# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:– २/१/२०१८

**दि. २/१/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**१५**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक २/१/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ५ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ६ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ७ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ८ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| ९ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| १० | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| ११ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती जया प्रकाश माखिजा, २. श्रीमती पंचम उमेश कालानी, ३. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ४. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा, ५. श्री. भारत रामचंद्र राजवानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
४. श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर
५. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. संतोष जाधव, सहा. लेखा अधिकारी

७. श्री. अशोक जाधव,सहा. लेखा परिक्षक
८. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
९. श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार
१०. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
११. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
१२. श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
१३. श्री. प्रदिप गोसावी, सहा. पोलिस आयुक्त, उल्हासनगर वाहतुक विभाग
१४. श्री. अनिल सोनवणे, पोलिस निरिक्षक, उल्हासनगर
१५. श्री. आगव, पोलिस निरिक्षक, उल्हासनगर
१६. श्री. मवाळे, सहा.आयुक्त
१७. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
१८. श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त, विधी
१९. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
२०. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त, साप्रवि
२१. श्री. बाजीराव जाधव,प्र. सहा. आयुक्त
२२. श्रीमती अलका पवार, प्र. सहा. आयुक्त
२३. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२४. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
२५. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२६. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२७. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

दुपारी ३.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक ३/१०/२०१७ (त्यात दिनांक ५/१०/२०१७, ९/१०/२०१७ व १६/१०/२०१७), १६/१०/२०१७, १६/११/२०१७, २४/११/२०१७, ८/१२/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**एवढया उशिरा इतिवृत्त का दिले?

**महापालिका सचिव:—**दिनांक ३/१०/२०१७ (त्यात दिनांक ५/१०/२०१७, ९/१०/२०१७ व १६/१०/२०१७) या सर्व एडजॉन झालेल्या सभा आहेत.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**नाही, एवढया सभा एडजॉन नाही झाल्यात.

**महापालिका सचिव :—**एडजॉन सभा लिहिल्या आहेत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**सभा एडजॉन केल्यानंतर लगेच कायम होण्यासाठी कशा येतील?

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**१६/१०/२०१७ ची सभा तीन वेळा स्थगित झाली आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**१६/१०/२०१७ चे इतिवृत्त १६/११/२०१७ मध्ये यायला पाहिजे होते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**होय ठिक आहे, प्रत्येक सभेचे इतिवृत्त लगेच आले पुढच्या सभेत आले पाहिजे.

**महापालिका सचिव :—**भरपुर आहेत इतिवृत्त. तेवढा स्टॉफ नाही.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**होय, ठिक आहे. तसे तर प्रत्येक सभेत आपण बोलतोच ना इतिवृत्ताची वाट न पाहता त्यात काय झाले.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**इतिवृत्ताबाबतच मी बोलत आहे. ८/१२/२०१७ रोजी एक विषय होता पत्र्याच्या घरातच आरसीसी बनविले होते. आरसीसीच्या घरास परत पत्र्यात रुपांतर करण्यासाठी कर विभागाने विषय येथे आणला होता. तो व्यक्ती तीन वर्षापासुन पिडीत होता. त्याचा कर पत्र्याविषयीचा होता आणि घर सुध्दा पत्र्याचे होते, ते आरसीसीचे करुन टाकले होते. तो विषय आपण वगळला यासाठी होता की पुढच्या सभेत त्याचा खुलासा झाला पाहिजे की कोणत्या अधिका—याच्या चुकीमुळे तो व्यक्ती पत्र्याच्या घरात राहत आहे. त्याच्या घरात आरसीसीचा कर आणला. व आपली महापालिका सांगते की ते घर आरसीसी नाही, पत्र्याचेच होते, तर त्यास डीलीट केले जावे. तर त्यावेळी आम्ही म्हटले होते की याची तपासणी करुन कोण अधिकारी आहे हे सभेत आणले पाहिजे. कारण की हा अत्याचार त्या व्यक्तीसोबत होत आहे. त्याने २—३ वर्ष भटकुन भटकुन हा विषय आणला. तसेच आम्ही तो विषय जेव्हा वगळला, तेव्हा तो व्यक्ती सर्व अधिका—यांकडे गेला. तो व्यक्ती माझ्याकडे सुध्दा आला त्याने म्हटले की त्यात आपली चुक नाही आम्ही जाणुन घेवु इच्छितो की कोणता अधिकारी आहे त्याने करआकारणी करुन ते घर आरसीसी केले आहे. तर याप्रकारचे विषय राहुन जातात तर त्यामुळे मी हे विचारत आहे की हा विषय का नाही आणला. व त्या विषयाबाबत काही अहवाल आला की तो विषय पडुनच राहिल. की असा व्यक्ती हा भटकतच राहिल. याबाबत मा. आयुक्त महोदय, आपण खुलासा करावा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यात मी एक विषय जोडु इच्छितो, मागील कालावधीत बॅरेक नं. ५३३ मध्ये एक जागी टीजी दाखविण्यात आले व त्यास १ + ३ ची पॅनल्टी सुध्दा लावली. तर त्यांनी डेप्यु ॲसेसर कलेक्टर व ॲसेसर कलेक्टर यांना पत्र दिले. त्यांनी पहाणी केली, आधी त्यांनी त्यास अर्ध रिव्हर्स केले. परत त्या माणसाने प्रश्न केला की माझे अर्धे रिव्हर्स का केले, माझे तर १९५० चे बांधकाम आहे. आजपर्यंतचे ते बॅरेकचे रुम आहे. परत आज त्यास रिवाईज्ड केले. तर तो माणुस ऑडीट विभागात गेलला, मी माझ्या कार्यकाळात पहिल्यांदा पाहिले की ऑडीट विभागातील ऑडीटरने जावुन तेथे व्हीजीट केली. मग त्यावर रिमार्क दिले. आयुक्त साहेबांची सही झाली मग स्थायी समितीमध्ये आले, तर स्थायी समितीमध्ये असा ठराव पारीत झाला की ज्या अधिका—याने हे केले आहे त्यावर कारवाई करा. तर पब्लीकला वारंवार हा त्रास होत आहे, चुकीच्या कर आकारणीमुळे. आजपर्यंत त्यांच्यावर काहीच कारवाई झाली नाही.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**एक विषय असा सुध्दा होता, ज्याचे जुने कर बाकी होते, तर ते तसेच ठेवले व नविन कर आकारणी केली.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**होय तो दुकानाचा विषय होता. सोना मार्केटचा विषय होता त्यात दुकान नं. १, २ व ३ असे होते. मग त्यावर अर्ज केला चेंज ऑफ नेम २००१ पासुन ते २००५ पर्यंत कर भरत नाही व जेव्हा कर विभागातील लोक त्याच्याकडे जातात तेव्हा तो म्हणतो की २००१ पासुन ते २००५ पर्यंत हा माझा प्रश्न आहे. ते प्रकरण सुध्दा मी त्यांना सांगितले होते, पत्र दिले ही आणि ती मालमत्ता एकच आहे. त्याची वसुली झाली आहे नाही आहे ते कर विभाग सांगेन.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**आमचा असा मुद्दा आहे की हे सर्व सांगितले पाहिजे, यात यायला पाहिजे. याचा अहवाल आला पाहिजे. आम्ही येथे मागतो तर अधिकारी सांगतात पुढील सभेत देतो परंतु पुढील सभेत अहवाल येतच नाही. आता परत इतिवृत्तात लिहिले जावे की ज्या व्यक्तीच्या घरास पत्र्याचे आरसीसी केले होते, तर तो आरसीसीतुन पत्र्यासाठी येथे तो विषय आला होता. तर तो विषय पुढील सभेत आला पाहिजे, हा सुध्दा आणि तो सुध्दा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**ते आले पाहिजे पुढच्यावेळेस, त्याचे समाधान झाले पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**मी संतोष जाधवांना बोलवितो.

**महापालिका सचिव :—**इतिवृत्ताचे काय?

**काही सदस्य :—**पास, पास.....

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक ३/१०/२०१७ (त्यात दिनांक ५/१०/२०१७, ९/१०/२०१७ व १६/१०/२०१७), १६/१०/२०१७, १६/११/२०१७, २४/११/२०१७, ८/१२/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. दिपक सिरवानी

**स्थायी समिती ठराव क्र. :— ६४ अ** **दिनांक : २/१/२०१८**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले मागील सभेचे दिनांक ३/१०/२०१७ (त्यात दिनांक ५/१०/२०१७, ९/१०/२०१७ व १६/१०/२०१७) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ८७ पर्यंतचे, दिनांक १६/१०/२०१७ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १५ पर्यंतचे, दिनांक १६/११/२०१७ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २९ पर्यंतचे, दिनांक २४/११/२०१७ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १६ पर्यंतचे, दिनांक ८/१२/२०१७ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २८ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. २ :—** माहे एप्रिल २०१७ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**हे काय आहे? काय ऑडिट केले? त्याचे फायनान्स काय आहे?

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षकः—** पहिल्या पानावर जे आकडे आलेले आहेत ते अर्थसंकल्पातील बजेटवर जे आहे ते दोन्ही कॉलमचे आहे, त्याच्या खाली जो पॅराग्राफ लिहिला आहे त्यात प्रत्यक्ष जमा किती झाले, यामध्ये महसुली जमेबद्दल भाष्य केलेले आहे. ऑक्टोंबर अखेर आपणांस १९६ कोटी ९७ लाख २७ हजार ९५८ इतके महसुल उत्पन्न अपेक्षित होते, प्रत्यक्ष पाहिले असता ते ३० टक्के आलेले आहे, म्हणजे ४५ कोटी ३९ लाख ८० हजार ६५ रुपये हे सर्व आकडे ऑक्टोंबर अखेरचे आहेत. त्यानंतर दुसरे पान जर आपण पाहिले तर तशीच माहिती आपण खर्चाबाबत दिलेली आहे. आता येथे जे उत्पन्न दिसेल आपणांस १५६ कोटी दिसेल मागचे जे उत्पन्न वाचले ते फक्त महसुली उत्पन्न होते. त्यामध्ये महसुली आणि भांडवली असे दोन्ही प्रकारचे आहे. त्या २५६ कोटीपेक्षा आता खर्च झालेला आहे २०७ कोटी ९० लाख ८ शे ५९ रुपये ज्यामध्ये सर्व प्रकारचे खर्च असतात, विकासकामे व इतर सर्व. मागच्या स्थायी समितीमध्ये प्रत्येक क्वार्टरने आम्हांस देण्याचे आदेश झाले होते आता दोन क्वार्टर झालेले आहेत. त्या दोन क्वार्टरचे आपण लेख्यावरील आम्ही भाष्य केलेले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मालमत्ता काय २५६ कोटी. हया महिन्यात तर आपले ३०—३२ कोटी झाले होते ना, मालमत्ताकराचे.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षकः—**हे बायफरगेट केले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**चला ठिक आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारेः—**महसुली किती आहे व भांडवली किती आहे?

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षकः—** महसूली उत्पन्न ४५ कोटी ३९ लाख, भांडवली आता तो आकडा येथे येत नाही. जो फॉर्मेट आहे ना त्यामध्ये महसुली उत्पन्नाचे असे येते व भांडवली आकडा येत नाही.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**लेखा शिर्षात तर सर्वच आले पाहिजे. मला काय म्हणायचे आहे २०७ कोटी तुम्ही खर्च केले मग बाकीचे आले कोठुन मग भांडवली आले. ते किती, त्यात ॲडमिनिस्ट्रेशनवर किती खर्च केला आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**एकुण तुम्ही जर धरले अ,ब, व क तर २६५ कोटी उत्पन्न आहे, आणि २०७ कोटी खर्च आहे. बॅलेंस ५७ कोटी दाखविले. ग्रॅण्ड वगैरे सुध्दा आहे ना?

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षकः—** बॅकेत?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—** तुम्ही जे बॅलेंस म्हटले आहे ते ॲक्चुअल आहे का? ५७ कोटी जी तुम्ही बॅलेंस दाखवत आहात त्याचा अर्थ असा आहे की ती बॅलेंस आपणाकडे आहे. व्हाट इज दिस बॅलेंस?

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षकः—** हे अकांउंटचे पुढेच जे पान आहे ना साहेब त्यात टाईप केलेले आहे साहेब, ते मेंटेन केले जातात.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—** असे दिसत आहे की तुमचा खर्च २०७ कोटी झाला मिळाले २५६ कोटी ग्रॅण्ड म्हणजे ५७ कोटी आपल्या अकाउंटला शिल्लक आहे काय?

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षकः—**वेगवेगळे अकाउंट आहेत ना साहेब.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**५७ कोटी शिल्लक आहे पैसे? शासनाचे ग्रॅण्ट वगैरे धरुन?

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षकः—**खात्री करुन सांगतो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**होय खात्री करा. ३१ ऑक्टोंबर कॅन नॉट बी द बॅलेंस.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वेः—**आबांचा प्रश्न जो होता तो किरकोळ प्रश्न होता. महापालिका आस्थापनेवर झालेला जो खर्च आहे आणि नागरीकांच्या सोयीकरीता केलेला जो खर्च आहे, तो किती टक्के झाला आहे, कसा झाला आहे त्याची जरा माहिती दया.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक:—**आतापर्यंत फारमेटमध्ये लेखाचा फक्त रिर्पोट येत होता. पुढच्या सभेत मी तुम्हांला त्याची विस्तृत माहिती देईल, टक्केवारसहित देईल. आता फक्त आकडेवारी पुरविलेली आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपण रिमार्कमध्ये फक्त एवढेच लिहिले आहे की उत्पन्न जो आहे ते कमी आहे. पेज नं. २ वर आपण लिहिले आहे बॉटम पेरा. २३ टक्के फर्स्ट पेजवर आहे याचे जे फायडिंगज आहेत जे सेक्शन १०५ मध्ये स्थायी समितीसमोर त्यांना अहवाल दयायचा आहे. त्यात ६(१) मध्ये त्यात अहवाल दिला आहे की स्थानिक संस्था कर, मालमत्ता कर, महापालिका मालमत्ता उत्पन्न, पाणी कर या सर्वांची वसुली कमी आहे. पहिली गोष्ट तर कमी का आहे व त्यावर आधार काय आहे? आपण विभाग काय अपेक्षा करतो की कशाप्रकारे याची वसुली करावी. फक्त असे लिहिण्याने की उत्पन्न कमी आहे, असे नाही त्याच्या पुढे सुध्दा आपणांस जायचे आहे. त्याचे उत्पन्न कमी होण्याचे कारण काय? २३ टक्के वसुली झाली. एप्रिल, मे, जुन, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर असे सात महिने. २३ टक्के झाले, तसे तर ६० टक्के व्हायला पाहिजे होती. त्याचे कारण काय याच्या डेप्थमध्ये आपणांस जायला पाहिजे.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक:—**यावर्षी आपण जे अंतर्गत लेखा परिक्षण सुरु केलेले आहे. पर्सेंटेजवाईज डिपार्टमेंट काढले.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**त्यांनी फायंडींग केले ते प्रत्येक वेळेस असते, त्यावर उपाययोजना काय?

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**साहेब, आधी हे काहीच नसायचे. ते यायला पाहिजे होते ते आले. आयुक्त साहेबांनी यांना सूचना दिली की प्रथम २०१७ चे येवु दया, २०१६ चे प्रलंबित आहे तर ते प्रलंबित ठेवु नका त्यास सुध्दा चालु ठेवा. आयुक्त साहेबांनी सूचना दिल्या तेव्हा आपणापुढे या वर्षाचे आले आहे. आता यामध्ये ६ महिन्याचे आहे त्यात वसुली कमी आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**याचे कारण असे आहे की आम्ही एस्टिमेट हाय ठेवली होती. प्रापर्टी टॅक्स असो किंवा डेव्हलोपमेंट चार्जेस, त्यात जे नॉमिनल आले असेल तो आपण जवळ जवळ ९० कोटी ठेवले, त्यात ४५ कोटी नुकसान झाले.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**ठिक आहे, यात मी आपणांस सूचना देवु इच्छितो, जसे श्री. हिरे साहेबांकडे जेवढे काही प्लान प्रलंबित होते. तेव्हा एक कॅम्प ठेवला होता. समोरासमोर इंजिनिअर बसायचे व ते सांगायचे व एका बाजुला डेव्हलोपर्स, आर्किटेक्ट बसायचे व सांगायचे त्यावेळी जागेवरच प्लान मंजुर होत असायचा. तर आपली वसुली ९० कोटीची येईल, आता आपणाकडे नगररचनाकार आले आहेत व एडीटीपी सुध्दा आले आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—** होय यावर आम्ही प्रयत्न करु, ते पद भरले आहे, परंतु तरी सुध्दा मला शंका आहे की होईल की नाही, प्रपोजलमध्ये एवढे डेव्हलोपमेंट चार्जेस, आम्ही वेटींग करु परंतु एवढे ९० कोटीचे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**दे आर वेटींग, जेवढया प्रापर्टी आहेत ते डेव्हलपमेंट करण्यासाठीच बनविल्या आहेत ना.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ते ठिक आहे. आपली सूचना चांगली आहे ती आम्ही करु. समरी युजबाबत आपण जे म्हणत आहात ना, जे छोटे प्लान आहेत त्याबाबत तर आम्ही दोन महिने आधीच सांगितले.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**मी सांगतो ना साहेब, त्याचा इश्यु सुध्दा सांगतो. आज फक्त एक आर्किटेक्टचे लायसन्स युज होत आहे. बाकी दुसरे कोणत्या आर्किटेक्टकडे आपण गेला तर ते म्हणतात की रिन्युव्ह नाही झाले तर रिन्युव्ह का नाही झाले तर टाउन प्लॅनर नाहीत, तर आपण त्यांना सूचना दया की ज्यांचे स्ट्रक्चर, लायसन्स पेंडींग आहेत त्यांना यावयास पाहिजे प्रत्येक सभेस., टाउनप्लॅनर व एडीटीपीस.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**प्लान पास करतेवेळी सर्व गोष्टींचे लक्ष ठेवले पाहिजे. जो प्रिमीयर चार्ज भरायचा असतो तो आपण घेत नाहीत. जर घेतले नाही तर परिस्थिती सुध्दा पाहिली पाहिजे. आपण घेतले नाही, ९—९ कोटी बाकी आहेत. त्या सर्व गोष्टी लक्षात ठेवली पाहिजे. जे सत्य आहे ते मी आपणांस सांगत आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**डेव्हलपमेंट चार्ज किंवा प्रिलीयम जे काही घ्यायचे आहे तर हे टीपी किंवा एडीटीपीचे काम आहे डेव्हलपमेंट करतेवेळी. त्याची वसुली करायची आहे

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>**जी गोष्ट झाली ती झाली परंतु येणाा—या प्रसंगी त्यावेळी सर्वांकडुन घेतले आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**गेले तरी आपण सोडु नाही शकत त्यासाठी कोर्टात केस चालु आहे.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी:—</u>**ती ट्रान्सफरंसी राहील.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>**आपले अधिकारी मदत करतात ना त्यावेळी कोर्टात जातात बिल्डर. महापालिकेचा पैसा बुडवुन.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**साहेब, काय माहित आहे का, थोडक्यात सांगाते, मागील वेळी जो घोटाळा झाला ना, त्यामध्ये प्लान पास करत असतांना एक वेळ खरोखरच पारदर्शकता होती. दोन्हीकडचे मंडळी असायचे, समोर आपले अधिकारी असायचे. पाहिले की जे ओके आहे ते केले व नाही झाले ते बाजुला ठेवले. त्यामध्ये प्रिमीयर भरला नाही तरी प्लान पास करुन दिले गेले. डेव्हलोपमेंटचा जो चार्जेस आहे त्याकरीता आपण प्रयत्न करतो. आता यावेळी जेव्हा घेणार तेव्हा ते प्रथम लक्षात घ्या. तोपर्यंत प्लान पास झालाच नाही पाहिजे जोपर्यंत येणे आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>** प्लानवर सहीच नाही झाली पाहिजे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**डेव्हलपमेंट चार्ज भरल्याशिवाय तोपर्यंत प्लान पास होतच नाही.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**जो संदर्भ कोर्टात आहे त्यासाठी आपण काय म्हणु शकतो.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**आपण काही म्हणत नाही.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>** जेव्हा आपण म्हणतो की शिबीर लावा, ज्या चुका आहे त्या दाखविल्या पाहिजे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**जे झाले ते ठिक आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>**होय परंतु पुढचे काय.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>**ठिक आहे. जो डीपी प्लान आहे तो आर्किटेक्टच्या सहीने येत आहे त्यांना तो सबमिट करु दया.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**हे पहा साहेब मी सांगतो प्रथम तर इश्यु असा आहे की जुन्या ज्या संचिका सबमिट होवुन अशाच पडुन आहेत आजच्या तारखेस त्या आर्किटेक्टचे लायसन्स रिन्यु झाले नाही.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>** लायसन्स रिन्युव्ह करुन देतो ना.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**तेच म्हणतो, रिन्युव्ह केल्याने मार्ग मिळेल. त्यास गती मिळेल आणि दुसरे जे मोठे प्लान आहे, त्यास तर आपणांस कंम्पलसरी आर्किटेक्ट लागणारच आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>**आता तर माझ्याकडे त्याचे कारण तर नाही. ९० दिवसाची जी मर्यादा आहे त्यामध्ये आम्ही करुन घेवु.

**<u>श्री. दादा पाटील, उप—आयुक्त, कर :—</u>**२६० होते.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**२६० आता सबमिट केले आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**जे काही असेल ते वुई कॅन सबमिट द प्लान.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**आधी ९० होते नंतर ६० केले. आता जो नविन जीआर आलेला आहे त्यामध्ये ईस्ट बिजनेस २०० मिटरचे आहे. त्यात सुध्दा म्हटले आहे की ३० दिवसात काढा.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**त्यात दुसरी गोष्ट अशी आहे की शहरात बोगस सनद सुध्दा चालु आहे. काम सुध्दा चालु आहे. बोगस सीडीच्या नावाने प्लान पास होत आहेत. खास करुन आपण लक्ष दिले पाहिजे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**हे पहा जेव्हा कोणता अधिकारी कोणत्याही प्लानवर सही करतो, सर्व कागदपत्र पाहुन, व्हेरीफाय करुन सहया करतो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–** लायसन्स रिन्युव्हचे जे विषय आहेत ना आर्किटेक्टचे, ते आपण १५ दिवसात करु शकतो. आता १०० मिटर, २०० मिटरचे जे रुल आले असतील

**श्री. मिलिंद सोनवणे, नगरचनाकार:–**त्यांना आधीच दिले आहे, त्यांनी फक्त रिन्युव्हसाठी अर्ज करायचा आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**पण दिले तर तुम्ही किती दिवसात करणार, आठ दिवसात?

**श्री. मिलिंद सोनवणे, नगरचनाकार:–**एका दिवसात सुध्दा होवु शकते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**चला आठ दिवसात करा.

**श्री. मिलिंद सोनवणे, नगरचनाकार:–**पण अजुनपर्यंत कोण समोर आलेले नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**आपले जे आर्किटेक्ट आहेत ना त्यांना सांगुन टाका, काही अडचण नाही. ॲक्चुअली सहा महिन्याचा आपला हा आरसा आहे. जसे आता वसुली नाही झाली, आपण अभय योजना राबविली, काही केले, हे नंतर झाले परंतु अभय योजने अगोदर ३५ कोटी आपणांस मिळाले, आपले उदिष्ट होते, किती होते प्रापर्टी करायचे उदिष्ट?

**श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर:–**२६० कोटी होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**बजेटमध्ये किती धरले होते? २६० ना, जवळजवळ १३ ते १४ टक्के आपली वसुली झाली आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**साहेब, विषय निघाला म्हणुन विचारतो, सेल्फ ॲसेसमेंट विंडो, ॲक्चुअली तुम्ही हा रिपोर्ट माझ्यामार्फत केला असता ना तर आपण हरकती व सूचना थोडक्यात तरी टाकले असते. आता आपण यामध्ये काय करत आहोत. कॅपीटल बेसवर तुमचे सॉफ्टवेअर अपडेशन चालले आहे, दुसरे जे युजर चार्जेस आहे, सेव्हरेज चार्जस आहे, सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट आहे ते सुध्दा आपण करत आहोत, त्यात सुध्दा वाढ होण्याची चांगली शक्यता आहे. तसेच जे काही कर विभागाशी संबंधीत विषय आहेत ते आपण आता महासभेपुढे आणत आहोत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–**२० फेब्रुवारीच्या आधी आपणास करायचे दर निश्चित करायचे आहेत. आज २ जानेवारी आहे, आपणाकडे वेळ १ महिना व २० दिवसच आहे. स्थायी समितीसमोर आपला प्रस्ताव आलेला नाही. २० फेब्रुवारी ही लिमिट आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:–**मागच्यावर्षी सुध्दा कर दर निश्चिती झाली नव्हती.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–**निवडणूकीमुळे झाले नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–** हा दोन लोकांचा विषय आहे. श्री. केणी तुमची फाईल कोठे आहे? रेट वाढविण्याचे वगैरे.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:–**साहेब, तुमच्याकडेच आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–** माझ्याकडे आहे.  आणि प्रापर्टी कराचे वगैरे? ती मोजमाप तर आपण घेतली आणि पार्किंगचे वगैरे ते विषय तुम्ही मुदतीत आपणा पुढच्या चार दिवसात. श्री. कुमावत जे पार्किंगची आपली चर्चा झाली आहे ते विषय लवकर आणावे.

**श्री. भगवान कुमावत, सहा. आयुक्त,मालमत्ता:–**होय साहेब.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**सर्व विषय तुमच्या मार्फतच येवु दया. आता काय तुम्ही माहिती दिली त्याचे प्रशासनाने काय दिले? ते येथे आले पाहिजे मग तुम्ही आमच्याकडे मंजुरीसाठी आणले पाहिजे. हे सांगण्यासाठी नेमके काय आहे तुम्ही काय केले आणि त्यानंतर काय अपेक्षा आहे. येथे काय होते की विभाग एक काम करतो त्याचे काम संपले, झाले.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**साहेब, दुसरी सूचना आहे, मी सहा महिन्यापासुन बोलत आहे. जर सदस्यांना मान्य असेल सेल्फ ॲसेसमेंट विंडो. कारण लोकांना माहित आहे की त्यांची जागा किती १००० स्केअर फुट आहे, किती आहे ते. करामध्ये त्यांना ५०० स्केअरफुटने बिल येते. ते घाबरुन सांगत नाहीत की माझी १००० स्केअर फुट जागा जास्त आहे. जोपर्यंत आपले अधिकारी तेथे पोहोचतात, कोणीही वाईट वाटुन घेवुन नका ते तेथे जावुन देणे—घेणे करुन काम करुन येतो. एक महिन्याच्या ट्रायल वर आपण का नाही विंडो ॲसेसमेंट करु या. जसे अभय योजना देतो, आपण मान्य केले त्याचा चांगला परिणाम मिळाला ना. ठिक आहे आपण एक महिना गेला परंतु २५ कोटी रुपये आपणांस १५ दिवसात आले. ३२ कोटी १५ दिवसात आले, अनॲक्सपेक्टेड २५ कोटी आपले आलेत. तर आपण जर सेल्फ ॲसेसमेंट विंडोजचे काम केले तर जेणेकरुन माणसे येवुन सांगतील की माझा घराचा एरिया एवढा आहे, मला एवढे येत आहे. आपणाकडे त्याचे ॲडव्हरटाईजमेंट झालेले नाही. साहेब, काय होत आहे ना की नविन दरामुळे कोणी येत नाही. आणि आपणाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही की त्यांच्याकडे जातील, आज ५० हजार मालमत्ता आहेत, ब्लॉक वर बिल्डींग बनल्या आहेत. त्याची वसुली केली आहे नाही केली आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**श्री. सिरवानीजी, लोकांकडुन अर्ज जे आले आहेत ना तर त्यानुसार सुध्दा कारवाई होईल. जर ते होत असेल ना तर विंडोजची आवश्यकता नाही. येणा—या करासाठी प्रत्येक अधिका—याने धाव घेतली पाहिजे. कारण ते आपले इनकम आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**एरियामध्ये एक दोन घरास १ + ३ चे जे बांधकाम करात आहेत ते लोक आमच्याकडे येतात की साहेब, बाजुवाला आहे त्यांना नाही आले, मला आले आहे. हा विषय गंभीर आहे जरा पहा व सांगा.

**श्री. दादा पाटील, उप—आयुक्त, कर:—**होय. मा. सभापती महोदय, मा. सन्माननिय सदस्य, आता सन्माननिय सदस्य श्री. सिरवानी यांनी जे सांगितले त्याबाबत आम्ही एक महिन्या आधीच आपण २७ टिम बनविली आहे, निरिक्षकांची. तर त्या लोकांनी रोज १० मालमत्तांचा सर्व्हे करायचा आहे. म्हणजे १० केले तर २७ लोक २७० मालमत्ता दररोज करतील. व एका महिन्यात ५००० च्या वर होईल. तर या महिन्याचा आढावा घेण्यात आला होता, तर या महिन्यात आपले नविन ॲसेसमेंट दिड कोटीचे झाले आहे. व येणा—या दोन महिन्यात ९० टक्के जी काही ॲसेसमेंट झाली नाही ती आपण ९० टक्के करुन टाकु. व मार्चपर्यंत वाटते जास्तीत जास्त सर्व मालमत्ता कव्हर होतील. दररोज आपले २७० मालमत्ता ॲसेस होत आहेत.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**अभय योजनेच्यावेळी आयुक्त साहेबांनी जसे केले तशी ॲडव्हरटाईज दिली तर स्वत: लोक येथे येवुन फॉर्म भरतील.

**सदस्य श्री. दादा पाटील, उप—आयुक्त, कर:—**आम्ही स्वत: त्यांच्याकडे जात आहोत, आम्ही यादी दिली आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**तरी सुध्दा एक सिंम्पल फॉर्म असेल, नाव, एरिया, ब्लॉक वगैरे. आपण एक फॉर्म निश्चित करा आपल्या महापालिकेस एवढे इनकम येईल. आपण एक महिन्यासाठी असे करुन तर पाहु शकतो.

**सदस्य श्री. दादा पाटील, उप—आयुक्त, कर:—**नाही, करु शकतो. परंतु आपण स्वत: २७ टिम पाठवित आहोत. दररोज २७० मालमत्ता होतात.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**ठिक आहे, येत आहेत तर चांगली गोष्ट होईल. दर महिन्यास ५००० होईल. तर दहा महिन्याला ५० हजार होतील.

**सदस्य श्री. दादा पाटील, उप—आयुक्त, कर:—**आपण ना, १६ कोटीचे नविन बिल जनरेट केले आहेत.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**आपणांस शासनाकडुन जी एलबीटी येते जी अपेक्षित होती २८ कोटी ३३ लाख ती आली फक्त ८ कोटी ७५ लाख.

**<u>सदस्य श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर:–</u>**कुठली आली, अनुदान?

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>**स्थानिक संस्था कर तुम्ही लिहिले आहे.

**<u>सदस्य श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर:–</u>**अनुदान तर येते शासनाकडुन.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>**माहे ऑक्टोंबर १८ अपेक्षित उत्पन्न स्थानिक संस्था कर २८ कोटी ३३ लाख आणि प्रत्यक्ष उत्पन्न आहे ८ कोटी ७५ लाख. आपण यात लिहिले आहे,हे काय आहे.

**<u>श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक:–</u>**साहेब, ऑक्टोंबर १७ अखेर अपेक्षित महसुली उत्पन्न आपण अंदाजपत्रकात जे आकडे लिहिले आहेत त्यात टाकले आहेत.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**ठिक आहे.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. २ :–** माहे एप्रिल २०१७ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ नुसार माहे एप्रिल २०१७ पासुन आक्टोबर २०१७ अखेर पर्यंतची जमा खर्चाचा एकत्रित अहवाल खालील प्रमाणे सादर करित आहे आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. ही विनंती

<u>जमा:–</u>

वित्तीय वर्ष २०१७–२०१८ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | २ |
| “अ” | ४९५१८५१५०० |
| “ब” | १५०००००० |
| “क” | १५७२१०३००० |
| एकूण | ६५३८९५४५०० |

**सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.**

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ३२०६०७६५०० |
| ३ | शासकीय अनुदान | २२९०२५०००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | ३३४१२५००० |
| ५ | एकुण | ३७६९२२६५०० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ३८४७५००० |
| ७ | एकुण :– | ३८०७७०१५०० |

वित्तीय वर्ष २०१७–२०१८ च्या अर्थसंकल्पात सुधारीत महसूल जमा रक्कम रुपये **३३७६६७६५००**/– अपेक्षित धरलेली आहे. माहे आक्टोबर २०१७ अखेर समप्रमाणात रुपये

१९६९७२७९५८/— महसूल उत्पन्न अपेक्षित होते. आरंभिची शिल्लक वगळता प्रत्यक्षात रुपये ४५३९८०९६२/— (एकूण अपेक्षित महसूल जमेच्या २३ टक्के) महसूल उत्पन्न प्राप्त झाले आहे.

माहे , एप्रिल २०१७ ते आक्टोबर २०१७ अखेर प्रारंभिक अंदाजानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष | | सन २०१६—१७ चे अंदाजे महसूली उत्पन्न | माहे आक्टोबर २०१७, अखेर अपेक्षित महसूली उत्पन्न | माहे आक्टोबर ,२०१७ अखेर प्रत्यक्ष महसूली जमा उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| | अर्थ संकल्प "अ" | १ | २ | ३ |
| १ | स्थानिक संस्था कर | ४८५८००००० | २८३३८३३३३ | ८७५३९९६३ |
| २ | मालमत्ता कर | १५६४५००००० | ९१२६२५००० | १७५६७७०२२ |
| ३ | एम. आर. टी. पी. वसूली | ९०१५०० | ५२५८७५ | ५७४७५० |
| ४ | अनाधिकृत बांधकाम दंड वसूली | १००००००० | ५८३३३३३ | .० |
| ५ | मार्केट | १००००००० | ५८३३३३३ | ० |
| ६ | रुग्णालय फी | ६००००० | ३५०००० | ३११६६५ |
| ७ | परवाना व इतर फी | ६९२००००० | ४०३६६६६७ | ५७९९२२६ |
| ८ | संकीर्ण | २८६७५००० | १६७२७०८३ | ६४३१९३५ |
| ९ | महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न | १५९६००००० | ९३१००००० | ४७६८८७९ |
| | **एकूण "अ"** | **२३२९२७६५००** | **१३५८७४४६२५** | **२८११८३४४०** |
| | **अर्थसंकल्प "ब"** | | | |
| | **महसूल उत्पन्न** | **१००००००** | **५८३३३३** | ० |
| | **एकूण "ब"** | **१००००००** | **५८३३३३** | ० |
| | **अर्थसंकल्प "क"** | | | |
| १ | पाणी बिल वसुली (कर) | ५००००००००० | २९१६६६६६७ | १०९३१९९८८ |
| १ (अ) | पाणी बिल वसुली (पाणी पट्टी) | ६००००००० | ३५०००००० | ४८०७७८१ |
| २ | मालमत्ता कर | ४७५०००००० | २७७०८३३३३ | ५१३८३८६१ |
| ३ | परवाना/इतर फी | १११००००० | ६४७५००० | ७२८५८९२ |
| ४ | संकीर्ण | ३००००० | १७५००० | ० |
| | **एकुण "क"** | **१०४६४०००००** | **६१०४०००००** | १७२७९७५२२ |
| | **एकुण "अ","ब" व "क"** | **३३७६६७६५००** | **१९६९७२७९५८** | **४५३९८०९६२** |

सन २०१७—१८ च्या 'अ''ब'व'क' मूळ अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ६५७८४२९५००/— (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले आहे. मात्र प्रत्यक्षात माहे , एप्रिल २०१७ ते आक्टोबर २०१७ अखेरपर्यंत मुळ अंदाजपत्राकाच्या अनुषंगाने रू. २६५२२०१८४७/— (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे.

लेखा परिक्षण विभागात पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवता येत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील वर्षाचे जमेचे लेखापरिक्षण करण्यात येत असून, अनियमितता आढळल्यास सदर बाब संबंधीत विभागच्या निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतात.

<u>खर्च—</u>

माहे एप्रिल २०१७ ते आक्टोबर २०१७ अखेर पर्यंत मुळ अंदाज पत्राच्या अनुषंगाने २०७९००८७५९/— खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसूलाच्या ७८.३९ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे आक्टोबर,२०१७ पर्यंतची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे—माहे एप्रिल २०१७ ते आक्टोबर २०१७, अखेर मध्ये महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा—यांची ६२ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ०६ (१) अ च्या तरतुदीप्रमाणे):— अर्थसंकल्पिय अंदाजाप्रमाणे महानगरपालिकेस फारच कमी उत्पन्न मिळाले आहे. त्यामुळे १) स्थानिक

संस्था कर २) मालमत्ता कर ३) महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न ४)पाणी बिल वसूली (कर) ५) पाणी बिल वसुली(पाणीपट्टी) या महसूली उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ६५ **दिनांकः— २/१/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे एप्रिल २०१७ अखेरपर्यंतचा महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांच्या अहवालाची नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर शहरातील वाहतुक नियमासाठी घेण्यात आलेल्या अतिरिक्त २५ ट्राफिक वार्डन यांना अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत.

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**या वार्डनच्या विषयात त्यांचे अधिकारी आले आहेत?

**श्री. यशवंत संगळे, प्र. वाहन व्यवस्थापकः—**होय आले.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**आपण जे वार्डन दिले आहेत तसे तर आपण २५ वार्डन देत होतो. एक वर्षात आपण त्यांना २० वाढवुन दिलेत, ४५ वार्डन दिलेत. आयुक्त साहेब म्हणाले होते की आपण याचे वेगळे प्रस्ताव देणार आहोत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** दिली ना मंजुरी २५ लोकांना.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—**एकुण ७५ वार्डनचा विषय आहे, त्यांची मागणी आहे. जरा समजावुन सांगावे.

**श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :—**मा. सदस्य, ब—याच ठिकाणी वाहने जास्त असल्यामुळे थोडी जरी गाडी बंद पडली की लगेच ट्रफिक होते, छोटया छोटया गोष्टीमुळे. तर अशावेळी जर एखादावार्डन जर ठेवला तर ट्रफिक समस्या कमी होईल. तसेच एक वार्डन ठेवण्यापेक्षा दोन दोन तीन तीन वार्डन जर ठेवले तर फायदा होईल साहेब. आताचे जे वार्डन आहेत त्यांना साप्ताहिक सुट्टी सुध्दा घेता येत नाही. जर आणखीन वार्डन वाढले तर त्यांना साप्ताहिक सुट्टी तरी मिळेल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—**या ७५ पैकी ऑनडयुटी किती लोक राहतात?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**वार्डनच्या डयुटीचा टाईम काय.

**श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :—**काही काही मुद्दे असे आहेत की त्यात डबल शिफ्ट होणे आवश्यक आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**कोठे?

**श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :—**शिवाजी चौक, शास्त्री चौक...

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**किती वाजेपासुन?

**श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :—**पहिला ७ ते २ व दुसरा २ ते ११ पर्यंत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**एवढी काय आवश्यकता आहे?

**श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :—**सकाळी ट्रफिक होते ना, ११ वाजेपर्यंत तर वार्डनची आवश्यकता आहेतच.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**होय ते दयायला पाहिजे ना हो. सध्या आतापर्यंत जे दिलेले आहेत त्यांचा वापर व्यवस्थित होत नाही. त्याचे युटीलायझेशन बरोबर होत नाही, कारण आम्ही पाहत असतो. आता तुमच्याकडे एकुण किती आहेत?

**श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :—**३५ वार्डन येतील.

**सदस्य श्री. धनंजय बोडार :—**आणि ४ नंबरला?

**श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :—**१० आहेत.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**३५ आणि १० हे एकुण ४५ झाले उल्हासनगरसाठी. परंतु ट्रफिकची समस्या आधी होती तशीच आहे. यात काय फरक पडला काय? आता ४५ वार्डन दिल्यानंतर थोडी तरी समस्या मिटली पाहिजे. ज्यावेळी ट्रफिक होते त्यावेळी वार्डन आणि ट्रफिक पोलिस अडवतात. ठिक आहे, कारवाई झालेली पाहिजे. तर सर्व वार्डन पवईला कंट्रीबार आहे तेथे बाजुला सर्व उभे असतात व ट्रफिक झाली तर तेथे कोणीच नसते, म्हणजे चार, चार व पाच पाच एकाच ठिकाणी. कारवाई झाली तर निश्चीत त्या चौकात चार,चार व पाच, पाच असतील. शिवाजी चौकात सुध्दा १७ सेक्शनला एका कोप—याला ट्रफिक जाम होते आम्ही तिकडुन जातो. कोप—याला कमीत कमी ४ ते ५ ट्रफिक वार्डन असतात. अशी परिस्थिती आहे. मग अशा वेळी तुम्हांला सव्वाशे दिले तरी कमीच पडणार आहेत.

**श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :—**आपले म्हणणे बरोबर आहे, नेहरु चौक जे आहे तेथे कमीत कमी ८ ते १० वार्डन रोज लागतात.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**ते बरोबर आहे परंतु आमचे म्हणणे एवढे आहे की तुम्ही त्यांच्याकडुन काम करुन घेतले पाहिजे. आपणांस जे वार्डन दिले आहे त्यांच्याकडुन काम करुन घेतले पाहिजे. ती जबाबदारी तुमची आहे परंतु तुमच्याकडुन ते काम करुन घेतले जात नाही. असे आमचे म्हणणे आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**काय आहे साहेब, किरकोळ गोष्टी आहेत. आता आपण तीन नंबरला जर आलो डर्बी हॉटेलसमोर, आता तेथे रस्ता कटिंग करुन ठेवला आहे. तेथे दोन रिक्षाच्या लाईन लागतात आम्ही महापालिकेसाठी टर्न मारायला गेलो तर अडचणी येतात, ठिक आहे तेथे कल्याणच्या रिक्षा लागतात. पण काही गोष्टी आहेत ना साहेब, तुमच्याकडुन कारवाई करणे आम्हांला आपणाकडुन अपेक्षा आहे. दोन लाईन ऐवजी एक लाईन लावली तर टर्न मारायला बरे पडते. पुढे तेथेच बाजुला टायरवाई आहे, दोन तीन जण आहेत, डर्बीच्या बाजुला आहे. निलमच्या पुढे आहे. जातांना तुम्ही पाहाल तर ॲपल बारच्यासमोर आटो लावलेल्या असतात तेथुन टर्नवर ती अडचण येते. तुमच्याकडुन कारवाई होत नाही त्यामुळे त्या सतत उभ्या राहतात. या किरकोळ गोष्टी पाळल्या तर वार्डन सुध्दा लागणार नाही. त्यांच्यावर कारवाई होत नाही रिक्षावाल्यांवर. सर्व भाडे सोडायला येतात व श्रीरामकडुन जे येतात त्याची वाट पाहत बसतात व ३ नंबरकडुन येणारा असतो तो येतो त्यामुळे अडचण होते.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**तसेच श्रीराम येथे रात्री नऊ वाजता लक्झरी उभ्या असतात.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**तुमचा प्रस्ताव होता की श्रीरामला डिवायडर टाकावे, डिवायडर टाकले आपण. त्यानंतर ॲपल हॉटेल तेथे ट्रफिक जाम होते तेथे वार्डन नाहीत. ठराविक ठिकाण आहेत, जंगम हॉटेल व इकडचे हिरा मेडिकल. नेहमी त्या ४ नंबर मध्ये ट्रफिक जाम होते. ४ नंबर मार्केट आणि श्रीराम हे दोनच ठिकाण आहेत, ते ट्रफिक सेशन आहे तेथेही आपण १० वार्डन मॅनेज करु शकता. नेहरु चौकात ट्रफिक आहेच.

**<u>श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :—</u>**नेहरु चौकाची समस्या अशी आहे, मेन मार्केट आहे तेथे उल्हासनगरच्या सर्व गाडया येतात. अरुंद रस्ते आहे, ट्रफिकचा प्रश्न येतोच नाहीतर ट्रफिक जाम होत नाही. परंतु वाहतुक चालुच असते. वाहतुक बंद पडली किंवा जाम झाली असा काही प्रश्न आला नाही. जाम म्हणजे कसे असते की जसे ठाण्याला दोन दोन तास वाहतुक जाम होते तसे असते. तसे आमचे होत नाही माझ्या मते. वाहतुक जाम होणे असे होत नाही. आता रस्ते लहान असल्यामुळे वाहतुक मोहिम मध्ये असणे हे महत्वाचे आहे आणि वाहतुक मोहिममध्ये असतेच.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>**काही गोष्टी तुमच्याकडुन सुध्दा झाल्या पाहिजेत. व्हीटीसी येथे काम चालु आहे, एक बाजुला २५ फुटाचा रस्ता बनवायचा म्हटला तर एक बाजुचा रस्ता खोदल्यानंतर तेथे डायवर्शन देण्यासाठी एक तरी वार्डन असला पाहिजे परंतु तसे होत नाही. ठेकेदाराला विचारले तुझ्याकडे परवानगी आहे का, त्याने परवानगी दाखविल्यानंतर पुढे काय डायवर्शन दाखविण्यासाठी काही तरी सुमोटो योजना केली पाहिजे ना.

**<u>श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :—</u>**माझ्या हद्दीतील सांगतो मी म्हणजे १,२, व ३ चे सांगतो मी.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>**मी एकत्रित प्रशासन म्हणतो.

**<u>श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :—</u>**होय मी ४ नंबर येथे नाही ना ते सांगतो.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**पण आम्ही उल्हासनगरच्या समस्या तुम्हांस सांगतो ना.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**तसे नाही आमच्याकडे सुध्दा अडचणी आहेत. त्या अडचणीचा उपाय सुध्दा आम्ही सांगत आहोत. रिक्षावाल्याच्या दोन लाईन जर लावायला लागले ना तर ती लोक पुन्हा ऐकणार नाहीत तुमचे. या ज्या काही गोष्टी आहेत ना त्या किरकोळ गोष्टी आहेत त्या तुम्ही करु शकतात.

**<u>श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :—</u>**बरोबर आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**यामध्ये काय आहे, हा जो विषय आला आहे तर वार्डन देणे तर आवश्यक आहेच पण आमचे असे म्हणणे आहे, आता जर आपण अहवाल वाचाल, तर २०१४—१५ मध्ये आपण २५ वार्डनने काम चालवत होतो. त्यानंतर १६—१७ मध्ये आपण २० वार्डन वाढवुन दिलेत. ४५ वार्डन झालेत. काम बरोबर न झाल्यामुळे २५ वार्डनचा जेव्हा नवव्या महिन्यात विषय आला होता तो विषय आम्ही रिजेक्ट केला. आता दुसरा प्रस्तावाबाबत आयुक्तांचे काम चालु आहे की वार्डन उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात असले पाहिजे. आमचा एक नियंत्रण अधिकारी असला पाहिजे, जोपर्यंत ही प्रक्रिया पुर्ण हाईल तोपर्यंत आपण २५ वार्डन वाढवुन देवु. आपण ठरावात उल्लेख करावा, हे एक वर्षासाठी नाही, उल्हासनगर महापालिका आपले नविन काम वार्डनच्याबाबत संपुर्ण माहिती जोपर्यंत बनवत नाही तोपर्यंत एक वर्ष किंवा जोपर्यंत महापालिकेद्वारे या ट्रफिक विभागाचे वार्डन एक वर्षासाठी देत आहोत. आधी २० होते त्यात आता २५ देत आहोत. आपली समस्या अशी आहे की आपल्या शहरात दोन समस्या आहेत एक सेनीटेशन व दुसरे ट्रफिक. सेनिटेशनबाबत भारत देशावर आपला क्रमांक २०७ वर होता. आयुक्तांची मेहनतमुळे आपण संपुर्ण भारतभर एक नंबरवर पोहचत आहोत, २०७ वरुन आणि आपण टॉपटेनमध्ये आलोच पाहिजे. ट्रफिक ही आपली दुसरी समस्या आहे ७५ काय १०० वार्डन देवु परंतु आपणाकडे चांगला परिणाम आला पाहिजे. आज आम्ही २५ वार्डन देत आहोत परंतु जर आम्हांस परिणाम मिळाला तर ८५ देवु शकतो. तसेच आयुक्त महोदयांनी म्हटले की चार हजार पगारात काय होत नाही. आम्ही स्वतः म्हणत आहोत, आम्ही त्यांचा पगार दहा हजार सुध्दा करु. आपण चांगला परिणाम दया आम्ही वार्डन वाढवुन घेवु. २५ वार्डन तर देतच आहोत त्याचबरोबर शहरातील दोन समस्या ज्या आहेत ट्रफिक आणि सेनिटेशन यांच्यापासुन मुक्ती मिळु दे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>**आता त्याचा परिणाम २० च आहे २५ दिल्यानंतर परिणाम दिसेल.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**नाही, नाही, ३५ आहेत ना.

**श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक:–**२५ लोकांचा प्रस्ताव आला होता, सप्टेंबर महिन्यात. आधी २० वार्डन होते. नंतर २५ वार्डनचा प्रस्ताव आला. आपण तो विषय वगळला होता.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**मग २५ दिल्यानंतर आता किती होणार.

**श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक:–**४५ च होणार. ३५ वार्डन १,२,३ ला आहेत. १० वार्डन विठ्ठलवाडी स्टेशनला आहे. आणि त्यात आधी ५ वार्डन विठ्ठलवाडीला होते व २० वार्डन यांच्याकडे होते, हा फरक होता.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**आता विठ्ठलवाडी येथे ५ च आहेत?

**श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :–**नाही, आता विठ्ठलवाडी येथे १० आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**आजच्या घडीला उल्हासनगरमध्ये किती वार्डन आहेत?

**श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक:–**४५ होतील हे पकडुन....

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**हे पकडुन नाही हो, हे तर मंजुरी दिल्यानंतर येतील ना. तुम्ही कशाला कनफ्युज करत आहात २० च आहेत ना आता. हे पकडुन ४५ होतील, म्हणजे आजच्या घडीला २० च लोक काम करत आहेत.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**४५ पैकी १० इकडे आहेत आणि ३५ तिकडे आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**साहेब,आपण जे म्हणत आहात ना की परिणाम का नाही दिसत ते अजुन रस्त्यावर यायचे आहेत व हे झाल्यावर मग आपण त्यांना विचारु शकु. व्यवस्थितपणे तुमची जबाबदारी राहील, हे वाढवुन दिल्यानंतर. त्यांचा पगार सुध्दा आता चार हजार आहे तर तो दहा हजार मंजुर करुन घेवु.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**पुढील सभेत होईल ना.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**होय, पुढील सभेत होईल. पण त्यानंतर समरल डे विल बी डिसमिस.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**२५ ची मान्यता देत आहोत. यामध्ये असे लिहा की प्रशासन जोपर्यंत आणत नाही किंवा जास्तीत जास्त १ वर्षापर्यंत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**आपण नाकारला होता आता तीन महिन्यानंतर आला आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**श्री. सोनवणे साहेब, जरा श्रीमती पंजाबी महोदयांचे काय म्हणणे आहे ते सुध्दा पहा.

**श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :–**होय.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**हा विषय पारीत करा, इतिवृत्ताची वाट न पाहता.

**श्री. सोनावणे, सहा. पोलिस निरिक्षक :–**ठिक आहे, आभारी आहे.

**महापालिका सचिव :–**ठरावात असे टाकते जोपर्यंत प्रशासन नविन प्रस्ताव आणत नाही तोपर्यंत जास्तीत जास्त १ वर्षापर्यंत.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :–** उल्हासनगर शहरातील वाहतुक नियमासाठी घेण्यात आलेल्या अतिरिक्त २५ ट्राफिक वार्डन

यांना अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत उल्हासनगर शहरातील वाहतुक कोंडीच्या समस्या दुर होणेसाठी शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व विठ्ठलवाडी यांना शहरातील वाहतुक समस्यांचे निराकरण करणेसाठी आता पर्यंत खालील प्रमाणे मंजुरी प्राप्त होवुन अर्थसहाय्य मंजुरी दिली आहे.

१) मा. स्थायी समिती ठराव क्र. ०१, दिनांक १३/०९/२०१२ अन्वये २० ट्राफिक वार्डन यांना अटी व शर्तीच्या आधारे मानधन तत्वावर अर्थसहाय्यस मंजुरी दिलेली होती.

२) सदर वार्डन यांचा एक वर्षाचा कालावधी संपुष्ठात आला असता मा. स्थायी समिती ठराव क्र. ५६, दिनांक १७/१२/२०१३, अन्वये वार्डन यांची सेवा सन २०१३–१४ साठी चालू ठेवून आणखी ५ ट्राफिक वार्डन म्हणजे एकुण २५ वार्डन नेमणेस व त्यांचे मानधन रू.२००० च्या ऐवजी रू.४०००अशी वाढ करण्यास मान्यता दिलेली होती.

३) सन २०१४–१५ मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. ७१, दिनांक ०२/०१/२०१५ अन्वये २५ वार्डन यांना मुदतवाढ दिली.

४) सन २०१५–१६ मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. १००, दिनांक १४/०३/२०१६ अन्वये २५ वार्डन यांना मुदतवाढ दिली.

५) सन २०१६–१७ मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. ८१, दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये २५ ट्राफिक वार्डन यांना अर्थसहाय्य मंजुरी दिलेली आहे.

६) सन २०१७–१८ मध्ये अर्थसहाय्य मंजुरी घेणेसाठी मा. स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर केला असता मा. स्थायी समितीने ठराव क्र. २७, दिनांक ०८/०९/२०१७ अन्वये २५ ट्राफिक वार्डन यांना मंजुरी देण्यास मान्यता दिलेली नाही.

वरील अ. क्र. ६ प्रमाणे २५ ट्राफिक वार्डन यांना अर्थसहाय्य मंजुरी दिली नसल्यामुळे पुण:शा प्रस्ताव सादर केला असता. मा. आयुक्त सो यांचे दालनात दिनांक १६/१२/२०१७ रोजी झालेल्या चर्चाअंती वाहतुक व्यवस्था हि शहरातील मुख्य समस्या असल्याने या समस्येला सुधारणे गरजेचे असल्यामुळे २५ ट्राफिक वार्डन यांना अर्थसहाय्य मंजुरी देणे गरजेचे आहे.

तरी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन २५ ट्राफिक वार्डन यांच्या अर्थसहाय्यास मंजुरी देण्याचे प्रस्तावित आहे.

१) संबंधीत २५ ट्राफिक वॉर्डन यांची नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहील.

२) संबंधीत २५ ट्राफिक वॉर्डन यांना प्रतिमाह रु. ४,०००/– एवढे मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक उपशाखा, उल्हासनगर विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.

३) ट्राफिक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.

४) ट्राफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ट्राफिक पोलिस विभागाची राहिल

५) याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याची जबाबदारी वाहतुक पोलिस विभागाची राहिल.

६) संबंधीत सर्व ट्राफिक वार्डन यांच्या उपस्थितीबाबत व कर्तव्याबाबत पोलीस विभागाचे नियंत्रण राहील.

सदर २५ ट्राफिक वॉर्डन यांचे मानधनापोटी वार्षिक रक्कम रु. १२,००,०००/– एवढा खर्च अपेक्षित असुन सदर खर्च वर्ष २०१७–१८ चे अंदाजपत्रकात A-I (24) Part- I (Traffic Sing) या लेखाशिर्षात रू. ३.७५ कोटी एवढी तरतूद उपलब्ध आहे.

या अनुषंगाने २५ ट्राफिक वार्डन यांना पुढील एक वर्षाकरीता अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ६६** **दिनांक:–२/१/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील वाहतुक नियमासाठी घेण्यात आलेल्या अतिरिक्त २५ ट्राफिक वार्डन यांना जोपर्यंत प्रशासन आपला नविन प्रस्ताव आणत नाही तोपर्यंत किंवा जास्तीत जास्त १ वर्षापर्यंत खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन अर्थसहाय्य देण्यास मंजुरी देत आहे.

१) संबंधीत २५ ट्राफिक वॉर्डन यांची नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहील.

२) संबंधीत २५ ट्राफिक वॉर्डन यांना प्रतिमाह रु. ४,०००/– एवढे मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस

आयुक्त, शहर वाहतूक उपशाखा, उल्हासनगर विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.

३) ट्राफिक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.

४) ट्राफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ट्राफिक पोलिस विभागाची राहिल

५) याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी वाहतुक पोलिस विभागाची राहिल.

६) संबंधीत सर्व ट्राफिक वार्डन यांच्या उपस्थितीबाबत व कर्तव्याबाबत पोलीस विभागाचे नियंत्रण राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उदयानांची निगा राखणे करीता लेबर व माळी व मजूर पुरवठा करणेच्या कामाची निविदा प्रक्रिया व सुरक्षा रक्षक पुरवठा करणेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**आपणाकडे गार्डन सुपरीडंट आहेत का? आपणाकडे गार्डन सुपरीडंटची पोस्ट आहे का?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**डी क्लास महापालिकेत पोस्ट नाही.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**पोस्ट नाही तर मग आपणाकडे असा कोणता अधिकारी आहे का जो रिटायर झाल्यानंतर त्यांना घेण्यासाठी आम्ही ब—याच अधिका—यांना सांगितले, ती लोक येथे चकरा मारत असतात, सार्वजनिक बांधकाम विभागात, पण कोण त्यांच्याकडे लक्ष देत नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**जरा याबाबत सांगावे काय आहे ते.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि:—**एकुण ६३ गार्डन आहेत उल्हासनगरमध्ये.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**६३ गार्डनची यादी दया, कोठे आहे?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि:—**आता दोन गार्डन नविन झाली आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**आता कोण कोणते गार्डन वाढत आहेत त्याची यादी दया. एक गार्डन १ नंबर बसस्टाप येथे बनविण्यासाठी आम्ही एमएलए निधी दिला होता. त्यास कंपाउड वॉल व गेट लावण्यात आले परंतु आपण त्याबाबत आजपर्यंत काहीच म्हणाले नाहीत. आणि हे जे पोलिस विभाग आहेत ना ते तेथे गाडी पकडुन आणतात व लावतात. कारण आम्ही तेथे कोणतेच झाड लावलेली नाहीत. १ नंबर बसस्टॉप येथे मागील बाजुस एक जागा पडुन होती. मी तेथे एमएलए फंडातुन कंपाउंड वॉल व गेट लावले गार्डन बनविण्यासाठी. परंतु ना आजपर्यंत तेथे कोणी अधिकारी व अभियंता आला नाही व काहीच म्हणाले नाहीत. तेथे आता पोलिस विभाग आपल्या गाडया

डंम्प करतात. आपण काय काय प्रोग्राम बनवत आहात व जे गार्डन बनविले गेले आहेत त्याची यादी सुध्दा नाही. त्यात टाका आता आणि असे काही नविन प्रस्ताव, आमच्या प्रभागात एक सुध्दा गार्डन नव्हते आज आम्ही कंपाउंड वॉल टाकुन गार्डनसाठी एक जागा ठेवली, २० वर्षापासुन ओरडुन ओरडुन, तर कमीत कमी गार्डन तर बनवा तेथे.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि:—**साहेब, १—१ प्रभागात ४ माळी आहेत.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**साहेब, त्या व्हीटीस गार्डन येथे वर्कर नाहीत, माळी सुध्दा नाहीत. अशी अवस्था आहे. आधी किती होते?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि:—**दोन माळी होते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**त्यासाठीच हा प्रस्ताव आणला आहे. यांचे माळी व लेबर सेवानिवृत्त झाले आहेत.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**महत्वाच्या आणि गंभीर विषयाकडे जरा लक्ष वेधतो. १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज जयंती आहे. गेल्या दोन—तीन वर्षापासुन जीजामाता उदयानाबाबत सतत पत्र देत आहे. आपण त्या उदयानाची अवस्था बघुन यावी. मी वारंवार पत्र देत आहे, त्याचे प्राकलन कधी होणार. त्याचे इंम्प्लीमेंट कधी होणार. निविदेसाठी जाणार मग निविदा होईल व काम कधी चालु होईल. संपुर्ण कलर गेला आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**जीजामाता व बालशिवाजी यांचा जो पुतळा आहे, बाजुला फाउंटन चालु केले तर फाउंटन बंदच आहे. तेथे हार टाकण्यासाठी सीडी नाही.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**सीडी नाही व प्रत्येक वेळेस आम्हांस लाकडाची सीडी आणावी लागते. काय माहित आहे साहेब, मग रागाने बोलायचे तर होत नाही. कसाला, कोणाकरीता बोलायचे आणि का बोलायचे, त्यांना वारंवार सांगितले तर ते म्हणता की आम्ही प्राकलन बनवुन ठेवले आहे. तर नुसते ठेवले म्हणुन चालणार आहे का? मला वाटते श्री. शेवकानी यांनी सुध्दा याबाबत तुमच्याशी चर्चा केली आहे. ते मला बोलले की साहेबांनी होकार दिला आहे की लवकर आणा म्हणुन. मग अडते कोठुन?

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आधी तर त्या सीडीची प्राधान्यता घ्यायची.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**आज दोन तारीख आहे व आणाकडे मुश्किल एक महिना आहे. जर ते १—२ तारखेला काम सुरु झाले तर पंधरा दिवसात काम होईल.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**सचिव महोदया, हा जो विषय आहे तो ४ नंबरचा आहे ना, मग तो स्थायी समितीचा आहे की महासभेचा आहे. कारण लिहिले आहे की महासभा विषय क्र. ४, दिनांक २/१/२०१८.

**महापालिका सचिव :—**टायपिंग मिस्टेक झाली आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**टायपिंग मिस्टेक सुध्दा होते काय, ठिक आहे हरकत नाही. याविषयामध्येच आपण जी झाडे वगैरे लावलीत, राज्य शासनाचे जे काही आदेश होते, वृक्ष लावणे, वृक्ष लागवड करणे, प्रत्येक प्रभाग समितीवाईज ५००—५०० झाडे लावलीत आपण. त्या झाडांची स्थिती काय, परिस्थिती काय ते सांगाल का यामध्ये? आपण प्रभाग समितीवाईज ५०० झाडे लावलीत का, जर लावली असतील तर त्याची काय परिस्थती आहे ती झाडे कोठे आहे, काय आहेत, त्याची देखभाल कोण करत होते? हे सांगा. पैसे खर्च करायचे महापालिकेचे.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि:—**त्याची परवानगी घ्यायची आहे व निविदा मागवायच्या आहेत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**महाराष्ट्र शासनाने २ कोटी मंजुर केले.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा जो विषय येथे आला आहे. आता आपणास वाचमन १६ पाहिजे, मजुर २४ पाहिजेत व १२२ माळी पाहिजे, तर यापुर्वी आपणाकडे किती माळी होते? किती मजुर होते? किती वॉचमन आपण मागविले होते?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि:—**होय दिले आहे ना. प्रभागवाईज दिले आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**निविदा मागविली आहे?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि:—**नाही याआधी निविदा नाही मागविली. आता मागवायची आहे. याआधी महापालिकेचे लोक होते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मग महापालिकेचे लोक कोठे जातील?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि:—**ते तर राहतीलच ना. कमी लोक आहेत ना.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**तर आपणांस हे जास्त पाहिजेत.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि:—**होय.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**आपण सांगावे की आपणाकडे माळी किती आहेत, वॉचमन किती आहेत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**महाराष्ट्र राज्य शासनाच्या आदेशानुसार लिहिले आहे की, ५०० झाडे लावण्यात यावी. तर शहरात जी झाडे लावलीत त्यांची स्थिती काय आहे? त्याची देखभाल कोण करत होते? ते जरा सांगावे.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि:—**आता हा जो प्रस्ताव आहे प्रभाग समिती १ मध्ये ४ माळी आहेत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**महाराष्ट्र राज्य शासनाच्या आदेशानुसार तर शहरात जी झाडे लावलीत त्यांची स्थिती काय आहे? ते जरा सांगावे.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**प्रत्येक प्रभागात गार्डनमध्ये किती माळी आहेत, वॉचमन किती आहेत ते सांगावे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**झाडाचे तर आधी सांगु दया, झाडे लावण्यात आली होती, जनतेचा पैसा आहे तो.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**यांनी यात लिहिले आहे ना की प्रत्येक प्रभाग समितीमध्ये ५००, ५०० करत असे दोन हजार झाडे लावलीत. तर हे सांगा की २ हजार झाडे कोठे, कोठे लावण्यात आली आहेत, त्यामध्ये किती जिंवत आहेत व किती गेलेत? याची जरा माहिती दयावी यांना.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब, काय आहे माहित आहे का, एक गोष्ट लक्षात आली असेल की जो विषय येतो, ज्या ज्या विषयाअंतर्गत आपण प्रस्ताव पाठवितो, ते कागदपत्र यांच्याकडे उपलब्ध असली पाहिजेत. सोबत तरी दिली पाहिजेत. आता हा विषय आलेला आहे यामध्ये आपणच म्हटले आहे की, प्रभाग क्षेत्रात ५०० असे करुन २००० झाडे लावली असून उदिष्ट पुर्ण करण्यात आले आहे. पुर्ण करण्यात आले तर सदस्य विचारणारच कोठे कोठे झाडे लावली आहेत, काय परिस्थिती आहे.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**साहेब, गार्डनचा गंभीर विषय आहे, आज मी पाच वर्षापासुन सांगत आहे, माझ्या प्रभागातील गार्डन किती चांगले बनविण्यात आले होते ते संपुर्ण खराब झाले आहे. तेथे नशेत असलेले लोक येतात व घाण करुन जातात. मी पाच वर्षापासुन सांगत आहे, मला माळी पाहिजे, माळी पाहिजे. पाच वर्षापुर्वी मी वृक्षप्राधिकरण समितीची सदस्या होती त्यावेळी सुध्दा मी सांगितले होते, त्यावेळी मला सांगण्यात आले होते की आमच्याकडे उपलब्ध नाही. किती आहेत ते तर सांगा आपण सांगत आहात ना की माळी आहे. मला का नाही मिळत माळी.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे::—**तेव्हा तर आपण हा प्रस्ताव घेत आहोत ना.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**आपण सांगत आहात ना की माळी आहे.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि:—**आता नाही आहेत. त्यासाठी हा प्रस्ताव दिला आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**यातच वेळ जात आहे, कर वसुलीसाठी, लोकांकडुन जबरदस्ती पैसे वसुल केले जात आहेत, त्यातच वेळ जातो. कर भरा, कर भरा.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**शासनाकडुन निधी आला होता ना.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**जनतेचा पैसा आहे ना, झाड कोठे लावले माहित नाही का तुम्हांला. पैसा जनतेचा, कर वसुली करता.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**आपण येथे लिहिले आहे की, प्रत्येक प्रभाग समितीमध्ये आपण दिले आहे, उदयान १२,१३,१९,१७ आवश्यक माळी ४ तर. १७ गार्डन येथे ४ माळी कसे जाणार? १९ गार्डन आहे ३ नंबर येथे तर आपले ४ माळी कसे जाणार?

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**आधी तर गार्डनची यादी दया मग नंतर बोलावे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>**माळीचा जो विषय आहे ना, जेथे आवश्यकता नाही तेथे काही गरज नाही, जेथे गरज असेल तेथे ते ४ माळीतुन १–२ जावुन काम करेल तरी चालेल. मोठे उदयान असेल तर जावु शकतात. आणि छोटे असेल तर तीन–तीन, चार–चार गार्डन ते दोन दोन दिवसात सांभाळतील. आता आपण थोडे बहुत निवड करु.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**एकुण ५ गार्डन एक माळीला पाहायचे आहे. आम्ही त्यात असे समजतो की ३ गार्डन छोटे आहेत व दोन गार्डन मोठे आहेत. उदा. नाना नानी पार्कचे गार्डन जेवढया साईजचे आहे, तर तेथे एक माळी आपणांस पुर्ण वेळ पाहिजे. हे पहा हा एव्हरेजचा विषयच नाही. हे असे झाले पाहिजे की जसे आता नेताजी गार्डन आहे तेथे आपणांस दोन माळी लागतील. सपना गार्डन आहे तेथे पुर्णवेळ दोन माळी लागतील. तसेच गोल मैदान आहे तेथे कमीत कमी दोन माळी पाहिजेत.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**त्यांनी जो प्रस्ताव आणला आहे, आता महापालिकेचे जे माळी आहेत त्यासोबत हे ॲडशनल असे काही आहे का?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**आपणाकडे जे आहेत त्यामध्ये ६ मिळविणार तरीदेखील यांच्याकडे १९ आहेत. नंतर काय भानगड होते साहेब माझ्याकडे माळी येतच नाही. जो येतो तो निघुन जातो, एका जागेतुन दुस–या जागी, दुस–या जागेतुन तिस–या जागी. हा ८ तासात किती किती वेळ पळणार? मोठया गार्डनसाठी आपण स्पेसिफिक एक ठेवा व छोटया गार्डनमध्ये २ किंवा ३ चे फिक्स डयुटी ठेवा की, हे ३ गार्डन पाहण्याची जबाबदारी तुमची आहे. अशाप्रकारे काय होईल की तो ४ एव्हरेजमध्ये, पावणेपाच एव्हरेजमध्ये पोहचणारच नाही.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**याची माहिती तर दया आधी यामध्ये आम्हांस समजतच नाही यामध्ये असे लिहिले आहे, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ मध्ये मजूर व माळी पुरविणेच्या रु. ३,७४,०१,९६०/– एवढा खर्च होत आहे. सदर खर्च उदयान दुरुस्ती या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीतून करणे आहे. सदर कामाचा कालावधी वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे ०१ वर्षाचा आहे, ठिक आहे पुढे काय लिहिले आहे की सदर कामाच्या प्रस्तावास मंजूरी मिळून निविदा प्रक्रिया करेपर्यंत डिसेंबर महिना पूर्ण होईल. डिसेंबर तर पुर्ण झाले आता. आता जानेवारी सुरु झाले. पुढे काय लिहिले आहे आपण, आर्थिक वर्ष संपण्याकरीता तीन महिन्याचा कार्यकाळ राहील. म्हणजे जानेवारी, फेब्रुवारीपर्यंत. त्यामुळे तीन महिन्याचा खर्च रु. ९३,५०,४९०/– एवढा खर्च होणार आहे असे लिहिले आहे. मग काय बाकी खर्च पुढील वर्षी करणार? मग पुढे निविदा करणार काय?

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**वॉचमनसाठी निविदा नाही करणार. शासनाचा निर्णय आहे. त्यानुसार सुरक्षा रक्षक आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंश वदारिया:–</u>**सुरक्षा रक्षक सुध्दा दिले पाहिजे ना साहेब.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**मुख्य तर वॉचमनचाच खर्च आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**२१ हजार ८४३ रुपये प्रत्येक महिन्यात होतात.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**जर आपण ते देत नसाल तर यामध्ये त्याची माहिती आलीच नाही पाहिजे. मंजुरी तर आपण घ्यालच परंतु वेगवेगळे आले पाहिजे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**२१ हजार खुप आहेत.

**सदस्य श्री. राजेंश वदारिया:—**काय होते साहेब, सर्वच जीआर महापालिकेस लागु होत नाहीत. जर जीआर सार्वजनिक बांधकाम विभागाचा आहे तर तो जीआर त्या विभागासच लागु आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**पुर्वी सुध्दा आपण सुरक्षा रक्षक आपण घेतले आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**जीआरची प्रत आम्हांस दाखविली जावी. जानेवारीचे २ तारीख झाली आपण म्हणता की जानेवारी ते ३१ मार्च तीन महिना. २ जानेवारी तर आज झाली, निविदा करणेस किती दिवस जातील. एक महिना तर असाच निघुन जाईल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**दोन जीआर आहेत. उदयोग विभागाने काढले आहेत, यात स्पष्टपणे सुरुवातीस म्हटले आहे, महाराष्ट्र राज्यात खाजगी सुरक्षा रक्षकांचे नियमन करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य खाजगी सुरक्षा रक्षक अधिनियम १९८१ लागु करण्यात आला आहे. सदर नियमाच्या कलम १५ नुसार सल्ला देण्यासाठी महाराष्ट्र राज्य खाजगी सुरक्षा रक्षक समितीची स्थापना करण्यात आली असून या सल्लागार समितीच्या दिनांक १४ जुन २००६ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यातील सरकारी उपक्रम, शासकिय मंडळे, महामंडळे, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादी सुरक्षा रक्षक नियुक्त करतांना शासनाच्या सुरक्षा रक्षक मंडळाकडुनच सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन घेण्याबाबत संबंधीत उपक्रम संस्थांना बंधन करण्याची बाब, आमच्या विचाराधीन होती. तर हे सर्वांसाठीच त्यांनी लागु केले आहे. आता रेट कोठुन घेतला याचा, चालु दर घेतला काय?

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मागे वर्तमान पेपरात बातमी होती की वॉचमन ऐवजी पहारेकरी शब्द वापरला आहे. पहारेकरी तर सुरक्षा रक्षक असतो तो तर नगरपालिकेत आहेत, उदयानात कसले सुरक्षा रक्षक बरोबर? खरे तर सार्वजनिक बांधकाम विभागतील गार्ड पाहिजेत हे जर तुम्हांला १२ हजारात मिळत असतील, १५ हजारात मिळत असतील तर पहा ना, लोकल लोकांना का नाही?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**जर खाजगी असतील तर ती लोक डबल काम करतील ना. दुसरे सुध्दा काम देवु शकतो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**बाकीची आपले असतील लोक. तुम्ही साखरा जीआर जीआर करत आहात, सुरक्षा रक्षक का दिले गार्डनमध्ये. पहारेकरी पाहिजे ना.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**सुरक्षा रक्षकांना वॉचमन कसे म्हणता? आपण तर त्यांना वॉचमनच म्हणु नाही शकत ते पहारेकरीच आहेत. सुरक्षा रक्षक हा वेगळया पर्पजसाठी आहे. वॉचमनला सुरक्षा रक्षक नाही म्हणु शकत.

**सदस्य श्री. धंनजय बोडारे :—**शोधा व महापालिकेचे बचत होत असेल तर परत घ्या.

**श्री. दादा पाटील, उप—आयुक्त, कर:—**त्यात असे आहे की शासनाचा दुसरा जीआर आहे त्यामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, वॉचमन हे जे सर्व पॅरेलर शब्द आहेत ना त्यास एकत्रित समजावे असे म्हटले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**सुरक्षा रक्षक म्हणायचे काय त्यास?

**श्री. दादा पाटील, उप—आयुक्त, कर:—**सुरक्षा रक्षक म्हटले काय, पहारेकरी म्हटले काय, सारखेच.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**असे कुठे आहे? बेसीकली पहारेकरी आणि वॉचमन एकच संज्ञा आहे. पहारेकरी आणि सुरक्षा रक्षक यांच्या जॉबप्रोफाईलमध्ये जमिन—आसमानचा फरक आहे.

**श्री. दादा पाटील, उप—आयुक्त, कर:—**शासनानेच तसा जीआर काढला आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**सुरक्षा रक्षक हीज टोटली डिफरंट पहारेकरी. सुरक्षा रक्षक हे पहारेकरी वॉचमन आहे का ते दाखवा. सुरक्षा रक्षक हा जीव धोक्यात घालुन तो सुरक्षा रक्षक असतो. पहारेकरी माळी आणि वॉचमन हे दोन्ही

सारखे आहेत. मग त्यांना दररोज ४०० रुपये पगार दयायचा आणि महिन्याला १२ हजार दयायचे. सुरक्षा रक्षकांना २० हजार, २२ हजार दयायचे. खरेतर काम तो टॅक्नीकली करणार आणि हा वॉचमन फक्त उभा राहणार. करेल तो काम त्याच्या पध्दतीचे परंतु एक डिस्पायरेबल विनाकारण तो जीआर ओढवुन घेतलेला आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे</u>**:– साहेब, काय आहे माहित आहे का, ज्याच्याकडे बंदुकीचा परवाना आहे तो सुरक्षा रक्षक. बंदुकधारकास सुरक्षा रक्षक म्हणतात.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**आय अंडरस्टुड. पहारेकरी व वॉचमन सारखे व सुरक्षा रक्षक वेगळे आहेत.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>**होय ते वेगळे आहेत. हा विषय वगळा.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**हा विषय वगळा.

**<u>महापालिका सचिव :–</u>**हा विषय वगळायचा की फेरसादर करायचा?

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>**यास काय करायचे की हा रिजेक्ट करुन यास नविन बनवायचा. व नविन प्रस्ताव बनवुन पुढील सभेत घेवुन यायचे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**हे काय बोलत आहेत साहेब, रिजेक्ट केले तर तीन महिने येणार नाही विषय. यास फेरसादर करा ना.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**हा विषय डिफर करा आणि नव्याने फेरसादर करा ना.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**होय नव्याने फेरसादर करा.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :–</u>**श्री. सितलानी साहेब, गार्डनची यादी दया सर्वांना.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–</u>**याविषयाशी निगडीत विषय आहे. मागील वेळेस आपण ग्रीन स्पेसचा विषय घेतला होता.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>**मी एकदा सांगतो, यात आपण दुरुस्त करावे, जसे माझ्या प्रभागातील उदयान आहे, तसे इतर असतील त्यांची एकत्रित यादी दयावी. फक्त मलाच काय देतात सर्वांना दया यादी. यामध्ये लिहिले आहे का, बसस्टॉप जवळ. कंपाउंड वॉल लावले, गेट लावले, गार्डनचे फंद दिले. बाळासाहेब ठाकरे उदयान १ नंबर बसस्टॉप जवळ.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>**ग्रीन स्पेसचे काय.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**ग्रीन स्पेस डेव्हलोपमेंटची सेंट्रल गर्व्हमेंटची स्कीम आहे. ही गेल्या तीन वर्षापासुन सेंट्रल गर्व्हमेंटची राबविली जाणारी स्कीम आहे. त्या त्या शहरामध्ये हरीतपट्टयाचा विकास होणे, ज्या ज्या आपणाकडे जागा आहेत. त्यात झाडे लावणे, इतर काही उदयाने असतील ते विकसीत करुन हरीत क्षेत्राचे सर्वेक्षण वाढविणे हा त्याचा उद्देश आहे. म्हणुन पहिल्यावर्षी १ कोटी, दुस–या वर्षी दिड कोटी, तिस–या वर्षी दिड कोटी तर आपले पहिल्यावर्षाचे जे १ कोटी आहे आधीच ठेकेदार अंतिम करुन ते काम सुध्दा सुरु आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–</u>**ठेकेदार काम करतो काय? त्यास वर्क ऑर्डर दिले आहे परंतु काम करत नाही.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**ही कोणाची जबाबदारी आहे? वर्क ऑर्डर दिले आहे तर काम का नाही सुरु केले?

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता:–</u>**काम लवकर करण्यास सांगितले आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**कोणाची जबाबदारी आहे? आम्ही असे समजतो की काम चालु आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–</u>**४–४ महिने सुध्दा ठेकेदार काम करत नाही.

**<u>श्री. महेश सितलानी, उप–अभियंता:–</u>**त्यास दिले आहे. ४–५ महिने लागतील.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**४—५ महिने झाले आहेत अजुन परत ४—५ महिने लावणार काय? आपण जावुन पहा तो काम करत नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आयुक्तांना काय स्थायी समितीत समजेल की काम सुरु केले नाही? ही पध्दत आहे काम करायची? तुम्ही सर्व एकाच प्रकारे शहर अभियंतापासुन खालच्या लोकांपर्यंत असे काम करता? काम चालु नाही तर मला का नाही सांगतले? मग आम्हांला शासनास माहिती दयावी लागेल, पैसा त्यांनी दिला आहे व आपण काहीच करत नाही. दुसरे काम झाले निविदेचे?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता :—**काम चालु करण्यास सांगितले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आणि तिसरे कधी तयार होणार?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—**२ दिवसात काम चालु होईल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आता यामध्ये अटी आहे की त्या पैश्यापैकी ८० टक्के नॉनसिव्हील वर्कवर करायचे आहे. आणि २० टक्के तुम्ही कंपाउंड वॉल असेल काही बेंचेस असतील, आता आपणास दुस—या वर्षासाठी १ कोटी १९ लाख रुपये मिळालेत. झाडांचे प्रपोजल जे आहे त्यास तेवढी जागाच नाही त्यामुळे ते उदिष्ट १ कोटी १९ लाख केले आहेत. आपल्यासाठी कंन्सल्टंट सुध्दा नेमलेला आहे त्याने संपुर्ण शहराची पाहणी केली. जागा पाहिलेल्या आहेत त्यामुळे आपली जेवढी क्षमता आहे तेवढे करुन आपण ते प्रोजेक्ट फायनल करु या.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मागील वेळेस तेवढीच चर्चा झाली की टाईमबॉड असला पाहिजे, अजुन तेथे कामच सुरु झालेले नाही. आणि तुम्हांला सांगतो की एवढे एशुअरन्स दिले, रस्त्यांच्या कामासाठी आता तो विषय नाही. डांबरीकरणाचे रस्ते शेडयुलप्रमाणे दिल्यानंतर, मंजुर केल्यानंतर अजुन ते होत नाही.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**रस्ते खोदुन ठेवले आहे, लोकांना जायला जागा नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मी यामध्ये एकच सांगतो, प्रत्येक कामाचा मी फॉलोप घेणार आणि येथे शक्य सुध्दा नाही आणि अपेक्षीत सुध्दा नाही. मी सूचना दिलेल्या आहेत की कुठलेही काम ज्याचा जो टाईमबॉड टाकलेला आहे, ते शेवटपर्यंत झाले नाही तर त्याच्या शेवटच्या बिलामध्ये कपात करायची. त्यामुळे प्रत्येकवेळेस ठेकेदारास सांगायची गरज नाही किंवा आढवा घ्यायची गरज नाही, त्यास जेवढा विलंब होईल तेवढी कपात होईल आणि ओव्हर व्हिव असेल तर त्यात स्ट्रीक्ट एक्शन घेवु. सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष नाही हे मी स्वत: सुध्दा कबुल करतो. आय एम टोटली अपसेट टु द पीडब्ल्युडी टीम.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**विषय आला म्हणुन सांगतो, आता आपला ३ नंबरचा जो ब्रिज आहे. ४ व ३ नंबरला जोडणारा ब्रिज यावर संपुर्ण डांबरीकरण केले आहे. त्याच्या बाजुलाच प्रभाग चालु होतो आमच्याकडे एकही थेब आले नाही. आता त्या ठेकेदाराचे असे म्हणणे आहे की माझ्याकडे जास्तीच ३—४ ठिकाणी करुन घेतले आहे. आमच्याकडे जे काम तुम्ही प्राकलनावर घेतले ते केलेच नाही. ज्याठिकाणी प्राकलन नाही त्याठिकाणी काम झाले आहे. मग परत परत भ्रष्टाचाराचे आरोप कोणावर येणार स्थायी समितीवरच येणार.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**कित्येक दिवसांपासुन श्री. शेवकानी येतच नाहीत. मी त्यांना आठ दिवसापासुन फोन करत आहे ते फोनच उचलत नाहीत. मी मॅसेज करतो की प्लीज कॉल मी तरी सुध्दा काहीच नाही. शहर अभियंता यांना तर माहितच नाही की प्रभाग समिती ३ मध्ये श्री. संदीप जाधव आहे की कोण आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**तसेच अभियंता बदलत असतात. आमचे पॅनल २ नंबरचे आहे तर आम्हांला जेई देतात ३ नंबरचा हे काय नाटक आहे?

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**शहर अभियंता यांनाच माहित नाही की श्री. संदिप आहे की श्री. शेवकानी आहे ते. एक रस्ता श्री. संदिप बघतो व एक श्री. शेवकानी बघतो. राधास्वामी रस्त्यावर पेचओव्हर केले आहे. ओटीपर्यंत केले नाही आता त्यासाठी सांगतात की निधी संपला.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**किती दिवसापासुन फाईल पडुन आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**सेंट्रल हॉस्पीटल पासुन ते कालानी महल येथे साईट पट्टी भरलेली नाही.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**आमदार यांच्या घराशेजारी मी काल रात्री परिस्थिती पाहिली, दयनीय परिस्थिती आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**सेट्रल पोलिस स्टेशन येथे पाहणार नाही संपुर्ण नाला तेथे वाहत आहे.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**हा प्रस्ताव फेरसादर केल्यानंतर कधी येणार? १ आठवडयात, २ आठवडयात?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—**१ आठवडयाच्या आत.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**१ आठवडयाच्या आत आला पाहिजे.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—**होय.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**एक आठवडयात फेरसादर करुन आणला पाहिजे व त्यास संपुर्ण चांगल्याप्रकारे फेरसादर करुन आणा.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**बजरंग आईस फॅक्टरी ते कलानी महल येथे एक महिन्यापासुन रस्ता चालु आहे, काल रात्री मी तेथुन गेलो तर पाहिले की दोन दोन फुटाएवढे खड्डे आहेत तेथे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उदयानांची निगा राखणे करीता लेबर व माळी व मजूर पुरवठा करणेच्या कामाची निविदा प्रक्रिया व सुरक्षा रक्षक पुरवठा करणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

जागतिक तापमानातील वाढ, हवामान आणि ऋतू बदल याची दाहकता आणि तिव्रता कमी करण्यासाठी व पर्यावरणाचे संतुलन राखणेकरीता शहरात वेळोवेळी वृक्ष लागवड करण्यात येते. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात एकुण ६१ उदयान आहेत. या ६१ उदयानांचे वृक्ष लागवड करुन सौंदर्य राखण्यात येते. तसेच रस्त्यांच्या दुतर्फा, दुभाजकांमध्ये मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येते.

दिनांक १ जुलै, २०१६ रोजी एकाच दिवशी संपूर्ण महाराष्ट्रात २ कोटी वृक्षारोपणाचा अतिशय महत्वाकांक्षी आणि धडक कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. या आगळया वेगळया उपक्रमाची नोंद लिम्का बुका ऑफ रेर्कार्डने घेतली. राज्याची ही कामगिरी देशस्तरावर देखील कौतुकाचा विषय ठरली. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात या कार्यक्रमाअंतर्गत प्रभाग क्षेत्र निहाय प्रत्येकी ५०० असे एकुण २००० वृक्ष लागवडीचे उदिष्ट पूर्ण करण्यात आले.

यावर्षीही शासनाने दिनांक १ जुलै ते ७ जुलै २०१७ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात ४ कोटी वृक्षारोपण करणेच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यावर्षी सदर कार्यक्रमांअंतर्गत उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग क्षेत्र निहाय १००० प्रमाणे एकूण ४००० वृक्षलागवडीचे उदिष्टे पार पाडण्यात आले आहे.

केंद्र शाासन पुरस्कृत अमृत अभियानाअंतर्गत सन २०१५—१६, २०१६—१७ व २०१७—१८ या आर्थिक वर्षाच्या आराखडयामध्ये उल्हासनगर शहराचा हरित क्षेत्र विकास प्रकल्पामध्ये समावेश असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे हरित क्षेत्र विकास प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु आहे.

या सर्व लागवड करण्यात आलेल्या वृक्षांची दैनंदीन निगा राखणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच वरील शासनाच्या योजना महापालिका क्षेत्रात प्रभावीपणे राबविणे अत्यंत आवश्यक आहे. तथापि उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अनेक वर्षापासून भरती व बढती होत नसल्याने प्रत्यक्षात कार्यरत असलेला कर्मचारी वर्ग अत्यंत अपूरा आहे. त्यामुळे उदयानांची निगा राखणे यामध्ये खूप अडचणीयेतात. याबाबत लोकप्रतिनिधी,स्थानिक नगरसेवकही वारंवार तक्रार करीत असतात.

याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ अंतर्गत असलेल्या उदयानांची निगा राखणेकरीता माळी व मजूर पुरविणेच्या कामाची निविदा प्रक्रिया करण्याचे योजिले आहे. सदर कामाचे प्रत्येक प्रभाग क्षेत्र निहाय माळी व मजूर पुरविणेकरीता प्राकलने तयार करण्यात आले आहे. सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्र. | एकुण उदयाने | एकुण क्षेत्रफळ | आवश्यक माळी | आवश्यक मजूर | आवश्यक सुरक्षा रक्षक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ | १३ | ३१४५२.९८ | ०४ | ०६ | २६ |
| २. | २ | १२ | ३२१६५.२६ | ०४ | ०६ | २४ |
| ३. | ३ | १९ | ५४७६९.८३ | ०४ | ०६ | ३८ |
| ४. | ४ | १७ | ४५६३६.०० | ०४ | ०६ | ३४ |
| **एकुण** | | ६३ | | १६ | २४ | १२२ |

| | एकुण आवश्यक संख्या | दरसुची प्रमाणे दर | एकुण दिवस | महिन्यांची संख्या | एकुण खर्च (स्तंभ क्र. १ x २ x ३ x ४) |
|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ |
| माळी | १६ | ४५२.०० | २६ | १२ | रुपये २२,५६,३८४ /— |
| मजूर | २४ | ४२३.०० | २६ | १२ | रुपये ३१,६७,४२४ /— |
| वॉचमन | १२२ | २१,८४३ /— | | १२ | रुपये ३,१९,७८,१५२ /— |
| | | | | **एकुण** | रुपये ३,७४,०१,९६० /— |

सदर खर्च महापालिका अर्थसंकल्पातील उदयानांची दुरुस्ती व निगा या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीतून करणे आहे.

तरी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ मध्ये मजूर व माळी पुरविणेच्या रु. ३,७४,०१,९६०/— एवढा खर्च होत आहे. सदर खर्च उदयान दुरुस्ती या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीतून करणे आहे. सदर कामाचा कालावधी वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे ०१ वर्षाचा आहे. सदर कामाच्या प्रस्तावास मंजूरी मिळून निविदा प्रक्रिया करेपर्यंत डिसेंबर महिना पूर्ण होईल व आर्थिक वर्ष संपण्याकरीता तीन महिन्याचा कार्यकाळ राहील. त्यामुळे तीन महिन्याचा खर्च रु. ९३,५०,४९०/— एवढा खर्च होणार आहे. त्याची सविस्तर आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

१) लेखाशिर्षाचे नाव :— उदयान दुरुस्ती (C31)
२) लेखाशिर्षामध्ये उपलब्ध एकंदर तरतुद :— ३,८९,७९,९००/—
३) सदर कामापूर्वी लेखाशिर्षातील शिल्लक तरतुद :— ३,८९,७९,९००/—
४) प्रस्तावित कामावरील खर्च :—९३,५०,४९०/—
५) प्रस्तावित कामानंतर उक्त लेखाशिर्षात शिल्लक राहणारी तरतूद :— रु. २,९६,२९,४१०/—

वरील निविदा प्रक्रियेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून माळी व मजूर यांचा पुरवठा करणेच्या कामाची प्रक्रिया करण्यात येणार असून वॉचमन यांचा पुरवठा शासन निर्णय क्र. एसजीए—१५०६/प्र.क्र. ९९/काम—५, दिनांक ८ नोव्हेंबर २००६ च्या सुरक्षा रक्षक मंडळाकडून करण्यात येईल.

तरी सार्वजनिक बांधकामविभागाकडून माळी व मजूर यांचा पुरवठा करणेच्या कामाची निविदा प्रक्रिया व सुरक्षा रक्षक पुरवठा करण्यासाठी मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेकरीता स्थायी समितीच्या पटलावर ठेवणेस मान्यता मिळणेस सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ६७** **दिनांकः— २/१/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उदयानांची निगा राखणे करीता लेबर व माळी व मजूर पुरवठा करणेच्या कामाची निविदा प्रक्रिया व सुरक्षा रक्षक पुरवठा करणेस मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनास १ आठवडयाच्या आत फेरसादर करणेस निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या घनकचरा प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता प्रदान करून घेण्यास 'महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुख्य अभियंता, ठाणे' यांना देय ठरविण्यात आलेले तपासणी शुल्क म्हणून आलेल्या खर्चाची माहिती नोंद करणे.

———————————————————————————————————————

यावेळी सदस्य श्री. दिपक सिरवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**हा विषय सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचा आहे. हा सर्व डीपीआर शासनाकडे जाणार. केंद्र शासन व राज्य शासनाकडुन निधी मिळणार. सेग्रीकेशन प्रोसेसींग करण्यास आपणास सहज जाईल. हे ४२ लाखाचे आहे व एमजीपीला दिले आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता करा.

**महापालिका सचिव :—**इतिवृत्ताची वाट न पाहता नाही येणार, हा माहितीचा विषय आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५ :—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या घनकचरा प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता प्रदान करून घेण्यास 'महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुख्य अभियंता, ठाणे' यांना देय ठरविण्यात आलेले तपासणी शुल्क म्हणून आलेल्या खर्चाची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी संदर्भातील शासन निर्णय दिनांक १५ मे, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. या अभियानाचा कालावधी २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंत आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीसाठी सविस्तर सूचना राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान यांच्या दिनांक २७ जुलै, २०१५ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.त्यामधील महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. मा. सचिव, नगर विकास विभाग, नवि—३४ यांनी स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) या अंतर्गत सं.क्र. ९०४ दिनांक २७ जुलै, २०१५ रोजी अन्वये दिलेल्या सुचनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापनासंबंधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई (RCUES) यांचे कडून

तयार करून घेण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या रूपये १० लक्ष खर्चास मा. स्थायी समिती ठराव क्र. ९५, दि. २७/०१/२०१६ अन्वये मान्यता देण्यात आली होती.

त्यानूसार नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई (RCUES) यांच्याबरोबर घनकचरा व्यवस्थापना संबंधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकामी करारनामा करून जा.क्र. उमपा/उप—आ/आवि/३८/१६,दिनांक ०४/०५/२०१६ रोजी अन्वये कार्यादेश देण्यात आला. व घनकचरा व्यवस्थापना संबंधित सविस्तर प्रकल्प अहवाल अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई मार्फत तयार करण्याच्या करारात नमुद केल्या प्रमाणे एकूण रक्कमेच्या रूपये १०,००,०००/— च्या २५% जमावाजमव (Mobilization) रूपये २,५०,०००/— खर्च देण्यात आला होता.

महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांच्याकडील पत्र क्र. राअस/घनकचरा/७१०/१७—१८, दि. ०७/०६/२०१७ अन्वये राज्य अभियान संचालनालयाने कोकण विभागातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे घनकचरा व्यवस्थापनाचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी "ICUC Consultants pvt. Lts" या संस्थेची नेमणूक केलेली आहे. सदर कामासाठी त्यांचे अधिकारी आपल्या संस्थेशी संपर्क साधतील. तरी त्यांना सहकार्य करावे. आपल्या सुलभ संदर्भासाठी पत्रासोबत प्रपत्र (घोषणापत्र) जोडण्यात येत आहे. ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना DPR करावयाचा आहे अशांमध्ये प्राधान्याने ODF/QCI प्रमाणित झालेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा विचार करण्यात येणार आहे. असे शासन पत्र प्राप्त झालेत.

त्याअनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापनासंबंधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, मुंबई (RCUES) यांचे कडून तयार करून घेण्यासाठी झालेला करारनामा रद्द करून घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार घनकचरा व्यवस्थापनांतर्गत सविस्तर कृती आराखडा (DPR) तयार करण्यासाठी दिनांक ०४/१०/२०१७ रोजी क्यु.सी.यु.आय. या संस्थांचे प्रतिनिधी यांच्याबरोबर चर्चा करण्यात आली व त्यानुसार क्यु.सी.यु.आय. या संस्थांच्या प्रतिनिधीना उल्हासनगर महापालिका कार्यक्षेत्रातून निघणारा घनकचरा व त्यावर प्रक्रिया करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना बाबत आवश्यक ती माहिती देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हामधील बहुतांश महानगरपालिकांचे घनकचरा व्यवस्थापनांतर्गत सविस्तर कृती आराखडा (DPR) तयार झाले आहेत व उल्हासनगर महापालिकेचा घनकचरा व्यवस्थापनांतर्गत सविस्तर कृती आराखडा (DPR) तयार नसल्याने शासनाने सदरचा घनकचरा व्यवस्थापनांतर्गत सविस्तर कृती आराखडा (DPR) त्वरीत तयार करून स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनूसार घनकचरा व्यवस्थापनाबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानूसार सदरची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने त्याबाबत राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांच्या स्तरावरून विभागनिहाय क्यु. सी.यु.आय. संस्थे कडून घनकचरा व्यवस्थापनांतर्गत सविस्तर कृती आराखडा (DPR) तयार करण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. ICUC यांनी रू. ३५८३.१३ लक्ष मात्रचा घनकचरा प्रकल्प अहवालाचा प्रारूप शासन निर्णयानूसार तांत्रिक मान्यतेसाठी एम.जे.पी. कडे सादर केलेला आहे. तद्नंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुख्य अभियंता, ठाणे यांचे दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर अहवालाची तांत्रिक तपासणी करण्यापुर्वी शासनामार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देय ठरविण्यात आलेले तपासणी शुल्क म्हणून प्रकल्प किंमतीच्या १% व १८% वस्तु व सेवा आकार करासहीत रक्कम रू. ४२,२८,०९०/— (ब्येचाळीस लाख अठ्ठावीस हजार नव्वद मात्र) तांत्रिकमान्यता शुल्क मजीप्रा च्या कार्यकारी अभियंता म. जी.प्रा. विभाग ठाणे या कार्यालयाकडे अदा करण्याबाबतचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे. त्यानुसार उल्हासनगर महापालिकेकडून AXIS BANK LTD, ULHASNAGAR धनादेश दिनांक १६/१२/२०१७ (धनादेश क्र. ३७३७५६) जा.क्र.उमपा/आवि/उप—आ/२८२/१७, दि. १८/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये शुल्क अदा करण्यात आले आहेत. म.जी.प्रा. विभाग ठाणे यांच्याकडून घनकचरा व्यवस्थापनांतर्गत सविस्तर कृती आराखडा (DPR) साठी तांत्रिक मंजूरी मिळाल्यानंतर सदरचा DPR अंतिम मंजूरी साठी शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसाठी माहितीस्तव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ६८** **दिनांकः—२/१/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या घनकचरा प्रकल्प अहवालास तांत्रिक मान्यता प्रदान करून घेण्यास 'महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुख्य अभियंता, ठाणे' यांना देय ठरविण्यात आलेले तपासणी शुल्क म्हणून आलेल्या खर्चाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ६ :— <u>प्रस्तावाची सूचना</u>**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मागील वर्षाचे विरोधी पक्षनेता, सभागृह नेता, प्रभाग समिती सभापती निधीची कामे होण्याबाबत स्थायी समिती सभापती आणि सदस्या श्रीमती कांचन अमर लुंड यांच्या प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

———————————————————————————————————————————

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>**या वर्षाचे नाही मिळत तर पुढील वर्षाचे काय मिळेल?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**नाही, नाही.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**काय नाही, नाही करत. आधी चर्चा तर करा. ही काय गोष्ट आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**जुने आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**जुने आहे म्हणुन काय झाले, मागील वर्षी त्यातुन काही लोकांना दिले होते. असा भेदभाव का सदस्यांना? म्हणजे असे आहे का आरक्षणावर सुध्दा सदस्य असतात. काहीतरी मिळावे असे आहे का काहीतरी प्रकार. मागील वर्षी निवडक लोकांना दिले आहे, मागच्या वर्षी आम्हांला एक सुध्दा रुपया मिळाला नाही. कोण किती घेवुन गेले.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**मागील वर्षी नगरसेवक निधी काही निवडक लोकांनाच आपण दिले आहे?

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—</u>**मागील वर्षी १० लाख प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधी होता.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**किती लोकांना दिला?

**<u>श्री. दादा पाटील, उप—आयुक्त, कर—</u>**मागील वर्षी कोणालाच नाही दिला.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**महापौर, उप—महापौर यांना कोणालाच नाही दिला?

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—</u>**महापौर, उप—महापौर यांना एक कोटी, सभागृहनेता व विरोधी पक्ष नेता यांना ५० कोटी.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**५० कोटी नाही ५० लाख असणार.

यावेळी सदस्य श्री. दिपक सिरवानी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—</u>**होय. ५० लाख. नगरसेवक निधी १० लाख व प्रभाग समिती निधी १० लाख परंतु कोणासच काहीही दिलेले नाही.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**कोणासच काहीच दिले नाही असे आपले म्हणणे आहे ठिक आहे मी माहिती अधिकारात आपणांस विस्तृत देतो. दुसरी गोष्ट म्हणजे मागील वर्षी एक सुध्दा रुपये खर्च नाही झाला तर यावर्षी काय होईल.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**यावर्षी आपण घेतले ना, १६—१६ लाखाचे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**साहेब, मागील वर्षी काय झाले आहे, माझा सभापती निधी १ कोटी तो मिळालाच नाही. आणि प्रत्येकाला तो मिळत गेला आहे. माझ्या कालावधीत मला मिळाला नाही, त्यानंतर आमचा नगरसेवक निधी. दोन्ही निधी एकही वर्ष नाही. तरी नशिबाने म्हणा पुन्हा चांगले काम केले असेल म्हणुन पुन्हा निवडून आलो. यावर्षी देखील एकही रुपयाचे काम नाही. अजुन निविदा सुध्दा नाही कसे काय आम्ही काम करणार? स्थायी समिती

निधी १–१ कोटी आहे तो तुम्ही विशेष निधी ठेवला आहे. मागील वर्षी दिले नाही, या वर्षी देखील दिले नाही मग आम्ही कसे काय काम करणार? लोकांना आम्ही काय सांगायचे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–** निधी मिळतच नाही, सर्व नगरसेवकांवर असे का होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**हे पहा, सर्व जागी असेच होत आहे. आम्ही जे १६–१६ लाख दिले ना ते भिंवडी व कल्याणने सुध्दा दिलेले नाही. नगरसेवक निधीचा एक सुध्दा पैसा खर्च झालेला नाही.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:–**साहेब, मजेची गोष्ट अशी आहे की जेव्हा काम चालु होईल, तेव्हा ते होईल. आम्हांला अर्धा निधी नाही मिळाला. जेवढे लवकर होईल तेवढे लवकर करा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**ते डायरेक्ट रिफलेक्ट होणार ना.जर आमच्याकडे असेल तर तेवढे आम्ही देवुन टाकणार. निविदा वगैरे झाल्यानंतर देवु.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**आमच्या विशेष निधीचे कसे करणार? चला ठिक आहे, मागच्यावर्षीचा तुम्ही म्हणता देवु, आता म्हणता अजिबात नाही.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–**स्थायी समिती सदस्यांचे सुध्दा आहे.

**सदस्या श्रीमती डिंम्पल ठाकुर:–**होय स्थायी समिती सदस्यांचे सुध्दा आहे ना.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**सावत्रपणाचा विषय संपला जसे कोणाला दिले, कोणाला नाही दिले.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**मी साहेबांना डिटेल देतो. आपणांस सुध्दा देतो, मी तोंडाने सुध्दा सांगतो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**माझ्या कालावधीत मध्ये १०० टक्के असे गेले नाही. गेल्यावर्षी नाही व यावर्षी देखील नाही.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**साहेब, गेल्यावर्षी दिला तुम्ही, दिवाळी बाजार.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:–तसे नाही म्हणता येणार, सामान्य निधीतुन काही कार्यक्रमासाठी पैसे देतात.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**महापौर निधीमधुन तुम्ही दिला आहे. सावत्र व्यवहार का म्हणता तर म्हणुन मी का म्हणतो यात सुध्दा आरक्षण आहे का?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**आपण असे चुकीचे म्हणता. दिला असेल तर महापौर निधी व नगरसेवक निधीमध्ये फरक आहे. आपण जर नगरसेवक निधी काही जणांना दिला किंवा काही जणांना नाही दिला असे नाही. मला तपासावे लागेल. जर महापौर निधीतुन दिला असेल तर नगरसेवक निधीतुन दयावा असे नाही म्हणायला पाहिजे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**महापौर, उप–महापौर निधी जर मिळाला असेल तर स्थायी समिती निधी का नाही मिळाला?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**पहिली गोष्ट तर २ महिने येथे आल्यानंतर सप्टेंबरमध्ये निवडणूका लागल्यानंतर निवडणूकीच्या तारखेआधी काहीतरी कालावधी दिला होता. तर नगरसेवक निधी देवु नये अशा निवडणूक आयोगाच्याच सूचना होत्या.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**साहेब, तुम्ही रुजु झाल्यानंतर तुम्ही स्वत: केलेले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**नाही.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**मी पुराव्यासहित देतो. एक मिनिट मी पुढील सभेत पुराव्यासहित देणार.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**मी काढले आहे ते ऑक्टोंबर मध्ये असेल ते मला माहित आहे परंतु निवडणूकीच्या अधिसूचनेमुळे कायम केले नाही.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**आम्ही दहा वेळा भेटलो, पत्र दिले. पैसे असतील तर काही ठिकाणी दिले आहे. जसे ते आवश्यक होते तर आमचे सुध्दा आवश्यक होते.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**आता काय आहे माझे असे निवेदन आहे की, आता स्थायी समितीचे सदस्य सर्व येथे बसलो आहोत, महापौर, उप—महापौर, सभागृहनेता, विरोधीपक्ष नेता व स्थायी समिती सभापती यांचा जो ५ कोटीचा निधी आहे त्यात आपण जास्त न मागता २५ टक्के ठेवु या. व स्थायी समिती सदस्यांचा १—१ कोटीचा निधी आहे, त्यात सुध्दा जास्त नाही तर २५—२५ लाख एवढे आपण कसेही करुन दया, भले ते ठरावात घ्या. निदान १७—१८ चे काम अवश्य केले पाहिजे. कारण तीन वर्षापासुन जेव्हा माजी आयुक्त होते ते म्हणाले होते एक वर्षाचे घेवु नका. दुस—या वर्षी मी जास्त देईल परंतु दुसरे वर्ष असेच गेले. नंतर आपण आलात, निवडणूक आली तर दिले गेले नाही. वर्ष पुर्ण होण्यात आले आता १६—१६ लाख मिळत आहेत. तर मागील वेळेस सुध्दा काही पदाधिका—यांनी म्हटले असेल की आम्ही आपल्यासाठी नाही शहरासाठी काम करणार आहोत. भले त्यांची यादी आपण पहाल अतिअवश्य जी कामे आहेत, ते सर्व अतिअवश्य काम करणार. ५ संविधानिक पदाधिकारी व १६ स्थायी समितीचे सदस्य या सर्वांचे २५ टक्के काम अर्थसंकल्पात जेवढी तरतुद ठेवण्यात आली आहे, ३० टक्के तेवढे या वर्षात झाले पाहिजे. तसेच आपणा सर्वांनी काम करण्यात हिस्सा घेतला की कर हा ४० टक्क्यापेक्षा जास्त वसुली करुन चांगला महसुल आणला व लोकांना आश्वासन दिले की आम्ही चांगले काम करणार. जास्तीत जास्त किती होणार ८—१० कोटीचे काम आहे, ते बिल आज दयायचे नाहीत, आता निविदा करता करता मार्च एप्रिल होईल, बिल देता देता आपणांस डिसेंबर २०१८ होईल. संपुर्ण १ वर्ष लागणार. तर मी सर्वांतर्फे आपणांस निवेदन करतो की, हे अतिआवश्यक कामे असून ते थोडे थोडे होणे आवश्यक आहे. आपण आता नविन अर्थसंकल्प बनविणार त्या कामात लागणार, लोकांना विकास आराखडयाबाबत आक्रोश आहे, त्यामुळे या सर्व गोष्टी पाहता लोकांना काम दाखविणे आवश्यक आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**आता आपण १३—१४ चे काम सुरु करण्यास जात आहोत.सर्व पदाधिकारी यांचे जर एकुण निधीचे टोटल केले तर ५१—५२ लाख होतात.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**१५ ते २० टक्के केले तर १५—१८ कोटी होतील.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**होय. तर यामध्ये सांगतो आपण जसा विचार करता, जसे आपली चर्चा झाली यामधुन आपण जे तातडीचे विषय आहे त्या कामाविषयी आपण विचार करु शकतो.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**असे अनावश्यक काम कोणी करणार नाही. आपण यादी मागवा त्यात जी तातडीची कामे असतील तर ते आपण करु.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**ठिक आहे.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी:—</u>**व्हिजीट तुमची असेल.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**मी आयुक्त महोदयांना त्यांचे वचनाची आठवण करुन देतो, अभय योजनेआधी त्यांनी नगरसेवकांना एक भाष्य केले होते, ज्या नगरसेवकांचे प्रभागातुन जेवढील वसुली होईल, त्यातुन ५० टक्के कामे केली जातील, हे वॉट्सअपवर सुध्दा आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**यादी दया म्हणजे श्री. सुर्वे साहेबांच्या सावत्रपणाबाबत गोष्ट पुढे यईल त्यात समजेल की आपले कोण आणि सावत्र कोण.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**श्री. जमनुजी, आपण फक्त आपल्यापुरताच विचार करुन बोलत आहात. आपला एक कोटी निधी आहे सदस्य करुन. सभागृहनेता करुन पाच कोटी निधी आहे. असा करुन सहा कोटी देणार.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**सभागृह नेता निधी तर सर्वांनाच देणार ना. फक्त आपल्या प्रभागातच घेवुन जाणार काय?

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**सभागृहनेता निधी आहे ते सर्वांनाच देणार ना. मी फक्त एकटा थोडेच घेवुन जाणार.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:–**आयुक्त साहेब, नगरसेवक निधी व इतर निधी जे आहेत ते लवकरात लवकर करा नाहीतर मंजुर मंजुर होईल आणि परत कुठले तरी इलेक्शन लागणार व परत रखडणार. असे नको व्हायला.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**कोणती कामे आहेत त्याबाबत आपण यादी बनवा. स्वच्छताच्या संबंधी आपण त्यास प्राधान्य देणार, स्वच्छता म्हणजे सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट, नविन शौचालय बनवायचे आहेत, काही दुरुस्ती करायच्या आहेत असे जर आपण घ्याल, असे जर काही घ्याल तर आपण यादी दया आपण बनवुन घेवु. २५ टक्के ठिक आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:–**नगरसेवक निधी सुध्दा लवकरात लवकर दया.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–**आयुक्त महोदय जसे म्हणाले की १६–१६ लाख निविदा काढावी लागेल. आम्ही प्रभाग समितीसाठी १४ लाख रुपये सार्वजनिक बांधकाम मार्फत दिले. २ लाखाचा निधी पाणी पुरवठयासाठी दिला तर मग पाणी पुरवठयासाठी श्री. सेलवन हे बजेटमध्ये टाकायला तयार नाहीत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संचिका काढा, १४ लाख तेथे आहेत.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:–**१४ लाखच केले होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**काही हरकत नाही. दोन मिनिटात सहया करणार. यांना फक्त अप्रुव्हल दया की २ लाखच बाकी आहे तर मग विषय मिटला.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**१६ लाखाची निविदा झाली आहे व आम्ही १४ लाख सार्वजनिक बांधकाम विभागात दिले आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**आता असे करु या. सर्वांना २५ टक्के निधी घेवु या.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**सर्वांनाच २५ टक्के करा. महापौर, उप–महापौर, स्थायी समिती सभापती व सदस्य, नगरसेवक निधी, सभागृहनेता, विरोधीपक्ष नेता व प्रभाग समिती सभापती.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**तसेच गटनेता यांचे सुध्दा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**नाही, नाही गटनेता नाही आहे. मागील वर्षाचे आहे साहेब, गटनेता निधी आताचा नाही. हा लवकरात लवकर करा इतिवृत्ताची वाट न पाहता करा.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**गटनेताचे दिले आहे ना १ कोटी, या अर्थसंकल्पात.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**होय पण ते सर्वांनाच देणार हे शक्य नाही असे मला वाटते. होत असेल तर सांगा.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**यांचे तर चारही बोट तुपात आहेत. गटनेता तेच आहेत, सभागृहनेता तेच आहेत, स्थायी समिती सदस्य तेच आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–** सेक्शन ९० असे म्हणतो की गटनेता तोच सभागृह नेता असतो. हे तर ठिक आहे आपणाकडे चालते ते चालते. आपली जी पध्दत आहे. प्रेसिडंट आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**१७–१८ च्या आर्थिक वर्षात २५ टक्के निधी देण्यात यावे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**ठिक आहे.

**महापालिका सचिव :–** मी ठरावात टाकते व ठराव वाचुन दाखविते.
सन २०१७–१८ च्या आर्थिक वर्षातील स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेता, सभागृहनेता, प्रभाग समिती सभापती व स्थायी समिती सदस्य यांना अतिआवश्यक कामासाठी एकुण अंदाजपत्रकात ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधुन अति आवश्यक कामासाठी २५ टक्के निधी देण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**साहेबांनी २५ टक्के दिले आभारी आहे.

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र. ६ :— प्रस्तावाची सूचना**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मागील वर्षाचे विरोधी पक्षनेता, सभागृह नेता, प्रभाग समिती सभापती निधीची कामे होण्याबाबत स्थायी समिती सभापती आणि सदस्या श्रीमती कांचन अमर लुंड यांच्या प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१६—१७ च्या आर्थिक वर्षातील तरतूदीनुसार सदर निधी स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेता, सभागृहनेता, सर्वगटनेते, प्रभाग समिती सभापती व स्थायी समिती सदस्य निधी यांना पुर्णपणे वापरण्याकरीता विशेष निधीतसेच नगरसेवक निधी मंजूर करण्यात आला होता. परंतू महापालिकेने सदर निधी काही सदस्यांना/पदाधिका—यांना दिला होता. काही सदस्य/पदाधिका—यांना एक ही रुपया निधी वितरीत केला नव्हता मागील सार्वत्रिक निवडणूकीत पुन्हा निवडून आलेल्या सदस्य/पदाधिका—यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ अन्वये कुठल्याही अर्थसंकल्पात तरतुद केल्यानंतर सदरची निधी हा पुढील २ वर्षापर्यंत वापरता येत असल्याने सदर निधीतून प्रलंबीत असलेली विकास कामे करण्यासाठी व मान्यता मिळणेसाठी या प्रस्तावाच्या सुचनेद्वारे सुचना मांडत आहे.

कृपया प्रस्तावाची सुचना स्थायी समिती बैठकीमध्ये चर्चेला घेवुन २०१६—१७ च्या आर्थिक वर्षातील उर्वरीत निधी वापरण्यास मंजुरी मिळावी ही न्रम विनंती.

**स्थायी समिती ठराव क्र. ६९** **दिनांकः— २/१/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार सन २०१७—१८ च्या आर्थिक वर्षातील स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेता, सभागृहनेता, प्रभाग समिती सभापती व स्थायी समिती सदस्य यांना अतिआवश्यक कामासाठी एकुण अंदाजपत्रकात ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधुन अति आवश्यक कामासाठी २५ टक्के निधी देण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सर्वांना नविन वर्षाचा शुभेच्छा।

सायंकाळी ४.४५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी)**

महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– १५/१/२०१८

**दि. १५/१/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**१६**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक १५/१/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ६ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ७ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ८ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ९ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| १० | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ११ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| १२ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| १३ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १४ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १५ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

१. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा हे सदस्य अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

२८.डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
२९.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३०.श्री. संतोष जाधव, उप मुख्य लेखा अधिकारी

३१.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
३२.श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
३३.श्री. अश्विनी अहुजा, उप अभियंता
३४.श्री. जितु चोईथानी, उप अभियंता
३५.श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता
३६.श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
३७.श्री. वानखेडे, लेखा अधिकारी
३८.श्री. संदिप जाधव, क. अभियंता
३९.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
४०.श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त, विधी
४१.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
४२.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
४३.श्री. बाजीराव जाधव, प्र. सहा. आयुक्त
४४.श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
४५.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
४६.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
४७.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

सायंकाळी ४.१५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

यावेळी डॉ. विजया कंठे, अतिरिक्त हया आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होत्या.

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक २/१/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक २/१/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

**स्थायी समिती ठराव क्र. :–** **६९ अ** **दिनांक : १५/१/२०१८**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २/१/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३२ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. २ :– उल्हासनगर. ३ सपना गार्डन येथे सिंधु भवन व आजूबाजूचा परिसर विकसित करणे या कामाकरीता निम्न दराचे मे.सतीश कंन्स्ट्रक्शन यांचे नावे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेekU. ns**

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–**पास, इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:–**जुन्या ठेकेदारासच हे काम मिळाले पाहिजे. ज्याने ग्राउंड बांधले आहे त्यांनाच दयावे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**हे नियमाप्रमाणे बरोबर आहे का?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:–**होय.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–**ठिक आहे. पास.

**महापालिका सचिव :–**५ टक्के जास्त दराने पास.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :– उल्हासनगर. ३ सपना गार्डन येथे सिंधु भवन व आजूबाजूचा परिसर विकसित करणे** या कामाकरीता निम्न दराचे मे.सतीश कंन्स्ट्रक्शन यांचे नावे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेekU. ns

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्षेत्र क्र. ३ मधील मंजुरी मिळालेल्या उल्हासनगर – ३, सिंधु भवन व आजूबाजूचा परिसर विकसित करणे या कामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक ) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २४/११/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्राकलनीय खर्च | रु. ३६१२५६२३/- |
| २. | निविदा प्रसिध्द् केलेली वर्तमानपत्रे | १) दै. सकाळ २) दै. वार्नाहर |

| | | |
|---|---|---|
| ३. | निविदा प्रसिध्द् करण्याचा दिनांक | दिनांक २७/११/२०१७ |
| ४. | निविदा विक्री कालावधी | दिनांक २७/११/२०१७ ते ३०/११/२०१७ |
| ५. | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०५/१२/२०१७ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | |
| (ब) | व्दितीय मुदतवाढ | |
| (क) | तृतीय मुदतवाढ | |
| ६. | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक २०/१२/२०१७ |
| ७. | आर्थिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक २०/१२/२०१७ |
| ८. | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ९. | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

दिनांक २४/११/२०१७ रोजी मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत **उल्हासनगर -३, सिंधु भवन व आजूबाजूचा परिसर विकसित करणे** या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **निविदाकाराच्या निविदेमधील बाबी** | **मे. सतीश कन्स्ट्रक्शन** | **मे. ए.एम. रामचंदानी** | **मे. सागर कन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|
| १. | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्क्म भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| २. | इसारा रक्क्म भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| ३. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |
| ४. | कामाचा अनुभव | होय | होय | होय |
| ५. | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय |
| ६. | संस्था / कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्त्ऐवज | होय | होय | होय |

सदर निविदांची निविदा समितीने छाननी केली असता १) **मे. सतीश कंन्स्ट्रक्शन** २) **मे. ए.एम. रामचंदानी** ३) **मे. सागर कंन्स्ट्रक्शन** हे निविदाकार निविदेतील अटी शर्तीनुसार पात्र ठरले. तद्नंतर पात्र निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग (आर्थिक भाग) उघडण्याकरीता प्रस्तावित करण्यात आले.

दिनांक २४/१२/२०१७ रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांचे अध्यक्षतेखालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य् लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

**१)** मे. सतीश कंन्स्ट्रक्शन :- भरलेले दर ९.९० टक्के जास्त
**२)** मे, ए. एम. रामचंदानी :- भरलेले दर १८.२८ टक्के जास्त

३) मे. सागर कंन्स्ट्रक्शन :- भरलेले दर १३.१३ टक्के जास्त

वरील निविदाकारांपैकी मे. सतीश कंन्स्ट्रक्शन यांची निविदा निम्न दराची असल्याने मे.सतीश कंन्स्ट्रक्शन यांना दिनांक २०/१२/२०१७ रोजी वाटाघाटीकरीता उपस्थिती राहणेबाबत व त्यांनी भरलेल्या दराबाबत स्पष्टीकरण सादर करणेकरीता पत्र देण्यात आले. मे. सतीश कंन्स्ट्रक्शन यांनी त्यांचे दिनांक २०/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे स्पष्टीकरण सादर केले आहे.

१) ठाणे जिल्हा अधिकारी यांचेमार्फत खारा बंद करण्यात आले असल्याने रेतीचा तुटवडा झाल्याने खडीचे दर वाढण्यात आलेले आहे.

२) वर्ष २०१३- १४ च्या जिल्हा दरसुची प्रमाणे विद्युत वस्तुंचे दर निविदे मध्ये घेण्यात आले आहे.

सिंधू भवन बांधणे हे काम संपूर्ण आर. सी. सी. सुपर स्ट्रक्चरचे काम आहे. सदर काम (तळ मजला + दोन मजले) असे काम आहे. यापूर्वी सिंधू भवन च्या तळमजल्याचे काम ९.४० टक्के जास्त दराने करण्यात आले होते. सदर प्रस्तावातील सिंधू भवन व आजूबाजूचा परिसर विकसित करणे या कामाकरिता मे. सतीश कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदेचा आर्थिक देकार दिनांक २०/१२/२०१७ रोजी उघडण्यात आले. मे. सतीश कंन्स्ट्रक्शन यांनी ९.९० टक्के जास्त दर दिले आहे. मे.सतीश कंन्स्ट्रक्शन यांना २२/१२/२०१७ रोजी वाटाघाटी करता बोलवण्यात आले. मे. सतीश कंन्स्ट्रक्शन यांनी भरलेले दराची महाराष्ट्र राज्य शासनाचे दरसुचीशी (SSR) तुलना करणेकरीता या कामाचे तांत्रिक सल्लागार मे. नोबल जिओ स्ट्रक्ट विभागामार्फत पत्र देण्यात आले.

त्याअनुषंगाने मे. नोबल जिओ स्ट्रक्ट यांनी त्यांचे दिनांक २६/१२/२०१७ चे पत्रानुसार मे. सतीश कंन्स्ट्रक्शन यांचे दर ३.५२% जास्त आहेत असे कळविले. यावर मे.सतीश कंन्स्ट्रक्शन यांनी त्यांच्या ९.९० टक्के दरातील ३.५२ टक्के कमी करुन ६.३८ टक्के जास्त दरावर काम करण्याची संमती दर्शवली.

तथापी, सदर दरांबाबत मा.आयुक्त सो. यांचे दालनात दिनांक ०४/०१/२०१८ रोजी पुनश्च बैठक झाली. सदर बैठकीत मा.आयुक्त सो. यांनी संबंधित निविदाकार यांना ५.०० टक्के जास्त एवढया दरावर काम करण्यास विनंती केली असता मे.सतीश कंन्स्ट्रक्शन यांनी ५.०० टक्के जास्त दरावर काम करण्यास संमती दर्शविली आहे.

तरी उल्हासनगर – ३ सिंधु भवन व आजूबाजूचा परिसर विकसित करणे या कामांकरिता मे.सतीश कंन्स्ट्रक्शन यांच्या प्राकलनिय किंमतीच्या ५ टक्के जास्त दराच्या निविदेस मान्यता मिळून मे.सतीश कंन्स्ट्रक्शन यांचे नावे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकरीता सदर प्रस्ताव स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७० **दिनांकः– १५/१/२०१८**

सूचकाचे नांव : श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर –३ सपना गार्डन येथे सिंधु भवन व आजूबाजूचा परिसर विकसित करणे या कामाकरीता मे.सतीश कंन्स्ट्रक्शन यांच्या प्राकलनिय किंमतीच्या ५ टक्के जास्त दराच्या निविदेस मान्यता तसेच त्यांचे नावे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३ :–** उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पाले जोडणीवर व रमाबाई टेकडीवरील बसविलेली जलमापके पावसाच्या विजेमुळे पुर्णतः जळाल्याने तातडीने नवीन बसविणे

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–**पाणी पुरवठयाचे कोण आहे? याचे उत्तर कोण देणार?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठाः–**मा. सभापती महोदया, ६/२/२०१७ रोजीच्या पावसामुळे ले टॅनिंग झालेले होते त्यावेळी आपले जे दोन मिटर होते ग्लो मिटर, पाले आणि रमाबाई टेकडी येथे जळुन गेलेले

होते. आणि पालेवरुन मिळणारे पाणी मोजणी करीता मिटर नसल्याने एमआयडीसीचे मिटर जास्ती प्रमाणे आकारले होते. त्यामुळे तेथिल मिटर तातडीने दुरुस्त करणे आवश्यक आहे. हे तातडीचे असल्याने एक कोटेशन मागीतले होते. त्यामध्ये दोन लोकांनी कोटेशन भरले होते त्यात निम्म दराचे मे. कल्पतरु यांच्याकडुन काम करुन परवानगी मिळण्यासाठी प्रस्तावित केले.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**केले की करुन घ्यायचे?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—**करुन घ्यायचे आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**हे ५(२)(२) मध्ये आहे. आमचे म्हणणे आहे की आपण पुर्वी हे काम करुन घेतले आहे का?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—**दोन मिटर करुन घ्यायचे आहे, कोटेशन मागितले आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**त्याचा बाजारभाव काय आहे?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—**आपणाकडे डीएसआरचा रेट नाही, एमआयडीसीचा दर आहे. जसा डीएसआरचा दर चालतो त्याप्रमाणे कोटेशन मागविले होते.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**कोणत्या कंपनीचे आहे?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—**स्टॅंडर्ड दिले आहे. आयएसओ स्टॅंडर्ड कंपनीचे आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**कंपनीचा उल्लेख नाही,यात स्पेसिफिकेशन नाही, कसला उल्लेख नाही. पुर्ण माहितीसह आणा.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:—**माझ्याकडे चार्ट आहे, देतो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**कंपनीचे नाव दया, संपुर्ण माहितीसह घेवुन आणा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**हा विषय वगळा व याची संपुर्ण माहिती घेवुन या.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**होय, यात माहिती पुर्ण नाही, संपुर्ण माहितीसह फेरसादर करा.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**होय, आणि इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता करा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :—**उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पाले जोडणीवर व रमाबाई टेकडीवरील बसविलेली जलमापके पावसाच्या विजेमुळे पुर्णत: जळाल्याने तातडीने नवीन बसविणे

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी अहवाल सादर करण्यात येतो की, कॅम्प नं ४ व ५ मधील भागात बारवी मेनवरील पाले जोडणीतून तसेच रमाबाई टेकडीवरून पाणी पुरवठा होतो. सदर पाले जोडणीवर महामंडळाच्या मालकीचे व उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे जलमापक बसविलेले आहेत. परंतु रमाबाई टेकडी येथे फक्त महापालिकेचे जलमापक बसविलेले आहे. सदर जलमापकाव्दारे कॅम्प नं.४ व ५ मधील भागात दैनंदिन होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या नोंदी घेणेत येतात. त्यानुसार महामंडळ मासिक देयक आकारत असते व महापालिका आपल्या जलमापकाच्या नोंदीनुसार त्याची तपासणी करून भरण्यासाठी प्रस्तावित करत असते.

सदर जलमापके दि.०६/१०/२०१७ रोजी झालेल्या वादळी पावसातील विज विद्युत पोलवर पडल्यामुळे विद्युत मीटर व महामंडळाचे तसेच महापालिकेचे जलमापके पुर्णत: जळुन खाक झाली आहेत तसेच ती दुरूस्त होण्यासारखी राहिली नाहीत. त्यामुळे शनिवार दि.०७/१०/२०१७ पासून सदर जोडणीवरून प्राप्त होणाऱ्या पाण्याच्या परिमाणाच्या नोंदी घेणे बंद झालेले आहे. त्याकारणास्तव प्रत्यक्षात प्राप्त होणाऱ्या पाणी परिमाणांची मोजदाद होत नाही. त्याकरिता सदर ठिकाणी तातडीने नवीन जलमापके स्वमालकीचे बसविणे आवश्यक आहे. कारण एक जलमापक नादुरूस्त झाल्यास दैनंदिन नोंदी सुरू असलेल्या दुसऱ्या जलमापकाव्दारे अखंडित नोंदी घेणेत येतात. तसेच दैनंदिन ३५ ते ४० द.ल.ली. पाले जोडणीतून व ९ ते १० द.ल.ली. रमाबाई येथून पाणी पुरवठा हया जोडण्यातून सुरू असल्यामुळे ग्राहकाने सुरक्षित नोंदीसाठी स्वमालकीचे जलमापक बसविणे गरजेचे आहे. अन्यथा अंदाजे अवाजवी पाण्याच्या नोंदी महामंडळाकडून आकारण्यात येवुन महापालिकेचे आर्थिक नुकसान होईल. सदर ठिकाणी यापूर्वी महापालिकेकडून अल्ट्रासॉनिक जलमापके बसविलेली होती. परंतु पाले जोडणीवर महामंडळाकडून लवकरच फुलबोअर मॅग्नेटिक इंन्सरशन टाईप जलमापके बसविण्यात येत असून महापालिकेकडून सुध्दा त्याप्रकारचे जलमापक सदर ठिकाणी बसविणे गरजेचे आहे. अन्यथा भविष्यात पून्हा दोन भिन्न प्रकारच्या जलमापकांच्या नोंदीमुळे वाद निर्माण होऊ शकतो तसेच महापालिकेच्या खर्चाने महामंडळ जुन्या व नवीन मुख्य संतुलन टाकीच्या आऊटलेटवर तशीच जलमापके बसवत असून रमाबाई संपच्या इनलेटवर नवीन मुख्य संतुलन टाकीचे आधी येत असल्याने नादुरुस्त झालेल्या जलमापकाच्या ठिकाणी सुध्दा तातडीने नवीन जलमापक बसविणे गरजेचे आहे.

त्यानुसार बाजारातून दरपत्रके मागवून व नवीन दरानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्याची किंमत रु.१८,४४,४३६/— एवढी आहे. तसेच सदर काम तातडीच्या स्वरूपाचे असल्याने निविदा कार्यवाही केल्यास वेळेचा अपव्यय होऊन विहीत कालावधीत काम होणे शक्य नाही. त्यामुळे सदर जलमापकांची कामे मे.कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर प्रा.ली.उल्हासनगर यांचेकडुन काम करून घेण्यास कलम ५ (२) (२) अंतर्गत मंजुरी मिळावी, ही विनंती. तरी सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**<u>स्थायी समिती ठराव क्र. ७१</u>** **<u>दिनांक:— १५/१/२०१८</u>**

सूचकाचे नांव : श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पाले जोडणीवर व रमाबाई टेकडीवरील बसविलेली जलमापके पावसाच्या विजेमुळे पुर्णत: जळाल्याने तातडीने नवीन बसविणेचा प्रस्ताव संपुर्ण माहितीसह फेरसादर करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** अनधिकृत बांधकाम निष्कासनापोटी येणारा खर्च वसुल करणेकामी शुल्क वसुलीस मान्यता देणे.

---

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे</u>**:—याची माहिती कोण देणार आहे. आतापर्यंत वसुली कशाप्रकारे चालु आहे. हे जे तुम्ही दर दिले आहेत त्याप्रमाणे वसुली चालु आहे का? प्रत्येक प्रभाग समितीवाईज वसुली किती झाली आहे आतापर्यंत.

**<u>श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त:—</u>**सन २००१ मध्ये अनाधिकृत बांधकाम निष्कासनाबाबत जो खर्च होता त्यासाठी ६१ रुपये प्रति स्केअर फुट दर निश्चित केला होता. तो दर रिवाईज्ड केला नव्हता त्यामुळे ऑडिट झाले होते.

त्यावेळी ऑब्जेक्शन घेतले होते की आपण रिवाईज्ड केले नाही, जुना रेट आहे. त्यामुळे जुन रेट नविन दराप्रमाणे आणला आहे. यापुर्वी आपण ६१ प्रमाणे वसुल केलेला आहे. आणि जे लोक भरणा करत नाही तर त्यांच्या मालमत्ता करात समाविष्ट केले जाते. त्यास पत्र दिले जाते.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**पत्र दिल्यानंतर मालमत्तेत समाविष्ट केले काय?

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**मला वाटते हा विषय स्थायी समितीचा असुच शकत नाही हा महासभेचा विषय आहे. पॉलिसी डिसिजन आहे त्यामुळे महासभेपुढे आले पाहिजे. दुसरी गोष्ट ६१ प्रमाणे दरवर्षी कसे वसुली केली? माहितीसह महासभेपुढे येवु दया.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**यात ६३ प्रमाणे लिहिले आहे तर त्याचे दर काय आहे?

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**सरसकट आले पाहिजे. आणि अंमलबजावणी करतांना एक प्रभाग समिती करते व एक करत नाही. सरसकट उल्हासनगर—१ ते ५ आले पाहिजे. एका प्रभाग अधिका—याचा चार्ट वेगळा असतो आणि दुस—या प्रभाग अधिका—याचा चार्ट वेगळा असतो.

**डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—**संपुर्ण माहिती आणा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**जनरल बॉडीमध्ये येवु दया तेथे बोलु.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**यात याचा सुध्दा उल्लेख आला पाहिजे जो ना दुरुस्त आहे. त्यांच्यावर सुध्दा फाईन लावले पाहिजे. जसे डेब्रिजवर लागत आहे, ग्रीटला लावतो, रेतीला लावतो.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**महासभेपूढे येवु दया.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**होय महासभेपुढे आले पाहिजे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**या विषयास दूरुस्त करुन महासभेपुढे आणले पाहिजे. यात काय काय दुरुस्त करायचे जसे अनधिकृत बांधकामाचा जुने दर ६३ होते तर आता नविन दर बनविला आहे. त्याचप्रकारे आधी हातगाडीचे काय होते जे चार कॉलममध्ये लिहिले आहे, हातगाडी, रिकामी हातगाडी, रस्त्यावर विक्रीसाठी माल ठेवलेले त्यांचे दर व तसेच गॅरेज बाहेर ज्या गाडया उभ्या करतात, दुरुस्त करण्यासाठी, दोन—दोन, पाच—पाच, दहा—दहा गाडया शटरच्या बाहेर, स्कुटर ट्रक, टॅम्पो त्याचे सुध्दा दर. हया सर्व गोष्टी बनवुन चांगल्याप्रकारे घेवुन या.

**महापालिका सचिव:—**हा धोरणात्मक निर्णय असल्याने महासभेपुढे आणण्यास प्रशासनास निर्देश देत आहे असा ठराव होईल.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :—** अनधिकृत बांधकाम निष्कासनापोटी येणारा खर्च वसुल करणेकामी शुल्क वसुलीस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामांविरुध्द् कारवाई करणेसाठी प्रभाग समित्या स्थापन करण्यात आलेल्या असून अनधिकृत बांधकामांविरुध्द् कारवाई करणेसाठी सहाय्यक आयुक्त यांची पदनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. सहा.आयुक्त यांचे अधिनस्त कनिष्ठ अभियंता, मुकादम व मजूर कर्मचा—यांमार्फत अनधिकृत बांधकामांविरुध्द् निष्कासनाची कारवाई करण्यात येत असते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधीनियमातील कलम २६० व २६७ अन्वये अनधिकृत बांधकाम पाडण्याचा खर्च अनधिकृत बांधकाम करणा–या व्यक्तिने देणे आवश्यक आहे. सदरचा खर्च वसूल करणेकामी दिनांक २०/२/२००१ रोजी तत्कालीन आयुक्तांनी प्रति चौ.फुट रु. ६३/– एवढा निष्कासन खर्च वसुल करणेकामी सदरचे आदेश सन २००१ मध्ये पारीत केलेले आहेत. तद्नंतर या आदेशामध्ये कोणतीही सुधारणा झालेली नाही. प्रधान महालेखाकार कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांनी केलेल्या लेखा परिक्षणामध्ये देखिल सदरची बाब नमुद केली असून निष्कासन खर्चापोटी वसुल करावयाच्या रकमेत सुधारणा करणे आवश्यक असल्याचे लेखा परिक्षणात नमुद केले आहे. त्यामुळे सदर आदेशात सुधारणा होणे आवश्यक आहे. यासाठी पुढीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | निष्कासीत केलेल्या बांधकामाचा प्रकार | निष्कासीत करण्यात आलेल्या बांधकामाच्या एकूण क्षेत्रफळाकरिता वसूल करावयाची खर्चाची रक्कम प्रती चौ.फुट प्रमाणे |
|---|---|---|
| १ | १. पत्रा शेड<br>२. वीट बांधकाम<br>३. झोपडी | रु. १००/– |
| २ | १. टीअर गर्डर<br>२. लोड बेअरींग | रु. २००/– |
| ३ | आर.सी.सी बांधकाम | रु. ३००/– |

संबधिताकडून खर्चाची रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४७८ (२) प्रमाणे वसुल करण्यात येईल. तसेच संबधिताने खर्चाच्या रकमेचा भरणा न केल्यास सदरची रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४३९ (२) अन्वये मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे वसुल करण्यात येईल.

त्याचप्रमाणे शहरातील अनधिकृत फेरीवाले, हातगाडीवाले, महापालिकेच्या पदपथावर व रस्त्यावर अनधिकृत व्यवसाय करणारे यांच्याकडून पुढीलप्रमाणे दंडाची रक्कम वसुल करणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) हातगाडीवर माल असल्यास रु. २,०००/–
२) रिकामी हातगाडी असल्यास रु. १,०००/–
३) पदपथावर अथवा रस्त्यावर विक्रीसाठी माल ठेवलेला असल्यास रु. २,०००/–
४) रस्त्यावर अनधिकृतपणे बांधकाम साहित्य उदा०खडी, विटा, रेती, सिमेंट इत्यादी साहित्य ठेवलेले असल्यास रु,५०००/–

तरी वरीलप्रमाणे शुल्क आकारणी करणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समितीसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ७२** **दिनांकः– १५/१/२०१८**

सूचकाचे नांव : श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अनधिकृत बांधकाम निष्कासनापोटी येणारा खर्च वसुल करणेकामी शुल्क वसुलीस मान्यता देणे हा धोरणात्मक निर्णय असल्याने महासभेपुढे आणण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५:–**सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती क्र. १,२ आणि ३ येथे वाहतुकीचे दिशा दर्शक फलक व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट लावणे या निविदेतील कामांच्या निम्न दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–**कोण उत्तर देईल.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**१९ टक्के बिलो चालले आहे.

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—**करणार ना साहेब.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**काम नाही करणार तर त्यास काळया यादीत टाका.

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता**:—होय.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**किती लोकेशन आहे.

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—**१०० बोर्ड आहे.  साहेब त्यात आरटीओ जसे जसे मागतात तसे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**आम्हांला एक अनुभव आला आहे, जेएनएनयुआरएम अंतर्गत पाण्याची पाईप लाईन होती ती बनविली नाही. संपुर्ण शहर भोगत आहे. तर यामध्ये एकुण किती लोकेशन आहेत?

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—**१०० बोर्ड आहेत. ते साईन बोर्ड आहेत. पी—१, पी—२, नॉ हॉकर्स झोन, सायलन्स झोन, जसे जसे आरटीओकडुन डिमांड येते तसे तसे आम्ही काम करुन घेतो. तसेच शाळा, कॉलेजच्या बाहेर झेब्रा पेंटींग करणार.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**कोठे कोठे होणार आहे.

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—**१०० जागा आहेत आरटीओकडुन

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**आपण फिक्स केले ना.

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—**होय.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**यामध्ये १,२,३ आहे व ४ था का नाही.

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता**:— आधीच त्याची निविदा चालु आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**पास करा पण जर त्याने काम नाही केले तर त्यास काळया यादीत टाका.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यामध्ये त्याने बिलो टाकले आहे तर ॲडीशन सिक्युरीटी आहे का.

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—**परफारमन्स सिक्युरीटी घेतली आहे..

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**जीआर नुसार सिक्युरीटी घेतली आहे का.

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—**होय, घेतली आहे. परफारमन्स सिक्युरीटी घेतली आहे, ॲडीशनल.  एमडी सुध्दा आहे. जसे प्रोग्रेस आपण मागणार तसे आम्ही देणार.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**काम झाले पाहिजे नाही झाले तर त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. घ्या पुढचा विषय.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यात आम्हांला तक्रार आली आहे की, कॅम्प नं. ४ चा ठेकेदार काम करत नाही.

**श्री. अश्विनी अहुजा, उप—अभियंता:—**३ व ४ मध्ये बोर्ड नाही लावले.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आता जसे सांगण्यात आले की ४ नंबर प्रभागासाठी दुसरी निविदा आहे. तर तेथील नगरसेवकांचे असे म्हणणे आहे की ४ नंबर प्रभागामध्ये तो ठेकेदार कामच करत नाही.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—**नाही करत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आता हे जे सभापती आहेत ना तेच सांगत आहेत.

**श्री. अश्विनी अहुजा, उप—अभियंता:—**हे एक वर्षापुर्वीची गोष्ट आहे.  आता ३ व ४ मध्ये बोर्ड नाही आहेत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**मग श्री. सितलानी कसे म्हणत आहेत.

**श्री. महेश सितलानी, उप–अभियंता:–**१० लाखाची निविदा आहे. त्याचे साडे सहा सात लाखाचे बिल होते. व ३ लाख बॅलेंस काम आहे. त्यास बोलावुन प्रभाग समिती ४ मध्ये काम करुन घेवु शकतो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:–**पुर्वीचे जे काम आहे

**श्री. अश्विनी अहुजा, उप–अभियंता:–**हो आहे ना.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**यात मी सांगु इच्छितो की, २२.३८ टक्के बिलो जे काम झाले होते, त्याविषयी मी असे सांगु इच्छितो की सुभाष एन्टरप्राईज २२.३८ टक्के कमी प्रमाणे भरलेले आहे. त्याने २२.३८ टक्के बिलो भरले होते.

**श्री. महेश सितलानी, उप–अभियंता:–** त्याने सिक्युरिटी डिपॉझीट भरले नव्हते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**त्याचे सेकंड इन्व्हलोप का उघडले?

**श्री. महेश सितलानी, उप–अभियंता:–** पहिल्या इन्हलोपमध्ये माहित पडत नाही. परफर्मन्स सेक्युरीटी भरली नव्हती. तांत्रिकपणे माहित नाही पडत.

**डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी** :–फायनल आहे का?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**जेव्हा आपण फर्स्ट इनव्हलोप उघडले तेव्हा माहितच नाही पडले का की त्याचे सिक्युरीटी डिपॉझीट भरले आहे का नाही ते.

**श्री. महेश सितलानी, उप–अभियंता:–**साहेब, त्याची टक्केवारी माहित नाही पडत फर्स्टमध्ये किती भरले आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**सेकंड मध्ये माहित पडते ना.

**श्री. महेश सितलानी, उप–अभियंता:–**होय सेकंडमध्ये माहित पडते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**जर सेकंडमध्ये माहितच नाही पडले की बिलो भरले आहे आणि सिक्युरीटी नाही भरले तर मग निविदाच संपृष्टात येते ना.

**श्री. महेश सितलानी, उप–अभियंता:–**होय. सेकंड २४ टक्के बिलो भरले आहे ना.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**मग परत निविदा मागवायची ना. मग यात असे करायचे ना की त्याने २२.३८ भरले तर त्यास बिलो करुन टाकावे.

**श्री. जितु चोईथानी, उप–अभियंता:–**२२.३८ टक्के आहे परंतु ते १८ टक्के बिलो जाण्यास तयार आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**आपल्या शासनाचा जीआर काय म्हणतो. पहिले तर जे लोवेस्ट निविदा आहे ती परत होते. तर सेकंड लोवेस्टला त्याच्या दराने दयायचे आहे की फर्स्ट लोवेस्टच्या निविदेला मॅच करायचे आहे? मी आपणांस जीआर विषयी विचारत आहे. आपला जीआर काय म्हणतो.

**श्री. महेश सितलानी, उप–अभियंता:–**सेकेंड लोवेस्ट त्यातच भरत आहे. ७ टक्के बिलो टाकुन देईल. जे सेकंड लोवेस्ट भरले आहे त्यात करु शकतो.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–**निविदा काय आहे? यात निविदा सुध्दा दोन आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**याप्रकारचे काम करण्यासाठी यास बिलो करुन टाकु या. व निविदा जर तीन नाही आल्यात तर आपण त्या उघडत नाहीत. तर मग आपण दोन निविदेत कसे उघडले आहे?

**श्री. महेश सितलानी, उप–अभियंता:–**७ निविदा आहे

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी::–</u>**७ ची माहिती आणा, ७ ची माहिती कोठे दिली आहे? हा गोषवाराच चुकीचा आणला आहे यास परत आणा. हा डिफर करा. आणि गोषवारा चांगल्याप्रकारे बनवुन आणा.

**<u>सभापती, श्रीमती कांचन लुंड:–</u>**प्रभाग ४ चे सुध्दा ठेकेदार काम नाही करत. ते म्हणतात की या दरावर मी काम नाही करणार.

**<u>श्री. अश्विनी अहुजा, उप–अभियंता:–</u>**त्याचे ३ लाखाचे बॅलेंस आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>**हा सर्वांना चुकीचा गोषवारा दिलेला आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**आमच्याकडे जो गोषवारा आहे त्यात काहीच माहिती नाही. हा विषय वगळतो यास तुम्ही परत आणा. आपण याप्रकारे गडबड करणार तर नाही चालणार.

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>**४ नंबरचा ठेकेदार काम करण्यास तयार नाही आहे परंतु त्याच दराने काम झाले पाहिजे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**गोषवा–याचे दुसरे पानच दिले नाही.

**<u>महापालिका सचिव:–</u>**त्यांनी पेन ड्राईव्हमध्ये चुकीचे दिले आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**सचिवांकडे वेगळा गोषवारा आहे व आमच्याकडे वेगळा गोषवारा आहे. हा गोषवारा अपुर्ण असून हा विषय वगळण्यात यावा. पुढच्या सभेत पुर्ण गोषवारा देण्यात यावा. आता हा विषय वगळण्यांत यावा.

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५ :–** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती क्र. १,२ आणि ३ येथे वाहतुकीचे दिशा दर्शक फलक व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट लावणे या निविदेतील कामांच्या निम्न दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका येथे प्रभाग समिती क्र.१,२ आणि ३ येथे वाहतुकीचे दिशा दर्शक फलक व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट लावणे या कामांकरीता बी–१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक ०३/०८/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.३४७४३२५/– |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०३/०८/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०४/०८/२०१७ ते ०७/०८/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०९/०८/२०१७ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | |

| | | |
|---|---|---|
| क) | तृतीय मुदतवाढ | |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ११/०८/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक ११/०८/२०१६ |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ६ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ६ |

दिनांक ११/०८/२०१७ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत प्रभाग समिती क्र. १,२ आणि ३ येथे वाहतुकीचे दिशा दर्शक फलक व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट लावणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे**.**

| **अ.क्र.** | **निविदाकाराच्या निविदेमधील बाबी** | **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** | **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** | **मे. सुभाष एंटरप्रायजेस** | **मे.झा.पी. ॲण्ड कंपनी** | **मे.ए.एम. रामचंदानी** | **मे. मॉ भवानी कन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय | होय | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय | होय | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १**) मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स २) मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन ३) मे. सुभाष एंटरप्रायजेस ४) मे. झा.पी.ॲण्ड कंपनी ५) मे. ए.एम.रामचंदानी ६) मे. मॉ. भवानी कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

मा. महापौर यांचे दालनामध्ये दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी ई–निविदेची आढावा बैठक घेण्यात आली होती. त्याअनुषंगाने ई–निविदेचा लिफाफा क्र.१ व २ वर एकाच वेळी उघडण्यात यावे. असे निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे सदर निविदेचे आर्थिक व तांत्रिक भाग उघडण्यात आला आहे.

दिनांक **११/०८/२०१७** रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत**.**

| निविदाकाराचे नांव | | दिलेले दर | **Performance Security** |
|---|---|---|---|
| **१) मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** | : | दिलेले दर १८.१० टक्के कमी | भरलेली आहे. |
| **२) मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** | : | दिलेले दर ९.९९ टक्के कमी | भरलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| **३) मे. सुभाष एंटरप्रायजेस** | : | दिलेले दर २२.३४ टक्के कमी | भरलेली नाही |
| **४) मे. झा.पी.ॲण्ड कंपनी** | : | दिलेले दर १५.०४२ टक्के कमी | भरलेली आहे. |
| **५) मे. ए.एम.रामचंदानी** | : | दिलेले दर १३.०० टक्के कमी | भरलेली आहे. |
| **६) मे. मॉ. भवानी कन्स्ट्रक्शन** | : | दिलेले दर १३.०५ टक्के कमी | भरलेली आहे. |

उपरोक्त **प्रभाग समिती क्र. १,२ आणि ३ येथे वाहतुकीचे दिशा दर्शक फलक व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट लावणे** या कामाचे उक्त निविदाकारांपैकी **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांनी दरसूची वर १८.१० टक्के कमी *(७८ण्७०: इमसव्)* प्रमाणे दर दिले आहे. सर्वात कमी दर भरलेले निविदाधारक म्हणजे **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांनी *च्मतवितउंदबम "मबनतपजल क्मचवेपजम* कोटक महिंद्रा बॅक, उल्हासनगर या बॅकेमार्फत दिनांक ०७/०८/२०१७ रोजी भरलेले असून त्याचा चेक क्रमांक १२४३४१ त्याची रक्कम रुपये ३,२०,०००/— इतकी आहे. तसेच **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांना दिनांक ०८/०९/२०१७ रोजी पत्र देवून त्यांना २२.३४ टक्के कमी दरावर काम करणेस सूचित करण्यात आले होते. त्यानुसार **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स यांचे प्रतिनिधी यांनी मा. आयुक्त यां**चे दालनात शहर अभियंता व उप अभियंता यांचे समोर दर कमी करणेबाबत सुचविले होते. त्याप्रमाणे **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांचे प्रतिनिधी यांनी १९.०० टक्के कमी दरावर काम करणेबाबत सहमती दर्शविली आहे.

तरी सदर दरावरील **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांची निविदा मान्य करण्यास व त्यांचेशी संविदा करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(ड) अंतर्गत मा.आयुक्त व निविदा समिती यांचे स्तरावर संविदेस मान्यतेसाठी मा. स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७३ **दिनांकः—१५/१/२०१८**

सूचकाचे नांव : श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती क्र. १,२ आणि ३ येथे वाहतुकीचे दिशा दर्शक फलक व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट लावणे या निविदेतील कामांच्या निम्न दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६:—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उदयानांची निगा राखणे करीता लेबर व माळी व मजूर पुरवठा करणेच्या कामाची निविदा प्रक्रिया करणेस व सुरक्षा रक्षक पुरवठा करणेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा सुध्दा चुकीचा गोषवारा दिला आहे. आम्हांस जी यादी देण्यात आली आहे ती समजत नाही. ७ निविदा आल्या तर २ निविदेची माहिती गोषवा—यात देतात. गार्डन आहे ६४ तर गोषवा—यात लिहितात ६१.

**श्री. जितु चोईथानी, उप—अभियंता:—**तसे नाही प्रभाग १ मध्ये ३ गार्डन आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**आता मला एक सांगा आपण जी माहिती दिली आहे ........

**श्री. जितु चोईथानी, उप–अभियंता:–**साहेब प्रभाग मध्ये ३ गार्डन एकाच एरियात व एकाच रस्त्यावर आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**कोणत्या क्रमांकावर?

**श्री. जितु चोईथानी, उप–अभियंता:–**प्रभाग १ मध्ये अ.क्र. ६,८,९ वर त्यात एकच उदयान आहे. पहिले काय होते हे तिन्ही एकत्र होते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**एक काम करा, या तिन्हींचे मिळुन किती गार्डन होईल.

**श्री. जितु चोईथानी, उप–अभियंता:–**एकच होईल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**एक करणार मग १६. व नंतर होणार १४.

**श्री. जितु चोईथानी, उप–अभियंता:–**एकच का तर आम्ही डेव्हलप केले होते १ नंबर येथे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी** :–मग यामध्ये तर आपण माहिती नाही टाकली. समजा येथे माळी, तेथे काही असे काहीच नाही लागणार काय?

**श्री. जितु चोईथानी, उप–अभियंता:–**ॲड केले आहे साहेब.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी** :–गार्डनमध्ये तर ॲड केले आहे परंतु ना तेथे माळी मिळेल ना लेबर मिळेल.

**श्री. महेश सितलानी, उप–अभियंता:–**साहेब, सर्व मिळेल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**आपण तसे लिहिले नाही. आपण असे लिहिले आहे की प्रभाग १ मध्ये १३ एकुण उदयाने व एकुण क्षेत्रफळ ३१४५२.९८.

**श्री. जितु चोईथानी, उप–अभियंता:–**साहेब, आमच्या प्रभाग ३ मध्ये पाच गार्डन लहान आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**ठिक आहे यास फेरसादर करुन आणा. चांगल्याप्रकारे बनवुन आणा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**आपण प्रभाग समिती ३ मध्ये दोन गार्डन लिहिले आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**६४ गार्डन व्यवस्थितरित्या घेवुन यावे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:–**तसेच मजुर आहेत, माळी आहे ते सुध्दा पहा. त्यांचे पगार आणि डीएसआर दर काय आहे ते पहा.

**श्री. महेश सितलानी, उप–अभियंता:–**डीएसआर दर तेच आहेत.

**सदस्य श्री. भारत राजवानी:–**यांचे काम होईल काय?

**श्री. तरुण शेवकानी, उप–अभियंता:–**११ हजार, १० हजारपर्यंत त्यांना पगार देणार.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–**यांना आपणांस ड्रेससुध्दा दयायचा आहे.

**श्री. तरुण शेवकानी, उप–अभियंता:–**आपण एजन्सी नेमणार.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–**माझे प्रथम ऐकुन घ्या, ज्या पण संस्था माळी असो, लेबर असो जे काही आहे, आम्हांस पुरवठा करणार तर त्यांना ड्रेस कंम्पलसरी दयायचे आहे. माळीला सर्व सामान असले पाहिजे, त्यास जर सफाई करायची असेल तर झाडु वगैरे सर्व सामान दिले पाहिजे. फावडे व घमेले असले पाहिजे. पावसाळयाच्या वेळी गमबुट व रेनकोट दिले पाहिजे, हया सर्व गोष्टी यामध्ये समाविष्ट झाल्या पाहिजेत.

**श्री. तरुण शेवकानी, उप–अभियंता:–**टेंडर कंडिशनमध्ये सुधारणा करुन या सर्व गोष्टी आम्ही टाकु.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**अशा कोणत्याच गोष्टीचा उल्लेख केलेला नाही. तसेच ज्या संस्था आहेत त्या पीएफ भरुन देणार, ईएसआय भरुन देतील, तर मिनिमम वेजेस आजच्या तारखेस लागु आहेत. त्या हिशोबाने लागु पाहिजे. तर आपण काय लागु केले, काय लागु केले नाही त्याचा खुलासा पाहिजे. डीएसआरमध्ये जो दर आहे तो कशाप्रकारे लागु करणार. मिनिमम वेजेस काय आहे.

**<u>श्री. तरुण शेवकानी, उप—अभियंता:— </u>** २६ डेज जे आहे, मिनिमम वेजेस नुसार साडे ११ हजार नुसार त्यांना महिन्यास पगार मिळेल. मिनिमम वेजेस नुसार ११ हजार पगार आहे त्यापेक्षा जास्त पगार देत आहोत.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**डेली व्हेजेसनुसार मिनिमम वेजेस म्हणजे वेजेस नुसार देत आहात तर पुर्वीचे किती आहे, त्यांचे जीपीएफ,, ग्रॅच्युअटी किती आहे? हे सर्व लागु झाले पाहिजे.

**<u>श्री. तरुण शेवकानी, उप—अभियंता:— </u>** साहेब, मिनिमम वेजेस मध्ये आम्ही सर्व कंडीशन टाकणार.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>**मिनीमम वेजेस किती आहे? परंतु ते व्हीजीबल आहे का? कंडीशनमध्ये आहे का?

**<u>श्री. तरुण शेवकानी, उप—अभियंता:— </u>** एस्टीमेट डीएसआर रेटनुसार बनतो, त्यात सर्व कंडीशन टाकु.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**कंडीशन टाकणार तर तो भरणार, हे सर्व खर्च सुध्दा त्यास लागु होणार ना.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**श्री. बोडारे यांचे बोलणे आपण समजुन घेत नाहीत आपण सांगता की आम्ही सर्व टाकु. जो ठेकेदार हे काम करेल तर तो सर्व काही आपणांस देवु शकणार काय? पगार, युनिफॉर्म वगैरे.

**<u>श्री. तरुण शेवकानी, उप—अभियंता:—</u>**जे एस्टीमेट बनवितो ते बेंच मार्क्स असतो तो डीएसआर रेट मध्ये बनतो. एजन्सी त्यास कोड करणार ना.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**होय, आता आपण मुख्य गोष्टीवर आलात.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**काय असते आपण प्रॅक्टीकल रित्या ते प्राकलन बनवत नाही आहात. त्याने काय होईल की उदया निविदा येईल ५० टक्के अबोव व न्युज पेपरवर बोंबाबोंब.

**<u>श्री. तरुण शेवकानी, उप—अभियंता:—</u>**तो जस्टीफाय करणार ना.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**जस्टीफाय आपण करणार.

**<u>श्री. तरुण शेवकानी, उप—अभियंता:— </u>** बेंच मार्क्स असतो, डीएसआर रेट असतो. डीएसआर एस्टीमेट बनवितो, जे ठाणे शेडयुल रेट आहे त्यानुसार करतो.

**<u>श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:— </u>** आता निविदा मागवित आहोत.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**माळी आहे, लेबर आहे यांचे जे पेमेंट आहे त्यांच्या मार्फत त्यांनी खर्च केला पाहिजे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**आपण ११ हजार पगार सांगत आहात परत त्यात जो कोण ठेकेदार हे काम घेईल ड्रेस, रेनकोट, गमबुट त्यांचा चार्ज प्रत्येकी व्यक्ती आपण एवढा एवढा देवु असे निविदेत टाका. नाहीतर काय होईल आम्ही वर्षात त्यास ३ किंवा ४ हजार एक्स्ट्रा देणार तर अबोव निविदा होईल, २५ टक्के ३० टक्के होईल आणि परत शहराचे नाव खराब होईल. .

**<u>श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—</u>**रेनकोटचे डीएसआरमध्ये प्रोव्हिजन नाही. ते स्टोअरमधुन येणार.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**आपण कंसेप्टच समजले नाही. आपण आउट सोर्सींग करत आहात, त्यास ड्रेस, त्यास इन्श्युरन्स, प्रत्येक गोष्ट व जे काही हत्यार असणार, जे काही लागणार ते सर्व दयायला पाहिजे ते आपले काम नाही आहे.

**<u>श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—</u>**निविदेत अट टाकु.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**ते ठेकेदाराचे काम आहे देणे. नंतर तो म्हणणार आपण हे नाही लिहिले, ते नाही लिहिले.

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—**निविदेत अट टाकु. त्या अटी नुसार तो दर बोल्ड करेल ना. त्या हिशोबाने आपण ॲनेलेसीस करणार.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**नाही, नाही आपल्या डीएसआरमध्ये जर माळीचा दर आहे तर माळीचा दर घेते वेळी त्यांनी काय घेतले, त्याचे जे हत्यार आहे ते घेतले नाही. ते आधी स्पष्ट करा, दुसरे म्हणजे गमबुट आहे, रेनकोट आहे ते पकडले आहे, नाही आहे, त्यात ग्लोज आहे ते पकडले आहे, नाही पकडले आहे. काय पकडले आहे काय नाही ते तर स्पष्ट करा.

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—**साहेब, त्यात काही सुध्दा आम्ही घेतले नाही. त्यात लेबर आहेत, माळी आहेत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**मग माळी कसे काम करणार, जर त्याच्याजवळ सामान नसेल तर तो फक्त येवुन बसणार. आपण त्यास सांगणार कोयता चालव तर तो म्हणणार यात कोयता लिहिलेला नाही. कोयता आपण आणुन दया मग चालवेन व कैची आपण आणुन दया मग चालवेन. कु—हाडी आणुन या मी चालवेन. अशा प्रकारच्या निविदा आणल्या आहे या लोकांनी.

**सदस्य श्री. दिपक सीरवानी:—**श्री. सितलानीजी, ३ वर्षापुर्वी वॉटर सप्लाय आनंदनगर येथे एक गार्डन अलोट केले आहे परंतु तेथे काही काम नाही झाले. साई बलराम साहेबांच्या नावाने ते गार्डन अर्लाट केले आहे. आपण त्या गार्डनचे सुध्दा नाव घ्या यादीमध्ये. धन्यवाद।

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—**हो साहेब.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**माझ्याकडुन आपणांस एक सूचना आहे. आपण या गोषवा—यास परत बनवुन आणा, यात करेक्शन करा. माळी ६४ टाका व मजुर १२८ टाका, जे आपण टाकले आहे त्यापेक्षा डबल. व वॉचमन ३० टाका.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**सुरक्षा बोर्डाचे किती आले आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**सुरक्षा मंडळवाले फक्त ३० टाका. तसेच एक्स्ट्रा जे चार्जेस आहे, गमबुट आहे काही आहे त्याचे एक्स्ट्रा टाका जे ठेकेदारास देणार.

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—**डीएसआर दराने टाकुन देणार.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**होय डीएसआर दराने टाका. प्रत्येक वॉचमनला वर्षात ड्रेस वगैरे असे दिले पाहिजे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**यात काय आहे, ही गार्डनची यादी आहे तर गार्डनची परिस्थिती काय आहे? आपण माळी देणार तर तो तेथे काम करु शकणार की नाही तेथे. रिटेनिंग वॉल लावणार की नाही.

**श्री. महेश सितलानी, उप—अभियंता:—**ती वेगळी निविदा येत आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**माझ्या प्रभागात रामरख्यानी गार्डन आहे, त्यात एक शौचालय आहे ते तोडले आहे व रिटेनिंग वॉल, कंपाउंड वॉल लहान आहे. त्याची काय परिस्थिती आहे?

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**मी काय सांगतो जर मी एक लहान उदाहरण घेतले तर बोटक्लबची परिस्थिती फार खराब आहे. आपण यात घेतले तर मग आपण त्याचे काय करु शकता? आपणांस त्यास डेव्हलप करावे लागेल आणि मग नंतर माळी वगैरे पाठविता येईल ना.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—**आता सपना उदयान हे मोठे आहे तर त्यात एक माळी पुरेसा होणार नाही.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**सर्व जागी एक माळी असणार ना. जर तीन गार्डन लहान असेल तर त्यात एक माळी असणार.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**गार्डन तर छोटे आहे तर माळीचे संपुर्ण दिवसाचे काम असणार ना.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>**बोट क्लबला मोठे गार्डन आहे तेथे माळी जास्त लागणार.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी:—</u>**यामध्ये एक प्रायव्हेट गार्डन आहे यांनी यात आणले आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**अ.क्र. काय आहे?

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी:—</u>**प्रभाग ४ येथे १६ अ.क्र.वर. हे एक प्रायव्हेट गार्डन आहे. तेथे एक कलेक्टर सोसायटी आहे, त्यांचे स्वत:चे गार्डन आहे, रस्ता आहे. तेथे एक माजी नगरसेवक राहत होते. ते गार्डन १००० वॉलच्यावरचे आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**श्री. भारतजी, काय असते जे ले आउट पास होते, त्यात ४०० इमारती आहेत तर रस्ता बनविल्यानंतर, गार्डन बनल्यानंतर ते महापालिकेस हॅण्डओव्हर होते. आपण एमएसईबीचे ट्रान्सफर्मर लावणार ना तर काही कालानंतर ते एमएसईबीचे होते.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी:—</u>**मला हे माहित आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**तर आपले मत काय आहे गार्डन मेंटेन झाले पाहिजे ना.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी:—</u>**नाही, नाही, जे लिगली आहे ते करुन घ्या. त्यास लिगली करुन हॅण्डओव्हर करा असे मला वाटते, कारण ते माझ्या प्रभागात येते. पुढे असे होता कामा नये की हे खाजगी मालमत्ता आहे व यावर महापालिका खर्च करत आहे. कलेक्टर पार्क सोसायटी आहे. ती अशीच बेवारस पडुन आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**प्रायव्हेट आहे तर मग घेतली का?

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी:—</u>**कलेक्टर पार्क सोसायटीचा ले आउट पास आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**याचा प्लान माझ्या मते महापालिका सेशन करते.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी:—</u>**ती जमिन अंबरनाथ मध्ये येते. त्याचा लेखा जोखा सर्व अंबरनाथ येथे आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**अंबरनाथ तालुका होवु शकतो.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**मालमत्ता कोणाचीही असो जर जनता वापर करेल तर बनणार ना उदयान तेथे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी:—</u>**मी तेच म्हणतो त्यास चांगल्याप्रकारे ताब्यात घेवुन कायदयानुसार बनविले पाहिजे. असे होता कामा नये की मी पुढे जावुन पत्र दिले की यावर पाच लाख खर्च करा व पुढे जावुन तक्रार होईल की हे प्रायव्हेट उदयान आहे. नगरसेवकावर केस करा वगैरे वगैरे. मी डेव्हलप न होवो या विरोधात आहे. डेव्हलप झाले पाहिजे, एलिगेशन लागता कामा नये.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**माझे काय म्हणणे आहे श्री. भारतजी, नगररचना विभागाचे कोण आले आहे का?

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी:—</u>**जसे मुंबई येथे झाले होते व वर्तमानपत्रात ब—याचशा एलिगेशन आल्या होत्या. काय आहे, जसे हॅण्डओव्हर करणार तसे ते टीडीआर युज करणार.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**ठिक आहे, यास संपुर्ण माहितीसह फेरसादर करुन आणा.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**प्रभाग अधिकारी कोठे आहेत, येत नाहीत.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**अधिका–यांनी सभेत आले पाहिजे, सभागृहनेता यांनी दहा वेळा स्थायी समितीत सांगितले आहे, त्यांनी आले पाहिजे परंतु एक सुध्दा सभेत अधिकारी येत नाहीत. सभागृहनेता यांचे अधिकारी ऐकत नाहीत.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**श्री. भारत राजवानी हया गार्डनविषयी जो मुद्दा उपस्थित केला आहे, अ.क्र. १६ ते आपण तपासुन पहा. पब्लीक युजमध्ये जर येत असेल तर बनविले पाहिजे. यास बनवुन, डेव्हलोप करुन त्याचे समन्सन सुध्दा केले पाहिजे, तर यास बनवुन ते आपणाकडे आहे नाही आहे, ते पाहिले पाहिजे. जर नसेल तर रितसर ताबा घेतला पाहिजे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>**ठिक आहे, तसेच दुसरे म्हणजे एका उदयानाचे नाव चुकीचे दिले आहे श्याम उदासी गार्डन जे विजय भारत गार्डन म्हणुन पास झाला आहे.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :–</u>**पाणी पुरवठया शेजारील असलेले साईबलराम गार्डनचे सुध्दा घ्या.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:–</u>**ठिक आहे, यास दुरुस्तीसह फेरसादर करुन आणा.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६ :–** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उदयानांची निगा राखणे करीता लेबर व माळी व मजूर पुरवठा करणेच्या कामाची निविदा प्रक्रिया करणेस व सुरक्षा रक्षक पुरवठा करणेस मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात एकूण ६१ उद्याने आहेत. या ६१ उद्यानांचे वृक्ष लागवड करुन सौंदर्य राखण्यात येते. तसेच रस्त्यांच्या दुतर्फा, दुभाजकांमध्ये मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येते. या सर्व लागवड करण्यात आलेल्या वृक्षांची दैनंदीन निगा राखणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच वरील शासनाच्या योजना महापालिका क्षेत्रात प्रभावीपणे राबविणे अत्यंत आवश्यक आहे. तथापी, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अनेक वर्षापासून भरती व बढती होत नसल्याने प्रत्यक्षात कार्यरत असलेला कर्मचारी वर्ग अत्यंत अपुरा आहे. त्यामुळे उद्यानांची निगा राखणे यामध्ये खूप अडचणी येतात, याबाबत लोकप्रतिनिधी, स्थानिक नगरसेवकही वारंवार तक्रार करीत असतात. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे माळी व मजूर यांचा पुरवठा करणे या कामाची निविदा प्रक्रिया करणे व सुरक्षा रक्षक मंडळ, मुंबई येथून वॉचमन मागविणेच्या प्रस्तावास दिनांक ०२/०१/२०१८ रोजीच्या मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आले होते.

तथापी, दिनांक ०२/०१/२०१८ रोजीच्या मा.स्थायी समितीच्या बैठकीत असे ठरले की, सदरच्या मुळ प्रस्तावात बदल करुन प्रभाग समिती निहाय जेवढे उद्यान तेवढे माळी व सुरक्षा रक्षक मागविणे.

यास्तव, सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या मुळ प्रस्तावात खालील बदल करण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्रभाग समिती क्र. | एकूण उद्याने | एकूण क्षेत्रफळ | आवश्यक माळी | आवश्यक मजूर | आवश्यक पहारेकरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १३ | ३१४५२.९८ | १३ | २० | १३ |
| २ | २ | १२ | ३२१६५.२६ | १२ | १८ | १२ |
| ३ | ३ | १९ | ५४७६९.८३ | १९ | ३१ | १९ |
| ४ | ४ | १७ | ४५६३६.०० | १७ | २८ | १७ |
| | एकूण | ६१ | | ६१ | ९७ | ६१ |

| | **एकूण आवश्यक संख्या** | **दरसुची प्रमाणे दर** | **एकूण दिवस** | **महिन्यांची संख्या** | **एकूण खर्च (स्तंभ क्र. १ X २ X ३ X ४ )** |
|---|---|---|---|---|---|
| | **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| माळी | ६१ | ४५२.०० | २६ | १२ | रु.८६,०२,४६४/- |
| मजूर | ९७ | ४२३.०० | २६ | १२ | रु.१,२८,०१,६७२/- |
| वॉचमन | ६१ | २१,८४३ | | १२ | रु.१,५९,८९,०७६/- |
| | | | | **एकूण** | **रु.३,७३,९३,२१२/-** |

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ मधील उद्यानामध्ये मजूर, माळी व सुरक्षारक्षक पुरविणेस निविदा कार्यवाही करावयाची आहे. निविदा सादर करणा-या निविदाकाराने सुरक्षा रक्षक हे शासन निर्णय क्र.एसजीए – १५०६/प्र.क्र.९९/काम-५ दिनांक ८ नोव्हेंबर,२००६अन्वये सुरक्षा मंडळ, मुंबई यांचेकडून मागविणे बंधनकारक राहणार आहे.

तरी सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकरीता स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ७४** **दिनांकः– १५/१/२०१८**

सूचकाचे नांव : श्री. सुनिल सुर्वे
अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उदयानांची निगा राखणे करीता ६१ माळी, ६१ वॉचमन (पहारेकरी) व ९७ मजूर पुरवठा करणेच्या कामाची निविदा प्रक्रिया करणेस व सुरक्षा रक्षक पुरवठा करणेचा प्रस्ताव प्रशासनास संपुर्ण माहितीसह गोषवारा फेरसादर करणेस निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ४.५० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:– २९/१/२०१८

**दि. २९/१/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**१७**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक २९/१/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ७ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ८ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ९ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| १० | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| ११ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, २. श्रीमती पंचम उमेश कालानी, ३. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा, ४. श्रीमती कविता लाल पंजाबी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

४८.श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
४९.श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
५०.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
५१.श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर

५२.श्री. संतोष जाधव, सहा. लेखा अधिकारी
५३.श्री. राम जैसवार, शहर अभियंता
५४.श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार
५५.श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
५६.श्री. अशोक जाधव, प्र. सहा. लेखा परिक्षक
५७.डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
५८.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
५९.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
६०.श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
६१.श्रीम. छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त, विधी
६२.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
६३.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
६४.श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
६५.श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
६६.श्री. वानखेडे, लेखा अधिकारी
६७.श्री. जितु चोईथानी, उप अभियंता
६८.श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
६९.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
७०.श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
७१.श्रीमती निलीमा कदम, ॲकाउंटंट, शिक्षण मंडळ
७२.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
७३.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

दुपारी १२.१५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक १५/१/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक १५/१/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्रीमती डिंम्पल ठाकुर

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

**स्थायी समिती ठराव क्र. :–** ७४ अ **दिनांक : २९/१/२०१८**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक १५/१/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २० पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्र. २ :–** उल्हासनगर शहरातील कॅम्प नंबर १ मधील अंबिका नाल्यामुळे वालधुनी नदीचे प्रदुषशन कमी करण्यासाठी व नाल्याची स्वच्छता करण्यासाठी तयार केलेल्या प्रकल्प अहवाला करीता सल्लागार फी ची रक्कम अदा करण्यास मान्यता देणे.

---

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता:–**अंबिका नगर नाल्यामधील शॉर्टटर्म आपणांस करण्यासाठी एमजीपी आणि सुप्रिम कोर्टचे आदेश आहेत. वालधुनीचे शुध्दीकरण करण्यासाठी आपण प्रोजेक्ट केलेले आहे, उल्हासनगरचे ते अमृत योजनेमध्ये मंजुर आहे, निविदा झालेली आहे परंतु ती कामे व्हायला दोन वर्ष लागणार आहे. तरी वालधुनीमध्ये होणारे प्रदुषण कमी करण्याच्या दृष्टीने सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी नाल्यातील लोड कमी करण्याकरीता शासनामार्फत म्हणजे....

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**निरी शासनाची संस्था आहे. त्यात बायोट्रिटमेंट वनस्पती वगैरे टाकुन त्याचे फ्लो वाढवितात आणि त्याचे जे प्रदुषण आहे त्या प्रमाणात कमी करण्याचा प्रयत्न करतात. आता हा विषय सीएस कमीटीच्या सभेत झाला होता. आपणांस जे काही मेजेस करायचे असेल त्यात आपला वालधुनीचा विषय असेल, खेमाणी डायर्वशन विषय असेल, खडेगोलवलीला जे सेक्शन झाले त्यातीलच भाग आहे. सुप्रिम कोर्टामध्ये आपण ॲफिडेव्हीड केलेले आहे की आम्ही या सर्व गोष्टी करत आहोत, त्यांनी आपल्याविरुध्द केस दाखल केलेली आहे त्यांचे हेच म्हणणे आहे की आपण कुठल्याही उपाययोजना करत नाहीत, शार्टटर्म किंवा लॉगटर्म. त्यास आता गती मिळाली आहे, हा एक महत्वाचा विषय होता. त्याचा खर्च जर आता पाहिला तर मला सुध्दा योग्य वाटत नाही. शेवटी ती शासनाची संस्था आहे. तर आपण एकीकडे खर्चाकडे बघायचे की सुप्रिम कोर्टाच्या स्टेला तोंड दयायचे, हे आपणांस करावे लागणार आहे. ही निरी संस्था आहे. त्यांचे जे टेंडर डॉक्युमेंट आहे त्यांचा पुढील जो खर्च आहे १ कोटी ४१ लाख, तो ॲक्चुली कामाचा खर्च आहे. २७ लाख आणि पुढील जी रक्कम आहे, ती त्यांची कंसल्टंसी फी आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:–**किती किलोमिटर आहे, कोठे आहे?

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता:—**शहाड स्टेशनच्या बाजुला आहे, नाल्यामधील जे स्लो आहे त्याने ते बायोरिड्रेशन करणार आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**पाणी अडवुन त्या त्या टप्प्यावर करतात.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**राजीव गांधी नाला नाही का कोणार्कच्या बाजुला तेथे आहे.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता:—**होय तेथेच.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**नाल्याची परिस्थिती खराब आहे, तो नाला कच्चा आहे, पक्का बांधलेला नाही.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**कंन्सल्टंसीची त्यांची कामे काय काय आहेत? आता जे काम चालु आहे त्यावर त्यांचे निरिक्षण आहे काय आहे?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**एकुण त्यांचे कंन्सल्टंसी चार्जेस म्हणजे तात्पुरते काही उपाययोजना करायला पाहिजे म्हणजे पुर्ण प्रोजेक्ट रिर्पोट त्यांनी शॉर्टमध्ये तयार करणे, निविदा डाक्युमेंट तयार करणे, फ्लोट वगैरे करुन त्यांचे बिल जे येईल ते वायोलेशन करणे व एकुण कामाचे निरिक्षण करणे असे एकुण सर्व त्यामध्ये आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**तेथे साहेब, ना सुपरविजन आहे ना, कोणाचे लक्ष आहे, ना कोणी तेथे आहे, यापध्दतीने तेथे कोणीच दिसलेले नाही.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता :—**अदयापपर्यंत तेथे कामच सुरु झालेले नाही साहेब. निविदा त्याने दिली आहे, निविदा प्रोसेसमध्ये आहे. केंद्र शासनाचे असल्यामुळे आपणाकडे विभागीय आयुक्तांकडुन बायंडिंग आहे म्हणजे यांच्याकडुन शॉर्टटर्म करण्यासाठी आणि पोल्युशन कंट्रोल सभेला आज हे शॉर्टटर्म असतात आपण ते करत नाही म्हणुन.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**म्हणजे तो ठेकेदार जो आहे तो काम सुरु करेल तेव्हा सुपरविजन असेल आणि सुपरविजनच्या सहीनंतरच आपली बिले निघतील ना.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**होय, होय, बरोबर. निरीबाबत त्यांना सांगितले होते की एकुण कंन्सल्टंसीपासुन त्याचे निविदा डाक्युमेंट त्यांनीच तयार करायचे, त्याचे रिवायलेशन त्यानेच करायचे, आपल्या नावावर जाहीरात निविदा वगैरे सर्व होईल, बाकी त्याने सर्व करायचे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**म्हणजे फायनल शेवटपर्यंत त्यांनी करायचे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**होय शेवटपर्यंत करायचे व मॉनिटरींग सुध्दा त्यांनीच करायचे. शॉर्टटर्म जे मेजर आहे ते पावसाळयामध्ये जे करतात त्यामध्ये स्ट्रक्चर वगैरे टेंम्पररी करतात, ते काढुन घ्यावे लागते कारण पावसाळयामध्ये ते वाहुन जाण्याची शक्यता असते. एकुण पाच वर्षाचे आहे. आपण किती वर्षासाठी हे केलेले आहे.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता :—**मेंटेनन्स पाच वर्षासाठी केले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**कोठे ४१ आहे ५ फुट ५ वर्षासाठी ते करतात.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**हा जो अंबिका नाल्याचा विषय आहे हा फक्त कंन्सल्टंसीसाठी आणला आहे ना.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**होय.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**आपण त्यास सांगितल्यानंतर काय काम करत आहे तेथे. हे जे कंन्सल्टंसी आहे नविन काय प्राकलन बनविले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**हा जो विषय आहे ना, तो वेगळा विषय आहे. त्यात बायोमेडिकल ट्रिटमेंट देतात. प्लान वगैरे लावुन त्यांचे जे काही आहे ते लावुन, हे आमच्या बिल्कुल स्कोप ऑफ वर्कमध्ये येत नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**म्हणजे कंन्सल्टींग ते करणार.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**होय सर्व. कंन्सल्टंसी १ कोटी ४१ लाख आहे. सॉलिड कंस्टेमचे निविदा बनवणार आहेत

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**थोडया वेळासाठी व दिर्घकालीन याबाबत जरा सांगावे. २९ लाख त्यांनी लिहिले आहे की हे अल्पकालीन ७८ लाख ५५ हजार, दिर्घकालीन हे काय आहे, हे जर दिर्घकालीन केले तर संपुर्ण लागणार की २९ लाख कापणार की ७८ लाख काय आहे? आपण हे दोन पाठविले आहे त्यात काय आहे की आपण जर अल्पकालीन सल्लागाराची फी घेतो तर २९ लाख लागणार व दिर्घकालीन जर घेतले तर ७८ लाख लागणार. आज आपण अल्पकालीन घेतले आहे व पुढे जावुन दिर्घकालीन घेतले तर काय ७८ मधुन २९ मायनस होतील की काय होईल. या दोघांचे डिफरन्स काय आहे?

**श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**आता आपण ७८ चे बनविले नाही, साहेबांनी सांगितले की शॉर्टटर्मचे कमीत कमी खर्चवाले बनवायचे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**शॉर्टटर्ममध्ये व लॉगटर्ममध्ये फरक काय आहे?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**५ वर्षाचा काळ आहे. त्याने काय परसेंटेज दिले काय? फी घेतली आहे का?

**श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—** टक्केवारी नाही साहेब, प्रत्येक कॉम्पोंटंटला वेगवेगळा दिला आहे त्यांनी. आणि परसेंटेजमध्ये नाही दिले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**ठिक आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**प्रोजेक्ट आपणांस पुर्ण करायचा आहे तर मग शॉर्टटर्म व लॉगटर्म आपणांस समजत नाही. शॉर्टटर्ममध्ये घेतले व तेही पुर्ण नाही झाले तर जबाबदारी कोणाची?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**शॉर्टटर्मच्या कामाचा कालावधी किती आहे तो तीन महिन्याची आहे ना. कामाचा कालावधी किती आहे, तीन महिन्याचा ना?

**श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**होय तीन महिन्याचा आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**३ महिन्याचा आहे व ५ वर्ष ते मेंटेन करणार. व्हीजीट करुन ५ वर्ष ते मेंटेन करणार. ७८ लाख लॉगटाईम म्हणजे अनएंडिंग विषय होता.

**श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**ते अॅडशनल कॉम्पोंटंट आहे. लॉगटर्मसाठी ती स्कीम करतो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**एकुण खेमाणी डायव्हर्शन आणि वडोल गावचे काम पुर्ण होईल. आता आपणाकडे आपण काहीच प्रक्रिया दाखवु शकत नाही. एक फेस फक्त सुप्रिम कोर्टामध्ये होईल की आम्ही काही तरी केले.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**डीपीआर पुर्ण करा आणि ५ वर्ष त्याने मेंटेन केले पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**त्याचीच निविदा त्यांनी १ कोटी ४१ लाखाची केली आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**आपणास २७ लाख ५६ हजार दयायचे आहे.

**श्री.सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**कंन्सल्टंसी फी आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**आणि कामाचे मेंटेनन्स वगैरेसाठी १ कोटी ४१ लाख दिले आहे. तर मग हे कधी करणार आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**त्याचे आता डीटीपी वगैरे झाले आहे, महोदया कधी देणार त्यानंतर

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हे काम लवकर केले पाहिजे. त्याचे प्राकलन तयार करुन त्या कामाच्या मागे लवकर लागले पाहिजे. हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**महापालिका सचिव :—**मी ठराव वाचुन दाखविते. ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील कॅम्प नंबर १ मधील अंबिका नाल्यामुळे वालधुनी नदीचे प्रदुषण कमी करण्यासाठी व नाल्याची स्वच्छता करण्यासाठी तयार केलेल्या प्रकल्प अहवाला करीता सल्लागार फी ची रक्कम रू. २७,५६,०३७/— अदा करण्यास मान्यता देत आहे. इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—** उल्हासनगर शहरातील कॅम्प नंबर १ मधील अंबिका नाल्यामुळे वालधुनी नदीचे प्रदुषण कमी करण्यासाठी व नाल्याची स्वच्छता करण्यासाठी तयार केलेल्या

प्रकल्प अहवाला करीता सल्लागार फी ची रक्कम अदा करण्यास मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरातील विविध नाल्याव्दारे उल्हासनदी व वालधुनीनदीचे होत असलेले प्रदुषन तातडीने थांबविण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने वेळोवेळी सुचित केले आहे. या अंतर्गत उल्हासनदीचे प्रदुषण थांबविणे करीता खेमाणीनाला वळविण्याचे काम महापालिकेकडून हाती घेण्यात आले आहे.परंतु वालधुनीनदीचे सांडपाण्यामुळे होणारे प्रदुषण कमी करण्यासाठी अमृत योजने अंतर्गत भुयारी गटार योजना प्रस्तावित करण्यात आली असून या कामास बराच कालावधी लागणार असल्याने तातडीची उपाय योजना करणे बाबत मा. राष्ट्रीय हरित लंवाद (NGT) यांचा आदेश असल्याने मा. विभागिय आयुक्त कोकण भवन यांचे अंध्यक्षतेखाली दिनांक १७/०१/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत केंद्र शासनांची अधिकृत राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अंनुसंधान संस्थान मुंबई (NEERI) संस्थेस सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून उपाय योजना सुचित करण्याच्या सुचना बैठकीत दिलेल्या होत्या त्या नुसार नेरी संस्थेव्दारे दोन प्रकारच्या उपाय योजना (अल्पकालीन व दिर्घकालीन) करीता DPR सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी सल्लागार म्हणून फी करीता दोन स्वंतत्र प्रस्ताव दिनांक १८/०२/२०१७ रोजी सादर केलेले होते. अल्पकालीन प्रस्तावाकरीता सल्लागार फी रू. २९,२७,५००/— व दिर्घ कालीन उपाय योजनेच्या प्रस्तावाकरीता सल्लागार फी रू. ७८,५५,०००/—आकारनार असल्याचे त्या पत्रान्वये कळविले होते.

महापालिकेव्दारे सदर संस्थेस अल्पकालीन उपाय योजना करणे करीता प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी पत्रान्वये दिनांक १९/०४/२०१७ व २५/०७/२०१७ रोजी लेखी कळविण्यात आले होते. या अंनुषगाने नेरी संस्थेव्दारे अंबिका नाल्याव्दारे होणारे प्रदुषण कमी करण्यासाठी व नाल्याची स्वच्छता करण्यासाठी उपाय योजना करण्याबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल,आराखडे,अंदापत्रके,नकाशे तयार केलेले असून दिनांक २४/११/२०१७ रोजी महापालिके पुढील कार्यवाहीसाठी सादर केलेला आहे. सदर काम तातडीने राबविणे करीता मा. सर्वोच्च न्यायालयात सिव्हिल अपील क्रमांक १०५८२/२०१७ अन्वये कालमयादेत पूर्ण असल्याने सदर मेरी या तज्ञ संस्थेकडून तांत्रिक मार्गदर्शनाखाली प्रकल्प राबविणेबाबत सुचित केलेले आहे. यात खालील कामांचा अंर्तभाव आहे.

| Sr No. | Description of Item | Amount |
|---|---|---|
| 1 | Screen/Floating Booms | Rs.5,79,700.00 |
| 2 | Silt trapper | Rs.34,94,747.52 |
| 3 | Floating rafters | Rs.56,53,600.33 |

| | | |
|---|---|---|
| 4 | Solar diffused aerator, Chlorination unit & Lime and PAC/Alum addition | Rs.11,13,400.00 |
| 5 | Gabion/check dam | Rs.9,36,675.00 |
| | | Rs.1,17,78,722.95 |
| | Operation and Maintenance for 5 years | Rs.23,55,624.57 |
| | Total Amount | Rs.1,41,33,747.42 |

वरील प्रकल्पाचा अहवाल,आराखडे,अंदापत्रके,नकाशे तयार करण्याची फी मिळण्या बाबत संदर्भिय पत्रान्वये मेरी संस्थेने मागणी केलेली आहे. या अंतर्गत प्रकल्प अहवाल तयार करण्याची सुधारीत फी रू. २५,९०,८६७/- जी.एस.टी धरून आकारण्यात येणार असुन या अंतर्गत प्रकल्प अहवाल करीता सर्वेक्षण करणे,आराखडे,अंदापत्रके,नकाशे तयार करून सादर करण्याच्या कामाचा समावेश आहे. त्याशिवाय या कामाची ई निविदा प्रक्रिंया करणे,निविदेचे तांत्रिक मुल्यांकन व निविदा अंतिम करणे या करीता रू. १,६५,२००/- जी.एस.टी. अंर्तभूत करून असे एकुण रू. २७,५६,०३७/- अदा करणेची मागणी केली असून सदर रक्कम मेरी संस्थेने मा. विभागिय आयुक्त व प्रदुषन नियंत्रण मंडळ यांच्या मार्फत मा.उच्च न्यायालय मुबई फिटीशन क्रमाक ७४५६/२०१५ च्या अंनुषगांने कार्यवाही असल्याने सदर देयक अदायगी करणे गरजेचे आहे.

तरी सदर रक्कम अदायगी करण्यासाठी मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त करण्यासाठी मा. स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ७५** **दिनांक:-२९/१/२०१८**

सुचकाचे नाव :- श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील कॅम्प नंबर १ मधील अंबिका नाल्यामुळे वालधुनी नदीचे प्रदुषण कमी करण्यासाठी व नाल्याची स्वच्छता करण्यासाठी तयार केलेल्या प्रकल्प अहवाला करीता सल्लागार फी ची रक्कम रू. २७,५६,०३७/- अदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :-** विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

**विषय क्र. ३ :—** दिनांक ०६ डिसेंबर २०१७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येणाऱ्या लोंकांसाठी पाणपोई, चहा व बिस्कीट इ. ची व्यवस्था करण्यात आली होती, सदर कामाची माहिती नोंद करणे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ३ :—** दिनांक ०६ डिसेंबर २०१७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येणाऱ्या लोंकांसाठी पाणपोई, चहा व बिस्कीट इ. ची व्यवस्था करण्यात आली होती, सदर कामाची माहिती नोंद करणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये मा. उप आयुक्त, मुख्यालय व मा. उप आयुक्त, भांडार यांनी दिनांक ०५/१२/२०१७ रोजी दिलेल्या निर्देशांनुसार दिनांक ०६ डिसेंबर २०१७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महापालिका मुख्य प्रवेशद्वार येथे जमणाऱ्या अनुयायांकरीता पाणपोई, चहा व बिस्कीट इ. ची व्यवस्था करण्यात आली होती. सदर कार्यक्रमासाठी झालेल्या खर्चास दिलेल्या मंजुरीची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | च्हा | ४१४००/— | मे. मोहिनी एंटरप्रायझेस उल्हासनगर— ०४ |
| ०२ | पाण्याचे ग्लास | १८०००/— | |
| ०३ | बिस्कीट्स, गुड डे, लहान पॅकेटस् | ४८४५०/— | |
| ०४ | मंडप ८×१०, एस बॅक जवळ, तसेच महापालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ ०५ टेबल झालरसहित व वाटपासाठी ०४ व्यक्ती | १२०००/— | |
| एकूण | | **१,१९,८५०/—** | |

तरी सदरची माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ प्रस्तावीत करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७६ **दिनांकः—** २९/१/२०१८

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार दिनांक ०६ डिसेंबर २०१७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येणाऱ्या लोंकांसाठी पाणपोई, चहा व बिस्कीट इ. ची व्यवस्था करण्यात आलेल्या कामाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** उल्हासनगर महानगरपालिका सेवेत कार्यरत लाभार्थी सुरक्षा कर्मचाऱ्यांना गणवेश व त्यांसंबंधी इतरसाहित्य खरेदी करणेकामी गणवेशाची रक्कम लाभार्थ्यांच्या बॅक खात्यामध्ये जमा करणेबाबत.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**गणवेशाचे आणि इतर म्हणजे काय? कोण आहे उत्तर दया.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**सांगा काय काय आयटम आहे ते.

**श्री. बाजीराव जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुखः—**इतर म्हणजे बेल्ट आहे, शुज आहे, रेनकोट आहे, स्वेटर आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**मग त्याची बाकीचे बिले मिळणार आहे का? यात नमुद केले आहे की बिले दिल्यानंतर लाभार्थ्यांने खरेदी केलेल्या वस्तूची व सादर केलेल्या पावतीची शहानिशा करून पूर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्यांच्या बॅक खात्यावर योजनेअंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे मला हे समजत नाही, म्हणजे सामान्य माहिती अशी आहे की आपण एक कापड खरेदी केल्यानंतर त्याचे एक बिल मिळते. किंवा आपण शिलाईला दिले तर शिलाईचे बिल मिळते. मग हया ज्या छोटया गोष्टी आहेत पट्टे आहेत, स्वेटर आहे याचे बिल मिळत नाही. मी पोलिस खात्यात पाहिले आहे की एक एक माणुस तेथे येतो ते बघतात आणि तसेच बिल घेतात.

२५ रुपये, १० रुपये, ५० रुपये जो काही दर असेल तो. तर तीन बिल ते उपलब्ध करुन देणार तर काय होणार. ते सुरक्षा रक्षक आहेत एक तर खरेदी करुन देतील काय, माझे प्रामाणिक मत असे आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**हे बरोबर आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**शासन निर्णयाचा हा जो उल्लेख करतात, प्रत्येक वेळी असे होते की त्याचा नंबर देतात. शासन निर्णयाची प्रत आम्हांस देत नाही. तर आम्ही काय समजणार त्यात काय लिहिले आहे. प्रशासन आम्हांस काय देत आहे ते, शासन निर्णयाची प्रत तर आम्हांस दिली नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आता मागवुन घ्या ना.

**श्री. बाजीराव जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख:—**हो आहे साहेब माझ्याजवळ.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**काय होते साहेब, जो विकणारा असतो ना तो छोटया छोटया गोष्टींसाठी बिल देत नाही. जे दुकान आहे ना, जर बिल देणार नाही तर जो शिपाई आहे तो अशा छोटया छोटया गोष्टी घेणार तर त्यास बिल दिले जाणार नाही. तर किंमत फिक्स करुन ठेवा की एवढी रक्कमेत दयायचे आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**थर्ड बिलचे पेमेंट तो तर देवु शकत नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**यात काय आहे, १४ हजार देणार, मग ते नंतर १३ हजार किंवा १५ हजार मध्ये खरेदी करतील.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**तसे तर १४ हजार १२३ चे सुध्दा बिल पाहिजे. १४हजार १२३ रुपयात तो खरेदी करणार पण याचे बिल नंतर मिळणार, यात लिहिले आहे की, सादर केलेल्या पावतीची शहानिशा करुन पुर्णपणे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**बिल जेथुन घेणार तेथिलच बिल असणार.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब, ड्रेसचे बिल मिळणार बाकी इतर जे आहे त्याचे बिल मिळणार नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे ना. किरकोळ बघता येईल परंतु मोठे तर जसे पॅटशर्ट आहे ते मिहणार.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**होय ते मिळणार. नाहीतर मग वॉव्हचर ते चालवा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे, वॉव्हचर घेता येईल.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**माझे तेच म्हणणे आहे की ते वॉव्हचर पध्दतीने घ्या.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**माझा यामध्ये प्रश्न आहे. यातील विषय जो आहे विविध कल्याणकारी योजना वस्तु स्वरुपात मिळणेकामी रोख लाभार्थींना बॅक खात्यात जमा करणेबाबत, ज्या लाभार्थीस आम्ही जी वस्तु देत आहोत, तर यामध्ये एम्प्लॉईजसाठी काही जीआर आहेच नाही. जे मी समजत आहे, डीपीटी त्यांनी जे म्हटले आहे थेट लाभ हस्तांतरण, आणि योजना म्हणजे ज्यास सामान देत आहात त्यास दयायचा आहे तर यामध्ये मला कर्मचा—यांचा उल्लेख दिसत नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**यामध्ये डायरेक्ट उल्लेख केलेला नाही.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आम्हांला त्यांना युनिफॉर्म दयायचा आहे. आणि त्याचे पेमेंट दयायचे आहे. हा वेगळा विषय आहे, जीआर मध्ये म्हटले आहे की आम्ही वेगवेगळया स्कीम चालवत आहोत. त्या स्कीममध्ये आपण जर कोणास काही वस्तु देत असणार ते त्यास वस्तु न देता थेट त्यास रक्कम दयावी. समजा मी आपणांस उदाहरण देतो, ज्यांना लेपरसी आहे त्यांना आपण दरमहा हजार रुपये अनुदान देतो व ते पैसे डायरेक्ट त्यांच्या खात्यावर जातात. तर ही एक स्कीम झाली की लेपरसी लोकांना मदत करायची आहे. जर मदत करायची असेल तर आपण त्यांना कपडे घेवुन दया किंवा अन्य काही वस्तु घेवुन दया. त्यांची जी आवश्यकता आहे, जसे औषधी आहे जे काही असेल ते आपण त्यांना मदतीच्या रुपाने अनुदान म्हणुन हजार रुपये देतो, हे झाले डीबीटी थेट. तर यामध्ये कर्मचारी व सेक्युरीटी गार्ड यांना ड्रेसचा उल्लेख नाही. तर हा कशाप्रकारे लागु होतो ते सांगितले जावे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**यामध्ये हे पहा सद्यस्थिती डीबीटी अंतर्गत अनेक योजना अंतर्भुत आहेत या योजनेत रोख रक्कमेच्या स्वरुपात अनुदान देण्यात येते. तर हे एक्झीस्टींग आपण हा जीआर येण्याआधी ब—याच योजना देत आहोत. लाभार्थ्यांच्या बॅक खात्यात थेट जमा होते. उदाहरणार्थ शिष्यवृत्त योजना अंतर्गत मिळणारे , वेतन, घरगुती योजना, गॅस, डीबीटी कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याची गरज आहे. यात ट्रान्सफरंसी असते, क्वालीटी मेंटेन असते. आपण एकसाथ खरेदी करतो तर निविदा करा, ते करा मग निविदा भरल्यावर टाईमली परचेस होत नाही. टाईम डिले होते व ट्रान्सफरंसी होत नाही. ज्यांना कोठेही परचेस करायला त्याला स्वतंत्रता राहिल. तो आपल्या हिशोबाने करेल. आपण प्राकलन तयार करत आहात चांगली गोष्ट आहे. लाभार्थी म्हणजे काय तर वन डु यु गेटींग मिन्स अ लाभार्थी, तो सामान्य व्यक्ती असो किंवा आपला कर्मचारी असो त्यास आम्ही एक्स्ट्रा देत आहोत. ही इज बेनिफिसली.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**कर्मचारी शब्द किंवा सुरक्षा रक्षक युज नाही केले आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**इत्यादी मध्ये सर्व येवुन जाते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**इत्यादीत तर आपण काहीही घेवु शकतात असे नाही होवु शकत कधीही. इत्यादी कोणास बोलतात तर ए बी सी डी इत्यादी यात इ येईल, एफ येईल, सर्व येते. परंतु त्यामध्ये अ ब क नाही येत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे, वुई आर चुस चॉईसेस परंतु जीआरचे आपण एक्स्टेंड करुन थोडे चांगल्याप्रकारे आणखीन वाढवुन त्यास लिटरली करणार हे प्रथम, नंतर सेकंडचॉईस आहे परत रखडलेले निविदा ...

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**हेच बरोबर आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**होय, हेच बरोबर आहे. यात काही वेळ सुध्दा जातो. जेवढे होईल तेवढे डीबीटीमध्येच गेले पाहिजे. आपण शाळेचे केले तसे त्यात डायरेक्ट आपण अकाउंटमध्ये जमा केले.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**गेल्या दोन वर्षापासुन नाही.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**नाही, नाही, गेल्या चार पाच वर्षापासुन नाही आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**ठेकेदाराकडुन कपडे मागविले तर बरोबर नाही येत.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**बरोबर येत नाही, ते उलट चांगल्या क्वालीटीचे स्वत: आणेल. कारण स्वत:ला घालायचे आहे. पैसे त्यास मिळत आहे तर माझ्या मते तरी चांगल्या क्वालीटीचे तो आणेल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**काय होते, जी चर्चा होते ड्रेसमध्ये किंवा ज्यास आम्ही वाटतो की तो म्हणेल अरे हे चौदा हजाराचे नाही हे तर पाच हजाराचे मिळेल. तुम्ही घेवुन या तुम्हांस चौदा टक्के काय वीस टक्के सुध्दा आणता येईल.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**हे महापालिकेस क्रिटीसाईज करणे, शासनास क्रिटीसाईज करणे आजच्या काळात फॅशन आहे. आपण कितीही चांगले काम घेवुन या, क्रिटीसाईज होणार नाही असे होवु शकत नाही. आम्ही लहान होतो, पुस्तकात एक गोष्ट होती. एक पिता आणि मुलगा गाढव घेवुन जात होते. तेव्हा लोक म्हणायचे गाढव सोबत असतांना देखील आपण पायी जात आहात. तर ते म्हणाले हे बरोबर आहे, त्यावेळी पिताने मुलास त्या गाढवावर बसविले. पुढे गेल्यानंतर दुसरा व्यक्ती भेटला तो म्हणाला, कसा मुलगा आहेस तु पिता पायी चालत आहे आणि तु गाढवावर बसला आहे. तर या क्रिटीसाईजने आपणांस घाबरायचे नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**घाबरण्यासाठी आम्ही करत नाही.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपला निर्णय त्यामध्ये बदलला नाही पाहिजे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब, निर्णय नाही बदलणार. माझे असे म्हणणे होते की कपडयांचे बिल मिळणार परंतु छोटया छोटया गोष्टींचे बिल मिळणार नाही. त्याचे वॉवचरने घ्या.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आपण जे म्हणत आहात ते बरोबर आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**आपण जे म्हणत आहात ते बरोबर आहे तीच गोष्ट आम्ही सांगत आहोत. बिलासाठी जे लिहिले आहे ना ते आणु शकणार नाहीत. त्याचे पैसे त्यास आपल्या खिश्यातुन दयावे लागेल. आम्ही जी रक्कम देत आहोत ती देवुन टाका आपण असे माझे म्हणणे आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**आपण ठराव वाचुन दाखवा.

**<u>महापालिका सचिव :–</u>**जसे आहे तसे पारीत करायचे का?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**यासाठी आम्हांस एक सेप्टी पहायला पाहिजे की तो निधी डायवर्ट होता कामा नये. त्याचा काही गैरवापर होता कामा नये. ती पावती आपणांस देणार. वेळ दिला पाहिजे की किती वेळाता तो आपणांस खरेदी करुन बिल आणुन देणार. जर तेवढया वेळात तो बिल आणुन देणार नाही तर डायरेक्ट त्याच्या पगारातुन कट करा.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**होय, हे बरोबर आहे. त्यास पंधरा दिवसाच्या आत परचेस करावयाचे आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**आपण त्यांना एक महिना दया.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**आपण एक महिना दया, एक महिन्याच्या आत त्याने बिल वगैरे जमा केले पाहिजे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**१ महिन्याच्या आत त्याने बिल व सर्व डीटेल्स जमा करायचे आहे विभागामध्ये. जर केले नाही तर त्याच्या येणा–या महिन्याच्या पगारातुन कपात केली जाईल.

**<u>महापालिका सचिव :–</u>**ठिक आहे, ठरावात टाकते १ महिन्याच्या आत न केल्यास पगारातुन कपात केली जाईल.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र. ४ :–** उल्हासनगर महानगरपालिका सेवेत कार्यरत लाभार्थी सुरक्षा कर्मचाऱ्यांना गणवेश व त्यांसंबंधी इतरसाहित्य खरेदी करणेकामी गणवेशाची रक्कम लाभार्थ्यांच्या बॅक खात्यामध्ये जमा करणेबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका सेवेत कार्यरत असलेल्या लाभार्थी कर्मचाऱ्यांना महापालिकेमार्फत गणवेश देणेबाबत मा. स्थायी समिती ठराव क्र. ९७० दिनांक १६/०७/१९९० अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने सुरक्षा विभागात कार्यरत कर्मचारी यांना गणवेश व तत्सम साहित्य मागविणेकामी भांडार विभागामार्फत दिनांक ०६/१२/२०६ ते २१/१२/२०१६ या कालावधीमध्ये ई–निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा प्रसिध्दीनंतर एकाही निविदाकाराने निविदेस प्रतिसाद न दिल्याने सदर निविदेस दिनांक ०९/०१/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली परंतू मुदतवाढ दिल्यानंतरही एकच निविदा प्राप्त झाली होती. तदनंतर महापालिकेची सार्वत्रीक निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यामुळे व आचार संहिता लागू झाल्यामुळे सदर निविदा प्रक्रिया थांबविण्यात आली होती.

निविदेस मिळणारा अल्प प्रतिसाद पाहता तत्कालीन उप आयुक्त, भांडार यांनी शासन निर्णय क्रमांक डिसीटी/प्र.क्र.१३३/का.१४१७ दिनांक ०५ डिसेंबर २०१६ मध्ये नमुद कार्यपध्दती (ओ) अन्वये संबंधीत यंत्रणेने

लाभार्थ्यांनि खरेदी केलेल्या वस्तूची व सादर केलेल्या पावतीची शहानिशा करून पूर्णपणे खातरजमा झाल्यावर लाभार्थ्यांच्या बॅक खात्यावर योजनेअंतर्गत सुनिश्चित केलेल्या अनुदानाची रक्कम जमा करणे उचित होणार आहे. गणवेशाकरीता कीती रक्कम द्यावयाची आहे याबाबत भांडार विभागामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या ई–निविदेतील रक्कमेच्या १० टक्के रक्कम कमी करून प्रती कर्मचाऱ्यास दोन ड्रेस व इतर साहित्य खरेदी करणेकामी रू. १४,१२३/– प्रमाणे ७१ अधिकारी/कर्मचारी यांना एकूण रू. १०,०२,७३३/– एवढा खर्च अपेक्षीत असल्याबाबत भांडार विभागाकडे सुरक्षा विभागामार्फत प्रस्तावीत केल्यानूसार त्याबाबतचा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात आला असता सदर प्रस्तावास मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब याबाबत निर्णय घेणेकामी व मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७७ **दिनांकः– २९/१/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका सेवेत कार्यरत लाभार्थी सुरक्षा कर्मचाऱ्यांना गणवेश व त्यांसंबंधी इतरसाहित्य ई–निविदेतील रक्कमेच्या १० टक्के रक्कम कमी करून प्रती कर्मचाऱ्यास दोन ड्रेस व इतर साहित्य खरेदी करणेकामी रू. १४,१२३/– प्रमाणे ७१ अधिकारी/कर्मचारी यांना एकूण रू. १०,०२,७३३/– एवढी रक्कम लाभार्थ्यांच्या बॅक खात्यामध्ये जमा करणेस मान्यता देत आहे.

तसेच लाभार्थी सुरक्षा कर्मचाऱ्यांना गणवेश व त्यांसंबंधी इतरसाहित्य वेळेत घेतले गेले पाहिजे. जर १ महिन्याच्या आत बिल सादर केले नाही तर सदर रक्कम कर्मचा–यांच्या पगारातुन कपात करण्यात येईल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :–** मा. क्र. 45CIO19049600 अन्वये नोंद असलेल्या मोठ्या निवासी जागेच्या करापोटी भरणा केलेली रक्कम रू.१९१७५/– मा. क्र. 45CIO19049600 चे खात्यात मालमत्ता करापोटी समायोजित करणे बाबत.

---

**<u>श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–</u>**शाळेने १९१३ साली बिन रेसीडेंसीअनखाली ही रक्कम भरलेली होती. तर ६६ वर्षापासुन होते की ही रक्कम आपल्या खात्यामध्ये वर्गीकरण करा. चुकीने त्याने पैसे भरले होते ते आता आपण त्याच्या खात्यावर वर्ग करत आहोत.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**खात्री पटली ना की त्याने चुकीचे भरले होते म्हणुन.

**<u>श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–</u>**हो, हो.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**यात मी असे म्हणतो साहेब, एकदा जर विषय आला, एक–दोन महिन्यापुर्वी एक विषय आला होता, आपणांस देखील माहित असेल की कोणाचे तरी ब्रिक्सवर्कस ला आरसीसी लिहिले होते. त्यावेळी लिहिले होते की त्यास आरसीसी नाही तर एसी करा. तो व्यक्ती तीन वर्षापासुन भटकला महापालिकेत की माझे तर आरसीसी नाही पत्र्याचे बांधकाम आहे तर मग आरसीसी कसे केले आहे? त्याचे आरसीसीचे कर येत होते. मोठया मुश्किलीने त्याने कोणा नगरसेवकास, कोणा अधिका–यास सांगितले असेल त्यावेळी स्थायी समितीत हा विषय आला त्यावेळी म्हटले होते की कोणत्या अधिका–याने आरसीसी दाखविले, या विषयास पुन्हा आणा. तो बिचारा व्यक्ती तीन वर्षापासुन त्रस्त झाला. त्यावेळी सांगितले की कोणत्या अधिका–याने हे काम केले मग त्यावेळी त्या अधिका–यावर कारवाई करण्यास सांगितले होते. त्या व्यक्तीचे काम झाले की नाही?

**<u>श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–</u>**हो झाले ते काम.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**केले ना, मग परत येथे आणण्याची आवश्यकता नाही ना.

**<u>श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–</u>**नाही आणण्याची आवश्यकता नाही. आपण म्हणालात त्याचवेळी ते काम केले.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>**दुसरे म्हणजे मागील वेळेस सुध्दा चर्चा झाली होती, एकाच मालमत्तेचे डबल बिल येत आहेत असे बरेचसे विषय आहेत. तर तीन सभा झाले चर्चा होत आहे की पुढील सभेत आणुन क्लीअर करावे तर ते कोठपर्यंत पोहाचले आहे?

**<u>श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–</u>**१ लाखाच्यावरच्या ज्या मालमत्ता आहे ते ४२ कोटीच्या मालमत्ता मी स्थायी समितीसमोर ठेवणार आहे. तर त्यावेळी डबल एंन्ट्रीचे विषय लॉटमध्ये सर्व निघुन जातील.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>**होय परंतु लवकर करा.

**<u>श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–</u>**होय घेवुन येतो.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी:–</u>**त्याची यादी सुध्दा मिळेल ना.

**<u>श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–</u>**होय.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**हा विषय इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ५ :–** मा. क्र. 45CIO19049600 अन्वये नोंद असलेल्य मोठ्या निवासी जागेच्या करापोटी

भरणा केलेली रक्कम रू.१९१७५/– मा. क्र. 45CIO19049600 चे खात्यात

मालमत्ता करापोटी समायोजित करणे बाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 45CIO19049600 अन्वसये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कार्यकारी अधिकारी, श्री. कृश्ण सेवा मंडळ ट्रस्ट, उल्हासनगर–४ यांनी दि. २१/०१/२०१४ रोजीचे अर्जान्वये मिळकतीमध्ये **शाळा** चालतविण्यात येत असल्याने मोठया निवासी जागेच्या करापोटी भरणा केलेली रक्कम समायोजित करणेसाठी विनंती केली आहे.

विशयांकित प्रकरणी सादर करण्यात येती की,

१) महाराष्ट्र अमारतीवरील कर (मोठया निवासी जागांसह) (पुन्हा अधिनियम करणे) अधिनियम १९७९ मधील करम १० (१) अन्वये ज्या निवासी जागेचे चटई क्षेत्र १५०/– चौ. मीटर पेक्षा जास्त व ज्या मालमत्तांचे करयोग्या मुल्य रू.१५००/– पेक्षा जास्त आहे, अ**शा** फक्त निवासी इमारतींवर करयोग्य मुल्याच्या १०ः दराने कर आकारणी करणे आव**श्**यक आहे.

२) तसेच अधिनियमातील कलम २(o) नुसार Residential Premises म्हणजे Any Building or Part Thereof Used, or Intended for Independent use, For residential Purpses अ**शी** व्याख्या कण्यात आली आहे.

३) मिकतीमध्ये **श**ाळा चालविण्यात येत असुन तिचा **शै**क्षणिक प्रयोजनार्थ वापर होत असल्याने महाराष्ट्र इमारतीवरील कर (मोठया निपासी जागांसह) (पुन्हा अधिनियम करणे) अधिनियम १९७९ अंतर्गत सदरील मिळकती करपात्र ठरत नाहीत.

४) संदर्भित मिळकतीसाठी पावती क्र. ५८८५६ दि. १७/०२/२०१० नुसार रक्कम रू. १९१७५/– इतकी रक्कम मोठ्या निवासी जागेवरील करापोटी भरणा केरण्यात आली आहे.

५) कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 45CIO19049600 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता मोठ्या निवासी जागेवरील करापोटी अतिरीक्त भरणा केलेली पावती क्र. ५८८५६ दि. १७/०२/२०१० नुसार रक्कम रू. १९१७५/– मालमत्ता क्र. 45CIO19049600 चे खात्यात मालमत्ता करापोटी समायोजित करणेसाठी मंजुरीकरीता मा. स्थायी समितीपुढे सादर करणेत येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७८ **दिनांकः– २९/१/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मा. क्र. 45CIO19049600 अन्वये नोंद असलेल्या मोठ्या निवासी जागेच्या करापोटी भरणा केलेली रक्कम रू.१९१७५/– मा. क्र. 45CIO19049600 चे खात्यात मालमत्ता करापोटी समायोजित करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** अभय योजना २०१७—१८ अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी मिळणे.

---

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u>**या गोषवा—यात एक पान गायब आहे की काय? पान नाही आले?

**<u>महापालिका सचिव :—</u>**आहे साहेब.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u>**ठिक आहे, मागील पॅरेग्राफ महत्वाचा आहे आपणांस मागील अभय योजनेत ४३. ६१ कोटी मिळाले आहे. यात जास्तीत जास्त ३६.१० कोटी आहे, यामध्ये ११.९३ माफी दिले.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६ :—** अभय योजना २०१७—१८ अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी मिळणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत अस्तित्वात असलेल्या अंदाजित १,७०,००० मिळकतींवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १२७(१) (अ), कलम १२९ तसेच अधिनियमाचे अनुसूची ''ड'' चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील तरतुदीनुसार ''मालमत्ता कर'' आकारणी व वसुली करण्यात येते. शिवाय वर्ष २००१—२००२ पासुन फक्त निवासी वापर होत असलेल्या मिळकतींवर ''पाणीपट्टी'' आकारणी मालमत्ता कर बिलात करण्यात येत आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कराची बिले तयार करून त्याचे वितरण करण्यात येते. वर्ष २०१७—२०१८ अखेर मालमत्ता कराची अंदाजित मागणी रक्कम रू ३८० कोटी (चालु मागणीसह) थकीत आहे. तसेच वर्ष २०१० पासुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४१ व महासभा ठराव क्र. ४८ दिनांक १७/०९/२०११ नुसार बिलाच्या न दिलेल्या रक्कमेवर प्रतिमाह २ टक्के इतकी शास्ती, थकबाकी व चालु मागणीवर लागु करण्यात येत आहे.याशिवाय वसुलीसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार वेळोवेळी सक्तीची उपाययोजना (उदा. शास्ती लागु करणे, अधिपत्र (वॉरंट) बजावणे, मिळकतीची जप्ती/अटकावणी करून विक्रीद्वारे वसुली करणे इ.) करण्यात येत आहे. मात्र तरीही बहुतांश मिळकतींच्या कर आकारणी असलेला वाद तसेच आर्थिक अडचणींमुळे करदात्यांचा कराचा भरणा न करण्याकडे कल आहे.

तसेच मालमत्ता कराच्या मागणीमध्ये विलंब शास्तीचा समावेश असल्याने थकबाकीचे प्रमाणात वाढ होत आहे. विलंब शास्ती लागु केल्यामुळे नागरिकांमध्ये ही रोष निर्माण झालेला असुन यामुळे कर वसुलीस अपेक्षित प्रतिसाद प्राप्त होत नाही. त्यामुळे नागरिक तसेच लोकप्रतिनिधी यांचेमार्फत वारंवार शास्तीची रक्कम माफ करणेबाबत मौखिक तक्रारी/लेखी निवेदन विभागात प्राप्त होत आहेत. मालमत्ता करावरील विलंब शास्ती माफ करणेसंदर्भात मा. आयुक्त यांचा विरोध होता. परंतु मनपा सदस्यांनी दिनांक ९/१०/२०१७ रोजीचे महासभेत शास्ती माफ करणेसंदर्भात अशासकीय प्रस्ताव सादर केला होता. मा. आयुक्त यांनी १०० टक्के शास्ती माफीस विरोध दर्शविला. परंतु महासभा बैठकीत झालेल्या चर्चेअंती महासभा ठराव क्र. ३२ अन्वये मालमत्ता करावरील ७५ टक्के, ५० टक्के व २५ टक्के याप्रमाणे विलंब शास्ती माफ करणेसाठी खालील अटीच्या अधिन राहुन निर्णय घेण्यात आला आहे.

''ही अभय योजना यानंतर कोणत्याही परिस्थितीत पुढील पाच वर्षापर्यंत पुन्हा लागु होणार नाही, तसेच ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत अभय योजनेचा लाभ न घेणाऱ्या सर्व थकबाकीधारकांविरूध्द् त्यानंतर वसुलीची सक्तीची कारवाई प्रशासनामार्फत सुरू करण्यात यावी''

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१, आयुक्तास, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, नियम ४१ खालील शास्ती, किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णत: किंवा अंशता माफ करता येईल, अशी तरतुद आहे त्यानुसार मालमत्ता करातील विलंब शास्ती माफ करणेसाठी **''अभय योजना २०१७—२०१८'**तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

## अ)योजनेचासारांश :—

अधिनियमाचे नियम ५१ नुसार मा. आयुक्तांचे स्वेच्छानिर्णयानुसार, नियम ४१ अंतर्गत आकारण्यात आलेली थकबाकी व चालु मागणीवरील विलंब शास्तीची रक्कम वगळता उर्वरीत संपुर्ण मालमत्ता कराची रक्कम एकरकमी भरणा करणाऱ्या करदात्यास विलंब शास्ती माफ करणेसाठी **''अभय योजना २०१७—२०१८'** राबविण्यात आली.

**१)योजनेचा कालावधी:—**दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीत तीन टप्प्यामध्ये असेल.

**२)योजनेची व्याप्ती:—**(अ)सदर योजनेअंतर्गत मालमत्ता कर थकबाकी असलेल्या करदात्यांना लाभ घेता येईल.(ब)योजनेच्या कालावधीत करदात्याकडे प्रलंबित असलेल्या मुळ रक्कमेचे खालीलप्रमाणे अभिवादन केल्यास प्रलंबित रक्कमेवर नियम ४१ नुसार प्रतिमाह २ टक्के दराने आकारण्यात येणारी शास्ती व नियम ५० खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क किंवा वसुलीचा खर्च नियम ५१ अंतर्गत माफ करण्यात येईल.

| टप्पा क्रमांक | कालावधी | शास्ती (व्याज) माफीचा तपशिल | मागणीचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | दिनांक ०१/११/२०१७ ते दिनांक १५/११/२०१७ | **थकीत शास्ती ७५ टक्के माफ** (थकबाकीसह चालु रक्कमेंवर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम) | थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम व अधिक २५ टक्के शास्तीची रक्कम एकरक्कमी भरणा केल्यास |
| २ | दिनांक १६/११/२०१७ ते दिनांक ३०/११/२०१७ | **थकीत शास्ती ५० टक्के माफ** (थकबाकीसह चालु रक्कमेंवर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम) | थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम व अधिक ५० टक्के शास्तीची रक्कम एकरक्कमी भरणा केल्यास |
| ३ | दिनांक ०१/१२/२०१७ ते दिनांक ३१/१२/२०१७ | **थकीत शास्ती २५ टक्के माफ** (थकबाकीसह चालु रक्कमेंवर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम) | थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम व अधिक ७५ टक्के शास्तीची रक्कम एकरक्कमी भरणा केल्यास |

**३) योजनेचा लाभ पुढील बाबीसाठी अनुज्ञेय असेल:—**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४१ खालील शास्ती, किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णत: किंवा अंशता माफ करता येईल.

**४) योजनेअंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कमा:—**सदर योजना ही वर नमुद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रक्कमांनाच लागु राहील. या योजनेच्या प्रारंभापुर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांना लागू राहणार नाही. योजना सुरू होण्यापुर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रक्कमांच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत दावा करता येणार नाही.

**५) योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी करावयाचा भरणा आणि अपील मागे घेणे इत्यादीसाठी लागु असलेल्या अटी व शर्ती :—**(अ)ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा आहे, त्या कालावधीत कोणतेही

प्रलंबित असलेले अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, विविध स्तरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहीजे. (ब)जर अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील, पुर्ननिरीक्षणासाठी आवेदन, संदर्भ आवेदन, विविध स्तरावरील न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका दाखल केली, तर योजने अंतर्गत संबंधित कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढुन घेण्यात येतील.

**६) आयुक्तांचे अधिकार प्रदान करणे:—**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६९, कलम १२८ तसेच अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१ नुसार आयुक्तास असलेले अधिकार दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीत उप आयुक्त (कर) यांना प्रदान करणे. सदर कालावधी नंतर सदरचे अधिकार संपुष्टात येतील.

**७) योजने अंतर्गत कार्यवाही विषयक बाबी:— (**अ) ''अभय योजना २०१७—२०१८'' राबविण्यासाठी मागणी पुस्तकात सदर रक्कमा माफ केल्याची नोंद करदात्याने कराची संपुर्ण रक्कम अधिदान केल्यानंतर मालमत्ता कर विभागाने घ्यावी. (ब)प्रोग्रामर,माहिति तंत्रज्ञान विभाग यांनी ''अभय योजना २०१७—२०१८'' राबविण्यासाठी संगणकप्रणालीत योग्य ती सुधारणा/बदल तात्काळ करावे. त्याअनुषंगाने मालमत्ता कराची रक्कम भरणा करणेसाठी उपलब्ध असलेल्या सर्व ठिकाणी (नागरिक सुविधा केंद्र, किऑक्स सेंटर) करदाता ज्या क्षणास कराचा भरणा करेल त्या क्षणास (त्मंस ज्पउम) नियम ४१ खालील शास्ती व नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च माफ करणेबाबत बदल करणे

**८) योजनेची जाहीरात व प्रसिध्द्‌ी :—**''अभय योजना २०१७—२०१८'' राबविण्यासाठी नागरिकांचा मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळावा यासाठी सदर योजनेचा तपशिलाबाबत शहरात हॅण्डबिल, होर्डीग्ज/बॅनर्सद्वारे जाहिरात करणे, केबल, वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक्स प्रसार माध्यमे, मनपा संकेतस्थळ इत्यादीद्वारे व्यापक प्रसिध्द्‌ी देणे.

**९) योजनेच्या प्रथम टप्प्यास मुदतवाढ:—**योजनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये दिनांक ०१/११/२०१७ ते १४/११/२०१७ या कालावधीत अंदाजित **रक्कम रू. २० कोटी ५७ लाख** इतकी वसुली झाली आहे. तथापि अद्यापही बहुतेक थकबाकीदारांनी कराचा भरणा केलेला नाही. त्यामुळे अभय योजनेच्या पहिल्या टप्प्यास मुदतवाढ देणेबाबत मा. महापालिका सदस्य, लोकप्रतिनिधी, नागरिक, कर विभागातील कर्मचारी यांचेकडुन निवेदन करण्यात आले आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यास नागरिकांनी दिलेला प्रतिसाद पाहता पुढीलप्रमाणे बदल करण्यात आला.

| टप्पा क्रमांक | कालावधी | शास्ती (व्याज) माफीचा तपशिल | मागणीचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | दिनांक ०१/११/२०१७ ते दिनांक ३०/११/२०१७ | **थकीत शास्ती ७५ टक्के माफ** (थकबाकीसह चालु रक्कमेंवर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम) | थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम व अधिक २५ टक्के शास्तीची रक्कम एकरक्कमी भरणा केल्यास |
| २ | दिनांक ०१/१२/२०१७ ते दिनांक १५/१२/२०१७ | **थकीत शास्ती ५० टक्के माफ** (थकबाकीसह चालु रक्कमेंवर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम) | थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम व अधिक ५० टक्के शास्तीची रक्कम एकरक्कमी भरणा केल्यास |
| ३ | दिनांक १६/१२/२०१७ ते दिनांक ३१/१२/२०१७ | **थकीत शास्ती २५ टक्के माफ** (थकबाकीसह चालु रक्कमेंवर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम) | थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम व अधिक ७५ टक्के शास्तीची रक्कम एकरक्कमी भरणा केल्यास |

## ब) जनजागृती/जनसंपर्कासाठी उपाययोजना

१)सर्वप्रथम अभय योजनेच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुधारणा संगणकप्रणालीत करण्यात आल्या.

२)स्थायी समिती ठराव क्र. १७, दि. २४/०८/२०१७ नुसार महानगरपालिका क्षेत्रातील कर थकबाकीदारांना भेटी देवुन कराचा भरणा करणेसाठी प्रोत्साहीत करणे तसेच अभय योजनेची माहिती देणे इ. कामासाठी बचत गटातील महिलांना सामावुन घेण्यात आले. महिलांकरीता घोषवाक्य छपाई केलेले अ‍ॅपरॉन खाचतवद,एओळखपत्र (कलर प्रिटींग), भेट नोंदवही ख्टपेपज ठवबा, इ. उपलब्ध करून देण्यात आले. याकामी रक्कम रू. २,९२,३७५/— इतका खर्च झाला आहे. दिनांक १६/१२/२०१७ रोजी त्यांची नियुक्ती रद्द करण्यात आली.

३) योजनेच्या प्रसिध्द्‌ीसाठी होर्डीग्ज (३ टप्प्यातील बदलानुसार) छपाई करून त्याची खालील ठिकाणी प्रसिध्द्‌ी करण्यात आली आहे. याकामी रक्कम रू. २,००,०००/— इतका खर्च झाला आहे.

| अ. क्र | साईज | ठिकाणांचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | 30 x 12 | Shahad |
| 2 | 20 x 12 | Shahad |
| 3 | 20 x 12 | UMC (b/b) |
| 4 | 20 x 12 | Venus(b/b) |
| 5 | 20 x 12 | Netaji (b/b) |
| 6 | 20 x 12 | Bhatia Chowk |
| 7 | 20 x 12 | Khemani |
| 8 | 20 x 12 | Sapna Garden |
| 9 | 20 x 12 | Hanuman Madir Fcg. Kalyan |
| 10 | 20 x 12 | Dudhnaka Fcg Chowk (b/b) |
| 11 | 18 x 10 | Nejru Chowk |
| 12 | 20 x 10 | Venus |
| 13 | 20 x 10 | Bhatia Chowk |
| 14 | 20 x 10 | Shantinagar |
| 15 | 30 x 12 | Sapna Garden (b/b) |
| 16 | 20 x 20 | Kacharam |
| 17 | 30 x 20 | Hiraghat Fcg powai |
| 18 | 30 x 20 | Ashok Tower |
| 19 | 30 x 20 | Sec. 17 |
| 20 | 30 x 20 | Shantinagar |
| 21 | 30 x 20 | Netaji Chowk |
| 22 | 37.5 x 22 | Maharaja Hall |
| 23 | 43 x 12 | Tilson Market |
| 24 | 36 x 12 | Kapleshwar |
| 25 | 60 x 25 | Hiraghat Fcg powai |
| 26 | 20 x 12 | O. T. Chowk (b/b) |
| 27 | 40 x 10 | O. T. Brge |
| 28 | 25 x 20 | Handover to Tilson |

४) योजनेच्या प्रसिध्द्‌ीसाठी बॅनर्स छपाई करून त्याची प्रसिध्द् शहरात खालील ठिकाणी करण्यात आली आहे. याकामी रक्कम रू. १,९९,८००/— इतका खर्च झाला आहे.

१) प्रभाग समिती कार्यालय क्र. १, गोल मैदान, उल्हासनगर—१

२) प्रभाग समिती कार्यालय क्र. २, यात्री निवास, खेमानी, उल्हासनगर—३

३) प्रभाग समिती कार्यालय क्र. ३, व्हि. टी. ग्राऊंड, उल्हासनगर—४

४) प्रभाग समिती कार्यालय क्र. ४, नेताजी, उल्हासनगर—५

५) शहरातील सर्व किऑक्स सेंटर

६) मनपा सार्वजनिक बांधकाम विभागाची सर्व कार्यालये

७) मनपा पाणी पुरवठा विभागाची सर्व कार्यालये

८) मनपा आरोग्य विभागाची सर्व कार्यालये तसेच हजेरी शेड

९) शहरातील सर्व शासकीय रूग्णालये

१०) तहसिल कार्यालय, गांधी रोड, उल्हासनगर—५

११) उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यालय, पवई चौक, उल्हासनगर—३

१२) मनपा मालकीच्या सर्व शाळा

१३) इतर आवश्यक त्या ठिकाणी

५) मालमत्ता कर वसुली व योजनेच्या माहितीसंदर्भात मराठी—हिंदी, मराठी—सिंधी याप्रमाणे दोन्ही बाजुस विविध नमुन्यात वेळोवेळी हॅण्डबिल छपाई करून, ते वर्तमानपत्र, बचत गटातील महिला, कर विभागातील कर्मचारी इ. मार्फत नागरिकांना वाटप करण्यात आले. याकामी रक्कम रू.११,४७,५००/— इतका खर्च झाला आहे.

६) योजनेचा लाभ घेणेसाठी नागरीकांना प्रवृत्त करणेबाबत शहरात वाहनाद्वारे ध्वनीक्षेपकामार्फत जाहीर आवाहन;Announcement)करण्यात आले. वाहन जाण्यास अडचणीच्या ठिकाणांकरीता ऑटोरिक्षाद्वारे ध्वनीक्षेपकामार्फत जाहीर आवाहन करण्यात आले आहे. याकामी रक्कम रू. ८४,०००/— इतका खर्च झाला आहे.

७) योजनेची वेळोवेळी माहिती देणेबाबत 'सुचनापट्टी' (Script)केबलद्वारे शहरात प्रसारीत करण्यात आली. तसेच माहितीपट;Documentry Film )तयार करून ती केबल व सिनेमागृहात प्रदर्शित करण्यात आली. याकामी रक्कम रू. १,९९,०००/— इतका खर्च झाला आहे.

८) योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी बुधवार, दिनांक ०८/११/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजलेपासुन''गोल मैदान(सुरूवात)→भारतचौक→शिरूचौक→नेहरूचौक→फर्निचर मार्केट→शिवाजीचौक१७सेक्शन→हिराघाट→पवईचौक→श्रीरामचौक→ओ.टी सेक्शन ४→मेन बाजार मार्केट रोड→विनसचौक→नेताजीचौक→प्रभाग समिती ४→भाटीया चौक भाटीया हॉस्पिटल मार्ग→सेक्शन ३९→गाऊन मार्केट→दुधनाका→मठमंदिर चौक→मेन मार्केट रोड→दसेरा मैदान (शेवट)'' या मार्गेरॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर रॅलीमध्ये मा. महापौर, महापालिका सदस्य, मनपा अधिकारी/कर्मचारी, सामाजिक संस्था, विद्यार्थी व शिक्षक इ. सहभागी होते. रॅली दरम्यान उपस्थितांकरीता टि—शर्टस व टोप्या, चहापाणी बिस्किट व ३ ठिकाणी नाश्ता इ. व्यवस्था करण्यात आली.घोषवाक्य असलेले कलर स्टिकर्स, हॅण्डबोर्ड, मल्टी कलर हॅण्डबिल, फ्लेक्स इ. छपाई करण्यात आले.याकामी रक्कम रू. ३,१२,७८०/— इतका खर्च झाला आहे. तसेच बॅड पथकाची व्यवस्था करण्यात आली. रॅलीचे छायाचित्र व चित्रीकरण करण्यात आले.याकामी रक्कम रू. २०,०००/— इतका खर्च झाला आहे.

९) योजनेचाप्रचारासाठी नागरिकांना मराठी, हिंदी भाषेमध्ये माहिती देणे तसेच कर भरण्यास प्रवृत्त करणेसाठी शहरात खालील ठिकाणी ''मालमत्ता कर भरा, वेळोवेळी'' हे पथनाटय सादर करण्यता आले.याकामी रक्कम रू. १,७५,५००/— इतका खर्च झाला आहे.

| अ. क्र | दिनांक | ठिकाणांचा तपशिल |
|---|---|---|
| १ | १—११—२०१७ | गोल मैदान, वार्ड क्र. ११, १२, १३, उल्हासनगर—२ |

| | | |
|---|---|---|
| २ | १–११–२०१७ | हरदास हॉटेल, १ नं. बस स्टॉप जवळ, उल्हासनगर–१ |
| ३ | ३–११–२०१७ | झुलेलाल मंदिर, उल्हासनगर–२ |
| ४ | ४–११–२०१७ | भारत चौक, उल्हासनगर–३ |
| ५ | ५–११–२०१७ | सोनार गल्ली, उल्हासनगर–२ |
| ६ | ६–११–२०१७ | बेवस चौक, उल्हासनगर–२ |
| ७ | ७–११–२०१७ | गोल मैदान, वार्ड क्र. ११, १२, १३, उल्हासनगर–२ |
| ८ | ९–११–२०१७ | गोल मैदान, उल्हासनगर–२ |
| ९ | | शिरू चौक, उल्हासनगर–२ |
| १० | | भरत चौक, उल्हासनगर–२ |
| ११ | | फर्निचर मार्केट, उल्हासनगर–२ |
| १२ | | शिवाजी चौक, उल्हासनगर–३ |
| १३ | | सेक्शन १७, उल्हासनगर–३ |
| १४ | | दुधनाका, उल्हासनगर–५ |
| १५ | | दसेरा मैदान, उल्हासनगर–५ |
| १६ | १३–११–२०१७ | गजानन मार्केट, उल्हासनगर–२ |
| १७ | १७–११–२०१७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, चोपडा, उल्हासनगर–१ |
| १८ | १७–११–२०१७ | शहाड रेल्वे स्टेशन, उल्हासनगर–१ |
| १९ | २१–११–२०१७ | धोबीघाट, उल्हासनगर–१ |
| २० | २२–११–२०१७ | महात्मा फुले चौक, शहाड, उल्हासनगर–१ |
| २१ | २२–११–२०१७ | उल्हासनगर १ पोस्ट ऑफिस, उल्हासनगर–१ |
| २२ | २३–११–२०१७ | उल्हासनगर १ बस स्टॉप, उल्हासनगर–१ |
| २३ | २४–११–२०१७ | ब्राम्हणपाडा, उल्हासनगर–३ |
| २४ | २४–११–२०१७ | गुरूद्वारा, उल्हासनगर–३ |
| २५ | २४–११–२०१७ | डी. टी. कालानी कॉलेज, उल्हासनगर–३ |
| २६ | १–१२–२०१७ | उल्हासनगर स्टेशन पुर्व, उल्हासनगर–४ |
| २७ | | उल्हासनगर स्टेशन पश्चिम, उल्हासनगर–३ |
| २८ | | गुरूनानक चौक, उल्हासनगर–४ |
| २९ | | खेमानी चौक, उल्हासनगर–२ |
| ३० | | वडार कॉलनी, उल्हासनगर–३ |
| ३१ | २–१२–२०१७ | बस स्टॉप नं. १, उल्हासनगर–१ |
| ३२ | | चोपडा कोर्ट, उल्हासनगर–३ |

| | | |
|---|---|---|
| ३३ | | खन्ना कम्पाउंड, उल्हासनगर—३ |
| ३४ | | दत्तप्रसाद वडापाव सेंटर, उल्हासनगर—३ |
| ३५ | ७—१२—२०१७ | संभाजी चौक, उल्हासनगर—४ |
| ३६ | | लालचक्की, उल्हासनगर—४ |
| ३७ | | उल्हास विद्यालय कम्पाउंड, उल्हासनगर—४ |
| ३८ | | जवाहर हॉटेल, उल्हासनगर—३ |
| ३९ | | कुर्ला कॅम्प, उल्हासनगर—४ |

१०) शहरात विविध ठिकाणी नागरिकांमध्ये जावुन योजनेची माहिती देणे, त्यांना कराचा भरणा करण्यास प्रवृत्त करणे इ. कामासाठी ॲकरची नियुक्ती करण्यात आली होती. याकामी रक्कम रू. १,१८,९५०/— इतका खर्च झाला आहे.

११) योजनेच्या कालावधीत महानगरपालिका सदस्य तसेच सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने खालील ठिकाणी 'मालमत्ता कर वसुली शिबीर'' आयोजित करण्यात आले. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे

| अ. क्र | दिनांक | पॅनल क्रमांक | ठिकाण | संबंधित कर निरीक्षकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | १—११—२०१७ | १ | शिवसेना शाखा, बिर्ला मंदिर, सेन्च्युरी कंपनी समोर,उल्हासनगर—१ | श्री. गणेश शिंदे<br>श्री. दयाराम डोभाळे |
| २ | | | तेजुमल चक्की, साधुबेला हायस्कुल बाजुला, उल्हासनगर—१ | |
| ३ | | २ | गोल मैदान वार्ड ऑफिसजवळ, उल्हासनगर—१ | श्रीम. उषा मौळे<br>श्री. किशार आईलसिंघानी |
| ४ | | ३ | सी ब्लॉक रोड, गुरूद्वारा जवळ, उल्हासनगर—१ | श्री. गणेश शिंदे<br>श्री. दयाराम डोभाळे |
| ५ | २—११—२०१७ | ४ | डॉ. आंबेडकर नगर, चोपडा उल्हासनगर—३ | श्री. गणेश शिंदे<br>श्री. दयाराम डोभाळे |
| ६ | | ५ | प्रकाश माखिजा ऑफिस जवळ उल्हासनगर—२ | श्रीम. उषा मौळे<br>श्री. किशार आईलसिंघानी |
| ७ | | ६ | अमरधाम चौक उल्हासनगर—२ | श्री. तानाजी पतंगराव<br>श्री. उध्द्व लुल्ला |
| ८ | ३—११—२०१७ | ५ | प्रकाश माखिजा ऑफिस जवळ उल्हासनगर—२ | श्रीम. उषा मौळे<br>श्री. किशार आईलसिंघानी |
| ९ | | ७ | डॉ. सिंग दवाखाना आझादनगर उल्हासनगर—२ | श्री. तानाजी पतंगराव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | | ८ | श्री. राजेश वधारीया यांच्या ऑफिस जवळ उल्हासनगर—२ | श्री. उध्द्व लुल्ला |
| ११ | | ९ | फर्निचर बाजार, समाज मंदिर उल्हासनगर—३ | श्री. अनिल खतोरानी |
| १२ | | | कालीमाता मंदिर, पंजाबी कॉलनी,उल्हासनगर—३ | |
| १३ | ४—११—२०१७ | ५ | प्रकाश माखिजा ऑफिस जवळ उल्हासनगर—२ | श्रीम. उषा मौळे<br>श्री. किशार आईलसिंघानी |
| १४ | ५—११—२०१७ | ५ | प्रकाश माखिजा ऑफिस जवळ उल्हासनगर—२ | श्रीम. उषा मौळे<br>श्री. किशार आईलसिंघानी |
| १५ | ६—११—२०१७ | १० | पवई चौक समाज मंदिर उल्हासनगर—३ | श्री. अनिल खतोरानी |
| १६ | | | साईबाबा नगर, शांतीनगर उल्हासनगर—३ | |
| १७ | | ११ | सिंधी युथ सर्कल उल्हासनगर—३ | श्री. नारायण कुडीया |
| १८ | | १२ | पुज्य पंचायत हॉल, धरमवाडी पंचायत उल्हासनगर—३ | |
| १९ | ७—११—२०१७ | १३ | दगडी शाखा संभाजी चौक, उल्हासनगर—४ | श्री. आनंद भानुशाली |
| २० | | | लालचक्की उल्हासनगर—४ | |
| २१ | | १४ | गणपती मंदिर वाल्मीक नगर, उल्हासनगर—४ | |
| २२ | | | अंबिका मित्र मंडळ स्टेशन रोड उल्हासनगर—४ | |
| २३ | | १५ | व्ही टी सी ग्राउंड | श्री. डी. एल. मगर<br>श्री. शंकर सोहंजा |
| २४ | | | सतरामदास हॉस्पिटल साईकृपा सोसायटी उल्हासनगर—४ | |
| २५ | | | शिवनगर उल्हासनगर—४ | |
| २६ | ८—११—२०१७ | १६ | दिपक दरबार उल्हासनगर—४ | श्री. डी. एल. मगर<br>श्री. शंकर सोहंजा |
| २७ | | १७ | प्रभात गार्डन उल्हासनगर—४ | श्री. सुखदेव भंबानी<br>श्री. मनोज गोकलानी |
| २८ | | १८ | काली माता चौक उल्हासनगर—४ | श्री. आनंद भानुशाली |
| २९ | | | आबेडकर चौक उल्हासनगर—४ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | ९–११–२०१७ | १९ | पुज्य पंचायत शॉप किपर जुना बस स्टॉप उल्हासनगर–५ | श्री. सुखदेव भंबानी<br>श्री. मनोज गोकलानी |
| ३१ | | २० | दुर्गादेवी पाडा विठ्ठल मंदिर उल्हासनगर–५ | श्री. सुखदेव भंबानी<br>श्री. मनोज गोकलानी |
| ३२ | १४–११–२०१७ | १६ | अमर लुंड ऑफिस | श्री. डी. एल. मगर<br>श्री. शंकर सोहंजा |
| ३३ | | | गुरू संगत दरबार | |
| ३४ | १५–११–२०१७ | | अमर लुंड ऑफिस | |
| ३५ | | | गुरू संगत दरबार सेवक ऑफिस जवळ | |
| ३६ | | | प्रेम नगर टेकडी | श्री. सुखदेव भंबानी |

**क) <u>फलश्रुती</u>**

अभय योजनेअंतर्गत ३ टप्प्यामध्ये मालमत्ता करापोटी रक्कम रू. ११.९३ कोटी विलंब शास्ती माफ करण्यात आली असुन रक्कम रू. ४३.६१ कोटी मनपात जमा झाली आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | माफीची टक्केवारी | लाभार्थ्यांची संख्या | माफ केलेली रक्कम (आकडे कोटीत) | वसुलझालेली रक्कम (आकडे कोटीत) |
|---|---|---|---|---|
| १ | 75% | 27835 | 11.49 | 36.10 |
| २ | 50% | 3372 | 0.30 | 3.21 |
| ३ | 25% | 5106 | 0.14 | 4.30 |
| **एकुण** | | 36313 | 11.93 | 43.61 |

वरीलप्रमाणे अहवाल स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता सादर करण्यात येत आहे.

**<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ७९** **<u>दिनांकः– २९/१/२०१८</u>**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार अभय योजना २०१७–१८ अंतर्गत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनमोदकाची सही/–

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :—**घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण करणेकरिता शहरातील नागरीकांना प्रत्येकी १० लिटरचे प्लास्टीकचे दोन डस्टबिन खरेदी करून वाटप करण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत

---

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**याबाबत कोण सांगेन.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—**शहरातील प्रत्येक घरामध्ये ओला कचरा व सुका कचरा याचे विल्हेवाट होणे महत्वाचे आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ आहे तसेच स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सूचना आहेत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**आपण जे वाटप करणार, ते वाटप केल्यानंतर डिस्पोज करण्यासाठी काही यंत्रणा आहे का आपल्याकडे? यात म्हटले आहे तसे की आपणाकडे तशी व्यवस्था नाही.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—**आपणांस माहितीच असेल की आपणाकडे डंम्पींगची जागा नाही. गायकवाड पाडा जेथे आपली जुनी खडी मशिन आहे, त्या खदानीत सध्या आपण कचरा एकत्रित टाकत असतो. तथापी जागा नसल्यामुळे अंबरनाथ तालुक्यातील उसाटणे गावात ३० एकर जागा शासनाकडे मागितली आहे. ती आपण घनकचरा व्यवस्थापनासाठी वापरणार आहोत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**किती दिवसात मिळेल वगैरे असे काही सांगता येईल का?

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—**ते शासन स्तरावर प्रलंबित आहे. कलेक्टर साहेबांनी शासनाकडे...

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**जेव्हा मिळेल तेव्हा ती आपल्या ताब्यात येईल ना.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—**हो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**थांबा मी सांगतो, शासनाच्या नविन धोरणानुसार ओला आणि सुका कचरा हा घरातुनच विलगीकरण केला पाहिजे. तो ओला कचरा त्याचे कंम्पोस्टींग कारवाई करुन आपणांस डंम्पींग मध्ये कमीत कमी दयावा असे धोरण आहे. सुका कचरा याची काहीतरी उपयोगी वस्तु बनविणे, प्रोसेसिंग करणे यासारख्या गोष्टींवर भर देणे गरजेचे आहे. सध्या आपण त्याचा डीपीआर सुध्दा तयार केलेला आहे, ३५ कोटी, शासनाने नेमलेली जी एजन्सी होती त्यामार्फत आपण डीपीआर तयार करुन घेतलेला आहे व तो ३५ कोटीचा डीपीआर शासनाकडे मंजुरीसाठी गेलेला आहे. त्याची मंजुरी मिळाली, कारण आपण घरोघरी नुसते डस्टबीन वाटुन चालणार नाही, डस्टबीन वाटल्यानंतर घरातुन ज्यावेळेस ओला आणि सुका कचरा वेगळा होईल, तो उचलण्यासाठी सुध्दा ओला आणि सुका असा वेगळा उचलला गेला पाहिजे. त्याची प्रक्रिया राबवीली पाहिजे. सध्या आता ती यंत्रणा आपणाकडे उपलब्ध नाही. आपण स्वत:हुन राबविण्यासाठी आपणाकडे तेवढे पैसे नाही त्यामुळे हा ३५ कोटीचा डीपीआर राबविण्यासाठी शासनाकडे पाठविले आहे. शासनाकडुन ७० ते ७५ टक्के मदत एकुण डीपीआरने होवु शकते. त्यामुळे मुद्दाम अशी ही अट टाकली आहे, त्यावर चर्चा भरपुर झाली आहे. वर्तमानपत्र, मिडीयामध्ये टिका झालेली आहे. त्यामुळे मुळात आपणांस निविदा काढुन ठेवायची होती. निविदा काढल्यानंतर त्याच्या रक्कमेबद्दल सुध्दा आक्षेप होते. १९५ दर हा जास्त होत होता. मी स्वत: मार्केटमध्ये जावुन काही डस्टबीन विकत घेतली. पिंपरी चिंचवडला २ वर्षापुर्वी साडेसात मिटरची डस्टबीन ९० रुपयाला त्यांनी खरेदी केलेली आहे. त्यावेळी जीएसटी वगैरे असे मोठया प्रमाणावर टॅक्सेस वगैरे नव्हते. आता साडेसात लिटरच्या ऐवजी आपण १० लिटर घेत आहोत म्हणजे ३३ टक्के तेथेच आपले पैसे वाढले, १० वर्षापुर्वी जर घेतले असते तर पिंपरी चिंचवड सारखे १२० रुपये झाले असते. आपण वाटपामध्ये एवढी एक्युरसी ठेवली, त्याचे आधारकार्ड, मोबाईल नंबर, घरोघरी वाटप केले ते नोंदणी त्यानेघ्यायचे आहे. प्रत्येक डस्टबिनला १ नंबर पासुन ते जेवढया मालमत्ता आहेत अंदाजे दिड लाख, कुठल्या घरात कुठल्या नंबरच्या डस्टबिन जोडया गेली त्याचे सिरीयल नंबर असतील, त्यामुळे आपल्याला कळेल, त्याचे मोबाईल

नंबर सुध्दा आपण ठेवली आहे एवढी एक्युरसी ठेवली आहे. त्यानंतर निविदेचा कालावधी तीन महिन्यासाठी वैध असतो, ठेकेदारास आपण बोलावुन त्यांच्याशी निगोशिएशन करुन १४५ रुपये दर निश्चित केला आहे व त्यांना सांगितले की जोपर्यंत आमचा डीपीआर मंजुर होत नाही प्रत्यक्ष घरोघरी कचरा उचलुन आमच्याकडे प्रक्रियेला स्टेज येत नाही तोपर्यंत आम्ही डस्टबिनची ऑर्डर देणार नाही. त्यालाही त्याने मान्यता दिली आहे आणि तोपर्यंत त्यांचा हा दर असाच राहिल.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**परंतु १४५ दर हा माझ्या दृष्टीकोनातुन जास्त आहे. बाजारात जावुन होलसेलच्या भावात डस्टबिन घेतले तर ६० रुपयाला दयायला दुकानदार तयार आहे. जर रिटेलमध्ये घेतले तर मी ४ खरेदी केले आहे त्यात ८० रुपये जीएसटीसहीत खरेदी केले आहे. राज्य शासनाचा जीएसटी आणि केंद्र शासनाचा जीएसटी या दोघांचा जीएसटी मिळुन मी ४ डस्टबिन खरेदी केल्या आहेत. माझ्या मते १४५ दर हा जास्त आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आपण काय केले निविदा आपल्या उघड होत्या. त्यात सर्वांनी भाग घेतला पाहिजे होता. या निविदेवर लोकांनी भाग घेतला, चर्चा केली व त्यानंतर स्वत: आम्ही खात्री केली की हे दर बरोबर आहेत का, निविदा आल्यानंतर आम्ही त्याच्याशी निगोशिएशीत केले. आपण जे म्हणतात ना ६० रुपये, ८० रुपये दे शुड पुट हॅव.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**स्थायी समितीपुढे हा विषय आला माझा अधिकार आहे बोलायचा ते मी बोलतो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**६० रुपये वगैरे असेल परंतु आपण जर बाजारात सुध्दा जावुन पाहिले तर १० लिटरची डस्टबिन आपणांस ....

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**माझ्याकडे डस्टबिन आहे आता खरेदी करुन आणलेली, त्याच क्वालीटीची व त्याच कंपनीची आहे आपण पाहु शकता.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मी स्पष्टपणे सांगतो आपणांस कोणासही एक रुपया जास्त देण्यास स्वारस्य नाही. आपणांस हे सिध्द झाले तर स्थायी समितीने देखील १४५ ने निगोशिएशन करु शकतो. यु कॅन टॅक डिसीजन. त्याबद्दल काही नाही. दुसरी गोष्ट आपण लगेच खरेदी सुध्दा करत नाही तो दुसरा मुद्दा आहे. आपण लगेच खरेदी करणार नसु परंतु प्राईजसुध्दा व्यवस्थीत असली पाहिजे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**आपण मागच्यावेळेस महिला बालकल्याण समितीमार्फत जे ३० डस्टबिन खरेदी केले होते. त्याचा अनुभव चुकीचा आलेला आहे त्यावेळी सुध्दा जास्त रक्कमेने खरेदी केले होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ते मान्य आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**त्यावेळी आपल्या अटी होत्या जेव्हा वाटप होतील, त्यावेळी वाटप झाल्यानंतर ज्यावेळी वाटप होतील त्यावेळी त्याची यादी तयार करुन दयायची परंतु ते वाटप न करता बिल घेतलेले आहे. तो अनुभव चुकीचा आलेला आहे, यावेळी सुध्दा तसे होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**वास्तविक त्यावेळी सुध्दा आदेश मंजुर झालेला होता व ती प्रक्रिया राबविली होती.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**माझे असे म्हणणे आहे की शासनाने आणलेले आहे. स्वच्छतेच्यादृष्टीने हे चांगले पाउल आहे. महाराष्ट्र व केंद्र शासन ओरडते व महापालिकेने काहीच करायचे नाही. कुठुनतरी सुरुवात झाली पाहिजे, मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की डंम्पींग ग्रांउड ही कल्पनाच असू नये. त्यासाठी ओला कचरा, सुका कचरा सेग्रीकेशन ॲड द लेव्हल, गाउंड लेव्हललाच झाले पाहिजे. लोकांना प्रवृत्त करणे हे महापालिकेचे काम आहे आणि महापालिकेने हे घेतले हे एक चांगले पाउल आहे. बाकी दराच्याबाबत तुम्ही बघा.

**सदस्या श्रीमती डिंम्पल ठाकुर:—**आणखी एक गोष्ट आहे, हे आमच्या घरात डस्टबिन देणार, ओला व सुका कच—यासाठी परंतु ते घेण्यास कोण येणार? कचरा गोळा कोण करणार?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**१४५ कोटीचे आपण पाठविले आहे, तर घरोघरी कचरा गोळा करण्याचे आम्ही पध्दत बनविली आहे. ते जेव्हा मंजुर होणार तेव्हा आम्ही हे घरोघरी वाटणार.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**याबबात मी बोलु इच्छितो, घरोघरी ओला व सुका कच—याचे डस्टबिनबाबत आपण जे ठेवले आहे, आपण हे आज सुरु करण्याचा प्रयत्न करत आहोत. काही शहरांमध्ये दोन, चार वर्षापुर्वी व छोटया छोटया गावांमध्ये यास सुरु सुध्दा केले आहे. भलेही आपणाकडे सुका व ओला कचरा यांची विल्हेवाट कशी करणार याबाबत काही व्यवस्था नसो परंतु लोकांना त्याची सवय होणे आवश्यक आहे. मला माहित आहे की आपण एका दिवसात लोकांना समजावु शकत नाही. आपण ओला कचरा व सुका कच—याचे विल्हेवाट करण्याचे काम सुरु सुध्दा करुन टाकणार, आपण वेगवेगळे उचलणार पण तरी सुध्दा लोक एकत्र करतील. त्यासाठी माझी सूचना होती की डीपीआरची वाट न पाहता, बजेटमध्ये ६ कोटी डस्टबिनसाठी ठेवले होते, हा आपल्या शहराचा डीन प्रोजेक्ट होता, जेव्हा डीपीआर येणार तेव्हा लोक आपोआप डस्टबिन खरेदी करतील, भले एक वर्षानंतर आपले हे काम सुरु होईल परंतु आजपासुनच लोकांना आपण ओला व सुका कचरा वेगवेगळा करण्यासाठी प्रेरित करु या. एक वर्षानंतर ख—या अर्थाने हे ओला व सुका कचरा करण्याची प्रक्रिया सुरु होईल. व जेव्हा आपला हा प्रोजेक्ट सुरु होईल तेव्हा पुर्णरुपाने आपली प्रक्रिया सुरु होईल. परंतु जेव्हा हा प्रोजेक्ट सुरु होईल आणि तेव्हा आपण लोकांना सांगणार की ओला व सुका कचरा गोळा करा तेव्हा एक वर्ष लागुन जाणार. आपण डीपीआर बनविला सर्व काही केले, आपण हा विचार करु नका की हा खर्च नुकसानकारक आहे. हा फारच चांगला प्रस्ताव आहे. तसेच आपण स्वच्छ भारत अभियान राबवित आहोत, उल्हासनगर शहरात स्वच्छता मोहिम राबवितो, तर आपण लोकांना काय सांगणार की आपल्या प्रभागाला चांगले मार्क मिळणार, सुका व ओला कचरा कसा ठेवायचा जर आज आपण जावुन एक एक बॅरेक, व इमारतीस सांगितले, आपण जर लोकांना समजावयाचे म्हटले तर काय समजवावे?

**सदस्या श्रीमती डिम्पंल ठाकुर :—**साहेब, आम्ही बाहेर वेगवेगळया डस्टबिन लावतो ते चोरीस जात आहेत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**लोकांनी कोठेही कचरा टाकला तर त्यास साफ कोण करणार? दुकानासमोर लावणार, घरासमोर लावणार लोकांना वास येणार. चला जावुन पहा कसे डस्टबिन पुर्ण भरलेले आहेत.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**हजार दोन हजारच्या कुंडया आहेत मोठ मोठया तेथे आणुन लोक कचरा टाकतात. ते ओव्हरफ्लो होतात.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**भलेही त्यात एक किलो कचरा असो तो नेहमीच स्वच्छ केला पाहिजे. काय होते संपुर्ण खत्ता भरला जातो. मी दोन जागेवरुन उखडुन दुसरीकडे लावले, कारण लोक माझ्यावर नाराज होते, हे आपण येथे लावुन गेलात व आमच्या घराबाहेर कचराकुंडी बनली.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**साफसफाई करण्यास कोणी येतच नाही.

**सदस्या श्रीमती डिम्पंल ठाकुर:—**होय तेच होते. खत्ते भरतात कचरा उचलण्यास कोणी येतच नाही. कोणी झाडु मारण्यास येतच नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**साफसफाईसाठी फारच त्रास आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**खत्ते पुर्ण भरले जातात परंतु खाली करण्यास तो कचरा उचलण्यास कोणी येतच नाही.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—**घरोघरचा कचरा असतो.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**नाही, नाही, रस्त्यावरचा कचरा आहे, दुकानाचा कचरा आहे, ती लोक त्यात टाकत असतील तर ती खाली करण्याची जबाबदारी कोणाची आहे?

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**कचरा कुठलाही असु दया तो उचलला गेला पाहिजे. कल्याणचा कचरा आहे की अंबरनाथचा कचरा आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**याबाबत काही सायकल ठरविले आहे का?

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—**होय साहेब.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**कोणत्या वेळेला उचलता?

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—**सकाळच्या वेळेस साहेब.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**आपण लोकांना सांगितले आहे का आम्ही येथे येथे कच–या कुंडया लावतो म्हणुन.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**माझ्या येथे श्रीम. बि–हाडे यांचा प्रभाग आहे त्यांच्या घरासमोर लावला आहे. बॅरेक नं. ३१ येथे मी चार दिवसापासुन पाहत आहे. तेथुन कितीही कचरा गेला तरी डबल कचरा तेथे पडला आहे. साहेब, हा कचरा जर दररोज उचलत नाही तर तेथेच पडुन राहतो. लोक म्हणतात की आमच्या घरासमोर का डब्बे ठेवले. परंतु असे नाही काही लोक बोलतात सुध्दा की आमच्याघरासमोर कच–याचे डब्बे लावा. तसे काही लोक म्हणतात की आम्हांला लावण्यास हरकत नाही परंतु डब्बे भरल्यावर उचलले जात नाहीत, ओव्हरफ्लो होतात. आणि मग लोक म्हणतात की आपण हे डब्बे काढा नाहीतर आमच्या घरासमोर कचरा कुंडी बनेल. कचरा रोज उचलला पाहिजे.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—**आता दोन दिवस सुट्टी होती त्यामुळे होवु शकते कच–याचे डब्बे भरले असतील.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**एक गोष्ट आहे श्री. केणी आम्ही आपणांस सांगतो ते चुकीचे सांगत आहोत असे आपणांस वाटते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**श्री. केणी आपण एसआय यांना जबाबदार धरा जर कचरा ओव्हरफ्लो दिसला तर ही विल बी रिस्पॉन्सिबल ही त्यांची जबाबदारी आहे. त्यांनी जबाबदारीने काम केले पाहिजे.

**सदस्य श्री. डिम्पंल ठाकुर :—**तीन दिवस सुट्टी असेल तर कोणच तेथे येत नाही.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आम्ही केरलला घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रशिक्षणासाठी गेलो होतो. सांगली महापालिका आहे, तेथिल नगरसेवक व तेथिल अधिकारी सुध्दा आले होते. त्यांनी सांगितले की आम्ही सेग्रिकेशन करतो, आम्ही असे असे करत आहोत. त्यांनी नविन एक सांगितले ईवेस्टसाठी कुठलेही प्रोव्हिजन केलेले नाही. ओला कचरा व सुका कचरा असेच ठेवले आहे. ईवेस्ट असे आहे की डंम्पींग ग्राउंडवर गेल्यावर तेथे आग लागल्यावर ते क्षमवु शकतो. सांगली महापालिका आमच्यापेक्षा छोटी महापालिका त्यांनी हाय कंन्सेप्ट दिले होते. आमच्याकडे ईवेस्ट सुध्दा केले जाते. ईवेस्ट म्हणजे ईलेक्ट्रानिक वेस्ट त्याचे आम्ही काय करत आहोत बायोमेडिकल करत आहोत. सुका कचरा व ओला कचरा तुम्ही गोळा करता त्याचे काय करायचे ते डंम्पीग ग्राउंडवर सेग्रीकेशन करा. प्रशासनास लवकरात लवकर कळवा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**हो ते माहित आहे. ईवेस्ट आहे तसेच अजुन एक हाजरडवेस्ट आहे. ईवेस्टतर त्यानंतरचे आहे. काचेचे तुकडे आहे, भंगार आहे, पत्रे वगैरे आहे हे हाजरडवेस्टने नष्ट केले जाते. मुळात आपणाकडे आता कचरा एक कचरा ही सवय लागलेली आहे. हे बदलण्यासाठी आपणांस कालांतराने टप्याटप्याने हे घ्यावेच लागणार आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**आपणाकडे हे जे प्रॉपर्टीधारक आहे त्यांच्याकडुन आपण त्यांच्या प्रॉपर्टीमध्ये हे पैसे ॲड करणार आहोत काय?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आपण प्रॉपर्टीमध्ये ॲड नाही करणार, परंतु आता विषय तुमच्या समोर आहे की आपणाकडे घनकचरा व्यवस्थापनासाठी जो काही खर्च येतो त्या खर्चाच्या तुलनेमध्ये आपला कर समांतर नाही, आपण खर्च करतो ५ कोटी व कर येतो ४ कोटी तर ते रेग्युलर आहे. रेग्युलर जो खर्च येणार आहे तो फॅमीली पर प्रस्ताव ठेवला आहे. आपण कॅपिटल कास्ट ठेवली नाही. पण जो घनकचरा व्यवस्थापनासाठी खर्च येणार आहे तो एटपार आपण फॅमीलीजना पर फॅमीली १७५, २७५, ३७५ असे ठेवणार, तो विषय वेगळा आपला आहेच.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**मला वाटते तो सुध्दा डीपीआरमध्ये ठेवावा. म्हणजे घरच्या लोकांना आम्ही प्रवृत्त केले आहे घरोघरी डस्टबिनसाठी शासनाची ही चांगली योजना आहे. त्यामध्ये लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**माझी अशी सूचना आहे की आम्ही जो अर्थसंकल्प तयार केला होता, तो बनवुन एक वर्ष झाला त्यावेळी डीपीआर बनेल, शासनाकडुन पैसे येतील. असा विचार नव्हता. आता विचार आहे की दयायला पाहिजे. तर एक वेळ लोकांकडे जावुन ओला कचरा व सुका कचरा वेगळा करण्यासाठी प्रेरणा दयाल. माझे असे मत आहे की डीपीआरची वाट पाहिली नाही पाहिजे. जर डीपीआरमध्ये येईल तर आपण त्यांना देणार नाही. आता देवुन टाकु.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**दराबाबत काय करु शकतो आपण. आपण दर कमी करु शकतो काय? आमची हरकत दराबाबत आहे. आमचा डस्टबिन वाटण्यासाठी काही विरोध नाही. पण दराबाबतच आमचे म्हणणे आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**काय आहे रेट कमी दिले व कॅपेसीटीच नसेल तर काही फायदाच नाही. आमचा उद्देश काय तर फक्त लोव्हेस्ट पाहायचे नाही तर त्याचे कॅपेसीटी किती आहे हे पहावे लागेल. नाहीतर देण्यास अर्थच नाही.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>**आपणांस सर्व पाहायचे आहे की जसे मिडीया व वर्तमानपत्रात इश्यु झाला आहे त्यास लक्षात ठेवुन.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**याचे उत्तर आधी श्री. राजेश यांनी सांगितले आहे. घोडावर बसला तरी लोक बोलणार काय चालले आहे. आम्हांस विचार करायचा आहे की प्रक्रिया काय करायची.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :–</u>**निविदा मागविल्यानंतर कोणी भरली नाही.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u>**जेएनएनयुआरएमचे वॉटरसप्लायची निविदा ३८ टक्के अबोव होती. तरी देखील चर्चा झाली होती.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**२५ टक्के मी स्वत: निगोशिएशन केले आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**पुर्वी ३८ टक्के अबोव होते आज ती निविदा २० टक्के बिलोव आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**असे आहे की याची चर्चा शहरात झाली आहे. अबोव गेले, ६० टक्के अबोव गेलेले आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**जर पाच दहा रुपयाचा फरक आहे आम्ही समजु शकतो परंतु जसे श्री. चौधरी साहेब म्हणतात की ६० टक्के अबोव गेले आहे जर हे सिध्द होत असेल तर आम्हांस सावधानीने पहावे लागेल. खरे आहे , खोटे आहे याची माहिती आम्ही घेवु. मला सुध्दा वाटत नाही की एवढे लोएस्ट मिळु शकते.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>**हे दुकानाचे बिल आहे जर आपण सेलने घेतले तर १०० टक्के दर कमी येईल.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**सॅम्पल मांगवुन घ्या आत मध्ये.

यावेळी सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांनी आणलेली डस्टबिन दाखविण्यात आले.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**साहेब, उदया जर तुम्हांला फेल करण्यासाठी ६० रुपयाऐवजी कोणी ४० रुपयाचे बिल आणले, तुम्ही स्विकारणार आहात काय? आपणांस सांगण्यासाठी मी ४० रुपयाचे बिल आणणार.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>**जेथुन बिल येणार तेथुन त्या ठेकेदारास बोवुन तेथुन ती वस्तु घेवु शकतो.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**यात जे बिल आहे १०३२ बकेट लिड एसपीईसी क्वांटीटीचे दर ८० रुपये डिस्काउंट १५.२५ ॲसेस ३९.२४, टॅक्सेबल अमाउंट २, सीएसटी, जीएसटी दोन्ही मिळुन त्यांनी २४ अमाउंट केले आहे. हे दहा लिटरचे आहे की पाच लिटरचे आहे ते दाखविले नाही. दुसरे म्हणजे की उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब आहे. त्यामुळे आमचे पेमेंट सुध्दा एक एक वर्ष होत नाही. त्यामुळे आमच्याकडे सप्लायर व ठेकेदार

येत नाहीत. तो सुध्दा फरक असतो ना. आपणास पेमेंट सहा महिन्यानंतर मिळणार, मग टॅक्स वगैरे लावुन देणार ना कोणीही व्यक्ती. आपले शेडयुल बी काय आहे?

**सदस्य श्री. भारत राजवानी :–**त्याच कंपनीचे आहे का? काय आहे, ही वस्तु अशी आहे ना की प्रत्येक घरातील लोक घेतात.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**घरातील व्यक्ती एक महिन्यात, दोन महिन्यात खरेदी करतो.

**सदस्य श्री. भारत राजवानी :–**आम्हांस घरोघरी वाटण्याचा जो खर्च आहे तो रेकॉर्ड ठेवणे वगैरेचा जो खर्च आहे तो हेड करुन व दुसरे म्हणजे या सर्व गोष्टी लक्षात घेवुन आपण करु शकतो हे चांगले काम आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**माझे असे मत आहे की हे दिले पाहिजे. दराविषयी जे आहे, २५ टक्के निविदेनंतर व १९३ चे २५ टक्के ३८ रुपये निगोशिएशन कमी केले जावे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**१२० टक्के जीएसटी वगैरे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**आज तो पैसे पेड करेल घरोघरी वाटणार तर त्या त्या पत्यावर एंन्ट्री करायची आहे, त्यासाठी माणुस ठेवायचा आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :–**२० ते ५० टक्केच्या वर प्रत्येक घरात तर डस्टबिन असणारच असणार. फक्त आपण जरा स्लम एरिया सोडुन दयाल तो नॉर्मली प्रत्येक घरात असणार.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–**साहेब, मी प्रश्न विचारला होता, यात लिहिले आहे की शेडयुल बी प्रमाणे बनवा, स्पेसीफिकेशन काय काय आहे.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:–**यामध्ये डस्टबीनची एक एक स्पेसीाफिकेशन दिली आहे. कॅपिसीटी १० लिटर, लेंथ २८ सेंटीमिटर, वेट २४ सेंटीमिटर, डेप्ट २७ सेंटीमिटर, थिकनेस १.२० एम, वेट ४३५ ग्रॅम, मटेरियल प्रोव्हलिन असेल आणि कलर ग्रीन आणि ब्यु असेल. अशा प्रकारे यामध्ये स्पेसीफिकेशन दिले आहे. आणि जेव्हा निविदा मागविल्या आणि आलेले जे तीन लोवेस्ट होते ते या स्पेसीफिकेशनप्रमाणे आहेत की नाही यासाठी आम्ही लॅबला पाठविले होते. भारत सरकारची नॅशनल लॅब आहे, तेथे चेक केल्यानंतर त्या डस्टबिन स्पेसीफिकेशनप्रमाणे आहेत. त्यांचा दुसरा लिफाफा सुध्दा उघडण्यात आलेला आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**त्या ठेकेदारांना बोलवा त्यामध्ये ते काही निगोशिएशन करत असतील तर देवुन टाका त्यांना आमची काही हरकत नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**स्थायी समिती सुध्दा निगोशिएशन करु शकेल. आता आमच्या स्तरावर कमी केले आहे. स्थायी समिती सुध्दा करु शकते ना. आमचे म्हणणे काय आहे आय वील निगोशिएट.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**त्यास उदया बोलवा जर तो निगोशिएट करत असेल तर आम्हांस हरकत नाही.

**सदस्य श्री. भारत राजवानी :–**होय बोलवा त्यांना उदया. जर काहीही फायदा होत असेल तर तो महापालिकेचा फायदा आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**असे करु शकतो काय की हया विषयास उदयाच्या सभेत घेतले जावे.

**महापालिका सचिव :–**नाही, ही सभा दोन तीन तासासाठी स्थगित करावी लागेल. उदयाच्या सभेत नाही घेता येणार.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**नाहीतर हा विषय शेवटी घ्या.

**महापालिका सचिव :–**हा विषय जर उदया घ्यायचा असेल तर सभा स्थगित करावी लागेल. नाहीतर हा विषय नंतर घेता येवु शकतो.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**असे करु या हा विषय नंतर घेवु या. शेवटी यावर चर्चा करु या.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**हे जे सॅम्पल आले आहेत ना त्यांना दुपारी माझ्याकडे बोलवा.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**गुरुकृपावाल्याला सुध्दा बोलवा आणि विचारा त्यास की ३ लाख ४४ हजार देणार काय? कोणत्या दरात देणार. नाव लिहिणे, घरोघरी पोहोचविणे वगैरे. आता सभेच्या शेवटी घ्या विषय.

**<u>महापालिका सचिव :–</u>** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :–** उल्हासनगर–१ मधील भवानी मंदिर ते गोलमैदान पर्यंत रस्ता दुभाजक बनविण्याच्या कामास कार्योत्तर मंजुरी देणे.

---

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**कोण सांगणार, बोलवा श्री. सितलानी यांना. या कामास दोन महिने झाले, ५(२)(२) मध्ये.

**<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:–</u>**अर्धे केले आहे. अर्धे काम राहिले होते ते केले.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**आयुक्त साहेब, आमच्याकडे सुध्दा इमरजन्सी काही कामे आहेत. एक अंडरग्राउंड ड्रेनेज कमला अपार्टमेंट येथे संपुर्ण वाहत आहे. त्यासाठी प्राकलन वगैरे बनवुन चार महिने झाले. अजुनपर्यंत ते काम करत नाहीत.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**कोणी केले, केले आहे का तुम्ही याचे एस्टीमेट.

**<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा:–</u>**होय, एस्टिमेट आहे साहेब. एक स्पेशल मशिन मागविली आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**होय, त्यासाठीच आम्ही थांबविले आहे. एक स्पेशल मशिन मागविली आहे. जे जड मटेरियल असेल ते सुध्दा सकींग करेल. त्यांना तुम्ही बोलवा.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**जी चांगली चालते मशिन चार महिने झाले ती सुध्दा तुम्ही आणत नाहीत.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**त्याची निविदा तयार केली ना, कुठे आहे मी मंजुरी सुध्दा दिली आहे. परवा आपण ठरविले ना की ५०० तास मिनिमम टाका त्याचे. प्रिपीरीयडला सांगतील ना ते त्यांना काय बदल पाहिजे ते. त्यांचे काय म्हणणे आहे, त्यांना बोलावुन घ्या ना. त्याचे एकोनॉमिक्स काय आहे ते आपण समजुन घेवु ना. त्यांना चालना काहीतरी दया, त्यांना बोलावुन घ्या, आज उदयामध्ये बोलवावे लागेल.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>**साहेब, तीन महिन्याच्या वर झाले अंडरग्राउंडसाठी आम्ही सभा घेतली, पाण्याविषयी खास करुन एमएमआरडीएचे शौचालय, कैलास नगर व गणेशनगरचे पीडब्ल्युडी आणि वॉटर सप्लाय तीन महिन्यापासुन ते एक लाईन नाही देवु शकत.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**मला असे वाटते हे तुम्ही शेवटी आणा, आता हा विषय संपवुन टाका.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>**होय नंतर घेवु.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**हे आता जे डिवायडरचे जे काम आहे ना, कोठे गेले श्री. सितलानी, डिवायडरचा आता चांगला परिणाम आला, पुर्वी आपण त्याची लेंथ पुर्ण नाही घेतली. तुम्ही अर्धे कसे घेतले लेंथ.

**<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता :–</u>**होय साहेब, डिवायडरचे काम पुर्ण केले.

**<u>श्री. तरुण शिवकानी, उप अभियंता:–</u>**श्रीरामचे एस्टीमेट होते १४ लाखाचे, ते ११० केले, २५० मिटर लेंथ, १३२ मध्ये घेतले.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**ते नव्हते का तुमचे? उरलेले तुम्ही येथे टाकले.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**श्रीराममध्ये अर्धे बाकी आहे वाटते डीवायडर टाकणे.

**श्री. जितु चोईथानी, उप अभियंता:—**आनंद दिघे प्रवेशद्वारे जो आहे तेथे बनवायचे आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**त्या रस्त्यावर फार खड्डे आहेत.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**साहेब, आमच्या येथे सुध्दा परिस्थिती खराब आहे तेथे सुध्दा डिवायडरची आवश्यकता आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मी सर्वांना सुचना दिली आहे की जेवढे काही डिवायडरची आवश्यकता आहे तर तातडीने प्राकलन बनवा.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**साहेब, उल्हासनगर शहरातील परिस्थिती फार गंभीर आहे. जेथे उल्हासनगरची एंन्ट्री आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**यात सफर कोण करत आहे, तुम्ही नाही करत आहात. तुम्ही कल्याणला नाही राहत.

**सदस्य श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता :—**कल्याणपासुन एंन्ट्री आहे. आज खरेतर ठेकेदारांची आम्ही सभा बोलावली आहे, ज्यांनी काम चालु नाही केले.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**ज्यांनी काम केले नाही त्याच्यावर काय कारवाई केली?

**श्री. तरुण शेवकानी, उपअभियंता:—**७ दिवसात काम चालु करणार आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आज का नाही?

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता:—**आज सभा आहे ना साहेब.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**काय सभा आहे, मी पंधरा दिवसापासुन मागे लागलो आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मी जनरल मागेच सांगितले आता मी परत सांगतो, कोणत्याही ठेकेदाराचे कोणतेही काम, एकदा त्याच्या हातात वर्कऑर्डर दिली, त्याच्या कॅपेसिटीच्याबाहेरची जर कारणे असतील, तर गोष्ट वेगळी आहे, जेवढा विलंब होईल तेवढया त्याच्या बिलातुन कपात करणार आहोत. हे सर्वांना लागु आहे. तो ठेकेदार छोटा असो किंवा मोठा असो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**किती वेळा सांगितले की टाईमबॉन्ड असू दया, काय टाईमबॉन्ड आहे, काय आहे, नोटिस दिले आहे, कोण विचारते नोटिसला. आपल्या हिशोबाने ती नोटिस आहे व त्याच्या हिशोबाने तो एक कागद आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**साहेब, एक महिन्यापासुन रामायण नगरच्या रस्त्याचे काम बंद पडले आहे. आपल्या अभियंत्यास माहित आहे की नाही माहित नाही.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**उल्हासनगर शहरातील ज्या एंन्ट्री आहेत ना, जसे कैलास नगर, शांतीनगरचे असेल सर्व एन्ट्रीला खड्डे आहेत. अर्धे रस्त्यावर आपण काम करतो आणि येणारे सर्व एंन्ट्री खराब. शांतीनगरच्या ब्रिजवर खड्डे आहेत.

**सदस्या श्रीमती डिंम्पल ठाकुर:—**बाहेरचे लोक जेव्हा येथे येतात तेव्हा पाहुनच म्हणतात की उल्हासनगर आले म्हणुन.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**आयुक्त महोदय, दुसरे स्वामी शांतीप्रकाश येथिल जे डिवायडर आहे, तेथे किती अपघात झाले आहेत, मी आपणांसही वॉट्सअप केले आहे. मी किती वेळा सांगितले आहे की यास एकतर बनवा किंवा तो काढुन टाका. पुढे मोठा करुन पट्टे असले पाहिजे. माझ्या घरासमोरच आहे. तो अतिशय खराब आहे, नंतर तो खाजगी पैसे खर्च करुन बनविण्यात आले. त्यानंतर एक सुध्दा अपघात झाला नाही. नाहीतर प्रत्येक दोन चार दिवसात तेथे अपघात व्हायचे. आज आम्ही स्वत:च्या खाजगी पैश्याने तेथे पट्टे लावले जेणेकरुन ते दिसले

पाहिजे. त्यानंतर अपघात झालेला नाही. तर मी म्हणतो असे जर काम असेल तर कसे चालेल, त्यांना वारंवार सांगण्यात आले आहे त्याबाबत पत्र सुध्दा दिलेले आहे. आजपर्यंत तेथे काम झाले नाही.

**सदस्य श्री.दिपक सिरवानी :—**साहेब आपणांस विनंती आहे, गुलराज टॉवर जे ४ नंबरपासुन एक ब्रिज खाली उतरतो तेथे दररोज अपघात होतो. मी आपणांस व्हिडीओ क्लीपींग पाठविणार तेथे मी सीसीटीव्ही लावलेला आहे. आपण भवानी मंदिर येथे जसे डिवायडर लावले, माझा सुध्दा विरोध होता पुर्वी, पब्लीकने आपणांस एप्रिसिएट केले आहे तर मी सुध्दा म्हणेल की आपण आम्हांला सुध्दा तेथे डिवायडर लावा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**कोण आहे, कधी येईल हे सर्व डिवायडरचे प्रापोजल?

**श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—**साहेब, बनवले आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**साहेब, तोंडी सांगितले आहे, प्रभाग समिती ते स्वामी शांतीप्रकाश गाउन मार्केट येथे जो रस्ता जातो तेथे छोटया गल्लीतुन माणसे कसेही आपली गाडी काढुन घेवुन जातात. जर तेथे डिवायडर होईल तर तो रस्ता सेफ होईल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे आम्ही प्रायोरीटीवर घेतो.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—**ठिक आहे साहेब.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यामध्ये ठेकेदाराची जी टाईम लिमिट आहे ती पुर्ण होत नाही तर त्यास रिस्क आणि कास्टमध्ये काम करुन घेतले पाहिजे. त्याचा क्लॉज आहे. तर मी म्हणतो शहर अभियंता यांनी खुलासा करावा. असे काम कोठेच झाले नाही की जे टाईमलिमिटमध्येच पुर्ण झाले असेल. त्यात एक्सक्लेशनची कास्ट वाढते.

**श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—**त्यामध्ये रिस्क ॲण्ड कास्ट आहे. परंतु आयुक्त महोदयांनी, जेवढी पण कामे आता पुर्ण होत आहेत त्यासाठी पॅनेल्टी फारच वाढीव केली आहे. ठेकेदार लोक सचेत झाले आहे. काम पुर्ण करण्याची आम्ही जबाबदारी घेतली आहे.

**आयुक्त,श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ज्यांचे वेळेत विलंब होईल तर १० टक्के, कमीत कमी ५० टक्के विलंब असेल तर तेवढे ५० टक्के पॅनल्टी लागेल.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**साहेब, हे पहा, ॲग्रीमेंट झाल्यानंतर नविन निविदा निघाल्यानंतर आपण नविन पॅनेल्टी तर नाही लावु शकत.

**आयुक्त,श्री. राजेंद्र निंबाळकर :—**असे तर ठेकेदार संपुर्ण अधिकार घेवुन येतील.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**निविदेत जेवढी पॅनेल्टी क्लॉज आहे आपण तेवढीच पॅनेल्टी लावु शकता. परंतु त्या सर्व निविदेत एक रिस्क ॲण्ड क्लॉज असते. जर आपण तशी नोटिस दिली आणि एका ठेकेदारावर तसे करुन दाखविले तर दुसरे ठेकेदार आपणांस थोडे घाबरतील. शहाड स्टेशनपासुन ते महापालिकेपर्यंत छोटे मोठे काही काम आहेत कोठे पेव्हर ब्लॉक लावलेला नाही, कोठे डिवायडर लावलेला नाही. या छोटया मोठया कामामुळे रोड उपयोगात नाही. जो उपयोग झाला पाहिजे, तो उपयोग होत नाही. डिवायडर लावले तर कलर नाही लावले, फुटपाथ आहे त्याच्या साईडवर कलर नाही तर आपणांस रोड दिसणारच नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**नविन याच्यामध्ये जेवढा टाईम डिले होईल, ५० टक्के तरी त्याच्या एकुण कास्टवर पॅनेल्टी लावायला पाहिजे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**जसे आपण खिलारी यांच्यावर ५० टक्के पॅनल्टी लावली तर या पॅनल्टीचा त्यावर क्लाज असले पाहिजे. टाईम लिमिटच्या वर विलंब झाला तर आपणांस प्रत्येक दिवसाची पॅनल्टी किती लागणार. तीन महिन्यापर्यंत विलंब केला तर आपणांस एवढी पॅनेल्टी आहे. तीन महिन्यापासुन ते सहा महिने विलंब करणार तर एवढी एवढी पॅनल्टी असणार.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**१२० दिवसात काम करणार तर २० टक्के पॅनेल्टी असणार. तर १० टक्के तरी त्यास कॉस्टचे असले पाहिजे असे माझे म्हणणे आहे. २० टक्के करु दया किंवा ५० टक्के करु दया जर बाय डिपॉझीट टाकले ना तर वेगवेगळया अटी टाकण्याची आवश्यकता नाही. जेवढा विलंब केला तेवढेच त्यांचे बिल शेवटी निघणार नाही. हा भाग आहे निविदेचा. समजा १०० कोटी असेल आणि त्याचा फायदा २० कोटी असेल आणि १० कोटी पॅनेल्टीमध्येच घेतले तर ते निविदेची कॉस्ट वाढवतील.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**आपण जे सांगितले की या कामास येथुन सुरुवात केली तर या तारखेपासुन संपेल. ते काहीच झाले नाही ते काम अर्धवटच पडुन आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**आपण करायला गेलो तर लोकांनी त्यांच्याकडुन पुर्ण रस्तेच्या रस्ते काम करुन घेतली. त्याचा इस्टिमेट आता वाढला आहे, कामाचा डिले वेगळा आणि इस्टीमेट वेगळे झाले आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**तुम्ही जो कालावधी दिला होता त्या कालावधीत त्यांनी काम पुर्ण नाही केले. लवकर करुन टाका.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**चला पास करा.

**<u>महापालिका सचिव :–</u>**पास?

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ८ :–** उल्हासनगर–१ मधील भवानी मंदिर ते गोलमैदान पर्यंत रस्ता दुभाजक बनविण्याच्या कामास कार्योत्तर मंजुरी देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर – १ मधील भवानी मंदिर ते गोलमैदान पर्यंत रस्ता दुभाजकाचे काम अर्धवट अवस्थेत आहे. सदर रस्ता हा शहराचा मुख्य रस्ता आहे. गोलमैदान या परिसरात मोठा बाजार असल्याने गर्दीचे ठिकाण आहे. सदर ठिकाणी दुभाजकाचे काम अर्धवट स्थितीत असल्याने वाहतूकीस अत्यंत अडथळा निर्माण होत आहे. सदर ठिकाणी दुभाजक नसल्याने दोन्ही विरुध्द दिशेने येणाऱ्या वाहनांची गर्दी होते. यामुळे अपघातही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संदर्भात वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांनी मा.आयुक्त यांची भेट घेवून सदर ठिकाणी दुभाजक बनविणेबाबत सुचविले आहे. मा.आयुक्त सो. यांनी सदर जागेची प्रत्यक्ष पाहणी केली व वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम 2 (2) अंतर्गत तात्काळ दुभाजकाचे काम सुरु करणेच्या सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे उल्हासनगर – १ येथील भवानी मंदीर ते गोलमैदान पर्यंत रस्ता दुभाजक बनविणेच्या कामाचे रु.७,००,०००/- एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले. सदर रस्त्यावरील दुभाजकाची एकूण लांबी २५०.५० मीटर असून अगोदरच्या प्राकलनात १३२.५० मीटर एवढी लांबी घेण्यात आली आहे. उर्वरीत ११८ मीटर लांबी प्राकलनात समाविष्ट करण्यात आली.

सदर खर्च महापालिका अर्थसंकल्पातील रस्त्यांचा विकास करणे या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीतून करणे आहे. सद्यस्थितीत सदर काम तातडीचे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम 2 (2) अंतर्गत मे.माँ भवानी कंन्स्ट्रक्शन यांचेमार्फत करुन घेण्यात आले असून सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजूरी मिळणेस प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

**<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>** ८० **<u>दिनांकः– २९/१/२०१८</u>**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—१ मधील भवानी मंदिर ते गोलमैदान पर्यंत रस्ता दुभाजक बनविण्याच्या कामास कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पाले जोडणीवर व रमाबाई टेकडीवरील बसविलेली जलमापके पावसाच्या विजेमुळे पुर्णत: जळाल्याने तातडीने फुल बोअर इलेक्ट्रोमॅग्नेटीक नवीन जलमापके बसविणे.

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मागील वेळेस हा विषय आपण डिफर केला होता.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**डिटेल काय आहे?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**१८ लाख ४० हजाराचे आहे. हा पास करा, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ९ :—** उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पाले जोडणीवर व रमाबाई टेकडीवरील बसविलेली जलमापके पावसाच्या विजेमुळे पुर्णत: जळाल्याने तातडीने फुल बोअर इलेक्ट्रोमॅग्नेटीक नवीन जलमापके बसविणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी अहवाल सादर करण्यात येतो की, कॅम्प नं ४ व ५ मधील भागात बारवी मेनवरील पाले जोडणीतून तसेच रमाबाई टेकडीवरून पाणी पुरवठा होतो. सदर पाले जोडणीवर महामंडळाच्या मालकीचे व उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे जलमापक बसविलेले आहेत. परंतु रमाबाई टेकडी येथे फक्त महापालिकेचे जलमापक बसविलेले आहे. सदर जलमापकाव्दारे कॅम्प नं.४ व ५ मधील भागात दैनंदिन होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या नोंदी घेणेत येतात. त्यानुसार महामंडळ मासिक देयक आकारत असते व महापालिका आपल्या जलमापकाच्या नोंदीनुसार त्याची तपासणी करून भरण्यासाठी प्रस्तावित करत असते.

सदर जलमापके दि. ०६/१०/२०१७ रोजी झालेल्या वादळी पावसातील विज विद्युत पोलवर पडल्यामुळे विद्युत मीटर व महामंडळाचे तसेच महापालिकेचे जलमापके पुर्णत: जळुन खाक झाली आहेत तसेच ती दुरूस्त

होण्यासारखी राहिली नाहीत. त्यामुळे शनिवार दि.०७/१०/२०१७ पासून सदर जोडणीवरून प्राप्त होणाऱ्या पाण्याच्या परिमाणाच्या नोंदी घेणे बंद झालेले आहे. त्याकारणास्तव प्रत्यक्षात प्राप्त होणाऱ्या पाणी परिमाणांची मोजदाद होत नाही. त्याकरिता सदर ठिकाणी तातडीने नवीन जलमापके स्वमालकीचे बसविणे आवश्यक आहे. कारण एक जलमापक नादुरूस्त झाल्यास दैनंदिन नोंदी सुरू असलेल्या दुसऱ्या जलमापकाव्दारे अखंडित नोंदी घेणेत येतात. तसेच दैनंदिन ३५ ते ४० द.ल.ली. पाले जोडणीतून व ९ ते १० द.ल.ली. रमाबाई येथून पाणी पुरवठा हया जोडण्यातून सुरू असल्यामुळे ग्राहकाने सुरक्षित नोंदीसाठी स्वमालकीचे जलमापक बसविणे गरजेचे आहे. कारण दैनंदिन पाणी पुरवठयात प्राप्त होणारे पाणी परिमाण जलमापकाशिवाय १ ते २ द.ल.ली. प्रतिदीन जास्त दर्शविल्यास प्रतिदिन रु.१६०००/— याप्रमाणे मासिक ४,८०,०००/— रुपये जास्त जाऊन महापालिकेचे अर्थिक नुकसान होईल. अन्यथा अंदाजे अवाजवी पाण्याच्या नोंदी महामंडळाकडून आकारण्यात येवुन महापालिकेचे आर्थिक नुकसान नाकारता येत नाही. सदर ठिकाणी यापूर्वी महापालिकेकडून अल्ट्रासॉनिक जलमापके बसविलेली होती. परंतु पाले जोडणीवर महामंडळाकडून लवकरच फुलबोअर मॅग्नेटिक इंन्सरशन टाईप जलमापके बसविण्यात येत असून महापालिकेकडून सुध्दा त्याप्रकारचे जलमापक सदर ठिकाणी बसविणे गरजेचे आहे. अन्यथा भविष्यात पून्हा दोन भिन्न प्रकारच्या जलमापकांच्या नोंदीमुळे वाद निर्माण होऊ शकतो तसेच महापालिकेच्या खर्चाने महामंडळ जुन्या व नवीन मुख्य संतुलन टाकीच्या आऊटलेटवर तशीच जलमापके बसवत असून रमाबाई संपच्या इनलेटवर नवीन मुख्य संतुलन टाकीचे आधी येत असल्याने नादुरुस्त झालेल्या जलमापकाच्या ठिकाणी सुध्दा तातडीने नवीन जलमापक बसविणे गरजेचे आहे.

सदरचे जलमापक KROHNE MARSHALL Pvt. Ltd. Pune, कंपनीचे असुन, पाले येथील जोडणीवर ७०० मी.मी. व्यासाचे व न्यु रमाबाई पंपिग स्टेशन येथे ४५० मी.मी. चे जलमापक बसिवण्यात येत आहेत. त्यानुसार बाजारातून दरपत्रके मागवून व नवीन दरानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्याची किंमत रु. १८,४४,४३६/— एवढी आहे. तसेच सदर काम तातडीच्या स्वरूपाचे असल्याने निविदा कार्यवाही केल्यास वेळेचा अपव्यय होऊन विहीत कालावधीत काम होणे शक्य नाही. त्यामुळे सदर जलमापकांची कामे मे.कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर प्रा.ली.उल्हासनगर यांचेकडुन काम करून घेण्यास कलम ५ (२) (२) अंतर्गत मंजुरी मिळावी, ही विनंती. तरी सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ८१ **दिनांकः— २९/१/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत पाले जोडणीवर व रमाबाई टेकडीवरील बसविलेली जलमापके पावसाच्या विजेमुळे पुर्णत: जळाल्याने तातडीने फुल बोअर इलेक्ट्रोमॅग्नेटीक नवीन जलमापके बसविणेसाठी मे.कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर प्रा.ली.उल्हासनगर यांचेकडुन काम करून घेण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :—** स्वच्छ भारत अभियान (नागरी) व स्वच्छ सर्वेक्षण— २०१८ अंतर्गत उल्हासनगर शहरातील

नागरीकांमध्ये स्वच्छतेबाबत होर्डीग्ज, भिंतीचित्रे, हस्तपत्रके, स्टीकर, पोस्टर, कॅलेंडर, जींगल सॉग, रिक्षाद्वारे प्रसार व प्राचार व जनजागृती करण्यासाठी प्रभाग निहाय व संपुर्ण शहरात येणाऱ्या खर्चास व प्रस्तावास महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ मधिल ५(२)(२) अंतर्गत मा. स्थायी समितीची मान्यता मिळणे.

---

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**आम्ही एक पत्र दिले आहे. सुका व ओला कचरा वेगळया केल्यावर ओल्या कच—यावर प्रक्रिया करण्यासाठी, आमच्या येथे जी जागा आहे त्या जागेमध्ये तुम्ही कंम्पोस्टींग बांधुन दयावी म्हणुन. ते जर लवकर बांधुन दिले तर आमच्याकडे ओला कचरा प्रक्रिया करण्याची सुरुवात लवकर होईल.

**श्री. केणी प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**तीन जागा आहेत, सोनवणे गार्डन येथे एक जागा आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे,करा. तेथे प्लास्टर वगैरे करुन टाकी बांधु ना.

**श्री. केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**सार्वजनिक बांधकाम विभागास सांगावे लागेल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**साहेब, मी सुध्दा सांगतो माझ्या प्रभागातील भाजी मार्केट, बसस्टॉप या दोन जागा आहेत भले आपण आमचा निधी घ्या किंवा महापालिकेचा घ्या ते काम करणे आवश्यक आहे.

**श्री. केणी प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**निधी पब्लीक फंडचाच येतो परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग म्हणते निधी नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मी सभागृह निधीतुन दोन पत्र दिले आहे.

**श्री. केणी प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**आपण पाच नंबर भाजी मार्केट येथे जे केले आहे तीच डिझाईन परफेक्ट आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपण म्हणता सार्वजनिक बांधकाम विभाग तर आपण तेथुन तो निधी युज करा ना.

**श्री. केणी प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**बांधकाम करण्यासाठी कोणताच निधी आमच्याकडे नाही.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**पब्लीक हेल्थ डिपार्टमेंट एक इंडीपेंडंट डिपार्टमेंट आहे. ज्यात आपणांस ज्यु. इंजिनिअर दिला आहे.

**श्री. केणी प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**ज्यु. इंजिनिअर श्री. संजय पवार यांची बदली नगररचना विभागात झाली आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**सुधारीत बजेट सुध्दा येत आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा एक अति महत्वाचा विषय आहे, स्वच्छ सर्वेक्षण होणार हे होणार ते होणार. आपणाकडे जागा आहे तसेच भाजी मार्केटसुध्दा आहे, तेथे कच—याचे वेगवेगळे खत्ते होत आहे. तर आपण आपली निधी देत आहोत ना.

**श्री. केणी प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**ठिक आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**आपण देत आहात, आमच्याकडे निधी कुठे आहे?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मी देतो माझा निधी.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**दया सभागृह नेता निधी.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**मला सुध्दा दया.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**२५ टक्के तर दिले आहे ना सर्वांचे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**स्वच्छ भारत मध्ये घेतले तर बरे होईल.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**जे ५(२)(२) मध्ये घ्यायची आवश्यकता आहे ते घेतले पाहिजे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**४ जानेवारीपासुन स्वच्छ सर्वेक्षण पुर्ण ऑल ओव्हर इंडियामध्ये सुरु झालेले आहे. आपल्यापण शहरात कोणत्याही क्षणी ते सर्वेक्षणासाठी येवु शकतील. लोकांमध्ये जनजागृती हा सर्वात पहिला टप्पाआहे. आपण वेगळा खर्च न करता नगरसेवकांना पत्र देवुन सुरु केले आहे. परंतु व्यापक स्वरुपात जर मोहिममध्ये न्यायचे असेल तर, आपल्या क्रमांकावर आपल्याला पोहचायचे असेल तर हे सर्व जाहिरात करणे, लोकांपर्यंत करणे गरजेचे आहे. निविदा करायची म्हटली, कोटेशन करायचे म्हटले तरी त्यात वेळ जाणार आहे. मेन १९ लाखाची जी भिंत रंगविणे आहे त्याचे निविदा लवकर होणार काय, आणि भिंती रंगवायला परत वेळ दयावा लागणार.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**प्रश्न विचारायचे कारणच ते आहे की ५(२)(२) कशाकरीता तर अर्जन्सी आहे म्हणुन. मी तेच सांगत होतो की जिजामाता उदयानाचा मी गेल्या तीन वर्षापासुन पाठपुरावा केला.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**मंजुर केले मी.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**मंजुर केले परंतु निविदा अजुन उघडली नाही, ती फायनल झाली नाही. कारण १९ फेब्रुवारीला शिवजयंती आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>**आता निविदा झाली ना मग वर्कऑर्डर दया ना.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**उदयापसुन चालु होईल का?

**<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता:–</u>**होय.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**चालु करा लवकरात लवकर व टाईम बॉन्ड देवुन टाका.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**साहेब काय आहे, समजा पाईप लाईन टाकायची आहे तर ती तर स्वच्छता अभियानापेक्षा जास्त महत्वाची आहे. मुलभुत सुविधा आहे आपण देत नाही. ५(२)(२) मध्ये करायला पाहिजे काम होण्यासारखे आहे. आमचा तुमच्यावर आक्षेप नाही काही नाही, मी त्यावेळस सुध्दा म्हणत होतो, जिजामाताचे काम५(२)(२) मध्ये केले असते तर ते नक्कीच पुर्ण झाले असते.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**आपण १९ तारखेच्या आत नक्कीच पुर्ण करुन घेवु. श्री. शेवकानी ही आपली जबाबदारी राहिल काम पुर्ण करुन घेण्याची.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>**हा जो विषय आहे यात ४ नंबर जे लिहिले आहे भिंतीवर पेंटींग.....

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**आम्ही आमच्या लोकांना काम पेंटींग करण्यास लावले आहे काम चालु करण्यासाठी.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**यामध्ये नवनिर्माण कंन्स्ट्रक्शनवाल्यांनी एक पत्र दिले होते.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:–</u>**यामध्ये आम्ही सांगितले होते की लोवेस्ट जे आले आहेत ते सर्व कामासाठी मे. ए.एम. रामचंदानी, मयुर, अशोक बाबलानी हे जुने आहेत, त्यात वॉल पेंटींगसाठी नवनिर्माण यांचे सुध्दा आले आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>**तेच म्हणतो जे पेंटिंगचे काम आहे ते नवनिर्माणसाठी लिहा.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:–</u>**स्थायी समिती जसा ठराव करेल त्या हिशोबाने येवुन जाईल.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**बाकी बरोबर आहे सर्वांचे नाव, फक्त ४ नंबरचा जो विषय आहे ते नवनिर्माण यांना दया. १९ लाख ५० हजाराचे नवनिर्माण कंस्ट्रक्शन यांना दया.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>** :–ए.एम. रामचंदानी यांच्याऐवजी नवनिर्माणवाल्यांना देवुन टाका. ठरावात तसे येवु दया.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**बाकी ए.एम. रामचंदानी, अमर ज्योती यांना जसे जसे दिले आहे तसे दया. तशीच यात माझी एक सूचना होती हा जो विषय आहे यात तर देणारच, जसे आपले हजेरीशेड आहे, समाजमंदिर आहे, महानगरपालिकेच्या शाळा आहेत, ६४ गार्डन आहेत यांची बाहेरच्या ज्या भिंती आहेत त्या सर्व खराब झाल्या आहेत, त्यांना जर व्हाईटवॉश करणार किंवा कलर करणार, सिमेंट कलर करणार तर त्याने सुध्दा सुंदरता वाढेल. संपुर्ण शहराचा १५—२० लाखाचा खर्च आहे. शासनाचा जो दर आहे त्यामध्ये पेंटींग कलर वगैरे करा. तर मला असे वाटते आपल्या स्वच्छभारतमध्ये एक चांगले काम होईल.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**खाजगी मालमत्ता सुध्दा आहेत, त्यांची सुध्दा अशीच अवस्था बनली आहे. तर महापालिकेने त्यास नोटिस देवुन कलर करुन घेण्यास सांगितले पाहिजे, ते सुध्दा शहरात खराब दिसत असते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**बीपीएमसीमध्ये एक क्लाज आहे नोटिस दिल्यानंतर ते काम करत नाही तर महापालिकेने त्यास कलर करुन दयायचे आहे व त्यांच्याकडुन पैसे वसुल करायचे आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**अशा सुध्दा मालमत्ता आहेत की तेथे लोक राहत नाहीत २०—२० वर्षापासुन तर तेथे लोक कचरा टाकत आहेत अशा मालमत्तेची माहिती घेवुन त्यांना नोटिस दिल्या पाहिजेत.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**याच अनुषंगाने सांगतो, सुमन सोसायटीच्या बाजुला १५ पडीक आहे तेथे घाण सुध्दा टाकली आहे, तेथे चुकीची कामे होतात, ती एक धोकादायक इमारत आहे, त्याचे सर्वेक्षण करुन ती एक इमारत धोकादायक म्हणुन तोडली तर बरे होईल. कारण तेथे चुकीचे प्रकार सुध्दा होतात. मी आपणांस तेथे जावुन दाखवितो, जसे श्री. जमनादास यांनी सांगितले, श्री. राजेश यांनी सांगितले अशा ज्या काही मालमत्ता आहेत, ज्याचा वापर नाही, त्याचा सर्व्हेक्षण झाला पाहिजे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**साहेब, माझ्या सुध्दा प्रभागात तशा मालमत्ता आहेत, ज्या खाली झाल्या आहेत तेथे इतका कचरा झाला आहे. आम्ही एसआय यांना सांगतो तसेच जे सफाईवाले आहेत ते खाजगी असल्याने नाही करत. आम्ही आजुबाजुच्या लोकांना बोलतो, ते घाणीमुळे त्रस्त आहेत. तो एरिया व इमारत साफ झाली पाहिजे. दुसरे स्मशानभुमी येथे महान संत कंवरराम यांच्याबाबत मी पत्र दिले होते तेथे पत्रासुध्दा नाही, त्यासाठी मी आपणांस एक पत्र दिले होते. आता एप्रिलमध्ये त्यांचा जन्मदिवस आहे त्याआधी काम होणार तर चांगले होईल.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपल्या शहरातील शाळा, समाजमंदिर, गार्डन यांच्या बाहेरच्या भिंतींवर कलर करुन हाच स्लोगन आपणांस त्यावर सुध्दा केला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक प्रभागात २० लाख तरतुद केली पाहिजे तेव्हा ते काम होईल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**तर आपण ठरावात टाकुन देवु या.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**जो डीएसआर दर आहे तो एक एक प्रभाग समितीत, असे चार प्रभाग समितीमध्ये ५—५ लाखप्रमाणे २० लाख व जेवढे काम होईल तेवढे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**यांचा काय दर आहे पर स्कवायर फुट? किती आहे दर.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—**साहेब ६ रुपये आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**व्हाईटवॉश वगैरे वापरु नका जरा पिंकी असा कलर वापरा.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**आपण जो कलर मारणार ना तो एकच ठेवु या. अधिका—यांनी एकच कलर निवडा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**समाजमंदिर वगेरे ठिकाणी एकच बॅकग्राउंड असला पाहिजे. डार्क कलर असला पाहिजे ज्यास अक्षरे दिसतील.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**एक युनिफॉर्म कलर घ्या.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**आमचे तेच म्हणणे आहे की एक युनिफॉर्म कलर तुम्ही घ्या. सुंदर दिसेल शहर.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**होय आणि ४ नंबरचा नवनिर्माण कंन्स्ट्रक्शन यांना दया.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**होय बाबा, ४ नंबरचा नवनिर्माण वाल्यांना दया.

**<u>महापालिका सचिव :–</u>**आपण जे जे सांगितले ते ठरावात टाकते. ४ नंबरचा नवनिर्माण कंस्ट्रक्शन यांना देण्यास तसेच डीएसआररेटने ५–५ लाख प्रत्येक प्रभाग समितीत असे एकुण २० लाख रुपये.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**त्यामध्ये असे सुध्दा घ्या की कुठल्या वास्तु करायच्या आहेत, शाळा, हजेरीशेड, गार्डनच्या भिंत, समाजमंदिर वगैरे वगैरे.

**<u>महापालिका सचिव :–</u>**इत्यादी लिहिते. त्यात सर्व येईल.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>**जे कलर मारणार ना आपण तो एकच ठेवावा.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>**होय एकच असु दया. जे चांगले असतील ते राहु दया व जे खराब झाले असतील त्यांनाच मारा.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**आणि ही प्रभाग अधिका–यांची जबाबदारी असेल. शॉर्ट लिस्ट करणे वगैरे. कुठल्या वास्तु करायच्या वगैरे तुम्ही आताच ती यादी करा.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**माझी प्रभाग अधिका–यांना विनंती राहील, जे जास्त खराब भिंती आहेत प्रथम त्यास करा, जे समाजमंदिर जास्त खराब आहेत ते करा लवकर.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**साहेब, प्रभाग अधिका–यांना एवढे माहित नसते काय कोठे आहे ते तर मला असे वाटते सार्वजनिक बांधकाम विभाग गार्डन पाहते, समाजमंदिर पाहते तर त्यांना ते सांगावे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**आमच्याकडे सर्व यादी दया.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>**सार्वजनिक बांधकाम विभागास दया.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>**माझ्यामते प्रायोरीटीने घेवु या. प्रथम शाळा घेवु या. नंतर समाजमंदिर घ्या.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**प्रथम शाळा, मग हजेरीशेड, आणि मग समाजमंदिर घ्या.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>**होय तसेच करु या.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**शाळेचा अर्थ म्हणजे बाहेरील भिंत.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>**आउटरवॉल.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**जे लोकांना दिसत आहे आउटरवॉल, गार्डनमध्ये सुध्दा तसेच करा. आणि हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**<u>महापालिका सचिव :–</u>**ठिक आहे. ठरावात तसे टाकते.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १० :–** स्वच्छ भारत अभियान (नागरी) व स्वच्छ सर्वेक्षण– २०१८ अंतर्गत उल्हासनगर शहरातील नागरीकांमध्ये स्वच्छतेबाबत होर्डीग्ज, भिंतीचित्रे, हस्तपत्रके, स्टीकर, पोस्टर, कॅलेंडर, जींगल सॉग, रिक्षाद्वारे प्रसार व प्राचार व जनजागृती करण्यासाठी प्रभाग निहाय व संपुर्ण शहरात येणाऱ्या खर्चास व प्रस्तावास महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ मधिल ५(२)(२) अंतर्गत मा. स्थायी समितीची मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येत आहे की, केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान (नागरी)” च्या धर्तीवर संदर्भीय शासन निर्णयान्वये राज्यानमध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” ची अंमलबजावणी मिशन मोड मध्ये सुरू आहे. या अभियानांतर्गत शहरे “हागणदारी मुक्त” करणे व घनकचरा व्यवस्थापनांतर्गत “स्वच्छ” करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे. स्वच्छ भारत अभियान हा केंद्र व राज्य शासनाचा फ्लॅगशिप असून या कार्यक्रमांतर्गत होणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण २०१८ मध्ये राज्यातील सर्व शहरांनी उत्कृष्ट कामगिरी करून उत्तम गुणांकन मिळविणे आवश्यक आहे. त्यामध्ये उल्हासनगर महापालिकेचा ही समावेश आहे. तरी उल्हासनगर महापालिकेने उत्कृष्ट कामगिरी करून उत्तम गुणांकन मिळविणे आवश्यक आहे. त्यामध्ये आपला शहराचा संपुर्ण परिसर स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. त्याकरीता आपल्या शहराच्या स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये प्रचार व प्रसार करणे आवश्यक आहे. त्यानुसार नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी मराठी, हिंदी व सिंधी यां भाषामध्ये स्वच्छतेचा संदेश देणारी स्टीकर छपाई करून शहरात मुख्य भिंतीवर चिटकावणे, तसेच हिंदी व सिंधी मध्ये जनजागृती करीता जाहीरातीचे बॅनर लोखंडी फ्रेमसह गार्डन मध्ये बसवूण घेणे, स्टीकर छपाई करून ऑटो रिक्षावर चिटकावणे, स्वच्छतेचे ब्रॅड ॲम्बेसिडर द्वारे हिंदी भाषेमध्ये ४ व सिंधी भाषेमध्ये ६ बॅनर ('१०×२०') जनजागृतीसाठी गार्डन मध्ये लावणे, हॅडबिल छपाई करून वाटप करणे, मराठी/हिंद/सिंधी भाषेत ऑडीओ क्लीप बनवून त्याद्वारे संदेश प्रसार करणे, जिंगल सॉग व्हीडीआ क्लीप बनवणे व केबलवर प्रसारीत करणे, रिक्षाद्वारे जनजागृती करणे व उघडयावरील हागणदारीची जी ठिकाणे ;क्ष्‍ैचवजेद्ध निष्कासीत केली आहेत, त्या उघडयावरील हागणदारीच्या ठिकाणांवर वॉल पेंटिंग करून घेणे व काही मुख्य भिंतीवर वॉल पेंटिंग करून स्वच्छतेचा संदेश नागरीकांपर्यंत पोहचविणे सदरची कामे अत्यंत महत्तवाचे व तातडीचे असल्याने याबाबत त्वरीत कार्यवाही करण्याचे मा. आयुक्त सो., यांनी दिनांक ०३/०१/२०१८ रोजीच्या बैठकीत निर्देश दिले होते.

तसेच दिनांक ०५/०१/२०१८ रोजी महापालिका पदाधिकारी व महापालिका सदस्य यांच्या समवेत स्वच्छता सर्वेक्षण २०१८ बाबत बैठक झाली असता सर्व पदाधिकारी व नगरसेवक/नगरसेविका यांच्यात मा. आयुक्त सो., यांच्याबरोबर झालेल्या चर्चेनूसार प्रत्येक प्रभागातून जनजागृती व स्वच्छता मोहिम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक प्रभागास ५०,०००/— रूपये या प्रमाणे ७८ प्रभागास ३९,००,०००/— रूपये चा निधी प्रभाग समिती फंडातून उपलब्ध करून मिळणेबाबत निश्चित केले आहे. तरी स्वच्छ सर्वेक्षण २०१८ अंतर्गत जनजागृतीसाठी आवश्यक साहित्याचे खुल्याबाजारातुन दुरध्वनीद्वारे दरपत्रके मागविण्यात आली होती. त्याअन्वये इकडील कार्यालयास विविध ठेकेदारांनी दरपत्रके सादर केलेली आहेत. तरी सदर दरपत्रकांतून न्युनतम दरपत्रकांचा व पुरवठादारांचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | साहित्याचा तपशील | प्रति प्रभाग | एकूण ७८ प्रभागांसाठी आवश्यक संख्या | प्रति दर रुपये | एकूण अंदाजीत खर्च रुपये | पुरवठादाराचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | स्टिकर छपाई करणे ग्लोसी, रंगीत, (५×१०) संपुर्ण पॅनल मध्ये मुख्य ठिकाणी, घरोघरी व दुकानांमध्ये चिटकवणे, | २००० प्रति | १५६००० | ३/— | ४,६८,०००/— | मे. ए. एम. रामचंदाणी, उल्हासनगर |
| २ | हस्तपत्रके दोन्ही बाजुने (bothside) छपाई करणे ग्लोसी, रंगीत (A4 Paper `ize) सिंधी भाषेमध्ये संपुर्ण शहरासाठी | १००० प्रति | ७८००० | ३/— | २,३४,०००/— | |
| ३ | पॅनल निहाय हस्तपत्रके दोन्ही बाजुने ;bothside) छपाई करणे (A4 Paper size) हिंदी व मराठी भाषामध्ये. पॅनल निहाय. | १००० प्रति | ७८००० | ३/— | २,३४,०००/— | |
| ४ | भिंतीवर पेन्टींग (Wall painting) चित्र रंगवणे करणे. | १००० प्रति चौ.फुट | ७८००० | २५/— | १९,५०,०००/— | |
| ५ | कॅलेंडर २०१८, स्वच्छ सर्वेक्षण मजकुरासह, दोन्ही बाजुने (bothside) रंगीत छपाई करणे (10×15) हिंदी व मराठी भाषामध्ये. | ५०० प्रति | ३९००० | ८/— | ३,१२,०००/— | |
| ६ | विनायल प्रींटींग होर्डींग, प्रींटीग करुन | ३२ प्रति चौ. | २४९६ | ४०/— | ९९,८४०/— | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | शहरात विविध ठिकाणी बसवूण देणे. (४×८) चौ.फु. ७८ नग | फुट | | | |
| ७ | जाहीरातीचे बॅनर लोखंडी फ्रेमसह गार्डन मध्ये बसवूण देणे. ('६×८') ४८ चौ. फु. | ६४ नग (३०७२ चौ.फु.) | ४०/— | १,२२,८८०/— | मे. अमर ज्योत इंटरप्राईझेस, उल्हासनगर |
| ८ | स्वच्छतेचे ब्रॅड ॲम्बेसिडरद्वारे जनजागृती होण्याकरीता हिंदी भाषेमध्ये ४ व सिंधी भाषेमध्ये ६ बॅनर लोखंडी फ्रेमसह बसवूण देणे. ('१०×२०') २०० स्के. फिट | १० नग (२००० चौ.फु.) | ४०/— | ८०,०००/— | |
| ९ | जाहीरातीचे बॅनर लोखंडी फ्रेमसह गार्डन मध्ये बसवूण देणे. ('६×८') ४८ स्के. फिट | ०९ नग (४३२ चौ.फु.) | ४०/— | १७,२८०/— | |
| १० | सर्व दुकानात/आस्थापनात, स्टिकर छपाई करणे, ग्लोसी, रंगीत (A4 Paper size) | १६००० नग | ८/— प्रति नग | १,२८,०००/— | |
| ११ | ऑटो रिक्षावर चिटकवण्यासाठी पोस्टर छपाई करणे, ग्लोसी, रंगीत (१२×८) | ४००० नग | १२/— प्रति नग | ४८,०००/— | |
| १२ | ऑडीओ रेकोर्डीग, मराठी, हिंदी आणि सिंधी भाषेत | ३५ मिनीटे | ५७२ प्रति मिनिट | २०,०००/— | मे. मयुर ॲड. उल्हासनगर |
| १३ | ऑडीओ रेकोर्डीग, रीक्षाद्वारे संपुर्ण शहरात प्रचार व प्रसार करणे, १० दिवस (प्रति दिन ८ तासांसाठी) | २ रिक्षा १० दिवस | प्रति रिक्षा प्रति दिन १२००/— | २४,०००/— | श्री. अशोक बाबलाणी, उल्हासनगर |
| १४ | शौचालयांवर संदेश डीजीटल पेंट करणे. (सुरेश रैना पोस्टर) (३×२) | ५४ नग (३२४ चौ. फुट) | ७७/— प्रति चौ. फुट | २४,९४८/— | मे. कॅन इमेज मेडीया टेक, वसई. |
| १५ | उघडयावर शौचास बसु नका शौचालयाचा वापर करा. आपले शौचालय स्वच्छ ठेवा. पाण्याचा जपुन वापर करा. व स्वच्छता बाबत इतर संदेश देण्याबाबत डिजीटल वॉल पेन्टींग (Chronic Point) (5x10) | २० ठिकाणे (१००० चौ. फुट) | ७७/— प्रति चौ. फुट | ७७,०००/— | |
| १६ | कार्यक्रम अमंलबजावणी कक्ष (PIU) येथिल भिंतीवर स्वच्छता संदेश डिजीटल वॉल पेंटींग | २०० चौ. फुट | ७७/— प्रति चौ. फुट | १५,४००/— | |
| १७ | जींगल सॉग, ऑडीओ ॲण्ड व्हीडीओ, ३ मिनिटे (लिरीक्स,सिंगर,शुटींग,डबिंग इत्यादी) | ३ मिनिटे | १००००० प्रति युनिट | १,००,०००/— | ज्युली इंटरटेंण्मेंट टेलिव्हीजन, उल्हासनगर |
| | **एकूण** | | | **३९,५३,३४८/—** | |

त्याअनुषंगाने नागरीकांमध्ये जनजागृती होण्याकरीता उक्तबाबीबाबत येणारा अंदाजित रूपये ३९,५३,३४८/— एवढा (अक्षरी एकोणचाळीस लाख त्रेपन्न हजार तिनशे अठ्ठेचाळीस मात्र) खर्च अपेक्षित आहे. तरी सदरचा खर्च महापालिका प्रभाग समिती फंडातून प्रत्येकी १२ लाख रूपये याप्रमाणे चार प्रभाग समिती रूपये ४८,०००००/— या फंडातून खर्च करण्यास मान्यता मिळावी.

वरील तपशीलामध्ये नमुद केल्यानुसार मे. ए. एम.रामचंदानी, उल्हासनगर—३, मे. अमर ज्योत इंटरप्राईझेस, उल्हासनगर, मे. मयुर ॲड. उल्हासनगर, श्री. अशोक बाबलाणी, उल्हासनगर, मे. कॅन इमेज मेडीया टेक, वसई, ज्युली इंटरटेंण्मेंट टेलिव्हीजन, उल्हासनगर यांची बाब निहाय न्युनतम दराचे परपत्रके प्राप्त झाली आहेत.

स्वच्छ सर्वेक्षण २०१८ अंतर्गत देशातील एकूण ४०४१ शहरांची स्वच्छते संबंधीत शासन निर्णयाअन्वये मार्गदर्शक निकषानुसार ४ जानेवारी २०१८ पासुन विविध शहरांची स्वच्छ सर्वेक्षण २०१८ च्या समिती मार्फत तपासणी सुरु आहे. सदरची

समिती कोणत्याही क्षणी उल्हासनगर महानगरपालीकेची पाहणी करण्यासाठी येवू शकते. अशा परीस्थितीत उक्त नमुद कामे निविदा प्रसिध्द करुन करणे शक्य होणार नाही व सदरची कामे कालमर्यादित करणे गरजेचे असल्याने सदरची कार्यवाही तातडीने करणे आवश्यक आहे.

तरी उक्त सर्व कामे करुन घेण्यास एकूण रूपये ३९,५३,३४८/— एवढा (अक्षरी एकोणचाळीस लाख त्रेपन्न हजार तिनशे अठ्ठेचाळीस मात्र) खर्च अपेक्षित आहे. सबब सदरची कामे त्वरीत करुन घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ मधिल ५(२)(२) अंतर्गत मा. स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ८२ **दिनांकः—२९/१/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार स्वच्छ भारत अभियान (नागरी) व स्वच्छ सर्वेक्षण— २०१८ अंतर्गत उल्हासनगर शहरातील नागरीकांमध्ये स्वच्छतेबाबत होर्डींग्ज, भिंतीचित्रे, हस्तपत्रके, स्टीकर, पोस्टर, कॅलेंडर, जींगल सॉग, रिक्षाद्वारे प्रसार व प्राचार व जनजागृती करण्यासाठी प्रभाग निहाय व संपुर्ण शहरात येणाऱ्या खर्च रूपये ३९,५३,३४८/— यास व सदरची कामे त्वरीत करुन घेण्यासाठी प्रस्तावास महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम ५(२)(२) अंतर्गत मान्यता देत आहे.

**तसेच**

१. अनुक्रमांक ४ वर दर्शविलेले बाहेरील भिंतीवर पेन्टींग (Wall painting) चित्र रंगवणे हे काम नवनिर्माण कंन्स्ट्रक्शन यांना देण्यास मान्यता देत आहे.

२. प्रभाग समिती क्र. १ ते ४ मध्ये हजेरी शेड, समाजमंदिर इत्यादी महापालिकेच्या मालमत्तांना बाहेरुन रंगरंगोटी करणेस एकुण रुपये २० लाखास मंजुरी तसेच सदर काम नवनिर्माण कंन्स्ट्रक्शनकडुन डीएसआर दराने करुन घेणेस मान्यता देत आहे. सदर काम करुन घेण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ११ :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानांची निगा राखणे करीता माळी,मजूर व सुरक्षा रक्षक पुरविणेच्या प्रस्तावाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणे.**

————————————————————————————————————

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**यामध्ये मागील वेळेस विषय झाला होता प्रायव्हेट गार्डन घेतले होते. आपण ते घेवु शकतो यासाठी आपण मागील वेळेस म्हटले होते. आमच्या येथे एक खाजगी उदयान आहे तर त्यास ६४ उदयानांमध्ये घेवुन यावे. ते गार्डन कलेक्टर पास सोसायटी आहे १९ गार्डनची त्यांचे स्वत:चे होते, तर महापालिका आपल्या ताब्यात घेत आहे. तर त्यामध्ये काम करु शकतो, निधी लावु शकतो का, नाहीतर असे होता कामा नये...

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ती खाजगी मालमत्ता आहे का.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**होय ती खाजगी मालमत्ता आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आपण कसे करणार, जोपर्यंत ते आपल्या ताब्यात येणार नाही तोपर्यंत.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—**याबाबत त्यांनी चर्चेस ठेवले होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**हा प्रस्ताव लिखित आहे का?

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मग सोसायटीकडुन प्रस्ताव लागणार ना. हे गार्डन आपण कायम मेंटेन करण्यासाठी त्यांना देत आहोत व हे गार्डन पब्लीकसाठी सुध्दा ओपन करण्यास तयार आहोत अशा प्रकारे प्रस्ताव पाहिजे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**हे अधिका—यांना माहित असेल.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**खाजगी मालमत्ता असतांना ती आपल्या यादीत आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**म्हणजे हे ६४ उदयानांच्या यादीतच खाजगी उदयान टाकले आहे का? श्री. शेवकानी सांगा. यावर का खर्च करत आहे आपण?

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता:—**हे श्री. अश्विनीजवळ आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**मुंबईला असे फारच विषय झाले होते. मुंबईला खासदार निधी लावला नंतर फार अडचणीचे झाले होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे, आपण हे आता टेंटेटीव्ह घेत आहोत, नंतर जशी आवश्यकता असेल तसे घेवु या. कोणते उदयान आहे ते मी चेक करतो नंतर.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**आमच्या येथिल उदयान आहे, दत्त निवास येथिल उदयान आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**हे आपल्या यादीत कसे आले?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—**ब—याच वर्षापासुन ते आहे साहेब.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे मग हे सामान्य जनतेसाठी आहे ना. फक्त सोसायटीचे लोक जात नाहीत.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—** अदयाप सोसायटी बनली नाही. ती खाजगी जागा असल्यामुळे मी बोलत आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**आमचे म्हणणे असे आहे की, जर उदया त्या लोकांनी अडविले तर.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**तर माळी तेथुन काढुन घेवुन मग दुस—या जागी त्याचा वापर करणार.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**नंतर अडचण येणार की नगरसेवक जाणुनबुजुन त्यावर खर्च करत आहे. ती अडचण येता कामा नये.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**जर पब्लीक युज करत असतील तर महापालिका त्यास तेथे ठेवेल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**जर जनता वापर करत असेल तर आपण डिटेल टॅक्नीकलमध्ये गेले नाही पाहिजे. आपण फक्त तेथे माळी आणि वॉचमन देत आहोत.

**सदस्य श्री. भारत राजवानी :–**साहेब, ते आजपर्यंत विकसित झाले नाही. फक्त कंपाउंड वॉल लावला आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**गार्डन विकसित करण्यासाठी आपण १७ गार्डन घेतले आहेत. तो सुध्दा विषय आहे आपणाकडे. यात फक्त एक दुरुस्ती केली आहे मागील वेळेस आपण १ वर्षासाठी केले होते. आता चर्चा करुन ४ वर्षात ३६ कोटी वाढविले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**आपणांस सुरक्षा रक्षक किती दयायचे आहेत?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**६४ दयायचे आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**हे जे ६४ उदयान आहेत त्यात आम्ही ६४ सुरक्षा रक्षक ठेवले आहेत. कोठे कोठे दोन लागतील, कोठे लागतील, कोठे नाही लागतील. बाकी तर सर्व बरोबर होते. सेक्युरीटी तर सुरक्षा मंडळाकडुन घ्यायचे आहे आणि त्याचे पैसे सुध्दा जास्त आहेत, सर्वांचे जसे मत असेल, जर ६४ सुरक्षा रक्षकांऐवजी जर फक्त ३२ केले तर. बाकी सर्व तसेच असु दया व ३२ सुरक्षा रक्षक घ्या. आणि ३२ दुसरे मजुर वाढवु या.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**गार्डन लहान असो किंवा मोठे असो जर तेथे लक्ष नाही दिले तर तेथे गैरप्रकार वाढतात. सुरक्षा रक्षक कमी आहेत. जर ही व्यक्ती ड्रेसमध्ये उभी जरी दिसेल तरी फरक पडणार.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**ठिक आहे, यात ज्या अटी आहेत त्या टाकण्यात याव्यात. एनजीओ संस्था अथवा संस्था व्हीटीपी मान्यता प्राप्त असावी. उदयानाचे देखभाल / दुरुस्ती केल्याचा अनुभव असावा. ईपीएफ आणि उदयोग आधार नोंदणी (शासन मान्य) असणे आवश्यक आहे. अशा अटी टाकण्यात याव्यात.

**महापालिका सचिव:–**ठरावात हया अटी टाकते की एनजीओ संस्था अथवा संस्था व्हीटीपी मान्यता प्राप्त असावी. उदयानाचे देखभाल / दुरुस्ती केल्याचा अनुभव असावा. ईपीएफ आणि उदयोग आधार नोंदणी (शासन मान्य) असणे आवश्यक आहे. मंजुर?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**एनजीओ कसाला?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**करतील ना एनजीओ. मंजुर करा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**एनजीओ पेक्षा प्रोफेशनल चांगले काम करतील. मॅन पॉवर प्रोवाईड करण्यासाठी आहे ना.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**ठिक आहे. एक एनजीओ नाही घ्यायचा तर त्याची संस्था एनजीओने रजिस्टर असली पाहिजे. मंजुर करा.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**यादीमध्ये जिजामाता उदयान, आजीआजोबा उदयान आहे का?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**आपण अनुभव सुध्दा टाकला आहे की उदयानाचे देखभाल/दुरुस्ती करणेसाठी अनुभव असावा.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**यामध्ये तसे नाही आहे. जिजामाता उदयानाच्या बाजुचे गार्डन नाही आहेत.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:–**आहेत, घेतले आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**हया अटी टाकुन ठराव पारीत करण्यांत यावा, इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**यामध्ये गार्डन कमी आहेत म्हणुन मी सांगतो साहेब, आजीआजोबा उदयान जे जिजामाता उदयानाच्या बाजुला आहे. ते या यादीमध्ये नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**सांगा काय आहे ते.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**ते देतील म्हणतात. एखादा राहिला तर मग तेथे देता येणार नाही. मग ६४ च्याऐवजी ६५ पाहिजे, एक वाढवा.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—**आमच्याकडे मजुर ऐवजी माळी जास्त आहेत.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**सुरक्षा रक्षकांची गोष्ट आहे ना.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**हे पहा, आपण निविदा काढणार माळीचा दर दरमहिन्यास काय आहे, मजुरचा काय आहे त्यामुळे १९—२० जे काही होईल, १० टक्क्यापर्यंत आपण वाढवु शकतो ना. आपण काही ३ कोटीची निविदा नाही काढत किंवा १६ कोटीचे नाही काढत.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**माझी विनंती एवढीच आहे की त्या बाजुच्या उदयानाचा उल्लेख नाही आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**निविदेत तशी अटच राहिल की त्याप्रमाणे मॅनपॉवर त्यास पुरवावे लागतील.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**याबाबत आपण आयुक्तांना प्राधिकृत करीत आहोत.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे, ठरावात अटी टाकते आणि इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ११ :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यानांची निगा राखणे करीता माळी,मजूर व सुरक्षा रक्षक पुरविणेच्या प्रस्तावाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्तावना**

सार्वजनिक बांधकाम विभागात विषयांकीत प्रस्ताव दिनांक १५/०१/२०१८ रोजीच्या स्थायी समितीच्या बैठकीत मंजूरी करीता सादर करण्यात आला होता. प्रभाग क्षेत्र क्र.१ मध्ये पूर्वी एकूण १३ उद्याने समाविष्ट केले होते. परंतू संबंधित प्रभाग क्षेत्राचे उप अभियंता यांनी त्यांचे प्रभाग क्षेत्रातील तीन मोकळया भुखंडांचे ठिकाणी कुंपण भिंत बांधलेली जागा आहे. अशा जागांवर भविष्यात परिसरातील नागरीकांच्या सोयी करीता अर्थसंकल्पातील उपलब्ध तरतूदीनुसार उद्याने विकसित करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे या तीन मोकळया भुखंडांची ठिकाणे उद्यानाच्या यादीत समाविष्ट केले. त्यामुळे प्रभाग क्षेत्र क्र.१ मधील एकूण उद्यानांच्या संख्येत बदल होऊन १६ एवढी झाली आहे व शहरातील एकूण उद्यानांची एकूण संख्या ६४ इतकी झाली आहे.

यास्तव, सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या मुळ प्रस्तावात खालील बदल करण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्रभाग समिती क्र. | एकूण उद्याने | एकूण क्षेत्रफळ | आवश्यक माळी | आवश्यक मजूर | आवश्यक सुरक्षा रक्षक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १६ | ३१४५२.९८ | १६ | २० | १६ |
| २ | २ | १२ | ३२१६५.२६ | १२ | १८ | १२ |
| ३ | ३ | १९ | ५४७६९.८३ | १९ | २६ | १९ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | १७ | ४५६३६.०० | १७ | २४ | १७ |
| | एकूण | ६४ | | ६४ | ८८ | ६४ |

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ मधील उद्यानामध्ये मजूर, माळी व सुरक्षारक्षक पुरविणे या कामाची निविदा एकूण ०४ वर्षाकरीता असेल. दरवर्षी एकूण खर्चात १० टक्के वाढ ग्राहय धरुन खालील वर्षनिहाय खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**वर्ष २०१८-१९**

| | **एकूण आवश्यक संख्या** | **दरसुची प्रमाणे दर** | **एकूण दिवस** | **महिन्यांची संख्या** | **एकूण खर्च (स्तंभ क्र. १ X २ X ३ X ४ )** |
|---|---|---|---|---|---|
| | **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| माळी | ६४ | ४५२.०० | २६ | १२ | रु.९०,२५,५३६/- |
| मजूर | ८८ | ४२३.०० | २६ | १२ | रु.१,१६,१३,८८८/- |
| सुरक्षा रक्षक | ६४ | २१,८४३ | | १२ | रु.१,६७,७५,४२४/- |
| | | | | **एकूण** | **रु.३,७४,१४,८४८/-** |

| **आर्थिक वर्ष** | **१० टक्के वाढ ग्राहय धरुन अपेक्षित खर्च** |
|---|---|
| २०१८-१९ | रु.३,७४,१४,८४८/- |
| २०१९-२० | रु.४,११,५६,३३३/- |
| २०२०-२०२१ | रु.४,५२,७१,९६६/- |
| २०२१-२०२२ | रु.४,९७,९९,१६३/- |
| **एकूण** | **रु.१७,३६,४२,३१०/-** |

तरी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र.१ ते ४ मधील उद्यानामध्ये मजूर, माळी व सुरक्षारक्षक पुढील ४ वर्षाकरीता पुरविणे या कामाची निविदा कार्यवाही करावयाची आहे. निविदा सादर करणा-या निविदाकाराने सुरक्षा रक्षक हे शासन निर्णय क्र.एसजीए – १५०६/प्र.क्र.९९/काम-५ दिनांक ८ नोव्हेंबर,२००६अन्वये सुरक्षा मंडळ, मुंबई यांचेकडून मागविणे बंधनकारक राहणार आहे.

तरी सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकरीता स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ८३** **दिनांकः– २९/१/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

ही स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेअंती उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील उदयानांची निगा राखणे करीता ६४ माळी, ८८ मजूर, ६४ पहारेकरी पुढील ४ वर्षाकरीता पुरविणे या कामासाठी खालील अटी व शर्ती सहीत निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

१. संस्था व्हीटीपी मान्यता प्राप्त असावी.
२. उदयानाचे देखभाल / दुरुस्ती केल्याचा अनुभव असावा.

३. ईपीएफ आणि उदयोग आधार नोंदणी (शासन मान्य) असणे आवश्यक आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १२ :— प्रभाग क्षेत्र क्र. ०१ अंतर्गत उल्हासनगर शहरातील उद्यानांचे सुशोभिकरण करणेच्या कामाच्या प्रस्तावाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे.**

———————————————————————————————————————————

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा प्रस्ताव सुध्दा आता दिलेल्या अटी व शर्तीसह इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा. बाकी सांगा ठरावाबाबत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**ठरावात काही नाही फक्त माझ्या येथे बोटक्लब जवळ एक उदयान टाकायचे आहे.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे, पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १२ :—** प्रभाग क्षेत्र क्र. ०१ अंतर्गत उल्हासनगर शहरातील उद्यानांचे सुशोभिकरण करणेच्या कामाच्या प्रस्तावाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

जागतिक तापमानातील वाढ, हवामान आणि ऋतू बदल याची दाहकता आणि तिव्रता कमी करण्यासाठी व पर्यावरणाचे संतुलन राखणेकरीता शहरात वेळोवेळी वृक्ष लागवड करण्यात येते.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या आराखडयामध्ये उल्हासनगर शहराचा हरित क्षेत्र विकास प्रकल्पामध्ये समावेश असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे हरित क्षेत्र विकास प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु आहे. तथापी, शहरातील उद्यानांची स्थिती खराब झाली आहे. वर्ष २०१६ पासून महाराष्ट्र शासनातर्फे दरवर्षी १ जुलै रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला जातो. शासनाने उल्हासनगर शहरास ठरवून दिलेले वृक्षारोपणाचे उद्दीष्ट पूर्ण करावे लागते. या सर्व शासनाच्या धडक कार्यक्रमांकरीता शहरातील उद्याने सुस्थित असणे आवश्यक आहे. उद्यानांमुळे शहराच्या सौंदर्यीकरणात मोठया प्रमाणात भर पडत असते.

त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्रभाग क्षेत्र निहाय शहरातील उद्यानांचे सुशोभिकरण करणेकरीता प्राकलने तयार करण्यात आली आहेत.

प्रभाग क्षेत्र क्र. **०१** अंतर्गत एकूण १५ उद्याने आहेत. त्यातील नुतनीकरणाची आवश्यकता असलेल्या खालील उद्यानांचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत.

| **अ. क्र.** | **प्रभाग क्र.** | **लेखाशिर्ष** | **कामाचे नाव** | **प्राकलनिय किंमत** |
|---|---|---|---|---|
| १ | १ | उद्यानाची देखभाल /दुरुस्ती | उल्हासनगर १, धोबीघाट येथील बाल शिवाजी उद्यान | ११,६०,०००/- |
| २ | ३ | | उल्हासनगर १, आराधना अर्पाटमेंट मागील, बॅ .क्र.४१५-१६ जवळील नामोमल उद्यान. | ९,२२,८००/- |
| ३ | ४ | | उल्हासनगर ३ येथील सी ब्लॉक रोड, शिवनयना अर्पाटमेंट जवळील उद्यान | ८,९५,६६०/- |
| ४ | ५ | | उल्हासनगर १, गोल मैदान येथील साधू वासवाणी उद्यान | ३७,५०,०००/- |
| | | | **एकूण** | **६७,२८,४६०/-** |

वरील एकूण ०४ उद्यानांचे सुशोभिकरण करणेकरीता रु. ६७,२८,४६०/- एवढया खर्चाचे प्राकलने तयार करण्यात आले आहेत. तरी सदर कामांचे प्राकलनांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ८४ **दिनांकः—** २९/१/२०१८

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्षेत्र क्र. ०१ अंतर्गत एकुण ०४ उदयानांचे सुशोभिकरण करणेकरीता रुपये ६७,२८,४६०/— एवढया खर्चाचे प्राकलनास व सदर कामाची खालील अटी व शर्ती सहीत निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

१. संस्था व्हीटीपी मान्यता प्राप्त असावी.
२. दयानाचे देखभाल / दुरुस्ती केल्याचा अनुभव असावा.
३ .ईपीएफ आणि उदयोग आधार नोंदणी (शासन मान्य) असणे आवश्यक आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १३ :— प्रभाग क्षेत्र क्र. ०२ अंतर्गत उल्हासनगर शहरातील उद्यानांचे सुशोभिकरण करणेच्या कामाच्या प्रस्तावाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणे.**

———————————————————————————————————————————

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा सुध्दा विषय पास, अटी व शर्तीसह, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**बोटक्लब येथिल टाका ना.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**होय बोटक्लब घ्या ना.

**आयुक्त,श्री. राजेंद्र निंबाळकर :—**बोटक्लबचा आहे, तो आपण व्यापक विषय करणार आहोत, बीओटी तत्वावर होवु शकते का ते आपण पाहत आहोत. पुर्वी २०—२५ वर्षापुर्वी चालायचे, बोटींग वगैरे आणता येईल काय हे ब—याच जणांचे इमोशनल, विशेष आहे, आपण जनरली चर्चा केली तर. बोटक्लबला पुन्हा त्या स्वरुपात प्रेझेंट करता येईल का ते पाहु या.  बीओटी तत्वावर पुण्यात काही तळी वगैरे आहेत ती लोकांनी ३० वर्षासाठी चालवायला दिली ाआहेत. तेथे स्टॉल लावायला थोडासा एफएसआय वापरायला ३० वर्षासाठी जर दिले तर आपल्या खिश्यातुन एकही पैसा खर्च न करता...

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मी सांगितले होते साहेब, हे बीओटीवर देण्यासाठी ९८ पासुन प्रयत्नशील होतो. कोणी म्हणते आपली जागा नाही, याबाबत काही निविदा सुध्दा केल्या मी जेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागाचा सभापती होतो तेव्हा टाउनहॉल बनविले, स्विमींग पुल केले. बोटक्लबबाबत सुध्दा प्रयत्न केले.  हे पहिल्यांदाच असे झाले हया दोन गोष्टी माझ्या वेळेस झाल्या. आम्ही याबाबत प्रयत्न केल्यानंतर सफल झालो नाही कारण जागा आपली नाही.  असे करत करत आम्ही २० वर्ष गमविले व शहरातील लोकांना काहीच देवु शकलो नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**बोटक्लबबाबत शॉर्टटर्म असो, लॉगटर्म असो. थोडे दिवस चांगले दिसत परत तसेच होईल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**बीओटीवर दया.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आपण ते बीओटीवर करु. ही मालमत्ता आपल्या नावावर आहेच नाही.  तर उदया कोणी येवुन यावर हरकत घेईल.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**प्रांत कार्यालयमुळे आपला त्यावेळी काम थांबले. प्रांत कार्यालयाने सांगितले होते की आपली मालमत्ता नाही आपण निविदा नाही करु शकत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**या विषयाबाबत मी अभ्यास करतो.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**साहेब, यास आपण प्रायोरिटीवर घेतलात तर ही शहरासाठी चांगली वास्तु आहे. भलेही बीओटीवर करा आम्ही तयार आहोत पण लवकर झाले पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे, रिव्हेन्यु ऑथरीटीज आम्ही प्रायोरिटीवर घेवुन करतो.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**पास, इतिवृत्ताची वाट न पाहता तसेच वर दिलेल्या अटी व शर्तीसहीत पास.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**आता श्रीमती कविता पंजाबी यांनी सांगितले आहे की ९०२ या उदयानाचा सुध्दा उल्लेख केला जावा.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता :—**आता १७ उदयान दिले आहेत.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>**श्रीमती कविता पंजाबी यांनी तब्येत बरी नाही म्हणुन त्यांनी मला सांगितले.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**हे प्रायोरिटीवर घ्या.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**आजपर्यंत जे बनले नाही ते आले आहे यादीमध्ये सी—१४, आजपर्यंत एक झाड सुध्दा लावले नाही.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>**बॅरेक नं. ९०२ चे गार्डन येथिल आदेश देण्यात यावे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**३ नंबर प्रभाग समितीमध्ये १७ लाख ९४ हजार ७४० चा खर्च दिलेला आहे, यात काही ३ लाखाचे स्व. आनंद दिघे गार्डन आहे. ३ लाखाचे कल्व्हर्ट व बाकीचे काम जर केले यामध्ये कुठेतरी बायफरकेशन करुन, कोठेतरी कमी करुन ते ३ लाखाचे यामध्ये करा.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**जे श्री. सुर्वे साहेब सांगत आहेत ते करुन टाका.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**ती रक्कम समाविष्ट करा ३ नंबर प्रभाग समितीमध्ये. जास्त अमाउंट आहे साहेब, एक ३ लाखाचे आहे व यापेक्षा कमी सुध्दा होईल.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>**३ लाखाचे काय आयटम आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**जसे कलर आहे, झाडे आहेत, बॅचेस आहे, ३ लाखाचे मी अंदाजे सांगत आहे. १ लाखामध्ये सुध्दा होवु शकते असे काही नाही.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**कशातपण १—२ लाख कमी करुन किंवा वाढवु करुन करा.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**१० टक्के वाढवुन होवुन जाईल ना.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**यामध्ये अटी व शर्तीसह इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास……

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १३ :— प्रभाग क्षेत्र क्र. ०२ अंतर्गत उल्हासनगर शहरातील उद्यानांचे सुशोभिकरण करणेच्या कामाच्या प्रस्तावाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणे.**

**<u>प्रस्तावना</u>**

जागतिक तापमानातील वाढ, हवामान आणि ऋतू बदल याची दाहकता आणि तिव्रता कमी करण्यासाठी व पर्यावरणाचे संतुलन राखणेकरीता शहरात वेळोवेळी वृक्ष लागवड करण्यात येते.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या आराखडयामध्ये उल्हासनगर शहराचा हरित क्षेत्र विकास प्रकल्पामध्ये समावेश असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे हरित क्षेत्र विकास प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु आहे. तथापी, शहरातील उद्यानांची स्थिती खराब झाली आहे. वर्ष २०१६ पासून महाराष्ट्र शासनातर्फे दरवर्षी १ जुलै रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला जातो. शासनाने उल्हासनगर शहरास ठरवून दिलेले वृक्षारोपणाचे उद्दीष्ट पूर्ण करावे लागते. या सर्व शासनाच्या धडक कार्यक्रमांकरीता शहरातील उद्याने सुस्थित असणे आवश्यक आहे. उद्यानांमुळे शहराच्या सौंदर्यीकरणात मोठया प्रमाणात भर पडत असते.

त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्रभाग क्षेत्र निहाय शहरातील उद्यानांचे सुशोभिकरण करणेकरीता प्राकलने तयार करण्यात आली आहेत.

प्रभाग क्षेत्र क्र. **०२** अंतर्गत एकूण १२ उद्याने आहेत. त्यातील नुतनीकरणाची आवश्यकता असलेल्या खालील उद्यानांचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत.

| अ. क्र. | प्रभाग क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | ६ | उद्यानाची देखभाल /दुरुस्ती | उल्हासनगर-२ येथील नाना नानी उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | २२,००,०००/- |
| २ | ६ | | उल्हासनगर – २ येथील यात्री निवास उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | ५,००,०००/- |
| ३ | ६ | | उल्हासनगर-२ मधील नगरन्युज वर्तमानपत्र कार्यालयाचे जवळील इंदिरा गांधी उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | ५,००,०००/- |
| ४ | ८ | | उल्हासनगर-२ मधील रामरख्यानी उद्यानाचे सौंदर्यीकरण करणे. | १५,००,०००/- |
| ५ | ११ | | उल्हासनगर-३ येथील दसेरा मैदान येथील इंदिरा गांधी उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | २३,००,०००/- |
| ६ | ११ | | उल्हासनगर-३ मधील बॅरक नं.१००४ जवळील उद्यान | ५,००,०००/- |
| | | | **एकूण** | **७५,००,०००/-** |

वरील एकूण ०६ उद्यानांचे सुशोभिकरण करणेकरीता रु. ७५,००,०००/- एवढया खर्चाचे प्राकलने तयार करण्यात आले आहेत. तरी सदर कामांचे प्राकलनांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ८५ दिनांक:—२९/१/२०१८

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्षेत्र क्र. ०२ अंतर्गत एकुण ०६ उदयानांचे सुशोभिकरण करणेकरीता रुपये ७५,००,०००/— एवढया खर्चाचे प्राकलनास व सदर कामाची खालील अटी व शर्ती सहीत निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

१. संस्था व्हीटीपी मान्यता प्राप्त असावी.
२. उदयानाचे देखभाल / दुरुस्ती केल्याचा अनुभव असावा.
३. ईपीएफ आणि उदयोग आधार नोंदणी (शासन मान्य) असणे आवश्यक आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १४ :— प्रभाग क्षेत्र क्र. ०३ अंतर्गत उल्हासनगर शहरातील उद्यानांचे सुशोभिकरण करणेच्या कामाच्या प्रस्तावाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणे.**

———————————————————————————————————————

**सदस्य श्री. भारत राजवानी:—**यादीमधील सी—१४ आहे आजपर्यंत तेथिल गार्डन आजपर्यंत विकसित झाले नाही. यास सुध्दा यामध्ये घेतले जावे, विकसित करण्याकरीता.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**यावर्षाच्या बजेटमध्ये घेतले आहे. यावर्षी ४ कोटी होते पुढील वर्षी ६ कोटी टाकले आहे उदयानांसाठी. तर पुढील वर्षी आणखीन ६—२५ गार्डन होवु शकतात.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**तर पुढील वर्षी प्रायोटिवर यास घेतले जावे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**पुढील वर्षी एप्रिल नंतर लगेच घेवु.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**ठिक आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यामध्ये ग्रीनस्पेसमध्ये सुध्दा जसे श्री. भारत राजवानी यांनी सांगितले तर ग्रीनस्पेसमध्ये सुध्दा झाड लावणे सुरुवात केली पाहिजे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**आपणांस एक विनंती आहे, संपुर्ण ३ नंबरमध्ये इंदिरा गांधी व सपना गार्डन असे दोनच उदयान आहेत. आमच्याकडे एक चार एकरचा प्लाट पडून आहे, आम्ही तो मालकी हक्कासाठी तीन चार वर्षापासुन वाट पाहत आहोत. आपल्याशिवाय ते कोणीच करु शकत नाही तर आपणांस विनंती आहे की, आपण ते पहावे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**साहेब, ९६ मध्ये जेव्हा महानगरपालिकेस पाणीपुरवठा विभागाच्या एमजीपीने हॅण्डओव्हर केली, ती सर्व मालमत्तेंसोबत हॅण्डओव्हर केली होती. परंतु आता असे झाले आहे की एमजीपी सर्व मालमत्तांवर आपला दावा करते. जसे कुर्ला कॅम्प येथिल प्लाट आहे मुख्य रस्त्यावर. स्मशानभुमीजवळ सुध्दा एक आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**माझ्या प्रभागामध्ये एक वॉटर सप्लाय क्वार्टस आहे. ते सुध्दा असेच पडुन आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**मी तेच म्हणत आहे. तर एममजीपीने हॅण्डओव्हर केली, ती सर्व मालमत्तेंसोबत हॅण्डओव्हर केली होती. त्यात काही क्वार्टस आहेत काही जीएसआर बनविले आहे किंवा काही असेल त्याचा आम्हांस खुलासा पाहिजे की पुर्वी त्याची परिस्थिती काय होती, त्यांनी काय हॅण्डओव्हर केले आहे आणि काय नाही केले आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**मालमत्तावाले सांगतील ना.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**नाही, पाणी पुरवठावाले सांगतील.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**नाही, हे बरोबर नाही, हा विषय मी डिफर करायला लावतो.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**श्री. सेलवन कोठे आहेत, त्यांनी हा विषय सांगावा.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**एमजीपीने डिसेंबर ९५ ला संपुर्ण पाणी पुरवठा दिले व त्यानंतर संपुर्ण मालमत्ता हॅण्डओव्हर केले होते. ९६ ला आपल्या ताब्यात दिले.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**नविन महानगरपालिका होती.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**नाही.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**नाही, त्यावेळी नगरपालिका होती.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**होय, त्यावेळी ९५ मध्ये आम्हीच सदस्य होतो. नगरपालिका होती. तर त्यावेळी आपणाकडे दिली होती, आता काय झाले आहे की, काही मालमत्ता आपणांस डेव्हलोप करता येत नाही आणि तेथे अक्षरशः घाण आहे. स्वच्छ भारत अभियानाचा उद्देश तो पुर्ण होत नाही. एक आनंदनगरला आहे, एक कुर्ला कॅम्पला आहे आणि एक नेताजी गार्डन जवळ आहे. म्हणजे महापौर बंगला, आयुक्त बंगला असे तेथे बनु शकते. अशा ज्या जागा आहेत, त्या अजुनही त्यांच्या ताब्यात आहेत त्या आपण घेत नाहीत. किंवा आपल्याला दिल्या आपण घेतल्या नाहीत. तर त्याबाबत त्या मालमत्ता आपणाकडे आहेत की नाहीत असा खुलासा श्री. सेलवन साहेबांनी केला तर बरे होईल.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**मी पाणी पुरवठाच्या जागा ताब्यात घेण्यासाठी सांगा.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**साहेब ते महाराष्ट्र शासनाकडुन स्कीम होती ८५ मध्ये ती आपणाकडे हॅण्डओव्हर झाली होती. वॉटर टॅक, पाण्याची टाकी वगैरे आपणाकडे हॅण्डओव्हर झालेले आहे. त्यांच्या मालकीच्या असलेल्या त्या जागा आहेत, क्वार्टर्स आहेत. त्या शासकीय जागा आहेत त्यांच्यापैकी कुठल्याही जागा आपणाकडे हस्तांतर केलेल्या नाहीत साहेब, त्यांच्याकडे राईट्स आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**तुम्ही त्यांना विनंती तर करा, तुम्ही तरी पाठवा हा विषय.

**श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :—**साहेब, आम्ही पाठविले होते तसे पत्र की शासकिय जमिन आम्हांला लागणार ते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**शासनाच्या धोरणानुसार ती मालमत्ता महापालिकेस हॅण्डओव्हर झाली पाहिजे. आपणाकडे सुध्दा जी आर आहे आणि आपणाकडे सुध्दा आहे. त्या धारेणानुसार आपल्या ताब्यात मालमत्ता घ्या,त्याचा आपण आपल्या हिशोबाने वापर करु. कोठे मालमत्ता बांधायच्या आहेत, कोठे जीएसआर बांधयचा आहे, कोठे ईएसआर बांधायचे आहे. किंवा महापौर व उप—महापौर यांचा बंगला बनविण्यात यावा. हे आपण नंतर विचार करु प्रथम ती मालमत्ता हॅण्डओव्हर तर घ्या.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**साहेब, आनंदनगर येथे कमीत कमी २५ प्लॅट बनविले आहेत. तेथे बरेच अधिकारी राहिले आहे, श्री. जवादे साहेब राहत होते. श्री. सेलवन आपणांस सुध्दा माहित असेल. एवढी पक्की इमारत आहे आज तेथे अड्डा बनला आहे. गैरप्रकार चालत आहेत. संपुर्ण एरिया येथे दोन वॉचमन सक्षम नाहीत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**बोटक्लबाबत एसडीओ यांनी हरकत घेतली होती, ती रिजर्व आहे आणि ८५ मध्ये हॅण्डओव्हर केली आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**८७ मध्ये.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**होय ८७ मध्ये हॅण्डओव्हर केली आहे. संबंधीत विभागाचे काम आहे, त्यांची डयुटी आहे. आपण कंसल्टंट अपॉइंट करु या एक एक मालमत्तेसाठी.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आहे का कोणी तुमच्या लक्षात.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**देतो ना साहेब.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**एखादा रिटायर एसडीओ, तलाठी नेमा, श्री. खिसमतराव आहे ना.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे. आपण अपॉइंट करुन टाकु.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**श्री. खिसमतराव अंबरनाथला आहे. मी सांगतो दुसरा.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**कुर्ला कॅम्पच्या मालमत्तेवर भुमाफियांची नजर आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**काय आहे साहेब, आता मालमत्ता आपल्या ताब्यात आहेत. फक्त आपल्या नावावर नाही आहे. एखादी जर दुर्घटना घडली तिथे तर जबाबदार आपण धरले जावु. तेथे फक्त दोन वॉचमन आहेत, तेथे जर वाईट दुर्घटना घडली ना तर महापालिकेबरोबर आपले सर्वांचे नाव खराब होईल. जेवढे लवकरात लवकर होईल तेवढया लवकर कंसल्टंट नेमा.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**होय, लवकर कंसल्टंट नेमा. वर दिलेल्या अटी, शर्तीसह दया.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**हा विषय आता पारीत करा, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता.

**<u>महापालिका सचिव :—</u>**पास?

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**☑विषय क्र. १४ :— प्रभाग क्षेत्र क्र. ०३ अंतर्गत उल्हासनगर शहरातील उद्यानांचे सुशोभिकरण करणेच्या कामाच्या प्रस्तावाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणे.**

**<u>प्रस्तावना</u>**

_जागतिक तापमानातील वाढ, हवामान आणि ऋतू बदल याची दाहकता आणि तिव्रता कमी करण्यासाठी व पर्यावरणाचे संतुलन राखणेकरीता शहरात वेळोवेळी वृक्ष लागवड करण्यात येते.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या आराखडयामध्ये उल्हासनगर शहराचा हरित क्षेत्र विकास प्रकल्पामध्ये समावेश असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे हरित क्षेत्र विकास प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु आहे. तथापी, शहरातील उद्यानांची स्थिती खराब झाली आहे. वर्ष २०१६ पासून महाराष्ट्र शासनातर्फे दरवर्षी १ जुलै रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला जातो. शासनाने उल्हासनगर शहरास ठरवून दिलेले वृक्षारोपणाचे उद्दीष्ट पूर्ण करावे लागते. या सर्व शासनाच्या धडक कार्यक्रमांकरीता शहरातील उद्याने सुस्थित असणे आवश्यक आहे. उद्यानांमुळे शहराच्या सौंदर्यीकरणात मोठया प्रमाणात भर पडत असते.

त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्रभाग क्षेत्र निहाय शहरातील उद्यानांचे सुशोभिकरण करणेकरीता प्राकलने तयार करण्यात आली आहेत.

प्रभाग क्षेत्र क्र. **०३** अंतर्गत एकूण १९ उद्याने आहेत. त्यातील नुतनीकरणाची आवश्यकता असलेल्या खालील उद्यानांचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत.

| अ. क्र. | प्रभाग क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | ९ | उद्यानाची देखभाल /दुरुस्ती | उल्हासनगर-३ येथील राजीव गांधी उद्यानातील लहान मुलांचे बगीच्याचे सुशोभिकरण करणे. | १५,००,०००/- |
| २ | १० | | उल्हासनगर-३ येथील विठ्ठलवाडी परिसरातील सोनावणे उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | १०,००,०००/- |
| ३ | १५ | | उल्हासनगर-४ येथील गगन बालानी यांचे घराजवळ, बॅरेक नं.१५७९ जवळील उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | १०,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | १६ | | उल्हासनगर-५ येथील स्वामी बोधराज उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | २९,९४,७४०/- |
| ५ | १६ | | उल्हासनगर-४ येथील सहयाद्रीनगर येथील उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | ६,००,०००/- |
| | | | **एकूण** | **७०,९४,७४०/-** |

वरील एकूण ०५ उद्यानांचे सुशोभिकरण करणेकरीता रु. ७०,९४,७४०/- एवढया खर्चाचे प्राकलने तयार करण्यात आले आहेत. तरी सदर कामांचे प्राकलनांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ८६** **दिनांकः— २९/१/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्षेत्र क्र. ०३ अंतर्गत एकुण ०५ उदयानांचे सुशोभिकरण करणेकरीता रुपये ७०,९४,७४०/— एवढया खर्चाचे प्राकलनास व सदर कामाची खालील अटी व शर्ती सहीत निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

१. संस्था व्हीटीपी मान्यता प्राप्त असावी.
२. उदयानाचे देखभाल / दुरुस्ती केल्याचा अनुभव असावा.
३. ईपीएफ आणि उदयोग आधार नोंदणी (शासन मान्य) असणे आवश्यक आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५ :— प्रभाग क्षेत्र क्र. ०४ अंतर्गत उल्हासनगर शहरातील उद्यानांचे सुशोभिकरण करणेच्या कामाच्या प्रस्तावाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणे.**

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**यामध्ये सुध्दा अटी व शर्तीसह इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**काही सदस्य :–**पास–पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**☑विषय क्र. १५ :– प्रभाग क्षेत्र क्र. ०४ अंतर्गत उल्हासनगर शहरातील उद्यानांचे सुशोभिकरण करणेच्या कामाच्या प्रस्तावाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणे**

**प्रस्तावना**

जागतिक तापमानातील वाढ, हवामान आणि ऋतू बदल याची दाहकता आणि तिव्रता कमी करण्यासाठी व पर्यावरणाचे संतुलन राखणेकरीता शहरात वेळोवेळी वृक्ष लागवड करण्यात येते.

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या आराखडयामध्ये उल्हासनगर शहराचा हरित क्षेत्र विकास प्रकल्पामध्ये समावेश असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे हरित क्षेत्र विकास प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु आहे. तथापी, शहरातील उद्यानांची स्थिती खराब झाली आहे. वर्ष २०१६ पासून महाराष्ट्र शासनातर्फे दरवर्षी १ जुलै रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला जातो. शासनाने उल्हासनगर शहरास ठरवून दिलेले वृक्षारोपणाचे उद्दीष्ट पूर्ण करावे लागते. या सर्व शासनाच्या धडक कार्यक्रमांकरीता शहरातील उद्याने सुस्थित असणे आवश्यक आहे. उद्यानांमुळे शहराच्या सौंदर्यीकरणात मोठया प्रमाणात भर पडत असते.

त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्रभाग क्षेत्र निहाय शहरातील उद्यानांचे सुशोभिकरण करणेकरीता प्राकलने तयार करण्यात आली आहेत.

प्रभाग क्षेत्र क्र. **०४** अंतर्गत एकूण १७ उद्याने आहेत. त्यातील नुतनीकरणाची आवश्यकता असलेल्या खालील उद्यानांचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत.

| अ. क्र. | प्रभाग क्र. | लेखाशिर्ष | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | १९ | उद्यानाची देखभाल /दुरुस्ती | उल्हासनगर ५, येथील जय झुलेलाल उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | १०,२९,९००/- |
| २ | १८ | | उल्हासनगर ५ कुर्ला कॅम्प परिसरातील तीन उद्यानांचे सुशोभिकरण करणे. | २०,०४,७००/- |
| ३ | १३ | | उल्हासनगर-४ येथील लालचक्की परिसरातील पाणी पुरवठा कार्यालयाजवळील उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | १२,४८,२००/- |
| ४ | १७ | | उल्हासनगर ५, येथील शांती प्रकाश उद्यान | २६,८५,५००/- |
| | | | **एकूण** | **६९,६८,३००/-** |

वरील एकूण ०४ उद्यानांचे सुशोभिकरण करणेकरीता रु. ६९,६८,३००/- एवढया खर्चाचे प्राकलने तयार करण्यात आले आहेत. तरी सदर कामांचे प्राकलनांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ८७ **दिनांक:– २९/१/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्षेत्र क्र. ०४ अंतर्गत एकुण ०४ उदयानांचे सुशोभिकरण करणेकरीता रुपये ६९,६८,३००/– एवढया खर्चाचे प्राकलनास व सदर कामाची खालील अटी व शर्ती सहीत निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

१. संस्था व्हीटीपी मान्यता प्राप्त असावी.
२. उदयानाचे देखभाल / दुरुस्ती केल्याचा अनुभव असावा.
३. ईपीएफ आणि उदयोग आधार नोंदणी (शासन मान्य) असणे आवश्यक आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

➪ **विषय क्र. १६ :–** वर्ष २०१७–१८ मध्ये पावसाळयापूर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाच्या सुधारीत प्राकलनास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता मिळणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**साहेब, टाईमबॉण्ड पाहिजे. त्या टाईमबॉण्ड प्रोग्राममध्ये काय झाले. जे प्राकलन होते तर माझ्याकडे एकही कण, थेंब डांबराचा आला नाही. यााला कारणे काय हा खुलासा आला पाहिजे. काम करणार आहेत की नाही नेमके काय? दर वेळेस अधिका–यास प्राकलन दाखवायचे, ते पास करायचे आणि ते झाल्यानंतर सुध्दा त्याचे एकही काम झाले असे नाही.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**काम होतच नाही.

**सदस्या श्रीमती डिंम्पल ठाकुर :–**माझ्या प्रभागात सुध्दा झाले नाही.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**अर्धे बीएम केले होते, ते निघुन गेले. एक एक महिना आपले अभियंते येत नाहीत, संपुर्ण महिनाभर त्यांना बोलुन बोलुन थकलो.

**श्री. जितु चोईथानी, उप अभियंता:—**ओटीपासुन ते पिंटो पार्कपर्यंत काम पुर्ण केले आहे, आपण म्हणता पुर्ण केले नाही तर कसे?

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**आयुक्त महोदयांना सुध्दा मी विनंती केली होती. आपले काम आज सुध्दा होते ना.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**अहो, रात्री पाउस पडला ना.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**ते म्हणता ट्रेंज पट्टी आम्ही नाही करणार. पिंटो पार्क येथे आपण बीएम किती केले व एसी किती केले, आपण आयुक्त महोदयांना घेवुन चला ना.

**सदस्य श्री. राम जैसवार, शहर अभियंता:—**संपुर्ण स्पिडमध्ये काम केले, तेथिल पुल खुप खराब होता.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**पुर्ण स्पीडमध्ये काम केले तर कोठे कोठे काम झाले ते सांगावे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**आयुक्त साहेब सांगतील ना.

**सदस्या श्रीमती डिंम्पल ठाकुर:—**काम झाले नाही, माझ्या प्रभागात सुध्दा अर्ध्यातच काम झाले आहे.

**सदस्य श्री.भारत राजवानी :—**होय, ब—याच ठिकाणी अर्धे काम झाले आहे, अर्धे झालेच नाहीत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**५० टक्के काम झाले आहे, ५० टक्के बाकी आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**२०१५ पासुन बीएम व एसीचे असेच काम अडकुन पडले आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**फ्रॉड झाला आहे, ती चौकशी व्हावी प्रथम. साहेब, पाटोल्स भरण्याकामी डांबराचा एक कण आला नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**हा पाटोल्सचा विषय आपण नंतर ठेवला सभेत तर बरे होईल. मी जी माहिती मागितली ती जोपर्यंत येणार नाही तोपर्यंत याबाबत मी काहीच बोलणार नाही.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**आभारी आहे साहेब.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**हा विषय उदया घेवु या.

**सदस्य श्री. सुनिल सर्वे:—**पाटोल्सचा हा विषय आपण पहा, की प्रभाग समिती १ मध्ये किती आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**६१ रस्ते जे आपण घेतले होते त्याची मुळ प्राकलन काय होते, आणि आता रिवाईज्ड प्राकलन काय आहे, गॅप कितीचा आहे, ती माहिती काढायला सांगितली आहे. काही माहिती दोन प्रभांगाची झाली आणि दोन प्रभागांची राहिली आहे, ती झाल्याशिवाय आणि मी तुम्हांला प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यात असल्याशिवाय चर्चा करु शकत नाही.

**सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी:—**जेव्हा या स्थायी समितीमध्ये पाटोल्सचा विषय आला होता, जेव्हा आपण व सदस्य सुध्दा बसले होते. त्यावेळी श्री. राजेश वदारिया व आम्ही सर्व बसलो होतो. श्री. चौधरी यांनी सुध्दा दिले होते की माझ्या प्रभागातील हे टाकले नाही, ते टाकले नाही. आपले प्रत्येक अभियंत्यांनी सांगितले की एक रुपयाचे सुध्दा एस्टीमेट वाढणार नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**त्याचे उत्तर असे आहे की ते एस्टीमेट फक्त पाटोल्सचे होते. १, २ मध्ये त्यांच्याकडुन काम करुन घेतले जात आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**ठेकेदाराकडुन काम करुन घेण्याची जबाबदारी कोणाची आहे? आपण जर पाटोल्सचे करत आहात तर पाटोल्सच भरा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**ठिक आहे आता जसे साहेबांनी सांगितले, कोणते रस्ते भरायचे आहेत, कोणकोणते झाले यादी जरा सांगा.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**ते सांगा जरा माहित तर पडेल.

**श्री. जितु चोईथानी, उप अभियंता:—**यांच्या प्रभागातील एरिया सर्व झाला. श्रीराम ते व्हीटीसी येथिल सर्व.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आणखी कोणता?

**श्री. जितु चोईथानी, उप अभियंता:—**हिरापुरी चौक, धोबीघाट रोड, अमरधाम चौक वगैरे. आम्ही जे बॅलेंस होते ते रिवाईज्ड मध्ये घेतले आहे.

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता:—**श्रीराम ते व्हीटीसी जवळजवळ पुर्ण झाले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**किती लोड टाकला, फुल विडमध्ये केले काय?

**सदस्य श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता:—**फुल विडथृमध्ये केले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आपण बोलता फुल विडथृमध्ये केले कोणाचा काही प्रेशर होता का?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर** :—म्हणुन मी एकुण एक रस्त्याची माहिती मागितली आहे. मी स्वत:च खात्रीकारक नाही की एवढे कशामुळे वाढले.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**जर आपण पाटोल्सच्या जागी संपुर्ण रस्ता घेतला आहे, तर कोणी आपणांस जबरदस्ती केले ते नाव सुध्दा आले पाहिजे. आपण जर खड्डयांची एस्टीमेट बनविली तर संपुर्ण रस्ता का केला, कोणाच्या सांगण्यावरुन केला. आमच्यामधुन कोणी काही म्हटले नाही. आम्ही जेव्हा म्हणतो एस्टीमेट बरोबर नाही तर आपण म्हणता बरोबर आहे. आपण आपलीच चालवाल, आपणच रस्ता तयार करुन येणार. व खड्डयांमध्ये पैसे टाकणार. आपण नाव सांगा की कोणत्या नगरसेवकाने खड्डे न भरता संपुर्ण रस्ता तयार करण्यास सांगितला. की आपापल्या मर्जीने केले ती सुध्दा यादी घेवुन या.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**सांगा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**कोणी म्हटले नसेल की रस्ता बनवा, खड्डे आपण भरले नाही व आपल्या मनाने काही केले नाही. बसस्टॉप येथे संपुर्ण रस्ता बनला आहे. तेथे आपण फक्त पट्टा बनविला आहे साईडचा व बाकी सर्व सोडुन टाकले आहे. सर्व जागी उलटे काम केले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**तीन रस्त्याचा निर्णय घेतला आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**होय तर त्याचे एस्टिमेटच फुल बनविण्यात आले होते ना. नाली टु नाली पुर्ण करायची आहे त्याचे एस्टिमेट फुल बनविले होते मग कमी कसे झाले.

**सभापती, श्रीमती कांचन लुंड:—**प्रभाग समिती ३ मध्ये काम झाले नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**ही लोक घरी बसुन एस्टिमेट बनवितात. खेमाणीपासुन वरपर्यंत त्याचे आम्ही म्हटले होते, श्री. जितु यांना रस्त्यावर फिरविले देखील होते की नाली टु नाली धुल फ्री झाले पाहिजे. त्याचे एस्टिमेंटच तसे बनविले त्याचा वाढण्याचा संबंधच नाही.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**सुरुवातीला जे रस्ते टाकले ते झाले, तुम्हांला माहित आहे कुठले कुठले रस्ते टाकले ते.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**पावसाळयात जे रस्ते बनविले ते स्पष्ट नाही त्यास पिंचीस नाही केले. त्यांनी म्हटले होते की जे खराब मटेरियल आहे ते काढुन आपण चांगले मटेरियल टाकणार. अजुन काम झाले नाही. अचानक पावसात खराब झाले होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**पाटोल्सच्या जागी एण्ड टु एण्ड रस्ता का बनविला?

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आणि कोणी सांगितले?

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता:—**साहेब, तेथे मोठ मोठे पॅसेज होते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मोठ मोठी पॅसेज एस्टिमेटमध्ये नाही टाकले होते का?

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**रस्ता चांगला बनविणे हे कोणाचे काम आहे? नगरसेवकांचे आहे, जनतेचे आहे की प्रशासनाचे आहे? आपल्या अभियंत्याचे आहे ना. फक्त खड्डे भरणे म्हणजे डांबर टाकणे आहे का? वर्केबल झाले पाहिजे, लोकांना त्रास होता कामा नये. खड्डे चांगले झाले पाहिजे, त्यासाठी अमाउंट किती आहे ते तुम्ही सुचावयचे. त्यास मंजुरी आम्ही दयायची.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**आपण इतिवृत्ताची प्रत सुध्दा आणा. त्यावेळी आम्ही यांना म्हटले होते की एस्टिमेट बरोबर आहे का? तर ते हो म्हणाले की आम्ही हमी देतो, आमची जबाबदारी आहे की आम्ही भरुन देतो सर्व खड्डे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**आपले काम पुर्ण झाले असे आपले म्हणणे आहे आता हे नविन आणले ना आपण. बिल वगैरे बनले झाले का आपले?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**या विषयास आता प्रलंबित ठेवा. शेवटचा विषय घेवुन मग पाहु या यास काय करायचे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आपण ३ वर्षाची गॅरेंटी ठेवली त्यात १ वर्ष झाले आता किती गॅरेंटी आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आपण एक वर्षाची ठेवली.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आता पीएफ टाकले ते उखडले.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**बीएमला एसी नाही केले तर ते उखडणार ना.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**हलक्या पावसात ते खड्डे भरणे चालु केले.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा प्रलंबित ठेवा. पुढचा विषय वाचा, त्यात सुध्दा काही असेल तर पाहु या ना. विषय क्र. १६ ला प्रलंबित ठेवा व १७ विषय घ्या.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यास प्रलंबित ठेवा परंतु त्या आधी खेमाणीचा रस्ता जो आपण फुल विडथसाठी सांगितले होते. पहिली गोष्ट तर त्यास फुड विडथ् केली नाही, चार स्टेपस आहेत, त्यात एक मधोमध फार मोठा खड्डा आहे. तो अजुन बुजविला नाही. पाण्याचे लिकेज आहे तर ते प्रथम बंद केले पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**उदया आपण ते घेवु या. ओरीजनल एस्टिमेट काय होते रिवाईज्ड एस्टिमेट जे मागविले आहे ते काय आहे, रस्ता पुर्ण आहे की नाही.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**साहेब, मुख्य रस्ता आहे नेताजी ते तहसिलदार कार्यालय साईटपट्टी आजपर्यंत घेतली नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**१७ नंबर विषय वाचा.

**महापालिका सचिव :—**आपण दोन विषय वाचले. आता आपण यास ॲडजॉन कसे करणार याबाबत काहीतरी निर्णय झाला पाहिजे ना. १७ विषय वाचला तर या विषयास उदया कसे प्रलंबित ठेवणार?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**वाचुन घेवुन चर्चा करुन मग ॲडजॉन करु या ना. हा १७ झाला ना की आपण प्रथम जो प्रलंबित ठेवला तो घेवु मग १६ नंबरचा घेवु.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**१६ नंबरचा डिफरच करु या ना.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**डिफर कुठे करत आहोत सभाच ॲडजॉन करत आहोत ना.

**महापालिका सचिव :—**आपण विषयावर निर्णय नाही घेवु शकत जर सभा ॲडजॉन करायची असेल तर.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**एक सांगा यांनी १७ नंबरचा विषय वाचला आणि तो चालत असतांना आपण सभा ॲडजॉन केली तर मग सभा ॲडजॉन नाही होणार का?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**दोन पेंडींग आहे तर सभा ॲडजॉन होणार ना.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**७,१६ व १७ हे ३ विषय प्रलंबित राहणार. आपण त्यावर निर्णय घेणार नाही. आधी आपण विषय वाचा मग पाहु या ना काय करायचे ते.

**महापालिका सचिवः—**ठिक आहे पुढचा विषय वाचुन दाखविते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**होय वाचा.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १७ :—** उल्हासनगर—३ येथिल वडोल गांव येथिल पुलाचे सुधारीत कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता मिळणे.

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मी चार दिवसांपुर्वी वडोल गाव येथे व्हिजीट करण्यास गेलो होतो. वडोल गाव येथे व्हिजीट केल्यानंतर तेथिल ठेकेदारास मी बोलाविले. तर आता येणा—या पावसापुर्वी ते वडोलगावच्या पुलाचे काम होणे अतिआवश्यक आहे. तसेच पाटोल्सची चुकीची एस्टिमेट बनवते मग रिवाईज्ड करतात, मग डबल काम वाढते तर मला यात सुध्दा शंका वाटत आहे. तेथिलि अभियंत्यास हे जास्त माहित आहे. ६ पार्ट पाणी वाहण्यासाठी बनविले आहे, जर पाउस पडला तर ६ जागेवरुन पाणी वाहणार. जर संपुर्ण ब्रिज बनेल तर आजची जी परिस्थिती आहे. तर फक्त तीन जागेवरुनच पाणी पास होईल, ३ जागेवरुन होणार नाही. त्याचे कारण काय आहे, मा. आयुक्त महोदय आपण तेथे जावे, कंसल्टंटला सुध्दा बोलवा. इंजिनिअर्सने सुध्दा जावे. ३ जागेवरुन जे पाणी निघणार, पाणी निघाल्यानंतर तेथे कच—याचा, मातीचा पहाड उभा आहे, तेथे हजारो गाडया, माती उचलण्यासाठी लागणार असा माझा अंदाज आहे, आणि जोपर्यंत ते क्लीन होत नाही, तर ते ब्रीज बनविण्याचा, जे सहा पार्ट बनविले आहे, त्याचा काहीच अर्थ राहत नाही. पाणी आल्यानंतर असा मार्ग करेल की परत त्या ३ जागेवरुनच पाणी जाईल, व ३ जागेवरुन जाणार नाही. ते पाणी ओव्हर फ्लो होईल व लोकांच्या घरात घुसणार. होवु शकते मी तांत्रिक दृष्टया चुकीचा असेल, आपण तेथे जा व सांगा आपले म्हणणे काय आहे. जर आपण त्या ६ पार्टवर ब्रिज जर बनविले तर तो मातीचा पहाड हटविणे फारच त्रासाचे होईल. गाडया, डंम्पर व जेसीबी जावु शकणार नाही. आजची परिस्थिती मी पाहुन आलो आहे तेथे आपण गाडया जेसीबी व डंम्पर लावुन तो कचरा आपण खाली करु शकतो. एक—दोन महिने लावले तर आपण तो टिला खालु करु शकतो. जर आपण दोन्ही बाजुंनी टिला जर खाली केला तर संरक्षण भिंत जे आपणांस मातीबरोबर उभी करावी लागेल व ती संरक्षण भिंत दोन्ही बाजुने उभ्या कराव्या लागतील. त्याचे एस्टिमेट बनले की नाही. कधी असे होता कामा नये की आपण २ कोटीचे बनविले, आज १ कोटी २० लाखाचे आणत आहोत. परत १ कोटी २० लाखाचे आणावे लागेल. मला तर असे माहित झाले की तेथिल जो कंसल्टंट आहे त्याने संपुर्ण टिला हटवुन संरक्षण भिंत लावुन ५ कोटीचे बनविले होते. तसेच जे पत्रकार आहेत, मिडीयावाले आहेत, वॉट्सअपवर सर्व आपल्या महापालिकेची बदनामी झाली. तर मी म्हणतो या प्राकलनास चांगल्याप्रकारे कंसल्टंट यांनी मिळुन भलेही चार दिवस, दहा दिवस लागो, परंतु योग्य प्रकारे बनविले पाहिजे. आयुक्त महोदय आपण तेथे जावुन भेट दिली तर अंबरनाथचा जो रस्ता मिळतो, जर आपण अंबरनाथवाल्यांना विनंती केली की ४० फुटचा रस्ता बनवा. तर दोन मिनिटात आपण उल्हासनगरला पोहोचणार व वडोल गाववाल्यांची सुध्दा सुविधा होईल. अंबरनाथवाल्यांना सुध्दा सांगु शकतो की आपला रस्ता बनवा व येथुन आपण आपला रस्ता बनवाल. तर फार मोठा चांगला प्रोजेक्ट बनु शकतो. माझी ही चांगली सूचना आहे. आपण ही सभा आता ॲडजॉन करणार आहोत. या विषयास मी यासाठीच सांगत होतो, उदयापर्यंत ही वेळ मिळेल त्यामध्ये आपले मा. आयुक्त महोदय, सर्व अधिकारी व सदस्य

जर गेलो आणि दोन चार कोटी खर्च होत असेल रस्त्यावर, संरक्षण भिंतीवर व वडोल गावावर खर्च होत असेल तर सुंदर प्रोजेक्ट तयार होणार. आपण तांत्रिक लोकांकडुन माहिती घ्या काय म्हणणे आहे त्यांचे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**आपण जेव्हा कंसल्टंट यांना बोलाविले होते, त्या माणसाने मला जे सांगितले, त्याबाबत मी आपणांस प्लान सुध्दा दिला होता. त्याची लॅण्डींग ब्रीज मध्ये जात आहे ना वडोलगाव येथे जात आहे जे आहे ते अभियंत्यांकडुन चेक करा, त्याची लॅण्डींग जी आहे ती चर्चमध्ये जात आहे व टुअर्स अंबरनाथ जात आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**याबाबत आपण स्थापत्य सल्लागार नेमला होता, आपल्या अभियंत्याचे काम आहे. अगोदर कंसल्टंट नोबेल जीओ होता आता दुसरा आहे. तर नोबेलला बदलले की त्यास काढले, ते काहीच स्पष्ट नाही.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—** या मध्ये काय होते,२४ मे रोजी साहेबांनी सभा घेतली होती.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**नोबेलला काढले आहे, त्यांनी जे सुपरविजन केले आहे ते उलट सुलट केले आहे. मी त्यावेळी पनवेलला होतो त्यामुळे हे सर्व झाले. त्यांना त्यावेळी नोटिस दिली त्यांचा कुठलाही रिर्पोट करेक्ट नव्हता, अ‍ॅक्युरेट नव्हता. त्यांच्या सहीचे रिपोर्ट होते. त्यांना चार वेळा समजुन सांगितले परंतु काही झाले नाही त्यामुळे त्यास काढले.

**सदस्य श्री. धनंजय बोडारेः—** बरोबर मला तेच सांगायचे आहे, जमनुजी सांगतात की, तिथे रीटेनींग वॉल बांधायला पाहीजे किंवा काय? श्री. टोनी सिरवानी सांगतात. स्थापत्य सल्लागार जिओ वाल्याला समजले नाही.तो जर चुकीचा असेल तर त्याला ब्लॅक लिस्टमध्ये टाका, त्यास पुन्हा येथे आणता कामा नये.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—:**तेथे अतिक्रमण सुध्दा होत आहे. झोपडी सुध्दा बनत आहे. तुम्ही जर टिला हटवला नाही तर तिथे अतिक्रमण होईल.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—** नोबेलवाल्याला मी वाचवत नाही, तो नोबेल ठेकेदार आमचे ऐकत नाही. आमच्याकडून डिझाईंग घेत नाही. आपण त्या ठेकेदारास फारच बोलले होते. त्या नोबेलवाल्यांनी उलट आपणांस सांगितले होते तो आमचे ऐकत नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आता श्री. जमनुजी यांनी सांगितले की, रिटनींगवाल बनवायला पाहीजे किंवा ठिला उचलला पाहिजे, जो जास्त आहे १२० चा जास्त एस्टिमेट सांगितला आहे. पहीले ५ करोडचा होता, ते बरोबर आहे. परंतु आपण हे समजायला पाहीजे की, काम तेथील लोकांना येण्या जाण्यासाठी सुविधा व्हावी त्या हिशोबाने पुलाचे एस्टिमेट बनवला होते. आपण फक्त पुलाच्याच कामाचे एस्टिमेट बनवला होता. आपल्याला तेथील टीला उचलायचा आहे आणि रिटनींग वॉल बनवायचा आहे. संरक्षण भिंत बांधली पाहिजे, तर त्याचे एक्स्ट्रा एस्टिमेट बनवायला पाहीजे. आपले एकाच जागेवर ५, ६ करोड खर्च करणार तर प्रायोडाईस करायला करायला लागेल. तेथील नाल्याचा प्रवाह तीन भागामध्ये जाणार तरी काही फरक होणार नाही. तर एक दोन दिवस या विषयाला...

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—:** जर होऊ शकते तर आपण काय करा? जे.सी.बी. प्रोकलेन आपले जे असतील तर ते कामाला लावा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—** यामध्ये मुळातच १ करोड, २० लाख वाढले आहे, ते पण रेकॉर्डवर यायला पाहीजेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**ठिक आहे, यासाठी मी सांगतो, की, योग्य पध्दतीने घ्या, अंबरनाथ कडून जो रोड येतो, व्हीजीट करा आणि फक्त लोकांना येण्या जाण्यासाठीच नाही तर संपुर्ण स्टेशनचा ....

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—** तो अंबरनाथ नगरपालिकेचा प्रॉब्लेम आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—** तो अंबरनाथ पालिकेला देवू.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—** तो रोड किती आहे, हे बघायला लागेल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–** ४० फुटाचा आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–** आहे का ४० फुट?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–** साहेब, आपण जी पण वेळ दयाल, बोडारे आपण पण चला, चौधरी साहेब, आपण पण चला, टोनीजी आयुक्त साहेबां बरोबर जाऊन सर्च करायला लागेल. तिन्ही विषय सोडून मिटींग स्थगित करू, मिटींग ३.०० वाजता आहे, तर आपण ४.०० वाजता मिटींग ठेवू. नाही नाही,२.०० वाजता ठेवू,

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–** सगळया कामांमध्ये किरकिर आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–** उद्या मिटींग २.०० वाजता ठेवा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–** ठिक आहे, यामध्ये कोटा वाढवून घ्या. एस्टिमेट बनवा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–** यामध्ये कोटयाचा इश्यु काय आहे? आपण कोटा जर आपला कमी आहेत तर आणि जेव्हा वाढवून दिला जातो, त्यावेळी ते डबल रेट लावतात.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–** ते बरोबर आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–** काय होते, ते पेनाल्टी लावतात.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–** २.०० वाजता मिटींग ठेवा, तो पर्यंत प्रयत्न करा,जेवढे होईल तेवढे, जेवढे होऊ शकते, तेवढे त्यांना तयार करायला बोलू शकतो? तीन दिवस सुट्टी होती, तीन दिवसामध्ये त्यांनी काहीच काम केले नाही साहेब.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:–**पहीले मिटींग पुढे चालवा. नंतर बघून काय होते?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–** तुम्ही तुमच्या मर्जीनुसार काम करणार.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:–** फॉरेस्ट नाका ते रमाबाई पॉईंट आहे, ते आमची दोघांची मेहनत आहे. आहे की नाही.

**सभापती, श्रीमती कंचन लुंड:–** ही मिटींग स्थगित करण्यात येत आहे, नंतर २ फेब्रुवारी ३.०० वाजेपर्यंत, धन्यवाद.

दुपारी ३.०० वाजंता सभेचे कामकाज स्थगित केल्याचे सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— २/२/२०१८

**दि. २/२/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**१७ —अ**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार,दिनांक २९/१/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे काही कामकाज स्थगित करण्यांत आल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक २/२/२०१८ रोजी सायंकाळी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ८ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्या |
| ९ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्य |
| १० | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | सदस्या |
| ११ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १२ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्य |
| १३ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१) श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, २) श्री.सुनिल मुकुंद सुर्वे, ३) श्री. धनंजय बोडारे.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
५. श्री. अशोक जाधव, सहाय्यक लेखा परिक्षक
६. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी
७. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. श्री. महेश सितलानी, कार्यकारी अभियंता, साबांवि
९. श्री. तरूण सेवकांनी, उप अभियंता, साबांवि
१०. श्री. संदिप जाधव, उप अभियंता, साबांवि
११. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता, विद्युत
१२. श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त
१३. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
१४. श्री. नंदलाल समतांनी, प्र.सहा. आयुक्त
१५. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१६. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१७. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१८. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१९. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
२०. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२१. श्रीमती निलीमा कदम, अकाउटंट

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

सायंकाळी .३.४५....वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. ७ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.७ :–** **घ**नकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण करणेकरिता शहरातील नागरीकांना प्रत्येकी १० लिटरचे प्लास्टीकचे दोन डस्टबिन खरेदी करून वाटप करण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

---

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:–**डस्टबीन च्या विषयाबात जी मागची मिटींग ॲडजॉन झाली होती तेव्हा पण आम्ही बोललो होतो की त्याचे दर किती आहेत? बाजारात ८० रूपयाला मिळत आहेत. आणि होलसेल घेतले तर अजून कमी भावात मिळतील. तसे कोटेशन पण मला एक कंपनीने रूपये ८०/– दराने दिलेले आहे. मी काल कमिशनर साहेबांना व्हाटस्अप वरून पाठविले आहे. दर जास्त आहेत, जर दर कमी करून घेत असाल तर ठिक आहे.परंतु दर बाजारभावापेक्षा खुप जास्त आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वधारीयाः—** पहिले हे आपण समजले पाहिजे की, आपण टेंडर काढलं होत का? पब्लीक नोटीस दिली होती का? हे माझे प्रश्न पूर्ण होवू दया, सर्वसाधारण पणे काय होते की, तीन वर्तमान पत्रामध्ये जाहीरात देणे आवश्यक आहे. आणि ई.निविदा मागवीली जाते. कोणी कूठूनही टेंडर भरू शकतो. आणि खुले स्वतंत्रपणे भाग घेवू शकतात. तर ही सर्व फॉरमॅलीटी आपण पूर्ण केली होती का.

**उप आयुक्त.श्री. संतोष देहरेकरः—**होय.

**सदस्य, श्री. राजेश वधारीयाः—** कोण कोणत्या वर्तमान पत्रामध्ये जाहीरात दिली आहे, पब्लीक नोटीस दिली.

**उप आयुक्त.श्री. संतोष देहरेकरः—** दैनिक लोकमत, ठाणे वैभव आणि धनुष्यधारी या तीन वर्तमानपत्रामध्ये पब्लीश करण्यात आले होते.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी**ः— त्याचे दर वैगेरे दिले होते का की आम्ही या या दर प्रमाणे घेणार.

**सदस्य, श्री. राजेश वधारीयाः—**त्याच्यामध्ये आपण टेंडर आन लाईन दिले आहे ना.

**उप आयुक्त.श्री. संतोष देहरेकरः—** टेंडर ऑनलाईन झालेल आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीयाः—** किती लोंकानी टेंडर भरलेल आहे.

**उप आयुक्त.श्री. संतोष देहरेकरः—** याची पूर्ण माहीती गोषवा—यामध्ये दिलेली आहे. तीन जणांनी भरलेले आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. आयुक्त साहेब, जसे की राजेश वधारीयाजी बोलले, पेपरमध्ये नोटीस काढली आणि सगळयांनी टेंडर भरले. जर असे कोणाचा व्यापार आहे, तर त्याने धनूष्यधारी पेपर आहे,अजून काही पेपर मध्ये आले आणि ई टेंडरींग आहे त्यामध्ये बघायला पाहिजे ,काढायला पाहिजे , भरण्याचे प्रयत्न केले पाहिजे. नाहीतर हे काम होण्यासाठी काहीतरी मतलब होवू शकतो की एक दुस—याला बघून दुसरे कोणी पण याचे दुस—याबरोबर भेदभाव होईल व माल त्या मार्फत जावू शकतो व ही स्पर्धा होवू शकते. मा. आयुक्त साहेब आणि माझे सर्व सदस्याना एक निवेदन आहे, की महामुबंई मधील एक बातमी आहे, स्थानिक स्वराज्य संस्था कचरा वर्गीकरणासाठी एप्रिल २०१८ ची डेडलाईन आहे की अनुदान थांबविण्याची ताकद असे स्पष्टपणे लिहीलेले आहे, स्वच्छ महाराष्ट्र मिशन अंतर्गत २०१८चे एप्रिल पर्यत आम्हाला ओला कचरा व सुका कचरा प्रत्येक घरांमधून घ्यायचा आहे. आणि त्याची विल्हेवाट सुध्दा लावायची आहे. तर हयाप्रकारचे काम नाही केले तर सरकार कडून जे अनुदान (ग्रॅड) मिळते आहे, १२० करोड, किती मिळते आहे, जी पण मिळत आहे. रूपये. १३ करोड प्रत्येक महिन्याला, रू. १५६ करोड मिळणे बंद होणार. डी.पी.आर. येईल,डी.पी.आर बनवून येईल तेव्हा देवू! तर माझ्या मते ही लाईन खोडून टाकली पाहीजे. आणि हे वाटायला पण तीन महीने लागतील. आणि दोन—तीन महीने लोकांना समजायला लागतील. की ओला कचरा वेगळा ठेवा आणि सुका कचरा वेगळा ठेवा. कमीत कमी लोकं याचा लाभ तर घेतील. आणि आपल्याला निवेदन करतो की जेव्हा डी.पी.आर. येईल तेव्हा हयाच्यामध्ये पैसे दाखवावे किंवा काही तरी उपाय करावे लागतील परंतु असे लिखित की डी.पी.आर येईल तेव्हा केल जाईल हे बरोबर नाही. आपण एक ,खुप चांगल्या प्रकारे काम केलेले आहे. की मेहनत घेतली आहे टेंडर झालेले आहे सर्व झालेले आहे. परंतु आत आम्ही लोंकांना सांगू कसे ओला कचरा आत स्वच्छ भारत अंतर्गत आज आम्ही हॅड बील घेवून घरोघरी जाणार आणि लोंकाना बोलणार की आपल्याला दोन कुंडया दिलेल्या आहेत आपण कचरा वेगवेगळा ठेवा. एक वेळा दिलेल आहे आपण जर माहे एप्रिल पर्यत वाटले तर त्याचा भरपूर फायदा मिळेल.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरीः—** सभापती महोदय, माझां हे सांगण आहे की अनुदान (ग्रॅड) सरकार देणार आहे, त्याच्यासाठी काही योजना केली पाहीजे हया गोष्टी बरोबर आहेत परंतु सरकारने असे कुठे सांगितले आहे की जास्त भाव देवून ही वस्तू खरेदी करा. महापालिकेच्या पैशाचा दुरूपयोग करा असे सरकारने सांगितले नाही आहे. सरकारची गाईड लाइन सरळ सरळ आहे जी उपाय योजना आहे ती केली पाहिजे नाही तर तुमचे अनुदान (ग्रॅड) बंद केली जाईल. परंतु तुम्ही डबल भावाने खरेदी करा असे बोललेले नाही आहे. आमचे ऑब्जेक्शन हे आहे की याचे जे दर आहेत ते जास्त आहेत. जास्त भावात घेण्याची घाई का आहे. त्यांनी विचारले टेंडर विषयी, तर टेंडर विषयी जे विभाग टेंडर मागवतील तर टेंडर ची जी किमंत आहे ती किमंत .... केली पाहीजे की हया बाजार भावाप्रमाणे मिळत आहे तुम्ही कोणत्या दराने देत आहेत. हे कोणी केले नाही. पहिला हयाचा भाव आला रू. १९३/— रूपये त्यानंतर

निगोसिएशनसाठी बोलावले तर रू.१४५/– रूपये आता आम्ही म्हणतो की हे ८० /–रूपया मिळत आहे. कंपनी काय कोटेशन आहे. असे झाल्यानंतर तुम्ही सांगत असाल की हे बरोबर आहे. जास्त पैसे घेवून दया हे पब्लीकचे पैसे आहेत. त्याचे पैसे वेस्टेज जात आहेत, तर हे चूकीचे आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>** बघा, हे खुली निविदा आहे. जी कंपनी आमच्या कडे आली आहे,की मला पण हे टेंडर भरायचे होते त्याने पहिलेच यायला पाहिले होते.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:–</u>** टेंडर ,कुठ बोललेच नाही,टेंडर भरायला कोणती कंपनी आली नाही, आम्ही बाजारमध्ये ही वस्तु या या बाजार भावा प्रमाणे मिळत आहे. आपण जास्त पैसे मिळत आहे हे आपल्या ध्यानात आणत आहे.. टेंडर आम्हाला भरायचाच नाही, त्यासाठी परत बोलवा, हे जे आता टेंडर आनले ते टेंडर, विषय परत करा. प्रशासन व नंतर नेगोसिअेसनला बोलवा,हे ८० रूपयाला मिळते आपण कोण्त्या दराने देता ते सांगा. निगोसिएशन करू शकतो.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:–</u>** मी, सांगू शकतो, हे अनक्वॉलिफाईड माणूस आहे. अस पण होवू शकते की हया कॅन्ट्रक्टरचा विरोधी आहे, की आज येवून सांगेल की ही माझे कोटेशन आहे. मी हे स्वस्त देत आहे. तो त्याचे काम होते टेंडर मध्ये भाग घ्यायचचा. खुली निविदा होती.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:–</u>**टेंडर कोणाला भरायचे नाही,टेंडर त्यालाच दया, आमचे काही हरकत नाही, आमचे एकच सांगणे आहे, हया भावात मिळत आहे. तर जास्त दर देवून का घेत आहेत. हे आमच म्हणणं आहे. हे बाजारामध्ये कितीला व कसे मिळते हे प्रशासनाने बघितले पाहिजे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>** मी पण हया मताशी सहमत आहे, आपला जो पैसा खर्च केला जात आहे,कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन, सुविधा मिळावी. त्यासाठी हे टेंडर केल त्याच्यानंतर मी स्वत:माहीती घेवून जस की मागच्या वेळेस स्थायी समिति (स्टॅडीग कमिटी) मध्ये सांगितले की ७.५० लिटर.... ९० रूप्ये मध्ये दोन वर्ष पहिले वाटलेले आहेत हे लक्षात घेवून आम्ही निगोसिएशन केले आणि १४५ मला रिजनेबल दर वाटले ते मी स्टॅडीगमधील सदस्याच्या सहमतीने नेगोसीअेसन करून ते रू. १४५ हे दर कायम करण्यात आले. हयाच्यानंतर जर उल्हासनगर मध्ये आपल्याला ८० रूपये दराने मिळत असेल ही माहिती मागच्या मिटींग मध्ये मिळाली त्यानंतर आम्ही त्यांना सप्लायर ला दोन तीन वेळा कॉल करून खाजगी त्यांना मी बोलावले. मी पण विचारले की आपले जे कोटेशन दिलेल आहे त्याच्याबददल मला बोलायचे आहे जर आपण देण्याच्या परीस्थितीत आहेत तर जरूर आम्ही आपल्याशी प्रियर करण्यासाठी जो टेंडर आहे त्याच्यात निर्णय दुसरा पण घेवू शकतो. पुन्हा पुन्हा त्यांना बोलावणे करून , त्यांनी काही प्रतिसाद दिला नाही, आणि मला पण काही सांगितले नाही. चार दिवसापासून माझे समोर आले सुध्दा नाही. त्यानंतर श्री. चौधरीनी त्यांचे कोटेशन दिले. परंतु जर आपण कोटेशन व्यावस्थित वाचले तर यामध्ये त्यांनी अस लिहिलेले आहे, त्याची कॅपेसीटी त्याचे पण समजून घेतले पाहिजे, ८० रूपयाला हे देत आहेत परंतु पॉईट पंबर ३ ,सप्लाय क्वॉन्टीटी २हजार ते ३ हजार नग (पीसेस) प्रत्येक महिन्याला वाटप करणार, आपले ३ लाखाचे जे सप्लाय आहे हे पूर्ण करायला त्यांना सात ते आठ वर्ष लागतील.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:–</u>** तर आपल्या टेंडर मध्ये किती

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:–</u>** ही गोष्ट पण विचारात घेतली पाहीजे, कॅपॅसीटी फक्त कमी आहे, आणि आम्ही असे नाही सांगू शंकत की त्यांनी ८० रूपये सांगितले तर आपल्या माणसानी काही ८० रूपयाला दया असे नाही. जर कोणी सांगत असेत ८० रूपयाला देणेस तयार आहे. तर त्यानी दिले पाहिजे. त्यानी आमच्या बरोबर कंडीशन कमप्लाय केल्या पाहिजेत. तर हा बरोबर जिनिअस प्रस्ताव मांनला पाहिजे. नाही तर आमच्या कोणत्या ही टेंडर प्रोसेसला कोणी पुल (ब्रीज) बनवत आहे आणि कोणी पण येवून सांगेल की मी ५०टक्के बनवू शकतो आपण त्याला ५०टक्के मध्ये बनवून घ्या असे होत नाही. जो हा दावा करत आहे की त्याची ही जबाबदारी असते, टर्म आणि कंडीशन नुसार त्यानी पूर्ण केली पाहीजे. आता हे फक्त एक सनसनाटी गोष्ट घेवून येत आहे,की ८० रूपयाला दयायला तयार आहे आपण स्वत: म्हणतो की माझी कॅपॅसीटी महीन्याला २ हजार ते ३ हजार डब्बे वाटप करण्याची आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** जर ते दयायला तयार असतील तर उदया कोणी दुसरा म्हणेल की मी रोज २ डस्टबीन दयायला तयार आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>** आपणच माझेकडे पाठवले आहे. काही कॉमेंन्टस नाही आणि जर जिनिअन असेल तर त्याला एवढा मोठा कॉन्ट्रक्ट ५ करोड चे मिळत आहे, हे दराप्रमाणे समजा २.५ अडीच करोड ते ३ करोड मिळत आहे तर त्याला किती इंटरेस्ट असायला पाहीजे. कमिश्नर स्वत: त्यांना बोलवत आहेत,समोर काहीच येत नाही आणि ते प्रुव्ह करत आहे की हे बरोबर दरांमध्ये घेण्यासाठी प्रॉपर आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू शकतो किंवा नाही, हे ही बरोबर आहे. आय एम स्टील हिअर ओपन, तरीसुध्दा हे जर आम्हाला येवून बोलू शकतो, प्रुव्ह करू शकतो कॉफीडंस देवू शकतो तर कोण घेणार १४५ रूपयाला मिळत असेल तर मी तर नाही घेणार,

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u>** हे जे कोटेशन वैगेरे दिलेले आहे ना, त्याना आता आपल्या टेंडर मध्ये पण इन्टेरस्ट नाही आहे. आम्ही आपल्याला सांगत आहे की, हे बाजारामध्ये एवढया पैश्यामध्ये मिळत आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—</u>** चौधरी साहेब, असे कुणी पण आपले सगळया प्रोसेला खिंड पडेल ना. उदया ब्रीज च्या बाबतीत दुसरे विषय आले की त्यामध्ये कुणी तरी असाच रस्त्यावरचा माणूस येईल आणि म्हणेल की मी हा ब्रीज एवढया दिवसात  पूर्ण करेल पण मी नाही पूर्ण करणार माझे हया रेट ला त्याला पूर्ण करायला सांगणार. ही काय पध्दत आहे काय?

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u>** असे नाही, अस नाही हयाच्यामध्ये त्यांनी सांगितलेल आहे की आम्ही पक्के बिल आणून दाखवले. की बाजारामध्ये ही वस्तू हया बाजारभवाप्रमाणे मिळते. तुम्ही पण एवढया पैशाला घेतले पाहीजे. अस आमच मत आहे बाकी मत नाही की त्यांनी टेंडर भरलय हयानी भरलय त्यांनी जास्त घेतले आहेत त्यांना इटरेस्ट आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—</u>** मी त्याच्या पुढे जावून सांगतो हे टेंडर सुध्दा रद्द करून मी तयार आहे. प्रोव्हायडे त्याच्या टर्म कन्डीशन्सच्या आपल्या टेंडरच्या सुसंगत असल्या पाहिजेत. तो जर म्हणेल मला जरी दिले तरी महिन्याला दोन तीन हजार देईन, चा अर्थ ८ वर्ष हा कार्यक्रम चालवायचा का?

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>** मी एक गोष्ट समजवू शकतो चौधरी साहेबांना, की आपण ज्याच्याकडून कोटेशन घेतले असेल, हे आपण काय आमच्या टेंडर च्या टर्मस् कंडीशन्स सांगितल्या होत्या का? ते आमच्या टर्मस कंडीशन्स वाचल्या पाहिजे आणि ज्या टेंडरच्या टर्म कंडीशन्सच्या हिशोबामध्येकोटेशन दयावे ,चार डब्बे देणे, चारशे डब्बे देणे आणि तीन लाख डब्बे देणे एक वेगळे आहे. त्याच्यासाठी तेवढी त्याची क्षमता असली पाहिजे. तेवढी गुंतवणूक करणेची क्षमता पाहिजे. त्या लेवल पर्यंत पोहचण्याची बीट क्षमता असली पाहिजे. जो पर्यत ही त्याची क्षमता नसेल तो एवढे छोटे डब्बे किती देणार, आठ वर्ष तो पर्यंत तर आपण थांबू शकत नाही.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u>** माझे हे म्हणणे आहे की आम्ही बाजारात गेले होतो , आम्ही ही वस्तू घेतली होती. आणि आपण ती वस्तू १४५ रूपयाला घेत आहात ती  वस्तू बाजारात ८० रूपयाला मिळत आहे, आपण जास्त पैसे खर्च करून का घेत आहात, हा आमचा प्रश्न आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>**  साहेब, बघा, एक टेंडर निघाले आहे तीन लाख डब्बे वाटप करण्यासाठी हा कॅन्ट्रक्टर म्हणतो की मी ३००, डब्बे देणार, तर ही त्याच्यात क्षमता नाही आहे.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u>** ३ लाख डब्बे घ्यायचे आहेत, जास्त पैशात घ्यायचे आहेत असे कुठे लिहिलेले आहे का? डबल पैसे देवून खरेदी करा.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:— हे योग्य आहे की, हे या प्रक्रीया (प्रोसेस एरॉव्हल ) होवून आलेला दर आहे. निरिक्षण केल्यानंतर निश्चित झालेला दर आहे, आणि तो आपल्याला मोघम सांगत आहे. आणि आपण त्याच्यावर म्हणणार की हा दर बरोबर आहे. हे एखादयाची काही तरी प्रक्रिया असते.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u>** मी शहराचा एक नागरीक म्हणून तिथे गेलो, ही वस्तू खरेदी केली त्याचे पक्के बिल आणले. राज्याची जीएसटी केंद्रची जीएसटी धरून ८० रूपयाला मिळाली. त्याचे बील त्याने दिले, तुम्हाला दाखविले स्टॅंडीगमध्ये ही वस्तू इथे रू. ८० दराने मिळते, तर रू. १४५ दराने का घ्यावी हा आमचा प्रश्न, बाकी काही नाही.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>** मी पण सुरूवाती पासून तेच सांगतो आहे.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u>**अधिका—यानी काही गोष्टी बघायला पाहिजे होत्या, त्या बाजारभावा प्रमाणे टेंडर काढायला पाहिजे, इथे ठेकेदार सांगतो त्या पध्दतीने टेंडर बनतात, आणि मग त्याच्यावर सहया होतात, कोण कशा सहया करतो काय करतो,

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>** असे असते तर मी ५० रूपये मी माझ्या अधिकरात निगोसीएशन करू शकतो तर.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u>**मागच्या वेळेला रू.३० लाखाच काम दिले त्याच्यात १९३ प्रमाणे घेतले त्यांच्यावर काय करवाई केली.? आपण कारवाई करायला नाही ना.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—</u>** ते तुम्हाला काळ सांगेन काय करायला पाहिजे ते,

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया:—</u>** ही एंडलेस चर्चा होईल. दुसरी सभा आहे ती पण चालवायची आहे. जर चौधरी साहेबांच मत नाही आहे तर बाकीचे मत घेवून क्लीअर करा.

**<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u>**करा ,करा. आपले सगळयांच मत आहे ना त्याच्यात बाकीचे काय. याला आमचा विरोध आहे.

**<u>सभापती,—श्रीम. कंचन अमर लुंड:—</u>** ठिक आहे, मतदान घ्यावे.

**<u>महापालिका सचिव:—</u>** जे या प्रस्तावाच्या बाजूने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**<u>प्रस्तावाच्या बाजूने ९ मते</u>**

१) श्रीम. कांचन लुंड

२) श्री. जमनादास पुरस्वानी

३) श्री. राजेश वदारिया

४) श्री. दिपक सिरवानी

५) श्रीम. पंचम कालानी

६) श्रीम. डिम्पल ठाकुर

७) श्रीम. कविता पंजाबी

८) श्रीम. जया माखिजा

९) श्रीम. चंद्रावती सिंग

**<u>महापालिका सचिव:—</u>** जे या प्रस्तावाच्या विरोधात आहे त्यांनी कृपया आपले हात वर करावेत

**<u>प्रस्तावाच्या विरोधात ४ मते</u>**

१) श्री. राजेंद्र चौधरी

२) श्री. कलवंतसिंह सोहता

३) श्री. भारत राजवानी

४) श्रीम. पुष्पा बागुल

**महापालिका सचिवः—** या प्रस्तावाच्या बाजूने ९ मते आणि प्रस्तावाच्या विरोधात ४ मते हा प्रस्ताव बहुमताने पास झाला.

**सदस्य श्री.जमनादास पुरस्वानीः—** याच्यामध्ये एक अट आहे की १ एप्रील पर्यंत वाटप करण्यासाठी त्यांना बंधनकारक राहील. कारण की हे जे आलेले आहे आज सरकार कडून त्यासाठी त्वरीत या कामाची वर्क ऑर्डर दिली जावी. इतिवृत्ताची वाट न पाहता आणि हे काम १ एप्रील पर्यंत पूर्ण करणे बंधन कारक असेल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—** त्याचा शासन निर्णय (जी.आर.) आलेला आहे. हे केवळ डस्टबीन वाटप करून जीआर कम्प्लाय होणार आहे का?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—** नाही होणार कारण लोकांना ते ठेवण्याची सवय कशी होणार. एक वर्ष लागणार.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—** डस्ट बीन वाटले जाणार त्याचे याग्य प्रकारे डीपीआर मध्ये...... कॉन्टक्टरला आम्ही राजी केलेले आहे, की जेव्हा डीपीआर मंजूर होईल तेव्हा वर्क ऑर्डर दिली जाईल. तो पर्यत हयाच दराप्रमाणे काम करण्यास तयार आहे. ही इज रेडी ना.

**सदस्य, श्री. राजेश वधारीयाः—** साहेब बघा, त्या वेळेस आपण त्यांना बोलणार, त्यांना डब्बे आणायला ,बनवायला, छापण्यासाठी, वाटण्यासाठी वेळ लागेल. आता सरकार कडून जीआर आलेला आहे, की एप्रील नंतर पूर्ण अनुदान बंद होणार आहे. तर हया परिस्थिती मध्ये त्याला येवूच देवू नका. आता आपल्याकडे फक्त दोनच महीने शिल्लक आहे. दोन महीन्या मध्ये कसे जर दोन महीन्यामध्ये डीपीआर मंजूर होवून नाही आला आणि डब्बे लोकांना वेळेत वाटले नाही आणि सुका कचरा ओला कच—याचे वर्गीकरण झाले नाही तर अनुदान बंद होईल. हे पण आपल्याला बघितले पाहीजे ना साहेब.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकरः—** हा जीआर आपल्यासाठी ऍक्सेप्सशन करायला पाहीजे. बाकी शहरा सारखे नाही की, संधी होती आणि वेळ होता आणि केले नाही. काल निर्णय घेतला आहे की प्रत्येक गार्डनमध्ये लोकलाईज जेवढे पण ५ ते १०टक्के असेल त्याच्यापेक्षा जास्त तर नसेल. परंतु आम्ही प्रयत्न करत आहोत आणि हे दाखवून देणार की, याच कारण अस नाही की हा जी.आर. फक्त डस्टबीन वाटपा पुरताच आहे. वर्क ऑर्डर पण तेव्हा देणार जेव्हा डीपीआर मंजूर होईल. आता फक्त दर निश्चित करून ठेवू शकतो.

**सदस्य, श्री. राजेश वदरीयाः—** डीपीआर मंजूरीसाठी पण काही ठराविक वेळ असेल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकरः—**डीपीआर पण एमजीपी द्वारा मंजूर होईल, परंतु आता छाननी होत आहे, येत्या चार दिवसात सरकारकडे पाठवण्यात येईल. मी हयाच्यामध्ये फालोअप करत आहेत. १ एप्रिल अशी अट टाकु नका.

**सदस्य, श्री. राजेश वदारीयाः—** साहेब एक महीना ठेवा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकरः—**बोलत आहात तर एक महीना ठेवला जाईल. परंतु एक महीन्यानंतर परत स्टॅडीग कमीटीमध्ये निर्णय घेवू.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—** नाही नाही. ४५ दिवस घ्या.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकरः—**पहीलेच आम्ही ३० हजार डस्ट बीन त्यावेळेला हया पीरस्थितीत घेतले आहेत. ते असेच पडले आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारीयाः—** महीला बालकल्याण आहे. त्या झोपडपटटीमध्ये वाटप करू शकतात.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकरः—** माझा हा विचार होता की हे जे डस्टबीन आहेत त्याच्यांवरती नाव वैगेरे छापून घेणे. हे ३० हजार डस्टबीन घेतले, त्याच किमतीत घेवून जर एकत्र वाटले , तर त्याचे एक वातावरण तयार होईल. ते सांभाळायची अडचण होते परंतु थोडा त्रास सहन करावा लागेल.

**सदस्य, श्री. राजेश वदारीयाः—**प्रशासनाकडून आम्ही खात्री (उम्मीद) करत आहोत की डीपीआर लवकरात लवकर मंजूर करावा.

<u>**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**</u> सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ७ :—** घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण करणेकरिता शहरातील नागरीकांना प्रत्येकी १० लिटरचे प्लास्टीकचे दोन डस्टबिन खरेदी करून वाटप करण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

<u>**प्रस्तावना**</u>

दिनांक १२/०९/२०१७ रोजी अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण करणेकरिता शहरातील मालमत्ता धारकांना प्लास्टीकचे १० लिटरचे डब्बे पुरवठा करून वाटप करण्यासाठीच्या प्रस्तावास व जाहिर ई—निविदा सुचना प्रसिध्द करण्यास मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महापालिका वेबसाईटवर व दैनिक वृत्तपत्रात ई—निवदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्याअनुषंगाने ३ निविदाकारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त निविदा दि. १०/१०/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास ई—निविदा कक्षात निविदा समिती अध्यक्ष व निविदा समिती सदस्य तसेच निविदाकारांच्या उपस्थितीत संगणकाच्या माध्यमाने उघडण्यात आल्या. निविदा समितीने सर्व कागदपत्रांची पहाणी केली. प्राप्त तीनही निविदाकारांनी निविदेतील नमुद अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करीत असल्याने या तीनही निविदाकारांच्या निविदेतील “Commercial Bid” उघडण्यापुर्वी नॅशनल टेस्ट हॉऊस, मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आलेल्या लॅबोरीटरीज्‌मार्फत तिन्ही पात्र निविदाकारांचे प्लास्टीक डस्टबिन तपासणी अहवाल मागविल्यानंतर “Commercial Bid” उघडण्याचे सर्वानुमते निविदा समिती सदस्य यांनी निर्णय घेतला आहे.

त्यानुसार प्राप्त ९ नमुने पैकी ३ नमुने नमुना क्र. १, २ व ३ यांची अंतीम केलेल्या नमुन्याप्रमाणे प्रयोगशाळेत तपासणी करून तपासणी अहवाल (LAB REPORT) सिलबंद लिफाफ्यात सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे राष्ट्रीय परीक्षण शाला (पश्चिमी क्षेत्र) यांनी तपासणी करून चाचणी परिणाम (Results of Test) सिलबंद लिफाफ्यात मा. उप—आयुक्त (आरोग्य), उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांच्या नांवे सार्वजनिक आरोग्य विभागाकडे दिनांक १६/११/२०१७ रोजी सादर केला आहे. सदरचा तपासणी अहवाल दिनांक २२/११/२०१७ रोजी मा. आयुक्त सो., यांनी दिलेल्या आदेशान्वये दिनांक २७/११/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. उप—आयुक्त (आरोग्य) यांच्याकडे सदरचा सिलबंद लिफाफा उघडण्यात आला. दिनांक ३०/११/२०१७ रोजी ई—निविदा कक्षात संध्याकाळी ४.०० वाजता निविदा समिती अध्यक्ष व सदस्य यांनी नॅशनल टेस्ट हॉऊस, मरोळ, अंधेरी (पू) यांच्याकडील प्राप्त डस्टबिन (SAMPLE) नमुना तपासणी करून निविदा समितीने दिलेल्या निर्देशानूसार तीनही निविदाकार यांना तपासणी अहवालातील अं.क्र. ६ व ७ मध्ये व निविदेतील अटी व शर्तीनुसार दिलेल्या स्पेसिफीकेशन व अंतीम केलेल्या नमुनाप्रमाणे डस्टबिन पुरवठा करून देण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत लेखी हमी पत्र सादर करण्याबाबत क्र.उमपा/आवि/उप—आ/२६५/२०१७, दि. ०४/१२/२०१७ अन्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने तीन ही निविदाकार यांनी दिनांक ०५/१२/२०१७ रोजी इकडील कार्यालयास हमी पत्र सादर केले आहे. त्यानुसार निविदा समिती अध्यक्ष, व निविदा समिती सदस्य यांच्या निर्णयानुसार व मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक ०५/१२/२०१७ रोजीच्या मान्यतेनुसार दिनांक ०५/१२/२०१७ रोजी संध्याकाळी ०५.०० वा. सुमारास ई—निविदा कक्षात निविदा समिती अध्यक्ष व निविदा समिती सदस्य तसेच निविदाकारांच्या सूचनेनूसार संगणकाच्या माध्यमाने दुसरा लिफाफा (वित्तीय लिफाफा) उघडण्यात आला. पात्र ३ निविदाकारांनी सादर केलेल दर खालीलप्रमाणे आहेत.

<u>**तुलनात्मक तक्ता**</u>

| **Sr. No** | **Description** | **Quantity/ Nos** | **M/S Manav vikas samajik seva sansta Rate per Unit (RS.)** | **M/S SSV sanstha Rate per Unit (RS.)** | **M/S Adarsh Adivashi Vikas va shekshnik sanstha Rate per Unit (RS.)** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Supply of the 10 liters capacity of plastic Dust bins | 344000 Nos | 195 | <u>**193**</u> | 198 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | with cover as per the specification noted in schedule B and distribution at various places in Ulhasnagar city. | | | | |

पात्र निविदाकारांमध्ये तुलनात्मक तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे मे. एस. एस. संस्था यांनी सादर केलेले दर न्युनतम आहे. प्राप्त दरानूसार प्लास्टीकचे १० लिटरचे डस्टबिन पुरवठा करून घेण्यासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr. No | Description | Quantity/Nos | M/S SSV sanstha<br>Rate per Unit (RS.) | Aprrox. Expenditure<br>(RS.) |
|---|---|---|---|---|
| 1 | Supply of the 10 liters capacity of plastic Dust bins with cover as per the specification noted in schedule B and distribution at various places in Ulhasnagar city. | 344000 Nos | 193 | 6,63,92,000 |
| **एकुण** | | | | 6,63,92,000 |

सदरचे प्राप्त दर अंदांजीत (बाजार भावानूसार) प्राकलनाच्या प्रति नग दरापेक्षा रू. ३५/— ने जास्त म्हणजेच २२ टक्के जास्त आहे. त्यामुळे प्राप्त दर बाजार भावाच्या दरापेक्षा जास्तीचे असल्याने निविदा समितीने दिलेल्या निर्देशानुसार न्युनतम दर सादर करणारे निविदाकार मे. एस.एस. व्ही. संस्था, उल्हासनगर यांना जा.क्र.उमपा/उप.आ/आवि/२८५/२०१७, दिनांक १९/१२/२०१७ अन्वये दिनांक २०/१२/२०१७ रोजी वाटाघाटीसाठी दुपारी १२.०० वाजता मा. आयुक्त सो., यांच्या दालनात निविदा समितीच्या उपस्थितीत बोलावण्यात आले. निविदा समितीमधील खालील सदस्य व निविदाकार मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर यांचे प्रतिनिधी वाटाघाटीसाठी उपस्थित होते.

१) उपायुक्त (आरोग्य)

२) मुख्य लेखा अधिकारी

३) मुख्य लेखा परीक्षक

४) शहर अभियंता

मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर न्युनतम दराचे निविदाकार यांच्याशी निविदा समितीने केलेल्या चर्चेअंती/वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| Sr. No | Description | Quantity/ Nos | M/S SSV sanstha<br>Rate per Unit (RS.) | After Negotiation Rate<br>(RS.) | Aprrox Expenses<br>(RS.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Supply of the 10 liters capacity of plastic Dust bins with cover as per the specification noted in schedule B and distribution at various places in Ulhasnagar city. | 344000 Nos | 193 | 145 | 4,98,80,000 |
| **एकुण** | | | | | **4,98,80,000** |

वाटाघाटीअंती प्राप्त दर हे सर्व करांसहित व नागरीकांच्या घरपोच वाटप करण्यासहीतचे असून त्यानुसार अंदाजीत खर्च रूपये ४,९८,८०,०००/— (रूपये ४ करोड ९८ लाख ८० हजार मात्र) इतका अपेक्षित आहे. निविदेतील अटी व शर्ती नुसार शहरात अस्तीत्वात असलेल्या मालमत्ता धारकांना सदरचे डस्ट बिन वाटप करावयाचे असल्याने डस्टबिनची संख्या कमी अथवा जास्त होवू शकते.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मधील तरतूदीनुसार १००: कचरा निर्मितीच्या जागीच वेगवेगळा (ओला, सुका, घरगुती घातक पदार्थ) करून स्वतंत्रपणे संकलित करणे व या संकलीत केलेल्या कचऱ्याची वाहतूक करणे, ओल्या कचऱ्यावर केंद्रित अथवा विकेंद्रित पध्दतीने प्रक्रिया करणे, तर सुका कचऱ्याचे पुर्नवापराकरिता पुन्हा विलगीकरण करून त्यावर प्रक्रिया करणे व उर्वरित कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विकसीत केलेल्या भरावभूमीवर विल्हेवाट लावून “शहर” स्वच्छ करणे आहे. सद्यास्थितीत ओला/सूका/घातक पदार्थ याची स्वतंत्र वाहतूक व्यवस्था कार्यान्वित नाही. प्रक्रिया केंद्र नाही तसेच शास्त्रीय पध्दतीने कचरा विल्हेवाट लावणेसाठी भरावभूमी नाही. त्याच प्रमाणे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल (क्च्) शासनाकडून मंजूर झालेला नाही. सबब उपरोक्त कार्यवाही झाल्यावरच निविदा कार्यादेश देणे उचित राहिल याबाबत सर्व मा. निविदा समिती सदस्य यांनी आपले मत मांडले होते. त्यावर मा. आयुक्त सो., यांनी दिनांक २२/१२/२०१७ रोजी मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, कंत्राटदाराकडून संमतीपत्र घेऊन सादर करण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत. सदरची बाब ही निविदेच्या अटी व शर्ती मध्ये नमुद करण्यात आलेली नसल्याने उक्त परिस्थीती लक्षा घेता घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मधील तरतूदीनुसार जसजसी कार्यवाही पुर्ण करण्यात येईल त्या त्या प्रमाणे प्लास्टीकचे १० लिटरचे डब्बे आवश्यकते नुसार टप्या टप्यात पुरवठा करून वाटप करण्याबाबत कंत्राटदार मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर यांच्याकडून उमपा/उप.आ/आवि/२९७/२०१८ दि. ०४/०१/२०१८ नुसार समंतीपत्र मागविण्यात आले होते, व त्या नुसार कंत्राटदार मे. एस.एस.व्ही.संस्था, उल्हासनगर यांनी सिसविस/११९, दि. १५/०१/२०१८ अन्वये इकडील कार्यालयास समंतीपत्र सादर केले आहे, तरी सदर पुरवठा आपल्या आदेशा नुसार करण्यास संस्थेची तयारी असल्याचे मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर यांनी समंतीपत्रात नमुद केले आहे. त्यानुसार मे. एस.एस.व्ही.संस्था, उल्हासनगर यांना स्वतंत्र कचरा वाहतूक व प्रक्रीया केंद्र सुरु झाल्यावर कार्यादेश टप्या टप्याने देणेत येतील व तसेच ठेकेदारास महापालिका सूचित करेल त्यांना डस्टबिन घरपोच देऊन मोबाईल क्रमांक, पोच पावती व छायाचित्र आधारकार्ड नंबरसह महापालीकेस सादर केल्यानंतर त्याप्रमाणे देयक अदा करणेबाबत नियमानुसार कार्यवाही करणेत येईल.

तरी एकुण अंदाजीत १७२००० मालमत्ता धारकांना प्रत्येकी २ डस्ट बिन (१० लिटरची, एक हिरवा व एक निळा रंगाचा, स्पेसिफीकेशननूसार) खरेदी करुन वाटप करण्यास येणारा अंदाजीत रूपये ४,९८,८०,०००/— खर्चास (चार कोटी अठ्ठयानऊ लाख ऐन्शी हजार मात्र) व मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, मिलींद नगर, उल्हासनगर—४ यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ८८ — **दिनांकः—२/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण करणेकरिता शहरातील नागरीकांना प्रत्येकी १० लिटरचे प्लास्टीकचे दोन डस्टबिन (एक हिरवा व एक निळा रंगाचा, स्पेसिफीकेशननूसार) खरेदी करुन वाटप करण्यास येणारा अंदाजीत रूपये ४,९८,८०,०००/— (चार कोटी अठ्ठयानऊ लाख ऐन्शी हजार मात्र) खर्चास व न्युनतम दर सादर करणारे मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, मिलींद नगर, उल्हासनगर—४ यांच्याशी संविदा करण्याकरीता मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**बहुमताने**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :–**विषय क्र. १६ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्रमांक १६ :–**वर्ष २०१७–१८ मध्ये पावसाळयापूर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाच्या सुधारीत प्राकलनास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता मिळणे.

---

**सदस्य, श्री. राजेश वदारीया:–**जेव्हा प्राथमिक (बेसीकली) प्रस्ताव आला होता, त्यावेळेस पण आम्ही परत परत प्रशासनाला सांगितले होते की एस्टीमेटमध्ये चूक आहे, काही इश्यु आहेत,कुठ ट्रंच दिलेल नाही, कुठे क्रॉसींग आहेत,आणखी काही अडचणी आहेत. त्याच्यात पूर्णपणे नाही दिलेल आहे. त्यावेळेस आपल्या इंजिनिअर्सला ऐवढा आत्मविश्वास होता की काहीच होणार नाही साहेब, आज काहीही रिझन देवून हे केले ते केले परत वाढत जाते. माझा विचार असा आहे की आपल्याला हे पण कमी पडणार आहेत. हे पण निश्चित मोजमाप नाही आहे. आता माझ्याकडे व्हाईट हाउस मध्ये रॅम्प आहे दोन्ही बाजूला हा पूर्ण खराब झालेला आहे, हे यांच्या लिस्ट मध्ये कुठे दिसत नाही आहे. आज सेंट्रल हॉस्पीटल पासून ते नानीकराज चौक , खेमाणी पर्यत जाउन कमीत कमी १२ ते १५ पटअी आहेत,क्रंच आहे साईड पटटी आहे, हे याच्यामध्ये सामावून घेतलेले नाही आहे. प्रत्येक प्रभागामध्ये असे प्रॉब्लेम आहेत. नंतर यांच्या लक्षात येते साहेब हे तर आम्ही घेतल नाही हे तर आम्ही बघितल नाही. हे तर राहून गेल. तर हयाप्रकारे कितीचा प्रस्ताव आणला आहे ५० ,५० लाख रूपये प्रत्येक प्रभाग समितीला देवून अस पूर्णपणे असायला पाहीजे.

**सदस्य,श्री. दिपक सिरवानी:–** मा. कमिशनर साहेब,मागच्या मिटींग मध्ये आपण सांगितले होते की, आता सध्या खात्रीपूर्वक सांगू शकत नाही, तीन दिवसा नंतर संपूर्ण माहिती देण्यात येईल. यादी देणार होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:–** दिलेले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया:–** साहेब त्या वेळेस पण तुम्हाला अधिकार देण्यात येत होते, कॅन्टीजंन्सी देण्यात येत होती, कॅन्टीजंन्सी म्हणजे काय की आपण आपल्या जवळ ठेवा. अणि जर आवश्यकता वाटली तरच त्याचा वापर करण्यात यावे. जरूात नसेल तर उपयोग करू नका. परत नंतर तुम्ही स्थायी समिती मध्ये आणणार, प्ररूताव बनवणार नंतर पास करणार, प्रक्रीयेमध्ये वेळ निघून जातो. तापर्यत रोडची अवस्था खराब होणार, लोंकाचे बोलणे आम्हाला ऐकावे लागतात. पत्रकार आमच्या विरोधात लिहीत आहेत की इथे खडडा आहे, हे नाही पाहीले ते नाही पाहीले,

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:–** पीडब्ल्युडी, याची माहीती संपूर्ण सांगा.

**कार्यकारी अभियंता श्री.महेश सितलानी सा बां वि:–** मागच्या वेळेस ५ करोड ६४ लाखाचे एस्टीमेट बनविण्यात आले होते. ते फक्त पाटोल्सचे होते. त्याच्यात ७५ टक्के काम पॅचोल्स चे काम केलेले होते. मुख:त हे रिजन आहे की त्यामुळे पाटोल्सचे काम वाढलेले आहे. त्याच एक्सेल रोडचे काम पूर्ण करण्यासाठी पॅचवर्कचे काम आता घेण्यात आलेले आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:–** किती क्वॉन्टीटी वाढली आहे.

**कार्यकारी अभियंता श्री.महेश सितलानी साबांवि :–** प्रत्येक प्रभाग निहाय यादी बनविली आहे, ६ करोड ३१ लाखाचे बनविण्यात आले आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:–** पहीला जो टेंडर मागवण्यात आला होता तो कितीचा होता.

**उपअभियंता श्री जितू चौईथानी:–** पहीला टैंडर होता ५ करोड ६४ लाखाचा.

**सदस्य, श्री राजेश वदारीया**:— आम्ही लोकांनी एक एक करोडचे काम , दीड करोड पर्यंत वाढवण्यास सांगत होते, ते आत्मविश्वासाने सांगत होते एवढा खर्च होणार नाही, फुल पट्टी करण्यात आली साईड पट्टी करण्यात आली. त्या ठिकाणी काही रोड सोडण्यात आले.

**सदस्य श्री दिपक सिरवानी**:— असे आम्ही फुल लेंथ केलेली होती.

**कार्यकारी अभियंता श्री.महेश सितलानी साबांवि** :— आता जरी साईडवर आले तरी, ज्या रोडची आपल्याला शंका आहे. आपण त्या ठिकाणी साइडवर चला केलेले काम दखविण्यात येईल.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया**:— आता डॉल्फीनचा रोड आहे, तो आपण चांल्या प्रकारे केलेला आहे. साधू वासवानी ते चोपडा कोर्टा पर्यंतचा रोड खुप चांगल्या प्रकारे करण्यात आलेला आहे. तर बाकीचे रोड सुटलेले आहेत. याआगोदरच आपणास सांगण्यात आले होते की कॉन्टीटी वाढवा.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी**:— डॅल्फीनचा रोड केलेला आहे तो कसा केलेला आहे हे आपण पाहीले का, साईड पट्टी सोडून देण्यात आलेली आहे गाडी उभी करून ठेवण्यासाठी, लोकाना माल ठेवण्यासाठी.

**सदस्य, श्री दिपक सिरवानी**:— उल्हासनगरची पार्कींग आहे की काय यामुळे आम्हाला टाईम मिळत नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया**:—जागा आहे त्याठिकाणी गाडया उभ्या आहेत त्या ठिकाणी बनवणार कसे?

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी**:— काम करायच असेल तर करू शकतात असे नाही की गाडी उभी आहे म्हणून करायचे नाही आणि डीपी मध्ये आपण १२० फुटाचे करतो आणि दुस—या बाजूने ऐवढाच का?

**सदस्य,श्री. भारत राजवानी**:— जमनुजी, प्रभाग ४ मध्ये एकाही रस्त्याचे साइड पटटीचे काम करण्यात आलेले नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:— पहीले तर त्या दिवसाचा रिपोर्ट दाखवा. आपण जी इस्टीमेट बनविण्यात आली होती, ही इस्टीमेंट पूर्ण झाली तर कशी पूर्ण झाली. हा रिपोर्ट कुठे देण्यात आला. ज्यावेळी आम्ही पून्हा पून्हा विचारणा करण्यात येत होती की हे जे इस्टीमेट आहे हे बरोबर नाही आहे. यामध्ये एक एक प्रभाग समिती मध्ये काम वाढणार आहे त्यावेळी अस उत्तर देण्यात आले होते की,एक रूपयाचे पण काम वाढणार नाही आम्ही हयाच्यात पूर्ण करणार तीन असे रोड होते आम्ही नाली ते नाली पूर्ण करण्याचे एस्टीमेट होते. हे १०० टक्के पेक्षा जास्त कसे काय वाढले.

**कार्यकारी अभियंता श्री.महेश सितलानी साबांवि** :— ते जे तीन रस्ते आपण प्रस्तावीत केले होते,ते आजून पर्यंत चालू आहेत साहेब,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:— बाकीचे कुठे होत आहेत हे,५ करोड मध्ये आपण बोलेले की पूर्ण होणार, ६ करोड वाढत आहेत तर शेवटी कधी होणार हे काम.

**कार्यकारी अभियंता श्री.महेश सितलानी साबांवि** ी:— आम्ही पाटोल्स ची कामे घेतली होती, पूर्ण पॅच्युअल करण्यास सांगितले.

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी** :— कोणाच्या सागण्यावरून त्या दिवशी आपण रिपोर्ट देणार होते. आपल्याला कोणी सांगितले,

**कार्यकारी अभियंता श्री.महेश सितलानी साबांवि** :— पॅच्युअल म्हणजे खडडे नाही सर,

**सदस्य श्री दिपक सिरवानी**:— त्यानी व्यवस्थित काम केलें असेल.

**सदस्य,श्री.भरत राजवानी**:— म्हणजे जास्त मोठे खडडा असेल,

**कार्यकारी अभियंता श्री.महेश सितलानी साबांवि** :— खडडा जास्त मोठा नाही असू शकत सर,

**सदस्य,श्री.भारत राजवानी**:— आपण फोटो वैगेरे काही काढले आहेत का?

**कार्यकारी अभियंता श्री.महेश सितलानी साबांवि** :— हो, आहेत सर, फोटोज आहेत.

**सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी:—**फोटोची जरूरत नाही आहे...... आपण त्यांना फसवत (मिसगाईड) आहात. हया प्रश्नाचे पहिले उत्तर दया, की जी एस्टीमेट बनविण्यात आली होती, त्यामध्ये म्हटले होतेकी एक रूपया पण कमी येणार नाही. बोलेले होते की नाही,नाही तर मिनीटस दाखवू का?

**कार्यकारी अभियंता श्री. महेश सितलानी साबांवि** :—पाटोल्स चे होते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** हां पाटोल्स चे होते. आपण पाटाल्सची एस्टीमेट बनविली होती. तर पाटोल्स चा भरणा का नाही करण्यात आला. पूर्ण रोड का केले, आपल्याला कोणी सांगितले की पूर्ण करा. किंवा आपणच हे सर्व रोड पूर्ण केलेले आहेत. दोन गोष्टी आहेत आपल्यावर कोणी दबाव आणून रोड बनविण्यात आला असेल, नाहीतर आपण पूर्ण एस्टीमेट चूकीचे बनविले असेल. दोन मधील एक तर स्पष्ट करा. दोन्ही गोष्टी मध्ये स्वत:ला बरोबर समजत आहात. आम्ही इस्टीमेट पाटोल्सची बनविली होती,आणि आम्ही बनविला रोड,हे कोणी सांगितले आपल्याला तर आपण रोडची एस्टीमेट घ्यायची होती. आज जर ही पेपर मध्ये बातमी आली तर की ५ करोड च्या पाटोल्स मध्ये ६ करोड ची वाढ. ५(२) (२) मध्ये जास्त, तर बदनाम कोण होणार सत्ताधरी होणार. ही चूक कोणी केली आहे तुम्ही केली की आम्ही. आम्ही वारंवार सांगण्यात आले होते की एस्टीमेट चुकीचे आहे,यामध्ये ५०, ५० लाख... एक , एक करोड वाढवून दया.ठरावात टाका तसे

**कार्यकारी अभियंता श्री.महेश सितलानी साबांवि** :— सर पाटोल्सचे काम पास करण्यात आले होते.

**सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी:—** आता सुपरविजन कोणी केले आहे, काम करून घ्यायचे, आता हयांनी पाटोल्स चे काम पास केले होते. सुपरवीजन कोणी केली मी का ठेकेदाराने स्वत: आपल्या मर्जी नुसार, सुपरवीजन कोणी केले रोड बनवायचा की पाटोल्स. आता आपण पाटोल्सचे काम केले तर सुपरविजन पण आपण केली असेल ना. तर तेच खडडे भरवून घ्या ना. तर कोणी आपल्यावर प्रेशर करत आहे, अशी चूकीचे काम का करत आहात.

**सदस्य, श्री दिपक सिरवानी**:—कोणी पण इंजीनिअरने सांगावे की मी विजिट केलेली आहे साईडवरती.

**सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी:—** आता पण सांगत आहे, आपण मिनीटसमध्ये यायला पाहीजे की आज पण एस्टीमेट अजून वाढणार, आपण नाली ते नाली सर्व केलेले आहे का?

**कार्यकारी अभियंता श्री.महेश सितलानी साबांवि** :— फक्त पॅचुअल केलेले आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**पहीले पण पॅचुअल्स आता पण पॅचुअल्स. म्हणजे साइड दहा,दहा फुट राहीलेली आहे.

**कार्यकारी अभियंता श्री.महेश सितलानी साबांवि** :— हो हो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—** एस्टीमेट मध्ये नाही घेततले का?

**कार्यकारी अभियंता श्री.महेश सितलानी साबांवि** :— नाही ,नाही सर

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**हे तर डबल झाले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**मर्यादीत जर आम्हाला अनुदान आहे आणि त्याच्यामध्ये ऐवढे करायचे आहे

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—** एकूण सर्व एस्टीमेट चूकीचे आहे.मुळातच एस्टीमेट ही खडडयाची आहे. त्यावरती पण कोणी सांगत असेल की काम जास्त व्हायला पाहीजे त्याच्यावर बोलत आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**आज येथील नगरसेवक सर्व आम्हाला बोलत आहेत. सभागृह नेता म्हणून आहे मला माहीत आहे. माझो पाटोल्स नाही झाले, हे नाही झाले आणि इंजिनिअर बोलत आहेत की सर्व कामे होणार आहे. आपण खुप चांगल्या प्रकारे एक एक रोडचे दिनांक व वेळ निश्चित करून दिलेल आहे. हया हया दिवशी हे हे काम होणार. सर्व लोक वाट पाहत थकून गेले. गणपती चा काळ निघून गेला तेव्हापण करू शकले नाही. दिवाळी पण झाली तरी पूर्ण नाही झाले. टेंडर झाल्यानंतर आपण टाईम टेबल घेतले होते आता मी म्हटले साहेबाने २०१७

मध्ये बोलेले होते २०१८ ची तारीख टाकली आहे. छापण्यात चूक झाली आहे. आता हे जर खर आहे हे लोक सांगतील नाही तर अजून वाढवून मागतील,

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** आमच्याकडे ठेकेदार दोन दिवस काम करतो आणि बंद करतो.

**आयुक्त श्री. राजेंद्र निबाळकर::—**हया एस्टीमेट नंतर वाढेल की नाही हे का , साईट पटटी नाही घेतली आहे हे ठिक आहे.

**सदस्य श्री दिपक सिरवानी**:— एक मिनीट साहेब, दोन वर्ष पहीले जर स्टॅडीग चा जर ठराव काढला तर आम्ही ५ करोडच्या वरती रोडचे काम करत नव्हते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**नाही,रू. ७ करोडचे काम केले आहे .

**सदस्य श्री दिपक सिरवानी**:— साहेब हया दोन वर्षामध्ये कमीत कमी १५ ते २० रोड सी.सी. पॅसेज चे बनविले आहेत. हे आहे ना की रू. १२ करोड असून सुध्दा साइड पटटी करत नाही. वाहनै उभी असतात. आणि म्हणतात की वाढणार. १३ करोड रूपये खर्च करून सुध्दा पेन्सील फॅक्टरी चा रोड अजून चालू करण्यात आलेला नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** जरूरी आहे की आम्ही त्या विरोधात नाही आहे,जो अधिकार असेल की आपल्याला तो अधिकार असेत की वारंवार स्टॅडीग मध्ये येईल, मीडीया मध्ये जाइल. रू. ५ व ५ लाखाचे

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** आता जे इस्टीमेट बनविले आहे त्यात प्रत्येक प्रभागामध्ये ५०, ५० लाखाचे मेडीटेशन देते आहे. ही कॅन्टीजंसी राहील.यादी तयार करण्यात आली आहे, त्यात ५०, ५०लाख देत आहेत तर ही कॅन्टीजंन्सी राहील. कुठे पण नगरसेवकाची कम्पलेट आली तर त्या ठिकाणी काम करू शकता. नंतर प्रसीजर मध्ये जाणे हे ते यासाठी आपल्याला जरूयरत पडणार नाही. ते ठरावामध्ये घेण्यात यावे. ५० लाख रूपये प्रत्येक प्रभाग समिती साठी

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**परंतु हे मुळ इस्टीमेट मधून घ्यावे जर काही झाले तर मुळ इस्टीमेट प्रमाणे न करणे असे करता येणार नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया:—**आमचे असे मत आहे की एस्टीमेट सोडून आपण

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**तर हे सर्व अनएंडींग होईल परत २ करोड मध्ये सुध्दा पुर्ण होणार नाही. कारण की प्रत्येक जण कोणी साइड पटटी १० फुट केली आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—**बघा, एक वर्ष झालेल आहे, पाटोल्स चे काम करण्यासाठी प्रयत्न करत आहेतै. पहीले ५(२) (२) मध्ये दिले तर यास मनाई करण्यात आली. नंतर टेंडर काढले, त्याची प्रोसीजर करत करत दिवाळी झाली. दिवाळीला काम चालू झााले पाटोल्सचे तेव्हा लोकांना कुठ थोडी सुटकारा मिळाला. पावसाळयापासून ते दिवाळीपर्यंत जे आम्ही भोगले आहे ना आम्हाला असे परत परत व्हावे असे आम्हाला नको पाहीजे. तो माझया प्रभागातच पटटा नाही घेतला त्याला दोन वर्ष पहीले पाटोल्स भरले होते तो त्यावेळेपासून बेफीक्री चौका पासून ते व्हाईट हाउस पर्यंत साइट पटटी केली होती परंतु आता ही पटटी केलीच नाही. अशी भरपूर ठिकाण आहेत जी सोडून दिलेली आहेत. आमचे म्हणणे आहे की हे ५० लाख देत आहेत, ज्या ठिकाणी मागणी असेल, अडचणी असतील त्या ठिकाणी उपयोग करावा. नाही आली तर काही नाही. काहीच हरकत नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—** ठिक आहे तर माझ्या हस्ताक्षरात आणि रिटर्न ऑर्डर नसेल तर १ फुट सुध्दा काम वाढणार नाही. ठिक आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदाारीया**:— आता हयावेळेस त्यानी टाकलेलेच नाही आहे. अशी भरपूर वस्तू आहेत, ते घेतलेलेच नाही आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया**:—यामध्ये असे आहे की बरेचसे रस्ते यामध्ये घेण्यात आलेले नाही. काही रस्त्याचे पाटोल्स धेतलेले आहेत. केलेले पूर्ण (फुल) आहे. त्याची क्वॉन्टीटी कमी झालेली आहे. त्यासाठी आम्ही वाढवून देत आहेत. आम्ही ५० लाख रूपये प्रत्येक प्रभाग समितीला देण्यात येत आहेत याचे पाहीले खडडयाचे पूर्ण काम

झाले पाहीजे. आणि जसे जसे पूर्ण केले तर नगरसेवकांनाकडुन मागणी येत आहे तशी ही काम पूर्ण व्हायला पाहिजेत. आणि या इतिवृत्ताची वाट न पाहता हे काम त्वरीत व्हायला पाहीजे.

**सदस्य श्री दिपक सिरवानी**:—साहेब, आपण जरा सुचना दयाव्यात की गतिरोधक जे ऑफिशियअल आहेत, जे सिमेंट ब्लॉक करण्यासाठी निघाले आहेत, कृपया सांगा परत परत तेच तेच होत असते.

**सदस्य,श्री.भारत राजवानी** :— कमिशनर साहेब, दुसरे आमच्या प्रभागा मध्ये जो काम करत आहे, केशू ठेकेदार त्याला जरा सुचना इंन्सट्रक्शन देणेत याव्यात, की त्याने सातत्याने काम केले पाहीजे, जेणेकरून लवकरात लवकर काम करून त्याचे फायदे होतील.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—** केशू कॉन्ट्रक्टरची कम्पलेट आहे.

**सदस्य,श्री.भारत राजवानी**:— नाही साहेब त्याची नेहमी प्लांट बंद असतो. आणि जुना रोलर घेवून येतो. साहेब आज पण त्याचे काम बंद आहे. ऐसी काम बंद आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर**:—सांगा

**उपअभियंती श्री, आश्विनी आहुजा:—** बंद आहे.

**सदस्य,श्री..भारत राजवानी:—** नाही साहेब, त्यांचे

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**आजपासून आणि यानंतर परत कॅलेंडर बनवा आणि प्रापरर्ली त्याला सांगा.जसे पहीले बनविले होते तसे आता हे ४० रोड आहेत. २० मध्ये पण काही सी.सी रोड बाकी आहेत का?

**उप अभियंता, श्री. आश्विनी आहुजा:—** ऐसी. बाकी आहेत साहेब,

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—** २० रोड तर पूर्ण झाले आहेत. त्याचा काही प्रश्न नाही आहे. ४० चे पूर्ण वेळापत्रक बनवा.

**सदस्य,श्री..भारत राजवानी—** साहेब, बी. एम केलेले आहेत. दोन दिवसात कसे पण करून ऐसी झाले पाहीजेत.

**सदस्य श्री दिपक सिरवानी:—** नवीन टेंडर मध्ये घेणार की पहिला जो टेंडर आहे त्याच्यामध्ये घेणार.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**ॲडीशनल मध्ये घेणार.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑**विषय क्र. १६ :—** वर्ष २०१७—१८ मध्ये पावसाळयापूर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाच्या सुधारीत प्राकलनास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

वर्ष २०१७-१८ या आर्थिक वर्षात ज्या रस्त्यांवर खड्डे पडले आहे अशा रस्त्यांची यादी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्रभाग क्षेत्र निहाय तयार करण्यात येऊन प्रभाग क्षेत्र निहाय खालीलप्रमाणे प्राकलने तयार करण्यात येऊन सदर प्राकलनांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया करण्यात आली. सविस्तर माहिती खालील तक्त्यात नमुद आहे.

**तक्ता क्र.१**

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत | मा.स्थायी समिती ठराव क्रमांक व दिनांक | निविदाकाराचे नाव | निविदाकाराने भरलेले दर | वाटाघाटीनंतरचे दर | रस्त्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्षेत्र क्र.१ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणे. | १२३६५११० | ठराव क्र.४५ दिनांक ०९/१०/२०१७ | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | ५.९४ | दरसुचीवर | १५ |
| २ | प्रभाग क्षेत्र क्र.२ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणे. | १८०९२८७९ | ठराव क्र.४६ दिनांक ०९/१०/२०१७ | मे.जयभारत कंन्स्टक्शन | ६.५७ | दरसुचीवर | १३ |
| ३ | प्रभाग क्षेत्र क्र.३ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणे. | १०९४०६९० | ठराव क्र.४७ दिनांक ०९/१०/२०१७ | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | ५.९४ | दरसुचीवर | १२ |
| ४ | प्रभाग क्षेत्र क्र.४ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणे. | १५०३५६२३ | ठराव क्र.४८ दिनांक ०९/१०/२०१७ | मे.जयभारत कंन्स्टक्शन | ९.८१ | दरसुचीवर | २१ |
| | **एकूण** | **५६४३४३०२** | | | | | **६१** |

शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याच्या कामाची निविदा प्रक्रिया करुन निम्न दराचे निविदाकार यांचे नावे दिनांक १३/११/२०१७ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित केले. संबंधित ठेकेदार यांचेमार्फत प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे. शहरातील एकूण ६१ रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम तयार करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार हाती घेण्यात आले.

सदर ६१ रस्त्यांचे सर्वेक्षण पावसाळयापूर्वी करण्यात येवून त्याप्रमाणे प्राकलने तयार करण्यात आली होती. तथापी कामाचा प्रस्ताव मंजूर होऊन निविदा प्रक्रिया होणेस विलंब झाला. त्यामुळे पावसाळयादरम्यान साधारणत: ऑगस्ट व सप्टेंबर मधील अतिवृष्टीमुळे शहरातील रस्त्यांवरील खड्डे जास्त प्रमाणात झाले. त्यामुळे संपूर्ण रस्त्यावरील (Full Width) खड्डे भरण्यात आले. यामुळे प्राकलनात समाविष्ट केलेल्या परिमाणात वाढ झाली.

काही ओबडधोबड रस्त्यांवरील नादुरुस्त पेव्हरब्लॉक काढल्यानंतर रस्त्याचे पृष्ठभाग कमकुवत असल्यामुळे पूर्ण रस्त्यावर सोलींग (WBM) करण्यात आले.

वरील कारणांमुळे खड्डे भरणेकरीता तयार करण्यात आलेल्या मुळ प्राकलनिय खर्चात वाढ होत आहे. सदर वाढीव कामाचे सुधारीत प्राकलन तयार करण्यात आले असून त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.२**

| अ.क्र. | कामाचे नाव | एजन्सीचे नाव | मुळ प्राकलनिय किंमत | सुधारीत प्राकलनिय किंमत (वाढीव खर्च) | एकूण होणारा खर्च |
|---|---|---|---|---|---|
| **१** | २ | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | प्रभाग क्षेत्र क्र.१ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणे. | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | १,२३,६५,११०/- | २,०१,००,०००/- | ३,२४,६५,११०/- |
| २ | प्रभाग क्षेत्र क्र.२ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणे. | मे.जयभारत कंन्स्टक्शन | १,८०,९२,८७९/- | ९५,००,००० | २,७५,९२,८७९/- |
| ३ | प्रभाग क्षेत्र क्र.३ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणे. | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | १,०९,४०,६९०/- | १,६०,००,०००/- | २,६९,४०,६९०/- |
| ४ | प्रभाग क्षेत्र क्र.४ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणे. | मे.जयभारत कंन्स्टक्शन | १,५०,३५,६२३/- | १,७५,००,०००/- | ३,२५,३५,६२३/- |
| | | एकूण | **५६४३४३०२** | **६,३१,००,०००/-** | **११,९५,३४,३०२/-** |

वरील स्तंभ क्र.५ मध्ये रस्त्यांवरील खड्डे भरण्याच्या कामाकरीता होणारा रु. ६,३१,००,०००/- (सहा लाख एकतिस हजार) एवढा वाढीव खर्च दर्शविला आहे. वास्तविक पाहता सदर वाढीव खर्च वर्ष २०१७-१८ च्या महापालिका अर्थसंकल्पातील “अ” अंदाजपत्रक भाग – १ क ६ (ii) “रस्ते दुरुस्ती” या लेखाशिर्षातून करणे अपेक्षित आहे. परंतू सदर

लेखाशिर्षात रुपये ७.०० कोटीचीच तदतूद करण्यात आली असल्याने मुळ प्राकलनिय किंमत रुपये ५,६४,३४,३०२/- वजा जाता रु.१,३५,६५,६९८/- एवढी रक्कम शिल्लक राहते. वरील तक्त्यातील स्तंभ क्र.५ मध्ये होणा-या रक्कमेकरीता एकूण रुपये ४,९५,३४,३०२ एवढया तरतूदीची आवश्यकता आहे. त्यामुळे सदर वाढीव खर्चाकरीता अन्य लेखाशिर्षातून तदतूदीचे समायोजन करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पातील अ अंदाजपत्रक भाग-१ क ४ (६) "नवीन रस्ते डांबरीकरण करणे" या लेखाशिर्षात रु.५,००,००,०००/- एवढी तरतूद उपलब्ध आहे. सदर वाढीव खर्चाकरीता आवश्यक असलेले रु.४,९५,३४,३०२/- एवढया खर्चाकरीता अ अंदाजपत्रक भाग-१ क ४ (६) "नवीन रस्ते डांबरीकरण करणे" या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूद "अ" अंदाजपत्रक भाग – १ क ६ (ii) "रस्ते दुरुस्ती" या लेखाशिर्षात समायोजन केल्यास वाढीव खर्चाकरीता तरतूद उपलब्ध होऊ शकते. लेखाशिर्षाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) 'अ' अंदाजपत्रक भाग–१ क ६ **(ii)** 'रस्ते दुरुस्ती | |
| मध्ये वर्ष २०१७–१८ साठी ठेवलेली एकूण तरतूद | :– रु. ७,००,००,०००/– |
| २) सदर कामावरील प्राकलनिय किंमत | :– रु. ५,६४,३४,३०२/– |
| ३) 'अ' अंदाजपत्रक भाग–१ क ६ **(ii)** 'रस्ते दुरुस्ती | |
| मध्ये शिल्लक तरतूद | :– रु.१,३५,६५,६९८/– |
| ४) तरतूदीच्या समायोजनासाठी अ' अंदाजपत्रक भाग–१ | |
| क ४ **(6)** 'नविन रस्ते डांबरीकरण करणे' मध्ये | |
| उपलब्ध असलेलें तरतूद | :– रु.५,००,००,०००/– |
| ५) समायोजित करावयाची रक्कम | |
| ६) वरील प्रमाणे समायोजन केल्यावर 'अ' अंदाजपत्रक | :– रु.४,९५,३४,३०२/– |
| भाग–१ क ६ **(ii)** 'रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षात | |
| उपलब्ध होणारी तरतूद | :– रु. ६,३१,००,०००/– |
| ७) या कामावरील खर्च | :– रु. ६,३१,००,०००/– |
| ८) शिल्लक तरतूद (अनु.क्र.४ मध्ये) | :– रु. ४,६५,६९८/– |

वरील वाढीव खर्चाच्या कामाकरीता फेरनिविदा प्रकिया केल्यास स्पर्धात्मक दर प्राप्त न झाल्यास पुन्हा मुदत वाढ देणे किंवा प्राप्त झालेल्या निविदाधारकांनी प्राकलनिय दरापेक्षा जास्त दर सादर केल्यास पुन्हा वाटाघाटी करणे या सगळया प्रक्रियेत वेळेचा अपव्यय होईल. शहरातील रस्ते सुस्थितीत राहणे आवश्यक असल्याने सदर कामास विलंब झाल्यास रिक्षा युनियन, लोकप्रतिनिधी यांची वारंवार तक्रारी प्राप्त होतात. त्यामुळे वर्ष २०१७-१८ मध्ये शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याकरीता जी निविदाप्रक्रिया केली होती, त्या प्रक्रियेलाच ग्राहय धरुन प्रभाग क्षेत्र निहाय कार्यारंभ आदेश निर्गमित केलेल्या निम्न दराच्या निविदाकारांकडून त्यांनी भरलेल्या दराप्रमाणे (तक्ता क्र.१ मध्ये नमुद) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत कामे करुन घेण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

वरील वस्तुस्थित लक्षात घेता सदर कामाचे रु.६,३१,००,०००/- एवढया वाढीव खर्चाकरीता लेखाशिर्षाचे समायोजन करणेस तसेच वेळेचा अपव्यय टाळणेकरीता सदर कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत कामे करुन घेण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकरीता सदर विषय मा.स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ८९ **दिनांक:– २/२/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७–१८ मध्ये पावसाळयापूर्वी उल्हासनगर शहरातील प्रभाग क्षेत्र क्र. १ ते ४ मधील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाच्या सुधारीत प्राकलनास रुपये ६,३१,००,०००/– एवढया वाढीव खर्चाकरीता लेखाशिर्षाचे समायोजन करणेस तसेच वेळेचा अपव्यय टाकणेकरीता सदर कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता तसेच या व्यतिरिक्त वाढीव काम निघाल्यास प्रत्येक प्रभागात ५० लाख खर्च करणेसाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

**कारण**

१) हे काम पावसाळयापुर्वी लवकरात लवकर होणे आवश्यक आहे.

२) शहरातील ब–याच रस्त्यांची ही कामे अजून अपुर्ण आहेत.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. १७ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्र. १७ :–** उल्हासनगर–३ येथिल वडोल गांव येथिल पुलाचे सुधारीत कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता मिळणे.

---

**सदस्य श्री दिपक सिरवानी:–** या विषयामध्ये मला संपूर्ण माहिती कोण देणार. १.२०चे काय आहे १.२५ काय आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:–** सर्व सत्ताधा–याचे सहमत आहे. सर्व काम वाढवायला लागते आहे. पाटोल्सचे काम वाढवले, प्रत्येक कामाला जास्त पैसे दयावे लागत आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–** मा. आयुक्त साहेब, मला एका प्रश्नाचे उत्तर पाहिजे पीडब्ल्यूडी विभागाकडून, जो आज आपण डांबरचे नविन रोड बनवत आहेत नविन रोड, जसे नेहरू चौक ते फॉलवर लाईन पर्यंत किंवा दुसरा रोड या रोड मध्ये भविष्य मध्ये एक वर्ष, दोन वर्ष, तीन वर्ष, झाले असतील तर फक्त २०,२० फुट बनवणार की पूर्ण ६० फुटाचा रोड बनवणार. खडडे पूर्ण भरणार. तीन वर्षनंतरचे सांगत आहे. तीन वर्षनंतर जर तीन वर्ष गॅरंटी तर होवू दया

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:–**तीन वर्षची कुठे गॅरंटी आम्ही सांगितली.

**उप अभियंता, श्री.महेश सितलानी:–** तीन वर्ष गॅरंटी आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** माझा प्रश्न फक्त समजून घ्या आणि माझया प्रश्नाचे उत्तर दया. एक नविन रोड आम्ही बनवत आहोत. नेहरू चौक ते फालवर लाईन पर्यंत, दुसरे पण जे डांबरचे नविन रोड, काजल पेट्रोत पम्प हे रोड बनले आहेत आणि त्याचे सगळे झाले आहे. त्याच्यावर जे खडडे होतात गॅरंटी वेळ संपल्यानंतर काही वेळानंतर पाटोल भरायचे आहेत पाटोल , नाली भरणार का मध्ये मध्ये पाटोल भरणार.

**उप अभियंता, श्री.महेश सितलानी:—** गॅरंटी वेळानंतर जर कुठेही खडडे होत असतील तर पूर्ण रस्त्यावर खडडे भरले जातील.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** हाच माझा प्रश्न होता.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—** हे सगळे त्याच्यावर निर्भर आहे ,आपले बजेट किती आहे, किती रस्त्यांची आपल्याला काम करायची आहेत.शेवटी याचे उत्तर यामध्येच आहे. किती पैसा आहे आणि किती रस्ते करायचे आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** असे कसे आता एक नवीन रोड बनविला आहे. १ नंबर बस स्टॉपचा मला वाटते की त्याचा गॅरंटी पिरिअड पण संपलेला नसेल, आज १ नंबर बस स्टॉप चा रोड आम्ही बनवलेला आहे नविन रोड बनला आहे, यामध्ये सर काय होत आहे की खडडा एक पण होत नाही आहे, मी आता कमिशनर साहेब आणि सर्व सदस्याना घेवून जावू शकतो, तो रोड ७ फुटाचा आहे अंतर किती आहे, २०० मीटर पण नाही आहे. ९५ मीटर रोड आम्ही बनवलेला आहे,

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**कोणत्या याच्यात बनवलेला आहे,

**उप अभियंता, श्री.महेश सितलानी:—** सर २०१२ चे आहे, वर्क ऑर्डर कोनार्कची त्याची लायबीलीटी पिरिअड २०१५ पर्यंत होते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**ठिक आहे. २०१५ मध्ये होत तर काम पण २०१५ ला पूर्ण झाले.

**उप अभियंता, श्री.महेश सितलानी:—**नाही सर २०१४ ला पूर्ण झाले होते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**कितीची होती लायबलीटी?

**उप अभियंता, श्री.महेश सितलानी:—** नाही सर, ३ वर्षाची होती.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**तर कोटींग मध्ये एक वर्षात कसे काय पूर्ण झाले.

**उप अभियंता, श्री.महेश सितलानी:—**बी एम झालेले होते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** ऐका, माझे एका,

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**नाही नाही पूर्ण कशाचे सर,मी सांगतो ४५ लाखाचे वर्कआर्डर होती. वारंवार सांगून २०१२ पासून काम झालेले नाही, २०१५ मध्ये जेव्हा मी पत्र दिलेले आहे, तारीख बघा, माझ्या पत्राची तारीख, की रिस्क अॅन्ड कास्ट वरती एखादया कंपनीला दया. २०१५ मध्ये मी देत आहे रिस्क अॅन्ड कास्ट वरती तर २०१४ मध्ये पूर्ण कसे काय झाले. त्यांनी सांगितले की हां त्या ठेकेदाला धमकावून, दुस—याला देणार म्हणून त्यांनी पूर्ण केले. ठिक आहे, पूर्ण झाले..... आज हा रोड बनविल्यानंतर ९५ मीटर चा एक तुकडा जेव्हा पाटोल भरण्यासाठी गेले. तेव्हा त्यांनी काय केले आहे १० फुट हया साईडला व १० फुट त्या साईडला २० फुट सोडून दिलेल आहे. तर त्या ठिकाणी खडडा एक पण नाही. खडडा बनवला गेला आहे, कसे बनवला गेला बघा,दोन्ही बाजेला साइड सोडल्यावर खडडा आपोआप तयार झाला. हे तीन इंच खाली झाला, तीन इंच वरती आता काय झाले दुस—या वेळेस परत पाटोल भरणार परत एक थर वाढणार परत ६ इंच होणार असे का करत आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर:—**आता पण आपला बजेट १२ करोड रूपये चा आहे,रिवाइज केल्यानंतर पैसे तेवढेच खर्च करायचे आहे, आणि साईड पट्टी पण करायची आहे, तर ६१ मधून २० रोड काढून टाकावे लागणार आहेत. कोण कोणते काढायचे आहेत ते सांगा पूर्णच्या पूर्ण काम करून घेवू.

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:—** बजेट कमी आहे तर छोटे करणार.

**सदस्य, दिपक सिरवानी**:— माझा एकच रोड आहे तो काढून टाका परंतु त्याच्या ऐवजी दुसरा कोणता रोड बनवत आहेत, ते आम्हाला सांगण्यात यावे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**याचा अर्थ असा की बनविण्यात आलेले रोड हे खराब करू नका. आज आम्ही बना बनवलेला रोड आहे. त्या ठिकाणी साइड, साइड सोडून देत आहेत फक्त १० ,१०फुट किंवा ५, ५,फुट कितीपण तर हा समोरून बनविण्यात आला असून, साइड तुटलेली आहे. ५० लाख रूपये आम्ही वाढवून देत आहेत.

**सदस्य,श्री. भारत राजवानी** :—सर प्रदुषण किती होत आहे.

**उप अभियंता, श्री. जितु चोईथानी:—** सर मी रिवाइज साईड फोल्डर घेतलेल आहे,

**आयुक्त राजेंद्र निंबाळकर**:— सर्व घेतलेले आहे का?

**सदस्य,श्री. भारत राजवानी** :— आता तर सितलानी ने सांगितले की साइड फोल्डर घेतलेला नाही.

**उप अभियंता, श्री.महेश सितलानी:—**जे पण आणि जिथे पण काम झालेले आहे धोबीघाटचे काम असेल, बस स्टॅंडचा रोड असेल,....सर ते लिकेज आहे, ते मी जाणूनबजून सोडण्यात आलेले आहे. पाण्यावरती मटेरिअल टाकू शकत नाही. आणि सर जिथे आणि जे पण रस्ते बनलेले आहेत ते एकदम व्यवस्थित आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**कामाच्या बाबतीत आम्ही बोलत नाही. आम्ही नाही सांगितले की काम चांगले केले नाही. परंतु हा लहानसा तुकड सोडून देत आहेत,

**उप अभियंता, श्री. जितु चोईथानी:—** सर आपल्या इथ सुध्दा मी सोडलेले आहे, आपल्याला माहीत असेल की आशा कोल्ड्रींग या ठिकाणी मोठी लिकेज आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**तो लिकेज तुकडा सोडा, बाकीचे बनले आहे ना.,

**आयुक्त, श्री. राजेंद्र निबाळकर**:— घेतलेल आहे असे म्हणताहेत सगळे घेतलेल आहे का. ठिक आहे .

**सदस्य,श्री. भारत राजवानी**:— कमिशनर साहेब, नेताजी ते गांधी रोड साइड पटटी ११ वर्ष मध्ये कधीच वाढली नाही. माझी विनंती आहे की आपण आदेश दिले तर साइड पटटी भरून घेतील.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** पहीले भेटले नाही का, विषय संपून गेला दुसरा विषय पण वाचला आहे मॅडमने, तुम्ही पाटोल विषयावरच चर्चा करत आहेत.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी**:— ठिक आहे, वडोल गावाच्या विषयावर कोण माहिति देणार आहे, संदिप साहेब यामध्ये पहिला टेंडर काय होते. २०१४ चा त्याच्यात काय होते किती रक्कमेचा होता.

**उप अभियंता, श्री. संदिप जाधव:—** या मध्ये .२.५४ सी.आर. चा होता. एक वर्षची टर्म होती.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी**:— या मध्ये त्याची लांबी किती होती.

**उप अभियंता, श्री. संदिप जाधव:—** ६० मीटर.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी**:— ६० मीटर, म्हणजे यामध्ये पूर्ण नदी आली २०० फुट असलेली, ब्रीजची चालु लांबी किती आहे.

**उप अभियंता, श्री. संदिप जाधवः—** ६० मीटर.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी**ः— ६० मीटर पहिली विडथ किती होती?

**उप अभियंता, श्री. संदिप जाधवः—**९ मीटर.

**सदस्य,श्री.दिपक सिरवानी**ः— ९ मीटर, आणि अप्रोचींग रोड जो ओटी पासून ते वडोल गांव पर्यत जात आहे याचे काही आपण नियोजन केले होते का?

**उप अभियंता, श्री. संदिप जाधवः—** नाही. नाही.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी**ः— नाही, काही पण नाही.

**उप अभियंता, श्री. संदिप जाधवः—** नाही नाही, रॅम्प घेतल होते दोन्ही बाजूने.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानीः—** अप्रोचींग रोड आहे १० फुटाचा.

**उप अभियंता, श्री. संदिप जाधवः—**एक्झीस्टींग त्या ठिकाण १०ते १२५ फुटाचे घेतले होते.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी**ः— ब्रीज होती १० फुटाची आता आम्ही ९ मीटर केली लगभग ३० फुटाची. आता तुम्ही अप्रोचींग रोड किती फुट देणार.

**उप अभियंता, श्री. संदिप जाधवः—** गुलराज टॉवर च्या ठिकाणी जे आपल्याला मिळत आहे एक्झीस्टीग रोड तेवढाच आहे.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी**ः— लगभग यामध्ये ३० ते ४० घर जे आहेत ते जात आहेत.

**उप अभियंता, श्री. संदिप जाधवः—**नाही,नाही सर, पूर्ण रोड नाही दिला सर, फक्त रॅम दिला आहे.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानीः—** आपण जे सांगत आहात की ९ मीटरचे ब्रीज घेतला आहे, अप्रोचींग रोड,

**उप अभियंता, श्री. संदिप जाधवः—** तेच सांगत आहे सर, :—एक्झीस्टींग रोड जो मिळत आहे ना आपल्याला त्यालाच रॅम आहे, नाही त्यात धरल नाही.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी**ः— आज आपण ब्रीज बांधत आहोत, त्याचे प्लानींग देवू शकत नाही, रोड कोणता जाणार आहे त्याच्यासाठी किती लोक हे बेघर होणार आहेत त्यांना घर कुठ देणार आहेत., ते पण ४० ते ५० वर्षपासून चे टॅक्स पेयर आहेत.

.**सदस्य, श्री.दिपक सिरवानीः—** पहिले हा माझा वार्ड नव्हता पण आता हे माझा पॅनल मध्ये येते.म्हणून मी माहीती करून घेत आहे

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरीः—** ब्रीज ३० फुटाचा बनत आहे तर रोड पण ३० फुटाचा पाहिजेना.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** हेच तर मी विचारत आहे, ३० फुटामध्ये एवढी घरे जात आहे त्यांचे काय करणार आहेत.

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी**ः— फायदा काय आहे.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी**ः— हे जे घर तुटतील त्यांनी कुठे जायचे.

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी**ः— तिकडे केमीकल सोडतात नंतर इथून केमीकल सोडतील.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी**ः— यामध्ये माझी एक विनंती आहे की जसे त्यादिवशी विजिट केली तर मातीचा एक ढिग निदर्शनास आला, नदीपासून काही अंतरावर दूर आहे. हा जो मातीचा ढिगारा आहे ती प्रल्हाद गायकवाड इसमाच्या नावावर अलाट झालेला आहे. त्याच्या जवळ सात बारा उतारा आहे. तो मी आपल्याला उदया किंवा परवा कॉपी देत आहे. त्याच्यानंतर मी त्याच्याशी बोललो केली की १० ते १५ घरे बेघर होत आहेत, त्यांना तिथ

आपण लॅड अपॉईट अलॉट  करणार, हे एक  सर्व साधारण रक्कम (नॉमीनल अमाउट) मध्ये देणार,  तर हा पण आमचा विषय दूर होईल. त्या ठिकाणी १० फुटा एवजी त्या जागेवर जास्तीत जास्त आम्ही २० फुट करू शकणार, अप्रोचींग रोड,आणि आतमध्ये १५०० ते २००० इतकी लोकसंख्या आहे त्यांच्या साठी ३० फुट करणार तर मला नाही वाटत सर एका गल्ली मधून ट्रक जावू शकेल किंवा दोन कार जाउ शकतील हे आपल्यासाठी समाधानकारक आहे. यामध्ये कोणाचे नुकसान नाही झाले पाहीजे.याठिकाणी पहिलेच एक तर के.बी. रोड चा मुददा आला आहे. आता ४०, ५० घरांचे माझ्यावर येणार. ही जी माती आहे त्यापासून आपले २५ लाख रूपये वाचत आहे. आणि हे जे १०, १५ घरे जात आहेत त्यांना आपण लॅड अलॉट करणार. त्यांनी आपल्या स्वखर्चाने बनवावे. माती काढायची काही गरज नाही. नदीपासून सर कमीत कमी १० फुट पुढे आहे.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी**:—भिंत बनविणार, १ ते २ मीटर आत येईल बस.

**सदस्य श्री.भारत राजवानी:—** भिंत बनविली तर ठिक आहे.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी**:—आपण पाहिले तर नदीचा सगळयात मोठा टर्न त्याच ठिकाणी आहे, १०० फुटापेक्षा जास्त आहे.  माझी विनंती आहे की या विषयासाठी (सपोर्ट करा) सहमती दर्शवा.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया:—** ठिक आहे,मुळ प्रकरण जे १.२० लाखाचे जे प्रकरण दिले आहे. या वर चर्चा करूया.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**आपण मला एक गोष्ट सांगा की आपण, तुम्ही या मी आपण टेक्नीकल माणूस आहोत का? जेव्हा त्या ठिकाणी इंजिनिअर विजिट करत आहेत,

सदस्य, श्री. दिपक सिरवानी:— आपण त्या ठिकाणी बघितल होते का ही जागा कोणाची आहे?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** नाही मी सांगत आहे ना.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— आपण का म्हणत आहात की माती काढा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** त्या बाबतीत मी नाही बोलत आहे. जर कोणतीही प्रापर्टी हटवायची आहे तर हे आयुक्त साहेबाचे काम आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— कोणालाघर देत आहे तर काय नुकसान आहे?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** आपण सांगा की टेक्नीकल जे आहेत जे

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— आपल्यालाच अडचण आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** आपल्याला पण अडचण आहे परंतु आपण टेक्नीकल नाही आहे. मी फक्त आयुक्त साहेबाना सांगितले होते. की या ठिकाणपासून पाणी जाईल की नाही जाणार. टेक्नीकली काय झाले पाहीजे आपण विजिट करा. आयुक्त साहेबांनी पर्ण टीम सहीत, कन्सलटन्स बरोबर विजिट केलेली आहे.इथून चार पाच पिल्लर काढायला पाहीजेत. हे टेक्नीकल काम आहे बाकी प्रॉपर्टी कोणची आहे. जर कुठे पाणी मध्ये पूरामध्ये कोणाची जागा जात असेल तर निर्णय घ्यायाचे आयुक्तांचे काम आहे, प्रशासनाचे काम आहे. आमचे नाही आहे, आम्ही त्यांचे वकील बनून वकालत करण्यासाठी नाही निवडून आलो आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— मी वकाली नाही करत आहे. दोन वर्षपासून  लोकांना बेघर होण्यापासून वाचवत आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** बेघर कोणी नाही आहे खुली जागा आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— खुली जागा आहे तर वसाहत करू दया. यामध्ये आपल्याला काय अडचण आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** हे टेक्नीकल लोक पाहतील.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— आपण का सांगत आहात की इथून ढिगारा काढा. मी असे सांगतो की आपला यात काही स्वार्थ आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** मी माझ्या स्वार्थसाठी करत असतो तर, आयुक्त साहेबांनी निर्णय घेतला आहे मी नाही घेतला.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— आमच्या पॅनलचे आम्हाला माहीत आहे आपण सभागृह नेता आहात, आपली पण जबाबदारी आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** नाही नाही निर्णय कोणी घेतला आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** कमिशनर साहेबांचे नाही, हा आपला विषय होता की हा ढिगारा काढून टाका.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** सर काही चूकीचे निदर्शनास येईल तर माझो काम आहे प्रशासनाला दरखवायचे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— ही जी नदी आम्ही जागेवर उभे राहून साफ केलेली आहे. त्याचा जो घेरा बनविलेला आहे. त्या वेळेला बघितल असते तर आमच्या साठी अजून चांगले झाले असते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** वर्षानुवर्ष ठेवण्यात आलेली आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— ही काढण्यात आलेली आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** हा काही माझा विषय नाही आहे, मी आपल्याला विचारत आहे की, आयुक्त ने एस्टीमेट बनविलेली आहे. ही टेक्नीकल लोकांच्या समतीने बनविण्यात आली आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— तिथे आम्ही चार लोकांचे घर बसवू शकतो. यात आपल्याला काय अडचण निर्माण होत आहे. काय त्रास आहे?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** घर वसवायचे आपली जबाबदारी नाही आहे, कुठे बनवायचे आहे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** मी प्रस्ताव बघत आहे. के. बी. रोडचे पण प्रशासनालाच बघावे लागेल का.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** हे प्रशासनालाच बघावे लागेल. आपण सांगू नका हे प्रशासन बघेल. आताच्या परिस्थितीत माती खाली जागोवरती पडलेली आहे तिथ काही आज घर बेघर झालेले आहे. माती काढायची

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— मी उदया कमिशनर साहेबाना या जागेचे पेपर्स देतो, ठिक आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—** नाही, साहेब हे जरा बघा जागेचे पेपर आहेत की नाही आहेत, काय आहे, काय नाही हे जरा साहेब आपण बघा.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** पूर्ण उल्हासनगर मध्ये जी सिमा आखलेली आहे. अशोकनगर आहे ,पहूमल कम्पाउंड आहे हिरा घाट आहे सर्व नदीच्या किना—यावरती आहेत सर्वच्या सर्व तोडणार का? दीड वर्ष झाले आपण अजून याच विषयावरती आहोत, त्याचे प्रोकलेन बिनकामाचे पडलेले आहे आहे माती काढण्यासाठी, त्याचे भाडे चालू आहे का याचे पण आरोप लावू शकतो.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**प्रशासनाने सांगावे सभागृहाला, माझ्यावरती आरोप लावून.... प्रशासनाला सांगा की माझा सांगण्यावरून एस्टीमेट बनविलेले आहे का, की मी आयुक्त साहेबा वरती दबाव आणलेला नाही आहे. मी फक्त सांगीतले होते की विजीट करा अधिका—यावरती मी बोली लावलेली नाही. अधिकारी सदर जागेवर जावून बघून आले व त्याना चांगले वाटले आणि त्यांनी एस्टीमेट बनविलेली आहे, असे नाही की, आयुक्त साहंबानी खुलासा करावा की मी जोरजबरदस्ती करून केलेले आहे का?

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— कोणाला जर घरे मिळत असतील तर आपण सर्पोट केला पाहीजे. त्यात कोणाचे काही नाही आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**जे कोणी काम सांगितले की घर जाण्याची काही गोष्ट नाही आहे. त्यानी सांगितले आहे खुले मैदान आहे खुली माती आहे पाणी गेले पाहीजे पाणी जाण्यासाठी रस्ता केला गेला पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** कमिशनर साहेब आपण ठरवा, तसे हे सहज सोपे नाही आहे कोणाची जागा घेणे.

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी व सदस्य श्री. राजेंद्र चौधरी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**<u>आयुक्त,श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:— या जागेवर दुस—या ठिकाणहून जेसीबी येवू शकतो का? स्लॅब वैगेरे झाल्यानंतर भविष्यमध्ये, ब्रीज च्या त्याबाजूने येवू शकतो का? जे पण खाली करायचे असेल तर आताच करावे लागेल. हा एक मुददा आहे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** मुददा नाही आहे अचानक एक मुददा कुठुन आला, आज जो नदीचे जे बघितले २ वर्ष नदी साफ करूनघेतली आहे, माती काढण्यात आली आहे सर्व काढण्यात आले आहे आपल्याकडे पूर्ण विडिओ चित्रिकरण केलेले आहे. आज असे का सांगण्यात येते की माती इथून काढण्यात आली आपण पण बघितले, साहेब सिमा आता लावण्यात आलेली आहे. मी आपल्याला सांगितले की आपण आलेले ही त्यासाठी होते.

**<u>आयुक्त,श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:— त्याची साईज आहे हा पूर्ण ,त्यानंतर त्याचे आयुष्य पूर्ण वाढत आहे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:— एक दांन पाच मिटर पर्यंत जर आपल्याला वाटले की आहे, सर १०० फुटाचे वर आहेत.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:— आता जर ब्रीज चे फ्लो जर बघितला तर तिथे जाउन जे ब्रीज साईज आहे, तिथे येवून एकदम नॅरो

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी व सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:— एकदा त्या ठिकाणी विजीट करून आपण त्या ठिकाणी निर्णय दया. आपण भेट देवून नंतर निर्णय दयावा. तो पर्यंत हा विषय पेंडींग ठेवा. मी आपल्याला सपोर्ट करणार ब्रिज चे काम पेंडीग नाही ठेवायचे. हे जे माती काढणार आहे प्रल्हाद गायकवाड त्याचे कडे पेपर आहेत किंवा नाही आहेत, हे बघीतले पाहीजे. दोन दिवसासाठी (तहकुब) डिफर करा.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**जर कोणााची मालमत्ता आहे, टेंडर झालेले आहे नदी बनविली जात आहे नाला बनविला जात आहे, याला तर आपण थांबवू शकत नाही. मा. आयुक्त जी हा आपला निर्णय आहे. त्याला डीडीआर देवून त्या ठिकाणची माती काढली पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:— मी सभापती महोदयाना विनंती करतो की दोन दिवसासाठी हया विषयासाठी ही सभा तहकुब करावी.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**मी एक दिवसासाठी सुध्दा सभा तहकुब करण्यास तयार नाही आहे. हे माझे मत आहे की मा. आयुक्त साहेबानी पूर्ण टिम घेवून विजीट केली आहे. मी फक्त त्यांना

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** त्या दिवशी आपण विजीट करून घेतली.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**त्या ठिकाणावरील माती हटवायला पाहीजे.माती पडलेली आहे पावसाळयातील पाणी येणार त्याला टक्कर मारून उजव्या बाजूने जाणारव त्याची रुंदी कमी होत आहे. पाणी जावू शकत नाही जर काम होत असेल तर सरळ होवू दया. नाही तर बनवूच नका पुन्हा पुन्हा लोक विचारत आहेत. वडोल गांव बनत नाही आहे शहरामध्ये बदनामी होत आहे. वडोल गावाचा ब्रिज चांगल्या मार्गाने बनला गेला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:— दोन दिवस लेट करणार ना यामध्ये कोणाची बदनामी होते.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**या विषयासाठी वोटींग झाली तरी चालेल. जे काम मी आयुक्त साहेबाना सांगितले , त्या निदर्शनास आणून दिले, आणि आयुक्त साहेबानी त्या ठिकाणी भेट दिली, आणि इंजिनिअरांनी एस्टीमेंट

बनविले त्यांना चुकीचे मी ठरवू शकतो का, की आपण करू शकता. मी तर फक्त स्थायी समिती मध्ये भेट देण्याबाबत निवेदन केले होते की आयुक्त साहेबांना सांगितले की हया हया अडचणी इथे आहेत. त्यांनी मान्य केले, इंजिनिअर्स नी मान्य केले. आम्ही टेक्नीकल सांगणारे कोण आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– शेवटच्या वर्षातील याचे फ्लट लेवल वैगेरे आहे का.

**उप अभियंता, श्री. संदिप जाधव–** स्लॅब चे जे टॉप आहे ते फ्लट लेवल याचेतूनच घेतली आहे. म्हणजे एक्झीटींग ग ब्रीज वरून १ मीटरवर.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर** :– म्हणजे याच्यातून पाणी येते का.

**उप अभियंता, श्री. संदिप जाधव–** होय.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–** तर हे काढून टाकावे लागेल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर** :– नाही नाही आपण पण लोकांच्या हिताचे बघत आहात. आपण जर दुस–याना हे करत असाल पूर तिथ पर्यंत आला तर आम्हीच त्यांच्या हवाली करत आहेत असे होईल. फ्लो जर जास्त असेल तर आजूबाजूच्या घरांमध्ये पाणी जाईल, ब्रीज बनवून देखील फक्त येण्या जाण्यासाठी रस्ता बनवणार परंतू नाल्याचे फ्लो….आणि भविष्यमध्ये पण काम होणार नाही. म्हणून मी विचारले समजा आज हे… आणि पाण्याचा प्रवाह बघून करायचा विचार करत आहेत तर हे शक्य होणार नाही.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– दोन दिवस डिफर करून माझ्याबरोबर विजिट करू शकता. जमनुजी मला बोलू दया.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**मी डिफरच्या फेवर मध्ये नाही आहे, आयुक्त साहेबानी अेगोदरच विजिट केलेली आहे, आमचे अधिका–यांनी विजिट केलेले आहे. आम्ही एक तास अजून बसू शकतो तेव्हाच निर्णय केला जाईल.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– आयुक्त साहेबांना मी दोन दिवसात पूर्ण माहिती देणार आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–** एक प्रॉपर्टी दुस–याची आहे हे आयुक्त साहेब सांगतील का खाली करण्यासाठी. काढत आहेत त्याची प्रॉपर्टी काढत नाही आहे. पाणी वाहत जाण्यासाठी माती काढत आहोत.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– आयुक्त साहेब निर्णय घ्या.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– नाही,नाही मी काळजी पूर्वक सांगत आपण मला त्या ठिकाणी काय दाखवण्याचा प्रयत्न करत आहात ते सांगा.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– साहेब त्याठिकाणी चार किंवा सहा नविन घरे बनवू शकतो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– नाही, ठिक आहे बसवायचे आहेत आपल्याला.आम्ही जेवढे

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– आयुक्त साहेब जेवढ कट करायचे असेल तेवढे सांगा आम्ही गाववाल्याना तेवढे सांगू शकतो.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**माती जेवढे हटवत आहात तेवढे, आयुक्तजीने सांगीतले पूर्ण हटवण्यासाठी नाही सांगितले. हजार मीटर जागा वाचत आहे, ५० घर बसू शकतात.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:–दोन दिवसासाटी डिफर करा. सभापती महोदय,

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– निर्णय आपल्याला घ्यावा लागेल.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– दोन दिवसांनतर हा निर्णय आहे तर तो मला मान्य करण्यास तयार आहे. परंतु आपल्याला एक वेळा त्याठिकाणी परत जावून बघितले पाहीजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– आपण एक काम करा, डिफर करून येणा–या मीटीग मध्ये, अजून काही विषय येणार आहेत का? एक दिवसासाठी,

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—** ही सभागृहाची मालमत्ता आहे, सभापतीची नाही आणि कोणाची नाही. ही मालमत्ता जी आलेली आहे या ठिकाणी ही सगळयांची झालेली आहे ही एकटयाची नाही. ही मालमत्ता एक सदनची मालमत्ता आहे, याला कोणीही डिफर करायला सांगत असतील तर मी मान्य नाही आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— त्या ठिकाणी एकदम सोपे पण नाही आहे की एकदम माती काढायला देतील.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—** त्याच्यासाठी आपले प्रशासन सज्ज आहे, तयार आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— चांगल्या प्रकारे झाले पाहीजे. येथील सर्वाना विश्वासात घेवून मला काम करायचे आहे. आपला वार्ड नाही, माझा वार्ड आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—** आपल्या वार्डच्या भल्यासाठी मी हे सर्व करत आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— माझे म्हणणे असे आहे की ज्यांचे घरे तुटतील, तर चार गरीब लोंकाना घरे मिळतील.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—** आता नाही झाले तर कधीच होणार नाही.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— ठिक आहे साहेब मी आपल्यावर सोडत आहे. जर आपल्याला एवढी घाई आहे भरपूर विषय आहेत. ज्यामध्ये आम्हाला घाई केली पाहीजे. दीड वर्ष झाली साहेब आणि सहा सहा महीने काम बंद आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— आता आपल्याला काय आहे की, पावसाळया पूर्वी हे काम पहिले करावे लागेल, एक एक दिवस भारी पडत आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— दोन दिवस दया साहेब.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— माझी रिस्पेक्ट ठेवू शकता साहेब. मी विश्वास देत आहे. विषय काय आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— ठिक आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारीयाः—** नाही, प्रभागामध्ये टोनी सिरवानी आहे, शिवाजी रगडे आहेत आणि दुसरे नगरसेवक, यांच्याबरोबर कमिशनर साहेबांनी जावे. कमिशनर साहेबांनी विजीट करून त्याचे पॉईंट ऐकावे. दोन दिवसासाठी काही मोठी गोष्ट नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**जर कमिशनर साहेब जावून आले असतील आणि माती काढावी लागेल असे सांगत असतील.

**सदस्या श्रीमती कविता पंजाबी** :— एक मिनीट दादा दोन दिवसासाठी गेले तर काय झाले.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**आयुक्तजी बोलत आहेत का? आयुक्त साहेबांचे म्हणणे ही नाही आहे. कारण की डिफर करून काही होणार.जो निर्णय झालेला आहे हे आयुक्तजी करत आहेत का. आयुक्त साहेब जावून आले सर्व इंजिनिअर जाऊन आले. याची फ्लड लेवल सांगत आहेत पाण्याची लेवल

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— सभापती महोदय, आपण हा विषय दोन दिवसासाठी डिफर करा. मी बोलत आहे, की यात आपण घेवू नका.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**माझे वोटीग नोंद झाले पाहीजे की आयुक्त विजीट करून आले आहेत.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— आले काय.

यावेळी सदस्य श्री. राजेश वदारिया हे सभागृहातुन बाहेर गेले. 

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**भले वोटींग होवू दया परंतु माझे हे आहे आयुक्त साहेंब टेक्नीकल कोण आहेत, आपण, आम्ही आपल्या बरोबर टीम आहे, ही टेक्नीकल आहे, की मी, मी फक्त आपल्या निदर्शनात आणून दिले होते, की हे काम झाले पाहीजे असे सभागृह नेता म्हणून मी विजीट केली आणि मला जेव्हा कळाले की मातीचा ढिग दिसण्यात आला, मी आपल्या निदर्शनास आणून दिलाआपण आपल्या टिम सोबत भेट देवून आले व आल्या बरोबर असल्याचे समजले व ठिक वाटले, आपण इस्टीमेंट बनवून दिले, आणि हे अतिआवश्यक कामामध्ये एक काम आहे. पाण्याची लेवल वरती वाढत आहे हे सर्व होत असून परत हया गोष्टी साठी जिद्द करणे, वडोल गांव नंतर सुध्दा आम्ही बोलत असतो,व्हॉटसअप वरती पाठवत असता माझा पॅनल आहे ,वडोल गाव चे पूल बंद झाले.

**सदस्या श्रीमती पंचम कालानीः—** सर,जर दोन दिवसाची गोष्ट आहे तर काय झाले त्यात जिदृदेच काय कारण आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**मला एक सांगा मॅडम, दोन दिवसानी काय होणार आहे.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी :—** नाही नाही, जर आपण बरोबर असेल तर आपले होणार जर ते बरोबर असतील तर .....

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**हे  तर कमिशनर साहेब निर्णय सांगत आहेत. इंजिनिअर सांगत आहेत ना भेट देवून आले आहेत ना. वडोल गांव एक दिवसाचा विषय नाही आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**ः— कमिशनर साहेबाचा विषय नाही आहे, हा आपला विषय आहे स्टॅडीगचा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—** दोन वर्षात एका तरी इंजिनिअरने सांगावे की मी वडोल गावचा पुल बघितला नाही आहे. तर मी दोन दिवस काय दहा दिवस टाईम देतो.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—**   याच्या आगोदर आपण कधी आले होते. वडोल गावामध्ये,

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**मी याच्या पहिले आलो हा विषय नाही आहे माझा असा विषय आहे की, आमच्या मध्ये असा इंजिनिअर आहे का त्याने वडोल गाव अजून बघितलेले नाही. दोन दिवसात वेगळा काही निर्णय घेणार का कोणी, इंजिनिअर बोलत आहेत का दोन दिवसात वेगळा निर्णय घेवू. दोन दिवसानंतर काय निर्णय घेणार हे मला सांगा कमिशनर साहेब.

यावेळी सदस्य श्री. राजेश वदारिया यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** हे कमिशनर साहेब नाही, हा निर्णय स्टॅडीग मध्ये घेणार, साहेबांच्या सहमतीने.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**ज्या विषयाला आम्ही अॅडजॉन करत आहोत हा विषय कमिशनर साहेबानी आणला आहे.आणि आयुक्त साहेबानी सहमती दिलेली आहे.यानंतर जर मी सभागृह नेता बोलत आहे या सभागृहामध्ये एक विषय पास करून दाखवा. यानंतर एकही विषय पास होणार नाही. हा जर आयुक्त साहेब बोलेले की हा निर्णय चूकीचा घेतला आहे तर.....

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**ः— जर बरोबर आहे तेच बोलणार. कमिशनर साहेब वाटर फ्लो मध्ये जेवढी माती येत आहे, उदया आम्ही विजिट करणार,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—**आयुक्त साहेबांना जेवढी माती हटवायची आहे तेवढी हटवा हे मी सांगणार नाही. एक फुट चागली वाटली एक फुट हटवा.

**आयुक्त, श्री राजेंद्र निंबाळकर**ः—असा आपण निर्णय घेवू शकतो का हा निर्णय पास करून प्रशासनावरती टाकून दया.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**हो.

**आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकर**ः— आपण पण परत विजिट करू, हा जसा विषय आला तसा

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**या विषयाला जसे आयुक्त साहेब बोलत आहे जसे पास करा.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**ः— माझा विषय हा आहे की, जो ४ घरे दहा घरे जात आहेत.

**आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकर**ः— जे पण आहेत बरोबर आहेत, जे पण घर जात असतील,

**सदस्य, श्री. राजेश वधारीया**ः— रिटेनींग भिंत बनवून घेवू. त्यानंतर तर आपण देवू शकतो ना.

**आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकर**ः— जो बरोबर आहे तो निर्णय घेवू.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**ः—डिफर साठी माझा निर्णय आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**हा जसा विषय आला तसा पास करावा. जसे आयुक्त साहेबानी पाठवलेला आहे तसा पास केला पाहीजे, आणि जर आज फक्त साहेबांना वाटत असेल की हे दोन फुट कटींग करायचे आहे किंवा किती तेवढे आयुक्त साहेबांना प्राधिकृत करत आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**ः— यांना आमच्या मताची सहमती नाही आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**मिनीटस मध्ये त्याची नोंद व्हायला पाहीजे की प्रशासनाच्या दृष्टीने प्रस्ताव आलेला आहे त्या प्रमाणेच पास करणेत यावा. या मताशी मी सहमत आहे आणि यानंतर सुध्दा जर आमचे इंजिनिअर, आमचे टेक्नीकल लोक, आयुक्त साहेबाना प्रधिकृत करत आहे, आणि त्यांना जर वाटले की हटवू नका तर नका हटवू. जर काढायचे वाटत असेल परंतु नाही हटवले आणि जर पूर आला तर त्याची जबाबदारी कोण घेणार. ही जबाबदारी प्रशासनाची असेल.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**ः—मी पण आपल्याशी सहमत आहे, दोन दिवस डिफर करून आयुक्त साहेब आणि इंजिनिअर्स यांच्यावरती ठेवणार किती वाटर फ्लो मध्ये येत आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**हे तें सांगणार**.**

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**ः—माझ बोलणे संपवू दया, मी दोन दिवसानंतर किंवा उदया आयुक्त साहेबां बरोबर भेट देवून गाववाल्याना सोबत घेवून सांगू शकतो की हे इथून जात आहे. संपला विषय. विश्वासात घेवून त्याना सांगू शकतो नक्की हे काय आहे. आपण पास करून जावू परंतु नंतर आपल्याला त्यांना तोंड दाखवायचे आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**जेव्हा आज माझ्या सांगण्यावरून आयुक्त साहबांनी विजिट केलेली आहे सर्व नगरसेवक आज इथे आलेले आहेत, जरूरी गोष्ट आहे की ही माती हटवायला पाहीजे,आणि आपल्या टेक्नीकल लोकाचे म्हणणे आहे की माती हटवली पाहीजे, दोन दिवस काय दहा दिवस अॅडजान करण्यासाठी मी तयार आहे. परंतु टेक्नीकल जे इथ बसलेले आहेत त्यांनी फ्लड लेवल सांगितली की स्लॅब ची शेवटची लेवल आहे ती फ्लट लेवल आहे तिथ पर्यत पाणी जाते, तिथ पर्यत जात असेल तर पाणी लोकांच्या घरात जाईल. जर त्यांनी सांगितले माती हटवायची आहे तर मी त्यानंतर परत सांगत आहे की आयुक्त साहेबाना वाटले नाही हटवायची तर नको हटवा त्यात काय आहे. तो ठिक आहे आयुक्त साहेबांना प्राधिकृत करू शकतो. जसे त्यांना ठिक वाटेल.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**ः—आम्ही पण आयुक्त साहेबांनाच प्रधिकृत करत आहोत, परंतु दोन दिवसानंतर,परवा विजिट केली जाईल. मीटींग ठेवा परवा. ही डिफर करून. आम्ही आपल्याला साथ देणार. साहेब एक वर्षपासून आमचा विश्वास आपल्यावरच आहे. एवढी काम केलेले आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—** माझे वर पण विश्वास नाही आहे का? त्याचे इनडायरेक्टली होत आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**ः— नाही सर, आहे ना ही जिद्दीची गोष्ट आहे. हा त्यांचा पॅनल नाही आहे,

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**ः— हा पॅनल चा विषय नाही आहे,आपल्याला एकाच नाही प्रत्येकाच विचार केला पाहिजे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**ः— माझी पण काही जबाबदारी आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**ः— हया गोष्टी साठी आम्ही जेव्हा विजिट केली

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– अचानक आले होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– परंतु विषय तर हाच होता. मातीच्या ढिगा–याजवळ आलो होतो.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– सर, त्या नंतर आपल्याला मी फोटो पण पाठवलेले आहेत.आपल्ययाला फाटो आलेले असतील, तेथील रहीवासी माझ्याकडे आले होते.आपण उदया तिथे विजिट करा. परवा टाईम ठेवा. इतकी वेळा मीटींग डिफर केली.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– रेसीडेन्सीचा मुद्दा आहे ना तर तेथील सर्व लोकांना वाटेल की मधोमध आम्हाला घर बांधुन दया.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– सर, मी आपल्यावरतीच सोडणार आहे नंतर नाही मॅडम मी डिफर करण्यास तयार आहे नंतर मी कमिशनर साहेबाच्या निर्णयाशी सहमत असेन. की मला हे मंजूर आहे. डिफर करा. उदया मी आपल्याला खरोखर काय परिस्थिती आहे हे दाखवतो.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**:–जर आयुक्त साहेबाना प्राधिकृत करून जर चुकीचे वाटले

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– हे जरूरी आहे का किती वेळा आपण डिफर केलेले आहे. हया मुद्दयामध्ये काय आहे की आपण याचे मागे लागले आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**:– एवढ काही नाही आहे हया विषयामध्ये.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:–एवढे काही नाही आहे हया विषयामध्ये, याच्या मागे लागले आहे.

**सभापती, श्रीम. कंचन अमर लुंड**:– नाही तर मतदान घ्या.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:–माझे हे आहे की दोन दिवस

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**:–मीटींग ॲडजॉन करा. माझा विषय आहे मतदान करून हा विषय पास करून घ्या.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:–एका वेळी, चौधरी साहेब आपण या, विझिट करा तेव्हा आपण समजाल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**:– पहिली गोष्ट काय आहे, मीटींग ॲडजॉन करा त्याच्यावरती मतदान झाले पाहीजे. मीटींग ॲडजॉन होईल किंवा नाही प्रथम हे विषय पास व्हायला पाहिजे की फेल व्हायला पाहिजे,

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– पास किंवा फेल नाही आहे. मीटींग डिफर करायची किंवा ॲडजॉन करायची. ॲडजॉन करू शकतो का?

**सदस्य श्री. राजेश वधारीया**:– घेवू शकता.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– तर ॲडजॉन चे घेवून टाका. पास किंवा फेल का करत आहात. ॲडजॉन चे बघा ना प्रश्नच नाही. माझ अस म्हणणे आहे की, मी हया विषयाच्या विरूध्द नाही आहे वडोल गांव ब्रीज बनवला पाहिजे, चांगल्या प्रकारे बनला पाहीजे. परंतु एक मातीचा ढिगारा जो आहे, त्या ठिकाणी आपण चार ते सहा कुटूंब राहतील असे चांगल्या प्रकारे घरे बनवू शकतो त्यानंतर सुध्दा बरीच जागा वाचत आहे. त्या नंतर वाटर फ्लो सुध्दा येईल. मी तर कमिशनर साहेबाना हे सांगेल की आपण येवून सदर ठिकाणाला भेट देवून एक वाटर फ्लो येईल त्या ठिकाणी बंद करून घ्या.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**:– जेव्हा टेक्नीकल लोक जावून आले,सर्व बघून आले नंतर ॲडजॉन का करायची.

**सदस्य श्री. राजेश वधारीया**:– ॲडजॉन नाही, डिफर होईल, ॲडजॉन झाली तर आपली मीटींग थांबेल. आपले बाकीचे ठराव पूढे होणार नाही. मीटींग पूर्ण करा. आणि जर डिफर करायची असेल तर तो विषय (आयटम) डिफर करा.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:— आता हे एवढया दिवसापासून केले आहे ती माती तिथेच अटकून पडेल. जो पर्यंत आपली मीटींग पूर्ण होत नाही आहे तो पर्यंत आपण ठराव करू शकाल का. मी आपली विनंती मान्य करत आहे परंतु एका, जसे आले तसे पास करत आहेत त्यानंतर सुध्दा आयुक्त साहेबाना वाटले की त्याना प्राधिकृत करायचे.

**<u>सदस्य श्री. राजेश वधारीया</u>**:— हो ठिक आहे, आपण काय करा की हया विषयाला (आयटम) डिफर करा.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:— मॅडम हया विषयाला (आयटम) डिफर करा.

**<u>सदस्य श्री. राजेश वधारीया</u>**:— काय झाले, सभागृह नेता इकडचे की तिकडचे आहेत.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:— सभापती मॅडम आपण डिफर करू शकता, आम्ही तुमच्यावर सोडत आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u>**:— आपल्याला डिफर करायचा आदेशही करायचा आहे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:— हया विषयाला नंतर घेवू शकतो नंतर मिटींग संपवली जाईल.

**<u>सदस्य श्री. राजेश वधारीया</u>**:— आमच असे म्हणणे आहे की आम्हाला सगळयाना वाटते की डिफर करा. दोन दिवसानंतर बसू ना काय आहे.

**<u>महापालिका सचिवः—</u>** हो असे होवू शकते. डिफर करायची आहे किंवा नाही बोला सर्वानी. आणि जे विषय डिफर च्या बाजूने आहेत त्यांनी..

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:— मी या प्रस्तावाच्या पक्ष मध्ये आहे असे वोटींग पाहिजे. असा हा प्रस्ताव पारीत व्हायला पाहीजे. मी हया फेवर मध्ये आहे , वोटींग झाले पाहीजे ना.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीया</u>**:— मी सांगत आहे, आम्ही सर्व जण सांगत आहेत की डिफर आहे, मा. सभागृह नेता यांचे मत (ओपीनिअन) आहे की मतदान झाले पाहिजे. तो ठिक आहे डिफर च्या विरोधामध्ये यांचे मत आपण नोट करू शकत आहेत ना.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:— हा प्रस्ताव जसा प्रसाशनाने दिला आहे मी त्याच्या पास करण्याच्या पक्ष मध्ये आहे. हा प्रस्ताव वाचा हया प्रस्तावाच्या बाजूने कोण आहे,आणि विरोधात कोण आहे. भले पडून राहू दया ना. मला काम झाले तर चांगल्या प्रकारे झाले पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:— आम्हाला पण हेच पाहीजे. दीड वर्षपासून आपण हयासाठी लढत आहोत.

**<u>महापालिका सचिव</u>**:— आता साहेबांच म्हणणे आहे की पहिले मतदान घ्या. जर प्रस्तावावर मतदान घेतले तर विषयच संपतो.

**<u>सदस्य, श्री. राजेश वधारीयाः—</u>** आपल्याला जर अस पाहिजे असेल तर ॲडजॉनमेंट चे देत आहेत.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:— हया नंतर कोणता विषय आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वधारीयाः—</u>** भले मीटींग ॲडजॉन करा आम्हाला काय आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** वडोल गावाचा हा प्रस्ताव झाला तर किती दिवसात कधी पूर्ण करणार आहेत.

**<u>सभापती,श्रीम. कंचन अमर लुंडः—</u>** कमिशनर साहेब, हे विषयासाठी मला विजीट केली पाहीजे. उदया पर्यंत ॲडजॉन करून उदया निर्णय घेवू.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—</u>** आभारी आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:— नाही, हा विषय आपण वाचा, विषय पटला वरती आहे,

**सभापती, श्रीम. कंचन अमर लुंडः—** जमनुजी आपण, उदयाच कमिशनर साहेबांबरोबर, सदस्या बरोबर विजीट करणार नंतर निर्णय घेवू.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**ः— हा सभापती यांचा विषय नाही आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** हा विषय .... आला होता आणि चर्चा सुरू झाली.

**सभापती, श्रीम.कंचन अमर लुंड**ः— ठिक आहे. चौधरीजी, मी चर्चा झाल्यानंतरच मी निर्णय घेत आहे. नाही काही वोटींग होणार नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** यासाठी मतदान होईल, नाही नाही, असे कायदयाने मतदान होईल. डिफर करायचे असेल तरी वोटींग होईल.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**ः— चौधरी जी आम्ही अशा किती मिटींग ॲडजॉन केलेल्या आहेत. जो विषय आला त्याच्यावर चर्चा केली नाही चार दिवस पहिले हा विषय आला १४ नंबर वरून १७ नंबरवर जावून नंतर मीटींग ॲडजॉन केली होती.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** उशीर झाल्यानंतर कामाला काही अडचण निर्माण होणार आहे काही. हे पण पाहणे गरजेचे आहे. दोन दिवसात होईल, चार दिवसात, दहा दिवसात होणार आहे. काहीच हरकत (ऑब्जेक्शन) नाही आहे.हरकत(ओब्जेक्शन) आपल्याच लोकांचे आहे, त्यानीच हे एवढे उशीर केलेला आहे. या विषयी आम्ही काहीच बोलेलो नाही.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** मीटींग ॲडजान करण्यासाठी सभापती महोदयानी पण सांगितले आहे.

**सभापती,श्रीम.कंचन अमर लुंड**ः— मला उदया ११.०० वाजता संपूर्ण टीम सोबत विजीट करायची आहे. सर्व सदस्य राहीले तर काही

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**ः—सचिव मॅडम हे सांगा की हा जो विषय आहे,

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** सभापती मॅडम ना बोलु दया,

**सभापती, श्रीम.कंचन अमर लुंड**ः— नाही तर आताच चला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**ः— या मीटींगला एक तास किंवा अर्धा तास, ६.०० वाजेपर्यत ॲडजान करण्यास मी पक्ष मध्ये आहे. परंतु हा निर्णय आज झाला पाहीजे,जर आज हा विषय पडत असेल तर पडू दया, तीन महीन्यानंतर घेवून या. हया वडोल गावाची पर्वा लागत नाही.

**सभापती, कंचन अमर लुंडः—** उदया येणार नसाल तर आता चला ५.३० वाजता तोपर्यत ही मीटींग ॲडजॉन करत आहो. परत ६.३० वाजता मीटीग ठेवू.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**ः— ही सभा आपण अर्ध तास, पाऊण तास, ६.००, ६.१५, ६.३० वाजेपर्यत ॲडजॉन करा परंतु आजच हा विषय क्लीअर करायचा.

**सभापती,श्रीम.कंचन अमर लुंड**ः—ही मीटींग आज ॲडजॉन करत आहोत व आत्ताच विजिट करून ही मीटींग उदया ठेवत आहोत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**ः— मा. आयुक्त साहेब माझा क्लीअर निर्णय आहे, की जसा विषय आहे पास करा. यानंतर सुध्दा मा. आयुक्त साहेब निर्णय घेतील.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** सभापती महोदय आपण निर्णय घ्या मी आपल्या निर्णयाशी सहमत आहे. धन्यवाद.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**ः— मा. आयुक्तजी यांचेच चालेल, त्याठिकाणी टेक्नीकल लोकाचे चालेल. आपले चालणार नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**आपण मागील वेळेस गार्डन व माळीचा जो ठराव केला होता त्यात एनजीओची अट काढा. तसेच सुरक्षा रक्षकांच्या ऐवजी आपण पहारेकरी टाका. एनजीओ कशाला, कॉम्पीटिशन झाली आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**ठिक आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**ठिक आहे.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे, ठरावात अट काढते तसेच सुरक्षा रक्षकांच्या ऐवजी पहारेकरी टाकते.

**सभापती, श्रीम.कंचन अमर लुंड:—** मीटींग ॲडजॉन, ६.३० वाजता.

**सभा ६.३० वाजेपर्यंत ॲडजॉन झाल्यानंतर सभा पुन्हा सांयकाळी ६.३५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले. यावेळी खालील सदस्य/ सदस्या उपस्थित होत/ होत्या.**

१. श्रीमती कांचन अमर लुंड
२. श्री. जमनादास पुरस्वानी
३. श्री. राजेश वदारिया
४. श्रीमती जया माखिजा
५. श्री. राजेंद्र चौधरी
६. श्री. दिपक सिरवानी
७. श्रीमती कविता लाल पंजाबी

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**वडोल गावचा विषय जसा आहे तसाच पारीत करण्यात यावा. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता करा.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**ॲज पर साईड व्हिजीट बाय कमिश्नर, जसे आयुक्त साहेबांनी साईडवर जावुन आदेश दिले आहेत तसे काम करण्यात यावे.

**महापालिका सचिव :—**ठरावात तसे लिहायचे आहे का?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आपला जो विषय आहे, तात्पुरते त्यांच्या जबाबदारीवर एक लाईनमध्ये जितके होवु शकेल तितके बनवु.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**होय एका लाईनीत करावे.

**महापालिका सचिव :—**व अमाउंट आहे १ कोटी ४५ लाख.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**जसे आयुक्तांनी सांगितले आहे तसे. ठरावात टाकायची गरज नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**आभारी आहे.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १७ :—** उल्हासनगर—३ येथिल वडोल गांव येथिल पुलाचे सुधारीत कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर-३ येथील वडोल गांव येथील पुलाचे बांधकाम करणेकरीता दिनांक १३/१०/२०१६ रोजी मे.ए.एम.रामचंदानी यांचे नावे सदर कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले. तसेच महापालिकेच्या स्थापत्य सल्लागारांच्या पॅनलवरील मे.नोबल जिओ स्ट्रक्ट यांची सदर पुलाच्या बांधकामाचे स्थापत्य सल्लागार म्हणून कामाच्या बांधकामाची तांत्रिक तपासणी तसेच निरीक्षण /देखरेख करणेचे काम सोपविले. वास्तविक पाहता सदर काम सुरु झाल्यानंतर कामाचे ठिकाणी प्रत्यक्षात अनेक अडचणी निर्माण आल्या. सदर कामाची मुदत कार्यारंभ आदेशाप्रमाणे ०१ वर्षापर्यंतची होती. सदर कामाचा एक वर्षाचा कालावधी संपुष्टात आला आहे. तथापी अद्याप पुलाचे काम पूर्ण झालेले नाही. संबंधित एजन्सीमार्फत प्रत्यक्षात कामास सुरुवात केल्यानंतर खालील कारणांमुळे कामास विलंब झाला आहे.

१)कामाचे सुरुवातीला वडोल गांवास पाणी पुरवठा करणा-या जलवाहिन्या पुलाच्या खांबांना टेकून असल्यामुळे सदर जलवाहिन्या सुरक्षितरित्या स्थलांरीत करण्यास विलंब झाला.

२) स्थापत्य कामाची संबंधित ठेकेदाराकडून सुरुवात करण्यात आल्यानंतर लोकप्रतिनिधी, पत्रकार व स्थानिक नागरीक यांनी कामाच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित केल्यानंतर संबंधित ठेकेदाराला या कार्यालयाचे दिनांक २६ मे,२०१७ रोजीचे पत्रान्वये पुलाचे बांधकामाचा तपासणी अहवाल प्राप्त होईपर्यंत काम बंद ठेवण्याच्या सुचना दिल्या होत्या.

३)सदर पुलाच्या पिलरचे १ मीटरच्या उंचीपर्यंत कास्टिंग करावयास संबंधित एजन्सीला मे.नोबल जिओ स्ट्रक्ट यांचेमार्फत सुचना देण्यात आल्या होत्या. परंतू दिनांक २४/०५/२०१७ रोजी संबंधित एजन्सीने पिलर क्र.४ चे १ मीटर ऐवजी ३.६ मीटरपर्यंत कॉंक्रिटींग केल्याचे आढळून आल्याने मे.ए.एम.रामचंदानी यांनी तांत्रिकदृष्टया विना परवानगी काम केल्याने तात्काळ सदर काम निष्कासित करणेबाबत स्थापत्य सल्लागार नोबल जिओ स्ट्रक्ट यांनी दिनांक २५/०५/२०१७ रोजी संबंधित एजन्सीला पत्र दिले.

४) पुलाच्या पीअर कास्टींगच्या स्थैर्यता व गुणवत्ताची (Stability and Quality) तपासणी केल्यानंतर अहवाल प्राप्त होणेस झालेला विलंब.

५) महाराष्ट्र राज्य वितरण कं. यांचा विद्युत पोल स्थलांतरीत करणेस झालेला विलंब.

वास्तविक पाहता सदर कामाकरीता १ वर्षाची मुदत होती. परंतू वरील कारणांतील अनु.क्र.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभागाच्या जलवाहिन्या स्थलांतरण करण्यामध्ये ४ महिन्याचा कालावधी गेला, जून महिन्यातील पावसामुळे व कामाच्या दर्जाबाबत तांत्रिक बाबींची तपासणी करणे तसेच महाराष्ट्र राज्य वितरण कं. यांचा विद्युत पोल स्थलांतरीत करणेस ४ ते ५ महिन्याचा कालावधी गेला, त्यामुळे प्रत्यक्षात काम ४ महिनेच सुरु होते. त्यामुळे कामास विलंब झाला आहे. सद्यस्थितीत सदर काम प्रगतीपथावर आहे. तथापी सदर कामाचे जागेवर तांत्रिक कारणांमुळे मुळ प्राकलनिय खर्चापेक्षा अधिक खर्च होत आहे. सदर वाढीव कामांची कारणे खालील प्रमाणे आहेत.

१) मे.नोबल जिओ स्ट्रक्ट यांनी त्यांचे दिनांक ०६/०४/२०१७ चे पत्रान्वये प्रकल्पस्थळी वाहणारे रसायनयुक्त घाणपाणी व आजुबाजुची परिस्थिती विचारात घेता आय एस ४५६:२००० नुसार कॉंक्रीटचे ग्रेड अपग्रेड करण्यात आले, त्यामुळे पुलाच्या संधानक कामासाठी एम-२० ऐवजी एम-३० करण्यात
आले व पिअर कॅप एम-२५ ऐवजी एम-४० करण्यात येवून कॉंक्रीटच्या ग्रेडचे अपग्रेडेशन करण्यात आले.

२) सदर ब्रिजचे स्लॅब वर मास्टिक ॲस्पाल्ट ही बाब ( **Items**) प्राकलनात समाविष्ट करण्यात आले आहे.

३) पिलरच्या मजबूतीकरण करणेकरीता के पी २०० ही बाब ( **Items**) समाविष्ट करण्यात आली आहे.

४) या कामाकरीता पूर्वीचे स्थापत्य सल्लागार मे.नोबल जिओ स्ट्रक्ट यांनी पुलाचे कामाकरीता तयार केलेल्या नकाशामध्ये आताचे स्थापत्य सल्लागार मे.अनिरुध्द नाखवा यांनी काही प्रमाणात बदल केला असल्याने कॉंक्रीटच्या प्रमाणात व स्टिलच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

वरील सर्व बाबींचा समावेश मुळ प्राकलनात समाविष्ट नसल्याने वाढीव होणा-या कामांचे प्राकलन तयार करण्यात आले आहे.

| मुळ प्राकलनिय किंमत | वाढीव खर्च | एकूण होणारा खर्च |
|---|---|---|
| २,५४,००,०००/- | १,२०,७९,४६०/- | ३,७४,७९,४६०/- |

सदर कामाच्या रु.२,५४,००,०००/- एवढया किंमतीच्या मुळ प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आलेली आहे. वर नमुद केल्याप्रमाणे सदर कामाचे होणा-या वाढीव कामावरील रु.१,२०,७९,४६०/- एवढा खर्च वर्ष २०१७-१८ च्या महापालिका अर्थसंकल्पातील वडोल गांव येथील पुल बांधणे या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीतून करणे आहे. सद्यस्थितीत काम सुरु आहे. व लवकरात लवकर पूर्ण करण्यात येत आहे. सदर कामास दिनांक ३०/०६/२०१८ पर्यंत मुदतवाढ मिळणेस मे.ए.एम.रामचंदानी यांनी त्यांचे दिनांक ०२/११/२०१७ चे पत्रान्वये विनंती केली आहे.

उल्हासनगर-३ येथील वडोल गांव येथील पुलाच्या वाढीव खर्चाच्या सुधारीत प्राकलनासंबंधि मा.आयुक्त सो. यांचे दालनात दिनांक २२/०१/२०१८ रोजी चर्चा करण्यात आली. सदर चर्चेच्या वेळी मा.आयुक्त सो. यांनी वडोल गांव पुलाच्या वाढीव खर्चाचे बाब निहाय (Item wise) सविस्तर विवरण सादर करण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार वडोल गांव पुलाच्या वाढीव खर्चाचे बाब निहाय (Item wise) सविस्तर विवरण खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Items | Previous | | | Uptodate | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Qty | Rate | Amount | Qty | Rate | Amount | Diff |
| 1 | Providing & laying in situ cement concrete of trap/granite/quartzite/ gneiss metal for cast in situ R.C.C. solid piers, column etc. including provision of "V" shaped f (Changed Pier Grade M-20 to Grade M-30) | 430.6 | 5385.7 | 2319082 | 1680.46 | 6390.13 | 10738358 | 8419275.4 |
| 2 | Steel | 60.97 | 55962.59 | 3412039 | 70.16 | 55962.59 | 3926335 | 514296.2 |
| 3 | M-25 Solid Slab (Changed Slab Grade M-25 to Grade M-40) | 433 | 6974.88 | 3020123 | 508.39 | 8643.38 | 4394208 | 1374084.9 |
| 4 | Providng and laying bitumen mastic wearing course(as per specification) with industril bitumen of grade 85/25 conforming to IS :702 prepared by using mastic cooker and laid to required level and slopee, including providing antiskid surface with bitumen precoated fine grained hard stone chipping of approved size at the rate eof 0.005 cum per 10 sqm and at approximate spacing of 10 cm centre to centre in bothdirections pressed into surfacae protruding 1mm to 4mm over mastic surfacae including cleeaning the surface, removal of debris etc all complete | 0 | 1364.1 | 0 | 450 | 1364.1 | 613845 | 613845 |
| 5 | Providing & mixing Epco Kp 200 in concrete | 0 | 193 | 0 | 4000 | 193 | 772000 | 772000 |
| 6 | Providing & supplying Poclain for breaking of Hard Rock | 0 | 3400 | 0 | 100 | 3400 | 340000 | 340000 |
| | | | | | | | | **12033502** |

वास्तविक पाहता सदर कामाकरीता ०५ वेळा निविदा मागविण्यात आल्या आहेत. परंतू पाचही वेळा अल्प प्रतिसाद प्राप्त होत होता. सदर पुलाचा वापर स्थानिक नागरीक, शाळकरी मुले यांना आवश्यक असल्याने पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण होणे ही वस्तुस्थिती आहे. सदर वाढीव खर्चाच्या कामाकरीता ई निविदा केल्यास प्रक्रियेत पुन्हा वेळेचा अपव्यय होईल. त्यामुळे सदर कामाकरीता पूर्वी जी निविदाप्रक्रिया केली होती, त्या प्रक्रियेतील निम्न दराचे निविदाकार मे.ए.एम.रामचंदानी यांचेकडून त्याच अटीशर्तीनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत कामे करुन घेण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत पुलाचे काम प्रगतीपथावर असून पुलाचे बांधकामाकरीता आवश्यक असलेल्याच बाबींचा समावेश वाढीव खर्चामध्ये करण्यात आला आहे. वडोल गांव ब्रिजच्या दोन्ही बाजूस पिलर आहेत. दरवर्षी आरोग्य विभागातर्फे पावसाळयापूर्वी नाले सफाई च्या कामाच्या वेळी नाल्यातील गाळ / मातीचे ढीग उचलून या पिलरजवळ जमा केला जातो. त्यामुळे वाहत्या पाण्याला अडथळा निर्माण होतो. दिनांक २९/०१/२०१८ रोजी मा.आयुक्त, मा.श्री.जमनु पुरस्वानी सभागृह नेता, श्री.राजेश् वधरिया, नगरसेवक यांनी सदर पुलाचे ठिकाणी पाहणी केली असता पाण्याच्या सुरळीत प्रवाहाकरीता पिलरच्या भोवती असलेला गाळ / मातीचे ढीग उचलणे आवश्यक असल्याने सदर कामाचा समावेश सुधारीत प्राकलनामध्ये करण्याचे अंतिम करण्यात आले. त्यामुळे सुधारीत प्राकलनामध्ये ८००० क्युब मीटर म्हणजे ४ ब्रासच्या ट्रकचे ७०५ फेऱ्यांवरील रु.२५,००,०००/- खर्च समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे सुधारीत प्राकलनाचा खर्च रु.१,४५,७९,४५०/- इतका होत आहे.

तरी वरील सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता पुलाचे कामास ३०/०६/२०१८ पर्यंत मुदतवाढ मिळणेस व पुलाचे वाढीव खर्चास मान्यता मिळून सदर काम मे.ए.एम.रामचंदानी यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत करुन घेणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ९०  **दिनांकः— २/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—३ येथिल वडोल गांव येथिल पुलाचे सुधारीत कामास ३०/६/२०१८ पर्यंत मुदतवाढ मिळणेस व पुलाचे वाढीव खर्च रु.१,४५,७९,४५०/- यास मान्यता मिळुन सदर काम मे. ए.एम. रामचंदानी यांचेकडुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत करुन घेणेस मान्यता देत आहे.

**कारण**

सदर रस्ता सार्वजनिक रहदारीचा असल्यामुळे पावसाळयापुर्वी लवकरात लवकर बनविणे आवश्यक आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ६.४० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ३०/१/२०१८

## दि. ३०/१/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

१८

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक ३०/१/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ५ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ६ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| ७ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती जया प्रकाश माखिजा, २. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ३. श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर, ४. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा, ५. श्रीमती पुष्पा नाना बागुल, ६. श्री. राजेंद्र शांतराम चौधरी, ७. श्री. धनंजय बोडारे,८. श्रीमती कविता लाल पंजाबी, ९. श्री. भारत रामचंद्र राजवानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

७४.डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
७५.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
७६.श्री. अशोक जाधव, सहा. लेखा अधिकारी
७७.श्री. वानखेडे, लेखा अधिकारी
७८.श्री. मवाळे, सहा. आयुक्त
७९.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
८०.श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
८१.श्री. दत्तात्रय जाधव, प्र. सहा. आयुक्त
८२.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
८३.श्री. भास्कर मिरपगारे, प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी
८४.श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक

८५.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
८६.श्रीमती निलीमा कदम, अकाउंटंट
८७.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
८८.श्रीमती नंदा, वरिष्ठ लिपिक

यावेळी डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त हया आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होत्या.

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

दुपारी ३.३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. १ :—**घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' **[User fee]** आकारणी करणेबाबत.

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**काही वरिष्ठ सदस्य स्थायी समितीत उपस्थित नाहीत तसेच हा विषय जो आहे शहराबाबतीत तर याबाबत जो काही निर्णय घ्यायचा आहे तर सर्वांनी विचारविमर्श करुन घ्यायचा आहे त्यामुळे ही सभा आता स्थगित करुन दिनांक २/२/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत यावी.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**दिनांक २९/१/२०१८ ची स्थगित सभा २/२/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता ठेवली आहे तर मग ही सभा ३.३० वाजता ठेवावी.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**ठिक आहे, २ तारखेला ३.३० वाजताही सभा ठेवावी. आपण घोषणा करा.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**ही सभा २ तारखेला दुपारी ३.३० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

दुपारी ३.३२ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि.कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २/२/२०१८

**दि. २/२/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**१८—अ**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक ३०/१/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेली सभा स्थगित करण्यात आल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक २/२/२०१८ रोजी दुपारी ३.३० वाजता सदरची सभा महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ७ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| ८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ९ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| १० | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| ११ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, २. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ३. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, ४. श्री. धनंजय बोडारे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त

३. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
४. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
५. श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
७. श्री. राम जैसवार,शहर अभियंता
८. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
९. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१०. श्री. महेश सितलानी, उप अभियंता
११. श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता, साबांवि
१२. श्री. अश्विनी अहुजा, उप अभियंता
१३. श्री. संदिप जाधव, उप अभियंता
१४. श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
१५. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
१६. श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त, विधी
१७. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१८. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१९. श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
२०. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
२१. श्री. भास्कर मिरपगारे, प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी
२२. श्रीमती निलीमा कदम, अकाउंटंट
२३. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२४. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२५. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

सायंकाळी ५.१५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**सभापती, श्रीम.कंचन अमर लुंड:–** दुसरी मीटींग चालु होत आहे कृपया शांतता राखा.

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–**घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' **[User fee]** आकारणी करणेबाबत.

---

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:– घनकचरा व्यवस्थापनकोणाचा विषय आहे.

यावेळी श्री. दिपक सिरवानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

**श्री. विनोद केणे प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक** :–घनकचरा व्यवस्थापननियम २, २०१६ अंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला जो घनकचरा व्यवस्थापनेवर खर्च येत असतो. त्या खर्चासाठी जी रक्कम अदा करावी लागते. ती प्रत्येक मालमत्ता धारकाकडून वसुल करायची आहे. त्या अनुषगांने शासनाने दिलेल्या निर्णया नुसार उपभोक्ता फी (युजर फी) म्हणून आपण आज इथे विषय आणलेला आहे. हा जो घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत उल्हासनगर महापालिकेसाठी कर्मचा–यांचे पगार व भत्ते, कचरा वाहतूक खर्च, डम्पींग ग्रांऊड खर्च, साफ सफाई खर्च, डेब्रीज

वाहतूक खर्च, इत्यादी जो खर्च आहे तो एकूण जवळपास रू. ६३ करोड आहे. आणि आकस्मीत खर्च एकूण ६.४० असा ७० करोड खर्च होत असतो. त्याअनुषंगाने सदरचा खर्च वसुल करणेकरिता मालमत्ता करात युजर फी लावण्याचा हा प्रस्ताव आहे.

यावेळी सदस्या श्रीमती पंचम कालानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** नियम काय म्हणाले, शासनाचा नियम आहे काय?

**प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक,श्री.केणे:—श**ासनाचा नियम आहे की, प्रशासनाला जो खर्च घनकचरा व्यवस्थापनावर येतो, तो खर्च वसुल करायचा आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— किती खर्च येतो.

**प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक,श्री.केणे**:—एकूण ७० करोड खर्च येतो.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— कचरा व्यवस्थापनावर?

**प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक,श्री.केणे**:— हो, कचरा व्यवस्थापन, कर्मचा—यांचे भत्ते, पगार इत्यादी. कर्मचा—यांच्या भत्त्याशी कचरा व्यवस्थापनाचा संबंध येतो.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**कर्मचा—याच्या भत्त्याशी कचरा व्यवस्थापनाचा काय संबंध येतो.

**प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक,श्री.केणे**:— जे आरोग्य विभागात १३०० जवळपास अधिकारी व कर्मचारी,सफाई कर्मचारी सर्व मिळून जे कर्मचारी आहेत, त्यांच्यावर येणारा वेतनाचा खर्च आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— तो मालमत्ता करातून घ्यावा.

**प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक,श्री.केणे**:— तो रू. ३२ करोड आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** आर.सी.सी. आहे टी.गार्ड आहे.

**प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक,श्री.केणे:—** त्या अनुषंगाने मालमत्ता आपल्याकडे जवळपास १ लाख ७३ हजार ७७५ आहेत. त्यातल्या आर.सी.सी, टीअर गडर, ७६ हजार आहेत, एसीसी ब्रीक्स बांधकाम ७९ हजार आहेत, लाकडी मातीचे बांधकाम १७ हजार ५५ मालमत्ता आहेत, त्याच्यानंतर तबेले मंगल कार्यालय हॉटेल २९१ आहेत, आणि इतर १३ ज्या औदयोगिक मिळकती आहेत त्या कॅटॅगरी मध्येच फी आकारली गेली आहे. आर.सी.सी. साठी आपण प्रतिमहा आपण ३७५ आकारतो. एसीसी ब्रीक्स साठी आपण २७५ आकारतो आणि लाकडी मातीचे जे बांधकाम आहेत त्याच्यासाठी १७५ आपण आकारतो. तसेच ज्या मालमत्ता ज्या कमर्शिअल आहेत त्याच्यासाठी प्रतिमाह आपण रू. १०००/— आकारतो. ज्यांचे क्षेत्रफळ हजार चौरस फुट आहे,आणि ज्याचं मालमत्ता हजार चौरस फुटा पेक्षा जास्त आहे त्याच्यासाठी प्रतिमाह आपण ५०००/— आकारतो.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— शासनाने हे नाही सांगितले ना आपल्याला की तुम्ही ऐवढेच दर लावले पाहिजेत. आरसीसीवर ऐवढे लावा.

**प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक,श्री.केणे:—** नाही. ते आपण प्रशासनाने ठरवले आहे की ज्या पध्दतीत साधारण बसतील, की लाकडी मातीचे बांधकामे जी असतील, बॅरेक्स किंवा झोपडपटटी असतील.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— आपण काय केलेल आहे की, आपला जो गॅप आहे रू. ६५ कोटीचा तो भरून काढण्यासाठी आपण हे जे अल्प उत्पन्न आहेत किंवा सगळयात गरीब कुटुंब आहेत त्याना सगळयात कमी दर लावले आहेत. आणि मोठया जागा आहेत, आरसीसी आहेत त्यांना जास्त लावले आहेत. आणि बाकी कमर्शिअल वापरासाठी अजून त्यापेक्षा जास्त आहे. ओव्हरऑल नियम असा आहे सरकारचा की तुम्ही आता घनकचरा व्यवस्थापन तोटया मध्ये चालवू नका. त्याच्यात फायदा काही नाही मिळाला तरी चालेल परंतु ॲट पार जेवढा खर्चै होतो तेवढा तरी, लोकांकडून, लोकांना कचरा व्यवस्थापनाचे महत्व कळले पाहिजे. महापालिकेला कचरा व्यवस्थापना

व्यतिरिक्त इतर जी कामे आहेत, त्यासाठी कच–याचे तुट त्याच्यामध्ये हानी होता कामा नये. हया मागचा शासनाचा मेन उददेश आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी</u>:–** आपण जे आता दर लावले आहेत ना ते ३७५ रूपये दर महीनाप्रमाणे १२ महीन्याचे ४५००रूपये. जे जास्त आहेत ना जे टॅक्स भरतात त्यानाच हा भुर्दंड आहे. जे लोक काही टॅक्स भरत नाही, जे डिस्पूट आहेत, जे टॅक्स भरतच नाही त्यांना कहीच करत नाही. ही रक्कम लिहिली आपण आरसीसी आणि टीगार्ड (टी.जी.) साठी, ही जास्त आहे. एसीसी ब्रीक्स बांधकाम असलेल्याना २७५ रूपये दर महीन्याला १२ महीन्याचे ३३०० रूपये. हे जास्त आहेत लाकडाचे मातीच्या बांधकाम असलेल्या, बांधकामाना १७५ रूपये आणि २१०० रूपये दर वर्षाला. हे जास्त आहेत याच्यामध्ये अजून काही कमी करून आणत असाल तर तसा प्रस्ताव आणा. ४५०० हजरी रूपये जर टॅक्स मध्ये एकदम वाढले तर लोक विचार करतील की ४५०० रूपये एकदम कसे काय वाढले. कचरा व्यवस्थापनासाठी वाढले असे सांगितले तर लोक अजून भडकतील.

यावेळी सदस्या श्रीमती पंचम कालानी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता</u>:–** मा. आयुक्त साहेब हे वाढविणे ऐवजी टॅक्सची जुनी थकबाकी आहे, त्या रिकव्हरी साठी आम्ही का जोर लावत नाही. सर, हा नविन टॅक्स लावणार आहेत शहरातील नागरीकावर हयाच्यापेक्षा जास्त भार पडणार आहे.

यावेळी सदस्य श्री. दिपक सिरवानी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>:–** सर्व थकबाकी वसुली साठी प्रयत्न चालू आहेत. ते पण आम्ही करत आहोत. आपण बघितले तर मागील पाच वर्षा मध्ये टॅक्स ची वसुली होत होती., त्याच्या कमीत कमी २५ ते ३० टक्के वसुली जास्त आहे परंतु आपली टॅक्स रिकवरी पेक्षा टॅक्स बेस डिमांड आहे ती पण आपली वाढली पाहिजे. वर्षानुवर्ष आपले तेच दर आहेत. वर्षानुवर्ष कचरा व्यवस्थापनआम्ही डेफीसीएट मध्ये चालवले आहे. ६५ लाख रूप्ये आपण कचरा व्यावस्थापनासाठी एका वर्षाला खर्च करत आहोत.,ते दुस–या कामासाठी येवू शकतात. त्यासाठी नगरसेवकांचा निधी थांबवावा लागत आहे.आणि अजून जी रस्त्याची कामे आहेत,साईड पटटीची कामे आहेत अशी कामे आपण करू शकत नाही कारण आपल्याकडे त्यासाठी फंडस् कमी आहेत. हा रू. ६० करोडचा डिफीसीएट जर इथून कमी झाला तर अतिरिक्त (एक्सट्रा)रू. ६० ते ६५ करोड चे वेगळे काम करण्यास त्याचा उपयोग होईल.

**<u>सदस्य, श्री. कलवंत सिंग सोहता</u>:–** आपले म्हणणे एकदम बरोबर आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>:–** आणि अजून एक गोष्ट ऐका, एका वर्षाचे रक्कम धरू नका प्रति दिवसाचे जर काउंट केले तर ६ रूपये ते १२ रूपये प्रत्येक कुटुंबास, ज्याचे झोपडयाचे घर आहे, कच्चा घर आहे, त्यांना ६रूपये प्रति दिवस आणि प्रति कुटूंब १रूपये २० पैसे प्रत्येक दिवसासाठी होत आहे. जे मध्यम वर्गीय आहेत त्यांना १०रूपये म्हणजे २ रूपये प्रति दिवस , प्रत्येक मानसी येतील. दुसरा आहे १२ रूपये. जर २ रूपये ४० पैसे जर कोणाला दयायचे नसतील आणि १ रूपये २० पैसे दयायचे नसतील आणि शहर स्वच्छ पाहीजे बाकी सर्व गोष्टी, रस्ते पाहिजेत, साइड पटटी करून पाहीजे, वडोल ब्रीज पाहिजे त्याचे पूर्ण वाढलेले एस्टीमेट केल पाहिजे पावसाळया पूर्वी सगळी कामे झाली पाहिजेत. मी आापल्याला सांगत आहे बजेट ची संपूर्ण माहिती पाहिजे असेल तर बजेट आपला हया वर्षीचा बनवलेला आहे. हे ६५ करोड जमा झालेले समजून ६०० करोडचा आहे. हे पण ६०० करोडमध्ये आम्ही मालमत्ता कर आणि दुस–या माध्यमामधून जी मागणी आहे ती जर शंभर टक्के आली तरच हा बजेट साकार होईल. जर आपण इथे ६५ करोड ची कपात केली तर भारत सरकारचे एक प्रकारे एक उल्लंघन केल्याचे होईल. हे निर्देश आहेत आणि आता जे स्वच्छ सर्वेक्षण होत आहे त्याच्यात पण मार्क आयटम आहेत. की कोणते शहरातून लोकांकडून कचरा व्यवस्थापनासाठीचा जो खर्च आहे तो वसुल केला जातो. ही एक महत्वाची बाब आहे. आम्ही इथ फेल होवून जाणार की लोकांना केवळ खुश करण्यासाठी किंवा नाराजी होवू नये म्हणून आम्ही हा टॅक्स लावू शकत नाही. टॅक्स आणि फी मध्ये फरक आहे.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता</u>**ः— सर ,लोक आज हे नाही पाहत. जसे की वसुली आहे त्याच्यात भरपूर प्रकारचे टॅक्स आहेत.

यावेळी सभापती श्रीमती कांचन अमर लुंड सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारीयाः—</u>** मी प्रपोज करत आहे श्री. दिपक सिरवानी जी, पदग्रहण करण्यासाठी. हां सर त्याच्यात जे दिले आहे आरसीसी?, टीअर गार्डर त्याच्यात ३७५ रूपये च्या हिशेबामध्ये ४५०० प्रति वर्षाचे आहे. नरतु सर यामध्ये कोणाचे २०० स्केअर फुटाचे आरसीसी स्ट्रक्चर आहे त्याच्यासाठी सुध्दा ४५०० रूपये आहेत का?

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**बसा श्री. सिरवानीजी, पीठासीन अधिकारी यांच्या जागेवर बसा.

यावेळी सदस्य श्री. दिपक सिरवानी हे सभापती महोदया यांच्या स्थानी पीठासीन अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**ः— बघा, कचरा जो आहे ते किती स्केअर फुटाचे घर आहे हे असे होत नाही.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता</u>**ः— आज माझे ८००० फुटाचे घर आहे परंतु त्याच्यात फक्त आम्ही चारच मेंबर राहत आहेत.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**ः— ऑन द कॉउंट्री सांगत आहात त्याच्या सपोर्ट मध्ये मी बोलत आहे. जेवढ घर लहान तेवढे मेंबर जास्त असतात, तेवढा कचरा जास्त होत असतो. जेवढे घर मोठे आहे तवढे मेंबर कमी आहेत तेवढा कचरा कमी होत आहे. हया विषयासाठी खात्री होती की आज पास होईल.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया</u>**ः— आपण प्रपोज करा ना, की आपण त्याच्यात काय संशोधन करू शकता.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता</u>**ः— चर्चेचा विषय आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया</u>**ः— साहेब, आम्ही तर आमंत्रित करत आहोत. आपण कशा पध्दतीने करायचा ते तर सांगा.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** आम्ही या विषयाला विरोध करत आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारीयाः—</u>** चर्चा करून काय फायदा. संशोधनाची गोष्ट करत आहोत ना आपणच तर सांगितले

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** मागील ५ वर्ष किंवा १०वर्ष आम्ही पण सत्तेत होतो बीजेपी आमच्या बरोबर होतो. एक रूपया सुध्दा टॅक्स वाढवला नाही. आपल्या राज्यात आपण सत्तेत आले आणि टॅक्स वाढत आहे.

यावेळी सदस्या श्रीमती कविता पंजाबी हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारीयाः—</u>** साहेब अस नाही आहे की आपण १० वर्षा मध्ये टॅक्स वाढवले नाही आहेत, हे मॅटर ऑन रेकार्ड आहे. यामध्ये पण आपण दोन तीन वेळा टॅक्स वाढवलेला आहे. आपण टक्केवारी वाढवलेली आहे. आता आपण गोष्ट च काढली आहे तर रिझॉल्युसन काढून देऊ शकतो. यात काही इश्यु नाही. टॅक्स वाढवल्या शिवाय कोणतीही संस्था चालू शकत नाही. बाकीचे खर्चे आपले प्रत्येक वेळी वाढतील, पगार वाढतील पेट्रोल खर्च वाढतील, लाईटचे बीले वाढतील, एमआयडीसी चे खर्च वाढेल, आपण जर का नाही वाढवत असाल तर संस्था तोटयात जाऊन बंद होण्याच्या मार्गावर येईल.

**<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता</u>**ः— सर्वच च्या सर्व लोंकावरती खर्च टाकला तर,, जो आपल्याला सरांनी सागितले ६५ करोड रूपये. आपल्या कडे आणखी काही रस्ते असतील की नाही. जसे की अनधिकृत पार्कीग भरपूर आहे,जेवढे रोड आम्ही बनविलेले आहेत, करोडो रूपये यावर खर्च करणेत आले आहेत. त्यांना हटवण्यासाठी, आज एक कार बाजार स्वतः बघत आहेत. कार बाजाराची हालत सभागृह नेता ने सांगितले की काय हालत आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– दुसरे एक हे प्रावधान आम्ही ठेवल आहे जर कोणीतेही कुटुंब, सोसायटी त्याचा कचरा सोसायटीमध्येच कंम्पोस्ट करत असतील त्यांना यामध्ये पूर्ण सूट मिळेल. हे पण आम्ही सांगितले आहे हे त्याच्या वरती आहे.

यावेळी सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी सभागृहात प्रवेश केला. व आपल्या स्थानी आसनस्थ झाल्या.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता**:– हे अस बरेच कमी होणार.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** पहिलेच एक डबा ठेवायला जागा नाही आता दोन दोन डबे ठेवायला जागा करावी लागेल.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया**:– आता मी खर (अॅक्चुअल) बोलू, आम्ही १८ वर्ष मागे जात आहेत, सन २००० च्या नियमा मध्ये दोन बिन्स (डबे) होते सन २०१६ च्या नियमामध्ये तीन डबे आहेत. आणि आता आमची महानगरपालिका दोन डबे ठेवणेसाठी सांगत आहेत. म्हणजे आम्ही १८ वर्ष मागे जात आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:–दुसरी गोष्ट अशी आहे की हा जो ६५ करोड चा गॅप आहे. हा आजच्या परिस्थितीचा गॅप आहे. आम्ही घरोघरी घंटागाडीचा खर्च जर वाढवायचा असेल, जर आणखी वाढणार आहे. हा ७१ करोड फक्त आजच्या तारखेचा खर्च आहे. भविष्यामध्ये जर डीपीआर बनेल त्याच्यात आपले कॉन्ट्रीब्युशन असेल यात ओएनएम कॉस्ट असेल ते वेगळेच असेल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:– हा विषयाला डिफर करून एक चांगला प्रस्ताव आणू. आमच्या कडून एक प्रस्ताव काही कमी करून आणत आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया**:– यामध्ये आपण जसे सांगितले की आरसीसी मध्ये सगळया वरती रू. ४५००/– लावणार. कोणचा १ आरके लॅट आहे, कोणाचा १ बीएचके आहे,कोणाचा २ बीएचके आहे, कोणाचा ३ बीएचके आहे,आम्ही पण तेच सांगत आहोत की आपण ही प्रस्ताव दया.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** वेळ दया.

**महापालिका सचिव :–**आपणांस जर दर वाढवायचे असेल तर दर वाढविण्यापुर्वी एक सभा ९ तारखेपर्यंत लावणे आवश्यक असेल. आणि त्यानंतर महासभेत २० तारखेस महासभेपुढे आणता येईल.

**सदस्य, श्री. राजेश वधारीया**:– जर दर वाढवायचे असतील तर जनरल बॉडी मधून २० फेब्रूवारी पर्यत मंजूरी मिळाली पाहीजे. आज तारीख आहे २ फेब्रूवारी, तो १२ फेब्रवारी पर्यत हे काढले २० तारीखे चे अजेंडा सात दिवस पहिलो जी निघते, तेव्हाच हे आपण करू शकतो. एक दोन दिवसच आहेत जास्त दिवस नाही आहेत. नविन अजेंड निघेल आणि ती दराबाबत (व्हॅल्यू) असेल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी** :– २० तारखेपर्यंत सांगतले आपण.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया**:–हो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–** जनरल बॉडीसाठी २० तारीख.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया:–** साहेब जनरल बॉडी साठी २० फेब्रूवारी. स्थायी समितीमध्ये पास होवून जनरल बॉडी कडे जाईल, जनरल बॉडीचा एजेंडा निघेल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :–** २० तारखेला अजून वेळ आहे. १२ तारखेला ठेवा.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया**:– नंतर लग्नसराई आहे. आपण तारीख सांगा ना.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी** :– १४ तारखेला ठेवा.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया**:– १४ तारखेला एजेंडा निघणार नाही जनतल बॉडीचा. सात दिवसाची नोटीस पाहिजे. ९ तारीखेला ठेवा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— कोणत्या कारणासाठी ऐवढा वेळ घेत आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया:—** यासाठी की काही प्रस्ताव दया. एकाच वेळेस कामे झाले पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— हे बघा एक बाब मी क्लीअर करत आहे, ही जी फी आहे, एक कुटूंब ,एक युनिट अशीच घ्यावी लागेल. याला पर स्केअर फुट जर घेतल तर बरोबर होणार नाही. कारण कचरा आपण प्रत्येक घरामधून काढत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया**:— हॉटेल मध्ये पर स्केअर फुट केले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— मोठया हॉटेल मधून कचरा जास्त निघतो. कुटुंबामध्ये तसे होत नाही ,जर घर मोठ असेल तरी कचरा तेवढाच निघेल. कमर्शिअलमध्ये हां पर युनिट असायला पाहीजे. जी गोष्ट आपल्याला करायची आहे. जी आजच केली तर निर्णय आजच घेतला तर अजून चांगल असेल. कारण की नाही तर सर्व कामे थांबवायला लागतील ही आपत्ती आपल्यावर येणार आहे. जर ६५ करोडची जम्प यावेळेस जर घेतली नाही खड्डा भरायचे काम नाही करत तर पूढे जावून नगरसेवक निधी व आता जे काम करणार आहेत ती सर्व कामे थांबवावी लागतील. असा कठोर निर्णाय घ्यावा लागेल.

**सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी:—** मा. आयुक्तजी जसे सर्व सदस्य बोलत आहेत, मी एक खाली आपल्याला निवेदन करत आहे, हया मीटींग ला ॲडजॉन कररून पुढची तारीख घ्यावी. परंतु कल्याण मध्ये, ठाणे मध्ये आणि भिंवडी मध्ये जी आपल्या जवळची तीन महानगरपालिका आहेत या कच—या विषयी आपण वाढवत आहोत त्याठिकाणी त्यांनी हया वर्षी काय वाढवलेल आहे. ठाण्याची तर जेवढी मला माहिती आहे, त्याच्या शेवटच्या वर्षीच त्यानी हॉटेल्स हातगाडी वैगेरे यांच्यावर कच—याचा टॅक्स वेगळा लावलेला आहे. आणि प्रत्येक महिन्याला बील पाठवले जातात. कमर्शिअल वरती पण लावलेला आहे परंतु किती लावला आहे हे माहीत नाही, माहिती करून घ्यावी लागेल. जास्त दिवस लेट करू नका ४,५,६, ला ठेवा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**कल्याण ची मी महिती काढून आणलेली आहे. कल्याण चे त्यांचे स्वत:चे टॅक्स बेस ३०० करोडच्या वरती आहे. मालमत्ता (प्रॉपर्टी )टॅक्स, आपले टॅक्स बेस १०० करोड पेक्षा कमी आहे. इथेच आपले, आम्ही हे नाही करत आहेत की सॉलेट बेस मॅनेजमेट ची आपल्याला फी घ्यायची आहे. आपल्याला कोणत्या ना कोणत्या तरी पध्दतीने डेफीसीएट कमी करायचा आहे. कच—यासाठी आल्या खिशातून खर्च केला जात आहे. ते आपल्या खिशातून खर्च करत आहेत, ६०, ६५ करोड आपल्याला नगरसेवक निधीमध्ये आपल्याला कामात येईल.

**सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी:—** १०, ११ तारखेला बंद आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** इथे १५ ते १६ मेंबरर्स वेळ मागत आहे. जी.बी. मध्ये सुध्दा असे होवू सकते की अजून एक, दोन दिवस ॲडजॉन करा. २० तारखेनंतर अडजेस्ट करू शकणार नाही तर १७ तारखेला जी.बी. समोर ठेवून केल तर चांगल होईल. नाही २० फेब्रूवारी अगोदर मान्य व्हायला पाहीजे.

**सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी:—**निर्णय पूर्ण झाला तर १७ तारखेचा एजेंडा निघू शकतो, आणि १७ तारखेची ॲडजॉन करून २० फेब्रूवारीला मीटींग ठेवू शकतो व ९ फेब्रूवारीला एजेंडा काढावा लागेल.

**सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी:—** इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** आपला जो विषय आहे त्याला तात्पूरता त्यांच्या जबाबदारी वरती एका लाईन मध्ये जेवढ होईल तेवढे, बस,

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** रू. १ करोड ४५ लाख, आभारी आहे.

**सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी:—** हे पहिलेच सांगितलेले आहे.

**सभापती, श्रीम. कंचन अमर लुंड:—** मीटींग ॲडजॉन करत आहोत व ९ फेब्रूवारी २०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता ठेवली जाईल.

सांयकाळी ५.३५ वाजंता सभेचे कामकाज स्थगित केल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ९/२/२०१८

**दि. ९/२/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**१८—ब**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक ३०/१/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेली सभा स्थगित करण्यात आल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक २/२/२०१८ रोजी दुपारी ३.३० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदरची सभा पुन्हा स्थगित झाल्याने सदर सभा शुक्रवार दिनांक ९/२/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ३ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| ४ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ५ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ६ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| ७ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| ८ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| ९ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी, २. श्रीमती जया प्रकाश माखिजा, ३. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ४. श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर, ५. श्रीमती पंचम उमेश कालानी, ६. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ७. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
५. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
६. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा

७. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
८. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
९. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी
१०. श्री. वानखेडे, लेखा अधिकारी
११. श्री. प्रबोधन मवाळे, सहा. आयुक्त
१२. श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१३. श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त
१४. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१५. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
१६. श्री. भास्कर मिरपगारे, प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी
१७. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१८. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती नर्गिस खान
२. श्री. बाळु भांगरे

दुपारी ३.३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :—** ही स्थगित सभा आहे, मी विषय वाचून दाखविते.

विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—**घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' **[User fee]** आकारणी करणेबाबत.

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**साहेब, आपण जे पेपर दिले आहे. डिटेल ऑफ युएमसी इनकम इन टॅक्सेस दि पर परर्सन लायबिलीटीवर. तर आम्ही म्हणतो की या प्रस्तावर आम्हांस जरा विस्तार करुन सांगावे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**स्वच्छ भारत मिशन अंतर्गत फक्त कचरा व्यवस्थापनवर आपले वर्षभरात ७० कोटी ३३ लाख खर्च होतो. आपणांस सेग्रीकेशन, घरोघरी घंटागाडी पाठवुन कचरा उचलायचा आहे, स्वच्छ भारत सॉलिड वेस्टच्या अंतर्गत काम करायचे आहे. ओला व सुका कचरा वेगळा करायचा आहे, तो वेगळा खर्च येणार. त्याअंतर्गत ओएनआरचे व कॅपिटल खर्च वाढणार. आजच्या तारखेस जो खर्च होत आहे तो या वर्षाचा घेतला तर ७० कोटी ३३ लाख होतो. यामध्ये कंन्झरवेशन टॅक्स जो लावतो त्याद्वारे जो आपणांस पैसा मिळतो, तो फक्त ५ कोटी २३ लाख आहे, म्हणजे नेट ६४ कोटी १० लाख डिफिशीट, फक्त आणि फक्त कचरा व्यवस्थापनावर खर्च होत आहे. तर आपण लोकांना सुविधा देत आहोत व काही असुविधेचे मोल मागत आहोत. आम्ही हे म्हणत नाही की कच—याच्या नावाने त्याचा उपयोग आम्ही रस्ते बनविण्यासाठी करु. किंवा पगार आहे किंवा अन्य खात्यात करणार असे नाही. कचरा व्यवस्थापनाचे जे कर्मचारी आहेत व त्याच्या काही पायाभुत गोष्टी आहेत त्याचाच खर्च आहे. तसेच आपण पाहिले की मागील चार पाच वर्षात रेटेबल व्हल्यु वाढविण्याबरोबर मायनर वाढ झालेली आहे. आणि टॅक्स बेस आपला मागील ४—५ वर्षात सेम राहिला आहे. आपला कॉस्ट ऑफ रनिंग व कॉस्ट ऑफ प्रोजेक्ट आहे डे टु डे मेंटेनन्स आणि शहरास ज्या काही सुविधा दयायच्या आहेत त्याचा खर्च प्रत्येक वर्षी १० टक्के करायचा आहे. आपण जर टॅक्स बेस नाही वाढविला तर प्रत्येक वर्ष आपले डिफिशीट वाढेल आणि प्रत्येक वर्षी अशी वेळ येईल की कोठे ना कोठे कटोती करावी लागेल. नगरसेवक निधीचा जो विषय आहे तो सुध्दा आपणांस तोलमोलने करावा लागत आहे. कारण आपणाकडे पैश्याची कमी आहे. हा ६५ कोटीचा गॅप कमीत कमी कच—याचे डिफिशिट वेगळया विषयातुन काढुन आपणांस हे यात टाकावे लागत आहे. तो तरी कमीत कमी झाला पाहिजे, बाकी जे आहे आपल्या गरजा आणि खर्च व इनकम हे तर आणखी व्यस्त प्रमाण आहे ती वेगळी गोष्ट आहे. तर कमीत कमी केंद्र शासनाचा आधार घेवुन त्यांचे म्हणणे आहे की कोणते शहर आपल्या कचरा व्यवस्थापनाचे काम पुर्ण करत आहे. आपण त्या गोष्टीत एवढे मागे आहोत की आपण १० टक्के सुध्दा व्यवस्थापन खर्च वसुल करु शकत नाही.

६४ कोटी व ७० कोटीच्या विरुध्द ५ कोटी वसुल करत आहोत. तर याचाच अर्थ असा आहे की, केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्व्हेक्षणाची जी टिम येणार आहे व त्याद्वारे जे परिक्षण करणार या विषयात त्यांनी अहंम महत्व दिले आहे. आपणांस यामध्ये शुन्य मार्कस् मिळणार, जेवढा आपणांस खर्च येत आहे. आजच्या तारखेला कमीत कमी तरी वसुल करत आहोत. आपल्या वसुलीत आपण जेवढी मागणी करत आहोत ५० टक्के तरी वसुल होत नाही. कमीत कमी आपण मागणी तरी वाढवु या. वसुली होणार नाही होणार ती गोष्ट वेगळी. १०० टक्के वसुली समजुन चालले तरी आपण ५ कोटी या तारखेस वसुल करणार. ७० व ६५ कोटी तरी वसुल करणार तर ते डिफिशिएट बरोबर राहील. त्यासाठी आपणांस हा चार्ट बनवुन दिला आहे. आपणांस असे वाटत आहे की आपण महिन्याला ७५ वाढवत आहोत परंतु ओव्हर ऑल याचे दायित्व जर आपण पाहिले तर पर फॅमीली, पर परसन, पर हिअर व शेवटचा जो कॉलम आहे तो पर डे आहे, ५५ कोटी जर आपण वाढवत आहोत, पर परसन, पर एव्हरेज ४८ पैसे आपण वाढवत आहोत. यामध्ये जे मोठे लोक आहे त्यांचा जास्त असेल. जे गरीब लोक आहे त्यांचा ४८ पैश्यापेक्षा सुध्दा कमी येईल. आता जे प्रेझेंट एक्झीस्टींग वसुल करत आहोत, जी मागणी आहे ती ५ कोटी, त्याचा पर परसेंट किती होत आहे ५ पैसे, म्हणजे ४ पैसे पर परसन आपणांस पेमेंट मिळत आहे. त्या माणसास आपले शहर स्वच्छ असले पाहिजे असे वाटते, ओला व सुका कचरा वेगळा असला पाहिजे. स्वच्छ सर्व्हेक्षण मध्ये ५० च्या आत रॅकिंग असले पाहिजे. संपुर्ण शहर सुंदर असले पाहिजे. आम्ही संक्षिप्त मध्ये आपणांस सांगितले की किती दायित्व त्याचे आहे. लोकांना सांगायला खुप आहे की वर्षाचे दोन हजार वाढत आहे, वर्षाचे असे असे वाढत आहे, पर डे पर पर्सन किती वाढत आहे व आजच्या तारखेस किती वाढत आहे ते सुध्दा आपण पाहणार. जर चालु वर्षाची मालमत्ता कर पाहिले तर १०० कोटी १५ लाख आपण करंट बजेटमध्ये लिहिले आहे. त्याचे सुध्दा दायित्व येत आहे, पर पर्सन पर डे ७४ पैसे ती सुध्दा मागणी आहे, त्या विरुध्द वसुली अभियान, अभय अभियान चालविले, व मागील वर्षी नोटबंदी झाली त्यावेळी आपण ९० कोटीवर पोहोचलो नाहीतर ५०—६० च्या वर मागील पाच वर्षात वसुली झालेली नाही. म्हणजेच ७४ पैसेच्या विरुध्दात ५० टक्के तर पर पर्सन पर डे ४० टक्के कराच्या स्वरुपात पैसे मिळत आहेत. व शहरास पाहिजे की रस्ते चांगले होवोत, बाकी सर्व सुविधा मिळोत. तर मला असे वाटते की हे कडु औषध आहे ते सुध्दा हलकेच आहे. आपण या वर्षाचा बजेट बनविला आहे तो आता आपल्यासमोर येणार त्यासाठी आपण उच्च बाबी ठेवल्या आहेत. मालमत्ता करात आपणांस ८० कोटी मिळाले पाहिजे, डेव्हलोपमेंट चार्जेस मध्ये २५ कोटी मिळाल्या पाहिजेत, नागरीकांची सुध्दा अपेक्षा आहे की आपण सुध्दा बजेटमध्ये जास्त ठेवणार नाही, तरी सुध्दा ६०० कोटी मॅच करण्यासाठी यासाठी सुध्दा डिफिशिएट आहेत. कमीत कमी आपण ६५ कोटीने तरी सुरुवात करु. त्यासाठी आपणांस थोडी तरी शांती मिळेल. नाहीतर मग आपण समोरासमोर उभे राहणार की नगरसेवक निधी मिळत नाही, हा मिळत नाही, तो मिळत नाही, हेच प्रश्न फिरुन फिरुन येत राहतील. आपणाकडे पैसे किती व आपली आवश्यकता किती. तर आपणांस विनंती आहे की, नागरीकांना ही गोष्ट सांगता आली पाहिजे. व आमच्यावर हा दोष टाकण्यात यावा की ही केंद्र शासनाची भुमीका आहे. हया गोष्टी सर्वांना आर्थिकदृष्टया समजली पाहिजे की आपण १ टक्के पर परसन पर डे घरुन देवु शकत नाही तर मग या शहराचा विकास कसा होईल. तसेच कुठलीही गर्व्हमेंटची स्किम येणार नाही, जी काही अमृत स्कीम होती ती मर्यादीत कालावधीत होती ती संपली. काही कार्यक्रम बनणार, तो येईलच. जो खर्च वाढला आहे, त्याची यादी फार मोठी आहे, आज सुध्दा एमएमआरडीएचे जे रस्ते बनत आहेत त्याचे प्राकलन बनविते वेळी, साईड लाईन सिफ्टींगचा कोणताही प्राकलनात आपण समावेश केला नाही. आपण त्यांना पत्र सुध्दा लिहिले होते की आपण एस्टीमेट पास करुन परत रस्त्याची मंजुरी दया. त्यांनी आज निगेटीव्हमध्ये पत्र लिहिले आहे की त्याची तरतुद, त्याचा अर्थसंकल्प आपणांस करावा लागेल आम्ही फक्त रस्ते बनविणार, लाईन सिफ्टींग व बाकी सर्व कामे आपणांस करावी लागतील. एमएमआरडीए जे काही रस्ते बनवत आहे त्याचे सर्व्हीस लाईन व रोड कटींग वगैरेचा खर्च आपणांस करावा लागेल. डिफिशिएटचे आणखी एक बर्डन वाढले आहे.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>**हे आपल्या डीपीत नाही की आम्ही शहरवाशियांना बोलु शकु की आम्ही एक नविन कर आकारत आहोत. मी काल सुध्दा आपणांस विचारले होते की एक शॉट ऍण्ड अमाउंट एक नॉमिनल अमाउंट सांगावी. की आम्ही ५० रुपये किवा ६०० रुपये महिन्याचे घेत आहोत. त्यांना आपण उदाहरण दाखवावे की अशी गोष्ट होवु शकते. जेव्हा आम्ही शहरवाशियांना काही दाखवु शकु तेव्हाच आपणांस काही मिळु शकेल. आपली गोष्ट बरोबर आहे की आपणावर खर्च आहे, आजची स्थिती अशी आहे ना,जर आपण कमर्शीअलवर टाकले तर मला नाही वाटत की ती लोक एक्सेप्ट करतील.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावता येण्यासारखाा मिळकतींना लागु होणारी युजर फी, ती लोकांना समजावावी कशी?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आपण काल त्याचा एक डेमो पाहिला, टाउन हॉल येथे कार्यक्रम होता., त्यात एक श्री. जोशी म्हणुन आहेत, असे काही एक उदहरण आहेत, आपण असे एक प्रयोग बाजारात उपलब्ध करुन घेवु शकतो. एक घरगुती बास्केट आहे आणि त्यामध्ये आपण कचरा जर टाकले, त्यात कचरा जिरविला तर १०० दिवस त्या बास्केटीतील कच—याचे प्रोसेसिंग करुन, ९५ टक्के जो ओला कचरा आहे, साध्या साध्या गोष्टी असतील तो भाग वेगळा, पण या गोष्टी त्यांना घरच्या घरी जिरविता येतील. त्यास इंडयूजल हाउस म्हणतात, कॉमन जर करायचे असेल तर प्रत्येक सोसायटीमध्ये कंम्पोटिंगसाठी जागा करावी लागेल. जर सोसायटीने वन टाईम जर खर्च केला, देखभाल केली तर आपल्याला त्यांच्याकडुन हा कर घ्यायची काही गरज पडणार नाही.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**श्रीमती सरिता खानचंदानी हया एक समाजसेविका आहेत तुम्हीही नाव ऐकले असेल त्यांनी अशा प्रकारचे प्रपोजल पुर्वी आणले होते. तेव्हाच जर हे झाले असते तर जवळपास आतापर्यंत ७५ टक्के शहर कचरामुक्त आला असता. प्रशासनाने त्यावेळी लक्ष दिले नाही, आम्ही सांगुन चुकलो. २ वर्षापुर्वीची ही गोष्ट आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**जरी घरोघरी जिरविला तरी ७० कोटी वाचतील, १०—२० कोटी खर्च येणारच. घंटागाडया कमी लागतील, ओव्हरऑल खर्च जो आहे तो उचलावाच लागणार. पण आपणांस हे करावेल लागेल, एक प्रोत्साहन देवु शकतो दर महिन्याला १७५ कोटी वाचवायचे असतील तर तुम्ही घरच्या घरी करा, तुम्हांला दोन चॉईस आहेत. एक तर तुम्हांला ते करायचे नसेल तर तुम्ही पैसे दया.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**मी माझ्या प्रभागात लोकांना ओला कचरा, सुका कचरा वेगवेगळा करा, असे सर्व काही सांगितले, लोकांचा एप्रोच जो आहे तो निगेटिव्ह आहे. आम्ही नाही करणार, आम्ही कशाला करु, आमच्याकडे कामवाली बाई येते. ती स्वत: कचरा बाहेर फेकते. तर त्यांना एक पर्पज पाहिजे सांगायला की आपणावर १०० रुपये महिना, ५० रुपये महिना जर आपणांस ही रक्कम वाचवायची असेल तर आपणांस सुका व ओला कचरा वेगवेगळा करावा लागेल. त्याची आपणांस विल्हेवाट सुध्दा लावायची आहे. ६५ ते ७० कोटी रिकव्हरी होणार हे मला माहित नाही. परंतु एक सुरुवात तर झाली पाहिजे. जसे आपण म्हणालात की दोन वर्षापुर्वीच हे करायला पाहिजे होते. त्यावेळी आपण ही सुरुवात केली नाही, आता तर करु शकतो. एक तर सुरुवात झाली पाहिजे, ज्याचा आपण दंडाच्या रुपाने म्हणा किंवा कसेही, आपण जर त्यांना सांगितले की आपली ही रक्कम वाचेल, आपणोस एक दुसरे उदाहरण देतो २०१२ च्या इलेक्शनमध्ये त्यावेळी लोक पाण्याचा मुददा उचलला होता, जे मिटर लावले आहेत आपल्या घरात त्यावेळी कोणार्कला पैसे वसुल करण्यास सांगितले जाईल. व ती आमच्याकडुन फारच मोठी वसुली होईल. तर मी त्यावेळी लोकांना समजावत होतो की आपणांस जी ब्ल्यु लाईन देण्यात आलेली आहे, यामुळे आपले जेवढे बिल येईल व समोर आपले लाईत्रचे बिल कमी होईल, जर लाईटचे बिल जास्त होते तर तो खर्च मी देईल जर आपले वाचत असेल तर मी आपणांस देईल, इलेक्टशनची वेळ सेंसेटीव्ह असते, प्रत्येक घरोघरी जावे लागते. त्यावेळी लोक प्रश्न करत असतात व त्यावेळी हा मुद्दा फारच सेंसेटीव्ह असतो. लोकांना कशाप्रकारे समजावे की ही जी गोष्ट आहे यात फायदा कसा होईल, आज आपले बील ७—८ हजार येत आहे, आज जरआपण मोटर लावली आहे तर त्याचे बिलींग येईल चाडेचार ते पाच हजार कमी होईल. ४८ हजार एक वर्षाचे होतील, आपण आता ३६०० वर्षाचे भरत आहात तर हे ७२ व ३६०० यामधुन जर आपण महापालिकेस १० ते २० हजार दिले तर आपले तरी सुध्दा पैसे वाचतील. आपले मिटर अदयाप चालु झाले नाही, बिलींग चालु आहे. तर त्यावेळी आम्ही लोकांना समजावत होतो की आपण ५० टक्के दया, नुकसान होणार तर मी आपणांस भरुन देईल. आता लोकांना काय वाटते की हे आवश्यक नाही. कंम्लसरी नाही तर कमी ओला व सुका कचरा वेगवेगळा का करु? कर लागेल, ५०, १०० लागु दया, १२०० रुपये, ६०० रुपये आपले वाचतील परंत आपणांस असे असे करावे लागेल. असे आपणांस लोकांना सांगायचे आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातुन लोकांना समजावायचा प्रयत्न केला, झोपडपट्टीत जावुन लोकांना समजावुन सांगितले. लोकांचे म्हणणे होते की पहिले तुम्ही पाणी दया, पाणी देत नाहीत व ओला व सुका कचरा वेगवेगळा करावयास सांगतात. पहिले आम्हांला दोन वेळ पाणी मिळत होते आता एक वेळ सुध्दा मिळत

नाही. १० ते १५ मिनिट पाणी येते, कधी येत नाही, १० ते १५ मिनिटच आपण पाणी देता आणि सांगत असतात की ओला कचरा वेगळा करा, सुका कचरा वेगळा करा. आम्ही लोकांना ब–याच गोष्टी समजावल्या काही लोक समजतात व काही लोक समजत नाहीत. जर पाणी आपण बरोबर देत नाहीत व कर वाढविण्याचे आपण लोकांना सांगणार तर लोक आम्हांस, आता तर काहीच म्हणत नाहीत, परंतु नंतर चार गोष्टी सुनवतील. असे मला वाटते. लोकांना समजावयास आम्ही समजवु परंतु लोकांकडुन आपण कर घेतो तर त्यांना सुविधा सुध्दा दिल्या पाहिजेत. मगील महासभेत मी नव्हतो परंतु आमच्या नगरसेवकांनी खाली बसले व चार तास पाण्याविषयी चर्चा केली. काहीच झाले नाही, त्यावर उपाय निघत नाही ना, पाणी येते ते सुध्दा घाण पाणी येते. पाण्यात लिकेज आहे, ते करत नाहीत, घाण पाणी येते, एमआयडीसीचे रोज काही ना काही असते. शुक्रवारी पाणी बंद असते, परत इतर दिवसी काहीतरी पाण्याचा त्रास होणार. आम्ही तर टॅलण्ड मध्ये आलो तुम्ही ब्लु लाईनच्या गोष्टी करणार ते तर शेवटच्या गोष्टी आहेत, आमच्या प्रभागात तर लोकांना पाणी मिळत नाही. किती वेळा आम्ही लोकांना काय सांगावे. लोकांचे सुध्दा म्हणणे बरोबर आहे. आपण इतर कामासाठी जो खर्च करत आहात ना, डस्टबिन वाटण्यासाठी, शौचालयासाठी करत आहोत तर किती पैसे एमआयडीसी जास्त घेणार आहे. दोन वेळ पाणी दिले तर लोकांना जास्त काही नको, पाणी प्रथम दया.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**बरोबर आहे हे. पाण्याची जी समस्या आहे ती लिकेजमुळे होत आहे, आणि इतरही काही समस्या आहेत, जुन्या लाईन काढुन नविन लाईन टाकण्याचा जोपर्यंत आपण प्रस्ताव नाही करणार तजोपर्यंत लिकेजेस, लोकांचा दबाव या सर्व गोष्टी होत राहणार, आम्ही पाणी पुरवठयाचे ५० कोटीचे प्राकलन कच्चे बनविले आहे. या प्राकलनासाठी पैसे कोठुन येतील, आपण खर्चाचे नाव देवो अथवा काहीही देवो, ६५ कोटी किटीत येईल व डिफिशिएट कमी होईल, आज जो कच–यावर खर्च होत आहे तो आज आपण पाण्यासाठी खर्च करु या. ५० कोटी तेथुन व आपणाकडुन १५ कोटी बनुन जातील. या विषयास जर आपण मान्यता दिली तर ५० कोटीची स्कीम बनविण्यास अजुन सोपे जाईल. तर ते ५० कोटी वेगळे एक्स्ट्रा एक्सपींडीचर अगेन कंटिन्यु. म्हणजेच आपण १००, १५० कोटी प्रत्येक वर्षी डिफिशिएट मागील बॅकलॉग आणि प्लस एडिशनल म्हणजे आपला गॅप वारंवार वाढतच राहिल, उत्पन्न व खर्च. श्री. चौधरी साहेब जे म्हणत आहे त्यात आणखीन एक कारण आहे की यास त्वरीत मान्यता दिली पाहिजे मग. जर पाण्याची समस्या सोडवायची असेल तर ६५ कोटी येथुन डिफिशिएट कव्हर होवुन जाईल. तर ५० कोटी आपण तेथे पाण्यासाठी देवुन टाकु.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**मागील वेळेस अर्थसंकल्पामध्ये जी तरतुद केली होती, तर त्यात किती पाण्याचा प्रश्न सोडविण्यात आला, काय लोकांना पाणी मिळाले काय, काही काम झाले काय, लाईन टाकण्यात आल्या काय?

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**जोपर्यंत आपण ५० कोटी खर्च नाही करणार व नविन लाईन १०० टक्के लोकांना नाही देणार, तर कोणतीही समस्या सुटणार नाही, माझे जर चुक असेल तर आपण सांगु शकता. त्या हिशोबाने आपण डिझाईन करु या परंतु एजपर डिपार्टमेंट, श्री. सेलवन जोपर्यंत आपण न्यु लाईन करत नाहीत, जुन्या लाईनीच्या लिकेज आणि प्रेशर, बाकी मुद्दे हे कायम राहणार आहेत.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**यापुर्वी आपण एमआयडीसीकडुन जेवढे पाणी घेत होतो, तेवढेच पाणी यावेळेस घेतले आहे. किती पैसे आपले नुकसान होणार आहे आणि किती पैसे आपले जास्त जाणार आहे. पाणी ही लोकांची गरज आहे तर ती आपण पुर्ण करु शकतो.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**२५ ते ३० टक्के पाणी रस्त्यावर आणि जमिनीवर जात आहे, त्यामुळे त्रास व्हायला लागला.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**बरोबर आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**तुमचे लिकेज सुध्दा वाचेल शिवाय पाण्यापोटी २५ पैसे जे जादा दयावे लागत आहेत उलट आपण त्यात कटोती करुन संपुर्ण शहराला पाणी देवु शकु. नविन लाईनशिवाय काही पर्याय आहे का, मला सांगावे कोणीतरी. मला असे वाटते की पुढच्यावर्षी हे रोजचे लाखो खर्च करण्यापेक्षा पाणी वाया जाण्यापेक्षा ब्ल्यु लाईनच १०० टक्के योजना करण्यापेक्षा मला तर काही पर्याय दिसत नाही.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**निवडणूकीच्या वेळेस पाणी व्यवस्थीत मिळत होते, त्यावेळी आपला खर्च किती होत होता व आता किती होतो. यामध्ये जर ताळमेळ पाहिले तर त्यावेळेस जास्त खर्च होत होता व आता कमी होत आहे असे काही नाही. तेव्हा सुध्दा लाईन लिकेज होत्या, तेव्हा सुध्दा लोकांना पाणी मिळत होते. त्यावेळी आमची पाण्याची बोंबाबोंब नव्हती. निवडणूका झाल्या होत्या.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**आयुक्त साहेब, जेव्हा ब्लु लाईन आपल्या शहरात टाकल्या गेल्या होत्या त्यावेळी जी लिकेजेस होत होत्या त्या बंद व्हायला पाहिजे होत्या. व आपणांस पाणी एक्स्ट्रा मिळायल्या पाहिजे होत्या, ते आजपर्यंत आपणांस काहीच मिळत नाही. जी आपण लाईन बदलली त्यात सुध्दा लिकेजेस होते, समजा आपण कोनार्कच्या लाईन टाकल्या, शहरात ७५ टक्के टाकल्या त्यात जे डेमेजेस होत्या, त्या कव्हर झाल्या नविन लाईन आल्यानंतर. तर मुख्य म्हणजे ते पाणी तरी आपणांस मिळायला पाहिजे होते ना. तर आमच्या प्रभागात अजुनपर्यंत पाण्याची कटोती आहे, आणि ९५ टक्के माझा प्रभाग कव्हर आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**त्यांनी ज्या लाईन दिल्या त्यांना आम्ही सांगितले की मिरा भाईंदर येथुन ज्या लाईनी जात आहेत, त्यासोबत जोडण्यात यावे. त्याची प्रत नाही आली का अजुन? मा. मंत्री महोदयांशी सुध्दा चर्चा होणार आणि त्यास मान्यता मिळण्याचा आम्हांला विश्वास आहे. मुख्य म्हणजे पाल्याला प्रेशरचा फार मोठा मुद्दा आहे. प्रेशरचा का मुद्दा आहे तर ब—याच लोकांना इंडस्ट्रीअल चेक वगैरे लोकांच्या लाईनी क्रास करण्यात आल्या.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**पाण्याचे मिटर बसविण्यासाठी पैसे घेतले आहेत परंतु अदयाप बसविले नाहीत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**तो मुद्दा नाही, माझे असे म्हणणे आहे की, लाईन टाकल्यानंतर आपण लोकांना दुस—यावेळेस जे पाणी देत होतो ते बंद करण्यात आले. त्यामुळे २०—२५ लाख बचत झाली असेल, परंतु माझा प्रभाग आहे, श्री. चौधरींचा आहे, अन्य सदस्यांचा असेल तर ते टेलॅण्ड जे आहे ना, त्यात काय होते पहिले लोक सकाळी पाणी भरुन घेतात, जर दुपारी व संध्याकाळी मोटर नाही चालु करणार, व टाकी भरली आहे तर पाणी इतर ठिकाणी पोहचेल. त्यांच्याकडे पाणीच पोहचत नाही. त्याचे प्रकार अनेक आहेत, कनेक्शन दया, मग लाईनी जास्त होतात. माझी आपणांस विनंती आहे की पहिल्यासारखे आपण जे पाणी देत होते तसे पाणी देवुन जे टेलॅण्ड आहे, श्री. चौधरी साहेब, श्री. बोडारे साहेब, सर्वांकडे ही अडचण आहे. तर कमीत कमी टेलॅण्डला तर पाणी जावे.श्री. सेलवनजी, आपण सांगावे की आपले किती बिल वाचले. बिलींगचे किती टक्के कमी झाले जे साहेबांनी दुसरे पाण्याविषयी सांगितले. पहिले फार मोठया प्रमाणात पाणी येत होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**यात तांत्रिक मुद्दे आहेत, आपण सांगावे, काही स्लम एरियामध्ये त्यास कॅप सुध्दा नाही. तर आपण जर म्हणाल तेथे पाणी भरले तर ते पाणी नाही जाणार ते पाणी वाहत राहणार.टेलॅण्ड येथे जाण्यासाठी आपणांस ते पाणी वेस्ट करावे लागणार. मी स्वत: स्लम एरियात जावुन पाहिले आहे की ते पाणी ड्रममधुन वाहत जावुन गटारमध्ये जात होते. लोकांमध्ये सुध्दा ही जागृती असली पाहिजे की आपणांस किती पाणी पाहिजे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**जेव्हा आम्ही नगरसेवक म्हणुन निवडुन येतो तेव्हा लोक आम्हांला विचारत असतात की पाण्याचे काय आहे?

**सदस्या श्रीमती कविता पंजाबी:—**आमचा प्रभाग तर फारच गरीब आहे, ते तर आपणांस काही देणारच नाही, आमच्या येथे गटारे भरली आहेत, सफाई नाही, तसेच ओला व सुका कचरा त्यांना समजावत समजावत त्रास होतो म्हणुन माझा तर विरोध आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**साहेब, हे पहा शहरात असे बरेचसे कामे आहेत की तेथुन रिकव्हरी होवु शकते.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**साडेसात लाख फॅमिली म्हणजे पॉप्युलेशन किती झाली? .४८ प्रत्येक फॅमिली हायली आहे ना. १७५ रुपये एका माणसाचे झाले. १० लाख जरी आपण शहराची पॉप्युलेशन पकडली तर साडे सात कोटी जास्त होत आहे ना.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**साडेपाच लाख शहराची पॉप्युलेशन आहे.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>**मी १० लाख पकडतो. १७५ रुपये एका माणसाचे वर्षाचे. ३८ पैसे दिवसाचे व ३६५ दिवसाचे होतात १७५ रुपये. जर १७५ रुपये सर्वात जास्त आहे. आपण शेवटी या चार्टमध्ये पहा. पर पर्सन पर डे. हाय आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>**आपण ४८ गुणे पकडले तर २ पैसे होतात. सर्वांना ५ वेळा मल्टीपाय करा. जर आपण पाहिले तर पर पर्सन पर डे चे अडीच रुपये होतात.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**म्हणजे ६५ डिवायडेड पाच करत होते. आपण म्हणालात की ४८ पैसा अॅड टु पाच करा.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**आपल्या सारख्या लोकांना अडीच रुपये पर पर्सन म्हणजे काहीच नाही. जे लोक बीपीएलमध्ये आहेत, आता आमच्या प्रभागात जे आहेत ते ६०० रुपये संजय गांधी निराधार योजना आहे ते मिळण्यासाठी महिन्या न महिने वाट बघत असतात. ६०० रुपये दर महिन्याला परंतु ७–८ महिने झाले अदयाप मिळाले नाही. मी मुख्यमंत्री महोदय व शासनाला पत्र लिहिले आहे. आता तुम्ही म्हणता परपरर्सन पर डे अडीच रुपये परंतु ज्याचे उत्पन्न कमी आहे, तर महिन्याला किती होतात. फक्त कचरा उपभोक्ता फी म्हणुन. आपण फक्त श्रीमंताचा विचार करतो. गरीबांचे काय? गेल्या दोन वर्षापासुन आपण त्यांना सुविधा दिलेली नाही. रस्त्यावरील खड्ड सुध्दा भरु शकलो नाही. पाणी मिळत नाही, प्रशासन लक्ष देत नाही, लोक प्रशासनापर्यंत पोहचत नाहीत. आणि मग नगरसेवकांना कचरा उचलला जात नाही म्हणुन दोष देतात. सुविधा दिल्या असत्या मग आपण हे चार्जेस लावले असते. रस्त्यावरील खड्डा सुध्दा भरला जात नाही. नगरसेवक निधी सोडा, जनरल निधीतुन सुध्दा खड्डा भरला जात नाही. २५ हजाराचे काम सुध्दा झालेले नाही, गेल्या दोन वर्षात.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**साहेब, कोणाच्याही प्रभागात नाही. आज २३ तारखेला इलेक्शन झाले आज ९ फेब्रुवारी आहे, तर लोक म्हणतात आपण एक वर्षात काय केले. जे नगरसेवक मागील वेळेस निवडुन आले ते परत निवडून आलेत तर तीन वर्षापासुन निवडुन येत आहेत, आणि जे नविन निवडुन आले आहेत त्यांच तर अडचण खुप आहे ते तर सांगुच शकत नाहीत की आम्ही एका वर्षात काय केले. समजा आम्हांस आमदार निधी मिळाला, काही आणखी मिळाले परंतु त्यांना निधीपर्यंत पोहोचण्यास व तो निधी आणण्यातच त्रास आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>**शहराच्या विकासाचे दोन प्रकार आहेत. एक गल्लीमध्ये साईटचे डेव्हलोपमेंट आणि पेनसिटी संपुर्ण शहराच्या विकासाचे विषय. शहराचा विकास पाहणार तर आपण खेमाणी नाल्याच्या डायव्हर्शनचे काम सुरु केलेले आहे. अमृतमध्ये १०० कोटीचे काम करत आहोत, रस्त्याचे ५० कोटीचे काम शहरात सुरु आहेत, बाकी सर्व मेजर जे आहे कच—याच्या विषयात आपण काम करत आहोत. नागरीकांच्या प्रभागात काम चालु आहे तर त्यास डेव्हलोपमेंट मानले जाईल, मग नागरीकांना समजावणार कोण मग, डेव्हलोपमेंट गल्लीतच नाही, तर संपुर्ण शहरात झाली पाहिजे, तर डेव्हलोपमेंट म्हणता येईल. आपणांस एका कोप—यातुन दुस—या कोप—यात पोहोचण्यास जेवढा वेळ लागत होता, रस्त्यावरील खड्डे वगैरे साठी आम्ही दावा नाही करणार कमी आम्ही संपुर्ण रस्त्याचे काम करणार. परंतु आमच्याजवळ जर पैसे असते तर आम्ही काही काहीच रस्ते व साईडपट्टी सोडुन रस्ते का बनविले असते. जे काही रस्ते आहेत ते सुध्दा आपण संपुर्ण विडथने करु शकत नाहीत. त्याचाच अर्थ आपणाकडे पैश्यांची कमतरता आहे. जेवढी आमची क्षमता आहे, जेवढे ज्ञान आहे तेवढाच वापर करुन आम्ही शहरास बदलण्याचा प्रयत्न करतच आहोत आम्ही. तर नागरीकांचे फक्त पेव्हरब्लॉक लावले, त्यांच्या सीसी, गल्ली तयार झाल्यात, त्यांचे समाजमंदिराचे काम झाले तरच त्यांना वाटेल की आमच्या शहराचा विकास होत आहे, आमचा नगरसेवक चांगला आहे. आपणांस तोंड फिरुन चालणार नाही तर आपणांस त्यांना समोरासमोर बोलण्याची क्षमता ठेवली पाहिजे.

**<u>सदस्या श्रीमती कविता पंजाबी :—</u>**साहेब, माझे सुध्दा हेच म्हणणे आहे. कधीपासुन लेबर येत नाहीत. आम्ही याबाबत आपणांस रोज फोन करतो, कित्येकदा आपणांस सांगितले आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>**हया आमच्या चुका आहेत, प्रशासनाची चुक आहे, ज्यात पैसे लागत नाही सुधारणा होण्यासाठी एक दिवसाचे लागता कामा नये, हे मी मान्य करतो.

**<u>सदस्या श्रीमती कविता पंजाबी :—</u>**ती लोक आमच्याशी भांडण्यास येतात, मोर्चे घेवुन येतात, घरात कचरा येत आहे आम्ही काय करावे जर आपण आता त्यांना सांगणार तुम्ही एवढा कर भरा तर ते मान्य करणार का? प्रथम तर

त्यांना आपण करुन दाखवा की हे काम झाले आहे तर हरकत नाही ना. आपण मेजर काम केले, चांगले काम केले ते आम्ही मान्य करतो. परंतु त्यांच्या लेव्हलचे सुध्दा काम झाले पाहिजे ना. माझ्या प्रभागात बॅरेकस् व झोपडपट्‌टया खुप आहेत, चांगले प्रभाग सुध्दा आहेत जेथे श्रीमंत लोक राहतात.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**६ कोटीचे काम केले आणखी ३ कोटीचे काम प्रस्तावित आहेत. १० कोटी आम्ही दलित वस्तीसाठी खर्च करण्यास जात आहोत त्यातुन ६ कोटी आपण आधीच खर्च केले आहेत. या सर्व गोष्टी लोकांना समजवावे लागेल, जे आपण आता करत आहोत. गार्डनचा विषय संपुर्ण दुर्लक्षित आहे तोही आपण योग्य प्रकारे हॅण्डल केला नव्हता, माळी, लेबर, वॉचमन नव्हते ते देत आहोत. तर लोकांना गल्लीत, नुकडमध्ये ज्या गोष्टी आहेत ते देत आहोत।. प्रशासनात सुधारणा आणण्याचा प्रयत्न करत आहोत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**दलित वस्तीचा निधी जो आहे त्याचे काम होत नाही. त्यात डिप्युट चालु आहे की कोणत्या प्रभागात करायचे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**महासभेमध्ये आम्ही विषय ठेवला आहे कारण पाच वर्षापुर्वी तो निर्णय घेतला आपण. कामांची यादी केली. आता त्याचे वार्डही बदलले आहेत, नविन बॉडी आली आहे. आम्ही निर्णय न घेता तो विषय महासभेपुढे ठेवला आहे. शासनाचे निकष आहेत आणि त्याअनुषंगाने आणखी त्यांनी सांगितले आहे की ५० टक्के इतर ठिकाणी सुध्दा तुम्ही कामे करा. आपण ठरवा आपण काम करु ते. पण आधीच १० कोटीचे कामे पुर्वीच्या मान्यतेने चालु आहेत ना. माझी शेवटची विनंती आहे, आपण म्हणणार शहरात काम होत नाही, मंजुरी मिळणार नाही आणखी कामे होणार नाहीत. आणखीन नाराजी वाढेल, या सर्कलमध्ये आपण फसणार.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**सभापती महोदया, माझे असे म्हणणे आहे की आपल्या सत्तेचे लोक येथे नाहीत व विरोधीपक्ष वाले बसले आहेत. कोरम आहे तर सभा चालु राहु दया.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**आज नगररचनाकार विभागात एवढया सर्व कंम्पलीशन झाल्या आहेत परंतु कोणासही कंम्पलीशन मिळाल्या नाहीत जर आपण लक्ष दिले तर किती तरी वसुली येवु शकते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मी नेहमीच सांगतो प्रशासनात ज्या काही कमतरता आहेत त्याची जबाबदारी मी स्वत: घेतो. त्यात ज्या काही सुधारणा असतील त्या आम्ही करु परंतु हया गोष्टीस लिंक करुन काहीही ढोंग करु नका.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**नाही साहेब, रिकव्हरीचे जे काही स्त्रोत आहेत तेथुन रिकव्हरी आल्या पहिजेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**येतील ना.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**त्या येत नाहीत म्हणुन सांगतो. मागील वेळेस मी मालमत्ताबद्‌दल सुध्दा सांगितले होते की ब—याचशा मालमत्ता आहेत, ज्या असेस झाल्या नाहीत. रेग्युलाईज्डसाठी आल्या आहेत त्या केल्या नाहीत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मी शहराच्या हितासाठी सांगत आहे, जर हा विषय होत नाही ना तर शहरातील विकासाचे काम आपणांस ठप्प करावे लागतील.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**साहेब, यापुर्वी कोणताही आयुक्त, जनतेच्या मध्ये आला नाही जेवढे आपण आला आहात. आपणांस असे वाटले का की जनतेला कन्व्हेन्स करणे सोपे आहे. मागील वेळेस आपण सहा महिने जनतेसोबत होतात.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**एक मिनिट सांगतो, जनता किंवा कोणताही सेंटीमेंट ते वाट पाहतात की हे किती पचनकारी आहे, किती फर्म आहे, किती डावाडौल आहे. जर असे वाटले डावाडौल आहे, तसे तर जनता अधिन हुशार झाली आहे. जर त्यांना वाटले ना की प्रशासन व नगरसेवक सोबत आहेत व हे आवश्यक आहे आपल्या हितासाठी. ते लोक दोन तीन दिवस बोलतील, पेपरबाजी होईल, नंतर अंतिमत: जर शहराच्या हितासाठी निर्णय आहे तर याचा मला विश्वास आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**साहेब, डिवाडर आपण लावले होते तर किती लोक आणाकडे आले होते. नंतर त्याच लोकांनी आपणांस एप्रिसिएट केले ना.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आपण हे कसे समजलात. तर मी सांगतो आपणांस विश्वास कोणावर तरी ठेवावाच लागतो.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**मी आपणांस विरोध केला होता, मी आपणांस एप्रिसिएट केले व सॉरी सुध्दा म्हणालो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**तर आपणच पाठिंबा देत आहात आणि आपणच मला सांगत आहात.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**साहेब, मी सुध्दा बिजनेस मॅन आहे, येथुन येणार व येथुन दयायचे आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मी आपणांस सांगतो की जर हा विषय नाही होत ना तर मग या शहराच्या मलमपट्टीसाठी आयएस अधिकारी यांची आवश्यकताच नाही. कोणताही आयएस अधिकारी, आयुक्त डिफिसिएटचे काम करण्यासाठी कोणीही वाढवा देणार नाही. मी आपणांस स्पष्ट सांगतो. देअर निड ऑफ आयएस आफिसर फॉर डेली मलमपट्टी, तितकेच रोजचे भिक मांगा आणि जेवन बनवा.

**सदस्य श्री. कलवंतसिंह सोहटा:—**परंतु आयुक्त महोदय, आधिच लोक कर भरत नाहीत, आपण आता ठेवले ६५ कोटी, यात आपलया शहराच्या लोकांकडुन जेवढी थकबाकी बाकी आहे. तर ते हे भरुच शकणार नाहीत, आणि जे आधीच कर भरत आहेत, त्यांच्यावर बर्डन येईल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आपणांस दुविधा आहे, आपणांस भरायचे नाही तर नका भरु, तो प्रशासनाच्या कागदपत्रावर चालेल. जो नाही भरणार त्याचे प्रत्येक महिन्याचे मिटर २ टक्के लेट फि चालु होणार.

**सदस्य श्री. कलवंतसिहं सोहटा:—**आपण त्यांच्यावर कारवाई नाही करणार तर त्यांना ४ टक्के सुध्दा भरु दया.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**कारवाई केली म्हणुन तर आपली वाढ झाली आहे.

**सदस्य श्री. कलवंतसिंह सोहटा :—**हे तर फक्त अभययोजनेसाठी भरत होते, इतर वेळेस कोठे भरत होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**नाही, भरत आहेत. आपण रेकॉर्ड काढा ५ वर्षाचा ते पहा किती कर भरत होते व किती भरत आहेत. आम्ही काय प्रयत्न केला आहे, बचतगटवाल्या महिलांतर्फे काम केले. त्यांना कोर्टात स्टे वगैरे भेटु नये, स्टेचा बहाणा घेवुन डॉल्फिनसारख्या केसेस ३०, ३५ आणुन, आता परवाच बॅकच्या रिकव्हरीचे हे काय उदाहरण आहे. ५५ लाख, ६० लाख वन टाईम पोचने भरुन घेणे, आय थिंक सक्सेस ऑफ प्रापर्टी टॅक्स डिपार्टमेंट इनटायर कॉर्पोरेशन ॲडमिट्रेशन, वुई शुड एप्रिशिएट दॅट.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**उदया कोणी लिडर येईल व म्हणेल की मी आपणांस फायदा देईल. असे करुन कर थांबतो. २००२ मध्ये सुध्दा कोणी लिडरने सांगितले होते की मी कर माफ करवुन देईल, तेव्हापासुन डामाडौल आहे कार्पोरेशन.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**मालमत्ता कराचे गफले, मॅनेजमेंट व तेथिल मिसिंग, बाकी हिल प्रॅक्टीसेस त्याचे एक सुध्दा उदाहरण सांगा की या वर्षी झाले आहे का? तर या सर्व गोष्टी हेच दर्शवितात की आपण हॉनेस्टली प्रिपेर, आपण त्याप्रकारे काम करु. कोणासही सोडत नाही, सर्वांसाठी आपण एकसारखा नियम लागु करत आहोत. व सक्तीने करत आहोत, अभययोजनेसारखे ब—याच गोष्टी आपण केल्यात. दिस हीज नॉट सर्पोटेड खुप अनर्पोच्युनेड होईल. अन वर्किंग डे टु डे हे मलम पट्टी केल्यासारखे होईल. माझ्या सारखा येवुन कोणी आयएस अधिकारी विचार करेल की रोजच्या रोज फक्त सॅलरी पेमेंट करायचे आहे आणि फक्त पेपरवर्क करायचे आहे, हे काही आयएस अधिका—याची पोज नाही. ऐनी सेकंडरी, क्लास वन ऑफिसर कॅन हॅण्डल.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**आपल्या शहरातील किती कर आहेत ते जरा सांगावे साहेब. नवि मुंबई असो, पनवेल असो, पिंपरी आहे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी:–</u>**आपणांस येथे माहित आहे की उच्च कर उल्हासनगरमध्ये आहे. यासाठीच सर्व गैरहजर आहेत काय, की सर्व आमच्यावर सोपविणार.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**एक प्रकारे चांगले आहे की त्यांच्याकडुन काम करुन स्वत: गैरहजर राहतात. तीच लोक ठराव करतात की, आयुक्त साहेब आमचे काम नाही करणार तर कोणीह नाही, दिस वाज अबसेंट माय अबसेंट, आय वेरी मच हर्ट.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**साहेब, ही सभा संपल्यावर बजेटची सभा आहे, बजेट आपला तेव्हाच बनणार जेव्हा हे अंतिम होईल नाहीतर बजेट सुध्दा अपुर्ण असेल. २० तारखेपर्यंत हो करायचे किंवा नाही करायचे तेव्हा हे एकतर आज कराचे नाहीतर चार दिवसांनंतर करायचे आहे. पहिले आम्ही विपक्षमध्ये होतो. तेव्हा आपण कोणी उपस्थित नव्हता तेव्हा तर आम्ही असे काही म्हणालो नव्हतो. जो काही निर्णय घ्यायचा आहे तो सोबत घ्यायचा आहे. कर्मशिअल आपण वाढवु शकता मला नाही वाटत त्यास कोणी नाही म्हणणार.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>**जर तेथे वाढवायचे असेल तर आपणांस २० गुणिलेने वाढवावे लागेल.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**कर्मशिअलवर आपला काय विचार आहे ते प्रथम सांगा.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**आपणांस ६५ कोटी पाहिजे. आपण १ लाख ७२ हजार मालमत्तेने घ्या किंवा १० हजार मालमत्तेने घ्या. १० हजार मालमत्तेवर ६५ कोटीचे ओझे टाकणे उचित आहे की, सर्वांनी शेअर करुन. तसे तर आपण कर्मशिअलला जास्त दिलेच आहे. १००० रुपये प्रत्येकी महिना केला आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**हे पहा बजेट तर आहेच, जो शब्द तेथे बोलणार, मी सांगतो आज पाण्यासाठी आम्ही लॉसमध्ये आहोत. आपण पाण्याचे बजेट उघडा तर आपणांस तेच मिळणार, जे मिसमॅच आहे, आपण स्ट्रीट लाईट फ्री मध्ये देतो. सफाई आपण फ्री मध्ये करतो ठिक आहे ती सेवा आहे. पाण्याच्यावेळी सुध्दा हा प्रस्ताव कित्येकदा आला आहे. कितेकदा प्रस्ताव आमच्याकडे आला आहे की पाण्याचे दर वाढवा, आम्ही वाढवत नाहीत.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>**आम्ही लोकांना तेच सांगणार ना की आपला कुठलाही दर वाढविला नाही फक्त हाच दर वाढविण्यात येत आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**साहेब, एक एक करुन मी बोलु इच्छितो कर्मशिअलवर किती वाढविणार त्यावर आधी सहमती करा.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:–कर्मशिअवर म्हटले आहे ज्याचा १००० एरिया असेल त्यास १००० रुपये प्रत्येक महिन्याचे घेणार, ज्यांचे १००० च्या वर असेल हॉटेल वगैरे तर त्यांचे ५००० रुपये प्रत्येक महिना. म्हणजे छोटे हॉटेल्स आहे त्यांचे मिनिमम ठेवला आहे. मोठे हॉटल्स व कार्यालय असतील त्यांच्याकडुन जास्त घेणार. संख्या ओव्हर ऑल १०टक्केच आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>**आज सर्वजण हृदयाचे ऐका डोक्याचे ऐकु नका. परवाच ३ कोटी आलेत.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :–</u>**निविदा मागविल्या ना.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:–निविदा मागविल्या, महासभेच्या? महासभेसमोर ठेवले ना की कोणते काम करायचे आहे. निविदा कोणत्या कामासाठी केल्या? ॲडंटीफाय कसे केल्या? आपण महासभेपुढे कोणता विषय ठेवला आहे.

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता :–</u>**हे पुढच्यासाठी आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>**पुढच्या कामासाठी आहे, ठिक आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**साहेब, आधी ९ प्रभाग होते एसीचे आता १३ झाले आहेत.

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता :–</u>**आता ९ प्रभागाचेच आहेत.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**३ कोटीची निविदा होती ना. ते ९ चेच महासभेसमोर प्रस्ताव आहे तो महासभेसमोर करु ना.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**माझी सूचना होती की एससी, एसटीचे टक्केवारी काढु या, जी टक्केवारी येईल त्या टक्केवारी आपण पर पर्सन ठरवु किती होते ते. १० जरी लोक राहत असतील तर तेवढा पर पर्सन ठेवा. जिथे जास्त डेंसिटी आहे तेथे जास्त पैसे आहेत. आणि जेथे तुरळक वस्ती त्याच समाजाची आहे, त्यांना सुविधा दयायची नाही, त्यापेक्षा पर पर्सन किती येते.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>**जे दलित वस्तीसाठी वार्ड राखीव होते, ते काम आपण करत होतो.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**आपण महासभेत पारीत केले त्यातच ते झाले की ५० टक्के घोषित झोपडपट्टी आहे तर त्यांना एक सुध्दा निधी मिळाला नाही. त्यामुळे ते इंम्बेलेन्स आधीच झालेले आहे. पहिल्या टर्ममध्ये जेव्हा आपणांस निधी मिळत होते, झोपडपट्टीत निधी मिळत होती. त्यात सुध्दा काम झाले नाही. त्या घोषित झोपडपट्टया आहेत ते सुध्दा.

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता :—</u>**आता नविन झोपडपट्टया येतील त्या १३ असतील. या बॉडीच्या आधीच कलेक्टर ऑफिसला गेले तीच यादी आहे ही.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**माझी सूचना होती की, यास हो किंवा नाही असे दोन पर्याय समजण्याऐवजी आपण असा निर्णय घेवु की महासभेने निर्णय घ्यावा. आम्ही महासभेपुढे सादर करु जेणेकरुन हो किंवा नाही असे काही होता कामा नये. महासभेसमोर जायलाच लागेल. आपण यास हो करा अथवा ना करा, महासभेपुढे येण्याची संधी सुध्दा आपणांस मिळणार नाही.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**आपण काय म्हणता कशाप्रकारे केले पाहिजे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**स्थायी समितीचे काही सदस्य नव्हते त्यामुळे आपण निर्णय नाही घेवु शकलो, हे कारण देवुन महासभेपुढे ठेवु या.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**ठिक आहे, ओके, डन. ही तिसरी सभा आहे ज्यात सदस्य अनुपस्थित आहेत. आपण एक काम करा, जेवढे जेवढे सदस्य आले नाहीत त्यांचे संख्याबळ व सही यासोबत जोडा. कोण कोण सदस्य नाहीत, सोडुन दया. याबाबत मजाच नाही हे मी आधीच सांगितले. सदस्य नाहीत त्यामुळे सोडुन दया याबाबत महासभा निर्णय घेईल. हे शासन चालविण्यासाठी निर्णय घ्यायचा आहे, भले जीएसटी लावायची आहे की नोटबंदी करायची आहे. पॉझीटीव्ह विचार करा नंतर त्याचा परिणाम चांगला येईल. जे काही होणार ते फेस करु. साहेब, आम्ही कंसेसस करायला तयार आहे. सहमती घेवुन आपण निर्णय घेणार. भले ते येथे असो की महासभेपुढे असो आम्ही आपणाकडुन कंसेसस करतो. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**ठिक आहे, महासभेपुढे लवकर पास करा.

**<u>महापालिका सचिव</u>**:—यापुर्वी कधी असे झाले नाही स्थायी समिती आधी मंजुरी ठरविते.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**महासभा लावण्याचा अधिकार महापौरांचा आहे, आमचा नाही. भलेही बजेटच्या सभेसोबत लावा ना. बजेट २० तारखेपर्यंत फायनल नाही होणार.

**<u>काही सदस्य :—</u>**परंतु बजेटच्या वेळी कसा घेणार या विषयावर बजेटच्या आधी निर्णय झाला पाहिजे ना.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**जो बजेट येत आहे त्यात जे काही प्रस्ताव असतील आयुक्तांतर्फे, बजेटमध्ये येणार आहे. कमी करा, जास्त करा, तेच ठेवा या सर्व गोष्टी येतील तर मग यास बजेटचा भाग बनवा ना.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**हे बनले आहे, आधीच यात टाकले आहे मी. आपली मंजुरी मिळणार हे समजुनच टाकले आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**हा जो प्रस्ताव आहे त्याच्या खालोखाल आपला ठराव येईल की आम्ही ठराव काय केला त्याचे एक पेज ॲड होईल. किंवा वेगळी महासभा लावायची असेल तर महापौरांतर्फे निर्णय घ्या. पहिले म्हणजे पहिला विषय दर वाढवा.........

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**बजेटमध्ये आधीच टाकले आहे. बजेटचा जो विषय आहे तो आज मंजुर होणार तर त्याचा सुध्दा आपण एक विषय घेणार, स्थायी समितीत आज बजेट पास होणार की फक्त सादर होणार?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**सादर होणार.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**मग असे आहे की बजेटची सभा २० तारखेपर्यंत कंम्पलीट नाही होणार. महासभेत याची एवढी मर्यादा आहे की हा विषय पुढे जावु दया, मग अर्थसंकल्प नंतर येणार.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**युजर फी आकारणी करणेचा निर्णय स्थायी समिती पुढे न घेता महासभेपुढे निर्णयासाठी ठेवा व हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**आज काही सदस्य उपस्थित नाहीत असे पण लिहा.

**<u>महापालिका सचिव :—</u>** ठिक आहे, पास? काही सदस्य नसल्याने, हा धोरणात्मक निर्णय असल्यामुळे महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :—**घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' **[User fee]** आकारणी करणेबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६३ (३) मधील तरतुदीनुसार मलजल, दुर्गंधीयुक्त पदार्थ व कचरा गोळा करणे, काढून नेणे, त्याची व्यवस्था व विल्हेवाट लावणे आणि (राज्य) शासनाने तसे फर्माविल्यास असे मलजल, दुर्गंधीयुक्त पदार्थ, कचरा यापासून मिश्रखत तयार करणे ही सेवा पुरविणेचे तरतूद आहे.

उल्हासनगर शहरात अंदाजे ४०० टन कचरा प्रतिदिन निर्माण होत आहे. सदर कार्ये व कर्तेव्ये पार पाडणेसाठी अंदाजे १३०० कर्मचारी अधिकारी आणि त्यासोबत खाजगी ठेकेदार संस्था कार्यरत आहेत.

उपरोक्त कार्ये व्यवस्थितरित्या पार पाडणेसाठी केंद्र शासनाने का. आ. क्र. १३५७ (इ) दि. ८ एप्रिल, २०१६ अन्वये घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ जाहिर केले आहे. सदर नियमानुसार शहरातील स्थानिक स्वराज्य संस्थेने पुढीलप्रमाणे कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या आहेत.

१) शहरातील घरे, झोपडया, मॉल्स, वाणिज्य मिळकतीतून दैनंदिन कचरा गोळा करणे.

२) कचरा गोळा करणाऱ्या लोकांचा गट तयार करून त्यांना प्रशिक्षण देवून त्यांच्या या कार्यात सहभाग घेणे.

३) कचरा निर्माण करणाऱ्या लोकांना कचरा रस्त्यावर, नदीत, नाल्यात, खुल्या जागेत न फेकण्यासाठी सूचित करणे.

४) कचरा निर्माण करणाऱ्या लोकांना कचऱ्याचे विलगीकरण करणेबाबत सूचना देणे.

५) विलगीकरण केलेल्या कचऱ्याची योग्यरितीने विल्हेवाट करणे.

६) अपायकारक कचऱ्याचा विहित पध्द्तीने साठा करणे व विल्हेवाट लावणे.

७) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणेसाठी भांडवली गुंतवणूक करणे.

८) कचऱ्यावर विविध प्रकारच्या पर्यायांपैकी योग्यरितीने विल्हेवाट लावणे.

९) जनजागृती करणे.

वरीलप्रमाणे अशा अनेक कर्तव्ये व जबाबदाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेवर लादण्यात आलेल्या आहेत. ही सर्व कर्तव्ये पार पाडणेसाठी सद्या करण्यात येणाऱ्या खर्चा व्यतिरिक्त मोठया प्रमाणावर खर्च अपेक्षित आहे.

सदर नियमानुसार घन कचरा निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर खालीलप्रमाणे जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

१) कचरा निर्माण करणाऱ्या व्यक्तींनी कचऱ्याचे विलगीकरण करणे व स्थानिक स्वराज्य संस्थेने प्राधिकृत केलेल्या कचरा गोळा करणाऱ्यास देणे.

२) कचरा निर्माण करणाऱ्यांनी कचरा रस्त्यावर, नदीत, नाल्यात, खुल्या जागेवर फेकू नये.

३) प्रत्येक दुकानदाराने वाया जाणारे अन्न फळे, भाज्या, डिस्पोजेबल कप, प्लेट इ. डसबीन मध्ये टाकणे.

४) प्रत्येक हॉटेल मालक यांनी महापालिकेच्या सहकार्याने कचऱ्याचे विलगीकरण करून महापालिकेने प्राधिकृत केलेल्या कचरा गोळा करणाऱ्यास देणे तसेच बायोडिग्रेबल कचऱ्यावर प्रक्रिया करणे.

५) घनकचरा व्यवस्थापनासाठी महापालिकेने निश्चित केलेल्या **''उपभोक्ता फी''** **[User fee]** चा नियमित भरणा करणे.

तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०१८ मधिल मार्गदर्शक सुचना नुसार घनकचरा व्यवस्थापन पध्दती आर्थिकदृष्टया सक्षमपणे चालु ठेवण्यासाठी घनकचरा व्यवस्थापनावरील खर्च स्थानिक स्वराज्य संस्थानी मालमत्ता कर आणि उपभोक्ता शुल्कामधून वसूल करावयाचे आहे.

या संदर्भात विस्तृत जबाबदाऱ्यांचा तपशिल घन कचरा व्यवस्थापन २०१६ मध्ये विहित करण्यात आलेला असून त्याची अंमलबजावणी अनिवार्य राहील.

सद्यस्थितीत घनकचरा व्यवस्थापनापोटी होणारा खर्च व संबंधित करापासून प्राप्त होणाऱ्या महसूली उत्पन्नाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| तपशिल | रक्कम (आकडे कोटीत) | एकुण (आकडे कोटीत) |
|---|---|---|
| पगार व भत्ते (पगार, बोनस, प्रवास भत्ता इ..) (कर्मचाऱ्यांची संख्या – १२५४) | ३२ | |
| प्रशासकीय खर्च | २ | |
| कचरा वाहतूक खर्च | १६.०७ | |
| डंपिंग ग्राउंड व्यवस्थापन | २.५४ | |
| मशिनद्वारे साफसफाई | १.५२ | |
| डेब्रीज वाहतूक | १.८० | |
| डसबीन पुरविणे | ६ | |
| जंतूनाशके खरेदी | २ | |
| एकूण खर्च | ६३.९३ | |
| आकस्मिक खर्च (१०:) | ६.४० | |
| | ७०.३३ | ७०.३३ |
| मल प्रवाह कर (वार्षिक मागणी) | ५.१५ | |

| | | |
|---|---|---|
| विशेष मल प्रवाह कर (वार्षिक मागणी) | ०.०८ | |
| एकूण उत्पन्न | ५.२३ | ५.२३ |
| तूट | | ६५.१० |

उक्त तपशिलानुसार सद्यस्थितीत घनकचरा व्यवस्थापनावर एकूण वार्षिक खर्च रुपये ७०.३३ कोटी इतका असून घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार यापुढे भविष्यात शहरातील नागरीकांसाठी घनकचरा वाहतुक करण्यासाठी डोअर टू डोअर सर्विस माहापालिकेस उपलब्ध करुन देणे अनिवार्य असल्याने त्यासाठी आवश्यक वाहने व मनुष्यबळ इत्यादीसाठी खर्चात अजून वाढ होणार आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत सद्यस्थितीत मल प्रवाह कर व विशेष मल प्रवाह कर याद्वारे वार्षिक रुपये ५.२३ कोटी मात्र कर स्वरुपात महापालीकेस प्राप्त होत आहेत. सदरची कर स्वरुपात वसूल होणारी रक्कम ही एकूण घनकचरा व्यवस्थपनावरी खर्चाच्या १० टक्के पेक्षाही कमी आहे. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनासाठी येणारा खर्च इतर योजना, कार्यक्रम, पदाधिकारी व नगरसेवक निधी यातून करावा लागतो, त्यामुळे शहरातील विकास कामांवर मर्यादा येते.

याशिवाय घनकचरा साठा, विलगीकरण व त्यावर प्रक्रियेसाठी जमीन संपादन करून तेथे घनकचरा प्रक्रिया करणे या बाबींवर मोठया प्रमाणावर भांडवली गूंतवणूक करावयाची आहे. याकामी आवश्यकता वाटल्यास एम.एम.आर.डी.ए सारख्या वित्तीय संस्थेकडून कर्जाची उभारणी करावी लागेल.

महापालिकेचे स्वत:चे उत्पन्नाचे दोन स्त्रोत म्हणजे मालमत्ता कर व पाणी पुरवठा हे आहेत. यापैंकी पाणी पुरवठयाचे दर खरेदीपेक्षा फारच कमी असल्याने सदर सेवा अर्थसहाय्य देवून पूरविण्यात येत आहे. परिणामी एम.आय.डी.सी ला कोटी रूपयांची थकबाकी देय आहे. मालमत्ता कर व अनूदानापोटी प्राप्त होणारी रक्कम महापालिकेने पार पाडाव्या लागणाऱ्या कार्ये व कर्तेव्यांसाठी पुरेशी होत नाही. व त्यामुळे उभारण्यात आलेल्या कर्जाची परतफेड वेळेवर होत नाही. अशा परिस्थितीत घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये महापालिकेवर लादण्यात आलेल्या अन्य जबाबदाऱ्यांसाठी अतिरिक्त निधी उभारणे आवश्यक आहे. अन्यथा सदर नियमांची अंमलबजावणी होणे कठीण आहे.

तरी घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अन्वये महापालिकेस पुरविण्यात येणाऱ्या सेवांसाठी शहरातील मिळकतधारकांवर पुढीलप्रमाणे **''उपभोक्ता फी'' [User fee]** आकारण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रस्तावित करण्यात आलेला **''उपभोक्ता फी'' [User fee]** चा तक्ता

| अ. क्र | मालमत्तांचा तपशिल | मालमत्तांची संख्या | प्रतिमाह युजर फी | प्रतिवर्ष युजर फी | अंदाजित उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी/टीअर गर्डर बांधकाम प्रकार असलेल्या मालमत्ता | ७६६५६ | ३७५ | ४५०० | ३४,४९,५२,००० |
| २ | एसी शिट ब्रिक्स बांधकाम प्रकार असलेल्या मालमत्ता | ७९६२० | २७५ | ३३०० | २६,२७,४६,००० |
| ३ | लाकडी/मातीचे बांधकाम असलेल्या मालमत्ता | १७१९५ | १७५ | २१०० | ३,६१,०९,५०० |
| ४ | तबेले, मंगल कार्यालय, हॉटेल व रेस्टॉरंट, मॉल्स इ. मालमत्ता | २९१ | | | |
| | अ) ज्या मालमत्तांचे क्षेत्रफळ १००० चौ.फुट पर्यंत आहे :- १०० | | १००० | १२००० | १२,००,००० |
| | ब) ज्या मालमत्तांचे क्षेत्रफळ १००० चौ.फुट पेक्षा अधिक आहे:- १९१ | | ५००० | ६०००० | १,१४,६०,००० |
| ५ | औद्योगिक मिळकती | १३ | ५००० | ६०००० | ७,८०,००० |
| एकुण | | १७३७७५ | | | ६५,७२,४७,५०० |

घरात किंवा आस्थापनेमध्ये गोळा होणारा कचरा हा त्याच ठिकाणी शास्त्रोक्त पध्द्तीने विल्हेवाट लावण्यात येत असलेल्या मिळकतींना वरीलप्रमाणे **''उपभोक्ता फी''** **[User fee]** मधुन पूर्ण सुट देण्यात येईल.

उपरोक्त **''उपभोक्ता फी''** **[User fee]** मालमत्ता कर बिलात समाविष्ट करून त्याप्रमाणे वसुलीची पध्द्त लागू केल्यास स्वतंत्रपणे बिले बजावणे, त्याचे वाटप करणे इ. सर्व बाबींवरील खर्च वाचविता येईल.

सबब, घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मधील तरतुदीनुसार **''उपभोक्ता फी''** **[User fee]** आकारणीचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीने महासभा पटलावर मंजुरी करीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ९३** **दिनांकः— ९/२/२०१८**

सुचकाचे नाव :—श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेअंती तसेच काही सदस्य उपस्थित नसल्याने घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी ''उपभोक्ता फी'' **[User fee]** आकारणी करणेचा निर्णय शहराची परिस्थिती विचारात घेता स्थायी समिती स्वतःच्या अखत्यारीत निर्णय न घेता महासभेपुढे निर्णयास्तव ठेवण्याचे निर्देश प्रशासनास देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ४.३० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ३/२/२०१८

**दि. ३/२/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती**

**सभेचे इतिवृत्त.**

**१९**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक ३/२/२०१८ रोजी सांयकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ५ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ७ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ८ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ९ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| १० | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| ११ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती जया प्रकाश माखिजा, २. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ३. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा, ४. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा

५. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
६. श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
७. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
८. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
९. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१०. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
११. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१२. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

सायंकाळी ४.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त हया आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होत्या.

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :— वर्ष २०१६-१७ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उद्यान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणे.**

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**पुर्ण स्टाफ का नाही आला? तुम्ही ठराविक कर्मचारी व अधिका—यास सांगितले आहे का, काही सिरीअसनेस नाही का? प्रभाग अधिकारी नाहीत. तुम्ही स्पेसिफिक ऑर्डर काढली आहे का?

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**सभागृहनेता तुमच्या राज्यात काय चालले आहे? बघा कोणी आहे का? कोणत्या विभागाचा विषय आहे हा?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**सार्वजनिक बांधकाम विभागाचा विषय आहे. मा. आयुक्त महोदया आपण आयुक्त स्थानी आज उपस्थित आहेत. हा विषय सुरु करण्याआधी मी एक दोन प्रश्न विचारु इच्छितो. आयुक्त महोदयांनी जो आदेश काढला की ३.०० वाजेनंतर विभागाने उपस्थित राहिले पाहिजे, जसे कर विभाग आहे ते रिकव्हरीसाठी बाहेर असतात त्यांनी ३.०० वाजेनंतर विभागात उपस्थित राहिले पाहिजे. लोक ३.०० वाजेनंतर येतात, आता मी कर विभागात गेलो होतो, मी लिपिकासाठी निरोप पाठविला होता परंतु ३.३० झाले तरी तेथे कोणीच नाही. पोवणे चार वाजता नाही, ४ वाजता नाहीत, सव्वा चार वाजता ते माझ्याकडे आलेत. मी म्हटलो तुम्ही कोठे आहात, सिटवर नाहीत वगैरे तर ते म्हणाले आमची डयुटी बीएलओला आहे. बीएलओला जर त्यांची डयुटी आहे तर किती वाजता त्यांना तेथे जायचे आहे, कधी जायचे आहे, तर आपण एक फलक बाहेर लावुन टाकु की व्हीजीटर यांनी कधीही येथे येवुच नका, कारण आमचे अधिकारी कोठेही फिरत असतात तर आपण येथे येवुच नका. काय महापालिकेचे काम रामभरोसे झाले आहे का, मला तर समजतच नाही, नोटिस वगैरे दयायची. नोटिस दिल्यानंतरही अधिकारी सीटवर नसतात व सभागृहनेता कार्यालयात येवुन असे उत्तर देतात की आम्ही बीएलओला गेलो होतो. मी म्हटले तुम्हांला किती वाजता बीएलओला जायचे आहे. ते म्हणालेत आमचे नक्की नाही आम्ही केव्हाही जातो, आपल्या मर्जीने. अशा अधिका—यास येथे स्थायी समितीत बोलवा व खुलासा करा.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**दुसरा सुध्दा विषय आहे, नगररचना विभागाशी सुध्दा संबंधीत आहे ना की कोणत्या जागेवर करणार, काय करणार ते. ती जागा महापालिकेची आहे की नाही, नगररचना विभाग तर हजरच नसतो सभेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**नगररचना विभाग असो किंवा अन्य विभाग असो त्यांनी येथे हजर असले पाहिजे. ३.०० वाजेनंतर आम्ही व्हीजीटरना नाही बोलवणार, त्यांना विचारा किती वाजता जाता ते. येथे रामभरोसे काम आहे, हे काय चालत आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**आयुक्त महोदयांनी तर आदेशच काढला आहे ना, की महापालिकेत तीन व चार वाजेनंतर उपस्थित राहायचे आहेच तर त्यांची डयुटी आहे, जर त्यांचा वेळ फिक्स नसेल तर आधी ते पुर्ण करुन यावे ना. त्यांना माहित आहे की गटनेता, सभागृहनेता यावेळी असतात तर जाणुनबुजुन त्यावेळी निघुन जातात.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**अधिकारी जर येतात तर ते कोठे येणार, महापौर, उप—महापौर, सभागृह नेता कि गटनेता, आपणाकडे डायरेक्ट जाणार. व्हीजीटर फिरत असतात व अधिकारी जागेवर नसतात, कोणी आहे की नाही. डीएमसी आपले अधीका—यांना सर्वांना ३.०० वाजेनंतर हजर राहायला पाहिजे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**गैरजबाबदार अधिका—यांवर प्रशासनातर्फे कारवाई करा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**माझ्याकडे एजेंडा नाही पोहोचला तर ही सभा इलिगल आहे.

**महापालिका सचिव :—**नाही असे नाही ही सभा इलिगल नाही, आम्ही पाठविले आहे, आमच्याकडे सही आहे. माझे शिपाई सर्वांना अजेंडा देवुन आले आहेत. तसेच आम्ही त्याच दिवशी ई—मेल करतो. एवढे सदस्य आले सभा सूचना मिळाली म्हणुनच ना.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपला ई—मेल आलेला नाही, ई—मेल केला असेल तर तो दाखवा.

**महापालिका सचिव :—**आम्ही आपणांस अजेंडा सुध्दा दिला आहे व ओ.सी. आमच्याकडे आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**दाखवा ना मग मला.

यावेळी शिपाई श्री. संतोष नवले यांनी अजेंडा दिला असल्याची स्वाक्षरी दाखविली व सांगितले की, त्यांच्या मिसेसने आम्हांला सेक्युरीटीवाल्याकडे एजेंडा दयायला सांगितला आहे व तसा आम्ही त्यास दिला आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**मी आता आता घरुनच आलो आहे, मला अजेंडा मिळाला नाही. वृक्षप्राधिकरणाची सूचना मिळाली आहे, त्यापुर्वीच्या स्थायी समितीची सूचना मिळाली आहे. यापुर्वी कालच्या स्थायी समितीचा अजेंडा मिळाला आहे व आजचा मिळाला नाही. तसेच सही मी यांच्या रजिस्टरमध्ये पाहिली आहे तर ती इंग्रजीमध्ये आहे. वॉचमन जो आहे तो अनाडी आहेतो इंग्रजीमध्ये सही कशी करणार.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**तशी सही त्यास येत असेल तो सही शिकला असेल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**श्री. राजेश आमचे मित्र आहेत व वरिष्ठ आहेत, असे होता कामा नये. त्यांना वेळेवर अजेंडा मिळाला पाहिजे. जर त्यांना चुकीचे वाटत असेल तर आजची सभा आपण रद्द करु या. परत अजेंडा काढु जर आपण बोलणार तर.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**सभा रद्द होण्याचा उद्देश नाही तर उद्देश असा आहे की आपण म्हणतात की ईमेल केला आहे तर ईमेल पाठविला आहे तर तेवढे सांगा. आपण ईमेल पाठविला ते सांगा माझ्याकडे पोहोचला नाही पोहोचला ते जावु दया.

**महापालिका सचिव :—**आमच्याकडे जे ईमेलचे पत्ते आहेत, स्थायी समितीच्या कोण कोणत्या सदस्यांकडे ईमेल आहे त्यांना तर ते पोहोचले असतील ते सांगतील.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**हे काय मला आलाच ईमेल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**त्यांचे असे म्हणणे आहे की ईमेल पोहोचले अथवा नाही परंतु आपण पाठविले का?

**महापालिका सचिव :—**होय पाठविले ना.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**ठिक आहे पाठविले असेल तर दाखवा ना की, आपणाकडे रिपोर्ट फेल आहे काय आहे काय नाही. कोणतेही रिजन असेल तर आपणाकडे फेलचा मॅसेज येतो.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे, आपणांस प्रिंट काढुन आणुन दाखवितो.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**होय, प्रिंट काढुन आणा.

**महापालिका सचिव :—:**साहेब, आता काय फोटो काढुन दाखवायचा का एकेकाला की आम्ही अजेंडा दिला आहे ते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मेलचा तर रेकॉर्ड राहतो ना.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे, मेलची प्रिंट काढण्यासाठी गेली आहे ना लिपिक, येवुन दाखवेल ना.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**रोज स्थायी समिती काय टाईमपास करण्यासाठी लावता का? आमच्या घरात लग्न आहे आम्हांला ६.३० वाजता जायचे आहे. ठिक आहे, नाही दिले तर सभा रद्द करायची असेल तर करा रद्द.

**महापालिका सचिव :—**नियमानुसार सभा रद्द करता येत नाही.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**काय नियमानुसार नाही. जर आपणांस अजेंडा तीन दिवसांपुर्वी पोहोचवायचा आहे, आपण जर तीन दिवसात नाही पोहचवु शकत तर आपली चुक आपण मान्य केली पाहिजे.

**महापालिका सचिवः—**आमची चुक नाही, आम्ही सभा सूचना दिली आहे.

यावेळी श्री. राजेश वदारिया यांना मेल केल्याची प्रिंट दाखविण्यात आली.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. सभापती महोदया, स्थायी समितीमध्ये हे जे विषय येत आहेत ना.....

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**मला वाटते आजची सभा जी चालत आहे ना ती बरोबर नाही, आयुक्त साहेब सुट्टीवर आहेत तर त्यांचा चार्ज श्री. देहेरकर यांना दिला आहे, तर त्यांच्या जागी अतिरिक्त आयुक्त बसले आहे, तर ते बसु शकतात का, ज्यांच्या जवळ त्यांचा चार्ज आहे ते बसु शकतात ना, काय आहे?

**सदस्य श्री. भारत राजवानीः—**हे बरोबर आहे, ज्यांच्याजवळ चार्ज आहे त्याने बसले पाहिजे, तर मग त्यांना बसवा ना, यांना का बसविले? तसे नाही तर मग कोणीही बसु शकतात का तर मग ठिक आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**मग अतिरिक्त आयुक्तांना चार्ज दिला पाहिजे ना मग आयुक्त साहेबांनी ते उप—आयुक्तांना का चार्ज देतात. हे सुध्दा चुकीचे आहे ना, काय सभापती महोदया.

**डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**खुर्ची रिकामी राहु नये म्हणुन बसावे लागते. श्री. हिरे साहेबांनी फक्त प्रभारी चार्ज दिलेला आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**प्रभारी दिला आहे, अतिरिक्त आयुक्तांचा?

**डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**होय.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**हे बरोबर नाही, मला असे वाटते हे चुकीचे आहे. मला जेवढे समजते तेवढे मी बोलतो. कधीही आयुक्त असतांना आयुक्त तुमच्याकडे चार्ज न देता उप—आयुक्त यांना चार्ज देतात.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**चुकीचे निर्णय घेतल्यामुळे होत असेल, मनमानी करत असणार म्हणुन असे होत असणार.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**कोण मनमानी करत?

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>**आठवडयातुन एकदा बीएलओसाठी पाठविले पाहिजे ना.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**जर ३.०० वाजेनंतर त्यांना महापालिकेत हजर असले पाहिजे तर येथेच त्यांनी राहिले पाहिजे ना. नाहीतर आपण त्यांना दुस–या दिवशी बोलु शकता.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**आज आम्ही सोडत आहोत, नंतर असे चालणार नाही, नाहीतर आम्ही स्थायी समितीची सभाच चालु देणार नाही.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**आपण जीआर काढला की नाही ही लोक कसे उल्लंघन करतात.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**येथे तर कोणच कोणाचे ऐकत नाहीत, आयुक्तांनी जीआर काढु देत की आदेश काढु देत कोणच कोणाचे ऐकत नाहीत.

**<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>**दुपारी ३.०० ते ५.०० मध्ये यायचेच आहे. तसेच दुसरा आदेश काढला आहे की बीएलओवाल्यांनी डेली रिपोर्ट दयावा आणि ३.०० वाजता येथे हजर रहावे तसेच दुसरे म्हणजे ५ वाजेपर्यंत रिपोर्ट दयावा.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानीः—</u>**ते बीएलओच्याच कामासाठी गेले होते का?

**<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>**होय.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**एक सांगा की आयुक्तांचा आदेश पाळला पाहिजे की नाही.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**आयुक्त साहेब दोन आदेश काढतात असे म्हणणे आहे.

**<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>**होय दोन आदेश काढले आहेत. एकात म्हटले आहे की ३.०० ते ५.०० मध्ये येथे रहावे व एकात म्हटले आहे की, जे ३.०० ते ५.०० मध्ये सर्व्हे करा.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**परंतु ते बीएलओच्याच कामासाठी गेले होते का?

**<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>**हो, तुम्हांला सांगितले ना. बीएलओच्याच कामासाठी गेले होते व सन्माननिय सदस्यांची जी तक्रार आहे त्याचे स्पष्टीकरण देण्यासाठीच समोर बोलावले ना.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**नक्की आदेश काय आहेत ते आदेश आम्हांला येथे दाखवा.

**<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>**कर विभागाच्या लोकंना ३.०० ते ५.०० च्या वेळेत येथे थांबण्यास सांगितले व दुसरे आदेशात आठवडयातुन एकदाच बीएलओसाठी जायचे आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**आपण जो आदेश काढला आहे त्यात जर आपण म्हटले असते आठवडयातुन एकदा जावे तर हा विषयच आला नसता. तुम्ही नक्की काय ते सांगा. तो म्हणतो हप्त्यातुन एकदा.

**<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>**ते आदेशच मागविले आहेत, मी स्व:त आपणास दाखविते. मा. आयुक्तांच्या स्वाक्षरीचे दोन्ही आदेश आहेत. मला व श्री. देहेरकर साहेबांना सुध्दा दिले आहे, सगळयांचे आदेश आहेत त्यामध्ये.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**डॅली बाहेर जायचे असे सांगितले आहे.

**<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>**होय कर विभागाचे काम दिले आहे ना, तर मग रोजची रिकव्हरीसाठी जावे लागते. रोजीच्या ५ किंवा १० तरी मालमत्ता सील करायच्या आहेत. ते आदेश आम्हांला सुध्दा दिले आहेत. सर्व अधिकारी दुपारीच जातात.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**रिकव्हरीला तर सकाळीच जायचे आहे व ३ ते ५ मध्ये येथे राहायचे आहे. आता विषय चालु करा. आम्हांला कार्यक्रमाला जायचे आहे. गोषवारा पहा काय आहे ते आणि शेवटी शिफारस काय केली आहे ते पहा.

**<u>महापालिका सचिव :—</u>**ते आम्हांला सार्वजनिक बांधकाम विभागाने आधीच सांगितले आहे की येथे चुक झाली आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**अरे अशा कशा चुका होतात, सार्वजनिक बांधकाम विभागाचे. त्यात किती रॅक आहेत, आयुक्त, उप—आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, शहर अभियंता, उप अभियंता, क. अभियंता, सचिव आहेत. आता यात पहा तक्ता क्र. ४ मध्ये मे. एच सी कटारिया २ टक्के, एम टेक इंजिनिअर प्राकलनीय दराप्रमाणे ॲटपार. आम्हांला जो गोषवारा मिळाला ना तर १,२,३ पहा तक्ता क्र. १,२,३ पहा काय आहे ते. तक्तयात २ टक्के लिहिले आहे आणि शेवटी ॲटपार लिहिले आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**प्रथम तर आम्हांस अजेंडाची प्रत दया.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**ज्या कंपनीस आपण शिफारस केली आहे त्याचे नाव काय?

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**कटारिया ना.?

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—</u>**नाही साहेब.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**आम्हांला दिले आहे ते आम्ही पाहणार नाही.

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—</u>**रेक्टीफिकेशन केले आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**कधी रेक्टीफिकेशन केले आहे?

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**चुक झाली आहे त्यांची. आता आम्हांला जी प्रत दिली आहे त्यात सुधार केली आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**आता यामध्ये ॲटपार केले आहे.

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—</u>**एच.सी. कटारिया ॲटपार आहे. टायपिंग मिस्टेक आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**नाही, नाही, टायपिंग मिस्टेक नाही, हे दुर्लक्ष केले आहे. स्थायी समितीसमोर जेव्हा देतो तेव्हा तयारी केली पाहिजे ना. किती वेळा चुका करणार. सहया कोणाच्या आहे शेवटी.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**गोषवाराच चुकीचा आहे. हे पहा ही टायपिंग मिस्टेक आहे की काय आहे हे कोण समजणार? गोषवा—यात लिहिले आहे की एच सी कटारिया दोन टक्के जास्त तर आपण आता काय म्हणणार की खालच्यास वर घ्या व वरच्यास खाली घ्या हे कसे आहे ते समजत नाही. दुस—या विषयात सुध्दा पहा की ते बरोबर आहे की नाही.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**या दोन विषयांसाठी खास सभा बोलावली आहे. आपणांस माहिती आहे का नगरसेवक निधी दिला, तो निधी मंजुर झाल्यानंतर या लोकांनी प्राकलन बनविले, प्राकलन मंजुर करण्यासाठी अतिरिक्त आयुक्तांकडे पाठविले. त्यानंतर तो अजेंडावर यायचा होता तर आतापर्यंत का नाही आला. प्रभाग समिती, नगरसेवक निधी आमचा अधिकार आहे. ते काम होत नाही व आम्ही दुसरे कामे करत आहोत.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**निविदा काढुन एक महिन्याच्या वर झाले आहे.

**<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>**माझ्या स्वाक्षरीचे जे काही प्रस्ताव होते, २२ प्रस्ताव आहेत ते आजच मा. आयुक्त महोदयांच्या स्वाक्षरीसाठी पाठविले आहेत. मी येथे येण्याआधीच ते संपुर्ण २२ प्रस्ताव आहेत त्यात नगरसेवक निधी, प्रभाग समिती निधी आहे ते मी स्वाक्षरीसाठी पाठविले आहेत.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**प्रशासनाला माहित होते एकत्रित निविदा, ते आम्ही मान्य करतो परंतु लेट का होत आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**आम्ही नगरसेवकांनी वार्डवाईज निविदा काढायला सांगितली आहे तुम्ही प्रभाग वाईज काढलेत.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**काढले तर काढले परंतु लेट का होत आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**प्रभागवाईज काढले तर लवकर आणा.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**लवकर आणा.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**२०१७–१८ चा बजेट संपायला आहे, आज आमचा हक्काचा निधी आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**एक मिनिट श्री.चौधरी, मला हे सांगा की नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधीची निविदा कधी झाली. व ही निविदा कधी झाली. तारीखचा किती डिफरंन्स आहे, तीन मंहिने आले नाही. याची निविदा कधी झाली व त्याची निविदा कधी झाली ते जरा सांगावे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–</u>**दोन वर्षापासुन महापालिकेचे काम झाले नाही.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधीचे कधी झाली. आपण लिहिले आहे की ८ तारखेस जानेवारीत निविदा उघडली त्यानंतर आज २ तारखेस आले सुध्दा. निविदा उघउली कधी ते सांगा. रिकॉल १० वेळा करा आम्ही नाही बोलत परंतु निविदा कधी उघडली. जर नगरसेवक निधीचा १० वर्ष रिकॉल केला तर आम्ही थोडेच म्हणणार, निविदा उघडली कधी.

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता :–</u>**तीन निविदा उघडल्या त्या फेल झाल्या. नगरसेवक निधी वगैरे मध्ये दोन निविदा आल्या, यात चार निविदा आल्या.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**एकतर आपण रिकॉल करा नाहीतर लगेच निर्णय घ्या.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**असा काही आदेश आहे का, नगरसेवक निधी नंतर घ्या वगैरे.

**<u>श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता:–</u>**बिल्कुल नाही, नगरसेवक निधीमध्ये १० टक्के अबोव गेले तर २० टक्के कमी गेले. ते करण्यासाठी आम्हांला जर वेळ लागतो.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**किती वेळ लागतो.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>**ज्यात नव्हते त्याचे काय केले?

**<u>श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता:–</u>**साहेब, त्यास वेळ लागला परंतु आता झाले आहे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>**ठिक आहे वेळ लागला तर अशी चुक मान्य करा.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**जोपर्यंत प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधी मिळत नाही तोपर्यंत स्थायी समितीचा कोणताही निर्णय घेणार नाही.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**सभा स्थगित करा अनिश्चित कालावधीसाठी.

**<u>महापालिका सचिव :–</u>**गोषवा–यात चुक आहे ना. एक तर विषय वगळा सभा स्थगित करु नका.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**गोषवारा दुरुस्त करुन आणण्यास सांगावे लागेल.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**पहिला पुढील वेळेस गोषवारा फेरसादर करुन आणा व दुसरा विषय घ्या. दुस–यात जर चुक असेल तर ते सुध्दा सांगा.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे



---

☑ **विषय क्र. १ :— वर्ष २०१६-१७ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उद्यान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणे.**

**प्रस्तावना**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या आराखडयामध्ये उल्हासनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्पाचा समावेश असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे हरित क्षेत्र विकास प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला होता. सदर प्रकल्प अहवालास शहर अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांची तांत्रिक मान्यता घेवून शासनाच्या मान्यतेकरीता सादर केले असता, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये केंद्र शासनाकडून मंजूर केलेल्या राज्य वार्षिक कृती आराखडयामध्ये समाविष्ट असलेल्या उल्हासनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्पास संदर्भिय शासन निर्णयातील अटी व तरतूदींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे.

सदर योजनेचा केंद्र शासनाकडून मंजूर राज्य वार्षिक कृती आराखडयानुसार वित्तीय आकृतीबंध पुढीलप्रमाणे आहे. (किंमत रु.कोटी)

**तक्ता क्र.१**

| अ. क्र. | महानगरपालिकेचे नाव | योजनेची मंजूर किंमत (डिपीआर नुसार) | प्राप्त झालेली रक्कम | केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या ५०%) | राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग (प्रकल्प किंमतीच्या २५% ) |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| १ | उल्हासनगर महानगरपालिका | १.५० | १.१८ | ०.५० | ०.२५ | ०.२५ |

सदर कामाकरीता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २०/१२/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.२**

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये १,१८,०१,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २०/१२/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १८/१२/२०१७ ते २०/१२/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०८/०१/२०१८ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | - |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | १५/०१/२०१८ |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०३ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

दिनांक १५/०१/२०१८ रोजी प्राप्त झालेल्या निविदाकांरांच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.३**

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.एच.सी. कटारीया | मे.एम.डेक. इंजिनियर | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी |
|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी यांनी उद्यान विकसित करणेचे एकूण रक्कमेच्या 50 टक्के रक्कमेचे काम यशस्वीपणे पार पाडले आहे का | आहे | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी या 3 वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे रु.1.00 कोटीचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | संस्था/कंपनी यांनी वैधता प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) Class IV and above. | आहे | आहे | आहे |
| ४ | पॅन कार्डाची प्रत | आहे | आहे | आहे |
| ५ | संस्था/कंपनी (EPF Registration) बाबतचे कागदपत्र जोडले आहे का | आहे | आहे | आहे |
| ६ | व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे |
| ७ | हाती असलेल्या कामाची यादी (परिशिष्ट – 2) मध्ये भरलेले आहे का | आहे | आहे | आहे |
| ८ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती (परिशिष्ट-३) | आहे | आहे | आहे |
| ९ | निविदाकाराची सविस्तर माहिती (परिशिष्ट – ४ ) | आहे | आहे | आहे |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार प्राप्त झालेल्या निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली असता १) मे.एच.सी.कटारीया २) मे.एम.डेक.इंजिनियर ३) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी हे तीनही निविदाकार एकूण ०९ मुद्दयांची पुर्तता करीत असल्याने पात्र ठरत होते. त्यामुळे या तीनही निविदाकारांच्या निविदेचा आर्थिक भाग दिनांक १९/०१/२०१७ रोजी उघडयात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

**तक्ता क्र.४**

| अ.क्र. | निविदाकारांची नावे | दिलेले दर |
|---|---|---|
| १ | मे.एच.सी.कटारीया | २ .०० टक्के जास्त |
| २ | मे.एम.डेक.इंजिनियर | प्राकलनिय दराप्रमाणे (At Par) |
| ३ | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | दिलेले दर १.१ टक्के जास्त |

वर्ष २०१६-१७ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उद्यान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेल्या उक्त निविदाकारांपैकी मे. एच.सी.कटारीया यांचे दर प्राकलनिय दराप्रमाणे (At Par) असल्याने मे. एच.सी.कटारीया यांची निविदा ग्राह्य धरण्यास शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त निविदाकारांपैकी मे. एच.सी.कटारीया या निविदाकाराचे दर सर्वात कमी असल्याने मे. एच.सी.कटारीया यांची निविदा मान्य करणेस व त्यांचाशी संविदा करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळण्यास स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ९१** **दिनांकः— ३/२/२०१८**

सुचकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१६—१७ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरीत क्षेत्र व उदयान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेचा प्रस्ताव संपुर्ण माहितीसह फेरसादर करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. २ :— वर्ष २०१७-१८ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उद्यान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणे.**

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यात विषय काय आहे आपण आधीच एक वर्कऑर्डर दिली आहे. ते काम अदयाप चालु झाले नाही. जर चालु झाले असेल तर कधी झाले ते आम्हांस सांगावे.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—**२०१५—१६ चे वर्कऑर्डर आम्ही इश्यु केले आहे. आणि १६—१७ व १७—१८ चे काम चालु झाले नाही, कारण दोन्ही जागेवर .....

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**लोकेशन बदली करा ना.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—**एक मिनिट, मिनाताई ठाकरे नगर आहे तेथे काम चालु आहे व दुसरे कैलास कॉलनी येथे २० टक्के काम चालु आहे. आम्ही त्यांना सांगतो की शिप्ट करा आणि ज्या दिवशी ते शिप्ट करतील काम चालु होईल.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**मिनाताई ठाकरे नगर येथे जे काम चालु आहे त्यास ३ वर्ष लागतील.

**श्री. महेश शितलानी, उप अभियंता:—**नाही साहेब, त्याचे ले आउट चालु आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**ले आउट लवकर होणार नाही. त्यात बदल करा, बाजुला जागा आहे. जागा पाहा तेथे आणि लोकेशन बदल करा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यात काय आहे की जीएस कॅम्युनिकेशन गॅप आहे. सार्वजनिक बांधकाम, पाणी पुरवठा, आरोग्य विभाग असो असे दुस—या विभागाचे आपसात कोणतेच कॅम्युनिकेशन नाही. आपण एवढा मोठा प्रकल्प हाती घेतात व जेथिल जागा प्रपोज करतात हे काम झाले पाहिजे तर पाणी पुरवठा विभागाकडुन विचारले की आम्ही ही जागा निश्चित केली आहे तर आपले काय प्रकल्प आहे का तेथे एसटीपीचे काम चालु केले आहे. हे तर प्रपोजल होणार नाही कारण त्यास विलंब लागेल, तेथे धुळ माती, सिमेंट उघणार, व्हायब्रेशन होणार तर तेथे झाड कसे उगणार? मग ठेकेदारास संधी मिळेल की साहेब आपले काम चालु होते मशिनरी काम तोडले, जेसीबीने तोडले, प्रोक्लेनचे काम चालु होते. आपले काम आहे आधी वेळेवर प्रपोजल बनविणे जेणेकरुन त्यास संधी मिळता कामा नये.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**लोकेशन बदली करा जेथे जागा खाली आहे तेथे करा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**श्री. चौधरी साहेब यामध्ये एक अडचण आहे ती अशी आहे शाासनाकडुन निधी आहे जर बदल करायचा असेल तर तेथुन मंजुरी लागणार.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**पैश्यांचा जर वापर करायचा आहे तर ही लोक काहीतरी करुन या पैश्यांचा वापर करणार.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**फक्त निविदा काढणे व वर्कऑर्डर देणे असे नाही. काम कसे होणार त्याची सुध्दा प्लॅनिंगची आवश्यकता आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**यामध्ये कोठे लिहिले आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपण यामध्ये जागा कोणती दिली आहे. मी म्हणतो ही मंजुरी व्हायच्या आधी स्थायी समितीच्या सभापती व सदस्यांनी ती साईट पहावी की तेथे काम होणार का?

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**यात वॉटर टॅकर लिहिले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**एरिया काय लिहिला आहे?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—**स्केअर मिटर लिहिले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**स्केअर मिटर? कसे असणार स्केअर मिटर? काही तरी गडबड आहे ८१ हजार कसे असणार?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—**१३ उदयान आहेत, त्याची एकुण आहेत ८१ हजार.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यात लिहिलेच नाही की १६—१७ चे आहे की १८—१९ चे.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:—**१७—१८ चे आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**मग २०१६—१७ चे कोठे आहे? १६—१७ चे आपण देत नाहीत व १७—१८ चे देतात.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**कुर्ला कॅम्पचे काय? यांना आदेश दया सर्व एकत्र दयावे. लोकेशन नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**५७०० ट्री आपण लिहिले आहेत.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**हा विषय आम्हांला पारित करायचाच नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा विषय नाही करायचा फक्त चर्चा करतो. ५७०० ट्री लिहिले आहे तर मग काय ट्री लावायचे आहेत?ते लावल्यावर ठेकेदाराची जबाबदारी काय असणार?

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता :—**गुजरातचे मॉडल आहे, ते पाहुन येथे आणले आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**हे आधी सुध्दा आणले होते.

**सदस्य श्री. भरत राजवानी :—**गुजरात मॉडेल तर फेल आहे ना.

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता :—**ग्रीन स्पेसेस असे होते की तेथे काहीच नव्हते. ग्रीनरी वाढविण्यासाठी ही शासनाची स्कीम आहे. आपल्या शहरात रिकाम्या जागा नव्हत्या परंतु १५—१६ चा जो डीपीआर बनला तर यामध्ये आकाश कालनी व एसटीपी चा स्पेस होता. हया दोन जागाच आम्हांस दिल्या तर जो कंसल्टंट अपॉईंट झाला तो मंत्रालयातुन झाला. सेंट्रल गर्व्हमेंटने अपॉईंटट दिला होता. तर आम्ही सर्व्हे केला की आम्ही कोणत्या उदयानाचा सर्व्हे नाही करणार, रिकाम्या जागेवर ग्रीन स्पेस करणार. त्यांनी एसटीपीची जागा होती तर तेथे व आकाश कॉलनी येथे ठरविले, १ कोटीचा बजेट होता. एसटीपी चालु नाही जेव्हा चालु होणार तेव्हा ग्रीनरी डेव्हलोप करणार.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**बोटक्लब पडुन होते तेथे रिकामी जागा होती ती नाही दाखविली आपण.

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता :—**आम्हांस निधी मिळत नव्हता, आमच्याकडे ६४ उदयाने आहेत ती आपण डेव्हलोप करा असे त्यांचे म्हणणे होते. तसेच त्यावेळी आम्ही आणखी कोणती जागा नाही असे आम्ही लिहुन दिले होते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**आपणाकडे नविन बनविलेले ११, इएसआर व जीएसआरची जागा आहे आपण कसे म्हणता की जागा नाही.

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता :—**एकुण जे काही निधी आहेत १६—१७ व १७—१८ चा जेथे गार्डन आहेत तेथे सुध्दा इएसआर आहे, तेथे झाड व ग्रीनरी वाढविण्यासाठी शाासनाने निधी दिला आहे तो आम्ही तेथे वापरु. यामध्ये आणखी टाकु शकतो आम्ही तो मुद्दा टाकला आहे. अधिकार दिले आहेत की ५७०० झाडे आपणांस लावायची आहेत. त्यासाठी आपण जी जागा ठरविणार तेथेच आम्ही झाडे लावु.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**माझा असा प्रश्न नव्हता असा होता की आपण जे ५७०० झाडे लावणार तर ठेकेदार किती करेल, झाड लावुन काम सोडुन देईल काय.

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता :–**नाही, एक वर्षापर्यंत तर त्यास ते मेंटेन करायचे आहे. तसेच त्यानंतर आपण जे माळी वगैरे ठेवले आहेत ना तर ते मेंटेन करतील. ही जीओ टॅकनीक असणार.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**किती टक्के यशस्वी झाले पाहिजे. समजा ५००० झाडे लावली तर त्यातुन किती टक्के यशस्वी झाले पाहिजे.

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता :–**तसे तर १०० टक्के झाले पाहिजे परंतु ७० टक्के शासनाने टार्गेट ठेवले आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :–**आमच्या येथे एक उदयान आहे तेथे आजपर्यंत आपण एक झाड नाही लावले. त्यासाठी प्रपोज नाही केले.

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता :–**आपण करु शकता. साहेब, आता सुध्दा आपण ॲड करु शकतो.

**सदस्य श्री. भारत राजवानी :–**आम्हांस माहित राहणार तेव्हा प्रपोज करणार ना. तुम्ही हे आता अंतिम घेवुन येत आहात.

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता:–**तसे तर आता सुध्दा ॲड करु शकता.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**ॲड करा त्यांचे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :–**पुष्प भवन, सी–१४ ब्लॉकच्या समोर.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**१ नंबर बसस्टॉप क्राईम ऑफिस समोर ॲड करा. दोन्ही विषय डिफर करा.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**श्री. शेवकानीजी, यात काही लोकेशन ॲड होवू शकतात काय?

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता :–**होय.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**स्टेशनपासुन जो पुल खाली येतो...

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता :–**उल्हास स्टेशनचे दिले आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**उल्हास स्टेशन नाही. आरओबी जे दिले आहे, बालानी गार्डन ओटी येथिल ते तर करु शकतो ना आपण.

**सदस्य श्री. भारत राजवानी :–**बालानी तर प्रायव्हेट गार्डन आहे ना.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**आता हे विषय आपण डिफर करत आहोत यात जे कमी आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**हे विषय डिफर नाही करत तर हे गोषवारे फेरसादर करुन चांगल्याप्रकारे यादया वगैरे लावुन आणावे. व बाकी सुध्दा ॲड करुन आणा. प्रभाग समिती निधी व नगरसेवक निधीचे सुध्दा आले पाहिजे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधीचे सुध्दा आले पाहिजे तरच हे आम्ही पास करु.

**महापालिका सचिव :–**ठिक आहे, ठरावात गोषवारा फेरसादर करुन आणण्यास, प्रस्ताव संपुर्ण माहितीसह फेरसादर करणेस प्रशासनास निर्देश देत. ठिक आहे? मंजुर?

**काही सदस्य :–**होय. पास, पास...

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. २ :— वर्ष २०१७-१८ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उद्यान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणे.**

**प्रस्तावना**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या आराखडयामध्ये उल्हासनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्पाचा समावेश असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे हरित क्षेत्र विकास प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला होता. सदर प्रकल्प अहवालास शहर अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांची तांत्रिक मान्यता घेवून शासनाच्या मान्यतेकरीता सादर केले असता, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये केंद्र शासनाकडून मंजूर केलेल्या राज्य वार्षिक कृती आराखडयामध्ये समाविष्ट असलेल्या उल्हासनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्पास संदर्भिय शासन निर्णयातील अटी व तरतूदींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे.

सदर योजनेचा केंद्र शासनाकडून मंजूर राज्य वार्षिक कृती आराखडयानुसार वित्तीय आकृतीबंध पुढीलप्रमाणे आहे. (किंमत रु.कोटी)

**तक्ता क्र.१**

| अ. क्र. | महानगरपालिकेचे नाव | योजनेची मंजूर किंमत (डिपीआर नुसार) | प्राप्त झालेली रक्कम | केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या ५०%) | राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग (प्रकल्प किंमतीच्या २५% ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | उल्हासनगर महानगरपालिका | २.०० | १.३३ | ०.५० | ०.२५ | ०.२५ |

सदर कामाकरीता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २०/१२/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.२**

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये १,३३,१७,१५२/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २०/१२/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १८/१२/२०१७ ते २०/१२/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०८/०१/२०१८ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | - |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | १५/०१/२०१८ |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०३ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

दिनांक १५/०१/२०१८ रोजी प्राप्त झालेल्या निविदाकांरांच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.३**

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.एच.सी. कटारीया | मे.एम.डेक. इंजिनियर | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी |
|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी यांनी उद्यान विकसित करणेचे एकूण रक्कमेच्या ५० टक्के रक्कमेचे काम यशस्वीपणे पार पाडले आहे का | आहे | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे रु.१.०० कोटीचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी वैधता प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) Class IV and above. | आहे | आहे | आहे |
| ४ | पॅन कार्डाची प्रत | आहे | आहे | आहे |
| ५ | संस्था/कंपनी (EPF Registration) बाबतचे कागदपत्र जोडले आहे का | आहे | आहे | आहे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे |
| ७ | हाती असलेल्या कामाची यादी (परिशिष्ट - २) मध्ये भरलेले आहे का | आहे | आहे | आहे |
| ८ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती (परिशिष्ट-३) | आहे | आहे | आहे |
| ९ | निविदाकाराची सविस्तर माहिती (परिशिष्ट — ४ ) | आहे | आहे | आहे |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार प्राप्त झालेल्या निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली असता १) मे.एच.सी.कटारीया २) मे.एम.डेक.इंजिनियर ३) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी हे तीनही निविदाकार एकूण ०९ मुद्दयांची पुर्तता करीत असल्याने पात्र ठरत होते. त्यामुळे या तीनही निविदाकारांच्या निविदेचा आर्थिक भाग दिनांक १९/०१/२०१७ रोजी उघडयात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

**तक्ता क्र.४**

| अ.क्र. | निविदाकारांची नावे | दिलेले दर |
|---|---|---|
| १ | मे.एच.सी.कटारीया | २ .०० टक्के जास्त |
| २ | मे.एम.डेक.इंजिनियर | २ .०० टक्के जास्त |
| ३ | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | ०.९९ टक्के कमी |

वर्ष २०१७-१८ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उद्यान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेल्या उक्त निविदाकारांपैकी मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांचे दर ०.९९ टक्के कमी असल्याने मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांची निविदा ग्राह्य धरण्यास शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त निविदाकारांपैकी मे.झा.पी.ॲण्ड कंपनी या निविदाकाराचे दर सर्वात कमी असल्याने मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांची निविदा मान्य करणेस व त्यांचाशी संविदा करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळण्यास स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ९२ **दिनांकः— ३/२/२०१८**

सुचकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरीत क्षेत्र व उदयान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेचा प्रस्ताव संपुर्ण माहितीसह फेरसादर करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ५.०० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २८/०२/२०१८

**दि.२८/२/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती**

**सभेचे इतिवृत्त.**

२२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा दिनांक २८/२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ६ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ७ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ८ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ९ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| १० | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ११ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| १२ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| १३ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| १४ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १५ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १६ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

८९.श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
९०.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
९१.श्री. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
९२.श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९३.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी
९४.श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता, साबांवि
९५.डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
९६.श्री. प्रबोधन मवाळे, सहा. आयुक्त
९७.श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
९८.श्री. संतोष जाधव, प्र. उप लेखा परिक्षक
९९.श्री. अशोक जाधकव, उप मुख्य लेखाधिकारी
१००. श्रीम. गणेश शिंपी, सहा. आयुक्त
१०१. श्री. जितू चौईथानी, प्र.उप अभियंता, साबावि,
१०२. श्रीम. अलका पवार, प्र. सहा. आयुक्त
१०३. श्री. नंदलाल सामतानी, प्र. सहा. आयुक्त
१०४. श्री. संदिप जाधव, प्र. उप अभियंता, साबावि,
१०५. श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता, विद्युत विभाग
१०६. श्रीम. श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१०७. श्रीम. छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त
१०८. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
१०९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १२.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक २९/०१/२०१८ त्यात २/२/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–**मा. सभापतीजी, मागच्या महासभेमध्ये आपण खरेतर सभा न लावण्याबाबत ठरले होते. सर्व सदस्यांनी महासभा आणि स्थायी समिती, पाण्याचा प्रश्न सुटेपर्यंत काही महासभा म्हणजे स्थायी समिती सभा लावू नये असे आपले ठरले होते. तर कमीत कमी माझी विनंती आहे पाण्या बद्दल साध टॅकर देखील चालू नाही झाले. तर आम्ही करायचे काय? आयुक्त साहेबांनी सर्व नकारात्मक घेतले तर आम्ही जायचे कुठे? आम्ही टॅंकरची यादी दिली अधिका–यांनी येऊन चेक केले. म्हटले आमचा रिपोर्ट तयार आहे. भदाणे साहेबाना नेमले, भदाणे साहेब पण जावून बघून आले. आम्ही जायचे कुठे लोकांना सांगायचे काय?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–** हे एका एकी होणार नाही , पाण्याचा प्रश्न रोजच्या रोज हॅंडल करावाच लागेल. वन टाईम सोल्युशन नाही, आता आज केल आणि प्रश्न सुटला, असे जोपर्यंत त्याला मुलभुत त्याला हात घालत नाही असे आपण कधी म्हणू शकत नाही ,कुठल्याच दिवशी पाण्याचा प्रश्न पूर्ण सुटलेला आहे. रोज हे आपल्याला हॅंडल करावे लागणार. इट इज इन डेली प्रॉब्लेम आणि डेली सोल्युशन विषय आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** विषय असा आहे साहेब, एक वर्ष झाले तुम्ही आल्यापासून एक वर्षा मध्ये सगळे सदस्य पाण्याच्या बाबतीत ओरडतात. तेव्हा इथे आगोदर शिंदे साहेब कमिशनर होते. उन्हाळयात पाणी आम्हाला त्या वेळेत मिळत होते. त्यावेळेला कोणीही मोर्चा काढला नाही. तुम्ही पाहिजे तर त्या मागचा सगळा कार्यक्रम बघा. तेव्हा कुठेही कोणी मोर्चा काढला नाही? आणि कोणीही सांगितले नाही की आमच्या वार्डात पाणी टंचाई आहे. ऐन उन्हाळयात आम्हाला पाण्याची टंचाई झाली नाही. पासाळयात पाणी असताना पाऊस चांगला पडला असताना पण आम्हाला पाण्याचा त्रास झालेला आहे. आता तर उन्हाळा सुरू झाला. दोन वर्षपूर्वी आम्ही बोरींग मारलेले आहेत ते सर्व बोरींग नादुरूस्त झालेले आहेत. नविन बोरींग मारण्याचा कुठलाही प्रस्ताव एक ही बोरींग महापालिकेच्या हददीमध्ये उल्हासनगरच्या मागच्या एक वर्षच्या काळामध्ये मारले गेलेले नाही. नाही कुठे रिपेरिंग साठी दहा वेळा सांगाव लागते. ज्या जुन्या पाण्याच्या टाक्या लावलेल्या आहेत त्या सगळया तुटलेल्या आहेत. जर यंत्रणा जर आपण बरोबर केली जर आपल्या हातात आपण अधिकारी आयुक्त आहात, इथे पाणी  पूरवठा विभाग आहेत, बोरींग कडे जर आपण लक्ष देणार नसेल टंचाईग्रस्त भागामध्ये तर कसा काय पाण्याचा प्रश्न सुटेल? कशा मध्ये किती नविन बोरींग मारलेत सांगा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**नविन सोड, नविन तर आपला प्रश्न आहे. आमचा प्रश्न आहे की जे जूने बोरींग आहेत ते दुरूस्त झाले पाहीजेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**काय अडचण आहे, आणि आयुक्तांचा याच्यामध्ये काय संबंध येतो.

**कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवन:—** सर ते बोरींग चे रेग्युलर जे रिपेरींग आहे, आपल्याकडे कर्मचा—यामार्फत केले जातात.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—**साहेब आपली सगळयाना ऑर्डर आहे. ऑगस्ट महिन्यामधली  त्याचे त्यानी परवा काम पूर्ण केले आहे. जर ५ महीने जर फक्त बोरींग असेल एमएमआरडी कडे टॉयलेसाठी आम्ही आता बोलून थकलो. मी तिथे स्वत:चे टॅंकर पाठवत आहे.

**कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवन:—** या ठिकाणी आगोदर बोरींग

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**बोरींग च्या रिपेअरिंगला तुम्हाला काही आम्ही मज्जाव केलेला आहे?

**कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवन:—** नाही सर आपण निविदा मंजूर केलेल आहे. त्याच्या नुसार प्रत्येक ठिकाणी वार्डमध्ये बोरींगचे काम चालू आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**निविदा कधी मंजूर झाले?

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—**निविदा चार महीन्याच्या आगोदर मंजूर झाले सर, आणि त्याच्यावर काम करतात सर ते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:—    किती ठिकाणी काम चालू आहे रिपेरींग चे ते सांगा.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** त्याची यादी आहे आमच्याकडे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:—तरी अंदाजे सांगा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** साहेब गेल्या तीन महीन्यामध्ये

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:—एक मिनीट ऐका.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** सर, ते उप विभागामार्फत ज्या ज्या तक्रारी येतात तिथे त्या अटेन्ड केल्या जातात.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— कोणते असे बोरींग आहेत जे त्यांचे एस्टीमेट पास आहेत परंतु त्यांचे कामे चालू नाहीत. असे किती आहेत? आणि कोणते असे आहे ज्याचे बोरींगचा अडचणी आहेत पण तुम्ही एस्टीमेट नाही केले. या दोन संख्या सांगा.

**<u>कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवनः—</u>** बोरींग असे आहे की आपल्याकडे ९०० बोरींग आपण आतापर्यंत मारलेले आहेत.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**ः— तुम्हाला जे बोरींगची तक्रार आहे किंवा बाब आहे की ती दुरूस्त नाही आहे. अशा किती बोरींग आहेत ती संख्या किती आहे आणि त्याच्यापैकी किती यांना माझ्याकडून मंजूर करून घेतले आणि किती याच्यामध्ये वर्क ऑर्डर आणि काम चालू आहे.

**<u>कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवनः—</u>** त्यांची यादी करून

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**ः— सो यू आर रिस्पॉन्सिबल, जर बोरींगची तक्रार आहे मी सांगून सुध्दा तिथे एस्टीमेट पण केले नाही अशी संख्या आहे का?

**<u>कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवनः—</u>** नाही सर, तसे ज्या ज्या ठिकाणी

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**ः— तुम्ही तसे पॉइंट आउट करा ज्याची तक्रार आहे पण एस्टीमेट पण केले नाही.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** साहेब याच्या पहिले यांना ठेवले होते श्री. बी.एस. पाटील होते. त्यानंतर दुस—याना चेंज केले. एक दासूमल नगरची बोरींग आहे, सोमनाथ म्हणून ठेकेदार आहेत पंप काढला आणि त्यांनी चांगली चाललेली बोरींग बंद पडली. पंप काढला आणि बनवायला नेला त्या कालावधीमध्येत्यांनी पॅकींग नाही केली त्याला काय कोणी दगड टाकला की काय टाकला माहीती नाही. त्यांनतर ती बोरींग आजपर्यत बोरींग चालू नाही झाली. त्याला आता दीड महिना होवून गेला.

**<u>कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवनः—</u>** सर, दासूमल मला माहिती आहे सर, बोरींग मध्ये असे आहे एकदा त्या बोरींग मध्ये कुठलातरी दगड टाकून भरले नंतर त्याला पून्हा बोरींग करता येत नाही त्याला फ्लेशिंन करता येईल सर, आम्ही बरेच वेळा फ्लेसींग करून बघतो त्या बोरींग मध्ये ते दिवसेंदिवस ते रोज ग्राउंड वाटर खाली जात असते तर पाणी नसते सर काही ठिकाणी अशी परिस्थिती आहे आणि बाजूला नविन बोरींग बांधतात ते नविन बोरींग शासनाचे परिपत्रका प्रमाणे २०० से फुटच्या खाली मारण्यास मनाई आहे.आपण जे बोर आहे ते २५० फुटापर्यत मारण्याचा प्रयत्न करतो पण पाणी मिळत नाही.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**ः— म्हणजे हया बोरींगला आता काही करता येत नाही.

**<u>कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवनः—</u>** करता येत नाही सर, त्या बोरींगला फ्लेशिंन करता येत नाही.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** ऐका सर, त्याच्या बाजूला शिवाजी मैदानची बोरींग आहे ती चालू आहे, ती बंद झाली त्याबद्दल सोमनाथ चे म्हणणे असे आहे. मला मागच्या वर्षीची आर्डर अजून मिळालेली नाही. एक वर्ष मी फुकट काम करतो आहे. कोणी आमची बिल बनवत नाही.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**ः— सोमनाथ कधी मला भेटला का? एक साधी गोष्ट, एक मिनीट.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** साहेब, जेवढे हे इथे पध्दतशीर सांगतात ना हया स्टॅडीग मध्ये तेवढया त्या सिटवर बसून तेवढे काम कसे नाही होणार. हया साठी ते प्रयत्न करतात.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**ः— त्याची कारणे पण आपण बघायला पाहिजे.आपण नगरसेवक मंडळी जी आहे त्याच्या कार्यालयात जातो त्याच्या पण काही तक्रारी माझ्याकडे आहेत. ज्या आम्ही कधी बोलत नाही.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** सर्व गोष्टीमध्ये एक गोष्ट झाली आहे. ज्या अधिका—याकडे जावे ते म्हणतात आयुक्त साहेब जोपर्यंत मान्य करत नाही तोपर्यत आम्ही करत नाही.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**ः— आता हे खूप झाले , कोणताही विषय मी रोखलेला नाही. बिल्कुल अशी चर्चा पण करू नका. कोण आता सहा महिन्यामध्ये बोलले असतील.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** सर मी सांगतो आता महापौरांकडे आपली मिटींग झाली, त्यानंतर तुम्ही सांगितले टॅकर्सचे डिटेल्स आणा. आज त्याला जवळजवळ एक महिना होवून गेला.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—** नाही, तो वेगळा विषय तुम्ही आता जो म्हणत आहात ना की आयुक्तांची मान्यता नाही, मान्य करत नाही हे कोणता विषय आहे.आताच सांगा. कोणता विषय आहे आपण काय बोलत आहोत कारण स्पेसीफिक गोष्टीत जायच्या आधी जी जनरल चुकीची चर्चा करतो ना ते दॅट इज नॉट करेक्ट. मी जर एकदा क्लीअर ठरवलेले आहे की पाण्याचा प्रश्न असेल तर मी प्राधान्याने मी काम करेल सगळयांना सुचना दिलेल्या आहेत. जर त्याच्याकडून होत नसेल तर दे आर रिस्पॉन्सीबल. पण जनरल काहीतरी आपण बोलणे हे बरोबर नाही आहे. आपण बोला मी ऐकायला तयार आहे. आणि मी काय केवळ आपण बोलताय किवा कोणी बोलत आहे म्हणून नाही पाण्यासाठी साठी जरी एखादा नागरीक जरी बोलला ना तरी मी त्याला सुध्दा तेवढच सिरिअसली रिस्पॉन्स करतो.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** सर मला वाटत पत्रकार, काय हयांचे नाव माझ्या वार्डात राहणारे एकपत्रकार तुम्हाला बोलले पाणी टॅकर बाबत डॉ. सदाफुले बोलेले मी त्यांना ते म्हटले आयुक्त साहेबानी टॅकर बंद केलेले आहे. आमचे फक्त तुम्हाला एवढेच म्हणणे आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**ः— टॅकर बंद केलेले नाहीत. मी आगोदरच सांगितलेले आहे जिथे गरज आहे. भदाणे कुठे आहेत, तुम्ही रिव्हियु घेतला आता चार दिवसात.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** साहेब, भदाणे साहेब येवून बघून गेले काय परिस्थिती आहे, महीला काय बोलल्या, आणि ते टॅकर देवू शकत नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—**साहेब आज टॉयलेटचे

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**ः— आपण एक, एक विषय घेऊ हे बघा बोरींगचा विषय आहे. सगळीकडे रिपेरींग ते दोन संख्या फक्त सांगतील ते घ्या किती बोरींग नादुरूत आहेत ते दुरूस्त होवू शकतात. त्यापैकी किती तुम्ही माझ्याकडे एस्टीमेट घेतले आणि कितीची कामे चालू आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**ः— साहेब, त्यांना विचारा की तुम्ही किती ठिकाणी काम चालू केले आहे. तुम्ही सुचना दिलेल्या आहेत. एक, एक वार्ड घ्या माझ्या वार्डमध्ये कुठल्या ठिकाणी कामे चालू आहेत. पाण्याची कमतरता अभाव जास्तीत जास्त माझ्या वार्ड मध्ये आहे. त्या वार्ड मध्ये कुठे चालू आहे बोरींग चे काम.

**कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवनः—** रिक्वायरमेंटचे आलेले नाही आहे आणि सब डिवीजनला सर ज्या बोरींग तुम्ही दिलेल्या आहेत. त्या बोरींग आम्ही जास्तीत जास्त प्रस्ताव करून आम्ही तातडीने करत होतो.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** आपले विभाग काय काम करते, वॉलमन काय काम करतात. जिथे पाणी कमी आहेत बोरींग आहेत माहीत आहेत आपल्या डिपार्टमेंटनीच बोरींग केलेल्या आहेत. प्राधान्य दिले पाहिजे की माझ्या वार्डात जिथे कमतरता आहेत तिथल्या बोरींग म्हणजे एक तरी स्पेसिफिक झाले तुम्ही सांगा कॉन्ट्रक्टरला सांगितले आहे की कुठल्या वार्ड मध्ये स्पेसिफिक काम झाले आहे तें सांगावे त्यांनी, की या वार्ड मध्ये चार बोरींग झाालेले आहेत. माझ्या वार्ड मध्ये एक तरी बोरीग झाली आहे का ते सांगा. एक सांगा तुम्ही मोघम सांगू नका.

**कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवनः—** आता यादी नाही आहे मी देतो सर कुठल्या कुठल्या भागामध्ये बोरींगची कामे झालेली आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—** आता आपण ऐका, कसे होते, हा विषय सारखा हॅमर करावा लागणार आहे. आपली सिस्टीम त्याच्यामध्ये असलेल्या मर्यादा हया सगळया गोष्टी जाणीवपूर्वक …….कशाला शंभर टक्के आय वील टेकन पण हया मर्यादा पण लक्षात घ्यायला पाहिजेत की आज सांगितले आणि उदया लगेच त्याचे काम होईल हे शंभर कामे सांगितली की सर्व कामे होतील पाण्याचाच नाही सगळया विषयात माझा पाठपूरावा असतो.खालची लोकांना सारखे सारखे सांगावे लागते. एखादी फाईल वरून खाली आणण्यासाठी मला आठ दिवस वाट बघवी लागते.आपण काही आक्रस्ताळपणा करून सोडवायची आहे का आपल्याला. आयुक्त हे आणि असे झाले. हे बरोबर नाही आम्हाला अजून तुम्ही डिमोरलाईज करत आहे. असे काही नाही आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** त्यावेळेला पाणी मिळत होते. आता पाणी मिळत नाही तर सांगावे नाही का माणसाने.?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** याला आयुक्त जबाबदार नाही हा विषय व्यक्तीगत घेवू नका. कुठल्याही आयुक्ताला असे वाटणार नाही की शहरातील पाण्याचा प्रश्न फेस करावा लागू नये.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** साहेब तुमची अडचण ५ नंबरच्या बाबतीत पाल्याच्या बाबतीत आम्हाला माहीती आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:—आधीचे आयुक्त आणि नंतरचे आयुक्त तो तुमचा व्यक्तीगत विषय आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** साहेब वयक्तीगत विषय असेल तो आम्ही पाहून घेवू. पाण्याचा प्रश्न आहे अतो आम्ही विचारणार. या सभे मध्ये मांडणार.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:—तो माझा चॉईस आहे कशाला काय उत्तर दयायचा तो माझा विषय आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** आम्ही तो विषय मांडणार.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**ठिक आहे , मांडा, आय वील नॉट ॲन्सर.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**परिस्थिती मांडणार आम्ही आणि तुम्ही पण प्रश्न घ्यायचा तर घ्या.घ्यायची तयारी आहे आमची. तुम्हाला बोलत तर आम्हाला पण बोलता येते. माणसानी काय प्रश्न मांडायचे नाही का त्यांचे वार्डामधले. आम्हाला त्रास आहे आम्हाला लोकांच्या शिव्या खाव्या लागतात.आम्ही काय शिव्या ऐकायला आलो नाही निवडून.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब महिला डायरेकक्ट शिव्या देतात. पर्याय म्हणून तुम्ही म्हणताय ना साहेब टॅकरच्या चो—या होतात. जपीआरएस सिस्टम लावू शकता त्याच्यावर. कुठला टॅकर कुठे गेला.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:—मी हया प्रश्नाला उत्तर दयायला बांधील नाही आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**आम्हाला पाणी पाहिजे तर त्याला तुम्ही जबाबदार. महासभेला सांगितले होते की पाणी देणार नाही तो पर्यंत महासभा चालू देणार नाही. तुम्ही सांगितले होते. तुमच्या महापौरांनी स्टेटमेंट दिले होते मागच्या महासभेमध्ये, जो पर्यत पाणी येत नाही तो पर्यत स्थायी समिती आणि महासभेची मिटींग होणार नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—**मा. आयुक्त जी, चौधरी साहेब व बोडारेजी व सर्व सदस्यांनी हा विषय घेतला आहे सर या मध्ये काय आहे, हा गंभीर विषय आहे. आपण पूर्ण मेहनत करून सुध्दा सफल होत नाही. आपल्या खालचे कर्मचारी वर्ग आपण आदेश देवून सुध्दा काम करत नाही.मी सांगतो साहेब, आपण एक काम केले तर ही समस्या बाबतचे कायमचे समाधान होवून अडचणी दूर होतील. जो पर्यंत आपला जेएनएनयुआरएम चा प्रेजेक्ट पूर्ण होईल. आज एक लहान काम जो रोजचे रू. ५ हजार खर्च करून संपवून टाकू शकतो. कोणताही नगरसेवक बोलू शकणार नाही की माझे वार्ड मध्ये लिकेज आहे. हे काम पण आपले अधिकारी करत नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**नगरसेवक लोक स्वत: करत आहेत. मी स्वत: करतो. मी वेलडींग ची मशीन आणून ठेवली आहे. वेलडर आणून ठेवला आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी**:—आमचे स्वत:चे टॅकर चालवत आहेत. आम्ही टॅकरद्वारेपाणी देत आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—**आम्ही स्वत: खडडे करणारे घेवून येतो, आमचे प्लबंर घेवून येतो आणि वेल्डींग करून काम करत आहेत. जर यांच्या कडे आम्ही तक्रार केली तर हे लोक रबराने पाईन बांधून तात्पूरते करून जातात. लोक आम्हाला बोलत असतात. एक छोटे जर आपण काम केले, कमीत कमी वेलडींग बाबत त्यानंतर मी बोरींग बाबत पण सांगत आहे. वेलडींग साठी प्रत्येक प्रभागामध्ये,

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** जमनुजी, एक सेंकद, साहेब दोन गाडया आपल्याकडे होत्या. दोन मशीन घेतल्या होत्या, वेल्डींगच्या त्या कुठे गेल्या.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—**महानगरपालिका करू शकत नाही. जर २४ तासात वेल्डींग करायचे असेल

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— सांगा, कधी घेतल्या होत्या त्या मशीन्स? एक एक प्रश्नाचे उत्तर दया.

**कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवन:–** सर, ते २०१६ साली टंचाईच्या काळामध्ये प्रभाग समितीचे तेव्हा मशीन घेतले होते. आमच्या पाणी पूरवठा विभागामार्फत  घेतलेले नाही. त्यांच्याकडे होते तेव्हा मशीन, वेल्डींग मशीन, यंत्रणा कॉन्ट्रक्ट मध्ये तेव्हा अँरेज केल्या होत्या त्या मशीन.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– ते काय झाले मशीन, आहेत का नाही?

**कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवन:–** दोन तिन वेळा विचारले ते मशीन त्यांच्याकडे प्रभाग समितीमध्ये नाही आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–** हे असे काय, मशीन कुठे गेल्या?

**कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवन:–** कॉन्ट्रक्ट पध्दतीत असल्यामुळे ते घेवून गेले.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**एक मिनीट मला विचारू तर दया.  हा गंभीर मुददा आहे, मशीन गायब झाल्या हे काय मी सहन करू शकतो का? काय झाले त्याचे?

**कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवन:–** ते मशीन साहेब कॉन्ट्रक्ट पध्दतीने त्यांना नेमलेले होते. मशीन भाडे तत्वावर

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**आपण विकत नव्हते घेतलेले ना, हां, ही आपली प्रॉपर्टी नाही. इट वाझ नाट अवर प्रापर्टी.

**कार्यकारी अभियंता. श्री.एस. के. सेलवन:–** भाडे तत्वावर मागितलेले होते ते त्यांचे माणसे घेवून गेली.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:–  दोन वर्षपूर्वी आपण बोरींग मारला होता. त्याच्यानंतर आपण एकही बोरींग मारला नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–**सर, याच्यात काय आहेजोपर्यत योग्य प्रकारे बसून याची आम्ही रचना जो पर्यंत करत नाही, महानगरपालिकेचे जे आपले अधिकारी लोक आहेत, ते वेल्डींग करू शकत नाही. कारण की आपल्याकडे ना मजूर उपलब्ध नाही आहेत, ना वेल्डर आहेत, ना प्लंबर आहेत, हे लोक काय करत  आहेत, जो ठेकेदार वार्ड मध्ये काम घेत असतात, त्या ठेकेदारांना हे लोक विनंती करतात की आमचे एक छोटेसे वेल्डींग मारून दया, तरं तो १० दिवस लावेल, १५ दिवस लावेल किंवा रबराचा पटटा बांधून आमच्या... सर आमची एक गोष्ट ऐका, एक पण नगरसेवक आपल्याला तक्रार करणार नाही. प्रत्येक  प्रभाग समितीमध्ये एक मोठी गाडी किंवा छोटी गाडी आहे जो कॉन्ट्रक्टर आपल्याल देत आहेत, फक्त ५ हजार रूपये प्रत्येक दिवसाचा खर्च आहे, आणि २४ तासात वेल्डींग होवून जाईल आणि अडचणी दूर होतील. करोडो रूपये आम्ही बरबाद करत आहे पण ५ हजार रूपये आम्ही खर्च करू शकत नाही. मजूर असायला पाहीजेत आपण सांगाल, लमजूर तर पाहिजेत ना खडडे मारायला. वेल्डर असायला पाहिजे, वेल्डिंग मशीन पाहिजे, आणि एक प्लंबर असायला पाहिजे. ही गाडी १२ तास प्रभाग समिती मध्ये असायला पाहीजे. ज्यांची पण तक्रार आली, ५ हजार रूपये खर्च आहे. जर आपण दोन ठेवत आहेत, प्रभाग समिती १, २, ३, मध्ये एक गाडी आणि ४ व ५ मध्ये एक गाडी, दोन गाडया सतत पाहिजेत. नाही करणार हे लोक प्रत्येक वेळेस याचा बहाणा असतो.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** खलच्या स्तरातील प्रक्रिया खूप हळू आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:–  मी पहिले पण सागितले आहे की असे होणार नाही. एस्टीमेट उदया दयायला सांगितले आहे. कधी येणार ते माझ्याकडे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–**यामध्ये काय काय टाकले आहे.या सभागृहामध्ये सांगा काय काय टाकले आहे या ऐस्टीमेट मध्ये.

**प्र.उप आयुक्त (पापूवि विभाग ) डॉ.युवराज भदाणे:–** मा. सभापती महोदय, मा. स्थायी समिती, आताच मा. आयुक्त महोदयानी सांगितल्याप्रमाणे आणि मा. सभागृह नेता यांनी सांगितल्याप्रमाणे आगोदरच दोन तीन दिवसापूर्वी नॉर्थ झोन आणि साउथ झोन(दक्षिण क्षेत्र आणि उत्तर क्षेत्र) या दोन्ही झोन साठी रिपेअरिंग साठी एक वेल्डर आणि

त्यांच्यानंतर एक फिटर ऑपरेटर असतो. तर दोन्हीची अपॉइंटमेंट करण्यासाठी आगोदरच फाईल तयार झालेली असून शुक्रवार पर्यंत जास्तीत जास्त ती तयार होईल. त्यानंतर दोन्ही झोन मध्ये गाडया तयार असतील.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—**माझा एक सल्ला आहे,त्या ऐस्टीमेट मध्ये आपण दोन मजुर, एक प्लंबर, आणि एक वेल्डींग मशीन एक वेल्डर, एक गाडी प्रत्येक प्रभाग समिती मध्ये उभी राहायला पाहिजेत. दोन जागेवर प्रत्येक प्रभाग समिती १,२,३,मध्ये आणि ४ व ५ मध्ये गाडी असायला पाहिजे. २४ तासा मध्ये त्या ठेकेदाराने काम करून दयायला पाहिजे. जर तक्रार आली तर पहिल्या वेळस १० ते १५ दिवस लागतील, सगळयाची तक्रार आली तर नंतर अडचणी येणार नाही. फोन आला की तक्रारीचे निवारण होणार. आणि दुसरी गोष्ट आहे बोरींगची, बोरींग विषयी सर मी आपल्याला सांगत आहे ज्यावेळे आपल्या शहरामध्ये डिसेंबर मध्ये ऐवढी समस्या आली होती. पाणी बिल्कुल नव्हते त्यावेळेस मनोहर हिरे साहेबांनी अर्जंट मध्ये बोरींगचा एक आदेश केला होता, आम्ही लोकांनी बोरींग केली होती खूप चांगला प्रतिसाद मिळाला होता. लोंकांना पाणी मिळत होते, गाडया भरून लोक पाणी बोरींगमधून घेवून जात होते. खूप चांगले होवून सुध्दा आज बोरींग दुरूस्त झाली नाही आहे. कुठे कुठे टाकी फुटली आहे, कुठे मोटर जळाली आहे, कुठे कुठे वायर निघली आहे तर हे बोरींग रिपेअरचे काम आता गर्मीच्या दिवसात अॅक्चुअली फेब्रवारी महीन्यात पूर्ण व्हायला पाहिजे होते. परंतु अजून फेब्रवारी मध्ये पूर्ण झाले नाही. कोणतीच बोरींग पूर्ण झालेली नाही. एखादाच कॉन्ट्रक्टर असतो त्याला हे बोरींग रिपेअरींग साठी सांगत असतात, आणि ते वेळेवर पोहचू शकत नाही. आठ ते दहा दिवस लावतात.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**ः—किती बोरींगच्या तक्रारी आहेत? किती बोरींग तुम्ही केल्या आहेत? याची माहीती मला दया.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—**तिन्ही कॉन्ट्रक्टर कोण कोण आहेत त्यांची नावे आम्हाला सांगा.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** आपण विभाग प्रमुखामध्ये जे तीन कॉन्ट्रक्टरांचे फोन नंबर टाकून घ्या.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—**तीनकॉन्ट्रक्टरांच्या जागी चार करून प्रत्येक प्रभाग समिती मध्ये एक दयायला पाहिजे आणि त्यांच्याकडून रोज रिपोर्ट घणे. आज आपण कोणता बोरींग बनवला, किती तक्रारी आल्या किती आणि सोडवल्या किती यांचे रजिस्टर बनवून त्या प्रमाणे कामे केली पाहिजेत. पहिले काय होत होते आम्ही फोन करत होतो अंडरग्राउड ड्रेनेज साठी बोलून बोलून थकलो शेवटी आयुक्त साहेबांनी नियोजन केले आणि आता तिथे कोणी फोन वर बसत असतात म्हणून आता कामे होंतात. पहिले काय होते फोन कोणाला करायचा आणि शोधायचे कोणाला. असे करू नका.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** दोन दिवसापूर्वीची गोष्ट आहे आम्ही दुरूस्ती साठी बोलत होतो, अधिकारी लोक म्हणतात की सोमनाथला आपण डायरेक्ट सांगा की विनंती करा त्याला बोलवण्यासाठी. सोमनाथला रिपेरींग साठी आम्ही बोलावू.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवनः—** ही टेंडरची प्रक्रीया आहे .याचेकडे जो बोरींग मंजूर झालेला आहे, आपण तो मंजूर करून दिलेला आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** नाही, नाही माझे सांगणे असे आहे की ते पहिले समजून घ्या, की आता भदाणे साहेबानी सांगितले नार्थ झोन साउथ झोन साठी त्यांनी दोन एस्टीमेट बनविली आहेत. नार्थ आणि साउथ झोन नाही पाहीजे आम्हाला प्रभाग निहाय पाहिजे. प्रत्येक प्रभागामध्ये १९ ते २० वार्ड आहेत. जर आपण नार्थ झोन आणि साउथ झोन केले तर त्याच्यात एक एक गाडी कमी पडणार, याच्यासाठी प्रभाग निहाय म्हणजे झोन निहाय वार्ड ऑफीस मध्ये आम्हाला एक एक गाडी मिळाली पाहिजे. चार गाडयाची आमची मागणी आहे.दोन गाडयामध्ये नाही होणार साहेब.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**ः— एक मिनीट, मी बघतो आहे, याला रिपेरींगला किती वेळ लागतो? एक दिवसात होते. एक दिवसात एक रिपेरींग होते का? चार आहेत तर, अंदाजे.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवनः—** सर ते रिपेरींग अर्ध इंच आहे मोठे लाईन आहे,

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— अंदाजे सर्वसाधारणपणे. एक ती टीम

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** साहेब अर्ध इंचला तर सरळ खुटी लावा ना, काय अर्धा इंचला काय करणार आहेत.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—**सर, अर्ध इंच कनेक्शन आम्ही ताबोडतोब बंद करतो. पण ते रिॲक्युरन्स आहे सर, इथ बंद केले तर बाजूला लगेच होते. कनेक्शनला आमची कुठलीही परवानगी न घेता केले जातात.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— बोरींगचे चालले आहे आपले, बोरींग चे बोलतो आपण.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** नाही नाही आम्ही रिपेरींगचे बोलतो ना साहेब.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— आपण लीकेजची चार टीम सांगत आहेत.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—**सर ते बोरींग चे वेगळे प्रकारचे असते. ते २००फुटाचा पाईप जमीनीच्या खली असतो त्याच्यामध्ये  पाणी आहे का

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— तुम्ही किती टीम बनवणार आहेत.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** सर आता आमच्याकडे येणा—या तक्रारी आम्ही ॲटेन्ड करतो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— आता जे चर्चा चालू आहे ते सांगा. लिकेज चे जे आहे ते किती स्टेमचे ऐस्टीमेट करता?

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** सर, आता ५ हजार रूपयामध्ये होणार नाही सर, त्याच्यामधल्या येणा—या  आम्ही बनविले आपल्यालला पण सांगितले होते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**यांची आणि माझी चर्चा झाली, मी यांना सांगितले एक गाडी छोटा हाथी त्याच्यामध्ये त्यांचा चालक, वेल्डर त्यांचा, हेल्पर त्याचा तीन लोक कमीत कमी लागतील. तीन लोक किंवा पाच लोक जे पण लागतील यामध्ये आपल्याला जनरेटर पाहिजे तर जनरेटर लावा. आमच्या वार्डात आले आम्ही कनेक्शन लावून देणार बाकीच्या वार्डाचे मी सांगत नाही. मदत करणार ना यांचे म्हणणे काय होते की त्या गाडीमध्ये जनरेटर असायला पाहिजे. मी सांगीतले की गाडी मध्ये तुम्ही जनरेटर ठेंवा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** आम्ही सर्व जनरेटर मशीन घेवून स्वत: करतो तर मदत का नाही करणार?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**माझ्या वार्ड मध्ये माझे कडे स्वत:ची मशीन आहे. आपआपल्या वार्डात आपआपली मशीन आहे सगळयाकडे अशी सुविधा नसू शकते.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**आपण स्वत: लीकेजचे काम करवून घेतो तर मदत का नाही करणार. हे माझे सांगणे आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**त्याच्यासाठी एक छोटा हाथी गाडी त्यामध्ये तीन ते पाच मजूर यामध्ये एक चालक असेल तो मदत पण करू शकतो आणि सोबत वेल्डर सुध्दा राहील आणि वेल्डींग मशीन आणि वेल्डींग रोड आणि दोन इंच तीन इंच आणि चार इंचचे पाईप.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**आपण काम  चालू करा. स्टॅडींग कमिटी ही उपाय देण्यासाठी, प्रशासन काय करत आहे हयाचा पण विचचार केला पाहिजे. बोरींगचा विषय झालेला आहे. प्रत्येक गोष्ट आम्ही सांगायची तर या लोकांनी काय केले.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी :—** उपाय (सोल्युसन)देऊन सुध्दा कामे होत नाहीत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**साहेब, बोरींगच्या विषयावर स्टॅडींग कमिटी मध्ये मागे पण चर्चा झाली होती. मला वाटत दोन महिन्यापूर्वी मिनीटस् बघू आपण, तुम्हालाही आठवत असेल. आणि त्याच्यानंतर टॅकर या विषयावर, आता यांनी किती गांभिर्याने घेतले आणि काय काय चालू केले आणि काय काय करायला पाहिजे. प्रशासनाकडून प्रस्ताव आले पाहिजेत की आम्हाला हे करायचे. राजेश वधारीया यांनी सांगायचे ,त्यानी सांगायचे मग प्रशासन काय

करते, उलट ते सोपे पडेल. एक टिम बनवा प्रभाग अधिकारी यांना कामाला लावा. प्रभाग अधिकारी मला वाटत एकच काम करतात. तुमच्यावर फोकस राहायला नको आहे. त्यामुळे टॅकरचे काय झाले तुम्ही सांगितले म्हणजे चालू झाले. आता किती वर्षापासून बोंब आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**टॅकर बंद कोणी केले, प्रशासनाने बंद केले.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** हा अतिरेक झाला म्हणून बंद केले. आणि बंद कल्यानंतर आता जिथे गरज आहे तिथे चालू करण्याबददल ही आपणास सांगितले. आपला वर्षला दीड ते दोन कोटी विनाकारण खर्च तो टॅकर वर होत होता. कारण त्याला कुठलीही गोष्ट गरजेची जरी असली तरी त्याला नियंत्रण असले पाहीजे. गरजेची आहे म्हणून त्याला नियंत्रण पण ठेवायचे नाही आणि अमाप खर्च करायचा ही गोष्ट बरोबर नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**पण साहेब, ज्या ठिकाणी आवश्यक आहे त्या ठिकाणी तर गेले पाहीजे ना लवकर.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**हां ते म्हणून सांगितले गरज आणि नियंत्रण हयानियमाने मी सांगितले. तुम्ही जिथे गरज नाही आहे तिथे चालू करत आहेत?

**उप आयुक्त (पा.पू.वि.) डॉ. युवराज भदाणे :—** नाही नाही एक मिनीट सर, ऑलरेडी सुर्वे साहेबाचा जो वार्ड आहे ना, एकता कॉलनी आणि गणपती मंदीर यामध्ये त्वरीत करायला त्यांनी सांगितले आहे तुम्ही दया. आज पासून सुरू करून दया आता.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**एक सांगू का, आपल्याकडे २० इंजिनियर नेमणूक करण्याचा प्रस्ताव आपण ठेवला आहे. त्यांच्याकडे माणसांची कमतरता आहे म्हणजे मी त्यांच्या गुणदोषावर पांघरून नाही घालत आहे. मला समजते की कोणाची कुठे कमतरता आहे आणि काय? परंतु हे २० इंजिनिअर लवकरात लवकर आपण हया जनरल बॉडीमध्ये करून दया. त्याच्यामध्ये त्यांची रिक्रूटमेंट झाली ना तर त्यांची मदत पी डब्लयु ला पण होईल आणि वाटर सप्लायाला पण आणि बाकीच्या इतरांना होईल.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** साहेब तुम्हाला २२ सांगितले होते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**प्रस्ताव दिलेला आहे आपण जी.बी. जर तहकूब करत असले तर कसे काय होणार?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**मंजूर केला म्हणून सांगूया महापौर तयार करून देतील पत्र, करून दया, कामाला लागा. झाला मंजूर विषय.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**आता एक मिनिट मी सांगतो आपण जे जे विषय चर्चा केली ना बोरवेल चे मी स्वत: बघतो मला माहिती दया. नंतर रिपेरींगचे जे एस्टीमेट त्यांनी तयार केले आहेत त्याच्या चार टिम तयार करा आणि त्यांची लवकरात लवकर एजन्सी तयार करा. जी काही प्रोसीजर त्याप्रमाणे चालू करा हे किती दिवसात होईल आता हे सगळयासमोर मिनीटेड होईल. किती दिवसात माझ्यासमोर ही फाईल येईल. किती दिवसात कार्यान्वीत होतील या रिपेरींगच्या टिम्स, सांगा. नाही नाही आधी लिकेजच्या टिम सांगा.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** रिपेरींगचे मी बनविलेले आहे. दाखवून देतो सर.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**टेंडर करावे लागेल का?

**कार्यकारी अभियंत, श्री.एस. के. सेलवन:—** मोठे म्हणजे पूर्ण करायचे असेल तर टेंडर करावे लागेल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**तुम्ही एक काम करा आता सध्या हया दोन महीन्याचे सॉर्ट काढा हयाला जर कमी एस्टीमेट असेल ३ लाखाचे तो विषय संपवून टाका. जस्ट मिनीमम की ते मार्गी लागेल. नंतर तुम्ही टेंडर एस्टीमेट त्याच्यातच वेळ घालवणार किंवा तुम्ही जर जास्त वेळेसाठी करायचे असेल तेवढयाच लवकर आणा तुम्ही आणणार का एस्टीमेट. एक वर्षसाठी जर कॉन्ट्रक्ट दयायचे १ ऐप्रील ते ३१ मार्च तर तुम्ही करू शकणार आहे का.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** शॉर्ट पिरीयडचे टेंडर काढायला लागेल सर.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**संपूर्ण माहिती काढायला तुम्हाला वेळ लागेल.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—**हो.डिटेल काढायला वेळ लागेल सर, सद्या दोन महीन्यासाठी दया.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**दोन महीन्यासाठी घ्या नाही तर एक महीन्यासाठी मार्च पुरते घ्या. ही टेंडर प्रक्रीया १एप्रील ते ३१मार्च वेगळे टेंडर काढा. हे माझ्याकडे कधी येईल?

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—**दोन दिवसात देतो,सर,

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**दोन दिवसात माझ्याकडे आणा. आणि दुसरे जे लॉग टर्म आहे एक वर्षासाठीचे ते पुढच्या आठ दिवसात आणा. हा झाला विषय तुमचा लिकेजचा. बोरवेलचे काय चालू केले आहे?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—** माझ्याकडे चार बोरवेल खराब आहेत.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** बोरवेलच्या ज्या ज्या तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**त्याला कॉन्ट्रॅक्टर किती आहेत?

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** चार कॉन्ट्रॅक्टर आहेत. सध्या काम करतात.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**चार कॉन्ट्रॅक्टर आहेत. ओके. त्यांना आपण काय मटेरीअल वैगेरे दिलेले आहे काय.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** प्रत्येक बोर रिपेरींग केल्यावर त्यांना आपण पेमेंट आपण प्रस्ताव करतो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**तुम्ही त्यांना वर्क ऑर्डर किती लोकांना दिल्या आहेत. त्याचे तो काम तो पण निट करत नाही आहे का?

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** सर, आता रू.२ लाख , रू. १.५० लाखाचे खर्चाचे दिलेले आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**त्याचे कामाची रिॲक्शन खाली का दिसत नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** त्याच्यामध्ये काय काय काम करणार आहेत. टाक्या तुटल्या तर त्या पण बसवणार आहेत का?

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** टाक्या बावण्याचे काम नाही आहेत त्याच्यात, रिपेरींगचे काम आहे नविन टाक्यांची प्रोव्हीजनत्यामध्ये नाही आहे. ते स्वतंत्रपणे करतो आपण सर, ते प्रत्येक ठिकाणी टाकी फुटली तर तुमचे पत्र आल्याबरोबर मी बरेच एस्टीमेट करून तसे केलेले आहे. काय तुटल्या असल्या आता करून देतो.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**आता तीन कॉन्ट्रक्टर आहेत. आता हया घडीला कुठे ना कुठे काम चालू आहे हे खत्री आहे तुम्हाला?

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** हो, असणारच साहेब, चालू असणार.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**ही इज डूइंग आल द टाईम.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** साहेब माझी एक सुचना आहे, वार्ड ऑफीसर, उप आयुक्त आणि वाटर सप्लायचे तुम्ही सगळयांना घ्या आणि प्रत्येक वार्ड मध्ये एक एक म्हणजे चार कॉन्ट्रक्टर कसे काम करतील आणि कामनसतील करत तर मग यांच्यावर कारवाई करा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— ठिक आहे. तिसरा विषय राहिला टॅकरचात्याच्याबददल काय केले आहे. तुम्ही आढावा घेतलेला आहे ना टॅकरचा.

**प्र.उप आयुक्त, (पापुवि विभाग) डॉ. युवराज भदाणे:—** हो घेतलेला आहे.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** टॅकर चा जो  सर्वे आलेला आहे ना सर प्रत्येक नगरसेकाची जी आमच्याकडे यादी आहे, संख्या मोठया प्रमाणावर दिसते सर, प्रत्यक ठिकाणी २५, ३०, ४० असे म्हटले तर आम्हाला २०० टॅकर चालवावे लागतील.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— व्हेदर इट इज रिक्वायरड हा पहिला प्रश्न विचारा. वीस आहे का, शंभर आहे का, एक आहे का, दोन आहे आय डोन्ट केअर जर गरज असेल तर ते कामे झाली पाहिजेत. तुम्ही ठरवायला पाहिजे लोकल मंडळीनी आणि त्यात परत गैरवापर कडे झूकले नाही पाहिजे आहे.

**कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:—** सर ते व्हॅलोमॅट्रीक मोजायला यंत्रणा नाही आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— मला एक त्याच्यामध्ये सजेशन आहे बरं का, माझे ऑब्झरवेशन आहे, आपण टॅकर एका ठिकाणी दिला ना दुसरीकडे पाणी आलेले असताना केवळ तिथे मुबलक नाही म्हणून तो टॅकर तिकडे रिपिट करायला सांगतात. जबरदस्ती करायला सांगतात. मी ते जे जबरदस्ती करणारे आहेत त्यांचे काही ही मुद्दा विचारात घेणार नाही. ही माझी सगळयांना कळकळीची सुचना आहे, विनंती आहे वॉर्निग आहे, जे काय समजायचे ते समजा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—** साहेब, मी सांगतो तुम्हाला इकडे फक्त मी तुम्हाला वारवांर बोललो एक अलंकार सोसायटी आहे. ७२ फ्लॅट आहेत तीन कनेक्शन आम्ही त्या दिवशी बघून आलो तीन कनेक्शन चालू होते. तीन कनेक्शन मध्ये अर्धेचे दोन आणि एक पाऊणचा असे काही तरी तीन कनेक्शनमध्ये ७२फ्लॅट त्याना पाणी कसे पूरू शकतें. कादंबरी अपा. आबाच्या तिथे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— जिथे गरज आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**आवश्यकता आहे की नाही.हे सांगणार कोण

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— दुसरी गोष्ट एक जनरल बरका सेल्वन, एक जनरल माझे ऑब्झरवेसन आहे शुक्रवार आणि शनिवारच्या त्या याच्यामुळे फे—यामुळे काही भागामध्ये टॅकर शंभर टक्के दयावे लागतात.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—**तीन दिवसाचा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— तिथे तो गॅप आधीच तुम्हाला माहीती असायला पाहिजे की शुक्रवार आणि शनिवारी नाही तर त्या ठिकाणी टॅकर ची तयारी आधीच केली पाहिजे नागरीकांनी मागणी न करता. हे तुम्ही रूटीन तयार करा. आणि मग रॅडमला जिथे खरोखर अडचण आहे तिथे तुम्ही तुमच्या लोकांना ताबोडतोब पाठवा.  बघू ना अतिरेक झाली तरी लक्षात येईल. काय थोडसे जास्त आपलेच पैसे आहेत. हेच लोक आहेत त्यांचेच पैसा जातो आहे. एवढी चर्चा बाकीचे विषय सोडून यातच ऐवढा वेळ घालवायचा आहे का काय करायचा आहे?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब त्याच्यामध्ये एक सजेशन मी तुम्हाला केले होते. आज आमच्याकडे ४ नंबरला पाणी आहे. त्यावेळेस ४ नंबरला टॅकर देवू नका. किंवा ५ नंबरला दया.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— ठिक आहे, आमचे मत जे आहे ना ते कळकळीचे आहे. त्याला डिस्टरब करू नका. म्हणजे आपण कुणाचे वैयक्तीक नाही पण केवळ इकडे टॅकर दिला आणि त्या लोकांना खूश करण्यासाठी आमच्या लोकांना पण टॅकर हे खुशीकरणाचे काम नको.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—**खुशीकरणसाठी नाही आहे साहेब तुम्ही चेक करा.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारे**:— तुम्ही क्लिअरकट सांगितले होते की लवकर यादया आणा. कुठे कुठे पाहीजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:—`ठिक आहे.  हे तीन मुद्दे हॅडल केले तर पाण्याचा काही विषय नाही राहत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— सध्या उन्हाळा सुरू झालेला आहे, पाण्याची टंचाई सुरू होणार आहे. नविन बोरींग दोन वर्षत मारले गेले नाहीत त्याचे काय करायचे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— नव्या बोरींग ला किती खर्च आहे, प्रत्येक बोरींग साठी.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>** रू.१ ते १.२५ लाख, रूपये १.५० लाख.

**<u>कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:–</u>** सर, ते बोरींग करायला फक्त ५० हजार खर्च होतो. त्याच्यामध्ये पॉवर पम्पस् म्हणजे जेट पम्प, म्हणजे रू.१.२५ लाख ते १.५० लाख म्हणजे वेगळे वेगळे त्याचे डेप्स असतात म्हणजे १. ५० लाख पर्यंत खर्च येतो.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:– त्याचे जी एस डी चे हे घेतलेले आहे का?

**<u>कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:–</u>** हो सर, जी एस डी चे हे घेतलेले आहे.२००फुट.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:– तुम्ही करा ना, जिथे आहे तिथे कराना.

**<u>कार्यकारी अभियंता, श्री.एस. के. सेलवन:–</u>** ते करतो सर, आपल्याकडे ९०० बोरींग आहे सर, एकूण म्हणजे जे आता सध्या चालू आहे त्याच्यामध्ये मोठया प्रमाणे येणारे जे चार्जेस तेवढा आपण खर्च करतो सर,

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:– अजून पोटेंशियल आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u>** सहामहीन्यापूर्वी पत्र दिलेले आहे तुम्हाला ते तर बोरींग करून दया. आम्हाला टॅंकर वैगेरे नाही पाहिजे आम्हाला नविन बोरींग करून दया.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>** नविन बोरींगचाविषय पण घ्या तुम्ही आम्हालापण सांगा. आता त्वरीत हे तीन विषय हॅंडल करा नविन बोरींग चा विषय एक आठ दिवसांनी आपण बघू काय करायचे?

**<u>महापालिका सचिव :–</u>** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्र. १ :–** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक २९/०१/२०१८ त्यात २/२/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**<u>सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :–** मागील सभेचे दिनांक २९/०१/२०१८ त्यात २/२/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेश वदारिया

**<u>स्थायी समिती ठराव क्र. ९३अ:–</u>** **<u>दिनांक : २८/२/२०१८</u>**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २९/०१/२०१८ त्यात २/२/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १०१ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :— वर्ष २०१६.१७ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उद्यान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणे.**

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी** :— काय आहे याबाबत कोण माहीती देणार आहे. या आगोदर किती याप्रकारचे कामे केंद्र शासन पुरस्कृत हरीत क्षेत्र आम्ही पास केलेले आहेत. आणि त्यांची आजपर्यतची स्थिती काय आहे. कुठे कुठे काम चालू करण्यात आलेले आहे. वर्क ऑर्डर देवून किती दिवस झाले आणि काम चालू झालेले नाही आहे कोण कोण्त्या अडचणी आहेत. की फक्त वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत. संपूर्ण माहिती सांगा.

**प्र.उप अभियंता, साबावि.श्री. तरूण सेवकांनी:—**सन २०१५ —१६ चे वर्क ऑर्डर आगोदरच काढलेला आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:— यामध्ये सन २०१६—१७ असे लिहिलेले आहे हे कधीचे आहे

**प्र.उप अभियंता, सा.बा.वि., श्री. तरूण सेवकांनी:—**हे सन २०१६—१७ आणि सन २०१७—१८.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—**जे पहिले मजूर केलेले आहे त्याची आजची स्थिती काय आहे. काही काम सुरू आहे का कुठे?

**प्र.उप अभियंता, साबावि, श्री. तरूण सेवकांनी:—**सन २०१५—१६ आम्ही दोन लोकेशन सिलेक्ट केले होते. मिनाताई ठाकरे नगर आणि आकाश कॉलनी. मिनाताई ठाकरे नगर मध्ये एसटीपी चे कामे अजून सुरू झालेले नाही. त्याठिकाणी एसटीपी बनविल्यानंतर ग्रीनरी करायची होती. आता एसटीपी चे काम बंद असेल आता. तर आम्ही त्याठिकाणी पाच लोकेशन हे आकाश कॉलनी चे डिस्पूट आहे तर पाच वेगळे लोकेशन आता सिलेक्ट करण्यात आले आहेत. कन्सल्टंट ला सुध्दा साईट दाखविण्यात आली आहे. मंत्रालयामधून जसे एप्रुवल या पांच लोकेशनचे येईल त्यावेळेस सन २०१५—१६ चे कामे सुरू करण्यात येईल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—**सन २०१५—१६ ची आम्ही एस्टीमेट बनविली होती. जेव्हा आम्ही त्या ठिकाणी भेटी दिल्या होत्या, तर आम्हाला काय समजले की, असे वाटले होती आम्ही या ठिकाणी काम करता येईल का? आज जेव्हा आपण बोलत आहात सन २०१८ — १९ वर्ष चालू होत आहे. सन २०१७—१८ हे वर्ष संपत आहे. तेव्हा सन २०१६—१७ चे काम अजून चालू नाही झाले. आम्ही फक्त टेंडरची प्रोसेस केली आणि वर्क ऑर्डर दिली. ग्रीनरीचे अजून काम झाले नाही. तर त्यावेळे आपल्याला ज्या अडचणी होत्या, हे माहिती नव्हते का? या अडचणी मुळे कामे होणार नाही.

**प्र.उप अभियंता, साबावि., श्री. तरूण सेवकानी :—**हे तिन्ही जे ग्रीन स्पेस चे प्रोजेक्ट आहेत हे सन २०१६—१७ मध्ये सिलेक्ट झाले होते. फंडस सन २०१५—१६,२०१६—१७ ,१७—१८ चे होते. त्याचे जे एप्रूवल वैगेरे होते ते २०१६—१७ मध्ये मिळाले आहे. आता आम्हाला २५ जून पर्यत काम पूर्ण करायचे आहे. अशा सूचना आहेत, की शासनाचे फंडस आहेत तर २५ जून पर्यत काम पूर्ण करायचे आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—**हे सर्वठिक आहे मी हे सांगत आहे की आम्ही लोक फक्त स्थायी समिती मध्ये मंजूरी देवून वर्क ऑर्डर देण्यापर्यतच सिमीत आहे की आमचा फंड परत जावू नये, की आम्हाला काही करायचे सुध्दा आहे.

**प्र.उप अभियंता श्री.जितु चोईथनी**:— नाही सर, करायचे आहे. बिल्कुल करायचे आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—**कामे करायची आहेत का फक्त फंड वाचवायचा आहे. जर फंड वाचवायचे आहेत तर ठिक आहे आज आम्ही पास करणार आहोत. जून मध्ये फंड जातील परंतु फक्त आम्ही यासाठी करत आहोत आमच्या मनात तर राहील. आज आम्ही लोकांना सांगत आहेत की भरपूर ग्रीनरी येणार आहे. ग्रीन स्पेसचे काम होत आहेत. करोडो रूपये आम्ही ग्रीन स्पेस साठी खर्च करत आहेत. जर तुम्ही सांगितले आम्ही लोकांना तसे सांगणार नाही. आम्ही फक्त हे सांगणार की सरकारचा पैसा परत जावू नये म्हणून आम्ही फक्त वर्क ऑर्डर दिलेली आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी** :— हे फक्त कागदावरती कामे केलेली आहेत.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी:—**कागदावरच कामे झाली आहेत किंवा जर आपणकाम करणार असाल तर एस्टीमेट तसेच बनवा ज्या ठिकाणी आम्ही काम करू शकतो. एस्टीमेट बनवतात, वर्क ऑर्डर बनवतात.,या ठिकाणी जागा भेटत नाही.या स्थीती मध्ये नाही आहे. लोकेशन बदलून करत आहेत.

**प्र.उप अभियंता श्री.जितु चोईथनी**:— सर, ही या ठिकाणची अडचण नाही आहे. दुस—या जागेवरी पण लोकेशन चे अडचणी आहेत. शेवटच्या मीटींग मध्ये मी आणि साहेब आम्ही उपस्थित होतो त्यांनी पण त्यावेळेस लोकेशन साठी बोलले की प्रपोझल पाठवून देवू, बदल करून दया.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:**— मा. सभापती जी आपण जी जागा सिलेक्ट केली आहे, ती सर्व वाटर सप्लायचे स्पेसेस आहेत आपण पाणी पूरवठा विभागाला विचारणा करण्यात आली का? की आपले एसटीपी कुठे येत आहे. कोणता प्रोजेक्ट काय येत आहे. आपले कोण्त्याही पाणी पूरवठा विभागाशी समन्वय नाही आहे.

**सदस्य, श्री. राजेद्र चौधरी**:— आता जे लोकेशन बदलले आहे त्याचे काम किती झाले आहे. किती दिवसात चालू होणार आहे.

**प्र.उप अभियंता साबावि.श्री. तरूण सेवकानी:—**आता सोमवारपासून चालू करण्यात येईल.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया**:— नाही, आपण सांगितले की आकाश कॉलनी मध्ये अडचणी आहेत. आकाश कॉलनी मध्ये टाकी बनविलेली आहे. त्यामुळे तिथे अडचणी यायला नको आहे. आपले तर कंम्पाउड वॉल तिथपर्यत बनविलेली आहे. अजून काय अडचण आहे. परत ती जागा का बदलण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी :—** माझ्या वार्डामध्ये गार्डनस् आहेत, आतापर्यत विकसीत करण्यात आलेले नाही. ते करू शकतात.

**प्र.उप अभियंता साबावि.श्री. तरूण सेवकानी** :— सर २०१६—१७ गार्डन आहेत.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—** मेन आहे पीडब्ल्युडी आणि वाटर सप्लाय यांच्यामध्ये समन्वय नाही आहे.यामुळे हा प्रोजेक्ट फेल होवून जाणार आहे.

**सदस्य श्री. धंनजय बोडारे:—** या विषयामध्ये मी एक सांगू शकतो. आता आम्ही मंजूरी देत आहेत, वर्क ऑर्डर लवकरात लवकर देवून काम कधी चालू होईल पुढच्या मिटींग मध्ये सर्व कमिटी प्रत्यक्ष बघण्यासाठी जाईल की तिथे काय काम झाले आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— सन २००९ मध्ये छाब्रीया जी होते की व माखीजा होते. यांच्या अंडर दिले होते. आज सुध्दा जे झाडे लावलेली आहेत,ही शाबूत आहेत कारण ते स्वत: लक्ष देत होते. ८ वर्ष झाले अजून एक माळी घेवू शकत नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी**:— माझे ऐरियामध्ये मी स्वत: ग्रीनरी केलेली आहे. पाणी पण आम्ही स्वत: देत आहोत.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी:—**आमचा उद्देश हा आहे की, काम झाले पाहीजे. भले १० टक्के पासून सुरू झाले ,पूर्ण वर्षभर हो काम तर चालू हो.इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे** :— घ्या पास करून.

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :— वर्ष २०१६-१७ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उद्यान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणे.**

**प्रस्तावना**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या आराखडयामध्ये उल्हासनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्पाचा समावेश असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे हरित क्षेत्र विकास प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला होता. सदर प्रकल्प अहवालास शहर अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांची तांत्रिक मान्यता घेवून शासनाच्या मान्यतेकरीता सादर केले असता, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये केंद्र शासनाकडून मंजूर केलेल्या राज्य वार्षिक कृती आराखडयामध्ये समाविष्ट असलेल्या उल्हासनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्पास संदर्भिय शासन निर्णयातील अटी व तरतूदींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे.

सदर योजनेचा केंद्र शासनाकडून मंजूर राज्य वार्षिक कृती आराखडयानुसार वित्तीय आकृतीबंध पुढीलप्रमाणे आहे. (किंमत रु.कोटी)

**तक्ता क्र.१**

| अ. क्र. | महानगरपालिकेचे नाव | योजनेची मंजूर किंमत (डिपीआर नुसार) | प्राप्त झालेली रक्कम | केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या ५०%) | राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग (प्रकल्प किंमतीच्या २५% ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | उल्हासनगर महानगरपालिका | १.५० | १.१८ | ०.५० | ०.२५ | ०.२५ |

सदर कामाकरीता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २०/१२/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.२**

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये १,१८,०१,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २०/१२/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १८/१२/२०१७ ते २०/१२/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०८/०१/२०१८ |

| | | |
|---|---|---|
| अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | - |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | १५/०१/२०१८ |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०३ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

दिनांक १५/०१/२०१८ रोजी प्राप्त झालेल्या निविदाकांरांच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.३**

| **अ.क्र.** | **निविदाकाराच्या निविदेमधील बाबी** | **मे.एच.सी. कटारीया** | **मे.एम.डेक. इंजिनियर** | **मे.झा.पी.ॲण्ड कंपनी** |
|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी यांनी उद्यान विकसित करणेचे एकूण रक्कमेच्या ५० टक्के रक्कमेचे काम यशस्वीपणे पार पाडले आहे का | आहे | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे रु.१.०० कोटीचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी वैधता प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) Class IV and above. | आहे | आहे | आहे |
| ४ | पॅन कार्डाची प्रत | आहे | आहे | आहे |
| ५ | संस्था/कंपनी (EPF Registration) बाबतचेकागदपत्र जोडले आहे का | आहे | आहे | आहे |
| ६ | व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे |
| ७ | हाती असलेल्या कामाची यादी (परिशिष्ट - २) मध्ये भरलेले आहे का | आहे | आहे | आहे |
| ८ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती (परिशिष्ट-३) | आहे | आहे | आहे |
| ९ | निविदाकाराची सविस्तर माहिती (परिशिष्ट – ४ ) | आहे | आहे | आहे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार प्राप्त झालेल्या निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली असता १) मे.एच.सी.कटारीया २) मे.एम.डेक.इंजिनियर३)मे.झा.पी.ॲण्ड कंपनीहे तीनही निविदाकार एकूण ०९ मुद्दयांची पुर्तता करीत असल्याने पात्र ठरत होते. त्यामुळे या तीनही निविदाकारांच्या निविदेचा आर्थिक भाग दिनांक १९/०१/२०१७ रोजी उघडयात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दरांच्या तक्त्यात खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**तक्ता क्र.४**

| अ.क्र. | निविदाकारांचीनावे | दिलेलेदर |
|---|---|---|
| १ | मे.एच.सी.कटारीया | प्राकलनिय दराप्रमाणे (At Par) |
| २ | मे.एम.डेक.इंजिनियर | २.०० टक्के जास्त |
| ३ | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | दिलेले दर १.१ टक्के जास्त |

वर्ष२०१६-१७च्याकेंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानयोजनेअंतर्गतउल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उद्यान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेल्या उक्त निविदाकारांपैकी मे. एच.सी.कटारीया यांचे दर प्राकलनिय दराप्रमाणे (At Par) असल्याने मे. एच.सी.कटारीया यांची निविदा ग्राह्य धरण्यास शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त निविदाकारांपैकी मे. एच.सी.कटारीया या निविदाकाराचे दर सर्वात कमी असल्याने मे. एच.सी.कटारीया यांची निविदा मान्य करणेस व त्यांचाशी संविदा करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळण्यास स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.९४** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१६—१७ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उदयान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे. एच.सी.कटारिया यांचेशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्तकायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३ :— वर्ष २०१७-१८ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उद्यान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणे.**

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :— वर्ष २०१७-१८ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उद्यान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणे.**

**प्रस्तावना**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या आराखडयामध्ये उल्हासनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्पाचा समावेश असल्याने उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे हरित क्षेत्र विकास प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला होता. सदर प्रकल्प अहवालास शहर अभियंता, उल्हासनगर महानगरपालिका यांची तांत्रिक मान्यता घेवून शासनाच्या मान्यतेकरीता सादर केले असता, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये केंद्र शासनाकडून मंजूर केलेल्या राज्य वार्षिक कृती आराखडयामध्ये समाविष्ट असलेल्या उल्हासनगर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्पास संदर्भिय शासन निर्णयातील अटी व तरतूदींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे.

सदर योजनेचा केंद्र शासनाकडून मंजूर राज्य वार्षिक कृती आराखडयानुसार वित्तीय आकृतीबंध पुढीलप्रमाणे आहे. (किंमत रु.कोटी)

**तक्ता क्र.१**

| अ. क्र. | महानगरपालिकेचे नाव | योजनेची मंजूर किंमत (डिपीआर नुसार) | प्राप्त झालेली रक्कम | केंद्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या ५०%) | राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग (प्रकल्प किंमतीच्या २५% ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | उल्हासनगर महानगरपालिका | २.०० | १.३३ | ०.५० | ०.२५ | ०.२५ |

सदर कामाकरीता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक २०/१२/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.२**

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये १,३३,१७,१५२/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २०/१२/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक १८/१२/२०१७ ते २०/१२/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०८/०१/२०१८ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | - |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | १५/०१/२०१८ |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०३ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

दिनांक १५/०१/२०१८ रोजी प्राप्त झालेल्या निविदाकांरांच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.३**

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.एच.सी. कटारीया | मे.एम.डेक. इंजिनियर | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी |
|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी यांनी उद्यान विकसित करणेचे एकूण रक्कमेच्या ५० टक्के रक्कमेचे काम यशस्वीपणे पार पाडले आहे का | आहे | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे रु.१.०० कोटीचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी वैधता प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) Class IV and above. | आहे | आहे | आहे |
| ४ | पॅन कार्डाची प्रत | आहे | आहे | आहे |
| ५ | संस्था/कंपनी (EPF Registration) बाबतचेकागदपत्र जोडले आहे का | आहे | आहे | आहे |
| ६ | व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे |
| ७ | हाती असलेल्या कामाची यादी (परिशिष्ट - २) मध्ये भरलेले आहे का | आहे | आहे | आहे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती (परिशिष्ट-३) | आहे | आहे | आहे |
| ९ | निविदाकाराची सविस्तर माहिती (परिशिष्ट – ४ ) | आहे | आहे | आहे |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार प्राप्त झालेल्या निविदाकारांच्या कागदपत्रांची छाननी केली असता १) मे.एच.सी.कटारीया २) मे.एम.डेक.इंजिनियर३)मे.झा.पी.ॲण्ड कंपनीहे तीनही निविदाकार एकूण ०९ मुद्दयांची पुर्तता करीत असल्याने पात्र ठरत होते. त्यामुळे या तीनही निविदाकारांच्या निविदेचा आर्थिक भाग दिनांक १९/०१/२०१७ रोजी उघडयात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दरांच्या तक्त्यात खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**तक्ता क्र.४**

| अ.क्र. | निविदाकारांचीनावे | दिलेलेदर |
|---|---|---|
| | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | ०.९९ टक्के कमी |
| १ | मे.एच.सी.कटारीया | २.०० टक्के जास्त |
| २ | मे.एम.डेक.इंजिनियर | २.०० टक्के जास्त |

वर्ष२०१७-१८च्याकेंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानयोजनेअंतर्गतउल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उद्यान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत प्राप्त झालेल्या उक्त निविदाकारांपैकी मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांचे दर ०.९९ टक्के कमी असल्याने मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांची निविदा ग्राह्य धरण्यास शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त निविदाकारांपैकी मे.झा.पी.ॲण्ड कंपनी या निविदाकाराचे दर सर्वात कमी असल्याने मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांची निविदा मान्य करणेस व त्यांचाशी संविदा करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळण्यास स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित

**स्थायी समिती ठराव क्र.९५** **दिनांकः– २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्पानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७–१८ च्या केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेअंतर्गत उल्हासनगर शहरामध्ये हरित क्षेत्र व उदयान विकसित करणेकरीता मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे. झा.पी. एण्ड कंपनी यांचेशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्तकायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— सगळे विषय एकत्र घेतले तर चांगले होईल सर्व विषय सारखेच आहेत.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— एक मिनीट हे १ ते २० पर्यंतचे मुद्दे आहेत. कोणा बरोबर चर्चा करावी.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया :—**आता हे बघा हा जो विषय आहे हा विषय क्र. ४ आहे. ४ तें २३ पर्यंतचे जे विषय आहेत. हे एकत्र घेतले ती तेवढा वेळ वाचेल. वाचा ना.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी** :— सगळे विषय वाचणार का?

**महापालिका सचिव:—** म्हणून मी म्हणते ना.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी** : सगळे विषय वाचू नका?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे** :— नाही पण, त्या विषया बददल काही सदस्याना चर्चा करायची आहे. टोनी जी काय म्हणता आहेत ते ऐकून घ्या.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—**सितलानी जी आपण उत्तर देणार,याचे.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—**हो

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—**हया २० कामाचा पॅनल आहे, नॅचर ऑफ प्लेस सेम आहे.

**प्र. शहर अभियंता .,श्री. महेश सितलानी:—**९० टक्के सारखेच आहे, म्हणजे सिव्हिल वर्क आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— सिव्हील वर्क म्हणजे नाली असेल, रोड असेल,.पेसेज असतील, सर्व असेच आहे ना. तर तुम्ही जस्टीफीकेशन आहे का कुठे २०टक्के बीलो किंवा १० टक्के अबाऊ.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—**लोकेशन मिनीमम ॲट पार आहे. आणि कमी २१ टक्के बीलो आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— मिनीमम ॲट पार कोणाचे आहे.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—**म्हणजेच कमीतकमी घेवून २१ टक्के बिलो, ही २० नावे याच्यात आहेत.

**सदस्य, श्री. राज्रेद्र चौधरी** :— अबाऊ एक नाही आले.

**आयुक्त, श्री. राजेद्र निंबाळकर**:— अबाऊ होते आम्ही त्याला नेगोसिएशन करून ॲट पार करण्यासाठी सांगितले.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:– जे पण अबाऊ होते त्यांना ॲट पारकेले. तर मायनस २० टक्के आहेत त्याचे जस्टीफिकेशन कसे देणार. जर आपण म्हणता की ९० टक्के काम(नेचर ऑफ वर्क) सारखे आहे. माझे कडे दहा फुटाची नाली बनवायची असेल,ऐका ,जमनुजी, १२ नंबर पॅनल मध्ये एक १० फुटाची नाली बनवायची आहे, आणि १३ नंबर पॅनललमध्ये १० फुटाची नाली बनवायची आहे. इथे १६ टक्के बिलो आहे तिकडे १० टक्के अबाऊ आहे. डि एस आर रेट काय करेल.

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:–</u>**डि एस आर रेट जे आपले चालू रेट आहे ठाण्याचा तो घेतलेला आहे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u>**:– तो रेट घेतलेला आहे ना आपण,

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:–</u>**सगळया ठिकाणी तोच रेट आहे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u>**तर त्याला आपण डिएसआर ला २० टक्के बिलो करणार का? की २० टक्के जास्तीचे (एक्सट्रा) काम करणार.

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:–</u>**प्रत्येक ठेकेदार वेगळा आहे. सरकारचे शासन निर्णय आहे १० टक्के बिलो, जेवढे पण जाईल, तेवढा तो परफॉरमन्स डयुटी देईल. जर त्यांनी परफॉरमन्स बरोबर नाही केले. तर त्याची जी अनामत रक्कम असेल ती फॉरफिट केली जाईल.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u>**हे कोण बघणार आहेत. हे जे जास्तीत जास्त कॉन्ट्रक्टर आहेत, त्यांचे जे काम आहे. आम्ही बोलून बोलुन थकलो आहे. ४५ लाखाचे काम आहे दलित वस्ती मध्ये आता र्प्यंत त्यांनी काम पूर्ण नाही केले आणि तुम्ही मला डिटेल दिलेले आहे, ऐका की त्याचे काम पूर्ण झाले आहे. कमीशनर साहेबां सोबत भेट दिल्यास, मी सांगत आहे त्याच कॉन्ट्रक्टर बरोबर. आणि आपल्या यादी मध्ये येते की काम पूर्ण झाले.

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:–</u>**नाही नाही, असे नाही होणार.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u>**अशोक नगरमध्ये ४५ लाखाचे दलित वस्ती चा फंड आहे, नालीचे कामाचा. आज सर्व शिवाजी रगडे, गजानन शेळके, टोनी पिंटो या तिन्ही चार जणांनी सहा महीने पहिले पत्र दिलेले आहे. ते काम पूर्ण झालेले नाही. आज त्यालाच आम्ही परत टेंडर देत आहेत. हे लोक काम घेतील याची काय गॅरंटी आहे. रामायण नगर नाली चे एस्टीमेट घेतलेले नाही, रोडचे अजून ऐस्टीमेट घेतलेले नाही आहे. रोड अर्धेतच पडलेले आहे. तेच ठेकेदार आहे. सर या २० टक्के बिलो मध्ये आम्हाला कॅमेरा घेवून नगरसेवकाना उभे राहावे लागेल. साहेब कोणती जबाबदारी ठेवली आहे. पब्लीक आम्हाला विचारत आहे. हा जो रोड चा मुद्दा होता त्याला कमीशनर साहेब स्वत: समाधानी नव्हते. मागच्या स्थायी समिती सभे मध्ये सांगितले आहे की मी सॅटीसफॅक्सन नाही आहे. तर हे २० टक्के बिलो , माझेकडे जर काम असेल २० टक्के बिलोमध्ये समोरच्याकडे १० टक्के बिलामध्ये असेल तर जस्टीफिकेशन कसे देणार.

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:–</u>**साहेब ऐकून घ्या की हे ई टेंडरींग आहे. यामध्ये कोणाला आपण फोर्स करू शकत नाही.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>** मी याचे व्हॅल्युएशन केले आहे. ज्यांनी २० टक्केबिलो भरलेले आहे. त्या व्याक्तीने सात आठ कामाचे टेंडर्स भरलेले आहेत जिथे ते कमीत कमी निघाले आहेत. काही ठिकाणी त्यांचे २० टक्के बिलो आहेत तर काही ठिकाणी ॲट पार आहेत तर काही ठिकाणी ४ टक्के आहे तर सरासरी आम्ही काढली , ज्या कॉन्ट्रक्टरची२० टक्के बिलो आहे तर त्याचे १० टक्के बिलो येत आहे. सगळयांची बेरीज आपण केली तर त्यामुळे त्यांनी असे सांगितले. मी त्यांच्याशी बोललो की आम्हाला याच्यासाठी आम्हाला तो जस्टीफिकेशन आहे की आम्ही ऐका ठिकाण २० टक्के भरलेले आहे. दुस–या ठिकाणी अबाऊ किंवा ॲट पार भरलेले होते. यामूळे मॅच करून १० टक्के बिलो मध्ये भरावे लागत आहे. आणि प्रत्येक टेंडर व्याक्तीश: त्याचे ॲसेसमेंट होत आहे. त्या टेंडरमध्ये कोणी भाग घेतला त्या जागेची भौगोलीक स्थिती काय आहे. स्पर्ध किती आहे हे यावरून होत आहे. आपण किती टक्के बिलो आहे यासाठी आपण त्याला काय प्रश्न अजून विचारणार. आपण आपल्या फायदयासाठी करतो आहे. आम्ही नेगोसिएशन असे नाही करत की तुम्ही २० टक्के बिलो भरलेल आहेत तर १० टक्के कमी करा. असे तर नेगोसिएशन होणार नाही.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी :–</u>** २० टक्के बिलो, ठिक आहे. जी एस टी किती आहे?

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:–</u>**त्याच्यामध्ये च घेतलेला आहे.(इनक्लुडींग आहे)

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी :–</u>**इनक्लुडींग आहे, ठिक आहे. आणि सोसायटी टॅक्स.

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:–</u>**सर जी आपल्याला त्याच्याशी काही वास्ता नाही, आपण त्याच्याकडून काम करवून घ्यावयाचे आहे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी :–</u>**आपल्याला त्याच्याकडून काम करवून घ्यायचे आहे हे शंभरटक्के तोटा होऊ दया.

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:–</u>**आपला त्याच्याशी काही संबंध नाही. त्याला त्याचा तोटा होवू दया. जो काम स्पेसिफिकेशन आहे, ते त्याच्याकडून काम करून घ्यायचे आहे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u>**अशाही परिस्थितीत जर ते काम नाही करू शकलो नाही तर आपण काय करणार?

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:–</u>**अनामत रक्कम आहे ना त्याची.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वनी</u>**:–यामध्ये काय आहे की ज्यानी पण १० टक्के बिलो भरलेले आहे. १० टक्के वरती १ टक्का अनामत रक्कम आणि १०टक्के नंतर ११टक्केवरती २टक्के, १२ टक्केवरती ३ टक्के, २० टक्के वाल्याचे १० टक्के अनामत रक्कम जमा आहे.म्हणजे ६६लाखाच्या कामावरती ७ लाख अनामत रक्कम जामा आहे. आणि दुसरी गोष्ट काय आहे,प्रत्येक वार्डची भौगोलिक स्थिती वेगळे आहे. आता मी माझे वार्डाचे सांगत आहे. माझे वार्डात जर कोणी फिरले असेलतर माझे वार्डात एक ठिकाणी जर रेतीची गाडी खाली करत असाल, विटा उतारत असाल किंवा सिमेंट उतारत असाल तर गल्लीमध्ये जाण्यासाठी आपल्याला हरवल्यासारखे असेल.गाडी खाली करणसाठी १० हजार रूपये लागत आहेत. शनी मंदीर भागामध्ये, शाखेच्या ठिकाणी  तर ठेकेदार अबाउ भरणार बिलो भरूच शकत नाही. कारण की त्याला सिमेंटची एक एक गोणी उठवण्यासाठी २० रूप्ये खर्च येईल. तो भौगालिक स्थितीसे यासाठी कोणी बिलो भरले आहे कोणी अबाऊ भरत आहेत.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>** हे बघा माझे हे म्हणणे आहे की आम्ही यांना कामे देत आहेत, आपण आता जो निर्णय घ्याल ती जबाबदारी आमच्या लोंकाची पण आहे. सगळयात जास्त जबाबदारी त्या ठिकाणी राहणा–या लोकांची आणि या माध्यमातून तुमची पण आहे. की प्रत्येक दिवस तुमची त्या कामावर नजर असेल. जे पण काही असेल ते आपण मला सांगावे. त्याच्यासाठी आपण काम त्याच्याकडून करवून घेवू. ही सगळयांनी  जबाबदारी समजली पाहिजे. हे काम सर्व करून घेवू.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u>**काम व्यावस्थितपणे आणि परफेक्ट झाले पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** ऐक माझा साधा प्रश्न आहे त्याच्यामध्ये, समजा एखादया प्रभागामध्ये २० टक्के बिलो आहे. २० टक्के बिलो म्हणजे प्राकलनीय खर्च १० लाख रूपये आहे. म्हणजे २ लाख रूपये कमी होतील, बरोबर आहे.ते कसे करणार. मी असे एकले आहे की २० टक्केचे बिलो आले आहे. २० टक्के चे ऐक्सट्रा काम करणार आणि दाखवणार की माझे १० लाख रूपये मध्ये काम पूर्ण झाले.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:– नाही नाही असे काही नाही. असे बिलकुल नाही जेवढे त्याचेसमजा १० लाखाचे त्याचे इस्टीमेट  होते आणि ८ लाख कोट  केले. १० लाखाच्या कामासाठी ८ लाख रूपये बिल होईल आणि जेवढे एस्टीमेट  आहे त्याप्रमाणे स्पेसिफिकेशन प्रमाणे काम होईल.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u>**सर, हेच मी सांगत आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– नाही नाही,

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>**असे नाही व्हायला पाहिजे आमचे ऑब्जेक्शन आहे. माझे असे आहे की,

**<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:–परत त्याच्याकडून २० टक्के काम करून घेणार. नाही असे नाही होणार.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी** :– मी १६ लाख रूप्ये फंड दिलेला आहे. १६ लाखाचे काम झाले पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**टेंडर प्रक्रीयेमध्ये अशा प्रकारचे कामे होत नाही.आम्ही समजा १०० करोडचा एक ब्रीज बनवायचा आहे, आणि त्याने १० टक्के बिलो केले, आपण बोलणार की नरम १० लाखाचे एक लहान ब्रीज बनवून दया. जो ब्रीज बनवायचा होता तो बनविण्यात आला. जे पण काम असेल

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– किंवा पीउब्ल्युडी ला एकच टेंडर काढायला पाहिजे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :**–ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– सर आम्हाला फंड १६ लाख देत आहेत की १३ लाख देत आहे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी**:– नगरसेवकि निधी श्री. टोनी जी अशी गोष्ट आहे १६ लाख रूपये त्यांनी दिले आहेत. त्याचे काम २० टक्के बिलो आहे. तर ते नगरसेवक निधीचा १३ लाख खर्चा झाला आहे. ३ लाख रूपये खर्च वाचला आहे.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:–**सर असे नाही आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– दुस–या बाजूने पण आपल्याला विचार करावा लागेल. जर १० टक्के अबाऊ जर कोणतें काम होत असेल दुस–या वेळेस तर त्याच्या वार्ड निधीतून १० टक्के कमी करून काम करायचे आहे. असे राहत नाही.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– सर, ॲट पार करा सर, नाही तर दोन दिवस रेड अनालीसीस करा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– ऑप्सन्स, ऑडीट आणि भरपूर काही असेल, आपण त्याचे काही शिल्लक राहिले असेल आपण हे लक्षात ठेवणार की एवढ सॅवीग झाले आहे. नंतर पुढच्या काम करण्याच्या वेळेस बघितले जाईल. या कामामध्ये याच कॉन्ट्रक्टरला मॅच करण्यासाठी देणार नाही.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वनी**:– यांना तीन, तीन लाखाचे लेटर देऊन हे करायला पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– नतंर , नंतर बघू ते.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– आपल्या आणि आपल्या विभागा कडून जस्टीफीकेशन लागत नाही. की माझ्याकडे आता तीन वर्षनंतर फंड मिळाला आहे. आणि कोणी ५० टक्के बिलो भरले असते तर. या लोकांनी कामच केले नसते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:– दुस–या वेळेस आम्ही त्याला रेकॉर्डवर ठेवले जाईल नंतर त्याच्याकडे बघितले जाईल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–**आपल्या सोबत एक उदाहरण देत आहे, आमदार निधी असते, आमदार निधी मध्ये प्रत्येक आमदाराना २ करोड चा फंड दिला जातो.ज्यामध्ये टेंडर जर २० टक्के बिलो झाला, तर त्याचा खर्च होईल १ करोड ८० लाख.किंवा १ करोड ६० लाख. तर ४० लाखाचे काम त्याना करून (होके) मिळते.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**त्याच कॉन्ट्रक्टरला देवू शकत नाही.

**सदस्य, श्री. भारत राजवानी**:– नविन काम काढून देवू शकतो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–**समजा परत त्यालाच देवू नका. ३ ते ४ लाखाचा फायदा होईल असे ऐस्टीमेट बनवा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**आपण जी गोष्ट करत आहात त्याच्यातून असा मॅसेज जाईल की तिथे उभे राहून आपण म्हणाल की २ लाखाचे अजून माझे समोर काम करून दया.

**सदस्य, श्री. भारत राजवानी**:– नाही, नाही नविन कामाचे जसे आपल्या वार्ड मध्ये आपल्या पब्लीकचे सपोर्ट होईल.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>**ठिक आहे, तुमच्या निधी सुरक्षित होवून जाईल , काही अडचण नाही.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u>**आपण शब्द दया की मिनिटस मध्ये येईल की ज्यांचे बिलो आहे तेवढे ते परत आजच पत्र दया, सर,

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी</u>**:– दुसरे साहेब माझे ही एक विनती आहे की आपल्या जवळ प्रभाग समिती आणि नगरसेवक निधी या पूढे स्थायी समिती मध्ये येवू नये की जसे पहिले होत होते. आम्हाला जसे की वार्ड मध्ये काम करण्यासाठी सोपे होत असते. एक वर्ष झाले आहे आम्ही निवडून आलो आहे, लोकांना हात पाय जोडूनआता तर आम्हाला शिव्या देत आहेत. की आपण जी फक्त कमीटमेंट करत आहेत ती पूर्ण करत नाही.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>**:–याच्यावर आमची मागच्या आठवडयात चर्चा झाली आहे. याचे अजून काही सोपा उपाय असू शकतो, जेणेकरून आपल्या लोकांकडून बघत आहोत.त्याचबरोर टेंडर प्रक्रीया आणि यामध्ये कसे स्थिरता येईल, हया गोष्टी बघ्याव्या लागतील.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u>**:– माझे एक सूचना आहे, जर ५ लाखाचे ऐस्टीमेट आले तर ५ लाखाचे टेंडर करा, त्यामुळे वाद पण होणार नाही बिलो पण होणार नाही त्यामुळे कामाची सुरूवात लवकर होईल.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u>**५ लाखाचे काम आहे आगोदरच आम्ही ३ लाख दिलेले आहेत,यापूढे पूढच्या भागामध्ये आम्ही २ लाख रूप्ये देणार. जर ३ लाखामध्ये सुध्दा २.५० लाखाचे काम झाले परत तीच प्रक्रीया टेंडर करा वैगेरे.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>**साहेब, नागरीकाचे बोलणे ऐकून इथे येवून आम्ही राग काढत असतो.

**<u>सदस्या, श्रीम. कविता पंजाबी</u>** :– समतानीजी, तुम्ही माझे बरोबर एक वादा केला होता की १५ दिवासामध्ये काम होणार म्हणून, परंतु हे घ्या यादी एक पण काम झालेले नाही. पाटोल्सचे पास केलेले आहे परंतु एक पण नाही दोन वेळा आम्ही मान्यता दिलेली आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u>**:– तर कृप्या हा जरा विषय गंभीर आहे, आपण कृप्या ऐकून घ्यावा,

**<u>सदस्या, श्रीम. कविता पंजाबी:–</u>**दोन वेळा आम्ही जे पण पास केले जाते परंतु ते काम होतच नाही. आपल्याला ही यादी देत आहे. पाटोल्सचेही आहेत शिवाजी चौक पासून ते स्टेशन रोड पर्यत झालेला नाही आणि महाराजा हॉल पासून संतु बिल्डिंग पर्यंत मोठे मोठे पाटोल्स आहेत लोक त्याच्यात पडत आहेत.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u>** पाटोल्सचे १५ ते २० दिवस झाले टेंडर देवून, दुस–यावेळेस आम्ही दिले, आज एक महिना झाला पाटोल्स चे डांबर चे काम पावसाळयात चालू करणार का?

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u>**:– पाटोल चे दुस–या वेळेसचे काम चालू च झालेले नाही, मॅडम जसे सांगितल की, सगळया ठिकाणी त्रास आहे. आज तर बिर्ला गेट पासून मी सांगत आहे एक वेळैस आयुक्त साहेबांना घेवून बिर्ला गेट पासून बस स्यूप रोड पासून येवू एवढे मोठ मोठे खड्डे रस्तेवरती आहेत, जसे की मॅडम ने सांगितले, दुस–या वेळेस चे ६करोडचे आम्ही काम घेतलेले आहे ते आता पर्यंत ५:२:२ मध्ये देवून सुध्दा अजून पर्यत झालेले नाही. एवढे लेट केले असते तर आतापर्यत टेंडर झाले असते. ५:२:२ मध्ये देवून फायदा काय आहे. नाही, मी महासभेत विचारणार आहे. की ५:२:२ मध्ये देवून सुध्दा वर्क ऑर्डर देण्यासाठी १ महीना आपल्याला लगाम आहेत तर टेंडर का नाही काढले. आता गणपती उत्सव निघून गेले, त्यानंतर चालीया उत्सव फेल गेला सर्व, दिवाळी फेल गेली सर्व खडडे, आता एवढे काम दिले गेले आयुक्त साहेब मेहनत करत आहेत. त्यामुळे आपण वर्क ऑर्डर देवून काम ताबोडतोब चालू करावे. चारही प्रभागामध्ये काम चालू करणे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>**वर्क ऑर्डर दिलेली आहे का नाही.

**<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी:–</u>** सर, एसेप्टन्स दिलेले आहे.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u>**:– आयुक्त साहेब, कॉन्ट्रक्टर यांना सांगा की त्वरीत चालू करणेसाठी.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— काम त्वरीत चालू करण्यासा सांगा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे**:— साहेब, पून्हा ४ ऐप्रीलला शिवजयंती आहे. ठाणे जिल्हयाची आणि ती मोठी रॅली निघते, पूर्ण उल्हासनगर मधून, गुढीपाडवा येत आहे, चेटीचंद उत्सव येत आहे, सगळया गोष्टी आहेत. आणि जर पाटोल्सचे काम ५ (२) (२) मध्ये देवून जर चालू होत नाही, तर दूर्देवाची गोष्ट आहे ना साहेब.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—**शिवरात्रीमधील मेन मेन ठिकाणी क्लीअर केलेले नाही आजूनविनस टॉकीज जवळ मोठे पाटोल्स आहे ते अजून केले नाही.मेन रोड आहे शिवरात्री मध्ये सुध्दा यांनी कमिटमेंट केली होती. परंतु शिवरात्रीमध्ये काम केले नाही.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी :—** सर आपण जर कोणाला मतदान करायचे ठरवले एखादया विभागामध्ये लाईट, पीडब्ल्युडी, वाटर सप्लाय सॅनीटेसन,यानां तुम्ही सांगू शकता का ५०टक्के तरी डयुटी करतात का? इतक्या तक्रारी आपल्याला मिळत आहेत, आपण करत आहेत.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी**:— आजच घडीला यांच्यावरती लोड किती आहे. १९९७ मध्ये मी जेव्हा पहील्या वेळेसवेळेस नगरसेवक झालो.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी**:— नाही ,नाही सर १८ इंजिनिअरर्स चे काम ४ इंजिनिअरर्स करत आहेत.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** ६ महीन्यापासून बोलले जाते की इंजिनिअर येत आहे. स्थानिक पातळीवर आम्ही अॅप्लाय केले आहे.

**सदस्या, श्रीम. पंचम कलानी:—** आणखी एक गोष्ट आहे की आपल्याला माहित आहे का जो पाहिले काम झाालेले आहे, ते परत येणार नाही.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी**:— कोणते मॅडम.

**सदस्या, श्रीम. पंचम कलानी**:— कुठे पण, पूर्ण परिसरामध्ये. ज्या ठिकाणी काम झालेले आहे तेच काम पून्हा या टेंडर मध्ये तर येणार नाही ना.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी**:— कोणतें प्रभाग समिती बोलत आहात का.

**सदस्या, श्रीम. पंचम कलानी**:—होय,

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी**:— परत कसे, परत नाही येणार.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**आपण आपल्या भागातील एस्टीमेट बघा जर आपल्याला असे वाटत असेलहे खूप गंभीरपणे मी सांगीतले आहे.

**सदस्या, श्रीम. पंचम कलानी**:— वर्क ऑर्डर देण्यापूर्वी थेडे लक्ष दया की उदया काही अशी काही गोष्ट समोर आली तर त्याची जबाबदार आपण असाल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**त्याच्यात प्रोसीक्यूशन असेल, जबाबदारी नसेल फौजदारी केस दाखल केली जाईल.

**सदस्या, श्रीम. पंचम कलानी**:— आपण परत एकदा बघून घ्या.

**आयुक्त , श्री. राजेंद्र निंबाळकर**:— मॅडम, कमीत कमी त्याच्या भगातील त्यांना एस्टीमेट दया.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी**:— यामध्ये माझा असा अंदाज आहे की, असे कधी आतापर्यत पीडब्ल्यूडी मध्ये झाले नाही. हा एक भ्रम आहे. की माफ होणार. आज आपल्या कडे ८ इंजिनिअर्स होते. चार कार्यकारी अभियंता होते काय काय होते विभागामध्य, किती मोठे होते, काम होत होते, आज हे चार इंजिनिअर्स साभळत आहेत आपण यांना शबासकी दयायला पाहिजे. की चार जण पूर्ण पीडब्ल्यूडी विभाग सांभाळत आहेत.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी :–</u>** साहेब जी शाबासकी देऊ पण पब्लीकच्या शिव्या आम्ही खात आहेत, पब्लीक टॅक्स भरत आहे.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u>**:– हां बरोबर आहे पण विभाग वाढला पाहिजे, स्टाफ भरला पाहिजे,

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी :–</u>** टॅक्स तर कमी नाही झाले ना चार इजिनिअर्स कमी झाले तर.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u>**:– नाही, चार कमी नाही झाले. १४ कमी झाले आहेत.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** ४ ऐप्रील ला शिवजयंती आहे अेसी चे एक पण काम झाले नाही. एक महिन्या पूर्वी आपण त्याना ५ (२) (२) मध्ये दिलेले आहे, आणि आजून तो काम चालू करत नाही तर कृपया त्या बाबत सुचना आपण दयाव्यात.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u>**:– इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u>** नाही, नाही, एक मिनीट बघा यामध्ये इश्यु असा आहे की जसे आमच्या प्रभागामध्ये पप्पू गार्डन पासून ते एटीपी स्कुल पर्यत ज्याची परिस्थिती गंभीर आहे, खूप खराब आहे. वांरवरसांगून सुध्दा त्याचे अजूनपर्यत पाटोल्स अजून भरण्यात आलेले नाही. रेड क्रॉस पासून ते खेमाणी पर्यत ते खडउे पण अजून भरलेले नाही. साइड पटटी नाही स्ट्रेंच नाही, सर्व आम्ही घेतलेले आहे. त्यावेळेस तर पूर्ण आत्मविश्वासाने सांगितले जात होते. आम्ही सगळे घेतले आहे ठिक आहे. आपण दुस–या भागामध्ये घेतले आहे दुस–याय भागातमध्ये घेतले आहे तर अजून र्प्यतकाम चालू झाले नाही आम्हाला रिझॉल्यूसन घेवून १५ दिवस झाले सेक्रटरी मॅडम सांगत आहेत की एक महिना झाला,सेक्रटरी मॅडम सांगत आहेत की एका दिवसात त्यांना रिझॉल्यूसन दिलेला आहे, तर आपल्याला वर्क ऑर्डर देण्यासाठी एक महिना का लागत आहे?

**<u>प्र. शहर अभियंता, महेश शितलानी</u>**:– आतापर्यत आमच्याकडे मिनीटस आलेले नाहीत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u>**व्हॉट मे यु कन्सर्न ऑफ वीथ मिनीटस्, व्हॉट मे यू आर कन्सर्न, रिझॉल्युसन ऑन फॉर यु,

**<u>प्र. शहर अभियंता, महेश शितलानी</u>**:– ओके सर,

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>** काम करायचे नाही शहरामध्ये शिव्या आम्ही खातो.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u>** सर साधी गोष्ट रिझॉल्युसन लागते. मिनीटस् काय संबंध आहे.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u>**:– ४ नंबर पासून ते २३ पर्यतचे विषय सर्व पास इतिवृताची वाट न पाहता पास.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ४ :–** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका **प्रभाग क्र. १** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत.या कामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यातआल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ५८,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०६ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०४ |

मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्यलेखा परिक्षक, शहरअभियंता यांचे उपस्थितीत **प्रभाग क्र.१** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यातआला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदे मधील बाबी | **मे.सागर कन्स्ट्रक्शन** | **मे.राजेश कन्स्ट्रक्शन** | **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** | **मे.देव'स इंटरप्रायझेस** |
|---|---|---|---|---|---|
| १. | निविदाप्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय | होय | होय |
| २. | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय | होय |
| ३. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय | होय |
| ४. | कामाचा अनुभव | होय | होय | होय | होय |
| ५. | पॅनकार्डाची प्रत | होय | होय | होय | होय |
| ६. | संस्था / कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादी चे) दस्ताऐवज | होय | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागा मध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. सागर कन्स्ट्रक्शन** २) **मे. राजेश कन्स्ट्रक्शन** ३) **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** ४) **मे. देव'स इंटरप्रायझेस** यांच्या निविदा अटीशर्तीनुसार पात्र असल्याने उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खलील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचेनाव** | **दिलेलेदर (टक्केप्रमाणे)** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | मे. सागर कन्स्ट्रक्शन | दिलेले दर ५.०० टक्के जास्त |
| २. | मे. राजेश कन्स्ट्रक्शन | दिलेले दर ९.९९ टक्के कमी |
| ३. | मे. झा.पी. ॲण्ड कंपनी | दिलेले दर १.१० टक्के कमी |
| ४. | मे. देव'स इंटरप्रायझेस | दिलेले दर १.०० टक्के जास्त |

उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे **मे. राजेश कन्स्ट्रक्शन** यांनी ९.९९% टक्के कमी एवढे दर दिले आहेत. सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे **मे. राजेश कन्स्ट्रक्शन** त्यांनी Performance Security Deposit,आय. सी. आय. सी. आय बँकेतून डी.डी चे रक्कम ६०,०००/- रु व चेक नं.०२००५६ एवढी रक्कम धनादेशाव्दारे भरली आहेत.

तरी **मे. राजेश कन्स्ट्रक्शन** या निम्न दराचे (९.९९% टक्के कमी) निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.९६.** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. १ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे ९.९९ टक्के कमी दराचे निविदाकार मे. राजेश कंन्स्ट्रक्शन यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ५ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ५ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. २** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ५ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. २** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका **प्रभाग क्र. २** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत.या कामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यातआल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ७७,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०७ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्यलेखा अधिकारी, मुख्यलेखा परिक्षक , शहर अभियंता यांचे उपस्थितीत **प्रभाग क्र.२** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्यानिविदेमधीलबाबी | **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** | **मे.सागर कन्स्ट्रक्शन** | **मे.आयुश कन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|
| १. | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| २. | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| ३. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | कामाचा अनुभव | होय | होय | होय |
| ५. | पॅनकार्डाची प्रत | होय | होय | होय |
| ६. | संस्था / कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनीइत्यादीचे) दस्ताऐवज | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** २) **मे. सागर कन्स्ट्रक्शन** ३) **मे. आयुश कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटीशर्तीनुसार पात्र असल्याने उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खलील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांचेनाव | दिलेलेदर (टक्केप्रमाणे) |
|---|---|---|
| १. | मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन | दिलेले दर ४.९९ टक्के जास्त |
| २. | मे. सागर कन्स्ट्रक्शन | दिलेले दर ५.०० टक्के जास्त |
| ३. | मे. आयुश कन्स्ट्रक्शन | दिलेले दर ९.९९ टक्के जास्त |

उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन यांनी ४.९९% टक्के जास्त निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी केल्या त्याप्रमाणे मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन यांनी वाटाघाटी अंती दिलेले दर At Par प्रमाणे या विभागामार्फत पत्र देण्यातआले होते. त्याप्रमाणे मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन यांची सदर काम At Par प्रमाणे देणेकरिता त्यांनी दिलेले दिनांक २४/०१/२०१८ रोजीचे दिलेले पत्रान्वये सहमती दर्शवली आहे. सदर काम मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन यांची सदर काम At Par प्रमाणे देणेकरिता शिफारस करण्यात येतआहे.

तरी **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** या निम्न दराचे At Par निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.९७** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. २ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे ॲटपार निविदाकार मे. नवनिर्माण कंन्स्ट्रक्शन यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे. **तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्तकायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय कमांक. ६ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ६ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र.** ३ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र.** ३ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका **प्रभाग क्र. ३** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत. या कामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यातआल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६०,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०६ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्यलेखा अधिकारी, मुख्यलेखा परिक्षक , शहर अभियंता यांचे उपस्थितीत **प्रभाग क्र.३** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यातआला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदे मधील बाबी | **मे. देव'स इंटरप्रायझेस** | **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** | **मे. महादेव कंन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|
| १. | निविदाप्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| २. | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| ३. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |
| ४. | कामाचाअनुभव | होय | होय | होय |
| ५. | पॅनकार्डाचीप्रत | होय | होय | होय |
| ६. | संस्था / कंपनीनोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनीइत्यादीचे) दस्ताऐवज | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. देव'स इंटरप्रायझेस** २) **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** ३) **मे. महादेव कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटीशर्ती नुसार पात्र असल्याने उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खलील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **दिलेले दर (टक्के प्रमाणे)** |
|---|---|---|
| १. | मे. देव'स इंटरप्रायझेस | दिलेले दर १.०० टक्के जास्त |
| २. | मे. झा.पी. ॲण्ड कंपनी | दिलेले दर १.१० टक्के कमी |
| ३. | मे. महादेव कंन्स्ट्रक्शन | दिलेले दर १०.०० टक्के जास्त |

उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** यांनी **१.१०%** टक्के कमी एवढे दर दिले आहेत. सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** त्यांनी Performance Security Deposit,ॲक्सीस बँकेतून डी.डी चे रक्कम ६०,०००/- रु व चेक नं.०१७६४२ एवढी रक्कम धनाव्दारे भरली आहे.

तरी **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** या निम्न दराचे (**१.१०%** टक्के कमी ) निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.९८** दिनांकः— २८/२/२०१८

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. ३ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे (१.१० टक्के कमी) निविदाकार मे. झा. पी. एण्ड कंपनी यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.

४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्तकायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ७ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ७ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. ४** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७ :— वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या प्रभाग क्र. ४ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका **प्रभाग क्र. ४** मधील विविध विकास कामांच्या निविदेचीमान्यता मिळणेबाबत.या कामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिकवआर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यातआल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणेआहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ५२,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |

| | | |
|---|---|---|
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०४ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०२ |

मा. आतिरिक्तआयुक्त, मुख्यलेखा अधिकारी, मुख्यलेखा परिक्षक , शहरअभियंता यांचे उपस्थितीत **प्रभाग क्र.४** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यातआला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदे मधील बाबी | **मे. व्ही.के. कंन्स्ट्रक्शन** | **मे. शुभम कंन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|
| १. | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय |
| २. | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय |
| ३. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय |
| ४. | कामाचा अनुभव | होय | होय |
| ५. | पॅनकार्डाची प्रत | होय | होय |
| ६. | संस्था / कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादी चे) दस्ताऐवज | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. व्ही.के. कंन्स्ट्रक्शन** २) **मे. शुभम कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटीशर्तीनुसार पात्र असल्याने उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खलील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचेनाव** | **दिलेलेदर (टक्केप्रमाणे)** |
|---|---|---|
| **१.** | **मे. व्ही.के. कंन्स्ट्रक्शन** | **दिलेले दर ९.९९९ टक्के कमी** |
| **२.** | **मे. शुभम कंन्स्ट्रक्शन** | **दिलेले दर १०.००टक्के कमी** |

उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे **मे. शुभम कंन्स्ट्रक्शन** यांनी **१०.००%** टक्के कमी एवढे दर दिले आहेत. सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे **मे. शुभम कंन्स्ट्रक्शन** त्यांनी Performance Security Deposit, अॅक्सीस बँकेतून डी.डी चे रक्कम ६४,०००/- रु व चेक नं. ०१७७४६ एवढी रक्कम धनादेशाव्दारे भरली आहेत.

तरी **मे. शुभम कंन्स्ट्रक्शन** या निम्न दराचे (**१०.००%** टक्के कमी ) निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समिती मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.९९** — दिनांकः— २८/२/२०१८

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७–१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. ४ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे**(१०.००% टक्के कमी)**निविदाकार मे. शुभम कंन्स्ट्रक्शन यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्तकायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. ८ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ८ :–** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. ५** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८ :– वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या प्रभाग क्र. ५ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका **प्रभाग क्र.५** मधील विविध विकास कामांच्या निविदेचीमान्यता मिळणेबाबत.या कामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यातआल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणेआहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये २२,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०७ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

मा.आतिरिक्त आयुक्त, मख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहरअभियंता यांचे उपस्थितीत **प्रभाग क्र.५** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्यानिविदेमधीलबाबी | **मे.ऋषी कंन्स्ट्रक्शन** | **मे.यश कंन्स्ट्रक्शन** | **मे. माँ भवानी कंन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|
| १. | निविदा प्र पत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| २. | इसारारक्कमभरलेलीआहेका? | होय | होय | होय |
| ३. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |
| ४. | कामाचाअनुभव | होय | होय | होय |
| ५. | पॅनकार्डाचीप्रत | होय | होय | होय |
| ६. | संस्था / कंपनीनोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनीइत्यादीचे) दस्ताऐवज | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे.ऋषी कंन्स्ट्रक्शन** २) **मे. यश कंन्स्ट्रक्शन** ३) **मे. माँ भवानी कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्ती नुसार पात्र असल्याने उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खलील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **दिलेले दर (टक्के प्रमाणे)** |
|---|---|---|
| १. | मे. ऋषी कंन्स्ट्रक्शन | दिलेले दर २०.१४ टक्के कमी |
| २. | मे. यश कंन्स्ट्रक्शन | दिलेले दर ११.०० टक्के कमी |
| ३. | मे. माँ भवानी कंन्स्ट्रक्शन | दिलेले दर २०.०० टक्के कमी |

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे **मे.ऋषी कंन्स्ट्रक्शन** यांनी २०.१४ टक्के कमी एवढे दर दिले आहेत. सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे **मे.ऋषी कंन्स्ट्रक्शन** यांनी Performance Security Deposit क्सिसबँकेतून डी.डी चे रक्कम ३१,०००/- रु व चेक नं.०१७६४४, रक्कम ३१,०००/- रु व चेक नं. ०१७६४५ ,रक्कम ३१,०००/- रु व चेक नं. ०१७६४६, रक्कम ३१,०००/- रु व चेक नं. ०१७६४७ रक्कम ३१,०००/- रु व चेक नं. ०१७६४८, रक्कम ३१,०००/- रु व चेक नं. ०१७६५०, रक्कम ३१,०००/- रु व चेक नं.०१७६४९, रक्कम ३१,०००/- रु व चेक नं.०१७६४९, रक्कम ३१,०००/- रु व चेक नं.०१७६५३,बँक ऑफ बडौदा बँकेतून डी.डी.चे रक्कम ३१,०००/- रु व चेक नं.६२९३०३, एकुण ३,४१,०००/-रुपये एवढी रक्कम धनादेशाद्वारे भरली आहेत.

तरी **मे. ऋषी कंस्ट्रक्शन** या निम्न दराचे (२०.१४% टक्के कमी) निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समिती मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १००** **दिनांक:— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. ५ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे**(२०.१४% टक्के कमी)**निविदाकार **मे. ऋषी कंस्ट्रक्शन**यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ९ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्र. ९ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. ६** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ९ :–** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. ६** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका **प्रभाग क्र.६** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत.या कामां करिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिकवआर्थिक ) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६१,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०८ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०५ |

मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक , शहरअभियंतायांचेउपस्थितीतप्रभाग क्र.६ मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिलखालीलप्रमाणे.

| अ.क्र | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.आयुश कंन्स्ट्रक्शन | मे.झा.पी. ॲण्ड कंपनी | मे.एम इंजिनिमेयर्स | मे.ओम एंटरप्रायजेस | मे.यश कंन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या 3 वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी यांनी मागील ३ वर्षाचे समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) | आहे | आहे | आहे | आहे | आहे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | संयुक्त भागीदारी (Joint Venture)मान्य नाही. | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती | आहे | आहे | आहे | नाही | आहे |
| ७ | कॉंक्रीट मिक्सर, वायब्रेटर इत्यादी साहित्य/मशिनरी ची मालकी असल्याचा पुरावा. | आहे. | आहे | आहे | नाही | आहे |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) मे.आयुश कंन्स्ट्रक्शन २) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी ३) मे.एम इंजिनिमेयर्स ४) मे.ओम एंटरप्रायजेस५) मे.यश कंन्स्ट्रक्शन यांच्यानिविदा उटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिकदर) मा. अतिरिक्त आयुक्तसो. यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत अघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांचेनाव | दिलेलेदर (टक्केप्रमाणे) |
|---|---|---|
| १. | मे.आयुश कंन्स्ट्रक्शन | दिलेलेदर १२.०० टक्केकमी |
| २. | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | दिलेलेदर २०.११ टक्केकमी |
| ३. | मे.एम इंजिनिमेयर्स | दिलेलेदर १९.२० टक्केकमी |
| ४. | मे.ओम एंटरप्रायजेस | दिलेलेदर ११.९९ टक्केकमी |
| ५. | मे.यशकंन्स्ट्रक्शन | दिलेलेदर १०.०० टक्केकमी |

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे मे.झा.पी.ॲण्ड कंपनीयांनी २०.११ टक्के कमी एवढे दर दिले आहेत. सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणेमे.झा.पी.ॲण्ड कंपनीयांनी Performance Security Depositॲ क्सिसबँकेतूनडी.डीचेरक्कम ६१,०००/- रुवचेकनं.०१७६६१, रक्कम ६१,०००/- रुवचेकनं. ०१७६६२ ,रक्कम ६१,०००/- रुवचेकनं. ०१७६६३, रक्कम ६१,०००/- रुवचेकनं. ०१७६५४ रक्कम ६१,०००/- रुवचेकनं. ०१७६५५, रक्कम ६१,०००/- रुवचेकनं. ०१७६५६, रक्कम ६१,०००/- रुवचेकनं.०१७६६४, बँकऑफबडौदाबँकेतूनडी.डी.चेरक्कम ६१,०००/- रुवचेकनं.६२९२९८, रक्कम ६१,०००/- रुवचेकनं.६२९२९९, बँकऑफबडौदाबँकेतूनडी.डी. चेरक्कम ६१,०००/- रुवचेकनं.६२९३०० रक्कम ६१,०००/- रुवचेकनं. ६२९३१२/-, फॅड्रलबँकचेडी.डी. रक्कम १०,०००/- वचेकनं. ५०६२०१ एकुण ४,९८,०००/-रुपये एवढी रक्कम धनादेशाद्वारे भरली आहेत.

तरी मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यानिम्न दराचे (२०.११% टक्के कमी) निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.१०१** **दिनांक:— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. ६ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे**(२०.११% टक्के कमी)**निविदाकार **मे.झा.पी. ॲण्ड कंपनी** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**<u>तसेच</u>**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्तकायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्रमांक. १० वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. १० :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. ७** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १० :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. ७** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्र.७ मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत.याकामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक ) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्याहोत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणेआहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ५६,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | १३/१२/२०१७ |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | २२/१२/२०१७ |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा  दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०४ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०२ |

मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक , शहर अभियंता यांचे उपस्थितीत प्रभाग क्र.७ मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत याकामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **निविदाकाराच्या निविदेमधील बाबी** | **मे.देव एंटरप्रायजेस** | **मे.झा.पी. ॲण्ड कंपनी** |
|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी यांनी मागील ३ वर्षाचे समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) | आहे | आहे |
| ४ | संयुक्त भागीदारी (Joint Venture)मान्य नाही. | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती | आहे | आहे |
| ७ | कॉंक्रीट मिक्सर, वायब्रेटर इत्यादी साहित्य/मशिनरी  ची मालकी असल्याचा पुरावा. | आहे | आहे |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समितीमार्फत छाननी केली असता १) मे.देव एंटरप्रायजेस २) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांच्या निविदा अटीशर्तीनुसार असल्याने पात्र आहेत

तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिकदर) मा. अतिरिक्त आयुक्त सो.यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यातआला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांचेनाव | दिलेलेदर (टक्केप्रमाणे) |
|---|---|---|
| १. | मे.देव एंटरप्रायजेस | दिलेलेदर १.०० टक्केजास्त |
| २. | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | दिलेलेदर १.१० टक्केकमी |

उपरोक्त निविदापैकी मे. झा.पी. ॲण्ड कंपनी यांनी १.१०% टक्के कमी एवढे दर दिले असून सदर दर सर्वात कमी आहेत.त्याप्रमाणे मे.झा.पी. ॲण्ड कंपनीयांनी Performance Security Deposit ॲक्सिस बँकेतून डी.डी चे रक्कम ५६,०००/- रु व चेक नं.०१७६६५ अन्वये भरणा केली आहे.

तरी मे.झा.पी.ॲण्ड कंपनी या निम्न दराचे (१.१०% टक्के कमी) निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.१०२** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. ७ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे**(१.१०% टक्के कमी)**निविदाकार **मे.झा.पी. ॲण्ड कंपनी** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्तकायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ११ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ११ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. ८** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ११ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. ८** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्र.८ मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत.याकामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक ) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्याहोत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ५६,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | १३/१२/२०१७ |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | २२/१२/२०१७ |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०४ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०२ |

मा. आतिरिक्तआयुक्त, मुख्यलेखाअधिकारी, मुख्यलेखापरिक्षक , शहरअभियंतायांचेउपस्थितीतप्रभाग क्र.८ मधील विविध विकास कामांच्या निविदेचीमान्यता मिळणेबाबतयाकामाच्यानिविदेचातांत्रिकभागउघडण्यातआलात्याचातपशिलखालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.देव एंटरप्रायजेस | मे.झा.पी. ॲण्ड कंपनी |
|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी यांनी मागील ३ वर्षाचे समकामाचे अनुभवाचे | आहे | आहे |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रमाणपत्र जोडलेले आहे का | | |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) | आहे | आहे |
| ४ | संयुक्त भागीदारी (Joint Venture)मान्य नाही. | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती | आहे | आहे |
| ७ | काँक्रीट मिक्सर, वायब्रेटर इत्यादी साहित्य/मशिनरी ची मालकी असल्याचा पुरावा. | आहे | आहे |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागा मध्ये छाननीसमिती मार्फत छाननी केली असता १) मे.देव एंटरप्रायजेस २) मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसराभाग (आर्थिकदर) मा. अतिरिक्त आयुक्त सो.यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत अघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांचेनाव | दिलेलेदर (टक्केप्रमाणे) |
|---|---|---|
| १. | मे.देव एंटरप्रायजेस | दिलेलेदर १.०० टक्केजास्त |
| २. | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | दिलेलेदर १.१० टक्केकमी |

उपरोक्त निविदापैकी मे. झा.पी. ॲण्डकंपनी यांनी १.१०% टक्केकमीएवढेदरदिलेअसुनसदर दर सर्वात कमी आहेत.त्याप्रमाणे मे. झा.पी. ॲण्डकंपनी त्यांनी Performance Security Deposit, ॲक्सिसबँकेतूनडी.डीचे रक्कम ६४,०००/- रुवचेकनं.०१७६५७ अन्वये भरणा केली आहे.

तरी मे.झा.पी.ॲण्ड कंपनी या निम्न दराचे (१.१०% टक्के कमी) निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.१०३** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. ८ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे**(१.१०% टक्के कमी)**निविदाकार **मे.झा.पी. ॲण्ड कंपनी** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्तकायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १२ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. १२ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. ९** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १२ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. ९** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्र.९ मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या एकूण ६ कामाकरीता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ४६,,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०८ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०५ |

दिनांक १८/१२/२०१७ रोजी निविदा समितीसमोर विभागातर्फे प्रभाग क्र.९ मध्ये नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या एकूण ६ कामांकरीकरीता प्राप्त झालेल्याएकूण ०५ निविदांचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **निविदाकाराच्या निविदेमधील बाबी** | **मे.लाल साई कंन्स्ट्रक्शन** | **मे.रुषी कंन्स्ट्रक्शन** | **मे.श्री माँ कंनस्ट्रक्शन** | **मे.व्हि.के.कंन्स्ट्रक्शन** | **मे.यश कंन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी यांनी मागील ३ वर्षाचे समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | नाही | आहे | आहे | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ४ | संयुक्त भागीदारी (Joint Venture)आहे का | आहे | आहे | नाही | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती | नाही | आहे | नाही | आहे | आहे |
| ७ | कॉंक्रीट मिक्सर, वायब्रेटर इत्यादी साहित्य/मशिनरी ची मालकी असल्याचा पुरावा. | नाही | आहे | आहे | नाही | आहे |

वरील तक्त्यातील माहितीनुसार प्राप्त झालेल्या निविदाधारकांच्या कागदपत्रांची निविदा समितीसमोर छाननी केली असता**१) मे.रुषी कंन्स्ट्रक्शन २) मे.व्हि.के.कंन्स्ट्रक्शन ३) मे.यश कंन्स्ट्रक्शन ४) मे.श्री माँ कंन्स्ट्रक्शन**हे निविदाकार वरील सात बाबींची पूर्तता करीत असल्याने पात्र असल्याने निविदेचा आर्थिक देकार भाग (Financial Bid)उघडणेस प्रस्तावित करण्यात आले.

दिनांक १८/०१/२०१८ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांचे अध्यक्षतेखालील निविड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांचे उपस्थितीत उक्त चार निविदाकारांचा आर्थिक देकार भाग (Financial Bid)उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांचीनावे | दिलेलेदर |
|---|---|---|
| १ | मे.रुषी कंन्स्ट्रक्शन | २० .१४ टक्के कमी |
| २ | मे.व्हि.के.कंन्स्ट्रक्शन | ९.९९९ टक्के कमी |
| ३ | मे.यश कंन्स्ट्रक्शन | १०.०० टक्के कमी |
| ४ | मे.माँ भवानी कंन्स्ट्रक्शन | ७.०० टक्के कमी |

उपरोक्त निविदाकारांपैकी मे. रुषी कंन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेले दर २०.१४ टक्के दिले आहेत. सदर दर सर्वातकमी आहेत. त्याप्रमाणे मे.ऋषी कंन्स्ट्रक्शन यांनी Performance Security Depositखालील क्रमांकांच्या धनादेशाद्वारे भरले आहेत.

| अ.क्र. | बँकेचे नाव | धनादेश क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ॲक्सिस बँक | ०१७६६६ ते ०१७६७१ (एकूण ६) | रु. २,७६,०००/-<br>(४६,०००/- X ६) |
| २ | कोटक बँक | ४७१३७३ ते ४७१३७६ (एकूण ४) | रु. १,८४,०००/-<br>(४६,०००/- X ४) |
| ३ | बँक ऑफ बडोदा | ६२९३१० | ४६,०००/- |
| ४ | फेडरल बँक | ५०६२०५ | १०,०००/- |
| | | **एकूण** | **रु.५,१६,०००/-** |

तरी मे.रुषी कंन्स्ट्रक्शन या निम्न दराचे निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**<u>स्थायी समिती ठराव क्र. १०४</u>** **<u>दिनांक:— २८/२/२०१८</u>**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. ९ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार **मे रुषी कंन्स्ट्रक्शन** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**<u>तसेच</u>**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्तकायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १३ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. १३ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १०** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १३ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १०** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्र.१०मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या एकूण ८ कामाकरीता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ५६,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |

| | | |
|---|---|---|
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०४ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

दिनांक १८/१२/२०१७ रोजी निविदा समितीसमोर प्रभाग क्र.१० मध्ये नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या एकूण ८ कामांकरीकरीता प्राप्त झालेल्याएकूण ०३ निविदांचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.देव एंटरप्रायजेस | मे.झा.पी. ॲण्ड कंपनी | मे.ओम एंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी यांनी मागील ३ वर्षाचे समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) | आहे | आहे | आहे |
| ४ | संयुक्त भागीदारी (Joint Venture)आहे का | आहे | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती | आहे | आहे | नाही |
| ७ | काँक्रीट मिक्सर, वायब्रेटर इत्यादी साहित्य/मशिनरी ची मालकी असल्याचा पुरावा. | आहे | आहे | नाही |

वरील तक्त्यातील माहितीनुसारप्राप्त झालेल्या निविदाधारकांच्या कागदपत्रांची निविदा समितीसमोर छाननी केली असता **१) मे.देव एंटरप्रायजेस २) मे.झा.पी. ॲण्ड कंपनी ३) मे.ओम एन्टरप्रायजेस**हे निविदाकार वरील सात बाबींची पूर्तता करीत असल्याने पात्र आहेत. त्यामुळे सदर निविदाधारकांच्या निविदेचा आर्थिक देकार भाग (Financial Bid)उघडणेस प्रस्तावित करण्यात आले.

दिनांक १८/०१/२०१८ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांचे अध्यक्षतेखालील निविड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांचे उपस्थितीत उक्त चार निविदाकारांचा आर्थिक देकार भाग (Financial Bid)उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांचीनावे | दिलेलेदर |
|---|---|---|
| १ | मे.देव एंटरप्रायजेस | १.०० टक्के जास्त |
| २ | मे.झा.पी.कंन्स्ट्रक्शन | १.१ टक्के कमी |

| | | |
|---|---|---|
| ३ | मे.ओम एंटरप्रायजेस | १०.०० टक्के कमी |

उपरोक्त निविदाकारांपैकी मे. ओम एंटरप्रायजेस यांनी सादर केलेले दर १०.०० टक्के कमी दिले आहेत. सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे मे.ओम एंटरप्रायजेस यांनीPerformance Security Deposit खालील क्रमांकांच्या धनादेशाद्वारे भरले आहेत.

| **अ.क्र.** | **बँकेचे नाव** | **धनादेश क्रमांक** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| १ | देना बँक | ३८९३४७ | रु. ५६,००० /- |
| | | **एकूण** | **रु.५६,०००/-** |

तरी मे.ओम एंटरप्रायजेस या निम्न दराचे निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १०५** **दिनांकः– २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७–१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. १० मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार **मे. ओम एंटरप्रायजेस** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्तकायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. १४ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्र. १४ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. ११** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १४ :— वर्ष 2017-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत**

करावयाच्या **प्रभाग क्र. ११** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या

दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्र.११ मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत.या कामां करिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक ) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणेआहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६४,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०९ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०७ |

मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक , शहर अभियंता यांचे उपस्थितीत प्रभाग क्र.११ मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत याकामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.झा.पी. ॲण्ड कंपनी | मे.महादेव कंन्स्ट्रक्शन | मे.नवनिर्माण कंन्स्ट्रक्शन | मे.ओम एन्टरप्रायजेस | मे.रचना कंन्स्ट्रक्शन | मे.सागर कंन्स्टक्शन | मे.व्हि.के. कंन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आहे का | | | | | | | |
| २ | संस्था/कंपनी यांनी मागील ३ वर्षाचे समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ४ | संयुक्त भागीदारी (Joint Venture)मान्य नाही. | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती | आहे | नाही | आहे | नाही | नाही | नाही | आहे |
| ७ | कॉंक्रीट मिक्सर, वायब्रेटर इत्यादी साहित्य/मशिनरी ची मालकी असल्याचा पुरावा. | आहे | नाही | आहे | नाही | नाही | नाही | नाही |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागा मध्येछाननीसमिती मार्फत छाननी केली असता १) मे. झा.पी. ॲण्ड कंपनी २) मे.महादेव कंन्स्ट्रक्शन ३) मे.नवनिर्माण कंन्स्ट्रक्शन ४) मे.ओम एन्टरप्रायजेस ५) मे.रचनाकंन्स्ट्रक्शन ६) मे.सागर कंन्स्टक्शन ७) मे.व्हि.के.कंन्स्ट्रक्शनयांच्या निविदा अटी शर्ती नुसार पात्र असल्याने उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसराभाग (आर्थिकदर) मा. अतिरिक्त आयुक्तसो.यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत अघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचेनाव** | **दिलेलेदर (टक्केप्रमाणे)** |
|---|---|---|
| १. | मे. झा.पी. ॲण्डकंपनी | दिलेलेदर २०.१४ टक्केकमी |
| २. | मे.महादेव कंन्स्ट्रक्शन | दिलेलेदर ११.२५ टक्केजास्त |
| ३. | मे.नवनिर्माण कंन्स्ट्रक्शन | दिलेलेदर १२.०० टक्केजास्त |
| ४. | मे.ओम एन्टरप्रायजेस | दिलेलेदर ११.९९ टक्केकमी |
| ५. | मे.रचनाकंन्स्ट्रक्शन | दिलेलेदर ५.३५ टक्केकमी |
| ६. | मे.सागर कंन्स्टक्शन | दिलेलेदर ९.९९ टक्केजास्त |
| ७. | मे.व्हि.के.कंन्स्ट्रक्शन | दिलेलेदर ९.९९ टक्केकमी |

उपरोक्त निविदापैकी मे.झा.पी.ॲण्ड कंपनी यांनी २०.१४% टक्के कमी एवढे दर दिले असुन सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे मे.झा.पी.ॲण्ड कंपनी त्यांनी Performance Security Deposit, फॅड्रल बॅंकचे डी.डी. रक्कम ६४,०००/- रुवचेकनं.५०६१७४, रक्कम ६४,०००/- रु व चेकनं. ५०६१७६ ,रक्कम ६४,०००/- रुवचेकनं. ५०६१७८, रक्कम ६४,०००/- रुवचेकनं. ५०६१७९ रक्कम

६४,०००/- रुवचेकनं. ५०६१८०, रक्कम ६४,०००/- रुवचेकनं. ५०६१८१, रक्कम ६४,०००/- रुवचेकनं.५०६१८२, रक्कम ६४,०००/- रुवचेकनं.५०६१८३, रक्कम ६४,०००/- रुवचेकनं.५०६१८७, रक्कम १०,०००/- रु व चेकनं.५०६२०६, बँक ऑफ बडोदा बँकेतून डी.डी.चे रक्कम ६४,०००/- रु व चेक नं.६२९३०४ एकुण ७,१४,०००/-रुपयेएवढी रक्कम धनादेशाद्वारे भरणा केली आहे.

तरी मे.झा.पी.ॲण्ड कंपनी या निम्न दराचे (२०.१४% टक्के कमी) निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.१०६** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिति वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. ११ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे**(२०.११% टक्के कमी)**निविदाकार **मे.झा.पी. ॲण्ड कंपनी** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.
**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १५ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. १५ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १२** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.झा.पी.ॲ | मे.महादेव कंन्स्ट्रक्श | मे.नवनिर्माण | मे.एम. | मे.सागर कंन्स्टक्श |
|---|---|---|---|---|---|---|

**विषय क्र. १५**

**:—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १२** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका **प्रभाग क्र.१२** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत.या कामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्याहोत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६४,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | ०६ |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०५ |

मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक , शहरअभियंता यांचेउपस्थितीत **प्रभाग क्र.१२** मधील विविध विकास कामांच्या निविदेचीमान्यता मिळणेबाबतयाकामाच्यानिविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.झा.पी. ॲण्ड कंपनी | मे.महादेव कंन्स्ट्रक्शन | मे.नवनिर्माण कंन्स्ट्रक्शन | मे.एम. इंजिनियर्स | मे.सागर कंन्स्टक्शन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी यांनी मागील ३ वर्षाचे समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) | आहे | आहे | आहे | आहे | आहे |

सदर निविदांची सार्वजनिकबांधकामविभागा मध्ये छाननी समिती मार्फत छाननी करण्यात आली १) मे. झा.पी. ॲण्ड कंपनी २) मे.महा

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिकदर) मा. अतिरिक्त आयुक्तसो. यांचे अध्यक्षते खालील निवडसमिती

| | | कंपनी | | कन्स्ट्रक्शन | इंजिनियर्स | कंपनी |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | निविदा भरावयाची (आर्थिक वर्षाचा) ... सत्य नाही. | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती | आहे | नाही | आहे | नाही | नाही |
| ७ | काँक्रीट मिक्सर, वायब्रेटर इत्यादी साहित्य/मशिनरी ची मालकी असल्याचा पुरावा. | आहे | नाही | आहे | नाही | नाही |

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | दिलेले दर (टक्के प्रमाणे) |
|---|---|---|
| १. | मे. झा. पी. ॲण कंपनी | |
| २. | मे. महादेव कंस्ट्रक्शन | दिलेले दर १२.४५ टक्के ज |

| | | |
|---|---|---|
| | | स |
| ३. | मे. नवनिमण कंस्रक्न | |
| ४. | मे. एम इंजिनियर्स | |
| ५. | मे. सगर कंस्रक्न | |

उपरोक्त निविदापैकी मे.एम इंजिनियर्स यांनी १७.८०% टक्के कमीएवढेदरदिलेअसून सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे मे.एम इंजिनियर्स त्यांनी Performance Security Deposit, फॅड्रल बँकचे डी.डी. रक्कम ६४,०००/- रु व चेकनं.५०६१८८, रक्कम ६४,०००/- रु व चेकनं. ५०६१८९ ,रक्कम ६४,०००/- रुवचेकनं. ५०६१९०, रक्कम ६४,०००/- रु व चेकनं. ५०६१९१ रक्कम ६४,०००/- रुवचेकनं. ५०६१९२, रक्कम ६४,०००/- रुवचेकनं. ५०६१९३, रक्कम ६४,०००/- रुवचेकनं.५०६१९४, पंजाब नॅशनल बँकेचे डी.डी.चेरक्कम ५,०००/- रु व चेकनं.७८६३०४ अन्वयेरुपये ४,५३,०००/- एवढी रक्कम भरणा केली आहे.

तरी मे.एम.इंजिनियर्स या निम्न दराचे (१७.८०% टक्के कमी) निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १०७** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. १२ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे**(१७.८०% टक्के कमी)**निविदाकार **मे.एम.इंजिनियर्स** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १६ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १६ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १३** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास……

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. १६ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १३** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका **प्रभाग क्र.१३** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत.या कामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक ) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यातआल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६४,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०६ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्यलेखा अधिकारी, मुख्यलेखा परिक्षक , शहर अभियंता यांचे उपस्थितीत **प्रभाग क्र.१३** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यातआलात्याचातपशिलखालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदे मधील बाबी | **मे. महादेव कन्स्ट्रक्शन** | **मे. सागर कन्स्ट्रक्शन** | **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|
| १. | निविदाप्रपत्रकाच्याखरेदीचीरक्कमभरलेलीआहे का ? | होय | होय | होय |
| २. | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| ३. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |
| ४. | कामाचाअनुभव | होय | होय | होय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | पॅनकार्डाचीप्रत | होय | होय | होय |
| ६. | संस्था / कंपनीनोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनीइत्यादीचे) दस्ताऐवज | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. महादेव कंन्स्ट्रक्शन** २) **मे. सागर कन्स्ट्रक्शन** ३) **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटीशर्तीनुसार पात्र असल्याने उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त निविदाकारांचाआर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्तआयुक्त सो. यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्यलेखा अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागयांचे उपस्थितीत अघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांचेनाव | दिलेलेदर (टक्केप्रमाणे) |
|---|---|---|
| **१.** | मे. महादेव कंन्स्ट्रक्शन | दिलेले दर १२.२५ टक्के जास्त |
| **२.** | मे. सागर कन्स्ट्रक्श्न | दिलेले दर १२.०० टक्के जास्त |
| **३.** | मे. शुभम कन्स्ट्रक्श्न | दिलेले दर १०.०० टक्के जास्त |

उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** या सर्वात कमी दराच्या (म्हणजे १०% टक्के जास्त) निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी केल्या त्याप्रमाणे **मे. शुभम कन्स्ट्रक्श्न** यांनी वाटाघाटी अंती दिलेले दर At Par प्रमाणे या विभागा मार्फत पत्र देण्यातआले होते. त्याप्रमाणे **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम At Par प्रमाणे देणेकरिता त्यांनी दिलेले पत्रान्वये सहमती दर्शवली आहे. सदर काम **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम At Par प्रमाणे देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** या निम्न दराचे निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.१०८** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. १३ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार **मे. शुभम कन्स्ट्रक्शन** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १७ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १७ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १४** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १७ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १४** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्र.१४ मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या एकूण ११ कामाकरीता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ८९,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०७ |

| | | |
|---|---|---|
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०२ |

दिनांक १८/१२/२०१७ रोजी निविदा समितीसमोर विभागातर्फे प्रभाग क्र. **१४** मध्ये नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या एकूण ११ कामांकरीकरीता प्राप्त झालेल्याएकूण ०२ निविदांचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.१**

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | मे.व्हि.के.कंन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी यांनी मागील ३ वर्षाचे समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) | आहे | आहे |
| ४ | संयुक्त भागीदारी (Joint Venture)मान्य नाही. | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती | आहे | आहे |
| ७ | कॉंक्रीट मिक्सर, वायब्रेटर इत्यादी साहित्य/मशिनरी ची मालकी असल्याचा पुरावा. | आहे | नाही |

वरील तक्त्यातील माहितीनुसार प्राप्त झालेल्या निविदाधारकांच्या कागदपत्रांची निविदा समितीसमोर छाननी केली असता १) **मे.झा.पी. ॲण्ड कंपनी ३) मे.व्हि.के.कंन्स्ट्रक्शन**हे निविदाकार वरील सात बाबींची पूर्तता करीत असल्याने पात्र आहेत. त्यामुळे सदर निविदाधारकांच्या निविदेचा आर्थिक देकार भाग (Financial Bid)उघडणेस प्रस्तावित करण्यात आले.

दिनांक १८/०१/२०१८ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांचे अध्यक्षतेखालील निविड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांचे उपस्थितीत उक्त चार निविदाकारांचा आर्थिक देकार भाग (Financial Bid)उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांचीनावे | दिलेलेदर |
|---|---|---|
| १ | मे.झा.पी.ॲण्ड कंपनी | १.१टक्के कमी |
| २ | मे.व्हि.के.कंन्स्ट्रक्शन | ९.९९९ टक्के कमी |

उपरोक्त निविदाकारांपैकी मे. व्हि.के.कंन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेले दर ९.९९९ टक्के कमी दिले आहेत. सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे मे. व्हि.के.कंन्स्ट्रक्शन यांनीPerformance Security Deposit खालील क्रमांकांच्या धनादेशाद्वारे भरले आहेत.

| अ.क्र. | बँकेचे नाव | धनादेश क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ महाराष्ट्र | ४३९८८६ | रु. ८९,०००/- |
| | | | |
| | | **एकूण** | **रु.८९,०००/-** |

तरी मे. व्हि.के.कंन्स्ट्रक्शन या निम्न दराचे निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १०९** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. १४ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार **मे. व्हि.के.कंन्स्ट्रक्शन** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १८ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १८ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १५** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १८ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १५** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्र.१५ मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या एकूण ०८ कामाकरीता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६४,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | १३/१२/२०१७ |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | २२/१२/२०१७ |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०४ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०२ |

दिनांक १८/१२/२०१७ रोजी निविदा समितीसमोर विभागातर्फे प्रभाग क्र. **१५**मध्ये नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या एकूण ८ कामांकरीकरीता प्राप्त झालेल्याएकूण ०२ निविदांचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.१**

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे.शुभमकंन्स्ट्रक्शन | मे.व्हि.के.कंन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी यांनी मागील ३ वर्षाचे समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) | आहे | आहे |
| ४ | संयुक्त भागीदारी (Joint Venture)मान्य नाही. | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती | नाही | आहे |
| ७ | काँक्रीट मिक्सर, वायब्रेटर इत्यादी साहित्य/मशिनरी ची मालकी असल्याचा पुरावा. | नाही | नाही |

वरील तक्त्यातील माहितीनुसार प्राप्त झालेल्या निविदाधारकांच्या कागदपत्रांची निविदा समितीसमोर छाननी केली असता १) **मे.शुभम कंन्स्ट्रक्शन२) मे.व्हि.के.कंन्स्ट्रक्शन**हे निविदाकार वरील सात बाबींची पूर्तता करीत असल्याने पात्र आहेत. त्यामुळे सदर निविदाधारकांच्या निविदेचा आर्थिक देकार भाग (Financial Bid)उघडणेस प्रस्तावित करण्यात आले.

दिनांक १८/०१/२०१८ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांचे अध्यक्षतेखालील निविड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांचे उपस्थितीत उक्त चार निविदाकारांचा आर्थिक देकार भाग (Financial Bid)उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांचीनावे | दिलेलेदर |
|---|---|---|
| १ | मे.शुभम कंन्स्ट्रक्शन | १०.०० टक्के कमी |
| २ | मे.व्हि.के.कंन्स्ट्रक्शन | ९.९९९ टक्के कमी |

उपरोक्त निविदाकारांपैकी मे. शुभम कंन्स्ट्रक्शन यांनी सादर केलेले दर १०.०० टक्के कमी दिले आहेत. सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे मे. शुभम कंन्स्ट्रक्शन यांनीPerformance Security Deposit खालील क्रमांकांच्या धनादेशाद्वारे भरले आहेत.

| अ.क्र. | बँकेचे नाव | धनादेश क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ॲक्सिस बँक | ०१७७४२ | रु. ८४,०००/- |
| | | **एकूण** | **रु.८४,०००/-** |

तरी मे. शुभम कंन्स्ट्रक्शन या निम्न दराचे निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.११०** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री.कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७–१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. १५ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार **मे. शुभम कंन्स्ट्रक्शन** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १९ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. १९ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १६** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १९ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १६** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्र.१६ मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या एकूण ०८ कामाकरीता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६१,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०५ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

दिनांक १८/१२/२०१७ रोजी निविदा समितीसमोर विभागातर्फे प्रभाग क्र. **१६** मध्ये नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या एकूण ८ कामांकरीकरीता प्राप्त झालेल्याएकूण ०३ निविदांचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.१**

| **अ.क्र.** | **निविदाकाराच्या निविदेमधील बाबी** | **मे.एम.इंजिनियर्स** | **मे.ओम एन्टरप्रायजेस** | **मे.यश कंन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी यांनी मागील ३ वर्षाचे समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का (State PWD /MJP) | आहे | आहे | आहे |
| ४ | संयुक्त भागीदारी (Joint Venture)मान्य नाही. | आहे | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे |
| ६ | निविदाकाराकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचा-यांची माहिती | आहे | नाही | आहे |
| ७ | कॉंक्रीट मिक्सर, वायब्रेटर इत्यादी साहित्य/मशिनरी ची | आहे | नाही | आहे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मालकी असल्याचा पुरावा. | | | |

वरील तक्त्यातील माहितीनुसार प्राप्त झालेल्या निविदाधारकांच्या कागदपत्रांची निविदा समितीसमोर छाननी केली असता १) **मे.एम.इंजिनियर्स२) मे.ओम एंटरप्रायजेस ३) मे.यश कंन्स्ट्रक्शन**हे निविदाकार वरील सात बाबींची पूर्तता करीत असल्याने पात्र आहेत. त्यामुळे सदर निविदाधारकांच्या निविदेचा आर्थिक देकार भाग (Financial Bid)उघडणेस प्रस्तावित करण्यात आले.

दिनांक १८/०१/२०१८ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त सो. यांचे अध्यक्षतेखालील निविड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता व कार्यकारी अभियंता यांचे उपस्थितीत उक्त तीन निविदाकारांचा आर्थिक देकार भाग (Financial Bid)उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांचीनावे | दिलेलेदर |
|---|---|---|
| १ | मे.एम.इंजिनियर्स | १५.०० टक्के कमी |
| २ | मे.ओम एंटरप्रायजेस | १४.९९ टक्के कमी |
| ३ | मे.यश कंन्स्ट्रक्शन | १.०० टक्के जास्त |

उपरोक्त निविदाकारांपैकी मे. एम.इंजिनियर्सयांनी सादर केलेले दर १५.०० टक्के कमी दिले आहेत. सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे मे. एम.इंजिनियर्स यांनीPerformance Security Deposit खालील क्रमांकांच्या धनादेशाद्वारे भरले आहेत.

| अ.क्र. | बँकेचे नाव | धनादेश क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पंजाब नॅशनल बँक | ७८६२५५ ते ७८६२६९ (एकूण १५) | रु. ३,७५,०००/-<br>( २५,०००/- X १५ ) |
| २ | पंजाब नॅशनल बँक | ७८६२७१ | रु. १०,०००/- |
| ३ | पंजाब नॅशनल बँक | ७८६२९२ | रु. ५,०००/- |
| ४ | पंजाब नॅशनल बँक | ७८६२९३ | रु. ५,०००/- |
| | | **एकूण** | **रु.३,९५,०००/-** |

तरी मे. एम इंजिनियर्स या निम्न दराचे निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.१११** **दिनांक:— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. १६ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार **मे. एम इंजिनियर्स** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्तकायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. २० वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. २० :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १७** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. २० :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १७** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका **प्रभाग क्र.१७** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत.या कामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यातआल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणेआहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६४,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |

| | | |
|---|---|---|
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०५ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्यलेखा अधिकारी, मुख्यलेखा परिक्षक , शहरअभियंता यांचे उपस्थितीत **प्रभाग क्र.१७** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यातआला त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदे मधील बाबी | **मे.नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** | **मे. सागर कन्स्ट्रक्शन** | **मे. आयुश कन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|
| १. | निविदाप्रपत्रकाच्या खरेदीची रक्क्म भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| २. | इसारा रक्क्म भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| ३. | अद्यावतआयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |
| ४. | कामाचा अनुभव | होय | होय | होय |
| ५. | पॅनकार्डाची प्रत | होय | होय | होय |
| ६. | संस्था / कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादी चे) दस्ताऐवज | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** २) **मे. सागर कन्स्ट्रक्शन** ३) **मे. आयुश कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटीशर्तीनुसार पात्र असल्याने उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यातआले.

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्तआयुक्त सो. यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खलील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचेनाव** | **दिलेलेदर (टक्केप्रमाणे)** |
|---|---|---|
| १. | मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन | दिलेले दर ४.९९ टक्के जास्त |
| २. | मे. सागर कन्स्ट्रक्शन | दिलेले दर १२.०० टक्के जास्त |
| ३. | मे. आयुश कन्स्ट्रक्शन | दिलेले दर १४.९९ टक्के जास्त |

उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** या सर्वात कमी दराच्या (म्हणजे ४.९९% टक्के जास्त) निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी केल्या त्याप्रमाणे **मे. नवनिर्माण**

**कन्स्ट्रक्शन** यांनी वाटाघाटी अंती दिलेले दर At Par प्रमाणे या विभागामार्फत पत्र देण्यात आले होते. त्याप्रमाणे **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम At Par प्रमाणे देणेकरिता त्यांनी दिलेले दिनांक २४/०१/२०१८ रोजीचे दिलेले पत्रान्वये सहमती दर्शवली आहे. सदर काम **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम At Par प्रमाणे देणे करिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** या निम्न दराचे At Par निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.११२** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. १७ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे At Par निविदाकार **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. २१ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २१ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १८** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. २१ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १८** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका **प्रभाग क्र.१८** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत.या कामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक वआर्थिक ) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यातआल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणेआहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६४,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०५ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्यलेखा अधिकारी, मुख्यलेखा परिक्षक , शहर अभियंता यांचे उपस्थितीत प्रभाग क्र.१८ मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यातआला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्यानिविदेमधीलबाबी | **मे.नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** | **मे. सागर कन्स्ट्रक्शन** | **मे. महादेव कन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|
| १. | निविदाप्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| २. | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| ३. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |
| ४. | कामाचा अनुभव | होय | होय | होय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | पॅनकार्डाची प्रत | होय | होय | होय |
| ६. | संस्था / कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्ताऐवज | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** २) **मे. सागर कन्स्ट्रक्शन** ३) **मे. महादेव कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटीशर्तीनुसार पात्र असल्याने उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसराभाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्तआयुक्त सो. यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खलील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचेनाव** | **दिलेलेदर (टक्केप्रमाणे)** |
|---|---|---|
| १. | मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन | दिलेले दर ४.९९ टक्के जास्त |
| २. | मे. सागर कन्स्ट्रक्शन | दिलेले दर ११.०० टक्के जास्त |
| ३. | मे. महादेव कन्स्ट्रक्शन | दिलेले दर ११.५२ टक्के जास्त |

उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** या सर्वात कमी दराच्या (म्हणजे **४.९९%** टक्के जास्त) निविदाकारांशी निविदा समितीने चर्चा करुन दर कमी करण्यास वाटाघाटी केल्या त्याप्रमाणे **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** यांनी वाटाघाटी अंती दिलेले दर At Par प्रमाणे या विभागामार्फत पत्र देण्यातआले होते. त्याप्रमाणे **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम At Par प्रमाणे देणेकरिता त्यांनी दिलेले दिनांक २४/०१/२०१८ रोजीचे दिलेले पत्रान्वये सहमती दर्शवली आहे. सदर काम **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** यांची सदर काम At Par प्रमाणे देणेकरिता शिफारस करण्यात येत आहे.

तरी **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** या निम्न दराचे At Par निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.११३** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सोहता

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. १८ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे At Par निविदाकार **मे. नवनिर्माण कन्स्ट्रक्शन** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. २२ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. २२ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १९** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. २२ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. १९** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका **प्रभाग क्र.१९** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत.या कामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यातआल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६४,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |

| | | |
|---|---|---|
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०३ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्यलेखा अधिकारी, मुख्यलेखा परिक्षक , शहर अभियंता यांचे उपस्थितीत **प्रभाग क्र.१९** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदे मधील बाबी | **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** | **मे. देव'स इंटरप्राईझेस** | **मे. एम. इंजिनिअर्स** |
|---|---|---|---|---|
| १. | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| २. | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| ३. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |
| ४. | कामाचा अनुभव | होय | होय | होय |
| ५. | पॅनकार्डाची प्रत | होय | होय | होय |
| ६. | संस्था / कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्ताऐवज | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** २) **मे. देव'स इंटरप्राईझेस** ३) **मे. एम. इंजिनिअर्स** यांच्या निविदा अटीशर्ती नुसार पात्र असल्याने उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यातआले.

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्तआयुक्त सो. यांचे अध्यक्ष ते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खलील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **दिलेले दर (टक्के प्रमाणे)** |
|---|---|---|
| १. | मे. झा.पी. ॲण्ड कंपनी | दिलेले दर १६.०० टक्के कमी |
| २. | मे. देव'स इंटरप्राईझेस | दिलेले दर १.०० टक्के जास्त |
| ३. | मे. एम. इंजिनिअर्स | दिलेले दर १०.७९ टक्के कमी |

उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** यांनी **१६.००%** टक्के कमी एवढे दर दिले आहेत. सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** त्यांनी Performance Security Deposit,बँक ऑफ बडौदातून डी.डी. चे रक्कम ६४,०००/- रु व चेक नं.६२९३११, ॲक्सिस बँकेतून डी.डी चे रक्कम ६४,०००/- रु व चेक नं.९५१३१३, रक्कम ६४,०००/- रु व चेक नं.९५१३१४, रक्कम ६४,०००/- रु व चेक नं.९५१३१५, रक्कम ६४,०००/- रु व चेक नं.९५१३१०, रक्कम ६४,०००/- रु व चेक नं.९५१३१२, रक्कम ६४,०००/- रु व चेक नं.९५१३११, एकुण रुपये ४,४८,०००/- एवढी रक्कम धनादेशाव्दारे भरली आहेत.

तरी **मे. झा.पी. ॲण्ड कंपनी** या निम्न दराचे (१६.००% टक्के कमी ) निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समिती मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.११४** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. १९ मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे(**१६.००% टक्के कमी**) निविदाकार **मे. झा.पी.ॲण्ड कंपनी** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. २३ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २३ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. २०** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २३ :—** वर्ष २०१७-१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंत करावयाच्या **प्रभाग क्र. २०** मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता

मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका **प्रभाग क्र.२०** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत.या कामांकरिता बी-१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक ) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविण्यातआल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ४८,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०६/११/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०८/११/२०१७ ते २९/११/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/१२/२०१७ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | - |
| क) | तृतीय मुदतवाढ | - |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | ०८/१२/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०८ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०६ |

मा. आतिरिक्त आयुक्त, मुख्यलेखाअधिकारी, मुख्यलेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत **प्रभाग क्र.२०** मधील विविध विकास कामांच्या निविदेची मान्यता मिळणेबाबत या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १) **मे. ऋषी**

| अक्र. | निविदाकाराच्या निविदे मधील बाबी | **मे.ऋषी कंस्ट्रक्शन** | **मे.यश कंस्ट्रक्शन** | **मे.सागर कंस्ट्रक्शन** | **मे.माँ भवानी कंस्ट्रक्शन** | **मे. राजेश भाटिया** | **मे.रचना कंस्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | निविदाप्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का, | होय | होय | होय | होय | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का, | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ५ | पॅनकार्डाची प्रत | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ६ | संस्था,कंपनी नोंदणी ,भागिदारी,मालकी,कंपनी इत्यादीचे, दस्ताऐवज | होय | होय | होय | होय | होय | होय |

**कंस्ट्रक्शन** २) **मे. यश कंस्ट्रक्शन** ३) **मे. सागर कंस्ट्रक्शन** ४) **मे. माँ भवानी कंस्ट्रक्शन** ५) **मे. राजेश भाटिया** ६) **मे. रचना कंस्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार पात्र असल्याने उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्तआयुक्त सो. यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खलील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **दिलेले दर (टक्के प्रमाणे)** |
|---|---|---|
| १. | मे. ऋषी कंस्ट्रक्शन | दिलेले दर २०.१४ टक्के कमी |
| २. | मे. यश कंस्ट्रक्शन | दिलेलेदर १०.००टक्के कमी |
| ३. | मे. सागर कंस्ट्रक्शन | दिलेले दर ७.००टक्के कमी |
| ४. | मे. माँ भवानी कंस्ट्रक्शन | दिलेले दर १०.०० टक्के कमी |
| ५. | मे. राजेश भाटिया | दिलेले दर ५.०७ टक्के कमी |
| ६. | मे. रचना कंस्ट्रक्शन | दिलेले दर ५.०० टक्के कमी |

उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे **मे. ऋषी कंस्ट्रक्शन** यांनी **२०.१४%** टक्के कमी एवढे दर दिले आहेत. सदर दर सर्वात कमी आहेत. त्याप्रमाणे **मे. ऋषी कंस्ट्रक्शन** त्यांनी Performance Security Deposit,ॲक्सिस बँकेतून डी.डी चे रक्कम ४८,०००/- रु व चेक नं.९३१३१६, रक्कम ४८,०००/- रु व चेक नं. ९५१३१७, रक्कम ४८,०००/- रु व चेक नं.९५१३१८, रक्कम ४८,०००/- रु व चेक नं.९५१३१९ रक्कम ४८,०००/- रुव चेक नं.९५१३२०, रक्कम ४८,०००/- रु व चेक नं.९५१३२१, रक्कम ४८,०००/- रु व चेक नं.९५१३२२ रक्कम ४८,०००/- रु व चेक नं.९५१३२३ रक्कम ४८,०००/- रु व चेक नं.९५१३२४ रक्कम ४८,०००/- रु व चेक नं.९५१३२५ बँक ऑफ बडौदा बँकेतून डी.डी. चे रक्कम ४८,०००/- रु व चेक नं.६२९२९३ , फेड्रल बँकचे डी.डी. रक्कम १०,०००/- व चेक नं. ५०६२०४, सारस्वत कोऑपरेटिव बँकचे डी.डी. रक्कम ६०,०००/- व चेक नं. ००६७८६ एकुण रुपये ५,९८,०००/- एवढी रक्कम धनादेशाव्दारे भरली आहेत.

तरी **मे. ऋषी कंस्ट्रक्शन** या निम्न दराचे (२०.१४% टक्के कमी ) निविदाकार यांचेशी नियमानुसार संविदा करण्यास मा.स्थायी समिती मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ११५** **दिनांकः— २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार वर्ष २०१७—१८ करीता नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षातर्गत करावयाच्या प्रभाग क्र. २० मधील विविध विकास कामांकरिता करण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे**(२०.१४% टक्के कमी)** निविदाकार **मे. ऋषी कंस्ट्रक्शन** यांच्याशी नियमानुसार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. रस्त्यावरील खड्डे भरण्याकामी वेळापत्रक बनविण्यात यावे.
२. सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील प्राकलनांची प्रत नावानिशी देण्यात यावी.
३. जेथे हे काम चालु आहे त्याठिकाणी याबाबतचा छोटासा फलक नागरीकांच्या माहितीसाठी लावण्यात यावा.
४. काम सुरु होण्याच्या आधीचे, काम सुरु असतांना तसेच काम संपल्यानंतरचे नगरसेवकांसोबत फोटो काढण्यात यावे व हे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत विभागाने देयक तयार करु नये.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. २४ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. २४ :– उल्हासनगर-३ प्रभाग क्र.४ शांतीनगर येथील साईबाबा मंदीराजवळील छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वाराचे दुरुस्ती व सुशोभिकरण करणेचे काम महाराष्ट्र मनगरपालिका अधिनियम चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत करुन घेणेस मान्यता मिळणे**

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २४ :– उल्हासनगर-३ प्रभाग क्र.४ शांतीनगर येथील साईबाबा मंदीराजवळील छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वाराचे दुरुस्ती व सुशोभिकरण करणेचे काम महाराष्ट्र मनगरपालिका अधिनियम चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत करुन घेणेस मान्यता मिळणे**

**प्रस्तावना**

दिनांक १९ फेब्रुवारी,२०१८ रोजी येणाऱ्या शिवजयंती निमित्त उल्हासनगर-३ प्रभाग क्र.४ शांतीनगर येथील साईबाबा मंदीराजवळील छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वाराची दुरुस्ती व सुशोभिकरण करणेबाबत सौ.अंजना अंकुश म्हस्के, नगरसेविका यांनी विनंती केली आहे.

सदर प्रवेशद्वाराची दुरावस्था झाली असून प्रवेशद्वारास रंगरंगोटी करणे व दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सध्या शिवजयंती जवळ असल्याने सदर प्रवेशद्वाराची रंगरंगोटी व दुरुस्तीचे कामाचे रु.४,००,०००/- एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर खर्च महापालिका अर्थसंकल्पातील प्रवेशद्वार दुरुस्ती व निगा या लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीतून करण्यात येणार आहे. सदर काम शिवजयंतीपूर्वी म्हणजेचे तात्काळ करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत मे.जकनुश कंन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ११६** **दिनांक:– २८/२/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–३ प्रभाग क्र. ४ शांतीनगर येथिल साईबाबा मंदिराजवळील छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वाराचे दुरुस्ती व सुशोभिकरण करणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत मे. जकनुश कंन्स्ट्रक्शन करुन घेणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी :–**आईत बाउन ठेवा, तीन महिन्याच्याआत काम पूर्ण नाही केले बिल दाखविले नाही तर त्याच्यावरती कारवाई झाली पाहिजे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी**:– टेंडर मध्ये अहम प्रेड असेल ना किती आहे?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी**:– साहेब तीन महिने.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी**:– वर्क ऑर्डर नंतर कमीत कमी ४ महिने.काम नाही झाले तर रद्द केले पाहिजे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–**साहेब, मार्च, ऐप्रील, मे आणि जून, जून ला पाऊस सुरू होतो. साडे तीन महिनेच आहेत. थेडसे तुम्ही...

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–** मला ना कोणी बोलू देत नाही मी बोलायला लागलो म्हणजे तिथे मिटींग आपण नियोजनबध्द चालवत नाही. मला काही दोन मिनीटे काही बोलायचे आहे. हे जे दोन महत्वपूर्ण विषय आहेत, आमच्या शहराच्या प्रत्येक पॅनलमध्ये काम केले जात आहे, पाटोल्सचे वाचलेले असेल किंवा नगरसेवक निधी चे असेल यामध्ये एक लोकांमध्ये एक ट्रान्सफरन्सी आणि प्रॉपरली काम होत आहे किंवा नाही याचे काही उपाय शोधले पाहिजेत आणि सांगितले पाहिजेत. माझी त्याना अशी सुचना आहे की जसे पाटोल्स चे आहे त्याचे पण दुस–या भागामध्ये टाईम टेबल बनवा,जे नगरनिधी चे आहे त्याचेही वेळापत्रक बनवा. कॉन्ट्रक्टरला सांगून करून माझ्या बरोबर चर्चा करून निश्चित वेळापत्रक बनवा. यामध्ये जास्त वेळ घालवू नका. पाटोल्स चे पहिले चालू करा. नंतर वेळापत्रक बनवा,हे आज पास झाले आहेत्याला दोन दिवस लागले तरी चालेल. प्रथमत: वेळापत्रक पहिजे बनवा. आणि सर्व नगरसेवकांना त्यांच्या पॅनल ची एस्टीमेटची कॉपी हार्ड कॉपी पाठवून दयावी, नावानिशी त्यामुळे आपल्याला माहीती पडेल की कोणते काम करत आहोत. तिसरी माझी ही सुचना आहे महत्वपूर्ण जिथे हे काम होत असेल त्या ठिकाणी छोटेसे का होईना फलक स्वरूपात तरी लावले पाहिजे जेणेकरून कोणते काम आम्ही करत आहेत` नागरीकांच्या माहितीसाठी लावले पाहिजे, हे वर्क ऑर्डर मध्ये कम्पलसरी करणे. ४. काम काम सुरू होणे पूर्वीचे फाटो, काम सुरू झाल्याचे मधील फोटो आणि काम पूर्ण झाल्याचे सदर ठिकाणी उभे असल्याचे नगरसेवकांबरोबरचे फोटो,हे जो पर्यंत येत नाही तो पर्यंत बिल मिळणार नाही ही अट वर्क ऑर्डर मध्ये टाकावी.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** रविवारी साहेब माझ्या वार्ड मध्ये आले होते, तेव्हा तेथील नागरीकांनी कोणती तक्रार केली, जवळच झुलेलाल शाळा आहे, १५०० विद्यार्थी शाळेत आहेत, दिवसभर त्यांना खुप त्रास होत असतो. साहेब, कधी पण रिक्षा पलटी होऊन नाली मध्ये पडू शकते. त्या ठिकाणी साहेबांनी तेथील नागरीकांना आश्वासन दिले की दोन दिवसात हे काम चालू करण्यात येईल. तरी अजून आश्वासनाची पूर्ती झाली नाही.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी**:– आता केले जाईल.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:–**आता जर वर्क आर्डर ४ ते ५ दिवस लेट होत आहे तर आपण कॉन्ट्रक्टरांना सांगावे की कामे चालू करावीत. आणि दुसरी गोष्ट एक आपल्याला सुचना देत आहे, गंभीर सुचना आहे, फर्निचर बाजार मध्ये जो लिंक रोड आहे म्हणले तिथून जे येतात नेहरू चौक पासून फारवर लाईन ते लिंक रोड जे येतात त्या ठिकाणी एक कलवट आहे, त्याचा कमीत कमी ५ फुटांचा साईडचा पटटा तुटलेला आहे, जर रात्रीच्या वेळेस कोणची नजर चूकली तर वाहन नाल्या मध्ये पडू शकते. आपल्या जर लक्षात आले असेल तर. आता आपण

ट्राफीक मध्ये गेले तर समजणार नाही. परंतु रात्रीच्या वेळी मी त्या ठिकाणहून निघालो तेव्हा कार किंवा कोणतेही वाहन ५ फुट पूर्ण रोड पर्यंत तुटलेले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**हुकुमतराय अपार्टमेंट वाला जो रस्ता आहे तो.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी**:— नाला, हा नाला बाहेर पर्यंत तुटलेला आहे. रोडही फक्त २० फुट आहे. २० फुटातून ५ फुट नाला बाहेर पर्यंत आला आहे तिथ पर्यत तुटलेला आहे म्हणजे गाडी सरळ नाल्यातच पडू शकते. त्यामुळे या ठिकाणी ४ते ५ फुटाचे काम करून जागा कव्हर करावी. हे काम करणे अत्यावश्यक असून अर्जंट करावे.

**महापालिकरा सचिव:—** नियमा नुसार संविदा करण्यास मान्य आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**इतिवृत्ताची वाट न पाहता पास. आणि ताबोडतोब काम चालू करायचे आहे. आपल्याला यावेळेस रिझॉल्युशन मिळेल. आणि त्वरीत प्रक्रीया चालू करून वर्क ऑर्डर दयावयाची आहे. वर्क ऑर्डर र्प्यंत प्रक्रीया लवकरात लवकर करावयाची आहे. सात दिवसाच्या आत करार करायचे आहे. सात दिवसाच्या आत काम सुध्दा चालू करायचे आहे. १४ दिवसांची आपल्याला वेळ देण्यात आलेली आहे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी**:— ५ (२) (२) मध्ये ऑर्डर दयावयाची आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** हे.... पास करण्यासाठी मी पाठविलेले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**ठिक आहे माहिती घेतली.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** मान्यता आहे ५ (२) (२) चे अधिकार स्थायी समितीचे आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** साहेब, धन्यवाद असे काम महत्वाचे केले म्हणून, आम्ही तुम्हाला तेच सांगतो की जे अत्यंत आवश्यक आहे ते काम करा आमची वाट बघू नका, आम्ही कोणी रोखणारे नाहीत.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी**:— पूर्ण स्थायी समिती चे सदस्य आपल्या बरोबर आहेत.

**आयुक्त,श्री. राजेंद्र निंबाळकर:—**तो पून्हा डिटोरेट होत चाललेला आहे. त्याच्यामध्ये ते आपण देखील कुणी आंणले काय? हया खोलात न जाता २ ते ३ लाख खर्च करायला मी काल त्वरीत मान्यता दिलेली आहे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी**:—पूर्ण स्थायी समिती चे सदस्य आपल्या बरोबर आहेत. असे दोन, चार लाख, पाच लाख, दहा लाखाचे काम इमरजन्सी मध्ये केले तर काही अडचण नाही.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश शितलानी**:—श्री. खिलनमल बनसंदानी माजी नगरसेवक होते, ते बघत(मेनटेन) होते. प्रायव्हेट स्टॅचू होता. त्यांचा मृत्यु झाला.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी**:— सिंधचे शेवटचे हिंदू राजा होते , महाराजा डायरसिंग , त्यांचा तो पुतळा आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—**माझी एक विनंती आहे,जमनुजी हे सांगत आहेत, पीडब्ल्युडी च्या सर्व अधिका—यांना विनंती आहे. जमनुजी जे सांगत आहेत ते तिथे लिहिले जावे, नाव लिहिले तर चांगले होईल. काय होत की जाणीवपूर्वक उल्हासनगर महानगरपालिका तिकडे लक्ष देत नाही असे होते, त्यामुळे...

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** दुसरे साहेब असे आहे की, जमनुजी एक मिनीट ,दुसरा स्मशान भूमी कुर्ला कॅम्प मध्ये आमचे महान संत आहेत कवंरामजी, त्याचे देशभरात दरबार आहेत, त्यांचा सुध्दा एप्रील मध्ये जन्मदिवस आहे. त्याचे सुशोभीकरण करण्यासाठी दिलेले होते.

**आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:—** एवढे महत्वाचे होते तर नगरसेवक निधी मध्ये टाकायचे होते.

**सदस्य, श्री. भारत राजवानी**:— साहेंब हे प्रपोजल नंतर आले माझ्याकडे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>**साहेब याच्यात एक सुचना अशी आहे, ज्या पॅनल मध्ये जो पुतळा असेल ना तिथले चारही नगरसेवक किंवा तीन नगरसेवक असतील त्या सगळयांचे निधी मधला एकूण निधी त्याला जर लागत असेल, तर घ्या हयावेळेस, आणि सगळे पुतळे शहरातले चांगले करा.किंवा त्याचे सुशोभीकरण काय असेल ते करा. सर्व प्रकारचे पुतळे आहेत त्याचा एक जनरल मुददा बनवून नगरसेवकाच्या निधीतून घेणे, किंवा एखादा जनरल निधी त्याच्याकरता ठेवा.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u>**:—सुर्वेजी यांचे असे म्हणणे आहे की, ज्या पुतळयाचे आपण नुतनीकरण करत आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>**आता आपण बजेट बनवत आहेत एक हेड बनवला पाहिजे त्यामध्ये पुतळयाचे सुशोभीकरण आणि देखभाल दुरूस्ती.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>**यामध्ये काय होत की ऐका ना साहेब, यामध्ये असे होते की काही पुतळयांची सुशोभीकरण किंवा दुरूस्ती होते आणि काही यांची होत नाही.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>**दुसरे,आता आम्हाला विशेष निधी मिळाला आहे, रू.२५, रू.२५ लाख यांचे पण प्रपोझाल लवकर आले तर चांगले हाईल.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**टॅक्सचा विषयाबाबत आमची काल सर्व पार्टीचे प्रमुखां सोबत चर्चा झाली. तुम्ही आले आणि कोणी नाही म्हणून लगेच निघून गेले. काल सगळया सोबत चर्चा केली, जनरल बॉडी मध्ये पण चर्चा होईल त्यावेळला मी बोलेल. आम्ही सगळयानी ठरवले की जे पण टॅक्स चे यावेळेला वाढ करण्यात नाही आली. परंतु आम्हाला कोणत्याही माध्यमातून जो आपला स्त्रोत आहे टॅक्स चा ते वाढविण्याची आवश्यकता आहे. जसे मी मॅसेज मध्ये लिहिले होते, आमचा रू.६०० करोड मधून मी तर रू. २५० करोड लिहिलेले आहेत. परंतु सरकारकडून फक्त रू.२३२ करोड अनुदानाच्या स्वरूपात येत आहेत. बाकी आपल्याला रू.३६८ करोड हे आपले स्वत:चे स्त्रोत असले पाहिजे. आजच्या घडीला आपले स्त्रोत ॲक्चुअल वसुली आणि मागणी बघितले तर रू.१५० करोडच्या वरती नाही आहे. जो हे वाढवायला सध्या आम्ही स्वच्छ भारत अभियान अंतर्गत आपली जी घनकचरा व्यावस्थापनाची फी आहे,ती आम्ही मागितली होती, १७५, २७५ आणि ३७५ कोणत्या प्रकारचे घर आहे यांच्यावर अवलंबून असेल. तर त्याची उदया चर्चा होवून जो विरोध होता, त्यांनंतर सांमजस्यपणे आम्ही कॉन्ससरला आलो आहेत तर कमीत कमी ५० टक्के तरी लागू केले जाईल. ते कशा प्रकारे करता येईल, जो रेट आहे,, १७५, २७५ आणि ३७५ यांचे ५०टक्के करावे किंवा ६५ करोड चे ३२.५० करोड ला अजून गरीबांना सवलत देवून पहिले जे इनीसिअल प्रपोज केलेले आहे त्यात मोठयांना थेडी कमी सवलत देवून ५०टक्के पेक्ष कमी या प्रकारे मॅच करून ३२.५० करोड पर्यत जर आपण पोहचू शकलो तर एक फार मोठी सफलता आपण आपल्या महानगरपालिकेला बजेट ला सक्षम करण्यासाठी विषयामध्ये असेल, आणि मी सर्वाना अनुरोध आहे की या विषयाला जनरल बॉडी मध्ये आपण आपल्या पार्टीच्या सहयोगी कडून चर्चा करून सकारात्मक दृष्टीने मान्यता देण्यास सहकार्य करावे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>**साहेब हे तर झाले येणारे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**आणि हे झाल्यावर मी अजून एक कमीटमेंट दिली आहे. जर हा विषय मान्य होत असेल ते ३२.५० करोड आणि जे आम्ही अपेक्षीत ठेवून नगरोवक निधी आणि प्रभाग समिती निधी आणि पदाधिकस—यांचे निधी कुठेही मिळती जुळती नाही आहे. जर हया प्रपोझल ला मान्यता दिली तर जो पण शिल्लक नगरसेवक निधी ची कामे आहेत, त्यांना लवकरच प्रीन्सीपल एप्रुवल देऊन ते ही कामे सुरू होतील. परंतु याला मान्यता मिळाली नाही तर फक्त आम्ही खर्चा कडे जास्त लक्ष देत आहे असे होईल.बजेटच्या उत्पन्नावर आपले लक्ष नाही असे समजून बाकीची सर्व कामे बंद करावी लागतील किंवा काही कामे रद्द करावी लागतील. अशी परिस्थिती आपल्यावर येता कामा नये, ही एक आमची अपेक्षा आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>**साहेब, उत्पन्नाचा छोटा मार्ग आहे आपल्याकडे एल.बी.टी. ची वसुली आहे तिकडे कोणाचे लक्षच नाही.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>**एल.बी.टी. चे मी घेतलेले आहे, एल.बी.टी.ची यंत्रणा सक्षम नियमांमध्ये नाही. आपण जे काही मालमत्ता करामध्ये जप्तीची वैगेरे प्रक्रीया असते तशी एल.बी.टी. मध्ये सरकारने पहिल्यापासूनच

त्याला सौम्य पॉलीसी टेवलेली आहे. नाही तर मी स्वत: बघितले पनवेलला असताना खूप अभ्यास केला कारण तिथे १००० कोटीच्या वर पोटेंशिअल आहे. परंतु सर्वसाधारण पणे त्याच्या ज्या तरतूदी  बघितल्या त्या सगळया खेकल्या आहेत किंवा कमजोर आहेत किंवा कंपनी ला प्रमोट करण्यासाठी त्यांना जास्त प्रेशराईज न करण्यासाठी बनविलेल्या आहेत. त्यामुळे आपण एल.बी.टी. मध्ये किती जरी लक्ष दिले तरी ....त्यांनी करायला पाहिजे. त्यांचे बॅक अकाउंट सिल करणे आणि बाकीच्या सर्व गोष्टी आहेत.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी**:— एल.बी.टी. बंद झालेले आहे. जी बाकी आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— ही जी बाकी आहे त्याच्या मध्ये आपल्याला एक काम करायचे आहे जुने रेकॉर्ड आहेत आता तीन वर्षपूर्वी एल.बी.टी. लागू झाली आहे. त्याचे आपण कधी हिशोब करणार, खाते कधी बघणार इ. त्यामुळे त्याचा आढावा घेणार आहे आणि सगळे बंद करणार.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—**साहेब, ती टीम आहे दुसरी ती रेग्युलायझेशन ची टीम आहे. आधीच ठेवलेली आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— त्यामुळे माझे थोडक्यात असे म्हणणे आहे की, एल.बी.टी. इज नॉट सो पोटेंन्शीयल सोर्स.

दुपारी १.२५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—६/३/२०१८

**दि. ६/३/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**२३**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक ६/३/२०१८ रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ६ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ७ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ८ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ९ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| १० | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ११ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| १२ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| १३ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थित होते.

१. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, २. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त

२. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
५. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. विनायक फासे, सहा. लेखा परीक्षक
७. श्री. संतोष जाधव, सहा. लेखा अधिकारी
८. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
१०. श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
११. श्री. बालाजी लोंढे, प्र. सहा. आयुक्त
१२. श्री. प्रबोधन मवाळे, प्र. सहा. आयुक्त
१३. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
१४. श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१५. श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त, विधी
१६. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१७. श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी
१८. श्री. वानखेडे, लेखा अधिकारी
१९. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
२०. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
२१. श्री. बाळु नेटके, प्र.मुख्य सुरक्षा रक्षक
२२. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२३. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२४. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२५. श्रीमती निलीमा कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ
२६. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्री. संतोष कोठरे

सायंकाळी ४.५२ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**<u>महापालिका सचिव :–</u>** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्र. १ :–** स्थायी समितीच्या १६ सदस्यां पैकी कोणते ८ सदस्य निवृत्त होतील ते चिठ्ठया टाकुन ठरविणे.

---

**<u>महापालिका सचिव:–</u>** दि. ५.४.२०१७ रोजीच्या सभेत पालिका सदस्यांपैकी १६ सदस्यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणुन नेमणुक केली होती. या १६ सदस्यांच्या नावांची यादी आपणा सर्वांस प्रस्तृत करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० प्रमाणे सदर स्थायी समिती सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील. म्हणजेच महापालिकेच्या २०१७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडुन आल्यानंतर एका वर्षाने कोणते सदस्य निवृत्त होतील ते कलम २० पोटकलम ३ मध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे त्यांचे निवृत्तीचे तारखेपुर्वी मा. स्थायी समिती सभापती ठरवील त्या सभेत अशा रितीने चिठ्ठया टाकुन निर्णय करण्यात येईल.

या १६ चिठ्ठया माझ्या हातात असुन यांवर १६ सदस्यांची नावे लिहिलेली आहेत. त्यातील एकेका चिठ्ठीवरील नाव मी वाचुन दाखविते.

यावेळी महापालिका सचिवांनी १६ सदस्यांची नावे वाचुन दाखविली.

त्यानंतर या सर्व चिठ्ठया प्लास्टीकच्या पारदर्शक काचेच्या रोलरमध्ये टाकण्यात येतील. रोलर गोल फिरवुन त्यातील एक–एक चिठ्ठी याप्रमाणे आठ चिठ्ठया काढल्या जातील. काढण्यांत आलेल्या चिठ्ठीवर ज्या सदस्याचे नाव लिहिलेले असेल तो सदस्य दिनांक १.४.२०१८ पासुन स्थायी समिती सदस्य पदावरुन निवृत्त होईल.

| **चिठ्ठी काढणा–यांची नावे** | **निवृत्त होणा–या सदस्यांची नावे** |
|---|---|
| मा. आयुक्त– श्री. राजेंद्र निंबाळकर | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग |
| सदस्या – श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| अतिरिक्त आयुक्त –डॉ. विजया कंठे | श्रीमती कांचन अमर लुंड |
| मा. सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| उप–आयुक्त, मुख्यालय–श्री. संतोष देहेरकर | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर |
| सदस्या श्रीमती डिंम्पल नरेंद्र ठाकुर | श्री. राजेश वदारिया |
| सदस्य श्री. राजेश वदारिया | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| मुख्य लेखा अधिकारी– श्री. दादा पाटील | श्री. कलवंतसिंह सोहता |

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–** वर उल्लेख केलेल्या आठ सदस्यांना आपले पद सोडावे लागेल. व खाली नमुद केलेले सदस्य पुढील एक वर्षासाठी स्थायी समितीवर सलगपणे कार्यरत राहतील.

| **अ.क्र.** | **सदस्यांची नावे** |
|---|---|
| १ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा |
| ३ | श्रीमती पंचम उमेश कालानी |
| ४ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग |
| ५ | श्रीमती पुष्पा नाना बागुल |
| ६ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी |
| ७ | श्री. धनंजय बोडारे |
| ८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी |

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. १ :—**स्थायी समितीच्या १६ सदस्यां पैकी कोणते ८ सदस्य निवृत्त होतील ते चिठ्ठया टाकुन ठरविणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका २०१७ नंतर महापालिकेच्या दि. ५.४.२०१७ रोजीच्या पहिल्या सभेत आपल्या पालिका सदस्यांपैकी १६ व्यक्तीची स्थायी समितीचे १६ सदस्य म्हणुन नेमणुक केली होती. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० अन्वये स्थायी समितीमध्ये निवडून आल्यानंतर एका वर्षाने पोट कलम ३ अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील. त्यांच्या नियुक्तीच्या तारखे पुर्वी स्थायी समितीचे सभापती ठरवतील अशा वेळी व रितीने चिठ्ठया टाकुन ठरविण्यांत येते. त्याअर्थी चिठ्ठया काढण्यासाठी दि. ६.३.२०१८ रोजी ही सभा बोलविण्यांत आली आहे आणि कोणते ८ (आठ) सदस्य निवृत्त होतील त्यासाठी चिठ्ठया काढण्यास प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ११७** **दिनांकः— ६.३.२०१८**

ही स्थायी समिती चिठ्ठया काढल्या नंतर पुढील ८ स्थायी समिती सदस्य दि. १.४.२०१८ पासून निवृत होतील असे ठरवित आहे.

१ श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग
२ श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी
३ श्रीमती कांचन अमर लुंड
४ श्री. सुनिल मुकुंद सुर्वे
५ श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर
६ श्री. राजेश नानिकराम वदारिया
७ श्रीमती कविता लाल पंजाबी
८ श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता

**चिठ्ठयाव्दारे मंजुर**

सभापती/पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ५.१० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१५/३/२०१८

**दि. १५/३/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

२५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक १५/३/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ४ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ५ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| ६ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ७ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| ८ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| ९ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजेश नानिकराम वदारिया, २. श्रीमती जया प्रकाश माखिजा, ३. श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर, ४. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ५. श्री. राजेंद्र शांतराम चौधरी, ६. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, ७. श्री. धनंजय बोडारे

खालील अधिकारी सभेस हजर होते.

११०. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
१११. श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय
११२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
११३. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
११४. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता, साबांवि
११५. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
११६. श्री. विनायक फासे, सहा. लेखा परिक्षक
११७. श्री. जितु चोईथानी, उप अभियंता,साबांवि
११८. श्री. अश्विनी अहुजा, उप अभियंता, साबांवि

११९. श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि
१२०. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
१२१. डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१२२. श्री. प्रबोधन मेवाडे, प्र. सहा. आयुक्त
१२३. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
१२४. श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१२५. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१२६. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१२७. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१२८. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१२९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१३०. श्री. दत्तात्रय जाधव, प्र.भांडार विभाग प्रमुख
१३१. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती नर्गिस खान

२. श्री. अशोक रामरख्यानी

३. श्री. संतोष कोठरे

सायंकाळी ४.३० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

यावेळी श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती क्र. १,२ आणि ३ येथे वाहतुकीचे दिशा दर्शक फलक व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट लावणे या निविदेतील कामांच्या निम्न दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा. एवढया दिवसांपासुन घेवुन येत नाहीत.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :—** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती क्र. १,२ आणि ३ येथे वाहतुकीचे दिशा दर्शक फलक व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट लावणे या निविदेतील कामांच्या निम्न दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका येथे प्रभाग समिती क्र.१,२ आणि ३ येथे वाहतुकीचे दिशा दर्शक फलक व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट लावणे या कामांकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून दिनांक ०३/०८/२०१७ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु.३४७४३२५/– |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०३/०८/२०१७ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०४/०८/२०१७ ते ०७/०८/२०१७ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०९/०८/२०१७ |
| (अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | |
| क) | तृतीय मुदतवाढ | |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ११/०८/२०१७ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक ११/०८/२०१६ |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ६ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ६ |

दिनांक ११/०८/२०१७ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता यांचे उपस्थितीत प्रभाग समिती क्र. १,२ आणि ३ येथे वाहतुकीचे दिशा दर्शक फलक व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट लावणे या कामाच्या निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे**.**

| **अ.क्र.** | **निविदाकाराच्या निविदेमधील बाबी** | **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** | **मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** | **मे. सुभाष एंटरप्रायजेस** | **मे.झा.पी. ॲण्ड कंपनी** | **मे.ए.एम. रामचंदानी** | **मे. मॉ भवानी कन्स्ट्रक्शन** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय | होय | होय | होय |
| २ | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ३ | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ४ | कामाचा अनुभव | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ५ | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय | होय | होय | होय |
| ६ | संस्था/कंपनी नोंदणी (भागिदारी, मालकी, कंपनी इत्यादीचे) दस्तऐवज | होय | होय | होय | होय | होय | होय |

सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी समिती मार्फत छाननी केली असता १**) मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स २) मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन ३) मे. सुभाष एंटरप्रायजेस ४) मे. झा.पी.ॲण्ड कंपनी ५) मे. ए.एम.रामचंदानी ६) मे. मॉ. भवानी कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदा अटी शर्तीनुसार असल्याने पात्र आहेत. तरी उपरोक्त निविदाकारांच्या निविदांचा दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावित करण्यात आले.

मा. महापौर यांचे दालनामध्ये दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी ई–निविदेची आढावा बैठक घेण्यात आली होती. त्याअनुषंगाने ई–निविदेचा लिफाफा क्र.१ व २ वर एकाच वेळी उघडण्यात यावे. असे निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे सदर निविदेचे आर्थिक व तांत्रिक भाग उघडण्यात आला आहे.

दिनांक **११/०८/२०१७** रोजी उपरोक्त निविदाकारांचा आर्थिक बाबींचा दुसरा भाग (आर्थिक दर) मा. अतिरिक्त आयुक्त सो., यांचे अध्यक्षते खालील निवड समिती सदस्य मुख्य लेखाअधिकारी, मुख्य लेखापरिक्षक, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे उपस्थितीत उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकांरानी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत**.**

| निविदाकाराचे नांव | | दिलेले दर | **Performance Security** |
|---|---|---|---|
| **१) मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** | % | दिलेले दर १८.१० टक्के कमी | भरलेली आहे. |
| **२) मे. साई सिध्दनाथ कन्स्ट्रक्शन** | % | दिलेले दर ९.९९ टक्के कमी | भरलेली आहे. |
| **३) मे. सुभाष एंटरप्रायजेस** | % | दिलेले दर २२.३४ टक्के कमी | भरलेली नाही |
| **४) मे. झा.पी.ॲण्ड कंपनी** | % | दिलेले दर १५.०४२ टक्के कमी | भरलेली आहे. |
| **५) मे. ए.एम.रामचंदानी** | % | दिलेले दर १३.०० टक्के कमी | भरलेली आहे. |
| **६) मे. मॉ. भवानी कन्स्ट्रक्शन** | % | दिलेले दर १३.०५ टक्के कमी | भरलेली आहे. |

उपरोक्त **प्रभाग समिती क्र. १,२ आणि ३ येथे वाहतुकीचे दिशा दर्शक फलक व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट लावणे** या कामाचे उक्त निविदाकारांपैकी **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांनी दरसूची वर १८.१० टक्के कमी (***७८ण१०: इमसवू***) प्रमाणे दर दिले आहे. सर्वात कमी दर भरलेले निविदाधारक म्हणजे **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांनी *चमतवितउंदबम "मबनतपजल क्मचवेपजम* कोटक महिंद्रा बॅक, उल्हासनगर या बॅकेमार्फत दिनांक ०७/०८/२०१७ रोजी भरलेले असून त्याचा चेक क्रमांक १२४३४१ त्याची रक्कम रुपये ३,२०,०००/— इतकी आहे. तसेच **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांना दिनांक ०८/०९/२०१७ रोजी पत्र देवून त्यांना २२.३४ टक्के कमी दरावर काम करणेस सूचित करण्यात आले होते. त्यानुसार **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स यांचे प्रतिनिधी यांनी मा. आयुक्त या**चे दालनात शहर अभियंता व उप अभियंता यांचे समोर दर कमी करणेबाबत सुचविले होते. त्याप्रमाणे **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांचे प्रतिनिधी यांनी १९.०० टक्के कमी दरावर काम करणेबाबत सहमती दर्शविली आहे.

तरी सदर दरावरील **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांची निविदा मान्य करण्यास व त्यांचेशी संविदा करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ७३(ड) अंतर्गत मा.आयुक्त व निविदा समिती यांचे स्तरावर संविदेस मान्यतेसाठी मा. स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** १२३ **दिनांकः— १५/३/२०१८**

सुचकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीया केलेल्या प्रभाग समिती क्र. १,२ आणि ३ येथे वाहतुकीचे दिशा दर्शक फलक व रस्त्यावर थर्मोप्लास्टीक पेंट लावणे या निविदेतील कामांच्या निम्न दराचे निविदाकार **मे. बुबेरे ॲण्ड असोसिएट्स** यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

## ➡ विषय क्र. २ :— उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र.१९ मध्ये बॅरेक नं.२०७१ ते २०४६ मार्गे बँक ऑफ इंडिया पर्यंतचा रस्ता सि.सि.कॉंक्रीट करणे व नाली बनविणेच्या कामाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणे

---

यावेळी मा. आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर यांनी सभागृहात प्रवेश केला व आपल्या स्थानी आसनस्थ झाले.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हे काम अतिआवश्यक आहे. तेथे मोठा दरबार आहे, तेथे वर्षामध्ये बरेचसे कार्यक्रम होत राहतात. तो रस्ता स्वामी शांतीप्रकाश आश्रम येथे जातो व हा जो रस्ता आहे तो डंम्पीग ग्रांउड येथे जातो. मा. आयुक्तांनी हा विषय ठेवला त्यामुळे आम्ही मा. आयुक्तांना धन्यवाद देतो. हे काम पडुन होते, येथे आधी पेव्हर ब्लॉक व चेकर टाईल्ससाठी निविदा मागविली होती. वर्कऑर्डर देवु शकलो नाही हे काम ब—याच दिवसांपासुन प्रलंबित आहे. मी सर्व सन्माननिय सदस्य व आयुक्त महोदयांना विनंती करतो की, २ जुनला दरबारला फार मोठा कार्यक्रम आहे व तेथे बाहेरुन मोठ मोठी लोक येतात, तसेच स्वामी शांतीप्रकार आश्रम येथे सुध्दा कार्यक्रम आहे, आता पावसाळा सुरु होणार आहे तसेच तेथे डंम्पींग ग्राउंड सुध्दा आहे संपुर्ण गाडी व ट्रक तेथुन जातात, तर हा छोटासा रस्ता आहे ५ (२)(२) लवकरात लवकर हे काम पुर्ण करावे. लवकरात लवकर त्यास वर्क ऑर्डर देवुन जुनपर्यंत काम करण्यास ठेकेरास सांगावे. तसेच मे. परेश कंन्स्ट्रक्शन कंपनी यांना हे काम दयावे. त्यांनी मोठ मोठे रस्त्याचे काम केले आहेत व त्याचा परिणाम सुध्दा चांगला आला आहे. तर हे काम ५(२) (२) मध्ये देवु ते लवकरात लवकर करण्याची विनंती आहे.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी :—**सॉरी, हा विषय आपण डिफर करु या. त्याचे कारण असे आहे की, सर्व पक्षांचे एक एक रस्ता घेण्यात यावा. खेमानी डंम्पींग ग्रांउड आम्ही सुध्दा रस्ता दिला होता व आपण तेथे व्हीजीट सुध्दा केली आहे. तेथे तर रस्ताच नाही, तेथे हजारो गरीब लोक राहतात तेथे कोणाचे लक्षच नाही. रस्त्याची स्थिती खुप खराब आहे. तेथे आपण जावुन पहा आपण तर व्हिजीट केलीच आहे. हा रस्ता डिफर नाही करणार पण हा रस्ता सुध्दा घ्या.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**गायकवाड पाडा येथे आहे का.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी :—**साहेब, आपणांस विनंती आहे की आपण या रस्त्याचे काम लवकरात लवकर करावे. हा रस्ता फार आवश्यक आहे. हा एक नविन रस्ता आम्ही कधीपासुन टाकला आहे. तेथे तर रस्ताच नाही. आपण सर्वांचे आणा व एकत्र घेवुन या.

**सदस्या श्रीमती डिंम्पल ठाकुर:—**साहेब हा रस्ता घेणे खुपच आवश्यक आहे तो खुपच खराब आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**जर कोणाचाही रस्ता आला असेल तर आम्ही नाही म्हणत नाही. तो आता आलाच नाही तर आम्ही कसे पास करणार.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी:—**पुढील सभेत दोन्ही घेवुन दोन्ही पास करण्यात यावे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**पुढच्या सभेत आपले घेवुन येवु. परंतु हे अतिआवश्यक काम आहे ५(२)(२) मध्ये करायचे आहे. वसनशाह दरबार येथिल रस्ता आहे व डंम्पीं ग्राउंड येथे तो रस्ता जातो. गायकवाड पाडा येथे.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी :—**साहेब, हा सुध्दा डंम्पींग ग्रांउड येथेच रस्ता जातो.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**यांच्या रस्त्याविषयी सांगा ना की त्याचे प्राकलन बनविले आहे नाही, बनविले आहे.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी :—**आधीच एक कोटीचे प्राकलन बनविले आहे.

**श्री. महेश शितलानी, उप अभियंता:–**तेथे काय झाले की लोकांनी कचरा वगैरे टाकला होता गाडीवर, त्यावेळी साहेबांनी व्हिजीट केली आहे व त्याठिकाणी साहेबांनी तेथिल लोकांशी बोलणे वगैरे केले होते. तो रस्ता आम्ही ड्राप केला. त्यासाठी तो रस्ता राहिला होता.

**सदस्य श्रीमती पंचम कालानी :–**तेथे तर डंम्पींग ग्राउंड आहेच ना.

**श्री. महेश शितलानी, उप अभियंता:–**होय डंम्पींग ग्राउंड आहे.

**सदस्या श्रीमत पंचम कालानी :–**तेथे गाडया ये–जा करत असतात, आम्ही सुध्दा व्हिजीट केले आहे व तेथे जायला रस्ताच नाही. तेथे कच्चा रस्ता आहे, तेथे गरीब लोक राहतात तेथे लहान लहान मुले आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**आपण तेथिल डंम्पींग ग्रांउडचा वापर करत नाहीत, त्यामुळे तेथे डंम्पर वगैरे तर जातच नाही.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी :–**साहेब, परंतु लोक तर ये–जा करतात ना.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**नार्मल थ्रु फेअर आहे तेथे. तसे पाहिले तर शहरात बरेचसे रस्ते आहेत ते अदयापपर्यंत झाले नाह.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी :–**साहेब, तेथे कच्चा रस्ता आहे. दोन्ही रस्ते सोबत घ्या.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**पहिली गोष्ट तर आपण पैसे कोठुन आणणार हे तर कोणी पाहतच नाही.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी :–**साहेब, एवढे रस्त्यांवर रस्ते बनविले जात आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**हा रस्ता का घेतला तर आमचा डंम्पींग ग्राउंड येथे जाण्याचा रोजचा रहदारीचा रस्ता आहे. येथे जर काही दुर्घटना वगैरे झाली तर जबाबदारी बनते. तेथे हॅवी ट्राफिक आहे. ते तर आपले बेसिक नेसीसीटी आम्हांस त्यास प्रायोरीटी दयावी लागेल. बाकी रस्ते नंतर होतील.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी :–**साहेब, परंतु आमचाही रस्ता करणे गरजेचे आहे ते ५(२)(२) मध्ये करायचे आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**हा रस्ता ५(२)(२) मध्ये नाही घेता येणार. त्याची निविदा मागविता येईल.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी:–**होय ठिक आहे, निविदा मागवा परंतु दोन्ही सोबतच करा.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**काम वाढतच जातील.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी :–**साहेब, काम तर आहे ना. लोक आमच्याकडे येतात, लहान लहान मुले तेथुन जातात, तेथे रस्ता नाही. कच्चा रस्ता आहे साहेब, मोटरसायकल सुध्दा जावु शकत नाही. लोक तेथे सारखे पडतात. तेथे रस्ता नाही. साहेब, तेथे हजारो गरीब लोक राहतात.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**मग आपण त्या करास सुध्दा मान्यता दिली पाहिजे, जेथुन पैसे येणार आहेत.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी:–**रस्ता बनविणार तर आपण लोकांना कर भरण्यास सांगु ना. रस्ता बनला तर लोक कर भरतील ना.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**आपला जो डेफिशिएट आहे तेच काम आम्ही केले विदाउट टॅक्स तोच डेफिशिएट झाला तर लोकांना आपण हेच म्हटले पाहिजे की ठेकदाराचे ६५ कोटीचे बिल प्रलंबित आहेत. अडीचशे कोटीचे डेफिशिएट आहे. काम आधी झाले आहेत व कर नाही लावला.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी :–**आपले म्हणणे ठिक आहे परंतु जर आपण लोकांना काहीच दिले नाही व त्यांच्याकडुन कराची अपेक्षा केली तर ..

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**दिले म्हणुनच आम्ही घाटयात आहोत.

**<u>सदस्या श्रीमती पंचम कालानी :–</u>**साहेब, गरीब लोक आहेत, तेथे तर पाणी सुध्दा येत नाही. पाणी पोहचतच नाही.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**पाण्याचे आम्ही पाहु पाणी देवु आपण.

**<u>सदस्या श्रीमती पंचम कालानी :–</u>**पाण्याची गरज आहे. बेसिक नेसेसिटी देणार तरच आम्ही पाण्याची अपेक्षा करणार ना. नाहीतर लोक म्हणतील की आम्ही का कर दयावा. साहेब, आय वुड शे माझा सुध्दा रस्ता टाकावा.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**असे तर कुठलाही रस्ता असेल मग.

**<u>सदस्या श्रीमती पंचम कालानी :–</u>**साहेब, माझा सुध्दा रस्ता घ्या त्याचे कधीपासुनच प्राकलन बनविले आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**माझी भुमिका त्यादिवसापासुन अगदी स्पष्ट आहे, जोपर्यंत आपले उत्पन्न वाढत नाही, स्त्रोत बाबत कोणताही विचार, इगोबाबत मुद्दा नाही. दिस इज रिॲलिटी एव्हरी बडी आउट ऑफ थ्री. सर्वांची हा विचार केला पाहिजे की आपले सामुहिक व वैयक्तिक जबाबदारी आहे की स्त्रोत वाढविणयासाठी आपण लवकर मान्यता दिली पाहिजे. दोन वेळा ठेवले व एकानेही फेवरमध्ये बोलले नाही.

**<u>सदस्या श्रीमती पंचम कालानी :–</u>**साहेब, असे नाही, फेवरमध्ये आहे, बोलुच देत नाहीत.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**असे कसे बोलु देत नाही.  तर ही वस्तुस्थिती आहे, जोपर्यंत आपण डेफिशिएट प्रापर लेवलला आणत नाहीत, आम्ही आवश्यक गोष्टींशिवाय काहीच करु शकत नाही.

**<u>सदस्या श्रीमती पंचम कालानी :–</u>**साहेब, हे आवश्यक आहे, आपण पाहिले आहे. आपण परत एकदा व्हिजीट करा व आणणार तर दोन्ही रस्ते आणा.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**पाण्याचे मी कुठल्याही परिस्थितीत करतो.

**<u>सदस्या श्रीमती पंचम कालानी :–</u>**पाण्याचा खुप त्रास आहे व रस्त्याची स्थिती खराब आहे, मोटरसायकल तेथुन जावु शकत नाही साहेब.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**याचे प्राकलन नाही बनविले का आपण? तेथे त्रास आहे तर केला पाहिजे ना तो सुध्दा रस्ता.

**<u>सदस्या श्रीमती पंचम कालानी :–</u>**आपण चला व पहा की किती त्रास आहे तेथे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**होय मी व्हिजीट केली आहे, तेथे गाडया जात नव्हत्या.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :–</u>**:साहेब, हा अहंम दरबार आहे तेथिल.  व माझी सुध्दा विनंती आहे की श्रीमती पंचम महोदयांचे काम झाले पाहिजे. आयुक्त साहेब, कराचा जो विषय आहे त्याबाबत आपणांस आम्ही सहकार्य देतो.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**आयुक्त साहेब, माझ्या प्रभागासोबत श्रीमत पंचम कालानी यांनी जो विषय ठेवला तो सुध्दा आवश्यक आहे.  आता तर तेथे डंम्पींग बंद आहे परंतु जेव्हा तेथे डंम्पींग चालु होते तेथे मी स्वतः व्हिजीट केले होते. तेथे रस्त्याची एवढी परिस्थिती खराब आहे की तेथे गाडया पलटी होत होत्या.  आता तर तेथुन गाडीच जावु शकत नाही. तेथे लोकांचा सुध्दा आक्रोश आहे. तेथे शौचालयाची सुध्दा अडचण होती व लोक रस्त्यावर शौचास बसायचे. हांगणदारी मुक्तचा विषय होता आपण तेथे शौचालय बनविले.  तेथे न पाण्याची व्यवस्था, ना काही तेथे गेल्यावर एक कापलेला एरिया असे वाटते. तर हा जो विषय त्यांच्या स्थानी उचित आहे परंतु येथे विषय पत्रिकेवर एकच विषय आहे तर मी म्हणतो की त्यांचा विषय अर्थसंकलपात टाकुन लवकरात लवकर घ्यावा.  परंतु या विषयात दोन मोठे दरबार आहेत तेथे डंम्पींग ग्राउंडवर जाण्यासाठी गाडया जातात. वसनशाह दरबार व स्वामी शांती प्रकाश आश्रम त्याच रस्त्याने जातो.  तेथे जुनमध्ये फार मोठा कार्यक्रम आहे.  तर मी म्हणतो की या विषयावर लक्ष देवुन सहकार्य करावे. तसेच हे काम परेश कंन्स्ट्रक्शन कंपनी यांना देवु ५ (२)(२) मध्ये करावे. लवकरात लवकर त्यास वर्कऑर्डर दिली जावी.  व ही जी पत्रिका आहे त्यासोबत समायोजित केली जावी. तेथे २ जुनला कार्यक्रम असून ५ हजारापेक्षा जास्त शहराबाहेरील लोक येतात. शहरातील बरेचसे लोक असतात. ३ दिवस कार्यक्रम चालतो. तर हे काम लवकर झाले पाहिजे.  डंम्पींग ग्राउंडला व लोकांना सुध्दा सोयीचे होईल.

**<u>सदस्या श्रीमती पंचम कालानी :–</u>**साहेब, मला आपण खात्री दयाल का की एक कोटीचा रस्ता पुढील महासभेत घेवुन याल.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**पुढील वेळेस घेवु या.

**<u>सदस्या श्रीमती पंचम कालानी :–</u>**परंतु आयुक्त महोदय नाही म्हणतात.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**ब–याच लोकांचे रस्ते आहेत तर ते व आपला सुध्दा घेवुन येवु, जोपर्यंत हे रस्ते होणार नाही तोपर्यंत कुठल्याच रस्त्यास मान्यता देणार नाही हे मी आपणांस आश्वासन देतो. आयुक्त महोदय नाही म्हणतात तर दुसरा सुध्दा रस्ता आम्ही करणार नाही ना.

**<u>सदस्या श्रीमती पंचम कालानी :–</u>**ठिक आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**हा रस्ता ५(२)(२) मध्ये आवश्यक आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**साहेब, त्याच्यात तीन कारणे आहेत. डंम्पींग ग्राउंड येथे गाडया जातात तेथे डांबराचा रस्ता आहे, एवढे मोठ मोठे खड्डे पडले आहेत. तेथे कचरा टाकण्यासाठी गाडया जातात. तेथे मोठे दोन दरबार आहेत एक वसनशाह व एक स्वामी शांती प्रकाश. तसेच स्वामी शांती प्रकाश येथे तर दर तीन महिन्यांनी कार्यक्रम होत असतात. कोणतीही एकादशी असली तरी २० ते २५ हजार लोक तेथे जातात. रस्त्यावर येणे जाणे आहे. वर्क ऑर्डर सुध्दा दिले आहे ८० लाखाचे २ जुनला कार्यक्रम आहे. ४ महिन्याचे काम ३ महिन्यात करुन टाकु या.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :–</u>**६ महिने लागतील.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**होय.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**६०० मिटर आहे किती मिटर आहे, मी पाहिले नाही.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**आजपासुन काम सुरु केले तर दोन ते अडीच महिन्यात काम पुर्ण होईल, दरबारचे काम आहे. यात तीन चार कारणे आहेत. याची ८० लाखाची निविदा झाली परंतु आपण केले नाही. वारंवार बोलल्याने आपण केले नाही. रद्द केला होता.

**<u>सभापती, श्रीमती कांचनी लुंड:–</u>**साहेब, हे काम ५(२(२) मध्ये झालेच पाहिजे. तेथे दरबार असल्याने वारंवार कार्यक्रम होतच राहतात.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**आपले प्राकलन तयार आहे का?

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता :–</u>**आपण उदया निविदा काढु शकतो.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**ठिक आहे, भले परवा काढा.

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता :–</u>**ठराव आल्यावर.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>**ठरावाची वाट पाहु नका.

**<u>श्री. महेश सितलानी, उप अभियंता :–</u>**दोन महिने निघुन जातील.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**आपण मला एकपण उदाहरण दया मी हो म्हणतो. माझा ना तेथे रस्ता आहे ना घर आहे. एक सुध्दा निविदेची मुदत सांगा की आपणस एक महिन्यात निविदा काढुन वर्कऑर्डर दिली असेल. ८ दिवस सोडा, एक महिना, आज आपण निविदा काढण्यासाठी दिली व एका महिन्याच्या आत वर्कऑर्डर दिली तर मला एक सुध्दा उदाहरण सांगा या १० वर्षात तर मी सांगतो. काहीच होत नाही, आपण फक्त बोलतो.

**<u>सभापती, श्रीमती कांचनी लुंड:–</u>**५ २(२)मध्ये हे काम करा कारण येणा–या दिवसात कार्यक्रम आहेत व ते होतच राहतात. आता सुध्दा साईंचा २७ मार्चमध्ये कार्यक्रम आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**आज जर निविदा काढली तर आठ दिवसात तुमची प्रोसेसींग होवुन जाईल. ३ आठवडयाच्या आत आपण त्यांना कार्यादेश देवु शकतो. माझा ५ २(२) ला विरोध आहे. निविदा काढा असे माझे मत आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**धर्माशी जोडणारा विषय आहे, वसनशाह दरबार, स्वामी शांतीप्रकाश दरबार आहे. २—३ दिवसात कार्यादेश दया.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**नाही, जुनच्या आधी नाही होणार.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**होणार ना, मुंबईचा ठेकेदार आहे, सर्व मशिनरी आहेत. मे. परेश कंन्स्ट्रक्शन यांनी १००, २०० कामे केली आहेत. तो तयार आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**तो काम लगेच करुन देईल?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**होय करुन देईल. आपण वर्कऑर्डरपासुन ३ महिने टाका. वसनशाह दरबाराचा पट्टा दिड महिन्यात पुर्ण झाला पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**दरबारवाला पट्टाच नाही संपुर्ण घ्यायचा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**होय पुर्ण तीन महिन्यात होवुन जाईल ना. ३ महिन्याचा त्यांना पिरीअड दया ना. यात अटी टाका की हे काम ३ महिन्यात पुर्ण करायचे आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**त्यात अटी खुप आहेत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**दिड महिन्यात एक पार्ट करायचा आहे तर निविदा करुन ३ महिन्यात पुर्ण काम होईल ना.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**५(२)२) मध्ये करा व त्यात अट टाका की ३ महिन्यात काम पुर्ण केले पाहिजे. मुंबईचा ठेकेदार आहे ना.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—**ठिक आहे पाहतो. आणि ठेकेदारास बोलवा, ते आता आहे का?

**श्री. महेश सितलानी, उप अभियंता :—**मी पाहिले नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**त्यांना उदयापर्यंत बोलवु, त्यांना देवुन टाकु. त्यास वर्कऑर्डर देवुन टाका, २ जुनच्या आधी त्याच्याकडुन काम करुन घ्या वर्कऑर्डर देवुन. ॲग्रीमेंट वगैरे देवुन लवकरात लवकर वर्कऑर्डर देवुन करुन घ्या.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**श्री. सितलानीजी, यास प्रायोरिटीवर घ्या.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**२ जुनच्या आधी दरबाराचे काम करुन घ्या. आणि हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे पास? मी ठराव व अटी वाचुन दाखविते.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—५ येथिल प्रभाग क्र. १९ मध्ये बॅरेक नं. २०७१ ते २०४६ मार्गे बॅक ऑफ इंडिया पर्यंतचा रस्ता सी.सी. कॉक्रिट करणेस व नाली बनविणेच्या कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यतेकरीता तसेच कामाची ई—निविदा प्रक्रिया न करता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५ २ (२) अन्वये श्री. परेश कंस्ट्रक्शन ॲण्ड फाउंडेशन प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. तसेच ठेकेदारास कार्यादेश मिळाल्यानंतर ३ महिन्यात काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. कारण_साई वसनशाह दरबारातील साई परमानंद यांचा जन्मोत्सव असून तेथे हजारो भाविकांची गर्दी होते. तेथे डंम्पींग ग्राउंडवर ट्रक, जेसीबी, डंम्पर वगैरे ये—जा करत असतात, तेथे रहदारीचा रस्ता असल्याने पावसाळयापूर्वी काम पुर्ण होणे आवश्यक आहे.

ठिक आहे, मंजुर?

**काही सदस्य :–**पास–पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. २ :– उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र.19 मध्ये बॅरेक नं.2071 ते 2046 मार्गे बँक ऑफ इंडिया पर्यंतचा रस्ता सि.सि.कॉंक्रीट करणे व नाली बनविणेच्या कामाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणे**

**प्रस्तावना**

मा.श्रीम.कंचन अमर लुंड, स्थायी समिती सभापती यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये उल्हासनगर-५ प्रभाग क्र.१९ मधील बॅरेक क्र.२०७१ ते २०४६ मार्गे बँक ऑफ इंडिया पर्यंतचा रस्ता खराब झाल्याने सदर रस्ता कॉंक्रीटीकरणाने बनविणे व नाली बनविणेकरीता विनंती केली आहे.

सदर रस्त्याची मा.आयुक्त सो., मा.स्थायी समिती सभापती व स्थानिक नगरसेवक यांनी पाहणी केली. सदर रस्ताची अवस्था अत्यंत बिकट आहे. सदर रस्ता उल्हासनगर शहरास अन्य शहरांशी जोडणारा मुख्य रस्ता आहे. रहदारीचे व वाहतुकीचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. सदर रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतूक सुरु असते. या परिसरात अनेक छोटया-मोठया उद्योगांचे कारखाने, लोकवस्ती वसलेली आहे. सदर ठिकाणी सिंधी बांधवांची साई वसणशाह यांचे दरबार व स्वामी शांतीप्रकाश आश्रम असल्याने भाविकांची सतत वर्दळ सुरु असते. सदर रस्ता खराब असल्याने नागरीकांना अडचण निर्माण होते. दरवर्षी पावसाळयापूर्वी सदर रस्त्यावरील खड्डे महापालिकेमार्फत भरले जातात. त्यामुळे वेळेचा व निधीचा अपव्यय होत आहे. सदर रस्ता सिमेंट कॉंक्रीट केल्यास दरवर्षी महापालिकेस डांबरीकरणाचा करावा लागणारा खर्च वाचेल.

सदर रस्त्याचे कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे रु.२,०६,७९,५२८/- एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर खर्च महापालिकेच्या वर्ष २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील नवीन सिमेंट रस्ते बनविणे या लेखाशिर्षातून हाती घ्यावयाचे आहे. सदर लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

१) लेखाशिर्षाचे नाव :- नविन रस्ते सिमेंट कॉंक्रीट करणे (C 4)

२) लेखाशिर्षामध्ये उपलब्ध एकंदर तरतूद :- रु. २३,९६,०६,०००/-

३) सदर कामापूर्वी लेखाशिर्षातील शिल्लक

तरतूद :- रु. -

४) प्रस्तावित कामावरील खर्च :- रु.२,०६,७९,५२८/- -

५) प्रस्तावित कामानंतर उक्त लेखाशिर्षात रु .१६,९९,३८,१९९/-

तरी सदर कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता तसेच कामाची ई-निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १२४** **दिनांक:– १५/३/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–५ येथिल प्रभाग क्र. १९ मध्ये बॅरेक नं. २०७१ ते २०४६ मार्गे बॅक ऑफ इंडिया पर्यंतचा रस्ता सी.सी. कॉंक्रिट करणेस व नाली बनविणेच्या कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यतेकरीता तसेच कामाची ई–निविदा प्रक्रिया न करता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५ २ (२) अन्वये श्री. परेश कंस्ट्रक्शन ॲण्ड फाउंडेशन प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदा करणेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

**तसेच**

ठेकेदारास कार्यादेश मिळाल्यानंतर ३ महिन्यात काम पूर्ण करणे बंधनकारक राहील.

**कारण**

१. साई वसनशाह दरबारातील साई परमानंद यांचा जन्मोत्सव असून तेथे हजारो भाविकांची गर्दी होते.

२. तेथे डंम्पींग ग्राउंडवर ट्रक, जेसीबी, डंम्पर वगैरे ये–जा करत असतात, तेथे रहदारीचा रस्ता असल्याने पावसाळयापूर्वी काम पुर्ण होणे आवश्यक आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः–**आभार आहे, सभा संपली, सर्वांना चेटी चंड व गुढीपाडवाच्या शभेच्छा.

सांयकाळी ४.४० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:– १९/०३/२०१८

**दि. १९/०३/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**२६**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा दिनांक १९/०३/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ८ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहता | सदस्या |
| ९ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्य |
| १० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्या |
| ११ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| १२ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१) श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर, २) श्री. राजेंद्र शांताराम चौधरी, ३) श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी, ४) श्री. भारत रामचंद्र राजवानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त, आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ.

२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
४. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
६. श्री. विनायक फासे, प्र. उप लेखा परिक्षक
७. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
८. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
९. श्री. बालाजी लोंढे, सहा. आयुक्त
१०. श्री. भगवान कुमावत, सहा. आयुक्त
११. श्री. नंदलाल सामतांनी, सहा. आयुक्त
१२. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१३. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
१४. श्री. जितू चौईथानी, प्र.उप अभियंता, साबावि,
१५. श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता, विद्युत
१६. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
१७. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१८. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
१९. श्रीम. निलिमा कदम, अकॉटंट, शिक्षण मंडळ
२०. श्री. राजा बुलानी, लिपीक, जनसंपर्क विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्रीमती नर्गीस खान, लिपीक
३. श्री. संतोष खोटरे, लिपीक

दुपारी १२.१५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** प्रभाग समिती क्र. १ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करण्यासाठी यांच्याशी संविदा करण्याकरीता मान्यता मिळणे.

---

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** या बाबत कोण सांगेल?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** मा. सभापती महोदया, सन्माननिय सर्व सदस्य, महापालिका क्षेत्रात जे सार्वजनिक शौचालय आहेत, त्यांचे दैनंदिन सफाई, स्वच्छता, देखभाल करणेसाठी प्रभाग समिती निहाय अभिकर्त्यांची नेमणूक करण्यासाठी तसा प्रस्ताव स्थायी समितीमार्फत महासभेपुढे ठेवण्यासाठी प्रस्तावीत करण्यात आले आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** के.आर.सी. बाबत काय, के.आर.सी. म्हणजे काय, ते फक्त पहील्या प्रभाग समितीला लावले आहे, बाकीच्या प्रभाग समितील के.आर.सी चा उल्लेखच नाही आणि याची यादी आम्हांला याच्या सोबत का

मिळाली नाही? कुठले कुठले शौचालय करणार आहेत, त्यांचे सिट ती यादी का मिळाली नाही. यादी तर आपल्याला पाहीजे ना? समजायला तर पाहीजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** प्रत्येक यामध्ये लिहीले आहे ना? ९७६.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** ९७६ दाखवते परंतु कोणते कोणते शौचालय आहेत? माहीत तर पडायला पाहीजे की, आमच्या प्रभागामधले तर आहेत की नाहीत. साहेब, ती लिस्ट पाहीजे ना? कोण कोणते शौचालय आहेत.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** शहरातील सर्व जे सार्वजनिक शौचालय आहेत, ती सर्वांचा समावेश याच्यात केलेला आहे. जे चालू स्थितीत आहेत, टोटल शहरात एम.एम.आर.डी.ए. आणि सार्वजनिक शौचालय असे ५१२ शौचालय आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** सगळया प्रभागामध्ये.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** संपुर्ण शहरामध्ये.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मी काय सांगतो? जर भविष्यामध्ये एखादा राहून गेला किंवा एखादा नविन बनत असेल तर त्यांचे पण यामध्ये समावेश व्हायला पाहीजे.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** त्यांचे पण यामध्ये समोश होईल.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:** एम.एम.आर.डी.ए. चे किती आहेत?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** सार्वजनिक शौचालय ३५० आहेत आणि एम.एम.आर.डी.ए.चे शौचालय १६३ आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** ३५० आणि १६३.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** होय, टोटल ५१२ आहेत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** यादी का दिली नाही, आम्हांला.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** याचे सर्व यादी तयार आहेत आणि आपण प्रत्येक टॉयलेटला वेगळा असा कोड दिला आहे. प्रभाग समिती निहाय, त्यांची वेगवेगळी जी संख्या आहे, असे टोटल ५१२ चे त्यांना होर्डीग दिलेले आहेत, प्रभाग समिती निहाय आणि प्रत्येक टॉयलेटला आपण नंबर लावून, त्या टॉयलेटवर आपण नंबर लावलेले आहेत. त्या जर पाहीजे असतील मिळतील.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** इतिवृत्त कन्फार्म झाल्या नंतर त्याच्या बरोबर ती लिस्ट दया, कारण की आता, याची लिस्ट तुमच्याकडे नाहीत का?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** आता ही आहे, परंतु आता सर्व सदस्यांना झेरॉक्स काढून वाटप करण्यात येईल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** लिस्ट बाबत मी सांगतो, लिस्ट प्रश्न केव्हा येतो, जर एखादा सोडला असेल आणि ही तर रूटींग आहे आणि अजून पण भविष्यामध्ये शौचालय बनतील तर ते शौचालयनुसार नाहीत, तर नंबरनुसार आहेत. हे किती शौचालय आहेत? तर भविष्यामध्ये जे बनतील ते आपोआप त्यांचा समावेश होऊन जाईल आणि भविष्यामध्ये जे तुटतील ते आपोआप निघत जातील, ही एक रूटींगची प्रक्रिया आहे. यामध्ये लिस्ट प्रश्न माझ्या माहीती प्रमाणे यायला नाही पाहीजे. जर १० शौचालय तोडले तर ते कट होऊन जातील त्यांचे पैसे मायनस होतील आणि जे नविन बनतील तर ते याच्यामध्ये येतील.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** कोणतेही शौचालय त्याच्यामध्ये ॲड करायचे असतील किंवा ते काढायचे असतील तर ते अधिकार महापालिकेला आहेत, आयुक्तांना आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** शौचालयांची देखभाल हे लोक करतील आणि जे तुटतील भविष्यामध्ये त्यांची गरज नाही. माझ्या वार्डमध्ये घराघरातून शौचालय बनले आहेत. जर १० शौचालय तोडले तर त्यांचे पैसे अटोमेटीक कमी होतील. ती कंडीशन आहे, यामध्ये आणि ती कंडीशन आपण ठरावामध्ये टाकून देवू. भविष्यामध्ये जे तुटतील त्यांचे पैसे कमी करायचे आहेत आणि भविष्यामध्ये जे नविन बनतील त्यांचा समावेश करायचा आहे. हे कंप्पलसरी आहे.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** निविदेच्या अटीशर्तीमध्ये त्याचा समावेश केला आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** महापालिका हद्दीतील प्रत्येक शौचालय मग एम.एम.आर.डी.ए. चे असतील किंवा सार्वजनिक असतील याची देखभाल म्हणजे याच्यामध्ये समावेश काय आहे?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** फक्त पे ॲन्ड युज सोडून महापालिकेच्या अंतर्गत ४० आहेत आणि त्या आपण वगळल्या आहेत. त्या याच्यामध्ये नाहीत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** त्या संस्था बघतात का?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** त्या संस्था बघतात, त्याच्यामध्ये आपले अग्रीमेंट ऑल रेडी झालेले आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** म्हणजे प्रश्नच नाही.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** आता प्रश्न राहीला आहे, के.आर.सी.चे सांगा.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** के.आर.सी. चा अर्थ आहे, की रिसर्च सेंटर मराठीमध्ये त्यांला म्हणतात, मुख्य साधन संस्था.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मग का ही अट का? वगळयात का आले? कारण काय? आणि फक्त एकामध्येच के. आर.सी. टाकले आहे आणि याच्यामध्ये टाकले नाहीत.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** पहील्या वेळेस जेव्हा टेंडर काढले, तेव्हा प्रत्येक टेंडरला के.आर.सी. ची अट कंप्पलसरी होती, त्यातील प्रभाग समिती क्र.१ला आणि प्रि बीडमध्ये ठरले होते की, के.आर.सी. संस्था जर उपलब्ध झाल्या नाहीत. सदरची अट काढण्यात येईल आणि त्या अनुषंगाने प्रभाग समिती क्र.१, २, ३, ४ मध्ये या तीन्ही ठिकाणी के.आर.सी. च्या संस्था आलेल्या आहेत. तथापी प्रभाग समिती क्र.१ मध्ये कोणतीही संस्था तिथे उपलब्ध न झाल्याने जेव्हा सेंकन्ड जेव्हा पुन्हा टेंडर काढण्यात आला तेव्हा ती अट वगळण्यात आली.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** ठिक आहे, याच्यात काय काय कामे ते करणार आहेत? त्याची माहीती दया, म्हणजे आम्ही त्या संबधित जो जो स्वच्छता अधिकारी असेल त्याला सांगू शकतो की, हे काम होत नाही, तर मला त्या कामाचे ७२० रूपये आपण दर महीन्याला देणार आहेत का प्रती दिवस देणार आहेत. हे फक्त मला...

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** प्रती महीना आहे,

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** प्रती महीना ७२० रूपये पर सिट.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** यात....

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** यात तो काम काय काय करणार आहे? त्याला औषधे कोण पुरवणार आहेत?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** जंतु नाशके व फिनेल हे जे लागेल ते अधिकार त्यालाच पुरवायचे आहेत, तो स्वत: ते उपलब्ध करून देईल. नंतर विद्युत मिटर आपल्याकडे कुठल्याही शौचालयामध्ये नाहीत. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी विद्युत मिटरची सुविधा त्याला स्वत:ला करावी लागणार आहे आणि त्यामुळे प्रत्येक शौचालयात लाईट ही उपलब्ध असणार आहे आणि त्यासाठी येणारे मासिक बिल त्यालाच भरावे लागणार आहे. त्या नंतर सदर ठिकाणी आपल्या शौचालयामध्ये पाण्याची व्यवस्था सर्वच ठिकाणी नाही, आपल्याला सर्वांना माहीत आहे. त्यामुळे अस्वच्छता निर्माण होते. तिथे पाण्याची लाईन तिथे देण्यात येईल परंतु पाण्याचा साठा करून ठेवणे, पाण्याची

उपलब्धता २४ तास पाणी असेल ही जी जबाबदारी आहे, ती अभिकर्त्यावरतीच आहे. त्याच्या नंतर तिथे त्यांना प्रत्येक प्रभाग समितीमध्ये कर्मचारी उपलब्ध ठेवायचे आहेत, त्यांच्यावर चार निरीक्षक ठेवायचे आहेत आणि एक त्यांच्यावर एक त्यांचा व्यवस्थापक असेल. जे त्याचे दैनंदिन देखरेख करतील. किमान दिवसातून तीन वेळा दुर्गंधीनाशक व फिनेल वापरून शौचालयाची स्वच्छता व सफाई करायची आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** किमान.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** किमान तीन वेळा करायची आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** एका महीन्यात.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** एका दिवसाला तीन वेळा शौचालय धुवायचे आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** स्वच्छता व सफाई करायची आहे. हे साधारण चालू कधी होईल समजा आज आपण पास केल्यावर नंतर किती दिवसात चालू होईल? ही प्रक्रिया तुमची त्याला वर्क ऑर्डर कधी देणार आणि काम कधी चालू होणार. त्याचे काय तारीख वैगेरे ठरवली आहे का?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीकडून नंतर मा. महासभेपुढे धोरणात्मक निर्णयासाठी जाणार आहे. तेथून मंजुरी मिळाल्या नंतर.....

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** तीन वेळा दिवसातून साफसफाई करायची आहे. लाईट त्यानी लावायची आहे.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** लाईटचे मिटर त्यांनी लावायचे आहे आणि मासिक बिल सुध्दा त्यांनीच भरायचे आहे. पाण्याची लाईन आपण देणार आहोत, मात्र तिथे साठा करून ठेवणे कारण तिथे २४ तास पाणी नसते, त्यामुळे एका तासात, दोन तासात जेवढे पाणी येईल, त्याचा साठा करून ठेवायची जबाबदारी ठेकेदाराचीच आहे. त्यामुळे २४ तास पाणी उपलब्ध होईल.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** वॉटर सप्लाय सहकार्य करीत नाही, तसे व्हायला नको? पाण्याची लाईन नाही म्हणून तिथे पाणी नाही.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** सदरची निविदा काढण्यापुर्वी मा. आयुक्त साहेब यांनी सर्व संबंधित विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग आणि विद्युत विभाग यांची कॉमन बैठक घेतली होती आणि त्या बैठकी अंतर्गत हे सगळे निर्णय घेतलेले आहेत. कारण त्यांना माहीत आहे की, जिथे पाण्याची लाईन उपलब्ध होणार नाही, तिथे बारींगद्वारे देण्यात येणार आहे, असे पाणी पुरवठा विभागाद्वारे सांगण्यात आले.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** कारण काय आहे की, एम.एम.आर.डी.ए. चे शौचालय चांगले झालेत पण त्या ठिकाणी पाणीच नाही, त्यामुळे त्यांची वाट लागली.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** तोच सर्व अनुभव लक्षात घेऊन तिथे ठेकेदाराला पाण्याचा साठा करायचा आहे, त्याने पाण्याची टाकी उपलब्ध करून दयायची आहे. जेनेकरून पाणी २४ तास उपलब्ध होईल.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहता:—** हे जे टोटल आपण सांगितले आहेत, ५१२ सांगितलें आहे.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** यांची संख्या जुन, जुलै सन २०१७ मध्ये सर्व्हे केल्या नंतरची ही फिगर आहे. आपल्याला माहीत आहे की, शौचालय काही कारणांमुळे काही तुटले जातात काही नविन बनवले जातात, ते फेक्झीबल राहू शकतात.

**सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहताः—** फेक्झीबल किती टक्के?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** ८ ते १० टक्के प्रत्येक निविदामध्ये स्पष्ट लिहीले आहे की, जेवढे पण शौचालय त्यांना देणार आहेत, त्याचे हॅन्डवर्क करणार आहेत, आताची त्यांची जी परिस्थितीआहे त्यांचे फोटो काढण्यात येणार आहेत आणि जे चांगल्या स्थितीत आहेत, तेच पहीले देण्यात येणार आहेत. थेट ५१२ देणार नाही आणि ५१२ चे पेंमेंट काढणार असे काहीच नाही. आज ३०० शौचालय सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दुरूस्त झाले आहेत आणि अजून बरेच दुरूस्ती करण्याचे शिल्लक आहेत. आजच्या तारखेला ३०० ते ३५० शौचालय चांगल्या स्थितीत असतील तर पहीले ते हॅन्डवर्क करू आणि बाकीचे जसजसे दुरूस्त होतील तसे ते पण हॅन्डवर्क करू.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** याच्यात एक सुचना आहे,

**महापालिका सचिवः—** हा प्रस्ताव महासभेपुढे ठेवायचा आहे का? मग आधीच ठेवायला पाहिजे होता.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** स्थायी समितीला गोषवाराच तसा आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** हे टेंडर झालेले आहे ना?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** टेंडर झालेले आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** मग महासभेपुढे जाण्याचा विषय कुठे आला?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** मा. आयुक्तांच्या आणि

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** मा. आयुक्तांचा कायदा काय म्हणतो ते सांगा? आयुक्त काय सांगतात ते बाजूला ठेवा? कायदा काय म्हणतो?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** सदरचा धोरणात्मक...

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** जमनुजी महासभेपुढे ठेवायचा आहे का?

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** महासभेपुढे ठेवायचा म्हणजे कारण काय आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** प्रस्ताव मंजूर करायचा असे लिहीले आहे, याच्यात लिहीले आहे, स्थायी समिती मार्फत महासभेच्या मंजूरीसाठी सविनय सादर.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** कायदयात बसतो का? कायदयानुसार सांगा आम्हांला.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** सदरची निविदा जी आहे ती, अभिकर्त्यांची नेमणूक पाच वर्षासाठी असल्यामुळे धोरणात्मक निर्णयासाठी जाणे असे प्रशासनाचे मत आहे,

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठेः—** निविदा मागविल्या आहेत, धोरणात्मक निर्णय घ्यायचा आहे, तर तो झालेला नाही.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—** महासभेचा संबंधच यामध्ये नाही, टेंडर प्रक्रिया झाली आहे आणि टेंडर प्रक्रिया झाल्या नंतर स्थायी समिच्या मंजुरीसाठी येतो. जेव्हा धोरणात्मक निर्णय होता, तेव्हा पहिले महासभेला विचारावे लागते की, करायचे किंवा नाही करायचे, जर झालेलाच आहे, तर महासभेचा काय संबध आहे? यामध्ये हे वाक्य काढून टाकण्यात यावे. स्थायी समितीमध्येच पास करू. महासभेचा काहीच संबंध नाही.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** धोरणात्मक निर्णय झाला नाही, असे तुमचे म्हणणे आहे. उलटी गंगा कशी वाहणार एकदा टेंडर झाल्या नंतर स्थायी समितीकडे पाठवल्या नंतर पुन्हा महासभेपुढे जाण्याचा विषय काय आहे? कायदा काय आहे?

**<u>महापालिका सचिवः—</u>** दर वाढवायचे असते तर ठिक होते, तुम्ही निविदा वैगेरे करून घेतल्या आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—</u>** टेंडर बिलो आले आहे.

**<u>महापालिका सचिवः—</u>** मग स्थायी समिती पुढे आणण्यापुर्वी महासभेपुढेच आणायचे होते.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—</u>** सदरच्या जी अभिकर्त्याची नेमणूक आहे, ती पाच वर्षाचीसाठीची असल्यामुळे स्थायी समितीचे आर्थिक बाब असल्यामुळे धोरणात्मक निर्णय व्हावा आणि त्याची बजेटमध्ये पण तरतुद व्हावी.

**<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—</u>** नाही नाही, सुर्वेजी धोरणात्मक निर्णय कशाला बोलतात? धोरणात्मक निर्णय असा असतो, जेव्हा आपण घरांचे टॅक्स वाढवत असतो, तो धोरणात्मक निर्णय असतो. त्याला करायचे आहे किंवा नाही करायचे तो धोरणात्मक निर्णय आहे. हे काढण्यापुर्वी महासभेमध्ये आला असता तर तो धोरणात्मक निर्णय आहे. यामध्ये टेंडर काढण्यात आला, आज मंजुरी झाली, तीन महीन्यापासून चालले आहे. सर्व्हे झाला आज स्थायी समितीमध्ये आला आहे आणि आपण बोलत आहेत की, धोरणात्मक निर्णय, धोरणात्मक निर्णय काय असतो?

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** थोडे तरी कॉमनसेस असायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** या मध्ये कॉमनसेस नाही.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—</u>** सदरची निविदा पाच वर्षासाठी असल्यामुळे, त्याची बजेटमध्ये आर्थिक तरतुद होणे गरजेचे असल्यामुळे महासभेपुढे पुढील पाच वर्षासाठी आर्थिक तरतुद असावी.

**<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—</u>** याच्यासाठी एक रस्ता आहे, याला स्थायी समिती पुढे मंजुरी देत आहेत आणि आपण बजेटच्या बाबतीत बोलत आहेत तर आता आपले बजेट येत आहे. आपण एक वर्षाचे पैसे देणार आहोत, याचे पैसे पाच वर्षासाठी ॲडव्हान्स देणार नाहीत. तर आपण बजेटमध्ये तरतुद करू. बजेटचा आता महासभेमध्ये तरतुद करू.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** या वर्षी तरतुद होऊन जाईल, प्रशासनाने घेऊन यायला पाहीजे, तरतुद घेऊन येणे हे तुमचे काम आहे.

**<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—</u>** तुम्ही घेऊन या, आम्ही स्थायी समितीमध्ये तरतुद केले आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** ही जबाबदारी प्रशासनाची आहे, तुम्ही टेंडर केले नसते तर विषय वेगळा होता. टेंडर केल्या नंतर पुन्हा महासभेमध्ये जातो, हे मी पहीलेच २० वर्षामध्ये पहील्यांदाच बघतो. तुम्हांला काही अनुभव आहे का? कोणाला कोणी अधिकारी सांगेल का आम्हांला असे काय होते? उलटी गंगा कशी वाहीली हे मी तर अजून पाहीले नाही. म्हणजे आम्ही म्हणतो ते बरोबर आहे की, निर्णय माझा आहे, मी सांगेल तसाच, मग तो चुकीचा का असेना असे चालले का?

**<u>अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठेः—</u>** मा. सभापती महोदया, स्थायी समिती सन्माननिय सदस्य, वस्तुस्थिती अशी आहे की, जरी अरोग्य विभागाकडे आहे किंवा होते, ते बरोबरच आहे, जो धोरणात्मक निर्णय अगोदर मा. महासभेने घ्यायचा आहे, तो झालेला नाही आणि सर्व निविदा प्रक्रिया पुर्ण केलेली आहे आणि आपल्या समोर सादर झालेले आहे, त्यामुळे प्रथम जो पर्यंत मा. महासभा मान्यता देत नाही आपल्या महानगरपालिकेतील सर्व शौचालयांची देखभाल आणि दुरूस्ती करणे त्यासाठी समंती मिळत नाही, तो पर्यंत ही प्रक्रिया आपल्या समोर येणे कायदयाच्या दृष्टीने अभिप्रेत नाही.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** आल्या नंतर ती उलटी गंगा पुन्हा महासभेपुढे जाईल का? ते कायदयात बसेल का? आपण टेंडर मंजुर करतो, त्याच्या नंतर महासभेमध्ये जाणार नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** धोरणात्मक निर्णय कोणते होतात? मॅडम बोलल्या काही चेंजेस करायचे आहेत का?

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—** माझ्या तर समजण्यातच येत नाही. धोरणात्मक निर्णय आधी होतो की, टेंडर पहीले होते.

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठेः—** धोरणात्मक निर्णय पहीले महासभेने घ्यायचा असतो.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—** मला एक गोष्ट सांगा तुम्ही धोरणात्मक निर्णय पहीले होतो का...

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** तीन महीने विषय सडत ठेवला होता, तो आणायचा होता ना?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** आता तुम्ही कायदा दाखवता, म्हणजे तुम्ही सांगितला तो कायदा तो आम्ही मान्य करायचा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** हा विषय महासभेमध्ये जाणार नाही, हा इथेच पास होईल आणि इथेच विषय संपेल.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—** दोन अटी व शर्ती लिहून घ्या,

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** कायदा जसा वळला तसा तुम्ही वळवायचा.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—** ठरावामध्ये आपण लिहा, हे अतिआवश्यक काम आहे, हे काम...

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** अतिआवश्यक नाही, टेंडर प्रक्रिया झालेली आहे.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—** टेंडर प्रक्रिया झालेली आहे, सर्व झाले आहे, कारण हे काम गरजेचे आहे, साफसफाई डेली व्हायला पाहीजे. आता हा जो धोरणात्मक निर्णय आम्ही करीत आहेत, टेंडर केलेला आहे, तो विचार करूनच केला आहे. आता आपले सफाई कर्मचारी साफसफाई करणे बंद करतील, आता साफसफाई कोण करेल? निविदाधारकाचे लोक करतील, त्यामुळे दोन चार महीन्या नंतर बंद होऊन जाईल. त्यासाठी या अटी शर्ती टाकण्यात याव्यात. सदर संस्थेने प्रत्येक महीन्यात देयक अदा करावे. प्रत्येक महीन्याला त्याला पेमेंट मिळायला पाहीजे, नाही तर पेमेंट मिळाला नाही तर बंद होऊन जाईल. अंडरग्राऊडची गाडी बंद झाली, लेबर येत नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** गाडयाच बंद झाल्या आहेत, आहे का प्रशासनाला काय?

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—** या सगळया गोष्टी व्हायला नाही पाहीजेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** ड्रेनेजच्या गाडयाच बंद आहेत.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—** अटी व शर्ती यामध्ये टाका आणि संस्थेला स्विय करण्यास देणे मान्य करणे आणि महासभेमध्ये पाठविण्याची गरज नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** हे चुकीचेच आहे, टेंडर झालेला आहे, निविदा प्रक्रिया झालेली आहे, पुर्ण फक्त टेंडर बांधणी करायची आहे.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानीः—** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास. १ एप्रिलपासून नविन वर्षात सुरू झाले पाहीजेत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—** १ एप्रिलपासून चालूच झाले पाहीजे, ती जबाबदारी प्रशासनाची राहील, वर्क ऑर्डर झाली नाही, एक्सपेक्ट लेटर झाले नाही कारणे आम्हांला सांगू नका? हे अधिकारी आले आणि ते गेले याचे आम्हांला काहीही घेणेदेणे नाही, फक्त काम झाले पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** एक लक्षात घ्या, स्वच्छ भारत अभियान राबवतो आणि जर घाण पडली.
**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** या दोन्ही पण घ्या, सर्व संमतीने

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** साहेब, उप आयुक्त पण आलेत..

**<u>महापालिका सचिवः—</u>** याच्यामध्ये हे पण टाकू भविष्यामध्ये जे तुटतील ते पण यायला पाहीजेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** ठरावामध्ये हे पण टाकून दया, भविष्यामध्ये जे शौचालय तुटेल, त्याची गरजच राहणार नाही तर त्याचे पैसे मायनस होतील आणि भविष्यामध्ये जे शौचालय बनेल त्यांचा यामध्ये समावेश होईल आणि या अटी व शर्तीच्या बरोबरच या कंडीशन वाचा.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारेः—</u>**१ एप्रिल पासून सुरु झाले पाहिजे.

**<u>महापालिका सचिवः—</u>** १ एप्रिल पासून सुरूवात होईल साहेबांनी सांगितले आहे. महासभेत ठेवायचे की नाही यावर लिगल ओपीनियन किंवा संबंधीत विभागास विचारा की हे महासभेत ठेवायचे की नाही ठेवायचे. कारण ५ वर्षासाठी देत आहे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** १ एप्रिल पासून सुरूवात झालीच पाहीजे, ते काय, कसे करायचे आहे ते बघा त्याला एक्सेपटन्स दयायची आहे की वर्क ऑर्डर दयायची आहे. महासभेत ठेवण्याची गरज नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास..पास..

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता, आम्ही आजच्या आज तुम्हांला ठराव सही करून देतो. आम्हांला लवकरात लवकर, उप आयुक्त साहेब, डिपार्टमेंटचे उपायुक्त आहेत इथे....

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** तुम्हांला मी सांगतो की, सार्वजनिक शौचालय आमच्याकडे आहेत, पण त्यांचा वापर होत नाही, कारण त्यांची साफसफाई होत नाही. एवढी घाण असते की, लोक तिथे जाण्यास पसंद करीत नाही तर बाहेर कुठे कंपाऊंड असेल तिथे जाण्यास पसंद करतात, ही वस्तुस्थिती आहे. मिलेटरी टाईप शौचालय होती, अजुनही काही बॅरेक मध्ये आहेत, त्यांचे वापर करीत नाहीत, ती तोडली जातात आणि लोकांनी तिथे घाण असते म्हणून घरामध्ये बनवले आहेत, परंतु डायरेक्ट गटारामध्ये सोडले आहेत. ते पण ओपन डीकी सारखेच असलेले आहे. प्रशासनाने लक्ष दिले पाहीजे, जर ते शौचालय झाले तर जरा तरी फरक पडेल आज बॅरेक एरियामध्ये, जेवढे पण बॅरेक आहेत, तिथे ओपन टाकी बनवलेली नाही, टंक बनवले नाहीत. बॅरेकमध्ये शौचालय आहेत, टाकी बनवली नाही तर सर्व मैला गटारामध्ये जात आहे. मला वाटते, बॅरेकमधले पण शौचालय याच्यामध्ये केणेजी आहेत का? त्याच्यामध्ये ॲड करा पाहीजेत तर, मिलेटरी टाईप असतील ते दुरूस्त करा. लोकांनी तिथे गेले पाहीजेत, अशा प्रकारची साफसफाई आपण तिथे ठेऊ या.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** जे पण नाहीत, ते ठरावामध्ये टाकले आहेत. येथे कंडीशन टाका मी वाचतो.

१. सदर काम अति आवश्यक असल्याने दररोज सफाई झाली पाहिजे.
२. सदर संस्थेस प्रति महिना देयक अदा करावे.
३. संस्थेस एसपीव्ही करण्यास मान्यता दयावी.
४. भविष्यात जे शौचालय तुटेल ते कमी करावे व नविन येतील त्याचा समावेश करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** नाही नाही, परंतु या शहराची ही वस्तुस्थिती आहे. आपण स्वच्छता अभियानाची अंमलबजावणी करीत आहेत, आपण आवाहन करीत आहेत, भारत स्वच्छता अभियान, महाराष्ट्र स्वच्छता अभियान, उल्हासनगर स्वच्छता अभियान परंतु यामध्ये आपण काहीच करीत नाहीत. तर प्रायरीटी जसे सुर्वेजीने सांगितले जर महानगरपालिकेच कर्मचारी करीत नाहीत, तर जर हे चालू करीत आहेत तर लवकरात लवकर चालू करा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** इतिवृत्ताची वाट न पहाता, कंडिशन बरोबरच.

**महापालिका सचिव:—**पास, सर्वानुमते, कंडिशन वाचुन दाखविते.

**काही सदस्य,** पास..पास...

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १ :—** प्रभाग समिती क्र. १ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करण्यासाठी यांच्याशी संविदा करण्याकरीता मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभागाकडून महापालिका प्रभाग समिती क्र. १ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी अभिकर्त्यांची अथवा सामाजिक संस्थेची ५ वर्षासाठी नेमणूक करण्यासाठी दिनांक ०९/१०/२०१७ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महापालिकेच्या वेब साईटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करून E-Tendering निविदा मागविण्यात आली होती. परंतु निविदाकार यांनी सर्व Mandatory condition ची पूर्तता केलेली नसल्याने समितीमधील सदस्यांनी सर्वानुमते ७ दिवसांची फेरनिविदा प्रसिध्द करण्याचे निर्देश दिले त्यानुसार फेर निविदा दिनांक १०/११/२०१७ रोजी उल्हासनगर महापालिकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करून न E-Tendering निविदा मागविण्यात आल्यात. तीन निविदाकारांनी आपल्या निविदा दाखल केल्या होत्या. टि.पृ.क्र. १३ अन्वये निविदेनुसार प्राप्त तीनही निविदाकारांनी KRC बाबत कोणतेही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यामुळे KRC ची अट प्रभाग समिती क्र. १ मध्ये काढून अल्पमुदत निविदा काढण्याबाबत मा. आयुक्त सो. , यांनी दिनांक ३०/०१/२०१८ रोजीन्वये निर्देश दिले आहे. त्यानुसार निविदा क्र. १४७२ द्वारे ई—निविदा सुचना प्रसिध्द करून E-Tendering निविदा मागविण्यात आली होती. त्याअनुषंगाने ३ निविदाकारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त निविदा दि. १५/०२/२०१८ रोजी ई—निविदा कक्षात निविदा समिती सदस्य व निविदाकारांच्या उपस्थितीत संगणकाच्या माध्यमाने पहिला लिफाफा उघडण्यात आला.

प्राप्त तीन निविदांपैकी मे. एम—डिएसी इंजिनीयर, अबंरनाथ यांनी कागदपत्रे निविदेतील अटी व शर्तीनूसार व प्री—बीड मध्ये दिलेल्या खुलाशानूसार आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाहीत. व इतर दोन निविदाकारां पैकी मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर यांनी आवश्यक कागदपत्रे यापुर्वीच सादर केलेली आहेत व मे. झा.पी.ॲण्ड कंपनी, उल्हासनगर यांनी इकडील पत्र क्र. ३४६/२०१८, दि. २१/०२/२०१८ अन्वये दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने दि. २३/०२/२०१८ रोजी अनुभवाचे कागदपत्रे सादर केलेले आहे.

त्याअनुषंगाने निविदा समितीने मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर व मे. झा. पी. ॲण्ड कंपनी, उल्हासनगर यांनी सादर केलेली कागदपत्रे छाननी करून तपासणीअंती ग्राहय धरून त्यांचा आर्थिक लिफाफा उघडण्यास निविदा शा.नि. १२/०४/२०१७, नियम ४.३ नुसार समितीमार्फत मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार दि. ६/३/२०१८ रोजी दुपारी १२.३० वा. ई—निविदा कक्षात दुसरा लिफाफा (Commercial bid) उघडण्याबाबत जा.क्र. उमपा/आवि/उप—आ/३७२/२०१८, दि. ०५/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मे. ए. एम.रामचंदानी, उल्हासनगर व मे. झा. पी. ॲण्ड कंपनी, उल्हासनगर निविदाकार यांना कळविण्यात आले होते.

परंतु मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर यांनी मे. झा. पी. ॲण्ड कंपनी, उल्हासनगर यांनी निविदा सादर करतेवेळी निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्राची पुर्तता केली नसल्याने व सादर केलेले कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र एक वर्षा साठी नसल्याने व विहीत मुदतीत कागदपत्रे दिली नसल्याने त्यांना अपात्र ठरविणे बाबत पत्र सादर केले होते. सदर पत्रानुसार मा. आयुक्त सो., यांनी दिनांक ६/३/२०१८ रोजी दुपारी ११.३० वा. त्यांच्या दालनात निविदा समितीचे सर्व सदस्य व निविदाकार यांचे प्रतिनिधी यांच्या समवेत बेठक घेतली. सदर बैठकीत निविदा समितीने पुनश्च सर्व कागद पत्रांची निविदाकारांच्या उपस्थितीत छाननी करून तपासणी केली. तपासणी अंती मे. झा.पी.ॲण्ड कंपनी, उल्हासनगर यांच्या कागदपत्रे निविदेच्या अटी व शर्तीनूसार कामाच्या अनूभवाचे प्रमाणपत्र योग्य नसल्याचे सर्वानूमते ठरवून त्यांना अपात्र ठरविले. व तसे समक्ष दोन्ही निविदाकारांना सांगण्यात आले. तद्नंतर निविदा समितीने एकच निविदा पात्र असल्याने मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर यांचा निविदेचा दुसरा लिफाफा (Commercial bid) उघडण्याचे

निर्देश दिले आहेत. टि.पृ.क्र. २२ अन्वये निविदा समितीने व मा. आयुक्त सो., यांच्या निर्देशाप्रमाणे दिनांक १६/३/२०१८ रोजी दुपारी ०४.०० वाजता निविदा समितीच्या मान्यतेन वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर निविदाकार यांनी सादर केलेल दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No | Description | Quantity/Nos | M/S A M Ramchandani Rate per Unit (R.S.) |
|---|---|---|---|
| 1 | Work of daily cleaning as well as repair and maintainance of the public toilets in the Juridication of ward committee No.1 Ulhasnagar Muncipal Corporation Toilets -126 seats—1239 | 1239 | 721 |

सदरचे प्राप्त दरानूसार निविदा समितीने दिलेल्या निर्देशानुसार मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर यांना जा.क्र.उमपा/उप.आ/आवि/३८०/२०१८, अन्वये दिनांक १७/०३/२०१८ रोजी वाटाघाटीसाठी सकाळी ११:०० वाजता मा. आयुक्त सो., यांच्या दालनात निविदा समितीच्या उपस्थितीत बोलावण्यात आले. निविदा समितीमधील पुढील प्रमाणे मा. उपायुक्त (आरोग्य/मुख्यालय), मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक हे सदस्य व निविदाकार मे. ए. एम. रामचंदानी, उल्हाससनगर यांनी वाटाघाटीसाठी दिनांक १७/०३/२०१८ रोजी पत्र सादर केले आहे. सोबत पत्र जोडुन सादर.

त्याअनुषंगाने मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरांचा तपशील खालिल प्रमाणे आहे.

| Sr. No | Description | Quantity /Nos | M/S A M Ramchandani Rate per Unit (R.S.) | After Negotiation Rate Rs. | Total Total Expenditure |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Work of daily cleaning as well as repair and maintainance of the public toilets in the Juridication of ward committee No.1 Ulhasnagar Muncipal Corporation Toilets -126 seats—1239 | 1239 | 721 | 720 | 892080 |

प्रभाग समिती क्र. १ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी ५ वर्षासाठी येणारा मासिक खर्च (१२३९ सिट्स × ७२० प्रति सिट्स = रूपये ८९२०८०/—) व प्रथम वार्षिक रू. ८९२०८० × १२ महिने = रूपये १०७०४९६० इतका वार्षीक खर्च अपेक्षित आहे. तसेच कार्यादेश दिल्यापासून प्रति वर्षा नंतर ३ % वार्षिक वाढ रक्कम देणे आहे.

तरी प्रभाग समिती क्र. १ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी ५ वर्षासाठी मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मार्फत महासभेच्या मंजुरीसाठी सिविनय सादर. सदरचे दर निविदाकाराने वाटाघाटीअंती प्राकलन दरापेक्षा कमी दर सादर केलेले आहेत.

**स्थायी समिती ठराव क्र. १२५** **दिनांकः— १९/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग समिती क्र. १ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची ५ वर्षासाठी दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. ए. एम. रामचंदानी, उल्हासनगर यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करुन त्यांच्याशी संविदा करणेकामी खालील अटी व शर्तीसह मान्यता देत आहे.

५. सदर काम अति आवश्यक असल्याने दररोज सफाई झाली पाहिजे.
६. सदर संस्थेस प्रति महिना देयक अदा करावे.
७. संस्थेस एसपीव्ही करण्यास मान्यता दयावी.
८. भविष्यात जे शौचालय तुटेल ते कमी करावे व नविन येतील त्याचा समावेश करण्यात यावा.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.२ :—**प्रभाग समिती क्र. २ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर, यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करण्यासाठी यांच्याशी संविदा करण्याकरीता मान्यता मिळणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** सेम कंडीशन नुसार इतिवृत्ताची वाट न पहाता जसे पहील्यामध्ये कंडीशन टाकल्या आहेत त्याच कंडिशन याच्यामध्ये सुध्दा टाका?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :—** प्रभाग समिती क्र. २ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर, यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करण्यासाठी यांच्याशी संविदा करण्याकरीता मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभागाकडून महापालिका प्रभाग समिती क्र. २ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी अभिकर्त्याची अथवा सामाजिक संस्थेची ५ वर्षासाठी नेमणूक करण्यासाठी दिनांक ०९/१०/२०१७ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महापालिकेच्या वेब साईटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करून E-Tendering निविदा मागविण्यात आली होती. परंतु निविदाकार यांनी सर्व Mandatory condition ची पूर्तता केलेली नसल्याने समितीमधील सदस्यांनी सर्वानुमते ७ दिवसांची फेरनिविदा प्रसिध्द करण्याचे निर्देश दिले त्यानुसार फेर निविदा दिनांक १०/११/२०१७ रोजी उल्हासनगर महानगरपालीकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करुन E-Tendering निविदा मागविण्यात आल्या असता विहित मुदतीत तीन निविदाकारांनी त्यांच्या निविदा दाखल केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने ३ निविदाकारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त निविदा दि. १६/१२/२०१७ रोजी ई—निविदा कक्षात निविदा समिती सदस्य व निविदाकारांच्या उपस्थितीत संगणकाच्या माध्यमाने पहिला लिफाफा उघडण्यात आला. निविदा समितीने सर्व कागदपत्रांची पहाणी केली. टि.पृ.क्र. १२ अन्वये मा. आयुक्त सो., यांच्या निर्देशाप्रमाणे वित्तीय लिफाफा दिनांक ६/१/२०१८ रोजी दुपारी १२.१५ वाजता निविदा समितीच्या मान्यतेन वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र ३ निविदाकारांनी सादर केलेल दर खालीलप्रमाणे आहेत.

**तुलनात्मक तक्ता**

| Sr. No | Description | Quantity/Nos | M/S Manav vikas samajik seva sansta Rate per Unit (R.S.) | M/S SSV sanstha<br><br>Rate per Unit (R.S.) | M/S Adarsh Adivashi Vikas va shekshnik sanstha<br><br>Rate per Unit (R.S.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Work of daily cleaning as well as repair and maintainance of the public toilets in the Juridication of ward committee No.2 Ulhasnagar Muncipal Corporation Toilets 135 seats 1339 | 1329 | 992 | **976** | 1040 |

पात्र निविदाकारांमध्ये तुलनात्मक तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर, यांनी सादर केलेले दर न्युनतम आहे. प्राप्त दरानूसार खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr. No | Description | Quantity/Nos | M/S SSV sanstha<br><br>Rate per Unit (R.S.) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | Work of daily cleaning as well as repair and maintainance of the public toilets in the Juridication of ward committee No.2 Ulhasnagar Muncipal Corporation Toilets 135 | 1329 | **976** | 12,97,104 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | seats 1329 | | | |
| **एकुण** | | | | **12,97,104** |

सदरचे प्राप्त दरानूसार निविदा समितीने दिलेल्या निर्देशानुसार मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर, यांना जा.क्र.उमपा/उप.आ/आवि/३७७/२०१८, अन्वये दिनांक १७/०३/२०१८ रोजी वाटाघाटीसाठी सकाळी ११:०० वाजता मा. आयुक्त सो., यांच्या दालनात निविदा समितीच्या उपस्थितीत बोलावण्यात आले. निविदा समितीमधील पुढील प्रमाणे मा. उपायुक्त (आरोग्य/मुख्यालय), मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक हे सदस्य व निविदाकार मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर, यांनी वाटाघाटीसाठी दिनांक १७/०३/२०१८ रोजी पत्र सादर केले आहे. सोबत पत्र जोडुन सादर.

त्याअनुषंगाने मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर, यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरांचा तपशील खालिल प्रमाणे आहे.

| **Sr. No** | **Description** | **Quantity /Nos** | **M/S SSV sanstha<br>Rate per Unit (R.S.)** | **After Negotiation Rate Rs.** | **Total Expenditure** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Work of daily cleaning as well as repair and maintainance of the public toilets in the Juridication of ward committee No.2 Ulhasnagar Muncipal Corporation Toilets 135 seats 1329 | 1329 | **976** | 720 | 956880 |

प्रभाग समिती क्र. २ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी ५ वर्षासाठी येणारा मासिक खर्च (१३३९ सिट्स × ७२० प्रति सिट्स = रूपये ९५६८८०/—) व प्रथम वार्षिक रू. ९५६८८० × १२ महिने = रूपये ११४८२५६० इतका वार्षीक खर्च अपेक्षित आहे. तसेच कार्यादेश दिल्यापासून प्रति वर्षा नंतर ३ % वार्षिक वाढ रक्कम देणे आहे.

तरी प्रभाग समिती क्र. २ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी ५ वर्षासाठी मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर, यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मार्फत महासभेच्या मंजुरीसाठी सिविनय सादर. सदरचे दर निविदाकाराने वाटाघाटीअंती प्राकलन दरापेक्षा कमी दर सादर केलेले आहेत.

**स्थायी समिती ठराव क्र. १२६** **दिनांकः— १९/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग समिती क्र. २ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची ५ वर्षासाठी दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर, यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करुन त्यांच्याशी संविदा करणेकामी खालील अटी व शर्तीसह मान्यता देत आहे.

१. सदर काम अति आवश्यक असल्याने दररोज सफाई झाली पाहिजे.
२. सदर संस्थेस प्रति महिना देयक अदा करावे.
३. संस्थेस एसपीव्ही करण्यास मान्यता दयावी.
४. भविष्यात जे शौचालय तुटेल ते कमी करावे व नविन येतील त्याचा समावेश करण्यात यावा.

५. १ एप्रिल, २०१८ पासुन काम सुरु करणे बंधनकारक असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र.३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र.३:—** प्रभाग समिती क्र. ३ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर, यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करण्यासाठी यांच्याशी संविदा करण्याकरीता मान्यता मिळणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३ :—** प्रभाग समिती क्र. ३ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर, यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करण्यासाठी यांच्याशी संविदा करण्याकरीता मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभागाकडून महापालिका प्रभाग समिती क्र. ३ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी अभिकर्त्याची अथवा सामाजिक संस्थेची ५ वर्षासाठी नेमणूक करण्यासाठी दिनांक ०९/१०/२०१७ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महापालिकेच्या वेब साईटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करून E-Tendering निविदा मागविण्यात आली होती. परंतु निविदाकार यांनी सर्व Mandatory condition ची पूर्तता केलेली नसल्याने समितीमधील सदस्यांनी सर्वानुमते ७ दिवसांची फेरनिविदा प्रसिध्द करण्याचे निर्देश दिले त्यानुसार फेर निविदा दिनांक १०/११/२०१७ रोजी उल्हासनगर महानगरपालीकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करुन E-Tendering निविदा मागविण्यात आल्या असता विहित मुदतीत तीन निविदाकारांनी त्यांच्या निविदा दाखल

केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने ३ निविदाकारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त निविदा दि. १६/१२/२०१७ रोजी ई–निविदा कक्षात निविदा समिती सदस्य व निविदाकारांच्या उपस्थितीत संगणकाच्या माध्यमाने पहिला लिफाफा उघडण्यात आला. निविदा समितीने सर्व कागदपत्रांची पहाणी केली. टि.पृ.क्र. १२ अन्वये मा. आयुक्त सो., यांच्या निर्देशाप्रमाणे वित्तीय लिफाफा दिनांक ६/१/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता निविदा समितीच्या मान्यतेन वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र ३ निविदाकारांनी सादर केलेल दर खालीलप्रमाणे आहेत.

**तुलनात्मक तक्ता**

| **Sr. No** | **Description** | **Quantity/Nos** | **M/S Manav vikas samajik seva sansta Rate per Unit (R.S.)** | **M/S SSV sanstha Rate per Unit (R.S.)** | **M/S Adarsh Adivashi Vikas va shekshnik sanstha Rate per Unit (R.S.)** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Work of daily cleaning as well as repair and maintainance of the public toilets in the Juridication of ward committee No.3 Ulhasnagar Muncipal Corporation Toilets 147 seats 1371 | 1371 | 992 | **977** | 1050 |

पात्र निविदाकारांमध्ये तुलनात्मक तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे मे. ए. एम. रामचंदानी यांनी सादर केलेले दर न्युनतम आहे. प्राप्त दरानूसार खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| **Sr. No** | **Description** | **Quantity/Nos** | **M/S SSV sanstha Rate per Unit (R.S.)** | **अपेक्षित खर्च** |
|---|---|---|---|---|
| 1 | Work of daily cleaning as well as repair and maintainance of the public toilets in the Juridication of ward committee No.3 Ulhasnagar Muncipal Corporation Toilets 147 seats 1371 | 1371 | **977** | 13,39,467 |
| **एकुण** | | | | **13,39,467** |

सदरचे प्राप्त दरानूसार निविदा समितीने दिलेल्या निर्देशानुसार मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर, यांना जा.क्र.उमपा/उप.आ/आवि/३७९/२०१८, अन्वये दिनांक १७/०३/२०१८ रोजी वाटाघाटीसाठी सकाळी ११:०० वाजता मा. आयुक्त सो., यांच्या दालनात निविदा समितीच्या उपस्थितीत बोलावण्यात आले. निविदा समितीमधील पुढील प्रमाणे मा. उपायुक्त (आरोग्य/मुख्यालय), मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक हे सदस्य व निविदाकार मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर, यांनी वाटाघाटीसाठी दिनांक १७/०३/२०१८ रोजी पत्र सादर केले आहे. सोबत पत्र जोडुन सादर.

त्याअनुषंगाने मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर, यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरांचा तपशील खालिल प्रमाणे आहे.

| Sr. No | Description | Quantity /Nos | M/S SSV sanstha<br><br>Rate per Unit (R.S.) | After Negotiation Rate Rs. | Total Expenditon |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Work of daily cleaning as well as repair and maintainance of the public toilets in the Juridication of ward committee No.3 Ulhasnagar Muncipal Corporation Toilets 147 seats 1371 | 1371 | **977** | 720 | 987120 |

प्रभाग समिती क्र. ३ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी ५ वर्षासाठी येणारा मासिक खर्च (१३७१ सिट्स × ७२० प्रति सिट्स = रूपये ९८७१२०/—) व प्रथम वार्षिक रू. ९८७१२० × १२ महिने = रूपये ११८४५४४०/— इतका वार्षीक खर्च अपेक्षित आहे. तसेच कार्यादेश दिल्यापासून प्रति वर्षा नंतर ३ % वार्षिक वाढ रक्कम देणे आहे.

तरी प्रभाग समिती क्र. ३ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी ५ वर्षासाठी मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर, यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मान्यतेने महासभेच्या मंजुरीसाठी सिविनय सादर. सदरचे दर निविदाकाराने वाटाघाटीअंती प्राकलन दरापेक्षा कमी दर सादर केलेले आहेत.

**स्थायी समिती ठराव क्र. १२७** **दिनांकः— १९/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग समिती क्र. ३ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची ५ वर्षासाठी दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर, यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करुन त्यांच्याशी संविदा करणेकामी खालील अटी व शर्तीसह मान्यता देत आहे.

१. सदर काम अति आवश्यक असल्याने दररोज सफाई झाली पाहिजे.
२. सदर संस्थेस प्रति महिना देयक अदा करावे.
३. संस्थेस एसपीव्ही करण्यास मान्यता दयावी.
४. भविष्यात जे शौचालय तुटेल ते कमी करावे व नविन येतील त्याचा समावेश करण्यात यावा.
५. १ एप्रिल, २०१८ पासुन काम सुरु करणे बंधनकारक असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र.४ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र.४:—** प्रभाग समिती क्र. ४ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. सिध्दान्त समाज विकास संस्था,उल्हासनगर, यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करण्यासाठी यांच्याशी संविदा करण्याकरीता मान्यता मिळणे.

————————————————————————————————————————

**काही सदस्य :—**पास—पास......

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** अटी व शर्तीसह सेम इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :—**प्रभाग समिती क्र. ४ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. सिध्दान्त समाज विकास संस्था,उल्हासनगर, यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करण्यासाठी यांच्याशी संविदा करण्याकरीता मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभागाकडून महापालिका प्रभाग समिती क्र. ४ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी अभिकर्त्याची अथवा सामाजिक संस्थेची ५ वर्षासाठी नेमणूक करण्यासाठी दिनांक ०९/१०/२०१७ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महापालिकेच्या वेब साईटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करून E-Tendering निविदा मागविण्यात आली होती. परंतु निविदाकार यांनी सर्व Mandatory condition ची पूर्तता केलेली नसल्याने समितीमधील सदस्यांनी सर्वानुमते ७ दिवसांची फेरनिविदा प्रसिध्द करण्याचे निर्देश दिले त्यानुसार फेर निविदा दिनांक १०/११/२०१७ रोजी उल्हासनगर महानगरपालीकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करुन E-Tendering निविदा मागविण्यात आल्या असता विहित मुदतीत तीन निविदाकारांनी त्यांच्या निविदा दाखल केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने ३ निविदाकारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त निविदा

दि. १६/१२/२०१७ रोजी ई—निविदा कक्षात निविदा समिती सदस्य व निविदाकारांच्या उपस्थितीत संगणकाच्या माध्यमाने पहिला लिफाफा उघडण्यात आला. निविदा समितीने सर्व कागदपत्रांची पहाणी केली. टि.पृ.क्र. १२ अन्वये मा. आयुक्त सो., यांच्या निर्देशाप्रमाणे वित्तीय लिफाफा दिनांक ६/१/२०१८ रोजी दुपारी १२.४५ वाजता निविदा समितीच्या मान्यतेन वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र ३ निविदाकारांनी सादर केलेल दर खालीलप्रमाणे आहेत.

## तुलनात्मक तक्ता

| Sr. No | Description | Quantity/Nos | M/S Manav vikas samajik seva sansta Rate per Unit (R.S.) | M/S SSV sanstha Rate per Unit (R.S.) | M/S Adarsh Adivashi Vikas va shekshnik sanstha Rate per Unit (R.S.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Work of daily cleaning as well as repair and maintainance of the public toilets in the Juridication of ward committee No.4 Ulhasnagar Muncipal Corporation Toilets 105 seats 1338 | 1338 | 992 | **977** | 1035 |

पात्र निविदाकारांमध्ये तुलनात्मक तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे मे. ए. एम. रामचंदानी यांनी सादर केलेले दर न्युनतम आहे. प्राप्त दरानूसार खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr. No | Description | Quantity/Nos | M/S SSV sanstha Rate per Unit (R.S.) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | Work of daily cleaning as well as repair and maintainance of the public toilets in the Juridication of ward committee No.4 Ulhasnagar Muncipal Corporation Toilets 105 seats 1338 | 1338 | **977** | 13,07,226 |
| **एकुण** | | | | **13,07,226** |

सदरचे प्राप्त दरानूसार निविदा समितीने दिलेल्या निर्देशानुसार मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर, यांना जा.क्र.उमपा/उप.आ/आवि/३७९/२०१८, अन्वये दिनांक १७/०३/२०१८ रोजी वाटाघाटीसाठी सकाळी ११:०० वाजता मा. आयुक्त सो., यांच्या दालनात निविदा समितीच्या उपस्थितीत बोलावण्यात आले. निविदा समितीमधील पुढील प्रमाणे मा. उपायुक्त (आरोग्य/मुख्यालय), मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक हे सदस्य व निविदाकार मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर, यांनी वाटाघाटीसाठी दिनांक १६/०३/२०१८ रोजी पत्र सादर केले आहे. सोबत पत्र जोडुन सादर.

त्याअनुषंगाने मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर, यांनी वाटाघाटीअंती सादर केलेल्या दरांचा तपशील खालिल प्रमाणे आहे.

| Sr. No | Description | Quantity /Nos | M/S SSV sanstha Rate per | After Negotiation Rate Rs. | Total Expenditon |
|---|---|---|---|---|---|

| | | | Unit (R.S.) | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Work of daily cleaning as well as repair and maintainance of the public toilets in the Juridication of ward committee No.4 Ulhasnagar Muncipal Corporation Toilets 105 seats 1338 | 1338 | **977** | 720 | 963360 |

प्रभाग समिती क्र. ४ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी ५ वर्षासाठी येणारा मासिक खर्च (१३३८ सिट्स × ७२० प्रति सिट्स = रूपये ९६३३६०/—) व प्रथम वार्षिक रू. ९६३३६० × १२ महिने = रूपये ११५६०३२०/— इतका वार्षीक खर्च अपेक्षित आहे. तसेच कार्यादेश दिल्यापासून प्रति वर्षा नंतर ३ % वार्षिक वाढ रक्कम देणे आहे.

तरी प्रभाग समिती क्र. ४ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी ५ वर्षासाठी मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर, यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मार्फत महासभेच्या मंजुरीसाठी सिविनय सादर. सदरचे दर निविदाकाराने वाटाघाटीअंती प्राकलन दरापेक्षा कमी दर सादर केलेले आहेत.

**स्थायी समिती ठराव क्र. १२८** **दिनांकः— १९/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग समिती क्र. ४ मधिल क्षेत्रातील सार्वजनिक शौचालयांची ५ वर्षासाठी दैनंदिन सफाई स्वच्छता व देखभाल ठेवण्यासाठी न्युनतम दर सादर करणारे मे. सिध्दान्त समाज विकास संस्था,उल्हासनगर, यांची अभिकर्ता म्हणून नेमणुक करुन त्यांच्याशी संविदा करणेकामी खालील अटी व शर्तीसह मान्यता देत आहे.

१. सदर काम अति आवश्यक असल्याने दररोज सफाई झाली पाहिजे.
२. सदर संस्थेस प्रति महिना देयक अदा करावे.
३. संस्थेस एसपीव्ही करण्यास मान्यता दयावी.
४. भविष्यात जे शौचालय तुटेल ते कमी करावे व नविन येतील त्याचा समावेश करण्यात यावा.
५. १ एप्रिल, २०१८ पासुन काम सुरु करणे बंधनकारक असेल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** वॉटर सप्लायचे नाहीत का कोणी? ड्रेनेजच्या गाडया किती आहेत? दर महीन्यात चार—पाच दिवस तरी बंद असतात, गेल्या मागच्या आठवडयापासून बंद आहेत. काय कारण आहे?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** अंडरग्राउंड ड्रेनेजची आज संपुर्ण शहरामध्ये खुपच त्रास आहे, आठ दिवस बंद दोन दिवस चालू, परत दोन दिवस बंद.

**सभापती, स्थायी समिती:—** लेबर पण नाहीत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** लेबर पण नाहीत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** पाच दिवसापासून ड्रेनेजच्या गाडया बंद आहेत, आपण काय स्वच्छता राबवतो? स्वच्छता अभियानमध्ये ते येत नाही का? लेबर नाहीत तर गाडयाच बंद आहेत. सगळया चारही गाडया बंद आहेत का? हे आरोग्याशी निगडीत नाही का? ड्रेनेजचे आरोग्यावर परिणाम होतो की नाही, आरोग्य म्हणजे काय? फक्त साफसफाई झाडू मारला म्हणजे झाले का आरोग्य,

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** पाणी पुरवठयाचे एक पण अधिकारी नाहीत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** हे नेहमीचाच सिन आहे, त्या दिवशी महासभेमध्ये पाणी पुरवठयाचे अधिकारी उपस्थित नव्हते. आज स्थायी समितीमध्ये नाहीत. तर हे लोक स्थायी समिती आणि महासभेला सिरीयसली घेत नाहीत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** त्यांनी सिरीयसली घेतले पाहीजे, त्यांच्या अंतर्गत मिटींग घेतल्या पाहीजेत._आयुक्तांनी बोलवले पाहीजे, उप आयुक्तांनी बोलवले पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** माझ्या हिशोबानुसार ही मिटींग स्थगित केली पाहीजे, ४.०० वाजता ठेवली तर बरे होईल. नविन आयुक्त येत आहेत, त्यांना सुध्दा ही वस्तुस्थिती दाखवायला पाहीजे की, ही परिस्थिती काय आहे? आपण बघा.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** प्रशासनाला यातले काही माहीतच नाही का? या ड्रेनेजच्या गाडया बंद आहेत, कशामुळे बंद आहेत. त्या चालू करण्यासाठी काय केले पाहीजेत. ज्या जुन्या लोकांच्या तक्रारी आहेत, रस्त्यावरून मैला वाहत आहे.

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—** ड्रेनेजच्या बाबतीत हा विषय पाणी पुरवठयाशी संबधीत आहे, मी त्यांना फोन करून विचारले की, उप अभियंत्याला पाठवित आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** पाणी पुरवठयाचे डिपार्टमेंट फॉरेस्ट डिपार्टमेंटचा नाही, महापालिकेचाच भाग आहे, त्यामुळे प्रशासनाच्या अधिकारात असायला पाहीजे.

**अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—** खरे हे आरोग्य विभागाकडे नाही, पाणी पुरवठयाकडे आहे, आपण त्याची माहीती घेऊन मग उत्तर देवू शकतात.त्यांना आता बोलवले आहे, एक मिनीटातच येत आहेत ते.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** तुम्ही कारवाई करा देहेरकर साहेब, मुख्यालय कोणाकडे आहे,

**सभापती, स्थायी समिती:—** वॉटर सप्लायचे आले नाहीत, तर त्यांना नोटीस दया, त्यांच्यावर कारवाई करा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** त्या दिवशी मा. महापौरांनी पण सांगितले होते, कारवाई करण्यासाठी आता पर्यंत काय कारवाई केली आहे.

**सदस्या, श्रीम. कविता पंजाबी:—** बोडारे सर बोलून बोलून आम्ही थकला आहे, माझ्या वार्डमध्ये ड्रेनेजचे एवढे प्रॉब्लेम आहेत की, लोक शिव्या देतात.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** प्रत्येक जागेवर प्रॉब्लेम आहेत.

**<u>सदस्या, श्रीम. कविता पंजाबी:—</u>** गाडी नाही, लेबर पण नाहीत, आयुक्त साहेबांना मी किती तरी वेळा सांगितले आहे. होऊन जाईल, होऊल जाईल, असेच ऐकायला मिळते. आम्ही खरोखरच त्रस्त आहोत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** केणेजी तुम्हांला रिपोर्ट येतात का?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** ड्रेनेज डिपार्टमेंट, तक्रारी येतात, कारण ड्रेनेजचे सर्व पाणी रस्त्यावरून वाहत असते आणि त्यामुळे दुर्गंधी येते आणि परिसर अस्वच्छ असतो, त्याच्यामुळे प्रत्येक्षपणे आरोग्य विभागावरती ताण येतो, ड्रेनेजच्या ज्या गाडया आहेत, त्या संपुर्ण ड्रेनेज डिपार्टमेंट वॉटर सप्लाय यांच्या अंतर्गत असून त्यांचे देखरेख प्रभाग समितीच्या प्रभाग अधिका—यां मार्फत होत असते.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** तुम्ही वरिष्ठांना रिपोर्ट केला काय? आरोग्याचे जे उपायुक्त आहेत, त्यांना रिपोर्ट_तुम्ही केला का?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** लिखीतमध्ये काही येत नाही, मिटींगमध्ये वारंवर या तक्रारी येत असतात. त्याच्यामुळे ड्रेनेज डिपार्टमेंटला वेळोवेळी ते सांगण्यात येत असते.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** फिल्डवर आपले लोक फिरतात तुम्ही फिरतात, एस.आय. फिरतात, त्यांनी रिपोर्ट दिला तर तुम्ही वरिष्ठ म्हणून मग मुख्यालय कशासाठी आहेत? फिल्डवरून तक्रारी येतात तर तुमच्याकडून मुख्यालयात बसून त्या सुटल्या पाहीजेत. तुम्ही उपायुक्तांना कळवले पाहीजे, वॉटर सप्लायचे उपायुक्त वेगळे असतील, आरोग्याचे एकत्र येऊन आणि त्यांनी काही तरी मार्ग काढला पाहीजे. का बंद आहेत, असे किती दिवस चालणार आहेत? आता आम्ही इथे विषय उपस्थित केला, तुमच्या गाडया महीनाभर बंद राहतील, उद्या शहर भोगेल, तुम्ही मुख्यालय म्हणून इथे काय करतात?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** ड्रेनेजच्या ज्या काही वारवाई आहेत, त्या प्रभाग समिती निहाय आहेत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** मुख्यालय कशासाठी आहे? सद्या फिल्डमध्ये जे प्रॉब्लेम आहेत, काही लोकांच्या तक्रारी आहेत, ज्या तुमच्या पर्यंत पोहचल्या नंतर  तुम्ही इथे बसून, कॉन्फरन्स हॉल आहे, आयुक्तांची केबिन आहे, उपायुक्तांची केबिन आहे, कशासाठी केबिन आपल्याला ठेवल्या आहेत, चर्चा करून त्याच्यातुन प्रॉब्लेम सॉल झालेत, कायप्रॉब्लेम सॉल करतात तुम्ही?

**<u>उपायुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर:—</u>**  या संदर्भात जे संबधीत वॉटर सप्लायचे इंचार्ज आहेत, उद्याच मिटींग घेऊन काय प्रॉब्लेम आहेत, माहीती घेऊन मग त्याचे निराकारण केले जाईल.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** साहेब, मला ती अपेक्षा आहे की, प्रत्येक नागरीकांच्या तक्रारी येऊन दया किंवा कर्मचा—यांच्या तक्रारी येऊ दया, वॉटर सप्लायचे असतील किंवा स्वच्छता विभागाचे असतील इथे चर्चा झाली पाहीजे तुमच्या अधिका—यांची आणि त्याच्या नंतर आमच्या अगदी शुल्लक, तुरळक तक्रारी आल्या पाहीजेत तुमच्याकडे, काही नजर चुकीने राहतील, सगळयाच तक्रारी आम्ही करायच्या का? सहा सहा दिवस गाडया बंद आहेत, तरी प्रशासनाला पाहीत नाही. माहीत असणे ही तर खुप मोठी चुक आहे आणि माहीत असून उपाय करीत नाहीत, ही तर फार मोठी घोडचुक आहे. ही तर छोटी महापालिका आहे, १३ चौ.कि.मिटरची, जर तुम्हांला मुंबई महानगरपालिका हातामध्ये दिली तर काय होणार आहे, मुंलुडच्या कोप—यात काय चालले आहे? दहिसरच्या कोप—यात काय चालले आहे? तुम्हांला कसे कळणार आहे? प्रशासन म्हणजे नक्की काय? तुमच्याकडे फिरते पथक आले पाहीजे आणि त्याच्यावर सोलूशन निघाले पाहीजे. मुख्यालय त्यासाठी आहे? नुसत्याच बैठका घ्यायच्या, आदेश दयायचे.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>**  काय त्याला अर्थ नाही, काय नाही?

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** सहा दिवसापासून गाडया बंद आहेत, तर तुम्ही काय केले?

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** सहा दिवसात कोणाला जाग आली नाही?

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** बरे तुम्हांला सिरीयसनेस नाही, याच्यामुळे रोगराई पसरणार नाही.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** आमच्या आमच्यामध्ये नगरसेवकांची भांडणे हातात, मला गाडी दे, मला गाडी दे. हा प्रत्येकाचा प्रॉब्लेम आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** भिंती रंगवायच्या, गाडया फिरवाच्या स्वच्छता अभियान, त्यामुळे स्वच्छता होणार नाही. शहराची एकंदरीत स्वच्छता आरोग्य म्हणजे काय?

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** आणि कारण काय? कारण विचारले त्यांना तर ते म्हणतात आमची पगार वाढ झाली नाही. एक तर पहीली गोष्ट प्रशासन या गोष्टी चुकते.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** का बंद का झाल्या होत्या? हे कोणाचे काम आहे, आमचे?

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** तुम्हांला साधी गोष्ट माहीती आहे, एक सिरीयस बाब आहे...

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** काय करून ठेवले आहे, तुम्ही? ग्रामपंचायत चांगली चालेल,

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u>** आबा एक सिरीयस बाब आहे, याच्यामध्ये जे ते सफाई कामगार काम करतात ना? त्यांचा पिएफ देखील कापला जात नाही, त्यांना कुठली सिक्युरीटी नाही, आपण ठेकेदाराला सर्व पैसे देतो, पण आपले अधिकारी ठेकेदाराला मिळाल्यामुळे हे सगळ चालू आहे. काय परिस्थिती आहे, माहीत आहे का जर एखादा कर्मचारी ड्रेनेजमध्ये खाली उतरतो, आतमध्ये गॅस असतो काय असतो, अशी बरीच प्रकरणे मुंबई पासून घडली आहेत, सगळीकडेच घटना घडल्या आहेत, त्यांचा मुंत्यू झाला आहे आणि त्यांचा मुंत्यू झाल्या नंतर मग ठेकेदारा मार्फत असल्यामुळे त्याला महानगरपालिका अंग झटकायला मोकळी होऊन जाते. पण त्याचा जो परिवार आहे, तो काम करणारा आहे, त्याला डॉक्टरी सुविधा नाहीत, ज्या आपण सगळया देतो, पण त्याला जो रेट देतो, त्याचे मिनिमम वेजेस पण त्याला दिला जात नाही. खरे म्हणजे जर या कोर्टात गेलो तर खरोखरच अधिका—यांना हातकडया लागतील, तुम्ही लक्षात घ्या, सिरीयसली घ्या. जे तिथे कर्मचारी आहेत, त्यांचा पगार त्यांच्या खात्यामध्ये गेला पाहीजे हे लक्षात घ्या तुम्ही, हा कायदा आहे, हा सुप्रिम कोर्टाचा कायदा आहे. मला असे वाटते की, मी या प्रकरणामध्ये लक्ष घालून, मी आज जबाबदारीने सांगतो की, या प्रकरणात लक्ष घालून मी हायकोर्टाची पायरी चढणार आहे. मी आजच माहीती अधिकारामध्ये तुमचाकडे देतो तुम्ही रेट काय देतात? आणि त्याच्या अटी आणि शर्ती काय आहेत, आता पर्यंत मागितल्या नव्हत्या. पण त्या दिवशी अक्षरक्ष: माझ्याकडे येऊन रडले ते, म्हणे आमचा पीएफ पण कापला जात नाही. तुटपुंजा ८ हजार ते ९ हजार पगार दिला जातो आणि आपण त्याला १५ माणसांची हजेरी दाखवतो,पण ते ८ ते ९ माणसे असतात १५ माणसांचे पगार निघतो.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** एक लक्षात ठेवा, इथे प्रपोजल आणतांना सर्वकंश विचार करत जा, त्या कामगाराला पण परवडले पाहीजे आणि ठेकेदाराला पण परवडले पाहीजे आणि महत्वाचे म्हणजे तुम्ही त्या ठेकेदाराकडून काम करून घेतले पाहीजे. त्यांना पगार वेळेवर मिळाले पाहीजे. ही जी कामे आहेत, ड्रेनेजच्या गाडया सहा सहा दिवस बंद झाल्या नंतर, शहरात परिस्थिती काय होणार आहे? आम्ही लोकांना काय उत्तर देणार? चेंबरमधून पाणी उलटे लोकांच्या बिल्डींगमध्ये जायला लागले, घरामध्ये जायला लागले, काय स्वच्छता? महापालिका काय करते? जर सामान्य नागरीकांनी आम्हांला विचारले की, तुम्ही पाणी पण आम्हांला देवू शकत नाही. साफसफाई होते, आता

चालले स्वच्छता अभियान चालू आहे म्हणून, रस्त्यावरून झाडू मारले पण आतमध्ये अजून तसेच आहे. जे पाणी गटारामध्ये जायला पाहीजे ते उलटे लोकांच्या घरामध्ये जाते, काय लोकांना काय उत्तर देणार मी

**शाखा अभियंता, डि.एस.पाटील:–** गेल्या आहेत सर आताच तीन गाडया गेल्या.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** हे अगोदर करायला पाहीजे होते, तुम्ही लोकांनी.

**शाखा अभियंता, डि.एस.पाटील:–** आणि नविन कॅम्प आता ओपन करणार आहेत, लेबर लोकांचे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** करा ना? तुम्ही तुमचे टेंडर पुरीपुर्ण असेल तर ठेकेदार करा. इथून पुढे कुठलाही टेंडर असू दया.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** जुना टेंडरची मुदत कधी पर्यंत होती, किती दिवस झाले?

**शाखा अभियंता, डि.एस.पाटील:–** भरपुर दिवस झाले, बघून सांगतो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** जर तुम्हांला माहीत आहे की, टेंडर पुर्ण होणार आहे. टेंडरची प्रक्रिया करण्यासाठी एक ते दिड महीना लागतो, तर ही तुमची जबाबदारी आहे की, टेंडर एक ते दिड महीना अगोदर नविन कॉल करणे, तुम्ही टेंडर कॉल करीत नाहीत आणि परत एक्सटेंशन देत असतात, मग ते आपली कंडीशन इंपोझ करेल मला हे रेट पाहीजेत, मला हे वाढवून दया, मला ते वाढवून दया.

दुपारी १२.५० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—३१/३/२०१८

**दि. ३१/३/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**२७**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक ३१/३/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ७ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| ८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ९ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| १० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| ११ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| १२ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १३ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, २. श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर, ३. श्री. भारत रामचंद्र राजवानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश पाटील, आयुक्त
२. श्रीमती विजया कंठे, आयुक्त अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी

५. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
६. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
७. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
८. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
९. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी
१०. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
११. श्री. बालाजी लोंढे, सहा. आयुक्त
१२. श्री. प्रबोधन मवाळे, सहा. आयुक्त
१३. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
१४. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१५. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१६. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१७. श्री. बाळु नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक
१८. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१९. श्रीमती निलीमा कदम, अकाउंटंट, शिक्षण मंडळ
२०. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२१. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
२२. श्री. राजा बुलानी, प्र. विधी विभाग प्रमुख
२३. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे
५. श्री. संतोष कोठरे

दुपारी ३.२७ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ३०/०१/२०१८ (त्यात २/२/२०१८ व ९/२/२०१८), दिनांक ३/२/२०१८, २८/२/२०१८, ६/३/२०१८, ९/३/२०१८, १५/३/२०१८, १९/३/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानीः—</u>** माझे असे म्हणणे आहे की इतिवृत्त सर्व एकत्र येत आहेत. पहिले सन १९९७ पासून आम्ही स्थायी समिती मध्ये होतो. आणि आताही आपल्या देखरेखीमध्ये  हे कार्य होत आहे. तर प्रत्येक इतिवृत्त आम्हाला प्रत्येक सप्ताहामध्ये येत होते.,आणि प्रत्येक हप्त्यामध्ये बैठक घेतली जात होती, जरी एक विषय असेल किंवा दोन विषय असतील. विषय जरी आले नसतील तरी प्रत्येक बुधवारी बैठक घेतली जात होती. आणि तेव्हा इतिवृत्त मिळत असल्यामुळे आम्ही वाचन करू शकत होतो. आता जर २०० पानांचे इतिवृत्त येत असेल तर त्यामध्ये काही चूका सुध्दा अशू शकतात, आम्ही इतिवृत्तास मंजूरी दिली परंतु आम्ही काय सांगितले , बोडारेजी यांनी काय सांगितले, याची आम्हाला माहिती होत नाही. आता एवढे इतिवृत्त कोण वाचणार?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u>** आपण डिफर करा किंवा पास करा.

**<u>महापालिका सचिव :—</u>** एक मिटीग ३०/१/१८ झाली परत २/२/१८ला झाली परत ९/२/१८ झाली आणि हया मिटींग अडजॉन केलेल्या आहेत.

**<u>सदस्य, श्री. धंनजय बोडारे:—</u>** त्यांचे असे म्हणणे आहे की पुढच्या वेळेस..

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u>**आम्हाला एक, एक इतिवृत्त पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>**या पूढे.

**<u>महापालिका सचिव :—</u>**साहेब हे ॲडजान झालेल्या मिटींगचे तर एकत्र देणार ना.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u>**:— मी ॲडजान मिटीगचे सांगत नाही,

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>**मॅडम, माझे म्हणणे समजून घ्या, जमनादासजी हे सांगत आहेत ३०/१/१८, ही मिटींग २/२/१८ आणि ९/२/१८ ला अडजॉन झाली. तर हया एक मिटींगचे एक मिनीटस् आपण तयार केले तर ते घेवून यावे. यानंतर ३/२/ १८, २८/२/१८, ६/३/१८ एक एक, एक स्टॅडीगमध्ये एकाचे घेवून यावे, त्याचे काही पाने असतील तर ते वाचण्यासाठी सहज होईल. आता आम्ही पास करत आहेत परंतु या पुढे..

**<u>महापालिका सचिव :—</u>**सभा भरपूर होत आहेत, तेवढा माझ्याकडे स्टाफ नाही आहे. मागणी करुन स्टाफ मिळत नाही. महासभा आणि स्थायी समिती मिटींग सतत होत आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>**आता आम्ही पास करत आहेत, यापुढे आम्ही म्हणत आहेत.

**<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u>**:—यापुढे काही वेळाने दयावे परंतु एक, एक दयावे.

**<u>महापालिका सचिव</u>** :— ठिक आहे. आता ॲडजान मिटींगचे कसे देणार?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>**ॲडजान मिटींगचे एकत्र देण्यात यावे.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :—**मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ३०/०१/२०१८ (त्यात २/२/२०१८ व ९/२/२०१८), दिनांक ३/२/२०१८, २८/२/२०१८, ६/३/२०१८, ९/३/२०१८, १५/३/२०१८, १९/३/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. दिपक सिरवानी

**<u>स्थायी समिती ठराव क्र. :—</u>** **१२८ अ** **<u>दिनांक : ३१/३/२०१८</u>**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक ३०/०१/२०१८ (त्यात २/२/२०१८ व ९/२/२०१८) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २५ पर्यंतचे, दिनांक ३/२/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते १५ पर्यंतचे, २८/२/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ९४ पर्यंतचे, ६/३/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४ पर्यंतचे, ९/३/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३६ पर्यंतचे, १५/३/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ११ पर्यंतचे, १९/३/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मा.सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा नवी मुंबई. यांचे द्वारा पुरवठा करण्यात आलेल्या कार्यरत १० सुरक्षा जवानांनसाठी १ वर्ष मुदत वाढ करणे करिता मान्यता मिळणे.

---

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>**याची माहिती कोण देणार आहे?

**<u>श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी</u>** :— उल्हासनगर महानगरपालिका, सुरक्षा विभाागमध्ये सुरक्षारक्षकांची कमी लक्षात घेता आपण यापूर्वी १० सुरक्षारक्षक घेतले होते. आणि त्यांची मुदत दिनांक १२/०४/२०१८ रोजी संपूष्टात येत आहे. आणि सुरक्षारक्षकांची आवश्यकता लक्षत घेता यासंबधित १० सुरक्षारक्षकांना मुदत वाढ देण्याचे प्रस्तावीत केले आहे. सदर चे जवान हे शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षारक्षक मंडळाचे जवान असल्याने यापूर्वीच देखील आपण मुदत वाढ दिलेली आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>**आपण आपल्या सुरक्षारक्षकांची नेमणूक का नाही करत आहात?

**<u>श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी</u>** :— सर, शासनाचे असे आदेश आहेत, शासन निर्णय आहेत, की आपण कुठल्याही नगरपालिका, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये जर सुरक्षारक्षक घ्यावयाचे असतील तर आपण शासनाकडून घेतलेल्या सुरक्षारक्षकामधूनच त्यांची कायम ची नियुक्ती करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>**जीआर मध्ये असे लिहिलेले आहे का की आपण आपली भरती न करून त्यांच्याकडून घेण्यात यावे.

**<u>श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी</u>** :— नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u>**:— हे तर कमालच झाले आपण असे कसे सांगत आहेत की त्यांच्याकडूनच घेण्यात यावे जर आम्ही सुरक्षा रक्षक आपले नियुक्त करत आहेत जेवढे आपल्या नियमामध्ये आस्थापना सुची मध्ये आहे तेवढे तर आपण, जे त्यांच्याकडून घेत असाल तर आपण पण घेवू शकतो. जसे मागच्या वेळेस आपणाला सांगितले की फायर ब्रीगेड मध्ये घेण्यात यावे. तसे यामध्ये ही घेण्यात यावे. तात्पुरते ३ महिन्यासाठी ऑडर देवून ३ महिन्यात त्यांची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>** आपली अनुकंपाची लोक आहेत ती आता अशीच बसलेली आहेत, अनुकंपावाल्याना देवू शकता तुम्ही. सुरक्षारक्षक म्हणजे काय हयांना विषेश काही शिकविलेले असते का?

**<u>श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी</u>** :— नाही तसे काहीच नाही आहे. उंची साधारण १६५ से.मी. वजन ५२ किलो छाती ८१ सें.मी. फुगवून ८६ अशी असणे अपेक्षित आहे, किमान १० उत्तीर्ण असले पाहिजे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—**मला एक गोष्ट विचारायची आहे, सर्वसामान्य जे कर्मचारी , ज्यांचे प्रॉब्लेम होतात, जे वारतात, त्यांच्या आपण वारसांना नोकरी देतो, मग त्या अनुषगाने त्यांना ठेवा ना, ते पण शिपाई आर्हतामध्ये मध्ये बसतात ना

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— नक्कीच घ्यायला हवेत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—**जे आता शिपाई उभे आहेत, तुम्ही बघा ते त्यांचे पोट ढेरी बघा, तुम्ही जसे म्हणता सुरक्षारक्षकाचे हे काय पाहिजे, त्याची शारीरीक क्षमता काय पाहिजे, तर ते अनुकंपाचे घ्याना काय अडचण काय आहे. वारंवार प्रस्ताव, साहेब, या प्रस्तावाला आपला शंभर टक्के विरोध आहे. हे बाद करण्यात यावे व जे अनुकंपा तत्वावरील आहेत त्यांना घेण्यात यावे. यासाठी बाहेर जे पैसे दिले जातात, ते लोक यांना किती पगार देत आहेत, कारण की आपल्या इथे कायदा कोणताही असो त्याचा उपयोग बरोबर केला जात नाही. यांना पगाार आपल्या याच्यातून दिला गेला पाहिजे, हे लोक किती पगाार देत आहेत ते कमीत कमी आहे. तो त्यांना मिळत नाही आहे. त्यांचा पीएफ ची कपात होते किंवा नाही हे आम्ही बघत नाही. हे आपले काम आहे. त्यांना वेळेवर पगार देणे, गणवेश देणे इ. ही सर्व त्यांना दिले जात आहे असे नाही आहे. हे जे बोर्ड आहे हे काय करतात ते मला माहिती नाही. मी त्यांच्याशी बोललो तर ९हजार ते १० हजार पगार दिला जातो.

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— नाही नाही, हयाच्यासाठी ९ हजार ते १० हजार बोर्डाला मिळत नाही. त्यांच्याकडे लेव्ही सोडून बाकीचे त्यांना रू. १५ ते १६ हजार त्यांना मिळतात. आणि बाकीचे लेव्ही फक्त ४५ टक्के

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—**पी.एफ वैगेरे आपण देतो का? मला काय म्हणायचे आहे त्यांना जो फायदा दयायचा आहे ना तो हयाच्यामधून का देत नाही, आपण त्याला जे बिल देतो,त्या बिलामधून त्यांच्या खात्यावर जे त्यांच्या फायदयाच्या गोष्टी आहेत त्या मंडळाने दयायला पाहिजे. उर्वरीत रक्कम मंडळाला दया. मंडळ ठरवेल तसे त्यांना पैसे मिळतात असे का?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— आपण तपासणी करत नाहीत काय? त्यांना पी.एफ मिळाला , जमा झाला किंवा नाही झाला,आणि दुसरी सवलती आहेत त्या मिळाल्या किंवा नाही.

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— सर यासाठी शासन निर्णय आहे.आणि शासन निर्णयानुसार आपण फक्त मागणी करतो मागणी केल्यानंतरनंतर त्यांची जबाबदारी आहे, पी.एफ. दयायचा किंवा नाही दयायचा त्याची जबाबदारी आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— तपासणी करण्याची जबाबदारी आपली नाही आहे का?

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— आपली आहे. आपण त्यांच्या कडून फक्त काम करून घेतो आणि त्यांना पगार देतो. बोर्ड महाराष्ट्र सरकार च्या देखरेखी खाली असते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:—आपण प्रत्येक महिन्याच्या १० तारखेला त्यंना पत्र पाठवा की आपण यांना पगार दिला आहे का? यांचा पी.एफ. भरलेला आहे का? यांचा इएसआयसी केला आहे का? या सर्व पूराव्यासहीत देण्यात यावी.

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— सर, आहे त्यांचे ऑनलाईन होत असते,

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— आपण तपासणी करत आहेत का?

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— होय सर,

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—**अकाउंट विभागाने सांगावे, की तपासणी केली जातेका?

**मुख्य लेखा परिक्षक श्री.दादा पाटील.:—**मा. सभापती महोदय, मा. सदस्य, राज्य सरकारने शासनातले विविध उपक्रम शासनाला जर सुरक्षारक्षक जर पाहिजे असतील तर ते कम्पलसरी त्यांच्याकडूनच घ्यावेत असे स्पष्ट आदेश आहेत, आणि त्या आदेशाचा भंग जर केला तर फौजदारी स्वरूपाचे गून्हे दाखल करण्याचे पण त्यांना अधिकार दिले आहेत. आणि अशा प्रकारचे गून्हे माझ्यावर वैयक्तीक भिवंडीत असताना दाखल झालेले आहेत. आणि पूर्ण पणे त्यांना जे

पेमेंट आहे ते सुरक्षारक्षक मंडळ जे आहे शासनाच्या अंतर्गत असून ते त्यांचा पेमेंट पूर्ण पणे बॅकेद्वारे करतात, सर्वच त्यांच्या ज्या वसुल्या आहेत त्या कमीत कमी वेजेस आणि इतर ज्या काही गोष्टी असतील कायदेशीर त्या नुसार करतात. अशी माझी माहिती आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** हयाच्यावर माझे एक मत आहे की, ठिक आहे याचे आपण करूया, पुढच्या वर्षी साठी आपण अपली भरती करणसाठी प्रक्रीया चालू करू या.

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— नक्कीच

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** शासनाने असे कुठेच म्हटले नाही की जसे राजेश वधारिया सर यनी सांगितले की जसे तुम्ही भरती करू नका म्हणून?

**मुख्य लेखा परिक्षक श्री.दादा पाटील.:—**तुमच्याकडे पुरेसे असल्यावर बाहेरचे घ्यायची गरज नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** प्रायव्हेट ठेकेदाराकडून किंवा प्रायव्हेट नेमणूक करणे बरोबर नाही, त्याएवजी सुरक्षामंडळ परंतु आपली भरती करायला काही हरकत नाही.

**मुख्य लेखा परिक्षक श्री.दादा पाटील.:—**भरती करायला काही अडचण नाही फक्त ते किती कमी जास्त करायचे ते तुम्ही ठरवू शकता ना.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— हे तर आस्थापना विभाग सांगेल.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—**अनुकंपाला देवू शकता ना.

**उप आयुक्त, श्री. संतोष देहरेकरः—**ही जी भरती आहे, सुरक्षारक्षकाची जी शारीरीक अर्हता पाहिजे, त्या अंतर्गत असतील तर भरता येतील. ती पद मंजूर आहेत का?

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— हो सर, पद मंजूर आहेत.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—**साहेब, पद मंजूर नाहीत मग ही बाहेरून लोक जी भरती करता मंजूर पोस्ट नाही पैसे आपण तेच घालवतो आहे, ते उलट जास्त पैसे देत आहेत. नुसते XXX काढुन असतात.

**उप आयुक्त, श्री. संतोष देहरेकरः—**हयाच्यामध्ये सुरक्षा रक्षकासाठी तुम्हाला पोस्ट मंजूर न करता सुध्दा त्या बाहेरून घेवून भरता येतात.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— जर पोस्ट मंजूर नाही आहे, तर आपण बाहेरून कसे काय घेवू शकतो?

**उप आयुक्त, श्री. संतोष देहरेकरः—**जसे आपण आता १०० कॉन्ट्रॅक्टने घेतो त्या पध्दतीने.

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— सर, आपल्याकडे आता ९६ पदे आहेत, त्यापैकी ६३ पद भरलेली आहेत, ३९ पदे रिक्त आहेत त्याच्या अनुषगांने आपण

**उप आयुक्त, श्री. संतोष देहरेकरः—**जर पद आहेत तर बाहेरून न घेता आपल्या कडून करता येईल

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— आमचे म्हणणे हे आहे, आपण पद भरण्यात यावी, आणि त्यांचे जसे आम्ही महापालिकेची महासभेमध्ये ठराव केला आहे. त्या बरोबर आपण आता पद काढण्यात यावीत. याबरोबर १० पद सुध्दा काढावीत. अनुकंपावाले जर हया पात्रते मध्ये बसत असतील तर त्यांना घ्या. बसत नसतील तर बाहेरून घेण्यात यावी.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** श्री. सुर्वेनी जो शब्द वापरला आहे, आता जो शब्द घेतलेला तो XXX शब्द बरोबर वाटत नाही तो काढून टाका.

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— सर,या मध्ये खरे म्हणजे उल्हासनगर महानगरपालिकेचे सुरक्षारक्षकांचा जो पगार आहे, मंजूर पगार आहे तो सुरक्षारक्षक मंडळापेक्षा कमी आहे. परंतु आपल्याकडे भरती प्रक्रीया राबविली जात नाही, ब—याच दिवसाची प्रलंबीत असल्यामंळे आपल्याला हा जास्त खर्च सोसावा लागत आहे. ही वस्तुस्थिती आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** हे प्रशासनाची चूकी आहे. का राबवत नाही तुम्ही. आस्थापना सूची मंजूर आहे.

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— मंजूर आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—**पुढच्या महीन्यात आणा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— नाही नाही, आणा कशासाठी class 1 आणि class 2 अधिकारीयांना महासभेची मान्यता लागते आहे, class 3आणिclass 4 यांनामहासभेची मान्यता नाही हा तर आयुक्तांचा अधिकार आहे. आम्ही त्यांना निर्देश देत आहे की आपण भरती करावी. पहिले १० पदाची तर करण्यात यावी.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** हे काय करायचे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे**:— रदद?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— कोणते?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** आता जे केले ते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— नाही, नाही यामध्ये आम्ही रिझॉल्युशन असे करत आहेत की

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** आता त्यांनी १ वर्ष करीता मागितलेले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— नाही नाही, आम्ही ३ महीन्यासाठी मागत आहेत. तीन महीन्यामध्ये ही भरतीची प्रक्रीया पूर्ण केली जाईल.

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— भरती प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— नाही, भरती प्रक्रीया , ६ महीने घ्या, ६ महीन्याच्या आता आपण भरती प्रक्रीया पूर्ण करून अनुकंपा किंवा थेट भरती.

**उप आयुक्त, श्री. संतोष देहरेकरः—**अनुकंपाच एक लक्षात घ्या, आपणाला त्यांच करताना सिनीरीटी आहे ती ब्रेक करता येत नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— आम्ही आपल्याला सिनीरीटी ब्रेक करायला सांगत नाही आहे. भरती करण्यासाठी नियम सांगत नाही आहे, आमचे म्हणणे एवढेच आहे जर अनुकंपामध्ये छाती, उंची, वजन वैगेर ही सर्व गोष्टी मिळत असतील तर प्राथमिकता त्यांना दयावी. आणि त्यांनंतर दोन लोक मिळाले किंवा तीन लोक मिळाले त्यांची थेट भरती करावी. आमचे एवढेच म्हणणे आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** ठिक आहे. ६ महिन्यासाठी मंजूर करून बाकी प्रशासनाला

**महापालिका सचिवः—** सन२०१८ पासून ६ महीन्याच्या आत मुदत वाढ देवून मान्यता देण्यास तसेच प्रशासनास १० सुरक्षारक्षक थेट भरण्यास प्रशासनाला.......

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:— ही प्रक्रीया ६ महीन्याच्या आत झाली पाहिजे.

**श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी** :— सर यामध्ये एक ऑप्शन आहे, आपण भरती प्रक्रीया अनुकंपाचे आपण बोलली किंबहूना ओपन डायरेक्ट भरतीचे बोलण्यात आले आहे. हया शासन निर्णयामध्ये असे नमूद करण्यात आले आहे, यापूर्वी जर आपण सुरक्षारक्षक मंडळाचे प्रतिनिधी घेतले असतील तर त्यातूनच पूर्तता करावी असेही म्हटले आहे. तर हे आपल्यावर डिपेंड राहील. स्थायी समितीने दिलेला निर्णय अतिंम असेल.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** आस्थापना सूची नुसार भरती करायची.

**<u>श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी</u>** :— ठिक आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u>**:— पास! इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—** मा.सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा नवी मुंबई. यांचे द्वारा पुरवठा करण्यात आलेल्या कार्यरत १० सुरक्षा जवानांनसाठी १ वर्ष मुदत वाढ करणे करिता मान्यता मिळणे.

**<u>प्रस्तावना</u>**

सुरक्षा विभागामार्फत सुरक्षा रक्षक मिळणे कामी विविध विभागाकडुन महापालिकेच्या मालमत्तेच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी सतत मागणी होत असते परंतु सुरक्षा विभागाकडे सुरक्षा रक्षक मागणीपेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक ०४/०४/२०१६ रोजीच्या मान्यतेने तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रमांक २१ दिनांक १३/०६/२०१६ व मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक २०/०३/२०१७ रोजीच्या मान्यतेने तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १२७ दिनांक २९/०३/२०१७ अन्वये. उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे रक्षण करणेसाठी मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्या करिता) यांचे कडील ०९ **सुरक्षा रक्षक** व १ **सुरक्षा सुपरवायझर** कार्यरत असुन त्यांची ०१ वर्षाची मुदत दिनांक १२ एप्रिल २०१८ रोजी संपुष्टात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागाच्या अस्थापनेमधिल कर्मच्या—यांची कमी लक्षात घेता प्रसंगानुसार शहराच्या विविध समस्या घेउन नागरिक संप, मोर्चा, घेराव, धरणे, व आंदोलने या सारखे प्रकार मोठया प्रमाणावर होत असतात. करीता अधिका—यांना अंगरक्षक तसेच मालमत्तेच्या संरक्षणासाठी यापूढे सुरक्षा रक्षकाची आवशकता लक्षात घेता तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेमध्ये दिवसेंदिवस विस्तार होत असल्याकारणाने सुरक्षिततेच्या दृष्टिकोणातुन महापालिका प्रशासकिय भवन, तसेच चार प्रभाग समित्या, इत्यादी ठिकाणी सुरक्षा रक्षकांची आवश्यकता आहे.

महापालिका सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने स्थापन केलेल्या **सुरक्षा रक्षक** मंडळाकडुन १० सुरक्षा जवानांना ०१ वर्षाची मुदत वाढ देणे प्रस्तावित आहे. मा. सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ मुंबई यांचे दिनांक ०९/०२/२०१८ रोजीच्या आदेशानुसार प्रती सुरक्षा रक्षकास एक महिन्या करीता २२,३६०.००/— तर ९ सुरक्षा रक्षकांना एक महिन्या करिता २,०१,२४०/— तर ९ सुरक्षा रक्षकांना एका वर्षाकरीता २४,१४,८८०.००/— तसेच एका सुरक्षा सुपरवायझर करीता एका महिन्याला २३,९९५.००/— तर एक वर्षा करीता २,८७,९४०.००/— एकुण १० सुरक्षा जवानांना एक वर्षा करीता रक्कम रूपये २७,०२,८२०.००/— येवढा खर्च अपेक्षीत आहे.

मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडुन घेण्यात येणा—या सुरक्षा जवानांच्या पगारात दर दोन वर्षांनी व इतर भत्त्यात दर सहा महिन्याने वाढ होत असते. त्याचप्रमाणे मुळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन, नोंदीत सुरक्षा जवानांचा किमान वेतनावर मुळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन मुख्य मालकाने ४६.७५ टक्के दराने लेव्ही देणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे घर भाडे भत्ता, प्रवास भत्ता, शैक्षणिक भत्ता, रजाकालीन भत्ता व अतिकालीक भत्ता या वर ४.७५ टक्के दराने लेव्ही देणे मुख्य मालकाला बंधनकारक राहिल.

तसेच ज्या विभागामध्ये सुरक्षा रक्षकांना कामगार विमा योजना लागु नाही. अशा मुख्य मालकांनी ४३ टक्के लेव्ही किमान वेतनावर (मुळ वेतन +विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन,) व इतर भत्ते नियमानुसार देणे बंधनकारक राहिल.

सबब. मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडील कार्यरत १० सुरक्षा जवानांना १२/०४/२०१८ पासुन पुढील एक वर्षा करीता मुदत वाढ देणे आवश्यक आहे. त्यावर येणारा खर्च महापालिका अंदाजपत्रकातील अ. १ (२४) आस्थापना रोजंदारी/मानधन इत्यादी या लेखाशिर्षकातील मंजुर तरतुदीतुन करणेसाठी मा. स्थायी समितीच्या प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. :–१२९** **दिनांक:– ३१/३/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मा.सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा नवी मुंबई. यांचे द्वारा पुरवठा करण्यात आलेल्या कार्यरत १० सुरक्षा जवानांनसाठी १२/०४/२०१८ पासुन पुढील ६ महिन्याकरीता मुदत वाढ देणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

नविन १० सुरक्षा रक्षकांची भरती प्रक्रिया करणेस किंवा अनुकंपा तत्वावरील पात्र कर्मचा–यांची सुरक्षा रक्षक म्हणुन भरती करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३ :–** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर १,२,३,४,५ येथे दलित वस्ती निधी अंतर्गत दलित वस्तीमध्ये विकास कामे करणे या निविदेतील कामांच्या निम्न दराच्या निविदाकाराशी संविदा करणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी:–** कोण आहे, या विषयावर माहिती कोण देणार आहे. यामध्ये गोषवारे जर व्यवस्थित वाचन केले तर गोषवा–यामध्ये असे लिहिलेले आहे की तीन लोकांनी टेंडर चा भरण करण्यात आला आहे. झा. पी ॲन्ड कंपनी, एम रामचंदानी, आणि जय भारत कन्सस्ट्रक्शन, आणि तिघंचेही दोन लिफाफे काढले, बरोबर आहे बघा आपण. यामध्ये असे लिहिले आहे की दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावीत करण्यात आले. तिघांचेही! सदर निविदांची सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये छाननी...

**सदस्य,श्री. दिनक सिरवानी**:–झा.पी आणि जय भारत लिहिलेल आहे एम रामचंदानीचे कुठे आहे?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः—</u>**एम रामचंदानी यांची निविदा का उघडण्यात आली नाही?

**<u>उप अभियंता श्री.तरूण सेवकानीः—</u>** हे टेक्नीकल मध्ये डिसकॉलीफाय झाले.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः—</u>**गोषवा—यामध्ये का लिहिलेले नाही. आपण गोषवारा व्यवस्थित वाचा त्याच्यातकाय लिहिलेले आहे. मी आपल्याला वाचून दाखवत आहे.

**<u>सदस्य,श्री. दिनक सिरवानी</u>**ः— ऐवढी मोठी चूक आपण करत आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः—</u>** सदर निवदिांची बांधकाम विभागामध्ये छाननीसमिती मार्फेत छाननी केली असता, झा. पी ॲन्ड कंपनी, एम रामचंदानी, आणि जय भारत कन्सस्ट्रक्शन, यांच्या निविदा अटी शर्ती नुसार असल्याने पात्र आहेत, सर्व तिन्ही, त्यानंतर तरी उपरोक्त निविदाकारांच्या दुसरा भाग उघडण्यात प्रस्तावीत करण्यात आले. यामध्ये तिघंचेही आले आहे यामध्ये एकाचे बाद आहे असे कुठे लिहिण्यात आले आहे. परत त्याच्या खाली लिहिलेले आहे दोघांचे. यामध्ये दोघांचे १टक्के जास्त ०.९९९, आणि तिसरा कुठे गायप झाले. गोषवारा चूकीचा बनवून पाठवत आहेत.

**<u>सदस्य,श्री. दिपक सिरवानी</u>**ः—अंदाजे सांगू श्कता का की रामचंदानी यांचे किती होते काय वैगेरे?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः—</u>**एम रामचंदानी यांना गायब का करण्यात आले आहे. गोषवारा चूकीचा आहे किंवा आपण चूकीचा बनवला आहे दुरूस्त करून घेवून यावे. काय चूकीचे आहे ते जरा सांगावे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u>**ः— बरोबर काय आहे, परिस्थिती काय आहे ते सांगावे.

**<u>कनिष्ठ अभियंता श्री. आश्विनी आहुजाः—</u>**झा. पी ॲन्ड कंपनी आणि जय भारत कन्सस्ट्रक्शन यांचे निविदा उघडण्यात आली.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः—</u>**तिसरे का नाही उघडण्यात आले कारण काय हाते? वरती जेव्हा अटी शर्ती मान्य आहेत असे लिहिले जाते.

**<u>कनिष्ठ अभियंता श्री. आश्विनी आहुजाः—</u>**हे पात्र नव्हते.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः—</u>**पात्र नाही होते तर कारण काय आहे. कारण सांगा ना गोषवा—यामध्ये सर्व लिहावे लागेल.

**<u>सदस्य,श्री. दिपक सिरवानी</u>**ः— याच कंपनीला आम्ही शौचालयाचे काम दिलेले आहे. रू. ६ करोडचे काम एम. रामचंदानी या कंपनीला दिलेले आहे. त्याच्यात काही अडचण नाही यामध्ये कशी काय अडचण येवू शकते.

**<u>कनिष्ठ अभियंता श्री. आश्विनी आहुजाः—</u>**शेवटच्या तीन वर्षातील टर्न ओव्हर नाही होता.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः—</u>**त्यांनी टाकला नव्हता का.

**<u>कनिष्ठ अभियंता श्री. आश्विनी आहुजाः—</u>**त्यांनी अपलोड केलेले नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः—</u>**हे गोषवा—यामध्ये का लिहिले नाही. आता गोषवारा दुरूस्त करून घेवून येणे. निविदा खरेदी रक्कम भरलेली आहे का? तीन्ही ठिकाणी लिहिलेले आहे होय, होय, होय, इशारा रक्कम भरलेली आहे का? सर्व होय, आय टी रिटर्न भरलेले आहे का? सर्व होय, कामाचा अनुभव आहे का? सर्व होय लिहिलेले आहे. पॅनकार्ड आहे का? होय. परत आपण कसे काय म्हणता की त्याचे हे नाही आहे.

**<u>कनिष्ठ अभियंता श्री. आश्विनी आहुजा</u>**ः— गोषवा—यामध्ये चूक आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** काय नाही आहे मला सांगा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः—</u>**मा. आयुक्त साहेब चांगले झाले की आपण वेळेवर आले, मी आपल्याला एक गोषवारा दाखवत आहे, आपले डिपार्टमेंट काय काय करत आहेत, कशा आणि कोणत्या चूका करत आहेत. यामध्ये

स्थायी समिती सदस्यांना अटकवत आहेत, आणि स्वत: ही अटकत आहेत. जरा आपण या गोषवा–याकडे लक्ष दयावे आणि संबंधित अधिका–यांना विचारा की अशाप्रकारचे चूका कोणाकडून होत आहेत.

**सभापती, श्रीम. कंचन अमर लुंडः–**श्री. शितलानी का नाही आले कोणला विचारून सुटटी घेतललेली आहे हे मला सांगावे. कारण की गुरूवारी मी सा.बा. विभागास भेट दिली असता मला ते कार्यालयात नव्हते. ते कोणकडून सुटटी घेवून गेले आहेत आज पण आलेले नाहीत.  ही मिटीग ॲडजान करून ५.३० वाजता घ्यावी. सेवकानीजी हा गोषवारा फेरसादर करून लवकर बनवून घेणेत यावा. या विषयासाठी मी बोलते आहे

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः–**विषयाबददल काय निर्णय घ्यायचा आहे तो आपण घेवू शकता. मेजरटी करून बहुमत घेवून निर्णय घेवू शकतात. परंतु ॲडजान करण्याची गरज नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः–**ॲडजान करत नाही आता.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः–**ते बोलत आहेत म्हणून आम्ही बेलत आहेत.

**सभापती, श्रीम. कंचन अमर लुंडः–**हा जो विषय आहे तो बरोबर करून आणावा

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः–**मॅडम,ॲडजान करत नाही पास करत आहेत, आमचा काही असा विरोध नाही आहे. आपले अधिकारी शेवटी काय करत आहेत. मी असे नाही सांगत आहे की करायचे नाही.

**सभापती, श्रीम. कंचन अमर लुंड**ः– हे चूकीचे करून घेवून येतात आणि कोणी उत्तर देत नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः–**हे बघा एक वेळेस तेव्हा ही असेच झाले होते, की एक रस्त्याचे काम आले होते, सात रस्ते होते यात लिहिले होते की हया ररस्त्याची मान्यता शासनाकडून आल्या नंतर वर्क ऑर्डर दिली जाईल. तो पर्यत टेंडर करा. नंतर एक रोड ५:२:२ मध्ये करा. शासनाची मान्यता आल्यानंतर बजेट मधून काढलेले नव्हते, कसे देवू शकतात. तसेच बाहेर आम्हाला बोलणे ऐकायला लागतात की आपण माझा रस्ता मंजूर नाही करून दिला. आज हया दलित वस्तीला आमचा विरोध नाही आहे. माझा विरोध फक्त प्रशासनाच्या चूकीबददल आहे. जर आम्ही चूका नाही पाहिल्या तर कसे पास करणार.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः–**माझे असे म्हणणे आहे की विरोध आहे तर विरोध राहू दया. आज ही स्थायी समिती मध्ये चर्चा होणार परत ५.३० वाजता घेण्यासाठी बोलावले जाईल.

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी**ः– मी आयुक्त साहेबाना निवेदनकरतो की एवढी मोठी चूक, तीन टेंडर आहेत, तीन टेंडर काढले आहेत खली फक्त दोन टेंडरचा खुलासा दिला आहे एकाचा का दिला नाही?

**आयुक्त श्री. गणेश पाटीलः–** बोला , बोला.

**कनिष्ठ अभियंता श्री. आश्विनी आहुजा**ः– साहेब ही टाईपींग एरर आहे,

**आयुक्त श्री. गणेश पाटीलः–**एकाचे टेंडर आपण काढले नाही.

**कनिष्ठ अभियंता श्री. आश्विनी आहुजा**ः– आयटी रिटर्न नव्हते, आणि तीन वर्षाचे टर्न ओव्हर नव्हते,आणि बीट कॉम्पिटन्सी त्यांनी जमा केले नव्हते.

**आयुक्त श्री. गणेश पाटीलः–**तर आपण होय कसे काय लिहिले. टाईपींग मिस्टेक,

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी**ः– ठिक आहे इथे टाईपींग मिस्टेक आहे. खाली वाचा सर्व ओके  इथे काय लिहिलेले आहे?

**सदस्य,श्री. दिपक सिरवानी**ः–मेजर मिस्टेक आहे. उदया जर कॉन्ट्रक्टर कोर्ट मध्ये गेला, तर काय जस्टीफिकेशन तुम्ही देणार?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी</u>**:—एकाच वेळेस हो किंवा नाही झाले पाहिजे उदया जर का मिडीया मध्ये आले की तीन टेंडर उघडले जातात, सर्व टेंडर ओके आहेत, दोन खोलेले आहेत, आणि तिसरे चौथे २०टक्के बिलो होते तर आमचे इथे मरण होत आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>**ठिक आहेयाच्यामध्ये सुधारणा, जो गोषवारा आहे त्याच्यामध्ये नाही नाही काय तीन बाबी नाही आहेत त्याच्यामध्ये आपण नमुद करूया.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील:—</u>**खालचा पॅरेग्राफ याच्यामध्ये एम रामचंदानी आहे ना.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>**ते पात्र नसल्यामुळे त्यांचा लिफाफा उघडण्यात आला नाही. असे पूढच्या हयाच्यामध्ये लिहा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी</u>**:— आणि हे मंजूर करत आहेत परंतु इतिवृत्तानंतर.

**<u>सदस्य,श्री. दिपक सिरवानी</u>**:— जमनुजी हे जे आपण दिनांक ९/२/२०१८ रोजी शौचालयासाठी मंजूर केले त्यावेळी सुध्दा असे होते, त्यावेळी ही शर्त नाही होती का? ती जूनी कंपनी आहे , आश्विनीजी.

**<u>कनिष्ठ अभियंता श्री. आश्विनी आहुजा</u>**:— सर त्यांनी अपलोड नाही केले.

**<u>सदस्य,श्री. दिपक सिरवानी</u>**:— अपलोड त्याच्याकडून चूकी आहे की आपण डाउनलोड केले नाही.

**<u>कनिष्ठ अभियंता श्री. आश्विनी आहुजा</u>**:— त्याच्याकडून अपलोड झाले नाही.

**<u>सदस्य,श्री. दिपक सिरवानी</u>**:— ठिक आहे, हे मिनीटस् मध्ये आले पाहिजे. नाहीतर नंतर ते असे सांगतील की आमचे काम फेल केले, माझ्या माहिती प्रमाणे १७ टक्के बीलो त्यांनी भरलेले आहे.

**<u>दस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>**निविदा उघडलीच नाही तर आपल्याला कसे काय माहिती झाले.

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारिया:—</u>**जो कंपनी

**<u>सदस्य,श्री. दिपक सिरवानी</u>**:— तरी गोषवारा सगळीकडे जात आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>**नाही नाही हया गोषवा—यामध्ये चूक आहे परतु आपण १७ टक्के बोलत आहात तर हे अजून उघडलीच नाही आहे.

**<u>सदस्य,श्री. दिपक सिरवानी</u>**:— त्यांना पण न्याय मिळाला पाहिजे ना. तीच कंपनी ३वर्षपासून महानगरपालिकेमध्ये काम करत आहे. लहान चूक केली आहे तर त्यांचे पण काम असायला पाहिजे. परतु हयांच्या चूका आम्ही दुरूस्त करत आहोत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>**त्यांनी जर अपलोड नाही केले तर हयांचा दोष नाही आहे.

**<u>सदस्य,श्री. दिपक सिरवानी</u>**:— ते असे सांगतात की हयांनी डाउनलोड केलेले नाही.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>**असे होते काय?

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारिया:—</u>**जे पात्रताधारकांचे नावे आहेत जर त्यामध्ये कंपनीने कोणताही पेपर अपलोड केलेला नसेल तर ती त्यांची चूक आहे. त्याला कन्सीडर करू शकत नाही. नाही तर दुसरा कोणीही येवून सांगेल की माझे चार पेपर कमी होते, माझे चार पेपर कमी आहेत ते कन्सीडर करण्यात यावे. आणि हे दलित वस्तीचे काम आहे खूप महत्वाचे आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी</u>**:— मी पण तेच म्हणत आहे की आमचा विरोध नाही आहे. कामासाठी विरोध नाही आहे. हे ज्या चूका आहेत काही त्रुटी आहेत, गोषवारा दुरूस्त करून घेण्यात यावा.

**<u>महापालिका सचिव:—</u>**मे. झा.पी कंपनी यांच्याशी मान्यता करणेस संविदा देत आहे.त्याच्याकडून पानच बदलून घेते दुरूस्त करून.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ३ :—** सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर १,२,३,४,५ येथे दलित वस्ती निधी अंतर्गत दलित वस्तीमध्ये विकास कामे करणे या निविदेतील कामांच्यानिम्न दराच्या निविदाकाराशी संविदा करणे.

**प्रस्तावना**

सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे उल्हासनगर १,२,३,४,५ मधील मंजुरी मिळालेल्या उल्हासनगर १,२,३,४,५ येथे दलित वस्ती निधी अंतर्गत दलित वस्ती मध्ये विकास कामे करणे या कामाकरीता बी—१ प्रकारच्या दोन भाग (तांत्रिक व आर्थिक) पध्दतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडुन दिनांक १/२/२०१८ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| **१** | प्राकलनीय खर्च | रु. ३,००,०१,०००/— |
| **२** | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १/२/२०१८ |
| **३** | निविदा विक्री कालावधी | दिनांक १/२/२०१८ ते २/२/२०१८ |
| **४** | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १६/२/२०१८ |
| **अ** | प्रथम मुदतवाढ | दिनांक १६/२/२०१८ |
| **ब** | द्वितीय मुदतवाढ | |
| **क** | तृतीय मुदतवाढ | |
| **५** | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक ८/३/२०१८ |
| **६** | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक १६/२/२०१८ |
| **७** | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०५ |
| **८** | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

दिनांक १४/३/२०१८ रोजी निविदा समितीसमोर उल्हासनगर १,२,३,४,५ मध्ये महापालिकेचे असलेले दलित वस्ती निधी अंतर्गत दलित वस्ती मध्ये विकास कामे करणे या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या एकूण ०१ कामांकरीता प्राप्त झालेल्या एकूण ०३ निविदांचा तांत्रिक भाग उघडण्यात आला त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | मे. झा.पी. ॲण्ड कंपनी | मे.ए.एम. रामचंदानी | मे. जयभारत कन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का | होय | होय | होय |
| २ | संस्था/कंपनी यांनी समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे | होय | होय | होय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | का | | | |
| ३ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | होय | नाही | होय |
| ४ | जी.एस.टी. रेजीस्ट्रशन | होय | होय | होय |
| ५ | अदयावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | होय | नाही | होय |
| ६ | ई पी एफ | होय | होय | होय |
| ७ | पॅनकार्ड | होय | होय | होय |
| ८ | कंत्राटदाराची निविदा भरण्याची क्षमता (बिड कॅपासिटी) | होय | नाही | होय |

वरील तक्त्यानुसार तीन निविदाधारकांपैकी दोन निविदाधारक पात्र होत आहे. सदर निविदेला तीनदा मुदतवाढ दिलेला असल्याने वरील दोन पात्र निविदाधारकांचे निविदेचा आर्थिक देकार भाग (Financial Bid) मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांच्या अध्यक्षते खालील निवड समिती सदस्या मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, शहर अभियंता/कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या उपस्थितीत नियमानुसार मान्यता घेवून उघडण्यात आले. त्याप्रमाणे निविदाकारांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | दिलेले दर |
|---|---|---|
| १) | **मे.जयभारत कन्स्ट्रक्शन** | दिलेले दर १.०० टक्के जास्त |
| २) | **मे. झा.पी.ॲण्ड कंपनी** | दिलेले दर ०.९९ टक्के कमी |

उपरोक्त उल्हासनगर १,२,३,४,५ येथे दलित वस्ती निधी अंतर्गत दलित वस्ती मध्ये विकास कामे करणे या कामाचे उक्त निविदाकारांपैकी सर्वात कमी निविदाधारक मे. झा.पी. ॲण्ड कंपनी यांनी दर ०.९९ टक्के कमी दिले असून त्याप्रमाणे मे. झा.पी. ॲण्ड कंपनी यांना सदर काम देणेकरीता शिफारस करण्यात येत आहे.

तरी मे. झा.पी. ॲण्ड कंपनी यांची निविदा मंजुरी मिळणेकरीता मा. स्थायी समितीच्या पटलावर सदरचा प्रस्ताव मान्यता मिळण्यासाठी प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** १३० **दिनांकः— ३१/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निविदा प्रक्रिया केलेल्या उल्हासनगर १,२,३,४,५ येथे दलित वस्ती निधी अंतर्गत दलित वस्तीमध्ये विकास कामे करणे या निविदेतील कामांच्या निम्न दराचे निविदाकार मे. झा.पी. ॲण्ड कंपनी यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** मनपा शाळांतील विदयार्थ्यांना चिक्की पुरवठा करणेकामी सर्वात न्युनत्तम दराचे निविदाकार मे. अंकुर एन्टरप्राईजस यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

**मुख्य लेखा परिक्षक श्री.दादा पाटील.:—**मा. सभापती महोदय, सन्मानीय सदस्य, हा जो प्रस्ताव आहे, हे वित्तीय वर्ष सन २०१७—१८ मध्ये हे आज संपत असल्यामुळे हा प्रस्ताव वित्तीय वर्ष २०१८—१९ चा असल्यामूळे हे चार विषय प्रशासनाकडून मागे घेण्यात येत आहेत.

**महापालिका सचिव :—**काय झाले मागे घ्यायचे आहेत.

**मुख्य लेखा परिक्षक श्री.दादा पाटील.:—**होय विषय क्र. ४,५,६ आणि ७ मागे घ्यायचे आहेत.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :—** मनपा शाळांतील विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संच पुरवठा करणेकामी सर्वात न्युनत्तम दराचे निविदाकार मे. मानसी महिला संस्था यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** मनपा शाळांतील विदयार्थ्यांना बुट मोजे पुरवठा करणेकामी सर्वात न्युनत्तम दराचे निविदाकार मे. अंकुर एन्टरप्राईजस यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :—** मनपा शाळांतील विदयार्थ्यांना गणवेश पुरवठा करणेकामी सर्वात न्युनत्तम दराचे निविदाकार मे. ऑनेस्टी सायन्टीफिक यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—**मागे घेतले. यामध्ये आज बजेट मंजूर होत आहे, कारण की आज ४ वाजता बजेटची मिटींग आहे. याबरोबर मी प्रशासनास माझे असे म्हणणे आहे, की जसे बजेट मंजूर होईल, नालेसफाई करण्याचे कामाचे टेंडर काढले पाहिजे. पाटोल्सचे काम अजूनपर्यंत पूर्ण झालेंले नाही आहे. तर ते काम पूर्ण केले पाहिजे यासोबत जर का जरूरत असेल तर पावसाळयाच्या वेळी पाटोल्सचे जे मागच्या वर्षी आम्हाला भरपूर त्रास झाला होता. तो त्रास हया वर्षी होणार नाही यासाठी पावसाळयापूर्वीच्या कामाची तयारी केली पाहिजे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—**पाटोल्स, माहीत आहे.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—**एक नालासफाईचे काम पावसाळयापूर्वीचे काम असते. आणि दुसरे असते पाटोल्स चे काम. पावसाळयापूर्वी, पावसाळयात, आणि पावसाळयानंतर रस्त्याच्या खड्डयासाठी पहिले टेंडर मागविण्यात येते. मागच्या वर्षी प्रशासनास आम्ही ५ (२) (२) मध्ये काम करण्यास सांगितले होते. परंतु काही कारणामुळे ते काम होवू शकले नाही. टेंडर काढण्यात आले टेंडरला तीन वेळा मागविण्यात आले. त्यामध्ये प्रत्येक वेळेस काही ना काही होत गेले आणि दिवाळीनंतर वर्क ऑर्डर दिली गेली. गणपती चालीया साहेब व्रत झाल्यानंतर दिवाळी मध्ये वर्क ऑर्डर मिळाली.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**आता जे काम वाढवून दिलेले आहे पाटोल्स चे काम अजून कुठे झाले नाही.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—**ते काम चालू आहे पण संथ गतीने चालू आहे. जसे निंबाळकरजी आयुक्त होते तर माझ्या वार्डात एका जागेवरती कंपोस्ट फीट चे उद्घाटन करण्यासाठी आले होते. पब्लीक ने त्यांना सांगितले की साहेब झुलेलाल स्कुल बाजुला आहे. त्याठिकाणी ३५०० विदयार्थी शिक्षण घेत आहेत. रोज रिक्शा, वॅन येत जात असते, विदयार्थी पायी चालत सुध्दा येतात. तिथे काही पाटोल्स होते तर साहेबानी सांगितले की तीन दिवसात करून देण्यात येईल. साहेबांची बदली झाली ही वेगळी गोष्ट आहे. परंतु प्रशासनाने आपर्यंत त्याच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही आहे. ते पाटोल्स आजपर्यंत पेंडीग आहेत. याप्रकारे अजून आमचे सदस्य आहेत, त्यांनी कित्येक वेळा सांगितले आहे, पत्र दिलेले आहे, पाटोल्स चे काम आजपर्यंत झालेले नाही आहे. पावसाळयात खडडे पडले आणि आज ३१ मार्च आहे, तर अजून पाटोल्स भरलेले नाही आहे. ही फार दुर्भग्याची गोष्ट आहे. याकडे सा.बा. विभाग लक्ष देत नाही आहे. आम्ही आपल्या कडून ही अपेक्षा करत आहोत. याकडे आपण निश्चित लक्ष दयाल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**जसे आपण कल्याण कडून प्रवेश करतो शंतीनगरकडून उल्हासनगरकडे येतो तिथे सुध्दा खूप खडडे पडलेले आहेत. मी मागच्या मिटींग मध्ये बोलेलो होते परंतु माझे बोलणे कोणी लक्षात घेतच नाही. ही दुख:द बाब आहे.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—**आणि दुसरे येणारे जी गर्मी आहे, परिस्थिती आहे, जून पर्यंत पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याचे म्हणणे असे आहे जून च्या शेवटी पडेल पाऊस, तर टॅकर्स जे आता लागणार आहेत, हया कठीण तीन महिन्याच्या परिस्थितीमध्ये एक शेवटी जिथे पाण्याची आवश्यकता आहे जिथे टॅकर्स लागतात तर टॅकर्सच पण ताबोडतोब टेंर्स मागवणे ,मागच्या वर्षत पण टेंडर मागविले नाहीत. टेंडर मागवून ते लवकरात लवकर ते चालू आहेत त्याला अजून मान्यता नाहीत. तो ठेकदार काय म्हणतात ते आपल्यावर उपकार केल्यासारखा चालवतोय, तो एक विषय जरा बघून घ्या. तिनच टॅकर्स तिथे उपलब्ध आहेत. पूर्वी १५ ते २० टॅकर असायचे तिथे ३ टॅकर्स आहेत, आता काय वाढणार आहे. आणि पाण्याच्या प्रश्नामुळे प्रशासन आणि नगरसेवक यांची भांडण व्हायला खरे कारण आहे. खरे कारण ही पाण्याची समस्या आहे. आणि जर पाण्याची समस्येला आपण जर व्यवस्थित टॅकल केले दुस—या मार्गाने जर पाणी देण्याचा प्रयत्न केला आपत्ती काळात तर मग नगरसेवक पण जास्त आग्रही नसतात. ठिक आहे बाकी रूटींगमध्ये होत राहील. तर हया गोष्टीचे पण लवकर जशा हया दोन गोष्टी सांगितल्या, लवकर टेंडर होवून कसे काय होईल, त्याला मान्यता नाही आहे त्यामुळे तो टॅकर्स वाढवत नाही आहे. दोन ते तीन टॅकर्स देतो त्यामुळे नगरसेवकांची आपसामध्ये भांडणे होतात, मला दया म्हणून, टॅल ॲन्ड लॅ आमची अवस्था कशी आहे, एक बोडारे साहेबांचा वार्ड एक माझा वार्ड आणि ज्या ठिकाणी कमी पाणी येते, पाणीच कमी येते च४० मिनीटे ३० मिनीटे येते त्या ठिकाणी मोठमोठया इमारती असताना त्याना पाणी लागते.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—**टॅकर मध्ये काय झाले की टॅकर आपण लावले, टॅकर फील करायला कुठूनतरी आपल्याच पॉईट वरून फील करावे लागतील, त्यामुळे टॅकर फिलींगमुळे जास्त पाणी गेले मग वार्डामध्ये पाणी पोहचत नाही त्यामुळे ते आता जर आपण बघितले दोन तीन दिवसापासून तर कॉन्ट्रडक्टरी मागण्या फार येत आहेत. काही लोक म्हणतात की टॅकर सुरू करा काही म्हणतात की सुरू कशाला करता त्याच्यामुळे ते फिलींग करायला पाणी लागते त्याच्यामुळे पाणी आम्हाला पोहचत नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**पूर्वी साधारणत: १०० ते १५० टॅकर भरत होते, आता हार्डली टेल च्या शेवटी आहेत, एकदम खरोखर म्हणजे पर्याय केल्या नंतर सुध्दा यांच्या कडून पाणी पोहचू शकत नाही. पाणी पोहचत असेल तर चांगली गोष्ट त्यांनी फिरावे. आठवडाभर त्यांनी तिकडे पाहाव आणि मग तो रिपोर्ट त्यांनी दयावा. पाणी पोहचत नसेल तर त्या लोकांना पर्यायी व्यवस्था आपली असलीच पाहिजे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—**नाही,पर्यायी व्यवस्था करणेबद्दल दुमत नाही आहे. प्रश्न कसा आहे की जी प्र्यायी व्यावस्था आपण करतो, ती आपण कुठून तरी टॅकर भरतो, जो फिलींग पॉईट आहे, फिलींग पॉईट पासून जो आहे मग पाणी जे होत ते नैसर्गिक जो रोजचा फ्लो आहे त्यातून कलटेल होवून जातो दृआणि मग त्या लोकांची ओरड येते.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**बरोबर म्हणजे,टॅकर नको आहेत असे तुमचे म्हणणे असेल,

**कार्यकारी अभिंयता श्री. एस. के. सेल्वन:—**नाही, नको नाही ना साहेब, सर आम्हाला नाही आहे पण काही लोक त्याच्यामुळे कमी पाणी पूरवठा त्यांच्या भगाताल होतो, म्हणून टॅकर चालू करू नका म्हणून हे करतात.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**यावर तुमचे प्रशासनाचे काय म्हणणे आहे.

**कार्यकारी अभिंयता श्री. एस. के. सेलवन:—**काही ठिकाणी एकदम शेवटचे टोकाचेएमआयडीसीचे पाणी बंद झाले, तर दोन तीन दिवस पाणी त्या भागात जात नाही. परंतु त्या भागाकरीता आपण व्यवस्था केलेली आहे सर, पण लोकांचे म्हणणे आहे की आता कॅम्प ४ आणि ५ अल्टरनेट चालू आहे सर, एक दिवस कॅम्प ४ असेल तर एक दिवसकॅम्प ५ नंबरला. परंतु ५ नंबरला पाणी चालू असताना ४ नंबरला टॅकर देवू नये असे जे म्हणणे आहे ते बरोबर वाटते. नाहीतर ४ नंबरमध्ये पूर्ण भागामध्ये पाणी नसते. पण शेवटच्या भागाचे पाणी येवून गेले तर टॅकरनी ऑब्जेक्शन घेतात.

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी**:—त्रास हया गोष्टीचा आहे की ज्या दिवशी ४ नंबरचे पाणी बंद असते, त्या दिवशी ५ नंबर येथून टॅकर भरून ४ नंबर मध्ये दिले जाते, त्यामुळे ५ नंबरच्या लोंकांना पाणी मिळत नाही. त्यांची मागणी अशी आहे ५ नंबरची नगरसेविका श्रीम.मीना सोंडे यांनी महासभेमध्ये सुध्दा दिले होते, ज्या दिवशी यांचे पाणी चालू असेल त्या दिवशी त्यांना टॅकर दयावे. ज्या दिवशी यांचे पाणी चालू असेल तर टॅकर दयावे सगळयांना दयावे, कॅम्प ५ नंबरचे ज्या दिवशी पाणी चालू आहे तर ५ नंबर मध्ये टॅकर दयावे. ४ नंबरचे पाणी चालू असेल तर ४ नंबरमध्ये टॅकर दयावे. ४नंबर चे पाणी बंद असेल आणि टॅकर द्वारे पूरवठा करत असतील तर बंद चे काही अर्थच नसेल.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**टॅकर जास्तीत जास्त ८ किंवा १०.

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी**:— नाही ५० मागवा ना. परंतु ज्या दिवशी पाणी असेल त्या दिवशी देण्यात यावे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—**ज्या दिवशी बंद आहे त्या दिवशी टॅकर सुध्दा पाणी देण्यात येवू नये. ज्या दिवशी बंद आहे त्या दिवशी बंदच पाहिजे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**आता कॅम्प १, २, ३, ला समजा टोनी सिरवानी यांचा वार्ड आहे, तिकडचे लोक येतात आमच्या कडे सकाळी पाणी आहे, दुपारी पाणी आहे आणि संध्याकाळी पाणी आहे. आणि इकडे दिवसाआड पाणी फक्त....

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—**निंबाळकर साहेबांनी दुस—या वेळेचे जे पाणी होते, आम्ही आणि चौधरी साहेब यांनी भरपूर वेळा पाण्याचा मुददा घेतला, त्यावेळी त्यांनी दुस—या वेळेस सुध्दा पाणी चालू केले नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**पहले जे कमीशनर होते त्यांनी महानगरपालिकेच्या पाण्याचा जो विषय होता पाण्या बाबत पैशाचा बचाव केला होता.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—**माझ्याकडे अलंकार बिडींग आहे , पाणी येते फक्त ४० मिनीटे, आणि ६ कनेक्शन आहेत काय त्यांना पाणी मिळणार. प्रत्येक घराला आम्ही एक कनेक्शन देतो, आणि एक दिवसाआड पाणी.

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी**:— टॅकर साठी विरोध नाही आहे. समजा आज सोमवारी पाणी आहे, आपण कितीही टॅकर घेवून जा, मंगळवारी पाणी बंद आहे तर प्रत्येक जण टॅकरची मागणी करतील.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—**त्यांचे म्हणणे बरोबर आहे, परंतु गायकवाडयातून ज्या ठिकाणापासून पाणी येत आहे त्या ठिकाणापासून भरले तर जास्त फरक पडत नाही. गायकवाडपाडयातून का भरत नाही. सेलवन साहेब,

**महापालिका सचिव :—** ४ वाजले महासभेची वेळ झाली आहे.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—**एक सेंकद थांबा जरा, महत्वाचा विषय आहे. आमच्या जीवना मरणाचा विषय आहे.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—**ठिक आहे अर्धातास थांबून महासभा चालू करू शकतो.

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी**:— महासभेमध्ये चर्चा करू या.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—**दोन मिनीटात विषय संपवितो. गायकवाडपाडयातून भरू शकतो का आपण त्या गायकवाडपाडयाला फरक होवू शकतो. सांगा साहेब.

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी**:— आपण तिकडे कसे घेवून जाणार ५ नंबरवरून ४ नंबरला.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**ठिक आहे आपल्या वार्डात जर बिल्डींग आहे,

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी**:— नाही नाही परत माझ्या वार्डात शुक्रवारी पाणी बंद आहे आपण दुस—या ठिकाणाहून टॅकर भरून माझे वार्डात दयावे. असे कसे आहे. ज्या दिवशी पाणी नाही, त्या दिवशी टॅकर कसे देणार.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—**ज्या दिवशी पाणी बंद असेल जो ऑफ दिवस असेल त्या दिवशी टॅकरला पण सुटटी पाहीजे,

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**काय साहेब आपण बघायचे,त्या दिवशी मग तुम्ही दोन टॅकर दया त्यांना. कारण ४८ फ्लॅट ४ हजार लिटर आजिबात पाणी जात नाही तिथे. कांदबरी अपा. मेघदूत अपा. पाणी जाते का? तुमच्या हददीमध्ये आहेत पाणी पूरवठा करणे कोणाच्या हातात आहे. महापालिकेचेच काम आहे त्यांना जर मुबलक नाही तर पुरेशे तर दया. पुरेशे ही पाणी मिळत नाही.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—**साहेब आता माझ्याकडे बुधवारी पाणी आले बुधवारी पाणी आल्यानंतर आता शनिवारी आज पाणी येईल.जेव्हा पाणी चालू होते तेव्हा जवळ जवळ ३६ तास पाणी शुध्दीकरणसाठी जातात. पाईन लाईन भरायला त्यांची एमआयडीसी चे म्हणणे असे आहे. बुधवारी पाणी मिळाले आहे गुरूवार नाही शुक्रवार बंद,गुरूवारी ५ नंबरला होते. आता शनिवार उदयाच आहे, आज शनीवार, आज पाणी मिळणार नाही. म्हणजे आलेले नाही ब—याच ठिकाणी आलेले नाही, काही ठिकाणी कमी फोर्स आहे.आज नाही मिळाले म्हणजे त्यांना पाणी आता सोमवारी मिळणार. म्हणजे बुधवार नंतर सोमवारीच संध्याकाळी पाणी त्यांना मिळणार. त्या माणसानी जायचे कुठे?

**सभापती,श्रीम. कंचन अमर लुंड:—**कॅम्प ४ नंबरवाल्याना फरक पडत आहे, शनिवारच्या दिवशी आमच्या भागामध्ये पाणी मिळतच नाही. परत रविवारी पाणी मिळत नाही त्यासाठी टॅकर्स तर पाहिजेत.

**सदस्य,श्री. दिपक सिरवानी:—**बोडारे साहेब,मागच्या वर्षी एवढा त्रास नव्हता या वर्षी एक दिवसाआड असे का झाले? लोकसंख्या तर एवढी नाही वाढली.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:— त्याठिकाणी जेव्हापासून बंद झाले तेव्हापासून एक दिवसाआड केले आहे. तेव्हापासून काहीच फरक नाही आहे. काही सुधारणा कारण्याचा प्रयत्न ही केला जात नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**महासभेचा एक प्रश्न होता ५० एमएलडी पाणी पाले गावातून ४व ५ नंबरला मिळत होते, त्याचे ४० एमएलडी कुणी केले त्याचे उत्तर तुम्ही नाही दिले आणि तुमच्या अधिका—यानी ही नाही दिले.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:— ४० एमएलडी पण नाही ३५ एमएलडी पाणी झाले आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— ते पाणी कोणी कमी केले आणि कशासाठी आणि कोणाच्या सांगण्यावरून कमी केले, हयाचेच उत्तर पाहिजे होते परंतु दिले नाही.

**सभापती,श्रीम. कंचन अमर लुंड**:— एमआयडी अधिका—याबरोबर मिटींग घेण्यात यावी व आम्हाला सुध्दा त्या मिटींग साठी बोलावण्यात यावे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:— आजचा विषय तो यांनी हया साठी आणलेला आहे, की आपत्तीकाळात आपल्याला जास्त पैसे दयावे लागतात. टॅकरची आवश्यकता असेल नसेल पण इकडचे टेंडर निविदा काढून ठेवा, त्यानंतर पाटोल्सची आगोदरच काढून ठेवा नाही तर गणपती आले मग..

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—**नाही, ते काढू, पाटोल्सचे काढू, टॅकर चे काढू.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—**दुसरा एक विषय आहे, आता तापमान वाढत आहे, पाण्याची समस्या आजून वाढणार आहेत. तर सन २०१५ मध्ये काही ४०१ बोरींग काढले होते. त्यापैकी जास्तीत जास्त बोरींग बंद आहेत. त्या बोरींग दुरूस्तीसाठी कमीत कमी एक निविदा काढावी.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— नविन कुठे बोरींग मारायचा असेल ते पण घेतले पाहिजे. आता मी एक बोरींग चे उदाहरण देतो, रोडचे काम चालू झाले ती बोरींग दबले गेली.

**सदस्या, श्रीम. पंचम कलानी:—** सर, मी एक याबाबत प्रस्ताव दिलेला आहे, मी लक्षवेधी टाकली आहे परंतु ही लक्षवेधी पुढच्या महासभेत येईल. यासाठी हया प्रश्नाचे उत्तर आपल्याला लवकर प्रीपेयर करावे लागेल. सूचना तर आगोदरच आली आहे की पाणी कमी होणार आहे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—**मी.वाचले

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— मागच्या वेळेला जाणून बूजून पाणी प्रश्नावर दुर्लक्ष केले, अधिका—यानी केले आणि प्रशासनाने केले, आणि जेव्हा जेव्हा पाणी प्रश्नाच्या वाढीव बाबत बोललो, कोटयाच्या बाबतीत बोललो, पाणी वाढवा बोललो तर लक्ष न देता जिथे गरज आहे लोकांना त्रास आहे, लोक पाणी पाणी करत आहेत, पाऊस जास्त पडल्यानंतर पण तर ते पाण्याकडे जाणून बजून लक्ष दिले नाही, आमची अपेक्षा आहे तुम्ही आता आयुक्त साहेब आता हया पाण्याच्या प्रश्ना कडे आपण चांगले लक्ष दयावे.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—**यामध्ये काय झाले ते मी सांगत आहे, की निंबाळकर साहेबांनी पैशाची बचत केली, प्रत्येक महीन्याला रू. ५० लाखाची बचत केली आणि पाणी एमआयडीसी कडून कमी घेण्याचे चालू केले. आता त्यापासून असे प्रश्न निर्माण होत आहेत की माझ्या वार्डात काही भाग टेल च्या शेवटी असे आहेत ज्याठिकाणी सकाळी पाणी पोहचत नाही संध्याकाळचे पाणी मिळते. माझ्या वार्डत साहेब असे आहे एक ठिकाणी काही भागात सकाळी पाणी आले तर बिल्डींग वाले मोटर चालू करतात. मागे शेवटी पाणी पोहचत नाही. दुस—या वेळेस जर पाणी आले तर सुरूवातीचे आहेत ते बंद करतात मोटर, आणि मागच्या लोकांना पाणी मिळते. तसेच विजेच्या सुध्दा अडचणी वाढतच आहेत. ज्यावेळेस पाणी येत असेल त्या वेळेस जर लाईट बंद होत असेल तर दुस—यावेळेस जर पाणी नाही आले जर आम्हाला २४ तास पाण्याची वाट पाहावी लागत असते. तर आमचे म्हणणे असे आहे की जे ५० लाख रूपयाची बचत करून आपण पाणी कमी केले,त्याच्यापासून देखील भरपूर त्रास वाढला आहे. त्याचे सुध्दा आपण असेंसमेंट करावे, तसेच जर पाणी जर परत पहिल्यासारखे परत चालू केले,कारण की तो आमचा आरक्षित कोटा आहे तो मिळाला पाहिजे. आणि दुसरे काय असते की आपण जर पाणी घेतले नाही तर पुढे जाऊन जो कोटा आहे तो संपून जाईल.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—**पाणी तर घेत आहेत, कोटया पेक्षा जास्त घेत आहेत. ११० एमएलडी चा कोटा आहे १६० एमएलडी पाणी घेत आहेत.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—**साहेब १२० एमएलडी चा कोटा आपला मंजूर आहे, आणि सन.२००५ साली आपल्याला ५० एमएलडी अजून मिळालेले आहे, सन २००५ पासून अजून ऑर्डर झाली नाही. त्या दिवशी म्हणून किणीकर साहेबानी आंदोलन केले, त्या आंदोलनानंतर ३ तारखेला बैठक लागलेली आहे, मंत्रालयात बैठक लागलेली आहे त्याच्यामध्ये इरीगेशन, एमआयडीसी, लोकसंख्या..

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—**मिराभांयदरची लोकसंख्या आपल्या शहराच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे, त्यांना ११० कोटा आहे.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—** नाही नाही, साहेब,

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:— यांनी सांगितले २४ तास आम्ही आपल्याकडचे प्रॅक्टीकल सांगतो, मंगळवारी समजा ४ नंबरला पाणी असेल, तर बुधवारी ५ नंबरला, ४ नंबरला पाणी येणार नाही. गुरूवारी ४ नंबर पून्हा, त्या गुरूवारी जर लाईट गेली फक्त अर्धा तास पाणी आहे. त्यावेळी जर लाईट गेली तर गुरूवारी पाणी मिळत नाही म्हणजे मंगळवारी पाणी मिळाले,गुरूवारी लाईट गेल्यामुळे मिळाले नाही. शुक्रवारी बंद, शनिवारी पून्हा ५ नंबर, म्हणजे मंगळवारी पाणी मिळाल्यानंतर रविवारी हे पाणी मिळायला लागले. ही आमची परिस्थिती.

**सभापती, श्रीम. कंचन अमर लुंड**:– कम्प नंबर ४ मधील नागरीकांची पाण्याच्या समस्ये बाबत खराब परिस्थिती आहे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:–**नाही, काय होते की पाणी येत नाही म्हणून लोक पाणी खूप साठवून ठेवतात. नंतर पाणी आले की हे पाणी फेकून देतात परत नविन पाणी भरून ठेवतात. त्याच्यामुळे जास्त अडचणी निर्माण होतात. रायझींग मेन वरती लोक कनेक्शन घेतात, टाक्या वेळेवरती भरत नाहीत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:– त्यासाठी आपण जेएनएनयुआरएम ची योजना होती ती बारगळवली.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:–**नाही, नाही, त्या योजनेबददल सांगतो आहे. तशी जी राईजींग मेन आहे टाकीची त्याच्यावरून लोकांनी कनक्शन टाकले आहेत. आता हे कनेक्शन टाकले की होते काय की भरायला जे प्रेशर पाहिजे ते प्रेशर कमी होवून जाते. प्रेशर ड्रॉप झाल्यामुळे टाकी भरत नाही. हे सगळे सिस्टम मधले अडचणी आहेत त्या रेक्टीफाय कराव्या लागतील त्या त्याचे साठी तुम्ही लोकांनी पण सहकार्य करायला पाहिजे.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:–**साहेब त्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी अनधिकृत कनेक्शन झाले आहेत, पाणी पूरवठा विभागाचे काम आहे,अनधिकृत कनेक्शन शेधून खंडीत करणे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:– कापडणीस साहेब होते तेव्हा त्यांनी स्वत: जावून तोडले होते.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:–**आतापर्यत यामध्ये पीआयएल सुध्दा झाली आहे. पीआयएल मध्ये सुध्दा मा. उच्च न्यायालयाने आदेश दिलेला आहे की जे अनधिकृत नळजोडण्या आहेत, ते खंडीत करण्यात यावे. आपजर्यंत किती खंडीत केलेले आहेत?

**आयुक्त श्री. गणेश पाटील:–**हेच त्यांना मी विचारले असता स्थानीकांचा याला विरोध आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–**साहेब ,याला जर आपण आज हे नियत्रणांत घेतले नाही तर दोन महीन्यात दुप्पट होवून जातील.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:–**सेलवनतुम्ही ड्राईव्ह घ्या हातामध्ये, अनधिकृत नळजोडण्या शोध मोहिम,तसेच अनधिकृत नळजोडण्या खंडित करणे.

**सदस्य, श्री.कलवंतसिंग सोहटा:–**सर पहिले हे विचारा की अधिकृत कनेक्शन किती आहेत.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:–**अधिकृत कनेकशन कशाला म्हणतात. ही पटटी तर सर्व टॅक्स मध्ये जात आहे. कोणी मीटर लावलेला नाही आहे कोणाला म्हणायचे अनिधिकृत कनेक्शन.

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी**:– काही दिवसापासून घरपटटी बिलामध्ये केल त्या दिवसापासून सर्व अधिकृत झाले. मेन लाईनवरील जे कनक्शन आहेत ते खंडीत करण्यात यावी. मेन लाईनवरील असलेली जी कनक्शन आहेत ती सोडून सर्व अधिकृत आहेत.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:–**मेन लाईन वरील कनेक्शन बंद करा.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:–**रायझींग मेन सुध्दा आहेत आणि डिस्ट्रीब्युशन मेन ही आहेत, त्याच्यावरती सुध्दा घेतलेली आहेत. ४ नंबर पासून ५ नंबर पाणी जात आहे, १ नंबरपासून ३ नंबर पाणी जात आहे, त्याच्यावरती सुध्दा कनेक्शन घेतलेले आहेत, डिस्ट्रीब्युशन मेन वरती पण कनेक्शन घेतली जावू नयेत.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:– साहेब सन २०१२.१३ मध्ये पाणी पूरवठा विभागाचे सभापती होतो, त्यावेळी पाले मधून ५८ एमएलडी पाणी येत होते. आणि आजच्या तारखेमध्ये ४० एमएलडी तर साहेब १८ एमएलडी खूप कमी झाले आहे. निंबाळकर साहेबाच्या वेळी किंवा कोण मिसगाईड केले असेल,परंतु पाणी समस्या तर आहेच.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:– मंगळवारी मिळाल्यानंतर जर गुरूवारी लाईट गेली तर रविवारी पाणी त्याना मिळेल.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—**एमआयडीसी ची आपण जी मिटींग घेतली, त्यामध्ये एमआयडीसी ने स्पष्ट सांगितलेले आहे, की पाणी आपण तुमच्या मागणीपेक्षा( रिक्वायरमेंट )पाणी जास्त देतो, लोकसंख्येपेक्षा पण जास्त पाणी दिले जाते. मीटर लावा तुमचे डिस्ट्रीब्युसन नेटवर्क आहे ते तुम्ही चांगले करा, कॅम्प १,२,३, ला जास्त पाणी येते तर ४व ५ ला कमी पाणी येते.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— नाही नाही आमच्याकडे सुध्दा पाण्याची समस्या आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—**टेल एण्ड मध्ये सगळीकडे त्रास आहे, वडोल गाव आहे, इमलीपाडा आहे, रमाबाई शाळा आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— आपला जेव्हा विषय येतो मिटर लावण्याचा, ते मीटर लावण्यासाठी किती महिने लावलेत आपण आगोदर पैसे भरलेले आहेत.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—**नाही, झाले त्यांचे टेंडर झाले वर्क ऑर्डर निघणार आहेत आता एक दिड महिन्यात ते मीटर लावणार आहेत.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—** साहेब तुम्हाला सांगतो ते खोटे पडणार आहेत उघडे पडणार आहेत, म्हणून ते लावत नाहीत. असे आमचे म्हणणे आहे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील**:— साहेब टेंडर झाले नव्हते.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—** साहेब टेंडर झाले आता, एक, दीड महीना कशाला लागायला पाहिजे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील**:— ते आता ऐप्रील मध्ये लावणार आहेत.सांगितले त्यांनी आम्हाला.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—** साहेब पैसे त्यांना आगाऊ दिलेले आहे. आणि ऐप्रील मध्ये नाही ते जून मध्ये सुध्दा लावणार नाहीत. आणि ३ तारखेला पहिला हाच विषय मी उचलणार आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:—दोन मिनीटात संपवित आहे पाण्याचा विषय निघला म्हणून , मागच्या वेळेला इथले आयुक्त पनवेल ला गेले, आणि पनवेलचे आयुक्त इथे आले, सुधाकर शिंदे , त्यावेळेला पण अशीच चर्चा झाली. त्यांनी पाणी वाढवून घेतले त्यावेळेला पाण्याच्या तक्रारी कमी झाल्या होत्या. सेलवन इथे आहे, तेच अधिकारी आहेत तेच कर्मचारी आहेत, तेच डेप्युटी आहेत त्यांना विचारू शकता, ते सांगू शकतील तुम्हाला. तेव्हा पाणी मिळत होते त्यानंतर यांनी जाणून बूजून कमी केले, निंबाळकर साहेबांना पैसे जास्त जातात म्हणून पैसे वाचवण्यासाठी आणि म्हणून त्रास सुरू झाला तो आतापर्यत. अनेक वेळा हा प्रश्न सांगितला, महासभेत झाला स्थायी समिती मध्ये झाला, पण त्याचेवर उपाययोजना निघाली नाही. ते आपण काढावे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:— आता पर्यत त्यांना पाल्यावरून देण्यात त्रास होता असे ते एमआयडीसी वाले सांगत होते. आता रायझींग मेन च्या ३ नंबरला घेतात, त्यामुळे आतापासूनच तुम्ही आमचे ५८ एमएलडी पाणी मिळत होते.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— नविन एमबीआय मध्ये किती एमएलडी पाणी मिळत आहे?

**महापालिका सचिव:—** महासभेचा विषय आहे.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—**साहेब महासभेसाठी वेळ झाला आहे, पाण्याचा विषय साहेबानी काढला मी बोरींगचा विषय काढला.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ८:— मालमत्ता क्र. 51DI019599100 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीमध्ये भारती इन्फ्रटल लि.

या कपनीचा मोबाईल टॉवर निष्कासित करण्यात आल्याने भाडोत्री गृहीत धरून करण्यात आलेली नोंद रद्द करून अतिरिक्त कर आकारणी रक्कम रू. 359222 + विलंब शास्ती निर्लेखित करणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी**:— हे विषय क्र. ८ ते १६ एकत्र घेण्यात येत आहेत. ८ ते १६ पर्यत सारखेच विषय आहेत. ८ ते १६ पर्यत विषय आले आहेत, आपले जे वार्ड क्र. १ ते ५८ पर्यंत, जी आमची टॅक्सची पध्दती आहे. त्याचे विषय आणले गेले आहेत. आणि ९० करोड रूपये, सर्व ५८ वार्डमध्ये सर्वाची एकूण रक्कम आहे. असे ९० करोड रूपये निर्लेखित करण्यासाठी आणण्यात आले आहेत. यामध्ये माझे भरपूर प्रश्न आहेत. वेळ फार कमी आहे. यामध्ये अशा किती मालमत्ता आहेत, त्यानी १० वर्षपेक्षा जास्त पैसे भरलेले नाहीत. काही अशा ही मालमता आहेत की त्यानी दोन वर्षपूर्वी भरलेले आहेत परंतु आता दोन वर्ष भरलेले नाहीत व त्यांचे निर्लेखित केली जाणार, अशा मालमता किती आहेत. हयाचा सुध्दा खुलासा झाला पाहिजे. दुसरे मी मा. आयुक्त साहेब आपणास निवेदन करत आहे, की ही रू. ९० करोड रूपयाची गोष्ट आहे. ही साधी गोष्ट नाही आहे. या मध्ये अशा भरपूर मालमत्ता असू शकतात, ज्यानां आम्ही निर्लेखित करणार.आणि येणा—या वेळात परत असेसमेंट करून नविन टॅक्स बनविणार,यामध्ये अर्धे लोक बरोबर असतील अर्धे लोक चूकीचे असणार, तरी ४५ करोड रूपयाचे नुकसान होणार. महीला बचत गटाकडे आम्ही काम दिले होते. त्यामध्ये २०० महिला रू.५०० प्रतिदीन प्रमाणे कामावर ठेवले होते. ज्यांनी आपले पूर्ण विलांचे वाटप केले. ज्यामध्ये आपल्या चांगली सफलता मिळाली. पहिले आपण कुरीयरद्वारे विले पाठवण्यात येत होती. यामध्ये २० ते ३० टक्के बिल जात होते ७० टक्के बिले परत येत होती, आणि आम्ही महिला बचत गटाकडे बिले वाटप करण्यासाठी दिले त्यांनी ८० टक्के बिलांचे वाटप झाले व २० टक्के परत आले. तर माझे आपल्याला असे म्हणणे आहे की ५८ वार्ड मध्ये ५,५ महीला प्रत्येक वार्ड मध्ये असे करून ३०० महिला कामावर ठेवल्या जातील. ३०० महीलाना रू.५०० प्रतिदीन प्रमाणे दोन महिने ठेवून एक एक वार्ड ५,५ महिलांना देण्यात यावा. हा ५ महिलांचा ग्रुप आहे. एक वार्डाचे बिले देण्यात यावी. जर एका एकाने १० घर जरी शोधून दिली तरी त्यांचा पगार निघून जाईल. आणि जर जास्त मिळाले तर ५० करोड मिळाले असे होईल. हे निर्लेखित करण्या आगोदर तीन महिन्याचा वेळ ठेवला जावा, त्यामध्ये सर्व ठिकाणी नोटीस बार्ड ठेवला जावा आणि प्रत्येक प्रभाग समिती कार्यालयामध्ये, महानगरपालिकामध्ये पूर्ण पूस्तके बूक ठेवली जावी की ही मालमत्ता आम्ही निर्लेखित करत आहेत कोणाची आहे त्यांनी येवून बघावी, आणि महिला बचत गटाकडे हे काम देवून तीन महीन्यापर्यत एक वेळा परत हे शोधण्याचा प्रयत्न केला करण्यात यावा. यानंतर आम्ही निर्लेखित केले तर हे बरोबर असेल असे मला वाटते.

**उप आयुक्त श्री.दादा पाटील**:—दोन मिनीटे मला बोलायला दया याच्यामध्ये, गेली वर्षभर मी त्या टॅक्स विभागामध्ये काम करतो आहे या विषयावर, ६६६५ प्रकरणे जी ५ ते ६ वर्ष तुमच्याकडे प्रलंबीत होती, आणि खूप लोक त्या विभागात यायचे, ते ३१ डिसेबंर २०१७ ला पूर्ण पाठीमागचे सर्व १००टक्के प्रकरणे पूर्णम्हणजे काय जी कारवाई करायची असेल ती करून पूर्ण केले. गेली वर्षभर हे जे निर्लेखित करायचे प्रपोझल आहे, तुम्हाला प्रत्येक प्रॉपर्टी नुसार निरीक्षकाने सही करून दिलेली आहे. आमचा निरिक्षक प्रत्येक प्रॉपर्टी ज्या उपलब्ध नाहीच आणि गेल्या वर्षी महिला बचत गटाने आमचे २० हजार बिले परत केली होते. त्याच्या आगोदर पोष्ट विभागाने ३० हजार बिले परत केलेले होते, हयाच्यामध्ये महत्वाचा विषय कसा आहे, आम्ही का ठेवला सांगतो तुम्हाला शासनाला जी माहिति पाठवीली केंद्र सरकारला १४ वित्त आयोगाने परफॉरमन्स ग्रॅड, हया दोन विषयासाठी लक्षात घ्या,की शासन जे पैसे देते त्या पैशामध्ये तुमच्या प्रॉपर्टी टॅक्स जी टक्केवारी जे आहे, ते पण विचारात घेतले जाते. आपले टक्केवारी जे आहे २५ टक्के पेक्षा जास्त जात नाही आहे. तुम्ही जर ही बिले निर्लेखित केले तर तुमची टक्केवारी ७० टक्के पेक्षा जास्त जाईल. आणि त्याच्या साठी १० मार्क आहेत. १००मार्कापैकी प्रत्येक पॉईटला मार्क दिलेले आहेत. आणि ७० टक्के अनुदान आपल्याला शासनाकडून येते आणि ३० टक्के महापालिकेचा स्त्रोत आहे. त्यामुळे तुम्हाला हयाच्यामध्ये भवितव्यामध्ये महापालिकेला राज्यसरकार, केंद्र सरकार कडून पूर्ण अनुदान जर पाहिजे असेल,समजा टक्केवारी जी वाढणार आहे, आणि आम्ही हे १००टक्के तर नाही पण ९८ टक्के काम, १०० टक्के बरोबर केले आहे,त्या प्रॉपर्टी, निर्णय काय घ्यायचा आहे , मला असे वाटते तीन महिने ठेवण्यापेक्षा हया वर्षी जर केला असता, तर हयावर्षीच्या टक्केवारी मध्ये हे झाले असते दुसरी गोष्ट बोर्ड पण लावलेले आहेत पेपरमध्ये जाहीरात पण दिलेली आहे, आणि हया सर्व ठिकाणी आम्हाला प्रसिध्दी देता आली तेवढी दिली.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी</u>**:— माझा एकच प्रश्न आहे,यामध्ये किती प्रॉपर्टी अशा आहेत त्यांनी तीन वर्षापूर्वी भरलेले आहेत.

**<u>उप आयुक्त श्री.दादा पाटील</u>**:— एकपण नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी</u>**:— हे कमीत कमी किती वर्षचे आहे.

**<u>उप आयुक्त श्री.दादा पाटील</u>**:— हे कमीत कमी २० वर्षाचे आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** आपण बघितले तर यामध्ये शहरातील करोडपतीचे नावे आलेली आहेत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:— आयुक्त साहेब, खरोखर टॅक्स विभागाने चांगले काम केलेले आहे. ब—याच वर्षापासून लोकांच्या तक्रारी, टॅक्स मध्ये प्रॅक्टीकल हे होत नाही, म्हणजे थकबाकी, किंवा चालू मागणी हे फुगवटा आहे त्यामुळे बजेट आम्हाला समजत नाही. पण एवढे केले तर बजेट आमचे बजेट सुध्दा मोडकळीस(कोलॅप्स) आहे. पण हयाच्यामध्ये चूका सुध्दा आहेत. त्या म्हणजे आपणाला घाई करून चालणार नाही.

**<u>उप आयुक्त श्री.दादा पाटील</u>**:— नाही चूकी साठी आम्ही लिहिलेले की जर समजा याच्यात रेक्टीफाय झाले तर आम्ही त्याला पून्हा त्वरीत आहे तसे करायचे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:— चूका म्हणजे अशा आहेत, आता मी फक्त एकच तक्ता(चार्ट) बघितलेला आहे, युनिट नंबर ७ इथे जे तुमचे टोटल आहे,हे बघा १ ते १०९ आहेत, तीच नावे ११० ते २१८ र्प्यत आहेत. सारखीच नावे आणि सारखेच नंबर आहेत.

**<u>उप आयुक्त श्री.दादा पाटील</u>**:— हां बरोबर आहे, ते बिल तसे आले ना.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:— टोटल तर तुमची चूकते ना.

**<u>उप आयुक्त श्री.दादा पाटील</u>**:— एकाच नावाचे तीन, तीन चार, चार वेळेस आहेत ना.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:— नाही एकच नंबर आहे. इथे नंबर एकच,१०९ नबर बघा,११० नंबरला हिरालाल कैन्हयालाल आहे. त्याचा नंबर आहे ९९४९४९९००, रक्कम तीच , आता इकडे त्याचे नाव तेच आहे.

**<u>उप आयुक्त श्री.दादा पाटील</u>**:— सर अशाच प्रकारचे सध्या उच्च न्यायालयात एक प्रकरण चालू आहे,तुम्ही जे बोलता त्याला मी आता सांगतो. सारखेच प्रकरण आहे त्यामध्ये असे चालू आहे,रिलायन्सचे त्याच्यामध्ये त्याला आम्ही १८ बिले दिलेले आहेत, त्या १८ बिलामधले ४ बिले आम्ही सारखेच रिपीट केलेले आहेत. तर ते उच्च न्यायालयाला त्यांनी दाखविले की हे नंबर सारखा आहे ही रक्कम सारखी आहे, लोकेशन सारखेच आहे, ते आम्ही लक्षात घेतले बरोबर आहेत चूक झाल्यात तर अशा पध्दतीच्या हया गोष्टी आहेत. ठेवता नंतर आम्हाला संगणकामध्ये नोंदी आहेत,त्या डबल असतील तर त्या डबल ठेवाव्या लागतील ना.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:— काय झाले बिले तर जनरेट झाली आहेत ना. हे ९० कोटी रूपये जे आहेत, एकाच माणसाला दोन दोन, चार,चार वेळा बिले दिलेली आहेत ना.

**<u>उप आयुक्त श्री.दादा पाटील</u>**:— संगणकामध्ये नोंद आहे ती तशी कट करता येणार नाही.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:— नोंद तर सरखीच आहे, हे बघा हिरालाल कन्हैयालाल.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील:—</u>**तर हेच झालेले आहे तेच त्यांचे म्हणणे आहे. एक बिल दोन वेळा कॅलक्युलेट झालेले आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:— जमनुजी, इथे तुमच्या लक्षात आले नाही. ही डबल नोंद आली आहे, असे मला वाटते.

**<u>उप आयुक्त श्री.दादा पाटील</u>**:— सर बघा, मी तुम्हाला सांगतो की,

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील:—</u>**हे डबल डबल आलेले आहे, हि रक्कम मोठी झाली आहे,

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>**डबल आले असते तर इथले बिल  नंबर वेगळे आले असते. पहिले बिल नंबर वेगळे असते.

**<u>उप आयुक्त श्री.दादा पाटील</u>**:—  सर बरोबर आहे, आता एवढे बघा, या महापालिकेच्या याच्यासाठी आम्ही सादर केलेत तुम्ही आता...

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी</u>**:— यामध्ये एक सांगा की ही असेंसमेंट कोणी केली होती?

**<u>उप आयुक्त श्री.दादा पाटील</u>**:—   आता २५ वर्षापूर्वी २० वर्षापूर्वी, १५ साला पूर्वी कोणी केली असेल,

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी</u>**:— आपल्या अधिका—यांनी केली असेल.

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारिया:—</u>**आज महासभा आहे बजेटची, ही मीटींग लॅप्स होवून जाईल. आणि तांत्रिक अडचण होईल, ३१ मार्च आहे, आम्हाला आज बजेट मंजूर करायचा आहे.

**<u>सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—</u>**   मला वाटते हा विषय डिफर करू नंतर घेवू, सगळे डिफर करा.

**<u>सदस्य, श्री.राजेश वदारिया:—</u>**हे विषय डिफर करा नंतर घेण्यात यावेत. (टॅक्सचे सर्व डिफर करा.)

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑

**विषय क्र. ८ :—** मालमत्ता क्र. 51DI019599100 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीमध्ये भारती इन्फ्रटल लि. या कंपनीचा मोबाईल टॉवर निष्कासित करण्यात आल्याने भाडोत्री गृहीत धरून करण्यात आलेली नोंद रद्द करून अतिरिक्त कर आकारणी रक्कम रू. 359222 + विलंब शास्ती निर्लेखित करणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील शिव लोक टॉवर, बॅरेक नं. १८५५ रूम नं. १, सेक्शन—३९, उल्हासनगर—५ या मिळकतीची कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ५१क्प्०१९५९९१०० अन्वये नोंद असुन मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन ठींतजप प्दतिंजमस स्जकण या नावे कर आकारणी सुरू आहे. सदरील इमारतीचे टेरेसवर ठींतजप प्दतिंजमस स्जकण या कंपनीमार्फत मोबाईल टॉवर उभारण्यात आल्याने खालिलप्रमाणे करपात्र बाबी गृहीत धरून कर आकारणी सुरू आहे.

| Const. Type | Occu. Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Tenant | Non Residential | 78827 | 27-NOV-09 | 565.5 | 0 | 565.5 |
| Open | Tenant | Non Residential | 21169 | 27-NOV-09 | 152.63 | 0 | 152.63 |

**२)** परंतु श्री. नंदलाल थदानी रा. शिवलोक टॉवर, बॅरेक नं. १८५५, सेक्शन—३९, उल्हासनगर—५ यांनी दि. १७/११/२०१६ व श्री. शंकरलाल दादलानी यांचे दि. २२/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये शिवलोक टॉवर या इमारतीवर Bharti Infratel Ltd. या कंपनीने उभारण्यात आलेला एअर टेल मोबाईल टॉवर दि. ०८/१२/२०१० पासुन निष्कासित करण्यात आल्याने वर्ष २०११—२०१२ पासुन भाडोत्री नोंद रद्द करून कर आकारणी करणेबाबत विनंती केली आहे.

पत्रासोबत खालिलप्रमाणे कागदपत्र सादर केली आहेत.

१) साहय्यक आयुक्त प्रभाग समिती क्र. ४ उ.म.पा. यांचेकडील जा.क्र./उमपा/प्र.स.का–४/१२८०/१० दि. ०८/१२/२०१० रोजीचा कार्यालयीन आदेशाची प्रत.

२) दि. ०६/०१/२०११ रोजी मनपाकडे कर आकारणी बाबत दाखल केलेला अर्ज.

**३)** शिवलोक टॉवर, बॅरेक नं. १८५५, सेक्शन–३९, उल्हासनगर–५ या इमारतीवरील अनधिकृत उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवर, हटविणेबाबत सहा. आयुक्त प्रभाग समिती क्र. ४ यांनी दि. ०८/१२/२०१० रोजी श्री. टिल्लू नारायणदास माखिजा (ठेकेदार) व एअर टेल या कंपनीला लेखी आदेश देण्यात आले आहेत.

**४)** संबंधित मिळकतधारक यांनी मा. आयुक्त यांची भेट घेतली असता वर्ष २०१०–११ चे रककम रू. १,२५,०६२/– चा भरणा करून सदर मिळकतीवर आकाण्यात आलेली विलंबशास्ती रक्कम रू. १,५५१७२ वर्ष २०१५–१६ पर्यत भरणा करून घेणेसाठी मौखिक आदेश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने मिळकतधारक यांनी दि. १९/११/२०१६ रोजी पावती नं. १३५७९९, रक्कम रू. २,८०२३४/– इतकी रक्कम भरणा करण्यात आली आहे.

**५)** विषयांकीत प्रकरणी कर निरीक्षकाने खालिलप्रमाणे अहवाल सादर केला आहे.

१) संदर्भित मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत इमारतीचे टेरेसवर मोबाईल टॉवर नसल्याचे आढळुन आले आहे. त्यानुसार करपात्र बाबींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| **Const. Type** | **Occu. Status** | **Usage** | **Annual Rent** | **Asst. Year** | **Total Area** | **Exempted Area** | **Assessable Area** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Open | Owner | Residential | 0 | 27-NOV-09 | 565.5 | 0 | 565.5 |
| Open | Owner | Residential | 0 | 27-NOV-09 | 152.63 | 0 | 152.63 |

२) संदर्भित मिळकतीमध्ये मोबाईल टॉवर नसल्याचे फोटो सोबत जोडले आहेत.

३) मालमत्ता क्र. 51DI019599100 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीची प्रत्यक्ष भाडे गृहीत धरून व भाडोत्री नोंद रद्द करून स्वत: वापर गृहीत धरून कर आकारणी व अतिरिक्त कर आकारणीचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| **वर्ष** | **प्रत्यक्ष भाडे गृहीत धरून कर आकारणी** | **भाडोत्री नोंद रद्द करून स्वत: वापर गृहीत धरून कर आकारणी** | **अतिरिक्त कर आकारणी (निर्लेखित करावयाची रक्कम)** |
|---|---|---|---|
| २०११–२०१२ | ५८९४८ विलंब शास्ती | ३५१५ | ५५४३३. विलंब शास्ती |
| २०१२–२०१३ | ५८९४९ विलंब शास्ती | ३८५१ | ५५०९८. विलंब शास्ती |
| २०१३–२०१४ | ६६१४९ विलंब शास्ती | ३९७६ | ६२१७३. विलंब शास्ती |
| २०१४–२०१५ | ६६१५० विलंब शास्ती | ३९७६ | ६२१७४. विलंब शास्ती |
| २०१५–२०१६ | ६६१४८ विलंब शास्ती | ३९७६ | ६२१७२. विलंब शास्ती |
| २०१६–२०१७ | ६६१४८ विलंब शास्ती | ३९७६ | ६२१७२. विलंब शास्ती |
| **एकुण** | **३८२४९२** विलंब शास्ती | **२३२७०** | **३५९२२२ . विलंब शास्ती** |

सबब मनपा कर आकारणी पुस्तकातील मालमत्ता क्र. 51DI019599100 करीता वर्ष २०११–१२ पासुन भाडोत्री नोंद रद्द करून वरीलप्रमाणे अतिरिक्त कर आकारणी रक्कम रू. 359222 **+** विलंब शास्तीसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार मा. स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणे तसेच मालमत्ता कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणुन सेक्रेटरी अशी नोंद वर्ष २०१७–१८ पासुन करणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १३० अ** **दिनांक:– ३१/३/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता क्र. 51DI019599100 अन्वये नोंद असलेल्या मिळकतीमध्ये भारती इन्फ्रटल लि. या कपनीचा मोबाईल टॉवर निष्कासित करण्यात आल्याने भाडोत्री गृहीत धरून करण्यात आलेली नोंद रद्द करून अतिरिक्त कर आकारणी रक्कम रू. 359222 + विलंब शास्ती निर्लेखित करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

—————————————————————————————————————————

विषय क्र. ९ :—महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे. (युनिट क्र. १)

—————————————————————————————————————————

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ९ :—** महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे. (युनिट क्र. १)

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर आहे.त्यामुळे सहाजिकच मालमत्ता कर विभाग हा उत्पन्नाचा विभाग आहे. सदर विभागाचे कामकाज नियमानुसार व वेळेवर होणे अपेक्षीत असते. त्या दृष्टीने माहे एप्रिल २०१७ पासुन दिनांक ३१/०१/२०१८ पर्यंत मालमत्ता कर विभागाचे एकुण ६६६५ प्रकरणे विविध कामांसाठी प्राप्त झाली. त्यामध्ये युनिट क्र. १ अंतर्गत सदर कालावधीत एकुण ८०२ प्रकरणे प्राप्त झाली असुन त्या सर्व प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. या कामामुळे यापुर्वी मालमत्ता कर विभागात दिसणारी नागरीकांची गर्दी फारच कमी झाल्याची दिसुन येते. त्यामुळे विभागातील कामास गती प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत प्रलंबित प्रकरणे निरंक आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर असल्याने, त्याची जास्तीत जास्त वसुली होणे अपेक्षीत आहे. त्याअनुषंगाने युनिट क्र. १ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र. १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० मधील मिळकतींचे मालमत्ता कर वसुलीची कार्यवाही चालु असतांना, काही मिळकतींची दुबार नोंद असल्याचे व काही मिळकती महानगरपालिकेच्या लेख्यात असलेल्या पत्त्यावर सापडत नसल्याचे, तसेच काही बॅरेकच्या ठिकाणी निवासी व अनिवासी इमारती तयार होवुन त्यातील सदनिका/दुकाने यांची नव्याने कर आकरणी झाल्यामुळे, बॅरेकच्या जुन्या मालमत्तेची कर आकारणी चालु राहिल्यामुळे फार मोठया प्रमाणावर थकबाकीची रक्कम दिसुन येते.

मालमत्ता कर वसुलीच्या आढावा बैठकांमध्ये मा. महापौर, मा. आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या मौखिक व लेखी आदेशानुसार युनिट क्र. १ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण १०५४ मालमत्ता व त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू. १०,१६,१२,१२,१७८/—(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणे कामी या सर्व मालमत्तांची यादी तयार करून सोबत जोडली आहे.

उपरोक्त परिच्छेदात नमुद सर्व मालमत्तांची तपासणी संबंधित कर निरीक्षकांनी केलेली आहे. याबाबत भविष्यात काही प्रकरण उद्‌भवल्यास किंवा कोणी दावा दाखल केल्यास त्यास सर्वस्वी कर निरीक्षक जबाबदार राहतील. तसेच भविष्यात काही मालमत्ता असल्याचे आढळुन आल्यास त्याच्या नोंदी थकबाकी व विलंब शास्तीसह पुर्ववत करण्यात येतील.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ अनुसार वर नमुद केलेल्या सर्व मालमत्तांची नोंद रद्द करून त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे योग्य वाटत असल्याने मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १३० ब** **दिनांक:— ३१/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार युनिट क्र. १ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.१, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण १०५४ मालमत्ता व त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू. १०,१६,१२,१२,१७८/—(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

———————————————————————————————

⇨ विषय क्र. १०. :— महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे. (युनिट क्र. २)

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १० :–** महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे.(युनिट क्र. २)

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर आहे.त्यामुळे सहाजिकच मालमत्ता कर विभाग हा उत्पन्नाचा विभाग आहे. सदर विभागाचे कामकाज नियमानुसार व वेळेवर होणे अपेक्षीत असते. त्या दृष्टीने माहे एप्रिल २०१७ पासुन दिनांक ३१/०१/२०१८ पर्यंत मालमत्ता कर विभागाचे एकुण ६६६५ प्रकरणे विविध कामांसाठी प्राप्त झाली. त्यामध्ये युनिट क्र. २. अंतर्गत सदर कालावधीत एकुण ९१५ प्रकरणे प्राप्त झाली असुन त्या सर्व प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. या कामामुळे यापुर्वी मालमत्ता कर विभागात दिसणारी नागरीकांची गर्दी फारच कमी झाल्याची दिसुन येते. त्यामुळे विभागातील कामास गती प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत प्रलंबित प्रकरणे निरंक आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर असल्याने, त्याची जास्तीत जास्त वसुली होणे अपेक्षीत आहे. त्याअनुषंगाने युनिट क्र. २. अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र. ११, १२, १३, १४, १५, १६, १७, २० व २१ मधील मिळकतींचे मालमत्ता कर वसुलीची कार्यवाही चालु असतांना, काही मिळकतींची दुबार नोंद असल्याचे व काही मिळकती महानगरपालिकेच्या लेख्यात असलेल्या पत्त्यावर सापडत नसल्याचे, तसेच काही बॅरेकच्या ठिकाणी निवासी व अनिवासी इमारती तयार होवुन त्यातील सदनिका/दुकाने यांची नव्याने कर आकरणी झाल्यामुळे, बॅरेकच्या जुन्या मालमत्तेची कर आकारणी चालु राहिल्यामुळे फार मोठया प्रमाणावर थकबाकीची रक्कम दिसुन येते.

मालमत्ता कर वसुलीच्या आढावा बैठकांमध्ये मा. महापौर, मा. आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या मौखिक व लेखी आदेशानुसार युनिट क्र. २ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.११, १२, १३, १४, १५, १६, १७, २० व २१मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेलया व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण ८१० मालमत्ता व त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू. ७,०४,३७,१३५/–(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणे कामी या सर्व मालमत्तांची यादी तयार करून सोबत जोडली आहे.

उपरोक्त परिच्छेदात नमुद सर्व मालमत्तांची तपासणी संबंधित कर निरीक्षकांनी केलेली आहे. याबाबत भविष्यात काही प्रकरण उद्‌भवल्यास किंवा कोणी दावा दाखल केल्यास त्यास सर्वस्वी कर निरीक्षक जबाबदार राहतील. तसेच भविष्यात काही मालमत्ता असल्याचे आढळुन आल्यास त्याच्या नोंदी थकबाकी व विलंब शास्तीसह पुर्ववत करण्यात येतील.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ अनुसार वर नमुद केलेल्या सर्व मालमत्तांची नोंद रद्द करून त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे योग्य वाटत असल्याने मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** **१३० क** **दिनांक:— ३१/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार युनिट क्र. २ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र. ११, १२, १३, १४, १५, १६, १७, २० व २१ मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेलया व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण ८१० मालमत्ता व त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू. ७,०४,३७,१३५/— (विलंब शास्तीसह) निर्लेखित करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ११ :— महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे. (युनिट क्र. ३)

---

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ११ :—** महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे.(युनिट क्र. ३)

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर आहे.त्यामुळे सहाजिकच मालमत्ता कर विभाग हा उत्पन्नाचा विभाग आहे. सदर विभागाचे कामकाज नियमानुसार व वेळेवर होणे अपेक्षीत असते. त्या दृष्टीने माहे एप्रिल २०१७ पासुन दिनांक ३१/०१/२०१८ पर्यंत मालमत्ता कर विभागाचे एकुण ६६६५ प्रकरणे विविध कामांसाठी प्राप्त झाली. त्यामध्ये युनिट क्र. ३ अंतर्गत सदर कालावधीत एकुण ८४९ प्रकरणे प्राप्त झाली असुन त्या सर्व प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. या कामामुळे यापुर्वी मालमत्ता कर विभागात दिसणारी

नागरीकांची गर्दी फारच कमी झाल्याची दिसुन येते. त्यामुळे विभागातील कामास गती प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत प्रलंबित प्रकरणे निरंक आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर असल्याने, त्याची जास्तीत जास्त वसुली होणे अपेक्षीत आहे. त्याअनुषंगाने युनिट क्र. ३ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र. १८, १९, २२, २३, २४ व २५ मधील मिळकतींचे मालमत्ता कर वसुलीची कार्यवाही चालु असतांना, काही मिळकतींची दुबार नोंद असल्याचे व काही मिळकती महानगरपालिकेच्या लेख्यात असलेल्या पत्त्यावर सापडत नसल्याचे, तसेच काही बॅरेकच्या ठिकाणी निवासी व अनिवासी इमारती तयार होवुन त्यातील सदनिका/दुकाने यांची नव्याने कर आकरणी झाल्यामुळे, बॅरेकच्या जुन्या मालमत्तेची कर आकारणी चालु राहिल्यामुळे फार मोठया प्रमाणावर थकबाकीची रक्कम दिसुन येते.

मालमत्ता कर वसुलीच्या आढावा बैठकांमध्ये मा. महापौर, मा. आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या मौखिक व लेखी आदेशानुसार युनिट क्र. ३ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.१८, १९, २२, २३, २४ व २५मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेलया व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण १८९७मालमत्ता व त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू १६,२९,६७,२९७/–(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणे कामी या सर्व मालमत्तांची यादी तयार करून सोबत जोडली आहे.

उपरोक्त परिच्छेदात नमुद सर्व मालमत्तांची तपासणी संबंधित कर निरीक्षकांनी केलेली आहे. याबाबत भविष्यात काही प्रकरण उद्‌भवल्यास किंवा कोणी दावा दाखल केल्यास त्यास सर्वस्वी कर निरीक्षक जबाबदार राहतील. तसेच भविष्यात काही मालमत्ता असल्याचे आढळुन आल्यास त्याच्या नोंदी थकबाकी व विलंब शास्तीसह पुर्ववत करण्यात येतील.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ अनुसार वर नमुद केलेल्या सर्व मालमत्तांची नोंद रद्द करून त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे योग्य वाटत असल्याने मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १३० ड** **दिनांकः– ३१/!३/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार युनिट क्र. ३ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र. १८, १९, २२, २३, २४ व २५ मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेलया व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण १८९७ मालमत्ता व त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू १६,२९,६७,२९७/–(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १२ :– महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन

त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे

(युनिट क्र. ४)

---

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १२ :—** महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे (युनिट क्र. ४)

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर आहे.त्यामुळे सहाजिकच मालमत्ता कर विभाग हा उत्पन्नाचा विभाग आहे. सदर विभागाचे कामकाज नियमानुसार व वेळेवर होणे अपेक्षीत असते. त्या दृष्टीने माहे एप्रिल २०१७ पासुन दिनांक ३१/०१/२०१८ पर्यंत मालमत्ता कर विभागाचे एकुण ६६६५ प्रकरणे विविध कामांसाठी प्राप्त झाली. त्यामध्ये युनिट क्र. ४ अंतर्गत सदर कालावधीत एकुण ८८० प्रकरणे प्राप्त झाली असुन त्या सर्व प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. या कामामुळे यापुर्वी मालमत्ता कर विभागात दिसणारी नागरीकांची गर्दी फारच कमी झाल्याची दिसुन येते. त्यामुळे विभागातील कामास गती प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत प्रलंबित प्रकरणे निरंक आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर असल्याने, त्याची जास्तीत जास्त वसुली होणे अपेक्षीत आहे. त्याअनुषंगाने युनिट क्र. ४ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र. २६, २७, २८, २९, ३० मधील मिळकतींचे मालमत्ता कर वसुलीची कार्यवाही चालु असतांना, काही मिळकतींची दुबार नोंद असल्याचे व काही मिळकती महानगरपालिकेच्या लेख्यात असलेल्या पत्त्यावर सापडत नसल्याचे, तसेच काही बॅरेकच्या ठिकाणी निवासी व अनिवासी इमारती तयार होवुन त्यातील सदनिका/दुकाने यांची नव्याने कर आकरणी झाल्यामुळे, बॅरेकच्या जुन्या मालमत्तेची कर आकारणी चालु राहिल्यामुळे फार मोठया प्रमाणावर थकबाकीची रक्कम दिसुन येते.

मालमत्ता कर वसुलीच्या आढावा बैठकांमध्ये मा. महापौर, मा. आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या मौखिक व लेखी आदेशानुसार युनिट क्र. ४ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.२६, २७, २८, २९, ३०मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेलया व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण ६९९मालमत्ताव त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू १०,९८,५२,८२०/—(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणे कामी या सर्व मालमत्तांची यादी तयार करून सोबत जोडली आहे.

उपरोक्त परिच्छेदात नमुद सर्व मालमत्तांची तपासणी संबंधित कर निरीक्षकांनी केलेली आहे. याबाबत भविष्यात काही प्रकरण उद्‌भवल्यास किंवा कोणी दावा दाखल केल्यास त्यास सर्वस्वी कर निरीक्षक जबाबदार राहतील. तसेच भविष्यात काही मालमत्ता असल्याचे आढळुन आल्यास त्याच्या नोंदी थकबाकी व विलंब शास्तीसह पुर्ववत करण्यात येतील.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ अनुसार वर नमुद केलेल्या सर्व मालमत्तांची नोंद रद्द करून त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे योग्य वाटत असल्याने मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** १३० इ      **दिनांकः—** ३१/३/२०१८

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार युनिट क्र. ४  अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.२६, २७, २८, २९, ३०मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेलया व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण ६९९मालमत्ता व त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू १०,९८,५२,८२०/—(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

विषय क्र. १३ :— महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे (युनिट क्र. ५)

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. १३ :—** महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे (युनिट क्र. ५)

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर आहे.त्यामुळे सहाजिकच मालमत्ता कर विभाग हा उत्पन्नाचा विभाग आहे. सदर विभागाचे कामकाज नियमानुसार व वेळेवर होणे अपेक्षीत असते. त्या दृष्टीने माहे एप्रिल २०१७ पासुन दिनांक ३१/०१/२०१८ पर्यंत मालमत्ता कर विभागाचे एकुण ६६६५ प्रकरणे विविध कामांसाठी प्राप्त झाली. त्यामध्ये युनिट क्र. ५ अंतर्गत सदर कालावधीत एकुण ८२७ प्रकरणे प्राप्त झाली असुन त्या सर्व प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. या कामामुळे यापुर्वी मालमत्ता कर विभागात दिसणारी नागरीकांची गर्दी फारच कमी झाल्याची दिसुन येते. त्यामुळे विभागातील कामास गती प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत प्रलंबित प्रकरणे निरंक आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर असल्याने, त्याची जास्तीत जास्त वसुली होणे अपेक्षीत आहे. त्याअनुषंगाने युनिट क्र. ५ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र. ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८ मधील मिळकतींचे मालमत्ता कर वसुलीची कार्यवाही चालु असतांना, काही मिळकतींची दुबार नोंद

असल्याचे व काही मिळकती महानगरपालिकेच्या लेख्यात असलेल्या पत्त्यावर सापडत नसल्याचे, तसेच काही बॅरेकच्या ठिकाणी निवासी व अनिवासी इमारती तयार होवुन त्यातील सदनिका/दुकाने यांची नव्याने कर आकरणी झाल्यामुळे, बॅरेकच्या जुन्या मालमत्तेची कर आकारणी चालु राहिल्यामुळे फार मोठया प्रमाणावर थकबाकीची रक्कम दिसुन येते.

मालमत्ता कर वसुलीच्या आढावा बैठकांमध्ये मा. महापौर, मा. आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या मौखिक व लेखी आदेशानुसार युनिट क्र. ५ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८ मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण ६२४ मालमत्ताव त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू. ८,२८,९३,७२९/—(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणे कामी या सर्व मालमत्तांची यादी तयार करून सोबत जोडली आहे.

उपरोक्त परिच्छेदात नमुद सर्व मालमत्तांची तपासणी संबंधित कर निरीक्षकांनी केलेली आहे. याबाबत भविष्यात काही प्रकरण उद्‌भवल्यास किंवा कोणी दावा दाखल केल्यास त्यास सर्वस्वी कर निरीक्षक जबाबदार राहतील. तसेच भविष्यात काही मालमत्ता असल्याचे आढळुन आल्यास त्याच्या नोंदी थकबाकी व विलंब शास्तीसह पुर्ववत करण्यात येतील.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ अनुसार वर नमुद केलेल्या सर्व मालमत्तांची नोंद रद्द करून त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे योग्य वाटत असल्याने मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

**<u>स्थायी समिती ठराव क्र. १३० फ</u>** **<u>दिनांकः— ३१/३/२०१८</u>**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार युनिट क्र. ५ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८ मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण ६२४ मालमत्ता व त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू. ८,२८,९३,७२९/—(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————

⇨ विषय क्र. १४ :— महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे (युनिट क्र. ६)

---

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र. १४ :–** महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे (युनिट क्र. ६)

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर आहे.त्यामुळे सहाजिकच मालमत्ता कर विभाग हा उत्पन्नाचा विभाग आहे. सदर विभागाचे कामकाज नियमानुसार व वेळेवर होणे अपेक्षीत असते. त्या दृष्टीने माहे एप्रिल २०१७ पासुन दिनांक ३१/०१/२०१८ पर्यंत मालमत्ता कर विभागाचे एकुण ६६६५ प्रकरणे विविध कामांसाठी प्राप्त झाली. त्यामध्ये युनिट क्र. ६ अंतर्गत सदर कालावधीत एकुण ५१९ प्रकरणे प्राप्त झाली असुन त्या सर्व प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. या कामामुळे यापुर्वी मालमत्ता कर विभागात दिसणारी नागरीकांची गर्दी फारच कमी झाल्याची दिसुन येते. त्यामुळे विभागातील कामास गती प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत प्रलंबित प्रकरणे निरंक आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर असल्याने, त्याची जास्तीत जास्त वसुली होणे अपेक्षीत आहे. त्याअनुषंगाने युनिट क्र. ६ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र. ३९, ४०, ४१ व ४२ मधील मिळकतींचे मालमत्ता कर वसुलीची कार्यवाही चालु असतांना, काही मिळकतींची दुबार नोंद असल्याचे व काही मिळकती महानगरपालिकेच्या लेख्यात असलेल्या पत्त्यावर सापडत नसल्याचे, तसेच काही बॅरेकच्या ठिकाणी निवासी व अनिवासी इमारती तयार होवुन त्यातील सदनिका/दुकाने यांची नव्याने कर आकरणी झाल्यामुळे, बॅरेकच्या जुन्या मालमत्तेची कर आकारणी चालु राहिल्यामुळे फार मोठया प्रमाणावर थकबाकीची रक्कम दिसुन येते.

मालमत्ता कर वसुलीच्या आढावा बैठकांमध्ये मा. महापौर, मा. आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या मौखिक व लेखी आदेशानुसार युनिट क्र. ६ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.३९, ४०, ४१ व ४२ मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण १६३३मालमत्ताव त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू. १३,६२,७९,३९९/–(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणे कामी या सर्व मालमत्तांची यादी तयार करून सोबत जोडली आहे.

उपरोक्त परिच्छेदात नमुद सर्व मालमत्तांची तपासणी संबंधित कर निरीक्षकांनी केलेली आहे. याबाबत भविष्यात काही प्रकरण उद्‌भवल्यास किंवा कोणी दावा दाखल केल्यास त्यास सर्वस्वी कर निरीक्षक जबाबदार राहतील. तसेच भविष्यात काही मालमत्ता असल्याचे आढळुन आल्यास त्याच्या नोंदी थकबाकी व विलंब शास्तीसह पुर्ववत करण्यात येतील.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ अनुसार वर नमुद केलेल्या सर्व मालमत्तांची नोंद रद्द करून त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे योग्य वाटत असल्याने मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

**<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> १३० ज** **<u>दिनांकः–३१/३/२०१८</u>**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार युनिट क्र. ६ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र. ३९, ४०, ४१ व ४२ मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण १६३३

मालमत्ता व त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू. १३,६२,७९,३९९/–(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. १५ :– महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे (युनिट क्र. ७)

---

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १५ :–** महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे (युनिट क्र. ७)

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर आहे.त्यामुळे सहाजिकच मालमत्ता कर विभाग हा उत्पन्नाचा विभाग आहे. सदर विभागाचे कामकाज नियमानुसार व वेळेवर होणे अपेक्षीत असते. त्या दृष्टीने माहे एप्रिल २०१७ पासुन दिनांक ३१/०१/२०१८ पर्यंत मालमत्ता कर विभागाचे एकुण ६६६५ प्रकरणे विविध कामांसाठी प्राप्त झाली. त्यामध्ये युनिट क्र. ७ अंतर्गत सदर कालावधीत एकुण ८२२ प्रकरणे प्राप्त झाली असुन त्या सर्व प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. या कामामुळे यापुर्वी मालमत्ता कर विभागात दिसणारी नागरीकांची गर्दी फारच कमी झाल्याची दिसुन येते. त्यामुळे विभागातील कामास गती प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत प्रलंबित प्रकरणे निरंक आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर असल्याने, त्याची जास्तीत जास्त वसुली होणे अपेक्षीत आहे. त्याअनुषंगाने युनिट क्र. ७ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र. ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५० मधील मिळकतींचे मालमत्ता कर वसुलीची कार्यवाही चालु असतांना, काही मिळकतींची दुबार नोंद असल्याचे व काही मिळकती महानगरपालिकेच्या लेख्यात असलेल्या पत्त्यावर सापडत नसल्याचे, तसेच काही बॅरेकच्या ठिकाणी निवासी व अनिवासी इमारती तयार होवुन त्यातील सदनिका/दुकाने यांची नव्याने कर आकरणी झाल्यामुळे, बॅरेकच्या जुन्या मालमत्तेची कर आकारणी चालु राहिल्यामुळे फार मोठया प्रमाणावर थकबाकीची रक्कम दिसुन येते.

मालमत्ता कर वसुलीच्या आढावा बैठकांमध्ये मा. महापौर, मा. आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या मौखिक व लेखी आदेशानुसार युनिट क्र. ७ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५० मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण ४९० मालमत्ताव त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू. ८,४०,४८,८९७/–(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणे कामी या सर्व मालमत्तांची यादी तयार करून सोबत जोडली आहे.

उपरोक्त परिच्छेदात नमुद सर्व मालमत्तांची तपासणी संबंधित कर निरीक्षकांनी केलेली आहे. याबाबत भविष्यात काही प्रकरण उद्‌भवल्यास किंवा कोणी दावा दाखल केल्यास त्यास सर्वस्वी कर निरीक्षक जबाबदार राहतील. तसेच भविष्यात काही मालमत्ता असल्याचे आढळुन आल्यास त्याच्या नोंदी थकबाकी व विलंब शास्तीसह पुर्ववत करण्यात येतील.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ अनुसार वर नमुद केलेल्या सर्व मालमत्तांची नोंद रद्द करून त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे योग्य वाटत असल्याने मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १३० ह** **दिनांकः— ३१/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार युनिट क्र. ७ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५० मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण ४९० मालमत्ताव त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू. ८,४०,४८,८९७/–(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ विषय क्र. १६ :— महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे. (युनिट क्र. ८)

———————————————————————————————————————

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १६ :—** महानगरपालिका कर अकारणी नोंदवहीत दुबारा नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या मालमत्ता व बॅरेकच्या ठिकाणी इमारती झालेल्या सर्व मिळकतीचा कर निर्लेखित करुन मालमत्ता रद्द करुन त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे. (युनिट क्र. ८)

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर आहे.त्यामुळे सहाजिकच मालमत्ता कर विभाग हा उत्पन्नाचा विभाग आहे. सदर विभागाचे कामकाज नियमानुसार व वेळेवर होणे अपेक्षीत असते. त्या दृष्टीने माहे एप्रिल २०१७ पासुन दिनांक ३१/०१/२०१८ पर्यंत मालमत्ता कर विभागाचे एकुण ६६६५ प्रकरणे विविध कामांसाठी प्राप्त झाली. त्यामध्ये युनिट क्र. ८ अंतर्गत सदर कालावधीत एकुण १०५१ प्रकरणे प्राप्त झाली असुन त्या सर्व प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. या कामामुळे यापुर्वी मालमत्ता कर विभागात दिसणारी नागरीकांची गर्दी फारच कमी झाल्याची दिसुन येते. त्यामुळे विभागातील कामास गती प्राप्त झाली आहे. सद्यस्थितीत प्रलंबित प्रकरणे निरंक आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत मालमत्ता कर असल्याने, त्याची जास्तीत जास्त वसुली होणे अपेक्षीत आहे. त्याअनुषंगाने युनिट क्र. ८ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र. ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८ मधील मिळकतींचे मालमत्ता कर वसुलीची कार्यवाही चालु असतांना, काही मिळकतींची दुबार नोंद असल्याचे व काही मिळकती महानगरपालिकेच्या लेख्यात असलेल्या पत्त्यावर सापडत नसल्याचे, तसेच काही बॅरेकच्या ठिकाणी निवासी व अनिवासी इमारती तयार होवुन त्यातील सदनिका/दुकाने यांची नव्याने कर आकरणी झाल्यामुळे, बॅरेकच्या जुन्या मालमत्तेची कर आकारणी चालु राहिल्यामुळे फार मोठया प्रमाणावर थकबाकीची रक्कम दिसुन येते.

मालमत्ता कर वसुलीच्या आढावा बैठकांमध्ये मा. महापौर, मा. आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या मौखिक व लेखी आदेशानुसार युनिट क्र. ८ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८ मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण १७६३ मालमत्ताव त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू. १४,६६,००,८७०/—(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणे कामी या सर्व मालमत्तांची यादी तयार करून सोबत जोडली आहे.

उपरोक्त परिच्छेदात नमुद सर्व मालमत्तांची तपासणी संबंधित कर निरीक्षकांनी केलेली आहे. याबाबत भविष्यात काही प्रकरण उद्‌भवल्यास किंवा कोणी दावा दाखल केल्यास त्यास सर्वस्वी कर निरीक्षक जबाबदार राहतील. तसेच भविष्यात काही मालमत्ता असल्याचे आढळुन आल्यास त्याच्या नोंदी थकबाकी व विलंब शास्तीसह पुर्ववत करण्यात येतील.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ अनुसार वर नमुद केलेल्या सर्व मालमत्तांची नोंद रद्द करून त्यावर आकारण्यात आलेली मालमत्ता कराची रक्कम विलंबशास्तीसह निर्लेखित करणे योग्य वाटत असल्याने मान्यतेसाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. १३० आय** **दिनांक:— ३१/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार युनिट क्र. ८ अंतर्गत मालमत्ता कर वार्ड क्र.५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८ मधील दुबार नोंद असलेल्या, सापडत नसलेल्या व बॅरेकच्या ठिकाणी इमारती तयार झाल्याने अशा एकुण १७६३ मालमत्ताव त्यांचा एकुण मालमत्ता कर रक्कम रू. १४,६६,००,८७०/—(विलंब शास्तीसह) निर्लेखित करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

**<u>महापालिका सचिव :—</u>** नाही विषय क्र. १७ पण आहे ना.

विषय क्र. १७ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १७ :— मालमत्ता क्र. २६ठळ०२०७१८५०० - ३९ळ०१९५४६५०० - २७ठ०२००३८८०० - २८ठ०००८३५२१०० करीता मालमत्ता करावरील विलंब शास्ती २५ टक्के माफ करणेसंदर्भात केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी मिळणेबाबत

---

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी</u>**:—विषय क्र. १७ पण डिफर करा.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** १७ पण तोच आहे ना.

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. १७ :—** मालमत्ता क्र. २६ठळ०२०७१८५०० - ३९ळ०१९५४६५०० - २७ठ०२००३८८०० - 28BI008352100 करीता मालमत्ता करावरील विलंब शास्ती २५ टक्के माफ करणेसंदर्भात केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी मिळणेबाबत

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका मालमत्ता कराची वसुली करणेसंदर्भातील प्रकरणे सामोपचाराने मिटविणेकरीता शनिवार, दिनांक १०/०२/२०१८ रोजी दिवाणी न्यायालय, क. स्तर, उल्हासननगरश्येथे आयोजित राष्ट्रीय लोकन्यायालयात ठेवण्यात आली होती. त्यामध्ये जा. क्र. उमपा/कर विभाग/३६७/१७, दिनांक ८/२/२०१८ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड मधील प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ५१, आयुक्तास, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, नियम ४१ खालील शास्ती, किंवा नियम ५० खालील फी किंवा वसुलीचा खर्च पुर्णत: किंवा अंशता माफ करता येईल, अशी तरतुद आहे. सदर तरतुदीनुसार विलंब शास्ती जास्तीत जास्त २५ टक्के पर्यंत माफ करणे व नियम ५० खालील फी व वसुलीचा खर्च पुर्णत: माफ करता येईल. तथापि, मिळकतधारकाने दिनांक २८ फेबुवारी, २०१८ पर्यत थकबाकीसह चालु कराची संपुर्ण रक्कम व अधिक ७५ टक्के शास्तीची रक्कम एकरक्कमी भरणा करणे बंधनकारक असेल, असे आदेश मा. आयुक्तांनी दिले होते.

त्यानुसार दिनांक १०/०२/२०१८ रोजी दिवाणी न्यायालय, क. स्तर, उल्हासननगरश्येथे आयोजित राष्ट्रीय लोकन्यायालयात पुढीलप्रमाणे मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला आल्याने संबंधितांचे बिलातील २५ टक्के विलंब शास्ती माफ करण्यात आली आहे.

| Sr. No | Property No | Property Holder Name & Address | Outstanding Amount | | | | (-) | Payment Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Arrears | Current | Late Payment Penalty | Total Outstanding | 25 % Amount Late | |

| | | | | | | Amount | Panalty | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 26BO020718500 | VIOM NETWORKES LIMITED RADHAKHISHNA NIWAS BK NO. 703/1 CENTRAL HOSPITAL ULHASNAGAR 3 | 261495 | 87750 | 109669 | 458914 | 27417 | 431497 |
| 2 | 39CO019546500 | TATA INDICOM P. LTD OM SAIRAM APT BLK C 924/1848-C 925/1849 KURLA CAMP ,Ulhasnagar-4 | 243608 | 81000 | 105339 | 429947 | 26335 | 403612 |
| 3 | 27BI020038800 | SURJITSINGH B AILSINGHANI ,SHOP 37,38 INDIAN POINEER OPP DALDA DEPT ULHASNAGAR 3 | 430749 | 143583 | 180080 | 754412 | 45020 | 709392 |
| 4 | 28BI008352100 | GULABRAO BABURAO KARNJULE OPP SAPNA GARDEN MANOHAR PALCE 5TH FLOOR FLAT NO 502 ULHASNAGAR 3 | 46723 | 46723 | 13840 | 107286 | 3460 | 103826 |

वरीलप्रमाणे अहवाल स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १३० जे** **दिनांकः— ३१/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता क्र. 26BO020718500 & 39CO019546500 & 27BI020038800 & 28BI008352100 करीता मालमत्ता करावरील विलंब शास्ती २५ टक्के माफ करणेसंदर्भात केलेल्या कार्यवाहीच्या अहवालास मंजुरी देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १८ :— उल्हासनगर शहरातील भुयारी गटार योजनेच्या मलवाहिन्या चोकअप काढणे, चेंबर सफाई चोकअप काढणेसाठी सुपर सकर मशीन, मजूर, इंधन इत्यादी भाडेतत्वावर घेणेस मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—**पास

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १८ :—** उल्हासनगर शहरातील भुयारी गटार योजनेच्या मलवाहिन्या चोकअप काढणे, चेंबर सफाई चोकअप काढणेसाठी सुपर सकर मशीन, मजूर, इंधन इत्यादी

भाडेतत्वावर घेणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वात असलजेली भुयारी गटार योजना जुलै २००५ मध्ये आलेल्या महापुरामध्ये नादुरूस्त झाल्याने मुख्य मलवाहिन्या व मलशुध्दीकरण केंद्र नादुरूस्त झालेले होते. शहरात असलेल्या मलवाहिन्या ठिकठिकाणी तुटल्यामुळे व रोड व कॉक्रीट चे काम सुरू असताना काही मॅनहोल चेंबर माती व कच—याने भरलेले असल्याने त्यांच्यामधून जात असलेले सांडपाणी ठिकठिकाणी ओव्हर फ्लो होते. त्यामुळे परिसरात दुर्गंधी परसरते. महापालिका मार्फत एस.एल.सी.एम. मशीन द्वारे तसेच ठेककेदाराच्या मजुरांमार्फत मॅनहोल चेंबर व भुयारी गटारे साफसफाई केली जातात.

मलवाहिन्या पूर्णपणे उपयोगात येत नसल्याने ठिकठिकाणी रस्त्या लगतच्या गटारामध्ये बायपास करून नाल्यामध्ये सांडपाणी सोडण्यात आलेले आहे. परंतु साफसफाई केलेले मॅनहोल चेंबर्स पुन्हा पुन्हा चोकअप होऊ न भरून वाहत असतात म्हणून लोकप्रतिनिधी व नसगरिकांच्या वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत.

या कामाकरिता दरपत्रके मागविण्यात आले होते. त्यानुसार मे. ॲकार्ड वॉटरटेक ॲन्ड ईन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या संस्थेचे कमीत कमी न्युनतम दर नुसार अंदाजपत्रक तयार करून ई—निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सबब सदर प्रस्तावाच्या कामाची ई—निविदा दिनांक २२/०२/२०१८ रोजीच्या उल्हास विकास, हिंदमाता मिरर या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करून ऑन लाईन ई—निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेचा लिफाफा क्र. ०१, दिनांक १३/०३/२०१८ रोजी उघडण्यात आला त्यात खालील प्रमाणे निविदाधारकांनी निविदा सादर केल्या आहेत.

१) मे. ॲकार्ड वॉटरटेक ॲन्ड ईन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., नवी मुंबई.

२) मे. अंकुश एन्टरप्राईज घनसोली, नवी मुंबई.

३) मे. ओरयिन ईन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि, वसई.

उपरोक्त निविदेचा तांत्रिक भाग उघडण्यात आला असता,प्राप्त तीन निविदाकारांपैकी सदर निविदाकारांनी सादर केलेल्या निविदा तांत्रिक दृष्टया पात्र आहेत.या अनुषंगाने निविदेचा आर्थिक बाबींचा लिफाफा (भाग) दिनांक २३/०३/२०१८ रोजी उघडण्यात आला. सदर सर्व निविदाधारकांनी भरलेले दर खालील प्रमाणे भरणेत आलेले आहेत.

| अ. क्र. | ठेकेदारांचे नाव | प्राकलनीय किंमत | सादर केलेला दर | एकुण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. ॲकार्ड वॉटरटेक ॲन्ड ईन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., नवी मुंबई | रु. ६४,८०,०००/— | ७ % टक्के (जादा दराने) | रु.६९,३३,६००/— | I |
| २ | मे. अंकुश एन्टरप्राईज घनसोली, नवी मुंबई. | | ९ % टक्के (जादा दराने) | रु.७०,६३,२००/— | II |
| ३ | मे. ओरयिन ईन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि, वसई. | | ९.९६ % टक्के (जादा दराने) | रु.७१,२५,४०८/— | III |

उपरोक्त तक्त्यामध्ये मे. अॅकार्ड वॉटरटेक अॅन्ड ईन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., नवी मुंबई, यांचे निविदेचे दर अंदाजित किंमतीच्या ७ % जास्त असुन त्यांची एकुण किंमत रु.६९,३३,६००/— एवढी होते. सदर दर इतर एजन्सी पेक्षा तुलनात्मकरित्या न्युनतम व कमी आहेत. परंतु वाजवी वाटत नाही. त्यामुळे न्युनतम दर सादर केलेले ठेकेदार मे. अॅकार्ड वॉटरटेक अॅन्ड ईन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., नवी मुंबई, यांना दराच्या वाटाघाटीसाठी मा.आयुक्त सो.,यांच्या दालनात दि.२६/०३/२०१८ रोजी १२.०० वाजता बोलवण्यात आले होते. वाटाघाटी दरम्यान झालेल्या चर्चेनुसार मा. आयुक्त सो., यांनी सदर संस्थेस निविदा दराने काम करण्यास सुचित केले. सदर ठेकेदार मे.अॅकार्ड वॉटरटेक अॅन्ड ईन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,यांचे प्रतिनिधी यांनी निविदा दराने काम करण्यास लेखी संमती दिली असुन सदर निविदा रू.६४,८०,०००/— किंमतीस स्विकृत करून पुढील कार्यवाही करण्यात मान्यता दिलेली आहे.

तरी प्रस्तावाचा निर्णय मा.स्थायी समितीमार्फत घेणे आवश्यक असल्याने, मा.स्थायी समितीच्या पटलावर निर्णयासाठी सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १३१** **दिनांकः— ३१/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील भुयारी गटार योजनेच्या मलवाहिन्या चोकअप काढणे, चेंबर सफाई चोकअप काढणेसाठी सुपर सकर मशीन, मजूर, इंधन इत्यादी मे. अॅकार्ड वॉटरटेक अॅन्ड ईन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., नवी मुंबई यांच्याकडुन भाडेतत्वावर घेणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिवः—** विषय क्र. १९ वाचून दाखवतात.

---

⇨ **विषय क्र. १९ :— प्रस्तावाची सूचना**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मागील वर्षाचे विरोधी पक्षनेता, सभागृह नेता, गटनेता, प्रभाग समिती सभापती निधीचे कामे होण्याबाबतची प्रस्तावाच्या सूचनेद्वारे मांडलेला प्रस्ताव विचारात घेणेबाबत स्थायी समिती सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य, श्री.राजेश वदारियाः—**यामध्ये स्थायी समिती सदस्यांचे सुध्दा फंडस् जोडण्यात यावे. हे जोडलेले नाही आहे. महापौर, उपमहापौर स्थायी समिती, सभापती यांचासुध्दा फंड जोडण्यात यावा.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—**ते जोडून सदरचा प्रस्ताव मागच्या दोन वर्षाचा...

**सभापती श्रीम. कंचन अमर लुंडः—** सर हे २५ टक्के आणखी फंड निंबाळकर साहेबानी रिलीज केला होता परंतु त्याचे अजून निविदा(एस्टीमेट) बनविणेत आली नाही. आणि अजून काही प्रक्रीया झालेली नाही.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया**:— हे २५ टक्के फंडाचे काम झालेले नाही हेच तर सभापती मॅडम सांगत आहेत.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—**नाही साहेब, मागच्या दोन वर्षाच्या कायदयाच्या कक्षेत आहे. आणि ती सरकारने प्रोव्हीजन केलेली आहे.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया**:— सन २०१६—१७,२०१७—१८ या दोन वर्षात, यामध्ये महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सदस्य, आणि सभापती सभागृह नेता विरोधीपक्षनेता हे तर लिहिलेले आहे. जे लिहिलेले नाही ते सांगत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी**:—इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे :—**इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १९ :— प्रस्तावाची सूचना**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मागील वर्षाचे विरोधी पक्षनेता, सभागृह नेता, गटनेता, प्रभाग समिती सभापती निधीचे कामे होण्याबाबतची प्रस्तावाच्या सूचनेद्वारे मांडलेला प्रस्ताव विचारात घेणेबाबत स्थायी समिती सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१६—१७ च्या आर्थिक वर्षातील तरतूदीनुसार सदर निधि स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेता, सभागृहनेता, सर्व गटनेते, प्रभाग समिती सभापती व स्थायी समिती सदस्य निधी यांना पुर्णपणे वापरण्याकरीता विशेष निधी तसेच नगरसेवक निधी मंजूर करण्यात आला होता. परंतु महापालिकेने सदर निधी काही सदस्यांना/पदाधिका—यांना दिला होता. काही सदस्य/पदाधिका—यांना एसक ही रुपया निधी वितरीत केला नव्हता मागील सार्वत्रिक निवडणूकीत पुन्हा निवडून आलेल्या सदस्य/पदाधिका—यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ अन्वये कुठल्याही अर्थसंकल्पात तरतूद केल्यानंतर सदरचा निधी हा पुढील २ वर्षापर्यंत वापरता येत असल्याने सदर निधितून प्रलंबित असलेली विकास कामे करण्यासाठी व मान्यता मिळणेसाठी या प्रस्तावाच्या सुचनेद्वारे सुचना मांडत आहे.

कृपया प्रस्तावाची सूचना स्थायी समिती बैठकीमध्ये चर्चेला घेवुन २०१६—१७ च्या आर्थिक वर्षातील उर्वरीत निधी वापरण्यास मंजूरी मिळावी ही नम्र विनंती.

**स्थायी समिती ठराव क्र. १३२** **दिनांक:—३१/३/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०२ नुसार मागील सन २०१६—१७ व २०१७—१८ या वर्षाचे मा. महापौर, मा. उप—महापौर, मा. स्थायी समितीत सभापती, स्थायी समिती सदस्य, विरोधी पक्षनेता, सभागृह नेता, गटनेता, प्रभाग समिती सभापती यांचा उर्वरीत निधीतुन प्रलंबित असलेली विकास कामे करण्यासाठी मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ४.३५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

## मा. स्थायी समिती सभापती पदाच्या निवडीसाठी दि. ११/४/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित केलेल्या विशेष बैठकीचे इतिवृत्त.

**१**

---

मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडील पत्र क्र. साशा/कार्या—३/नपा—२/पीठासीन अधि./कावि—९०/२०१५,दिनांक २०/३/२०१८ अन्वये, उल्हासनगर महानगरपालिका, स्थायी समिती सभापती या पदावर निवड करणेसाठी डॉ. प्रशांत नारनवरे, मा. जिल्हाधिकारी, पालघर यांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे. त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी बोलविणेत आलेली आजची विशेष बैठक सकाळी ११.३० वाजता डॉ. प्रशांत नारनवरे, मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करणेत आली. सदर सभेस खालील स्थायी समिती सदस्य उपस्थित होते. उपस्थित सदस्यांची ओळख व खात्री महापालिका सचिव श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी यांनी केली.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | उपस्थिती |
|---|---|---|
| १ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | हजर |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | हजर |
| ३ | श्रीमती पंचम उमेश कालानी | गैरहजर |
| ४ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | हजर |
| ५ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | हजर |
| ६ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | हजर |
| ७ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे | हजर |
| ८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | गैरहजर |
| ९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | हजर |
| १० | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | हजर |
| ११ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | हजर |
| १२ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | हजर |
| १३ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी | हजर |
| १४ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | हजर |
| १५ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | हजर |
| १६ | श्री. भगवान शंकर भालेराव | हजर |

सर्वप्रथम महानगरपालिका सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व विशेष बैठकीचे प्रयोजन या निवडीची प्रक्रिया उपस्थितांना समजावून सांगितली व विषयपत्रिकेवरील खालीलप्रमाणे विषयाचे वाचन केले.

**महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ मधील नियम—२१(अ) अन्वये सन २०१८—१९ कालावधीकरीता स्थायी समितीवर असणा—या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती या पदावर (३१ मार्च २०१९ पर्यंत) नेमणूक करणे.**

निर्धारीत कार्यक्रमानुसार बुधवार दिनांक ४/४/२०१८ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० वाजेपर्यंत स्थायी समिती सभापती पदाच्या निविडीसाठी महानगरपालिका सचिव यांचेकडे प्राप्त झालेले ४ नामनिर्देशनपत्रे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी मा. महानगरपालिका सचिव यांनी मा. पीठासीन अधिकारी यांच्याकडे दिनांक ११/४/२०१८ रोजी सकाळी ११. ३२ मि. सादर करण्यात आले. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | श्रीमती रेखा अशोक ठाकूर | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग |
| २ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | श्रीमती दिप्ती नविन दुधानी | श्री. दीपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | श्रीमती पंचम ओमेश कालानी | श्री. राजेश नानिकराम वधरिया |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना |

तद्नंतर मा. पीठासीन अधिकारी यांनी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र उपस्थितांसमोर वाचून दाखवले व सदर नामनिर्देशन पत्राच्या छाननीचे काम सकाळी ११. ३३ मि. सुरु करणेत आले.

१. सर्वप्रथम श्रीमती जया प्रकाश माखीजा यांच्या नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्रीमती जया प्रकाश माखीजा यांच्या नामनिर्देशनपत्रावर सुचक म्हणून स्थायी समिती सदस्य श्रीमती रेखा अशोक ठाकूर यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणून श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार, सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्ष—यांची खात्री महापालिका सचिव श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पूर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्रीमती जया प्रकाश माखीजा यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.
२. श्रीमती जया प्रकाश माखीजा यांच्या द्वितीय नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्रीमती जया प्रकाश माखीजा यांच्या नामनिर्देशनपत्रावर सुचक म्हणुन स्थायी समिती सदस्य श्रीमती दिप्ती नविन दुधानी यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणुन स्थायी समिती सदस्य श्री. दीपक लक्ष्मणदास सिरवानी यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार,सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्ष—यांची खात्री महापालिका सचिव श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी यांच्यामार्फत करण्यात

आली. छाननी पूर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्रीमती जया प्रकाश माखीजा यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

३. श्रीमती जया प्रकाश माखीजा यांच्या तृतीय नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्रीमती जया प्रकाश माखीजा यांच्या नामनिर्देशनपत्रावर सुचक म्हणुन स्थायी समिती सदस्य श्रीमती पंचम ओमेश कालानी यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणुन स्थायी समिती सदस्य श्री. राजेश नानिकराम वधरिया यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार,सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्ष—यांची खात्री महापालिका सचिव श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पूर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्रीमती जया प्रकाश माखीजा यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

४. श्रीमती जया प्रकाश माखीजा यांच्या द्वितीय नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली. श्रीमती जया प्रकाश माखीजा यांच्या नामनिर्देशनपत्रावर सुचक म्हणुन स्थायी समिती सदस्य श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी यांनी स्वाक्षरी केली आहे व अनुमोदक म्हणुन स्थायी समिती सदस्य श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना यांनी स्वाक्षरी केलेली आहे. छाननी दरम्यान नामनिर्देशन पत्रांवरील उमेदवार,सुचक व अनुमोदक यांच्या ओळखीबाबत व त्यांच्या स्वाक्ष—यांची खात्री महापालिका सचिव श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी यांच्यामार्फत करण्यात आली. छाननी पूर्ण झाल्यानंतर या नामनिर्देशनपत्रावर कोणाची हरकत आहे किंवा कसे याबाबत उपस्थितांना विचारणा करण्यात आली. उपस्थितांपैकी कोणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे श्रीमती जया प्रकाश माखीजा यांचे नामनिर्देशनपत्र छाननीअंती वैध ठरविणेत आले.

वरीलप्रमाणे एकाच उमेदवाराचे चारही अर्ज वैध करण्यात आले. छाननीअंती वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नाव** |
|---|---|
| १ | श्रीमती माखिजा जया प्रकाश |

अशा प्रकारे छाननीचे काम सकाळी ११.३३ मि. सुरु करुन सकाळी ११.३७ मि. संपविण्यात आले. त्यानंतर पीठासीन अधिकारी यांनी महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ५(२) अन्वये ज्या कोणत्याही उमेदवारास आपले नामनिर्देशनपत्र मागे घ्यावयाचे असेल त्यांनी सकाळी ११.३८ ते ११.५३ या १५.०० मिनिटाच्या कालावधीत लेखी नोटीस देवून नामनिर्देशन पत्र मागे घेता येईल असे जाहिर केले.

दिलेल्या मुदतीमध्ये उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली नाही. त्यामुळे श्रीमती माखिजा जया प्रकाश हया एकमेव उमेदवार निवडणूक रिंगणात राहीले. सबब, उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदाकरीता **श्रीमती माखिजा जया प्रकाश** यांचे एकमेव नामनिर्देशन असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम ६(१) अन्वये, पीठासीन अधिकारी यांनी उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापती पदी सन २०१८—१९ च्या कालावधीसाठी **श्रीमती माखिजा जया प्रकाश** यांची रितसर बिनविरोध निवड केल्याचे याद्वारे घोषित केले.

निवडणूकीबाबत सर्व अभिलेख महापालिका सचिव, उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडे सुपुर्द करण्यात आले. अभिलेख्याच्या प्रमाणित प्रतींची मागणी केल्यावर त्या संबंधितांना देण्याबाबत महापालिका सचिवांना निर्देश देण्यात आले. सभेच्या पुर्ण कामकाजाचे

व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले. तद्नंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून विशेष बैठकीचे कामकाज दुपारी ११.५५ वाजता संपल्याचे जाहिर केले.

दिनांक :—११/०४/२०१८

स्थान :— सभागृह

उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर—३

(डॉ. प्रशांत नारनवरे)

पीठासीन अधिकारी

तथा

जिल्हाधिकारी, पालघर

स्थायी समिती सभापती निवडणूक २०१८

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–८/५/२०१८

**दि. ८/५/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**२**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक ८/५/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ५ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ७ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १० | श्री. भगवान भालेराव | सदस्य |
| ११ | श्रीमती मिनाकौर लबाना | सदस्या |
| १२ | श्रीमती रेखा ठाकुर | सदस्या |
| १३ | श्रीमती दिप्ती दुधानी | सदस्या |
| १४ | श्रीमती ज्योती बठिजा | सदस्या |
| १५ | श्रीमती अंजना म्हस्के | सदस्या |

तर,

१. सदस्य श्री. धनंजय बोडारे हे अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

२१.श्री. गणेश पाटील, आयुक्त
२२.श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
२३.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
२४.श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
२५.श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक

२६.श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
२७.डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी
२८.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
२९.श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
३०.श्री. हनुमंत खरात उप अभियंता, विद्युत
३१.श्री. अश्विनी अहुज, उप अभियंता
३२.श्री. जितु चोईथानी, उप अभियंता
३३.श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता
३४.श्री. प्रबोधन मवाळे, सहा. आयुक्त
३५.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
३६.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
३७.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
३८.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
३९.श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
४०.श्री. बाजीराव जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
४१.श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
४२.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्री. अशोक रामरख्यानी
३. श्री. संतोष कोठारे

सायकाळी ४.१५ वाजता सुरू झाली.

**सदस्य,श्री.जमनादास पूरस्वानीः—** मी सभापती निवड झाल्यानंतर याठिकाणी पहिली बैठक येथे होत आहे. आणि आता ४.१० वा. झाली आहे. आतापर्यत बहुतांश विभाग प्रमुख उपस्थित नाहीत. आणि मा. आयुक्तजी उपस्थित नाहीत. ठिक आहे येथे आयुक्तांच्या जागेवर कोण बसणार आहे हे निर्देश सुध्दा अजून नाहीत.आयुक्तजी जर आले त्यानंतर मला काही बोलायचे आहे, एक महिना जो आमचा गेला आहे,कामाच्या बाबतीत शहराचा पूर्ण सत्यानाश झाला आहे, या विषयी मला काही बोलायचे आहे. परंतु मी मा. सभापती महोदया आपल्याला निवेदन करतो की, आपण आदेश करा की आता आयुक्तजी यांनी यावे किंवा आयुक्तांच्या स्थानावर कोण बसणार आहे. मा. सभापती महोदया, आपल्या आदेशानुसार मी काही बोलू इच्छितो, मा. आयुक्त साहेब, आज स्थायी समितीची सभापती निवड झाल्यानंतरची पहिली सभा आज येथे होत आहे, मा. आयुक्त साहेब, दुखःद बाब म्हणून बोलावे लागत आहे, की आपण उल्हासनगर महानगरपालिकेचे पदभार हाती घेतला आणि आपल्याला प्रशिक्षणासाठी जावे लागले. परंतु जर आपण प्रशिक्षणासाठी नसते गेले तर एक महिना उल्हासनगर वासीयांसाठी खूप चांगला राहिला असता, चांगले कार्य झाले असते, आपण प्रशिक्षणासाठी गेल्यानंतर दु:खद बाब म्हणून बालावे लागते की जसे उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये जसा काही अकाल पडतो तसा अधिका—यांचा या महानगरपालिकेत अकाल पडला होता. आपण जर पूर्ण एक महिन्याचे उपस्थिती किंवा लेखाजोखा पाहिले असते भरपूर अधिकारी यामध्ये उपायुक्त असतील, अतिरिक्त आयुक्त असतील किंवा दुसरे अधिकारी असतील तसेच पाणी पुरवठाचे इंजिनिअरर्स, सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनिअर्स असतील किंवा दुसरे अधिकारी असतील तर या कोणाचे ही काही जबाबदारी उल्हासनगर महानगरपालिकेसाठी, उल्हासनगर शहरासाठी शुन्यच्या बरोबर होते. मी माझ्या २१ वर्षाच्या नगरसेवकाच्या कार्यकाळामध्ये हे पहिल्यांदा बघत आहे. पहिले सन—१९९७ मध्ये महानगरपालिकेमध्ये निवडून आलो, त्यावेळी आमचे पत्र असायची व त्यांची उत्तरे येत होती. सार्वजनिक बांधकाम विभाग खूप चांगल्या प्रकारे काम करत होते. कामाच्याबाबती नं. १ वर सार्वजनिक बांधकाम विभाग राहत असे. आणि निविदावरती सही होत असे, कामे होत होती. पाणी पूरवठा विभागामध्ये सुध्दा अडचणी राहत नव्हत्या. परंतु आता पाणी पूरवठा विभागामध्ये जर पाहिले तर कुठे लिकेज आहे, तर याच स्थायी समितीमध्ये भरपूर वेळा चर्चा करण्यात आली. तसेच एक महिन्यासाठी आम्ही गाडया लावल्या होत्या. की एक एक गाडी ज्याचा रोजचा खर्च १० ते १२ हजार होईल त्यासोबत एक वेल्डर, दोन तीन मजूर, एक गाडी, एक वेल्डींग मशीन असे आम्ही चार प्रभागनिहाय चार कॉन्ट्रक्ट एक महिन्या साठी दिले होते. परंतु त्याचा उपयोग शुन्य झाला. १० ते १२ लाखाचे बिले झाली आणि खर्च झाला. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. आज सुध्दा शहराच्या काही ठिकाणी गर्मीचे वातावरण असून पाण्याची चणचण भासत आहे. परंतु मा.

आयुक्तजी आपण पाहिले तर लिकेज मोठया प्रमाणावर आहेत. लिकेजवरती आपण नियंत्रण आणू शकलो नाही. लहान सहान गोष्टी एक लिकेज बनविण्यासाठी एक वेल्डर पाहिजे ती कामे अजून झालेली नाहीत. एक एक तर मोठी गोष्ट महाराष्ट्र दिनाच्या दिवशी आपण पाहिले तर भरपूर प्रमाणात अधिकारी अनुपस्थित होते. ज्यामुळे असे झाले की सर्व राष्ट्रीय वर्तमान पत्रामध्ये उल्हासनगर चे नाव खराब झाले. आणि स्थायी समिती सभेमध्ये जरी आपण पाहिलेत तर अधिकारी उपस्थित होत नाही. विभागप्रमुख उपस्थित होत नाही. आणि महासभेमध्ये आपण पाहिले नव्हते. जी महासभा झाली त्या महासभेमध्ये कोणीही अधिकारी उपस्थित नसल्यामुळे भरपूर अडचणींना सामोरे जावे लागले. मा. आयुक्तजी आज आपण या सभेमध्ये आलेले आहेत, आपल्याकडून लोकांच्यामध्ये भरपूर अपेक्षा आहेत, की आयुक्त साहेब आलेले आहेत भरपूर कामे होतील. ज्यावेळेस निबांळकरजी होते त्यावेळेस प्रत्येक हप्त्याला विभाग प्रमुखांची बैठक होत होती. साहेब मी भरोसा देवून सांगू शकतो की, निबांळकरजीने भरपूर काही कामे केलेली नसतील परंतु एक अधिका—यांवर अंकूश होता, शिस्त होती. १० ते १.३० वाजता सर्व अधिकारी येत होते. लहान लहान कामे ज्यामध्ये फंडाचे पैसे खर्च होत नव्हते, जो आम्ही अगोदरच वर्क ऑर्डर दिलेली आहे. ज्यामध्ये डंम्पर गाडी, कचरा समस्या असेल, प्रत्येक नगरसेवक, ८३ नगरसेवक ७८ निवडून आलेले आणि ५ नियुक्त केलेले असे. सफाई च्या विषयामध्ये खूप ॲक्टीव झाले होते. की आज येथे कचरा हे ते पूर्ण दिवस कच—यावरती स्पर्धा लागत होती. मा. आयुक्तजी, आज आम्हांला विचार करावा लागत आहे, की आज आम्ही कुठे फोन करायचा. आज माझ्या वार्डामध्ये पाणी नाही आले. माझ्या वार्डामध्ये बिर्ला मंदिर आवारात एक पाण्याची टाकी आहे. जी टाकी रात्रीच्या वेळी भरली जाते आणि त्या टाकीमधून पाणी वाटप केले जाते. ती टाकी रात्री १ते ३ वाजता भरली जाते जर ती टाकी भरली नाही, तर सकाळी पाणी येत नाही. परंतु अधिकारी वर्ग आम्हांला कळवितात की आज काही कारणामुळे टाकी भरलेली नाही. लाईटचा डिओ गेलेला आहे किंवा मोटर खराब आहे किवां दुसरे काही कारण असेल, परंतु आज असे कोणीही काही सांगण्यास तयार नाही. याची अधिका—यांना सुध्दा माहिती नाही. लोकांसाठी पाण्याची टाकी का भरली गेली नाही. जेव्हा लोकांचे आमच्याकडे फोन येत असतात त्यावेळी आम्ही लोकांना काय उत्तर दयावे. की आज पाणी का नाही आले कारण काय आहे? काही अधिका—यांना फोन केल्यानंतर आपल्या पाणी पूरवठा विभागातील उप अभियंता साहेबांशी संपर्क झाला आणि त्यांनाही याची माहिती नव्हती, त्यांनी सुध्दा थोडया वेळानंतर सांगितले, की रात्री लाईटचा डिओ गेल्यामुळे पाण्याची टाकी भरलेली नाही. मा. आयुक्तजी, मी निवेदन करत आहे की लहान लहान गोष्टी जेव्हा निंबालकरजी विभाग प्रमुखांची बैठक घेत होते, जेवढे अधिकारी आज स्थायी समितीमध्ये उपस्थित आहेत त्यापेक्षा जास्त अधिकारी बैठकीस उपस्थित राहत होते. आणि सर्व चाणक्ष राहत होते आणि मिनीटस् बनवले जात होते, की कोणत्या नगरसेवकाने कोणते काम सांगितले आहे. परत दुस—या सोमवारी त्या मिनीटस् वर चर्चा होत असे. की राजेश वदारिया यांनी या ठिकाणी सांगितले की पाईप लाईन तुटलेली आहे त्याचे काय झाले? त्यामुळे अधिका—यांना भिती राहत असे आणि त्या सप्ताहामध्ये ते काम केले जात होते. अशी काही कामे होती, ही कामे करण्यासाठी अधिक कठीण होती, ती सुध्दा कामे विभाग प्रमुखांची बैठकी द्वारे अधिका—यांवर अंकूश ठेवून कामे करवून घेतली. म्हणून मी आपणांस निवेदन करत आहे की एका हप्त्यात नाही तर दहा दिवसात, पंधरा दिवसात किंवा एक सोमवार सोडून दूस—या सोमवार अशी एक विभाग प्रमुखांची बैठक जरूर घेण्यात यावी. सर्व नगरसेवकांच्या लहान सहान तक्रारी करतील, त्यांचे समाधान होवून मिनीटस् बनवण्यात यावे. आणि ज्या प्रकारे निंबाळकरजी साहेबांनी अंकूश लावला होता की, सर्व अधिका—यांनी उपस्थित राहावयाचे आहे. आणि मा. आयुक्तजी या महानगरपालिकामध्ये ब—याच वर्षपासून काही प्रथा आहेत, की टॅक्सचे कर निरीक्षक आहेत, किंवा जे दुसरे अधिकारी आहेत, ते सकाळ पासून बाहेर जात असतात, जे ३ वाजेनंतर महानगरपालिकेत येत असतात. ३ वाजेनंतर शहरातील नागरीक येण्याची वेळ असते.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** सभापती मॅडम, यांनी आता विषय उपस्थित केला. आयुक्तानी काळामध्ये सोमवारी आम्ही पण चार मिटींग लगातार लावुन एक महिना कामे घेऊन येत होतो. नंतर ती मिटींग बरखास्त कराव्या लागल्या. ही वस्तुस्थिती आहे, कामे झाली असती तर त्यांना येथून जायची गरज लागली नसती. कामे झाली नाही ही वस्तुस्थिती आहे. माणसाला कधीपण अधिकारी घाबरत होते तुमचं म्हणण ठिक आहे. माणसामध्ये दोन गोष्टी असतात, एक दहशतवादाची भिती आणि दुसरी एक आदरयुक्त भिती असते. ती दहशतवादाची भिती होती. कारण त्यांची भाषा चूकीची होती सगळयाच्या प्रति, अधिका—याच्या प्रति पण तीच भाषा, सामान्य माणसाच्या प्रति तीच भाषा आणि नगरसेवकांच्या प्रति तीच भाषा त्यामुळे लोक ही भाषा नको आहे. जो सुशिक्षित वर्ग आहे ही भाषा आमच्या जवळ यायला नाही पाहिजे. म्हणून लोक घाबरत होती. आयुक्त साहेबांच्यात फरक आहे त्यांच्या भाषेमध्ये आणि यांच्या भाषेमध्ये फरक आहे. एक नदी टोक आणि दुस—या नदीचे टोक आयुक्त साहेब आहेत एवढा फरक आहे. हे जाणून घ्या मला वाटतं आयुक्त साहेबांच्या बोलण्यापेक्षा ते कृतीत आणतील आणि एक महिन्यात आपण जो मुद्दा मांडला की, एक महीन्यात उल्हासनगर भकास झाला. उल्हासनगर ही बॉडी आल्यापासून भकास झाली. कारण वर्षभर काही काम झालेले नाही, आणि कुठल्याही नगरसेवकाचे, कुठलेही काम केलेले नाही. त्यामुळे इथे निंबाळकरांची काही शिफारस आणि हया गोष्टी चांगल्या होत्या ठिक आहे. जो कार्यक्रम राबविला गेला स्वच्छ अभियानाचा तो केंद्राचा कार्यक्रम होता. तो पी एम मोदींचा होता मुख्यमंत्र्याचा होता. तो कार्यक्रम राबविला गेला त्यामुळे कुठलीही काहीही कोणीही ती काही वैयक्तीक भाग घेवून सगळया महानगरपालिकेडून राबविलेले आहे.

आणि टॅक्सचे काम आपण नगरसेवक लोक सगळयानी मदत केली. त्यामुळे कोणाला चांगले नाव आणि काही अपेक्षा नाही आहे. इथे काम आता भविष्यकाळामध्ये काही लोक जोरात चालतात साहेब हळू चालतात एवढच फरक असेल. करतील कामे हळूहळू होईल, आणि सगळयाच गोष्टी आपण जरा आता एक वर्ष थांबलो आहे. साहेबांनी आता सुरूवात केली आहे. आता नव्याने साहेब प्रशिक्षण घेवून परत आले आहेत, आता येथे साहेब चांगली सुरूवात करतील अशी अपेक्षा व्यक्त करू. एवढीच आमची आता अपेक्षा आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः–</u>** मा. सभापती मॅडम, आजच्या या स्थायी समितीच्या सभेमध्ये, सभागृह नेत्यांनी मागच्या आयुक्तांचे काय कौतुक केले. त्यामध्ये ते नाही आहेत त्याच्याबददल बोलणे बरोबर नाही. परंतु आयुक्त साहेब या महापालिकेमध्ये ज्या पध्दतीने अधिकारी वर्ग वागतो, ती पध्दत चूकीची आहे. बैठकीला सदस्य आल्यानंतर आयुक्त तुम्ही यायला वेळ लागला ठिक आहे, कारण तुमचे काम असेल पण बाकीचे अधिकारी येतात ज्यानां माहिती आहे की नाही, माहिती आहे, ते येतात बाकीचे अधिकारी येत नाहीत अधिका–यांना महापालिकेच्या तर्फे मोबाईल फोन दिलेले आहेत, ते फोन सुध्दा त्यांचे बंद असतात. श्री. समतानीचे तीन नंबर आहेत तीन नंबर मला वाटतं सगळयांना दिलेले आहेत. समतानीचे नाव घेवून सांगतो मोबाईल लागत नाही त्यांचे कारण हे असे झाले नाही पाहीजे. आपण आएएस आयुक्त आहात, आनंदाची बातमी आम्हाला आपल्याकडून अपेक्षा आहेत. आणि त्या अपेक्षा पूर्ण झाल्या पाहिजेत. अधिका–यांनी काम केले पाहिजे. आणि ते काम कोणी कुठेही उठून जाते राम राज्य सारखे, कधी कोणाला काही विचारत नाही. आणि ती पध्दत चूकीची आहे. पध्दत आपण मोडून काढाल, आणि अधिका–यांना..

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः</u>**– रामराज्य मध्ये विचारून जात होते. हे बिगर रामराज्य आहे असे म्हणा. रावण राज्य बोला. आणि राम राज्य मध्ये बिगर आदेशाचे चालत नव्हते,

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः–</u>** राम भगवान बद्दल भाजपावाल्याना जास्त माहिती असेल. चांगली गोष्ट आहे. मी त्यांबददल जास्त बोलत नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः–</u>** रावण राज्य आता संपलेले आहे राम राज्य आता चालू झाले आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः–</u>** रामराज्य आलेले आहे असे म्हणतात आणि कामे काही अजून झालेलीच नाहीत. ठिक आहे. रामराज्य आहे रावण राज्य आहे कोणतेही असो. तुमची जी अपेक्षा आहे ती आमची आहे. कामे झाली पाहिजेत अधिकारी वर्गाने येथे लोकांची कामे केली पाहिजेत. जो ज्या कामाचा पगाार घेत आहेत ते कामे केली पाहिजेत. ही अपेक्षा आमची आहे. सत्तेमध्ये असो किंवा विरोधी मध्ये रहा. कामे झाली पाहिजेत. आपण एक आयुक्त म्हणून त्याच्यावरती अंकूश ठेवाल. नागरीकांचे काम मागच्या एक वर्षापासून झाले नाही. एक महिन्यामध्ये झाले नाही ते आता होईल, अशी अपेक्षा बाळगतो.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः–</u>**मा. सभापती मॅडम, आज उल्हासनगर महानगरपालिकेचे मुलभुत सुविधाचे ४ रोड चालू आहेत. १. नेहरू चौकापासून ते फालावर लाईन, २. काजल पेट्रोल पम्पपासून विठठलवाडी स्टेशन, ३. व्हटीसी ग्राउंड पासून ते माणेरा गांव, आणि ४. जिजामाता उदयानापासून ते वीर सावरकर पुतळयापर्यत. या ४ रस्त्यामधून एक रोड जो नेहरू चौक पासून ते फालवर लाईन पर्यत जो रोड आहे तो जवळ जवळ पूर्ण झालेला आहे. परंतु बाकीचे तीन रोड आहेत ते अजून पूर्ण होण्याच्या स्थितीपासून फार दूर आहेत. आज माहे मे ८ तारीख आहे, अंदाजे पाऊस जूनच्या १५ तारखे पर्यंत येईल, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे ही कामे कधी पूर्ण होणार आहेत. पावसाळयापूर्वी ही सर्व कामे पूर्ण होतील का? दुसरे जी कामे चालू आहेत ही गॅस गोडावूनमधील प्लायवूड फॅक्टरी, कैलास कॉलोनी चौक, श्रीराम चौक, आणि बस स्टॅड उल्हासनगर–१, यामधून कैलास कॉलनी रोड चालू केलेला नाही. श्रीराम चौक पूर्ण झाला आहे. आणि गॅस गोडावून चे काम अजून र्पंत पूर्ण झालेले नाही. बस स्टॅडचे काम अजून पर्यंत चालूच केलेले नाही. त्याबरोबर ब–याच वेळा सांगून सुध्दा पाटोल्स मध्ये सम्राट अशोक नगर, साईबाबा मंदीरापासून ते सम्राट अशोक नगर यामध्ये फक्त बी एम चे दोन तीन लोड पाहिजे पाटोल्सचे. बाबसाहेब आंबेडकर यांची जयंती होती त्यावेळी सा. बा. वि. स ब–याच वेळा सांगण्यात आले. या रस्त्यावरून मिरवणूक निघत असते त्यामुळे हा रस्ता पहिले बनविणे गरजेचे आहे, परंतु तरी सुध्दा हा रोड पूर्ण झाला नाही. खेमाणी चौकापासून डॉ. बाबसाहेब आंबेडकर रोड चौक साईड पटटी बीएम केलेले आहे एसी अजूनपर्यत केलेले नाही ते बीएम निघण्यास सुरूवात झाली आहे. रमाबाई चौकापासून ते बौध्द नगर आतापर्यंत पाटोल्सचे काम झालेले नाही. त्याबरोबर खेमाणी नाल्याचा एक मोठा प्रोजेक्ट महानगरपालिकेच्या फडांतून होत आहे. जे पण लवकर होत नाही आहे. निंबाळकर साहेबांनी ५० हजार रूपये प्रतीदिन प्रमाणे दंड लावण्यात आले होते. तरी सुध्दा अजूनपर्यंत हे काम अजून पर्यंत बाकी आहे. त्याबरोबर वालधूनी नदीचा जो प्रोजेक्ट चालू आहे, ते पण खूप संथ गतीने चालू आहे. आम्ही आपल्याकडून अशी अपेक्षा करतो की या प्रोजेक्ट ची आजपर्यंतची स्थिती काय आहे. आणि हे प्रोजेक्ट कधी पूर्ण होतील याबाबत आम्हाला खुलासा करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** सभापती महोदय, साहेबजी एक महिन्यापासून आपल्या अनुपस्थितीमध्ये वार्ड ऑफीसर आहेत त्यांची काय डयुटी असते? रामायण नगर पासून ओटी पर्यत जो रोड आहे, सीमेंट ब्लॉक आहे आज ४० ते ५० वर्षापासून हा रोड सिमेंट ब्लॉक चा बनविण्यात येत आहे. ३० फुटाचा रोड आहे १५ फुट बनविण्यात आला आहे. ७.६ फुट हया बाजूने सोडण्यात आले आहे आणि ७.६ फुट त्या बाजूने सोडण्यात आला आहे. एकही अधिका—याला त्या ठिकाणी येवून तपासणी करण्यास वेळ नाही आहे. आज उदया जर त्या ठिकाणी काही अपघात दूर्घटना झाली. असेच वडोल गाव येथील आहे. मे महिन्या अगोदर काम पूर्ण करायला पाहिजे होते. जून महिना जवळ आला आहे. येथे एक ४००० लोकांची वस्ती आहे. २ ते २.५० हजार कॉनव्हेंट शाळेतील मुले तिथे शिक्षण घेत आहेत. कोणत्याही अधिका—याला काहीही सिरीअसनेस नाही. याचे मला द:ख होत आहे. उल्हासनगर मधील दोन महत्वाचे रस्ते बनवून तयार आहेत. परंतु साईट पटटी राहिल्यामुळे हे रस्ते आम्ही चालू करू शकत नाही. आपण थोडे यांना नियंत्रणखाली ठेवावे. जसे की हे नागरीकांचे काम आहे. हे आपल्या कोणाच्या घरचे काम नाही आहे. अधिकारी वर्ग बसलेले आहेत कोणी फोन उचलत नाही. माझ्याकडे पूर्ण आहे. मेसेज करत आहेत, कमीत कमी फोन तर उचला. आम्ही स्थानिक नगरसेवक म्हणून आमचा हक्क आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मा. आयुक्त जी राजेश वधारियाजी यांनी मुलभूत सुविधांचा जो विषय मांडला, आपल्याकडील शहर अभियंता बसलेले आहेत त्यांनी कृपया लक्ष दयावे. नेहरू चौकापासून ते फालवर लाईन पर्यंत चा जो रोड बनविण्यात येत आहे, त्या रोडमध्ये जवाहर टॉकीज नंतर चे काम बंद का करण्यात आले आहे. त्याच्या पुढील काम नाही आहे का त्यामध्ये? पूढे जे काम बंद आहे ते पूर्ण झालेले नाही.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता.:—</u>** हा रोड ८०० मीटर एवढाच होता.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** जर हे पूर्ण झाले आणि थोडे वाढले तर काहीना कही तरी करायला पाहिजे. आता ८०० मीटर आहे आणि आपण एस्टीमेट चूकीचे बनविण्यात आले आहे. आणि २० २५ मीटर शिल्लक राहीला तर अर्धवट काम तर नाही सोडणार ना. हे तर रोड अर्धवट राहील.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—</u>** हा रोड पूर्ण करणार, त्याचे परत रिवाईज एस्टीमेट बनवावे लागेल.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** हे तर करावेच लागेल. पावसापूर्वी पूर्ण झाले पाहिजे. आणि दुसरी गोष्ट मुलभूत सुविधांमध्ये रू.७५ लाखाचे उल्हासनगर—१ बस स्टॉप येथील मा. आयुक्त जी आहे त्याठिकाणी कामाची काही जरूरत आहेच नाही. इथे वांरवार पाटोल्स भरणा करून रोड बनला आहे. आणि आम्ही तीन वर्षपूर्वी रू. ४० लाखाचे एक निधी देवून हा रोड बनविण्यात आला होता. ७५ लाखाचे एस्टीमेट इकडून तिकडे अशी एक वर्षापासून फिरत आहे. त्याबाबत मी एक पत्र दिलेले आहे. बसस्टॉपसाठी हे मुलभूत सुविधासाठी आलेले पैसे परत जावू नये म्हणून मी या लोकेशन मध्ये बदल करणबाबत मी एक पत्र दिले आहे. त्यासाठी जी फॉरमॅलीटीज आपल्याला लवकरात लवकर करायची आहे. काम बस स्टॉप जवळ आहे. परंतु जो बस स्टॉप आहे तो पूर्णपणे बनलेला आहे. त्या ठिकाणी आपल्याला खर्च करण्याची आवश्यकता नाही. शिवसेना शाखा पर्यंत रोड जात आहे हा ३५० चा करून देण्यात यावा, कारण की सदर ठिकाणी खूप गरीब वस्ती आहे.आणि गाडया वैगेरे जातात तर हाच ७५ लाखाचा फंड डायर्व्हट करून देण्यात यावा.

**<u>शहर अभि.श्री. महेश शितलानी:—</u>** याबाबतचे आपले पत्र आलेले आहे. त्या अनुषंगाने आम्ही सादर बनविण्यात आले आहे. साहेबांची स्वाक्षरीसह आम्ही ठाण्याला पाठविण्यात येईल.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदाारिया:—</u>** माझे जे प्रश्न होते काजल पेट्रोल पंप पासून ते विठठलवाडी त्याचा खुलासा करण्यात यावा. कधी पर्यत पूर्ण होणार.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—</u>** मुलभूत सुविधांमध्ये २० कोटी मध्ये एक काम आहे व्हटीसी ग्रउंड पासून ते मौर्यानगरी पर्यंतचे ३१ मे पर्यंत पूर्ण केले जातील.

**<u>सदस्य, भरत राजवाणी:—</u>** नाही आता हे बोलणार परंतु १५ दिवसानंतर परत वेळ मागितला जाईल.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** मला तुम्ही रामायण नगरची स्थिती काय आहे हे सांगू शकाल का?

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—</u>** काजल पेट्रोल पंप चे डांबरीकरणाचे काम चालू आहे. ते पण ३१ मार्च पर्यंत पूर्ण होईल.

**<u>सदस्य, श्री राजेंद्र चौधरी:—</u>** पूर्ण होवून जाईल.

**<u>श्श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—</u>** साहेब डांबरचे काम तर पूर्ण होणार. जो पेंटींग चे काम आहे,

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी:—** या पूढचे जे सिमेंट ब्लॉक बनविण्याचे जे काम घेतले आहे,अॅप्रूवल घ्या ना.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—** स्मशान भूमी जवळचे जे आहे निर्णय घेवून साहेबांचे अॅप्रूवल घेवून..

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी:—** अॅप्रूवल घ्या ना.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता** :— सादर बनविण्यात आलेले आहे सर,

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी:—** किती होणार ते..

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—** ४० मीटर

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी:—** डांबरचे बनवून काही फायदाच नाही. तेवढयाच एस्टीमेट मध्ये तिथे सिमेंट कॉक्रीटचा होईल

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता** :— बहुतेक वेळा त्याठिकाणी त्याच पैशामध्ये ३५० चे काम होवू शकते. आपल्या अॅप्रूवल साठी वेट करत आहोत. आणि एक काम जिजामाता गार्डनपासून वीर सावरकर पर्यंत त्याची मार्कींग देण्यात आलेली असून डयु टु डिमोलेशन मुळे काम चालू झालेले नाही. जोपर्यत डिमोलेशन होत नाही तो पर्यंत काम चालू होणार नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदाारिया:—** हे तर प्रभागअधिका—याचे काम आहे डिमोलेशन करायचे. मार्कींग त्यांनी टाउन प्लानींग मध्ये दिलेले आहे.

**उप अभियंता श्री.तरूण सेवकानी**:— पुढच्या जेबी मध्ये ६० फुटा ऐवजी ४० फुटाचा रोड करण्यात आला आहे. आता जी जेबी झाली होती शेवटच्या जीबी मिटींग मध्ये ४० फुट केलेले आहे. अर्ध रोड मार्कींग झालेला आहे आर्ध रोड आता टाउन प्लानींग ने दयावयाचा आहे. हे मार्कींग झाल्यानंतर वार्ड ऑफीसरकडे डिमोलेशनसाठी यादी पाठविली जाईल. त्यांनतर रोडचे काम चालू होणार.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:—** आणि दुसरे जे हे गॅस गोडावून पासून ते कैलास कॉलनी चौक, श्रीराम चौक.

**उप अभियंता श्री.तरूण सेवकानी**:— श्रीराम चौकाचे काम पूर्ण झाले आहे.

**उप अभियंता श्री.जितु चोईथनी**:— गॅस गोडावून चे फुटपाथ आणि ड्रेन्स दोन्ही बाजू झालेल्या आहेत आणि बीएम पण झाली आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदाारिया:—** कॅरेज वे.

**उप अभियंता श्री.जितु चोईथनी**:— दोन्ही झालेले आहेत, सर.

**सदस्य, श्री. राजेश वदाारिया:—** बी एम झालेले आहे.

**उप अभियंता श्री.जितु चोईथनी**:— डीबीएम आणि एसी झाालेले नाही. दहा जे बारा दिवसात पूर्ण केले जाईल.

**सदस्य, श्री. राजेश वदाारिया:—** आणि कैलाश कॉलनी चौकाचे काम पूर्ण झाले का?

**उप अभियंता श्री.आशिवनी आहुजा**:— त्या ठिकाचे काम बंद करण्यात आले होते. काल पासून काम चालू झालेले आहे

**सदस्य, श्री. राजेश वदाारिया:—** पूर्ण कधी होणार?

**उप अभियंता श्री.आशिवनी आहुजा**:— कमीत कमी तीन महीन्याचा कालावधी लागेल.

**सदस्य, श्री. राजेश वधारिया:—** तीन महीने! पावसाळयात कसे काय काम होणार.

**उप अभियंता श्री.आशिवनी आहुजा**:— परंतु ड्रेन चे काम पहिले करावे लागेल त्याच ठिकाणी हार्ड रॉक लावलेला आहे. ते तोडण्याचे काम चालू आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदाारिया:—** आपण त्यांना वर्क आरॅर्डर कधी दिलेली आाहे?

**उप अभियंता श्री.आशिवनी आहुजा**:— नोव्हेंबर २०१७ मध्ये.

**सदस्य, श्री. राजेश वदाारिया:—** आज मे महीना चालू आहे.

**उप अभियंता आश्विनी आहुजाः—** साहेब मध्ये ते काम चालू केले होते परंतु रॉक लागले होते. आम्ही त्यासाठी ब्रेकर मागविण्यात आले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वधारियाः—** रॉक आपल्याला एका भागामध्ये लागलेला आहे.

**उप अभियंता आश्विनी आहुजा**ः— पूर्ण भागामध्ये रॉक लागलेला आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे. दुसरा सम्राट अशोकनगर चे पाटोल्स चा जो विषय घेतला आहे. पाटोल्सच्या कामासाठी जास्त वेळ का लागत आहे?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—** सम्राट अशोकनगरचे काम आम्हाला सांगीतले होते. त्या कामाबाबत आम्ही संबंधित कॉन्ट्रक्टरला सांगितले होते, तांत्रिक अडचणीमुळे त्याचा प्लांट बंद आहे. आता सुध्दा आम्ही त्याला सुचना दिलेल्या आहे, दोन तीन दिवसामध्ये काम पूर्ण करून देण्यात येईल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** शहाड पासून ते बिर्ला मंदीर पर्यतचा जो मुरबाड रोड आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता** :— शहाड पासून ते बिर्ला मंदीराचा रोड एमएमआरडीए कडे आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** हो, एमएमआरडीए करत आहे परंतु काय करत आहे, कशी करत आहे हे बघितले का? काम कसे चालू आहे त्यांना डिमोलेशन करून दयाचे आहे हे नाही केले आजपर्यत, जिथे जागा मोकळी आहे तिथेच फक्त काम करत आहेत. बाकी लोक तिथे टपरी लावून बसले आहेत ते हटविण्याचे काम कोणाचे आहे? एमएमआरडीएचे आहे का?

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** प्रभाग अधिकारी करतील, बाकी कोण करणार.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—** मी उत्तर देतो, सर, ते काम एमएमआरडीए करण्यात येत आहे. आम्ही टाऊन प्लानींगद्वारे मार्किंग दिलेली आहे. प्रभाग अधिकारी त्यांना नोटीस देऊन, डिमोलेशन, प्रभाग अधिकरी करतील.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—**कधी करणार आहेत?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—**सर, याचे उत्तर प्रभाग अधिकरी देतील.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** प्रभाग अधिकारी कुठे आहेत?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—**मार्किंग झालेली आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—**हो, मार्किंग झालेली आहे ते आम्हाला माहीती आहे. काम कोण करणार. काम करण्यासाठी साईट, जागा मोकळी नाही.

**सदस्य, श्री.भारत राजवानीः—**प्रभाग क्र. १ मध्ये प्रभाग अधिकारी कोण आहेत?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—**त्यांनाकोणी चार्जदिला. साहेब, त्यांना एकही प्रभाग समिती व्यवस्थित सांभाळता येत नाही. आणि दोन दोन प्रभाग समित्या आपण त्यांना देतो. तर ते चूकीचे आहे, एका प्रभाग समितीचे काम बरोबर होत नाही. आपण बघा बाकीच्या प्रभाग समित्यांमध्ये जे काही बॅनर्स होल्डर्स वैगेरे लावलेत, पोस्टर लावलेले आहेत, गेटस् आम्ही उभे केलेले होते कोणी जंयती साजरी केली किवा आणखी काही, ते सगळे काढलेले आहेत त्या प्रभाग समितीमध्ये तुम्ही आज या गेट वरून आलात, बाबासाहेब आंबेडकर गेट आहे, प्रवेशद्वार, त्या प्रवेशद्वारवर बॅनर लावलेले आहेत, शहरामध्ये तर लावलेले आहेत, ते काढायची जबाबदारी कोणची नगरसेवकांची आहे. प्रभाग अधिकारी जर हे काम करत नसतील तर अजून कुठले काम सांगायचे. रस्त्यांनी बरोबर जाता येत नाही नादुरूस्त वाहने ऐवढी आहेत, गॅरेजवाल्यांची वाहने उभी आहेत. कार विकणारे उभे आहेत. त्यांच्यावर कारवाई करायला यांच्याकडे वेळ नाही. तर ते बाकीचे कामे कधी करणार.

**सदस्य, श्री.भारत राजवानीः—**समतानी असे अधिकारी आहेत जेव्हा त्यांची तक्रार केली कोणा विरूध्द जर तक्रार केली तर त्यांना मेसेज देवून समोर पाठवतो की यांना सांभाळून घ्या.

**आयुक्त श्री. गणेश पाटील**ः— समतानी कुठे गेले.

**सदस्य, श्री.भारत राजवानीः—**हे अधिकारी आहे. कारवाई काही करणार नाही उलट आमच्यावर दबाव टाकणार.

**<u>सदस्य, श्री. दिनक सिरवानी:–</u>**शितलानी जी रामायण नगरचे काय परिस्थिती आहे. चार्ज कोणकडे आहे. संदिप जाधव कडे आहे का सेवकानी कडे आहे.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :–</u>** संदिप जाधव यांच्याकडे आहे. काही कारणासाठी

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u>**आज पर्यत माहिती नाही आहे का? दोघांपैकी चार्ज कोणाकडे आहे, बीएम साठी त्यांना फोन करणे किंवा सिमेंट ब्लॉक साठी फोन करणे, मला एवढेच काम आहे का? एकच जणकडे चार्ज दया, एक तर संदिप किंवा सेवकानी. तुमची काही अडचण नाही आहे, प्रत्येक कामासाठी आम्ही तुमच्याकडे तर येणार नाही. त्यासाठी ज्यनिअर इंजिनिअर आहेत.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :–</u>** हा जो सीसी रोड आहे, हे काम संदिप जाधवजी बघत आहेत. त्याच्यामध्ये काय होते,

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u>**दुय–या स्थायी समितीची मिटीग येईपर्यंत त्याची मी वाट बघू का?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u>** खेमाणी नाला आणि वालधूनी सेल्वनजी..

**<u>महापालिका सचिव :–</u>** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–**मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ९/२/२०१८ (त्यात ६/३/२०१८ व ७/३/२०१८), व दिनांक ३१/३/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**<u>महापालिका सचिव:–</u>**यामध्ये एक मागच्या मिटींग मध्ये होते ३१/३/१८ मध्ये गोषवा–यामध्ये झा पी अ‍ॅड कंपनी ९९ टक्के जास्त लिहिले त्यात कमी करणे ही दुरूस्ती करणे. मीनीटस् मध्ये आलेले आहे कन्फर्म साठी दुरूस्ती सांगते. हे त्याच्याकडून गोषवा–यात जास्त लिहिले गेले आहे, आणि खाली कमी लिहिले गेले. ती दुरूस्ती केली.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u>** आपण रिझॉल्युशनमध्ये बरोबर करून घेण्यात यावे.

**<u>महापालिका सचिव:–</u>** पास?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u>** पास.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :–** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ९/२/२०१८ (त्यात ६/३/२०१८ व ७/३/२०१८), व दिनांक ३१/३/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्र चौधरी

**<u>स्थायी समिती ठराव क्र. :–</u> १** **<u>दिनांक : ८/५/२०१८</u>**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक ९/२/२०१८ (त्यात ६/३/२०१८ व ७/३/२०१८), रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३७ पर्यंतचे, दिनांक ३१/३/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४३ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिवः—** विषय क्र. २ वाचून दाखवतात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मा. सभागृह नेता यांच्या निधीतुन १०० नग (पोर्टेबल) सिंगल सीटर युरीनल खरेदी करण्यासाठी ई निविदा मागविण्यास व ४६ आवश्यक ठिकाणे निश्चित करून वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

---

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानीः—** हा जो विषय आहे, आज पूर्ण शहरामध्ये जेवढापण बाजाराचा भाग आहे. प्रत्येक नगरसेवक जवळजवळ ७८ नगरसेवक आहेत, प्रत्येकाला शौचालयाची सर्व ठिकाणी आवश्यकता आहेच, त्यासाठी भरपूर प्रमाणात मागणी येत आहे की शौचालय नाही आहे, महिलांसाठी सुध्दा शौचालय नाही आहे. लहान लहान दुकानामध्ये सुध्दा शौचालय नाही आहेत. त्यासाठी लोकांची मागणी असल्यामुळे मी एक पत्र दिले होते. त्यामध्ये असे आले आहे की १०० ठिकाणी , ६००००/—प्रति शौचालय काही दिवस पहिले लावले होते. हे सिध्दांत समाज विकास संस्थेद्वारे मंजूर दरामध्ये लावण्यात आले होते. आणि ब—याच ठिकाणी लावण्यात आले होते आणि मी ते पाहिले, त्यानंतर मी हे पत्र दिले होते की असे १०० शौचालय लावले गेले पाहिजे. हा विषय आला आहे तर माझा असा विचार आहे की असे जे ६० हजाराचे शौचालय आहेत,ते १०० ठिकाणी त्याच दराप्रमाणे सिध्दांत समाज विकास संस्थेने जे लावले होते, त्यांनाच हे काम देण्यात यावे. आणि ७८ वार्ड मध्ये प्रत्येक नगरसेवकाला एक ७८ नगरसेवकांकडून पत्र घेवून की कोणत्या ठिकाणी लावायचे आहेत त्याच्यां ते सूचना देतील.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—**यामध्येच, १०० मध्ये, ठिक आहे.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानीः**— त्यांना ७८ मध्ये टाकण्यात यावे, की कुठे कुठे लावण्यात यावे, प्रत्येक नगरसेवक पत्र देतील की मला हया ठिकाणी शौचालय लावून देण्यात यावे. ७८ आणि सेनेटरी विभागाकडून काही २० ते २२ ची मागणी केली आहे, असे १०० शौचालय लावण्यात यावे. नगरसेवकांना जास्त माहिती असल्यामुळे की कुठे लावले जावे, एक शौचालय प्रत्येक वार्डात लावून दयावे. ७८ नगरसेवकांच्या वार्डामध्ये आणि २२ एसआय आहेत त्यांनी जी सूचना दिलेली आहे. असे एकूण १०० ठिकाणी लावले गेले पाहिजे. आणि मंजूर दराप्रमाणे लवकरात लवकर सिध्दांत समाज विकास संस्थेकडून सुरू करण्यात यावे. पास इतिवृताची वाट न पाहता.

**महापालिका सचिव**ः— मी ठराव वाचते.

**आयुक्त,श्री.गणेश पाटीलः**— ई निविदा शिवाय कसे करणार.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**ः— पहिले ठराव मंजूर केला होता. त्याच संस्थेला देण्यात यावे आणि त्याच दरामध्ये.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**ः— असे करू शकत नाही ई निविदा काढावी लागेल.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**ः हयाच संस्थंला पहिले देण्यात आलेला आहे.

**आयुक्त,श्री.गणेश पाटीलः—**पहिले दिले असेल. आता जर शैचालय बसवायचे असेल तर त्याचे स्पेसीफिकेशन बनवावे लागेल. आणि टेंडर काढावे लागेल. कारण की त्याची रक्कम मोठी आहे.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**ः— एक वार्ड मध्ये एक मागवत आहोत. ७८ वार्डमध्ये ७८ शौचालय प्रत्येकी ६० हजाराचे होत आहेत.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:– ६० हजार नाही त्याची पूर्ण रक्कम पकडावी लागेल. १०० आहेत तर ६० लाख रूपये होतील.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:– मे.सिध्दांत समाज विकास संस्थेकडून खरेदी करण्यासाठी ठराव मंजूर झाला असून त्यांचे संस्थेकडून..

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:– शेवटी काय लिहिलेले आहे हे बघावे लागेल, हा प्रस्ताव आहे त्याला तुम्ही मंजूरी दयावी त्याची निविदा प्रक्रिया करता येईल.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:– परंतु पहिले गोषवा–यामध्ये आलेले आहे, ६० हजार प्रति नग या दराने मे.सिध्दांत समाज विकास संस्था याच्या कडून खरेदी करण्यासाठी ठराव मंजूर झाला असून त्याच संस्थेकडून १०० नग शहरात लावल्यास शहरातील नागरीक व व्यापारी त्यांचा फायदा होईल. ठरावामध्ये लिहिलेले आहे तरी मंजूर दराने सभागृह नेता यांच्या निधी मधून करणेसाठी मा. सभागृह नेता हे लिहिलेले आहे.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:– हे आपले पत्र लिहिलेले आहे.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:– मी पत्रामध्ये लिहिलेले आहे की १०० ठिकाणी लावावे.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:– ही कोणची फाईल आहे.

**उप आयुक्त श्री. संतोष देहरेकर:–** तत्कालीन आयुक्त होते की त्यांनी ई टेडर मागवायचे.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:– म्हणजे यापूर्वी येवून गेला होता. नाही नाही, हा विषय इतिवृत्तामध्ये पहिल्यांदा येतो की पूर्वी येवून गेला. डायरेक्ट कुठेच नाही. ३ लाखाच्या वरती काहीच डायरेक्ट नाही आहे.

**उप आयुक्त श्री. संतोष देहरेकर:–**७३ सी हे मान्यतेसाठी.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–**७३ सी आहे हे आम्ही आयुक्तजी यांना प्राधिकृत करत आहेत ॲग्रीमेंट करण्यासाठी.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:– ७३ चे काय आहे की आम्ही जेव्हा ई निविदा काढत असतो ५(२)(२) मध्ये करत नाही आहोत. हे मंजूर दराप्रमाणे जसे पहिले ज्या संस्थेला दिलेले आहे आणि त्यांनी लावलेले आहेत,तर त्यांना त्या मंजूर दरामध्ये दिले पाहिजे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–**आपण त्यांना तसेच देवू शकतो.

**उप आयुक्त श्री. संतोष देहरेकर**:– स्थावर मालमत्ता किंवा त्याच्याशी संबंधित करण्यासाठी संविदा करीत हया २५ लाख रूपये अधिक रू. ५० लाख रूपयापेक्षा अधिक त्या रक्कमेचा खर्च असेल अशी इतर कोणतीही संविदा महापौरानें पूर्व मान्यता दिल्याशिवाय आयुक्तांनी करता कामा नये.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:– ॲडमिनीस्ट्रेटीव्ह मंजूर आहे. स्थायी समितीकडे फक्त ॲडमिनीस्ट्रेटीव्ह व आर्थिक मंजूरीसाठी येत असतात, आपण एक वेळा मंजूरी दिली तर पूढची प्रोसीजर नियमाप्रमाणे केली जाईल. नाही नाही २५ लाखापेक्षा जास्त रक्कमेचे जर काम करायचे असेल तर.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–**जी रू. ५० लाखाची बाब आहे. असे आहे की जर आयुक्त साहेबांना वाटले तर ते डायरेक्ट करू शकतात,जर महापौरांची मंजूरी असेल तर रू. ५० लाखापर्यंत.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:– हयाच्या अगोदर घेतले आहे.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:– घेतले असेल सामान तर आपण घेतच राहतो पण सामान ज्याच्याकडून घेतले असेल त्याच्याकडून पूर्ण आयुष्यभर घेतले पाहिजे.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:– असे काही नाही. पहिल्या वेळेस त्याच्याकडून घेतले आहे. त्यामुळे असे वाटते असे झाले पाहिजे.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील:–**नाही, असे नाही आहे ते, आम्ही टेंडर सुध्दा करत आहोत रेट पण आला तर परत ऑर्डर देत आहोत तर ५० टक्केसाठी जास्तीत जास्त देवू शकतो. त्या पेक्षा जास्त देवू शकत नाही. तसे टेंडरचे नियम आहेत. आपल्याला फक्त ॲडमिनीस्ट्रेटीव्ह मंजूरी दयायची आहे. कारण आम्ही रू. २५ लाखापेक्षा जास्त किमंतीची मालमत्ता घेत आहोत, त्यासाठी आपण स्थायी समिती मध्ये ठेवले आहे. ॲप्रूवल दया कदाचित जर इन

प्रीन्सीपल बाकीची जी सरकारी प्रक्रीया आहे त्याप्रमाणे हे काम होईल. केणे तुम्ही मला फाईल दाखवीली होती, तिथूनच सांगा.

**श्री. विनोद केणे, प्र. मु.स्वच्छता निरिक्षक**:— मा. सभागृह नेता,यांनी पत्र दिले होते १०० ठिकाणी शौचालय आपल्या शहरात बसवायच्या आहेत त्याअनुषंगाने आरोग्य विभागामार्फेत आवश्यक त्या ठिकाणांची यादी तयार करण्यात आली होती. आणि सदरची यादी एकूण ४६ ठिकाणे आम्ही निश्चित केली होती. त्या शौचालयांस मजूरी मिळण्यासाठी ॲक्सेसी मिळेल,

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी**:—हे ठिकाणे चूकीची आहेत, एसआय दिलेली १९ ठिकाणी आणि नगरसेवकांची ७८ ठिकाणे याप्रमाणे आम्हाला करायचे आहे.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— बोला.

**श्री. विनोद केणे, प्र. मु.स्वच्छता निरिक्षक**:—त्या अनुषंगाने तयार केला होता, यापूर्वी आपण निविदा काढली होती त्याच्यात शौचालयाची किमंत ६० हजार प्रति नग आली होती. त्यानुसार हा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर आणला गेला होता. मा. आयुक्त यांनी सदरचे निविदा सदरचे साहित्य किंवा शौचालय थेट विक्री किंवा खरेदी न करता, ई निविदासाठी प्रस्तावित करावे. त्यानुसार आपण सदरचा प्रस्ताव हा ई निविदा प्रस्तावित करण्यासाठीच मान्यतेसाठी आणलेला आहे. आणि ७३ क ही रक्कम २५ लाखेक्षा जास्त असल्यामुळे स्थायी समिती समोर सादर केलेली आहे.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— तुम्ही ही फाईल माझ्याकडे आणली होती का?

**श्री. विनोद केणे, प्र. मु.स्वच्छता निरिक्षक**:— सर, तुम्ही त्यावेळेस नव्हता, सदरची फाईल निंबाळकर साहेब होते त्यावेळेस फायनल झाली.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी:—**त्यांची सही आहे का?

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— त्यांनीच लिहिलेले आहे की ई टेंडर करा म्हणून.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— ठिक आहे. या ठरावामध्ये आपण असे करा की हे जे एसआय यांनी १९ ठिकाणे आणि अजून तीन ते चार ठिकाणे दिले तर एकूण २२ ठिकाणे लिहून दिलेले आहेत तसेच जे ७८ नगरसेवक निवडून आलेले आहेत त्यांचे एक एक पत्र घेवून ठिकाण असेत किंवा कोणती जागा आहे ते सांगतील, ज्या ठिकाणी जास्त आवश्यकता आहे. काय होते की प्रत्येक नगरसेवकाने सांगितलेले असते की या ठिकाणी शौचालय बनवून देतो आणि तेथे ते शौचालय बनवून दिले जात नाही. ७८ ही ठिकाणे,

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— लोकेशन होत नाही ना तेवढे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—**खरी अडचण तर आज जी साफसफाईची आहे, जे दुसरे टॉयलेट आहेत ते बरोबर साफ होत नाही.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— त्याचा अगोदरच टेंडर दिलेला आहे ना. प्रत्येक ठिकाणची वर्क ऑर्डर मिळालेली नाही, साफसफाईची वर्क ऑर्डर आता मिळेल.

**सदस्य, श्री. भारत राजवानी**:— ते कधी मिळणार जेव्हा नगरसेवकाचे होत नाही तर ते कधी होणार.

**श्री. विनोद केणे, प्र. मु.स्वच्छता निरिक्षक**:—आपल्याला त्यावरती एक टाकी पण पाहिजे २०० लिटरची, शौचालयाची २०० लिटर्सची टाकी असेल तर आपण वेगवेळया ठिकाणी ठेवतो तर २०० लिटरची टाकी त्याच्यात समाविष्ट करू.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— आपण आता टेंडर काढणार तर त्या हिशोबानेच टेंडर काढण्यात यावी.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— आपल्याला रक्कमेला हे दिलेले आहे स्पेसिफिक अजून ठरलेले नाही आहे. स्पेसिफिकेशन ठरवा तुम्ही आणि स्पेसिफिकेशन झाल्यानंतर हे करा. लोकेशन जे आहेत आता १०० ठिकाणाचे दिले आहेत, पण फिजीकल लोकेशन किती आहे.

**प्र. मु.स्वच्छता निरिक्षक,श्री. विनोद केणे**:— सर, फिजीबल ४६ ची यादी आम्ही बनविलेली आहे.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— आता माझ्या वार्डात नाही आहे माझया वार्डात ५ ठिकाणी आवश्यकता आहे, एक पण ठिकाण लिहिलेले नाही. असे नाही आहे हे जे लोकेशन जी नाही. ही आपल्या एसआयचे लोकेशन आहे

आज माझ्याकडे ५ ठिकाणी आवश्यकता आहे. माझ्याकडे एक पण ठिकाण नाही. काल पासूनच माझ्याकडे फोन यायला सुरूवात झाली. एक एक नगरसेवकाला एक एक तर पहिले दया,

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— ही टॉयलेट आहे, मुतारी.

**सदस्य, श्री. भारत गंगोत्री**:— जमनुजी हे जे शौचालय आपण बघितले आहेत, यामध्ये खाली सेफ्टी टॅंक वैगेरे आहे,

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**वरती लावणार आहेत.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— आता आम्ही ई टेंडरींग केले तर आयुक्त साहेब सांगा. आता ई टेंडरींग होत आहे तर कसे व्हायला पाहिजे, त्याच्यावरती पाण्याची टाकी असायला पाहिजे. आणि शौचालयाचे कनेक्शन थेट नाली मध्ये कसे गेले पाहिजे, लॅट्रीन नाही आहे, युरीनल आहे. त्याला सेफ्टी टाकीची जरूरत नाही , त्याला नाली मध्ये कसे जाईल हे सर्व बनवायला पाहिजे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी**:— आउटलेट वैगेरे

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— सर्व करणार ना सर्व त्याच्यातच आहे. जे पहिले बनविलेले आहेत त्याचे आउटलेट थेट नालीमध्ये टाकायचे आहे.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** केणे साहेब, हे शौचालय फक्त पुरूषांसाठीच आहेत का?

**श्री. विनोद केणे, प्र. मु.स्वच्छता निरिक्षक**:— नाही, स्त्रियांसाठी सुध्दा करू शकतो. पुरुषांसाठीच आहे असे काही नाही, म्हणजे आहे दोन्हींसाठी आहे. जिथे जशी मागणी असेल त्या नुसार लावले जाईल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** आपण युनिसेक्स बनवा.

**श्री. विनोद केणे, प्र. मु.स्वच्छता निरिक्षक**:— युनिसेक्स योग्य होणार नाही, महिला जात नाही.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— आपण बनवायला बनवू परंतु त्याचा उपयोग झाला पाहिजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:— स्त्रियांसाठी आणि पुरूषांसाठी वेगवेगळे बनवा. जसे एक पॅनल मध्ये ४ आहेत तर २ स्त्रियांसाठी आणि २ पुरूषांसाठी किंवा मार्केटसारख्या ठिकाणी जिथे आवश्यकता असेल तिथे बनवा बाकी पुरूषांसाठी जास्त बनवावे. ३० टक्के स्त्रियांसाठी आणि ७० टक्के पुरूषांसाठी.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— ५०,५० टक्के करा.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— ठिक आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**ई टेंडर करण्यासाठी आपण मंजूरी देऊ शकतो, स्पेसीफिकेशन जो आहे ते प्रशासनाने बनवावे, त्यासाठी आयुक्त साहेबांना प्राधिकृत करत आहेत. आणि इतिवृत्ताची वाट न पाहता हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** पास.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—** मा. सभागृह नेता यांच्या निधीतुन १०० नग (पोर्टेबल) सिंगल सीटर युरीनल खरेदी करण्यासाठी ई निविदा मागविण्यास व ४६ आवश्यक ठिकाणे निश्चित करून वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहर हे व्यावसायिक आणि व्यापारी शहर असुन या शहरामध्ये वेगवेगळया राज्याच्या शहरामधुन व्यापार करण्यासाठी व्यापारी येत असतात. तसेच इतर नागरिक हि शहर

पाहण्यासाठी येत असतात. त्यांना लघुशंका करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्या कारणाने ते इतरत्र भरबाजारात, रहदारीच्या रस्त्यावर, उद्ययानाच्या बाहेर, भिंतीलगत, उघडयावर लघुशंका करतात. त्याने शहराचे नांव खराब होते तसेच शहराचे विद्रुपीकरण होऊन संपुर्ण परिसरा मध्ये दुर्गंधी पसरते. त्यामुळे मा. स्थायी समिती ठराव क्र. ५१ दिनांक १६/१०/२०१७ रोजी अनुक्रमांक ३ नुसार सिंगल रिटर मुतारी रू. ६०,०००/— प्रति नग या दराने मेसर्स सिध्दांत समाज विकास संस्था यांच्या कडून खरेदी करण्यासाठी ठराव मंजुर झाला असुन त्याच संस्थे कडून १०० नग मुताऱ्या शहरा मध्ये लावल्यास शहरातील नागरिक व व्यापारी यांना त्यांचा फायदा होईल. तरी मंजुर दराने सभागृह नेता यांचे निधी मधुन करणेसाठी मा. सभागृह नेता यांनी आरोग्य विभागाकडे पत्र सादर केले आहे.

तरी त्यापुर्वी शहरात मुताऱ्यांची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत जा.क्र. उमपा/आवि/मुस्वनि/२२२/२०१८, दिनांक १५/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये सर्व स्वच्छता निरीक्षक यांच्याकडून लेखी मागणी/अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने प्रभागातील सर्व स्वच्छता निरीक्षक यांनी त्यांचा आवश्यक ठिकाणासह लेखी मागणी/अहवाल खालिल प्रमाणे सादर केला आहे.

| प्र.स. क्र. | पॅनल क्र. | अ.क्र. | मुतारी ठेवण्याचे आवश्यक ठिकाणाचा पत्ता | आवश्यक संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | १ ब | १ | मुरबाड नाका ट्रन्सफार्मर लगत, उल्हासनगर — १ | १ |
| | १ अ | २ | नाका नं. १० समोर कचरा कुंडी लगत, उल्हासनगर —१ | १ |
| | ३ ब | ३ | शहाड स्टेशन नाल्या लगत, उल्हासनगर — १ | १ |
| | ३ ड | ४ | निरंकारी हॉल समोरील पटरी लगत, फुटपाथ (सी—ब्लॉक रोड), उल्हासनगर — १ | १ |
| | ४ अ | ५ | डॉल्फिन क्लब हॉटेल समोर, उल्हासनगर — ३ | १ |
| | ५ अ | ६ | ब्रम्हकुमारी पीस पार्क पाठीमागे, मधुर मिलन समोर, गोलमैदान उल्हासनगर — १ | १ |
| | ५ क | ७ | गोल मैदान, कॉरपोरेसन बॅक समोर, उल्हासनगर — १ अभिनव बॅक | १ |
| | ५ ड | ८ | टर्निग पॉईंट, हरिओम अपार्टमेन्ट समोर, उल्हासनगर — ३ | १ |
| | ५ ड | ९ | उमपा चौक, लाईट डी.पी. जवळ उल्हासनगर — ३ | १ |
| २ | ६ | १० | सखी पॅलेस नाला जवळ, उल्हासनगर — २ | १ |
| | ८ क | ११ | धर्म विल्हा आपर्टमेन्ट समोर, पंजाबी कॉलनी चौक, उल्हासनगर — २ | १ |
| | ८ ड | १२ | पुरी भाजी नाल्या बाजुला ठाणे जिल्हा कॉ.बॅक, उल्हासनगर — २ | १ |
| | ८ ड | १३ | सन्मुख सदन बिल्डिंग मागे पडलेल्या डेब्रिज बाजूला शिवहरी कॉम्पलेक्स समोर, उल्हासनगर — २ | १ |
| | १० क | १४ | लोहारवाला नाला येथे हिराघाट पंचशीला नगर रोड, उल्हासनगर — ३ | २ |
| | १० अ | १५ | रामगिरधारी इंड्रस्टीच्या बाजुला फुटपाथ वर उल्हासनगर — ३ | २ |
| | १० अ | १६ | खन्ना कंपाऊंड ब्रिज चा बाजुला उल्हासनगर — ०३ | २ |
| ३ | ११ अ | १७ | रोटरी गार्डन गेट जवळ | २ |
| | ११ ब | १८ | बॅ.नं. ११०१, संगम हॉल समोर | २ |
| | १३ अ | १९ | उड्डान ब्रिज खाली महापालिका हजेरी शेड जवळ, उल्हासनगर — ४ | १ |
| | १५ अ | २० | एस.के.प्रोडक्ट फॅक्टरी सम्राट कंपनी समोर, व्ही.टी.सी. रोड, उल्हासनगर —४ | १ |
| | १५ अ | २१ | गावदेवी मंदिर जवळ, ट्रान्सफॉर्मरच्या बाजूला, उल्हासनगर — ४ | १ |
| | १५ क | २२ | पेन्सील फॅक्टरी जवळ, व्ही.टी.सी. रोड, उल्हासनगर — ४ | १ |
| ४ | १६ क | २३ | कल्याण जनता सह बॅक जवळ, जय बाबा धाम रोड,उल्हासनगर — ५ | १ |
| | १९ क | २४ | कोमल सर्व्हिससेंटर कैलास कॉलनी, उल्हासनगर — ५ | १ |
| | १९ ड | २५ | बसंत नगर अर्पाटमेंटच्या बाजुला मोकळया मैदानात, उल्हासनगर— ५ | १ |
| | २० | २६ | आकाश कॉलनी लाईट डी.पी. नाल्याच्या बाजुला, उल्हासनगर — ५ | १ |

तसेच मुख्य स्वच्छता निरीक्षक यांनी मुताऱ्यांची आवश्यकता असलेले १५ ठिकाणाची यादी खालील प्रमाणे सादर केली आहे.

| प्र.क्र | पॅनल क्र | अ.क्र | मुताऱ्या बसविण्याचे ठिकाणचा पत्ता | आवश्यक संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | १ | उल्हासनगर १, भाजी मार्केट, पाठीमागील नाल्यावर | १ |
| | २ | २ | अनिल चहावाला हॉटेलच्या समोर, नाल्यालगत | १ |
| | ३ | ३ | डी.ए.कॉलेज, नाल्यालगत, गुलशननगर | १ |
| | ४ | ४ | गॅस गोडावन नाल्यालगत, साईबाबा नगर | १ |
| २ | ६ | ५ | एस.ई.एस जुनियर कॉलेज, खेमानी रोड कचरा कुंडी जवळ | १ |
| | ७ | ६ | आसाराम बापु आश्रम पोलिस चौकीच्या बाजुला | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ९ | ७ | पप्पु गार्डन, कचरा कुंडी जवळ फुटपाथवर | १ |
| | १० | ८ | एकता नगर कॉलनी, नाल्यालगत | १ |
| | १० | ९ | आरोमा बारच्या पाठीमागे | १ |
| | १० | १० | शांतीनगर, मीनाताई ठाकरे नगर | १ |
| ३ | ११ | ११ | मनिष नगर, कचराकुंडी जवळ | १ |
| | १५ | १२ | रोमा अपार्टमेंट, विठ्ठलवाडी पोलिस स्टेशनच्या समोर कुंडीजवळ | १ |
| ४ | १६ | १३ | कॅनरा बॅकच्या पाठीमागे, बॅ.न १६८३ गुलसंगत दरबारजवळ | १ |
| | १७ | १४ | व्हिनस कॉर्नर, कचरा कुंडी समोर, राधेश्याम नगर | १ |
| | १९ | १५ | टॅकर पॉइंट, गायकवाड पाडा | १ |

तरी प्रभागातील स्वच्छता निरीक्षक यांनी उक्त सादर केल्याप्रमाणे एकुण ३१ ठिकाणी मुताऱ्यांची आवश्यकता असल्याचा लेखी मागणी/अहवाल सादर केला आहे. तसेच शहरातील नागरीकांकडून व लोकप्रतिनीधी यांनी वेळोवेळी केलेल्या मागणी नूसार मुख्य स्वच्छता निरीक्षक कार्यालयाकडून १५ ठिकाणी मुताऱ्यांची आवश्यकता आहे अशा एकुण ४६ (पोर्टेबल) सिंगल सीटर युरीनलची आवश्यकता आहे. मा. स्थायी समिती ठराव क्र. ५१ दिनांक १६/१०/२०१७ रोजीच्या मान्यतेनुसार अनुक्रमांक ३, नुसार मे. एस. एस. संस्था, उल्हासनगर यांच्याकडून सिंगल सीटर मूत्रमार्गात क्षेत्र १.२ मीटर × २६ मीटर खरेदी करण्यासाठी प्रति नग ६०,०००/— (अक्षरी साठ लाख रूपये मात्र.) दर मंजुर आहे. याप्रमाणे उक्त नमुद ४६ ठिकाणी मुतारी ठेवण्यास व त्याकरीता येणारा सदरचा अंदाजीत खर्च रूपये २७,६०,०००/— (अक्षरी सत्तावीस लाख साठ हजार मात्र.) अपेक्षीत आहे. सदरचा खर्च मा. सभागृह नेता यांच्या निधीतुन करण्याचे व मंजुर दराने मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर, यांच्याकडून थेट १०० नग खरेदी करण्याचे निर्देश दिलेले होते.

त्याअनुषंगाने यापुर्वी मे.एस.एस. संस्था, उल्हासनगर यांच्याकडून सिंगल सीटर मूत्रमार्गात क्षेत्र १.२ मीटर × २६ मीटर खरेदी करण्यासाठी प्रति नग ६०,०००/— (अक्षरी साठ लाख रूपये मात्र) दर मंजुर आहे. सदरचा खर्च मा. सभागृह नेता यांच्या निधीतुन करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. त्यानुसार मा. आयुक्त सो., यांनी दिनांक १७/०३/२०१८ रोजी अन्वये सदर प्रक्रिया ई—निविदा मागवुन पुर्ण करण्याचे निर्देश दिलेले आहे. त्यानुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे सिंगल सीटर मूतारी खरेदी करण्याकामी दर मागविण्यासाठी ई—निविदा सुचना प्रसिध्द करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. तसेच प्रस्तावित ठिकाणे ४६ आहेत, तर मा. सभागृह नेता यांनी ६० लक्षाचा निधी यासाठी उपलब्ध करून दिलेला आहे. सबब शिल्लक निधीसाठी इतर आवश्यक ठिकाणे स्थायी समितीत निश्चित करून देणेबाबत व मा. स्थायी समितीची वित्तीय मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मान्यतेसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. २** **दिनांकः— ८/५/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेअंती मा. सभागृह नेता यांच्या निधीतुन १०० नग (पोर्टेबल) सिंगल सीटर युरीनल खरेदी करण्यासाठी ७८ नगरसेवकांनी त्यांच्या प्रभागात योग्य वाटेल अशी जागा निश्चित करुन त्यांच्याकडुन तसे पत्र घेतल्यानंतरच तसेच २२ युरिनल व स्वच्छता निरिक्षकांनी दिलेल्या एकुण १०० युरिनल खरेदी करण्यासाठी ई निविदा मागविण्यास आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे तसेच वित्तीय मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव** :– विषय क्र ३ वाचून दाखवतात.

---

**विषय क्र. ३ :–** महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 13BI015531600 जुना क्र. 13/1031, 13BI015478200 जुना क्र. 13/0476 व 13BI015478300 जुना क्र. 13/0477 ही दुबार नोंद रद्द करणेबाबत.

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–**हा काय विषय आहे हे कोणी समजून सांगेल का?

**मुख्य लेखापरिक्षक श्री. दादा पाटील**:– या अगोदर आम्ही आपल्याला अगोदरच ८८ कोटीची दूबार नोंद आणि हे प्रपोजल पाठवलेले आहेत. त्याच्यामध्ये हे पण प्रपोजल आहे. परंतु आपले सन्मानीय नगरसेवक यांनी फार आग्रह केल्यामुळे हा प्रस्ताव आलेला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–**नाही, नाही, मागच्या वेळेला जो आपण विषय आणला होता तो डिफर झाला ना. त्याच्यामध्ये सगळे एकत्र आणा असे सांगितले होते ना.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:– हे आहेत का त्याच्यात. त्याच्यातच असेल तर सर्व एकत्र आणायला पाहिजेत. हे डिफर करून सर्व एकत्र आणावे.

**मुख्यलेखापरिक्षक श्री. दादा पाटील**:– आपल्याकडे दिलेले आहेत

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:– पेंडींग आहेत आम्ही घेवून येतो.

**सदस्य, श्री. भारत राजवानी**:– आमचे पण काही एक ते दीड वर्षापासून पेंडींग राहिलेले आहेत.

**महापालिका सचिव :–**डबल प्रस्ताव झाला हा. डिफर झाला तर पुन्हा येईल, रिजेक्ट केला तर हे संपुष्टात येईल.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:– हे रिजेक्ट करून अपोआप परत हा प्रस्ताव येईल.

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :–**महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. १३ठ०१५५३१६०० जुना क्र. 13/1031, 13BI015478200 जुना क्र. 13/0476 व 13BI015478300 जुना क्र. 13/0477 ही दुबार नोंद रद्द करणेबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयास अनुसरूण सादर करण्यात येते की श्री. महेश पी. सुखरामानी, राहणार – कैलास निवास, नाना–नानी पार्क जवळ, उल्हासनगर २ यांनी दिनांक २२/०९/२०१७ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 13BI015531600 जुना क्र. 13/1031, 13BI015478200 जुना क्र. 13/0476 व 13BI015478300 जुना क्र. 13/0477 ही दुबार नोंद रद्द करणेसाठी विनंती केलेली आहे.

**विषयांकित प्रकरणा संदर्भात कार्यालयीन दप्तरी नोंदीचा तपशिल खालील प्रमाणे.**

1) **GURNOMAL H.** मालमत्ता क्र. **13BI015531600** जुना क्र. **13/1031**

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वर्षिक भाडे | एकुण क्षेत्र | कर माफक्षेत्र | करपात्र क्षेत्र चौ.फु. |
|---|---|---|---|---|---|---|
| मोकळी | निवासी | ०१ एप्रिल ८६ | ० | २५९ चौ.फुट | ० | २५९ चौ.फुट |
| एसी शिट ब्रिक्स | निवासी | ०१ एप्रिल ८६ | ० | २६० चौ.फुट | ० | २६० चौ.फुट |

या

करपात्र मालमत्ता क्र. 13BI015531600 जुना क्र. 13/1031 या मिळकतीकरीता वर्ष २०१७—१८ करीता चालु मागणीसह आकारण्यात आलेला मालमत्ता कर रक्कम रू. ४२१४३/— व विलंब शास्तीसह रक्कम थकीत आहे.

2) **MAHESH/GANIESHIBAI P/NEETU M.S** मालमत्ता क्र. **13BI015478200** जुना क्र. **13/0476**

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वर्षिक भाडे | एकुण क्षेत्र | कर माफक्षेत्र | करपात्र क्षेत्र चौ.फु. |
|---|---|---|---|---|---|---|
| मोकळी | निवासी | ०१ एप्रिल ८६ | ० | २३७ चौ.फुट | ० | २३७ चौ.फुट |
| एसी शिट ब्रिक्स | निवासी | ०१ एप्रिल ८६ | ० | ३१९ चौ.फुट | ० | ३१९ चौ.फुट |

या

करपात्र मालमत्ता क्र. 13BI015478200 जुना क्र. 13/0476 या मिळकतीकरीता वर्ष २०१७—१८ करीता चालु मागणीसह आकारण्यात आलेला मालमत्ता कर रक्कम रू. ९०/— व विलंब शास्तीसह रक्कम थकीत आहे.

3) **NEETU MAHESH SUKHRAMANI** मालमत्ता क्र. **13BI015478300** जुना क्र. **13/0477**

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वर्षिक भाडे | एकुण क्षेत्र | कर माफक्षेत्र | करपात्र क्षेत्र चौ.फु. |
|---|---|---|---|---|---|---|
| मोकळी य | निवासी | ०१ एप्रिल ८६ | ० | १२९ चौ.फुट | ० | १२९ चौ.फुट |
| एसी शिट ब्रिक्स | निवासी | ०१ एप्रिल ८६ | ० | ४९४ चौ.फुट | ० | ४९४ चौ.फुट |

करपात्र मालमत्ता क्र. 13BI015478300 जुना क्र. 13/0477 या मिळकतीकरीता वर्ष २०१७—१८ करीता चालु मागणीसह आकारण्यात आलेला मालमत्ता कर थकीत नाही आहे.

**स्थळ पहाणी अहवालाचा तपशिल**

दिनांक / /२०१८ रोजी तिन्ही मिळकतीची प्रत्यक्ष पहाणी केली असता मालमत्ता क्र. 13BI015531600 जुना क्र. 13/1031, 13BI015478200 जुना क्र. 13/0476 व 13BI015478300 जुना क्र. 13/0477 या ठिकाणी बॅरेकच्या परिसरात कैलास निवास या मिळकतीची सन २००३ मध्ये नोंद केलेली आहे.

उक्त बाबी विचारात घेता महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 13BI015531600 जुना क्र. 13/1031, 13BI015478200 जुना क्र. 13/0476 व 13BI015478300 जुना क्र. 13/0477 ही दुबार नोंद असल्याची दिसुन येत आहे.

तसेच मालमत्ता क्र. 13BI015531600 जुना क्र. 13/1031 वर मालमत्ता कर रक्कम रू. ४२१४३/— व मालमत्ता क्र. 13BI015478200 जुना क्र. 13/0476 वर मालमत्ता कर रक्कम रू. ९०/—इतकी आहे व 13BI015478300 जुना क्र. 13/0477 या मिळकतीकरीता वर्ष २०१७—१८ करीता चालु मागणीसह आकारण्यात आलेला मालमत्ता कर थकीत नाही आहे. तरी विलंब शास्ती किंवा स्थायी समिति मंजुरी मिळपर्यतची रक्कम वसुल न होण्याजोगे आहे. असे इकडील मत आहे.

सबब महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम १५२ नुसार मालमत्ता क्र. 13BI015531600 जुना क्र. 13/1031, 13BI015478200 जुना क्र. 13/0476 व 13BI015478300 जुना क्र. 13/0477 रद्द करून या मालमत्तेची थकीत रक्कम ४२२३३/— विलंब शास्ती किंवा स्थायी समिति मंजुरी मिळेपर्यतची रक्कम मा. स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेकामी मा. स्थायी समिति पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ३** **दिनांकः— ८/५/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र. 13BI015531600 जुना क्र. 13/1031, 13BI015478200 जुना क्र. 13/0476 व 13BI015478300 जुना क्र. 13/0477 ही दुबार नोंद रद्द करण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव** :— विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** उल्हास नदी व खेमाणी नाला यांचा संगम होत असलेल्या उल्हास नदीतील भागात तरंगती पाने वनस्पती व डेब्रिज काढणेबाबतचा प्रस्ताव माहितीसाठी सादर.

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— काय झाले सेल्वन साहेब, ५(२)(२) मध्ये केले का? तुम्हीच करून घेतले का ५(२)(२) चे अधिकार?

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता :—**त्यावेळेला तातडीचे असल्यामुळे आयुक्त साहेबांची मंजूरी घेवून काम पूर्ण झाले.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— किती रक्कम आहे.

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता :—**रू. ९ लाख रूपये. साई कन्स्ट्रक्शन ने केले आहे साहेब,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— ती वनस्पती नाही आहे..

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता :—**पूर्ण म्हणजे वनस्पती पसरते, सर, प्रत्येक वेळा..

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— काढले का?

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता :—**काढले, ते पूर्ण काढले, सर, अजून पर्यंत काढायचे सतत चालू आहे. काढलेले आहे सर, आता तुम्ही येवून बघू शकता.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— आता आपण मिटींग संपल्यानंतर जायचे का?

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता :—**हां ठिक आहे जावु या, सर.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— आयुक्त साहेब हा विषय असा आहे की, आपण पाणी एमआयडीसी कडून घेतो. मग एमआयडीसी हे ९ लाख रूपये खर्च करायला पाहिजे. ते आपण करतो ते बिलामध्ये वर्ग करून देणार का आपण एमआयडीसीला. कारण जबाबदारी एमआयडीसीची आहे. आपण पाणी घेतो ते पाणी देण्याची जबाबदारी त्यांची आहे. त्यांना पेमेंट देण्याची जबाबदारी आपली आहे. पैसे दया नाही तर पाणी बंद करू. मग हे पण त्याचे काम आहे ९ लाख रूपये खर्च करायचे.

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता :—**पिण्याचे पाणी आपल्याकडेच पुरवठा होत असल्याने..

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— नाही, नाही, तुम्हाला गरजेपेक्षा जास्त पाणी उचलून देतात का? हे नदीतली वनस्पती आहे ना.

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता :—**नदीतले आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— मग ती रायतेच्या पुलापर्यंत ती वनस्पती आहे. बरोबर ना मग त्या पुलापर्यत आपली जबाबदारी आहे का?

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता :—**पुलापर्यंत नाही आपल्या हद्दीतले आपले पंपींग स्टेशनला येणारी वनस्पती आहे.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— रीट पीटीशनचे ते काय ते सांगा ना तुम्ही.

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता** :— रीट पीटीशनबाबत मा. सर्वौच न्यायालयामध्ये हे जे पूर्ण तातडीने काढा म्हणून ते न्यायालयाने पण आदेश दिले होते. हरीत नाल्याने पण वारवांर प्रदुषण खेमानी नाल्यामुळे होते, त्यामुळे काढावा म्हणून आदेश होता. त्यामुळे तातडीने काढावे लागले.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— पाणी जरी एमआयडीसी देत असेल, तरी आपल्या नाल्याचे जे पाणी नदीपात्रात जाते. त्या पाण्यामुळे त्या वनस्पतीची वाढ होते. त्यामुळे वनशक्ती एका नावाच्या संस्थेने रीट पीटीशन केले होते सुप्रीम कोर्टामध्ये, कोर्टाने सांगितले तुम्ही तुमचे गटाराचे पाणी सोडता, त्याच्यामूळे इथे वनस्पती तयार होते. तुम्ही वनस्पती काढण्यासाठी काय करतात. त्यासाठी ही एक्शन तातडीने केली होती.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— केली, ठिक आहे, हरकत नाही परंतु एमआयडीसी कडे जर आपण पत्र लिहुन कळविले की आम्ही ९ लाख रूपये खर्च केले आहेत. पाणी तुम्ही देतात.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— एमआयडीसी पाणी उचलते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— कोर्टाचे आदेश असतील.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— नाही कोर्टाचे आदेश तसे नाही, आपण आपल्या गटाराचे पाणी आपण ट्रीटमेंट करत नाही तसेच सोडतो त्याच्यामुळे वनस्पती उगवते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— साहेब, आपण गटाराचे पाणी सोडतो समजा, जिथे आपण पाणी उचलतो तिथे. ते रायता इथून बारावी डॅम पर्यत. हे पाणी बारावी डॅम पर्यत आहे हे पाणी बारावी डॅम मधून येते.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— आपण आपल्या हद्दीतले काढले बाहेरचे नाही काढले.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— नाही नाही, त्यांनी पुढचे पण केलेले आहे.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील**:— नाही,नाही,

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता** :— पूढचे नाही केले, सर.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— आपल्या हद्दीत किती आहे.

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता** :— आपल्या हददीतले १०० मीटरच्या भागातले पूर्ण केले.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— ९ लाख रूपये आहे.

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता** :— म्हणजे आता चालू आहे सर, खेमाणी नाल्याहून प्रत्येक दिवस जाणार आहे.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— सतत चालू आहे.

**महापालिका सचिव:—** यामध्ये त्यानी सादर केले होते नविन गोषवरा दिला आहे.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— तो ५(२)(२) मध्ये दिले असेल त्यानी काम चालू आहे ना.

**महापालिका सचिव:—** त्यांनी गोषवा—यामध्ये नाव टाकलेले नव्हते. आता नाव टाकुन दिले आहे.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— वर्क ऑर्डर कोणाली दिली.

**महापालिका सचिव:—**आता त्यानी दिले आहे तर, सेलवन साहेब सांगा.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— मला एक सांगा की, ५(२)(२)मध्ये वर्क ऑर्डर दिलेली आहे. हे माहितीसाठी सादर केलेले आहे, तर वर्क ऑर्डर दिलेली आहे किंवा नाही.

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता** :– वर्क ऑर्डर दिलेली नाही सर स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानंतर.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:– तर मग तिथे काम कोण करत आहे.

**श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता** :– साई कन्स्ट्रक्शन म्हणून सर, त्यांना तातडीने म्हणून लावलेले आहे, सर,

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:– काम करत आहे ना तर टाका ना आम्हाला सांगायची काय आवश्यकता आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:– कार्योतरसाठी इथे आणलेले आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** वर्क ऑर्डर दिली नाही आणि काम झालेले आहे असे म्हणता. आणि त्यांना सांगितले तर काम पूर्ण झाले आहे.

**महापालिका सचिव**:– काय, माहितीची नोंद घेत आहेत.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:– माहितीची नोंद झाली. आता काय आहे?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** आमच्याकडे माहितीसाठी आलेले आहे, आम्ही माहितीही नोंद करणार.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ४ :–** उल्हास नदी व खेमाणी नाला यांचा संगम होत असलेल्या उल्हास नदीतील भागात तरंगती पाने वनस्पती व डेब्रिज काढणेबाबतचा प्रस्ताव माहितीसाठी सादर.

**प्रस्तावना**

उल्हासनदी व खेमाणी नाया यांचा संगम होत असलेल्या उल्हास नदीतील भागात तरंगती पाने वनस्पती व डेब्रिज काढणे बाबत. रु. ९,९७,८०९/– या कामास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्तावास मा. आयुक्त उल्हासनगर महानगर पालिका यांनी मा. स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर करणेसाठी दिनाक १५/०२/२०१८ रोजी लिखित दिले आहे.

उपरोक्त विषयाकींत प्रकरणी अहवाल सादर करण्यात येतो की उल्हासनगर शहरातील खेमाणी नाला उल्हास नदीत मिसळत असल्याने खेमाणी नाला वळविणेचे काम महापालिकेकडून हाती घेण्यात आले आहे. परंतू सदर कामास काही कालावधी लागणार असल्याने तो पर्यत खेमाणी नाल्याचे सांडपाणी उल्हासनदीत मिसळत असल्याने नदीचे गोडया पाण्यात पान वनस्पती तयार होवून म.औ.वि.महा.मंडळाने शहाड टेमघर प्राधिकरण व कल्याण डोंबिवली महापालिका सेन्चुरी कंपनी इत्यादी पाणी उंचलाणा–या यंत्रणाचे पंपीग मध्ये व्यत्यय येत असून पानवनस्पती मुळे नदीतील पाणी प्रदुषीत होत असल्यामुळे भविष्यात अंनुचित प्रकार घडलयास ठाणे लघुपाटबधारे विभाग त्यास जबाबदार राहणार नसल्याचे कार्यकारी अभियंता यांनी संदिर्भिय पत्रान्वये लेखी कळविले आहे. त्याशिवाय सदर काम लघु पाटबंधारे खात्याकडे लेखा शिर्ष व तरतुद उपलब्ध नसल्यामुळे महापालिकेने सदर पानवनस्पती काढण्याची कार्यवाही स्वखर्चाने करावी किंवा लघु पाटबधारे खात्यास पुर्व ठेव तत्वावर सदरचे काम करणेसाठी निधी उपलब्ध करून देण्यास सुचित केले आहे.

सन २०१७ वर्षात माहे मार्च –एप्रिल यां कालावधीत उल्हासनदीतील पानवनस्पती काढण्याचे काम महापालिकेकडून ठेकेदाराची नेमणूक ५ (२) (२) अंतर्गत करून तातडीची बाब म्हणून करून घेण्यात आले होते. यावर्षी सुध्दा पावसाळया पर्यत उल्हासनदीत म.औ.वि.महा.मंडळाचे उदद्भवाच्या वरील व परिसरात तयार होणारी पानवनस्पती वेळोवेळी काढून नदी पात्र स्वच्छ ठेवण्यासाठी मजूर व मशिन लावून करण्यासाठी रू. ९,९७,८०९/– किंमतीचे अंदाजपत्रक तयार केले आहे.

सदर काम तातडीने करून घेणे अत्यावश्यक असल्याने महापालिकेकडून मे. साई कंन्स्ट्रक्शन उल्हासनगर–२ यांची नेमणूक ५ (२) (२) अंतर्गत करून तातडीची बाब म्हणून करून घेण्यात येत आहे.तरी सदर बाब मा. स्थायी समितीपुढे माहितीसाठी सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४ **दिनांकः— ८/५/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हास नदी व खेमाणी नाला यांचा संगम होत असलेल्या उल्हास नदीतील भागात तरंगती पाने वनस्पती व डेब्रिज काढणेबाबतच्या प्रस्तावाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव**:— विषय क्र. ५ वाचून दाखवतात.

---

⇨ **विषय क्र. ५:—** उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्याकामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. वेट्स सोसायटी फॉर ॲनिमल वेलफेर ॲण्ड रुरल डेव्हलप्मेंट, हैदराबाद यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— डॉ साहेब, कुठे आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**नाही हे जे कुत्रे आपण पकडणार.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— एक मिनीट राजेशभई, आता पर्यंत आपण एवढया वर्षामध्ये किती वेळा टेंडर काढलेत.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी:—** सन २०१० मध्ये काढला होता आणि शेवटच्या वर्षी २०१६—१७ मध्ये काढला होता.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— २०१६—१७ ला काढला होता, त्यावेळी आपण हे सर्व केले होते.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— हो.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— किती कुत्र्यांना केले होते.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— २५०० कुत्र्यांना केले होते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— आता किती आहेत.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— आता अंदाजे सन २०१२ चे प्राण्यांची जनगणणे प्रमाणे त्यांनी ४ हजार दाखवले होते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— आपण हे केल्यानंतर वाढले कसे?

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी :—**एक मिनीट, सरजी, प्रत्येक वर्षी एक मादी जातीचे कुत्रे दोन वेळा पिलांना जन्म देतात, आणि तीन ते ४ चार पिलांना ते जन्म देतात. अंदाजे आता उल्हासनगरमध्ये जवळ जवळ १० हजार इतके कुत्रे आहेत.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— किती आहेत.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— हो. आणि प्रत्येक वर्षी एक मादी कुत्रे दोन वेळा जन्माला देते.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— नर आणि मादी जातीचे कुत्रे किती आहेत.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— नर आणि मादी जातीचे कुत्र्यांचे आकडे ५०, ५० टक्के आहेत.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— एकूण दहा हजार आहेत, ५०, ५० टक्के मध्ये ५ हजार झाले, तर २५०० कुत्र्यांचे आपण आगोदर केलेले आहे. बाकी राहीले अडीच हजार. असे केल्याने भविष्यात कधी नाही येणार.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— आता याच्यामध्ये नर जातीचे कुत्रे पण येणार. नर जातीचे पण इन्स्टालायझेन करावे लागेल.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— आता अजून किती काम राहिले आहे.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— हे काम केल्यानंतर माहिती पडेल.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— नाही असे आहे साहेब, मागच्या वर्षी २५ लाखाच्या आसपास खर्च केले. आता हे २५ लाखाचा खर्च आहे. आणि त्याचा निकाल वाढले पण कमी नाही. एक तर हे थंबायला पाहिजे होते नाही तर त्याची संख्या १० ते १५ टक्क्यांनी वाढायला पाहिजे होती. इथे तर ही २०० ते २५० टक्क्यांनी वाढली.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** साहेब, यामध्ये काय आहे की जे आम्ही कार्य करत आहेत, त्याचा रेकॉर्ड प्रॉपर ठेवला जात नाही. ज्यानी केले त्यांनाच माहिती, त्यामुळे यासाठी माझी सुचना काय आहे की जी पण संस्था काम करेल ते प्रॉपर जे कुत्र्यावरती प्रक्रीया करेल त्याचे छायाचित्र काढून त्याची आपणांस सॉफ्ट कॉपी देण्यात यावी. हार्ड कॉपीचे प्रोव्हीजन आपण ठेवलेले आहे किंवा नाही हे मला माहीत नाही परंतु कमीत कमी सॉफ्ट कॉपी तर ठेवू शकतात. आणि सॉफ्ट कॉपी सीडी मध्ये बनवून आपल्याला देण्यात यावी.

**आयुक्त श्री.गणेश पाटील**:— टेंडर मध्ये आहे का हे?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** साहेंब तेच तर विचारत आहे.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— सर, टेंडरमध्ये नाही आहे. परंतु मागच्या वेळी आम्ही प्रत्येक महिन्यातील जी पण प्रक्रिया केली होती त्याची आम्ही बुक घेतले त्याठिकाणी बुकस् प्रत्येक कुत्र्याचे ऑपरेशन केले त्यास स्टीकर किंवा जे इन्स्टलाझार करतात त्यांना आमच्याकडे रेकॉर्ड आहे, सर.

**सदस्या, श्रीम. पंचम कलांनी:—** परंतु ज्याच्यावर शस्त्रक्रिया केली तर एक डॉट किंवा स्टीकर किवा मार्क करतात का?

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— हो मार्क केले जाते. वी मार्क्स केले जाते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** आमचे म्हणणे असे आहे की, बघा हा मोबाईल आहे, त्याचा त्यांनी फौटो काढला आणि एका संगणकामध्ये ठेवून आपल्याला प्रत्येक महिन्याला किवा १५ किंवा ८ दिवसाला, जेव्हा आपण त्याचे सीडी बनविले जाईल ते सीडी बनवून आपल्याला देतील. की हे आज आम्ही ५०० कुत्रे यांचे वर कारवाई केली आहे. तुमच्याकडे रेकॉर्ड राहील.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— जेव्हा ही नसबंदीची शस्त्रक्रिया केली जाईल त्यावेळी स्थानिक दोन नागरीकांचे पंचनामे करावे लागतात. की कुत्र्यांना पकडले आणि घेवून गेले आणि नसबंदी करून परत त्याच जागी सोडल्यानंतर परत पंचनामा करावा लागतो. की इथे आम्ही सोडले आपण असे करता का?

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— हो, असे केले जाते.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— त्यानंतर ते कुत्रे जिवंत आहे की मृत्यु झाला.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— नाही हे करत नाही बाकी ज्या ठिकाणाहून उचलेले जाते त्या ठिकाणचे दोन स्थानिक नागरीकांचे पंचनामे केले जातात किंवा ज्यांनी तक्रार केली त्याचे कडून लिहून घेवून जो एजन्सी आहे ते सेंट्रल मध्ये नेवून प्रोसीजर करून परत त्या ठिकाणी सोडले जातात.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:—डॉ. साहेब, २५०० कुत्रे सन २०१६—२०१७ मध्ये सांगितले त्यामध्ये काहींचा मृत्यु झाला नसेल का? की तेवढेच आहे.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— आता कुत्रे मरण्याचे कसे काय..

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— तरी किती टक्के आहे.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— मरण्याची टक्केवारी एकदम कमी आहे. आता आपल्याला हया वर्षात एक किंवा दोन कुत्रे मरण्याची तक्रार सॅनीटरी विभागातून मिळाली आहे. ज्याचा आम्हाला मृत्यु झाल्यानंतर ठिक करून टाकण्यात आले. एक विषय हा आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** ही जी प्रक्रीया होणार ती कुठे होणार. आपण कुत्रे कुठे ठेवणार, प्रक्रीया कशी करणार. सोडण्यासाठी जागा कोणती आहे.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— सर, आता आम्ही मागच्या वेळी श्री. राजेश वदारियाजी यांच्याशी बोलणे झाले मागे जो आमचा जकात नाका आहे, मालमत्ता विभागाने आम्हाला पत्र दिले आहे हॅडओव्हर करण्यासाठी त्याठिकाणी फक्त ५०हजार रूपयाचे काम राहिले आहे, भिंत बनवीली की हे काम ताबोडतोब सुरू होणार.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— ही जी वर्क ऑर्डर असेल, कामाची ऑर्डर देतील, किती दिवसाची असेल,

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— एका वर्षासाठी.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— आणि प्रतिदीन किती नसबंदी केले जातील.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— त्याची गाईडलाईन्स आहे की १०० च्या वर नाही गेले पाहिजेत.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— रोज शंभर. रोज १०० कुत्रे पकडून आणू शकतात.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— बघा, प्रोसीजर करणे पकडून आणणे

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— जास्तीत जास्त ७० पकडून आणले तरच अडीच हजार होणार. प्रत्येक दिवस ७० एक दिवस पण सुट्टी नसेल तेव्हा. एका वर्षात अडीच हजार होणार. प्रत्येक दिवशी एवढे होतील. कुठे ठेवणार.

**डॉ राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी** :— हो जागा आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** यासाठी माझी एक सूचना आहे जकात नाक्यावर सीसी टीव्ही कॅमेरे लावावे लागतील, की ज्याची रेकॉर्डीग सतत आपल्या कडे उपलब्ध होईल. हे असे चांगले होईल.

**आयुक्त श्री.गणेश पाटील.**:— आणि हे सीसीटीव्ही कॅमरे तपासून नंतर त्याचे बिल काढण्यात यावे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** सदर जागेवर सीसीटीव्ही कॅमरे लावल्यानंतर किती कुत्रे आले आणि गेले हे तपासणे आपलयाला सोपे जाईल.

**महापालिका सचिव:—** स्थायी समिती वरील ठराव उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे नीर्बिजीकरण करण्याकामी न्युनतम दराचे निविदाकार मे. वेटस् सोसायटी फॉर ॲनीमल वेलफेअर ॲन्ड रूरल डेव्हलपमेंट हैद्राबाद यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे तसेच ज्या ठिकाणी निर्मिती करण्यात येईल त्याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा लावणे आवश्यक असेल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** आणि सॉप्ट कॉपी पण आम्हाला देतील. प्रत्येक ज्या कुत्रेवरती प्रक्रीया करणार त्याचे छायाचित्र काढून कार्यालयामध्ये जमा करावी. हा आमचे आयटी सेल आहे ते त्याठिकाणी कॅमेरे लावतील. पास इतिवृत्ताची वाट न पाहता लवकरात लवकर काम करणे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५ :—** उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्याकामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. वेट्स सोसायटी फॉर ॲनिमल वेलफेर ॲण्ड रुरल डेव्हलप्मेंट, हैदराबाद यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

वैद्यकीय आरोग्य विभागा मार्फत, मा. आयुक्त सो, यांचे मान्यतेनुसार सन २०१७—२०१८ या अर्थिक वर्षात उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे संदर्भात दिनांक २१/११/२०१७ ते १८/१२/२०१७ या कालावधीत वर्तमान पत्रात जाहिरात देवुन ई—निविदा काढण्यात आली होती. सदर निविदा दोन निविदाधारकाने भरल्यामुळे व स्पर्धात्मक दर प्राप्त न झाल्यामुळे सदर ई—निविदास अनुक्रमे दिनाक २१/१२/२०१७, दिनांक ०२/०१/२०१८, व दिनांक ०८/०१/२०१८ रोजी प्रथम, द्वितिय, व तत्रतिय मुदतवाढ देण्यात आली होती.

सदर निविदा मे. नवोदय वेट सोयायटी, हैदराबाद व मे. वेट्स सोसायटी फॉर ॲनिमल वेलफेर ॲण्ड रूरल डेव्हलप्मेंट, हैदराबाद या दोन निविदाधारकाने भरली आहे. मा. आयुक्त साो., यांचेकडील मान्यतेनुसार सदर ई—निविदेचा तांत्रिक भाग (TECHNICAL BID) दिनांक २२/०२/२०१८ रोजी स. ११.३० वा. निविदा समिती सदस्य यांचे समक्ष ई निविदा संगणक प्रणालीव्दारे उघडण्यात आला. वरील प्रमाणे प्राप्त दोन निविदाकारांनी TECHNICAL BID मध्ये आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने मा. आयुक्त साो., यांचेकडील मान्यतेनुसार दिनांक २७/०२/२०१८ रोजी दुपारी १.०० वा. सदर निविदेचा आर्थिक भाग (Commercial Bid) निविदा समिती सदस्य यांचे समवेत संगणकव्दारे उघडण्यात आला. पात्र झालेल्या निविदाकारांकडुन सादर केलेल्या भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया दर तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

**तक्ता अ**

| अ.क्र | तपशील कामाचा | परिमाण | **निविदाधारकाचे नाव व त्याचे प्राप्त दर** | |
|---|---|---|---|---|
| | | | मे. नवोदय वेट सोयायटी, हैदराबाद | **मे. वेट्स सोसायटी फॉर ॲनिमल वेलफेर ॲण्ड रूरल डेव्हलप्मेंट, हैदराबाद** |
| 1 | Dog Catching in own vehicle with labour, shifting to space (Dispensary) and planning for sterilization operation & release to same place.<br>Providing food to dogs for stay & operation period. Treatment of disease dog at space provided by UMC. Ulhasnagar Municipal corporation Limits. | २५०० | रू. ११०७/—प्रति भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया | **<u>रू. १०४०/— प्रति भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया</u>** |

तसेच दिनांक २८/०२/२०१८ रोजी वरील प्रमाणे न्युनतम दर सादर करणा—या निविदाकारास भटक्या कुत्र्याचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया दराबाबत वाटाघाटीसाठी उपस्थित राहण्यासाठी पत्र देण्यात आले होते. त्यान्वये सदर निविदाकारणे खालील प्रमाणे दर सादर केले आहेत.

**वाटाघाटीनंतर सादर केलेले दर**

**तक्ता ब**

| अ.क्र | तपशील कामाचा | परिमाण | **मे. वेट्स सोसायटी फॉर ॲनिमल वेलफेर ॲण्ड रूरल डेव्हलप्मेंट, हैदराबाद** | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | Dog Catching in own vehicle with labour, shifting to space (Dispensary) and planning for sterilization operation & release to same place.<br><br>Providing food to dogs for stay & operation period. Treatment of disease dog at space provided by UMC. Ulhasnagar Municipal corporation Limits. | २५०० | **रू.. १०००/— प्रति भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया** | रू. २५,००,०००/— |

वरील प्रमाणे तक्ता ब मध्ये **मे. वेट्स सोसायटी फॉर ॲनिमल वेलफेर ॲण्ड रूरल डेव्हलप्मेंट, हैदराबाद यांनी वाटाघाटी अंती सादर केलेल्या दरानुसार** उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे करिता रफ. २५,००,०००/— (रूपये पंचवीस लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१७—१८ या वर्षात मधील लेखाशिर्षे सी — २ (X) श्वान निर्बिजीकरण कार्यक्रम या लेखाशिर्षाखालील रू. ४०,००,०००/— इतकी तरतूद करण्यात आली आहे पैकी पुर्ण तरतुद शिल्लक आहे त्यातुन करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. तसेच सदर खर्चास व उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया न्युनतम दर सादर करणा—या निविदाकारकाडुन करण्याचे प्रस्तावित करणेत येते.

तरी भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रियाचे न्युनतम दर सादर करणा—या मे. वेट्स सोसायटी फॉर ॲनिमल वेलफेर ॲण्ड रूरल डेव्हलप्मेंट, हैदराबाद यांच्याशी संविदा करण्याकरिता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ५** **दिनांकः— ८/५/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्याकामी न्युनत्तम दराचे निविदाकार मे. वेट्स सोसायटी फॉर ॲनिमल वेलफेर ॲण्ड रुरल डेव्हलप्मेंट, हैदराबाद यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

**तसेच**

ज्याठिकाणी निर्बिजीकरण करण्यात येईल त्याठिकाणी सी.सी. कॅमेरा लावण्यात यावा आणि त्याची सॉफ्ट कॉपी प्रशासनाकडे जमा करण्यात यावी.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६:—मा.स्थायी समिती ठराव क्र.१२१ दिनांक ०९/०३/२०१८ मध्ये अंशत: बदल करणेबाबत...**

---

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— हे आम्ही जो बाथरूम बनविण्यासाठी आदेश स्थायी समितीने दिला होता की हे ५(२)(२) मध्ये केले पाहिजे, एका बाजूने स्वच्छ भारत अभियान सुरू होत आहे हागणदारी मुक्त,की निंबाळकरजी यांचा ड्रीम प्रोजेक्ट होता. बाथरूम बनविले पाहिजेत परंतु जसे आम्ही यांना ५(२)(२) मध्ये मंजूरी दिली, आणि आयुक्त साहेबांची बदली झाली. तेव्हा त्यांनी फेरसादर करा म्हणून लिहून दिले. स्थायी समिती मध्ये परत पाठवा. यांना आम्ही ५(२)(२) ची ऑर्डर दिली आहे. त्यांनंतर दि.९/३/२०१८ ला देण्यात आले होते. यानंतरची जी स्थायी समितीची मिटींग होती त्यामध्ये जी ५(२)(२) ची ऑर्डर दिली, त्यावर सही करून गेले आणि याला इथे परत पाठवून गेले. हे असे कसे झाले हे मला समजण्यात आले नाही. तर याची चौकशी झाली पाहिजे. ज्या ठिकाणी चूक आहे तर मी कोणाची बाजू घेणार नाही. ९/३/१८ रोजी मा. आयुक्त यांचे ड्रीम प्रोजेक्ट हा बनला पाहिजे,त्याला ५(२)(२) मध्ये आदेश दिला जाणार आहे. त्या फाईल थांबविण्यात आली आहे. आणि ९/३/१८ नंतरची जी दुसरी सभा आहे, त्यामध्ये आम्ही एक विषय ५(२)(२) मध्ये केला आहे, त्याला त्यानी ताबोडतोब सही करून दिले. रू. २ करोडचे आहे ते रोडचे काम आहे आणि आजपर्यत ते सुरू झालेले नाही. अति आवश्यक म्हणून २ जूनला स्वामी आत्माराम मंदीर उल्हासनगर ५ वसणसाह दरबार इथे २ जून ला एक मोठा मेळावा आहे. त्या मेळयासाठी एक हॅडबील दिले होते. मेळा होत असून त्यासाठी देश विदेशातून लोक येणार म्हणून ५(२)(२) मध्ये रस्त्याचे काम करा. हा रोड रू.२ करोडचे काम असून सिमेंट ब्लॉक चा रोड आहे त्यावरती सही करण्यात आली. विषय काय होता ते समजलेच नाही. बाकीचे दोन आहेत त्याना बाजूला ठेवून परत स्थायी समिती मध्ये पाठवण्यात आले. जो ५(२)(२) रोड दिला आहे आजपर्यत तिथे खोदकाम सुध्दा झालेले नाही. आणि एका महीन्यापेक्षा जास्त कालावधी झाला, फक्त उद्घाटन झाले. ५(२)(२) मध्ये उद्घाटन ऑर्डर नसते आता ऑर्डर मिळाली की उदया काम सुरू झाले पाहिजे. दि. २ जून पर्यत पूर्ण करावे असे बंधनकारक अट टाकली आहे. जर हे काम सद्या सुरू झालेले नसेल तर ते काम रद्द करून त्वरीत निविदा काढण्यात यावी.

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:—** रद्द करा. आणि त्या कॉन्ट्रक्टरचे नाव काय आहे, ५(२)(२) मध्ये घ्यायला आले.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— असे जे ५(२)(२) चे काम आहे एक ते दीड महीन्यापर्यत काम सुरू होत नाही.

**आयुक्त गणेश पाटील:—** ५(२)(२) चे अधिकार कोणाला आहेत.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— ५(२)(२) ची अधिकार स्थायी समिती च्या सदस्यांना आहे. अतिआवश्यक असे काही कामे येत असतात, जसे की हे स्वच्छ भारत मिशन चे काम चालू होते. तर दोन सौचालय ठिक आहे बाहेंरून टीम आली आम्हाला एक चांगला रॅम्प मिळणार, आमच्या शहरात सुलभ सुंदर शैचालय नाही आहे. ते बनविले तर आम्ही सुध्दा त्यांना दाखवू शकतोकी आमच्या कडे चांगली वस्तु आहेत. दोन अलग ठेकेदारांकडून प्रोजक्ट रिपोर्ट बनविलेली होती. आयुक्तजी यांना सुध्दा दाखविले होते. परतु अरज पर्यत होत नसेल हे तर रखडले परत स्थायी समितीमध्ये पाठविण्यात आले. एक महिन्यापासून सभापती नव्हत्या निवडून होवून नविन सभपती ची निवड झाली. आणि पहिली मिटींग आहे त्याला तर आम्ही पास करत आहोत परंतु जे ५(२)(२) मध्य दिलेले आहे. ज्याला वर्क ऑर्डर देवून १ महीना होत आहे. वर्क ऑर्डर दिलेली आहे किवा नाही.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**रोडची वर्क ऑर्डर दिलेली आहे. आणि रस्त्याला मार्कीग दिलेली आहे.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— रोड अजून चालू का नाही झाला. जोपर्यत रोड कटींग वाईडींग कले असते तो पर्यत टेंडर निघाली असती.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता** :— सर, आम्ही तर निविदा साठी बोलेलो होते ५(२)(२) मध्ये स्थायी समितीने पास केले आहे.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— स्थायी समितीने का केले की दोन जून ला तिथे कार्यक्रम आहे. आपल्या मिनीटस् मध्ये आहे का आम्ही लवकरात लवकरात ३ महिनेच्या आत करण्यासाठी.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता** :— रोड वाईडींगमुळे काम झाले नाही.

**सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी**:— पंचमजी ने त्यावेळेस बोलले होते आणि विरोध केला होता. आपण त्यांना अजून वर्क ऑर्डर दिली नाही.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता</u>** :– हे सर्व मिनीटस् मध्ये आहे सर,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>**सन्मानीय आयुक्त साहेब, आमच्या सभागृह नेता यांनी मुद्दा मांडला आहे. ५(२)(२) मध्ये, त्यांच्या काळामध्ये काय झाले असेल त्यांची खरोखर चौकशी करा. आणि खरोखरच अत्यावश्यक गरज असेल, ५(२)(२) चा अर्थ च अत्यावश्यक सोय झाली पाहिजे. जर नसेल त्याची फेरनिविदासाठी परत आणावे असे आम्हाला वाटते.

**<u>सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:– जर काम नाही झाले तर बदलून दिले पाहिजे.

**<u>आयुक्त श्री.गणेश पाटील:–</u>**सभागृहामध्ये परत यायची गरज नाही कारण इन प्रीन्सीपल त्यानी मंजूरी दिली आहे. कामाला मंजूरी दिली आहे आता फक्त प्रक्रीया करायची टेंडर ने की विना टेंडर ने करायचे. आता वर्क ऑर्डर दिलेली आहे आता त्यांची वर्क ऑर्डर बाद करावी लागेल.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता</u>** :– अजून काम चालू झाले नाही. रोड वाईडींग चे काम बाकी आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>**काम चालू नाही झाले २ जूनची त्यांची अडचण होती आता २ जून पर्यत कामच झाले नाही त्यामुळे ते रद्द करण्यात यावे.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता</u>** :– रोडचे मार्कींग दिलेले आहे परंतु डिमोलेशन झालेले नाही.

**<u>सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:– नाही नाही ५(२)(२) चा अर्थ काय होतो की लवकर करून देण्यात यावे. आतापर्यंत आपण डिमोलेशन केलेले नाही. आणि अजून ६ महिने लावणार तर ५(२)(२) चे तोपर्यत टेंडर प्रोसेस पण होवून जाईल. याचे पहिले पाटोल्सचे ५(२)(२) मध्ये ऑर्डर देवून २ महिन्यानंतर काम चालू करण्यात आले.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>** आता एक हप्ता पहिले आमच्याकडे चालू झालेले आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:– तर ३ महिने पहिले ५(२)(२) मध्ये का दयावी? नाही तर टेंडर प्रोसेस करा. आज आम्ही युरीनलचे का देत आहे, आम्ही आज दिली असती आणि उदया पासून १०० युरीनल लागले असते. ई टेंडरमध्ये एक महिना लागू शकतो. आमचा उद्देश काय आहे. ५(२)(२) मध्ये देण्याचा की आमचे काम जोपर्यत आपले काम १ महिने मध्ये काम पूर्ण झाले पाहिजे. आणि आपण तर ३ महिने सुरू करत नाही.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता</u>** :– त्यामध्ये अटी शर्ती टाकल्या होत्या ९० दिवसामध्ये काम पूर्ण केले पाहिजे. नाही झाले तर त्याच्यावरती दंड आकारण्यात येणार आहे. आम्ही वर्क ऑर्डर दिली आणि मार्कीग दिलेली आहे. रोडचे डिमोलेशन झालेले नाही.

**<u>सदस्य,श्री. भारत राजवानी:–</u>**साहेंब दुसरे हायवे कडून शहरात मंबईहून लोक येत असतात, त्यांना त्रास होत आहे.

**<u>सदस्य,श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:– जसे पहिले केला होता तसेच ५(२)(२) मध्ये आणि तीच कंपनी. दोन्ही मध्ये इतिवृताची वाट न पहाता. पास करा. दोन्ही विषय एकत्र घ्या.

**<u>महापालिका सचिव:–</u>** अंशत: बदल करणेस मान्यता देत नाही बाकी जसे आहे तसे विषय क्र. ६ व ७ दोन्ही विषय येतील.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६ :– मा.स्थायी समिती ठराव क्र.121 दिनांक 09/03/2018 मध्ये अंशत: बदल करणेबाबत**

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर-१ येथील गोलमैदान येथे पुरुष तसेच स्त्रीयांकरीता सुंदर व सुविधांनी युक्त असलेले सुंदर स्वच्छतागृह/शौचालय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत करणेस मा.श्री.जमनु पुरस्वानी, सभागृह नेता यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये विनंती केली आहे.

त्यानुसार उल्हासनगर-१ येथील गोलमैदान उद्यान हा मोठया प्रमाणातील वर्दळीचा परिसर आहे. या उद्यानात सकाळी व संध्याकाळी मोठया प्रमाणात नागरीक वॉकींग, जॉंगींग व फेरफटका मारण्याकरीता येत असतात. याठिकाणी बाजारपेठ असल्याने नागरीकांची प्रचंड गर्दी असते. त्यामुळे उद्यानाचे बाजूला सुंदर व आधुनिक सुविधांनी युक्त असलेले सुंदर स्वच्छतागृह शौचालय बनविल्यास शहराच्या सौंदर्यात वाढ होणार आहे. तसेच नागरीकांनाही फायदा होणार असल्याने सदर कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे रु.६०,००,०००/- एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले. व सदर कामास प्रशासकीय मान्यता मिळून कामाची ई निविदा प्रक्रिया करणेस मा. स्थायी समिति च्या मंजूरीकरीता प्रस्तावित करण्यात आले. मा.स्थायी समितीने ठराव क्र.१२१ दिनांक ०९/०३/२०१८ अन्वये सदर कामाची ई निविदा प्रक्रिया न करता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत मे.नवनिर्माण कंन्स्ट्रक्शन यांचेशी निविदेशिवाय थेट संविदा करणेस मंजूरी दिली.

तथापी मा.तत्कालीन आयुक्त यांनी दिनांक १७/०३/२०१८ रोजी सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेबाबत संचिकेवर शेरा लिहिला. त्यामुळे मा.स्थायी समितीने ठराव क्र.१२१ दिनांक ०९/०३/२०१८ मध्ये अंशत: बदल करणे आवश्यक आहे. मा.आयुक्त सो. यांनी दिलेल्या शेऱ्याचे अनुषंगाने उल्हासनगर-१ येथील गोलमैदान येथे पुरुष तसेच स्त्रीयांकरीता सुंदर व सुविधांनी युक्त असलेले सुंदर स्वच्छतागृह/ शौचालय बनविणेच्या कामाची निविदा प्रकिया करणेकरीता मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ६ **दिनांक:—८/५/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मा. स्थायी समिती ठराव क्र. १२१, दिनांक ९/३/२०१८ मध्ये अंशत: बदल करण्यास मान्यता देत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिति सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :— मा.स्थायी समिती ठराव क्र.१२२ दिनांक ०९/०३/२०१८ मध्ये अंशत: बदल करणेबाबत...**

---

**काही सदस्य :—**जसे आहे तसे पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ७ :— मा.स्थायी समिती ठराव क्र.122 दिनांक 09/03/2018 मध्ये अंशत: बदल करणेबाबत**

**प्रस्तावना**

उल्हासनगर-४ मधील नेताजी चौकाजवळ येथे पुरुष तसेच स्त्रीयांकरीता सुंदर व सुविधांनी युक्त असलेले सुंदर स्वच्छतागृह/ शौचालय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत करणेस मा.श्री.जमनु पुरस्वानी, सभागृह नेता यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये विनंती केली होती.

त्यानुसार उल्हासनगर-४ मधील नेताजी उद्यान हा मोठया प्रमाणातील वर्दळीचा परिसर असल्याने या उद्यानात सकाळी व संध्याकाळी मोठया प्रमाणात नागरीक वॉकींग, जॉगींग व फेरफटका मारण्याकरीता येत असतात. सदर उद्यानाचे बाजूला नेताजी चौक आहे. या चौकातून उल्हासनगर शहरास अन्य शहरांशी जोडणारे रस्ते आहेत. याठिकाणी बाजारपेठ असल्याने नागरीकांची प्रचंड गर्दी असते. त्यामुळे या चौकात सुंदर व आधुनिक सुविधांनी युक्त असलेले सुंदर स्वच्छतागृह शौचालय बनविल्यास शहराच्या सौंदर्यात वाढ होणार असल्याने सदर कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे रु.६०,००,०००/- एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले. व सदर कामास प्रशासकीय मान्यता मिळून कामाची ई निविदा प्रक्रिया करणेस मा. स्थायी समिती च्या मंजूरीकरीता प्रस्तावित करण्यात आले. मा.स्थायी समितीने ठराव क्र.१२२ दिनांक ०९/०३/२०१८ अन्वये सदर कामाची ई निविदा प्रक्रिया न करता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत मे.दत्त म.का.स.संस्था यांचेशी निविदेशिवाय थेट संविदा करणेस मंजूरी दिली.

तथापी मा.तत्कालीन आयुक्त यांनी दिनांक १७/०३/२०१८ रोजी सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेबाबत संचिकेवर शेरा लिहिला. त्यामुळे मा.स्थायी समितीने ठराव क्र.१२२ दिनांक ०९/०३/२०१८ मध्ये अंशत: बदल करणे आवश्यक आहे. मा.आयुक्त सो. यांनी दिलेल्या शेऱ्याचे अनुषंगाने उल्हासनगर-४ मधील नेताजी चौकाजवळ पुरुष तसेच स्त्रीयांकरीता सुंदर व सुविधांनी युक्त असलेले स्वच्छतागृह/ शौचालय बनविणेच्या कामाची निविदा प्रकिया करणेकरीता मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ७ **दिनांकः—८/५/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मा. स्थायी समिती ठराव क्र. १२२, दिनांक ९/३/२०१८ मध्ये अंशत: बदल करण्यास मान्यता देत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८:—**उल्हासनगर —५ येथिल स्मशानभुमी विकसित कामाची ई—निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

---

**महापालिका सचिव:—**विषय क्र. ८ साठी पत्र आले आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता** :— विषय क्र. ८ मध्ये काही तांत्रिक अडचण असल्यामुळे गोषवारा परत घेण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** काय तांत्रिक अडचण आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता** :– एस्टीमेट मध्ये बनविण्यामध्ये काही त्रृटी असल्यामुळे एस्टीमेट परत बनविण्यासाठी फेरबदल करायचे आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया**:– काय अडचण आहे ते तर सांगा. आपल्याला एस्टीमेट बनविण्यासाठी काय चूक झाली ते तर सांगा.

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:–** त्यामध्ये असे आहे की महानगरपालिकेच्या बजेट मध्ये जी तरतूद आहे , उल्हासनगरमध्ये चार स्मशान भूमी हिंदूच्या आहेत. त्याच्यासाठी ७५ लाख रूपये बजेट मध्ये तरतूद आहे. त्यामधून ५६ लाख रूपये एकाच स्मशान भूमी साठी खर्च केले जात आहेत. हा कसा काय न्याय आहे.

**सदस्य,श्री.जमनादास पूरस्वानी:–** परत काढून टाका.

**महापालिका सचिव:–** ठिक आहे, मागे घेतले.

विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९:–** उल्हासनगर महानगरपालिका शहरातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारकरणेसाठी ६X६ फुटाच्या लोखंडी पोर्टेबल केबिन पुरवठा करणे.

---

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:–** कोण आहेत याचे उपायुक्त वैगेरे कोण उत्तर देणार?

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :–** श्रीम.कंठे मॅडम आहेत.

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:–** सहायक आयुक्त कोण आहेत.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :–**दि. २८ ऑक्टोबर २०१५ मध्ये माफ करा २०१६ मध्ये, सप्टेंबर २०१६ मध्ये तत्कालीन लोकआयुक्तांनी वर्तमान पत्रात जाहिरात दिलेली २८ आक्टो. २०१५ च्या शासन निर्णयानुसार त्यानंतर हे अर्ज आलेले आहेत.

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:–** हे अर्ज तुमच्याकडे आले तीच यादी तुम्ही तयार केली का? असे तुमचे म्हणणे आहे.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :–** होय.

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:–** नाही पण आमच्या म्हणण्यानुसार अजूनही अर्ज तुमच्याकडे येवून पेंडींग पडलेले आहेत. तुम्ही ती यादी बरोबर बनवून ठेवलेली नाही काही लोंकांचे अर्ज आलेले असतांनाही त्यांना या यादीमध्ये त्यांना घेतलेले नाही.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :–** या योजनेपुरते तर असे झालेले नसावे.

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:–** नाही, आता ही योजना कुठली आहे. याचा एक ठराव आम्ही स्थायी समिती मध्ये. केला होता. परवानगी देण्याबाबतचा. जागा घेवून जर स्वत:चे बनवायचे असेल त्यापेक्षा तुम्ही देतात ते घेणार ना तो. आता हया याजनेमध्ये जायचे असेल तर काय करावे लागेल.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :–** त्यावेळेस २०१६ साली अर्ज मागवले होते. त्यावेळेस ज्यांनी अर्ज दिलेले आहेत त्यांची आम्ही यादी तयार केलेली आहे.

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:–** सन २०१६ आणि सन २०१८ यामध्ये तीन वर्षाचा फरक आहे. तीन वर्षामध्ये अजून काही लोकांना जर त्याच्यामध्ये या योजनेमध्ये जायचे असेल, तर त्यांना त्या योजनेमध्ये घेता आले पाहिजे. आणि त्यांनाही त्याचा फायदा दिला पाहिजे.

**सदस्य,श्री. राजेश वदारिया:–** नाही बघा जे सांगत आहेत देर सही पण अंधेर नही!

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:–** ठिक आहे ना देर है! परंतु सगळयांना त्याचा फायदा मिळाला पाहिजे.

**सदस्य,श्री. राजेश वदारिया:–** बघा आपण काय केले पाहिजे हे मंजूर करा, आणि परत एकदा सगळया पर्यंत पोहचवा, की अजून कोणला पाहिजे, त्याचाच पण आम्ही समावेश करणार

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:—** हे कधी दिले सन २०१६ यांना दयायचे आहे २०१८ तर दोन वर्ष लागत असतील परत अर्ज यायला दोन वर्ष लागले तर कसे काय चालणार. किंवा हे दयायला दोन वर्ष लावले तर कसे चालणार.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** माझ्याकडे कार्यभार आल्यानंतर हे अर्ज मी बाहेर काढलेत, आणि त्यांची छाननी करून यादी तयार केली.

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:—** या आगोदर पण अधिकारी तिथे होते, तुमच्यासारखेच अधिकारी होते त्यांची चूकी झाली म्हणून या शहरातील नागरीकांनी भोगायचे का? आणि ते अपंग लोकांनी भोगायचे का? हा महत्वाचा प्रश्न आहे. तुम्ही काम चांगले केले तुम्हांला आम्ही शाबासकी देवू त्या कामाबददल पण दुसरे लोक काम नाही करत त्यांचे काय? त्यांनी पण केले पाहिजे ना दोन वर्ष जर लावणार असतील,

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** दुसरी गोष्ट अशी आहे, आता तुम्ही किती आहेत. ५६ आहेत. जागा ठरविण्यात आल्या आहेत का कुठे ठेवणार आहेत.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** त्याच्यात लिहिले आम्ही मालमत्ता, मालमत्ता सहायक विभागीय यांच्यापुढे..

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** नाही, नाही अगोदर गोष्टी कसे काय कळत नाही. ६६ आहेत ना, तर जागा ठरविण्यात आल्या पाहिजेत ना. कुठे लावणार, काय गजाजन मार्केट मध्ये लावणार!

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** बरोबर आहे पण अर्ज आले तर त्यांच्यावर वांरवार विचारणा व्हायची अपंगांची आणि आजही कमीत कमी चार अपंग रोज भेटी देतात. ई निविदा साठीच आम्ही मागवतो.

**सदस्य, श्री.भगवान भालेराव:—** जागेची अडचण आहे हे ठेवणार कुठे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील**:— आता डीबीटी आहेना. मग डीबीटी मध्ये तुम्हाला टेंडर मागवायचा प्रश्न काय येतो.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** सर, या दरम्यान असे झालेले आहे की अतिरिक्त आयुक्त श्रीम. कंठे मॅडम यांच्याकडे ही फाईल होती, त्यावेळेस ती मंजूर झालेली आहे ती फाईल.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** नाही , नियमाच्या विरूध्द तुम्ही मंजूर कशी करू शकतात. जर आपल्याला डायरेक्ट बेनीफीट ट्रांन्सफर दयायचा आहे. तुम्हाला जे काही पैसे दयायचे आहेत ते तुम्ही ते त्यांना डायरेक्ट दयायचे आहेत तुम्ही टेंडर काढायचे नाही, तुम्ही वस्तु खरेदी करायच्या नाही, तुम्ही त्यांना डायरेक्ट पैसे दयायचे आहेत.

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:—** साहेब शासनाची पॉलीसी जरी असली तरी हया माणसांना जर पैसे दिले त्याचा चांगला उपयोग करतील याची शंका आहे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** आता हया आरग्युमेंटलाच हे डीबीटी सोल्युशन दिले आहे. हे आपण पूर्वी सांगत होतो त्याला विकत घ्यायला पैसे मिळतील की नाही, तो सदुपयोग करेल का? ते पैसे अनत्र खर्च करेल का? त्याचे हे सगळे झाल्यानंतर शासनाचे तुम्ही त्याला फायदा फक्त देवु शकता बस. आणि आपण काय करतो की फायदा देण्यापूर्वी त्यांनी ती वस्तू त्याला घ्यायला लावतो. आणि ती घेतलेली आहे याची खात्री करून मग त्याला आपण पैसे त्याच्या खात्यावर पाठवियात येतात. सगळया योजना हया डीबीटी वरच चाललेल्या आहेत.

**सदस्य, श्री.जमनादास पूरस्वानी**:— एकाला किती देणार.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** आमचे जे उद्देश आहेत हे आहेत की अपंगाना मदत करणे, डीबीटी च्या माध्यमामतून केले तरी काही अडचण नाही आहे. परंतु ते कॅबीन घेणार किंवा नाही. एक मिनीट सर,

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** योजना अशी बनवायची की ती कॅबीन त्यांनी घेतलीच पाहिजे. कॅबीन तिथे बसविण्यात आली पाहिजे, आम्ही ते तपासून पाहणार.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** साहेब, उधारीवरती कोण कोणाला माल देणार. त्याला कोन उधारी वरती देणार समजा आज तीस हजाराची कॅबीन आहे, त्यामध्ये पहिले तो दिव्यांग आहे. इश्यु पैशाचा नाही आहे. हे कॅबीन आहे त्याला कोण उधारीवर देणार ही कॅबीन आहे कॅबीन लावून नंतर मला पैसे दया.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** शासनाची पॉलीसी आगोदरवच बनलेली आहे हे फक्त चर्चा झालेली आहे त्यावेळी आणि ही चर्चा झाल्यानंतरच सरकारने सांगितले आहे की डीबीटी च होणार, प्रक्रिया ही बसविण्यात आली. की पहिले तुम्ही योजना तयार करा त्या व्यक्तीला आत्मविश्वात घ्या, हे एक योजना आहे याला झेरॉक्स मशीन

दयावयाची आहे. म्हैस दयायची आहे, तर पहिले खरेदी करावी लागते. आणि हे खरेदी करण्याचे विभाग जेव्हा तपासून पाहतील तेव्हा त्याच्या खात्यावर पैसे जमा होतील.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** साहेब, आता जी डीबीटी योजना आहे, त्याचे तर आम्हाला यांनी कधी माहिती दिलेले नाही.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** परिपत्रक आलेले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** काय होत आहे की यामध्ये समन्वयाचे अंतर आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी:—** माझ्या एका प्रश्नाचे उत्तर दयावे मा. आयुक्त जी ने जे सांगितले आहे. या गोष्टीची माहिती आम्हाला पण नाही दिली. खून चांगली यांजना सांगितली आहे. परंतु एक अपंग व्यक्ती टपरी टाकायची आहे. ते आपले टपरी विकत घेईल आणि आपली झेरॉक्स मशीन असेल आणि इतर असेल ते रोजगार चालू करेल, तर तो ही टपरी कोणत्या ठिकाणी टाकेल. जेव्हा टपरी महानगरपालिकेकडून बनवून येतात, तर त्यांना कोणी अडचणीत आणणर नाही किवा कोणी थंबवणार नाही. आम्ही त्या ६६ जागेवरती ठेवणार. आणि नंतर वाटप करणार. एक यांना दिली , दुसरी यांना दिली, परंतु अपंग टपरी स्वत: टपरी ठेवेल तर आपला इनक्रूज विभाग ताबोडतोब उचलणार. काय करायचे याची प्रक्रीया तर सांगा. आता एका अपंगाला टपरी टाकायची आहे. समजा ६६ लोक आहेत, ते कोणकडून तरी मदत घेवून टपरी टाकतील. त्यासाठी जागा तर आपण पहिली निश्चित केली पाहिजे. की ६६ साठी जागा कुठे आहे.

**सहायक आयुक्त श्री. विनायक फासे:—** सर, गोषवा—या आपण शेवटी असे लिहिलेले आहे,

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी:—** काय लिहिलेले आहे.

**सहायक आयुक्त श्री. विनायक फासे:—** सहायक आयुक्त मालमत्ता विभाग यांच्याकडून जागा निश्चित झाल्यानंतरच पुढील प्रक्रिया सुरू होईल.

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी:—** तर जागा नंतर निश्चित करणार.

**सहायक आयुक्त श्री. विनायक फासे**:— तुम्ही जर मान्यता दिली असेल..

**सदस्य,श्री. भगवान भालेराव:—** हो , मान्यता देणार, आणि जागा निश्चित करून नंतर..

**सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी:—** नाही नाही, बरोबर आहे हे ठिक आहे जसे डीबीटी चा विषय आला ना आता हया विषयाला मान्यता नाही देणार, तर डीबीटी चा विषय आला तर हे लोक कुठे जावून लावणार. हे करायचे नाही तर आता आम्ही काय करायचे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी :—** ठिक आहे गॅरंटी आहे ही चांगली गोष्ट आहे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** तुम्ही पहिल्यांदा तपासून पहा.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** ठिक आहे सर.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** पहिल्यांदा जागा आहे का ते तपासून पहा. तुम्ही काय करता पहिल्यांदा अर्ज मागवता.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** जागा महापालिका निश्चित करेल असे त्यात दिलेले आहे.

**सदस्य,श्री. भगवान भालेराव:—** हयाचे काय झाले आहे की ४० टक्के लोकांना कॉन्ट्रीब्युशन करायचे आहे. अपंगत्व ४० टक्के असेल तर.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** नाही,नाही मला म्हणायच होत की, अपंगांसाठी सरकारने २५ योजना केलेल्या आहेत. बरोबर आहे, तर तुम्ही स्टॉलच दयायला पाहिजेत असे नाही दुस—याही योजनेचा लाभ दयायला पाहिजेत.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** इतर ही योजना आपण त्यांना दिलेल्या आहेत, सर.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** असू दया ना. परत परत दया.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** सन २०१६ साली आपण एक जाहिरात दिलेली.

**सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी:—** परत परत त्यालाच दिलेले आहे का?

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** नाही तसे नाही केलेले आहे, एका व्यक्तीला एक वेळाच लाभ दिलेला आहे. यामध्ये असे पण दोन आहेत, पती पत्नी आहेत,

**सदस्य,श्री. भारत राजवानी:—** यामध्ये जो १०० टक्के अपंग आहे तो हे कसे चालवू शकेल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** साहेब यामध्ये काय आहे,की काही लोकांनी वेगवेगळे अर्ज केलेले आहेत. परंतु त्यांना आज पर्यत फायदा मिळालेला नाही आहे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** यासाठी जाहिरात दिली होती का?

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** होय, सर जाहिरात दिलेली होती.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** तर आता काय करा की यांची संपूर्ण तपासणी करा. त्यांची इलीजीबीटी डबल आहे किंवा नाही हे तपासून घ्यावे. त्यांनंतर जागा आहे किंवा नाही ते तपासून पहा. आणि जागेनुसार परत यामधून कोणाला घ्यायचे आहे, हे ठरवावे लागेल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** यामध्ये एक पती पत्नी सुध्दा आहे. अनुक्रमांक ३३ व ३४.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** याच्यापूर्वी असे धोरण ठरले नव्हते की पती पत्नीला दयावे किंवा न दयावे त्यामुळे अर्ज स्विकारले.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** तसे नाही अर्ज स्विकारले तर तुम्ही मॅकॅनीकल झाले, तुम्ही पोस्टमन नाही ना सगळे गोळा केले. अर्ज स्विकारल्यानंतर तुम्ही त्यांची तपासणी करायला पाहिजे होती. यात इलीजीबल आणारी लोक किती आहेत. तुम्ही तसेच अर्ज स्विकारले अणि तसंच आणून ठेवले. पण अर्जाची छाननी करायला पाहिजे ना. पात्र कोणते अपात्र कोणते, पूर्वी दिलेले कोणते, असू शकत ना. यापूर्वी आपण कधीच लाभ दिलेला नाही.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** कुठलाच लाभ दिलेला नाही आहे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** ही योजना कशासाठी मंजूर केली. एकदम स्टॉलची योजना.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** नाही नाही, आपण जाहिरात दिलेली आहे, सर,

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** जाहिराती देण्यामध्ये तुम्ही म्हटले असते आम्ही सायकली वाटणार आहे.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** ते पण लिहिलेले आहे. वैदयकीय मदत दिलेली आहे, शिक्षणाठी शिष्यवृती दिलेली आहे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** शिष्यवृती देवू शकता, अपंग खेळाडूसाठी शिष्यवृत्ती देवू शकता, हे सोपे आहेत. स्टॅलच्या मागे लागले .

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** माझे म्हणणे हे आहे की याबाबत आपले बोलणे झाले आहेत. शिष्यवृती यांना दिली जे छात्र आहेत त्यांनापण देणार हे आपल्याला देण्यासाठी सोपे आहे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** स्टॉलची योजना कशासाठी काढली.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—** सर, ही योजना अगोदरच झालेली होती. याची फाईलच तयार नव्हती. असे झाले.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** असू दया, हे बघा कुठले स्टॉल वाटायचे असेल तर पहिले तपासले पाहिजे की आपल्या कडे जागा किती आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** साहेब ही जी योजना आली ना म्हणून मी पहिले विचारले की उप आयुक्त कुठे आहेत? त्यांना ही योजनेविषयी माहिती होती. म्हणून विचारले आणि नंतर यांच्याकडे आले. याच्याकडे चार्ज आल्यानंतर हयांनी ते मार्गी लावले.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** यामध्ये एक सूचना आहे, हा ठराव आम्ही असा करत आहोत की जागा निश्चित करून नंतर ई टेंडर मागवा.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** पहिली तुम्ही जागा निश्चित करा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** आपले आता हे लोकं निश्चित आहेत, यासाठी जागा निश्चित करा, आणि नंतर ई टेंडर मागविण्यात यावी.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील:—</u>** लोकांची सुध्दा स्क्रूटनी केली पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** चौधरी साहेबांनी सांगितले परत एकदा जाहिरात देण्यात आली पाहिजे. त्यांची यादी आमच्यासमोर घेवून यावे. जागाही निश्चित करून आपण नंतर ई टेंडर काढा. मान्यता आम्ही आता देत आहेत.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील:—</u>** ई टेंडरला आता मान्यता देवून काही फायदा नाही. पहिले लाभार्थी किती आहेत ते काढावे लागतील. जर आपल्याला माहितच नाही किती खर्च होणार आहे. स्थायी समिती मान्यता देते म्हणजे रक्कमेनुसार मान्यता देते ना! जर रक्कमच माहिती नाही तर काय मान्यता देणार आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** आता जेवढे लोक आलेले आहेत, त्यांना मंजूरी देत आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** साहेब आता आपण काय करू टेंडर काढायला मंजूरी देवू टेंडर काढल्यानंतर किती लोक आहेत काय आले.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील:—</u>** टेंडर मध्ये रेट येणार आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** यामध्ये असे आहे, २०१६ लोक वाट पाहत आहेत. तर यांना पहिले घेवू. जागा निश्चित करायची असेल तर यांच्यामध्ये करा. तीन महिन्यानंतर टेंडर काढा. परंतु पहिले जागा निश्चित करा. आणि ई टेंडर काढा. जे चौधरी साहेबांनी सांगितले की यामध्ये अजून काही लोंकांना आणावे हे तर एक दिवसाची प्रक्रीया नाही आहे. हे चालतच राहणार. यासाठी परत जाहीरात देवून या लोकांना सोडून बाकीचे जे अपंग लोक असतील ज्यांना आम्ही काही मदत करू शकतो त्यांची जाहिरात देवून परत अर्ज मागवून त्यंची वेगळी प्रक्रिया चालू करावी.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील:—</u>** नाही, नाही, आता काय आहे सन २०१६ पासून आलेले आहेत, सन २०१६ नंतर सरकारचे भरपूर शासन निर्णय बदलेले आहेत. त्यांना काय दयायचे आहे, काय नाही दयायचे आहे. आणि प्रक्रीया पण चेंज झाली आहे. ना जागेचा ठिकाणा आहे. आम्हाला वाटते अजून जास्त लोकांपर्यत जाहिरात पोहचली पाहिजे. अजून लोकांकडून अर्ज मागविण्यात यावे. हे पॉसीबल होणार नाही. त्यापेक्षा ही जी योजना आहे ती फेरसादर रिडीझाइन करा. आणि दुसरी नवीन योजना आणा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** साहेब, काय होत आहे की सरकारचा जो शासन निर्णय येत आहे, सचिवांमार्फेत सर्व नगरसेवकाना पाठविण्यात यावे. कमीत कमी यांना तर माहिती मिळावी. नविन जीआर काय आला आहे.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील:—</u>** जीबी मध्ये वाचून दाखवतात ना.

**<u>महापालिका सचिव:—</u>** नाही साहेब, जीबी मध्ये वाचून दाखवत नाही. प्रोसीजर नाही आहे ना. साहेब.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवाणी:—</u>** साहेब, काही माहितच पडत नाही.

**<u>महापालिका सचिव :—</u>**साहेब जीआर वाचतो परंतु देत नाहीत.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील:—</u>** तुम्ही विषय ठेवा ना. विषय पत्रिकेमध्ये विषय ठेवायचा की नविन आलेल्या जीआर चे वाचन करणे.

**<u>महापालिका सचिव :—</u>**तो विषय नाही टीप येईल, विषय असला तर ठराव होतो, टिप असेल तर वाचता येते.

**<u>सदस्य,श्री. जमनादास पूरस्वानी:—</u>** डीबीटी शब्द आज आपल्या कडून माहिती पडला.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** साहेब आमचे म्हणणे काय आहे. प्रशासनाजवळ नविन कोणताही जीआर, नविन नोटीफिकेशन येत असेल ते जसे आपण जीबीचे पाठवत असतात, गोषवारा पाठवत असतात,त्याच्याबरोबर एक प्रत पाठवावी व लिहिण्यात यावे की हे, हे नविन जीआर आलेला आहे.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील:—</u>** यासाठी मी सांगत आहे, त्याची प्रंक्रिया अशी असते की आपला जो अजेंडा त्याच्यामध्ये एक विषय राहील, शासनाचे जे पण नविन जीआर, परिपत्रक आलेले असतील त्याचे वाचन. याच्याकडे येईल ते वाटप पण करतील. वाचन पण करतील

**<u>सदस्य,श्री. जमनादास पूरस्वानी:—</u>** बरोबर आहे, एकदम बरोबर आहे.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** याने वाचले. त्यामुळे याच्यावर जबाबदारी अशी असते जर एखादा ठराव आला आणि वाचला नाही, की पूढच्या वेळी विचारणा करता येते. पूढच्या मिटींग मध्ये हा जीआर का दाखविण्यात आला नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** बरोबर आहे साहेब.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** सर्व जीआर नाही, जे पॉलीसी डिसीजन जे आहेत असे पॉलीसी डिसीजन की जसे आपल्या महानगरपालिकेमध्ये महापालिकेवरती काही फरक पडतो. स्वतः वाचून दाखवायचे. लोकांना माहिती होते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** विषय जसे की आयुक्त साहेबांनी सांगितले हया योजना रि डीझाईन करण्यासाठी आम्ही प्रशासनास परत पाठवत आहोत. तेच सांगत आहेत फेरदुरूस्ती करून परत घेवून यावे.

**महापालिका सचिव :—**हा प्रस्ताव प्रशासनास परत पाठवायचा की फेरदुरुस्ती कायची?

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यास रिडीझाईन करुन नव्याने प्रस्ताव आणावा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे



---

☑ **विषय क्र. ९ :—** उल्हासनगर महानगरपालिका शहरातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारकरणेसाठी ६X६ फुटाच्या लोखंडी पोर्टेबल केबिन पुरवठा करणे.

**प्रस्तावना**

शासन निर्णय क्रं. सकीर्ण —२०१५/प्र.क्र.११८/नवि—२०, मंत्रालय, मुंबई—३२, यांचे दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ अन्वये नमुद केल्यानुसार केंद्र शासनाने अंपग व्यक्तींच्या कल्याणासाठी अंपग व्यक्तीसाठी समान संधी, संरक्षण व समान सहभाग कायदा, १९९५ दिनांक १/१/१९९६ पासुन लागु केला आहे. सदर कायद्यातील कलम ४० अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंगासाठी किमान ३ टक्के निधी राखीव ठेवण्याबाबत शासन परिपत्रक, नगर विकस विभाग क्रं. संकीर्ण—२०१/प्र.क्र.१४६, दिनांक ३०/१०/२०१० अन्वये निर्देश देण्यात आले आहेत. सदर ३ टक्के निधी नागरीक भागातील अपंगांच्या कल्याणासाठी खर्च करण्याकरिता मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

शासन परिपत्रक, नगर विकस विभाग क्रं. संकीर्ण—२०१/प्र.क्र.१४६, दिनांक ३०/१०/२०१० अन्वये अपंग व्यक्तीसाठीसमान संधी, संरक्षण व समान सहभाग कायदा, कलम ४० अन्वये सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी अपंगासाठी किमान ३ टक्के निधी राखीव ठेववयाच्या ३ टक्के निधी पुढील प्रयोजनार्थ खर्च करण्यात यावा असे नमुद केले आहे. त्यानुसार सन २०१६—२०१७ या आर्थिक वर्षात योजना प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार महापालिकेच्या आर्थसंकल्पामध्ये महापालिका क्षेत्रातील अपंग नागरीकांसाठी अपंग कल्याणासाठी सन २०१८—२०१९ साठी रू. २ कोटी तरतुद आहे. सदर शासन निर्णयानुसार दिव्यांगांना स्टॉल उपलब्ध करून देणेत बाबतच्या योजनेस मा. आयुक्त यांनी दि. १८/०४/२०१८ रोजी मान्यता दिली.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील ६६ दिव्यांग लाभार्थींनी आपले अर्ज या विभागात दाखल केलेले आहे. त्याची यादी खालील प्रमाणे दर्शविलेली आहे.

| अ.क्र. | दिव्यांग व्यक्तीचे नाव | पत्ता | अपंगत्वाचे प्रमाण (टक्के) | अंपगत्वाचा दाखला | आधार कार्ड | रेशन कार्ड |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. पवार संतोष श्रीरंग | पंजाबी कॉलनी, रूम नं. एच २८ गुरूद्वारामागे, उल्हासनगर—३ | ५० | ✓ | ✓ | ✓ |
| २ | श्री. नरेश लखुमल सोहंदा | वाहेगुरू अपार्टमेंट, तिसरा माळा, रूम नं. ३०४, गोलमैदान, उल्हासनगर—१ | ५० | ✓ | ✓ | ✓ |
| ३ | भारत बारकू चव्हाण | कमल नेहरू नगर, धोबीघाट, उल्हासनगर — १, | ५० | ✓ | ✓ | ✓ |
| ४ | श्री. दिपक रामकिशन चौहान | राजेश किराणा स्टोर्सच्या मागे.शांतीनगर, उल्हासनगर — ३ | ७५ | ✓ | ✓ | ✓ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | श्री. समाधान भारत पवार | गारूडी पाडा, बॅ. नं. ११ च्या बाजूला श्रीराम नगर, यशवंत विद्यालय जवळ, उल्हासनगर– ४ | ४५ | ✓ | ✓ | ✓ |
| ६ | साधना लक्ष्मण विसपुते | २०४, आशिर्वाद अपा. विठ्ठलवाडी पोलिस लाईन जवळ, उल्हासनगर–४ | ४५ | ✓ | ✓ | ✓ |
| ७ | संतोष फुलचंद कांबळे | ब्लॉक नं. ए ३०२ च्या मागे, तिामह रामजी आंबेडकर नगर, उ. नगर–४ | ५५ | ✓ | ✓ | ✓ |
| ८ | श्री. बबलु गंगाशरण बेहनवाल | व्ही. टी. सी. मौदानजवळ, गिता कॉलनी, उल्हासनगर–४ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| ९ | रमाकांत बाबासाहेब सुतार | गायकवाड पाडा, सेक्शन – ३६, उल्हासनगर – ५ | ५० | ✓ | ✓ | ✓ |
| १० | आकाश रतन सोनवणे | सम्राट अशोक नगर, नाना पवार यांच्या घराजवळ, ओ. टी सेक्शंन, उ. नगर ३ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| ११ | घनश्याम महेंद्र पांडे | यादव किराणा स्टोअर, अे ब्लॉक रोड, अपना इंन्डस्ट्रीचया बाजुला, शहाड फाटक, उ. नगर १ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| १२ | सतनामकौर दिलबाग सिंग शेखाव | साई गोपाळ अपार्ट, रूम नं. २०१, 2nd floor, न्यु विल्डींग, आशेळे पाडा, उल्हासनगर ४ | ४५ | ✓ | ✓ | ✓ |
| १३ | ज्योती अशोक भालेराव | संतोष नगर, बॅ. नं. १०९२, गल्ली नं. १, ओ. टी. सेंक्शन, उल्हासनगर ३. | ४० | ✓ | ✓ | ✓ |
| १४ | पॉल मार्कास मनवेल | हॉटेल सागर प्लाझाच्या मागे, गांधी रोड, तहसीलदार ऑफिस जवळ, उल्हासनगर ५. | ४५ | ✓ | ✓ | ✓ |
| १५ | सिमिल जॉनसन सॅल्वीडोर | बॅ. नं. ७०७, रूम. न. १, सेंट्रल पोलिस स्टेशन समोर, हॉस्पीटल ऐरिया, उ.नगर ३ | ४० | ✓ | ✓ | ✓ |
| १६ | दत्तु हरि मोर | संत ज्ञानेश्वर नगर, खेमाणी रोड, ओ. टी सेंक्शन २, उल्हासनगर –२ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| १७ | नानासाहेब सुषेन मंडलिक | संतोष नगर, पेन्सिल फॅक्टरी रोड, विठ्ठल मंदीर समोर, उल्हासनगर ४. | ४५ | ✓ | ✓ | ✓ |
| १८ | मंगेश जिभाऊ निकम | बॅ. नं. ११४, मुरली किराणा स्टोअर्स जवळ, शनि मंदीर,उ.नगर १. | ८० | ✓ | ✓ | ✓ |
| १९ | श्री. सुनिल पंचु नायकर | बॅरेक नं. २१२३, न्युनेहरू नगर, हिल लाईन पोलिस स्टेशन, उल्हासनगर–५ | ९० | ✓ | ✓ | ✓ |
| २० | विद्या बाबु कनकुट | सी ब्लॉक रोड, सेंच्युरी ग्राऊंडच्या बाजुला, गौतम नगर, उल्हासनगर ३ | ६० | ✓ | ✓ | ✓ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २१ | दिपक रूपराव शिरसाठ | बॅ. नं. ३१/३२, जनता मित्र मंडळ, शिव रोड, शिव मंदीर, उल्हासनगर १. | ७५ | ✓ | ✓ | ✓ |
| २२ | संदीप दशरथ साळवे | ब्लॉक नं. ३६० च्या जवळ, कुर्ला कॅम्प, उल्हासनगर ४ | ७५ | ✓ | ✓ | ✓ |
| २३ | गौतम नारायण ओव्हाळ | c/o दिलीप खंडू गायकवाड, राजीव गांधी नगर, उलहासनगर १ | ४५ | ✓ | ✓ | ✓ |
| २४ | बंटी रिजुमल वाधवा | ब्लॉक नं. ६१३/१२२६, सेक्शंन २५,उल्हासनगर ४ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| २५ | राहुल हरेशलाल गोखलानी | बॅ.नं. १८४९, सेक्शंन ३९, उल्हासनगर ५ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| २६ | सलीम मनोहर खान | बॅ.नं. १३१४, धोबीघाट, स्टेशन के पास, उल्हासनगर ४ | | ✓ | ✓ | ✓ |
| २७ | कमल गोदुमल नानवाणी | बॅ. नं. ५५४, रूम. न. १, दुनिचंद कालानी हॉल जवळ, उल्हासनगर २ | ६८ | ✓ | ✓ | ✓ |
| २८ | शिवाजी सिध्दलिंग क्षिरसागर | एम आय डी.सी रोड, बिर्ला मंदीर जवळ, उल्हासनगर १ | | ✓ | ✓ | ✓ |
| २९ | बाळू हिरालाल कुमावत | सुभाष टेकडी, ब्लॉक नं. ३७२ च्या समोर, कानसई रोड, उ.नगर ४ | ५० | ✓ | ✓ | ✓ |
| ३० | प्रिती रमेश पोपटानी | ब्लॉक नं. ११०, रूम नं. ३, महाराष्ट्र मित्र मंडळ, पवन प्लाझा, उ.नगर–१ | ४० | ✓ | ✓ | ✓ |
| ३१ | ज्योती जगन गायकवाड | दुर्गामाता नगर, खेमानी,उ. नगर–२ | ८५ | ✓ | ✓ | ✓ |
| ३२ | रशिद मझिद कुरेशी | तानाजी नगर,बिर्लागेट, मझिद जवळ, उल्हासनगर–१ | ९० | ✓ | ✓ | ✓ |
| ३३ | दिपक अभिमान चांदणे | संतोषीमाता कॉलनी ,जुने अंबरनाथ गांव, उ. नगर–५ | ५० | ✓ | ✓ | ✓ |
| ३४ | सरीका दिपक चांदणे | संतोषीमाता कॉलनी ,जुने अंबरनाथ गांव, उ. नगर–५ | ५० | ✓ | ✓ | ✓ |
| ३५ | संजु शंभूनाथ चाल | बंटीचाळ, रूम नं. १ ओ.टी. सेक्शन, प्रिती अपार्टमेंटच्या समोर, उ.नगर–३ | ८५ | ✓ | ✓ | ✓ |
| ३६ | विकी भावनदास वाधवानी | वकील चाळ, बसंत बहार, उल्हासनगर–५ | ७० | ✓ | ✓ | ✓ |
| ३७ | किशन उधवदास आहुजा | बॅ.नं. १७४२, रू.नं. २, गांधीरोड, उल्हासनगर–५ | ५० | ✓ | ✓ | ✓ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३८ | इंदू राजू जाधव | बॅ.नं. १३१४, आदर्शनगर, रेल्वे स्टेशन जवळ, उ. नगर–४ | ६० | ✓ | ✓ | ✓ |
| ३९ | लता लक्ष्मण मोरे | हिललाईन पोलिस स्टेशन मागे,उल्हासनगर–५ | ८० | ✓ | ✓ | ✓ |
| ४० | अशोक बबन भालेराव | संतोषनगर, शिवसेना शाखा समोर,उल्हासनगर–३ | ५० | ✓ | ✓ | ✓ |
| ४१ | दुर्गा गणेश खरात | विर तानाजी नगर, उल्हासनगर–५ | ४५ | ✓ | ✓ | ✓ |
| ४२ | अशोक कालीचरण शर्मा | सचिव केबलवाला, ए–ब्लॉक रोड, हनुमाननगर, उ.नगर–१ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| ४३ | विकास रमेश बव | गणराज कॉलनी आशेळेपाडा, उ.नगर–४ | ६० | ✓ | ✓ | ✓ |
| ४४ | महेश मुरलीधर चौधरी | साईपॅलेस, गोलमैदान जवळ, उल्हासनगर–१ | ७० | ✓ | ✓ | ✓ |
| ४५ | प्रशांत श्रावण मोर | डॉलपीन हॉटेल समोर, उल्हासनगर–३ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| ४६ | संदिप नामदेव दळवी | महालक्ष्मी, फॉउडेशन, मच्छीमार्केट, उल्हासनगर–५ | ७० | ✓ | ✓ | ✓ |
| ४७ | अमोल इश्वर चव्हाण | महात्मा फुलेनगर, उ.नगर–५ | ५५ | ✓ | ✓ | ✓ |
| ४८ | निलेश दत्तु अमोदकर | शनीराज कॉलनी रूम नं. ८, मोनेरा रोड, उल्हासनगर–४ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| ४९ | सुनिल सुरेश शेजुळे | लालचक्की स्टेशनरोड, उ. नगर–४ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| ५० | राकेश किरण शार्दुल | हिललाईनपोलिस स्टेशन, उ. नगर–५ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| ५१ | राधेश्याम मखनलाल केवट | भयासाहेब आंबेडकर सोसायटी, हिराघाट, उ. नगर–३ | ४५ | ✓ | ✓ | ✓ |
| ५२ | दिनेश भगवानदास दुलानी | बॅ.नं. ८१४/१, सेक्शन १७, उल्हासनगर–३ | ४५ | ✓ | ✓ | ✓ |
| ५३ | रतनकुमार खुशीलाल चौधरी | मोहन जोशी चाळ, उ. नगर–५ | ९० | ✓ | ✓ | ✓ |
| ५४ | जगदिश दयाराम गेमनानी | अभिशेक अपार्ट. प्रेमनगर टेकडी, उल्हासनगर–५ | १०० | ✓ | ✓ | ✓ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५५ | राजेश विष्णेदास सोनी | शिवपूजा अपार्ट. भाटीयाचौक, उल्हासनगर—५ | ८७ | ✓ | ✓ | ✓ |
| ५६ | संतोष एस. पाचरे | मोहिनी पॅलेस, चरणदास दरबार,उल्हासनगर—१ | ४० | ✓ | ✓ | ✓ |
| ५७ | महेंद्र संतोष तायडे | आनंदभाउ चाळ, आशेळे पाडा, उ.नगर—४ | ९८ | ✓ | ✓ | ✓ |
| ५८ | सुनिल दत्तु जाधव | वेलफेर हायस्कुल जवळ, उल्हासनगर—४ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| ५९ | मिना राजाराम सोनवणे | एम.आय.डी.सी. वाल्मिकनगर,उल्हासनगर—१ | ६० | ✓ | ✓ | ✓ |
| ६० | प्रदिप वसंत सोनवणे | भोईर चाळ , लालचक्की, उल्हासनगर—४ | ४५ | ✓ | ✓ | ✓ |
| ६१ | मनिषा वेखंट वाघमारे | बौध्दनगर, विठठ्लवाडी,उ. नगर—३ | ६० | ✓ | ✓ | ✓ |
| ६२ | अनिल पहलाज माखिजा | बॅ.नं. २१४/१, बेबस चौक, मझिद, उल्हासनगर—१ | ६० | ✓ | ✓ | ✓ |
| ६३ | पवन कन्हैयालाल खाटर | शिवदर्शा अपार्ट. सेक्शन २५, उल्हासनगर—४ | ९९ | ✓ | ✓ | ✓ |
| ६४ | हनुमंत नारायण पवार | महात्मा गांधीनगर, शिवसेना शाखे जवळ, उल्हासनगर—२ | ४५ | ✓ | ✓ | ✓ |
| ६५ | इशांत बशीर शेख | महात्मा फुले टेकडी, पाण्याच्या टाकीजवळ, उल्हासनगर—५ | १०० | ✓ | ✓ | ✓ |
| ६६ | पप्पुसिंग बलवंतसिंग राठौर | राहुल रेशीडेंसी सेक्शन २५ उ.नगर ४ | ८५ | ✓ | ✓ | ✓ |

वरील दर्शविलेल्या ६६लाभार्थ्यांच्या मागणीनुसार स्वयंरोजगार करणेसाठी ६X६ फुटाच्या लोखंडी पोर्टेबल केबिन मालमत्ता विभाग यांचेकडून प्रभाग समिती क्रं. १,२,३,४.मधील योग्य जागा निवडून दिल्यानंतर बसवण्यात येतील.

योजनेचे स्वरूप पुढील प्रमाणे असेल

१) अर्ज केलेल्या व पात्र ठरलेल्या अर्जदारांनाच याचा लाभ मिळेल.

२) प्रति अर्जदार एक स्टॉल पुरविण्यात येईल.

३) सदरच्या स्टॉलची जागा महानगरपालिका निश्चित करेल. जागा बदलण्याचा पूर्ण अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका यांना असेल.

४) स्टॉलची संपूर्ण मालकी उल्हासनगर महानगरपालिकेची असेल.

५) स्टॉल हा पाच वर्षे कालावधीसाठी नाममात्र भडे तत्वावर ताब्यात दिला जाईल. त्यानंतर मुदतवाढीसाठी मालमत्ता विभागात अर्ज करणे आवश्यक राहील मुदतवाढ देणे अथवा न देणे याचा निर्णय मा. आयुक्त यांचा असेल.

६) सदरचा स्टॉल कायदेशीर व्यवसाय करणेस वापरावा. जर याबाबत एखादी तक्रार असेल व त्यात स्टॉल वापराबाबत नियमबाहयता सिध्द झाली तर स्टॉल काढून घेणेत येईल.

स्टॉलची वैशिष्टये

१) सदरचा स्टॉल लोखंडी जिंदाल मेक (१६ गेज) जाडीच्या पत्र्याचा असेल.
२) स्टॉल गंजरोधक, उष्णतारोधक तसेच (Waterproof) असेल.
३) स्टॉलमध्ये सर्व लाईट फीटींगची व्यवस्था असेल.
४) स्टॉल R.C.C.बेसवर बसवण्यात येईल.
५) स्टॉलचे आयुष्यमान १५ वर्षे असेल.

सन २०१८—२०१९ च्या अर्थसंकल्पात क—२ रूग्णालय व दवाखाने मध्ये अपंग व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना या लेखाशिर्षात एक कोटी त्रेपन्नलाख सासष्ट हजार इतकी तरतुद आहे. तरी सदर खर्च या लेखाशिर्षातून करणेसाठी तसेच हे स्टॉल दिव्यांगांना नाममात्र भाडेतत्वावर ५ वर्षासाठी देणेकरीता स्टॉल खरेदीसाठी ई— निविदा मागणविणेसाठी व खर्चास प्रशासकिय मान्यतेसाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ८ **दिनांकः—** ८/५/२०१८

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका शहरातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारकरणेसाठी ६X६ फुटाच्या लोखंडी पोर्टेबल केबिन पुरवठा करणेकामी व्यक्ती आणि जागा यांची निश्चिती करुन तशी आखणी करुन नव्याने प्रस्ताव आणण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ५.४० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १७/०५/२०१८

**दि. १७/०५/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**३**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा दिनांक १७/०५/२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ५ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ६ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| ७ | श्री. भगवान शंकर भालेराव | सदस्य |
| ८ | श्रीमती मिनाकौर लबाना | सदस्या |
| ९ | श्रीमती ज्योती बठिजा | सदस्या |
| १० | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१) श्रीमती पंचम उमेश कालानी, २) श्री. राजेंद्र शांताराम चौधरी, ३) श्री. धनंजय बाबुराव बोडारे, ४) श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ५) श्रीमती रेखा ठाकुर, ६) श्रीमती दिप्ती दुधानी.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

४३.श्री. दादा पाटील, मुख्य लेखाधिकारी
४४.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४५.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी
४६.श्री. अश्विनी आहुजा, प्र. उप अभियंता, साबांवि
४७.श्री. जितु चौईथानी, प्र. उप अभियंता, साबांवि
४८.श्री. संदिप जाधव, कनिष्ठ अभियंता, साबांवि

४९.श्री.प्रबोधन मवाळे, सहाय्यक आयुक्त
५०.श्री. नंदलाल सामतांनी, सहाय्यक आयुक्त
५१.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन विभाग
५२.श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता, साबांवि
५३.श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
५४.श्रीम. श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
५५.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
५६.श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
५७.श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्री. बाळु भांगरे, लिपीक
३. श्री. संतोष खोटरे, लिपीक

सयंकाळी ४.१५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

या वेळी मा. आयुक्तांच्या स्थानी श्री. दादा पाटील, मुख्य लेखाधिकारी हे आसनस्थ होते.

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

**⇨ विषय क्र.१:— प्रोक्लेन व जेसिबी मशिनद्वारे मोठया/छोटया नाल्याची सफाई करणे व तसेच मनुष्यबळाद्वारे शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ याची डंपरद्वारे वाहतुक डंपिंग ग्राऊंडवर करणेबाबतच्या पावसाळयापुर्वी व वार्षिक कामाच्या प्रस्तावास वित्तीय मान्यता व न्युनतम दराच्या निविदाकार मे. शुभम कंन्स्ट्रक्शन उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता मिळणे.**

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** हा विषय काय आहे? त्याच्या बददल सांगा.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** मा. सभापती मॅडम, सर्व सन्माननिय सदस्य, पावसाळयापुर्वी आपण जी नालेसफाई दरवर्षी करीत असतो, त्या अनुषंगाने हा प्रस्ताव आहे. परंतु सदरचा प्रस्ताव मागील वर्षा प्रमाणेच पावसाळयापुर्वी नालेसफाई न करता, वर्षातून तीनदा या प्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचा प्रस्ताव निविदा प्रक्रियाअंती मेसर्स शुभम कन्स्ट्रकशन न्युनतम दराचे जे निविदाकार आहेत. त्यांच्याशी संविधा करण्यासाठी मा. स्थायी समितीपुढे सादर केला आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** यामध्ये आपण जो प्रस्ताव दिला आहे, पोकलेन १७५० तास चालेल आणि आपला जेसीपी लोडर जो आहे, १४९० आणि ४३२० तास डंपर चालतील, किती डंपर चालतील?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** सर हे रेट तासावर ठरवले जातील.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** किती तास चालतील?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** जेवढी गरज पडेल तेवढे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** २५ हजार लेबर मागविले आहेत, तर त्यांना तीन पार्टमध्ये डिव्हाईड करायचे आहे. एक आता पहीले होईल आणि एक चार महीन्या नंतर होईल आणि एक दिवाळीमध्ये.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** एक दिवाळीमध्ये आणि एक जानेवारी महीन्यामध्ये

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** एक डिसेंबर महीन्यामध्ये तर याचे वितरण तुम्ही कसे करणार आहेत?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** ते केले आहे, जसे मागच्या वेळेस केले होत, आपल्याला पावसाळयाच्या पहीले यंत्रणा लागते, त्या हिशोबाने २५ हजार मॅन पावरच्या विषयी सांगतो, हे जे २५ हजार आहेत, त्यामधून आपण ११ हजार पावसाळयापुर्वी वापर करणार आहोत आणि बाकी ७ हजार, ७ हजार हे नंतरच्या टर्ममध्ये वापर करू.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** यामध्ये पण जेसीबी आणि डंपर....

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** सेम, सेम पोकलेन मशिन आपण ९५० वापर करणार आहोत आणि जर त्यामध्ये कमी वाटत असतील आणि जास्त जरी लागत असतील तर त्यामध्ये आम्ही कमी जास्त करू शकतो, परंतु आमचा जो अंदाज आहे, एस्टिमेट आहे की, पहील्या सेशनमध्ये ९५० पोकलेन मशिन, ७९० जेसीबी आणि २१२० तास डंपर, या हिशोबाने घेणार आहेत. आता सध्या चार मशिन पोकलेन असतील एक २०० ची असेल, जी आपली वालधुनी मोठी नदी आहे, ती तिथे लागेल. बाकी सर्व या ९०च्या अशा तीन असतील.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** आता ११ हजार लेबर जे पावसाळयापुर्वी आपण घेतले आहेत, ते जास्त लागतात त्यांची संख्या खरी आहे का? जर एवढे लेबर हिशोब कराल तर प्रत्येक वार्डमध्ये १४० लागतील. प्रत्येक महीन्याला आणि तीन हजार, चार हजार लेबर आपल्याला दुस—या जागेवर लागतील.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** आमचा हिशोब हा आहे की, आम्ही जे एस्टीमेट बनवला आहे, त्या हिशोबाने आम्ही प्रत्येक पॅनलसाठी एक महीन्यासाठी १६ लेबर देणार आणि प्रत्येक प्रभागासाठी चार, एक पॅनलमध्ये १६.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** १६ लेबर एक महीन्यासाठी देणार. म्हणजे ४८० लेबर आपण देणार.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** नाही ३१२ असतील किंवा ३१५ असतील.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** आपण बोलतात की, ३० दिवस देणार.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** होय, ३० दिवस.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** १६x ३, ४८ म्हणजे ४८० होतात. जर ४८० आम्हांला तुम्ही लेबर देणार आहेत, बाकीचे काय?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** मला वाटते त्या हिशोबाने टोटल साडे नऊ हजार होतात.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** तीन चार जागा अशा आहेत की, त्यासाठी दोन लाख, तीन लाखाचे एस्टिमेट वेगळे बनवत होते.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** मी तेच सांगत आहे,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** माझ्या वार्डमध्ये फर्निचर बाजार येथे एक आहे,

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** होय, फर्निचर बाजार, १८०, समतानगर, लेपर्सी कॉलनी अशा काही जागा आहेत, पुरीभाजीवाल्या पासून ए.वन फर्निचर बाजार जिथे अंडरग्राउंड आहे, हे सर्व करावे लागते. त्यासाठी कमीत कमी दिड हजार वर्कर लागतात. साडे नऊ हजार हे प्रत्येक प्रभाग समितीमध्ये जातील आणि दिड हजार बाकीचे जिथे जास्त प्रॉब्लेम आहेत, तिथे वापरण्यात येतील. या हिशोबाने ११ हजाराचे एस्टिमेट आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मिस व्हायला नाही पाहीजे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** फॉलवर लाईनचा एक ऐरिया आहे, तिथे आज पर्यंत कधीच एक पण माणूस नाल्याच्या कामासाठी लावले नाहीत. तो एवढा मोठा नाला आहे की, तो कधीच साफ झाला नाही. फॉलवर लाईन ते गणेशनगर असा जातो.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** होय फॉलवर लाईन ते गणेशनगर

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** जसे आपण दुस—या जागेवर माणसे कामाला लावतात.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** तिथे पण आम्ही थर्ड सेशनमध्ये माणसे लावून काम केले होते.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** त्या नाल्याला अजून पर्यंत हातच लावला नाही. तो आमच्या पॅनलमध्ये येतो.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** ठिक आहे, सर आम्ही बघू आणि पहीले तिथले काम करून घेऊ.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** नाला सफाईसाठी जो सन २०१८—२०१९ चा जो बजेट आहे, त्यामध्ये किती प्रोव्हीजन आहे?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** तीन करोडचे प्रोव्हीजन आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** नाला सफाईसाठी फक्त ३ करोडचे बजेट आहे. नाला सफाईसाठी जास्त बजेट आम्ही पास केले होते, किती आहे?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** हे एस्टिमेट २.७७ करोडचा बनवला आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मी एस्टिमेट बददल बोलत नाही, काय होते, ही नाला सफाई आपण लेबरकडून करत असतो. सन १९९७ पासून आपण सुरू केले, त्यावेळेस महानगरपालिका झाली होती, कॅप्टन शुळ आपले आयुक्त होते. त्यावेळी नाला सफाईसाठी दोन दोन लाखाचे पहीले पहीले टेंडर काढत होतो. तेव्हा एकदम झिरो होते, काहीच काम होत नव्हते. त्याच्या नंतर लेबर घ्यायला सुरूवात केली, जेव्हा पहील्या वेळेस आम्ही सर्वांना, प्रत्येक नगरसेवकांना एक महीन्यासाठी लेबर दिले होते, तर आम्ही २० लेबर एक महीन्यासाठी एका, वार्डमध्ये ६०० लेबर दिले होते. तीस दिवसाठी त्या नंतर एक दोन वर्षा नंतर काय झाले, १० लेबर केल आणि दोन महीन्यासाठी केले, ६०० लेबर. आज लोकसंख्या वाढली आहे, अस्वच्छता पसरली आहे, सर्व नाल्या आपण बंद केल्या आहेत, तर आपण १०० लोकांमध्ये काम कसे करून घेणार? महीले ६०० लेबरमध्ये काम होत होते, आता १०० लेबरमध्ये काम होणे मुश्किल आहे. हे होणे गरजेचे आहे, खुपच अतिआवश्यक आहे. ही जी पॉलिसी आहे, माझ्या हिशोबाने, हा जो टेंडर आहे, तो एकाच सेक्टरमध्ये पुर्ण व्हायला पाहीजे.पावसाच्या पहीले हे लेबर आपल्याला कमी पडतील आणि बाकीचे टेंडर आणखी निघायला पाहीजे ऑक्टोंबरसाठी आणि डिसेंबरसाठी निघाले पाहीजेत. कारण यामधून आपण आम्हांला पहीले ४० टक्के देणार, नंतर ३० टक्के देणार तर काम होणार नाही.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** सर जर गरज पडेल आता पण आपण २५ लाखामध्ये करू शकतो.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** परंतु याच्यासाठी आयुक्त साहेब असणे गरजेचे आहे. आयुक्त असतील तर पॉलिसी बनेल कारण हा विषय फार गंभीर आहे. उद्या ठकेंदार पाच दिवस दोन चार जण पाठवतील आणि पाचजणांमध्ये दोन चार दिवसामध्ये काम झाले, दोन चार दिवसामध्ये काम होणार. तर मा. आयुक्त साहेब हजर असणे अतिआवश्यक आहे. ते असतांना पॉलिसी बनवून हे २.७७ चे करून आपण अजून टेंडर काढू शकतो. जे आपला दिवाळी आणि डिसेंबर व दिवाळीचा कोटा आहे, एवढे लेबर तर आपल्याला मिळतील, १०० लेबरमध्ये काय होईल? पहीले आपल्याला वार्डमध्ये ६०० लेबर मिळत होते, आता ४०० लेबर संपुर्ण पॅनलमध्ये मिळत आहेत, चार पॅनल तर आपल्या नाल्याची सफाई कशी होणार? रोडच्या नाल्या बंद केल्या आहेत, चेंबर बंद केले आहेत, आता छोटे नाले आपण सर्व लिहीले आहे. तर छाटे नाली—नाले, कल्वर्ट नाला साफसफाई करण्यासाठी त्या मानाने लेबर खुपच कमी आहेत. संपर्ण वर्षासाठी आपल्याला लेबर कमीत कमी ५० हजार असायला पाहीजेत. तरी सुध्दा आणखी सदस्य आहेत, त्यांचे मत घ्या.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** प्रत्येक वेळेस आपल्याला सुरूवाती पासून १० लेबर ३० दिवसासाठी मिळत होते, प्रत्येक वार्डसाठी ४५० लेबर मिळत होते. त्या हिशोबाने ३५ हजार लेबर मान्सुनच्या काळात मिळत होते. आता आपण संपुर्ण वर्षासाठी २५ हजार केले आहेत, तर हे खुपच कमी आहेत, तर यामुळे काय होणार मी एक उदाहरण देतो, मागच्या वर्षी ८ जुनला पहीला पाऊस पडला होता आणि पहील्या पाऊसातच माझ्या वार्डमध्ये पाणी घुसले होते. तिथे हनीमुन कॉटेज आहे, रात्री सभागृह नेता १.०० वाजता माझ्याकडे आले होते, ती परिस्थिती बघण्यासाठी. तर याचे कारण म्हणजे लेबर कमी असल्यामुळे असे झाले. जसे की, तुम्ही आता तुम्ही घेतले पुरी भाजीवाल्या

पासून तर फर्नीचर बाजार पर्यत तो नाला संपुर्ण अंडाग्राउंड आहे. हा नाला साफ करण्यासाठी लेबर कमी पडतात, लेबर मिळत नाही तर असे काम राहून जाते. काम राहून गेल्या नंतर पुर येतो, पहील्या पावसामुळे खुप नुकसान झाले.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:–** आता आमचे असे प्लॅनिंग आहे की, जसे की, मी पुरीभाजी, हनीमुन कॉटेज, १८० मच्छि मार्केट सांगितले आता आम्ही पहीले इथेच लेबर लावणार आहेत. जिथे जिथे पाणी भरण्याची शक्यता आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** दुसरे असे की, जेव्हा ठेकेदार पोकेलन मशिन घेऊन खाली नाल्यामध्ये उतरतो, तेव्हा तो काही ठिकाणी पाईप लाईन डॅमेज करतो, नंतर बोलतात की, माझ्या एस्टिमेटमध्ये पाईप लाईन बनवणे नाही, तर मी बनवणार नाही. त्याचे प्रोव्हिजन यामध्ये आपण ठेवले आहे का?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:–** जर काम करतांना काही नुकसान होत असेल तर ठेकेदाराला ते करायचे आहे, असे प्रोव्हिजन त्यामध्ये आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** पहीले त्यांना मागच्या वर्षीचा कामाचे अनुभव आहे. तेथील लोकांना पाच पाच, दहा दहा हजार रूपये भरून काम करावे लागले आणि आपल्या डिपार्टमेंटने त्यांना काहीच मदत केली नाही, ठेकेदाराने सुध्दा मदत केली नाही, त्यांनी सरळ सांगून टाकले की, मी हे काम करणार नाही, माझ्या प्रोव्हिजनमध्ये हे नाही.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:–** आता जर असे होईल, कोणत्याही सदस्यांच्या वार्डमध्ये जर असे झाले, तर लिखीत दया, म्हणजे ठेकेदाराकडून भरपाई करून घेण्यात येईल किंवा त्याच्या पेमेंटमधून कपात करण्यात येईल.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** ठिक आहे, जर चार घराच्या लाईन तुटल्या...

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:–** ठेकेदाराची जबाबदारी आहे की, पब्लिकच्या प्रॉपर्टीचे जे पण नुकसान झाले तर त्याला ते भरपाई करून दयायचे आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** आमचे म्हणणे आहे की आपण क्वॉन्टीटी कमी घेतली आहे, ती वाढवायला पाहीजे आणि आपण जे लेबर सांगत आहेत, त्यांना एक वर्षे लागेल तर माझ्या माहीती प्रमाणे एक महीन्यामध्ये लेबर लावले तरच चांगली साफसफाई होईल. जर आपल्याला लेबर वाढवायचे असतील तर आयुक्त उपस्थित असणे गरजेचे आहे. तेच कमिटमेंट देतील. नाही तर याच टेंडरला एक्सटेशन देवू किंवा दुसरे नविन टेंडर काढू शकतो.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:–** हे जो टेंडर आहे, तो २५ हजार लेबर मागवले आहेत, आपला ११ हजाराचे एस्टीमेट आहे, आपण ११ हजारामध्ये करू शकतो, जर होत नसेल तर आपण त्यामधून मॅन पावर घेऊ शकतो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** आज तारीख १७ मे, आहे, तर कधी एस्टिमेट बनेल, कधी त्याला फायनल सेंशन मिळेल आणि कधी त्याचे काम होईल,

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:–** सर रेट मंजूर आहेत आणि संपुर्ण वर्षासाठी आहे, याच दराने मा. आयुक्तांची मंजूरी घेऊन स्थायी समितीपुढे परत येऊ शकते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** मी आपल्या लक्षात आणून देतो की, मागच्या सभेमध्ये आयुक्त साहेबांनी, लक्षात घेतले होते. एक प्रपोजल होते की, त्यांनी या दराने सप्लाई केली आहे. त्याच ठेकेदाराला तीच वस्तु देण्यात यावी. आयुक्त साहेबांनी सांगितले की, आम्ही देवू शकत नाही, त्यासाठी टेंडर काढायला लागेल.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:–** हे टेंडर संपुर्ण वर्षासाठी आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** ठिक आहे, एक वर्षासाठी आहे, परंतु क्वान्टीटी कमीत कमी २५ हजार आहे,

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** याच्यामध्ये हे पण प्रोव्हिजन आहे की, जर मॅन पावर कमी पडत असेल तर आपण घेऊ शकतो, जर जास्त लागतील तर त्यांना ते दयायचे आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** त्याचे लिमिट काय आहे?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** लिमिट दिले नाही, परंतु प्रोव्हिजन आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** ठिक आहे, केणे साहेब, याच्यामध्ये तुम्ही जेसीबी चा रेट दिला आहे, ११६०रूपये बरोबर आहे, आता इथे श्री. राजेश वदारिया बसले आहेत, मला तुम्ही सांगा, जेसीबीचा प्रत्येक तासाचा रेट काय आहे?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** ६५० रूपये आहे, आपण कधी पण फोन करा, जेसीबी आपल्याकडे चार तासात येऊन जाईल. ६५० रूपये दर मार्केटमध्ये चालू आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आपला रेट डबलचा ११६० आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** खुलासा करणेसाठी आयुक्त पण नाहीत आणि उप आयुक्त पण नाही, मग या गोष्टीचा खुलासा कसा होणार?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** मला वाटते की, भारतात कुठेही जेसीबीचा हा रेट नसेल?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** तो पण थ्री डी आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** होय.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>**आता नविन मॉडेल आयडीचा येऊन वर्ष झाला आहे. आता तर थ्री डी आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** ११६० कसला रेट आहे, एवढा?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** जेसीबीचाच दर आहे,तो.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** तुम्ही डंपरचा रेट दिला आहे, ६०० रूपये प्रत्येक तासला, ६०० रूपये प्रत्येक तासाला म्हणजे तुमचे आठ तासाचे झाले किती?

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** भालेरावजी तुमचे म्हणणे आहे की, डंपर संपुर्ण दिवसासाठी असायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** डंपर तर संपुर्ण दिवसासाठी घ्यायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** तासाचे कोणत्या हिशोबाने पकडाल?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** तासाचे कोणत्या हिशोबाने घ्याल? आपण जेसीबी तासाच्या हिशोबने घेऊ शकतो. आपला हिशोब काय तासाने घ्यायचा, त्यांना टेलर दयायचा आहे, तो १० तास चालवेल किंवा १५ तास जेसीबी चालवेल. आपण टेंडर देत आहोत ना?

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** आपण जो वालधूनी नदीमध्ये जेसीबी उतरवला होता...

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** जेसीबी नाल्यामध्ये जाईल, तिथे तो दोन दोन दिवस तीन तीन दिवस अडकून राहीला तर त्याचे तास आपण पकडणार का? केणे साहेब सांगा ना? एखादा जेसीबी नाल्यामध्ये गेला आणि तो तिथे आडकला, दोन दिवस आडकला त्याचे तास तुम्ही पकडणार आहेत का?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** नाही, जेवढे तास तो काम करेल, तेवढेच तास गृहीत धरले जातील. एखादी पोकलेन मशिन जर बंद पडली असेल..

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** जमनुजी मागच्या वेळेस टेंडरमध्ये आपण नाल्याचा उल्लेख करीत होतो, मोठा नाला,छोटा नाला टेंडरमध्ये नाल्याचा उल्लेखच नाही. पहीले टेंडरमध्ये देत होते की, हा नाला साफ होईल, तो नाला

साफ होईल, हा नाला घेतला आहे, तो नाला घेतला आहे, यामध्ये कुठे नाला घेतला आहे? ते समजायलाच येत नाही. कोणता नाला घेणार आहे,? आणि ठेकेदार कुठे काम करीत आहेत? ते नाले तर सांगा.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** ४६ नाल्यांची यादी आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आम्हांला ती गोषवा—या बरोबर का दिली नाही? नाल्यांची यादी आम्हांला का दिली नाही?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** आपण ती लिस्ट घेऊन या.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** गोषवा—या बरोबर ती लिस्ट दयायला पाहीजे होती.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—**केणे साहेब, हे अतिआवश्यक काम आहे, असे नाही की, कोणी पण नगरसेवक नाही बोलणार नाही की, हे करू नका आम्ही करण्यासाठी तयार आहेत आणि आम्हांला असे पण वाटते की, जास्त मजूर पाहीजेत. परंतु जसे आमचे सदस्य, श्री. भगवान भालेराव यांनी सांगितले की, मोठया नाल्यांसाठी पोकलेन कुठे कुठे लावणार? त्यांची एक यादी असायला पाहीजे.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** ४६ नाल्यांची यादी तयार आहे, जर सदस्यांना पाहीजे असेलतर मी १० मिनीटात झेरॉक्स काढून देवू शकतो.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** गोषवा—या बरोबर का दिली नाही?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** गोषवा—या बरोबर दिली नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** का दिली नाही?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** मी आता देवू शकतो १० मिनीटात, माझ्याकडे ती उपलब्ध आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मी सर्व सदस्यांना निवेदन करतो की, आयुक्त साहेब पण नाहीत, आपण या विषयाला चांगल्या प्रकारे, नंतरच्यासाठी पण आपल्याला जास्त लेबर पण पाहीजेत, कसे पाहीजेत? बजेटचे प्रोव्हिजन काय आहे? तर ही मिटींग उद्या चार वाजे पर्यंत स्थगित करू. मोठे नाले जे आहेत, त्यासाठी पोकलेन लागतील, काय लागतील? मोठया नाल्यांची लिस्ट, त्याचे संपुर्ण प्लॅनिंग, लेबर लागतील, आपण कसे काय वितरीत करणार? वार्डमध्ये किती देणार? पॅनलमध्ये किती देणार? बाकी वार्डचा बाहेर किती किती देणार? बाकी वार्डच्या बाहेर जे मोठमोठे नाले आहेत, तिथे किती व कुठे कुठे लेबर कामाला लावणार? याचे संपुर्ण प्लानिंग करून या. नंतर वर्क ऑर्डर देणार, पास होऊन जाईल आणि प्लॅनिंग काहीच नाही. प्रत्येक नगरसेवक फोन करत राहतील.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** फर्स्ट टर्ममध्ये एक पॅनलमध्ये एवढे वर्कर लोक, सेकन्ड टर्ममध्ये एवढे, थर्ड टर्ममध्ये एवढे लोक.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** प्लानिंग तीन महीन्याचा असेल.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** एक दिवसात होणार नाही, पण लवकर करायचे आहे.

**महापालिका सचिवः—** नोटीस देता येणार नाही, फोन करून सांगणार.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानः—** अजेंडा लिस्ट नाही बनवणार, फोन करून कळवून दया, शिवसेनेचे पण सदस्य नाही. त्यांना सुध्दा फोन करून कळवून दया. कार्यालयातून फोन जायला पाहीजे, आम्ही पण सर्व सदस्यांना कळूव. उद्या ४.३० वाजता मिटींग ठेवण्यात येईल आणि श्री. केणेजी आपण सर्व डिटेल्स घेऊन या.

**सभापती, श्रीम. जया प्रकाश माखिजाः—** ठिक आहे, ही मिटींग स्थगित करण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** त्याच बरोबर एक गोष्ट, स्थायी समितीची मिटींग असेल किंवा जनरल बॉडीची मिटींग असेल तेव्हा काही अधिकारी गैरहजर असतात, तर माझे प्रशासनाला एक निवेदन आहे की, सर्वांना सुचना देण्यात यावी की, सर्वांनी उपस्थित राहावे.

सायंकाळी ४.३० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १८/०५/२०१८

**दि. १८/०५/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**३—अ**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक १७/०५/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. सदर सभा स्थगित केल्याने शुक्रवार दिनांक १८/५/२०१८ रोजी सायंकाळी ४.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ५ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | सदस्य |
| ६ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे | सदस्य |
| ७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ९ | श्रीमती ज्योती बठिजा | सदस्या |
| १० | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| ११ | श्रीमती मिनाकौर लबाना | सदस्या |
| १२ | श्रमती ज्योती बठिजा | सदस्या |
| १३ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१) श्री. भारत रामचंद्र राजवानी, २) श्री. भगवान भालेराव, ३) श्रीम. रेखा ठाकुर ४) श्रीमती दिप्ती दुधानी.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश पाटील, आयुक्त

२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
४. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता, पा.पु.वि.
५. श्री. प्रबोधन मवाळे, सहाय्यक आयुक्त
६. श्री. मनिष हिवरे, सहाय्यक आयुक्त
७. श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता, विद्युत विभाग
८. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
९. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
१०. श्रीम. श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
११. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
१२. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्री. बाळु भांगरे, लिपीक
३. श्री. संतोष खोटरे, लिपीक

सयंकाळी ४.४५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव:–** ही स्थगित सभा आहे.

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

**⇨ विषय क्र.१:– प्रोक्लेन व जेसिबी मशिनद्वारे मोठया/छोटया नाल्याची सफाई करणे व तसेच मनुष्यबळाद्वारे शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ याची डंपरद्वारे वाहतुक डंपिंग ग्राऊंडवर करणेबाबतच्या पावसाळयापुर्वी व वार्षिक कामाच्या प्रस्तावास वित्तीय मान्यता व न्युनतम दराच्या निविदाकार मे. शुभम कंन्स्ट्रक्शन उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता मिळणे.**

---

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** काम चालू आहे, ना पोकलेन लावून त्यांचे काम चालू आहे. वालधूनी नाला साफ करण्यासाठी.

या वेळी सदस्य, श्री. दिपक सिरवानी व सदस्या, श्रीमती ज्योती चैनानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** मा. आयुक्त साहेब, आपण काल उपस्थित नव्हते, आपण मंत्रालयात गेले होते आणि याच्या पहीले आम्ही या विषयावर चर्चा केली होती,

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:–** सर वालधूनी संपुर्ण नाला नाही, फक्त पार्ट आहे. जिथ पर्यंत मशिनरी जाते, तिथ पर्यंत नाल्याचे काम करता येते.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** इथे चांदीबाई कालेज पर्यत लिहीले आहे. तर मा. आयुक्तजी यामध्ये काही गोष्टी आहेत, त्या आपल्या समोर ठेवायच्या होत्या. त्यासाठी कालची मिटींग स्थगित करण्यात आली, चर्चा केली होती, तर आमच्या सर्व सदस्यांचे म्हणणे होते की, आयुक्त साहेब असायला पाहीजेत. कारण की हा नाला सफाईचा विषय खुप गंभीर असतो. सर सन १९९७ मध्ये जेव्हा श्री. कॅप्टन शुळ, आयुक्त होते, तेव्हा पहीले वेगवेगळया नाल्यांचे टेंडर निघत होते. ४८ नाले आहेत, तर ४८ टेंडर निघत होते. वार्डचे छोटे छोटे नाले आहेत, त्यांचे पण

टेंडर निघत होते, दोन लाखाचे, तीन लाखाचे आणि काम बिलकुल झिरो होत होते. त्या वेळी मी नालेसफाईचे कामाचा विषय महासभेमध्ये केला होता की, नालेसफाई अजिबात झालेली नाही आणि नाल्यांना पुर आला आहे. त्या वेळी मा. कॅप्टन शुल यांनी सर्व ठेकेदारांचे बिल थांबवले होते आणि चौकशी लावली होती आणि अशा प्रकारे सन १९९८ मध्ये एक नविन प्रथा चालू झाली होती. प्रत्येक वार्डमध्ये २० लेबर डेली, ३० दिवस असे ६०० लेबर एका वार्डमध्ये, त्या वेळी ६९ वार्ड होते. ६०० लोक एका वार्डमध्ये त्या वेळी १०० रूपये दर होता. फावडा घमेला पण आणत होते, ७००० हजार रूपये आणि ४२ लाख रूपये खर्च मनुष्य बळाचा होत होता. काही नगरसेवकांनी सांगितले की, २० लेबरमुळे काय होणार? ६०० लेबर लागतात. तर २० लोकांमधून ५ या १० लोक बसून घेतात आणि १० किंवा १२ च लोक काम करतात. तर दोन वर्षा नंतर आम्ही १० लेबर, ६० दिवसासाठी करण्यात आले. म्हणजे प्रत्येक वार्डमध्ये ६०० लोक मिळाले आणि ४२ लाख रूपयेच खर्च होत होता, नंतर या प्रथेविरूध्द कोणी कोर्टामध्ये गेले आणि म्हणाले की, आम्ही तीन वर्ष,चार वर्ष काम केले आहे, तर आम्हांला परमानंट करा. तर ही प्रथा संपवून आम्ही परत टेंडर काढून लेबर घ्यायला सुरूवात केली. परंतु आता रेट वाढल्यामुळे, जो प्रत्येक दिवसासठी लेबर होते, ते खुपच कमी झाले आहेत. जे ६०० लेबर आम्हांला मिळत होते, ते कमी होऊन आता ३०० झाले आहेत आणि काही वर्षानी ते १५० वर आले आणि मागच्या वर्षाचे बघितले तर आम्हांला १४० ते १२० लेबर मिळत आहेत. त्यामुळे आपले काम बिलकुल शुन्या बरोबर होऊ शकते. आता काय होईल, आम्हांला वार्डमध्ये १०० लेबर देतील, १२० लेबर देतील आणि आठ दिवसात किंवा दहादिवसात काम होणार नाही आणि पावसाळयात भरपूर नाले भरलेले आसतात, पाणी येत असतो आणि हे काम दिवाळीच्या वेळेस पण होते. तर माझा असा अंदाज आहे की, हे काम खुपच गरजेचे आहे आणि २५ हजार लेबरची जी संख्या आहे. ते पण तीन वेळेस कधी ११ हजार लेबर मिळती आणि प्रत्येक नगरसेवकांना १२० लेबर मिळतील, परत दिवाळीच्या वेळी मिळतील, नंतर परत डिसेंबरमध्ये मिळतील. ही संख्या खुपच कमी आहे, पहीले जी संख्या होती, ती ६०० होती, ती कमी होऊन ३०० वर आली, नंतर १५० वर आली, त्याच्या नंतर १२० ते १३० वर पोहचली. तर मी आपल्याला निवेदन करतो की, आपल्या शहरामध्ये दोनच मोठया समस्यां आहेत.एक नाला सफाई आणि दुसरा ट्राफिकची समस्या आणि नाला सफाईचा जो विषय आहे, त्यामध्ये २५ हजार जे लेबर ठेवले आहेत, ते पाऊस पडण्याच्या आधी सर्वांना देण्यात यावेत. प्रत्येक नगरसेवकांना एका वार्डमध्ये १० लेबर, ३० दिवसासाठी डेली देण्यात यावेत. ३०० लेबरच्या हिशोबाने २५ हजार लेबर असतील. आपण लिहीले आहे की, छोटे छोटे नाल्यासाठी, आणि माझ्या माहीती प्रमाणे कमीत कमी हे लेबर डबल करायला पाहीजेत आणि साडे बारा हजार लेबर दिवाळीच्या पहीले, त्यामध्ये आपण पाच लेबर ३० दिवस दिले तरी चालेल आणि डिसेंबर महीन्यामध्ये पाच लेबर असे तीन वेळा करू. माझ्या माहीती प्रमाणे हे सर्व नगरसेवकांना सेटीजफाय होईल. दहा दहा लेबर, ३० दिवसासाठी तर ३०० ची संख्या होईल. आज पर्यंत काय झाले आहे? या दहा, बारा वर्षामध्ये रोडची ड्रेन पण बंद केले आहेत. नाली बनवून ढाकण लावून बंद केले आहेत. ते आपले सफाई कामगार कमी असल्यामुळे वर्षातून तीन वेळा काम करीत असतो आणि आज १० लेबर घेऊन मेन रोडवर सफाई करेल तर ३० दिवसा पेक्षा मला जास्त वेळ लागेल. तर माझे आपल्याला निवेदन आहे की, हे काम डबल करण्यात यावे, तेच ठेकेदार करतील. आपल्या निर्देशा प्रमाणे लेबर कमी व्हायला नाही पाहीजेत. आम्हांला नालासफाईसाठी १० लेबर दया, ५० दया, १२० दया लेबरची संख्या कमी व्हायला नकोत., सगळयांना लेबर मिळायला पाहीजेत आणि सर्व संमतीने आज आम्ही मान्य पण करू, पण आम्हांला लेबर वाढवून पाहीजेत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** काय आहे? माझे वेगळे म्हणणे आहे की, जवळपास आपण पाऊणे तीन करोड खर्च करणार आहोत, त्याच्या नंतर सुध्दा नागरीकांच्या तक्रारी किंवा लोकांच्या तक्रारी जर आल्या, ते बरोबर नाही. त्यामुळे प्रशासनाने लक्ष दयावे, आम्हांला तीन किंवा दहा आम्हांला नाल्यांची सफाई झाली पाहीजे. कारण की तुमचे ॲसेसमेंट असले पाहीजे, मागच्या वेळेस एक अनुभव आला की, अगोदर सांगितले झाले जसे डांबरीकरणाचा बजेटमध्ये मी स्थायी समितीमध्ये विषय होता. आम्हांला माहीत होत, आमचे ॲसेसमेंट होते की, डांबरीकरणाचा रोड होणार नाही. त्यांनी आयुक्तांना सांगितले, डिपार्टमेंट म्हणाले नाही एवढयामध्ये होईल आणि खरोखर चार पाच रोड प्रत्येक प्रभाग समितीमध्ये झाले, बाकीचे रोड झाले नाहीत. त्यांचे बजेट संपले, एस्टिमेट संपले, आता हे ॲसेसमेंट कोणाचे काम आहे, त्याचा त्रास कोणाला होतो, बर नंतर काय अधिकारी हात वर करून बसतात. त्याचे एस्टिमेट संपले आहे, आता आम्हांला माहीत आहे का या डांबराचा प्रत्येक कामाला किती खर्च येतो, पाटोल्ससाठी किती खर्च येणार आहे. त्यांची बोम, यांचे बोम झाले रस्त्याचे संपले. बर ठेकेदार काय परत फोन उचलत नाही, मग आता

संपले. अशी परिस्थिती झाली, नंतर १० किंवा २० आमचे काम प्रत्येक नाला साफसफाई झाले पाहीजे, लेबर कमी आहेत, रोजचे, दैनंदिन स्वच्छता निरीक्षक यांच्याकडून रिपोर्ट घ्या, मोठया नाल्यांना तर हातच लावले नाही. वर्षभर हातच लागत नाही, आता काय थोडे फार लेबर भेटतील तेवढयातच काम होते. ते होतील का त्यांच्याकडून घ्या, परत तक्रार नको, नाही झाले दोन लेबरमध्ये काम केले तरी आम्हांला चालेल. पण ते करायला पाहीजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** आपण बोलणार नाही, तर काय होते, मी सांगतो ६ करोडचे पाटोल्स होते, त्यांना एक्सटेंशन दिले आहे ८ करोड ५ (२) (२) मध्ये एक्सटेंशन ८ करोडचे हे चुकीचे होते.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** सुरूवातीला काय झाले, ६ करोडचे होते,तीन करोड केले

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** नाही नाही, ६ करोडचे पाटोल ८ करोडचे एक्सटेंशन दिले.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** ६ करोडमध्ये काम पुर्ण झाले नाही, नंतर सगळीकडे बोंबाबोंब झाली आणि त्याच्या नंतर सांगितले की ८ करोडचे एक्सटेंशन दयायचे आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** यामध्ये काय होते, बोडारेजी नाव आपले खराब होते की ८ करोड वाढवून दिले, हे आजच इथे वाढवून दिले तर....

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** आम्ही बोललो होतो की, नाही होणार. होत असेल तर चांगली गोष्ट आहे, ६ करोडे काय ५ करोड खर्च कमी करा. तसे आता हे पावने तीन करोड खर्च करून नाले जसेच्या तसे राहतील. जसा की, हा पवईचा नाला आहे, जसे यांनी सांगितले फुटपाथ कधी पासून १९९९ पासून हात लावले नाही. मागच्या वर्षी फक्त एक साईडचा नाला साफ केला आहे. मेन रोडचा नाला केलेलाच नाही. आता वर्षभर हात लावला नाही. लोक बोंबलत राहतात काय कराचे? रोज साफ करता येत नाही कारण की, कामगार नाहीत. असे बरेसचे नाले आहेत, ते झालेलेच नाहीत, केलेच नाहीत. करायचे आहेत आणि तशी गरजच आहे. जर होत असेल तर चांगली गोष्ट आहे, चार लेबरमध्ये करा, दोन लेबरमध्ये करा, आमचे काहीही म्हणणे नाही. फक्त झाले पाहीजेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** नंतर उत्तर एकच मिळते की, क्वॉन्टीटी संपली आहे, असे उत्तर नाही मिळायला पाहीजे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** कारण ठेकेदार बांधलेला आहे, मला चार लेबर पाहीजेत. माझा विषय संपला. जसे पाटोलचे झाले आहे. तसे व्हायला नको.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** केणेजी माझा एक विषय आहे, मागच्या वेळेस आपण नदीची जी सफाई केली हाती, चांगल्या प्रकारे केली होती, निंबाळकर साहेबानी उभे राहून करून घेतली होती. खुपच चांगली सफाई झाली होती. आज तिथे फक्त २५ टक्के काम राहीले आहे, आज पण तिथे तेवढीच मशिनरी लागेल का?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** मशिनरी आता...

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** माझे सांगण्याचे कारण असे आहे मी त्या वार्डमध्ये राहतो, अशोकनगर पासून तर आयोध्यानगर पर्यंत खुप मोठा बेल्ट आहे, त्यामध्ये आमचा पॅनल आहे. मशिनरी आपण मागच्या वेळेस जेवढी ठेवली होती, तर या वर्षी पण तेवढयाच मशिनरी लागतील का? डिपमध्ये कराल का ब्रॉट कराल?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** नाही तिथे फक्त आता कटींग करू. तिथला संपुर्ण....

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—**आज पण तसेच आहे, तिथे सहा महीन्यापासून डेब्रिज आले आह, फक्त तेच आपल्याला करायचे आहे. मशिनरी कमी करून आम्हांला तिथे लेबर वाढवून दया. आपण ३०० मजूर लावा किंवा १०० मजुरांकडून करून घ्या, फक्त आम्हांला १०० टक्के काम झाले पाहीजे.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** सर आम्ही कोणत्याही क्वॉन्टीटी किंवा मशिनरी फिक्स केल्या नाहीत, फक्त एस्टिमेट ठेवले आहे, मॅन पावर, जेसीबी, डंपर, पोकलेन त्यांच्या तासाचे आम्ही रेट मागवले आहेत. जर मशिनरी जास्त लागतील तर मशिनरी घेऊ आणि जर मॅन पावर जास्त लागत असेल तर मॅन पावर जास्त घेऊ.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** पहीले तर आपण मॅन पावर वाढवा.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** मॅन पावर तर २५ हजार मॅन पावर आहे, ते आम्ही तीन सेशनमध्ये ठेवले आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** जर २५ हजार आपले आताच संपले तर आपण....

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** काम तर करायचे आहे ना, मागच्या वर्षी ६ मे रोजी काम चालू केले होते.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** बरोबर आहे, मागच्या वर्षी आयुक्त साहेब पण होते आणि आमची चर्चा पण झाली होती की, तुम्ही परफेक्ट नाला सफाईसाठी तुमचा अंदाज सांगा, मायक्रो प्लॅन बनवा त्याच्या पहीले आम्ही साडे आठ हजार लेबर घेणार होतो आणि काही मशनरी घेणार होतो तर हा संपुर्ण अभ्यास केल्या नंतर आम्हांला २५ हजार क्वॉन्टीटी मागच्या वर्षी लागली.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** साडे आठ हजारमध्ये काम पुर्ण झाले होते का?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** नाही,

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मला एक गोष्ट सांगा केणेजी पाहीजे तर आज मिटींग स्थगित करू. आपण सन १९९९ ला एका वार्डमध्ये किती लेबर लागले ते सांगा.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** सन २०१० मध्ये आम्हांला १० लेबर मिळाले होते.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** त्या वेळी मी स्वत: स्थायी समितीचा सदस्य होतो.

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** सर मला माझे बोलणे पुर्ण करू दया. मागच्या वर्षी आम्ही जे एस्टिमेट बनवले होते आणि आमचा मायक्रो प्लॅन पण बनवला होता. तेव्हा आम्हांला वाटले की, पावसाच्या पहीले संपुर्ण नालेसफाई करण्यासाठी २५ लेबर लागतील. तर त्यामध्ये असे झाले की, चर्चा झाली आणि जेव्हा पावसाच्या पहीले हे लेबर कामाला लावले तर हे लेबर मे महीन्यामध्ये कामाला लावतो आणि जुनच्या महीन्याच्या शेवट पर्यंत जास्तीत जास्त काम चालते. त्यामध्ये सर्वच लेबर, २५ हजार मिळत नाहीत. यांच्याकडून कमीत कमी जेवढी नालसफाई करू शकतो, तेवढे पावसाच्या पहीले करायचे आणि नंतर दुसरा सेशन आहे तो पावसाळयाच्या नंतर करायचा आहे. ते तीन सेशनमध्ये केले आहे, कारण संपुर्ण वर्षभर नालेसफाई झाली पाहीजे आणि पावसाळयात कोणताही त्रास होणार नाही, यासाठी आम्ही ११००० हजार डिमांड ठेवला आहे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** आम्हांला संपुर्ण विश्वास आहे की, आपण केले आहे. परंतु हा जो ठेकेदार आहे, तो मागच्या तीन वर्षा पासून आपल्याला लेबर देत नाही, उलट त्याला लेबर पण आपणच देत असतो._तुमच्याकडे भरपूर नगरसेवकांनी तक्रार पण केली आहे, त्याच्याकडे मॅन पावर नाही. नगरसेवकांना तो ठेकेदार पैसे देतो आणि सांगतात की, आपण हे करून घ्या. ही गोष्ट आपल्याला माहीत आहे का? बोडारे साहेब, जमनुजी आपल्याकडे असे आहे का?

**<u>प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—</u>** नाही, असे नाही, आमच्या बघण्यात असे आले नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** आपण फक्त त्याच्याकडून लेबर मागवत असतो आणि वार्डमध्ये कामाला लावत असतो.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** मागच्या वर्षीचे पेमेंट आपले आडकले आहे, परंतु तो विषय नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** मी आपल्या लक्षात आणून देतो की, मागच्या वर्षी ८ जुन २०१७ ला रात्री जेव्हा ११.०० वाजता पाऊस चालू झाला, तेव्हा पहील्या पावसामध्ये दोन तासामध्ये हनीमुन कॉटेज, चालीस कोटी, सतराम कॉलनी संपुर्ण परिसर पाण्यामध्ये बुडून गेले होते. सभागृह नेताजी यांना दिड वाजता फोन केला ते लोक आले, त्या वेळेस जे आपातकालिन विभागाचे होते, ते पण काही लोक नव्हते आणि त्या लोकांना स्थलांतरीत करायचे होते तर धर्मशाळेमध्ये जागा उपलब्ध नव्हती, त्यांची कोणतीही पर्यायी व्यवस्था होऊ शकली नाही. जेव्हा निंबाळकर साहेबांनी

पहाणी केली, तेव्हा त्यांना सांगितले की, शाळेतील मुलांनी जेव्हा नविन पुस्तके खरेदी केली होती, ती पाण्यामध्ये खराब झाली, त्यांचे अन्नधान्य खराब झाले आणि महानगरपालिकेकडून सुध्दा त्यांना काहीच मिळाले नाही. चुकी ठेकेदाराची आहे किंवा महानगरपालिकेची आहे, त्यांनी नाला साफ केला नाही. त्याच्यामुळे जे स्थानिक लोक तिथे राहतात, त्यांनाच त्रास सहन करावा लागतो. त्याला जबाबदार कोण आहे?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** यासाठी सर्वांत जिथे पाणी भरले जाते, त्यासाठी आम्ही वेगळे प्रोव्हिजन केले आहे, तुम्हांला लिस्ट दिली आहे. त्यासाठी आम्ही वार्डमध्ये देण्याच्या पहीले जिथे पाणी भरले जाते तिथे पहीले लेबर लावून साफसफाई करण्यात यावी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** केणेजी मला वाटते की, मला जिथ पर्यंत माहीती आहे, संपुर्ण माहीती आली आहे, जिथे सर्वात जास्त समस्या आहे, तिथे पहीले लेबर लावून काम करून घ्या. मी एक निवेदन देतो की, ज्या पण नगरसेवकांना समस्या आहेत, आपातकालीन विभागाचा जो स्टाफ आपण बनवतो, त्यासाठी आपण आमच्या वार्डमधले लोक घेऊ.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** ते तर ऑल रेडी आम्ही घेतलेच आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** हे लेबर घेऊन आपण स्कॉट बनवा.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** मा. आयुक्त सर, याच्या दोन वर्षा पुर्वी....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** आता काय बोलायचे? संपुर्ण जबाबदारी कोणाची प्रशासन आणि आम्ही तुम्ही आम्हांला सांगायचे हे करायचे आहे, केले पाहीजे. सहा आणि पाच लेबर घेऊन त्यांना माहीती आहे की, साफसफाई होत नाही. तरी ऑल रेडी घेतलेले आहे, मग साफसफाई करायची कोणी साफसफाई करायची कोणी मग सांगायचे की लेबर नाहीत, ही आताची परिस्थिती आहे, ही अल्टीमेटली जबाबदारी कोणाची आहे,

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** आपातकालिनचे लेबर घ्या.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** ठिक आहे ना आपातकालिनची माणसे घ्या, पण वार्डामध्ये साफसफाई होते की नाही, हे बघण्याची जबाबदारी कोणाची आहे. फक्त आम्ही आपातकालिनसाठी स्कॉट तयार केला आहे. म्हणजे वार्ड बोंबलला तर चालतील. ही जबाबदारी अल्टीमेटली कोणाची आहे, नगरसेवकांची आहे किंवा नागरीकांची आहे का? प्रशासनाने स्थायी समितीला आणि जनरल बॉडीला मदत करायची आहे. लोकांना उत्कृष्ठ सेवा दिली पाहीजे, हे महापालिकेचे काम आहे, हे अधिका—यांचे काम आहे. याच्यमध्ये त्यांनी सांगितले की, आम्हांला काहीच नको तरी आम्ही तुम्हांला देतो विषय संपला. एक पण रूपया खर्च न करता करा, पण ते करा ना? फक्त नंतर हात वर करायचे का तर लेबर नाहीत. मी एक उदाहरण सांगितले पाटोलचे आम्ही सगळयांनी सांगितले होणार नाही. तुम्हांला आता किती पाहीजे, काय प्रोव्हिजन करायचे ते सांगा? तेव्हा म्हणाले होईल झाले. अधिकारी, इंजिनियर बाजूला बसले ठेकेदाराने हात वर केले बोंबलला काम, गणपती गेले सर्व सण उत्सव गेले त्यामध्ये महापालिकेच नाव बदनाम झाले.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** आता फेब्रुवारीला काम चालू झाले.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** आता तरी करत आहेत, पावसाच्या पहीले झाले पाहीजेत.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** आठ दिवसापासून बंद आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** ६ कोटींचे पाटोलचे काम ८ कोटींवर गेले.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** पाटोल्समध्ये एक इश्यु आहे, तुम्ही डॉलफिनवाला रोड बनवलाकृ

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** ते जाऊ दया, आता हा महत्वाचा विषय आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** साहेब, हा कनेक्टेड विषय आहे, डॉलफिनचा रोड बनवला, त्याच्याच जवळ काकाचा ढाबा आहे, ड्रेन आहे, तो ओवरफुल आहे, त्याचे पाणी रोडवर येत आहे, त्यामुळे रोडवर खड्डे पडत आहेत. त्या

दिवशी मी पवार साहेबांना फोन केला, पवार साहेबांनी सांगितले की, पुढे नाली बंद आहे. नाली बंद आहे, तर नाली बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि सॅनेटरी विभाग आपआपसात कॉडीनेट करा, आताच रोड बनवला आहे. मी तुम्हांला जाऊन दाखवू शकतो.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** आताच १० मिनीट पहीले शिवाजी चौक इथे काम चालू होते, कोणी बघितले असेल तिथे लिकेज चालू आहे आणि तिथे डांबरीकरणाचे काम चालू आहे, आताच अर्धा तास पहीले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोणी असतील तर उत्तर देवू शकतात.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** सांगायचे तात्पर्य एवढेच आहे की, साफसफाई झाली पाहीजे नाली असोत किंवा गटारे असतील हे जर होत असतील तर जबाबदारी त्यांनी घ्यावी. आमचे बोलायचे गरज नाही, कुठे पाठवायचे आहे, आम्ही हस्तक्षेप करणार नाही. जे काही चार मजूर किंवा दोन मजुर देतील त्याचमध्ये करायचे आहे. नगरसेवक जे नाले देतील ते करायचे आहेत, या पावसाळयापुर्वी सर्व कामे संपली पाहीजेत. ही जबाबदारी प्रशासनाने घ्यावी, त्यांनी सांगावे जास्त मजूर घेण्याची गरज नाही, विषय संपला.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** एक मिनीट हा केणेजी दुसरी एक गोष्ट आहे, राधास्वामी हॉल पासून ते अशोकनगर पर्यंत या दहा बारा वर्षामध्ये पंधरा घरे अशी बनली आहेत की, ते नाल्यावर बांधली आहेत, संतोषनगर आहे, पवार साहेब, तिथल्या रहिवाशांची पण आपल्याकडे तक्रार आहे. तुमच्याकडे आले होते, आज तीन चार वर्ष त्यांच्या घरा खालून साफसफाई करू शकलो नाही, त्यांच्यासाठी पण काही तरी करा.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** तिथे अनाधिकृत बांधकाम झाले आहे, ते तोडायला लागेल. नागरीकांनी बांधकाम केल आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मग ते तोडायला पाहीजेत.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** मागच्या वर्षी पण हे झाले होते, तेव्हा श्री.मनिष हिवरेजी वार्ड ऑफिसर होते, तेव्हा सिरवानी साहेब व्हिजीट करायला आले होते,

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** आता पण तसेच्या तसेच आहे, साफसफाई करू शकत नाही. मोठा नाला आहे, आपल्याला तोडल्या शिवाय पर्याय नाही, १० घरांमुळे ४०० ते ५०० घरांमध्ये पाणी भरेल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** सरळ तोडून टाका.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** त्यांना नोटीस देवून टाका आणि सध्या आपण आहेत तेवढयातच करा, जर आपल्याला वाटले तर आपण जास्त मॅन पावर लावू शकतो, त्यामध्ये काही इश्यु नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** केणेजी आम्ही सर्व संमतीने पास करीत आहेत, मागच्या वर्षी जिथे जिथे मागच्या वर्षी समस्या निर्माण झाली होती, हे इतिवृत्तात पण नोंद करा, तिथे सर्वात पहीले मजूर लावून काम करून घ्या आणि दुसरी गोष्ट म्हणजे यामधूनच इमरजेन्सी स्कॉट तयार करा आणि कारण की, आपण प्रत्येक दिवस त्यांना पगार देणार आहेत. आमच्या वार्डमधले लोक घेऊन समस्या निर्माण करू नका.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** यामध्ये काय होते, ते मी तुम्हांला सांगतो, मागच्या वर्षी असेच ठेकेदारीवर घेऊन तिथे ठेवले होते, परंतु त्यांना एरिया काहीच माहीत राहत नाही आणि कुठलीही नाली माहीत राहत नाही. फिप्टी फिप्टी करावे लागेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** तुमचे मुकादम आहेत ना? आपण एक मुकादम ठेवा, माझ्या वार्डचा एक लेबर ठेवू आणि त्याला चार नंबरमध्ये पाठवले तर त्याला कोणती एरिया माहीत आहे. त्याला तिथला एरिया माहीतच नाही, त्यासाठी त्या एरियाचा मुकादम असेल त्यांना फोन करा आणि त्वरीत टीम पाठवून दया, आमच्या वार्डचे लेबर घेऊ नका, आमच्या वार्डमध्ये खुपच समस्या आहेत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** इमरजन्सी स्कॉट आपण एक तयार करून कायम स्वरूपी ठेवू आणि तो सगळीकडे पाठवायचा जिकडे महत्वाचे आहे, तिकडे इमरजेन्सी स्कॉट पाठवायचा.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** आपल्याकडे मुख्यालयात एक आहे आणि चार प्रभाग समिती निहाय चार आहेत. इथे जवळ पास १० लेबर असतात.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** नेटकेजीने कसे केले आहे? किती चांगले काम केले आहे?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** तेच आहेत, फक्त सफाई कामगार आपले असतात. जर यांचे म्हणणे असेल तर आपल्याला याच्यातून देता येईल, असे काही नाही.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** इमरजेन्सीवाले काय आहे? माहीत आहे का? ते नुसते बसून राहतात जेव्हा इमरजेन्सी येईल तेव्हाच त्यांचा वापर होतो मग त्यांना नुसते बसून ठेवायचे का आपण? त्यांना आपल्याला निव्वळ बसवून पण ठेवता येणार नाही, त्यांना आपल्याला काम दयावे लागेल.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** सर ते मेन म्हणजे तीन पाळीमध्ये लावावे लागतात.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** जेव्हा पावसाळयात झाडे पडतात, तेव्हाच इमरजेन्सीवाले कामात येतात.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** त्याला मग काही इलाज नाही, त्यामुळे त्यांची जास्त संख्या पण वाढवता येत नाही, खुप वाढवून ठेवायची मग नंतर त्यांच्यावर प्रश्न निर्माण होतात की, हे लोक नुसते बसूनच आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** इमरजेन्सीवाले एका प्रभाग समितीचे दुसरीकडे पण पाठवू शकतो, नेटकेजी खुप चांगले काम करतात.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** इमरजेन्सीचे आपण इकडे, तिकडे देवू शकतो.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** फक्त नाईटला प्रॉब्लेम होतो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** रात्रीच्या वेळेस फायर ब्रिगेड तर आहे. समजा झाड पडले तर अग्निशमन दलाकडे झाड कापण्यासाठी इलेक्ट्रॉनिक आरडी आहे, वैगेरे सर्व यंत्रणा आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** अग्निशमन दलाचे लोक करू शकतात, हे लोक करू शकत नाही, परंतु हे लोक त्याच्या सपोर्टसाठी आहेत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** सपोर्टसाठी गरजेचे आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** दुसरे म्हणजे बॅरेक नंबर १४४ आणि बॅरेक नंबर १३१ यांची नोंद करा, हे मी नाले साफसफाईसाठी बोलत आहे. तिथे जेसीबी जात नाही किंवा पाठवत नाही, काही तरी इश्यु असेल, जर तिथे छोटासा जेसीबी पाठवला तर खुप चांगले होईल. नाला व्यवस्थित साफ होत नाही.

**प्र मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** ठिक आहे, होऊन जाईल.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** राधास्वामी हॉल ते संतोषनगर..

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** बॅरेक नंबर १३७ मॅन्युअल आहे का?

**प्र मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** मॅन्युअल जेवढे होईल तेवढे करू तिथे अनाधिकृत बांधकाम आहे, ते जो पर्यंत तोडणार नाहीत, तो पर्यंत इश्यु आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** टोनीजी साहेबांना सांगा, साहेब यांचा एक विषय आहे, नाल्यावर अनाधिकृत बांधकाम झालेले आहे आणि ते अनाधिकृत बांधकाम, अनाधिकृत विभागाने काढले पाहीजे, प्रभाग अधिका—याने काढले पाहीजे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** हे कुठे झाले आहे?

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** तीन नंबर प्रभागामध्ये आहे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** कुठल्या नाल्यावर अनाधिकृत बांधकाम झालेले आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** संतोषनगरमध्ये १० ते १२ खोल्या आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** तुम्ही तशी तक्रार दिली का त्यांना.

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** सर संतोषनगर एरिया आहे, तिथे मी पाहणी केली आहे, जवळ जवळ १२ ते १५ वर्षे ती घर अनाधिकृतपणे बांधली आहेत आणि नाल्यावर त्यांनी कोणी रूम बांधल्या आहेत, कोणी बाथरूम बांधले आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** वाढीव बांधकाम केले आहे ना?

**प्र.सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरे:—** वाढीव काम असे नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** त्यांचे पुर्वी घर होते, पण वाढवून बांधकाम केले आहे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** नाल्यावरचा पोर्सन काढून टाका.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** त्याच्यामुळे पाणी भरते.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** त्यांना नोटीस देवून टाका की, तुमचे नाल्यावरती अनाधिकृत बांधकाम झाले आहे, तुम्ही स्वत:हून काढून टाका, नाही तर तुम्ही काढून टाका.

**महापालिका सचिव:—** ठराव वाचते

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** आणि हे तातडीने, लवकरात लवकर चालू करा, आधीच उशिर झाला आहे.

**प्र मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** सर ऑल रेडी मशिनरी पण तयार आहेत, मॅन पावर पण रेडी आहे, उद्या पासून सुरू होईल.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** तुम्हांला लेबर फिक्स आहेत, नाली सफाई झाली पाहीजे हे महत्वाचे आहे.

**महापालिका सचिव:— ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रोक्लेन व जेसिबी मशिनद्वारे मोठया/छोटया नाल्याची सफाई करणे व तसेच मनुष्यबळाद्वारे शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ याची डंपरद्वारे वाहतुक डंपिंग ग्राऊंडवर करणेबाबतच्या पावसाळयापुर्वी व वार्षिक कामाच्या प्रस्तावास वित्तीय मान्यता व न्युनतम दराच्या निविदाकार मे. शुभम कंन्स्ट्रक्शन उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.**

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास...

**प्र मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** सर खरे तर ठराव झाल्या नंतर ॲग्रीमेंट ही प्रोसेस करावी लागते. त्याला दोन दिवस लागतात, तत्कालीन काम आहे, म्हणून स्थायी समितीच्या मान्यतेने उद्या पासून सुरूवात करण्यात येईल.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** मशनरी कुठे ठेवल्या आहेत.

**प्र मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** सर व्हॉईट हाऊस ४४४ ला एक मशिन उतरवली आहे आणि सि. एच.एम.कॉलेज जवळ एक मशिन उतरवली आहे. उद्या मा. महापौर, मा. सर्व पदाधिकारी यांना बोलावून उदघाटन करून काम सुरू करता येईल.

**काही सदस्य :—**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :—प्रोक्लेन व जेसिबी मशिनद्वारे मोठया/छोटया नाल्याची सफाई करणे व तसेच मनुष्यबळाद्वारे शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ याची डंपरद्वारे वाहतुक डंपिंग ग्राऊंडवर करणेबाबतच्या पावसाळयापुर्वी व वार्षिक कामाच्या प्रस्तावास वित्तीय मान्यता व न्युनतम दराच्या निविदाकार मे. शुभम कंन्स्ट्रक्शन उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता मिळणे.**

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिका आरोग्य विभागाकडून पासवाळयापुर्वी व तद्नंतर आवश्यकतेनुसार पोक्लेन व जेसिबी मशिनद्वारे मोठया/छोटया नाल्याची सफाई करणे व मनुष्यबळाद्वारे शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ यांची डंपरद्वारे वाहतूक डंपिंग ग्राऊंडवर करणेबाबतचे वार्षिक कामासाठी दै. वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साईटवर व ई—निविदाद्वारे निविदा क्र. १५१७ नुसार निविदा मागवण्यात आल्या होत्या. दिनांक २७/०४/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता निविदा समिती व निविदाकार यांच्या समक्ष पहिला तांत्रिक लिफाफा (Technical bit) उघडण्यात आले आहे. त्यानुसार खालिल ३ निविदाकांराची निविदा प्राप्त झाल्या आहे.

१. मेसर्स शंकर ट्रेडर, कल्याण,
२. मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर,
३. मेसर्स देवीचंद लक्ष्मण चव्हाण, कल्याण,

प्राप्त निविदाकारांनी त्यांच्याकडील अपलोड केलेल्या ऑनलाईन दस्तऐवज ची तपासणी केली असता मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर व मेसर्स देवीचंद लक्ष्मण चव्हाण, कल्याण, यांनी दिलेल्या पुर्ण कागदपत्राची निविदेतील अटी नुसार पुर्ण दस्तऐवजची पुर्तता केली आहे. मेसर्स शंकर ट्रेडर, यांनी निविदेतील अटी व शर्ती नूसार कागदपत्रांची पुर्तता केली नाही.

तरी प्राप्त तिन निविदाकारां पैकी मेसर्स शंकर ट्रेडर, कल्याण यांनी Mandatory Condition ची पूर्तता केलेली नाही व मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर व मेसर्स देवीचंद लक्ष्मण चव्हाण, कल्याण यांनी Mandatory Condition ची पूर्तता केलेली आहे. परंतु निविदा उघडत्यावेळी निविदाकार यांनी (original Document) मुळ कागदपत्र घेऊन निविदा समिती समोर उपस्थित राहणे आवश्यक होते. तसेच मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर व मेसर्स देवीचंद लक्ष्मण चव्हाण, कल्याण यांनी सादर केलेले कागदपत्र प्राधिकृत अधिकाऱ्याकडून प्रमाणित किंवा स्वप्रमाणीत करून सादर केलेले नसल्याणे सदरची कागदपत्रे पडताळणी करीता (original Document) मूळ कागदपत्र घेऊन निविदा समिती समोर दिनांक ०२/०५/२०१८ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता उपस्थित राहण्याचे निविदा समिती सदस्य यांनी निर्देश दिले होते. त्यानुसार (original Document) मुळ कागदपत्रासह उपस्थित राहण्याकरीता मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर व मेसर्स देवीचंद लक्ष्मण चव्हाण, कल्याण यांना जा. क्र. उमपा/आवि/उप—आ/२५/२०१८, दि. २७/०४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे सदर दिवशी सदर वेळेत मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांनी (original Document) मुळ कागदपत्र निविदा समिती समोर सादर केले तसेच मेसर्स देवीचंद लक्ष्मण चव्हाण, कल्याण यांनी मुळ कागदपत्रे (original Document) सादर न करता दिनांक ०२/०५/२०१८ रोजी इकडील कार्यालयास पत्र सादर केले आहे, सदर पत्रानूसार त्यांच्याकडे असलेले निविदेसाठी आवश्यक कागदपत्रे गहाळ झाली असून सदरची कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ असल्याचे व पावसाळयापुर्वीचे इतक्या कमी वेळात सदरचे काम समाधानकारक करू शकत नसल्याने आमच्या निविदेचा विचार करू नये असे पत्रात नमूद केले होते.

मा. आयुक्त सो., यांचे निर्देशानुसार संबंधित दोन्ही निविदाकारांना दि. ८/५/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता मा. आयुक्त सो., यांच्या दालनात बोलविण्यात आले. सदर बैठकीत मा. आयुक्त सो., यांनी मे. देविचंद लक्ष्मण चव्हाण या निविदाकारास दोन दिवसांत निविदेतील आवश्यक असलेली मुळ कागदपत्रे घेऊन हजर राहण्याचे निर्देश दिले, मूळ कागदपत्रांसह हजर न राहिल्यास संबंधीत निविदाकाराची बयाना रक्कम रू. २,५०,०००/— (रूपये दोन लाख पन्नास हजार मात्र) जप्त करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार जा.क्र.उमपा/आवि/उप—आ/३१/२०१८, दि. ०८/०५/२०१८ अन्वये संदर्भीय पत्रान्वये कळविले होते. मात्र मे. देविचंद लक्ष्मण चव्हाण, कल्याण हे दिनांक १०/०५/२०१८ रोजी मूळ कागदपत्रासह इकडील कार्यालयास उपस्थित न राहिल्याने मा. आयुक्त सो., यांनी दिलेल्या निर्देशान्वये निविदाकाराची बयाना रक्कम रू. २,५०,०००/— मात्र जप्त करण्याची कार्यवाही करण्यात आली व आता मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर हे एकच निविदाकार निविदेतील अटी व शर्ती नुसार पात्र ठरत आहेत. त्याअनुषंगाने मा. आयुक्त सो., व निविदा समिती यांनी मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांचा दुसरा लिफाफा (Commercial Bid) दिनांक ११/०५/२०१८ रोजी दुपारी १२.१५ वाजता उघडण्यास मान्यता दिली. व त्यानुसार समितीने घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक ११/०५/२०१८ रोजी दुपारी १२.१५ वाजता मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन यांची ई—निविदा आर्थिक बाब (Commerical Bid) उघडण्यात आली.

मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांची प्राप्त निविदा आर्थिक बाब (Commerical Bid) उघडण्यात आली असुन त्यांनी सादर केलेले दराच्या तपशील खालिल प्रमाणे आहे.

| Sr. No | Particulars | Hrs/Nos | Price per unit | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Poclain CK/LC70/80/90 EX- 100/200 or equivalent –(With bucket) | 1750 Hrs. | 2750/- | 4812500/- |
| 2 | Excavator Loader (JCB 3D) or equivalent with front bucket and back hoe. | 1490 Hrs. | 1550/- | 2309500/- |
| 3 | Providing Dumper/Truck for Disposal of Sludge/Garbage | 4320 Hrs. | 732/- | 3162240/- |
| 4 | Unskilled Labour | 25000 Nos. | 800/- | 20000000/- |
| | **Total** | | | **3,02,84,240/-** |

तरी उक्त मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांनी सादर केलेल्या दरानूसार एकत्रित किमान रू. ३,०२,८४,२४०/— खर्च हा अंदाजीत प्राकलन रक्कम रू. २,४८,८७,०००/— पेक्षा जास्त आहे. म्हणजेच अंदाजीत प्राकलनाच्या २१.६८% (रू. ५३,९७,२४०/—) जास्त दर प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर निविदाकार यांना वाटाघाटीसाठी बोलविण्याचे निविदा समितीने निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांना वाटाघाटीसाठी जा. क्र.उमपा/आवि/उप.आ/३६/१८ दि. ११/०५/२०१८ रोजी अन्वये दिनांक ११/०५/२०१८ रोजी दुपारी ३:०० वाजता मा. उपायुक्त (आरोग्य/मुख्यालय) यांच्या दालनात वाटाघाटीसाठी बोलवण्यात आले. त्यानुसार मा. निविदा समिती अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली सर्व निविदा समिती सदस्य यांच्या उपस्थितीत मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांनी सादर केलेल्या दराबाबत वाटाघाटी केली.

वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तपशील खालीप्रमाणे आहेत.

| **No.** | **Particulars** | **Hrs/Nos Total** | **Price per unit** | **After Negotiation Rate Rs.** | **Total Amount** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Poclain CK/LC70/80/90 EX- 100/200 or equivalent –(With bucket) | 1750 Hrs. | 2750/- | 2725/- | 4768750/- |
| 2 | Excavator Loader (JCB 3D) or equivalent with front bucket and back hoe. | 1490 Hrs. | 1550/- | 1210/- | 1802900/- |
| 3 | Providing Dumper/Truck for Disposal of Sludge/Garbage | 4320 Hrs. | 732/- | 675/- | 2916000/- |
| 4 | Unskilled Labour | 25000 Nos. | 800/- | 750/- | 18750000/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **Total** | | | | **2,82,37,650/-** |

उक्त नमुद वाटाघाटी अंती मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांनी सादर केलेल्या दरानूसार एकत्रित किमान रू. २,८२,३७,६५०/— खर्च अंदाजीत प्राकलन रक्कम रू. २,४८,८७,०००/— पेक्षा जास्त आहे. म्हणजेच अंदाजीत प्राकलनाच्या रक्कमे पेक्षा १३% जास्त असल्याने सदर निविदाकार यांना पुनश्च वाटाघाटीसाठी मा. आयुक्त सो, यांच्या दालनात बोलविण्याचे निविदा समिती अध्यक्ष व निविदा समिती सदस्य यांनी निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांना जा.क्र. /उमपा/आवि/३७/२०१८, दि. १४/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये पुनश्च वाटाघाटीसाठी मा. आयुक्त सो., यांच्या दालनात दिनांक १४/०५/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता निविदा समिती अध्यक्ष व निविदा समिती सदस्य यांच्या उपस्थितीत बोलविण्यात आले.

मे. शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांनी सादर केलेल्या दराबाबत वाटाघाटी केली.

प्रथम वाटाघाटीअंती व दुसऱ्यांदा वाटाघाटीअंती प्राप्त दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Particulars | Hrs/Nos Total | Estimate cost (Rs.) | Price per unit (Bid Offer) | First Negotiation Rate ( Rs.) | Second Negotiation Rate (Rs.) | Total Expediture (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Poclain CK/LC70/80/90 EX-100/200 or equivalent –(With bucket) | 1750 Hrs. | 2450/- | 2750/- | 2725/- | 2700/- | 4725000/- |
| 2 | Excavator Loader (JCB 3D) or equivalent with front bucket and back hoe. | 1490 Hrs. | 1050/- | 1550/- | 1210/- | 1160/- | 1728400/- |
| 3 | Providing Dumper/Truck for Disposal of Sludge/Garbage | 4320 Hrs. | 500/- | 732/- | 675/- | 600/- | 2592000/- |
| 4 | Unskilled Labour | 25000 Nos. | 675/- | 800/- | 750/- | 750/- | 18750000/- |
| | **Total** | | | | | | **2,77,95,400/-** |

उक्त नमुद शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ यांची डंपरद्वारे वाहतूक डंपिंग ग्राऊंडवर करण्याबाबत मशिनरी व मनुष्यबळ पुरवठा करण्याकामी त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा नुसार रू २,७७,९५,४००/— ( रुपये दोन करोड सत्त्यातर लाख पंच्चानऊ हजार चारशे मात्र) खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन २०१८—१९ च्या लेखाशिर्षक ड (iv) नाला व गटार सफाई खर्च या लेखाशिर्षकातील तरतूदीतून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

तरी सदरच्या खर्चास व तसेच उक्त कामासाठी न्युनतम दर सादर करणा—या निविदाकार मेसर्स शुभम कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करीता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ९** **दिनांकः—१८/५/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

**ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रोक्लेन व जेसिबी मशिनद्वारे मोठया/छोटया नाल्याची सफाई करणे व तसेच मनुष्यबळाद्वारे शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ याची डंपरद्वारे वाहतुक डंपिंग ग्राऊंडवर करणेबाबतच्या पावसाळयापुर्वी व वार्षिक कामाच्या प्रस्तावास वित्तीय मान्यता व न्युनतम दराच्या निविदाकार मे. शुभम कंन्स्ट्रक्शन उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.**

**या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.**

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** हा विषय संपला आहे, दुसरा विषय आहे, पॉईंट ऑफ ऑर्डरने, आपल्याकडे सार्वजनिक बांधकामाद्वारे रस्त्यांची कामे चालु आहेत, काही झाले आहेत. आता कल्याणला गेल्या नंतर नविन रस्ते झाल्यावर झेब्रा क्रॉसिंग, कलर पेटींग, लाईटींग हे सगळे आहे, आपल्याकडे का नाही? आता श्रीरामचा जो रस्ता आहे, तो पुर्ण झाला आहे, पण असाच सोडून दिला आहे. व्हाईट पटा नाही काही नाही, सगळी प्रोव्हिजन असतांना का होत नाही. एवढे एस्टिमेट मंजूर आहेत, रस्त्यांसाठी ७५ लाखाचा निधी आहे, त्याच्यामध्ये सगळी तरतुद आहे का होत नाही? व्हि.टी.सी. चा रोड तुम्ही बघून आले आहेत, का होत नाही? आता पाटोलचे काम किती महीन्या पासून चालू आहे? आता पाऊस कधी पण पडणार आहे, यांच्या हातामध्ये आहे का? पुन्हा डांबर टाकणार,पाऊस पडणार ठेकेदार म्हणेल पाऊसामुळे वाहून गेले.

**प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानी:–** सर प्रभाग १ मध्ये आजच्या तारखेला झेब्रा पेटींगचे काम चालू आहे आणि प्रभाग समिती २ चे पुर्ण झाले आहे. फॉलवर लाईन, नेहरू चौकचे काम चालू आहे आणि श्रीरामचे जे आपण बोलत आहेत, ते पण काम चालू होणार आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** ठेकेदाराचा कार्यकाळ संपला आहे ना?

**प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानी:–** सर एकच एजेन्सी आहे, ते श्रीराम येथे पण येईल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** दोन नंबरचा हॉस्पिटलचा जो रोड बनवला आहे, त्याच्या मधल्या डिव्हाईडरला अजुन पर्यंत कलर मारला नाही.

**प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानी:–** तो होऊन जाईल.

**महापालिका सचिव:–** हा विषय नाही, इतिवृत्तात येणार नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलू शकतो ना मॅडम.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** इतिवृत्तात येईल ना.

**प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानी:–** सर प्रभाग तीनमध्ये पण काम होईल. आपण जे बोलत आहेत, श्रीराम व काजोल पेट्रोल पंप इथे पण करणार आहोत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** आता काम बंद आहे,

**प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानी:–** नाही,चालू आहे, सर.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** तो ठेकेदार वेगळा आहे आणि हा ठेकेदार वेगळा आहे.

**प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानी:–** दुस–या एजेन्सीला सांगतो सर.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** कल्याण गेल्या नंतर मी योगीधामचा रोड काल बघितला प्रसन्न वाटते.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:–** बरोबर आहे, प्रसन्न वाटते.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** नविन रोड तयार झाले आहेत, ते पुर्ण...

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** तुम्हांला मी डेड लाईन दिली होती की, ३० तारखे पर्यंत सर्व कामे झाली पाहीजेत. आता तुमच्याकडे वेळ फार कमी आहे, पंधरा दिवसापेक्षा कमी वेळ आहे, म्हणजे १२ ते १३ दिवसच राहीले आहेत. मग १२, १३ दिवसामध्ये सिल वर्क कम्पलिट करायचे, पेंटींग वैगेरे करायचे आहेत, हे जे झेब्रा क्रॉसिंग करायचे आहे, ते पण काम पुर्ण करायचे आहे, ३० तारखे पर्यंत तुम्हांला वेळ दिला आहे, तुम्ही ठेकेदाराला सांगितले आहे का?

**<u>प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानी:—</u>** ठेकेदाराला बोललो आहे.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** नोटीस दिली का त्याला?

**<u>प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानी:—</u>** नोटीस नाही दिली, परंतु त्यांना मी ओरली सांगितले आहे, कसे पण पुर्ण करा?

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** संपुर्णपणे असे काम झाले तर महापालिकेचे नाव निघेल, आयुक्तांचे नाव निघेल, लोकप्रतिनिधींचे नाव निघते, ठेकेदाराचे नाव निघते, इथे तसे नाही. आज शहाड फाटकचा रोड किती वर्षापासून चालू आहे, काय त्याचे? काहीच नाही?

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** काम पुर्ण झाले की नाही.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** त्या रोडला थिगळे दिल्या सारखे वाटते, नविन आहे असे वाटत नाही, समाधानच मिळत नाही, म्हणजे करोडो रूपयाचा किती करोड रूपयाचा रोड आहे तो?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** २० करोड रूपयाचा आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** २० करोडचा खर्च करून तो असा गोधडयासारखे थिगळे लावल्या सारखे आहे.

**<u>प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानी:—</u>** सर त्यांना पण फायनली पत्र दिले आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>**पत्र दिले आहे, पण तुमची जबाबदारी आहे, लेटरमध्ये दम असायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** आज शहाड स्टेशन पासून पाई चालाल तरकृ

**<u>प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानी:—</u>** केले आहे, ते काम केले आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** एकाचे दुर्लक्ष झाले तर दुस—याने केले पाहीजे, पण काहीच नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** चोपडा कोर्टाच्या पहीले आणि चोपडा कोर्टाच्या नंतर मधला जो भाग आहे, तिथे इंटर लॉग लावायचे आहेत, आज पर्यंत ते इंटर लॉग तिथे गाडया फसतात आणि लोक पडतात, समजायला येत नाही की, तीन वर्ष झाली तरी रोडचे काम पुर्ण करू शकले नाहीत.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** तीन वर्षे झाली रस्त्याचे काम पुर्ण का होत नाही.

**<u>प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानी:—</u>** सर दहा, पंधरा दिवसामध्ये पुर्ण होऊन जाईल, देड लाईन दिली आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** आपल्यांना माहीत असेल की, जेव्हा निंबाळकर साहेब, स्थायी समितीमध्ये विभाग प्रमुखांच्या मिटींगमध्ये बसले होते आणि मिटींग पुर्ण झाली आणि संपुर्ण रोड आमच्या बरोबर फिरले तेव्हा त्यांना पण सांगितले होते की, साहेब, रोड तीन महीन्यामध्ये पुर्ण होईल.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** एका पण डिव्हाडरला पण कलर लावला नाही.

**<u>प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानी:—</u>** सर पंधरा दिवसामध्ये कसे पण पुर्ण करून देणार.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** दिवस, रात्रभर काम करा आता आणि मॅन पावर पण वाढवा, त्यांना सांगा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** शहाड ते कटकेश्वर मंदिरापासून ते उल्हासनगर महानगरपालिकेच्या रोडचा आम्ही महासभेमध्ये ठराव पास केला आहे की, तिथे स्ट्रिट लाईट लावायची आहे, सेंटरमध्ये आता पर्यंत एक पण खांब उभा केला नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** हे सगळे आपोआप झाले पाहीजे, हेच डिसीप्लीन आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** हे बघा, नेहरू चौक ते फॉलवर लाईन रोड, आपल्या ठरावाची काय गरज आहे? ६० फुट डिपीमध्ये ६० फुट बनला, डिव्हाडर लावले गेले तिथे तर आपण सेंटरमध्ये लाईट लावू शकतो ना?

**प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:–** सर ज्या वेळेला सार्वजनिक बांधकाम विभागाचे एस्टिमेट बनतात, त्याच वेळेला विद्युत विभागाचे बनले तर सोपे होऊन आता सगळे रस्ते बनल्या नंतर आम्हांला रस्त्यांची लांबी रूंदी काय आह आम्हांला माहीत नसते, आणि ते झाल्या नंतर आम्हांला पत्र येते की, लावा, त्यामुळे लाईट लावायला वेळ लागतो.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** वेळ लागतो आता तरी काम होईल का?

**प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:–** होऊन जाईल.

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:–** मिटींग संपली आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** नाही हे इतिवृत्तात घ्या, पॉईंट ऑफ ऑर्डरने बोलत आहे. तुम्ही म्हणजे खरात बोलतात काय, मग महापालिकेचे इंजिनियर आहेत, तुमचे समन्वय असले पाहीजे. एखादे एस्टिमेट बनवतांना. पाणी पुरवठा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत विभाग, आणि नगररचनाकार हे सगळे बसले पाहीजेत.

**प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:–** सर त्या वेळेला...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** सर हे प्रत्येक वेळेस असेच चालत आले आहे, आता ग्रीन स्पेसचा प्रोजेक्ट बनवला आहे, तिथे पाणी पुरवठा विभाग एस.टी.पी. चा प्लॉन करीत आहे आणि सार्वजनिक बांधकाम विभाग प्लॉन करीत आहे की, आम्ही तिथे ग्रीन स्पेस बनवेल दोन्हीचा स्केलेश झाले. पाणी पुरवठा विभाग एस.टी. पी. चा प्लॉन बनवत आहे आणि बाजुला सार्वजनिक विभाग ग्रीन स्पेशचा प्रोजेक्ट बनवत आहे, या दोघाचाही समन्वय नाही. दोन एस्टिमेट आजूबाजूने बनत आहेत, दोन्ही सिव्हल वर्क अमायमेंट केले तर आपले ५० टक्के कास्ट वाचतो

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:–** मा. सभापती महोदया, तो खेमानी नाल्याचा जो प्रोजेक्ट आहे, तो एनजीटीच्या ऑर्डर प्रमाणे सन २०१५ मध्ये ऑर्डर झाले होते, त्यामुळे टाईम ऑफ त्वरीत आपल्याला १५ एम.एल. डी.चा प्लॉन बनवण्याचे आश्वासन होते. त्या प्रमाणे १५ एम.एल.डी.चा प्लॉन शांतीनगरलाच प्रस्तावीत झालेला आहे आणि शांतीनगरला प्रस्ताव जाऊ सुरू झाल्या नंतर अमृत योजने अंतर्गत आपल्याला मंजुरी मिळाली सन २०१६ ला, अमृत योजने अंतर्गत उर्वरीत भागासाठी जो एरिया आहे. त्यासाठी स्ट्रिटमेंट बनवण्यासाठी कुठेच जागा नाही. ते पण शांतीनगरलाच घेण्यात आलेले आहे आणि जे नंतर टेंडर प्रक्रिया झाल्या नंतर तो खिलारी इन्फास्ट्रक्चरल अगोदर खेमानी नाल्याला होते आणि याला पण त्यांनीच भरलेले होत म्हणून त्यांना पण आम्ही विचारले होते की, दोनही एकत्रित करून दया, त्यांनी एकत्रित करून दिल्या प्रमाणे तसा प्रस्ताव दिला होता. पण महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि गव्हर्नमेंटने त्याला अप्रोल दिले नाही, त्यामुळे स्वातंत्रपणे आपल्याला बनवावे लागले.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** इश्यु ठेकेदाराचा नाही, इंक्ल्युमेंट एजेन्सी उल्हासनगर महानगरपालिका आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** एका डिपार्टमेंटने बनवले तिथे ग्रीन वेस्ट प्रोजेक्ट आणि दुस–या डिपार्टमेंटने तिथे बर दोन्ही फंड कुठले, केंद्र शासनाचे अमृत योजना, बनवतो कोण उल्हासनगर महानगरपालिका या दोन डिपार्टमेंटला आता कुठला तरी निधी तिथला कॅन्सल करावा लागणार आहे. यांनी जे सांगितले की, कुठलाही प्रोजेक्ट बनवतांना समन्वय असले पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** पहीले होता.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** इंडस्ट्रिकडून कनेक्शन तुम्हांला मिळाले का आता? किती दिवस झाले आज जोडणार आहे, उद्या जोडणार आहे.

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—** त्यांनी प्रमाणपत्र मागवून मी ते एसी ऑफिसला पाठवले आहे, मी सकाळी पण जाऊन आलो त्यांचे म्हणणे आहे की, आम्हांला अग्रीमेंट सगळे करून दिल्या नंतर रिलीज करणार आहेत दोन तास सप्लाय बंद करून त्यांनी मला परवा म्हणटले होते की, शुक्रवारी जोडून देतो.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** साहेब, या बाबतीत तुम्हांला पॉलिटीकल जे काही लागणार आहे, ते आम्ही सगळे करायला तयार आहेत

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** मला एक कळत नाही, मी रूजू झाल्या पासून खेमानीला पहीली भेट दिली होती. तेव्हा पासून आपल्याला इलेक्ट्रीक कनेक्शन घ्यायचे चालले आहे. सगळे तयार फक्त जोडायचे काम दिड महीना झाला, त्याला दोन महीने झाले.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** तुम्हांला पाहीजे तर विद्युत वितरण महामंडळाची मदत घ्या.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** विद्युत वितरण महामंडळवाले तुम्हांला जाणूनबुजून त्रास देत असतील तर आम्हांला सांगा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** साहेब, अशा भरपूर गोष्टी आहेत, आता हे दोन एसटीपी बाजूलाच आहेत. शांतीनगरचा, तर माझे म्हणणे असे आहे की, जर पाणी पुरवठा विभाग एखादा प्रोजेक्ट घेत असेल तर सार्वजनिक बांधकाम विभाग, पब्लिक हेल्थ हे महत्वाचे तीन चार डिपार्टमेंट आहेत, त्यांनी बसून कॉर्डिनेट केले पाहीजे की आपण कशा प्रकारे प्रोजेक्ट करणार आहेत, आपल्याला काय आयडीया आहे? काय सुचना आहेत, आणि यामध्ये बसून जास्त काय करू शकतो? टाईम, पास वेस्ट जायला नको?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** पुढच्या स्थायी समितीच्या मिटींगच्या अगोदर एक वेळ ठेवा, श्रीराम टॉकीजचा रोड जो सांगितलेला आहे, त्याच्यावर झेब्रा क्रॉसिंग झाली पाहीजे. कारण तो पुर्ण झालेला आहे, व्हि.टी.सी. चा रोड तो पण पुर्ण होत आहे. एकदम स्टॅंडर्ड असले पाहीजे. त्या नंतर तिथे मार्किंग, कलरींग किती झाले हे पुढच्या वेळेस असले पाहीजे. त्याच वेळेस पाटोलचे काम पुर्ण झाले पाहीजे. म्हणजे काय आहे, आले राज्याच्या मनात तसे ठेकेदाराचे झालेले आहे. मनात आले तेव्हा करणार, दोन दिवस करणार, दोन पाटोल झाले का काय करणार साहेब, आम्हीच उत्तरे ऐकायची का?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** हे बघा, पहील्या सभामध्ये बोलले होते की, सम्राट अशोकनगर येथे पाटोल भरायचे आहेत. सितलानी यांनी सांगितले की, साहेब, मी तीन दिवसात करून देतो, त्या दिवशी मशनरी गेली, एक डंपर गेला २५ टक्के काम केले आहे आणि काम बंद करून निघून गेले आहेत. साहेब माझा रोड संपला आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** साहेब, आता एकरोड चालू आहे, फॉलवर लाईन पासून ते नेहरू चौक तो ८० टक्केपेक्षा जास्त पुर्ण झाला आहे. परंतु जव्हार हॉटेल ते फॉलवर लाईन पर्यंत काम बंद केले आहे. लेंन्थ नाही रोड तर आपण फॉलवर लाईन पासून ते नेहरू चौक पर्यंत घेतला आहे. आता जो रोड घेणार आहेत, तो कुठून सुरूवात करणार आहेत, फॉलवर लाईन चौक पासून करणार का? आपण व्हिजीट करा.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** मी ऑल रेडी व्हिजीट केले आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** डिव्हाईडर फॉलवर लाईन कडून आणि रोड बंद आहे आणि तेथील लोक सभागृह नेता कार्यालयात येऊन आम्हांला ओरडत आहेत की, रोडचे काम का बंद केले आहे? फक्त २५ ते ३० मिटर काम राहीले आहे.

**कनिष्ठ अभियंता, श्री. संदिप जाधव:—** रोडची लेंन्थ १.२ किलो मिटर आहे, रोडचे एस्टिमेट आम्ही सात, साडेसात कोटी बनवले होते, त्या दरम्यान सर्व सदस्य बसले होते, तेव्हा सदस्यानी फिक्स केले अजून एक ॲडीशनल रोड घ्यायचा आहे, तर तो जिजामाताचा रोड घेतला होता. त्यामुळे मला त्या रोडचा एस्टीमेटमधून अमॉउंटच कट करून साडेपाच कोटी दिले होते. याच्यामध्ये जे लेंन्थ आहेत, तेवढे घेतले आहे. निंबाळकर साहेबांनी साईड व्हिजीट केले

होते. त्यांनी डिव्हीईडर पुर्ण घ्यायला सांगितले होते, त्यामुळे तो डिव्हाईडर पुर्ण घेतले. आता १०० मिटरचा जो आहे, ते काम करणे गरजेचे आहे, जर त्याला अमाउंट दिले तर मी एस्टिमेट बनवू शकतो.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** आमच्या फंडातून करा, कसे पण करा? पण पुर्ण करून दया. साहेब दुसरा एक आहे, बस स्टॉप उल्हासनगर—१ तो मुलभूत सुविधांचा आहे, ७५ लाख वर्क ऑर्डर दिली आहे. त्याची वर्क ऑर्डर देवून किती वर्षे झाली आहेत, एक वर्षे, सहा महीने झाले असतील किंवा तीन महीने झाले असतील आणि तो रोड ऑल रेडी आम्ही पाटोलचे काम करून पुर्ण केला आहे. तिथे काहीच काम राहीले नाही. तर मी काही दिवसापासून लोकेशन चेंज केला बस स्टॉप ते शिवसेना शाखा पर्यंत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** बस स्टॉप ते कुठ पर्यंत?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** बस स्टॉप ते शिवसेना शाखा पर्यंत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** दुसरा एक बस स्टॉप पासून तर बिर्ला मंदिर पर्यंत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** तो तर आहेच ना? आता हे ७५ लाखाचे मी किती तरी दिवसा पासून बोलत आहे की, बस स्टॉप पासून ते शिवसेना शाखा पर्यंत फक्त चेंज ऑफ लोकशन करून...

**प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानीः—** सर बस स्टॉपचा झोलेला आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** काल मा. श्री. उद्ववजी ठाकरे आले होते, त्यांच्या बरोबर वरिष्ठ नेता पण आले होते, ते शिवसेना शाखा येथे येणार होते. त्यांचे येणे चेंज झाले, नाही तर सर्व रोड तुटलेला, फुटलेला होता, माझे नाव खराब झाले असते.

**प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानीः—** सर उद्या, फेर सादर केले जाईल आणि आतला जो रस्ता आहे, तो चेंज ऑफ लोकेशन करून घेण्यात येईल.

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—** चेंज करून काम करून घ्या.

**प्र. उप अभियंता, श्री. जितू चौईथानीः—** सर काल त्याच्या बाबतीत चर्चा झाली आहे.

सायंकाळी ५.२० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

**(प्राजक्ता मि. कुलकर्णी)**
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

दिनांकः—७/७/२०१८

**दि. ७/७/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**४**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शनिवार दिनांक ७/७/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश वदारिया | सदस्य |
| ४ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ५ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| ६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ७ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ८ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| ९ | श्री. भगवान भालेराव | सदस्य |
| १० | श्रीमती मिनाकौर लबाना | सदस्या |
| ११ | श्रीमती रेखा ठाकुर | सदस्या |
| १२ | श्रीमती दिप्ती दुधानी | सदस्या |
| १३ | श्रीमती ज्योती बठिजा | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्या अनुपस्थित होत्या.

१. श्रीमती पंचम उमेश कालानी, २. श्रीमती पुष्पा नाना बागुल, ३. श्रीमती अंजना म्हस्के

खालील अधिकारी सभेस हजर होते.

५८.श्री. गणेश पाटील, आयुक्त
५९.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
६०.श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय
६१.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
६२.श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता, साबांवि
६३.डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी
६४.श्री. जितु चोईथानी, उप अभियंता, साबांवि
६५.श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
६६.श्री. भुषण पाटील, क. अभियंता
६७.श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
६८.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
६९.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
७०.श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
७१.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
७२.श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
७३.श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
७४.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
७५.श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख

७६.श्री. ताराचंद्र जेठा, प्र. कर निरिक्षक
७७.श्री. अनिल खतुरानी, प्र. कर निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. बाळु भांगरे

४. श्री. संतोष कोठरे

सांयकाळी ४.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ११/४/२०१८, ८/५/२०१८, १७/५/२०१८ (त्यात १८/५/२०१८), रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**पास करा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :—** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ११/४/२०१८, ८/५/२०१८, १७/५/२०१८ (त्यात १८/५/२०१८) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नांव : श्री. भगवान भालेराव

**स्थायी समिती ठराव क्र. :— ०९ अ** **दिनांक : ७/७/२०१८**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक ११/४/२०१८ पृष्ठ क्र. १ ते ३ पर्यंतचे, दिनांक ८/५/२०१८ पृष्ठ क्र. १ ते ४० पर्यंतचे, दिनांक १७/५/२०१८ (त्यात १८/५/२०१८) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्र. २ :–** तरणतलावाच्या दर्शनी बाजुस असलेली प्रेक्षकगॅलरी व त्यालगतची तळमजला अधिक दोन मजल्याची इमारत धोकादायक असुन वापरासाठी असुरक्षित असल्याने निष्कासन कारवाई करणेकामी लेखी नोटीस देणे.

---

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**कोण सांगते याबाबत.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**कोणी सिध्द केले आहे.

**श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक:–**स्ट्रक्चर ऑडिट केलेले आहे त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने, श्री. नाखवा म्हणुन आहेत, त्यांनी सर्टीफिकेट दिलेले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:–**पॅनवर जे स्ट्रक्चर ऑडिटवाले वाढवा कारण एकाची मनोपॉली होते.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**हा ठाण्याला असतो तो ब–याच वर्षापासुन आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**हा महापालिकेच्या इंटरेस्टने नाही तर स्वत:च्या इंटरेस्टनेच काम करतो.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**आणि खास करुन तो ठेकेदाराच्या इंटरेस्टनेच काम करतो. आताच मला असे वाटते दोन का जास्त वर्ष झाले सन २०१३–१४ मध्ये त्याने साईबलराम यांचे नाव दिले होते. तर ते लगेच कसे खराब झाले.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**मी स्वत: जावुन पाहिले आहे त्या इमारतीची परिस्थिती खुप खराब आहे व ती बंद करुन ठेवली आहे. ती कधीही पडु शकते. पुढे फक्त बोर्ड बनविला होता.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**हे काम कोणी केले.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**तरण तलावाचे ना?

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**त्याची दुरुस्ती झालीच नाही.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**त्यास फक्त बाहेरुन पॅक केले आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**यांनी तोडण्यास सांगीतले आहे दुरुस्तीसाठी नाही.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**जर तेथे ॲक्सीडंट वगैरे झाले तर त्याची जबाबदारी आपलीच. आहे. ते काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे नाही ना. मी मध्येच बोलतो सॉरी, श्री. सेलवनजी आयत्यावेळचा एक विषय होता, पाण्याचा टाकीचा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**नाही आयत्यावेळचा विषय जर आणायचा असेल तर सभेआधी प्रथम मंजुर करावा लागतो.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**काय विषय आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**मी विनंती करतो श्री. चौधरी साहेब कृपया, त्यात इलिगल कनेक्शन वगैरे आहे. १इंच व २ इंचाचे आपले अधिकारी कधी डिसकनेक्ट नाही करणार. ती टाकी भरण्यासाठी सहा सहा तास लागतात.

शिवाजी नगर, अयोध्या नगर, अशोक नगर, आनंद नगर पंपींग स्टेशन येथे सकाळी ७.०० वाजता पाहिले. हा एकच विषय आहे आयत्यावेळी.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**आमचा असा काही विषय आला तर घेतला पाहिजे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**गोषवारा वगैरे तयार आहे तर मला असे वाटते सभा सुरु होण्यापुर्वी स्थायी समितीमध्ये यायला पाहिजे होता हा विषय. श्री. सेलवनजी सांगणार काय?

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**चार दिवसात सभा लावा, आम्ही घेतो विषय, आम्ही करायला तयार आहोत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**ठिक आहे, विषयच नाही तर श्री. सेलवन साहेब काही बोलतच नाही नंतर घेवु या हा विषय. आता हा विषय पारीत करा, इतिवृत्ताची वाट न पाहता.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—** तरणतलावाच्या दर्शनी बाजुस असलेली प्रेक्षकगॅलरी व त्यालगतची तळमजला अधिक दोन मजल्याची इमारत धोकादायक असुन वापरासाठी असुरक्षित असल्याने निष्कासन कारवाई करणेकामी लेखी नोटीस देणे.

**प्रस्तावना**

महापालिकेच्या तरणतलावासमोरील महापालिकेने बांधलेल्या स्ट्रक्चर स्टॅबिलीटीबाबत सार्व. बांधकाम विभागाकडून अहवाल मागविला असता सदरहु इमारत अतिधोकादायक असल्याचे महापालिकेने नियुक्त केलेल्या मे. अनिरूध्द् नाखवा, स्थापत्य सल्लागार यांनी त्यांचेकडील दिनांक ११/४/२०१७ रोजीच्या (condition survey report) Interim) अंतरीम अहवाल सादर केला आहे. त्यानुसार सार्व. बांधकाम विभागाने तरणतलावाच्या दर्शनी बाजूस असलेली संपुर्ण इमारत अतिधोकादायक असल्याचे घोषित केले आहे.

मा. महासभा ठराव क्र. ३४, दिनांक २६/८/२०१४ अन्वये तरणतलावाचे नुतनीकरण व त्यालगतची जागा विकसित करणेकरीता बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर ३० वर्षासाठी दिलेल्या मान्यतेनुसार मे. विराट अंबे स्पोटर्स क्लब प्रा. लि. कंपनी यांना दिनांक ७/२/२०१५ अन्वये कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यांच्यासोबत केलेल्या करारनाम्यातील अट क्र. ३ नुसार कंपनीने प्रकल्पास मंजुरी मिळाल्यापासुन १ वर्षाच्या आंत प्रकल्प पुर्ण करावयाचा आहे असे नमुद आहे. तथापि, नगररचना विभागाकडून सदर प्रकल्पाचे बांधकाम सुरू करण्यासाठी दिनांक १/८/२०१५ रोजीच्या बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रान्वये परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना कार्यादेश दिल्यावर सहा महिन्याच्या कालावधीनंतर बांधकाम परवानगी देण्यात आली असल्याने प्रत्यक्ष काम सुरू करणेस त्यांना विलंब झाला असल्याने करारनाम्यातील उक्त अटीनुसार १ वर्षाच्या आंत त्यांना बांधकाम पुर्ण करणे शक्य झाले नाही. सदर मुदत संपण्यापुर्वी कंपनीने प्रकल्प पुर्ण करणेसाठी मुदतवाढीकरीता दिनांक २०/७/२०१६ रोजी केलेल्या विनंती अर्जानुसार त्यांना दिनांक २८/९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ३१/३/२०१७ पर्यंत ८ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढीचा कालावधीही संपुष्ठात आलेला आहे. मे. विराट अंबे स्पोटर्स क्लब प्रा. लि. यांनी तरणतलावाचे काम पुर्ण करून माहे ऑक्टोंबर २०१७ मध्ये नागरीकांसाठी खुला करावयाचा आहे असे कळविले असता त्यांनी केलेल्या कामाची पाहणी करीत असता तरणतलावाच्या दर्शनी भागावर असलेली महापालिकेची दोन मजले इमारत ज्यामध्ये तरणतलावाचे बुकिंग कार्यालय, प्रेक्षक गॅलरी व चेंजिग रूम व इतर कार्यालये आहेत त्या इमारतीचा तळमजल्याचे सिलींग

कोसळण्याच्या स्थितीत दिसले याकारणास्तव मा. आयुक्त सो. यांचे निर्देशानुसार सार्व. बांधकाम विभागाकडून सदर इमारतीबाबत प्रमाणपत्र मागविण्यात आले.

सार्व. बांधकाम विभागाने त्यांचेमार्फत नियुक्त स्थापत्य सल्लागार मे. मे. अनिरूध्द् नाखवा, यांचेकडून सदर इमारतीची पहाणी करून अहवाल मागविला असता त्यांनी त्यांचेकडील दिनांक ११/४/२०१७ रोजीच्या (condition survey report) Interim) अंतरीम अहवाल सादर केला असुन त्यामध्ये तरणतलावाच्या दर्शनी बाजूस असलेली संपुर्ण इमारत धोकादायक असल्याचे घोषित केले आहे.

तरणतलाव व कंपनीमार्फत देण्यात येणा—या अन्य सुविधांचा लाभ घेण्याकरीता नागरीकांना/सभासदांना प्रवेश करण्याचा मार्ग सदर धोकादायक इमारतीतून आहे. सदरची इमारत धोकादायक असल्याने केव्हाही कोसळून जिवीत किंवा वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरची इमारत निष्कासित करणे उचित वाटते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४ (१) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद आहे. ''कोणतेही बांधकाम मोडकळीस आलेले आहे किंवा पडण्यासारखे आहे किंवा त्यापसून अशा बांधकामाच्या किंवा त्याच्या शेजारच्या कोणत्याही बांधकामाचा किंवा जागेचा भोगवटा करणा—या किंवा तीत जाणा—या येणा—यास किंवा जवळून जाणा—या कोणत्याही बाबीस कोणत्याहीप्रकारे धोका आहे असे पदनिर्देशित अधिका—यास कोणत्याहीवेळी वाटेल तर त्यास अशा बांधकामाच्या मालकास किंवा त्याच्या भोगवटादारास लेखी नोटीस देवून असे बांधकाम किंवा वास्तू पाडण्यास, मजबूत करण्यास, काढून टाकण्यास किंवा दुरूस्त करण्यास किंवा त्यापैकी एक किंवा अधिक गोष्टी करण्यास आणि त्यापासून होणा—या धोक्याच्या सर्व कारणांसह प्रतिबंध करण्यास फर्माविता येईल अशी तरतूद आहे.

सार्व. बांधकाम विभागाने सदरची इमारत धोकादायक म्हणून घोषित केलेली आहे तसेच त्यांचेमार्फत नियुक्त पॅनलवरील स्थापत्य सल्लागार यांनी दिलेलया स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी अहवालामध्ये खालिलप्रमाणे निष्कर्ष व शिफारसी दिलेल्या आहेत त्यामध्ये ....

१. सदरची इमारत धोकादायक असुन वापरासाठी असुरक्षित आहे.
२. सदर इमारत निष्कासित करून योग्य प्रकारे पुर्नबांधणी करण्यात यावी.

तरी तरणतलावाच्या दर्शनी बाजुस असलेली प्रेक्षकगॅलरी व त्यालगतची तळमजला अधिक दोन मजल्याची इमारत धोकादायक असुन वापरासाठी असुरक्षित असल्याने तसेच तरणतलाव व त्यालगतचा परिसर मे. विराट अंबे स्पोटर्स क्लब प्रा. लि. या कंपनीकडे बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकसित करणेकरीता देण्यात आलेली आहे. सदरचे धोकादायक इमारत तरणतलावाची प्रेक्षक गॅलरी, बुकींग ऑफिस असुन तरणतलावाचेलगत आहे. तरणतलाव नागरींकासाठी सद्यस्थितीत खुला केला असल्याने त्याठिकाणी नागरीकांची ये—जा सुरू आहे. अशावेळी सदर धोकादायक इमारत कोसळून जिवीत हानी होवू नये याकरीता निष्कासन कारवाई होणे आवश्यक आहे. तथापि, सदर धोकादायक इमारत निष्कासनासाठी खर्च होणार आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २६४ चे कलम ४ अन्वये धोकादायक बांधकाम निष्कासनासाठी आलेला कोणताही खर्च बांधकामाच्या मालकाने किंवा भोगवटादाराने दिला पाहिजे अशी तरतुद आहे.

सद्यस्थितीत तरणतलावालगतची धोकादायक इमारत मे. विराट अंबे स्पोटर्स क्लब प्रा. लि. यांचे ताब्यात दिलेली असल्याने सदर जागेचा भोगवटादार म्हणुन इमारत निष्कासन कारवाई करणेकामी लेखी नोटीस देणेसाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १०** **दिनांक:— ७/७/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार तरणतलावाच्या दर्शनी बाजुस असलेली प्रेक्षकगॅलरी व त्यालगतची तळमजला अधिक दोन मजल्याची इमारत धोकादायक असुन वापरासाठी असुरक्षित असल्याने निष्कासन कारवाई करणेकामी लेखी नोटीस देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाच्या लगत ॲक्सिस बॅकेचे एटीएम मशिन लावण्यासाठी भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन देणे

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यामध्ये ही लोक डिपॉझिट देत आहेत का? साधारणपणे तीन महिने ते सहा महिने असे काही.

**श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक :—**असे काही आपण बोलले नाही परंतु घेवु शकतो त्यांच्याकडुन आपण.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**सहा महिन्याचे डिपॉझिट घ्या.

**श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक:—**ठिक आहे चालेल.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आम्ही आयुक्तांना प्राधिकृत करतो की आपण त्यांच्याशी निगोशिएशन करुन तीन ते सहा महिन्याच्या दरम्यान त्यांच्याकडुन डिपॉझिट घ्यावे.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे ठरावात टाकते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**हा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाच्या लगत ॲक्सिस बॅकेचे एटीएम मशिन लावण्यासाठी भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन देणे

**<u>प्रस्तावना</u>**

शाखा प्रबंधक, ॲक्सिस बॅक, यांनी उल्हासनगर महापालिका मुख्यालयाच्या लगतच्या जागेत महापालिका कर्मचा—यांच्या व शहरातील नागरीकांना त्याचा वापर करता येईल यासाठी एटीएम मशिन उभारणीकरीता १०० चौ.फुट जागा भाडेतत्वावर देणेची मागणी केलेली आहे.

लेखा विभागाकडील प्राप्त अभिप्रायानुसार उल्हासनगर महानगरपालिकेतील एकुण कार्यरत २२२५ कर्मचा—यांपैकी ११०० कर्मचा—यांचे वेतन ॲक्सिस बॅकेतुन होते. ॲक्सिस बॅकेच्या एटीएमसाठी उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाचे डाव्या बाजुस संरक्षक भिंतीलगतच्या जागेसंदर्भात सार्व. बांधकाम विभागाकडून भविष्यात अडचण होणार नाही याबाबत अभिप्राय घेतले आहेत. तसेच त्यांची वर्ष २०१८ चे शिघ्रसिध्द गणक पत्रकानुसार दरमहा भाडे रक्कम रू.१०,७९४/— आकारणी निश्‍चित केलेली आहे. सदर जागेवर एटीएम केबीनची उभारणी ॲक्सिस बॅक करणार आहे त्यामुळे महापालिका याकरीता कोणताही खर्च करावा लागणार नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ चे पोटकलम (ब) अन्वये आयुक्तांस स्थायी समितीच्या मंजूरीने, महानगरपालिकेच्या मालकीच्या ज्या जंगम मालमत्तेचे मूल्य पाच हजार रूपयांहुन अधिक नसेल अशा कोणत्याही जंगम मालमत्तेचा विनियोग विक्री करून, भाडयाने देऊन किंवा अन्य प्रकारे करता येईल. आणि त्यांस उपरोक्त असा कोणताही हक्क धरून महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता एक वर्षाहुन अधिक अशा कोणत्याही कालावधीसाठी तशीच मंजुरी घेऊन पटटयाने देता येईल किंवा जिचे मूल्य किंवा अधिमूल्य पन्नास हजार रूपयांहुन अधिक नसेल अशी महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता विकता येईल किंवा कायमच्या पटटयाने देता येईल अशी तरतुद आहे.

उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने ॲक्सिस बॅकेच्या एटीएमसाठी उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाचे डाव्या बाजुस संरक्षक भिंतीलगत १०० चौ.फुट. जागा दरमहा रू. १०,७९४/— भाडे आकारणी करून ०१ वर्षाकरीता तसेच प्रत्येक वर्ष पुर्ण झाल्यावर सद्यस्थितीत निश्‍चित केलेल्या भाडे आकारणी रकमेमध्ये १०टक्के वाढ करणेचे अटीवर त्यांचेसोबत करारनामा करून त्यांना एटीएमसाठी भाडे तत्वावर देणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>** ११ **<u>दिनांक:—७/७/२०१८</u>**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार ॲक्सिस बॅकेच्या एटीएमसाठी उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाचे डाव्या बाजुस संरक्षक भिंतीलगत १०० चौ.फुट. जागा दरमहा रू. १०,७९४/— भाडे आकारणी करून ०१ वर्षाकरीता तसेच प्रत्येक वर्ष पुर्ण झाल्यावर सद्यस्थितीत निश्‍चित केलेल्या भाडे आकारणी रक्कमेमध्ये १० टक्के वाढ करणेचे अटीवर त्यांचेसोबत करारनामा करून निगोशिएशन न करता त्यांच्याकडुन ३ ते ६ महिन्याचे डिपॉझिट घेवुन त्यांना एटीएमसाठी भाडे तत्वावर जागा देणेकामी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्र. ४ :— उल्हासनगर-5 येथील डंपींग ग्राउंड (खडी मशीन) येथे पोच रस्त्याचे काम व प्लॅटफॉर्म (Window Platform) बनविणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 कलम 2 (2) अंतर्गत मे.क्रिष्णा कंन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणेस मान्यता मिळणे.**

---

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—**कोण सांगणार? कसला निधी आहे.

**श्री. भुषण पाटील, कनिष्ठ अभियंता:—**खडी मशिन येथे डंम्पींग ग्राउंड येथे विंडो प्लॅटफॉर्म बनविण्यासाठी प्रस्तावित आहे. गायकवाड पाडा येथिल पोच रस्ता आणि विंडो प्लॅटफॉर्म.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**ठिक आहे आपण अगोदर २२ लाख ठेवले होते.

**श्री. भुषण पाटील, कनिष्ठ अभियंता:—**ते पीडब्ल्युडीने ठवेले होते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**तेथे सेक्युरीटी विभाग असला पाहिजे नाहीतर आपण प्रत्येक वेळेस पीडब्ल्युडीस विसंबुन राहतो. शिक्षण मंडळाचे जर काम करायचे आहे तर सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणी पुरवठयात काम करायचे आहे तर सार्वजनिक बांधकाम विभागास सांगावे लागते. गेट लावायचे आहे, झाडे लावायची आहेत तरी सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागास सांगावे लागते.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**मागील वेळेस मे. आर्यन कंन्स्ट्रक्शन यांना २२ लाखाचे काम दिले होते तर त्यामध्ये त्याने डब्ल्युबीएम रस्ता बनविला होता.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**किती मिटर काय वगैरे.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**साहेब ते कदाचित २०० मिटर असणार.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**श्री. पाटील साहेब, आता आपण जो रस्ता केला त्यावर डब्ल्युबीएम घेतले काय?

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**सोलिंग आणि डब्ल्युबीएम केले होते.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**ज्या कामाची मंजुरी दिली होती ते काम झालेच नाही. आता तुम्ही करत असाल हे काम ५(२)(२) मध्ये गरज असेल, आता तुम्ही आणले आहे. परंतु मागचेचे काम नाही झाले.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**हे काम ५ (२)(२) मध्ये कार्योत्तर मंजुरीसाठी आणले आहे. काम झालेले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**नाही, मंजुरीसाठी आहे, काम झालेले नाही.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**ते काम तर सप्टेंबरमध्ये झाले होते ना साहेब.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**सप्टेंबर म्हणजे मागील वर्षी.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**होय मागीलवर्षी केले होते ना साहेब.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**हे काम झाले होते त्याच्यावर आता पुन्हा डब्ल्युबीएम करायला घेतले.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**असे रिपीट का करता?

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**आम्हांस दोन दोन वर्ष निधी मिळत नाही आणि आता येथे ५०—५० लाखाचे परत काम करता. आम्हां नगरसेवकांची परिस्थिती काय आहे.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**मागील वेळेस जे सिलिंग व पीसीसी केले होते...

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**साहेब, आता काय परिस्थिती आहे, डब्ल्युबीएम घेतले ना.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता :—**आजच्या परिस्थितीत तेथे खड्डे पडले आहेत व पाणी वगैरे साचत आहे त्यात.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**मागच्या वर्षी जे २९ लाख दिले होते व जे मंजुर केले होते ते काम झाले की नाही सदयस्थिती काय आहे. एका वर्षाला एका वेळेस खर्च करुन तो रस्ता जर झाला असेल आणि पुन्हा त्यावर हे काम करणार असाल तर पैसे वाया जातात ना फुकट. ते २९ लाखाचे काय झाले याचे उत्तर पाहिजे आम्हांला.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता:—**ते आम्ही नाही त्यांनी केले होते.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**त्यांनी काम केले तर ते तुम्ही पाहिले का.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**३ लाखसाठी फोटो घ्यावे लागते तर फोटो आणुन दया.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**मागील वेळेस जे काम केले होते ते रस्त्याचे काम केले होते. डब्ल्युबीएम आणि सिलिंग.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**मग आता हे काय करत आहात.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**साहेब ते प्लॅटफॉर्म बनवत आहेत तेथे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**रस्ता सुध्दा लिहिला आहे यामध्ये.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**तो वेगळा रस्ता आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**तेथुन जाण्यासाठी तो एकच रस्ता आहे.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**साहेब, ते काम झाले आहे. तेथे आपण पाहणी करा. डब्ल्युबीएम व सिलिंग केले आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**मग ते हे काम करत नाहीत का.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**हे काम वेगळे आहे. साहेब ते प्लॅटफॉर्म बनवत आहेत. दोन्ही बाजुचा रस्ता आहे साहेब.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता :—**आपण २०० मिटर घेतले साहेब त्यामध्ये.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**म्हणजे तो प्लॅटफॉर्म व प्लस २०० मिटर पुढे. आणि तुम्ही कोणता घेतला होता.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**२०० मिटरच घेतला होता आम्ही.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**परंतु कोठुन घेतला होता.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता :—**गायकवाड पाडा ते डंम्पींग ग्रांउड.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**गायकवाड पाडा ते डंम्पींग ग्राउंड हा २०० मिटर रस्ता आहे.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता:—**एकच रस्ता आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**त्याच रस्त्याचे काम २९ लाखाचे मागील वेळेस झालेले आहे. आणि परत तेच काम तुम्ही करत आहेत. आता ते किती लाखाचे काम करत आहात तुम्ही.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता :—**१३ लाखाचे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**१३ लाख रुपये अजुन त्यावर खर्च करणार आहात.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**१३ लाखात काय काम करणार आहेत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**हे स्पष्ट असले पाहिजे ना की प्लॅटफॉर्मसाठी एवढा खर्च, रस्त्यासाठी एवढा खर्च.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**१३ लाखामध्ये काय काम करणार कॉंक्रिट करणार की खडी करणार. फक्त खडी करणार?

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता:—**त्यामध्ये प्लॅटफॉर्मसुध्दा आहे साहेब.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**प्लॅटफॉर्म बनविण्याचे वेगळे आहे.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता:—**३५ लाखाचा प्लॅटफॉर्म व १३ लाखाचा रस्ता असे काम आहे साहेब.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**श्री. सितलानी तुम्ही उत्तर दया. मागील वेळेस आपण केले.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**हो मागील वेळेस आम्हीच केले.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**आपण एमबी केले त्याचे?

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**आमच्या विभागाने केले.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**तो रस्ता आहे ना.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—** तो रस्ता आहे. त्याची परिस्थिती खराब झाली आहे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**कारण सांगा त्याचे.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता:—**त्याचे कारण असे की रोज ५०—१०० गाडया येत असतात. तेथे कचरा टाकण्यासाठी गाडी जाते, तेथिल रस्ता खराब झाला आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**मला एक सांगा, खेमाणी जवळ डंम्पींग ग्राउंड टाकले होते तुम्ही. किती वर्षात त्या डंम्पींग ग्राउंडला आतापर्यंत खर्च केलेत. रस्त्यावर २५ वर्षात एक रुपयासुध्दा खर्च केलेला नाही. आणि तुम्ही येथे एक वर्षात दोन वेळा खर्च करता.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**आणि त्याच ठेकेदाराला पुन्हा देत आहात.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, हा जो विषय येथे आला आहे यात दोन वेगवेगळे विभाग आहे, दोन्ही विभागांच्या चर्चा झाल्या व आपसात ताळमेळ होत नाही. त्यांचे असे ताळमेळ बसत नाही की आधी जे काम झाले आहे ते झाले आहे अथवा नाही झाले. आरोग्य विभागाचे म्हणणे आहे की आधी तेथे काम झालेच नाही.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**त्यांचे म्हणणे असे नाही.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता:—**काहीच काम झाले असे नाही आताची परिस्थिती सांगत आहे ना मी.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**काम झाले आहे असे नाही सांगत ते. फक्त कंडिशन सांगत आहेत.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—काम झाले आहे साहेब, आपण तेथे जावुन पहावे. कंडिशन खराब झाली असेल पावसामुळे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**श्री. केणी आणि श्री. पवार यांना माहित असणार की तेथे काम झाले आहे की नाही ते.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**साहेब ९ महिन्यात तेथिल रस्त्याची परिस्थिती खराब झाली आहे. तेथे कच—याच्या गाडया जातात, साधारण रस्ता नाही आहे तो.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**ही चर्चा आपण दोन महिन्यापासुन सांगत आहात की रस्ता खराब आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**फक्त २०० मिटरला २९ लाख, २९ लाख काही कमी रक्कम नाही.

**श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**तो रस्ता झाला होता. पावसामुळे तेथे आता खड्डे झाले आहेत आणि डंम्पींगला जाण्यासाठी खुप अडचणी येत होत्या. त्यामुळे पुनश्च आम्ही तो, गायकवाड पाडयापासुन डंम्पींग ग्राउंड पर्यंत काम होते, गाडया अनलोडिंग करायला जागा नसल्यामुळे आणि तो विंडोचाच भाग असल्यामुळे ३५ बाय ३५ मिटरचा विंडो प्लॅटफॉर्म करतो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**नाही, नाही. तेच सांगत आहेत की काम झाले होते परंतु एका पावसामुळे क्वालिटी खराब झाली. त्याच ठेकेदारास वाढीव क्वांटिटीमध्ये ५ (२)(२) मध्ये देत आहोत ही कुठली पध्दत आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**श्री. केणी साहेब, सप्टेंबरनंतर पाऊस असतो का?

**श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**आताच्या पावसाळयापुर्वी जी परिस्थिती होती. त्यांनी तो रस्ता बनविला.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**त्यावेळी कोणत्या संस्थेस ते काम दिले होते.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**आधीचा कोण होता आणि आताचा कोण करत आहे.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता:—**आता क्रिष्णा कंन्स्ट्रक्शन करत आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**आधीचा कोण होता आणि आताचा कोण आहे.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—जयसिंघानी म्हणुन आहेत.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**ते फक्त प्लॅटफॉर्म करतील.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**पुर्वी जे काम झाले त्याची लायबिलीटी काय होती.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—सहा महिने होती ना.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**झाले सहा महिने संपले.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—त्यांनी डब्ल्युबीएमचाच रस्ता बनविला होता गाडी येण्याजाण्यासाठी. त्यांनी असे नाही केले की लाईफ टाईम असो.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**२९ लाख खड्डयात गेले. आधीचा रस्ता डब्ल्युबीएम केला नंतर त्यात एसी केला.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**साहेब, काय आहे माहित आहे का आपले सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष नाही. आणि ठेकेदार त्याचा फायदा घेतात. जर यांच्यात क्वालिटी जोपर्यंत येणार नाही तोपर्यंत त्या ठेकेदारात पण येणार नाही.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**साहेब, ठेकेदाराचा विषय निघाला म्हणुन सांगतो की २०१० मध्ये आम्ही ठेका दिला तेव्हा कंपनी कोणती होती, काय होती ते माहित नाही. ज्यांनी काम केले अगोदर त्यांच्याकडे ७०—८० लाखाचे काम बाकी आहे. त्या ठेकेदारास काळया यादीत टाका. ज्यास काळया यादीत टाकायला सांगता त्यास टाकत नाहीत.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**कुठल्याही विभागास तुम्ही विचारा, जिल्हापरिषद व शाासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग आहे त्यांच्याकडे जो इंजिनिअर आहे तो एमडी रेकॉर्ड करतो. येथे ठेकेदार एमडी रेकॉर्ड करुन देतो, फक्त ते करुन देतात व हे फक्त लिहून देतात.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—इंजिनिअर करतात ना साहेब.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**अभियंता आपण बोला एमडी कोण रेकॉर्ड करतो.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**एमडी ठेकेदार रेकॉर्ड करतो.

**श्री. जितु चोईथानी, क. अभियंता :—**मोठी जी कामे असतात ते ठेकेदार रेकॉर्ड करतो. तो बिल सबमिट करत नाही. ५० लाखाच्या वर असेल तर ठेकेदारच बिल देतात. शहर अभियंताकडे त्यांना रेकॉर्ड करावे लागते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपणाकडे फक्त श्री. सितलानी, जेई, डेप्यु इंजिनिअर व सीटी इंजिनिअर आपणांस मिळुन किती इंजिनिअर आहेत.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—फक्त ५ इंजिनिअर आहेत आधी १६ असायचे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**५ इंजिनिअर काय काय करतील. आम्ही महासभेत आपणांस प्रस्ताव पारीत करुन दिला आहे. पीडब्ल्युडी, वॉटर सप्लाय आणि फायर यामध्ये ६१ इंम्प्लॉईज आपलाच प्रस्ताव होता. त्यावेळी प्रशासनाने म्हटले होते की यापेक्षा जास्त मंजुरी देवु नका. फक्त ६१ चीच करा आपण ६१ स्टॉफलाच मंजुरी दिली आहे. त्यानंतर अशी गोष्ट आली की एकुण शासनाने बदल केला आहे. आधी युएमसीचे पोर्टल होते आता शासनाचे पोर्टल झाले आहे. आपणांस नियुक्तीसाठी पाठवायचे आहे. ते आतापर्यंत आले नाही. सीएमच्या पोर्टलवर पाठविले तर तर त्यांनी युडीला दिले की आपण जागा काढा. आतापर्यंत जागा निघाल्या नाहत. पाणी पुरवठयात ४ इंजिनिअर आहेत व यांच्याकडे ५ इंजिनिअर आहेत. हे इंजिनिअर सेवानिवृत्त होत आहेत व त्यांचे इंजिनिअर बदली करुन कोठे जात आहेत. यांच्याकडे एवढे इंजिनिअर्स नाहीत की ते साईटवर जावुन पहाणी करु शकतील.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**ते प्रशासनाचे काम आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आमचे काम कसे नाही. आपण त्यांना पास करुन दिले आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**काय ठेकेदाराने बनवुन दिले आहे का बिल?

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**साहेब मला असे वाटते की २९ लाखाचे त्यास कुठले दिले आहे तर आताच्या स्थितीत जर त्याने निष्कृष्ट काम केले आहे ते तो मान्य करत नाही तर त्या ठेकेदारास काळया यादीत टाका.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—साहेब, त्यांनी जेव्हा काम केले तेव्हा रस्त्याची परिस्थिती खराब झाली होती. ते काम झाले आहे व फोटो काढले आहेत, जसे अहवाल वगैरे आहेत. तेथे रोज डंम्पींगच्या गाडया जातात. तो कच्चा रस्ता आहे पक्का नाही, तर मग रस्त्याची हालत खराब झाली असणार. तर त्यादिवशी १३ लाख रिपेरिंगचे बनविले आहे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**पहिले किती होते?

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—२९ लाखाचे होते.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**मग आता ही दुरुस्ती आहे फक्त.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—एक लेअर त्यावरच टाकायचे आहे साहेब. आता एवढा पावसाळा आहे, रस्ता रोज खराब होतो.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**आपल्या किती गाडया जातात रोज.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—४०—५० गाडया जातात.

**श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**साधारणत: १० ते १५ टन गाडया जातात. खरे तेथे सीसी पाहिजे. तो कच्चा रस्ता आहे, डांबरी रस्ता नाही. जड वाहनामुळे सारखे तेथे खड्डे पडतात.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**श्री. केणी साहेब, खेमाणीला डंम्पींग ग्राउंड होते ते जुने आहे तेथे आतापर्यंत किती खर्च केले ते सांगा आता. एक रुपया खर्च केला नाही आतापर्यंत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**साहेब, आमच्याकडे आले आहे ना आता. १० कोटी आले आहे हा डीपीआरचा पार्ट आहे. तर पुढे चालुन त्यात डांबरीकरण व सिमेंट कॉंक्रिटचे काही तरतुद आहे का?

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता :—**तरतुद नाही त्याची.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**आपण १३ लाखाचे बनविले आता पावसाळा सुध्दा आहे. तर त्याच डांबरीकरण का नाही करत, १०—१५ लाख आणखी लागतील, त्यास डांबरीकरण करा. १५ लाख आणखी वाढवुन त्याचे प्राकलन करा. आपण १५ लाख वाढवुन आणा नंतर आता हे आम्ही करुन टाकु.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**त्यानंतर किती दिवस राहणार त्याची गॅरेंटी दिली पाहिजे ना.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**नेहरु चौक ते फॉलोवर लाईन चौक बनविला आहे, त्या निविदेत ३ वर्षाची गॅरेंटी दिली आहे, रस्ता एवढा चांगला बनविला आहे व चेंबर त्याने एवढया चांगल्याप्रकारे मेंटेन केले आहे व नाली चांगली बनविली आहे. त्यास माहित आहे की हे थांबेल तर माझा खड्डा वाढेल. चार रस्त्यापैकी एक रस्ता एकदम टाईम लिमिटच्या आत त्यांनी रस्ता पुर्ण केला आहे. एक ठेकेदार काम करु शकतो तर दुस—याकडुन तसे काम का घेवु शकत नाही.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**केशु ठेकेदाराची क्वालिटी एकदम थर्ड क्लास आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**कोणतेही काम असो जयभारत कंन्स्ट्रक्शन यांचे काम चांगले आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**ज्यांनी खराब काम केले त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हे नेहरु चौक येथे कोणाचे काम आहे.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—जयहिंदवाल्याचे आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**जयहिंदचे काम चांगले आहे.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—श्रीराम चौक येथे जयहिंदवाल्यानेच केले आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आम्ही मागच्या स्थायी समितीत आपणांस सांगितले होते. महासभेत सुध्दा सांगितले होते व आता पुन्हा रिपीट करीत आहे. डॉल्फिन क्लब येथिल रस्ता आपण एक पार्टात सांगितले होते की त्या रस्त्यावर ड्रेनचा रस्ता नाही त्यामुळे तेथे रस्त्यावर पाणी येत आहे. त्या रस्त्यावर खड्डे भरणे चालु केले आहे. आता सहा महिने सुध्दा झाले नाही आपण त्या रस्त्याला डांबरीकरण करुन.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—साहेब, मी आधीच म्हटले आहे तेथिल नाली साफ नाहीत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आता आपण नाली साफसाठी किती खर्च केला.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—नाली साफ नसल्यामुळे आपण ठेकेदारास पत्र सुध्दा दिले आहे. काकाच्याय ढाब्याकडे पॉटोल्स झाले आहे त्यास दुरुस्तीकरण्यासाठी. तो दुरुस्ती करणार जसे उन्ह येईल तेव्हा. तेथिल नाली स्वच्छ करणे फारच आवश्यक आहे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**नाली कोण साफ करतो.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता**:—आरोग्य विभाग करतो.

**श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**डंम्पींग ग्राउंडच्या नाल्याला पाणी जायला जागा नाही, त्या ज्या नाल्या आहेत तेथे रोडला बिल्कुल स्लोप नाही, आणि नालीसाठी कोठेही होल पाडलेले नसते त्यामुळे सर्व पाणी रस्त्यावर थांबते.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**सार्वजनिक बांधकाम विभागाने बनविली आहे ना ती नाली.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हे येथे असे चालले आहे की सार्वजनिक बांधकाम विभाग सांगते तेथे नाली बांधली नाही व आरोग्य विभाग सांगतात तेथे पाणीसाठी रस्त्याचा स्लोप नाही केला. तर मी असे म्हणतो की पॅटोल्स करण्याच्यावेळी नाली साफसाठी सुध्दा टाका ना. का आपण नाल साफसाठी वेगळी निविदा, त्यासाठी वेगळी निविदा बनवितो. उगाच आरोप प्रत्यारोप करत राहणार की हे याने नाही केले, ते त्याने नाही केले. आज शहरात तीन चार तासाच्या पावसामुळे पाणी एवढे भरले होते की तेथे ना गाडी, माणसे कोणीच जावु शकत नव्हते. नाल्यातुन पाणी वाहत नव्हते. १० दिवसांपुर्वी मी पत्र दिले होते त्यावेळी श्री. बोडारे आयुक्त महोदयांकडे बसले होते. आज सर्वच जागी पाणी भरले होते. व पाणी सुध्दा एक फुट, दोन फुटापर्यंत भरले होते तर एक दुस—यांकडे बोट दाखवुन काम होणार नाही. आपल्या मनावर घ्यायचे आहे. असे होता कामा नये की त्याने हे नाही केले तर मी हे नाही केले. आज मी पहिल्यांदा बघत आहे की स्थायी समिती सभागृहात एक अधिकारी दुस—या अधिका—यावर आरोप लावत आहे. आपण डांबरच्या रस्त्याचे काम करत असतांना आरोग्य विभागास पत्र दिले होते का नाली साफ करण्यासाठी, बोलले का आपण आजपर्यंत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**आपण घाई का करता प्राकलन बनविण्याचे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**आपण एकमेकांना सांगितले पाहिजे ना. आज सॅनिटेशन विभाग सर्व जागी काम करत आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**अहो, आयुक्त साहेबांना बोलु दया ना.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**आज सार्वजनिक बांधकाम विभाग शुन्यात आहे व ते सांगत आहेत की सॅनिटेशन विभाग काम नाही करत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**आपण प्राकलन बनवितेवेळी या सर्व गोष्टींकडे लक्ष का नाही देत. वॉटर पाईपलाईन आहे, सॅनिटेशन आहे, आपण फक्त एस्टिमेट बनवत राहता, बनवत राहता, यात एवढे सिमेंट टाका, यात एवढे डांबर टाका. दोन तासात एस्टिमेट बनवितात. काय प्रापर काम करता आपण. मी आपणांस किती वेळा सांगितले आहे आपण ड्राईंग बनवा. किती बाय कितीचा. आता हे विचारत आहेत किती मिटरचा रोड आहे. आपण कोठेच लिहित नाहीत की हा दोनशे मिटरचा रस्ता आहे, पााचशे मिटरचा रस्ता आहे. हया सर्व गोष्टी झाल्या पाहिजेत ना. आपण पाच लोक आहेत तर पाच लोकांनी जेवढे काम होते तेवढे केले पाहिजे ना. आम्ही कोठे म्हणतो तुम्ही १६ लोकांचे काम करा. तुम्ही १६ लोकांचे काम करता परंतु क्वालिटी काहीच नाही त्यामध्ये.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**साहेब, आपणाकडे ९९ ला कंन्सल्टंट नेमला होता ते बारीक बारीक ड्राईंग, डिझाईन दयायचे की प्रापर होते की नाही. महापालिकेचे लोक असायचे ते बरोबरच पण ते स्वत: ती काम करत होते. परंतु आता आपण कंन्सल्टंट नेमत नाहीत.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता :—**मोठया कामांसाठी कंन्सल्टंट नेमतो.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**साहेब, पॅटोल्समध्ये ६ कोटीचे पॅटोल्स आपले नाव येथे खराब. ६ कोटीचे एस्टीमेट आणले आहे व मी येथे प्रश्न विचारला आहे. श्री. बोडारे साहेब म्हणाले माझे नाही होणार व मी म्हणालो माझेपण नाही होणार. १०० टक्के होणार. ८ कोटीचे दिले आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**साहेब, ८ कोटी असून सुध्दा आमच्या प्रभागात काम झाले नाही.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**याबाबत तर मला अजुन माहित नाही काही.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**आपणांस माहित नाही.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**आपण एक काम करा ना, ही छोटी छोटी कामे करुच नका ना.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**नाही, नाही, छोटे कामे बोलतात आता या रस्त्यावर कोण ठेकेदार होता. श्री. सितलानी सांगा, व्हीटीसीपासुन आशेळा गावापर्यंत आता जो रस्ता चालु आहे तेथे कंन्सल्टंट कोण आहे व तो येतो का?

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता :—**महिंद्रावाला कंन्सल्टंट आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**एकदापण आला नाही. त्याच्या कामाची क्वालिटी बरोबर सुध्दा नाही, कोण ठेकेदार आहे.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता :—**महिंद्रा कंन्सल्टंट आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**एकदापण आला नाही. मी तर पाहिले नाही त्याला. साहेब, अॅडमिनिस्ट्रेशनचे कंट्रोल त्याच्यावर नाही. कंन्सल्टंट नेमतात त्याची फी त्याला मिळते, घरी बसुन. तुम्ही तरी कडक व्हा प्रशासनाच्यावतीने. म्हणुन इंजिनिअर करत नाही व कंन्सल्टंट फी घेवुन जातात.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता :—**त्यांची आतापर्यंत काही देयके दिली नाहीत.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**दयायचे सुध्दा नाही आपणांस क्वालिटी पाहिजे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**तो ऑफिशियल कंन्सल्टंट आहे तर त्यास बिल तर दयावेच लागणार ना.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता :—**त्यास चारही रस्त्यांसाठी नियुक्त केले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**त्याच्यावर नियंत्रण पाहिजे ना. तो जी कामे करतो तर मेंटेन करणे हे ठेकेदाराचे काम आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**साहेब, मी मजेशीर गोष्ट सांगतो माझ्याकडे राधास्वामी ओटी रोड येथे कंन्सल्टंट आहे त्याने १८ पॉईंट सार्वजनिक बांधकाम विभागास तक्रार केली की ठेकेदार येथे येथे काम करत नाही. ज्यादिवशी तक्रार दिली तर तो ना आजपर्यंत तेथे आला ना माझा फोन उचलला.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**साहेब, मी सांगतो. जे रस्ते आम्ही मंजुर केले ते काही उत्कृष्ट आहेत, काही ठिकाणी सूचना दिल्या असतील तर त्या पुढील स्थायी समितीत आणा. काय चालले आहे आम्हांस माहित नाही, मंजुर करायचे आम्ही आणि हात वर करायचे. नियंत्रण यांचे नाही, आमचे नाही, कसे चालणार, कसे चालले आहे. मग

२९ लाखाचे पेमेंट होवुन गेल्यानंतर क्वालिटी बरोबर होती की नाही, हे केले की नाही मग दोन विभाग आपसात भांडणार. हे बरोबर नाही.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**साहेब, निधीसाठी आपण फार चांगले केले. ३ लाख असो किंवा २ लाख असो त्याचा फोटोग्राफ असला पाहिजे. ५० लाखासाठी आपणाकडे काही स्पेसिफिकच नाही. किती मिटर आहे, काय आहे, प्लॅटफॉर्म काय आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**एक गोष्ट लक्षात ठेवा यांचे म्हणणे आहे २९ लाखाचे काम झाले आहे. क्वालिटी चांगली नाही असे यांचे म्हणणे आहे आणि श्री. केणींचे म्हणणे आहे त्यांनी केले नाही, रस्ते खराब आहेत. त्यामुळे आयरन कंपनीला काळया यादीत टाकावे असे आमचे म्हणणे आहे.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता :—**साहेब, त्याचे बिल अदयाप वर गेले नाही, ते पास झाले आहे नाही माहित नाही. परंतु त्याने काम केले होते, एमबी आहे. त्याचे सिक्युरीटी डिपॉझिट आपणाकडे आहे. त्याच्याकडुन आपण रेक्टीफाय करु शकतो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**त्यांना पेमेंट देतो, ठिक आहे त्याने काम केले. आपली चुक आहे.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता :—**नऊ महिने झाले ना साहेब.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**त्यांना नोटिस दया. आपण त्यास काळया यादीत टाकले नाही काहीच करत नाहीत. ठेकेदार आपणास काळया यादीत टाकु शकतो आपण आजपर्यंत नोटिसच दिल नाही तर कसे काळया यादीत टाकणार. तो कोर्टात निघुन जाईल.

**श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता :—**साहेब, आज देतो नोटिस.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**कायदा फार मोठा आहे, आपण ना नोटिस देता ना काही करत. तो जाणार व आपण काळया यादीत जाल.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**साहेब, आता विषय असा आहे की १३ लाखाचे काम झाले आता काम होणार व परत पुढच्या वेळेस ते पावसाळयात उखडणार. त्यासाठी काहीतरी आता निर्णय घ्या. हे कार्योत्तर मंजुरीसाठी आले आहे आणखी १०—१५ लाख डांबरीकरणासाठी करत असतील, अजुनही पुढच्या दोन चार दिवसात आणावे. प्राकलन चांगले तयार करावे आणि गॅरंटी दिली पाहिजे भले एक—दोन—तीन वर्ष.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**साहेब, त्यात तीन वर्षाची गॅरंटी असली पाहिजे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**डब्ल्युबीएमला कोणी गॅरेंटी देत नाही.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**डांबरीकरणाचेच सांगत आहे मी.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**करु शकतो का आपण त्याचे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**साहेब, स्वच्छ भारत अभियानामध्ये आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**यामध्ये १० कोटी निधी आहे तो जर तुम्ही डीपीआरमध्ये वापरता ते त्यामध्ये नमुद आहे का?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**ते बघावे लागेल ना.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**४८ लाख ते सुध्दा त्यामध्ये आहे का?

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**डीपीआरचा पार्ट आहे का?

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता:—**साहेब, डीपीआरमध्ये विंडो प्लॅटफॉर्म आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**रोड नाही.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता :—**रोड नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**मा. आयुक्त साहेब, आपला १८–१९ चा जो अर्थसंकल्प आहे, त्यामधुन यास डांबरीकरणाचा रस्ता बनवुन ३ वर्ष किंवा ५ वर्षाची गॅरेंटी टाका.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**बाकी जे पाण्यात गेले त्याचे काय करणार.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**कारणे दाखवा नोटिस देतील ना.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**नोटिस देवु ना.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**त्याची सेक्युरीटी घेतली पाहिजे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आपण यास ५(२)(२) मध्ये देत आहात. यात कसे कंडीशन टाकणार.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**डांबरमध्ये यामध्ये नाही. यानंतर जे डांबराचे येईल त्यामध्ये तीन वर्षाची गॅरंटी येणार ना. ठिक आहे पास करा.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**ठेकेदाराची सेक्युरीटी बाकी आहे.

**महापालिका सचिव :—**अटी सुध्दा टाकावे लागतील ना.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हे पास करा त्याचबरोबर.....

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:—**आपण जसे इतर गोष्टी स्पेसिफिक बाब मागवितात ती यामध्ये सुध्दा मागवा. किती मिटर आहे, रस्ते आहे, किती प्लॅटफॉर्म आहे, या आधी काय काम झाले आहे, त्यासाठी मी सांगत आहे की हे ५(२)(२) मध्ये दिले पाहिजे. आता जसे म्हटले की यामध्ये आपण काहीही अटी टाकु शकत नाहीत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**अटी यामध्ये येत नाही तर अटी डांबरमध्ये आहेत.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**बनवुन घ्या, प्रत्येक वेळी आपण ५ कोटी, २ कोटी दया, आपण फक्त बसुन पास करत आहोत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :–**आता पावसाळयामध्ये रोज साडेतिनशे टन कचरा जातो त्याठिकाणी  तर त्या गाडया कशा उतरविणा तुम्ही. तुम्ही हे विषय एकत्र करुन आणता ना, तुम्ही काय करा रस्ता वेगळा ठेवा आणि प्लॅटफॉर्म वेगळा ठेवा.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**तेव्हा मी सांगतो तुम्हांला की नविन गोषवारा बनवा आणि त्यामध्ये स्पष्ट लिहा.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :–**प्लॅटफॉर्मला आपण मंजुरी देवु व रोडचे डांबरीकरणाचे नविन आणु.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता:–**प्लॅटफॉर्मचे वेगळे करतो.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**हो, प्लॅटफॉर्मचे वेगळे करा. आणि पुढचे ते डांबरीकरणाचे एकत्र करुन आणा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**किती आहे ३४ लाख.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता:–**३५ लाख ६० हजार आहे, प्लॅटफॉर्म फक्त.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:–**३५ लाख ६० हजार फक्त प्लॅटफॉर्मसाठी आणि बाकी रोडसाठी?

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता:–**१३ लाख ८६ हजार रोडसाठी.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :–**आता आपण डांबरीकरण जरी केले तर हा रस्ता तर करावाच लागेल ना अगोदर. अगोदर डब्ल्युबीएम करावे लागेल नंतर डांबरीकरण.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता:–**हो.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :–**आता आधी रोडचे आणले नंतर डांबरीकरण करणार ना.

**श्री. भुषण पाटील, क. अभियंता :–**गाडयांना ये–जा करण्यासाठी तेथे त्रास होतो.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :–**पुढच्या आठवडयात आपण सभा घेणार आहोत तेव्हा आणा ना मग ते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**गाडयांना येण्याजाण्यासाठी त्रास होतो म्हणुन एवढे पास करुन डांबरीकरणाचे प्राकलन आणा. त्यात ३ वर्षाची गॅरेंटी टाका.

**सदस्य श्री. धनंजय बोडारें :–**आधी प्लॅटफॉर्मचे करुन टाका ना.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :–**आधी प्लॅटफॉर्म करा व डांबरीकरणाचे जे काम आहे ते आपण कोणास देणार आहे. त्यास पुर्ण दयावे लागेल ना. खालचे तोच करेल व डांबर सुध्दा तोच करेल. तेव्हा तर तो पाच वर्षाची गॅरेंटी देणार ना.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**आता जर त्यास दिले व डांबराचे दुस–यास दिले तर तो लक्ष देणार नाही ना.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :–**फोटो लावा ना तुम्ही सोळा लोक जावुन नाही पाहणार की ती वस्तु काय आहे. सभागृह नेता जावुन आले आम्हांस सुध्दा जावे लागणार काय.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**आयुक्त महोदय जसे म्हणाले की, प्लॅटफॉर्म करणार आता तर मी आपणांस विनंती करतो की, २०० मिटरचा जो रस्ता आहे त्याचे जे डांबरीकरणाचे काम करायचे आहे. ३ वर्षाची लायबिलीटी टाकुन त्यास ८ दिवसात इस्टीमेट बनवुन पुढील सभेत आणले जावे. त्म्यास उहिशर होता कामा नये. जेणेकरुन तो डब्ल्युबीएम करेल व डांबरीकरण पावसाळयानंतर केले तरी चालेल. पण त्याचे काम झाले पाहिजे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>** आता मुद्दयावर आला आहात. सप्टेंबरमध्ये त्याचे डब्ल्युबीएम झाले आहे. परत डब्ल्युबीएमसाठी आणले, तर तुम्ही परत डब्ल्युबीएम करणार का?

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**आता प्लॅटफॉर्म करायचे आहे. डब्ल्युबीएम व डांबराचे एकत्र आणावे. व त्याचे लायबिलीटी पिरीअड टाकुन. ८ दिवसात घेवुन यावे. नाहीतर परत एक महिना जाणार.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>**यास पार्ट पार्ट करण्याबाबतीत माझा विरोध आहे. नविन गोषवारा घेवुन या आम्ही त्या हिशोबाने करणार.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**प्रशासनाने आणले आहे तर दयावे लागणार.

**<u>महापालिका सचिव :—</u>**नियमात लिहिले आहे की ५(२)(२) मध्ये देतांना यात कारण दयावे लागणार.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**त्यात लिहा ना प्लॅटफॉर्म खरा आहे व तेथे कचरा टाकण्यास त्रास होतो. हे काम अतिआवश्यक आहे.

**<u>महापालिका सचिव :—</u>**यात लिहिते रस्त्यात खड्डे असून रस्त्याची अवस्था दयनीय आहे. कचरा वाहतुकीस त्रास होत आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**ते तर प्रस्तावनेत आले आहे ना. त्यांनी कारणे तर दिली आहेत ना.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>**हे ५ (२)(२) मध्ये आहे तर यास पार्ट करु शकतो का.

**<u>महापालिका सचिव :—</u>**साहेब, ही निविदा नाही हे प्रशासनातर्फे आले आहे.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी:—</u>**मंजुरीकडे आला आहे ना आपणाकडे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**जे आले आहे ते ३६ लाखाचे.

**<u>सउस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**३४ लाख ६० हजार.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>**आपणाकडे बरीचशी कामे आहेत, शिवाजीनगर येथे आपण स्वत: पाहिले आहे साहेब.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**श्री. पाटील साहेब, यानंतर वाढणार आहे का ते. ३४ चे काही ६० वगैरे होणार आहे का.

**<u>श्री. भुषण पाटील, क. अभियंता:—</u>**आपण ३५ बाय ३५ चा घेतला आहे त्यानंतर नियमात तरतुद आहे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**म्हणजे तुमचे ३४ लाख ६० मध्येच संपेल ना.

**सदस्य श्री. भुषण पाटील, क. अभियंता :—**होय.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**काय ४०—४५ पर्यंत जाणार परत.

**सदस्य श्री. भुषण पाटील, क. अभियंता :—**नाही जाणार.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**३४.६० ला मंजुरी देत आहे तर त्यात लिहावे लागणार ना.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**३४ लाख ६० हजार, त्यांनी ३४ बाय ६० लिहिले आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**साहेब, यामध्ये आमचा विरोध असणार. आपण पाहणीच नाही केली. जोपर्यंत आम्हांला स्पष्टीकरण नाही तोपर्यंत आम्ही पास नाही करणार.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**नाही, पाहणी तर आम्ही केली आहे. साईट आम्ही पाहिली आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**हे पहा, आपण प्रत्येक वेळी आमच्याकडुन फोटो मागता, डिझाईन मागता, यामध्ये आपण कोणते डिझाईन दिले आहे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**नाही, नाही आपणाकडे पुर्ण इस्टिमेट नाही येत ना. फक्त गोषवारा येईल ना. संचिकेत सर्व असणार.

**सदस्या श्रीमती ज्योती बठिजा :—**३ जुनला वॉट्सअपवर आले होते आज ७ जुलै आहे तर मग एवढे दिवस गेले निविदेत का नाही गेले.  आपण माझा प्रभाग पाहिला आहे व आपण व्हीजीट करुन गेले आहात. तेथे एक मुलगा रस्त्यात खड्डा पडला आहे, तेथे रस्ता एवढा खराब आहे त्या मुलाचे डोके फुटले आहे, तेथे किती लोक पडले आहेत. तर त्यास सुध्दा आपणण्स ५ (२)(२) मध्ये टाका नाहीतर आमचा विरोध आहे. साहेब ३ पासुन आता ७ पर्यंत चालु आहे, २४ तासाचे असते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने बनविला आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**आता रस्ता नाही करत, रस्त्याचे रद्द केले आता फक्त डंम्पींग ग्राउंडचे देत आहोत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**तेथे फक्त कचरा खाली होणार व तेथुन परत ती गाडी खाली करुन येणार.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**ठिक आहे चालेल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हा विषय इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा व यामध्ये इतिवृत्तात एक लाईन लिहा.  डांबर रस्त्याचे जे इस्टिमेंट आहे ते लवकरात लवकर ८ दिवसात पाठवावे. जेणेकरुन ही सुध्दा तयारी होईल.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ४ :— उल्हासनगर-5 येथील डंपींग ग्राउंड (खडी मशीन) येथे पोच रस्त्याचे काम व** प्लॅटफॉर्म (Window Platform) बनविणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 कलम 2 (2) अंतर्गत मे.क्रिष्णा कंन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणेस मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर-5 गायकवाड पाडा (खडी मशीन) येथील डंपींग ग्राउंडवर उल्हासनगर शहराचा सर्व कचरा दैनंदिन जमा केला जातो. त्यामुळे सदर ठिकाणी मोठया प्रमाणावर वाहनांची वाहतूक सुरु असते. तेथील रस्ता सुस्थितीत असणे अत्यंत आवश्यक आहे.

सद्यस्थितीत पोच रस्ता कच्च्या स्वरुपात असून रस्त्याची अवस्था दयनीय आहे. पावसाळा सुरु झाला असून कचरा वाहतूकीच्या वाहनांमुळे सदर रस्त्यावर मोठे खड्डे निर्माण झाले आहेत. त्यामुळे तेथे अवजड वाहनांचा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. रस्ता खराब झाल्यामुळे तेथील स्थानिक नागरीकांनी यापुर्वी वाहने अडवून रस्ता बनविण्याची मागणी केलेली आहे. तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियानाअंतर्गत कचरा उतरण्याकामी प्लॅटफॉर्म (Window Platform) करणे बंधनकारक/ गरजेचे आहे. मा.आयुक्त यांनी सदर ठिकाणी वरील काम करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्यानुसार या विभागामार्फत सदर कामाचे रु.48,50,000/- अंदाजे एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. स्वच्छ भारत अभियान आर्थिक वर्ष 2018-19 मध्ये 10 कोटीची तरतूद करण्यात आली असून त्यामधून भागवू शकतो.

सदर कामाची तातडी पाहता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 कलम 2 (2) अंतर्गत मे.कृष्णा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांचेमार्फत करुन घेणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** १२ **दिनांक:— ७/७/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-5 येथील डंपींग ग्राउंड (खडी मशीन) येथे पोच रस्त्याचे काम व फक्त ३४,६०,०००/— लाखाचे प्लॅटफॉर्म (Window Platform) बनविणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे प्रकरण 5 कलम 2 (2) अंतर्गत मे.क्रिष्णा कंन्स्ट्रक्शन यांचेकडून करुन घेणेस मान्यता देत आहे.

**कारण**

तेथे रहदारीचा रस्ता असल्याने रस्त्याची अवस्था खराब असून रस्त्यावर खड्डे पडल्याने रस्ते दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

——————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ५ :—** चहा कॅन्टीन भाडे तत्वावर चालविण्यास जयदिप महिला मंडळ, यांना एक वर्षाकरीता जागा उपलब्ध करून देणेस व त्यांच्याशी थेट संविदा करण्यास मान्यता देणे

——————————————————————————————————————

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**साहेब, हा धोरणात्मक निर्णय आपण येथे घेवु शकतो.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**पॉलिसी नाही आहे ही यामध्ये आपली जी जागा आहे आपण त्यांना कॅन्टीन चालविण्यासाठी देत आहोत. ती आपली मालमत्ता आहे ती देत आहोत. त्याची निविदा सुध्दा झाली आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**निविदा झाली आहे पारीत करा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ५ :—** चहा कॅन्टीन भाडे तत्वावर चालविण्यास जयदिप महिला मंडळ, यांना एक वर्षाकरीता जागा उपलब्ध करून देणेस व त्यांच्याशी थेट संविदा करण्यास मान्यता देणे

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयाच्या आवारात पंपहाऊस जवळील कॅन्टीनच्या जागेचे मोजमाप करून उपलब्ध २७० चौ.फुट. क्षेत्रफळाचे सा.बांधकाम.विभाग.उल्हासनगर महानगरनपालिका यांचेकडुन चालू रेडीरेकनरनुसार मासिक भाडे आकारणी रक्कम रू.१६,१६८/— इतकी आकारणी निश्चित केली आहे. चहा कॅन्टीन भाडेतत्वावर चालविण्यास देणेबाबत स्थानिक महिला बचत गट/महिला मंडळ यांचेकडुन दि. २४/०५/२०१८ पर्यंत कार्यालयीन कामकाजाचा दिवशी दु.०३:०० वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. उक्त विहीत कालावधीत खालीलप्रमाणे स्थानिक महिला बचत गट/महिला मंडळाचे एकुण ०७ निविदा प्राप्त झाल्या आहेत. संबंधीत बचत गट/महिला मंडळांना विहित मुदतीत निविदेच्या पाकिट क्र.१ सोबत सादर केलेली माहिती खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदा सादर केलेल्या महिला बचत गट/ महिला मंडळाचे नाव. | पाकिट क्र. १. | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | सुरक्षा अनामत रक्कम जमा | एस.जी.एस क्र. (एन.यु.एल.एम. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **केल्याची पावती क्र. व दिनांक.** | **विभागाकडील)** | |
| १. | जयश्री महिला बचत गट. | पावती क्र. २६०/२५९४८<br>दि.१०/५/२०१८<br>रू. ५०००/— | ४०५<br>दि.२५/३/२०१३ | **निविदा ग्राहय** |
| २. | जयदिप महिला मंडळ. | पावती क्र. २६०/२५९४९<br>दि.१०/५/२०१८<br>रू. ५०००/— | धर्मादाय आयुक्त, ठाणे, यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्राचा क्र.१७२०५.<br>दिनांक. | **निवीदा ग्राहय.** |
| ३. | सम्यक महिला बचत गट. | पावती क्र. २६०/२५९५३<br>दि.११/५/२०१८<br>रू. ५०००/— | २७४१६९००३६१ | **निविदा ग्राहय** |
| ४. | सिध्दांत समाज विकास संस्था. | धनादेश क्र. ४०००९८०४८<br>दि.११/५/२०१८<br>रू. ५०००/— | ............ | महिला बचत गट/महिला मंडळ नसल्याने याबाबत उपस्थित महिला बचत गटाच्या प्रतिनिधींनी हरकत घेतल्याने निविदा उघडली नाही. |
| ५. | प्रगती महिला बचत गट. | पावती क्र. २६०/२५९५२<br>दि.११/५/२०१८<br>रू. ५०००/— | २७४१६९००२८९ | **निविदा ग्राहय** |
| ६. | धम्मदीप महिला बचत गट. | पावती क्र. २६०/२५९५४<br>दि.११/५/२०१८<br>रू. ५०००/— | २७४१६९००२७४ | **निविदा ग्राहय** |
| ७. | यशोधरा महिला बचत गट. | ........... | २७४१६९००१४७ | सुरक्षा अनामत रक्कम भरणा केली नाही. निविदा अग्राहय |

उपरोक्त चहा कॅन्टीन संबंधीच्या प्राप्त **०७** सिलबंद निविदा हया दि. १४/०५/२०१८ रोजी सायं ०५:१० वा. मा.उप—आयुक्त (मुख्यालय) यांचे दालनात उपस्थित निविदा निवड समिती, अधिकारी (मु.ले.अ), (मु.ले.प.) व उपस्थित महिला बचत गट/महिला मंडळ यांच्या समक्ष उघडण्यात आल्या. त्यापैकी उक्त अ.क्र. ०४ वरील महिला बचत गट/महिला मंडळ नसल्याने याबाबत उपस्थित महिला बचत गट/महिला मंडळ यांचे प्रतिनिधी यांनी हरकत घेतल्याने तसेच, अ.क्र ०७ वरील महिला बचत गटाने इसारा रक्कम भरली नसल्याने सदर ०२ निविदा ग्राहय धरण्यात आल्या नाहीत. उर्वरीत ०५ महिला बचत गट/महिला मंडळ यांनी सादर केलेल्या निविदेतील चहा कॅन्टीनबाबत वार्षिक दर पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | महीला बचत गट/महिला मंडळाचे नाव. | सादर केलेले निविदा दर | शेरा. |
|---|---|---|---|
| १. | जयश्री महिला बचत गट. | रू. २,००,०००/— | |
| २. | जयदिप महिला मंडळ. | रू. २,५२,०००/— | |
| ३. | सम्यक महिला बचत गट. | रू. २,१५,६१६/— | |
| ४. | सिध्दांत समाज विकास संस्था. | .................. | |
| ५. | प्रगती महिला बचत गट. | रू. २,०४,२१६/— | |
| ६. | धम्मदीप महिला बचत गट. | रू. १,९५,०००/— | |
| ७. | यशोधरा महिला बचत गट. | .................. | |

उपरोक्त ०५ महिला बचत गट/महिला मंडळ यांच्या ग्राहय धरलेल्या निविदेतील नमुद केलेले वार्षिक दर पाहता तुलनात्मकदृष्टया जयदिप महिला मंडळ, श्रीरामनगर. से. २८. उल्हासनगर—४. यांनी चहा कॅन्टीनसंबंधी वार्षिक उच्चतम दर रक्कम. **रू. २,५२,०००/—** एवढे नमुद केलेले आहे.

त्यानुसार जयदिप महिला मंडळ, यांना एक वर्षाकरीता चहा कॅन्टीन भाडे तत्वावर चालविण्यास जागा उपलब्ध करून देणेस व त्यांच्याशी थेट संविदा करण्यास मान्यता मिळणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ अन्वये प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे मंजूरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १३** **दिनांक:— ७/७/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार चहा कॅन्टीन भाडे तत्वावर चालविण्यास जयदिप महिला मंडळ, यांना एक वर्षाकरीता महापालिका मुख्यालयाच्या आवारात जागा उपलब्ध करून देणेस व त्यांच्याशी थेट संविदा करण्यास मान्यता देणे

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** उल्हासनगर शहरातील दुभाजके यांचे सुशोभिकरण करणेचे काम **"चालविणे व हस्तांतरीत करणे"** या तत्वावर उल्हासनगर शहराच्या सौंदर्यात भर पडण्याच्या दृष्टीने मे.रिजेन्सी निर्माण लिमिटेड यांचा वरील प्रस्ताव मान्य होवून त्यांचेशी करारनामा करणेस व भविष्यात अशा सेवाभावी संस्था / विकासक यांचेकडून अशाप्रकारचे विनाशुल्क प्रस्ताव आल्यास त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणे

---

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**हा महासभेचा विषय आहे की स्थायी समितीचा विषय आहे.

**महापालिका सचिव :—**ज्या विभागाने आणले आहे त्यांनीच सांगावे.

**श्री. जितु चोईथानी, उप अभियंता:—**हा प्रस्ताव सेवाभावी संस्था/विकासक यांचेकडुन विनाशुल्क प्रस्ताव आल्यास करारनामा करण्यासाठी मान्यता देण्यास आणला आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**हा महासभेचा विषय आहे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**हा स्थायी समितीत का आणला मग? सांगा ना, त्यांना आपण परमंनंटली देत नाही आहोत ना. मी त्यांना बोललो होतो पण त्यांचे म्हणणे होते की स्थायीची आपण मंजुरी घेवु.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**हे देण्यास काही मोठी गोष्ट नाही.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**दयायला काही हरकत नाही.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**परमनंट देत आहात काय?

**श्री. जितु चोईथानी, उप अभियंता :—**५ वर्षासाठी देत आहोत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यात महापालिका जो खर्च करणार तो खर्च आपला वाचत आहे.

**श्री. जितु चोईथानी, उप अभियंता:—**आणखी सेवाभावी संस्था येवु शकता त्यास सुध्दा मान्यता दयावी लागेल. सप्टेंबरमध्ये मालमत्तेची जाहिरात करण्यास दयावे लागेल.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**सर्वसंमतीने पास करावा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**महासभेची आवश्यकता नाही. स्थायी समितीच आवश्यकता नाही. आयुक्त साहेबांना स्वत:चा अधिकार आहे. यात काही खर्च होत नाही आपण कोणासही देवु शकता. हा आपण पास करु या.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**एक मिनिट, यात काही रस्ता टाकायचा आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**हो सांगा ना कोणता ते.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**मा. आयुक्त साहेब, हा फारच चांगला विषय तुम्ही येथे आणला आहे. मी आपणांस धन्यवाद देतो व त्याचबरोबर आपणांस विनंती करतो, आमच्याकडे उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत ५०० मिटरपेक्षा कमी छोटे गार्डन आहेत, ते गार्डन सुध्दा मेंटेन करावे व सेवाभावी संस्थेस बोलवुन लाईट लावणे, सेक्युरीटी गार्ड ठेवणे वगैरे सर्व काही वाचणार. आपण ५०० मिटरपेक्षा कमी छोटया उदयानासाठी पेपरात जाहिरात दया. ज्या काही सेवाभावी संस्था आहेत २ वर्ष आहे, ५ वर्ष आहे त्यांना दया. मी आयुक्तांना प्राधिकृत करतो.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील :–</u>**आपण हे ५०० मीटरचे नका टाकु.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>**ती जागा हडप होईल नंतर.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील :–</u>**५०० मीटरचे नका टाकु आम्ही फक्त आता मेंटेनन्ससाठी देत आहोत.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>**येथे अशी परिस्थिती आहे, आपण परिवहनला दिले आहे, आज काय परिस्थिती आहे.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:–</u>**उदयानाचे तसे होणार नाही. कसे आहे माहित आहे का, त्यावेळेला जे ॲग्रीमेंट केलेले होते, ते ॲग्रीमेंट कसे केले होते यावर सर्व अवलंबुन आहे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>**तुम्ही गार्डनचे देवु नका, रात्रभरात तेथे सीडी तयार होते.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**यामध्ये अधिका–यांची चुक आहे की ज्यावेळेस त्या प्लाटचा ताबा दिला त्याचा दंड नाही घेतला की आम्ही माजमोप करुन एवढे तुम्हांला प्लाट दिला आहे. आपणाकडे पुरावा नाही की तुम्ही त्यांना एवढा प्लाट दिला आहे. आपल्या ठरावात नमुद आहे, मी परिवहन विषयी बोलत आहे. जेव्हा आपण त्याच्याकडुन ताबा घेतो तेव्हा ताबा पावती त्याच्याकडुन घेतली पाहिजे ना. आपणांस ताबा पावती दिली नाही, त्यामुळे त्याने ती जागा हडपली. ती आपली चुक आहे, आपले काम आहे मोजमाप करण्याचे. त्याच्याकडुन लिहुन घ्यावे की ५०० मिटर आहे, ५००० मिटर आहे. आपण ताबा पावती घेतली पाहिजे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**त्यानंतर काही फरक पडला आहे का.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**तेच होणार.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**तेच होणार, आता तर आणखी इंजिनिअर कमी आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**अकांटब्लेटी पाहिजे ना. हा विषय पारीत करा, इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>**माझा रस्ता घ्या. कल्याण हद्दी ते श्रीराम चौक, श्रीराम चौक ते नेताजी.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**ही जी यादी बनविली आहे ती १४ रस्त्यांची आहे. त्यामध्ये आणखी हे रस्ते ॲड करा.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>**आणि साहेब यामध्ये हे तर कराच करा पण आपले जे एन्ट्री गेट आहे, शिवाजी छत्रपती महाराज एन्ट्री गेट आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर एन्टी गेट आहे, असे जे एन्टी गेट आहे तेथे सुध्दा करा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**वाको कंपाउंड ते मोर्या नगर घ्या.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**आपण हे स्थायी समितीत प्रपोजल घेवु शकतो ना, ठेका दिला नाही, महापालिकेचा पैसा वाचेल. हे शहर हिताचेच आहे ना, धोरणात्मक निर्णय आहे तर महासभेत का नाही घेत. महासभेचा अधिकार आहे तर आपण का करत आहोत येथे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**सर्वच बोलत आहेत आपला पैसा वाचणार, हे आहे ते आहे. तो सुध्दा त्याची जाहिरात करणार ना. पैसा वाचणार तो काही मेहरबानी करत नाही महापालिकेत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपणाकडे कोणती एजन्सी आहे तर आपण आणा त्यास. फुकट नाही करत.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**त्यापेक्षा निविदा मागवा.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**तो काय मेहबानी करत आहे आपणावर तो जाहिरात करेल.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपण केडीएमसी पहा तेथिल रस्ता, संपुर्ण चौक पहा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**नाहीतर महापालिकेतर्फे जे मुख्य रस्त्यावर लावले आहे ते. तो जाहिरात देत आहे, तो कोणता पेंट लावणार आहे, बाम लावणार आहे, नाहीतर महापालिकेतर्फे जे मुख्य रस्त्यावर लावले आहेत. कोणती लावणार ते आपणांस माहित नाही.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**कोणत्या रस्त्यावर लावले आहे.

**सदस्य श्री. राजेदं चौधरी :—**सांगा डिझाईन काय आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**त्यास देण्यास हरकत नाही पण झाडे कोणती आणणार ते महत्वाचे आहे. नाहीतर त्याचा उद्देश आहे, माझी जाहिरात करायची. त्याने जी झाडे लावली ती कोणती, आपणाकडे काय आहे. यांना कोणती झाडे लावायची आहे यांना तरी माहित आहे का?

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**कल्याण अंबरनाथ रोडची परिस्थिती काय आहे, एक एक झाड किती मोठे असणार ते मी दाखवितो आपणांस जावुन. आज आपणाकडे जे एमएमआरडीए रोड डेव्हलोप करत आहे ना.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**मुख्य उदयान अधिक्षक आहे का आपणाकडे. कोण बघणार. मुख्य उदयान अधिक्षकच नाही. आणि कोण याचे सुपरविजन करणार.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**शहर अभियंत्यास दया. आपणाकडे लोक नाही तर काय करणार.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**आपणाकडे लोक नाही तर आपणांस शांत बसायचे नाही. म्हणुन आपण काय केले की सेंच्युरी रेयॅान येथिल गार्डन डिपार्टमेंटचा जो माणुस आहे ना त्यास बोलाविले होते त्याचे आणि यांचे कॉऑर्डीनेशन करुन दिले आम्ही. त्याच्याकडुन मार्गदर्शन घ्या, कुठल्या कुठल्या व्हेराईटी आहेत, ते लिहुन दिले आहे त्यांनी त्या व्हेराईटी त्यांच्याकडुन घेवु.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**या ठरावाबाबत आयुक्त साहेबांना प्राधिकृत करण्यात येत आहे. आणि पास.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**आपण ॲडव्हर्टायझींग करतो, निविदा काढतो किती पैसे मिळतात महापालिकेला माहित आहे ना. काही आहेच नाही हे काय बोलत आहात आपण. शहरात आपण किती जाहिराती देतो त्याचे किती पैसे मिळतात आपणांस.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**आपण डिफर करतो कोणत्याही संस्थेस दयायचे नाही. याची भले निविदा काढा. काम होत आहे शहराचे उगाच आपण आपसात हे करतो.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**आपसाच्या गोष्ट नाहीत. जेव्हा सूचना वगैरे काढतात तर तेव्हा चर्चा केली पाहिजे ना आमच्याशीही. समजत नाही का चर्चा करायची आमच्याशी. आमचा अधिकार आहे येथे बोलण्याचा ते आम्ही बोलु शकतो.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**चर्चा केली पाहिजे, बरोबर आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**आमच्यावर कोणी मेहरबानी करत नाही.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**भलेही यास पाच वर्षाच्या जागी तीन वर्ष ठेवा. शहरात एक एक्सपरीमेंट झाले पाहिजे. नविन कामासाठी शहरात एक्सपरीमेंट झाले पाहिजे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**ठिक आहे बाबा झाले ना.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**पाच वर्ष देवु नका, भले तीन वर्षसाठी दया. एक्सपरीमेंट करा.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**ते आमच्यावर काही मेहरबानी करत नाहीत.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**जाहिरातीचे सुध्दा त्यात माप लिहिले आहे की कसे करणार छोटे करणार वगैरे. मेहरबानी नाही करत आपले सुध्दा काम होणार त्याची सुध्दा जाहिरात होणार. एक दुस—यावर निर्भर आहे तर भलेही दोन वर्ष, तीन वर्ष करा, पाच वर्ष करु नका.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**आपण घाईही करता कामा नये, कोणता व कशाप्रकारे विकास केला पाहिजे. मुख्य म्हणजे शहरातील सुशोभिकरण झाले पाहिजे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**ठिक आहे, तीन वर्षासाठी दया.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**चांगली फुल झाडे लोकांना दिली पाहिजेत.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**साहेब, तुम्ही सेंच्युरी रेयॉन येथुन ज्यांना आणले होते त्यांच्याकडुन झाडे घ्या. तीच झाडे मागवा.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**आपण निविदा करा ना.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील :—</u>**आपली दुसरी सुध्दा निविदा आहे. आपल्याकडे गार्डन विभागात कोणी नाही आणि आपणाकडे जे ग्रीन स्पेसला काम चालु आहे, एक कंन्सल्टंट शासनाने नेमलेला आहे, त्या कंन्सल्टंटने व्हेरायटी दिल्या त्या पाहिल्यानंतर मला असे वाटते इथे त्या व्हेरायटी काही उपयोगाच्या नाहीत, म्हणुन आपण सेंच्युरी गार्डन येथिल माणुस मागविला व त्यास सांगितले की, या परिसरात येणारी झाडे कोणती ती लिहुन दया, डिवायडरवर

कोणती लावायची, शोचे कोणते लावायचे, ही सर्व माहिती त्याच्याकडुन ही लोक घेतील आणि त्यांना ते देतील की हीच झाडे तु घेवुन यायची.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आता ग्रीन स्पेस किंवा दरवर्षी जी झाडे लावतो ती एकाच प्रकारची आहेत, चावडी असते ना तीच झाडे रस्त्यावर आहेत. त्या झाडांची सावली पेक्षा सुशोभिकरणाला त्रासच जास्त होतो.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**नाही, नाही गुलमोहरची लावली तर त्याची सावली चांगली पडते.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**गुलमोहर पावसात तुटतो पण लवकर, मोडतो लवकर.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**त्यापलिकडे व्हेरायटी नाहीच.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**आता ते कसे आहे माहित आहे का, उलटे रोप लावले तर ते जगत नाहीत, त्यामुळे कमीत कमी १० फुट रोपे आणावीत असे मी यांना सांगितले होते. आठ दहा फुटाचे रोप जे मिळाले ते घेवुन आले. नाहीतर आपणांस शहापुरच्या नर्सरीशिवाय कुठला स्कोपच नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. आयुक्तजी, आज मी तक्रार दिली आहे आज आपल्या उदयानात कोणी अतिक्रमण केले तर आपण त्यासाठी काय कारवाई करणार. किती दिवसात कारवाई करणार. एक नंबर बसस्टॉप जवळ २५ वेळा मी पत्र दिले आहे. गार्डनसाठी १५ लाख रुपयाची गेट लावले, महापालिकेच्या निधीतुन पैसा खर्च केला आहे, झाडे लावली आहेत तर तेथे पोलिसांनी भंगारची सर्व गाडया तेथे लावुन ठेवल्या आहेत, जबरदस्ती जमा करुन, मुद्देमाल. लोकांची तेथे झोपडपट्टी आहे, गरीब वस्ती आहे, गार्डन नाही आहे कंपाउंड गार्डनसाठी मारले होते. संपुर्ण पॅनलमध्ये गार्डन बनविण्यासाठी १५ लाख रुपये खर्च केला आहे. गेट लावुन कंपाउंड मारले व त्यांनी तेथे गाडया लावल्या. आता मी पत्र देवुन देवुन थकलो आहे. हे इतिवृत्तात घ्या. आज आपण १३ कोटी वृक्ष लावत आहोत महाराष्ट्रात. त्याची सुरुवात झाली आहे व आमच्या येथे १५—२० वृक्ष लावले आहेत आणखी लावायची आहेत परंतु ती लोक तेथुन गाडया काढत नाहीत. पोलिस लाईनीत पोलिसांची जागा आहे. आपण त्यांना आपणामार्फत पत्र दया की पोलिस लाईनच्या जागेवर गाडया पार्क करा. तेथुन गाडया हटवा. तसेच माझ्या प्रभागात बॅरेक नं. ११३ व ११४ मध्ये पामची झाडे पाहिजे तर कोण देणार ती झाडे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**मालमत्ता विभाग पाहते ना.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**डॉ. बाबासाहेब आंबेडकर गार्डन आहे का.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**डॉ. बाबासाहेब आंबेडकर गार्डन नाही.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**भिमनगरच्या बाजुला डॉ.बाबासाहेब आंबेडकर गार्डन आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**बरोबर आहे तो माझा प्रभाग नाही. शिवसेनेचे महाराज श्री. भुल्लर यांचा प्रभाग आहे. त्याची सुध्दा तपासणी केली पाहिजे. गार्डन चांगले बनविले आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**पर्सनल एका व्यक्तीसाठीच आहे, श्री. नंद जेठानी.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**गार्डन चांगले बनविले आहे, सर्वांनी यावे व जावे त्यास कोणास मनाई नाही. हा विषय आता पारीत करावा.

**महापालिका सचिव :—**यामध्ये वरील अटी व शर्ती सह, आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे असे ठरावात लिहिते.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**ठिक आहे, पास इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**ठिक आहे. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**साहेब, जरा एक वेळा ते सागावे. मी हरकतीच्या मुद्दयावर बोलत आहे ना जरा सांगावे ना की बसस्टॉप येथिल गार्डन मला कधी खाली करुन मिळेल. कधी करणार, कमीत कमी पत्रव्यवहार तरी करावे.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>**होय पत्रव्यवहार करु या ना. मालमत्ता विभाग कोठे आहे,गेले का, तुम्ही सांगा त्यांना मालमत्ता विभागाने पत्र दया.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**नाहीतर प्रभाग अधिका—यांना सांगा ना. २० हजार स्केअर फुटची जागा आहे पोलिस लाईन येथे.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील :—</u>**प्रभाग अधिका—यांचे ते ऐैकणार नाहीत आम्ही करु ते काम.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**ठिक आहे, इतिवृत्ताची वाट न पाहता विषय पारीत करा.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ६ :— उल्हासनगर शहरातील दुभाजके यांचे सुशोभिकरण करणेचे काम "चालविणे व हस्तांतरीत करणे"** या तत्वावर उल्हासनगर शहराच्या सौंदर्यात भर पडण्याच्या दृष्टीने मे.रिजेन्सी निर्माण लिमिटेड यांचा वरील प्रस्ताव मान्य होवून त्यांचेशी करारनामा करणेस व भविष्यात अशा सेवाभावी संस्था / विकासक यांचेकडून अशाप्रकारचे विनाशुल्क प्रस्ताव आल्यास त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणे

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत शहरात शासनाच्या योजनांमधून मुख्य रस्त्यांचे विकास करणेची कामे सुरु आहेत. या रस्त्यांवर बांधण्यात येणारे दुभाजके तसेच अस्तित्वातील दुभाजकांच्या ठिकाणी वृक्षारोपण, विविध सामाजिक संदेश देणारे, सुविचार दर्शविणारे फलक लावून सुशोभिकरण केल्यास शहराच्या सौंदर्यात अधिकाअधिक भर पडणार आहे. उल्हासनगर शहरातील रस्त्यांवरील दुभाजकांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | दुभाजकाची लांबी (मीटरमध्ये) |
|---|---|---|
| १ | शहाड स्टेशन चौक ते उल्हासनगर महानगरपालिका चौकापर्यंत | ३१७.०० |
| २ | कालानी कॉलेज चौक ते ए-१ पाणी पुरी दुकानापर्यंत चौकापर्यंत | २६५.०० |
| | **कल्याण अंबरनाथ रस्ता** | |
| अ) | शास्त्री चौक ते शिवाजी चौंक | २०२.४० |
| ब) | अमिर हॉटेल ते महाराजा हॉल | ११२.५५ |

| | | |
|---|---|---|
| क) | महाराजा हॉल ते (लाल प्रिंटीग प्रेस) ते जेसवानी हॉस्पीटल | १५१.२० |
| ड) | डिंपल बार ते मयुर मोबाईल | २८.१३ |
| इ) | अशोक टॉकीज ते एम.एस.ई.बी.ट्रान्सफार्मर | ८७.४५ |
| ई) | गुरुगोविंद शाळा ते ममता फोटो | १०७.९० |
| प) | अमृत स्वीट कॉर्नर (फालवर लाईन) ते राधास्वामी गेट नं.२ | ८३.०० |
| फ) | कार सजावट (भारत मार्बल) ते डर्बी हॉटेल (१७ सेक्शन) | ११९.०० |
| | **मुकेश टायर ते शास्त्री चौक** | १३५.६० |
| १) | कार गॅलरी ते आईलसिंघानिया चेंबर | ३३.०० |
| २) | मुकेश इंटरप्रायजेस ते साईराम कॉम्प्लेक्स | २१७.४० |
| ३) | सावरकर चौक ते प्रकाश ऑटो | २१५.४० |
| ४) | फुडबाजार ते रेमेंड शो-रुम | १००.०० |
| ५) | महादेव कार सीट ते होंडा शो रुम | २०३.५० |
| ६) | केणी अपार्टमेंट ते साईबाबा मंदिर | ५२.०० |
| ७) | सेंट्रल पार्क ते जकात नाका | ८०.८० |
| ८) | नेताजी चौक ते कैलाश कॉलनी चौक | ११७०.०० |
| ९) | जयबाबा धाम, सगुण पॅलेस जवळ ते करुणा अपार्टमेंट पेट्रोल पंप जवळ | ४१४.०० |
| १०) | लाल चक्की प्रभाराम मंदिर जवळ ते जुन बस स्टॉप, उल्हासनगर-५. | ५९०.०० |
| ११) | ओ.टी.सेक्शन, बॅरेक क्रमांक १९२५ जवळ ते कैलाश कॉलनी, हनुमान मंदिर जवळ | १६५.०० |
| १२) | व्हिनस चौक कोतवाल चौक ते लालचक्की गुरुद्वारा | ६२३.०० |
| १३ | फॉलवर लाईन ते नेहरु चौक | |
| १४ | काजल पेट्रोल पंप येथील रस्ता | |

वरील रस्त्यांवरील दुभाजकांचे सुशोभिकरण करणेचे काम महापालिकेमार्फत करावयाचे ठरविल्यास मोठया प्रमाणात खर्च करावा लागणार आहे. तसेच भविष्यात देखभाल सुध्दा जिकरीची व खर्चीक होणार आहे.

त्यामुळे शहराच्या सौंदर्याच्या दृष्टीने सदर काम **"चालविणे व हस्तांतरीत करणे"** या तत्वावर सेवाभावी संस्था / विकासक यांचेकडून पुढील ५ वर्षापर्यंत निगा व देखभाल राखून करुन घेतल्यास महापालिकेचा निधी वाचणार आहे. सदर दुभाजकांमध्ये सुशोभिकरण तसेच सामाजिक संदेश देणारे फलक लावण्याचा संपूर्ण खर्च काम स्विकारणारी संस्था / विकासक यांचेवर राहील. याच्या मोबदल्यात सुशोभिकरण करणा-या संस्था / विकासक यांना त्यांची जाहिरात प्रसिध्द करण्याचे अधिकार असतील. याकरीता महापालिकेतर्फे विविध जाहिरीतींच्या माध्यमातून जसे की महापालिकेच्या संकेत स्थळ, मुख्यालय इमारतीचा फलक, राज्यस्तरीय तसेच स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन इच्छुक सेवाभावी संस्था / विकासक यांचेकडून प्रस्ताव मागविण्यात येतील. सदर प्रस्तावात खालील अटी व शर्ती असतील.

१) वरील तक्त्यात नमुद केलेल्या रस्त्यांचे दुभाजक यांचे सुशोभिकरण, निगा देखभाल

ही कामे करणे आहेत.

२ सुशोभिकरणात लावण्यात येणा—या झाडे फुलझाडे यांचा प्रकार मुख्य उद्यान अधिक्षक, उल्हासनगर महानगरपालिका यांच्याकडून निश्चित करुन घ्यावा.

३ दुभाजकाचा सुशोभिकरणाचा व देखभालीचा खर्च संस्थेने करावयाचा आहे.

४ महानगरपालिका उपलब्धतेनुसार नळ जोडणी करुन देईल तथापि, दुभाजकाच्या आतील पाणी पुरवठयाची व्यवस्था संस्थेनी करावयाची असून पाण्याचा अपव्यय टाळावयाचा आहे.

५ संस्थेस या सुशोभिकरणासाठी लागणारा संपुर्ण खर्च करावयाचा असून या मोबदल्यात सुशोभिकरण करणा—या संस्थेस त्यांचा जाहिरात करण्याचे अधिकार देण्यात येतील.

६ संस्थेने जाहिरातीसाठी रस्ता दुभाजकास बसविण्यात आलेल्या विद्युत दिव्यांच्या दोन खाबांच्या अंतरामध्ये एक फलक कमाल ०.६० X ०.४५ से.मी. आकाराचा लावावयाचा आहे.

७ विद्युत खांबावर जाहिरातींचे हक्क देता येणार नाहीत

८ जाहिरातीच फलक ग्लो साईन चा लावल्यास विद्युत पुरवठा देयकापोटी खर्च संस्थेने करावयाचा आहे.

९ रस्ता दुभाजक, चौक यांची हिरवळ झाडे लावणे व त्यांची दैनंदिन निगा, देखभालीची जबाबदारी विकासकाची राहील.

१० त्या ठिकाणी वापरण्यात येणारा सर्व कर्मचारी वर्ग, कुशल व अकुशल कर्मचारी, वायरमन, ऑपरेटर्स, माळी इ. विकासकाचा राहील. त्याची कुठलीही जबाबदारी विकासकाचीच राहील.

११ महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून विज कनेक्शन घेण्यासाठी ना हरकत दाखला व इतर आवश्यक सहकार्य दिले जाईल. परंतु त्या पोटी येणारा खर्च जसे पोल उभारणे, अनामत रक्कम, ट्रान्सफार्मर उभारणे, मीटर भाडे इ. विकासकाने द्यावयाचा आहे. तसेच महाराष्ट्र राज्य विद्युत बिल व इतर दायित्व इ. वेळोवेळी भरणे आवश्यक आहे. हस्तांतरणाचे वेळी कोणतीही थकबाकी नसावी.

१२ राज्य/केंद्र शासनाचे धोरणानुसार व नियमानुसार करमणुक कर व इतर आवश्यक कर विकासकाने संबंधितांना वेळोवेळी भरणे आवश्यक आहे. हस्तांतरणाचे वेळी कोणतीही थकबाकी नसावी.

१३ रस्ता दुभाजक विकासकास सुशोभिकरण निगा, देखभाल व दुरुस्तीसाठी दिल्याबाबतचे संबंधित पोलीस ठाण्यास पत्र इ. सहकार्य महापालिकेकडून दिले जाईल.

१४ जागेचा मालकी हक्क कायमस्वरुपी उल्हासनगर महानगरपालिकेचा राहील.

१५ करारनामा करतेवेळी येणारा खर्च तसे स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन फी, विधी सल्लागाराची फी, तसेच वास्तुविशारद व आर.सी.सी. कन्स्लटंट यांची फी तसेच स्टेशनरी खर्च विकासकाने स्वत: करावयाचा आहे.

१६ विकासकाने महापालिकेच्या पुर्व परवानगीशिवाय उद्यानात कोणताही पुतळा अथवा चौथरा बांधू नये, अथवा कोणतेही अनधिकृत बांधकाम करु नये.

१७ रस्ता दुभाजक स्थापत्य कामाच्या दुरुस्तीची जबाबदारी महानगरपालिकेची असेल.

१८ सुशोभिकरण करतेवेळी अथवा पूर्ण झाल्यानंतर गुणवत्ता अथवा इतर बाबतीत नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्यास महापालिकेने दिलेल्या सुचनांची योग्य ती दखल विकासकाने त्वरीत घ्यावयाची आहे. विकासकाला पुरेशी संधी देवूनही कामात सुधारणा न झाल्यास काम काढून घेण्याचा अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहील.

१९ रस्ता दुभाजक या ठिकाणी काम करीत असलेल्या कर्मचा—यांनी कंपनीचे ओळखत्र मुख्य उद्यान अधिक्षक यांचे स्वाक्षरीने प्रमाणित केलेले स्वत:जवळ बंधनकारक राहील.

२० विकासक व त्यांचे ग्राहकास कोणत्याही प्रकारचा तंटा निर्माण झाल्यास महापालिका त्यात पार्टी असणार नाही व त्याबाबत लेखी हमी कंपनीने द्यावी.

२१ कार्यकारी अभियंता/मुख्य उद्यान अधिक्षक व विकासक यांच्यात कोणत्याही प्रकारचा मतभेद निर्माण झाल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त महोदय यांचा राहील व तो निर्णय सर्वांना मान्य व बंधनकारक असेल.

२२ विकासकाचे भागधारक असल्यास आपल्या सर्व भागधारकांची नांवे कार्यकारी अभियंता यांना प्रत्यक्ष काम सुरु होण्यापुर्वी कळवावी.

२३ मुदतीनंतर विकासकाने रस्ता दुभाजक त्यावरील वस्तु व सोईसुविधा, हिरवळ, झाडेझुडपे, कारंजे इ. सुस्थितीत महापालिकेच्या ताब्यात द्यावयाच्या असून त्यांनी लावलेल्या जाहिराती तात्काळ काढून घेणे बंधनकारक राहील.

२४ या करारनाम्याची मुदत ५ वर्षे नंतर मा. आयुक्त महोदय यांना वाटल्यास व वाढविण्याचे ठरविल्यास विकासकाला प्राधान्य देण्यात येईल.

२५ आपणांस देण्यात आलेल्या रस्ता दुभाजक यामध्ये दुस—या जाहिरातदारांस तेथे जाहिरात करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

२६ करारनाम्यातील अटी व शर्तीचा भंग झाल्यास अथवा शोभिवंत झाडांची निगा न राखल्यास देण्यात आलेले विकासकाम काढून घेण्याचा अधिकार मा. आयुक्त महोदय यांना राहील.

वरील प्रस्तावानुसार उल्हासनगर शहरातील दुभाजके यांचे सुशोभिकरण करणेचे काम **"चालविणे व हस्तांतरीत करणे"** या तत्वावर सेवाभावी संस्था / विकासक यांचेकडून वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून पुढील ५ वर्षापर्यंत निगा व देखभाल राखून विविध जाहिरातींच्या माध्यमातून प्रसिध्दी देऊन करुन घेणे प्रस्तावित आहे. याबाबत मे.रिजेन्सी निर्माण लिमिटेड यांनी त्यांचे दिनांक २८/३/२०१८ रोजीचे पत्रान्वये वरील यादीतील १) शहाड स्टेशन चौक ते उल्हासनगर महानगरपालिका चौकापर्यंत २) गुरुद्वारा सी ब्लॉक ते मधुबन चौकापर्यंत ३) उल्हासनगर महानगरपालिका ते स्टेट बँक ऑफ इंडिया ४) कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील शांतीनगर ते साईबाबा मंदीर ५) कल्याण मुरबाड रोड वरील म्हारळ नाका ते कटकेश्वर मंदीर या पाच रस्त्यांवरील दुभाजकांमध्ये त्यांचेतर्फे विनाशुल्क सुशोभिकरण करणेकरीता महापालिकेची परवानगी मागितली आहे. या कामांमध्ये दुभाजकांमध्ये मोठे व छोटे रोपे लावणे, सदर रोपांची वेळोवेळी पाणी व खत घालून निगा राखणे तसेच त्यांच्या कंपनीच्या प्रसिध्दीकरीता जाहिरातीचे फलक लावून दुभाजकांचे सौदर्य वाढविणार आहे.

उल्हासनगर शहराच्या सौंदर्यात भर पडण्याच्या दृष्टीने मे.रिजेन्सी निर्माण लिमिटेड यांचा वरील प्रस्ताव मान्य होवून त्यांचेशी करारनामा करणेस व भविष्यात अशा सेवाभावी संस्था / विकासक यांचेकडून अशाप्रकारचे विनाशुल्क प्रस्ताव आल्यास त्यांचेशी करारनामा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** १४ **दिनांक:— ७/७/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील दुभाजके यांचे सुशोभिकरण करणेचे काम **"चालविणे व हस्तांतरीत करणे"** या तत्वावर उल्हासनगर शहराच्या सौंदर्यात भर पडण्याच्या दृष्टीने मे.रिजेन्सी निर्माण लिमिटेड यांचा वरील प्रस्ताव मान्य होवून त्यांचेशी करारनामा करणेस व भविष्यात अशा सेवाभावी संस्था / विकासक यांचेकडून अशाप्रकारचे विनाशुल्क प्रस्ताव आल्यास प्रस्तावनेतील अटी व शर्तीनुसार त्यांचेशी करारनामा करण्यास आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

**तसेच**

कल्याण हद्द ते श्रीराम चौक, श्रीराम चौक ते नेताजी व वाको कंपाउंड ते मोरयानगरी पर्यंतचा रस्ता घेणे आवश्यक आहे आणि शहरातील अन्य प्रवेशगेटचा समावेश करणे आवश्यक आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :—** मालमत्ता कर विभागातील कार्यरत कॅश कॅबिन मधिल कॅश लिपीक यांना कॅश भत्ता मिळणेबाबत.

---

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**मला याबाबत एक सांगायचे आहे. हा कुठला विभागाचा आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**कर विभागाचा आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**साहेब यामध्ये दुसरा विषय असा आहे, पदाधिकारी आहेत, विरोधी पक्ष नेता आहे, सभागृह नेता आहे, स्थायी समिती सभापती असेल, महापौर असेल, उपमहापौर असेल, पदाधिकारी जोपर्यंत बसतात तोपर्यंत तेथे तुमचा लिपिक बसलेला असतो. मला वाटते यांना सुध्दा त्यांच्याबरोबर घ्यावे, तुमच्या कार्यालयातील असोत. तुम्ही बसतात आठ वाजेपर्यंत तसे तेही बसतात. सर्व लिपिकांना त्यामध्ये समाविष्ट केले तर बरे होईल.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**पदाधिका—यांबरोबर कुठली कॅश हॅण्डलिग होते. हा कॅश हॅण्डलिंगचा विषय आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**पदाधिकारी थांबतात ना, तुमचे लिपिक थांबतात ना.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :—**हा थांबण्याचा नाही कॅश हॅण्डलिंगचा विषय आहे, कॅश भत्तेबाबतचा विषय आहे, कोण आहे मालमत्तेचे सांगा ना.

**महापालिका सचिव :—**तुमचा प्रस्ताव शेवटी आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**ठिक आहे, ठिक आहे. माझा विषय शेवटी आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—** विशेष मोहीमसाठी दिले होते ना कर्मचा—यांना.

**श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालयः—**हा विशेष मोहीमेसाठी नाही, हा कर विभागातील दोन लिपिकांना कॅश भत्ता देण्याविषयीचा आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**ठिक आहे पास, दोन जणांसाठी आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजाः—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ७ :—** मालमत्ता कर विभागातील कार्यरत कॅश कॅबिन मधिल कॅश लिपीक यांना कॅश भत्ता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

आपल्या महापालिका क्षेत्रामध्ये एकुण मालमत्ता १,७०,००० एवढया प्रमाणात असुन, त्यांचे ८ युनिट असुन ५८ वार्ड मध्ये विभाजन करण्यात आले आहे. त्या प्रत्येक युनिट कर निरिक्षक व कर वसुली लिपिक यांना, मा. स्थायी समिती ठराव क्र. ६१ दिनांकः— ३/९/२०१६ नुसार विशेष कर वसुलीसाठी दर महिना रू. २००० मान्य करण्यात आलेले आहेत. त्या वसुली लिपिकांनी वसुल करून आणलेली एका दिवसाला सरासरी २५ ते ३० लाख रोख रक्कम वसुली लिपिकांनी कडून स्विकारून ती बॅकेत भरणा करण्याचे काम श्री. नामदेव चव्हाण, लिपिक, (प्र. रोखपाल) व उमेश हजारे, लिपिक, (प्र. रोखपाल) हे दररोज करत असतात.

तरी युनिट कर निरिक्षक व कर वसुली लिपिक यांना, मा. स्थायी समिती ठराव क्र. ६१ दिनांकः— ३/९/२०१६ या धर्तीवर श्री. नामदेव चव्हाण, लिपिक, (प्र. रोखपाल) व उमेश हजारे, लिपिक, (प्र. रोखपाल) यांना दर महिना रू. २०००, मंजुर करून मिळणेस विनंती.

सोबत व सन २०१४—२०१५ व २०१६—२०१७ चे कॅशबुक आणि मागिल मा. स्थायी समिती ठराव क्र. ६१ दिनांकः— ३/९/२०१६ जोडला आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** १५ **दिनांकः— ७/७/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मालमत्ता कर विभागातील कार्यरत कॅश कॅबिन मधिल कॅश लिपीक श्री. नामदेव चव्हाण, लिपिक, (प्र. रोखपाल) व उमेश हजारे, लिपिक, (प्र. रोखपाल) यांना दर महिना रू. २०००/— कॅश भत्ता देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ८ :—** मा. आयुक्त सो‍ा यांच्यासाठी नविन Ciaz Sigma पेट्रोल वाहन Gem (Government e Marketplace) या संकेत स्थळावरून थेट खरेदी करण्यासाठी मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**कोणती गाडी घेणार आहेत. आयुक्तांनी होण्डा सिटी घेतली पाहिजे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**या साईटवर आपले रजिस्ट्रेशन झाले आहे का.

**श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक:—**होय, रजिस्ट्रेशन झाले आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**होण्डा सिटी असले पाहिजे असे आमचे म्हणणे आहे, ठिक आहे, पास.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—**साहेबांनी आमच्याकडे सुध्दा असेच लक्ष ठेवावे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ८ :—** मा. आयुक्त सो‍ा यांच्यासाठी नविन Ciaz Sigma पेट्रोल वाहन Gem ( Government e Marketplace ) या संकेत स्थळावरून थेट खरेदी करण्यासाठी मान्यता देणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये मा. आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांना कार्यालयीन कामकाजा करीता वाहन क्र MH-०५ P ३०३३ (टाटा माझा) हे वाहन देण्यात आलेले आहे.सदर वाहन सन २०१४ मध्ये खरेदी करण्यात आलेले असुन, आजतागायत एकुन ९५००० किलो मीटर धावलेले आहे. मा. आयुक्त सो‍ा यांना कार्यालयीन कामकाजाकरीता वारंवार मंत्रालय, मुबई येथे जावे लागते आता सदर वाहन वांरवार नादुरूस्त असल्याबाबत वाहनचालकाकडून तक्रार येत आहे. त्यामुळे सदर वाहनाच्या दुरूस्तीवर जास्तीचा खर्च होत आहे. तसेच वाहनाचे धाव देखील ९५००० किमी असुन सदर वाहन शासनानी निर्धारीत केलेली धाव पुर्ण झालेली असल्यामुळे सदर वाहन बदलणे आवश्यक आहे.

शासकीय वाहनांचे किंमती मर्यादा धोरणानुसार विविध पदाधिकारी / अधिकारी यांना त्यांचे दर्जानुसार शासकीय वाहन खरेदी करता असलेल्या किंमत मर्यादा ठरविण्यात आली आहे. या किंमत मर्यादितील वाहन त्यांच्या दर्जानुसार शासकीय वाहन म्हणून अनुज्ञेय राहील.या धोरणामध्ये इतर अधिकारी व पदाधिकारी यांना नवीन वाहन खरेदी करणेबाबत महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वाहन २०१६/प्र.क्र.५१/१६/विनियम मंत्रालय, मुबई ४०००३२ दिनांक २१/१/२०१७ मधील राज्यस्तरीय वाहन आढावा समितीच्या मान्यतेने वाहन अनुज्ञेय केलेले इतर अधिकारी या संवर्गातील इतर पदाधिकारी/अधिकारी यांना त्यांच्या पसंतीनुसार तथापि, रक्कम रू ७ लक्ष (वाहनाची किंमत + विक्रीकर + टेंम्पररी रजिस्ट्रेशन + मुल्यवर्धित कर +.सहाय्यभुत साहित्य (Accessories) इत्यादी अंतर्भुत) या विनिर्दिष्ट किंमत मर्यादेत वाहन खरेदी करणे आवश्यक आहे

यास्तव अधिकारी व पदाधिकारी यांना नवीन वाहन खरेदी करणेबाबतच्या शासन मान्य धारेणानुसार त्यातील विहित मर्यादेपर्यत किंमत असणाऱ्या वाहनांची माहिती घेतली असता में मारूती सुझूकी इंडीया लि. या उत्पादक कंपनीचे वाहन सरकारी दराने ( Gem ) व विशेष सरकारी दराने उपलब्ध असल्याने व धोरणातील वित्तीय मर्यादीत किंमतीपर्यतचे असल्याने खरेदी करणे योग्य होणार आहे.याबाबत में. मारूती सुझूकी इंडीया लि यांचेकडील सरकारी दराचे दरपत्रक Gem ( Government e Marketplace ) या संकेत स्थळावरून मागविण्यात आले आहे.

सदरची वाहन खरेदी करावयाचे झाल्यास ती खालील प्रमाणे होईल.

में मारूती सुझूकी इंडीया लि.

| MODEL | Ciaz Sigma,Petrol |
|---|---|
| category of Vehicles | PC |
| NDP Price | 474900 |
| Discount on NDP(B) | 10202.56 |
| Govt.NDP Price (c=a-b) | 464697.44 |
| Mark up (d) | 5937 |
| Assessable value Without Tax (e=c+d) | 470634.44 |
| IGST/(CGST+SGST)@28%on Assessable value(f=e*28%) | 131777.64 |
| Compensation cess@17%on Assessable value(g=e*28%) | 80007.85 |
| Basic+ GST Payable (h) | 682419.93 |
| Transport Amount Upto mumbai(i) | 13642 |
| IGST/(CGST+SGST)@28%on Transport Amount(j=i*28%) | 3819.76 |
| Compensation cess@17%on Transport Amount(k=i*17%) | 2319.14 |
| Service + GST Payable(i) | 19780.9 |
| Per Unit Cost of Vehicle (Invoice Amount Payable to MSIL) (m=h+l) | 702200.83 |

Ciaz Sigma Petrol रू ७,०२,२००.८३/—(सात लाख दोन हजार दोनशे एक रूपये) या दरात उपलब्ध आहे. रजिस्ट्रेशन व इन्शुरन्स वगळून सदर कार मे. मारूती सुझूकी इडीया लि.यांचेकडून थेट खरेदी करण्यास मान्यता मिळवी.सदर वाहनाची किंमत शासन निर्णयातील दराच्या मर्यादेत आहे.

तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता Ciaz Sigma पेट्रोल वाहन थेट मे. मारूती सुझूकी इंडीया लि.या अधिकृत कंपनीकडून शासनाच्या Gem या संकेत स्थळावरील दराने खरेदी करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.सदरचे वाहन वाहन विभागाचे वाहन खरेदी ( AA – (2) P - II ) या लेखा शिर्षात सन २०१८—१९ मध्ये रू ७८,००,०००/— एवढी तरतुद उपलब्ध असुन या मधुन खरेदी कराण्यात येईल.

उपरोक्त परिच्छेदात नमुद केल्यानुसार Ciaz Sigma (पेट्रोल) वाहन शासनाच्या Gem या संकेत स्थळावरील उपलब्ध दराने प्रत्यक्ष उत्पादक कंपनी यांचेकडून खरेदीच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीपुढे प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. १६** **दिनांक:— ७/७/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मा. आयुक्त सो। यांच्यासाठी नविन Ciaz Sigma पेट्रोल वाहन Gem ( Government e Marketplace ) या संकेत स्थळावरून थेट खरेदी करण्यासाठी प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** अतिधोकादायक इमारतींचे निष्कासन करणेकामी मे.एडिफाईस इंजिनीअरींग कंपनी यांचेशी निविदेशिवाय थेट संविदेस मान्यता देणेबाबत.

---

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**काय आहे विषय.

**श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त :—**साहेब, तीन इमारती आहेत.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**तीन कोठे आहेत, यात फक्त दोनच दिल्या आहेत.

**श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त :—**आधीच वर लिहिले आहे. तीन आहेत. आधीची प्रथम वर लिहिली आहे, पवई चौक येथिल श्रेयस कॉम्पलेक्स, लक्ष्मीनारायण अपार्टमेंट ही अतिशय धोकादायक आहे, तिचा स्लॅब पडला होता, बिल्डींग रिकामी केली आहे. इंजिनिअरचा अहवाल सुध्दा आला की ही इमारत अति धोकादायक आहे. दुसरी आहे मंदार सोसायटी ती सुध्दा धोकादायक आहे. अशा तीन इमारती आहेत साहेब. इमारतीचे लाईट आणि पाणी सुध्दा कट केले आहे. लक्ष्मीनारायण अपार्टमेंटचा स्लॅब मागच्यावर्षी पडला होता. एक आहे अपार्टमेंट ती आपण दोन महिन्यापुर्वी रिकामी केली.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**५ (२)(२) मध्ये देण्यापेक्षा निविदा का नाही मागवत.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**साहेब, यात विषय असा आहे की २४ लाख ३० हजार रक्कम व १८ टक्के जीएसटी.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**साहेब, हे मुख्य रस्त्यावर आहे. पवईचा जकात नाका सुध्दा बाजुलाच आहे.

**<u>श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त :—</u>**एक मिनिट श्रेयस अपार्टमेंटचे सांगतो मी. श्रेयस अपार्टमेंटमधील लोकांनी स्ट्रक्चर इंजिनिअर श्री. नाखवाकडुन तपासणी करुन घेतली. तर त्यांनी इमारत दुरुस्त होवु शकते असा अहवाल दिला आहे. त्यामुळे आपण इमारतधारकांकडुन अंडरटेकिंग घेतले आहे की दुरुस्ती चालु केली म्हणुन नाही केली तर आपण ती इमारत निष्कासित करुन टाकु.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**साहेब, परिस्थिती अशी आहे की २४ लाख ३० हजार व परत १८ टक्के जीएसटी. मग ही रक्कम तुम्ही काढली कोठुन.

**<u>श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त :—</u>**२०१६ मध्ये आपण निविदा मागविली होती, त्यानुसार २ लाख १३ हजार परडेने निविदा मागविली होती. आता १३ ते १४ दिवसाचा कालावधी लागणार आहे. २०१६ च्या तुलनेत आता तुलना केली तर तोच दर लागणार आहे. एक इमारत निष्कासित करायला ४ ते ५ दिवस लागतात. तीन इमारत आहेत.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**एकाची तर दुरुस्ती होणार आहे ना.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**मा. आयुक्त साहेब, आपण हया ज्या जर्जर इमारतींना तोडतो तर याप्रकारचे निविदा आपण कित्येक वेळा दिल्या आहेत. २०१६ मध्ये सुध्दा दिली होती. त्यावर आपण खर्च करत आहोत, तर तो खर्च आपण इमारतीच्या मालकांपासुन किंवा प्रापर्टी होल्डर आहेत त्यांच्याकडुन वसुल करतो त्यात लिहितो की काय करतो.

**<u>श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त :—</u>**आपण मालमत्ता विभागास पत्र देतो व त्यांचे जे मालमत्तेचे देयक असते त्यामध्ये समाविष्ट करायला आपण मालमत्ता विभागास पत्र दिले आहे. यापुर्वी जे आपण तोडले ते मालमत्ता विभागास दिलेले आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**पुढे जावुन कोणी बिल्डर किंवा डेव्हलोपर आला तर तो पैसा वसुल झाला पाहिजे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**आता तर काही होणार नाही पुढे जावुन होईल.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**कर विभागाने लगेच त्याची नोंद घ्यायची. आणि दोन वर्षानंतर किंवा चार वर्षापर्यंत वजा करण्यात येत आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**जेवढया काही तोडल्या त्या सर्वांना असे केले आहे.

**<u>श्री. जेठानंद ताराचंद, प्र. उपकर निर्धारक व संकलक:—</u>**होय, आम्ही लगेच नोंद घेतो.

**<u>श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त :—</u>**होय.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेरावः—</u>**श्री. शिंपी साहेब, एका दिवसाचे २ लाख १२ हजार तुम्ही १३ दिवसाचे दिले, अंदाजे वाढले तर मग?

**<u>श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त :—</u>**नाही वाढणार नाही, आता जी रक्कम दिली त्याने लमसम दिली आहे. आणि कितीही दिवस लागले तरी तेवढेच पैसे दयायचे आहे आपल्याला. दोन दिवस लागले तरी तेवढेच पैसे. आपण पर डे च्या हिशोबाने घेतलेले आहे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**ठिक आहे पास.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—</u>**काम जर लवकर नाही केले दिवस वाढले तर म्हणुन आपण लमसम घेतले.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**ठिक आहे, पास इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पास.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजाः—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑**विषय क्र. ९ :—** अतिधोकादायक इमारतींचे निष्कासन करणेकामी मे.एडिफाईस इंजिनीअरींग कंपनी यांचेशी निविदेशिवाय थेट संविदेस मान्यता देणेबाबत...

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात दिनांक १९/६/२०१८ रोजी सकाळी १०.३० चे सुमारास श्रीराम चौक, उल्हासनगर—३ या ठिकाणी महापालिकेच्या जकात नाक्याच्या मागील बाजुस असलेल्या श्रेया कॉम्प्लेक्स या इमारतीचा काही भाग धोकादायक झाल्याची बातमी प्राप्त झाली. सदर ठिकाणी पाहणी केली असता तळघर+तळमजला+ ४ मजले अशा स्वरुपाच्या इमारतीच्या दर्शनी भागाचा एक कॉलम तुटल्याचे निदर्शनास आले. इमारतीच्या अंतर्गत भागाची पाहणी केली असता इमारतीच्या आतील कॉलमला देखिल तडे गेल्याचे दिसून आले तसेच इमारत अतिधोकादायक असल्याचा अहवाल शहर अभियंता यांनी दिलेला आहे.

सदर इमारत उल्हासनगर—कल्याण या मुख्य रस्त्यावर आहे. इमारत अतिधोकादायक असून पावसाळयामध्ये इमारत कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे सदरची इमारत पूर्णपणे निष्कासीत करणे आवश्यक आहे. सदर इमारत बहुमजली असून निष्कासीत करावयाची झाल्यास त्यासाठी महापालिकेकडे आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध नाही. तसेच मनुष्यबळाद्वारे सदरची इमारत निष्कासीत करणे शक्य नाही.

त्याचप्रमाणे प्रभाग समिती क्र. ३ व ४ मध्ये अशाच प्रकारे दोन इमारती ह्या अतिधोकादायक म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहे. सदर इमारती अतिधोकादायक असल्याने रिकाम्या करुन सिलबंद करण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतींचा स्लॅब व प्लास्टर निखळत असून परिसरातील नागरिकांना देखिल ह्या अतिधोकादायक इमारतींमुळे धोका निर्माण होवू शकतो. यासाठी सदरच्या इमारती देखिल पूर्णपणे निष्कासीत करणे आवश्यक आहे. सदर इमारतींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

१) लक्ष्मीनारायण अपार्टमेंट, स्टेशन रोड, उल्हासनगर—३. तळमजला + ५

२) मंदार सोसायटी, शिवनगर, लालचक्कीजवळ, उल्हासनगर—४ तळमजला+४

यापूर्वी महापालिका क्षेत्रातील अतिधोकादायक इमारती ह्या हायरीच जॉ क्रशींग मशिनद्वारे निष्कासीत करण्यात आल्या होत्या. सन २०१६ मध्ये एडिफाईस इंजिनीअरींग या कंपनीला निविदा काढून इमारत निष्कासनाचे काम देण्यात आले होते. सदर कंपनीच्या प्रतिनिधींना इमारत निष्कासनाबाबत विचारणा केली असता त्यांनी तीन इमारती निष्कासीत करणेसाठी रु. २४,३०,०००/— + १८ टक्के जीएसटी एवढा खर्च असल्याबाबतचे दरपत्रक सादर केले आहे. यामध्ये ते इमारतीचे पूर्णपणे निष्कासन करणार असून डेबरीज हटवून त्याची वाहतुक देखिल करणार आहेत.

सदर कंपनीला सन २०१६ मध्ये प्रतिदिन रु.२,१२,०००/– या दराने निविदा मागवून काम देण्यात आले होते. सदर तीन इमारती निष्कासीत करणेसाठी अंदाजे १२ ते १३ दिवसांचा कालावधी लागणार असून पूर्वीच्या दरांशी तुलना केली असता दर वाजवी दिसून येतात.

सद्यस्थितीत सदरच्या तीनही इमारती अतिधोकादायक असून पावसाळा सुरु झालेला आहे. अतिवृष्टी झाल्यास इमारती कोसळून जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही या कामासाठी निविदा प्रक्रिया केल्यास निविदा अंतिम होण्यासाठी किमान १ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर कामाची अतिआवश्यकता पाहता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ (२)(२) अन्वये निविदा न मागविता मे. एडिफाईस इंजिनीअरींग या कंपनीशी थेट संविदा करणे उचित वाटते. महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात अनधिकृत बांधकाम निष्कासन खर्च ''इ.संकिर्ण (१४) या लेखाशिर्षाखाली रु १.०२ कोटी एवढी तरतुद उपलब्ध आहे. त्यामधून सदरचा खर्च करता येईल.

सदरच्या कामाची अतितातडी पाहता तीन अतिधोकादायक इमारती निष्कासीत करणेकामी मे.एडिफाईस इंजिनीअरींग कंपनी यांचेशी निविदेशिवाय थेट संविदे करणेस मान्यता मिळणेकामी स्थायी समितसमोर प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** १७ **दिनांकः– ७/७/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार तीन अतिधोकादायक इमारतींचे निष्कासन करणेकामी मे.एडिफाईस इंजिनीअरींग कंपनी यांचेशी निविदेशिवाय थेट संविदेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**⇨ विषय क्र. १० :–प्रस्तावाची सूचना**

महानगरपालिकेमधील पदाधिकारी व इतर अधिकारी कार्यालयाकडे काम करणा–या चतुर्थश्रेणी कर्मचा–यांच्या अतिकालीन भत्यात रु. १०००/– वरुन रु. २०००/– अशी वाढ करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. भगवान भालेराव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**साहेब चतुर्थश्रेणी कर्मचा–यांना एक हजार देतोच.

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः–**सर्वांनाच देतो.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**नाही साहेब, सचिव कार्यालयाच्या आणि तुमच्या कार्यालयाच्या शिपायांना देत नाही. काही ठराविक कार्यालयाच्या शिपायांना देतो, त्यात लिपिकांना नाही. शिपायांनाच देतो तर त्यांना १००० वरुन

२००० रक्कम वाढ करावी आणि सचिव कार्यालय व तुमच्या कार्यालयातील लिपिक आहेत ते सुध्दा थांबत असतात. फक्त पाच असे जसे विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, महापौर, उप–महापौर, स्थायी समिती सभापती आहेत. असे पाच कार्यालयातील तसेच त्यात सचिव कार्यालय व तुमच्या कार्यालयातील लोकांना मिळुन सात कार्यालयात लाभ मिळावा.

**आयुक्त, श्री.गणेश पाटील:–**अकाउंटवाले कोण आहेत, त्याचे फायनांशिअल इंटीमेशन पहावे लागणार ना.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**एक हजार देतो तर दोन हजार करावेत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:–**हजाराचे दोन हजार काही हरकत नाही.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**सात हजार झाले ना.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**आपण नविन करत नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**नाही नविन करत नाहीत.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**नाही, नाही नविन घेत आहोत ना, सचिव कार्यालय, आयुक्त कार्यालयाचे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :–**दोन प्रस्ताव आहेत ना यांचे एक ज्यांना देत आहोत त्यांना दोन हजार करायचे आहेत.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**आणि सचिव कार्यालय व आयुक्त कार्यालय यांना सुध्दा.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**सचिव कार्यालयात फक्त शिपायांना मिळतात त्यांच्या लिपिकांना मिळत नाही.

**महापालका सचिव :–**सचिव कार्यालयास सुध्दा लिहा. आणि साहेब, दिवसानुसार मिळते. कधी कधी थांबावे लागते.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**जनरली थांबतात.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:–**हे थांबले तरच आहे का?

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**होय.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :–**लमसम देत आहोत ना, आपण यात तास वगैरे ठेवत नाहीत.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**नाही. आणि यामध्ये फक्त लिपिक वाढतील.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील :–**नाही लिपिकांसाठी नाही.

**श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय:–**साहेब, शासनाने जीआर काढला आहे. फक्त चतुर्थश्रेणी यांना देण्यात येईल परंतु लिपिकांना ओव्हरटाईम देण्यात येणार नाही.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**मग यामध्ये तुमच्या विभागातील सुध्दा फक्त शिपाई घ्यावे लागतील. सचिव कार्यालयातील घेतात, महापौर कार्यालयातील नाही घेतले तुम्ही.

**<u>महापालिका सचिव :—</u>**नाही, महापौर कार्यालय, स्थायी समिती माझ्याकडुन सहया घेवुन जातात, जास्त वेळ थांबले तर बायोमेट्रीकप्रमाणे त्यांना दिले जाते.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**फक्त आता लिपिकांना नाही मिळणार.

**<u>महापालिका सचिव :—</u>**नाही लिपिकांना नाही मिळणार.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**ठिक आहे, पास.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १० :— <u>प्रस्तावाची सूचना</u>**

महानगरपालिकेमधील पदाधिकारी व इतर अधिकारी कार्यालयाकडे काम करणा—या चतुर्थश्रेणी कर्मचा—यांच्या अतिकालीन भत्यात रु. १०००/— वरुन रु. २०००/— अशी वाढ करणेबाबतचा पालिका सदस्य श्री. भगवान भालेराव यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

मा. महापौर, मा. उप—महापौर, स्थायी समिती सभापती, मा. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उप—आयुक्त इत्यादी पदाधिकारी व अधिकारी यांचेकडील चतुर्थश्रेणी (शिपाई व सुरक्षारक्षक) कर्मचा—यांना स्थायी समिती ठराव क्र. ६२, दिनांक ११/११/२००२ व ७५ दिनांक २५/९/२००३ व ठराव क्रमांक ५९, दिनांक १७/१२/२०१३ अन्वये प्रतिमहा १०००/— रुपये अतिकालीन भत्ता देण्याबाबत मंजूरी देवून त्यानुसार आजपर्यंत या कर्मचा—यांना अतिकालीन भत्ता देण्यात येत आहे.
परंतू सदर कर्मचा—यांनी अतिकालीन भत्यामध्ये वाढ करुन मिळण्याबाबत माझ्याकडे विनंती केली आहे.

सदर कर्मचारी हे कार्यालयीन वेळेनंतर व काही वेळेस सुट्टीच्या दिवशीही कार्यालयीन कामकाजाकरीता कार्यालयात येत असतात. महापालिकेतील वरील नमूद पदाधिकारी व अधिकारी यांचे कार्यालयात काम करणा—या चतुर्थ श्रेणी कर्मचा—यांना रु. १०००/— ऐवजी रु. २०००/— अतिकालीन भत्ता हा विषय स्थायी समिती पटलावर घेण्यात यावा.

**<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> १८** **<u>दिनांक:—७/७/२०१८</u>**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार महानगरपालिकेमधील पदाधिकारी व इतर अधिकारी कार्यालयाकडे काम करणा—या चतुर्थश्रेणी कर्मचा—यांच्या अतिकालीन भत्यात रु. १०००/— वरुन रु. २०००/— अशी वाढ करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—**आता हे शेवटचे आहे आता जे काही ठराव वाचले जातील ते इतिवृत्त वाचल्यानंतरच वाचले जाणार.

सांयकाळी ५.३५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१०/८/२०१८

**दि. १०/८/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार, दिनांक १०/८/२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | सदस्य |
| ५ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| ६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ७ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ८ | श्री.भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ९ | श्री. भगवान शंकर भालेराव | सदस्य |
| १० | श्रीमती मिनाकौर लबाना | सदस्या |
| ११ | श्रीमती रेखा ठाकुर | सदस्या |
| १२ | श्रीमती दिप्ती दुधानी | सदस्या |
| १३ | श्रीमती ज्योती बठिजा | सदस्या |
| १४ | श्रीमती अंजना म्हस्के | सदस्या |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती पंचम उमेश कालानी, २. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी,

खालील अधिकारी सभेस हजर होते.

७८.श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय)
७९.श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

८०.श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी
८१.श्री. मिलिंद सोनावणे, नगररचनाकार
८२.श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
८३.श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
८४.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
८५.श्री. नंदलाल सामतानी, प्र. सहा. आयुक्त
८६.श्री. अजित गवारी, प्र. सहा. आयुक्त
८७.श्री. जितू चोईथानी, प्र. उप अभियंता, सा.बा.वि.
८८.श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता, विद्युत वि.
८९.श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
९०.श्री. बाळु नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक
९१.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
९२.श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
९३.श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
९४.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
९५.श्री. अनिल खतुरानी, प्र. करनिरीक्षक, कर विभाग
९६.श्री. जेठा ताराचंद, प्र. करनिरीक्षक, कर विभाग
९७.श्री. बैसाने, लिपीक, पा.पु. वि.

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. बाळु भांगरे

५. श्री. संतोष कोठरे

सायंकाळी १.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

यावेळी श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

**नगररचनाकार, श्री. मिलिंद सोनवणेः–** आयत्या वेळचा एक विषय आहे.

**महापालिका सचिवः–** आयत्या वेळचा विषय घ्यायचा आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः–** आयत्यावेळचा विषय काय आहे?

**महापालिका सचिवः–** आयत्यवेळचा विषय वाचून दाखवतात.

परवानाधारक अभियंता, वास्तुविशारद व संरचनात्मक अभियंता यांना परवाना देणे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः–** विषय चालू झालेत का? रेग्यलर अजेंडावर घ्या.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः–** रेग्युलर अजेंडावर विषय घेंऊ.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** महत्वाचा विषय आहे घ्या.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः–** सोमवारी अजेंडा काढून रेग्युलर घ्या.

**महापालिका सचिवः–** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्र.१ :—** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ७/७/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** पास..पास...

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक ७/७/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

**स्थायी समिती ठराव क्र.१८ अ** **दिनांक : १०/८/२०१८**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक ७/७/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४६ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्र.२ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना ''टप्पा—१'' अंतर्गत बांधण्यात आलेल्या कॅम्प क्र. १ ते ३ मध्ये असलेले विविध एच.टी. व एल.टी.पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामी प्राप्त फेर निविदेस मंजुरी मिळणेबाबत.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** आज सभापती महोदया, आज विशेष समितीच्या सभापती यांच्या निवडणूकीचे फॉर्म भरावयाचे आहेत आणि आज आमची वरिष्ट पदाधिका—यां बरोबर बैठक आहे. तर इथे आम्ही उपस्थित राहू

शकत नाही, जायाचे आहे, तरी मी आपल्याला निवेदन करतो की, ही सभा सोमवार पर्यंत स्थगित करण्यात यावी आणि सोमवारी ४.०० वाजता ही सभा ठेवण्यात यावी.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>**जमुनाजी जो पाण्याचा विषय आहे, तो अत्यंत महत्वाचा आहे, त्याच्यावर फक्त चर्चा करू आणि नंतर सभा स्थगित करू. एकाच विषयावर चर्चा करू आणि सोमवारी त्याच्यावर निर्णय घेऊ. परंतु या विषयावर चर्चा करू. पाण्याचा विषय हा खुप गंभीर विषय आहे. या संदर्भात, वॉलच्या संदर्भात माहीती कोण देणार आहे?

**<u>शाखा अभियंता, डी.एस. पाटीलः—</u>** कॅम्प नंबर १ ते ३ मध्ये एसपी पंपिंग स्टेशन आहे, रमाबाईला एक आहे, बिर्ला गार्डनला एक आहे, दसरा मैदानला एक आहे आणि चोपडा येथे एक आहे आणि आनंदनगर असे पाच पंपिंग स्टेशन आहेत. ते आऊट सोर्चिगने चालवायचे आहेत, त्यासाठी ऑपरेटर आणि हेल्पर अशी माणसे त्यांना इलेक्ट्रीशन वैगेरे लागतील ते आऊट सोर्चिगने चालवण्यासाठीची वार्षिक निविदा आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>** एक वर्षाची.

**<u>शाखा अभियंता, डी.एस. पाटीलः—</u>** होय, एक वर्षाची.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** विषय असा आहे की,ष्त्यासाठी लोक किती असणार आहेत?

**<u>शाखा अभियंता, डी.एस. पाटीलः—</u>** पंपिंग स्टेशन तीन शिप्टमध्ये चालतात, तीन शिप्टमध्ये तीन ऑपरेटर आणि त्यांना एक हेल्परे, म्हणजे तीन हेल्पर झाले, नंतर पंपिंग स्टेशनचे मेन्टेनेश ठेवण्यासाठी एक फिटर असतो, इलेक्ट्रीशन असतो आणि त्यांचा एक इंजिनियर असतो, एवढे त्यांची लोक असतात.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** हे जे २५ टक्के, ३० टक्के जास्त...

**<u>शाखा अभियंता, डी.एस. पाटीलः—</u>** साहेब, ते जे रेट आहेत, सन २०१६—२०१७ चे आहेत. ते जी.एस.टी. रेट आहेत.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** सन २०१७—२०१८ चे रेट आहेत, प्रशासनाने नविन रेट का आणले नाही? म्हणजे प्रशासनाला पाहीजे तसे रेट तुम्ही लावतात, किती तरी निविदा आताच्या आयुक्तांनी केवळ मागचा डी.एस.आर. लावला आहे, म्हणून पुन्हा फेर निविदा मागवल्या मग या बाबतीत का असे? काय आयुक्त साहेब, म्हणजे प्रशासन कसे दुटप्पी भुमिका घेते, नगरसेकांच्या मागणीनुसार कामे असतील, ते जर आले तर नविन डी.एस.आर. लागलेला आहे आणि यामध्ये तुम्ही जस्टीफाय करतात की, मागच्या वर्षीचा डि.एस.आर. २५ टक्के बरोबर आहे, २५ टक्के बरोबर आहे का? केवळ २५ टक्के निविदा ....

**<u>श्री. संतोष देहेरकर उप आयुक्त (मुख्यालय) तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारीः—</u>** शेवटच्या याच्यामध्ये त्यांनी लिहीले आहे की, ७२ लाख, १२ हजार, १५० चालू दर सुचिनुसार ७.७० टक्के जास्त दराने येत असून वाजवी आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** नाही, नाही आम्हांला एक म्हणायचे आहे, ७.७० ठिक आहे, ७.७० म्हणजे टेंडर अभाउमध्ये आहे ना. मग टेंडर किती आलेत? दोनच आलेत मग परत सेकंड कॉल का नाही केला?

**<u>शाखा अभियंता, डी.एस. पाटीलः—</u>** तिसरा कॉल आहे,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** नाही, नाही त्याच्यामध्ये मुददयाचा एक विषय दुसरी गोष्ट अशी आहे, तुम्ही जे वॉलमेन, आयुक्त साहेब, याच्यामध्ये एक असा विषय आहे, तुम्ही जे कर्मचारी ठेवणार आहात, त्या कर्मचा—यांना किती पगार असणार आहे? वेळेवर पगार मिळत नाही आणि त्यांना किती पगार देणार आहात? आपल्या शासनाच्या नियमाप्रमाणे त्यांना पगार मिळणार आहे का? कारण आजची परिस्थिती शहरामधली अशी आहे की, फक्त पाच हजार व सहा हजार जे पालवेवरून सोडतात, मिळते आणि ब—याच नगरसेवकांना त्यांना खिशातून पैसे दयावे लागतात आणि इथे बरेच नगरसेवक असतील आम्ही खिशातून पगार

देतो. म्हणजे आम्ही त्यांना पैसे देतो, वारंवार महापालिकेतून पैसे जातात त्या वॉलमेनच्या पगारासाठी आणि ती संबंधित एजेंन्सी त्यांना पगार देत नाही, पाच हजार ते सहा हजाराच्या वरती त्यांना पगार मिळत नाही. त्यांना तीन तीन शिप्टमध्ये काम करावे लावतात आणि नागरीकांना त्रास होऊ नये म्हणून आम्ही नगरसेवक त्यांना दहा,दहा पंधरा, पंधरा हजारातून आमच्या पगारातून पगार देतो, म्हणजे अशी परिस्थिती आहे, पुर्ण शहरामध्ये.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** त्यांना तीन तीन महीने पगार दिला जात नाही.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** पंपिंग स्टेशनचा आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** फक्त तीनच महीने नाही तर, खडे गोळवली येथील कर्मचा—यांना दहा दहा महीने पगार नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** जे पंपिंग स्टेशन चालवतात त्यांना दुसरा असा आहे की, आपण मागच्या वेळेस एक टेंडर काढला आहे, अग्निशमन विभागाचे त्याच्यामध्ये कंडीशन टाकली होती. कामगार आयुक्तांच्या निर्णयानुसार आपण त्यांना पगार देणार या टेंडरमध्ये तसे आहे का?

**शाखा अभियंता, डी.एस. पाटील:—** मिनिमम देणेस त्यांना बंधनकारक आहे, त्यांना पिएफ अकाउंट पण उघडले आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** वेळेवर पगार करू शकत नसतील तर त्याला आपण काय करू शकतो, त्याच्यावर कारवाई करू शकतो का?

**शाखा अभियंता, डी.एस. पाटील:—** होय,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** तुम्ही मला आज एक सांगा पाटील साहेब, शहरामध्ये आपण पंपिंग हाऊसमधून पाणी सोडतात असे किती कर्मचारी आहेत?

**शाखा अभियंता, डी.एस. पाटील:—** साहेब, कॅम्प नंबर १, २, ३ ला जे पंपिंग स्टेशन आहे, त्याचे वेगळे कर्मचारी आहेत

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** टोटल किती आहेत?

**शाखा अभियंता, डी.एस. पाटील:—** सांगतो, सांगतो

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** त्यांच्याकडून पाच,पाच हजार आणि सहा,सहा हजार रूपयेमध्ये काम करून घेतात आणि महापालिकेवर....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** तीन, तीन शिप्टमध्ये माझ्या वार्डामध्ये आझादनगरला रात्री २.०० वाजता पाणी येते, साहेब, पुर्ण दिवसभर तो वॉलमन काम करतो आणि रात्री २.०० वाजता पण पाणी सोडायचे, ६.०० वाजे पर्यंत ते पाणी देतात, ही परिस्थिती आहे, सहा हजारामध्ये?

**श्री. संतोष देहेरकर उप आयुक्त (मुख्यालय) तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—** पाटील साहेब, याच्यामध्ये त्यांचे पेमेंट चेकद्वारे किंवा कसे करणार?

**शाखा अभियंता, डी.एस. पाटील::—** ते थेट आर.टी.जी.एस. च्या त्यांच्या खात्यात जमा करणार साहेब.

**श्री. संतोष देहेरकर उप आयुक्त (मुख्यालय) तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—** आता नंतरचे जेव्हा पेमेंट येईल, नंतरच्या पेमेंटला ते सर्व प्रुफ सादर करणार आहेत का?

**शाखा अभियंता, डी.एस. पाटील::—** त्यांना सर्व प्रुफ सादर करणे त्यांना बंधनकारक आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आमचा मुददा तोच आहे, माझे काय म्हणणे आहे साहेब, हा मुददा पेडींग ठेवून पुढच्या येणा—या सोमवारच्या सभेला संबंधित ठेकेदाराला येथे बोलवा. जी कल्पतरू ऐजेन्सी आहे, त्या ठेकेदाराला बोलवावे आणि त्याच्याकडून आम्हांला डिटेल माहीती मिळावी, अशी आमची इच्छा आहे.

**<u>शाखा अभियंता, डी.एस. पाटील::—</u>** ठिक आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** ते लोक काम करतात, त्यांना त्याचा मोबदला मिळाला पाहीजे, हीच भुमिका आहे, दुसरे काही नाही. ठेकेदारालाच पैसे मिळत जातील आणि बाकीच्या....

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आणि इथे काय झाले माहीती आहे का शहरातील नागरीक त्या वॉलवर काम करीत असतात आणि मग काय होते जनतेच्या रोषांला त्यांना बळी पडावे लागते आणि सगळया गोष्टी कोणावर येतात वॉलमनवर ते पाणी सोडत नाहीत म्हणून पाणी मिळत नाही. त्यामुळे पुढच्या येणा—या स्थायी समितीच्या सभेला संबंधित ठेकेदाराला, कल्पतरूला बोलावून आणि मिटींग स्थगित करावी.

**<u>श्री. संतोष देहेरकर उप आयुक्त (मुख्यालय) तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—</u>** पाटील, त्यांना बोलावून घ्या.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** यामध्ये नगरसेवक भालेरावजी यांनी जो विषय उपस्थित केला आहे. तो फक्त एका वार्डासाठी किंवा एका एरियासाठी संबंधित नाही. सर्व नगरसेवकांना, त्यामध्ये आम्हांला पण आमच्या पदाधिका—यांना सुध्दा त्रास आहे. तर तुम्ही त्यांना बोलावून यामध्ये काय काय सुधारणा करता येतील तसे पत्र घ्या.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** तसे अधिकार प्रशासनाकडे नाहीत का? मग तुम्ही काय केले? परत तुम्ही बोलतात की हे योग्य आहे म्हणून.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** आजची सभा आज स्थगित करू, विदाऊट नोटीस. आजची सभा सोमवार पर्यंत ४.०० वाजे पर्यंत स्थगित करण्यात येत आहे, विदाऊट नोटीस आणि बाकीचे जे सदस्य, अनुपस्थितीत आहेत, त्यांना फोन वरून सुचना देण्यात याव्या.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** हे फक्त कॅम्प नंबर १, २, ३ चेच आहेत आणि कॅम्प नंबर ४, ५ चे काय?

**<u>सभापती तथा पिठासिन अधिकारी:—</u>** ठिक आहे, ही सभा स्थगित करण्यात येत आहे. सोमवार ४.०० पर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

सांयकाळी १.३० वाजंता सभेचे कामकाज स्थगित केल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—१३/८/२०१८

**दि. १३/८/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**५—अ**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १०/०८/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित करण्यांत आली होती. परंतु सदरची सभा स्थगित झाल्याने सोमवार दिनांक १३/८/२०१८_रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ५ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ७ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १० | श्री. भगवान भालेराव | सदस्य |
| ११ | श्रीमती मिनाकौर लबाना | सदस्या |
| १२ | श्रीमती रेखा ठाकुर | सदस्या |
| १३ | श्रीमती दिप्ती दुधानी | सदस्या |
| १४ | श्रीमती ज्योती बठिजा | सदस्या |
| १५ | श्रीमती अंजना म्हस्के | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. धनंजय बोडारे.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी, आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. मिलिंद सोनावणे, नगररचनाकार
४. श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अधिकारी, पा.पु.वि.
५. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
६. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखापरिक्षक
७. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता, विद्युत वि.
८. श्री. मनिष हिवरे, प्र. प्र. सहा. आयुक्त
९. श्री. डी.एस. पाटील, शाखा अभियंता, पा.पु.वि.
१०. श्री. बाळु नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक
११. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१२. श्री. जेठा ताराचंद, प्र. कर निरीक्षक, कर विभाग
१३. श्री. अनिल खतुरानी, प्र. कर निरीक्षक, कर विभाग
१४. श्रीमती दिप्ती लादे, लिपीक, सा.बा.वि.

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन

२. श्रीमती नर्गिस खान

३. श्री. बाळु भांगरे

५. श्री. संतोष कोठरे

सायंकाळी ४.०५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

या वेळी मुख्य लेखाधिकारी, श्री. विकास चव्हाण आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ झाले.

**महापालिका सचिव:—** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.२ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना ''टप्पा—१'' अंतर्गत बांधण्यात आलेल्या कॅम्प क्र. १ ते ३ मध्ये असलेले विविध एच.टी. व एल.टी.पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामी प्राप्त फेर निविदेस मंजुरी मिळणेबाबत.

---

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** सभापती महोदया, उल्हासनगरमध्ये पाण्याची समस्या खुप गंभीर आहे. उल्हासनगरमध्ये आता पाणी भरपुर पडत आहे, तलाव सुध्दा भरले आहेत आणि अशा प्रकारे पावसाळयामध्ये पाण्याची समस्या गंभीर होण्याचे कारण काय? आम्ही परत परत आयुक्त साहेबांना पण सांगितले आहे, पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी यांना पण सांगितले आहे, पण ते लक्ष देत नाहीत. त्यांना माहीत आहे की, उल्हासनगरमध्ये जो पाणी पुरवठा केला जातो, तो शहाड पंपिंग स्टेशन जो आहे, सेंच्युरीचा त्याला एम.ए.सि.पी. चा जो कनेक्शन दिला जातो, तो दोन केंबलद्वारे दोन कनेकशन दिले आहे, दोन कनेक्शन पैकी एक केबल त्याची डॅमेज झाली आहे. आता जो केबलवर पाण्याचा पंप चालू आहे तो जर बंद झाले तर आपल्याला चार दिवस पाणी मिळणार नाही. मागच्या दोन महीन्यापुर्वी चार दिवस बंद झाले होते, त्याचे कारण म्हणजे केबल डॅमेज होण्याचे कारण होते. आम्ही परत परत सांगितल्या नंतरही ठेकेदाराचे काम चालू आहे. तिथे ट्रीटमेंट प्लॅानचे काम चालू आहे, त्यामुळे केबल डॅमेज केली आहे. त्याच्यावर कारवाई करीत नाहीत आणि बनवून पण घेतले जात नाही. तो बनवेल कोण? जर पाण्याची दुसरी केबल डॅमेज झाली, लाईन बंद झाली किंवा आणखी काही झाले तर चार दिवस शहराला पाणी मिळणार नाही. खास करून कॅम्प नंबर १, २, ३ साठी पाणी मिळणार नाही. या विषयावर आम्ही बोलून बोलू थकलो आहे, एचओडी ग्रुपवर आम्ही मॅसेज टाकल्या नंतरही महापालिका लक्ष देत नाही, तर एचओडी ग्रुप बनवला आहे, तो कशासाठी बनवला आहे. लोकांच्या समस्या सांगण्यासाठी, लोकांच्या समस्या दाखवण्यासाठी, लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी बनवला आहे ना, तर ग्रुप टाकल्यावर सुध्दा काहीच सोलूशन निघत नाही, काम होत नाही तर काय करायचे? मी

खास करून माझ्या वार्डची पोझिशन सांगतो, माझ्या वार्डामध्ये जो पाणी पुरवठा केला जातो, पाण्याची सप्लाय केली जाते ते वल्ड एंबियर आहे. वल्ड एंबियरची पाण्याची टाकी कमीत कमी ५० वर्षापुर्वीची जुनी आहे आणि ५० वर्षे जुनी असतांना रिपेर केले नाही, एबीपीएर रिपेर करीत नाही. त्यामध्ये जर १० फुट, १० मिटर पर्यंत पाण्याची टाकी भरली गेली तर कधी पण ती टाकी ब्लास्ट होऊ शकते. १० फुट आपण भरू शकत नाही आणि १० फुट भरलेली टाकी आमच्या दहा बारा वार्डमध्ये पाणी पुरवठा होतो. दहा बारा वार्डमध्ये १० फुट टाकी भरल्या नंतर पाणी सोडले जाते, सकाळी ५.३० वाजता पाणी वार्डमध्ये सोडले जाते. त्या टाकीतील पाणी कमीत कमी ४५ मिनीट चालेते आणि आमच्याकडे शांतीनगर, विठ्ठवाडी येथे पावने सहा वाजता पाणी येण्यास वेळ लागतो. अशा प्रकारे पाणी पुरवठा होत असतो आणि ते पाणी ६.३० वाजता बंद होते. तर आमच्या येथी, उल्हासनगरमधील लोकांनी फक्त अर्धा तासच, पाऊन तासच पाणी प्यायचे का? खास करून माझ्या वार्डामध्ये ही परिस्थिती आहे. आम्ही मागच्या आयुक्तांना सांगितले तेव्हा दोन वेळेस पाणी मिळत होते. मागचे आयुक्त पण पाण्या विषयी त्यांचीच चालवत होते आणि आताचे आयुक्त पण स्वत:चीच चालवत आहेत. काम तर कोणी करीत नाहीत, तर लोकांनी फक्त अर्धा तासच पाणी प्यायचे का? आमच्या इथे प्रत्येक दिवस पाणी ६ ते ११ वाजे पर्यंत चालते, परंतु टाकी रिकामी झाल्या नंतर शेवटी, एन्डला पाणी मिळत नाही. ही जबाबदारी महापालिकेची आहे, प्रशासनाची आहे, कारण आमच्याकडून टॅक्स वसुल केला जातो, तर लोकांना सुविधा देणे पण आपले काम आहे. परंतु या कामाकडे कोणी लक्षच देत नाही. स्वत:चीच मर्जी चालवत आहेत, कोणाच्या मनामध्ये आले सहा इंचाची लाईन घेतली चालू केले सर्व पाणी तिकडे जाते आणि लास्टला आम्हांला पाणी मिळत नाही. याच्यासाठी तुम्ही काय करणार आहेत, ते सांगा. सभापती महोदया मी तुमच्या माध्यमातून, सभागृह नेता पण इथे आहेत. येणारी महासभा जी १६ तारखेला मिटींग आहे, ती महासभा आम्ही होऊन देणार नाही. महासभा चांगल्या प्रकारे चालवायची किंवा नाही तर पहीले पाण्याची समस्या सोडवा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया::—** पहीली गोष्ट म्हणजे जो विषय श्री. राजेंद्र चौधरी यांनी उपस्थित केला, शहरामध्ये पाच दिवसा पर्यंत पाणी नव्हते हे सत्य आहे. आम्ही आपले आमदार, श्रीमती ज्योती कालानी यांच्या बरोबर गेलो होतो, तिथे सेलवन साहेब, तिजोरे, ठाकरे आणि त्यांचे अधिकारी आणि एम.आय.डी.सी. चे अधिका—यांना पण आमदार मॅडमने बोलावले होते. ठेकेदाराने काम करतांना पहीले एक स्टॅंडबाय जो एक कॅबिन आहे, ती तोडून टाकली, त्याचे नॉलेज यांना मिळाले नाही, एम.आय.डी.सी. वाल्यांना पण मिळाले नाही आणि कोणालाही मिळाले नाही आणि त्याच बरोबर ती केबल टाकी भरण्याच्या वेळी कॉक्रीटने झाकून टाकली जेव्हा एस.टी.पी. चा प्लॉन बनवत होते. त्याच्या नंतर जी दुसरी कॅबिन होती, ती जी जे.सी.पी. नाला सफाईसाठी खाली उतरली होती तेव्हा केबल नष्ट करण्यात आली. या दोन्ही केबल नष्ट केल्या नंतर पाच दिवस शहरामध्ये पाणी नव्हते. सर्व प्रयत्न केल्या नंतर पहीले या दोन केंबल तात्पुरत्या जोडण्यात आल्या. यामधून थोडा फार लोड येऊन चारच्या जागी दोन पंप चालू होते. आता पाणी तर येत आहे, परंतु दोन्ही केबल नष्ट झाल्यामुळे आणि आपलेच दोन्ही ठेकेदार आहेत, एक खिलारी जयंत जेव्ही आणि दुसरा नालासफाईसाठी शुभंम कन्स्ट्रक्शन त्याच वेळी आमदार मॅडमने आयुक्त साहेबांना पण सांगितले, सेलवन तिथेच उपस्थित होते, त्यांना सांगितले की या दोन्ही केबलचा जो खर्च आहे, यांच्याकडून तो भरून घेऊन एम.ए.सि.बी. कडून नविन केबल टाकून दया. आता त्यांचे टोलवाटोलवी चालू होते, तर यामुळे भविष्यात कोणतीही घटना घडू शकते? ही केबल एवढी मोठी आणि जड असते की, ती त्वरीत उपलब्ध होत नाही. तर ती केबल आणण्यास पण वेळ लागेल. तर ती केबल आणणे अतिआवश्यक आहे, खुप गरजेचे आहे, त्यासाठी आमदार मॅडमने पत्र दिले आहे. त्याच्या नंतर सुध्दा पाणी पुरवठा विभागाचे आणि आरोग्य विभागाचे तिकडे लक्ष नाही. लक्ष देण्याची जबाबदारी, आज आयुक्त नाहीत, तर आपण पिठासीन अधिका—यांच्या जागेवर बसले आहेत, तुमची असेल. दुसरे म्हणजे मागच्या रविवारी माझ्या वार्डमध्ये पावसामुळे रिटनिंग वॉल नाल्यामध्ये पडली, त्या रिटनिंग वॉलमध्ये पाण्याची एक लाईन होती, जो हनीमुन कॉटज आणि चाळीस कोठी आणि बाजुच्या एरियामध्ये पाणी मिळत होते. ती लाईन पण आतमध्ये पडली. मला दुपारी १.०० वाजता न्युज मिळाली तेव्हा मी साईडवर गेलो आणि फोटो काढून एचओडी ग्रुपवर शेरा केले. भरपूर पयत्न केल्या नंतर अग्निशमन अधिकारी आले त्यांनी सांगितले की, आमच्याकडे कोणतेही हत्यार नाही. फक्त फावडा घमेला, टीकाव आहे याच्यामुळे डेब्रिज निघणार नाही कारण की, कॉक्रीटचे वॉल आहे. नंतर मी केणेना फोन केला तेव्हा रात्री त्यांनी जे.सी.पी. पाठवला त्या जे.सी.पी. ने खाली उतरून ज्या पाण्याच्या लाईन वाचल्या होत्या त्या पण तोडून टाकल्या. मटेरीयल तर काढले परंतु पाण्याची लाईन पुर्ण डॅमेज झाली. त्याच्या नंतर नऊ दिवस झाले कमीत कमी २०० घरांमध्ये पाणी नाही. परत परत एचओडी

ग्रुपवर टाकल्या नंतर मी स्वत: तिजोरे साहेबांशी बोललो, ठाकरेशी बोललो, सेलवन बरोबर बोललो तरी सुध्दा त्यांचा रिस्पॉस नाही. आज नवव्या दिवशी त्यांना माहीती आहे की, आज स्थायी समितीची सभा आहे, स्थायी समितीमध्ये हा मुद्दा निघणार आहे, तेव्हा ठाकरे आणि तिजोरे आले होते. नऊ दिवसा नंतर काय झाले होते? हे बघण्यासाठी आले होते आणि आपल्याच कार्यकर्त्यांना विचारतात की, हे तुटले आहे तर कोण बनवणार? काम कोण करेल कोण ठेकेदार आहे? ठेकेदार देणे ही तुमची जबाबदारी आहे. तुमच्या एका शब्दावर ठेकेदाराने काम करायला पाहीजे, एका आदेशावर काम झाले पाहीजे हे अतिआवश्यक आहे. आज रविवार असतांना आपातकालिन विभागाचे कोणीच अधिकारी नाही.

**आपतकालिन विभाग प्रमुख, श्री. बाळू नेटके:—** सर मी तिथे उपस्थित होतो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया::—** मी सांगतो ना, मी तुमचे नाव घेईल तुम्हांला फोन केल्या नंतर तुम्ही अग्निशमन विभागाची गाडी पाठवली होती, त्याच्या जवळ कोणतीच हत्यारे नव्हती. मी तीन वेळा तुम्हांला फोन केले तेव्हा आपण आले तुम्ही माझ्याशी बोलले की, यांच्याकडे काहीच सामान नाही तर मी काय करू शकतो? तुम्ही केणे बरोबर बोला. इमरजन्सीचा अर्थ काय आहे? डिजास्टर मॅनेजमेंटचा अर्थ काय आहे? चार फावडे, दोन घमेले, चार टिकाव ठेवले, चार लोक बसवले अग्निशमन विभागाच्या गाडीवर चढून आले तर काय झाले? हे डिजास्टर मॅनेजमेंट त्यांच्याकडे कोणतेच इक्युपमेंट नाही. जर कोणी आतमध्ये दाबले गेले असते तर कशा प्रकारे काढले असते? इमरजेन्सीमध्ये तुमच्याकडे सिस्टम नाही. खरे तर रविवारी सुट्टी असली तरी एक जबाबदार अधिकारी हेडकॉटरमध्ये असले पाहीजेत. त्या दिवशी कोणाची डयुटी होती आणि ते कुठे होते? साईडवर का आले नाही. त्यांनी काय कार्य केले ही माहीती आम्हांला मिळाली पाहीजे. त्याच्या नंतर मी आयुक्त साहेबांकडे गेलो, आयुक्त साहेबांना निवेदन केले की, एक रिटरींग वॉल पडला आहे, ५० फुटाचा पोर्सन पडला आहे आणि बाकीचा पोर्सन पण पडणार आहे, कधी पण पडू शकतो? तो बनवण्यासाठी तुम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाला आदेश दया. तर खुप दु:खाची गोष्ट आहे की, आयुक्त साहेबांनी सांगितले की, आपल्याकडे पैसे नाहीत, इमरजेन्सी कामासाठी पण पैसे नाहीत आणि कुमावतला बोलवा आणि त्यांना सांगा की, सर्व घरांना नोटीस दया, सर्वांची घरे खाली करा. ही आपण आपली जबाबदारी निभावत आहेत, रिटनिंग वॉल खाली पडली, त्यांची घरे पडणार आहेत, संरक्षण न देता, उलट त्यांना नोटीस देणार की, तुमचे घर रिकामे करा. कारण आम्ही रिटनिंग वॉल दोन वेळा रिपेरींग करण्यासाठी गेला पण आम्ही महानगरपालिकेमध्ये नाहीत. कशा प्रकारची व्यवस्था आपण सांभाळत आहेत? आपली काय प्रायोरीटीज आहे? गार्डनचे काम होत आहेत आणि इमरजेन्सीची कामे रखडत आहेत. साहेब, आपण उत्तर दया, पिठासीन अधिका—यांच्या बाजुला बसले आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** दुसरा एक पाणी पुरवठया विषय बोरींगचा विषय आहे, आपण सन २०१६ मध्ये नविन बोरींग मारल्या होत्या, आज दोन ते अडीच वर्षे झाली त्या बोरींग रिपेरींग करण्यासाठी आपल्याकडे माणूस नाही आणि आम्ही ठेकेदाराला पकडून आणतो त्यांना काम करण्यासाठी सांगतो पण आपले लोक एस्टिमेट मंजुर करीत नाहीत. पाण्याची टाकी तुटली आहे, नगरसेवक लोक टाकी बसवू शकत नाहीत, लोक नगरसेवकांना शिव्या देतात. ही जर व्यवस्था राहीली तर महापालिकेचे काम कसे चालेल आणि आयुक्त साहेंबांना बोला आयुक्तांना बोला तर तेव्हा फंडा, पैशाची गोष्ट येते. बाकीची सर्व कामे बंद करा सफाई आणि पाण्यासाठीच फक्त काम करा, जर महापालिकेकडे पैसे नाहीत तर.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया::—** असा कोणता कायदा आहे की, पहीले तुम्हांला पगार दयायचे आहे आणि बाकीची कामे नंतर करायची आहेत आणि जर थांबवायचे आहे तर पगार पण थांबवा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** लोकांकडून आपण टॅक्स वसुल करतो, जो पैसा येतो त्यांना सुविधा देणे आपले काम आहे. तर त्यांचे पैसे आपण घेतो पगार पहीले करता, मग पगार पण थांबवा त्यांना सुविधा देता येत नाहीत, सुविधा थांबवतात तर पगार पण थांबवा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** विशेष म्हणजे पाण्याच्या संदर्भामध्ये चौधरी साहेबांनी आणि वदारिया साहेबांनी जो मुददा मांडला आहे. साहेब विषय असा आहे आरोग्य आणि पाणी, स्वच्छता या भारतातल्या नागरीकांच्या मुलभुत गरजा आहेत आणि महानगरपालिकेचे प्रथम कर्तव्य आहे, त्या गरजा पुरवणे या तीन्ही गरजा आजच्या या काळात आपण पुरवू शकलो नाही. विषय असा आहे पाण्याच्या संदर्भामध्ये आज जे पाणी येते एम.आय.डी.सी. मधून ते

चांगल्या पध्दतीने येते, एम.आय.डी.सी. मधून ते फिल्टर होऊन उल्हासनगर महानगरपालिकेच्या टाक्यांमध्ये जाते. टाकीमधून जे पाणी येते ते कशा पध्दतीने असते, हे तुम्हांला आम्ही सांगायची काहीच गरज नाही. अशी परिस्थिती निर्माण आहे. दुसरी गोष्ट अशी आहे, हा जो विषय आहे, पाण्याच्या संदर्भातील अत्यावाश्यक सेवामध्ये पाणी येते पण आपली सेवा, अत्यावश्यक सेवा मधला कुठला शब्द लावावा मला वाटते की, तो शब्द पण चुकीचा असेल. पाण्यासाठी अत्यावश्यक सेवा लावणे हा शब्दच चुकीचा आहे. भारतामध्ये सगळीकडे अत्यावश्यक सेवेची गरज असेल, ते पाण्यात मोडत असेल. मला वाटते की, उल्हासनगरमध्ये महानगरपालिकेचा कुठला अधिकारी पाण्याच्या संदर्भातील अत्यावश्यक सेवेत मोडतो. मला मधल्या काळामध्ये एक आठवले की आयुक्तांनी सर्व डिपार्टमेंटच्या लोकांना बोलावले आणि प्रत्येकाकडे विचारले की किती किती लोक कोणाकडे काम करतातत? आमचे सेलवन साहेब एवढे बहादूर आहेत, त्यांनी सांगितले की आमच्याकडे एवढे लोक काम करतात. आयुक्तांनी सर्व्हे केला तर जास्त लोक हे पाणी पुरवठयाकडे काम करतात. बरोबर आहे ना, सर्वात जास्त लोक महानगरपालिकेचे पुरवठयाकडे काम करतात. तरी आमचे सेलवन साहेब म्हणतात की, माझ्याकडे माणसे नाहीत. अजून किती माणसे हवीत? या महानगरपालिकेमध्ये सर्वात जास्त माणसे तुमच्याकडे असतांना तुम्ही लोकांना पाणी पुरवू शकत नाहीत आणि पाण्याच्या संदर्भात तुम्ही वेगवेगळे बहाणे सांगतात. तुमचे एस्टिमेट वेळेवर तयार होत नाहीत, एक एक एस्टिमेटला तुम्ही सहा सहा महीने लावतात आणि लावले तरी ते मंजुरीला जात नाहीत. अशा परिस्थितीमध्ये तुमची जर पाण्याची यंत्रणा असेल आणि तुम्ही हा जो विषय आणला वॉलमेनच्या संदर्भातला २५ टक्के पगारवाढ करा, कशासाठी पगारवाढ करायची? त्याची कारणे सांगा. पाणी मिळत नाही, आणि पगारवाढ कशासाठी करायची २५ टक्के? २५ टक्के पगारवाढ करण्यापेक्षा हा जो ठेकेदार आहे, त्याच्याकडे वॉलमन जर उपलब्ध नसतील तर त्या वॉलमनला दुस–या कोणाला देवून टाका आणि तुमचे वॉलमन कुठे आहेत? पाणी पुरवठयाची एवढी माणसे तुमच्याकडे असतांना, तुमची माणसे कुठे आहेत? काम का करीत नाहीत, महानगरपालिकेची २५ टक्के, एक तर आम्हांला पाणी प्यायला मिळत नाही आणि मुळात तुम्ही अजून २५ टक्के काम करायला सांगतात. आम्हांला इथे सविस्तर सांगा कशासाठी पाहीजेत वाढीव हे.

या वेळी श्रीमती पंचम कालानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u>** पाण्यासाठी तुम्ही काय करणार आहेत, ते सांगा आणि पाणी नाही आले तर मी सांगितल्या प्रमाणे १६ तारखेची महासभा, सभापती इथे आहेत, सभागृह नेता आहेत, त्याची जबाबदारी आहे महासभा चालू देणार नाही, मग त्याचे पुढचे परिणाम....

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया::–</u>** मधल्या काळामध्ये जी सेटींग मशिन मोठी चालू होती, त्याचे पण टेंडर ऐकायला आले आहे की, पुर्ण झाले आहे. त्या विषयी पण माहीती दया.

**<u>आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री. विकास चव्हाण:–</u>** सेलवन साहेब, उत्तर दया.

**<u>कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:–</u>** वर्ल्ड एम.बि.आर. मधून येणारे सध्या त्यांच्या पॅकेज प्रमाणे कमी प्रमाणात मिळते पाणी एक आठवडया पासून अर्धा ते एक तासाच्यावर पाणी येत नाही आणि आम्ही जे पाणी टाकीमध्ये भरूून ठेवतो ते ९ तास त्या टाकीमध्ये पाणी भरून सुध्दा यांच्याकडे येणारे पाणी कमी प्रमाणात येते अशी त्यांची तक्रार आहे. पाणी पुरवठा विभागाची पुर्ण यंत्रणा पाण्याच्या बाबतीत ज्या पाईप लाईनमध्ये कुठे मेजर लिकेज असतील आणि कशामुळे पाणी येत नाही हे आम्ही सर्व तपासणी केल्या. साहेबाकडून चार पाच ठिकाणचे लिकेज सुध्दा व्हॉटस ॲप वरून मेसेज आले होते की, हे बघा म्हणून हे लिकेज अध्या इंचाचे असल्यामुळे एवढे काही फरक पडत नाही. परंतु आता आमच्या लोकांनी जे चेक केले, एम.आय.डी.सी. कडून जे येणारे पाणी आहे, एम.आय.डी.सी. च्या मालकीची जी टाकी आहे, ती खुप जुनी आहे, ४० वर्षाच्या वरती झाली आहे आणि त्याच्यामध्ये मोठया प्रमाणात गळती आहे. एम.आय.डी.सी. वारंवार सांगतात की, ती टाकी बंद करण्यासाठी आम्हांला परवानगी दया, आपल्याकडे दुसरा पाणी साठवण्या करीता दुसरा पर्याया नसल्यामुळे त्या जुन्या टाकीचाच वापर पाणी साठवण्यासाठी करीत आहोत आणि त्यांच्याकडून जी पाईप लाईन टाकलेली आहे, ६ किलो मिटरचा पाईप लाईन आपण विठ्ठलवाडी पर्यंत आपण तोच वापरतो, पण त्याच्यामध्ये सुध्दा भरपुर गळतीचे प्रमाण असल्याने त्यामुळे यांना पाणी कमी प्रमाणात जाते. चार पाच लिकेज जे आम्हांला मेन साईनला सापडले ते आम्ही दुरूस्त केले

आहेत आणि आता सध्या स्थितीमध्ये एम.आय.डी.सी. चे असे म्हणणे आहे की आम्ही पुर्णपणे क्वाटीटी पाणी देता, कुठल्याही क्वॉटीटी कमी केल्या नाहीत? असे म्हणणे आहे. तरी आम्ही जलशुध्दीकरण केंद्रावर तपासणी करतांना लोकांकडून माहीती घेतली आणि लोकांनी सांगितले की, दोन चार ठिकांणी त्यांच्या प्रिमायसेस लिकेज आहेत. ते काढण्यासाठी आम्ही त्यांना सांगितले आहे आणि ते पण शुक्रवार पर्यंत लाईन बंद करून करणार आहेत असे सांगितले आहे. साहेबांनी दुसरा मुददा सांगितले आहे की, खेमानी नाला इथे केबलचे जे काम चालू आहे त्या ठिकाणी मागे नाला सफाईसाठी आपण जे.सी. बी. नाल्यामध्ये उतरवल्या होत्या, त्यामुहे त्या केबल नादुरूस्त होऊन पाच दिवस पाणी पुरवठा विस्कळीत झाला होता. त्या ठेकेदाराकडून तातडीने पैसे भरून दिल्यामुळे केबल आणून परत त्या सुरू केल्या. परंतु खेमानी नाला वळवण्याच्या कामामध्ये, खेमानी नाल्याचे काम करतांना चेंबर बांधतांना एक केबल डॅमेज केला आहे. असे एमएसइबीचे म्हणणे होते, साहेब. परंतु खेमानी नाला वळवण्यासाठी चेंबर बनवतांना डिसेंबरमध्ये खोदले होते, डिसेंबरमध्ये स्टॅंडबाय केबलला त्यांनी डॅमेज केले होते, असे एमएसइबी चे म्हणणे आहे. त्यानुसार आम्ही तातडीने त्या ठेकेदाराला पत्र लिहीले त्या ठेकेदारांनी काम करतांना कोणत्याही केबलला डॅमेज केले नाही, असे त्यांचे म्हणणे होते सर. परंतु ज्या आयडीयल केबल एमएसइबी . च्या मार्फत टाकल्या होत्या, त्या आयडीयल पुर्णपणे अगोदर टच केलेल्या नव्हत्या केबल अशाच टाकल्या गेल्या होत्या. स्टॅंडबाय करून, त्याच्यामुळे सुरूवातीलाच टाकतांना कुठे डॅमेज झाल्या असतील तर त्या आपल्या महापालिकेच्या फंडातून कराव्यात असे त्यांचे म्हणणे होते. परंतु त्या ठेकेदाराला सांगितले जिथे खोदले होते, त्यावेळी तिथे केबल होत्या का?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** एक मिनीट, सेलवन साहेब, त्या केबलच्या संदर्भात तुम्ही ठेकेदाराला नोटीस दिली का?

**<u>कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—</u>** नोटीस दिले आहे, सर.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** नोटीस दिली आहे, तर तुमचे काम आहे, त्या ठेकेदाराला त्या ठिकाणी न्यायचे आणि एम.ए.सि.बी. च्या अधिका—यांना तिथे न्यायचे आणि एम.ए.सि.बी. च्या अधिका—यांना ते दाखवायचे कुठे आमच्या ठेकेदाराने केबल तोडली आहे ते दाखवा आणि ही जबाबदारी जर तुम्ही झटकणार असती आणि चार दिवस पाणी जर बंद झाले तर त्याला जबाबदार कोण राहील? हे पहीले सांगा.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आता गणपती आलेत, येणारा काळ कठिण आहे आणि एखादी केबल बंद झाली तर काय करणार?

**<u>कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—</u>** केबल तातडीने बदली करावी लागणार.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** बदली करावी लागेल, ते आम्ही सांगायला पाहीजे.

**<u>कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—</u>** सर एम.सी.बी. ने आपल्याकडून पैसे घेऊन, त्याचे डिपॉझिट घेऊन त्या केबल टाकलेल्या आहेत. त्या केबल यांचे म्हणणे आहे की, ठेकेदाराने डॅमेज केले आहेत आणि गेल्या सहा महीन्या पर्यंत त्यांनी काही सांगितले नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** चार दिवस पाणी, पाच दिवस त्यांना बनवायला लागले परत डॅमेज झाल्यावर तेव्हा पाणी बंद झाले, तेवढयात पाणी बंद झाले तर त्याला जबाबदार कोण? पाणी आपण घेतो आपले कर्तव्य आहे, आपल्या पैशानी बनवा काहीही करा. आमचे काहीही म्हणणे नाही, तुम्ही ठेकेदाराकडूनच बनवले पाहीजे असे आमचे म्हणणे नाही. तुम्ही कसे पण बनवा? पण बनवून घ्या.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** यांचे म्हणणे आहे की, जर ठेकेदार ऐकत नसेल जर ठेकेदार काम करीत नसेल, ठेकेदाराचे बिल येत असेल तर त्या बिलाच्या संदर्भात ठेकेदारावर तुम्ही कारवाई करा. त्याला आवश्यक असेल १ लाख रूपये तर त्याचे पाच लाख रूपये कापा.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मा. सभापती मोहदया, हा जो विषय चालला आहे, तो पुर्ण शहरामध्ये चर्चा होत होती, चार दिवस पाणी बंद होते, ते केबल ठेकेदारानेच तोडली होती, सर्वांना माहीती आहे आणि आपल्या डिपार्टमेंटला पण माहीती आहे, अधिका—यांना पण माहीती आहे. तर त्वरीत बनवायला पाहीजे आणि ठेकेदाराच्या

बिलामधून ते पैसे कट केले पाहीजेत. ठेकेदार बनवून देत नसेल ठिक आहे, तुम्ही बनवा. त्वरीत बनवायला पाहीजे आणि येणा—या दिवसामध्ये कधी पण केबल जर तुटली तर पाणी बंद होते आणि खरोखर एक गोष्ट तुम्हांला सांगतो की, ज्या वेळी ही केबल तुटली होती, तेव्हा मा. आयुक्त साहेबांनी तिथे व्हिजीट केले होते, तेव्हा आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, आपल्याला तिथे दोन जनरेटर बसवायला पाहीजेत. तुम्ही स्वत: तिथे उपस्थित होते आणि अधिकारी पण उपस्थित होते. तिथे फक्त चर्चा झाली. जर कधी भविष्यामध्ये लाईट बंद होते, लाईट गेल्यावर आमचे पाणी बाधित झाले नाही पाहीजे. त्यासाठी जनरेटरची पण व्यवस्था झाली पाहीजे, त्या वेळी कोटेशन पण काढले होते. २४ किंवा २५ लाखामध्ये दोन जनरेटर येणार होते. तर त्या विषयी काही झालेच नाही? काहीच कारवाई झाली नाही? तुम्ही त्या विषयी पत्र दिले का? एस्टिमेट बनवले का, किंवा एखादया कंपनीकडून तुम्ही जनरेटरसाठी कोटेशन काढले. आयुक्तांनी सगळया समोर सांगितले होते, महापौर होत्या, उप महापौर होते, सर्व होते त्याच्या नंतर तुम्ही काय केले?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आता पर्यंत काय केले, प्रस्ताव दिले का?

**<u>कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—</u>** सभापती महोदया, या संदर्भात एम.आय.डी.सी. आपल्याकडे रॉवाटर पंपिंग त्यांच्या मालकीची आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** आयुक्तां बरोबर चर्चा झाली होती, एम.आय.डी.सी रॉवॉटर देतात, परंतु ज्या वेळी शहरातील सहा लोक बाधित होतात, पाणी मिळत नाही, लोक त्रस्त होतात, त्यावेळी आपण काय करणार? त्यावेळी त्यांनी सांगितले ४००, ५०० करोड, महानगरपालिका २५ लाखाचे दोन जेनेरेटर बसवू शकत नाही का? एमरजेन्सीमध्ये भले त्यांच्याकडून घ्या, पैसे आपण देतो.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** बिल देण्याच्या वेळी त्यांच्याकडून पण पैसे कापून घ्या, आपण जर जेनेरेटर बसवला तर.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** पैसे कापले नाही, ही वेगळी गोष्ट आहे, परंतु पर्यायी व्यवस्था तर झाली पाहीजे ना?

**<u>कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—</u>** सर जनरेटरसाठी कोटेशन मागवले होते,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** सेलवन साहेब एकंदरीत या महानगरपालिकेत काम करण्याची तुमची मानसिकता नाही, असे दिसून येते. कधीही तुम्हांला एखादा विषय सांगितला तर तुम्ही हा विषय पुढे सरकून नेता आणि कुठल्याही गोष्टी तुम्हांला असे वाटत नाही की, या महानगरपालिकेचे आम्ही पगार घेता. माझी मानसिकता पाहीजे की, हे काम पुढाकार घेऊन केले पाहीजे.

**<u>कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—</u>** सर तसे केले होते, कोटेशन मागितले एम.आय.डी.सी. कडे आम्ही सबमिट केले होते.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** त्याच्या संदर्भात काय गोष्टी घडल्या हे श्री. चौधरी साहेबांना आणि आम्हांला माहीती आहे. कशा पध्दतीने आम्ही पैसे घेतले, किती दादागिरी केली? काय केले? ते तुम्हांला माहीत नाही. त्या दिवशी तुम्ही पण होते ना? सुट्टीचा दिवस असतांना काय करायला लावले? शशांक जे शुभम कन्स्ट्रक्शनचा माणूस पैसे देत नव्हता. त्याला आम्ही चेक दयायला लावले, माल उधार दयायला लावला. हे सगळे त्या वेळी करायला लावले आणि आता तुम्ही परत दुसरी केबल जळण्याची वाट बघतात.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** आयुक्तांनी जनरेटर एम.आय.डी.सी. ला सांगितले, आपल्याला सांगितले असते तर....

**<u>कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवन:—</u>** आपण कोटेशन मागवून त्यांच्याशी संपर्क साधायला सांगितले होते, आपल्याकडे एवढया मोठया मोटर आहेत, ७५० एच.पी.,२५० एच.पी. मोटर आहेत, त्याच्यावर जनरेटर चालत नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** पाण्याच्या संदर्भात तुम्ही किती दिवसात कराल ते आताच सांगा? तुम्ही जर पावसाळयामध्ये लोकांना पाणी देवू शकत नाही तर तुम्ही उन्हाळयात कधी देणार आहेत, ते सांगा. कधी देवू शकता

आणि किती दिवसात पाण्याचा प्रॉब्लेम सॉल करू शकतात? तुम्हांला सांगून तर मला आता कंटाळा आला आहे, सांगा.

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवनः—** सर महापालिकेच्या क्षेत्रामध्ये ब—याच ठिकाणी पाण्याचा....

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आताच्या आयुक्तांनी पाण्याच्या एस्टिमेटसाठी हे केले आहे का? ब्रेक लावला आहे का? आधी सांगा. तीन, चार, पाच लाखा पर्यंत त्यांनी करायला सांगितले आहे ना.

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवनः—** नगरसेवक निधीतून ....

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** नगरसेवक नका बोलू? नगरसेवक तुम्ही जसे की, तुमच्या खिशातून देतात आम्हांला, नेहमी नगरसेवक निधी, नगरसेवकांना ५० लाख रूपये निधी दया.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** हे कशाला आणले आहे, जनरल निधीमधून, तुम्ही गार्डन वैगेरे आणतात, पंपिंगचा विषय आणता ठिक आहे, ठिक आहे पंपिंगचा विषय आणला, पहीले लोकांना पाणी दया.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** गार्डनचे विषय कोणी आणले आहेत?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** कोणी आणले ते आणले?

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** गार्डनमध्ये वॉचमन नाही, हालत खराब आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** तुमची परिस्थिती अशी आहे की, अधिकारी सोनावणेना पाठवले आता तिजोरेंना पाठवण्याच्या तयारीत आहेत. तुम्हीच राहीलेत फक्त तुम्ही पण लवकर मोकळे व्हाल आणि आम्हांला सांगा जो मुळ मुददा आहे, जो विषय आहे, त्या विषयाला थोडे हे झाले होते. मी सांगतो, आमचा मुददा असा आहे की, तुमचा हा कल्पतरूवाला ज्याला हा वॉलचा टेंडर २५ टक्के देण्याचे सांगितले आहे. कल्पतरूवाल्यांनी २५ टक्के त्यांच्या त्या वॉलमनला आणि त्या हेल्परला पगार किती देतो यांची आम्हांला आकडेवारी सांगा? सांगा ना आकडेवारी आपण त्यांना किती पगार देतो?

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवनः—** पुर्ण पॅनलची माहीती मागितलेली आहे....

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आधी आपण ऐका, आधी आपण सांगितले होते की, मिटींग का स्थगित केली होती, याच गोष्टीमुळे ना, कल्पतरूवाला किती पगार देतो? काय देतो त्याची माहीती पाहीजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** सभापतीसाठी फॉर्म भरायचे होते, म्हणून स्थगित केली होती.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** त्याच्यामुळे स्थगित केली होती, परंतु या विषययाची पण चर्चा झाली होती ना.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** सांगितले होते की, संपुर्ण डिटेल्स नंतरच्या मिटींगमध्ये घेऊन या.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** चर्चा तर झाली होती ना? तर आणयला पाहीजे होते ना, आज पण आणले नाही. साहेब, दुसरा विषय असा आहे, वॉलमनला पगार फक्त पाच ते सहा हजार रूपये देतात, हेल्परला कमी पगार देतात आणि ते पण वेळेवर देत नाहीत, त्यांना तीन तीन शिप्टमध्ये राबवून घेतात आणि आपल्याकडे २५ टक्के वाढीव दराने इथे निविदा आणतात. संबंधित जो ठेकेदार आहे तो सगळे पैसे हडप करतो आणि त्या वॉलमनला पाहीजे तेवढा पगार मिळत नाही आणि त्यांने ठरवले की, उद्या उल्हासनगरला पाणी बंद करायचे आणि काही आडचण निर्माण करायची ते करू शकतात. आपण महानगरपालिकेत काम करतो, आपल्या महानगरपालिकेचे वॉलमन काम करताता, त्यांना मिनिमम रेटनी पगार मिळाला पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** आता तुम्ही सांगा याच्यामध्ये आपण काय काय कंडीशन ठेवलेल्या आहेत?

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** टेंडरमध्ये तुमच्या काय काय कंडीशन आहेत?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** कामगार आयुक्तांच्या नियमाप्रमाणे आहे का,

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवनः—** होय सर, मिनिमम वेजेस प्रमाणे त्यांना देय आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** नाही देत,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** आपण जेव्हा कोणाला ठेका देतो, ती आपली जबाबदारी आहे कंडीशन टाकणे की मिनिमम वेजेस दया, आपण असे बोलणार नाही की, कोणी कोणाचा पगार करणार नाहीत आपण जाऊन बोलणार आमच्याकडे येऊन ॲपलीकेशन करणार काय?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** हे बघा इथून मागे काय झाले तुमच्या कंडीशन होत्या की नाही हे आम्हांला माहीती नाही, पण आता हे आणि अता हे झाले पाहीजे आणि त्यांना वेळेवर पगार झाला पाहीजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** त्यांना चार, चार, तीन तीन महीने पगार होत नाही आणि पाच पाच, सहा सहा जणांना त्यांना तीन तीन शिप्टमध्ये राबवले जाते.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** इतिवृत्ताची वाट न पहाता पास...पास...दोन वर्षा करीता.

**महापालिका सचिवः—** पास..

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** नाही, नाही हा विषय पहीले घ्या.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** पहीली गोष्ट मी जेव्हा रिटनिंग वॉलचा मुददा उठवला होता, त्याचे तर तुम्ही उत्तर पण दिले नाही. आपतकालीनचा विषय बोललो डिजास्टर मॅनेजमेंट का काय झाले त्याचे पण उत्तर यायला पाहीजे. पास तर करणारच आहेत, मिटींगच्या नंतर का? नाही तर मिटींग बोलावूच नका तुम्ही, मिटींग बोलवायची काय गरज आहे?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** इमरजेन्सीचा कोण आहे?

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** नेटके आहेत ना.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** नेटके काय विषय आहे? कचरा माती काढू शकतो पण बनवणार कोण?

**आपतकालिन विभाग प्रमुख, श्री. बाळू नेटकेः—** आपत्ती व्यवस्थापन विभाग माझ्या अंडरमध्ये आहे, नाला चोकअप झाला होता, ते आम्ही करू शकतो. परंतु तशी परिस्थिती नव्हती. परिस्थिती म्हणजे संपुर्ण भिंतच पडलेली होती, त्यामुळे ताबोडतोब केणेंना फोन केला जे.सी.पी. साठी परंतु जे.सी.पी. मला उपलब्ध होऊ शकला नाही. त्याच्यामुळे मी वर हात केले सर.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** तसा निधी आम्ही लावायला तयार आहेत, चिंता का करायची. पगार बंद करा.

**आपतकालिन विभाग प्रमुख, श्री. बाळू नेटकेः—** नाही, नाही वेगळी परिस्थिती होती.

या वेळी काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** जो रिटनिंग वॉलचा इश्यु होता, त्याची लाईन पडली आहे, त्यासाठी निधी पाहीजे असे बोलायला पाहीजे ना.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** इमरजेंन्सी निधी दया.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—**साहेब,उत्तर देत नाहीत काय फायदा आहे याचा? स्थायी समिती सभेचा उपयोग काय?

**कार्यकारी अभियंता, श्री. एस.के. सेलवनः—** ४० फुटीचा ज्या ठिकाणी रिटनिंग वॉल नाल्यामध्ये पडला होता, काही पाईप लाईन पण त्या ठिकाणी डॅमेज झाल्या होत्या, साहेबांनी व्हॉटस अपवर पण टाकले होते आणि स्थळ पाहणी करून त्या बंद झालेल्या लाईन त्यांनी तातडीने दुरूस्त करण्यासाठी कळवले होते. परंतु मोठया प्रमाणात पाईप लाईन

तुटल्यामुळे त्यासाठी स्वतंत्र एस्टीमेट लागेल सर आणि आता एस्टीमेट पाठवला आहे आणि तातडीने कामे करून घ्यायला लागेल अन्यथा तिकडच्या लोकांचे पाण्याची समस्या सुटू शकत नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** ही स्थायी समिति तुम्हांला बी.पी.एल. ची माहीती देतो, आयुक्तांना महानगरपालिकेच्या महापौरांना विचारून ५० लाखा पर्यंतची कामे करण्याचा अधिकार आहे. ५ (२) (२) च्या वेगळे बोलत आहेत साहेब, दोन सेक्शन आहेत, एका सेक्शनमध्ये आपण महापौरांना विचारून काम करू शकतात. दुस—या सेक्शनमध्ये ५ (२) (२) मध्ये अगणित म्हणजे यामध्ये काहीच लिमीट नाही. तुम्ही इमरजेन्सी काम करू शकतात आणि ५ (२) (२) मध्ये स्थायी समितीला विचारू शकतात. तुम्ही उपयोग करीत नाहीत जेव्हा आरोग्य विभागाने डंपिंगसाठी विषय आणला आम्ही तुम्हांला परमिशन दिले आहे, तर तुम्हांला एस्टीमेट बनवण्यासाठी नऊ दिवस का लागतात.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** आमचा मेसेज आजच्या स्थायी समितीचा आयुक्तांना दया, सभेची काय परिस्थिती आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** पास.. पास...दोन वर्ष टाका यात.

**महापालिका सचिव:—** पास...

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. २ :—**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना ''टप्पा—१'' अंतर्गत बांधण्यात आलेल्या कॅम्प क्र. १ ते ३ मध्ये असलेले विविध एच.टी. व एल.टी.पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामी प्राप्त फेर निविदेस मंजुरी मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

विषयांकित कामाची मुळ ई निविदा क्रमांक १३१६ मा.स्थायी समिति ठराव क्रमांक २६, दिनांक ०८/०९/२०१७ अन्वये शासन परिपत्रक क्रमांक जीएसटी—१०१७/प्र.क्र.८१/कराधान—१, दिनांक १९ ऑगस्ट २०१७ अन्वये नव्याने जीएसटी लागु झाल्याने त्यानुसार कार्यवाही होणे करिता जुन्या निविदा रद्द करुन नवीन निविदा मागविण्यास प्रशासनास निर्देश देण्यात आला होता.

त्यामुळे विषयांकित कामाची फेर निविदा दिनांक १४/११/२०१७ रोजीच्या लोकमत, जागरुक टाईम्स या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करुन ऑनलाईन फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या.सदर फेर निविदेस प्रतिसादर न मिळाल्याने दिनांक १२/१२/२०१७ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली. परंतु स्पर्धा न झाल्यामुळे व्दितीय मुदतवाढ दिनांक २८/१२/२०१७ पर्यंत देण्यात आली. दुसऱ्यांदा सुध्दा स्पर्धा न झाल्याने तिसरी मुतदवाढ दिनांक १२/०१/२०१८ पर्यंत देण्यात आली. तिसऱ्या मुदतवाढी नंतर सुध्दा दोनच निविदा धारकांनी भाग घेतल्याने तिसऱ्यांदा निविदेचा तांत्रिक भाग दिनांक १५/०१/२०१८ रोजी उघडण्यात आला व तांत्रिक दृष्टया दोनही निविदा पात्र झाल्याने निविदांचा आर्थिक भाग (लिफाफा क्रमांक २) दिनांक ०३/०२/२०१८ रोजी उघडण्यात आला असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | ठेकेदारांचे नाव | प्राकलनीय किंमत | सादर केलेला दर | एकुण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर प्रा.लि. उल्हासनगर. | रु. | २८ : टक्के (जादा दराने) | ७३८५२४१.६ | ८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | मे. ओम इंडस्ट्रीअल इंजिअनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली. | ५७,६९,७२०/— | ३० : टक्के (जादा दराने) | ७५००६३६. ०० | ए |

उपरोक्त तक्त्यामध्ये मे. कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर प्रा.लि. उल्हासनगर, यांचे निविदेचे दर अंदाजित किंमतीच्या २८ : जास्त दराने भरलेली असुन, त्यांची एकुण किंमत रु.७३८५२४१.६ एवढी होते. सदर निविदेच्या वाटाघाटीसाठी संबंधित ठेकेदारास मा.अतिरीक्त आयुक्त यांच्या दालनात दिनांक ०७/०२/२०१८ रोजी बैठक बोलाविण्यात आले होते. या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार सदरचे काम निविदा किंमतीस (ॲट पार) करणे आवश्यक असल्याचे मा.अति.आयुक्त यांनी सुचित केले. परंतु मे. कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर प्रा.लि. उल्हासनगर यांनी निविदा किंमती ऐवजी भरलेला दर २८ : एवढा होता. वाटाघाटीनंतर जी.एस.टी.चा भार वाढल्याने त्यांनी फक्त २ : दर कमी केला म्हणजेच त्यांनी २६ : या दराने काम करण्यास सहमती दर्शविली होती. सदर कमी केलेले दर मान्य नसल्याने या दरांची पुन्हा वाटाघाटी करणेसाठी मा.आयुक्त सो.यांचे सुचनेनुसार दिनांक १६/०३/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता बैठकीसाठी बोलाविण्यात आले होते. त्यानुसार ठेकेदाराने १ : दर कमी केल्याचे लेखी पत्रान्वये कळविले होते. म्हणजेच २५: जादा या दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे. सदर ठेकेदाराने वाटाघाटी नंतर भरलेलर दर (२५ टक्के) जादा दराबाबत चालु दरसुची नुसार तुलना केली असता, त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | निविदेतील प्राकलनीय किंमत | :— रु.५७,६९,७२०/— |
| २) | वाटाघाटी नंतर न्युनतम ठेकेदाराच्या निविदेची किंमत २५ टक्के जादा दराची (५७,६९,७२० X १.२५ %) | :— रु.७२,१२,१५०/— |
| ३) | निविदा प्राकलनाची चालु दरसुची नुसार (२०१८—१९) किंमत | :— रु.६६,९२,४६८/— |
| ४) | निविदेची (२५ % जादा दराची) चालु दरसुची नुसार तुलना केली असता आलेली टक्केवारी | (२—३) X १०० = ३<br>= (७२१२१५०—६६९२४६८) X १००<br>६६९२४६४<br>= ७.७६५ %<br>= ७.७७ % |

सदर कामासाठी न्युनतम दराची निविदा किंमत रु.७२,१२,१५०/— ही चालु दरसुची नुसार (२०१८—१९) ७.७७ % जादा दराची येत असुन, वाजवी आहे. तरी सदर ई—निविदेचा न्युनतम देकार मे. कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर प्रा.लि. उल्हासनगर,यांची निविदा स्विकुत करून त्यांच्याशी करारनामा करून कार्यादेश देण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.१९.** **दिनांकः— १३/८/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना ''टप्पा—१'' अंतर्गत बांधण्यात आलेल्या कॅम्प क्र. १ ते ३ मध्ये असलेले विविध एच.टी. व एल.टी.पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामी ई—निविदेचा न्युनतम देकार मे. कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर प्रा.लि. उल्हासनगर,यांची निविदा स्विकुत करून त्यांच्याशी दोन वर्षासाठी करारनामा करून कार्यादेश देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**<u>सर्वानुमते</u>**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिवः—</u>** विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

---

⇨ **<u>विषय क्र.३ :—</u> उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र.१ अंतर्गत असलेल्या उद्यानाचे सुशोभिकरण करणेच्या कामाचे निविदाप्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.**

---

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** कोण आहे, याच्या बदल कोण सांगणार आहे? नाही नाही हायकोर्टात गेले, याच्यात विषय असा आहे की, तुम्ही पण याचे उत्तर सांगू शकत नाहीत. टेक्नीकल आहे सगळे आम्हांला विचारायचे आहे.

**<u>लिपीक, श्रीमती दिप्ती लादेः—</u>** साहेब, नाहीत कायकोर्टात गेले आहेत. दोघेही कोर्टात गेले आहेत, एक आजारी आहेत आणि एक व्हिजीटसाठी गेले आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u>** हे बघा, पाच इंजिनियर आहेत, सितलानी ॲक्टींग शहर अभियंता, ओरीजनल पोस्ट जुनियर इंजिनियर प्रमोटेड उप अभियंता ऑर्डर मिळाली आहे किंवा नाही हे मला माहीत नाही. शहर अभियंताचे चार्ज त्यांनाच आहे ना, त्याच्या नंतर सर्व जेई पण तिथेच आहेत आणि उप अभियंता पण तिथेच लोक आहेत. म्हणजे एक झोनचा जेई आहे आणि दुस—याचे उप अभियंता आहेत. जो दुस—याचा जेई आहे, तो पहील्याचा उप अभियंता आहेत आणि आयुक्त साहेब सांगतात की, मला इंजिनियर भरती करण्यासाठी महाराष्ट्र शासनाची परवानगी पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—</u>** काही दिवसापुर्वी आयुक्त साहेबांनी मला फाईल दाखवली, की आम्ही नविन इंजिनियरची ऑर्डर काढली आहे, परंतु मी दोन वेळा विचारले ऑर्डर काढली नाही, काहीच नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** टेक्नीकल इंजिनियर कोणीही नाही, आम्हांला विचारायचे आहे, चार विषय पेडींग आहेत. पेडींग ठेवायचे नाहीत, सांगा काय करायचे?

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानीः—</u>** खुलासा तर करा.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** सन्माननिय चव्हाण साहेब, मी तुम्हांला विचारतो, एनजीओचा अर्थ काय? एनजीओ जी संस्था असते, ती एनजीओ संस्था काय करू शकते?

**<u>आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी, श्री. विकास चव्हाणः—</u>** सामाजिक कार्य करते.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** बरोबर आहे, मग या चारही टेंडरमध्ये एनजीओला जॉईंट वेंचर करून केलेले आहे. ते योग्य आहे का?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** कोणत्याही कामासाठी जर एनजीओला केले आहे तर ते चांगल्या प्रकारे देखभाल करतील ना, नाव गर्व्हनमेंट ऑर्गनायजेशन आहे, ते त्यांच्या हितासाठी, समाजाच्या हितासाठी काम करतील. त्यामध्ये जर काही गडबड झाली तर....

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** जॉईंट वेंचर केले आहे, मी फक्त एनजीओ बोलत नाही, एनजीओला दिले तर कोणतीच आपत्ती नाही. परंतु जॉईंट वेंचर त्यांना कसे केले आहे, ते मला सांगा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** हिंदुस्तानच्या कॉन्स्टूशनमध्ये असे थांबवणे नाही, की कोणतीही पब्लिक ट्रस्ट किंवा रजिस्टर सोसायटी त्यांना शब्द दिला जातो, एनजीओ, नॉन गर्व्हनमेंट ऑर्गनायजेशन ते कोणतेही कार्य करण्यासा थांबवू शकत नाही, असे कुठेच नाही. भले गार्डन बनवण्याचे काम असेल, मेन्टेनेसचे काम असेल, आपल्या शहरामध्ये भरपूर एनजीओ टॉलेट ऑपरेशन आणि मेन्टेनेस करतात. महीला बचत गट आहेत, ते कॅटींग चालवतात, वेगवेगळी कामे करतात. आपल्या हाऊस टॅक्सचे बिल पोहचवतात, भरपूर कार्य करतात. त्यांना सिमित नही करू शकते, त्यांना त्या वस्तुचे नॉलेज आहे आणि ते आपल्या कंडीशनमध्ये बसतात. तर ते कार्य करू शकतात

**<u>सदस्य, श्री. राजेद्र चौधरी:—</u>** एनजीओच्या विषय मी तुम्हांला सांगतो, ज्या पण संस्था आहेत, धर्मादायक आयुक्तांच्या कार्यालयाने रदद केल्या आहेत. तर त्यांनी रदद केलेलया या संस्था तर नाहीत ना. काल परवाच व्हाटस अपवर लिस्ट आली होती.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** चौधरीजी, हे बघा कसे आहे, हे काम प्रशासनाचे आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेद्र चौधरी:—</u>** बरोबर आहे, मी प्रशासनालाच विचारत आहे ना.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आम्ही प्रशासनाला विचारत आहेत, तर तुम्ही का उत्तर देत आहेत, त्यांच्यासाठी तुम्ही उत्तर देत आहेत.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** मी तुमच्या प्रश्नाचे उत्तर देत नाही, मी सांगत आहे की, ही परिस्थिती आहे, तुमचा प्रश्नच चुकीचा आहे. त्यासाठी हे बघणे प्रशासनाचे काम आहे. मी प्रशासनाला जागृत करीत आहे की, त्यांचे रजिस्ट्रेरेशन रदद तर झाले नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** हा जो विषय आहे, विषय क्रमांक ४,५ ...

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** एवढी काय घाई आहे, तुम्हांला जायचे आहे तर जा.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** साहेब, गार्डनची हालत खराब आहे, तिथे वाचमन पण नाही.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** हे गार्डन तुम्ही बनवणार तर तिथे माळीची गरज भासेल, गार्डन बनवल्यावर तिथे सुरक्षा रक्षकाची गरज लागेल, गार्डन बनवल्यावर त्याची देखभाल करण्यासाठी लेबरची आवश्यकता लागेल. तुम्ही बनवणारच नाही तर तुम्हांला हे लेबर, माळी, सुरक्षा रक्षक यांची आवश्यकता का लागेल?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** बनवणार आहेत नाही बनवून झाले प्रभाग क्रमांक ३ चा जो काम आहे, ते काम झाले आहे की, नाही ते मला आता सांगा. झाले आहे, प्रभाग क्र.३ मधील गार्डनचे काम झाले ना?

**<u>सदस्य, श्री. राजेद्र चौधरी:—</u>** यादी कुठे आहे? कोणकोणते गार्डन आहेत.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** वर्क ऑर्डर नाही, काय काम होऊन मोकळे झाले आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेद्र चौधरी:—</u>**जिजामाता गार्डन आहे त्यामध्ये.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** आज प्रभाग चारमध्ये....

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** भारतभाई तुम्ही असा प्रश्न विचारत आहेत, तुमही अभ्यासू नगरसेवक आहेत, खुपच जुने आहेत, वरिष्ठ नगरसेवक आहेत. तुम्ही जर गोषवारा वाचला असता तर तुम्हांला नॉलेज आले असते.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** याच्यामध्ये विषय असा आहे की, बुबेर ॲन्ड कंपनी यांनी याच्यामध्ये कंडीशन टाकली होती. विटीपी म्हणून एक त्यांनी त्यावेळी सुरू केले होते, सामाजिक संस्थेला ते विटीपी असल्या शिवाय हे काम देण्यात येऊ नये. सुरूवातीला यांनी टेंडर कॉल केला, कॉल केल्या नंतर सामाजीक संस्था चार आल्या. चारमध्ये विटीपी असणारी संस्था एक होती आणि बाकीच्या संस्था नव्हत्या त्यामुळे त्यांनी रीकॉल केला. रीकॉलमध्ये

यांनी काय केले जॉईटं वेंचरने काम करू शकतात, अशी एक अट टाकली, ठेकेदारांना सांभाळण्यासाठी. जॉईंट वेंचरने काम करण्यासाठी. पहील्या सामाजिक संस्थमध्ये तसे नव्हते. दुस–या कॉलमध्ये ते करून टाकले. दुस–या टेंडर केल्यामुळे जॉईंट वेंचरने करून टाकले. पाच लोक आली, पाच लोकांमध्ये गुबेर ॲन्ड कंपनी पण आली. त्याच्यामध्ये एन.एस.जी.एस.टी. ची अट टाकली होती, पिएफची अट टाकली होती आणि कामाचा अनुभव या सगळया गोष्टीमध्ये बुबेर ॲन्ड कंपनी बसते. पण यांनी काय केले? हे सगळे मिलीभगत असल्यामुळे या लोकांना बुबेर ॲन्ड कंपनीचे सेंकड इनलोप ओपनच केले नाही. आले की लक्षात, आजही बुबेर ॲन्ड कंपनीचे सेंकड इनलअप ओपन केले आहे का विचारा त्यांना? का नाही केले? त्याच्याकडे सगळया गोष्टी असतांना सुध्दा तो ओपन करण्यात आला नाही. त्या नंतर विषय असा आहे की, जॉईंट वेंचर त्या संदर्भात तक्रारी झाल्या होत्या, तरी यांनी दखल घेतलेली नाही. ए.एम. रामचंदानी यांनी संदर्भात तक्रारी केल्या होत्या, की हे पुर्णपणे बोगस आहे. असे असतांना सुध्दा आपण त्याच्यावर ॲक्शन घेतली नाही. जॉईंट वेंचरने कुठलेही एनजीओ काम करू शकणार नाही. तसे नसतांना सुध्दा या संदर्भातील तिन्ही किंवा चारही कामे आहेत, कामाची निविदा आपल्या स्थायी समिती समोर मंजुरीला आणतात आणि बुबेर आणि कंपनीचे का थांबवले? ते पण आम्हांला कळाले पाहीजे ना. ते सभागृहाला इथे कळाले पाहीजे. त्यांचे का थांबवले गेले? त्यांच्या काही अडचणी असतील किंवा त्यांचे काय नव्हते? ते तर आम्हांला कळाले पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u>** माझे म्हणणे आहे की, भरपूर चर्चा झालेली आहे, आता हा विषय पास करू.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u>** नाही, नाही पास करा, परंतु परत परत प्रश्न केला जातो की, महानगरपालिकेमध्ये चुकीच्या पध्दतीने काम केले जाते.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** आम्हांला अडचण नाही पास करण्यासाठी.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u>** चुकीच्या पध्दतीने महानगरपालिकेत काम केले जाते.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u>** प्रशासनाने आणले आहे तर हे सर्व बघणे प्रशासनाचे काम आहे. करू शकतो किंवा नाही करू शकतो.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** हेच चांगले दिवस आहेत का?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u>** काम करू शकतो किंवा नाही करू शकत हे सर्व बघणे प्रशासनाचे काम आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** चुकीचे असले तरी चालेल का?

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u>** जर कोर्टामध्ये कोणी गेले जसे यांनी सांगितले की कल्पतरू....

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>** सेंकड लिफाफा का उघडला नाही, तो टेंडर का उघडला नाही?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** बुबेर कंपनीचे सर्व ओके असतांना सुध्दा लिफाफा उघडला गेला नाही.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>** एक गोष्ट तुम्हांला सांगतो की, किती वेळा टेंडर होतात, ते आपल्या नियमाला फुलफिल नाही करीत सेकंड लिफफा जर उघडला जात नाही तर प्रशासनाची ही जबाबदारी आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** नियम आपणच बनवले आहेत ना.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>** टेंडर उघडला तरच समजेल ना.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u>** ही टेक्नीकल बाब आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>** या गोष्टीला आपण जबाबदार नाहीत. प्रशासनाने उघडला नाहीतर विचार करूनच, टेंडरची एक कमिटी असते, कमिटीने निर्णया घेतला असेल नाही उघडायचा तर आपण काय करू शकतो.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u>** इथे कमिटी मॅनेज होते, कशी होते, काय होते आम्हांला माहीती नाही का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** जर एखादया ठेकेंदारा बरोबर अन्याय होत असेल तर त्यांच्यासाठी कोर्ट उघडा आहे. जाण्यासाठी बंधनकारक नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** पास करत आहोत, टेक्नीकल काम आहे, आम्ही जबाबदार नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** सर्व समितीने पास…

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** आज राजेशजीनी जे जे सांगितले की आपण जेव्हा हे काम करून तेव्हा माळी, वॉचमन, मजुर लागतील. चार नंबर प्रभागामध्ये गार्डनमध्ये फंड जात आहे, हे डेव्हलेप झालेले गार्डन आहेत, तिथे आजची परिस्थिती अशी आहे की, एक पण वॉचमन नाही. सहा माळीमधून फक्त एकच माळी आहे, या सर्व गार्डनसाठी तिथे जंगल जशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कटींग होत नाही, काहीच होत नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** माळी, मजूरांचे पण टेंडर काढले आहे,

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** पहीले गार्डन बनवल्यावर माळी येतील का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** याच्या नंतर माळी येतील.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** माळी कुठून आणणार रस्त्यावरून?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** ठेकेदाराला गार्डन बनवून दया, त्याच्या नंतर माळी पण येतील.

**महापालिका सचिवः—** याच्यामध्ये काही टाकायचे असेल तर अटी शर्ती सांगा.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** ही सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील. इतिवृत्तात नाही ठरावामध्ये यायला पाहीजे. या चारही टेंडर संदर्भात….

**महापालिका सचिवः—** तांत्रिक बाबीसाठी प्रशासन जबाबदार असेल.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** एक खुप फेमस केस झाली होती, उल्हासनगर महापालिकेची दोन मिनीटात सांगतो, मोनार्च इन्फास्ट्रक्चार, कोणार्क इन्फास्ट्रक्चार लिगल फिल्डमध्ये पण खुप फेमस केस आहे. जर प्रशासन कुठे पण चुक करीत असेल तर ती जबाबदारी त्यांची असते तुमची आणि आमची रहात नाही. कारण की, टेक्नीकल क्वालिफाईड हे आहेत. इंजिनियर लोक पण हे आहेत, त्यांनी एम.पी.एसी. पण पास केले आहे, आय. .एस. आय अधिकारी हे आहेत, आपण आणि मी आय.एस. आय. नाही मी तर ११ वी नापास आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** मुददा असा आहे, जी गोष्ट आपल्यांना माहीत आहे, ज्या सदस्यांने समोर आणली आहे, नजर अंदाज करून पण चालणार नाही ना.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** नाही, नाही नजरअंदाज करणेची गोष्ट नाही, इथे त्यांना रिकमेंड केले आहे, तर सर्व बघून विचार करून केले आहे ना. कायदा कानून हे सर्व बघून केले आहे.

**महापालिका सचिवः—** जर तांत्रीकदृष्टया कधी अडचणी आल्यास सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची राहील. दुसरे असे लिहीले आहे की, सदरच्या कामास एसपीव्ही करण्यास मान्यता राहील उपरोक्त कामाचे देयक काम पुर्ण झाल्यानंतर अदा करावे..

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** काम झाल्या नंतर देयक अदा करू.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** इतिवृत्ताची वाट न पहाता, चारही टेंडर पास..पास..पुढील प्रमाणे अटी टाका तांत्रिकदृष्टया काही अडचणी असतील तर त्यास सर्वस्व प्रशासन जबाबदार राहील आणि सदरच्या कामास एसपीव्ही करण्यास मान्यता दयावी व उपरोक्त कामाचे देयक काम पुर्ण झाल्यानंतर अदा करावे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आठ दिवसात पेमेंट होणार. एक कामाचे तीन नंबर प्रभाग समितीचे काम पुर्ण झाले आहे. आठच दिवसात पेमेंट होणार, माझ्याकडून लिहून घ्या.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** वाचमन आणि माळीचे जरा बघा.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** प्रभाग तीनची लिस्ट सांगा.

**<u>सदस्या, श्रीमती दिप्ती दुधानी:—</u>** सर ही चांगली गोष्ट आहे की, गार्डनचे प्रपोजल होत आहेत, कुठे वापर होत आहेत हे जरा लक्ष दया. कालानी सोसायटीच्या बाहेर पहीले भाजी मार्केट होते, परंतु आता इथे गार्डन प्रपोज केले आहे. ते रोड कटींगमध्ये येत आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** आयुक्त साहेब, पर्सनली याच्यावर लक्ष देतील, जर रोड वायडिंगमध्ये जात आहे, तर तिथे काम करायला नाही पाहीजे, हे बघितले पाहीजे.

**<u>सदस्या, श्रीमती दिप्ती दुधानी:—</u>** याच्यासाठी काय केले जाईल?

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** रोड कटींगमध्ये जात आहे, तर आयुक्त साहेब बघतील.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** रोड कटींगमध्ये येत आहे तर गार्डन बनवायचे नाही आतमध्ये घेऊ. रोड कटींगमध्ये तुटून जाईल.

**<u>सदस्या, श्रीमती दिप्ती दुधानी:—</u>** सर पैसे वेस्ट जात आहेत ना.

**<u>महापालिका सचिव:—</u>** ठिक आहे? विषय क्र. ५, ६ ७ सेम आहेत, इथे अटी दिल्या आहेत, जर तांत्रिकदृष्टया काही अडचणी असतील तर त्यास सर्वस्व प्रशासन जबाबदार राहील आणि सदरच्या कामास एसपीव्ही करण्यास मान्यता दयावी व उपरोक्त कामाचे देयक काम पुर्ण झाल्यानंतर अदा करावे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** एक मिनीट मॅडम, फक्त मला याच्यामध्ये एक मुददा आहे, मला असे वाटते की, माझ्या अंदाजा प्रमाणे प्रभाग क्रमांक ३ चा जो इथे टेंडर आहे, विषय असा आहे, गार्डनच्या संदर्भात ही कामे जी घेणार आहेत, पुर्वीची कामे आणि आताची नविन कामे तुम्ही जी करणार आहेत, दोघाचेही चित्रीकरण करण्यात यावे आणि सभागृहाला दाखवण्यात यावे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** सर्व प्रभागांचे करा साहेब,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** सर्व गार्डनचे आताचे चित्रीकरण करा आणि नंतर बनल्या नंतर चित्रीकरण करा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u>** काम होण्या आधीचा फोटो आणि काम झाल्या नंतरचा फोटो काम करण्याच्या वेळी व्हिडोओ ग्राफी सर्व व्हायला पाहीजे.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, जया प्रकाश माखिजा:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र.१ अंतर्गत असलेल्या उद्यानाचे सुशोभिकरण करणेच्या कामाचे निविदाप्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.**

**<u>प्रस्तावना</u>**

टि-८ वर नमुद केल्याप्रमाणे प्रभाग क्षेत्र क्र. १ अंतर्गत असलेल्या उद्यानांचे (एकूण १५ उद्याने) सुशोभिकरण व नुतनीकरण करणेच्या कामाची, प्राकलनिय किंमत रुपये ६७,२८,४६०/- एवढया रक्कमेची सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे फेरनिविदा मागविण्यात आली. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६७,२८,४६०/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २७/०४/२०१८ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक २७/०४/२०१८ ते २/५/२०१८ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १४/०५/२०१८ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | ७/२/२०१८ |
| क) | तृतीय मुदतवाढ | २७/४/२०१८ |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | १८/०५/२०१८ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०३ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

दिनांक १८/०५/२०१८ रोजी प्रभाग क्षेत्र क्र. १ अंतर्गत असलेल्या उद्यानांचे (एकूण १५ उद्याने) सुशोभिकरण व नुतनीकरण करणेच्या कामांकरीता प्राप्त झालेल्या एकूण ०३ निविदांचा तांत्रिक देकार भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तांत्रिक भाग (Technical Bid)**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी | मानव व्हि.एस.एस.एस व ऋषी कंन्स्ट्रक्शन | आदर्श ए.व्हि. व एज्यु.सोसा.व एस.एस.के.इंन्फ्रा. |
|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | होय | होय | होय |
| २ | संस्था/कंपनी यांनी समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | होय | होय | होय |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का | होय | नाही (नोंदणी प्रमाणपत्र ५०.०० लक्ष खर्चापर्यंतच्या कामांच्या मर्यादेतील आहे.) | होय |
| ४ | जी.एस.टी. रेजीस्ट्रेश्न | होय | होय | होय |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | होय | होय | होय |
| ६ | ई पी अेफ | होय | होय | होय |
| ७ | पॅनकार्ड | होय | होय | होय |
| ८ | व्ही.टी.पी. सर्टिफिकेट | होय | होय | होय |

सदर फेरनिविदा प्रक्रियेत १) मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी २) आदर्श ए.व्हि. व एज्यु.सोसा.व एस.एस.के.इंन्फ्रा. हे दोन निविदाकार पात्र होत असल्याने सदर निविदांचा दुसरा लिफाफा आर्थिक भाग (Finanacial Bid) उघडणेस मा.आयुक्त सो. यांनी दिनांक १३/०७/२०१८ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार दिनांक १६/०७/२०१८ रोजी पात्र निविदाकारांचा आर्थिक भाग उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांची नावे | दिलेले दर |
|---|---|---|
| १ | मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी | ९ टक्के जास्त |
| २ | आदर्श ए.व्हि. व एज्यु.सोसा.व एस.एस.के.इंन्फ्रा. | १३ टक्के जास्त |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी यांची निविदा ९ टक्के जास्त दराची असून निम्न असल्याने मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी यांना दिनांक २४/०७/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता मा.आयुक्त सो . यांचे दालनात त्यांनी सादर केलेल्या दराचे वाटाघाटाकरीता बोलविण्यात आले होते. सदर वाटाघाटीदरम्यान मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी यांनी दरसुचीवर (AT PAR) काम करण्यास संमती दर्शविली आहे. याबाबत मा.आयुक्त सो यांनी सहमती दर्शविली आहे.

तरी मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी या निम्न दराचे निविदाकार यांचेशी दरसुचीवर (AT PAR) संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.२०** **दिनांक:— १३/८/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र. १ अंतर्गत असलेल्या उदयानाचे सुशोभिकरणप करणेच्या कामाचे निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे. सिध्दांत एस.व्हि. एस. व झा.पी. कंपनी या निम्न दराचे निविदाकार यांचेशी दरसूचीवर ॲटपार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. तांत्रिकदृष्टया काही अडचणी असतील तर त्यास सर्वस्व प्रशासन जबाबदार राहील.
२. सदरच्या कामास एसपीव्ही करण्यास मान्यता दयावी.
३. उपरोक्त कामाचे देयक काम पुर्ण झाल्यानंतर अदा करावे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभापती
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव:–** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्र.४:– उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र.२ अंतर्गत असलेल्या उद्यानाचे सुशोभिकरण करणेच्या कामाचे निविदाप्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.**

---

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, जया प्रकाश माखिजा:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ४ :– उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र.२ अंतर्गत असलेल्या उद्यानाचे सुशोभिकरण करणेच्या कामाचे निविदाप्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्तावना**

टि-८ वर नमुद केल्याप्रमाणे प्रभाग क्षेत्र क्र. २ अंतर्गत असलेल्या उद्यानांचे (एकूण ०६ उद्याने) सुशोभिकरण व नुतनीकरण करणेच्या कामाची, प्राकलनिय किंमत रुपये ७५,००,०००/- एवढया रक्कमेची सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे फेरनिविदा मागविण्यात आली. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ७५,००,०००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २७/०४/२०१८ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक २७/०४/२०१८ ते २/५/२०१८ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १४/०५/२०१८ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | ७/२/२०१८ |
| क) | तृतीय मुदतवाढ | २७/४/२०१८ |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | १८/०५/२०१८ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०५ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०५ |

दिनांक १८/०५/२०१८ रोजी प्रभाग क्षेत्र क्र. २ अंतर्गत असलेल्या उद्यानांचे (एकूण ०६ उद्याने) सुशोभिकरण व नुतनीकरण करणेच्या कामांकरीता प्राप्त झालेल्या एकूण ०५ निविदांचा तांत्रिक देकार भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तांत्रिक भाग (Technical Bid)**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी. कंपनी | मानव व्हि.एस.एस.एस व ऋषी कंन्स्ट्रक्शन | आदर्श ए.व्हि. व एज्यु. सोसा. व एस.एस.के.इंन्फ्रा. | मे.बुबरे ॲण्ड असोसिएशन | मे.सागर कंन्स्ट्रक्शन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी यांनी समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का | आहे | नाही (नोंदणी प्रमाणपत्र ५०.०० लक्ष खर्चापर्यंतच्या कामांच्या मर्यादेतील आहे.) | आहे | आहे | आहे |
| ४ | जी.एस.टी. रेजीस्ट्रेश्न | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | ई पी अेफ | होय | होय | होय | होय | होय |
| ७ | पॅनकार्ड | होय | होय | होय | होय | होय |
| ८ | व्ही.टी.पी. सर्टिफिकेट | होय | होय | होय | नाही | नाही |

सदर फेरनिविदा प्रक्रियेत १) मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी २) आदर्श ए.व्हि. व एज्यु.सोसा.व एस.एस.के.इंन्फ्रा. हे दोन निविदाकार पात्र होत असल्याने सदर निविदांचा दुसरा लिफाफा आर्थिक भाग (Finanacial Bid) उघडणेस मा.आयुक्त सो. यांनी दिनांक १३/०७/२०१८ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार दिनांक १६/०७/२०१८ रोजी पात्र निविदाकारांचा आर्थिक भाग उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांची नावे | दिलेले दर |
|---|---|---|
| १ | मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी | ९ टक्के जास्त |
| २ | आदर्श ए.व्हि. व एज्यु.सोसा.व एस.एस.के.इंन्फ्रा. | १२.५० टक्के जास्त |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी यांची निविदा ९ टक्के जास्त दराची असून निम्न असल्याने मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी यांना दिनांक २४/०७/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता मा.आयुक्त सो. यांचे दालनात त्यांनी सादर केलेल्या दराचे वाटाघाटाकरीता बोलविण्यात आले होते. सदर वाटाघाटीदरम्यान मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी यांनी दरसुचीवर (AT PAR) काम करण्यास संमती दर्शविली आहे. याबाबत मा.आयुक्त सो यांनी सहमती दर्शविली आहे.

तरी मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी या निम्न दराचे निविदाकार यांचेशी दरसुचीवर (AT PAR) संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिति ठराव क्र.२१** **दिनांकः— १३/८/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र. २ अंतर्गत असलेल्या उदयानाचे सुशोभिकरणप करणेच्या कामाचे निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे. सिध्दांत एस.व्हि.एस. व झा.पी. कंपनी या निम्न दराचे निविदाकार यांचेशी दरसूचीवर ॲटपार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. तांत्रिकदृष्टया काही अडचणी असतील तर त्यास सर्वस्व प्रशासन जबाबदार राहील.
२. सदरच्या कामास एसपीव्ही करण्यास मान्यता दयावी.
३. उपरोक्त कामाचे देयक काम पुर्ण झाल्यानंतर अदा करावे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** विषय क्रमांक. ५ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र.५:— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र.3 अंतर्गत असलेल्या उद्यानाचे सुशोभिकरण करणेच्या कामाचे निविदाप्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.**

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५ :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र.3 अंतर्गत असलेल्या उद्यानाचे सुशोभिकरण करणेच्या कामाचे निविदाप्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्तावना**

टि-८ वर नमुद केल्याप्रमाणे प्रभाग क्षेत्र क्र. ३ अंतर्गत असलेल्या उद्यानांचे (एकूण १९ उद्याने) सुशोभिकरण व नुतनीकरण करणेच्या कामाची, प्राकलनिय किंमत रुपये ८५,९४,७४०/- एवढया रक्कमेची सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे फेरनिविदा मागविण्यात आली. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ८५,९४,७४०/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २७/०४/२०१८ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक २७/०४/२०१८ ते २/५/२०१८ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १४/०५/२०१८ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | ७/२/२०१८ |
| क) | तृतीय मुदतवाढ | २७/४/२०१८ |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | १८/०५/२०१८ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०४ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०४ |

दिनांक १८/०५/२०१८ रोजी प्रभाग क्षेत्र क्र. ३ अंतर्गत असलेल्या उद्यानांचे (एकूण १९ उद्याने) सुशोभिकरण व नुतनीकरण करणेच्या कामांकरीता प्राप्त झालेल्या एकूण ०४ निविदांचा तांत्रिक देकार भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**<u>तांत्रिक भाग (Technical Bid)</u>**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी. कंपनी | मानव व्हि.एस.एस.एस व ऋषी कंन्स्ट्रक्शन | आदर्श ए.व्हि. व एज्यु. सोसा. व एस.एस.के.इंन्फ्रा. | मे.बुबरे ॲण्ड असोसिएशन |
|---|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी यांनी समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का | आहे | नाही (नोंदणी प्रमाणपत्र ५०.०० लक्ष खर्चापर्यंतच्या कामांच्या मर्यादेतील आहे.) | आहे | आहे |
| ४ | जी.एस.टी. रेजीस्ट्रेश्न | आहे | आहे | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | ई पी अेफ | आहे | आहे | आहे | आहे |
| ७ | पॅनकार्ड | आहे | आहे | आहे | आहे |
| ८ | व्ही.टी.पी. सर्टिफिकेट | आहे | आहे | आहे | नाही |

सदर फेरनिविदा प्रक्रियेत १) मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी २) आदर्श ए.व्हि. व एज्यु.सोसा.व एस.एस.के.इंन्फ्रा. हे दोन निविदाकार पात्र होत असल्याने सदर निविदांचा दुसरा लिफाफा आर्थिक भाग (Finanacial Bid) उघडणेस मा.आयुक्त सो. यांनी दिनांक १३/०७/२०१८ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार दिनांक १६/०७/२०१८ रोजी पात्र निविदाकारांचा आर्थिक भाग उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांची नावे | दिलेले दर |
|---|---|---|
| १ | मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी | ९.०० टक्के जास्त |
| २ | आदर्श ए.व्हि. व एज्यु.सोसा.व एस.एस.के.इंन्फ्रा. | १२.०० टक्के जास्त |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी यांची निविदा ९ टक्के जास्त दराची असून निम्न असल्याने मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी यांना दिनांक २४/०७/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता मा.आयुक्त सो. यांचे दालनात त्यांनी सादर केलेल्या दराचे वाटाघाटाकरीता बोलविण्यात आले होते. सदर वाटाघाटीदरम्यान मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी यांनी दरसुचीवर (AT PAR) काम करण्यास संमती दर्शविली आहे. याबाबत मा.आयुक्त सो यांनी सहमती दर्शविली आहे.

तरी मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी या निम्न दराचे निविदाकार यांचेशी दरसुचीवर (AT PAR) करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.२२** **दिनांकः— १३/८/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र. ३ अंतर्गत असलेल्या उदयानाचे सुशोभिकरणप करणेच्या कामाचे निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे. सिध्दांत एस.व्हि.एस. व झा.पी. कंपनी या निम्न दराचे निविदाकार यांचेशी दरसूचीवर ॲटपार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. तांत्रिकदृष्टया काही अडचणी असतील तर त्यास सर्वस्व प्रशासन जबाबदार राहील.
२. सदरच्या कामास एसपीव्ही करण्यास मान्यता दयावी.
३. उपरोक्त कामाचे देयक काम पुर्ण झाल्यानंतर अदा करावे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव:—** विषय क्रमांक. ६ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.६:— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र.४ अंतर्गत असलेल्या उद्यानाचे सुशोभिकरण करणेच्या कामाचे निविदाप्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.**

---

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६ :— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र.४ अंतर्गत असलेल्या उद्यानाचे सुशोभिकरण करणेच्या कामाचे निविदाप्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार यांचेशी संविदा करणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्तावना**

टि-८ वर नमुद केल्याप्रमाणे प्रभाग क्षेत्र क्र. ४ अंतर्गत असलेल्या उद्यानांचे (एकूण ४ उद्याने) सुशोभिकरण व नुतनीकरण करणेच्या कामाची, प्राकलनिय किंमत रुपये ६९,६८,३००/- एवढया रक्कमेची सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे फेरनिविदा मागविण्यात आली. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनिय खर्च | रुपये ६९,६८,३००/- |
| २ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक २७/०४/२०१८ |
| ३ | निविदा विक्री कालावधी | दिनांक २७/०४/२०१८ ते २/५/२०१८ |
| ४ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १४/०५/२०१८ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | - |
| ब) | द्वितीय मुदतवाढ | ७/२/२०१८ |
| क) | तृतीय मुदतवाढ | २७/४/२०१८ |
| ५ | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | १८/०५/२०१८ |
| ६ | आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | - |
| ७ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०४ |
| ८ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०४ |

दिनांक १८/०५/२०१८ रोजी प्रभाग क्षेत्र क्र. ४ अंतर्गत असलेल्या उद्यानांचे (एकूण ४ उद्याने) सुशोभिकरण व नुतनीकरण करणेच्या कामांकरीता प्राप्त झालेल्या एकूण ०४ निविदांचा तांत्रिक देकार भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तांत्रिक भाग (Technical Bid)**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी. कंपनी | मानव व्हि.एस.एस.एस व ऋषी कंन्स्ट्रक्शन | आदर्श ए.व्हि. व एज्यु. सोसा. व एस.एस.के.इंन्फ्रा. | मे.बुबरे ॲण्ड असोसिएशन |
|---|---|---|---|---|---|
| १ | संस्था/कंपनी या ३ वर्षाचे वार्षिक उलाढाल केल्याचे कागदपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे | आहे |
| २ | संस्था/कंपनी यांनी समकामाचे अनुभवाचे प्रमाणपत्र जोडलेले आहे का | आहे | आहे | आहे | आहे |
| ३ | संस्था/कंपनी यांनी नोंदणी प्रमाणपत्र जोडले आहे का | आहे | नाही (नोंदणी प्रमाणपत्र ५०.०० लक्ष खर्चापर्यंतच्या कामांच्या मर्यादेतील आहे.) | आहे | आहे |
| ४ | जी.एस.टी. रेजीस्ट्रेशन | आहे | आहे | आहे | आहे |
| ५ | अद्यावत आयकर भरल्याची प्रमाणपत्र | आहे | आहे | आहे | आहे |
| ६ | ई पी अेफ | आहे | आहे | आहे | आहे |
| ७ | पॅनकार्ड | आहे | आहे | आहे | आहे |
| ८ | व्ही.टी.पी. सर्टिफिकेट | आहे | आहे | आहे | नाही |

सदर फेरनिविदा प्रक्रियेत १) मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी २) आदर्श ए.व्हि. व एज्यु.सोसा.व एस.एस.के.इंन्फ्रा. हे दोन निविदाकार पात्र होत असल्याने सदर निविदांचा दुसरा लिफाफा आर्थिक भाग (Finanacial Bid) उघडणेस मा.आयुक्त सो. यांनी दिनांक १३/०७/२०१८ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार दिनांक १६/०७/२०१८ रोजी पात्र निविदाकारांचा आर्थिक भाग उघडण्यात आला. त्याप्रमाणे निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकारांची नावे | दिलेले दर |
|---|---|---|
| १ | मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी | ९.०० टक्के जास्त |
| २ | आदर्श ए.व्हि. व एज्यु.सोसा.व एस.एस.के.इंन्फ्रा. | १२.८० टक्के जास्त |

वरील तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी यांची निविदा ९ टक्के जास्त दराची असून निम्न असल्याने मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी यांना दिनांक २४/०७/२०१८ रोजी दुपारी १.०० वाजता मा.आयुक्त सो. यांचे दालनात त्यांनी सादर केलेल्या दराचे वाटाघाटाकरीता बोलविण्यात आले होते. सदर वाटाघाटीदरम्यान मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी यांनी दरसुचीवर (AT PAR) काम करण्यास संमती दर्शविली आहे. याबाबत मा.आयुक्त सो यांनी सहमती दर्शविली आहे.

तरी मे. सिध्दांत एस.व्हि.एस व झा.पी.कंपनी या निम्न दराचे निविदाकार यांचेशी दरसुचीवर (AT PAR) संविदा करण्यास मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.२३** **दिनांकः— १३/८/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्षेत्र क्र. ४ अंतर्गत असलेल्या उदयानाचे सुशोभिकरण करणेच्या कामाचे निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे. सिध्दांत एस.व्हि.एस. व झा.पी. कंपनी या निम्न दराचे निविदाकार यांचेशी दरसूचीवर ॲटपार संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

१. तांत्रिकदृष्टया काही अडचणी असतील तर त्यास सर्वस्व प्रशासन जबाबदार राहील.
२. सदरच्या कामास एसपीव्ही करण्यास मान्यता दयावी.
३. उपरोक्त कामाचे देयक काम पुर्ण झाल्यानंतर अदा करावे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** विषय क्रमांक. ७ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.७:—** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागाअंतर्गत ई निविदा प्रक्रियादृवारे सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक,मदतनीस व किरकोळ पंप दुरूस्ती इत्यादीकामी लघुत्तम दराचे निविदाकार मे.हर्षल टेकनिक्ल यांच्या निविदेस मान्यता देणे.

.—

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** टेंडर किती आले होते, तीन आले होते ना, मग आता किती?

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे:—** १.८ येत आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** दुसरा कितीचा आहे?

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे:—** तांत्रिक लिफाप्यामध्चये तीन क्वालीफाईड झाले होते, तीन जणांनी भाग घेतला होता, त्यामध्ये एकजन पात्र ठरला आहे. कामाचे निकष पहाता आणि उर्जा खात्याचा सन २०१७ चा जी. आर. त्यामध्ये असे दिले आहे की, मुददा क्रमांक ४ च्यानुसार कामाची हे बघून....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** तुम्ही परत कॉल केला नाही का?

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे:—** गेल्या एक वर्षापासून हे पाच कॉल झाले आहेत सर.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ठिक आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** आचार संहिता पण होती.

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे:—** मध्ये आचार संहिता पण होती.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ठिक आहे, पास...पास...

**महापालिका सचिव:—** पास...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** यामध्ये मी पहीला प्रश्न विचारला होता, मोठी जी सेक्शन मशिन आली होती, मी ऐकले की तीचे काम बंद झाले आहे, मी जो प्रश्न केला होता, सांगितले नाही.

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे:—** सर हा प्रश्न पाणी पुरवठा विभागाशी संबंधित आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** सेलवन साहेब.

**कार्यकारी अभियंता, श्री. एस. के सेलवन:—** सुपर सेक्शन मशिनसाठी आपण एस्टिमेट बनवून तीन महीन्यासाठी त्यांना दिले होते, पावसाच्या अगोदर, तीन महीन्याच्या कालावधीमध्ये त्यांना सिप्ट प्रमाणे त्यांना काम करायचे होते, त्याची मुदत संपलेली आहे आणि पुढील निविदा आता पावसाच्या नंतरच काढता येईल, सर. पावसाच्या कालावधीमध्ये आपल्याला आपल्याकडे जेटींग मशिन आहे, ती रिपेरींग करण्यात येणार आहे आणि नंतर ड्रायव्हिंग सेशनला, लिंक सेशनला मोठया प्रमाणात चोकअप जे होतात, ते साफ करण्यासाठी या मशिनचा वापर करण्यात येतो. आता जे बरेच चेंबरमध्ये पाणी जास्त प्रमाणे असल्यामुळे ते कचरा साफ करण्या ऐवजी पाणीच जास्त वाढते सर. त्याच्यामुळे हे काम नंतर करायला सांगितले आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** पावसाळया नंतर करणार आहेत का?

**कार्यकारी अभियंता, श्री. एस. के सेलवन:—** मेन सिजनध्ये नविन एस्टिमेट करून या दराने मंजूर करावे लागेल सर.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** असा किती एरिया बाकी आहे?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** सेलवन साहेब, ऐका तुम्ही टेंडर बनवाल, त्याच्या पहीले एस्टिमेट बनवणार तो टेंडर कॉल करणार, तो टेंडर ओपन होईल, एक वेळा, दोन वेळा त्याच्या नंतर प्रशासनाची मंजुरी ऑडीटरकडून आयुक्तांकडे जाईल, त्याच्या नंतर मंजुरीसाठी स्थायी समितीमध्ये येईल. यासाठी तुम्हांला वेळ लागणार आहे, त्यासाठी त्वरीत एस्टिमेट बनवून आयुक्त साहेबांची मंजुरी घ्या. कसे होते, मी आपल्याला एक उदाहरण देतो, हे बघा, गोषवा—याची तारीख आहे तुमची १/८/२०१८...

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** यामध्ये तुम्ही लक्ष देत नाहीत ना, गार्डनसाठी लवकर लक्ष देतात.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** दिनांक ४/१०/२०१७ ला पहील्या वेळी टेंडर कॉल केला होता, आज काय तारीख आहे, दहा महीने टेंडरसाठी प्रोसेस करण्यासाठी लागले आहेत. पाच वेळा टेंडर रिकॉल केला आहे, हा टेक्नीकल प्रॉब्लेम, तो टेक्नीकल प्रॉब्लेम पाच वेळा रिकॉल केले आहे, तर आपण मंजुर करणार रिझिववेशन होईल, त्या नंतर एम.डी. साठी, हा एक वर्षासाठी तर आता दोन वर्षासाठी केले पाहीजे. यांना आठ महीने प्रोसेससाठी लागतात.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** ती त्यांची चुकी आहे, जो आपल्याकडे आले आहे, तेच काम आपण करणार ना.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** साहेब, तुम्ही समजत नाही, आता एवढया वेळे पर्यंत जेटींगसाठी लेबर नव्हते, संपुर्ण शहरामध्ये त्रास होता,

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** तुम्ही आश्वासन दिले होती की,चांगले दिवस येणार आहेत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** यासाठी मी मी सांगतो की, एक वर्षसाठी नाही तर दोन वर्षासाठी करा.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** जे आहे, तेवढेच करा त्याच्यामध्ये काही वाढीव काम करू नका.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u>** परत परत टेंडर करा....

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u>** एक गोष्ट ऐका, एक तर आपण यांना जुना जो दर आहे, तो दर वाढवून दिले २५ टक्के जास्त देत आहे, २५ टक्के जास्त दराने देत आहेत तर एक वर्षाचा देण्या पेक्षा दोन वर्षाचा देवू. २५ टक्के अबाऊ देयचा आणि दोन वर्षासाठी दयायचा. हा टेंडर २५ टक्के अबाऊ आला आहे ना.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** बिलो किती आहे? तुम्ही दोन वर्षाचा प्रस्ताव का आणला नाही?

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u>** तुम्ही सिनियर नगरसेवक आहेत, खुप अभ्यासू अहात,  मी सर्वांसाठी शेवटचा पॅरा वाचून दाखवतो,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** तुम्ही उत्तर का देत आहेत?

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u>** तुम्ही अधिका–यांचे उत्तर का देत आहेत?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी–</u>** मी तुम्हांला सांगू इच्छितो की,....

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** मग तुम्ही तिथे बसा

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी–</u>** आपल्यांनाच अडचण निर्माण होते, सभागृहाच्या सदस्यांना त्रास होतो, आठ आठ महीना, एक वर्ष लागतो.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** तुम्ही त्रासत नाहीत ना.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी–</u>** मागच्या पानावर बघा निविदा मागवायला किती वेळ लागतो? निविदा मागवण्यासाठी आठ आठ महीने, एक एक वर्ष  लागतो. सर्वच त्रासतात, सर्व दु:खी आहेत, म्हणून मी म्हणतो की, दोन वर्षासाठी करा. हा पण विषय दोन वर्षासाठी दया आणि दोन नंबर विषय पण दोन वर्षासाठी दया.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>** मग तुम्ही उत्तर का देतात? त्यांनी आणला आहे, ते एक वेळचे जेवण मांगत आहेत, तर तुम्ही दोन वेळेचे जेवण का देत आहेत?

**<u>महापालिका सचिव:–</u>** यामध्ये दोन वर्षासाठी ठेवायला पाहीजे का? ठिक आहे पास... अटी वाचून दाखवत आहे, ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागाअंतर्गत ई निविदा प्रक्रियादृवारे सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक,मदतनीस व किरकोळ पंप दुरूस्ती इत्यादीकामी लघुत्तम दराचे निविदाकार में.हर्षल टेकनिक्ल यांच्या निविदेस २ वर्षाकरीता मान्यता देत आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u>** मी चव्हाण साहेबांकडून आशा बाळगतो की, आयुक्त साहेब आल्या नंतर स्थायी समितीमध्ये जे झाले आहे, त्याचा संपुर्ण अहवाल ते आयुक्तांना देतील.

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>सभापती, जया प्रकाश माखिजा:–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ७ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागाअंतर्गत ई निविदा प्रक्रियादृवारे सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक,मदतनीस व किरकोळ पंप दुरूस्ती इत्यादीकामी

लघुत्तम दराचे निविदाकार में.हर्षल टेकनिक्ल यांच्या निविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

- उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिकेतील सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक, वाहन मदतनिस व किरकोळ दुरूस्ती या बाबतची Online ई निविदा दिनांक ०४/१०/२०१७ ते २४/१०/२०१७ या कालावधीत मागविण्यात आलेले होती.
- सदर निविदेचा Online Bid Upload / Submission कालावधी दिनांक २४/१०/२०१७ पर्यंत एकाच निविदाकाराने भाग घेतला असल्यामुळे सदर निविदामध्ये स्पर्धा होत नसल्याने सदर निविदेस १५ दिवसाची प्रथम मुदतवाढ देणेत आली होती. त्याचा कालावधी दिनांक ०४/१०/२०१७ ते दि. १०/११/२०१७ असा ठेवण्यात आला होता. या कालावधीत एक निविदाकाराने भाग घेतला असल्यामुळे पुन्हा ७ दिवसाची दुसरी मुदतवाढ देणेत आली.
- पाच निविदाकाराने भाग घेतला असल्यामुळे पाच निविदाकारापैकी दोन निविदाकाराने निविदेच्या कस्टडी मध्ये यशस्वी रित्या बीड समिंट केलयाने मा.अति.आयुक्त ई निविदा समिती अध्यक्ष यांच्या मान्यतेने निविदा समिती समोर दिनांक १२/१२/२०१७ रोजी तांत्रिक भाग उघडण्यात आला. शासन निर्णय क्र.सीएटी—२०१७/प्रक्र.८/इमा—२, दिनांक १२ एप्रिल २०१७ मधील परिच्छेद ४.४ मध्ये ई निविदा प्रणाली अंतर्गत निविदाकाराने किमान ३ अथवा ३ पेक्षा जास्त निविदा भरल्याचे आढळल्यास (१) तात्रिक लिफाफा उघडावा. तात्रिक लिफाफातील कागदपत्रांची छाननी करून किमान १ किंवा २ कंत्राटदार पात्र ठरले तर अशा कामांचा लिफाफा क्रमांक (२) न उघडता सदर निविदा फेटाळण्यात यावी असे नमूद केले आहे. त्यानुसार तात्काळ सदर कामाची फेर ई निविदा प्रसिध्द करण्यासाठी मा. आयुक्त सो,यांच्या मान्यतेने ई निविदा क्र.१४०७ रद्द करून नव्याने फेर ई निविदा दिनांक २६/११/२०१७ ते ११/१/२०१८ या कालावधीत ई निविदा क्र १४६२ प्रसिध्द करण्यात आली होती.
- सदर निविदेत चार निविदोकाराने भाग घेतल्यामुळे सदर निविदेबाबत मा.अति.आयुक्त तथा ई निविदा समिती अध्यक्ष यांच्या मान्यतेने निविदा समिती समोर निविदा कक्षात दिनांक २४/०१/२०१८ रोजी तांत्रिक भाग उघडण्यात आले होते. या निविदामध्ये चार निविदाकारापैकी १) में.हर्षल टेकनिक्ल, नाशिक २) में कल्पतरू इंजिनिअर्स यांचे निविदेच्या अटी व शर्ती नुसार कागदपत्र सादर करण्यात आले आहे. परंतु ३) में श्रीकृष्णा एंटरप्रायजेस ४) में सिध्दान एंटरप्रायजेस या निविदाकारानी दुकाने व संस्था नोंदणी प्रमाणपत्र सादर केले नाही वरिल दोन्ही निविदा कारानी आवश्यक कागदपत्रे सादर केले नसल्यामुळे पुन्हा फेर निविदा अल्पकाळात मागविण्यास सुचना करण्यात आली.
- सदर कामाची निकड पाहाता निविदा कमीत कमी म्हणजे ५ दिवसाचा कालावधीत तृतीय फेर निविदा क्र १४७४ दि. ०२/२/२०१८ ते ०८/२/२०१८ या कालावधीत प्रसिध्द करण्यात आली होती. कस्टडी कालावधी मध्ये तीनच निविदाकारांने आपली निविदा ट्रान्सफर केली असल्याने पात्र तीन निविदाकाराची नियमानुसार उघडण्यात आली. सदर निविदा शासन निर्णय क्र.सीएटी—२०१७/प्र.क्र. ८/इमा—२, दिनांक १२ एप्रिल २०१७ नुसार परिच्छेद ४.३ व ४.४ लक्षात घेता यामध्ये स्पर्धा होत असल्याने तृतीय फेर ई निविदेचा दिनांक १६/०२/२०१८ रोजी तात्रिक भाग उघडण्यात आला. परंतु कागदपत्रात तपासणीच्या वेळी ई निविदा समितीने १) में.हर्षल टेकनिक्ल, नाशिक २) में कल्पतरू इंजिनिअस यांची निविदेच्या अटी व शर्ती नुसार कागदपत्र सादर केली होती. परंतु सदर कागदपत्रा मध्ये दोन्ही ही निविदाकारांचा अनुभवाचा दाखला हा एक वर्षाचा अढळून आल्यामुळे पात्र ठेकेदारचे निविदेत सादर केलेले मुळ कागदपत्रे घेऊन येण्यास सुचीत केले. त्यानुसार वाहन विभागामार्फत जा.क्र. /वाहन/३०२/१८ दि. २१/२/२०१८ रोजी पत्र देवून संबधिताना शासन निर्णय क्र. सीएटी—२०१७/प्रक्र.८/इमा—२, दिनांक १२ एप्रिल २०१७ नुसार परिच्छेद ४.५.२ प्रमाणे दोन वर्षाचे अनुभवाचे प्रमाणपत्र घेऊन दि. २८/२/२०१८ रोजी उपस्थित राहणेबाबत कळवले होते.
- में. हर्षल टेकनिक्ल, नाशिक, में कल्पतरू इंजिनिअर्स यांची मुळ कागदपत्रांची पडताळली करून घेण्यात आली व अनुभवाच्या कालावधीची प्रत्येकांनी दोन वर्षाचे प्रमाणपत्र सादर केले त्यामुळे वरिल दोन्ही पात्र निविदा कार यांचे निविदाचा आर्थिक भाग दि. ०५/३/२०१८ रोजी उघडण्यात आला. परंतु ई निविदा कक्षा मार्फत तात्रिक चुकीमुळे व नजर चुकीने उक्त दोन निविदाकारांची निविदा उघडणे ऐवजी तिन्ही निविदाकाराचा आर्थिक भाग उघडल्यामुळे निविदा क्र १४७४ रद्द करून नव्याने अल्पकालावधीत फेर निविदा प्रसिध्द करणसाठी मा. आयुक्त सो, यांची दि.०६/३/२०१८ रोजीच्या मान्यताने. पुन्हा फेर ई निविदा क्र. १५०२ दि.०९/३/२०१८ ते दि.१४/३/२०१८ या कालावधीत प्रसिध्द करण्यात आली होती.

- चौवथी फेर ई निविदा मध्ये तीन निविदाकारानी भाग घेतला होता. सदर तीन निविदाकारांमधून दोनच निविदाकारांने निविदेच्या कस्टडी मध्ये यशस्वी रित्या बीड संमिट केल्याचे आढळून आले. कस्टडी कालावधी मध्ये दोनच निविदाकारांने आपली निविदा ट्रान्सफर केली असल्याने त्यांचीच निविदा नियमानुसार उघडण्यात आली. सदर निविदेबाबत फेर निविदा असल्यामुळे तसेच कामाची निकड पाहाता अत्यंत गरजेचे असल्यामुळे सदर निविदा दि. ०५/४/२०१८ रोजी उघडण्यात आली. या निविदा मध्ये १) मे.कृष्णा एंटरप्रायजेस, व २) मे.सिध्दात एंटरप्रायजेस या दोन्ही निविदाकारानी संस्था नोंदणी प्रमाणपत्र (शॉप लायसन्स) हे स्टेशनरी व फर्निचर पुरवठा करणे आणि कॅम्प्युटर पार्टस सेल अंण्ड सर्व्हीस पुरवठा केल्याचे जोडले असल्यामुळे यांना ई निविदा समितीने अपात्र ठरविण्यात आले.
- उक्त बाब पाहता निविदा क्र १५०२ रद्द करून कामाची निकड पाहता पुन्हा फेर ई निविदा प्रसिध्द करण्यात आली.
- दरम्यान महाराष्ट्र विधान परिषदेची पदवीधर मतदार संघाची निवडणूक आचारसंहिता माहे जुन २०१८ पासुन लागू असल्याने सदरची ई निविदा ही आदर्श आचारसहीता संपल्यानंतर निविदा मधील अटी व शर्तीमध्ये बदल करून पुन्हा फेर ई निविदा क्र. १५५१ दि. ०६/७/२०१८ ते १३/७/२०१८ या कालावधीत पाचवी फेर ई निविदा मागविण्यात आल्या असुन त्यांची माहिति खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राकलनीय खर्च | रु. **३३,३८,६४०/—** |
| २ | निविदा प्रसिध्द केलेली वर्तमानपत्रे | १)दैनिक लोकमत, २) दैनिक प्रात:काल, ३) दैनिक फ्री प्रेस,<br>४) दैनिक धनुषधारी. |
| ३ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक ०४/०७/२०१८ ते दिनांक ०५/०७/२०१८ |
| ४ | निविदा विक्री कालावधी | दिनांक ०६/०७/२०१८ ते दिनांक १३/०७/२०१८ |
| ५ | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक १३/७/२०१८ ते दिनांक १४/७/२०१८ |
| ६ | निविदेचा तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १६/०७/२०१८ ते दिनांक १८/०७/२०१८ |
| ७ | निविदेचा आर्थिक भाग उघडण्याचा दिनांक | दिनांक १६/०७/२०१८ ते दिनांक १८/०७/२०१८ |
| ८ | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ३ |
| ९ | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ३ |

- फेर ई निविदा क्र. १५५१ चा तांत्रिक भाग दिनांक १८/०७/२०१८ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक,मदतनीस व किरकोळ दुरूस्ती बाबतचे या कामाच्या निविदेचा भाग—१ लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | **मे कल्पतरू इंजिनिअर्स** | **मे.हर्षल टेकनिक्ल, नाशिक** | **मे.कामदेनु इंटरप्रायजेस, ठाणे** |
|---|---|---|---|---|
| १ | Registered Contractor in appropriate class with any Govt. /Semi Govt. Dept./Municipal corporation or Shop Licene | कार्यादेशाच्या प्रती जोडल्या आहे. | होय | होय |
| २ | GST Certificate | होय | होय | नाही |
| ३ | experience with any Govt./Semi Govt.Dept./Municipal corporation | होय | होय | होय |
| ४ | EPF certificate /ESIC Registered | होय | होय | नाही |

सदर निविदा समिती यांनी छाननी केली असता. १) में.हर्षल टेकनिक्ल,नाशिक, २) में कल्पतरू इंजिनिअर्स व ३) मे.कामदेनु इंटरप्रायजेस ठाणे यानी निविदेत सहभाग घेतला होता. या तीन निविदाकारचे पेपर (तांत्रिक भाग) तपासले असता. में कल्पतरू इंजिनिअर्स, व मे.कामदेनु इंटरप्रायजेस ठाणे, हे कागदपत्र तपासणी वेळी निविदा समितीने अपात्र ठरवले आहेत. त्यामुळे में. हर्षल टेकनिक्ल, नाशिक यांचे दस्ताऐवज बरोबर असल्यामुळे. त्यांचा आर्थिक भाग उघडण्यात यावा असे आदेश ई निविदा समिती केले.

- तसेच सदरची निविदा ही वांरवार फेर निविदा देवून प्रकाशित केली होती. सध्याची पाचव्यांदा फेर ई निविदा प्रसिध्द केलेली असल्याने कामाची निकड लक्षात घेता, व शासन निर्णय क्र.सीएटी–२०१७/प्रक्र. ८/इमा–२, दिनांक १२ एप्रिल २०१७ नुसार परिच्छेद ४. नुसार में. हर्षल टेकनिक्ल, नाशिक हे पात्र निविदाकार यांचे निविदाचा आर्थिक भाग उघडण्यास मा. निविदा समितीने मान्यता दिली.
- उपरोक्त निविदाकांराच्या निविदाचा दुसरा भाग (आर्थिक) दिनांक ३०/०७/२०१८ रोजी उघडण्यात आला. त्याचा तपशिल दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशील | निविदा रक्कम | में.हर्षल टेकनिक्ल, नाशिक, |
|---|---|---|---|
| | | रू | दर रू. |
| 1 | Item No.1:-Providing Operator cum Driver & Cleaner cum Helper for SLCM vehicle & Suction Unit with Routine & preven tive maintenance with misc.material complete.<br><br>(For S.L.C.M. Vehicle No. MH-05 N-216, MH-05 N-74, MH-05 N-53, MH-05 2760, MH-05 2731.) | ३३,३८,६४०/- | ३३,०१,९१४.९६/- |
| 2 | Driver cum Machine Operator | | |
| 3 | Cleaner cum Helper | | |
| 4 | Maintenance for vehicles | | |
| 5 | कमी दर % | | - १.१० % |

वरील तक्त्यानुसार में.हर्षल टेकनिक्ल, नाशिक, यांनी वाहना संबंधी सादर केलेले दर हे अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १.१० % कमी म्हणजेच ३३०१९१४.९६/– ऐवढी आहे. सदर दर रू ३३०१९१४.९६/– असुन तो अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी आहे.

या अनुषंगाने **में.हर्षल टेकनिक्ल, नाशिक** यांचा प्राप्त दरानुसार पुढील कारवाई करीता मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.२४** **दिनांकः–१३/८/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागाअंतर्गत ई निविदा प्रक्रियाद्वारे सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक,मदतनीस व किरकोळ पंप दुरूस्ती इत्यादीकामी लघुत्तम दराचे निविदाकार में.हर्षल टेकनिक्ल यांच्या निविदेस २ वर्षाकरीता मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिवः—** विषय क्रमांक. ८ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र.८ः—** उल्हासनगर कॅम्प नं.३ मधील फॉरेस्ट नाका अंबरनाथ येथून टाकण्यात आलेल्या ६०० मी.मी. व्यासाच्या डी आय जलवाहिनीतून फस्ट गेट पासुन दसेरा मैदान उंच जलकुंभापर्यत ४०० मी.मी.व्यासाची डी.आय. जलवाहिनी टाकणेबाबत.

---

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** त्यासाठी के.बी. रोड, म्हारळ गावाकडू टाकी भरू.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास... पास...

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, जया प्रकाश माखिजाः—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ८ :—** उल्हासनगर कॅम्प नं.३ मधील फॉरेस्ट नाका अंबरनाथ येथून टाकण्यात आलेल्या ६०० मी.मी. व्यासाच्या डी आय जलवाहिनीतून फर्स्ट गेट पासुन दसेरा मैदान उंच जलकुंभापर्यत ४०० मी. मी.व्यासाची डी.आय.जलवाहिनी टाकणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील कॅम्प नं ३ मधील काही भागात दसेरा मैदान येथील उंच साठवण टाकीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. सदर टाकी भरण्यासाठी आनंद नगर फस्ट गेट येथून गुरूत्ववाहीनी सन १९९८—९९ मध्ये टाकण्यात आली असून या गुरूत्ववाहिनीवर ब—याच अनधिकृत नळ जोडण्या असल्याने टाकी भरण्यास बराच कालावधी जातो. सदर गुरूत्ववाहिनी व अनधिकृत नळ जोडण्या कॉक्रीट रस्त्याच्या खाली गेल्याने निष्काशित करणे शक्य नाही. याकरिता नव्याने फॉरेस्ट नाका येथून फस्ट गेट आनंदनगर पर्यंत टाकण्यात आलेल्या ६०० मी. मी. व्यासाच्या डी. आय. पाईप लाईन मधून आनंद नगर फस्ट गेट पासून दसेरा मैदान उंच जलकुंभापर्यंत ४०० मी. मी व्यासाची डी.आय. पाईप लाईन टाकणेचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. सदया कल्याण बदलापूर मुख्य रस्त्याचे रूंदीकरणाचे काम सुरू असल्याने रस्त्याचे काम पूर्ण होण्याअगोदर सदर जलवाहिनी टाकणे गरजेचे आहे.

याकरिता सदर कामाची प्रथम ई—निविदा दि.१५/०५/२०१७ रोजी मागविण्यात आली होती. सदर निविदेचा लिफाफा क्र.०१, दि.०१/०६/२०१७ रोजी उघडण्यात आला, त्यात तीन निविदाकारांनी निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त तीन निविदांपैकी एक निविदा तांत्रिक दृष्टया पात्र होती व दोन निविदा अपात्र असल्यामुळे स्पर्धा होऊ शकली नाही. करीता फेर निविदा (दुसरी मागणी दि.०६/०७/२०१७ रोजी मागविण्यात आली. दुसऱ्यांदा मागविलेल्या ई—निविदे अंतर्गत तीन निविदा धारकांनी निविदा खरेदी केल्या होत्या. परंतु दोनच निविदाधारकांनी भाग घेतला होता. त्यामुळे स्पर्धा होऊ शकली नाही. करीता फेर ई—निविदा (तिसरी मागणी) दिनांक ०३/०२/२०१८ रोजी दैनिक नवशक्ती, दैनिक ठाणे वैभव, दैनिक धनुष्यधारी या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करून ऑन लाईन फेर ई—निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर फेर निविदेचा लिफाफा क्र.०१, दिनांक १३/०४/२०१८ रोजी उघडण्यात आला, त्यात खालील प्रमाणे निविदाधारकांनी निविदा सादर केल्या आहेत.

१) मे. कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर प्रा.लि.उल्हासनगर—३.

२) मे. बी. आर. कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर—३.

उपरोक्त निविदाकारांचा लिफाफा क्र. ०१ उघडण्यात आला व त्यातील कागदपत्रे निविदेच्या अटी व शर्ती नुसार तांत्रिक दृष्टया योग्य होते. तद्नंतर लिफाफा क्र.०२, दिनांक ०९/०५/२०१८ रोजी उघडण्यात आला व त्यामध्ये खालील प्रमाणे दर नमुद करण्यात आलेले आहेत.

| अ. | ठेकेदारांचे नाव | प्राकलनीय किंमत | सादर केलेला दर | एकुण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|

| क्र. | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर प्रा.लि.उल्हासनगर–३. | रु.२५३२१५०/– | १९.६६ : जादा दराने | रु.३०२९९७०.६९ | ए |
| २ | मे. बी.आर. कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर–३. | | १० : कमी दराने | रु.२२७८९३५.०० | ए |

उपरोक्त तक्त्यामध्ये मे.बी.आर.कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर, यांचे निविदेचे दर अंदाजित किंमतीपेक्षा १० % कमी दराने असुन त्यांची एकुण किंमत रु.२२,७८,९३५/– एवढी होते. सदर दर इतर एजन्सी पेक्षा तुलनात्मकरित्या न्युनतम व कमी असल्याने, वाजवी वाटतात. म्हणुन मे. बी.आर. कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर, यांची निविदा स्विकृत करून यांच्याशी करारनामा करून कार्यादेश देण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.२५** **दिनांकः– १३/८/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर कॅम्प नं. ३ मधील फॉरेस्ट नाका अंबरनाथ येथून टाकण्यात आलेल्या ६०० मी.मी. व्यासाच्या डी आय जलवाहिनीतून फर्स्ट गेट पासुन दसेरा मैदान उंच जलकुंभापर्यंत ४०० मी.मी.व्यासाची डी.आय.जलवाहिनी टाकणेकामी मे. बी.आर. कंन्स्ट्रक्शन, उल्हासनगर, यांची निविदा स्विकृत करून यांच्याशी करारनामा करून कार्यादेश देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ५.०५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— ४/९/२०१८

**दि. ४/९/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती**

**सभेचे इतिवृत्त.**

**६**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा मंगळवार दिनांक ४/९/२०१८ रोजी १२.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश वदारिया | सदस्य |
| ४ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ५ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| ६ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ७ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| ८ | श्री. भगवान भालेराव | सदस्य |
| ९ | श्रीमती मिनाकौर लबाना | सदस्या |
| १० | श्रीमती रेखा ठाकुर | सदस्या |
| ११ | श्रीमती दिप्ती दुधानी | सदस्या |
| १२ | श्रीमती ज्योती बठिजा | सदस्या |
| १३ | श्रीमती अंजना म्हस्के | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती पंचम उमेश कालानी, २. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ३. श्री. भारत रामचंद्र राजवानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

९८. आयुक्त, श्री. गणेश पाटील
९९. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१००. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी
१०१. श्री. मिलिंद सोनवणे, नगररचनाकार
१०२. श्री. संतोष जाधव, सहा. लेखा अधिकारी
१०३. श्री. विनायक फासे, सहा.लेखा परिक्षक
१०४. श्री. अशोक जाधव, प्र. मुख्य लेखा परिक्षक
१०५. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१०६. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
१०७. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी
१०८. श्री. वानखेडे, लेखा अधिकारी
१०९. श्री. पाटील, शाखा अभियंता
११०. श्री. विनोद खामितकर, उप अभियंता
१११. श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता, साबांवि
११२. श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
११३. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
११४. श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
११५. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
११६. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त

११७. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
११८. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
११९. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१२०. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१२१. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१२२. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
१२३. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१२४. श्री. राजा बुलानी, प्र. विधी विभाग प्रमुख
१२५. पोलिस निरिक्षक, श्री. कल्याणजी थेटे
१२६. पोलिस निरिक्षक, श्री. जी. एम. अगाउ

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. बाळु भांगरे
४. श्री. संतोष कोठरे

दुपारी १.०० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिवः—**सभापती मॅडम यांनी मिटींग सुरू करण्यास आदेश दिले आहेत. त्यापूर्वी प्रशासनातर्फे आयत्यावेळचा विषय आले आहे.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरीः—**काय विषय आहे?

**महापालिका सचिव :—**मी विषय वाचुन दाखविते.

**विषय १:—**प्रभाग क्षेत्र क्र. १ व २ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता मिळणे.

**विषय २:—** प्रभाग क्षेत्र क्र. ३ व ४ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता मिळणे.

**सदस्य, श्री भगवान भालेरावः—** सितलानी सांगा. १४ कोटीचे रस्ते आपण मागच्या वर्षी खडड्‌ असलेले भरले तर त्याच्यामध्ये ते रस्ते नाही आहेत का?

**शहर अभियंता,श्री महेश शितलानीः—** सर, हे जे आहेत, गणपती विसर्जन आता येत आहेत त्यासाठी गणपती विसर्जन घटाकडे हे जे रस्ते जात आहेत, आणि या अगोदर आम्ही काम केले आहेत ते सोडून जे खड्डे पडले आहेत.

**सदस्य, श्री भगवान भालेरावः—** कुठला रस्ता आहेत, आम्हाला तुम्ही आयत्या वेळेस देता, दाखवा डिटेल्स. कुठले रस्तें आहेत ते.

**शहर अभियंता,श्री महेश शितलानीः—** ते ६१ रस्ते आहेत.

**सदस्य, श्री भगवान भालेरावः—** किती रस्ते आहेत?

**सदस्य, श्री जमनादास पूरस्वानीः—** आताचा जो विषय आहे, तो फक्त समावेश करण्यासाठी आहे. विषयाचे समावेष झाल्यापनंतर चर्चा होईल.आता हया विषयाचे समावेश करण्यात यावे व जेव्हा हा विषय येईल तेव्हा चर्चा करण्यात यावी.

**सदस्य, श्री राजेश वदारीयाः—** हो हो, विषयाचे समावेश केले जावे, गोषवारा वैगेरेचे वाटप करण्यात यावे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**नाही, नाही, आयत्यावेळी नाही.

**महापालिका सचिवः—** मतदान घ्यायला लागेल.

**सदस्य, श्री राजेश वदारीयाः—** आम्ही पण तेच सांगत आहोत की विषय समाविष्ट करा आणि सविस्तर चर्चा नंतर करण्यात यावी. आपण म्हणता चर्चा करायची नाही.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी:—**चर्चा करायची आहे. विषय समाविष्ट नाही आहे.

**सदस्य, श्री राजेश वदारीया:—**विदाउट अजेंडाशिवाय कशी चर्चा करणार.

**सदस्य, श्री भगवान भालेराव:—** आयुक्त साहेब विषय असा आहे,ठिक आहे बहुमताने घ्या,परंतु हयाच सभेमध्ये आम्हाला रस्तेवाईज कुठे आणि कोणकोणते रस्ते आहेत हे आम्हाला आता सांगावे नंतर ही चर्चा होईल.

**सदस्य, श्री जमनादास पूरस्वानी:—** हे विषय समावेशाची बाब आहे. समावेश करायचे आहे किंवा नाहि हे सांगा?

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—** ठिक आहे, समावेश करा परंतु जे यांनी सांगिले आहे ते पहिले ऐकून घ्यावे.

**सदस्य, श्री जमनादास पूरस्वानी:—**ठिक आहे, नंतर त्याचे म्हणणे ऐकू.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—** जे पहिले काम केलेले आहे त्याचे काय झाले.

**सदस्य, श्री जमनादास पूरस्वानी:—**आता ते विषय समाविष्टा नंतर चर्चा करण्यात येईल.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—** विषय समाविष्ट न करण्यामागचे कारण हे आहे की पहिले जे झाले ते काय झाले.

**सदस्य, श्री राजेश वदारीया:—** साहेब बघा, विषय अजेंटावर आल्यावर त्याच्यावरती चर्चा होईल. नाही तर चर्चा कशावरती करणार? विषय घ्या.

**महापालिका सचिव:—**ठिक आहे, सर्वांना गोषवारा दया.

विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक १०/८/२०१८ त्यात १३/८/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :—** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक १०/८/२०१८ त्यात १३/८/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेश वदारिया

**स्थायी समिती ठराव क्र. :— २५ अ** **दिनांक : ४/९/२०१८**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक १०/८/२०१८ त्यात १३/८/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४१ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

➡ **विषय क्र. २ :—** परवानाधारक अभियंता, वास्तुविशारद व संरचनात्मक अभियंता यांना परवाना देणे.

---

**सदस्य, श्री राजेश वदारीया:—** या विषयाची माहिती कोण देणार.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** जो ठराव क्रमांक ४ आपण पास केले होते त्यामध्ये आम्ही १०हजार जे त्यांची नुतनीकरणाची फी घेण्यात येत होती, याबाबत तात्कालीन आयुक्त साहेब आणि मा. महापौर साहेब यांच्याकडे मिटींग घेण्यात आली होती, त्यामध्ये असा निर्णय घेण्यात आला होता की आता २५हजार रूपये आणि १ लाख रूपये अनामत रक्कम.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—** किती आपल्याकडे आहेत आता, किती लायसेन्स.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** ४ जणं आहेत आता जे कॉन्सील ऑफ आर्किटेक आहेत, त्यांना आपल्याकडून रिनीवल घ्यायची आवश्यकता नाही.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—** ४ कोण कोण आहेत?

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** वाघ म्हणून एक आहेत, ऐक देतसिंग खालसा म्हणून आहेत, एक जोगळेकर म्हणून आहेत, अजून एक नविन आहेत त्यांचे नाव माहिती नाही.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—** हां बाकीचे जे आहेत त्यांचे काय झाले.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** हेच आता आता ठेवलेले आहेत ना, ४ वर्षापासून आता कोणाचेच परवाने रिनीवल झालेले नाहीत, म्हणूनच त्यावेळेला तात्कालीन आयुक्तांनी निर्णय घेतला होता,की आता जे १२ ला यांच्यापूर्वी आपण ते निश्चित केले होते १० हजार रूपया प्रमाणे ते आता आपण वाढविले पाहिजे होते. आणि त्याच्यामध्ये जे पूर्वीचे लोंकांचे जे लायसन्स रद्द केले होते ते आपण काहीही हे न करता आपण त्यांचे सगळयाचे नुतनीकरण करू. कारण मध्यंतरी ११० प्रकरणे हायकार्टामध्ये झाली होती. त्याच्यामध्ये डायरेक्टरांचा रिपोर्ट आला होता,की हयाच्यामध्ये काय काय त्रृटी झालेल्या आहेत त्याच्या अनुषंगाने त्यावेळच्या आयुक्तांनी त्यांचे परवाने रद्द केले होते आणि काही काही अजून दोन तीन आणि त्याच्या व्यतीरिक्त आहेत.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—**त्या त्रृटी आता लक्ष दयायचे नाही फक्त,

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** दयायचे आहे, त्याच्यामध्ये परत हायकोर्टमध्ये पीटीशीयन दाखल झाली आहे,की तुम्ही काहीही कार्यवाही केलेली नाही म्हणून

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—**मग आता आम्ही निर्णय काय घ्यायचा, हायकार्टाच्या अधीन राहुन घ्यायचा, एकाबाजूने तुम्ही म्हणता हायकोर्टमध्ये आहे.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** नाही नाही ते नाही ते सोडून,आता जे नवीन लोक येत आहेत त्याच्यांसाठी आहे.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—**आणि जून्या लोकांचे काय?

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—**जून्या लोकांचे आयुक्त साहेबांना सांगितलेले आहे, आयुक्त साहेबांनी सांगितलेले आहे की ज्यांची लायसेन्स रद्द झालेली आहेत त्यांना

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—**मला वाटतं मागच्या आयुक्त साहेबांच्या बरोबर ही मिटींग झाली होती, की त्यात फक्त आर्कीटेक्चर लोकांचाच फक्त दोष होता असे नाही, प्रशासनाचा काय तत्कालीन अधिका—यांचा दोष होता. हायकोर्टमधले जे समोर आले आहे ते फक्त स्थानिक स्थापत्य कारण काय की स्थानिक लोकांची मोनोपॉली बनते. तसे मी मागे महासभेमध्ये सुध्दा सांगितले होते. एक स्ट्रक्चरल इंजिनिअर नाखवा म्हणून आहे, त्यांच्याकडे गेल्यानंतर त्यांच्याकडे ॲप्रूव्ह झाल्यानंतर त्यांना पाहिजे तो अगर जर त्यांनी लोकांनी ऐकले तर ती बिल्डींग ओके. नाही तर बिल्डींग धोकादायक होते. तसे ठराविकच आपल्याकडे स्थापत्य असल्यामुळे त्यांची मोनोपॉली झालेली आहे, आणि सगळेच गुन्हेगार आहेत असे नाही आहे. ११० बिल्डींगच्या प्रकरणामध्ये सगळेच्या सगळे गुन्हेगार आहेत का?

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** जे आर्किटेक आहेत,

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—**म्हणजे ४ वर्षे वाट बघावी लागेल. म्हणजे इथले इजिनिअर्सबाहेर चालतात,इथले आर्कीटेक्चर बाहेर चालतात आणि आम्ही ब्लॅक लीस्ट करतो.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** आपले आर्कीटेक स्वत:च्या नावावर काम करतच नाही. त्यांची सही कुठेच नाही, नाही करत ना दुस—यांच्या करतात. आणि माहिती आहे उदया प्रॉब्लेम झाला तर आपण अडचणीत येवू. आज तूम्ही सांगता ११० मध्ये एकही आर्कीटेक लायसन्स जे मागतात, त्यांची लायसन्स नाही त्यांनी दुसरे लोक ठेवलेले आहेत, ती लोक येवून सही करतात.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी:—**आता आपण काही प्लॅन पास केलेले आहेत का?

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** केलेले आहेत ना.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी:—**ते आर्कीटेक कोण आहेत?

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** सांगितले ना आता नावे.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी**:—ते बाहेरचे आहेत.आपल्या इथले नाहीत का?

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** इथलेच आहेत उल्हासनगरचे आहेत.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी**:— ४ आहेत

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** कॉन्सील ऑफ आर्कीटेक ते चारच आहेत. जे आता सध्या कामे करतात.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी**:— चार लोकांमधील त्यांना आता आपण मंजूरी दिली.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** मंजूरी नाही दिली ते कॉन्सील ऑफ आर्कीटेकचेच नोंदणीकृत आर्कीटेक आहेत.त्यांना आपल्याकडून मंजूरी घेण्याची आवश्यकता नाही.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी**:— नाही त्यांनी प्लॅन तर पास केलेत ना.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** आहेत ना आता ज्यांचे लायसेन्स चालू आहेत, त्यांचेच लायसेन्स चालू आहेत जे कॉन्सील ऑफ आर्कीटेकचे सभासद आहेत. आणि कॉन्सील ऑफ आर्कीटेकचे जो मेंबर आहे, आपण त्याचे लायसेन्स रद्द करू शकत नाही. नाही तर कॉन्सील ऑफ आर्कीटेकला तूम्ही तक्रार करा, तेच कार्यवाही करतात.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—**म्हणजे रद्द करता आले असते तर तेही तूम्ही तेही रद्दझाले असत असे तूमचे म्हणणे आहे. आपण रद्द करू शकत नाही म्हणून ते आहेत.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** नाही तसे नाही आपण कळविले आहे.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे:—**बरोबर आहे त्यांपनी प्लॅन पास केलेले आहे, त्यामध्ये ते असणारच आहे. ते म्ही अधिकार रद्द करायचे नाहीत म्हणून ते रद्द झाले नाहीत.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** हे जें ४ जण नाही सांगितले ते ११० मध्ये नाही आहेत.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— ते ११० मध्ये नाही आहेत का.

**आयुक्त, श्री गणेश पाटील.:—**आपला विषय फक्त आता फी वाढविण्यापुरता आहे.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— फी वाढविल्यानंतर जो आर्कीटेक आहे ते महापौर, सभागृह नेता विरोधी पक्ष नेता आमचे सर्व नगरसेवकांना भेटले होते की आम्ही प्लॅन सुध्दा टाकू शकत नाही. कारण आमची गेल्या चार वर्षापासून...

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** साहेब तुमच्याकडे जे आले होत ना ते स्वत:च्या नावावर प्लॅन टाकतच नाही.

**सदस्य, श्री भगवान भालेराव:—**का टाकत नाही.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—**टाकतच नाही मी सांगतोना.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:—टाकतात ते आणि गेल्या चार वर्षापासून आमचे सस्पेंड आहे.

**आयुक्त, श्री गणेश पाटील.:—**नाही, सस्पेंड नाही आहे.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:—रद्द आहे.

**आयुक्त, श्री गणेश पाटील.:—**रद्द केलेले आहे.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— बर त्याच्यावर काही सुनावणीही नाही.

**आयुक्त, श्री गणेश पाटील.:—**त्याच्यावर आता काय सुनावणी करणारजेव्हा ते कोर्टातून ज्यावेळेला सुटतील त्यावेळेला त्यांचा विषय होईल समजा. आता काय आहे की जे मार्केटमध्ये नवीन लोक मागणी करत आहेत, त्या लोकांना आपण जून्या फी प्रमाणे दयायचेपेक्षा नवीन फी ने देवू म्हणजे महापालिकेच्या उत्पन्नामध्ये थोडी वाढ होईल. म्हणून त्यावेळेला महापौर आणि तात्कालीन आयुक्त यांनी मीटींग जी घेतली होती त्याच्यावरती असे ठरले होते की, १ लाख रूपये सिक्युरीटी डिपॉझीट घ्यायचे जेणेकरून असे काही जर अडचणी निर्माण झाल्या तर आपल्याला सिक्युरीटी डिपॉझीट फॉरफिट करता येईल. आणि १२ हजार रूपयाएवजी २५ हजार रूपये लायसेन्स फी करायची. या वाढीला आपण मान्यता करावी.

**सदस्य, श्री जमनादास पूरस्वानी:—**ठिक आहे१० हजार ते २५ मान्यता देत आहेत.

**सदस्य, श्री राजेंद्र चौघरी**:—१ लाख डिपॉझीट घ्यायची!

**सदस्य, श्री जमनादास पूरस्वानी:—**त्यांचेडिपॉझीट राहील ना.

**सदस्य, श्री राजेंद्र चौघरी**:—डिपॉझीटची काय जरूरत आहे.

**सदस्य, श्री जमनादास पूरस्वानी**:—कारण हयाच्यामध्ये काय आहे की जसे हे लोक कोणाचे लायसन्स रद्द करत आहेत किंवा काय त्यासाठी जर १ लाखाचे अनामत रक्कमेची त्याच्यांवर जबाबदारी राहील त्यामुळे ते चूकीचे कामे करणार नाहीत आणि त्यांना चूकीची कामे करण्याची भिती असेल.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—** तेवढयासाठीच ते ठेवलेले आहे.

**सदस्य, श्री राजेंद्र चौघरी**:— १ लाख जास्त आहे. रू.५० हजार ठिक आहे, पन्नास हजार करा.

**सदस्य, श्री जमनादास पूरस्वानी:—**रू. ५० हजार डिपॉझाीट आणि रू. २५ हजार फी ठेवण्यात येत आहे.

**महापालिका सचिव:—** विषय क्र. ३ ...............

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:—एक मिनीट, याबाबतीत माझे एक म्हणणे आहे. सोनावणे साहेब, काही लोकांच्या आमच्याकडे तक्रारी येतात, की आर्किटेक लोकांवरती हे होतात, आमच्याकडे कम्प्लीशनसाठी मागितल्यानंतर सुध्दा तिथ महापालिकेकडून कम्प्लीशन दिले जात नाही.एक चांदीबाई कॉलेजमध्ये इंजिनिअरींग कॉलेज होत आहे, इंजिनिअरींग कॉलेज पूर्ण झालेले आहे. कम्प्लीशनमागण्यासाठी त्यांनी कायदेशीर मागणी केलेली आहे. पण त्यांना कम्प्लीशन मिळत नाही. एक इंजिनिअरींगकॉलेज उल्हासनगरमध्ये होत आहे, आणि केवळ महापालिकेच्या आडमूठ धोरणामुळे केवळ कम्प्लीशनमुळे ते काम चालत नाही.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे:—**एक मिनीट ऐकून घ्या.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— आम्ही फक्त स्वप्न बघतो.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— हयाच्यामध्ये त्यांनीकम्प्लीशनबरोबर रिवीझन पण टाकलेली आहे. आणि त्या रिवीझनमध्ये ऑलमोस्ट त्यांचा एफ एस आय कन्झुम झालेलया आहेत. त्याचे क्षेत्रफळ जवळजवळ ५५ हजार स्केअर मीटर आहे. मी त्यांच्या आर्किटेकना सांगितले तुम्ही या आमची लोक घेवून जा कारण मेजरमेंट मध्ये चूक झाली तर कोण सोडणार नाही कारण हयाच्यामध्ये एफ एस आय ऑलमोस्ट पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. जोपर्यत मी सगळी मापे घेत नाही तोपर्यंत रिवाईज होणार नाही, ते म्हणतात आम्हाला आधी रिवीझन करा आणि नंतर कम्प्लीशन दया. त्यांना ऑप्शन्स खुले ठेवले आहेत. मी तर त्यांना तेही म्हटले होते की तुम्ही जे पूर्ण झाले आहे त्याचे कम्प्लीशन घ्या रिवीझन होत राहील.

**सदस्य,श्री भगवान भालेराव:—** सोनावणे साहेब आता तूम्ही शैक्षणिक बाबतीत जर ऐवढा विचार करता मे तुम्ही रिजन्सीच्या बाबतीत ही विचार करायला हवा होता तुम्ही कम्प्लीशन देवून मोकळे झालेत.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— कोणलाही दिलेले नाही.

**सदस्य,श्री भगवान भालेराव:—** काय दिले तुम्ही मग.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:—अजून काहीही दिलेले नाही.

**सदस्य,श्री भगवान भालेराव:—** मागच्या आयुक्तांनी तुम्ही काय करून दिले आहे, सांगा मला.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:—रिवीजन.. कम्प्लीशनम्हणता आहात तुम्ही, रिवाईज परमीशन दिले आहे.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी**:—त्यांना रिवाईज देता येत का काही तरी करून बघा ना जरा...

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— त्यांचा आर्किटेक तर यायला पाहिजे. लोक साईट वर जायला कोणी नको.

**सदस्य,श्री भगवान भालेराव:—** जरा विचार करा, हया गोष्टी एका इंजिनिअरींग कॉलेजसाठी ही कॅटॅगिरी लावतो.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— त्यांना स्वत:ला काळजी नाही तर मी काय करणार , त्यांनी आर्किटेकनी समोर यावे.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी**:— काळजी नसती तर आमच्यासारख्या लोकांना सांगितले नसते. हयांनाही माहिती आहे.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— तुम्हा सगळयांना सांगतात पण त्यांचा आर्कीटेकला यायला वेळ नाही. अशी परिस्थिती आहे.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील:—**सोनावणे एक काम करा आतात्यांना पत्र दया तुम्ही आणि एक टाईम फ्रेम ठरवा.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— याबाबत ५ वेळा चर्चा झाली आहे, त्याचा आर्कीटेक एकदा येतो, आणि परत येतच नाही.

**आयुक्त,श्री.गणेश पाटील:—**त्यांना लेखी पत्र दया. इन्सपेक्शनची तारीख कम्युनीकेट करा, आठ दहा दिवस अगोदर त्या दिवशी तुम्ही इन्सपेक्शन करा. आणि पुढच्या आठ पंधरा दिवसामध्ये निर्णय घेवून टाका.

**सदस्य,श्री भगवान भालेराव:—** इन्सपेक्शन सगळया ठिकाणी झाले पाहिजे. नुसते इंजिनिअरींग कॉलेजलाच नाही झाले पाहिजे.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:—एक सोनावणे साहेबांनी सांगितले की,प्लींथ कम्ल्पीशन सर्टीफिकेट मागतात, ते बांधकाम प्लॅान नुसार आहे का? ही जबाबदारी कोणाची आहे.तुम्ही प्लींथसर्टीफिकेट घेता, **ही** उत्तरे झाली का? हे प्रशासन आहे का तुमचे,

**सदस्य,श्री भगवान भालेराव:—** प्लान झाले नाही तरी तुम्ही प्लींथ सर्टीफिकेट दिले आहे.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— कोणचे प्लींथ सर्टीफिकेट.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— नाही,नाही तूम्ही सांगितले की, बांधकाम नकाशा प्रमाणे असेल तर त्याला कम्प्लीशन.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— आहे ना त्याच्यामध्ये.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— बघणार कोण आम्ही.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— त्याच्या अर्किटेकने यायला काय अडचण आहे.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— तो येणार नाही त्याला नाही करायचे.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— दुसरा अर्किटेक नेमावा त्याने. तोच असा नाही, कोणी तरी त्याचा जबाबदारी घेणारा माणूस पाहिजे ना.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— त्यांना बेकायदेशीर करायचे आहे महापलिका काय करते आहे.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— उदया त्याच्यावर आरोप होताहेत की हे तुमच्या परवानगीने केले.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— ही तुमची उत्तरे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**सोनावणे तुम्ही त्यांना पत्र दया इन्सपेक्शनची तारीख निश्चित कराआणि पाहणी करून त्याचे सर्टीफिकेट देवून टाका. त्याला एक दहा दिवसांची नोटीय दया, कुठल्या तारखेला तुम्ही येणार, त्यानंतर तुमचे इन्सपेक्शन करून मग…

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— त्यांनाच विचारावे लागेल त्यांना कुठली वेळ योग्य आहे,

**आयुक्त, श्री. गणेश पाटील**:—ठिक आहे ना,त्यांना त्या प्राचार्यांना विचारा. प्राचार्य असेल किंवा कोणी असेल तुम्ही सांगा त्यांना कॉऑपरेट करायला.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— आतापर्यंत महापालिकेने कम्प्लीशन किती दिलेत मला सांगा बरं.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— नियमानुसार जागेवर केले नसेल तर कम्प्लीशन देणार कुठून?

**सदस्य,श्री भगवान भालेराव**:— ही जबाबदारी कोणची आहे आमची आहे का?

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— त्याच्यामध्ये पण तेच सांगतो देत नाही ना त्याला काही तरी कारण असेल ना, चूकीच्या कामाना पण कम्प्लीशन दयावे असे म्हणणे असेल तर सांगा.

**सदस्य,श्री भगवान भालेराव**:—चूकीचे म्हणजे तुम्ही कामे काय करता, तुमचे इंजिनिअर काय करतात.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— उलट उत्तरे देता.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— उलट उत्तरे नाही देत, मी तुम्हाला तेच सांगतो. ज्याच्या मध्ये जागेवर जर काम मोजणी नकाशाप्रमाणे असेल तर कसे देणार.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— कोणत्या बिल्डिग नियमा प्रमाणे आहे ते काढा. आयुक्त साहेंब एकही विभाग व्यवस्थितपणे काम करत नाही. परवा आम्ही पाण्यासाठी भांडलो काय चाललय महापालिकेत आम्ही यायचे नुसते मिटींग घ्यायची त्याचा काय उपयोग आहे. म्हणजे नियंत्रण ठेवण्याचे काम महापालिकेचे नाही का? एक टाउन प्लानर कायदयाप्रमाणे म्हणज तुम्हाला माहीत आहे. कायदयाप्रमाणे होत नाही मग तुम्ही काय करतात. पाण्याची मोटर १५ दिवसापासून दुरूस्त होत नाही, लोक वणवण भटकत आहेत. अधिका—याला माहीत आहे परवानगीनुसार काम होत नाही मग काय करताय. ही उत्तरे झाली हे तुम्हाला माहीत असले पाहीजे.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— ज्यांना ज्यांना कम्प्लीशन मागितलेले आहे त्यांना… तक्रारी गेलेल्या आहेत त्याच्यावर कारवाई होत नाही त्याला कोण जबाबदार आहे.

**सदस्य,श्री भगवान भालेराव**:—तुम्ही वार्ड ऑफीसरला पत्र दिलेले आहेत का?

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— हो दिलेल्या आहेत त्यांना विचारा. मी तुम्हाला पत्र काढून देतो किती जणांना दिलेले आहे. काम बंद ठेवायचे आदेश असताना सुध्दा काम चालू होते. कसे चालू राहते, हयाला उत्तर कोण देणार,मी.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— महापालिका, महापालिका.

**सदस्य,श्री भगवान भालेराव**:—हे असे बोलत असतील तर…

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— थांबवा आणि घेवून या, किती वार्ड ऑफिसरना दिलेल्या आहेत तुम्ही,

**सदस्य,श्री भगवान भालेराव**:— सांगा चला आम्ही मिटींग थांबवतो.

**नगररचनाकार,श्री मिलिंद सोनावणे**:— आणतो.

**सदस्य,श्री भगवान भालेराव**:—किती नोटीसा दिलेल्या आहेत त्या दाखवा.

**<u>सदस्य, श्री राजेश वदारीया:—</u>**ही परिस्थिती आम्हीभरपूर वेळा बघितलेली आहे.एक विभाग दुस—या विभागावर आरोप करत असतात, तर हया प्रकारे प्रशासन चालत नाही. जर दोन विभागामध्ये काही आपआपसात मतभेद असतील तर आयुक्तांबरोबर बसून हे मतभेद दूर केले पाहिजेत. इथे येवून मागच्या वेळेसय सुध्दा आरोग्य विभाग आणि पीडब्ल्युडी यांच्यामध्ये वाद झाला होता. आता टाउन प्लानींग अधिकारी वार्ड ऑफीसर यांच्यामध्ये मतभेद असतील तर आयुक्त साहेबांकडे एक मिटींग लावून हे मतभेद दूर केले पाहिजे. वाद मिटविण्याची ही जागा नाही आहे. पहिली गोष्ट असे वाद व्हायलाच नाही पाहिजेत. टाउन प्लानींग अधिकारी सांगतो की मी प्रभाग अधिकारी यांच्याकडे दिलेले आहे. प्रभाग अधिकारी सांगणार की मला अजून मिळाले नाही, असे काहीही असेल, माझे म्हणणे असे आहे की पहिली गोष्ट विभागामध्ये डिस्पूट व्हायला नको.आणि जर कधी यांचे ओपीनीयन वेगवेगळे असतील तर आयुक्त साहेबांकडे बसून वाद मिटवण्यात यावा. ही वाद मिटविण्याची जागा नाही.

**<u>सदस्य, श्री धंनजय बोडारे</u>**:— सर्व विभाग एकत्र येवून काम करणे,

**<u>सदस्य, श्री राजेश वदारीया:—</u>** आयुक्त साहेबांकडे सर्व विभाग प्रमुखांची मिटीग तर होत असेल, तर त्या ठिकाणी असे मतभेद काढले जात असतील. यामध्ये आम्ही २५ फी आणि ५० हजार अनामत रक्कम.

**<u>सदस्य,श्री भगवान भालेराव</u>**:— कोणाचा इश्यु नाही ना.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :— परवानाधारक अभियंता, वास्तुविशारद व संरचनात्मक अभियंता यांना परवाना देणे.**

**<u>प्रस्तावना</u>**

स्थापत्य व संरचनात्मक अभियंता परवाना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७२ अन्वये मा. आयुक्त यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये देण्यात येतात. अभियंता परवान्याची मुदत एका वर्षाकरीता असुन प्रत्येक वर्षाच्या ०१ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीसाठी देण्यात येऊन दरवर्षी त्यांचे नुतनीकरण करण्यात येते.

यापूर्वी परवानाधारक अभियंता यांचेकडून स्थायी समिती ठराव क्र. ४ दि. २९.०५. २०१२ अन्वये रु. १०,०००/— परवाना शुल्क आकारण्यात येत होते. यामध्ये आजपर्यंत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. याकरीता त्यामध्ये वाढ होणे गरजेचे आहे. यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. सदर प्रकरणी दि. १४.०१.१८ रोजी मा. महापौर यांचे दालनात तात्कालिन आयुक्त सो. यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये परवाना देणेकामी रु. २५,०००/— वार्षिक शुल्क व रु. १,००,०००/— अनामत रक्कम, घोषणापत्र व हमीपत्र घेण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करणेची कार्यवाही करणेचे निर्देश दिले होते.

त्यानुसार बांधकाम परवानगी प्रस्ताव सादर करणेकरिता नव्याने स्थापत्य / संरचनात्मक अभियंता यांची नियुक्ति करणेकामी दिनांक १४.०६.२०१८ रोजीच्या दैनंदिन वर्तमानपत्रात नोटीस जाहिर करणेत आली आहे. सदर नोटीसीचे अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ व विकास नियंत्रण नियमावलीत नमुद अर्हता प्राप्त नवीन अर्जदार यांना नव्याने परवाने देणे व यापूर्वी परवाना देण्यात आलेल्या परंतु परवाना रद्द न केलेल्या स्थापत्य / संरचनात्मक अभियंता यांचे परवाने नुतनीकरण करणेकामी बांधकाम परवानगीबाबत भविष्यात तांत्रीक अडचणी येवू नये याकरिता खालील अटी व शर्तीचा समावेश करुन परवाना देणेचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१ नव्याने देण्यात येणाऱ्या स्थापत्य/संरचात्मक अभियंता परवान्यातील अटीचे उल्लंघन केल्यास, मंजूरी प्राप्त केलेल्या प्रकरणात नियमबाहय अथवा वाढीव बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अभियंता यांना कोणतीही पूर्वसुचना न देता अथवा नोटीशीचा खुलासा सादर करणेची संधी न देता त्यांचा परवाना तात्काळ रदद् करुन त्यांनी भरणा केलेली अनामत रक्कम जमा करणेत येईल.

२ संबंधित स्थापत्य/संरचात्मक अभियंता यांना परवाना प्राप्त झाल्यावर विकास योजना व विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींची पडताळणी करुन योग्य प्रस्ताव महापालिकेस सादर करणे,बांधकामास मंजूरी प्राप्त झाल्यावर त्यांच्या देखरेखीखाली सुरु असलेले बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार सुरु आहे किंवा नाही याची पडताळणी करणे, बांधकामात काही तफावत आढळल्यास त्याची माहिती उल्हासनगर महानगरपालिकेस देणे,तसेच बांधकामाचा जोत्याचा दाखला व भोगवटी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे हे संबंधित परवानाधारक अभियंता यांना बंधनकारक राहील. भोगवटा प्रमाणपत्र घेतल्यानंतरच जागेचा वापर सुरु करणे अशा कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणेची जबाबदारी संबंधित परवानाधारक अभियंता यांची राहील.

उपरोक्त अटी व शर्ती नमुद करुन वरीलप्रमाणे ठरविण्यात आलेले वार्षिक परवाना शुल्क रु. २५,०००/— व रु. १,००,०००/— (रु. एक लक्ष मात्र) अनामत रक्कम नव्याने स्थापत्य/संरचात्मक अभियंता यांना परवाना देणे व यापूर्वी परवाना देण्यात आलेल्या परंतु परवाना रद्द न केलेल्या स्थापत्य / संरचनात्मक अभियंता यांचे परवाने नुतनीकरण करणेकामीचा प्रस्ताव मान्यतेकरिता येत्या स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. २६** **दिनांक:— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार परवानाधारक अभियंता, वास्तुविशारद व संरचनात्मक अभियंता यांना वार्षिक परवाना शुल्क रु. २५,०००/— व रु. ५०,०००/— (रु. पन्नास हजार मात्र) अनामत रक्कम परवाना देणेस व यापूर्वी परवाना देण्यात आलेल्या परंतु परवाना रद्द न केलेल्या स्थापत्य / संरचनात्मक अभियंता यांचे परवाने नुतनीकरण करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर शहरातील खेमाणी नाला वळविणेचे कामाअतर्गत बंधारा संप व पंपगृह बांधणे उर्ध्ववाहिनी मलशुध्दीकरण केंद्र इ. कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून म. जी.प्रा.ची सेवा मिळणेकरिता करारनामा करणे.

---

**सदस्य, श्री राजेश वदारीया:—** कोण माहिती देणार.

**<u>कार्यकारी अभियंता,श्री.एस.के.सेलवन:—</u>**मा. सभापती महोदय, खेमाणी नाला वळविण्याचे काम आपल्या महापालिका फडांतून २०१६ मध्ये आपण हाती घेतलेले आहे. एमजीपीच्या आर्डर प्रमाणे ते काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने काम सुरू आहे. याच्यामधले काही कारणांमुळे निधी आपल्याकडे ते पूर्ण काम आतापर्यत कोर्टाने दिलेल्या आदेशानुसार झालेले नव्हते, जागा मिळण्यामध्ये अडचणीमुळे थेडेसे वेळ लागला परंतु ते कोर्टाने दिलेल्या ज्या नदीमध्ये जाणा—या जे पाणी वळविण्याचे दृष्टीने ते इनीसीअली करायला आपल्याला मुदत दिली होती ते पूर्ण आपण केलेले आहे. आणि आता सध्या नदीमध्ये जाणा—या पाणी साठी जे पंप हाउस पाईप लाईन टाकून आम्ही अंबीकानगर पर्यत काम पूर्ण झालेले आहे. पण ते ट्रीटमेंट प्लान सीवील ट्रीटमेंट प्लान शांतीनगरला १५ एमएलडीचे बांधायचे आहे. ते ट्रीटमेंट प्लान साठी पीएमसीचे गरज आहे म्हणून मागे आयुक्त साहेबांनी शासनाकडे रेफर केले होते, एमजीपीला अशी विनंती करून एमजीपी ला पीएमसी नेमणूक करण्यासाठी शासनाचा आदेश आहे. हयाच्यासाठी ते प्रस्ताव सादर केलेले आहे.

**<u>सदस्य, श्री राजेश वदारीया:—</u>** आपले जे प्रोजेक्ट आहे,त्यावरती खेमाणी नालेंवरती प्रोजेक्ट आहे त्याच्यावर किती टक्के काम झालेले आहे, एकूण प्रोजक्ट काहीतरी ३२ करोडचा आहे,

**<u>कार्यकारी अभियंता,श्री.एस.के.सेलवन</u>**:— हो.

**<u>सदस्य, श्री राजेश वदारीया:—</u>** त्यामध्ये किती काम झालेले आहे. किती टक्के काम झालेले आहे.

**<u>कार्यकारी अभियंता,श्री.एस.के.सेलवन</u>**:—सर, त्या कम्पाउंडवाईज काम झालेले आहे सर, पंपींग स्टेशन आणि पाईपलाईनचे काम,आणि सम चे काम जेथे टाकी बनविण्याचे काम झालेले आहे. पाईपलाईनचे काम ५० टक्के पूर्ण झाले आहे. म्हणजे राजीव गांधी नगर पर्यत.

**<u>सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी:—</u>**किती झाले आहे आकडयात सांगा, किती करोडचे काम झालेले आहे.

**<u>सदस्य, श्री राजेश वदारीया:—</u>** ठिक आहे, ३२ करोडमधून किती करोडचे काम झालेले आहे अंदाज असतो, की एकूण प्रोडक्ट पैकी आपण कंम्पाउंडवाईज सांगत आहात की हे शंभर टक्के झाले की शंभर टक्के झाले,तर एकूण प्रोजेक्टपैकी किती टक्के काम झालेले आहे.

**<u>सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी:—</u>**आणि जी वर्क ऑर्डर दिली होती त्याचा कालावधी किती होता. सन २१०६ मध्ये वर्क ऑर्डर दिली होती, त्याचा काम संपविण्यासाठीचा कालावधी किती होता, आणि आतापर्यत किती टक्के काम झालेले आहे.

**<u>कार्यकारी अभियंता,श्री.एस.के.सेलवन</u>**:— टेंडर मध्ये १८ महिन्याचा कालावधी होता, आणि हा १८महिन्याचा कालावधी संपला. त्याला मुदतवाढीचा कालावधी जानेवारी २०१९ पर्यतचा दिलेला आहे.

**<u>सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी</u>**:— नाही, माझा एक प्रश्न आहे, कामासाठीचा जो १८ महिन्याचा कालावधी संपला. ठिक आहे आपण मुदतवाढ दिली, आणि कामचा अवधी संपल्यानंतर कन्सलटंट नेमायचा आहे. आता बिल्डींग चा विषय निघला म्हणून बोलतो आहे, बिल्डींग चे काम चालू आहे, बिल्डींग पूर्ण झाली, आणि इंजिनिअर नेमायचा आहे त्याचे प्लींथ सर्टिफिकेट, आरसीसी डिझाईन घेण्यासाठी बिल्डींग बनविल्यांनंतर असे करणार का? असाच विषय आहे ना.

**<u>सदस्य, श्री धंनजय बोडारे</u>**:— हा डिपीआर कोणी बनविला होता.

**<u>कार्यकारी अभियंता,श्री. एस.के.सेल्वन</u>**:— फाईन एनोरो इंजिनिअरींग म्हणून एक एजन्सी नेमली होती सर, त्यांनी डीपीआर बनविला आणि डीपीआर एमजीपी नी दिलेल्या डायरेक्शन नुसार इरीगेशन डिपार्टमेंट पोल्युशन कंट्रोल बोर्ड याच्या मेंबरचचा सल्लयानुसार ते डीपीआर बनवून त्याला टेंडर काढले गेले आहे.

**<u>सदस्य, श्री राजेश वदारीया:—</u>** माझ्या प्रश्नाचे उत्तर अजून दिले नाही,

**कार्यकारी अभियंता,श्री.एस.के.सेल्वन**:—साहेब, १२ कोटी हा खर्च, ३२ कोटीचे काम होते, ३२ कोटी मधून ५वर्षाचे मेन्टनेन्स आहे. म्हणजे मूळ किमंत २४ कोटी आहे, त्यामधून १२ कोटीचे काम आतापर्यत झाले आहे.

**सदस्य, श्री राजेश वदारीया:—** म्हणजे ५० टक्के काम आपले झालेले आहे. तर आता सल्लागार न नेमता आपण ५० टक्के एक्झ्युकेशन केलेले आहे, आणि पीएमसीची नंतर नेमणूक करणार.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— आणि ६४ लाख रूपये देवून इथे नगरसेवक निधीसाठी भटकत आहेत आणि खड्डे भरण्यासाठी भटकत आहेत पाण्यासाठी बोडारे साहेब यांच्या वार्डातील पाणी येत नाही म्हणून एक मशीन दुरूस्ती करायची आहे. या ठिकाणी पाण्याची लिकेजसाठी प्रत्येकी ५० हजार सर्व प्रभाग समितीसाठी ही कामे होत नाहीत. आणि काम पूर्ण झाल्यानंतर कन्सलटंट नेमणार, मी या विषयावर निवेदन करत आहे की हा विषय रद्द करण्यात यावे.

**आयुक्त, श्री गणेश पाटील:—** याच्यामध्ये काय झाले आहे की, प्रोजक्ट मधले जे कॅम्पोनंट होते, यातला एक कॅम्पोनंट आपण पूर्ण केलेला आहे. आता तो मेजर कॉम्पोनंन्ट आहे की ज्यामध्ये टेक्नीकली खूप इनव्हॉल्व आहे, तो कॅम्पोनंट म्हणजे एसटीपीचे कन्स्ट्रक्शन, एसटीपीचे कन्स्ट्रक्शन हा कॅम्पोनंट जो आहे तो तांत्रिक दृष्टया आपल्या लोकांना आपल्याकडे जी लोक आहेत इंजिनिअर त्यांना तो झेपणारा नाही आहे. त्याच्यामुळे आपण असे ठरविले होते की, याच्यामध्ये पुढे तांत्रिक काही मुद्दे उपस्थित होवू नये, म्हणून आपण याच्यापूढे एमजीपीला कन्सलटंट नेमावे. अमृतचे जे दोन प्रोजेक्ट आहेत...

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:—एवढा पैसा का दयायचा. २१ करोडचे ३ टक्के.

**आयुक्त, श्री गणेश पाटील:—** नाही, नाही, २१ करोड होणार नाही ना जे काम आता बॅलन्स वर कट असेल ना.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— या विषयाला रदद करण्यात यावे. परत बनवून बरोबर आकडेवारीत घेवून येणे.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— एक मिनीट, इथेच त्यानी क्लीअरकट सांगतात की, २४ कोटीचे काम त्यापैकी ५० टक्के झालेले आहे. राहिले १२ कोटी, १२ कोटीचे ३ टक्केनी किती होतात साहेब, ३६ लाख इथे ६४ लाख कसे काय आलेत.

**आयुक्त, श्री गणेश पाटील:—**हे तुम्ही पूर्ण घेतले का?

**कार्यकारी अभियंता,श्रीएस.के.सेल्वन**:— हो, सर ते प्रस्ताव...

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— हे प्रस्ताव एमजीपी ने दिले एमजीपीच्या अधिका—यानी दिले. पहिला जो डीपीआर बनविणारी एजन्सी होती त्यांचे स्कोप ऑफ वर्क त्यांनी काय काय करायचे, ते कुठपर्यंत करायचे हे आम्हाला पहिले दाखवा. त्याच्यात स्कोपमध्ये काय काय आहे त्याची मुदत कुठपर्यत आहे, शेवटपर्यंत त्याची लायबीलीटी असली पाहिजे. हे काय म्हणजे रेघोटया मारून दिल्या की डीपीआर झाला का?

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— डीपीआर आणि पीएमसी हया दोन वेगवेगळया गोष्टी आहेत. डीपीआर तयार केल्यानंतर केंद्र शासनाकडून पास करून घेणार, इथ पर्यतचे डीपीआरचे काम संपून जाते. ज्यावेळेस डिटेल्स प्रोजेक्ट जेव्हा सुरू करतो त्यावेळेला आपल्याला प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंन्सी आपण नेमतो, ही सध्या आपल्याकडे प्रोजेक्ट मैनेजमेंट कन्सलटंन्सी नव्हती, आपले एमजीपी च सगळे काही करायची. ते एमजीपीचे इजिनिअर जे एसटीपी जे आहेत या तांत्रिक बाबी गुंतागुतीचे आहेत ते खूप मोठया प्रमाणावर असते, त्यामुळे आपल्याला ...नेमायचा आहे.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— इथे पून्हा प्रशासन उघडे पडते, दीड वर्षामध्ये इथे कुठे जर हार्डल नसते, तर दीड वर्षामध्ये हा प्रोजेक्ट पूर्ण झाला असता. आज तुम्ही अडीच वर्षानंतर

पीएमसी साठी तुम्ही प्रस्ताव आणताय डिसेंबर २१०६ मध्ये तुम्ही मंजूरी घेलेले आहे. तयानंतर त्याचे काम कधीतरी डिसेंबर २०१७ मध्ये पूर्ण करायचे होते.

**<u>सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी</u>**:—हया विषयावरती महासभेमध्ये लक्षवेधी आलेली आहे.

**<u>सदस्य, श्री धंनजय बोडारे</u>**:— ऑगस्ट सप्टेंबर २०१९ मध्ये तुम्ही पीएमसी साठी आणता म्हणजे कुठपर्यंत चालणार आहे. ही क्वॉलीटी झाली का ?

**<u>आयुक्त, श्री गणेश पाटील</u>**:— प्रोजेक्ट जे आहे त्याची कधीपर्यंत आहे, जानेवारीपर्यंत आहे ना.

**<u>सदस्य, श्री धंनजय बोडारे</u>**:— दोनवेळा मुदत वाढ दिली आहे.

**<u>आयुक्त, श्री गणेश पाटील</u>**:— मुदत वाढ दिलेली आहे ना. त्याठिकाणी जागेचा प्रश्न होता त्यामुळे काम झाले नाही.

**<u>सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी</u>**:— माझे असे म्हणणे आहे की या विषयाला रद्द करून परत बरोबर व अचूक बनवून परत घेवून यावे तसेच किती काम अजून बाकी आहे आणि त्यासाठी अजून किती खर्च होईल हे घेवून येणे.

**<u>सदस्य, श्री धंनजय बोडारे</u>**:— मला असे वाटते आहे की आम्ही स्थायी समितीचे काही सदस्य हे जे आहेत ना हे जे प्रोजेक्टवर स्थायी समिती आणि आपण चेअसमन, आयुक्त आपण भेट देवू तिथे किती किती कामे झाली आहेत, हे आम्हाला स्वत:ला बघायची आहेत.

**<u>आयुक्त, श्री गणेश पाटील</u>**:— हो बघा, बघा ना,

**<u>सदस्य, श्री राजेश वदारीया:—</u>** दुसरी गोष्ट अशी आहे की डीपीआर कोणी बनविला आहे, त्या वर्क ऑफीसरला पण आमच्या जवळ घेवून यावे, त्या वर्क ऑफीसमध्ये पीएमसीचे किती भाग आहेत की नाही, हे आम्हाला माहिती व्हायला पाहिजे. हा विषय अमान्य करा.

**<u>काही सदस्य :—</u>**हा प्रस्ताव अमान्य करा.

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर शहरातील खेमाणी नाला वळविणेचे कामाअतर्गत बंधारा संप व पंपगृह बांधणे उर्ध्ववाहिनी मलशुध्दीकरण केद्र इ. कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून म.जी.प्रा.ची सेवा मिळणेकरिता करारनामा करणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महापालिका क्षेत्रात असलेल्या खेमाणी नाल्याचा सांडपाण्याचा प्रवाह उल्हासनदीमध्ये महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडळाच्या उध्दभवाजवळ उल्हासनदीत मिसळत असल्याने उल्हासनदीचे प्रदुषण होत होते. याकरिता खेमाणी नाल्याचा प्रवाह वळविणे व त्यावर प्रक्रिया करणेकामी जनहीत याचिका मा.हरित लवाद पुणे येथे दाखल केलेली होती.या सुनावणी अंतर्गत दिलेल्या निर्देशानुसार सदर खेमाणी नाला वळविण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिके तर्फे तातडीने उपाययोजना राबविण्यात येत असून उल्हासनदीत मिसळणारा खेमाणी नाल्याचा प्रवाह वळवून शांतीनगर येथे प्रस्तावति मलशुध्दीकरण केंद्रात त्यावर प्रक्रिया करून वालधुनी नदीत सोडण्याचे काम हाती घेणेत आलेले आहे. सदर काम मे. खिल्लारी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. जे.व्ही.मे.जयभारत कन्स्ट्रक्शन उल्हासनगर यांना देण्यात आले असुन, त्यांचेमार्फत काम प्रगतीपथावर आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नाला वळविणेचे काम विहीत कालावधीत पुर्ण करण्याचे उदीष्ट असल्याने, महापालिकेकडून प्रयत्न सुरु आहेत. परंतु महापालिकेकडे तांत्रिक मनुष्यबळ अपूरे असल्याने व म.जी.प्रा.कडून अभियंते मागणी करूनही प्रतिनियुक्तीवर उपलब्ध होत नसल्याने, सदर काम वेळेत व प्रभावीपणे पूर्ण करण्यास अडचणी येत आहेत. त्याकरिता या कामासाठी म.जी.प्रा.स प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक केल्यास महापालिकेला तांत्रिक मार्गदर्शन होऊन काम पुर्ण करण्यास मदत होईल.

उल्हासनगर महापालिका क्षेत्रासाठी अमृत योजने अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा–१ व टप्पा–२ मंजुर असुन, टप्पा–१ चे काम प्रगतीपथावर आहे व टप्पा–२ करीता निविदा कार्यवाही सुरु आहे. या कामासाठी शासनाकडून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक केली असुन, त्यांचे तांत्रिक मार्गदर्शनाखाली काम सुरु आहे.

अमृत योजनेचे मलशुध्दीकरण केंद्र व खेमानी नाल्याचे मलशुध्दीकरण केंद्र शांतीनगर येथे एकाच ठिकाणी सुरु असल्याने, अमृत योजनेच्या कामासह खेमानी नाल्याच्या कामावर मजीप्रा कडून प्रकल्प व्यवस्थापन सेवा पुरविणे सुलभ होईल. याकरीता खेमानी नाला वळविणेचे कामासाठी मजीप्रास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमनेचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.त्यास मा.मुख्य संचिव, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडून मजीप्राव्दारे महापालिकेला प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा उपलब्ध करुन देणेस सुचीत केले आहे. त्या अनुषंगाने म.जी.प्रा.मार्फत उल्हासनगर महानगरपालिकेस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा उपलब्ध करुन देण्यास सहमती दर्शविली आहे. या सेवेसाठी विहीत करारनामा म.जी.प्रा. व महापालिके दरम्यान करणेसाठी लेखी कळविले आहे. सदर करारनामा करण्यासाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. कारण मजीप्रा कडून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा पुरविणेकरीता प्रकल्प किंमतीच्या ३ : फी आकारण्यात येणार आहे. खेमानी नाला वळविणेचे कामाअंतर्गत सध्या शिल्लक प्रकल्पाची किंमत रु. २१,५०,३१,०००/– असुन, याकरीता ३ : फी रु.६४,५०,९३०/– मजीप्रास द्यावी लागणार आहे.

सदर होणाऱ्या खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** २७ **दिनांक:– ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :–श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील खेमाणी नाला वळविणेचे कामाअतर्गत बंधारा संप व पंपगृह बांधणे उर्ध्ववाहिनी मलशुध्दीकरण केंद्र इ. कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून म. जी.प्रा.ची सेवा मिळणेकरिता करारनामा करणेचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

**⇨ विषय क्र. ४ :– उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय इमारतीचे आवारात साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे, महात्मा ज्योतीबा फुले व पुज्य साई झुलेलाल यांचे पुतळे उभारणे.**

---

**सदस्य, श्री राजेश वदारीया:–**याविषयामध्ये भरपूर वेळा पाठपूरावा करत आहेत हे पुतळे लावण्याचे आज १० ते १५ वर्षापासून जनरल बॉडी ने ठराव मंजूर केला होता.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** १०,१५ वर्षापासून नाही १९९५ पासून पाठपूरावा करत आलो आहेत.

**सदस्य, श्री राजेश वदारीया:–**या विषयाला आम्ही पास करत आहोत इतिवृत्ताची वाट न पाहता, आणि लवकरात लवकर हे सुरू झाले पाहिजे आणि लवकरा लवकर हे काम पूर्ण झाले पाहिजे.

**महापालिका सचिव :–** सुरेश राऊत यांचे नाव देण्यात येत आहे इतिवृत्ताची वाट न पाहता, पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :– उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय इमारतीचे आवारात साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे, महात्मा ज्योतीबा फुले व पुज्य साई झुलेलाल यांचे पुतळे उभारणे.**

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मुख्य आवारात साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे, महात्मा ज्योतीबा फुले व पुज्य साई झुलेलाल या राष्ट्रपुरुषांचे पुतळे उभारणे करीता मा.स्थायी समितीने मंजूरी दिलेल्या ठरावानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत शिल्पकार श्री.विजय शिरगांवकर यांचे नावे कार्यारंभ आदेश निर्गमित करणेबाबत ठराव पारित केला आहे.

शासन निर्णय क्रमांक : पुतळा-३११६//प्र.क्र.३०८/२९ दिनांक २ मे,२०१७ मधील पुतळे उभारणेसंबंधिच्या २१ मार्गदर्शक तत्वांनुसार महापालिका आवारात पुतळे उभारणेची कार्यवाही करावयाची आहे.

सदर मार्गदर्शक तत्वातील मुद्दा क्र.३ व ४ ची पुतर्ता करणेकरीता प्रथम पुतळयाचे मॉडेल तयार करणे आवश्यक असल्याने श्री.विजय शिरगांवकर यांना क्ले मॉडेल तयार करुन देणेकरीता दिनांक ४ जून २०१८ रोजी पत्र दिले होते. तद्‌नंतर श्री. विजय शिरगांवकर यांचे चिरंजिव श्री.अभिजीत विजय शिरगांवर यांनी या कार्यालयात त्यांचे दिनांक ०७/०७/२०१८ चे पत्रान्वये श्री. विजय शिरगांवकर यांना आकस्मिक मृत्यु झाला असल्याचे कळविले. पुतळ्याचे क्ले मॉडेलचे काम ५० टक्के पूर्ण करण्यात आले असून उर्वरीत पुतळ्याचे काम सिने मॉडेल आर्टीस्ट स्टुडीओचे श्री.सुरेश राऊत यांचेकडून करुन घेणेबाबत कळविले आहे.

तसेच दिनांक १/८/२०१८ रोजी श्री.अभिजीत विजय शिरगांवकर व सुरेश राऊत यांनी त्यांचे आपसात करारनामा केला आहे. सदर करारनाम्यानुसार श्री.अभिजीत विजय शिरगांवकर यांनी श्री.राऊत यांना पुढील काम करण्यास माझी काही हरकत नसून सदर कामासाठी यापुढे सर्व अधिकार सिने मॉडेल आर्टीस्ट स्टुडीओ शिल्पकार श्री.राऊत यांना राहतील असे सादर केले आहे.

सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांचा मोठया प्रमाणात पत्रव्यवहार सुरु आहे. वरील परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे श्री.विजय शिरगांवकर यांना प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत कार्यारंभ आदेश निर्गमित करणेकरीता मा.स्थायी समितीने ठराव पारित केला होता. परंतू श्री.विजय शिरगांवकर यांचे आकस्मिक मृत्युमुळे त्यांचेऐवजी सिने मॉडेल आर्टीस्ट स्टुडीओचे शिल्पकार श्री.सुरेश राऊत यांचेकडून उर्वरीत पुतळयांची कामे करुन घेणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** २८ **दिनांक:—** ४/९/२०१८

सुचकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय इमारतीचे आवारात साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे, महात्मा ज्योतीबा फुले व पुज्य साई झुलेलाल यांचे सिने मॉडेल आर्टीस्ट स्टुडीओचे शिल्पकार श्री. सुरेश राऊत यांचेकडुन उर्वरीत पुतळयांची कामे करुन घेणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

**विषय क्र. ५ :—** जुनी खडी मशिन जवळ, गायकवाड पाडा, उल्हासनगर—५ येथिल डंपिंग ग्राउंडवर निर्गत करण्यात येणा—या घनकच—यामुळे येणारी दुर्गंधी घालविण्यासाठी बायोसॅनिटायझरद्वारे प्रक्रीया करुन दुर्गंधीनाशक व कच—याचा थर कमी करण्यासाठी निविदा प्रक्रीया न करता मे. भारद्वाज ईकोटेक,नाशिक यांना थेट संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

———————————————————————————————————————————

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:—१० दहा दिवसात त्यानी सांगितले आहे. त्याच्याकडून लिहून घ्या बरोबर झाले पाहिजे. नाहीतर स्वप्न दाखवायची भरपूर.

**सदस्य, श्री भगवान भालेराव:—**इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

**सदस्य, श्री धंनजय बोडारे**:— होणार ना साहेब हे.

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— होईल, होईल.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:—यामध्ये १७ तारखेला चालिया मेळा आहे, त्याच्या अगोदर याठिकाणी चांगल्या प्रकारे कामे झाली पाहिजेत.

**सदस्य, श्री राजेश वदारीया**:— यामध्ये जे यांनी पहिला नंबर जो आयटम आहे, प्रोव्हायडींग अॅप्लायमेंट बाय ट्रीटमेंट टू एव्हेलेबल सोर्स ऑफ वाटर इन्क्लूडींग कास्ट ऑ वाटर हे कीट सुध्दा दिलेले आहे, तर ते किट काम पूर्ण झाल्यानंतरनंतर देवून जाणार ना.

**श्री.एकनाथ पवार, प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक :—** सर, हे १ वर्षासाठी आहे, ते आपल्याच कडे राहणार आहे. १ वर्ष त्यांनी ट्रीटमेंट करायचे आहे. कीट आपल्याकडे राहणार.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ५ :—** जुनी खडी मशिन जवळ, गायकवाड पाडा, उल्हासनगर—५ येथिल डंपिंग ग्राउंडवर निर्गत करण्यात येणा—या घनकच—यामुळे येणारी दुर्गंधी घालविण्यासाठी बायोसॅनिटायझरद्वारे प्रक्रीया करुन दुर्गंधीनाशक व कच—याचा थर कमी करण्यासाठी निविदा प्रक्रीया न करता मे. भारद्वाज ईकोटेक,नाशिक यांना थेट संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये उल्हासनगर शहरात दररोज अंदाजीत ३६० मेट्रीक टन घनकचरा निर्माण होत आहे. सदरचा कचरा दिनांक ३ ऑक्टोबर २०१६ पासून जुनी खडी मशिन जवळ, गायकवाड पाडा, उल्हासनगर—५ येथिल पडीक खदाण, येथिल डंपिंगग्राउंडवर वाहतूक केला जातो. तसेच महापालीकेकडे मोकळा भुखंड नसल्याने शहरातील नाले सफाईमधून निघणारा गाळ, कचरा व अतिरीक्त डेब्रिज, रॅबिड डंपिग ग्राउंडवर टाकण्यात येत आहे. सदर ठिकाणी टाकण्यात येणा—या कच—याचे विघटन होवून जास्तीजास्त घनकचरा सामावून घेण्यासाठी सदर ठिकाणी साठत असलेल्या कच—यासवर बायोकल्चर द्रव्य व पावडर शिडकावणी करुन सदर ठिकाणी डोझर व पोक्लेन मशिनद्वारे कच—याचे सपाटीकरण सुरु आहे. तसेच कच—याचे नियोजन योग्यरीत्या होण्यासाठी सदर ठिकाणी प्लॅटफॉर्म बनविण्याचे काम सुरु आहे. त्याच प्रमाणे आजुबाजूच्या परीसरात नियमीत जंतुनाशक फवारणी केली जाते व तेथिल नागरीकांसाठी आरोग्य शिबीर राबविण्यात येत असते.

सद्यास्थितीत पावसाळा असल्याने डंपिंग ग्राउंडवर निर्गत करण्यात येणा—या कच—यामुळे आजुबाजूच्या परीसरात दुर्गंधी येत असल्याच्या स्थानिक नगरसेवक व नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. तसेच दिनांक २०/७/२०१८ रोजीच्या महासभेत प्रस्तावाची सुचना अंतर्गत झालेल्या चर्चेअंती डंपिंग ग्राउंडवर येत असलेल्या कच—यामुळे दुर्गंधी येत असून डंपिंग ग्राउंड त्वरीत हटविणेबाबत मागणी केले होती. त्याचप्रमाणे डंपिंगबाबत दिनांक ०६/८/२०१८ रोजीचे श्री. सतरामदास

जेसवानी, नगरसेवक व इतर स्थानिक नगरसेवक, पत्रकार व खाजगी संस्थेच प्रतिनीधी व तेथिल परीसरातील नागरीक १ दिवसाच धरणे आंदोलन केले होते. सदर ठिकाणी झालेल्या चर्चेअंती सदर ठिकाणी येणारी दुर्गंधी येत असल्यामुळे डंपिंग ग्राउंड हटविणेबाबत उपायुक्त (आरोग्य) यांना विनंती केली होती. त्यावेळेस उपायुक्त आरोग्य यांनी सदर ठिकाणी नियमीत जंतुनाशक फवारणी केली जात असून दुर्गंधीनाशबाबत योग्य त्या उपाययोजना केल्या जातील असे नमूद केले होते.

त्याअनुषंगाने मा. आयुक्त सो. यांनी स्थानिक नगरसेवक यांच्या समवेत केलेल्या चर्चेअंती कच—यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू नये म्हणून सदर ठिकाणी त्वरीत उपाय योजना करण्यासाठी घनकचरा व्यास्थापन तज्ञ श्री गुणवंत पाटील यांच्याशी चर्चा विनीमय करुन त्यानुसार त्वरीत प्रस्ताव सादर करण्याचे विभागास निर्देश दिले होते.

त्यानुसार दिनांक १०/८/२०१८ रोजी मे. भारद्वाज ईकोटेक, नाशिक यांनी खडी मशिन जवळील, गायकवाड पाडा येथिल डंपिंग ग्राउंडला भेट देवून दिनांक १६/८/२०१८ रोजी इकडील कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावा नुसार बायोकॅटॅलीस्ट स्प्रे ट्रीटमेंटद्वारे सदर डंपिंग ग्राउंडवरील धुर व दुर्गंधी १० दिवसात नाहीशी करता येईल. तसेच यापध्दतीने काम करणारी मे. भारद्वाज ईकोटेक, नाशिक हि एकमेव एजन्सी आहे. त्याबाबतचे आार्थिक अंदाजपत्रक, खर्च पुढीलप्रमाणे दिलेला आहे.

| Sr. No. | Item to be executed | Quantity | Rate R.s. Per unit | Cost in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Providing and applying Bio-Treatment to available source of water (Well) including cost of treatment kit. | 2 kits | 1,25,000 | 2,50,000/- |
| 2 | Providing and applying Bio-treatment to available source of water (Well) including cost of treatment kit. | 1 kit | 1,50,000 | 1,50,000/- |
| 3 | Spraying of Bio-water over dumping heaps duly making holes, turning garbage heaps whenever per month for one year | 1000 no. | 1,000 | 10,00,000/- |
| 4 | Operation and maintenance by deploying labours for spraying Bio-water and administrating Bio-Culture doses to dumping ground and making pumping and spraying attangement with necessary pipe and electric connection. | Lump sum | 10,00,000 for one year | 10,00,000/- |
| | Total cost of Dumping treatment | | | 24,00,000/- |
| | Project preparation charges 2%on above project | | | 2,80,000/- |
| | Total cost of the project is Twenty six lakh eighty thousand rupees only. | | | 26,80,000/- |

उपरोक्त अंदाजीत रुपये २६,८०,०००/— खर्चाबाबत/दराबाबत मे. भारद्वाज ईकोटेक, नाशिक यांचे प्रतिनीधी श्री. गुणवंत पाटील व श्री. योगेश भारद्वाज यांच्याशी मा. आयुक्त सो. यांच्या दालनात वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटी अंती खालील अटी व शर्तीच्या आधीन राहून सदरचे काम रुपये २२,००,०००/— (रुपये बाविस लाख मात्र) सर्व करांसहित (जीएसटी इत्यादी) करण्याचे मान्य केले.

कामाचे अटी व शर्ती खालील प्रमाणे.

१) सदर ठिकाणी कच—यावर प्रक्रीया करण्यासाठी लागणारे बायोसॅनिटाइझर हे भवालकर इकोलोजीकल रिसर्च इंस्टीटयुट (BERI) यांचे कडून प्राप्त करुन घेतल्याबाबतचे ऑथोरायझेशन पत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

२) उपरोक्त तपशिलात नमुद केल्यानुसार सर्व कार्यवाही करुन (उदा. बायोसॅनिटायझर चिप/किट तसेच पाणी साठविण्यासाठी टॅक, संपुर्ण कच—यावर फवारणी करण्यासाठी सिंचन/पाईपलाईन, कच—याचे कंपोस्टींग करण्यासाठी बायोकल्चर पावडर, देखरेख करण्यासाठी तज्ञ व्यक्ती/प्रोजेक्ट मॅनेजर इत्यादी ) पुर्ण वर्षभरासाठी दैनंदिन कामे करण्यासाठी व सदरचे ऑपरेशन व मेंटनंससाठी किमान ४ लेबर/कामगार पुरविणे बंधनकारक आहे.

३) कामाचे देयक टप्प्या—टप्प्याने देण्यात येईल. १) डंपिंग ग्राउंडवर संपुर्ण यंत्रणा बसवून (तक्यात नमुद तपशिलानुसार)प्रत्यक्ष काम सुरु झाल्यानंतर १५ दिवसांनी तेथिल धुर, दुर्गंधी व माशा नाहिशा होतील याबाबत खात्री झाल्यानंतर व त्यानुसार स्थानिक अधिकारी, स्थानिक नगरसेवक व स्थानिक नागरीक यांनी काम समाधानकारक झाले असल्याचे लेखी प्रमाणपत्र दिल्यानंतर प्रथम टप्पा रुपये १०,००,०००/— (रुपये दहा लाख मात्र) अदा करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. तसेच त्यानंतर उर्वरीत रक्कम प्रत्येक महिन्याला १,००,०००/— (रुपये एक लाख मात्र) अदा करणेबाबत विभागाकडून कार्यवाही करण्यात येईल. प्रत्येक देयक सादर करतेवेळी स्थानिक अधिकारी, स्थानिक नगरसेवक व स्थानिक नागरीक यांचे काम समाधानकारक झाल्याचे (धुर, दुर्गंधी व माशा नाहिशा होवून कच—याचे कंपोस्टींग होत असल्याबाबत) लेखी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहिल.

सबब नागरीकांचे आरोग्याच्या दृष्टीने व पावसामुळे सदर कच—यातुन दुर्गंधी पसरुन नागरीकांचे आरोग्य धोक्यात येवू नये म्हणून सदरचे काम कालमर्यादित करणे गरजेचे आहे. तसेच सदरचा विषय अत्यंत संवेदनशिल असून नागरीकांच्या वारंवार तक्रारी वाढत आहेत, त्यामुळे त्याठिकाणी त्वरीत उपाययोजना न केल्यास कचरा वाहतुकीचे काम तेथिल स्थानिक नागरीकांना

बंद पाडल्यास शहरातील ७ लाख नागरीकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर कामासाठी रुपये २२,००,०००/– (रुपये बाविस लाख मात्र) खर्च येणार असून सदरचा खर्च सी–१ (५) स्वच्छ महाराष्ट्र अभियान या लेखाशिर्षातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदरचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. तसेच यापध्दतीने काम करणारी मे. भारद्वाज ईकोटेक, नाशिक हि एकमेव एजन्सी आहे. त्यामुळे सदरचे काम निविदा न मागविता मे. भारद्वाज ईकोटेक, नाशिक यांच्याशी थेट संविदा करुन कामाचे आदेश देण्याचे प्रस्तावित करण्यात येते. तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ मधिल ५(२)(२) अंतर्गत मा. स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. २९** **दिनांकः– ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :–श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार जुनी खडी मशिन जवळ, गायकवाड पाडा, उल्हासनगर–५ येथिल डंपिंग ग्राउंडवर निर्गत करण्यात येणा–या घनकच–यामुळे येणारी दुर्गंधी घालविण्यासाठी बायोसॅनिटायझरद्वारे प्रक्रीया करुन दुर्गंधीनाशक व कच–याचा थर कमी करण्यासाठी निविदा प्रक्रीया न करता मे. भारद्वाज ईकोटेक,नाशिक यांच्याशी आयुक्ताना थेट संविदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या ''टप्पा–१'' अंतर्गत कॅम्प क्र. १ ते ४ मध्ये असलेले विविध एच.टी. व एल.टी.पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामी प्राप्त फेर निविदेस मंजुरी मिळणेबाबत.

---

**सदस्य, श्री भगवान भालेराव:–**हा, एक मिनीट याच्यावरकोण बोलणार आहे. सेल्वर साहेब सांगा.

**कार्यकारी अभियंता,श्रीएस.के.सेल्वन**:– साहेब , उल्हासनगर शहरामधील असलेल्या एसपी पंपींग स्टेग स्टेशन आहे, कॅम्प नं. ४ आणि कॅम्प नं.५ मध्ये एकूण ४ पंपींग स्टेशन आहे. त्याला वार्षिक चाविण्याकरिता निविदा काढल्या होत्या.

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:– हा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये ८/९/२०१७ ला आला होता. ते आपल्या स्थयी समितीने काय आदेश दिले होते. ते जरा आम्हाला सांगा.

**कार्यकारी अभियंता,श्रीएस.के.सेल्वन**:– आठवत नाही.

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:–मी ठराव वाचू का? बघा, आयुक्त साहेब बघा, ही स्थायी समिती वरील प्रस्तावानुसार उल्हासनगर महापालिकेच्या टप्पा क्र.१ अंतर्गत नंबर ४ ते ५ मध्ये असलेले विविध एसपी पंप चालवणे देखभाल व दुरूस्ती करणे कामी प्राप्त निविदेश वित्तीय मंजूरी देण्यास प्रस्ताव अमान्य करीत आहे. कारण शासन परिपत्रक क्रमांक जीएसटी जो १०१७ प्रकरण ८१ कराधान–१ दि. १९ ऑगस्ट २०१७ अन्वये नव्याने जीएस टी लागू झाल्याने त्यानुसार कारवाई होणे आवश्यक आहे. त्यामुळे जून्या निविदा रद्द करून नविन

निविदा मागविण्यास प्रशासनास निर्देश देत आहे. असे असतनेही जीएस टी न लावता परत तसेच करून जास्त दराने जीएसटी लागून जास्त दराने तुम्ही जर निविदा रद्द करायला सांगितली, निविदा पून्हा काढायला सांगितली असे असतानी स्थायी समितीपूढे परत तसेच आणता, ही कुठली मस्ट आहे. काय डोळेझाक पण आहे हा?

**सदस्य,श्री राजेंद्र चौधरी:—**२५ टक्के जास्त दराने.

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:—आपण सूचक अनुमोदक आहेत. आणले जीएसटी करून आणि नविन दराने आणले तेवढे सांगा फक्त दोन गोष्टी सांगा.

**कार्यकारी अभियंता,श्री.एस.के.सेलवन**:— प्रशासकीय मान्यता मिळाली होती त्याच रक्कममधून निविदा काढल्या होत्या,

**सदस्य,श्री राजेंद्र चौधरी:—**२६ नंबरचा ठराव झाला ना , सचिव मॅडम ठराव आपलाच आहे का?

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— सूर्वे आणि टोनी सिरवानी यांची सही आहे.

**सदस्य, श्री धनंजय बोडारे:—** गोषवा—यामध्ये पहिल्याहयाच्यातच नमूद आहे.त्यामुळे फेरनिविदा मागविण्यात आली.

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— स्पष्ट लिहिलेले आहे, ठराव केला आहे स्थायी समितीने जीएसटी लागू नकरता कशा पध्दतीने... साहेब माझे मत असे आहे हा टेंडर रद्द करावा. आणि नव्याने निविदा जीएसटी लावून काढा.

**उप अभियंता श्री बी.एस.पाटील:—** हे असे होते ते जे रेट होते म्हणजे जीएसटी नंतर ॲड करायची होती, म्हणजे जे रेट होते आपले तेच होते, त्यामुळे आपण कॉल केले एजन्सीने भरताना जीएसटी धरून रेट कोड केलेला आहे. तो डीएस आर आलेला आहे. १८—१९चा त्याला जीएसटी धरून कम्पेअर केले.

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— आपल्याला फेरनिविदा काढायला सांगितलेली होती

**उप अभियंता श्री बी.एस.पाटील:—** फेरनिविदा मागविली साहेब,

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— फेर निविदा काढली होती का?

**उप अभियंता श्री बी.एस.पाटील:—** हो, साहेब. फेर निविदा मागविली.

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— दुसरी निविदा.

**उप अभियंता श्री बी.एस.पाटील:—** हो, नविन मागविली साहेब,

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— नविन काढली

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— गोषवारा वाचा.

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— गोषवारा वाचला मी.

**उप अभियंता श्री बी.एस.पाटील:—** नविन टेंडर मागविले साहेब, तिनदा त्याला मुदतवाढ दिली कोणी भरत नव्हते, दोनच टेंडर होते आणि...

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— हयामध्ये लिहिलेले आहे १५/१/२०१८ रोजी नविन निविदा काढण्यात आली त्यामध्ये दोन लोकांनी भाग घेतला आणि ते दोन्ही पात्र आहेत. त्यामेळे एकाचे ३०टक्के आणि दुस—याचे २५ टक्के आणले आहे. जूनी रदद् करण्यात आली आहे.

**उप अभियंता श्री बी.एस.पाटील:—**त्यांनी जो सादर केलेला रेट आहे ना, तो जीएसटी धरून आहे.

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— जीएसटी धरून आहें म्हणजे त्यांनी सादर केलेला आहे की तूम्ही एस्टीमेट बघा. मला यात जीएसटी आहे का तेवढे सांगा.

**उप अभियंता श्री बी.एस.पाटील**:— भालेराव साहेब, कसे आहे डीएसआर जो झालेला आहे ना साहेब, डीएसआर मध्ये खाली...

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— आता तुम्ही एकच सांगा आता तुम्ही निविदा मंजूरीला आणलेली आहे, आजच्या रेटचा डिएसआर आहे का? आणि जीएसटी त्यामध्ये इनक्लूड आहे का?

**उप अभियंता श्री बी.एस.पाटील**:— नाही, आजचा डीएसआर साहेब १ जूलैला आलेला आहे. आणि त्याप्रमाणे ती कारवाई झालेली आहे. जीएसटी फक्त ॲड करायचा आहे.

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— ती फक्त ॲड करायचे आहे.

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— ते करून दिलेली आहे ना.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— सर्व बरोबर आहे गोषवारा पूर्ण वाचा. ३/२/२०१८ रोजी टेंडर उघडण्यात आले आहे. दोन लोक आले.

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— १ वर्षापासून आपण ही प्रक्रीया करत आहोत,

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— तीन वेळा त्याला वाढवून देण्यात आलेला आहे.

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— मध्ये इलेक्शन लागले त्यामूळे थोडा वेळ लागला.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— टेंडर तीन वेळा कॉल केलेला आहे. जे केलेले आहे ते बरोबर आहे.

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— नाही,नाही, मला साहेब एक गोष्ट लक्षात येते. आता ठिक आहे तूम्ही बोलता ना, रेट मध्ये काही फरक आहे. ७४, ५०,७३६ रूपये, आता परत याच्यात ७४, ५०,७३६ रूपये असेच येवू शकते,

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— हो., त्याचे कारण डीएसआर कधी बदलला,

**उप अभियंता श्री बी.एस.पाटील**:— १ जूलैला.

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— म्हणजे ऑगस्ट २०१७ चे. आहे

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— कुठले,

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— एस्टीमेटमध्ये ५ते १० रूपयेचा पण बदल होवू शकत नाही.

**सदस्य, श्री.दिपक सिरवानी:—** टेंडर नविन काढला आहे तर...

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— नविन काढला नाही टेंडर, रक्कम तीच आहे.

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— डीएसआर आता बदलला ना.

**उप अभियंता श्री बी.एस.पाटील**:—१ जूलै २०१८ ला नविन डीएसआर आला.

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:— त्याच्यामुळे जूने रेट सगळे तसेच होत,

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— बरोबर आहे, रेट तर तेवढेच येतील.

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— आपण आज ऑगस्ट ला देतोय.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— त्याच्यासाठीच तर २५ टक्के..

**सदस्य, श्री राजेश वदारीया**:— डीएसआर नविन आला आहे, हे डीएसआर चे पहिले टेंडर काढलेले आहे. त्यामुळे आपल्याला २५ टक्के जास्त लागत आहे.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— पास इतिवृत्ताची वाट न पाहता. पूढे चलाइतिवृत्ताची वाट न पाहता लिहा.

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— दया दया वाढवून दया २५ टक्के, ५० टक्कके अबाऊ दया. २५ टक्के काही नाही जीएसटी ५०टक्के दया.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— दीड वर्षापासून मुदत वाढ देवून,देंवून काम चालू आहे. नविन टेंडर तर काढाचवे लागेल ना.आणि आम्ही टेंडर काढत नाहीतर मुदत वाढ देत आहात, आता टेंडर काढला तर मुदत वाढ का देत आहात. करा इतिवृत्ताची वाट न पाहता.

**महापालिका सचिवः— पास.**

**सदस्य, श्री राजेश वदारीया**:— नाही नाही, आपली जी पध्दत जी आहे ना ती बरोबर नाही.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— आजपासून नंतर इथे मुव्ही ठेवा. माझी आज एक मागणी आहे.

**सदस्य, श्री राजेश वदारीया**:— सगळयाकडे माईक आहे ऑब्जेक्कशन करा ना.

**सदस्य,श्री धंनंजय बोडारेः—** परंतु त्यांनी पास पास विचारले तर काय झाले.

**महापालिका सचिवः—**इतिवृत्ताची वाट न पाहता असेल तर सचिवांना विचारावे लागते.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— माझी एक मागणी आहे काही लोक हि शांत बसत आहे त्यामुळे प्रत्येकाला उभे करून विचारावे लागेल पास.

**सदस्य,श्री धंनंजय बोडारेः—**यामध्ये आपण काय दाखविले की आम्हाला यामध्ये पास करण्यात घाई आहे.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— दीड दोन वाजता महासभा आहे.

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— तीन वाजता महासभा आहे.

**सदस्य, श्री राजेश वदारीया**:— आपल्याला बोलायचा अधिकार आहे, आपण माईक वरती बोला. आपले काय म्हणणे आहे सचिव एक एक मेंबरला का विचारेल?

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— सचिव मॅडम जमनु पुरस्वानीची मुव्हीची मागणी आहे आणि आमची लाईव्ह ची मागणी आहे.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— मा. सभापती महोदयाने निवेदन करत आहे की एकतर लाईव्ह करा आणि प्रत्येक मेंबंरला विचारण्यात यावे,आणि ज्या दिवशी स्थायी समितीची मिटींग असेल त्या दिवशी इतर कामकाज, महासभा वैगेरे ठेवण्यात येवू नये.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** कोणी ठेवलेले आहे ठेवायचे काम तुमचे आहे, आम्ही सांगितले होते का महासभा हया हया वेळेला ठेवा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजाः—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ६** :— उल्हासनगर महानगरपालिकेच्या ''टप्पा—१'' अंतर्गत कॅम्प क्र. १ ते ४ मध्ये असलेले विविध एच.टी. व एल.टी.पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामी प्राप्त फेर निविदेस मंजुरी मिळणेबाबत

**प्रस्तावना**

विषयांकित कामाची मुळ ई निविदा क्रमांक १३१७ मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २६, दिनांक ०८/०९/२०१७ अन्वये शासन परिपत्रक क्रमांक जीएसटी—१०१७/प्र.क्र.८१/कराधान—१, दिनांक १९ ऑगस्ट २०१७ अन्वये नव्याने जीएसटी लागु झाल्याने त्यानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्यामुळे जुन्या निविदा रद्द करुन नवीन निविदा मागविण्यास प्रशासनास निर्देश देत आहेत, असा ठराव मंजुर झाला होता.

त्यामुळे विषयांकित कामाची फेर निविदा दिनांक १४/११/२०१७ रोजीच्या सकाळ, पुन्य नगरी, उल्हास विकास या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करुन ऑनलाईन फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर फेर निविदेस प्रतिसादर न मिळाल्याने दिनांक १२/१२/२०१७ पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात आली. परंतु स्पर्धा न झाल्यामुळे व्दितीय मुदतवाढ दिनांक २८/१२/२०१७ पर्यंत देण्यात आली. परंतु दुसऱ्यांदा सुध्दा स्पर्धा न झाल्याने तिसरी मुतदवाढ दिनांक १२/०१/२०१८ पर्यंत देण्यात आली. तिसऱ्या मुदतवाढी नंतर सुध्दा दोनच निविदा धारकांनी भाग घेतल्याने तिसऱ्यांदा निविदेचा तांत्रिक भाग दिनांक १५/०१/२०१८ रोजी उघडण्यात आला व तांत्रिक दृष्टया दोनही निविदा पात्र झाल्याने निविदांचा आर्थिक भाग (लिफाफा क्रमांक २) दिनांक ०३/०२/२०१८ रोजी उघडण्यात आला, त्यात खालील प्रमाणे दर नमुद केले आहेत.

| अ.क्र | ठेकेदारांचे नाव | प्राकलनीय किंमत | सादर केलेला दर | एकुण रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. ओम इंडस्ट्रीअल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली. | ७४,५०,७३६/— | २५.२ : टक्के (जादा दराने) | ९३२८३२१.४७ | ट |
| २ | मे. कल्पतरु इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर प्रा.लि. उल्हासनगर. | | ३० : टक्के (जादा दराने) | ९६८५९५६.८ | ट |

उपरोक्त तक्त्यामध्ये मे. ओम इंडस्ट्रीअल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली, यांचे निविदेचे दर अंदाजित किंमतीच्या २५.२ : जास्त दराने भरलेली असुन, त्यांची एकुण किंमत रु.९३२८३२१.४७ एवढी होते. सदर निविदेच्या वाटाघाटीसाठी मा.अतिरीक्त आयुक्त यांच्या दालनात दिनांक ०७/०२/२०१८ रोजी बैठक बोलाविण्यात आली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार सदरचे काम निविदा किंमतीस (ॲट पार) करणे आवश्यक आहे, असे ठरले. परंतु संबंधित ठेकेदार मे. ओम इंडस्ट्रीअल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली, यांनी निविदा किंमती ऐवजी भरलेला दर २५.२ : निविदा किंमतीपेक्षा जास्त दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे. परंतु दरांची पुन्हा वाटाघाटी करणेसाठी मा.आयुक्त सो., यांचे सुचनेनुसार दिनांक १६/०३/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता बैठकीसाठी बोलाविण्यात आले होते.

त्यानुसार ठेकेदाराने ०.२ टक्के दर कमी करुन २५ टक्के जास्त दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.७४५०७३६/— असुन ठेकेदाराने सादर केलेल्या (वाटाघाटी नंतर) निविदेची किंमत रु.९३१३४२०/— एवढी आहे. या निविदा किंमतीची चालु दरसुची नुसार (सन २०१८—१९) किंमत रु.८७३६५८२/— येत असुन ती ६.६० टक्के जादा येत आहे. याबाबत तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यामुळे न्युनतम निविदा ६.६० टक्के जादा दराची स्विकृती करीता शिफारस करण्यात येत आहे.

तरी सदर ई—निविदेचा न्युनतम देकार मे. ओम इंडस्ट्रीअल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली, यांची निविदा स्विकुत करून त्यांच्याशी करारनामा करून कार्यादेश देण्यासाठी प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ३०** **दिनांकः— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या ''टप्पा—१'' अंतर्गत कॅम्प क्र. १ ते ४ मध्ये असलेले विविध एच.टी. व एल.टी.पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामी प्राप्त ई—निविदेचा न्युनतम देकार मे. ओम इंडस्ट्रीअल इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली, यांची निविदा स्विकुत करून त्यांच्याशी करारनामा करून कार्यादिश देण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :–** जंतूनाशक/किटकनाशक/अळीनाशक/डासनाशक/शौचालयासाठी औषधे पुरवठा करुन घेण्यासाठी प्राप्त न्युनतम दर सादर करणारे निविदाकारांशी संविदा करण्यास मान्यता देणे

---

**सदस्य, श्री राजेश वदारीया**:– आम्ही नेहमी ही गोष्ट सांगितलेली आहे, की जे पण जंतुनाशक किटकनाशक वार्डामध्ये येत असतात त्यावेळेला नगरसेवकांना माहिती मिळाली पाहिजे, की आपण किती नग आणि कोणकोणती वस्तु आमच्या वार्डात दिलेली आहे. हे नगरसेवकांना माहितीच होत नाही, की कोणकोणती किटकनाशके आली आहे, कधी आले ,कधी संपली आहे इत्यादी,

**प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक श्री.एकनाथ पवार :–**याबाबत प्रत्येक प्रभाग समितीच्या सभापती व मा. प्रभाग अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात सर्व नगरसेवकांना देण्यात येते.

**सदस्य, श्री राजेश वदारीया**:– बघा, आज एचओडीग्रुप मध्ये सर्व नगरसेवक आणि आपण आहेत, त्याच्या टाका की या या वार्डात एवढे मटेरियल टाकण्यात आले. नगरसेवकांना माहिती होईल.

**प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक श्री.एकनाथ पवार** :– प्रभागनिहाय्य वाटप करण्यात आलेले जंतुनाशके माहिती देण्यात येते.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:– आयुक्त जी सर्व वार्डामध्ये ही आपली गाडया व्हील बेरो, फावडे घमेले सामान यांची सुध्दा खूप अडचण आहे. व्हील बेरो तुटलेले आहे. दोन दोन व्हल बेरो आले पाहिजेत.

**प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक श्री.एकनाथ पवार** :– प्रोसेस सुरू आहे.

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:– प्रोसेस सुरू आहे, १ कोटी ६ लाखाचे हा जंतुनाशकाचा विषय १ कोटी ७ लाखाच्या आसपास म्हणजे जवळ जवळ ७८ वार्ड मध्ये सव्वा, दीड लाखाची औषेधे येतात आणि त तीच नगरसेवकांना जर माहित नसतील तर काय उपयोग.

**प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक श्री.एकनाथ पवार** :– प्रत्येक नगरगसेवकाला याची कल्पना असतेच तरी पण यापूढे लेखी स्वरूपात किती साहित्य देण्यात आलेले आहे, याबाबतची सर्व माहिती देण्यात येईल.

**सदस्य,श्री धंनंजय बोडारे**:– डंपींग ग्राऊडसाठी टेंडरच देतो, उदयापासून तो चालू करणार आहे. मग हयाच्यामध्ये असलेले आयटम ते काय घ्यायला पाहिजे. डंपींग ग्राऊडसाठी लागणरे आयटमजे आहेत, तिथे आम्ही त्याला देतो,

**प्र.मुख्य स्वच्छता निरिक्षक श्री.एकनाथ पवार** :– बायोडीक्रीब्युटल हा प्रोसेस जास्त प्रमाण म्हणून पूर्वीचाच प्रस्ताव आहे नंतर आपण बायोसायटेझनचे आपण केलेले आहे.

**आयुक्त, श्री गणेश पाटील**:– बायोकल्चर लागणारच आहे कारण हा आपण काय करतोय आता आपण प्रत्येक वार्डामध्ये कम्पोस्टींग करतोय, त्यात बायोकल्चर पावडर टाकावी लागणारच.

**सदस्य, श्री राजेश वदारीया**:–बायोकल्चर त्याच्यामध्ये लागणारच.

**सदस्य,श्री धंनंजय बोडारे**:– इथे डंम्पींग ग्राऊड साठी लिहिलेले होत म्हणून मी म्हटले.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:– मा. आयुक्त जी, जसे की यापूर्वी चालू केले होते, की प्रत्येक वार्डामध्ये हे कम्पोझीटचे चालू व्हायला पाहिजे, याच्यासाठी ८ ते १० वार्डामध्ये कार्यक्रम बनविण्यात आला होता, परंतु ते अर्ध्योतच बंद झालेले आहे. उल्हासनगर १ बस स्टाप मध्ये सर्वे करून गेले होते, तसेच बाकीच्या जागी ही सर्वे केला होता. ज्या ठीकाणी

होत असेल त्या ठिकाणी चालू करण्यात यावे. प्रत्येक महिन्याला एक ठिकाण जरी बनविले तर २० पॅनल मध्ये होवून जाईल.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— इतिवृत्ताची वाट न पहाता पास

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ७ :—** जंतूनाशक/किटकनाशक/अळीनाशक/डासनाशक/शौचालयासाठी औषधे पुरवठा करुन घेण्यासाठी प्राप्त न्युनतम दर सादर करणारे निविदाकारांशी संविदा करण्यास मान्यता देणे

**प्रस्तावना**

*उल्हासनगर शहरातील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने व स्वच्छतेच्या दृष्टीने शहरातील नागरीकांच्या आरोग्याचा विचार करता आवश्यक जंतुनाशक औषधांचा पुरवठा होण अत्यंत आवश्यक आहे. शहरातील नागरीकांच्या आरोग्याचा विचार करता आवश्यक जंतुनाशक/किट्कनाशक/अळीनाशक/डासनाशक/शौचालयासाठी रसायने/पावडर/औषधे सन 2018-19 साठी खरेदी करिता मा. आयुक्त सो., यांनी सदर प्रस्तावास दि. 02/07/2018 रोजी अन्वये दिलेल्या मान्यतानुसार ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. विहित मुदतीत खालील निविदाकारांनी त्यांच्या निविदा दाखल केलेल्या आहेत.*

*1) मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, 2) मे. मित्र हर्बल्स प्रा. ली. 3) मे. रविराज केमिकल्स.*

*प्राप्त निविदा दिनांक 31/07/2018 रोजी दुपारी 03.00 वाजता ई-निविदा कक्षात निविदाकारांच्या उपस्थितीत संगणकाच्या माध्यमाने तांत्रिक बाब पहिला लिफाफा उघडण्यात आला. सदर सर्व निविदाकारांनी निविदेतील नमुद अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याने समितीने वित्तीय लिफाफा उघडण्याबाबत सुचना केल्या त्यानुसार दिनांक 03/08/2018 रोजी दुपारी 03.30 वाजता निविदा समितीच्या मान्यतेने तीनही निविदाकारांचे दुसरा वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र तीनही निविदाकारांनी सादर केलेल तुलनात्मक दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहेत.*

*तुलनात्मक तक्ता*

| अ. क्र. | औषधाचे नांव व त्यांचा तपशील | आवश्यक मालाचा (परिमाण) | मागील वर्षाचे मंजुर दर रु. | मे. रविराज केमिकल | मे. डॉल्फीन कॉर्पोरेशन | मित्रा हर्बल्स प्रा.लि. | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ब्लीचींग पावडर 33% क्लोरिन आय.एस.आ. प्रमाणीत | 15000 KG | 43 | 67 | 75 | 79 | 1005000 |
| 2 | काळे फिनाईल, शौचालयासाठी (35 लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | 7000 Ltrs | 85 | 00 | 0 | 0 | -- |
| 3 | सॅनिटेक्स व्हाईट क्लिनर, सुंगधीत शौचालयासाठी व कार्यालयासाठी (35 लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | 5000 Ltrs | 93 | 122 | 101 | 115 | 505000 |
| 4 | जर्मीटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टर पावडर | 5000 KG | 82 | 118 | 89 | 100 | 445000 |
| 5 | फिनॉईल (डांबर) गोळ्या, जंतुनाशक मुताऱ्यांसाठी | 500 KG | 289 | 00 | 0 | 0 | -- |
| 6 | सफाया मोनोक्लोरो फिनॉल पावडर जंतुनाशक दुर्गधीनाशक (35 लि. पलास्टीक कॅन मध्ये) | 5000 KG | 70 | 86 | 76 | 92 | 380000 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | मायक्रो फाईन पावडर, सुंगधीत वातावरण निर्मिती करण्यासाठी | 5000 KG | 160 | 167 | 180 | 183 | 835000 |
| 8 | क्लीनोव्हाईट, दुर्गधीनाशक WHO स्पेसिफीकेशन प्रमाणे | 5000 Ltrs | 184 | 205 | 250 | 245 | 1025000 |
| 9 | निमटेक्स हार्बल अळीनाशक हाफकीन इस्टिट्यूटद्वारे टेस्टेड | 600 Ltrs | 1290 | 1650 | 1366 | 1599 | 819600 |
| 10 | सेप्टी टँक पावडर (सेपटीक्लीन पावडर) शौचालयाचे सेप्टीक टँक सफाईसाठी | 1000 KG | 715 | 851 | 779 | 862 | 779000 |
| 11 | फ्रेश ऑल डिलक्स (75 ग्राम कार्यालयासाठी) | 300 Nos | – | 00 | 0 | 0 | -- |
| 12 | पिप बेट ग्रन्युअलम माशानाशक | 600 KG | 1156 | 1525 | 1264 | 1445 | 758400 |
| 13 | वेस्ट ट्रीट पावडर सिलीकेटर, झेडबेस पावडर एन्ट्रीसेप्टीक पावड मिनरल पावडर (दुंगधीनाशक व रोगजंतूचा अटकाव करण्यासाठी) | 7000 KG | 110 | 148 | 145 | 120 | 840000 |
| 14 | बायोक्लचर पावडर डंपिंग ग्राउडंसाठी/कचऱ्याचे विघटन करण्यासाठी आवश्यक घटक नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, कलचर अॅझ्रोटो बॅक्टर लिगनीग डिग्रेबल बॅक्टोरिया | 2000 KG | 120 | 158 | 160 | 135 | 270000 |
| 15 | बायोटेक ओसीएक्सपी (डम्पिंग ग्राउडसाठी/ओल्या कचऱ्याचे कम्पोस्टींग करण्यासाठी) | 2000 KG | 400 | 397 | 850 | 599 | 794000 |
| 16 | प्रिमॅझोल (क्रिसॉलिक पावडर) | 5000 KG | 77 | 0 | 0 | 0 | -- |
| 17 | हॅड्रोक्लोरिक ॲसिड (05 लिटर प्लास्टिक कॅन मध्ये) शौचालय मुताऱ्या सफाई करणेसाठी | 5000 KG | 42 | 48 | 65 | 58 | 240000 |
| 18 | बॅक्टोक्लीन व्हाईट क्लिनर, शौचालय सफाईसाठी | 5000 KG | 117 | 150 | 127 | 141 | 635000 |
| 19 | साईग्निऑन 50% EC डासनाशक किटकनाशक | 1170 KG | -- | 1566 | 1354 | 1525 | 1584180 |
| 20 | युरिनल ब्लॉक्स | 100 KG | 2375 | 2650 | 2625 | 2550 | 255000 |
| | एकूण अंदाजीत खर्च | | | | | | 1,11,70,180 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार अ. क्र. 1,7,8,15 व 17 साठी मे. रविराज केमिकल, डोंबिवली, अ.क्र. 3,4,6,9,10,12,18 व 19 साठी मे. डॉल्फीन कॉर्पोरेशन, अ. क्र. 13,14 व 20 साठी मे. मित्र हर्बल प्रा.ली. यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत. तसेच अ.क्र. 2,5,11,व 16 यासाठी कोणीही दर सादर केलेले नसल्याने सदची अळीनाशके/डासनाशके/किटकनाशके औषधे वगळण्याचे येते, उक्त जंतूनाशक/अळीनाशक/डासनाशके/किटकनाशके औषधे आवश्यकते नुसार दरपत्रकाद्वारे मागविण्यात येतिल.

तरी उक्त एकुण अ. क्र. 1,3,4,6,7,8,9,10,12,13,14,15,17,18,19, व 20 वरील नमुद केलेली सदरची जंतूनाशक/अळीनाशके/डासनाशके/किटकनाशके औषधे खरेदी करण्यासाठी निविदा समिती सदस्य यांच्या निर्देशानुसार जा.क्र.उमपा/आवि/उप.आ/104/2018, दिनांक 04/08/2018 रोजीच्या पत्राअन्वये न्युनतम दर सादर करणाऱ्या निविदाकारांस वाटाघाटीसाठी दिनांक 06/10/2017 रोजी दुपारी 3:00 वाजता वाटाघाटीसाठी बोलावून दरांच्या वाटाघाटी केल्या. सदर वाटाघाटीअंती सर्व निविदाकाराने वाटाघाटीअंती सादर केलेल्या दराबाबत लेखी पत्र सादर केले

*आहे. प्रथम वाटाघाटीअंती प्राप्त दरानुसार नमुद केलेली जंतुनाशक/अळीनाशक/डासनाशक/किटकनाशक औषधी खरेदीकरीता रू. 1,07,83,000/- खर्च अपेक्षित होता. तद्नंतर मा. आयुक्त सो., यांनी पुनश्च दराच्या वाटाघाटीसाठी न्युनतम दर सादर करणाऱ्या निविदाकारांस दिनांक 23/08/2018 रोजी दुपारी 12:00 वाजता वाटाघाटीसाठी बोलावून पुनश्च वाटाघाटी करण्यात आली. सर्व निविदाकाराने वाटाघाटीअंती सादर केलेल्या पुनश्च दराबाबत लेखी पत्र सादर केले आहे. त्यानुसार पुनश्च वाटाघाटीअंती प्राप्त दरांचा तक्ता खालील प्रमाणे आहे.*

| अ. क्र. | औषधाचे नांव व त्यांचा तपशील | आवश्यक मालाचा (परिमाण) | मगील दर (सन 2017-18) | न्युनतम निविदाधारकांचे नांव व त्यांचे प्राप्त दर प्रति नग/किलो/लिटर | | | प्रथम वाटाघाटी अंती प्राप्त दर | द्वुतीय वाटाघाटी अंती प्राप्त दर | अपेक्षीत खर्च रूपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मे. रविराज केमिकल | मे.डॉल्फीन कॉर्पोरेशन लि. | मित्रा हर्बल्स प्रा.लि. | | | |
| 1 | ब्लीचींग पावडर 33% क्लोरिन आय.एस.आ. प्रमाणीत | 15000 KG | 43 | 67 | -- | -- | 62 | 58 | 870000 |
| 2 | काळे फिनाईल, शौचालयासाठी (35 लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | 7000 Ltrs | 85 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 3 | सॅनिटेक्स व्हाईट क्लिनर, सुंगधीत शौचालयासाठी व कार्यालयासाठी (35 लि. प्लास्टीक कॅन मध्ये) | 5000 Ltrs | 93 | -- | 101 | -- | 97 | -- | 485000 |
| 4 | जर्मीटॉक्स प्लस पावडर, डिसन्फेक्टर पावडर | 5000 KG | 82 | -- | 89 | -- | 86 | -- | 430000 |
| 5 | फिनॉईल (डांबर) गोळ्या, जंतुनाशक मुताऱ्यांसाठी | 500 KG | 289 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 6 | सफाया मोनोक्लोरो फिनॉल पावडर जंतुनाशक दुर्गधीनाशक (35 लि. पलास्टीक कॅन मध्ये) | 5000 KG | 70 | -- | 76 | -- | 73 | -- | 365000 |
| 7 | मायक्रो फाईन पावडर, सुंगधीत वातावरण निर्मिती करण्यासाठी | 5000 KG | 160 | 167 | -- | -- | 162 | 161 | 805000 |
| 8 | क्लीनोव्हाईट, दुर्गधीनाशक WHO स्पेसिफीकेशन प्रमाणे | 5000 Ltrs | 184 | 205 | -- | -- | 195 | 194 | 970000 |
| 9 | निमटेक्स हार्बल अळीनाशक हाफकीन इस्टिट्यूटद्वारे टेस्टेड | 600 Ltrs | 1290 | -- | 1366 | -- | 1335 | -- | 801000 |
| 10 | सेप्टी टॅंक पावडर (सेपटीक्लीन पावडर) शौचालयाचे सेप्टीक टॅक सफाईसाठी | 1000 KG | 715 | -- | 779 | -- | 755 | -- | 755000 |
| 11 | फ्रेश ऑल डिलक्स (75 ग्राम कार्यालयासाठी) | 300 Nos | - | -- | | -- | -- | -- | -- |
| 12 | पिप बेट ग्रन्युअलम माशानाशक | 600 KG | 1156 | -- | 1264 | -- | 1229 | -- | 737400 |
| 13 | वेस्ट ट्रीट पावडर सिलीकेटर, झेडबेस पावडर एन्ट्रीसेप्टीक पावड मिनरल पावडर (दुंगधीनाशक व रोगजंतूचा अटकाव करण्यासाठी) | 7000 KG | 110 | -- | | 120 | 116 | 115 | 805000 |
| 14 | बायोक्लचर पावडर डंपिंग ग्राउडंसाठी/कचऱ्याचे विघटन करण्यासाठी आवश्यक घटक नॉन इडिबल पावडर, मिनरल पावडर, कलचर अॅझोटो बॅक्टर लिगनीग | 2000 KG | 120 | -- | | 135 | 126 | 125 | 250000 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | डिग्रेबल बॅक्टेरिया | | | | | | | | |
| 15 | बायोटेक ओसीएक्सपी (डम्पिंग ग्राउडसाठी/ओल्या कचऱ्याचे कम्पोस्टींग करण्यासाठी) | 2000 KG | 400 | 397 | | -- | 390 | 389 | 778000 |
| 16 | प्रिमॅझोल (किसॉलिक पावडर) | 5000 KG | 77 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 17 | हॅड्रोक्लोरिक ॲसिड (05 लिटर प्लास्टिक कॅन मध्ये) शौचालय मुताऱ्या सफाई करणेसाठी | 5000 KG | 42 | 48 | | | 48 | 46 | 230000 |
| 18 | बॅक्टोक्लीन व्हाईट क्लिनर, शौचालय सफाईसाठी | 5000 KG | 117 | -- | 127 | -- | 121 | -- | 605000 |
| 19 | साईथ्रिऑन 50% EC डासनाशक किटकनाशक | 1170 KG | -- | -- | 1354 | -- | 1330 | -- | 1556100 |
| 20 | युरिनल ब्लॉक्स | 100 KG | 2375 | | | 2550 | 2495 | 2490 | 249000 |
| | | एकूण अंदाजीत खर्च | | | | | | | 1,06,91,500/- |

*वाटाघाटीअंती प्राप्त दरानुसार उक्त नमुद केलेली जंतुनाशक/ अळीनाशक /डासनाशक /किटकनाशके औषधे त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा नुसार खरेदीकरीता रू. 1,06,91,500/- खर्च अपपेक्षित आहे. सदरचा खर्च हा सन 2018-19 या अर्थिक अंदाजपत्रकात जंतुनाशक औषधे खरेदीसाठी भाग-1सी-1(3) जंतुनाशक खरेदी या लेखा शिर्षकात रूपये 1,20,00000/- तरतूद करण्यात आली आहे. पैकी पुर्ण तरतूद शिल्लक आहे. त्यातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी सदरच्या खर्चास व तसेच उक्त औषधांसाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली, मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पेरेशन व मे. मित्र हर्बल प्रा.ली. यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (क) अन्वये मान्यतेसाठी सविनय सादर.*

**स्थायी समिती ठराव क्र.** **३१** **दिनांकः- ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :- श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार जंतूनाशक/किटकनाशक/अळीनाशक/डासनाशक/ शौचालयासाठी औषधे पुरवठा करुन घेण्यासाठी प्राप्त बाब निहाय न्युनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली, मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पेरेशन व मे. मित्र हर्बल प्रा.ली. यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

➡ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर शहरातील वाहतुक नियमासाठी घेण्यात आलेल्या एकुण ४५ ट्राफिक वार्डन यांना अर्थसहाय्य मंजुरी मिळणे बाबत.

---

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— सभापती मॅडम मी एक विनंती करू इच्छित आहे की, ट्रॉफीकचे गेंडे साहेब इथे बसले आहेत. त्यांना बोलवा.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी**:— यामध्ये असे आहे आपण ४०० रूपये ठेवले आहेत, प्रत्येक वेळी ४०० रूप्ये देत आहोत, या ४०० रूपयामध्ये काय होणार. ४०० रूपयावरून ६०० रूप्ये करायला पाहिजेत, कारण की हे ट्रॉफीक वार्डन... ४हजारावरून ६हजार करायला पाहिजे. २ हजार वाढवायला पाहिजेत.

**सदस्य, श्री राजेश वदारीया**:— इश्यु काय आहे की,ट्रॉफीक ची परिस्थिती उदल्हासनगरमध्ये फार खराब आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी**:— त्याचे कारण काय आहे?

**सदस्य, श्री राजेश वदारीया**:—तेच त्याचे कारण काय आहे यावर चर्चा करा. खड्डे असतील किंवा अजून दुसरे काही अडचणी असतील, दोन दिवस पहिले शिवाजी चौकापासून फॉलोवर लाईन जाईपर्यंत मला ३० मिनीटांचा कालावधी लागला. जेव्हा मी ट्वीटवरती ठाणे कमीशनर यांना लिहिले की ही परिस्थिती आहे ती त्यानंतर तिथे अधिकारी आणि त्यांचे कर्मचारी आले आणि त्यांनी ट्रॅफीक कमी केली. आजच्या घडीला प्रत्येक व्यक्तीला घई आहे की पहिजे मी जातो यासाठी मेन मेन जे चौक आहेत त्याठिकाणी आपले कर्मचारी आणि अटेडंन्ट असले पाहिजेत. याची अत्यंत आवश्यकता आहे. ४५ वार्डन देवून सुध्दा जर ट्रॅफीक मध्ये जर सुधारणा होत नसेल तर हे देण्याची आवश्यकता काय?

**सदस्य, श्री भगवान भालेराव**:— त्याच्यामध्ये दुसरी गोष्ट अशी आहे, आम्ही आता आम्ही तुम्हाला ४५जे वार्डन देतोय त्याच्यामध्ये नॅशनल हायवेला २२२ ला तुम्ही किती माणसे लावता. आणि बाकी आमच्या शहरात किती लागतात. त्याची पण आपण दिली तर बरी होईल.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी**:— साहेब हाच विषय नेहमी असतो. देण्यासाठी आम्हाला काही नाही आणि हे आमच्या शहरासाठी देत आहेत, परंतु त्या कोणत्या ठिकाणी जागेवर ठेवणार याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे.

**सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी**:— मा. आयुक्त जी हो विषय जो घेण्यात आला आहे, आज इथे या विषया वर आम्ही याआगोदर भरपूर दिवसापासून मुदत वाढीसाठी आला होता त्यावर आम्ही चर्चा केली, तत्कालीन आयुक्त निबांळकरजी यांनी ३ हजार रूपयामध्ये काय होते, आम्ही असा प्रस्ताव बनविला पाहिजे की ७ हजार, ८ हजार महिना देण्यात यावा व चांगल्याप्रकारे शहरातील ट्रॅफीक ची समस्या आहे त्याचे समाधान करायला पाहिजे. आता यांनी ३ हजारा ऐवजी ४ करून पाठविलेले आहे. तर ही काही जास्त रक्कम नाही आहे. आम्ही असे निवेदन केले पाहिजे की ते आणि आम्ही बैठक घेवून, ही तर मुदत वाढ करावी असे सुत्र तयार करा की जो ही ट्रॅफीक ची समस्या आहे याचे समाधान झाले पाहिजे आज बिर्ला गेट रोड आहे, कमीतकमी आपले ८ ते १० वार्डन त्याठिकाणी असतात. तर हे ट्रॅफीक वार्डन पास करून सर्वांची एक बैठक घेवून एक नवीन प्लान बनविले पाहिजे की खर्च होईल परंतु या शहराची समस्या कशी दूर करता येईल. या विषयावर आता चालीया आहे, गणपती उत्सव जास्त चर्चा न करता हे विषय पास करत आहेत.

**सदस्य,श्री धंनजय बोडारे**:— घेटे साहेब, त्यांना बोलायचे असेल, आम्ही पास पास करतो. पहिली गोष्ट जे ट्रॅफीक वार्डन आम्ही देत आहेत, मी ब—याच ठिकाणी बघतो की, आपल्या ट्रॉफीक वाल्यांचा लक्ष असते जो कोणी चूकतो यांच्याकडे लक्ष असते आणि आम्ही त्यांची पावती कधी फाडतो. म्हणजे पवईला ट्रॅफीक असते आणि पेन्सील फॉक्टरीच्या चौकात ट्रॅफीक

वाले उभे असतात. म्हणजे लहान मुले काय चूकतात कोण चूकण्यावर लक्ष असते. पण ट्रॅफीक कंट्रोलवर लक्ष नसते. आम्ही जे देतो ते ट्रॅफीक कंट्रोल करण्यासाठी त्याच्यावर लक्ष देण्यासाठी जेणेकरून शहरातील नागरीकांना त्रास होवू नये म्हणून. तुमच्या विभागाच्या वसुलीसाठी ट्रॅफीक वार्डन नाही आहेत. ही पहिली गोष्ट लक्षात ठेवा. अनधिकृत पार्कींग किंवा ट्रॅफीक व्यावस्थित चालावा यासाठी आमच्याकडे सिग्नल सिस्टम नाही आहे. ट्रॅफीक विभागाकडून सिग्नल सिस्टम याठिकाणी असावी असे प्रकारचे प्रस्ताव यायला पाहिजेत पण प्रत्येक वेळी फक्त ट्रॅफीक वार्डन दया एवढेच प्रस्ताव तुमच्याकडून येतात. वास्तविक पहता शहरातील ट्रॅफीक यंत्रणा सुधारण्यासाठी काय काय उपाय योजना महापालिकेने केल्या पाहिजेत, पोलीस विभागाने अशी एक समन्वय बैठक झाली पाहिजे त्याच्यातू एक सादक बाधक चर्चा करून एक पर्याय तुम्ही काही तरी सुचना केल्या पाहिजेत. सूचना येत नाही फक्त ट्रॅफीक वार्डन. आणि ट्रॅफीक वार्डन कुठे उभे असतात. १७ सेक्शनला ट्रॅफीक जाम असते, आणि आपल्य ट्रॅफीक वार्डन चे लक्ष असते नो इंनट्री मधून कोण येते. मी हे वांरवार हे विचारतो. की नो इंनट्रीमध्ये लोकांनी घूसू नये म्हणून त्यासाठी तिकडे उभा नसतो, पण नो इंनट्री मधून घुसला नाही तर आम्हाला पावती मिळणार नाही. अशा प्रकारची मानसिकता आहे. लोकांनी चूकू नये यासाठी प्रयत्न केले पाहिजे. पण शक्यतो आम्ही हा मार्ग शोधला पाहिजे की लोकांनी चूकता कामा नये. तर मी ब—याच दा बघितले की आमचे ट्रॅफीक पॉईंट कोणते आहेत, नेहरू चौक, १७ सेक्शन ते शिवाजी चौक फालोवर लाईन, उल्हासनगर—५ मध्ये दूधनाका आणि बिर्ला गेट नॅशनल हायवे, आणि त्या शहाड येथे,फाटक या ५ ठिकाणी जरी ट्रॅफीक वार्डन लावले तरी ट्रॉफीक व्यवस्था सुरळीत होईल. पण लोक तिथे नसतात. ट्रॅफीक वार्डन हे ट्रॉफीक सुधारण्यासाठी असतात लोकांना होणार नाही यासाठी असतात. पावत्या फाडण्यासाठी नाही याची कृपया दखल घ्या. आणि ट्रॅफीक व्यवस्था इथून पुढे चांगली होणार याची खात्री तुम्ही कशी देणार, तुमच्याकडे पर्याय काय आहे. महापालिकेने काय काय केले पाहिजे म्हणजे सुचना दया.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** आणि एक दुसरा विषय आहे.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी**:— ट्रॅफीक व्यवस्था सुधारण्यासाठी काय काय यंत्रणा माहापालिकेच्या माध्यमातून केल्या पाहिजेत याचाही उल्लेख झाला तर बरे होईल. आयुक्त साहेब आहे, स्थायी समितीचे सभापती आहेत, जे काही तुम्हाला साहित्य देता येईल, ते देण्याचा प्रयत्न करतील. जॅमरचा विषय असेल, नो पार्कींग चे वोर्ड असतील, वन वे असेल, वन वे आपल्या शहरामध्ये एकही रस्ता नाही. त्यासाठी तुम्हाला ते लावण्यासाठी टयुईंग व्हॅन नाही. त्याच्यासाठी पण तुम्ही चर्चा करा.

**आयुक्त श्री. गणेश पाटील:—** आपल्याकडे ट्रॅफीक मॅनेजमेंट मध्ये, हया ज्या दोन तीन गोष्टी आहेत ना त्या माला बोलायच्या होत्या एकतर टोईंग व्हॅन तुम्हाला ज्यादा पाहिजेत असतील त्याचे इम्पीलीमेंट, कारण इतके लोक कशाही प्रकारे पार्कींग करून गेलेले असतात, मला वाटते तुमच्याकडे एक गाडी आहे.

**पोलिस निरिक्षक, श्री. घेटे** :— दोन गाडया आहेत, सर.

**आयुक्त श्री. गणेश पाटील**:— दोन गाडया आहेत, आजून तीन चार गाडया तूम्हाला देऊ. प्रभाग समितीवाईज आपण ठेवू. मॅन पॉवर ठेवू. आणि दुसरी गोष्ट काय आहे माहित आहे का? की आपल्याला काही रस्ते जे आहे ना काही रस्ते आपल्याला वाहन मुक्त करायचे आहेत., की ज्याच्यावरती लोक फक्त चालतील, बाजार करतील, रस्त्याने फिरतील असे काही तरी आपल्याला पाहिजे. सगळया गल्लीबोळ्ातून वाहने चालू , लोकांना चालायला रस्ता शिल्लक राहिलेला नाही. त्यामुळे दुकानदारही काय करतात स्वत:च्या गाडयाही आणून लावतात. हे सगळे चूकीचे आहे ते, हे आपल्याला बंद करायला लागेल तर त्यासाठी आपल्याला काय करता येईल हे जरा तुम्ही आम्हाला सांगा.

**पोलिस निरिक्षक, श्री. घेटे** :— सन्मानीय अध्यक्ष, आयुक्त सर, आणि सगळे सभासद यांना माझा जय हिंद, इथे विषय मी घेवून आलो होतो शहराच्या वाहतूक समस्याबाबत त्याच्या आधी मी एक सांगतो, मा. आयुक्त साहेबांनी मागच्या १५ दिवसापूर्वी शहराच्या वाहतूक समस्येबाबत एक मिटींग लावली होती. काही कारणास्तव ती मीटींग रद्द झाली. त्याची डेट पूढे दिली गेली नाही आहे. हे जे विषय होते, हे सगळेचे सगळे विषय आयुक्त साहेबांनी

मला वाटत अजेंडा तयार केला असेल. आयुक्त साहेबांनी आता जे सांगितले की आपल्याकडे नो पार्कींग झोन पाहिजे,किंवा वाहने विरहीत रस्ता पाहिजे, माझे त्याला उत्तर असे आहे, की सर आपल्या शहराची लोकसंख्या जवळपास ७.५० लाख आहे. जी नगरपालिकेच्या आपण पत्रव्यावहार करतो त्याच्यावरून मला प्राप्त झाली. आणि आपल्याकडे तीन रल्वे स्टेशन आहेत. दोन महामार्ग आहेत. सर, इतकी मोठी लोकसंख्या आणि जवळपास ४ लाख आपल्याकडे शहरामध्ये वाहने आहेत. परंतु एकही आपल्याकडे गव्हर्नमेंटची पार्कींग नाही आहे. खाजगी पार्कींग नाही आहे. किंवा कोणत्याच प्रकारची पार्कींग व्यावस्था झोन आपल्याकडे नाही. व्यापारी ज्या आपल्या बाजारपेठा आहे, त्या सर्वांमध्ये पार्कींग व्यावस्था पाहिजे परंतु व्यापा—यांची गाडी लावायची कुठे? यासाठी जागा नाही. सोसायटी मध्ये आपल्याकडे कुठेही पार्कीगची व्यावस्था नाही. त्यामुळे हया सर्वच्या सर्व गाडया असतात, वाहने असतात हे रस्त्यावर येतात. रस्त्यावर आल्याच्या नंतर त्याला जरी आपण पी१, पी२ केलेले असते तर तरीही त्यापध्दतीने लागत नाही. जर शहराची लोकसंख्या आणि वाहनांची संख्या आणि रस्त्याचे जर आपण प्रमाण पाहिले तर ती जागा आपल्याला कमी पडते अपूरी पडते. आपल्याकडे त्यासाठी दोन टोईंग व्हॅन आहे, ज्या नेहमी शहरातल्या वाहतूतक सुरळीत करण्यासाठी निर्यमित करण्यासाठी आपल्याला उपयोगात पडतात. परंतु ती कारवाई करतांना मला इतका त्रास होतो का जसे काही की मर्डरचा आरोपी पकडायला जावो ना त्याच्यापेक्षा जास्त त्रास होतो. एक गाडी आणली तर त्याच्यासाठी मला दहा फोन येतात. आणि टोईंग वाले म्हणजे काहीतरी आता त्यांनी बॉम्ब हल्ला आपल्या शहरावर केलेला आहे, अशा प्रकारचे मला सामोरे जावे लागते. तर सर, हे पण आपली थेडी जे काही सदस्य असतील आपण ॲवरनेस करायला पाहिजे. ते आपल्याकडून अजून होत नाही.राहिला हा जो मेन हायवे आहे वदारीया साहेबांनी जे सांगितले तर मी त्यांना त्या दिवशी दहा दिवसात मी त्यांचा ट्रॅफीक क्लीअर केला होता त्यांना मी ट्वीटरवर उत्तर पण दिले होते. माझे फोटो ही पाठवले होते. ते ट्रॅफीक काढत होते, फालवर लाईनला कनजक्शन झाले होते. ओव्हरटेंकींग झाले होते, रॉग साईडने लोक आले होते त्यामुळे पार्कींग झाले होते.मी आपल्याला त्याच वेळेस रिप्लाय पण दिला होता. अजून बोडारे साहेबांनी जे सांगितले त्याच्या प्रश्नाला असे उत्तर आहे कीट्रॅफीक वार्डन हे कर्मचा—याच्या सोबत असतात.आणि ते वसुलीचे काम करतच नाहीत. जे कुठे चूकला त्याठिकाणी आपण त्याच्याकडून फाईन भरला जातो. आणि सगळा फाईन आपण सरकार जमा करतो तो आणि सगळी सुरळीत व्यवस्था करण्यासाठी सगळे करतो.  या व्यातिरिक्त व्यक्तीगत इटेंशन कोणाचेच नाही आहे. सर्वात महत्वाचा भाग याच्यात असा आहे, की आम्ही शहरासाठी काम करतो आहोत, शहरात वाहतूक सुरळी होण्यासाठी काम करता. सर्व सदस्याच्या वतीने काम करतो आणि जनतेसाठी काम करतो. तुमचे सहकार्य आम्हाला पाहिजे एवढीच विनंती आहे.

**सदस्य, श्री. धंनजय बोडारेः—** साहेब प्रत्येक रोडवर राजेश वदारीया, किवा धंनजय बोडारे किंवा जमनु पुरस्वानीजी, सर्व सामान्य लोकांचा विचार, तुम्ही आता ते म्हणून तुम्हाला फोन केला सर्व सामान्य प्रत्येक नागरीक तुम्हाला म्हणून “प्रीव्हेन्सी इज बेटर दॅन केअर” ट्रॅफीक झाल्यानंतर क्लीअर करण्याएवजी ट्रॅफीक होवू नये म्हणून वार्डन चा वापर करा.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरीः—** साहेब तुम्ही सांगितले की, या शहरामध्ये मार्केटस बाजारपेठा आहेत,

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** एक स्टेशन आपण विसरला आहात. दोन तीन वेळा आलेले आहेत परंतु मला आजपर्यंत समाधान झालेले नाही.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी**ः— बाजारपेठा आहेत, बाजारपेठा मध्ये पार्कीग नाही. पार्कींग नाही हा तुमचा मुद्दा बरोबर आहे. या शहरामध्ये गॅरेजवाले जे जून्या गाडया, ट्रान्सपोर्ट वाले गाडया लावत आहेत त्यांच्यावर कारवाई करायला आपल्याला काय हरकत आहे.

**पोलिस निरिक्षक, श्री. घेटे** :— सर मी आतापर्यत मी...

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी**ः— त्यांचा तर पार्कींग चा विषय नाही. रस्त्यावर गाडया उभ्या करून कुठेही त्यांचा धंदा करावा. हे चूकीचे आहे.

**<u>पोलिस निरिक्षक, श्री. घेटे</u>**:— सर मी, दोन महिने मला इथे येवून जवळपास १२५ गॅरेजवर मी आतापर्यंत कारवाई केली आहे.

**<u>सदस्य, श्री राजेंद्र चौधरी</u>**:— समस्या सुटलेली नाही आहे , साहेब. समस्या सुटण्यासाठी आपल्याला काय करावे लागेल.

**<u>पोलिस निरिक्षक, श्री. घेटे</u>**:— हे जे मागितलेले आहेत ना ते १ ते ५साठी आहेत.

**<u>सदस्य, श्री. भगवान भलेराव:—</u>** नाही, नाही, साहेब दुसरी गोष्ट अशी आहे, उल्हासनगर महानगरपालिकेच्या बाहेर ५० मीटर अंतरावर मोटरसायकल लावलेली आहे. अमन टॉकीज कडे जायला रस्ता नसतो.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानी:—</u>**मा. आयुक्त साहेब आम्ही तीन चार वर्षपूर्वी एक ठराव केला होता तो आता शोधावा लागेल की ज्या गाडया रिपेअर केल्या जातात, ज्याचे गॅरेज आहेत किंवा कार शृंगार आहेत, त्यांनी आपल्या गॅरेजच्या आतमध्ये गाडया रिपेअर केल्या पाहिजेत. गाडया बाहेर लावल्या जातात. एखादी गाडी लागली तर ठिक आहे. २० ते ४० गाडया बाहेर उभ्या करून ठेवलेल्या असतात त्यामुळे सुध्दा ट्राफीक जास्त प्रमाणत वाढते.

**<u>सदस्य, श्री. भगवान भलेराव:—</u>** मला वाटते गेडे साहेब गणपती १३ तारखेनंतर लवकर येतात. तर मला वाटते एक १० तारखेच्या आसपास एक बैठक गटनेता आणि सभागृह नेता आपण ठेवावी. गेंडे साहेबांच्या बरोबर आणि त्यांना आपल्याला जिथे ट्राफीक ची समस्या जास्त आहे, ते आपण सांगू शकतो.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया</u>**:— हे असे आहे की, नेहरू चौक हा उल्हासनगर शहराचा महत्वाचा भाग आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भलेराव:—</u>** साहेब १० तारखेपर्यंत एखादी मिटींग ठेवली आणि जे जे ठिकाणे आहेत ते आम्ही सांगू, आणि त्यांचा काही अनुभव असेल अशा रीतीने एक गणपतीच्या अगोदर मिटींग ठेवा.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील:—</u>** गणपतीच्या अगोदर आपण एक मिटींग ठेवू त्याच्यामध्ये आपण फक्त गटनेत्याला बोलवू बरोबर, पण त्याच्यामध्ये मला एक असे पाहिजे की त्या मिटींग मध्ये की कुठले रस्ते वन वे करायला पाहिजे सरक्युलर ट्रॅफीक कशी फिरली पाहिजे. सरक्युलर ट्रॅफीक म्हणजे इकडून आला इकडे गेला. आणि लागला रस्त्याला अशा स्वरूपाचे सूचना पाहिजेत.

**<u>श्री. यशवंत संगळे, प्र. वाहन व्यवस्थापक:—</u>**सर त्यांना ५ ते ६ हजार रेट हवा.

**<u>सदस्य, श्री. भगवान भलेराव:—</u>** महानगरपालिकेकडून काय पाहिजे ते पण तूम्ही मागा.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील</u>**:— लांबून जरा फिरून येता आले तरी चालेल, तुम्ही काय करा माहित आहे का तुम्हाला हे जे प्लान करायचे आहेत ना आपण गणपती पूर्वी एक मिटींग लावू त्या मिटींग मध्ये तुम्ही हे सगळे घेवून या. म्हणजे त्या दिवशी आपण फायनल चर्चा करून त्याला अंतिम स्वरूप देवून टाकू. आणि काही रस्ते जे आहेत ना ते आपण नो व्हेइकल झोन करू, तिथे गाडी बिल्कुल लावू दयायची नाही. कारण गल्ल्या भरपूर आहेत एक गली पॅक केली तर पॅरलल गल्लीतून गाडया जावू शकतील.ही गल्ली आपण मार्केट मध्ये फिरणा—या लोकांना खरेदी करणा—या लोकांना चालायला राहू दयावी. असे काही तरी केले पाहिजे. त्याचा प्रस्ताव जो आहे तो ट्रॅफीक विभाग यांनी एकत्र करून तयार करा.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** पास इतिवृत्ताची वाट न पाहता. बोला.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** हा जो विषय आला आहे. प्रशासनाकडून ४ हजार रूप्ये लिहून पाठविलेले आहे.त्यामुळे आम्ही त्याला ५ हजार किंवा ६ हजार करू शकत नाही. नियम नाही आहे. प्रशासन जर आपण ज्यादा मागणी केली असती तर आम्ही केली असती परंतु आता हा विषय आला आहे. जर आज पास केला तर तोच रेट असेल.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया</u>**:—प्रशासनाचाच प्रस्ताव ४ हजाराचचा आहे तर आम्ही आपल्या मर्जीनूसार कसे देणार.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** जो प्रशासनाचा प्रस्ताव असेल त्याला मान्यता देवू.

**<u>सदस्य, श्री राजेंद्र चौधरी</u>**:— प्रशासनाचे जेवढे प्रस्ताव आले त्याला मान्यता नाही दिली का?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** कमी करू शकतो वाढवू शकत नाही.

**<u>सदस्य, श्री. भगवान भलेराव:—</u>** वाढवू शकतो ना.

**<u>श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक:—</u>**वाढवु शकतो.

**<u>सदस्य, श्री. धंनजय बोडारे:—</u>** ४ हजारामध्ये काय शक्य होणार नाही. तुम्ही आणला प्रस्ताव तुम्ही सांगता ४ हजारामध्ये त्यांचे म्हणणे बरोबर आहे. पुढच्या मिटींगमध्ये घ्या.

**<u>सदस्य, श्री भगवान भलेराव:—</u>** डिफर करायचा का?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** डिफर केला हाच विषय परत पुढच्या वेळेला येणार. फेर सादर करून परत आणा.

**<u>सदस्य, श्री. धंनजय बोडारे</u>**:— एक मिनीट मुदत वाढ दिली, पण त्याच्या वाढीव मानधानासाठी एक नविन प्रस्ताव पुढच्या हयाच्यामध्ये.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मुदतवाढीसाठी मान्यता इतिवृत्ताची वाट न पाहता बाकीचा आपण प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया</u>**:— यामध्ये ट्राफीकवाल्याकडून जी पण मागणी येत असेल, ज्यामध्ये टोइंग व्हॅन आहे, जॅमर आहे, किंवा अजून काही इश्युज असतील, झेब्रा क्रासींग हे सर्व एकत्र घेवून यावे.

**<u>सदस्य, श्री भगवान भलेराव:—</u>**दुसरे आता काय आहे

**<u>सदस्य,श्री. राजेंद्र चौधरी</u>**:—सानावणे साहेब आलेत त्यांचा विषय घेवून टाका.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** पहिले आयत्या वेळेचा विषय घेवू.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर शहरातील वाहतुक नियमासाठी घेण्यात आलेल्या एकुण ४५ ट्राफिक वार्डन यांना अर्थसहाय्य मंजुरी मिळणे बाबत.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत उल्हासनगर शहरातील वाहतुक कोंडीच्या समस्या दुर होणेसाठी शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व विठ्ठलवाडी यांना शहरातील वाहतुक समस्यांचे निराकरण करणेसाठी आंत्ता पर्यंत खालील प्रमाणे मंजुरी प्राप्त होवुन अर्थसहाय्यस मंजुरी दिली आहे.
१) मा. स्थायी समिती ठराव क्र. ०१, दिनांक १३/०९/२०१२ अन्वये २० ट्राफिक वार्डन यांना अटी व शर्तीच्या आधारे मानधन तत्वावर अर्थसहाय्यस मंजुरी दिलेली होती.

२) सदर वार्डन यांचा एक वर्षाचा कालावधी संपुष्ठात आला असता मा. स्थायी समिती ठराव क्र. ५६, दिनांक १७/१२/२०१३ अन्वये वार्डन यांची सेवा सन २०१३—१४ साठी चालू ठेवून आणखी ५ ट्राफिक वार्डन म्हणजे एकुण २५ वार्डन नेमणेस व त्यांचे मानधन रू.२००० च्या ऐवजी रू.४०००

अशी वाढ करण्यास मान्यता दिलेली होती.

३) सन २०१४—१५ मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. ७१, दिनांक ०२/०१/२०१५ अन्वये २५ ट्राफिक वार्डन यांना मुदतवाढ दिली.

४) सन २०१५—१६ मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र.१००,दिनांक १४/०३/२०१६ अन्वये २५ ट्राफिक वार्डन यांना मुदतवाढ दिली.

५) सन २०१६—१७ मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. ८१,दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये २५ ट्राफिक वार्डन यांना अर्थसहाय्य मंजुरी दिलेली आहे.

६) मा. स्थायी समिती ठराव क्र.२७ दिनांक ८/९/२०१७ अन्वये २५ ट्राफिक वॉर्डन यांच्या अर्थसहाय्यास मंजुरी देण्यात आली आहे.

७) मा. स्थायी समिती क्र. ५७ दिनांक १६/११/२०१७ अन्वये २० ट्रॅफिक वॉर्डन यांच्या अर्थसहाय्यास मंजुरी देण्यात आली आहे.

८) वाहतूक शाखेस ट्राफिक वार्डन कमी पडत असल्यामुळे त्यांनी २५ अधिक अतिरिक्त २० ट्राफिक वार्डन यांना मानधन मिळणेबाबत विनंती केल्यानुसार मा. स्थायी समिती ठराव क्र. ८२, दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये अतिरिक्त २० ट्राफिक वार्डन यांना उदारनिर्वाहसाठी प्रति वार्डन रू. ४,०००/— एवढे मानधन देण्यास मान्यता दिलेली आहे.

१. उपरोक्त नमुद मुदा क्र. ६ व ७ प्रमाणे एकुण ४५ ट्राफिक वार्डन यांचा कालावधी संपल्यानंतर पुढील एक वर्षाकरीता खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन त्यांच्या अर्थसहाय्यास मंजुरी देण्याचे प्रस्तावित आहे.

१) संबंधीत अतिरिक्त ४५ ट्राफिक वॉर्डन यांची नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहील.

२) संबंधीत अतिरिक्त ४५ ट्राफिक वॉर्डन यांना प्रतिमाह रु. ४०००/— एवढे मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक उपशाखा, उल्हासनगर विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.

३) ट्राफिक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.

४) ट्राफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ट्राफिक पोलिस विभागाची राहिल.

५) याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याची जबाबदारी वाहतुक पोलिस विभागाची राहिल.

६) संबंधीत सर्व ट्राफिक वार्डन यांच्या उपस्थितीबाबत व कर्तव्याबाबत पोलीस विभागाचे नियंत्रण राहील.

२. उक्त एकुण ४५ ट्राफिक वॉर्डन यांचे मानधनापोटी वार्षिक रक्कम रु. २१,६०,०००/— एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च वर्ष २०१८—१९ चे अंदाजपत्रकात A-I (24) Part- I (Traffic Sing) या लेखाशिर्षात रू. ३.७५ कोटी एवढी तरतूद उपलब्ध आहे.

यास्तव मा. स्थायी समिती ठराव क्र. २७ दि. ८/९/२०१८ अन्वये व ठराव क्र. ५७ दिनांक १६/११/२०१८ व अन्वये नियुक्तीचा एक वर्षाचा कार्यकाल दिनांक ०७ ऑक्टोंबर २०१८ व १५ नोव्हेंबर २०१८ मध्ये संपुष्ठात येत असल्याने वाहतुक नियमनासाठी एकुण ४५ ट्राफिक वार्डन यांना पुढील एक वर्षाकरीता अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३२ **दिनांकः— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील वाहतुक नियमासाठी घेण्यात आलेल्या एकुण ४५ ट्राफिक वार्डन यांना एक वर्षाकरीता अर्थसहाय्य देण्यास मंजुरी देत आहे

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **आयत्यावेळचा विषय**

**विषय क्र. ९ :–** प्रभाग क्षेत्र क्र. १ व २ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता मिळणे.

---

**सदस्य, श्री. भगवान भलेराव**:– ठिक आहे, याठिकाणी ५(२)(२) मध्ये प्रस्ताव आणलेला आहे. दुसरी गोष्ट अशी आहे साहेब हयाच्यामध्ये आम्ही रस्ते मागितले, रस्ते मिळालेले नाही. यादी दिलेली नाही.त्यामुळे मला वाटत हा विषय ५(२)(२) नाही ती यादीच नाही.

**शहर अभियंता श्री. महेश शितलानी:–** सर, आता जसे १३ तारखेपासून गणेश...

**सदस्य, श्री. भगवान भलेराव**:– आम्ही हे मान्य करत आहोत पण आपण सांगा की हया रस्त्यावरती खडडा भरायचा आहे की नाही ते आम्हाला सांगा.

**शहर अभियंता श्री. महेश शितलानी:–**६१ रोड आम्ही भरले होते, जे डिफेक्ट लायबीलीटी पिरीयडमध्ये भरण्यात आले होते.

**सदस्य, श्री. भगवान भलेराव**:– हो, ते सोडून.

**शहर अभियंता श्री. महेश शितलानी**:– ते रोड सोडून आम्ही जनरल एस्टीमेट बनविण्यात आले आहे. जसे की कोणाला याची तकलीफ होवू नये. आणि रोज पाउस पडतो आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** माझी एक सूचना आहे, भगवान भलेराव जी यांनी जो विषय ठेवला आहे की आम्ही १२ तं १३ करोड चे पाटोल भरले आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भलेराव**:– १४ करोड.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** १४ करोडचे त्यांचा लायबीलीटी वेळ ही डिसेंबर मध्ये संपत आहे तर आपण याला मान्यता देत आहात का? की यांचा लायबीलीटी वेळ ही डिसेंबर मध्ये संपत आहे.

**शहर अभियंता श्री. महेश शितलानी**:– नाही, ते प्रत्येक रस्त्याचे वेगवेगळे आहे.
**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** कधी पर्यत.

**<u>शहर अभियंता श्री. महेश शितलानी</u>**:—जसे की पहिले ५ करोड ६१ लाखाचे काम ाची वर्क ऑर्डर आम्ही दि. १३/११/२०१७ मध्ये दिले होते. आणि रिवाईज एस्टीमेंट आम्ही दि. २५ /०१ /२०१७ मध्ये आणले होते. त्यामुळे ५ करोड ६१ लाखाचे काम हे जानेवारी २०१७ मध्येच संपले होते.

**<u>सदस्य, श्री. राजेश वदारीया</u>**:— आपण काम कधी पूर्ण केले. कम्प्लीशन नंतर डिफेक्ट लायबीलीटी चालू होत असते ६ महिन्यांकरीता.

**<u>शहर अभियंता श्री. महेश शितलानी</u>**:— साहेब, आपले बरोबरच आहे, कारण की तिस—या पार्टीच्या ऑडीट चे काम चालू आहे. आम्ही त्यांचे फायनल बील बनवू शकत नाही.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील</u>** :— बील वेगळे गोष्ट आहे. कम्प्लीशन कधी झाले?

**<u>सदस्य, श्री. भगवान भलेराव</u>**:— फायनल बील नाही तर बील कम्प्लीशन करू शकत नाही.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील:—</u>**कम्प्लीशन वेगळे आहे बील नंतर बनते. हा जो प्रस्ताव आहे तो ६१ रोड मागच्या वेळेला केलेले आहेत, ६१ रोड वगळून बाकीचे शहरातील सगळेच रस्ते याच्यात आले.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**जर ६१ रोडमध्ये सुध्दा काही ठिकाणी करायचे असेल तर आम्ही मान्यता देत आहे पण त्यांचे बिलातून पैसे कापण्यात यावे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भलेराव</u>**:— तुम्ही जर गणपती उत्सवासाठी करत असाल तर हे ६१ रोड वरती खडडे पडलेले आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:— आता आम्ही ६१ रोड वरती काम करू शकत नाही.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील</u>**:— शितलानी आपण चांगल्या प्रकारे समजून सांगत नाही आहेत. बघा दो गोष्टी आहेत एक तर ६१ रोड आहेत, ६१ रोडमध्ये पॅच वर्क मध्ये काम झालेले आहे. पूर्ण रोडवरती काम झालेले नाही. आता समजा या पॅचमध्ये काम केलेले आहे आणि त्याच्यात खडडे आले तर डिफेक्ट लायबीलीटी मध्ये येणार. जर हे खडडे पॅचच्या बाहेर असतील तर डिफेक्ट लायबीलीटी मध्ये येणार नाही. ते आपल्याला याच्यात करता येणार आहेत. बरोबर आहे.

**<u>शहर अभियंता श्री. महेश शितलानी</u>**:— हो, सर.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील</u>**:— सेंकडली ६१ रोड सोडून म्हणजे ज्या ठिकाणी पॅच वर्क केलेले आहे. ते सोडून बाकी ज्या ठिकाणी खडडे आहेत ते आपल्याला गणपती उत्सवा पूर्वी भरायचे आहेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी</u>**:— मा. आयुक्त साहेब मी पहिली गोष्ट तर याठिकाणी सांगू इच्छितो की इंजिनिअर इथे बसलेले आहेत. आज हा रोड आहे. या रोड चे एस्टीमेट बनविले होते, रू. १४ करोडचे तर आम्ही लिहिले न्वहते की सिरू चौक ते काशामल हलवाईपासून १० फूट बाहेर खडडा आहे. ५ फुट बाहेर खडडा आहे. आम्ही सांगू का जेवढे खडडे पडलेले आहेत ते आता पडले आहेत. ते भरलेले नाही आहेत. तर काय होणार.यामध्ये असे व्हायला पाहिजे. सिरू चौक ते नहरू चौकापर्यत जर पाटोलचे काम झालेले आहे त्या रोडवरती खडडा पडलेला आहे तर त्या परत लायबीलीटीमध्ये करायला पाहिजे. माप मोजणी कसे कराल.

**<u>आयुक्त श्री. गणेश पाटील</u>**:— हे एएमसी जसे होईल. भरणा वेगळा आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u>**:— आयुक्त साहेब, एक गोष्ट सांगा ५० लाख रूपयाचे जर खडडे भरले आणि डिसेंबर र्प्यंत आपली मुदत आहे. शहरातले रस्ते सर्व रस्ते चांगले होवू शकतातत का? आम्हाला एवढे सांगा.

**आयुक्त श्री. गणेश पाटील**:— नाही, नाही आता हे खडडे जे आपण भरणार आहोत. आणि पाऊस पडला तर परत खडडे पडतील. हयाचे कारण हे तात्पुरते आहे. गणपती उत्सवासाठी याच्यात आपण काय काय करतो सांगा.

**शहर अभियंता श्री. महेश शितलानी**:— साहेब, या गणपती उत्सवामध्ये खडडयाचे खोली ४ ते ५ इंचाचे जास्त असेल तर खडीने तो खडडा भरून वरून २ इंचाचे बीएम टाकले जाईल.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**एक मिनीट त्यांना काय बोलायचे आहे ते.

**शहर अभियंता श्री. महेश शितलानी**:— आता आम्ही शहाड वरून येतो तीन दिवस पहिले केडीएमसी ने खडडे भरले. दोन दिवस सुध्दा पाउस झाला नाही ५० टक्के पेक्षा जास्त खडडे उकरले आहेत. साहेब पावसामध्ये हे खडडे परत परत पडतात. आम्ही हे गणपती उत्सवासाठी तात्पूरते बनवत आहोत.

**सदस्य,श्री धनंजय बोडारे:—** साहेब एक मला शंका आहे, पाउस फक्त आमच्याकडेच पडतो मुंबई रिजनमध्येच पडतो, मी केरळ मध्ये होतो एवढा पाउस झालेला आहे जास्त अगदी १०० वर्षामध्ये कधी न आलेला असा पूर. पण तिथले रस्ते जसे आहेत तसेच आहेत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**कसले आहेत.

**सदस्य,श्री धनंजय बोडारे:—**डांबरचे रस्ते आहेत तसेच आहेत फक्त इथेच का होतात खराब?

**शहर अभियंता श्री. महेश शितलानी**:— त्याचे कारण आहे.

**सदस्य,श्री धनंजय बोडारे:—** उल्हासनगरचा एक ठेकेदार शेगावला आहे शेगावला सुध्दा भपूर पाउस पडलेला आहे. कधी पाऊस नव्हता तेवढा शेगाव , नगापूर भागात झालेला आहे. गेल्या ६ वर्षापासून जो रोड आहे तासाच्या तसा आहे. आणि तोही डांबराचा रोड आहे. कॉन्ट्रॅक्टर उल्हासनगरचा, याचे कारण काय? एक गोष्ट त्याच्यानंतर, आयुक्त साहेब, १४ कोटी, रू. ५ कोटीचे सुरूवातीचे ऐस्टीमेट, ५ कोटीचे नंतर मुदतवाढ देवून नंतर १४ कोटीचे झाले. तेव्हा कारणे सांगितली की नगरसेवक किंवा लोक ऐकत नाही म्हणून आम्ही पूर्णच्या पूर्ण रोडच घेतले. बरोबर ना.

**शहर अभियंता श्री. महेश शितलानी**:— पूर्ण नाही साहेब.

**सदस्य,श्री धनंजय बोडारे:—** पाटोल सोडून. बघा,

**शहर अभियंता श्री. महेश शितलानी**:—पॅच्युलघेतले आहेत.

**सदस्य,श्री धनंजय बोडारे:—**पॅच्युल नाही, पूर्ण रोड घेतले म्हणून एस्टीमेट वाढले, म्हणजे ५ कोटीचे ८ कोटी वाढीव एस्टीमेट. म्हणजे प्रशासनाने काहीही आणले तरी आम्ही मान्य करायचे. बर ते किती दिवसासाठी मागच्या महिन्यापर्यंत पाटोल्सचे काम चालले होते. जो बाको रेडिओवाला किवा व्हटीसीवाला रोड आहे तो मागच्या दोन महिन्यापूर्वी केला होता पाऊस सुरू होण्याच्या आगोदर, महणजे दाड महिन्यात आम्ही ५ कोटी आणि १४ कोटी असेच घालवायचे! म्हणजे महापालिकेच्या पैशाची काहीच जबाबदारी नाही, १४ कोटीचे फक्त १एक महिन्यासाठी हे बरोबर पटते का? नगरसेवकाना १० लाखाचे एस्टीमेट ५ लाखचे एस्टीमेट तुम्ही एवढी कंजूषी करता म्हणजे प्रशासनावरतीम्हणजे नाही नाही सर्व मिळून हे २५ लाख घ्या, आणि १४ कोटी पाण्यात जातात आणि एक महिन्याचा खर्च.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**मागच्या स्टॅडीग मध्ये आपण नव्हते का?

**सदस्य,श्री धनंजय बोडारे:—** होतो.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी**:— मग हे आपण कसे काय केले?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील**:— पास कसे काय केले.

**सदस्य,श्री धनंजय बोडारे:—** आयुक्तांनी आणले.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील**:— आमचे किती चांगले प्रस्ताव रिजेक्ट केले.

**<u>सदस्य,श्री धनंजय बोडारेः—</u>** ऐका, त्यानंतर एक नविन रोड बनविलेला आहे. आयुक्त साहेब वीटीसी ग्राऊंड ते आशेळा नविन रोड बनविलेला आहे, आज त्या रोडची अवस्था बघा काय आहे.

**<u>शहर अभियंता श्री. महेश शितलानी</u>**ः— साहेब, आम्ही त्यांना नोटीस दिलेली आहे.

**<u>सदस्य, श्रीराजेश वदारीयाः—</u>** काम कोणी केलेले आहे?

**<u>सदस्य,श्री धनंजय बोडारेः—</u>**जेव्हा रोड बनविला जात होता.

**<u>सदस्य, श्रीराजेश वदारीया</u>**ः— आता मी तुम्हाला एक उदाहरण सांगत आहे, नेहरू चौकापासून ते फालवर लाईन रोड सेम जॉईट व्हेंन्चर जसहिंद, झा पी आणि... कंपनी या रोड वरती एक पण खड्डा पडलेला नाही.

**<u>शहर अभियंता श्री. महेश शितलानी</u>**ः— त्यांना आम्ही पत्र दिले आहे, ऐका साहेब, विनंती आहे, पाऊस जसा कमी होईल तसा तो रोड परत पूर्ण करून देईल.

**<u>सदस्य,श्री धनंजय बोडारेः—</u>**काय आहे की, जेव्हा हा रोड चालू होता ना, त्यावेळी लोंकांना आम्ही आश्वासन दिले होते की तीन वर्षापयंत खड्डे पडणार नाहीत. खडडे पडले तर ताबोडतोब भ्रला जाईल ही त्याची जबाबदारी आहे. सहा महीने खडडयातून चालणार नंतर एका महीन्यांनी खडडे भरणार, त्याचा काय फायदा आहे.

**<u>शहर अभियंता श्री. महेश शितलानी</u>**ः— साहेब, ताबोडतोब काम करवून घेतो.

**<u>सदस्य,श्री धनंजय बोडारेः—</u>** कोणते?

**<u>सदस्य, श्रीराजेश वदारीया</u>**ः— नेहरू चौक ते फालवर लाईन सेम कंपनी बनवत आहे, रोड वेळेवर पूर्ण होत असतो ७ महिन्यामध्ये आणि त्याच्यात पूर्ण पावसामध्ये एक पण खडडा नाही आहे.

**<u>सदस्य,श्री धनंजय बोडारेः—</u>** अजून पर्यंत पूर्ण झालेले नाही.

**<u>सदस्य, श्रीराजेश वदारीया</u>**ः— फालवर लाईचा त्यांचा थोडा कॉन्टीअीचा इश्यु झालेला आहे.

**<u>सदस्य,श्री धनंजय बोडारेः—</u>** याठिकाणी श्रीराम टॉकीज वाला रोड बनवला आहे, तो चांगल्याप्रकारचा आहे.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरीः—** मग त्याठिकाणचा रोड असा का झाला?

**<u>सदस्य, श्रीराजेश वदारीया</u>**ः— हे काम जयहिंद यांनी स्वतः ने केले. दोन कामे, एकश्रीराम चौक आणि फालवर लाईन ही कामे त्यांनी स्वतःने केली आहेत.

**<u>सदस्य,श्री धनंजय बोडारेः—</u>** आणि या ठिकाणी किती खडडे पडले आहेत. लोक महापालिकेच्या कामाला हासत आहे.

**<u>शहर अभियंता श्री. महेश शितलानी</u>**ः— सर हे आपल्या तक्रारी नुसार त्याना देण्यात आलेले आहे.

**<u>सदस्य,श्री धनंजय बोडारेः—</u>** नोटीस दिली म्हणजे काम झाले असे नाही. तीन चार लोकांना सांगितले होते सेवकानीजी, क्वालीटी वरती लक्ष ठेवण्यात यावे. याठिकाणी डांबर बरोबर चालते, वदारीयाजी मला तेच सांगायचे आहे श्रीरामवाला रोड त्याठिकाणी सुध्दा तसाच पाऊस पडतो, तिथे अजिबात खडडे नाही. केरळमध्ये एवढा पाऊस पडून तिथे डांबरीवरती खडडे नाही, इथे एका रोडवरती खडडे आहेत आणि दुस—या रोडवरती खडडे नाही.

**<u>सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानीः—</u>** या ठिकाणी काय झाले पाहिजे, यामध्ये इंजिनिअर वर्गाचे लक्ष असायला पाहिजे. जे ठेकेदार काम बरोबर करत नाही जॉइन्ट व्हेंचरमध्ये घेवून किंवा कसेही, न त्यांच्यावर कारवाई होत, खाली पत्र पाठवले जाते नोटीस देवून असेच राहते. वेळ पूर्ण झाल्यानंतर त्यांचे बिले बनविली जातात. जसे की कोणाची रजिस्ट्रेशन १ करोडची असते, तर ८०लाख,८०लाखाचे दहा कामे घेतली जातात. परंतु अशी कामे झाली नाही पाहिजेत. माझी एक सुचना आहे, की एक करोड रजिस्ट्रेशन वाल्याकडे उल्हासनगर महानगरपालिकेचे १ करोडचे काम आहे त्यामध्ये त्याचे कम्प्लीशन जोपर्यंत होत नाही तो प्यंत दुस—या रजिस्ट्रेशनवाल्याला दुसरे काम त्याला देण्यात येवू नये.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी</u>**ः—टेंडर कंडीशन व्हायला पाहिजे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u>**:— टेंडर कंडीशन करणारे ठेकेदारच यांचेकडे येवून टेंडर कंडीशन टाकत असतात.

**<u>सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—</u>** काय होते की, दहा कामे घेतली की कामाचे सत्यानाश होवून जाते.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील</u>**:— जनरल बॉडी नियम बनवू शकते.

**<u>सदस्य, श्री राजेश वदारीया</u>**:— साहेब, ज्यावेळी टी. चंद्रशेखर होते त्यांनी ३३ रोड काढले आणि ३३ रोडच्या टेंडरमध्ये त्यांची कंडीशन होती,

**<u>सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—</u>**मी जर का करोड,करोडचे दहा कामे घेतली. मी एक काम करत आहे, दिपूने एक काम केले आहे, नेहरू चौक ते फालवर लाईन स्वतःने, ते बरोबर झाले, दुसरे केले ते बरोबर झाले, चार काम दुस—याला दिली, ते चार ही रोड बुडाले, त्यामंळे त्याला जर आम्ही दोनच कामे दिले असते, दोनही कामे चांगले केली असती. मी जर १० कामे घेतली आणि माझी क्षमता जर दोन कामे कराची असेल तर बाकीची ८कामे दुस—याला देणार तर दुसरे काम चांगले करतात की नाही त्यांची क्वालीटी नाही आहे, त्यामुळे नाव खराब होते,म्हणून क्वालीटी मेंनटेंट करण्यासाठी जोपर्यंत त्याच्या कंपनीचे रजिस्ट्रेशन एक करोडचे असेल तर एक करोडचे पूर्ण केले पाहिजे परत पूढे जायला पाहिजे. असे नियम केले तर पुढे चांगले होइल.

**<u>सदस्य,श्री भगवान भालेराव:—</u>** ठिक आहे, याचे काय करायचे. नाव काय आहे नाव तर समोर यायला पाहिजे. नंतर आम्हाला सांगा की एजन्सी कोणती आहे.

**<u>सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—</u>**मी प्रभाग क्षेत्र क्रमांक १ आणि२ जे येत आहे आणि रियल ईप्रा, आणि प्रभाग क्रमांक ३ आणि ४ मध्ये जे येत आहे दत्त मजूर कामगारकृ

**<u>सदस्य,श्री भगवान भालेराव</u>**:— माझे मत असे आहे की,

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील</u>**:— या ठिकाणी एजन्सीचे नाव विचारत आहात का? ही ५(२)(२) ची जी परमीशन आहे, ती परमीशन अशासाठी आहे की विदाउट कॉलींग टेंडर यु आर ॲथेरायझींग कमीशनर टू डू द वर्क एवढेच आहे.

**<u>सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—</u>**आम्ही नावे देत आहेत.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील</u>**:— नावे कसे देणार. नावे नाही देवू शकत.

**<u>सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी</u>**:— का? नाव दिले नाही तर आपण कसे नाव टाकणार. आपल्या वरती अरोप लागतील ही सभा आपल्याला नाव देत आहे.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील</u>**:— नाही,नाही, नियम..

**<u>सदस्य,श्री भगवान भालेराव</u>**:— आयुक्तांना प्राधिकृत कराना.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील</u>**:— नियमामध्ये प्रोव्हीजन अशी आहे की "स्टॅडींग कमिटी ऑथराईज्ड कॅन कमीशनर टू डू वर्क वीदाउट टेंडर"

**<u>सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी</u>**:— नावाची तर घोषणा करणार.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील</u>**:—नंतर आम्ही करणार ना.

**<u>सदस्य, श्रीराजेश वदारीया</u>**:— साहेब, इज देअर एनी रिस्ट्रेक्शन की स्थायी समिती नाव देवू शकत नाही. जेव्हा स्थायी समिती कमीशनर साहेबांना ऑथोराइज करत असेल, हे काम आपण करायला पाहिजे, तो कोणाकडून करायचे आहे, हे ऑथोराइज करू शकते.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील</u>**:—नाही,नाही. अधिकृत.

**<u>सदस्य,श्री भगवान भालेराव</u>**:— गोषवा—यामध्ये कोणाचे नावच नाही. आयुक्तांना प्राधिकृत करा विषय संपला.

**<u>सदस्य, श्रीराजेश वदारीया</u>**:— यांनी २७ लाख १० हजाराचे आणलेले आहे. अधिकृत याला म्हणतात की २७ लाखाचे काम २९ लाखात करा. २७ लाखाचे, २७ लाख १० हजार करत आहेत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील**:— हे रफ एस्टीमेट आहे. हे आपल्याला फक्त अधिकृत करावयाचे आहे.

**सदस्य,श्री भगवान भालेराव**:— हो बरोबर, जर कोणी चांगले काम करणारे असेल तर आता कोणी सांगितले की हे चांगले काम करतात. जयं हिंद वाले देवून टाका त्यांना अशा लोकांना आण तुम्ही क्वालीटीवाल्याना.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी**:— हा विषय जो आहे याच्यात जसे प्रशासनाकडून आले आहे. आम्ही मा. आयुक्त साहेबांना प्राधिकृत करत आहेत, दोन्ही कामे देण्यासाठी, आयुक्तांच्या जबाबदारीवरती, की हे काम बरोबर योग्य व चांगल्याप्रकारे, देखरेखी नुसार झाले पाहिजे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील**:— जबाबदारी आयुक्तांचीच राहील.

**सदस्य,श्री भगवान भालेराव**:— आणि इतिवृत्ताची वाट न पहता.

**महापालिका सचिव:—** तीन ते चार दोन्ही का?

**सदस्य,श्री भगवान भालेराव**:— दोन्ही, इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सदस्य, श्री. राजेश वदारीया**:— मी पॉइंट ऑफ ऑर्डर ने सांगत आहे, मागच्या सभेमध्ये आमचे काही विषय आले होते. त्यावेळी आयुक्त साहेब उपस्थित नव्हते,

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** मिटींग इज...

**सदस्य, श्री. राजेश वदारीया**:— ऐका, माझा विषय पेंडींग आहे, आयुक्त साहेब आले नव्हते त्यांच्या जागी प्रशासनाच्या वतीने चव्हाण साहेब बसले होते. चव्हाण साहेबांना आम्ही सांगितले होते की, त्या सर्व गोष्टी आमच्या ज्या आहेत त्या कमीशर यांना कम्प्लाय करणार किंवा सांगण्यात याव्यात, त्याचे अजून काहीच झाले नाही. काहीच इमप्लीमेंटेशन आले नाही. पाण्याचे विषय होते. एक रिर्टनीग वाल नाल्यात पडली होती. आणि पूर्ण तुटून गेला. पाईप पण आम्ही घेवून दिला त्यांनी फक्त वेल्डींग करून दिला. आणि रिटनिंग वाल तर अजून पर्यत काम चालू झालेला नाही. फार धेकादायक परिस्थिती मध्ये काही घरे आहेत. आम्हाला असे वाटते की पहिले घरे पडतील.नंतर रिटनिंग वाल बनविणे, मागच्या वेळेस चव्हाण साहेब होते हे सगळे कमीशनर साहेबांना सांगाणार. पाईप आम्ही वेल्डींग कश्रन दिला आहे परंतु पीडब्ल्युडी ने आज पर्यंत रिटनींग वालचे काम करून दिलेले नाही. हा जो रिटनींग वाल आहे तो पडण्याच्या मुळे काही घरे अडचणीत आली आहेत. हे कधीपण जर पाण्याची धार जर लागली तर प्लींथ कमाजोर असेल तर पडू शंकतात.

**सदस्य, श्री. धनंजय बोंडारे**:— साहेब, टाऊन प्लानरनी यांनी सांगितलेले आहे की, आता हा समन्वय तुम्ही बघा,वार्ड ऑफीसरना तुम्ही दिलेले आहे का? कोणत्या वार्ड ऑफीसरना तुम्ही दिलेले आहे.

**सदस्य, श्री.राजेश वदारीया**:— नाही, नाही आमचे म्हणणे काय आहे बोडारे साहेब, टाउन प्लानीग विरूध्द वार्ड ऑफीसरचे मुद्दा व्हायला नाही पाहिजे. आयुक्त साहेब ही गोष्ट बघतील.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **आयत्यावेळचा विषय**

**विषय क्र. ९ :—** प्रभाग क्षेत्र क्र. १ व २ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे दरवर्षी पावसाळयापूर्वी, पावसाळयादरम्यान व पावसाळयानंतर शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाची निविदा कार्यवाही करुन कामे करण्यात येतात. तथापी, वर्ष २०१८-१९ मध्ये शहरातील

रस्त्यांवर खड्डे भरणेच्या कामाची निविदा कार्यवाही झालेली नाही. निविदा कार्यवाही करुन प्रत्यक्षात कामे सुरु करण्यास विलंब होईल.

दिनांक ०६ जुलै पासून संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे शहरातील रस्त्यांवर खड्डे निर्माण झाले आहेत. सदर खड्डयांमुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. शहरातील रस्ते सुस्थितीत राहणे आवश्यक असल्याने सदर कामास विलंब झाल्यास रिक्षा युनियन, लोकप्रतिनिधी यांच्या वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे सदर रस्त्यांवर तात्काळ डांबरीकरण व पुर्नपृष्ठांकन करणेच्या सुचना मा.आयुक्त सो. यांनी दिल्या आहेत.

त्याअनुषंगाने प्रभाग क्षेत्र क्र.१ व २ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवर खडीकरण करण्याच्या कामाचे रुपये २६,३०,०००/- (अक्षरी रुपये सव्वीस लाख तीस हजार फक्त) एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर कामात सोलींग, जेसीबी, रोलर, खडीकरण इत्यादींचा समावेश आहे. सदर खर्च वर्ष २०१८-१९ च्या महापालिका अर्थसंकल्पातील रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षांतील उपलब्ध तरतूदीतून हाती घेण्यात येणार आहे.

सध्या गणेशोत्सव जवळ येत असल्याने गणेशोत्सवापुर्वी शहरातील रस्ते सुस्थितीत करणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा जनतेमध्ये असंतोष निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. कामाची निविदा प्रक्रिया केल्यास विलंब होईल. तरी सदर कामांची तातडी पाहता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत उक्त काम करुन घेणेस मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ३३** **दिनांक:— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्षेत्र क्र. १ व २ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम (२)(२) अंतर्गत करुन घेणेकामी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**आयत्यावेळचा विषय**

**विषय क्र. १० :—** प्रभाग क्षेत्र क्र. ३ व ४ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता मिळणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **आयत्यावेळचा विषय**

**विषय क्र. १० :—** प्रभाग क्षेत्र क्र. ३ व ४ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे दरवर्षी पावसाळयापूर्वी, पावसाळयादरम्यान व पावसाळयानंतर शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणेच्या कामाची निविदा कार्यवाही करुन कामे करण्यात येतात. तथापी, वर्ष २०१८-१९ मध्ये शहरातील रस्त्यांवर खड्डे भरणेच्या कामाची निविदा कार्यवाही झालेली नाही. निविदा कार्यवाही करुन प्रत्यक्षात कामे सुरु करण्यास विलंब होईल.

दिनांक ०६ जुलै पासून संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे शहरातील रस्त्यांवर खड्डे निर्माण झाले आहेत. सदर खड्डयांमुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. शहरातील रस्ते सुस्थितीत राहणे आवश्यक असल्याने सदर कामास विलंब झाल्यास रिक्षा युनियन, लोकप्रतिनिधी यांच्या वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे सदर रस्त्यांवर तात्काळ डांबरीकरण व पुर्नपृष्ठांकन करणेच्या सुचना मा.आयुक्त सो. यांनी दिल्या आहेत.

त्याअनुषंगाने प्रभाग क्षेत्र क्र.३ व ४ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवर खडीकरण करण्याच्या कामाचे रुपये २७,१०,०००/- (अक्षरी रुपये सत्ताविस लाख दहा हजार फक्त) एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर कामात सोलींग, जेसीबी, रोलर, खडीकरण इत्यादींचा समावेश आहे. सदर खर्च वर्ष २०१८-१९ च्या महापालिका अर्थसंकल्पातील रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षांतील उपलब्ध तरतूदीतून हाती घेण्यात येणार आहे.

सध्या गणेशोत्सव जवळ येत असल्याने गणेशोत्सवापुर्वी शहरातील रस्ते सुस्थितीत करणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा जनतेमध्ये असंतोष निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. कामाची निविदा प्रक्रिया केल्यास विलंब होईल. तरी सदर कामांची तातडी पाहता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत उक्त काम करुन घेणेस मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३४ **दिनांक:— ४/९/२०१८**

सुचकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार प्रभाग क्षेत्र क्र. ३ व ४ अंतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणेचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम (२)(२) अंतर्गत करुन घेणेकामी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी २.१५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— ५/१०/२०१८

## दि. ५/१०/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ५/१०/२०१८ रोजी सायंकाळी वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश वदारिया | सदस्य |
| ४ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ५ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| ६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ७ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १० | श्री. भगवान भालेराव | सदस्य |
| ११ | श्रीमती मिनाकौर लबाना | सदस्या |
| १२ | श्रीमती रेखा ठाकुर | सदस्या |
| १३ | श्रीमती दिप्ती दुधानी | सदस्या |
| १४ | श्रीमती अंजना म्हस्के | सदस्या |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती पंचम उमेश कालानी, २. श्रीमती ज्योती बठिजा

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१२७. श्री. गणेश पाटील, आयुक्त
१२८. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१२९. श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय
१३०. श्री. विनायक फासे, मुख्य लेखा परिक्षक
१३१. श्री. अशोक जाधव, सहा. मुख्य लेखा परिक्षक
१३२. श्री. दगडू ज. वानखेडे, वरिष्ठ लेखा परिक्षक
१३३. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैदयकीय आरोग्य अधिकारी
१३४. श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता, साबांवि
१३५. श्री. अश्वीनी अहुजा, उप अभियंता
१३६. श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि
१३७. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१३८. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१३९. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१४०. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१४१. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
१४२. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१४३. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१४४. श्री. बाजीराव जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
१४५. श्री. राजा बुलानी, प्र. विधी विभाग प्रमुख
१४६. श्रीमती निलीमा कदम, प्र. लेखापाल
१४७. श्री. राठोड, प्रकल्प अधिकारी
१४८. श्री. धनराज, विदयुत विभाग

१४९. श्री. बाजीराव जाधव, सुरक्षा रक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. बाळु भांगरे

सायंकाळी ४.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

यावेळी श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय हे आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ झाले.

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ४/९/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** दोन मिटींगमध्ये काय फायदा झाला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:–** दोन मिटींगमध्ये पहीले पण माझा एक विषय होता, चव्हाण साहेब, आयुक्तांच्या स्थानी बसले होते, इथे त्यांनी बोलले की, मी आयुक्तांना सांगतो. परंतु अजून पर्यंत काहीच काम झाले नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** भिंत पडली म्हणून, पाण्याचे वॉल पडले म्हणून.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** डमी डिसिजनमध्ये काय होईल?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** आपण आयुक्त साहेबांच्या कॅबिनमध्ये मिटींग घेऊ.पुढचा विषय घ्यायचा का?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** स्थायी समितीचा टेबल पण तिथे चांगला आहे, सध्या शहरामध्ये पाण्याचा विषय खुप गाजत आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:–** सार्वजिक बांधकाम विभागाचे कोणीच नाहीत, प्रभाग समितीचे पण कोणीच नाहीत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–** सार्वजनिक बांधकाम विभागाचे अजून संप आहे का? सार्वजनिक बांधकाम विभागाचा अजून पेन डाऊन संप चालू आहे, असे वाटते.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** आहेत का पाणी पुरवठा विभागाचे एक पण नाहीत,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:–** पेन डाऊन कशासाठी चालू केले आहे?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** काल पेन डाऊन का झाले होते?

**श्री. संतोष देहेरकर, उप आयुक्त (मुख्यालय) तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–** अभियंता आणि आपले नगरसेवक यांच्यामध्ये थोडे वाद झाले होते,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–** हा विषय आहे का? मा. सभापती मोहदया...

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–** आता विषय निघाला, सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहेत का? माझे म्हणणे असे आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी पाहीजे होते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:–** सार्वजनिक बांधकाम विभागाचे एक पण अधिकारी नाहीत, जमनुजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोणीच नाहीत.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** पाणी पुरवठा विभागाचे पण कोणीच नाहीत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:–** ही सभापतींची जबाबदारी आहे, सर्व अधिकारी इथे यायला पाहीजे. आम्ही सभापतींनाच विचारणार ना.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** अजून मिटींग चालू झाली नाही,मिटींग अजून चालू झाली नाही, फक्त चर्चा चालू आहे, काल काय झाले?

**महापालिका सचिव:—** इतिवुत्त पेडींग ठेवू का?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** काय करायचे?

**काही सदस्य:—**पास करा, पास करा.

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :—** मागील सभेचे दिनांक ४/९/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेश वदारिया

**स्थायी समिती ठराव क्र. :— ३४ अ** **दिनांक : ५/१०/२०१८**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक ४/९/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४१ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २:—** सन २०१८—१९ करीता सफाई कर्मचा—यांसाठी संरक्षणार्थ साहित्ये व शहरातील सफाई व स्वच्छतेसाठी आवश्यक सफाई साहित्याचा पुरवठा करुन घेण्यासाठी न्युनत्तम दराच्या निविदाकारांशी संविदा करण्यास मान्यता मिळणे.

---

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** हे सर्व वार्षिक साहित्या आहे, यामध्ये हात रूमाल...

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** फुल झाडू, पंखा झाडू...

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** साहेब, आज पर्यंत या वस्तू कधी बघितल्या नाहीत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** हातगाडया आहेत का? प्लास्टीकच्या, फायबरच्या हातगाडया.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** पहील्या वेळेसच मागवत आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** यामध्ये...

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** प्रथमच मागवत आहेत, पहील्या ज्या लोखंडाच्या होत्या त्या.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** लोखंडाच्या आपण तीन, तीन मागवत होतो, दरवर्षी आपण लोखंडी तीन तीन मागवत होतो, या वेळेस काय केले की, लोखंडीचा नंतरचा खर्च जास्त असतो. त्यामुळे लोखंडी ८० मागवल्या आहेत आणि एका प्रभागाला दोन, दोन एका पॅनलला ८ येतील.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** एका पॅनललाच ना, वार्डाला नाही ना.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** एका वार्डाला,

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** एका वार्डाला दोन, दोन ८ एका पॅनलला.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** होय.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** ठिक आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** हे सामान आपण मागवत असतो, पण वार्डामध्ये कर्मचा—याना ते मिळत नाही. काही वस्तु आम्हांला त्यांना पुरवाव्या लागतात, स्वत:च्या पैशातून.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** या मध्ये काय आहे, जे पण आपले अधिकारी स्वच्छता निरीक्षकांना देतात, तेव्हा त्यांची सही असते. तुम्ही कार्यालयामध्ये जाऊन बघू शकतात, तुमच्या स्वच्छता निरीक्षकाला मिळाले आहेत की नाही मिळाले.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** लोखंडी गाडया पण आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** एक काम करा, जसे यांनी सांगितले, प्रभाग समितीला गेल्या नंतर, त्या स्वच्छता निरीक्षकाला मिळाल्या नंतर त्याची एक कॉपी नगरसेवकाला मिळाली पाहीजे. कारण आता हे आम्ही मंजूर केल, तुम्ही वर्क ऑर्डर देतात एक महीन्याची, दोन महीन्याची काही अडचण जर आली तर तीन महीने लागतात.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** नाही, एवढा वेळ नाही लागत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** म्हणजे ॲप्लीमेंट व्हायला, जेव्हा एक महीन्यानी होईल किंवा दोन महीन्यानी होईल ते नगरसेवकांना कळू दया. का साहित्य मिळाले. जेव्हा स्वच्छता निरीक्षक किंवा मुकादमाला म्हणाले की आम्हांला मिळाले आहे, तेव्हा आम्ही लगेच बोलू शकतो की,तुम्हांला साहीत्य दिलेले आहे.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** साहित्य वाटप करतांना प्रत्येक नगरसेवकांना माहीती देण्यात येईल.

यावेळी आयुक्त श्री. गणेश पाटील यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** टू बिन्स काय आहे, ॲटम?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** ज्या मोठया असतात ना त्या घेऊन जातात हाताने, हाताने खेचून नेतात ना त्यांना दोन बिन्स असतात.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** त्या पण घेणार आहेत का?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** होय. त्या फक्त त्यांचा जेवढा एरिया आहे, तेवढयातच देतात. ते त्यांच्या एरियातले आहेत, हे बाकी आपण जे रस्ते सफाई करतो, तेव्हा लागतात.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** एक उत्तर दया, जसे भरतजी बोलतात, हे खरे आहे का? त्रास आहे. मटेरियल दिले तर एक व्हॉटस ॲप पाठवा.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** त्यांच्या वार्डामध्ये साहित्य पोहचल्यावर...

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** यांच्या नंतर आता लक्ष दया की, हे साहित्य मिस झाले नाही पाहीजेत, नंतर वस्तु विकल्या जातात म्हणून मी हा मुददा उचलला आहे.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** गोडाऊनचा जर काही इश्यु असेल तर...

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** फक्त माझ्याच वार्डामध्ये नाही तर संपुर्ण ७८ वार्डामध्ये लक्ष दया.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणे:—** ज्यांच्या इथे तक्रार आहे, तिथे जास्त लक्ष दिले जाईल.

**महापालिका सचिव:—** पास...

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मॅडम, दोन मिनीटे फक्त....

**महापालिका सचिव**:— एकदा ठराव वाचून दाखवते, ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २०१८—१९ करीता सफाई कर्मचा—यांसाठी संरक्षणार्थ साहित्ये व शहरातील सफाई व स्वच्छतेसाठी आवश्यक सफाई साहित्याचा पुरवठा करुन घेण्यासाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. अमरज्योत इंटरप्राइजेस, मे. मोहित इंटरप्राइजेस, व मे. मोहिनी इंटरप्राइजेस, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** विषय असा आहे, आपण खड्डे बुजवण्यासाठी कॅम्प नंबर १ ते ४ आपण एजन्सी सांगितली ती एजन्सी तुम्हांला फिक्स करता येणार नाही. एजन्सी तुम्ही फिक्स केली ती एजन्सी ब्लॅक लिस्ट आहे किंवा काय? त्याची आपण खात्री केली का? ती एजन्सी तुम्ही कशी फिक्स केली? आम्हांला स्थायी समितीला न कळवता, त्या संदर्भातले काही आम्हांला कळले पाहीजे ना. सार्वजनिक बांधकामाचे कोणीच नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** सार्वजनिक बांधकाम विभागाचे नाहीत, पाणी पुरवठा विभागाचे नाहीत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** सितलांनी कुठे आहेत, त्यांना फोन करून बोलवून घ्या ना.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** कसे आहे, साहेब, तुम्ही स्थायी समितीला अधिकार असतांना सांगितले की, मला एजन्सी फिक्स करण्याचा अधिकार आहे. पण मी त्यांच्यावर थोडी स्टडी केली, आम्हांला पण वाटले की ते आम्हांलाच अधिकार आहेत. त्याच्या आमच्याकडे एजन्सीचे नाव यायला पाहीजे. त्याच्यामध्ये तसे स्पष्ट लिहीलेच नाही काही, त्यामुळे स्थायी समितीचा अर्थच तुम्ही ५ (२) (२) मध्ये स्थायी समिती पुढे आणता, मग ती एजन्सी आम्हीच फिक्स केली पाहीजे ना. ती तुमच्या गोषवा—यामध्ये आली पाहीजे. ती तुमच्या गोषवा—यामध्ये आलीच नाही.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** आहे, परंतु याचा अर्थ ...

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** परंतु याचा अर्थ काय परंतु तुमच्या तुमच्या बाजूने पण असू शकतो, आमच्या बाजूने पण असू शकतो.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** नाही, नाही, तसे नाही. परंतु याचा अर्थ प्रोव्हीजन त्याला मराठीमध्ये त्याचे ट्रान्सलेट करतात, प्रोव्हीजो परंतु याचा अर्थ तो सेपरेट क्लॉज असतो, प्रोव्हीजन तो वरचे सोडून दयायचे आणि खालचेच जो प्रोव्हीजन आहे तेच वाचायचे स्थायी समितीला तिच्या कार्यवृत्तात कार्य कारणे नमुद करून त्यात तरतुद केल्या प्रमाणे निविदा न मागविता संविधा करण्यास प्राधिकृत करता येईल. अर्थात निविदाच मागवलेली नाही, याचा अर्थ ठेकेदारच फिक्स झाला नाही. निविदा न मागवीता म्हणून आम्ही त्या दिवशी सांगितले होते की, तुम्ही निविदा न मागवतर तुम्ही काम करा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** संबंधित ठेकेदाराला वर्क ऑर्डर दिलेली आहे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** होय, त्याला वर्क ऑर्डर दयावीच लागणार आहे, त्या शिवाय तो काम कसे करणार?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** तुम्ही वर्क ऑर्डर दिली, त्याचे आम्हांला काही नाही, आमच्या पर्यंत ती एजन्सी यायला पाहीजे होती ना साहेब, आमचा साधा विषय तोच आहे, कारण यांच्या पुर्वीचे आम्ही जितके केल आहेत, ती एजन्सी, तुमच्या गोषवा—यामध्येच ती एजन्सी येते आणि आम्ही त्याला मान्यता देतो.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** याच्यामध्ये दोन प्रकार आहेत, आयुक्तांनी ५ (२) (२) ला प्रस्तावीत करूनच स्थायी समितीला पाठवले आहे किंवा इमरजन्सीमध्ये जेव्हा आपण प्राधिकृत केलेले आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>**प्राधिकृत, हा विषय इथे आला, मागच्या वेळेस तुम्ही सभेला नव्हते, तेव्हा सांगितले की, आम्ही एजन्सी फिक्स केली, तुम्ही एजन्सी कसे सांगू शकतात? तेव्हा एजन्सीदिली असती तर तेव्हा विषय संपवला असता. पण त्यांनी एजन्सीफिक्स केली आहे, त्या एजन्सीमध्ये ती एजन्सीआपली स्थानिक नाही, पहीली गोष्ट, ती एजन्सी आहे, बाहेरची, ती बाहेरच्या महानगरपालिकेमध्ये ब्लॅक लिस्ट असू शकते. त्याची खात्री कोणी केली?

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** त्याची खात्री, ही ब्लॅक लिस्ट आहे की नाही, ही खात्री नाही केली. पण ती ज्या अर्थी ती इथे आली, ती ब्लॅक लिस्ट नसणार, तुमच्याकडे आहे का काही पुरावा ती ल्बॅक लिस्ट आहे का?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** नाही, नाही थेट ती एजन्सीइथे आली आणि ५ (२) (२) मध्ये आली, मला काय म्हणायचे की ती टेंडरमध्ये आली असती तर काही म्हणणे नव्हते. ५ (२) (२) मध्ये कशी एजन्सीआली?

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** ५ (२) (२) चा अर्थच तो होतो....

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मी सांगतो आयुक्त साहेब, यामध्ये काय होते, आम्ही २० ते २२ वर्षा पासून स्थायी समितीमध्येच आहेत, सदस्य पण आहेत, आयुक्तांकडून जेव्हा असा प्रस्ताव येतो की, हे ५ (२) (२) मध्ये दयायचे आहे, तर संबधित विभागामधून पहीले गोषवा—यामध्येच नाव येते की ५ (२) (२) मध्ये दयायचे आहे आणि हे आहे. मग सदस्य, जर नाव पसंद नाही, ही ब्लॅक लिस्ट आहे किंवा नाही त्यावर चर्चा होते आणि नाव कट करून दुसरा पण देवू शकते.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** माझे म्हणणे साधे आहे, ही संबंधित एजन्सी आपल्या इथे एकही काम केलेले नाही, ही ५ (२) (२) मध्ये आली कशी? पहीली गोष्ट, आयुक्तांनी कशी शिफारस केली. दुसरी गोष्ट. जर आयुक्तांनी त्यांची खात्री केली असेल किंवा आयुक्त साहेबांनी सगळया गोष्टी केल्या असतील, तर आयुक्त साहेबांनी आता सगळया एजन्सीची सगळया गोष्टींची खात्री करायला पाहीजे. याच्या पुढे आम्ही ज्या ज्या एजन्सीया सुचवू त्या बाहेरच्या असतील, त्यांना पण मान्यता दिली पाहीजे. कारण आयुक्तांनी ही एजन्सी....

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** आयुक्तांना आपण प्राधिकृत केले आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** नंतर हा विषय आला असेल.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** आयुक्तांनी संबंधित प्रशासनाला विचारून दिले असेल.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** परंतु ठाणे आणि डोबिंवलीच्या एजन्सीला असे उडून आल्या सारखे माहीती पडले की, इथे ५ (२) (२) मध्ये काम आहे.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** अधिकारी सांगतात ना, चौकशी करतात.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** तुम्हांला माहीती होते की, हा ठेकेदार आहे आणि मला या ठेकेदाराला दयायचे आहे, स्थायी समितीच्या सदस्यांनी सांगितले होते आणि तुम्ही त्याला नाकारले.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** मला असे म्हणायचे होते की....

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** आपल्याकडे नेहरू चौक आणि फॉलवर लाईन पर्यंत उत्कृष्ट जयहिंद यांनी काम केले आहे. मग त्याचा विचार का करण्यात आला नाही.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** त्यांनी नाही म्हणून सांगितले ना, त्यांनी नाही म्हणून सांगितले हेच मी तुम्हांला सांगतो. त्या लोकांशी चर्चा झाली त्या सगळया लोकांना फोन केले, माझ्या समक्ष फोन केले, त्यांना आम्ही वारंवार विनंती केली आणि त्यांनी सांगितले की आम्हांला त्या महापालिकेत खड्डयांचे तर काम बिल्कुल करायचे नाही, ही परिस्थिती आहे. आणि हे रेकॉर्डवर आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**ठिक आहे साहेब आपण हा मुद्दा मागे सुध्दा उपस्थित केला होता. आपण मागच्यावेळेस १४ कोटीची कामे पुर्ण केली आता ५० लाख वाढले आहे. १४ कोटीमध्ये आपण लोकांना जे खड्डे भरायला लावले होते त्याची डिसेंबर पर्यंत गॅरेंटी दिली आहे तर आता जे खड्डे भरायचे आहे ते ५० लाखमधुन काही ठिकाणी खड्डे भरलेले आहे. तर ते काम केले का त्यांनी.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** ज्या ठिकाणी खड्डे भरलेले नाही त्याठिकाणी पुर्वीच्या ठेकेदाराने काम केले होते त्यांनाच आपण सांगितले होते. ती त्यांची जबाबदारी आहे, त्या ठिकाणी आपण नाही काम केले. हे काम फक्त त्याच्या व्यतिरिक्त ठिकाणी केलेले आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**नेताजी ते गांधीरोड जो जात आहे त्या १४ कोटीतुन काम झाले आहे त्यावरच आता जे ५० लाख आहेत त्यातुन भरपुर काम झाले आहे. मी तेथिल नगरसेवक असून मला माहित आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**साहेब, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका—यांना विचारा ना. पुर्वी खड्डे भरण्यासाठी जे १४ कोटी आपण दिले होते, मागील वर्षी ते आपण काम चालु केली की नाही केली का आपण ते या ५० लाखामध्ये काम केले.

**श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि:—**डीएलपीमध्ये जे रस्ते आहेत त्या रस्त्यावर नाही केले आपण. परंतु आता जो हिराघाट येथिल जो रस्ता होता तो १४ कोटीमध्ये होता, १४ कोटीचे काम सुरु करण्यापुर्वी सर्वात प्रथम हिराघाटचे काम केले होते. त्यास १० महिने झाले. म्हणजे ११ व्या महिन्यात वर्क ऑर्डर निघाले होते एप्रिला रिवार्जड केले होते सर्वात प्रथम डीएलपीमध्ये रस्ता घेतला होता तो वुडलॅप म्हणता येणार नाही कारण सहा महिन्यापेक्षा जास्त वेळ झाली आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**नेताजी चौक ते चालिया मंदिर येथे जो रस्ता जात आहे, गांधी रोड तहसिलदार येथे १४ कोटीतुन मागील वर्षी काम केले होते आता परत त्यावरच १४ कोटीचे काम केले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**उल्हासनगर—४ मधील पेन्सील फॅक्टरी रोड येथे जुनमध्ये काम करण्यात आले होते आता जर तुम्ही लगेच सहा महिन्यात ते काम करुन नाही घेतले तर ते करणार कधी.

**श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि:—**साहेब, त्यांना नोटिसा काढलेल्या आहेत. आणि काही रस्ते सुरु सुध्दा केले आहेत.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**नाही आता उत्तर काय दिले. सहा महिने झाले, आता याला सहा महिने व्हायची वाट बघणार आहात काय?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** सहा महिन्यात खड्डे नव्हते का.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आहेत ना.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**नोटिस काढल्या ना त्यांना. खड्डे होते म्हणुनच काढले ना.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**साहेब, जुनमध्ये पाउस पडला आणि दोन दिवसाच्या पावसात खड्डे पडले.

**श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि:—**सहा महिन्यात खड्डे नव्हते. पावसाळयामुळे जे काही खड्डे निर्माण झाले. डीएलपी कालावधीमध्ये जो रस्ता आहे त्यामध्ये खड्डे पडले, सहा महिन्यातच खड्डे पडले असे नाही.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**उल्हासनगर कॅम्प नं. ४ मध्ये जे रस्ते झाले आहेत ते किती तारखेला तुम्ही डांबर टाकले. त्यानंतर खड्डे कधी पडायला लागले ते काढा ना. आता तुम्ही सोपे उत्तर काय दिले की हिराघाटचा रस्ता सुरुवातीला घेतला त्यास ११ महिने झाले. त्याचा कालावधी होता, बरोबर आहे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**त्याचे बिल दिले आहे.

**<u>श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि:—</u>**अदयाप त्याचे बिल फायनल झाले नाही.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**नाही, नाही दिले आहे.

**<u>श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि:—</u>**नाही, नाही आमच्याकडे चालान आहे पर्टिक्युलर रस्त्याचे. ज्यावेळेस रोडवर डांबर टाकले जाते त्यानंतर सहा महिने.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**ठिक आहे, बरोबर.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**अगोदरचे आहे ना, तुम्ही फक्त उत्तर दया मला, आज डांबर टाकतो आणि पंधरा दिवसानंतरचे चालान देतो.

**<u>श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि:—</u>**ज्यावेळेस डांबराची गाडी येते त्यावेळेस आमचे मुकादम चालान काढतात.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**तुमच्याकडे डांबराची गाडी कोठे येते तुम्ही लोड करुन आणता ना. त्या डांबर प्लानमध्ये पंधरा दिवस अगोदरचा सुध्दा डांबर टाकला जातो.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**तारीख असेल ना.

**<u>श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि:—</u>**तारीख आहे ना साहेब.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**५० लाखाचे ५(२)(२) काम दिले त्याचे काय झाले.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**आता ५० लाखामध्येच संपले आहे का साहेब.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**५० लाखात झाले काय, काय बाकी आहे त्याचे?

**<u>श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि:—</u>**अदयाप मोजमाप केलेले नाही आम्ही.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**मग आता काय आहे.  आयुक्त साहेबांच्या म्हणण्याप्रमाणे कमी झाले पाहिजे, वाढले नाही पाहिजे.

**<u>श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि:—</u>**नाही, नाही, १ आणि २ प्रभाग समितीचे जे आहे ते २५ लाखापेक्षा वर गेलेले नाही ते मी सांगतो. ३ आणि ४ चे माझ्याकडे नाही.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**मग राहिलेले काम त्यांच्याकडुन करुन घ्या ना.

**<u>श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि:—</u>**होय साहेब, करुन घेवु.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**आता समजा बीएम केले त्यावर एसी केली तर तो रस्ता चांगला आहे.

**<u>श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि:—</u>**एसीचे ठेका घेतलेलाच नाही आपण.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**घ्यायला पाहिजे, त्यामध्ये तरतुद करायला पाहिजे ना आपण. बीएम केले तर ते लगेच निघुन जाईल एसी नाही केली तर. आणि एसी केली तर ते भविष्यात टिकेल.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**नेताजी आणि मच्छी मार्केटचे क्लीअर नाही केले.

**<u>श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि:—</u>**केले आहे.  चांगले काम झाले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**चला धन्यवाद चांगले काम केले तर.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**चांगले काम केले तर ठिक आहे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**चांगले काम केले आहे त्याने.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**जाधव, आपण कल्याणहुन एन्ट्री करतो शांतीनगरला, तो ब्रिज तोडल्यानंतर सर्व खड्डेच आहे रस्त्याला. आपल्या शहरातील महत्वाची एन्ट्री आहे, तर तेथे बीएम, एसी वगैरे करा, ते काम करुन घ्या ना.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**माझे उत्तर दया ना.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**श्री. अश्वीनी, जो नविन रस्ता बनविला आहे श्री. सेवकानीच्या वेळी. व्हीटीसीच्यापुढे त्या रस्त्यावरील ग्रीट वर येत आहे.

**श्री. अश्वीनी अहुजा, क. अभियंता, साबांवि:—**संपुर्ण एसी परत होणार. आता संपुर्ण लेअर आम्ही एसीचे करणार.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**जो रस्ता बनविला आहे त्याचे ग्रीट वर येत आहे, तो नविन रस्ता आहे.

**श्री. अश्विनी अहुजा, क. अभियंता, साबांवि:—**एसी केले आहे त्याचे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**तो पुर्ण रस्ताच खराब आहे, त्याची लायबिलीटी काय आहे. करायला लावा त्याला.

**श्री. अश्विनी अहुजा, क. अभियंता, साबांवि:—**पुर्ण नविन करणार. १०० टक्के एसी परत लेअर करणार.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**नेहरु चौकाचे तसेच आहे काय?

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**काजल पेट्रोल पंपवाला रस्ता.

**श्री. अश्विनी अहुजा, क. अभियंता, साबांवि:—**काजल पेट्रोल पंपचा रस्ता तसाच आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**नेहरु चौक ते फालोवर लाईनचा रस्ता त्यांनी केला आहे. श्रीरामचा रस्ता केला आहे जयहिंदवाल्यांनी. माझ्या प्रभागाचे काम आहे तर मी ते सांगु शकतो. एसी कोठल्या रस्त्याचे निघाले.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**व्हीसीटीपासुन ते आशेळा रस्त्यापर्यंत.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**नेताजी ते मच्छी मार्केटपर्यंत, आपण शहाडचे जे पाटोल्सचे जे काम केले आहे मागील वेळेस १४ कोटीचे पाटोल्सचे जे काम केले होते, त्याच रस्त्यावर पुन्हा काम झाले आहे. तर यांचे असे म्हणणे आहे की जुनी एजन्सी जी आहे त्यांनी काम केले आहे. यांचे म्हणणे आहे की नविन एजन्सीजी आहे त्यांनी ते काम केले आहे.

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता, साबांवि:—**साहेब हे पुर्वी केसी चंदनानी यांनी काम केले आहे. त्यांनी जे खड्डे भरले त्याशिवाय सुध्दा खड्डे खराब झाले आहेत. आता जे नविन प्राकलन बनविले त्यात जे खड्डे खराब झाले ते करुन घेतले आहे बाकी डीएलबीमध्ये जे खराब झाले आहेत ते परत करुन घेवु.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**पहिली गोष्ट तर जे जुने रस्ते होते त्यावरच आता नविन काम केले आहे. नविन एजन्सीने काम केले आहे,तेच केले आहे. त्यात नविन खड्डे बनले नाहीत, जुने जे होते तेच बनले आहेत.

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता, साबांवि:—**परंतु साहेब तेथे कंटीन्यु काम झाले आहे देना बॅकेच्या येथे लिकेज आहे, तर तेथे सलग पाणी वाहत आहे आता सुध्दा पाणी वाहत आहे, त्यामुळे जे लिकेजेस आहे तेथे डांबर टिकणार नाही. त्याबाबत पाणी पुरवठावाल्यांना सुध्दा सांगितले आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**म्हणजेच ठेकेदारांना आपण बढावा देत आहात.

**श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता, साबांवि:—**साहेब, ही पहिली वेळ असे झाले आहे की, डीएलबीमध्ये काम दिले आहे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>**परंतु आमच्या येथे नाही झाले ना.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>**ठेकेदाराला जास्त मदत करु नका.

**<u>श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता, साबांवि:–</u>**बिल्कुल नाही.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**मागील महासभेत जेथे आयुक्त साहेब उपस्थित नव्हते. श्री. चव्हाण साहेब बसले होते. तसेच आता जी ४/९/२०१८ रोजी जी सभा झाली ते स्वत: आयुक्त साहेब होते तर त्यावेळी मी त्यांना सुध्दा सांगितले होते व श्री. चव्हाण साहेब होते त्यांना सुध्दा सांगितले होते. त्यावेळी मी मुद्दा उपस्थित केला होता की पावसाळयाच्या वेळी माझ्या प्रभागात ४० फुटाची एक रिटनींग वॉल कोसळली होती तर साहेबांनी सांगितले होते की त्यास आपण बनवुन घेणार. तर आतापर्यंत ते काम सुरु झालेले नाही. तेथे परिस्थिती नाजुक झाली आहे. तेथे नाला आहे व त्याची प्लिंथ कमकुवत होत आहे. व काही घरांना तेथे धोका निर्माण होत आहे. रिटनिंगवॉल बनविणे आवश्यक आहे मी स्थायी समितीत दोन वेळा मुद्दा उपस्थित केला आहे. दोन्ही वेळा प्रशासनाकडुन आश्वासन मिळाले आहे की आम्ही लवकरात लवकर काम करु. तर आता सार्वजनिक बांधकाम विभागास विचारले तर ते काम झाले नाही.

**<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :–</u>**ते नाल्याचा काही बुंदा पडला आहे त्यास घरे लागुन आहेत, त्या घराचे फाउंडेशन वगैरे ओपन झालेले आहे. तर ते ॲक्च्युअली रिटेनिंग वॉल नाही बांधले तर तर ते घर धोकादायक व्हायचे. तर त्याचे एस्टीमेंट वगैरे तयार केले होते पण आर्थिक परिस्थितीमुळे ते तसेच प्रलंबित आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**आर्थिक परिस्थितीचा याचा काय संबंध आहे साहेब.

**<u>श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा :–</u>**त्याचा प्रस्ताव तयार केला आहे साहेब.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील :–</u>**आता ब–याचशा जागी असे झाले आहे रिटेनिंग वॉलची आावश्यकता आहे. माझ्या मते म्हारळ येथे सुध्दा असे झाले होते तेथे सुध्दा रिटेनिंग वॉल बनविणे आवश्यक आहे. हे सर्व काम प्रायोरीटीव्हाईज करावे लागणार. अशी कामे जर आपण करायला गेलो तर बाकीचे काम मागेच राहणार ना मग. थोडी प्रायोरीटी देवुन आपण करणार. ते तुम्ही दाखवा मला त्यामध्ये.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**मी आपणांस म्हटले होते आपण एकदा येवुन पहावे. त्याची गंभीरता काय आहे ते समजणार साहेब. आपण भेट दया त्यानंतर आपण त्यावर निर्णय घ्या. उदया भेट घ्या.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील :–</u>**नाही, उदया तर नाही होवु शकणार.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**भले सोमवार चला.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील :–</u>**आपणांस बरीचशी कामे करायचे आहे. आपणांस प्रायोटराईज काम करायचे आहे. आपण जे सांगणार तेच काम पकडुन चालले तर बाकी लोकांचे काय करणार.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>**साहेब, मी असे नाही म्हटले, आपण सर्वांचे काम करा ना.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील :–</u>**मी आपणांस आधी सुध्दा सांगितले होते की आम्ही पाहणार, प्रायोरीटीव्हाईज करु. जेथे जास्त धोका आहे ते काम आधी करु.

**<u>काही सदस्य:–</u>**पास, पास......

---

☑ **विषय क्र. २ :–** सन २०१८–१९ करीता सफाई कर्मचा–यांसाठी संरक्षणार्थ साहित्ये व शहरातील सफाई व स्वच्छतेसाठी आवश्यक सफाई साहित्याचा पुरवठा करुन घेण्यासाठी न्युनत्तम दराच्या निविदाकारांशी संविदा करण्यास मान्यता मिळणे.

**<u>प्रस्तावना</u>**

सन 2018-19 करीता सफाई कर्मचाऱ्यांसाठी संरक्षणार्थ साहित्य व शहरातील सफाई व स्वच्छतेसाठी सफाई साहित्याचा पुरवठा करून देण्यासाठीच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो., यांनी दि. 02/07/2018 रोजी अन्वये दिलेल्या मान्यतानुसार दै. वृत्तपत्रात सुचना प्रसिध्द करून ई-टेंडरींगद्वारे महापालिका वेबसाईटवर जाहिर ई-निविदा सुचना प्रसिध्द करून निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. विहित मुदतीत खालील निविदाकारांनी त्यांच्या निविदा दाखल केलेल्या आहेत.

1) मे. मोहित इंटरप्राइजेस, 2) मे. मोहिनी इंटरप्राइजेस, 3) मे. अमरज्योत इंटरप्राइजेस,

प्राप्त निविदा दिनांक 31/07/2018 रोजी दुपारी 03.30 वाजता ई-निविदा कक्षात निविदाकारांच्या उपस्थितीत संगणकाच्या माध्यमाने तांत्रिक बाब पहिला लिफाफा उघडण्यात आला. सदर सर्व निविदाकारांनी निविदेतील नमुद अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याने समितीने वित्तीय लिफाफा उघडण्याबाबत सुचना केल्या त्यानुसार दिनांक 03/08/2018 रोजी दुपारी 04.00 वाजता निविदा समितीच्या मान्यतेने तीनही निविदाकारांचे दुसरा वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र तीनही निविदाकारांनी सादर केलेल तुलनात्मक दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहेत.

## तुलनात्मक तक्ता

| अ. क्र. | सफाई साहित्याचे नांव व त्यांचा तपशिल | | आवश्यक मालाचा (परिमाण) | मागील वर्षाचे मंजुर दर रू. | मे. अमरज्योत इंटरप्रायजेस | मे. मोहित इंटरप्रायजेस | मोहिनी इंटरप्रायजेस | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | गॅलव्हनाईज बादल्या | | 320 नग | 254.8 | **199** | 201 | 202.50 | 63680 |
| 2 | गोवा ब्रुम (750 ग्राम प्रति नग) कार्यालयातील नमुण्याप्रमाणे | | 10,000 नग | 57.82 | 65 | 60 | **39.80** | 398000 |
| 3 | बांम्बु (अदांजे 18 फुट लांबी) | | 234 नग | 279.3 | **199** | 205 | 209.80 | 46566 |
| 4 | रबरी हातमौजे | | 12000 नग | 57.82 | 45 | 48 | **24.99** | 299880 |
| 5 | हातरूमाल (प्रति कर्मचारी प्रति महिना 01 नग) | | 14500 नग | 56.84 | 45 | 36 | **24.99** | 362355 |
| 6 | साबण (हिंदुस्थान लिव्हर कंपनीचे 75 ग्राम) | | 14500 नग | 24.01 | 21 | 20 | **12.49** | 181105 |
| 7 | फावडे | 4" इंच | 156 नग | 170.52 | 105 | 108 | **97.20** | 15163.2 |
| | | 6" इंच | 156 नग | 183.26 | 118 | 121 | **113.40** | 17690.4 |
| | | 8" इंच | 156 नग | 200.09 | 136 | 141 | **121.50** | 18954 |
| 8 | डस्टर्स | | 150 नग | 33.32 | 21 | 25 | **17.55** | 2632.5 |
| 9 | रबरी बुच कार्यालयातील नमुण्याप्रमाणे | | 50 नग | 171.05 | 99 | 105 | **89.10** | 4455 |
| 10 | फुल झाडू | | 100 नग | 68.06 | **75** | 78 | 84 | 7500 |
| 11 | रबरी स्क्वायझर (5 फुट दाडयां सह) | | 50 नग | 362.06 | 360 | 365 | **145.80** | 7290 |
| 12 | नायलॉनचे रोड सफाई ब्रश (5 फुट दाडयां सह) | | 780 नग | 219.52 | **210** | 225 | 273.60 | 163800 |
| 13 | दातारी (12 -दाती) | | 156 नग | 364.56 | **180** | 183 | 194.40 | 28080 |
| 14 | दातारी (02 -दाती) | | 78 नग | 219.52 | **150** | 155 | 178.20 | 11700 |
| 15 | लोंखडी हातगाडया (कार्यालयातील नमूण्याप्रमाणे) | | 80 नग | 7938 | 6480 | 6600 | **6280** | 502400 |
| 16 | प्लास्टिक/फॉयबरच्या हातगाडया (गोदरेज किंवा तत्सम कंपनीचे) | | 156 नग | -- | 8000 | **7600** | 9190 | 1185600 |
| 17 | फेस मास्क (कापडी) | | 14500 नग | 23.52 | 17 | 14 | **7** | 101500 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 18 | घमेला प्लास्टिकचे दोरीवाले (कार्यालयातील नमुण्या प्रमाणे) | 156 नग | 311.64 | 225 | **220** | 299.80 | 34320 |
| 19 | फावडे दांडे (4 फुटी) | 780 नग | 47.04 | 45 | 40 | **21.60** | 16848 |
| 20 | विम पावडरर | 50 कि.लो | 53.9 | 58 | 55 | **43.74** | 2187 |
| 21 | टू-व्हील बिन्स ओटो/निलकमल किंवा तत्सम कंपनीचे 120 लिटर क्षमतेच्या | 158 नग | 4116 | 3300 | 3500 | **2696.90** | 426110.2 |
| 22 | पंखा झाडू (ब्रुम) | 780 नग | 87 | 105 | 99 | **84.80** | 66144 |
| 23 | ॲप्रॉन (ग्रिन/ब्ल्यु) 500 xL /500 xxL | 1000 नग | -- | **90** | 100 | 145.80 | 90,000 |
| | **एकूण अंदाजीत खर्च** | | | | | | **40,53,960.3/-** |

*उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार अ. क्र. 1,3,10,12,13,14 व 23 साठी मे. अमरज्योत इंटरप्राइजेस, उल्हासनगर, अ.क्र. 16 व 18 साठी मे. मोहित इंटरप्राइजेस, उल्हासनगर, अ. क्र. 2,4,5,6,7,8,9,11,15,17,19,20,21 व 22 साठी मे. मोहिनी इंटरप्राइजेस, उल्हासनगर यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत. प्राप्त दर मागील वर्षीच्या दरांपेक्षा व बाजारभावापेक्षा वाजवी आहेत.*

*उक्त एकुण अ. क्र. 1 ते 23 वरील नमुद केलेली सफाई साहित्य खरेदी करण्यासाठी अंदाजीत खर्च रुपये 40,53,960.3/- खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सन 2018-19 साठी भांडवली खर्च भाग-2, सी-1 (1) साफसफाई साहित्य खरेदी या लेखाशिर्षकात रुपये 1,00,000,00/- तरतूद करण्यात आली आहे. पैकी पुर्ण तरतूद शिल्लक आहे. त्यातून करण्यात येत आहे. तरी सदरच्या खर्चास व तसेच उक्त सफाई साहित्यासाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. अमरज्योत इंटरप्राइजेस, मे. मोहित इंटरप्राइजेस, व मे. मोहिनी इंटरप्राइजेस, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (क) अन्वये मान्यतेसाठी सविनय सादर.*

**स्थायी समिती ठराव क्र.** ३५ **दिनांकः- ५/१०/२०१८**

सुचकाचे नाव :- श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २०१८-१९ करीता सफाई कर्मचा-यांसाठी संरक्षणार्थ साहित्ये व शहरातील सफाई व स्वच्छतेसाठी आवश्यक सफाई साहित्याचा पुरवठा करुन घेण्यासाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मे. अमरज्योत इंटरप्राइजेस, मे. मोहित इंटरप्राइजेस, व मे. मोहिनी इंटरप्राइजेस, उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :-** विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३ :-** डंपिंग ग्राऊंडवर घनकचरा सपाटीकरणासाठी मशिनरी उपलब्ध करून देण्यासाठी न्युन्नतम दर सादर करणारे निविदाकार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कं.ली., उल्हासनगर

यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

---

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**दरवर्षी आपण सपाटीकरणाला किती खर्च करतो.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—</u>**मा. महोदया, मागील वर्षी ज्याप्रमाणे रिक्वायरमेंट होती. त्या अनुषंगाने अडीच कोटीचा खर्च होता. आता सदर ठिकाणी कच—याचा ढिग निर्माण झालेला आहे. तेथे जागा कमी आहे, त्या कच—याची लेव्हलींग करायला आणि नियोजन करायला आता सध्या दोन बुलढोजर आणि दोन प्रोक्लेनची आवश्यकता लागेल. त्यामुळे सदरचा खर्च प्राप्त दरानुसार ३ कोटी ५२ लाख अपेक्षित आहे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**खेमाणी येथे जे डंम्पींग ग्राउंड होते ते सर्वात उंच होते. दरवर्षाला असा किती खर्च येतो.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—</u>**२०१५—१६ चा विचार केला तर साधारण साडे तीन चार कोटीचा खर्च होता.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**कुठला.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—</u>**म्हारळ गावचा.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**तेव्हा मशिन किती लावले आपण.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—</u>**तेव्हा मशिन चार ते पाच अशा होत्या.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>** दोन मशिन आहेत, ३ कोटी ५२ लाखाचे.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—</u>**नाही चार मशिन आहेत. दोन बुलडोझर, दोन प्रोक्लेन.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**आता पुन्हा पाहिजेत.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—</u>**होय आवश्यक आहेत.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**त्यास सहा महिने सुध्दा झाले नाहीत.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—</u>**२०१६ , ऑक्टोंबरपासुन आपण तेथे डंम्पींग ग्राउंड सुरु केले आहे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**दोन वर्षापुर्वी झाले.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—</u>**हो दोन वर्ष आता होईल.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**खर्च जास्त आहे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**हा खर्च जास्त आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**साहेब विषय असा आहे की आपण कचरा उचलायला, डंम्पींग करायला जो खर्च करतो, सपाटीकरणाला सुध्दा खर्च होतो.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—</u>**मागच्या वर्षी साहेब, २ कोटी ५८ लाखापर्यंत खर्च झाला. रेटमध्ये जास्त फरक नाही. मागील वर्षापेक्षा बुलडोझर १.८० वाढीव दर आलेला आहे आणि प्रोक्लेन जे आहे ते १.७५ आहे. एक टक्का, दोन टक्का खर्च वाढत आहे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**कचरा डंम्पींग ग्राउंडवर टाकण्यासाठी आपणांस खर्च किती येतो.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**४ लाख ४६ हजार.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**हा प्रत्येक दिवसाला किती येतो.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**साधारण १ लाख.

**सदस्य श्री. भगवान भालेरावः—**म्हणजे जवळ जवळ पाच ते साडे पाच लाख खर्च आपणांस येतो. औषध मारुन व पगार वेगळाच. कचरा पुर्णपणे उचलला जातो का? पुर्णपणे सफाई आहे का? आता माझ्या प्रभागात जे ओपन प्लाट पडले आहेत, एकतर नोटिस देत नाही ही लोक आणि कचरा टाकला जातो. ओपन प्लाट असल्यामुळे तेथे कोणीही कचरा टाकतो. तुम्ही बालकनजी बारी पहा, त्या शाळेच्या आजुबाजुला कच—याचे ढिग पडलेले आहेत. असे असतांना तो कचरा कोणी उचलायचा.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**कुठलाही कचरा असो जेसीबी डंम्परद्वारे तो उचलुन घेत असतो.

**सदस्य श्री. भगवान भालेरावः—**पाहिजेतर सभा होवु दया आपण आयुक्त साहेबांना घेवुन जावु. बालकनजी बारीला जवळ जवळ सहा हजार विदयार्थी शिकतात. तेथे पहा कमीत कमी दोनशे अडीचशे ट्रक कचरा मिळेल.

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—**दोनशे ट्रक?

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**होय.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**प्रायव्हेट प्लाट असेल. मी ते पाहतो. जर प्रायव्हेट प्लाट असेल तर त्यांनी त्यांच्या लेव्हलला प्रोटेक्शन करुन कचरा उचलला पाहिजे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**तेथे कमीत कमी पाचशे लोक रोज शौचालयाला जात असतील. अशी परिस्थिती असतांना तेथे कचरा असतो, ओपन प्लाटमध्ये. इंडस्ट्री झोनमध्ये बरेच ओपन प्लाट आहेत, प्रत्येक प्लाटवर २५—२५ गाडया कचरा निघेल.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**पाण्याच्या टाकीजवळचे म्हणता का बाल्कनजी बारी. तेथे एक्सेस नाही आणि जेसीबी डंम्पर जायला पण इश्यु आहे तेथे. तो बराच आतील भाग आहे. बालकनजी बारी एका संस्थेची जागा आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**तेथे राहणारेच लोक कचरा टाकतात ना. त्यांनी कंपाउंड बांधले होते ते सुध्दा मागे तोडले.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**सांगायचे तात्पर्य साहेब,ही अमाउंट जास्त वाटते. चार साडेचार लाख रुपये जर संपुर्ण दिवसाचे कलेक्शन असेल. घरोघरी कच—याचे कलेक्शन होते. फक्त सपाटीकरणासाठी एवढा खर्च. तुम्हांलाच योग्य वाटत असेल परंतु आम्हांला योग्य वाटत नाही. चार लाख रुपये दिवसाचा फक्त कलेक्शनचा खर्च आणि १ लाख सपाटीकरणासाठी. तुम्ही समर्थन करता तर चुक आहे. मागील वर्षी अडीचशे कोटी, वाढुन वाढुन किती वाढले पाहिजे. ज्या डंम्पींग ग्राउंडवर जेथे डोंगर झाले होते तेथे एवढा खर्च कधी झाला नव्हता.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—**साहेब, एक मशिन वाढली आहे त्यामुळे तो खर्च वाढलेला दिसतो. मात्र तेथे जागा खुपच अपुर्ण आहे त्यामुळे नेहमीचा जो कचरा येतो. जोपर्यंत तो डोझरने शिप्ट करत नाही तोपर्यंत ती जागा आपणांस मिळत नाही कचरा टाकण्यासाठी.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**कच—याच्या संदर्भात आपण उल्हासनगरला अजुनही स्वंयपुर्ण झालेलो नाही. जेथे जेथे जाणार तेथे कचरा असतो तेथे तुम्ही सुध्दा पाहत आहात. उदा. भगवान भालेराव तेथे काम करत असेल तर त्यास तेथुन बदलावे लागेल. तुम्ही बदल करा ना, काही तरी बदल करावे लागतील तुम्हांला. बदल केल्याशिवाय कच—याची समस्या सुटणार नाही.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**वर्षानुवर्षे तीच कंपनी आहे. काय लागेबांधे आहे काय माहित.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>**साहेब आपण ई—निविदा प्रसिध्द केलेली असते, वृत्तपत्रात जाहिरात दिलेली असते.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**सी.सी. टीव्ही लावा साहेब, कोणती मशिन किती तास चालते आणि किती काम करते काय करते ते कळु दया ना आम्हांलापण.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**आपण त्यांना तासाचे पैसे देतो ना.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>**तेथे सीसी टीव्ही आहेत. मा. सदस्यांनी दिलेल्या निर्देशानुसार त्याची रेकॉर्डींग कशी ठेवता येईल ते पाहण्यात येईल.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**नाही, नाही आमचे म्हणणे एकच आहे. मशिन किती तास चालली पाहिजे. ३ कोटी ५२ लाखामध्ये किती तास मशिन चालली पाहिजे. प्रोक्लेनचा दर तासाला किती दर आहे.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>**प्रोक्लेनचा २९६२.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**तासाचा.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>**होय. आणि डोझरचा ३ हजार आहे. मागील दरापेक्षा हा एक टक्का जास्त आहे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:—</u>**मागील दरापेक्षा नाही, आता मार्केट दरापेक्षा जास्त आहे की नाही आता मला एवढेच सांगा.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>**आता मिळालेले हे दर बाजारभावापेक्षा योग्य वाटतात.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**श्री. भालेरावजी आपण आता एक मुद्दा उपस्थित केला बालकनजी बारी येथे जो प्लाट आहे तेथे कचरा भरपुर पडला आहे. तो प्लाट एक ट्रस्टचा आहे व तो माझ्या प्रभागातील आहे. मला सर्व अडचण माहित आहे. लोकांना सूचना दिल्यानंतर व जनजागृती केल्यानंतर लोक त्या प्लाटवर कचरा फेकत आहेत. त्यांनी भिंत बनविली तरी सुध्दा तेथुन लोक कचरा टाकतात. त्या लोकांना ते शॉर्टकट आहे. येण्याजाण्यासाठी सुध्दा शॉर्टकट आहे व कच—याची विल्हेवाटसाठी सुध्दा शॉर्टकट आहे. जेवढया वेळा भिंत बनविणार तेवढया वेळा कचरा टाकतात. तेथुन लोकांना येण्याजाण्यासाठी शॉर्टकट आहे. दुस—या रस्त्यापेक्षा तो रस्ता येण्यासाठी त्यांना सवलतीचा असतो. त्यासाठी ते भिंत तोडतात व तेथे कचरा सुध्दा टाकतात. आम्ही स्वच्छता निरिक्षकांना सोबत घेवुन जनजागृतीसुध्दा केली. परंतु लोक बदलत नाही. तर आपण काय करु शकता, कसे करु शकता. आपण तेथे जेसीबी डंम्पर घेवुन साफसफाई करुन, बोर्ड लावण्यात यावा व दंड लावण्यात यावा. एरिया आमची आहे तर आम्हांस माहित आहे ना की काय त्रास आहे तेथे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**मुद्दा असा आहे की सफाई झाली पाहिजे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**असे आहे की आयुक्त साहेब म्हणत आहे संस्थेवाले जरा जागा देणार काय, आपण ओला कचरा संपृष्टात आणण्यासाठी बोलु शकतो. तेथिल लोक येवुन तेथे कचरा टाकतील, तेथे कचरा संपतील ना.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**संस्था जर जागा देईल तर तेथे फक्त ओला कचरा संपृष्टात येईल. लोकांना तर सुका कचरा व ओला कचरा तर वेगळा करावा लागणार ना.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**सन्माननिय सदस्य श्री. वदारिया साहेब बोलले की, त्यांचा प्रभाग आहे तर माझा सुध्दा आहे व जास्तीत जास्त ७५ टक्के माझा प्रभाग आहे. बालकनजी बारी ते गांधीनगरचा एरिया ते आझाद नगरपर्यंत. २५ टक्के तुमचा त्या बाजुचा प्रभाग आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:–**जनता माझ्या प्रभागात राहते व प्रभाग आपला असू शकतो.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:–**यासाठी आपल्या प्रभागातील लोकांना आपण सांगितले पाहिजे. कच–याचे आपणाकडेच आहे तर आपणच समजुन सांगितले पाहिजे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**हे पहा महापालिका जनजागृती करणार, आपण त्यांना जावुन समजावणार, पॅनल्टी घेणार याव्यतिरिक्त काय करु शकतो. मी ट्रस्टशी बोलतो.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**२९०० रुपये कुठल्याच प्रोक्लेनला नाही. १७०० ते १८०० प्रोक्लेनचा दर आहे. जर डिझेल वाढले असेल तर त्याचा दर फार फार तर २००० रुपये झाला असेल. तर २९०० दर जास्त आहे. साहेब, माझे मत असे आहे, तासापेक्षा दिवसावर घेतलेले काय परवडेल आपल्याला.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**सांगा जरा एक्सप्लेन करा.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**महापालिकेचा लॉस होतो.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:–**हे जे प्रोक्लेन किंवा डोझर आहे हे तासावरतीच मिळतात, दिवसावर देत नाहीत. दिवसावर दिले तर डिझेल, पेट्रोल काय लागते त्याचा मेंटेनन्स असतो त्याप्रमाणे आपल्याला करावे लागते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**दिवसासाठी घेण्यास आपणांस नुकसान काय आहे ते पहा, आज प्रोक्लेन खराब झाले व पाच तास चालले, तीन बंद राहिले तर पैसे तर संपुर्ण दिवसाचे घेणार.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**पाच तास चालते आणि दहा तासाचे पैसे घेतात. एवढया वर्षापासुन एकाच कंपनीला वारंवार काम कसे मिळते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**ई–निविदा आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**ई–निविदा काय आहे आम्हांस माहित आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**एकाच व्यक्तीस वारंवार काम मिळते प्रत्येक गोष्टीत चिटींग आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**नाला सफाईत सुध्दा तसेच केले.

**सदस्य श्री. भारत राजवानी :–**महासभेत आमची एक सूचना होती की उल्हासनगरमध्ये स्थायी समिती शिकण्यासाठी कोणत्याही एमएलए यांना बोलविण्यात यावे. येथे ज्याप्रकारे सेटिंग होते, श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले होते ना की येथे कसे सेट होतात निविदा ते.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–**हो महासभेत सांगितले होते ना.

**सदस्य श्र. भगवान भालेराव :–**आपल्याच एका सदस्याने सांगितले होते.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**साहेब, तुम्हांला या विषयावर काय वाटते की, चार लाख शहराचे कलेक्शन होते व १ लाख सपाटीकरणासाठी जाते. सोशल मिडीया स्ट्रॉग झाला आहे. नगरसेवकांनाच उत्तर दयावे लागेल.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :–**साहेब, रिटेंडरींग करा, चला.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**हो रिटेंडरींग करा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**आपण बोला परंतु येथे बरेच सदस्य आहेत ना. एक सदस्य नाही. माझे असे मत आहे की हे काम आवश्यक आहे. ५ नंबरला आधीच त्रास आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**त्याची निविदा कधी संपली.

**श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:–**त्याची निविदा १७ सप्टेंबर, २०१८ संपली आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**तो आणखीन काम करणार, नविन निविदा आल्यावर.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**निविदा संपली आहे तर दयावे लागेल ना त्यास. आता आपण ही निविदा आज नाही देत आहोत. त्याच्या गाडीचा, प्रोक्लेनचा जो दर आहे तो दिड टक्के जास्त आहे. पेट्रोलचे व डिझेलचे दर हे शासन दरानुसार १० ते २० टक्के जास्त वाढले आहे. माझे असे मत आहे की त्यांना डंम्पींग ग्राउंडचे काम दिले पाहिजे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**दिले पाहिजे परंतु दर कमी असला पाहिजे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**साहेब, आमचे असे म्हणणे आहे, आता यांचे म्हणणे अत्यावश्यक आहे की नाही तर आमचे सुध्दा तसेच म्हणणे आहे.  तर एक काम करा एक महिन्यापुरते पास करा व नंतर रि—टेंडर करा. अत्यावश्यक आहे तर एक महिना निविदेची मुदत घ्या.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**सपाटीकरणासाठी किती खर्च येतो हे पाहणे तुमचे काम आहे, ओपन मार्केटमध्ये विचारा ना तुम्ही.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**ओपन मार्केटला विचारा ना तुम्ही.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**आपण निविदा काढतो तर आपण ओपन मार्केटमध्येच काढली आहे ना. आपण पेपरला प्रसिध्दी दिलेली आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**साहेब, यापेक्षा कमी दराने पनवेलकर आपणाकडे काम करायला तयार आहे.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**तुम्ही आणा ना त्याला, त्याने निविदा भरली पाहिजे ना.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**मॅनेजच करतात ते. बघा ना तुम्ही. हे करून सगळे अधिकारी बदला सर्व सिस्टमच बदलेल.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—**नाही, ई—टेंडरमध्ये कसे काय मॅनेज करणार. तुमचे जर टेंडर तसे असेल तर तुम्ही निर्णय घ्या आणि सांगा आम्हांला. निर्णय जर तसा असेल तर तुम्ही निर्णय घ्या. तसे सांगा आम्हांला आम्ही तशा पध्दतीने काम करू.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**तुम्ही काम करा, संपुर्ण महापालिकेने काम करा व पहा किती खर्च येतो ते. आणि ई—टेंडर करा. महापालिकेने एक महिना करा आणि मग निविदा करा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**आमचे असे मत आहे की हा विषय झाला पाहिजे, अतिआवश्यक आहे. व ई—टेंडरिंग झाले आहे.  रेट जास्त आहे व कमी आहे, आम्ही ई—टेंडरिंग केले आहे तर मग शासनाला अर्थच काय ई—टेंडरिंगचा. एक टक्का दर जास्त आहे मागील वर्षापेक्षा.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—**कोठे एक टक्के जास्त आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** पहील्या वर्षा पासूनच दिड टक्का रेट जास्त आहेत, पाहीजे तर सभागृहामध्ये मतदान घेण्यात यावे. आम्ही देण्याच्या बाजूने आहेत.

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सचिव मॅडम, मतदान घ्या.

**महापालिका सचिव:—** सभापती मॅडमनी मतदान घ्यायला सांगितले आहे. जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**प्रस्तावाच्या बाजूने मतदान:—**

१. श्रीमती जया प्रकाश माखिजा
२. श्री. जमनादास पुरस्वानी
३. श्री. राजेश वदारिया

४. श्री. दिपक सिरवानी
५. श्रीमती दिप्ती दुधानी
६. श्रीमती मिनाकौर लबाना
७. श्रीमती चंद्रावती सिंग
८. श्रीमती रेखा ठाकुर

**<u>महापालिका सचिव :—</u>**जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**<u>प्रस्तावाच्या विरोधात मतदान:—</u>**

१. श्री. धनंजय बोडारे
२. श्री. राजेंद्र चौधरी
३. श्री. भगवान भालेराव
४. श्री. भारत राजवानी
५. श्रीमती पुष्पा बागुल
६. श्रीमती अंजना म्हस्के

**<u>महापालिका सचिव:—</u>** बहुमताने हा ठराव पास झाला.

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>** सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :—** डंपिंग ग्राऊंडवर घनकचरा सपाटीकरणासाठी मशिनरी उपलब्ध करून देण्यासाठी न्युन्नतम दर सादर करणारे निविदाकार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कं.ली., उल्हासनगर यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

मा. आयुक्त सो., यांनी दिनांक १८/०७/२०१८ अन्वये आरोग्य विभागासाठी जुनी खडी मशिन जवळ, गायकवाड पाडा, उल्हासनगर — ५ येथिल डंपिंग ग्राऊंडवर घनकचरा सपाटीकरणासाठी आवश्यक मशनरी भाडेतत्वावर पुरवठा करून घेण्यासाठी मान्यता दिलेली होती. त्यानुसार ई—टेंडरींगसाठी बनविण्यात आलेल्या निविदेचा मसुदा प्रसिध्द करण्यात आला होता. जाहिर निविदा दिनांक १३/०८/२०१८ रोजी पर्यंत मागविण्यात आलेल्या होत्या. सदर निविदेच्या शडयुल नुसार दिनांक १३/०८/२०१८ रोजी निविदा सादर करण्याची अंतिम तारीख होती. कचरा सपाटी करणाच्या निविदेस दिनांक १३/०८/२०१८ रोजी पर्यंत दोन निविदा प्राप्त झालेल्या असल्याचे ई—निविदा कक्षा मार्फत कळविले असल्याने सदर निविदा प्रक्रियेस दिनांक २३/०८/२०१८ पर्यंत निविदा सादर करण्यास मुदतवाढ (1st Extension) देण्यात आली होती. त्यानंतर दिनांक २३/०८/२०१८ रोजी पर्यंत दोन निविदा प्राप्त झालेल्या असल्याने पुन्हा दिनांक ३१/०८/२०१८ पर्यंत निविदा सादर करण्यास मुदतवाढ (2nd Extension) देण्यात आली होती.

तद्नंतर दिनांक ३१/०८/२०१८ रोजी पर्यंत तीन निविदा प्राप्त झालेल्या असल्याचे ई—निविदा कक्षा मार्फत कळविले असल्याने सदर निविदा दिनांक १०/०९/२०१८ रोजी संध्याकाळी ०४.०० वाजता निविदेचा तांत्रिक बीड/लिफाफा क्र. १ ई—निविदा निविदा समिती व निविदाकाराच्या प्रतिनीधी समोर उघडण्यात आल्या आहे. त्यानुसार निविदा समितीने कागद पत्रांच्या छानणी करून मे. देविचंद लक्ष्मण चव्हाण, अंबिवली, मे. कुमार, इंटरप्रायजेस, कल्याण, व मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कं. ली., उल्हासनगर, तिनही निविदाकार निविदेतील अटी व शर्तीनुसार पात्र असल्याने निविदा समितीने दिलेल्या सुचनेनुसार तीनही निविदाकारांचा वित्तीय बीड/लिफाफा क्र. २ निविदा समिती सदस्य व निविदाकारांचे प्रतिनीधी यांच्या समोर दिनांक ११/०९/२०१८ रोजी दुपारी ३:०० वा. ई—निविदा कक्ष येथे उघडण्यात आले. प्राप्त झालेल्या दरांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Description | M/s Devichan Laxman Chawan Rate per hour (RS.) | M/s Kumar's Enterprises<br><br>Rate per hour (RS.) | M/s Konark<br><br>Rate per hour (RS.) |
|---|---|---|---|---|
| **1.0** | **Bulldozer** | | | |
| 1.1 | Bulldozer D-120 or equivalent | 3300 | 3330 | **<u>3120</u>** |
| **2.0** | **Poclain-Machine** | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2.1 | Poclain EX-200 or equivalent<br>(With bucket) | 3205 | 3219 | **3050** |
| **3.0** | **On call contractor shall provide** | | | |
| 3.1 | Skip loader, Hook loader with container (Rate per day for 8 hrs.) | 9305 | 9350 | **9100** |

उक्त नमुद केलेल्या तपशीलानुसार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कं. ली., उल्हासनगर यांनी सादर केलेले दर न्युनतम असल्याने मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कं. ली., उल्हासनगर यांना जा.क्र.उमपा/आवि/उप.आ/१४७/२०१८ दिनांक १२/०९/२०१८ रोजी अन्वये वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार दिनांक १२/०९/२०१८ रोजी संध्याकाळी ४.०० वा. उप—आयुक्त (आरोग्य) यांच्या दालनात दरांच्या वाटाघाटी केल्या. सदर वाटाघाटीअंती प्राप्त दरांचा तक्ता खालीप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **मागील वर्षाचे मंजूर दर रूपये (सन २०१७—१८)** | **निविदाकाराचे प्राप्त दर रूपये (सन २०१८—१९)** | **वाटाघाटीअंती प्राप्त दर रूपये** |
|---|---|---|---|---|
| **1.0** | **Bulldozer** | | | |
| 1.1 | Bulldozer D-120 or equivalent | 3015 | 3120 | 3090 |
| **2.0** | **Poclain-Machine** | | | |
| 2.1 | Poclain EX-200 or equivalent<br>(With bucket) | 2915 | 3050 | 2980 |
| **3.0** | **On call contractor shall provide** | | | |
| 3.1 | Skip loader, Hook loader with container (Rate per day for 8 hrs.) | 7850 | 9100 | 7850 |

उक्त वाटाघाटीअंती प्राप्त दर मागील वर्षाच्या दरापेक्षा डोझर डी—१२० चे दर २.४८% व पोक्लेन इक्स २०० चे दर २.२२% ने जास्त असल्याने मा. आयुक्त सो., यांच्या आदेशानूसार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कं. ली., उल्हासनगर यांना जा.क्र.उमपा/आवि/उप.आ/१५७/२०१८ दिनांक २५/०९/२०१८ रोजी अन्वये पुनश्च वाटाघाटीसाठी मा. आयुक्त सो., यांच्या दालनात उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार दिनांक २६/०९/२०१८ रोजी दुपारी २.०० वा. मा. आयुक्त सो., यांच्या दालनात पुनश्च दरांच्या वाटाघाटी केल्या. वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **तपशिल** | **निविदाकारांचे प्राप्त दर** | **प्रथम वाटाघाटीअंती प्राप्त दर रूपये (१२/०९/२०१८)** | **द्वितीय वाटाघाटीअंती प्राप्त दर रूपये (२५/०९/२०१८)** |
|---|---|---|---|---|
| **1.0** | **Bulldozer** | | | |
| 1.1 | BEML Bulldozer D-120 or equivalent | 3120 | 3090 | 3070 |
| **2.0** | **Poclain-Machine** | | | |
| 2.1 | Poclain EX-200 or equivalent | 3050 | 2980 | 2965 |
| **3.0** | **On call contractor shall provide** | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3.1 | Skip loader, Hook loader with container (Rate per day for 8 hrs.) | 9100 | 7850 | 7850 |

तरी वाटाघाटी अंती प्राप्त दरानुसार व नमुद केलेल्या परीमाणानुसार डंपिंग ग्राऊंडवर घनकचरा सपाटीकरणासाठी उक्त नमुद ऑन कॉल मशनरी शिवाय प्रामुख्याने डोझर डी–१२० व पोक्लेन इक्स २०० या मशिनरीची आवश्यकता आहे. सद्यास्थितीत २ डोझर डी–१२० व २ पोक्लेन इक्स २०० प्रतिदिन ८ तासासाठी चालल्यास प्राप्त दरानुसार अंदाजीत वार्षिक खर्च खालील प्रमाणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील | आवश्यक मशनरी (नग) | प्रति तास रूपये | एकूण दिवस | अपेक्षित खर्च रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | Bulldozer D-120 or equivalent | २ | ३०७० | ३६५ | १७९२८८०० |
| २ | Poclain EX-200 or equivalent | २ | २९६५ | ३६५ | १७३१५६०० |
| **एकुण** | | | | | **३,५२,४४,४००** |

तरी उक्त कामासाठी वार्षिक रूपये ३,५२,४४,४००/— (रूपये तीन कोटी बावन्न लाख चौरेचाळीस हजार चारशे) ऐवढा खर्च येणार असून सदरचा खर्च भागविण्यासाठी अंदाजपत्रक सन २०१८–१९ च्या भाग — १ सी–१(१) कचरा वाहतुक खर्च या लेखाशिर्षकात रूपये ३०,००,००,०००/— तरतूद केली असून सदरचा खर्च त्यातून प्रस्तावित करण्यात आला आहे. तरी न्युनतम दर सादर करणारे निविदाकार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर, लि. उल्हासनगर, यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव मा. स्थायी समितीस सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ३६** **दिनांक:–५/१०/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार डंपिंग ग्राऊंडवर घनकचरा सपाटीकरणासाठी मशिनरी उपलब्ध करून देण्यासाठी न्युन्तम दर सादर करणारे निविदाकार मे. कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कं. ली., उल्हासनगर यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**बहुमताने**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** विषय क्रमांक ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.४ :—** उल्हासनगर महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा मुबई यांचे द्वारा नियुक्त सुरक्षा रक्षकांना मुदतवाढ देणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे.

---

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**पुर्वी उदयानात एक वॉचमन, माळी वगैरे असायचे. आता उदयानाकडे लक्ष दयायला कोणच नाही. दिवसेंदिवस उदयानाची परिस्थिती खराब होत आहे. आम्ही बोलुन बोलुन थकलो आहोत परंतु आज एक सुध्दा वॉचमन उदयानामध्ये नाही. फारच चुकीचा वापर तेथे होतो तर मग आपण आपल्या महापालिकेचा

सिक्युरीटी का नाही वापरत तेथे. आज तिथे फालतूगिरी होत आहे, लोक येऊन तिथे त्रस्त होत आहेत. तर आपण आपल्या पॉपर्टीसाठी एक वॉचमन का ठेवत नाही.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**वॉचमन ब—याच ठिकाणी ठेवावे लागतील. शाळा आहेत, ब—याचशा शाळा चांगल्या आहेत. तेथे वॉचमन पाहिजेत. गार्डन आपण तयार करतो गार्डनला माळी नाहीत. आपण विकास करतो की काय करतो तो कोणासाठी करतो. तुम्ही सुधारणा सुध्दा चांगल्या दिल्या आहेत, ग्रीन स्पेसमध्ये. परंतु गार्डन तयार करणे हे गर्दुलेचे, जुगाराचे अड्डे तयार होणार आहेत कारण तेथे सिक्युरीटी नाही. शाळेची सुध्दा अवस्था तशीच आहे, आता मला श्री. दिलीप गायकवाड यांनी सुध्दा सांगितले. २० नंबर, २६ नंबर शाळा दुरुस्त केली, चांगली केली तेथे दारुडे बसायला लागले आहेत. तेथे पंखे गायब होतील, तेथे बॅचेस गायब होतील. जेथे आवश्यकता आहे तेथे टाकी, पाण्याची टाकी यांनी जसे सांगितले, जेथे पाण्याची टाकी आहे तेथे वॉचमनच नाही. ते वाढवा वाटल्यास.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**येथे तफावत बघा एकीकडे ३ कोटी ५२ लाखाची निविदा घेत आहोत कारण येथे आर्थिक स्त्रोत आहे म्हणुन. आणि येथे बघा ही सिक्युरीटी निम शासकिय आहे. किती महिने अगोदर यांची निविदा संपलेली आहे? आता एक दिला आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** तुम्ही वाढवा पाहीजे तर कसे मार्ग काढायचा पण सुरक्षा रक्षक मिळाले पाहीजेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** कसे आहे साहेब, आता इथेच बघा तफावत कशी आहे? एकीकडे ३ कोटी, ५२ लाखाचा एक अत्यावश्यक टेंडर येत आहे. कारण इथे आर्थिक सोर्स आहे म्हणून आणि इथे बघा हे सुरक्षारक्ष निमशासकिय आहेत. किती महीने आधी यांचा टेंडर संपलेला आहे.

**सुरक्षा रक्षक, श्री. बाजीराव जाधव:—** ३० सप्टेंबर पासून टेंडर संपला आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** बघा यांचा टेंडर यायला उशिर लागतो, कारण इथे आर्थिक सोर्स नाही. आधी शासनाला पगार जाणार, मग शासन त्यांना पगार देणार. ही तफावत बघा, आपल्याच कर्मचा—यांना त्यांना दोन दोन महीने पगार नाही, आपल्या सुरक्षाकांना आणि इथे अत्यावश्यक सेवा म्हणून जास्त खर्च करतो, म्हणजे यांना इतिवृत्ताची वाट न बघता ताबोडतोब हे करून दयायचे आणि मला वाटते १ वर्षाचे आणण्यापेक्षा साहेब, एक, दोन वर्षापेक्षा जास्त, कमीत कमी ३ वर्षे आपण सुरक्षारक्षक करायला पाहीजेत. एक वर्षासाठी आपल्याकडे येतात आणि परत त्यांना दोन, दोन, तीन, तीन महीने पगार मिळत नाही. अशी परिस्थिती होती.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** झाले काय माहीती आहे का? सुरक्षारक्षकांमध्ये एकुण ९६ लोक टोटल काम कारीत आहेत. त्यातील ४६ लोक सुरक्षारक्षकांची कामेच करीत नाहीत. म्हणून आम्ही या महीन्यामध्ये त्यांचे पगारच बंद केले आहेत. आहेत कुठे हे सगळे? ९६ आपल्या रेकॉर्डवरती आहेत.

**सुरक्षा रक्षक, श्री. बाजीराव जाधव:—** ६० कार्यरत आहेत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** ६० कार्यरत आहेत आणि परत आपण हे ३१ घेतलेले आहेत ना, म्हणजे टोटल किती झाले आता ९१, ९१ मधले ४५, ४६ लोक कुठे आहेत, पत्ताच लागत नाही. नेटकेला पण माहीती नाही कुठे आहेत ते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव**:— कुठे आहेत?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** गेले कुठे ते गार्डनमधून गेले कुठे ते, या पुढे स्ट्रीम लाईन करायचे आती मी त्याच्यावरती काम पण सुरू केले आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** हे नेटकेजी बघतात ना, आनंद नगरचा प्लॉट आहे....

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** मी तेच सांगता आहे की, आपल्याकडे मॅन पॉवर नाही, असा प्रश्न नाही, ९१ लोक आहेत, अजून ज्यांचा आपण देत आहोत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** निम्याच्या वरती कामच करीत नाहीत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** नेटकेला मी तेच सांगितले की, पहीले याचा हिशोब लाव पाहीले आणि हा हिशोब लावू आपण कोण काय करते? कोणी सुरक्षारक्षक म्हणून काम करतो? कोणी वॉलमन म्हणून काम करतो? कोणी इथे पगार घेतात पण कामच कुठे काहीच करीत नाहीत. तो म्हणतो इकडे आहे, तो म्हणतो तो तिकडे आहे. जो पर्यंत काही लोक म्हणतात की हे पाणी पुरवठयाला आहेत, पाणी पुरवठा विभागाला विचारले तर ते म्हणतात की माझ्याकडे माणसच नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभाग म्हणजे हे सर्व स्ट्रीम लाईन मिस झालेल्या आहेत, सगळे सुरक्षारक्षक मिस झालेलेआहेत. म्हणून या महीन्यामध्ये आम्ही नेटकेच्या अंडरमध्ये जेवढे सुरक्षारक्षक आहेत, त्यांचेच पगार दयायचे बाकीच्याचे पगार बंद करायचे आहे. एक तर हे सगळे लोक आम्ही कॉरम फॉर्मवरती घेतो. बाकीच्या डिपार्टमेंटमधून त्यांना काढून घेतो. त्यांना सुरक्षारक्षकांच्या अंडरमध्येच ठेवू आणि मग त्यांना आपण गरजेनुसार अलाटमेंट करू. बरेच लोक क्लार्क म्हणून काम करतउत कोणी वार्डामध्ये काम करीत आहेत. म्हणजे त्याचे मुळ काम सोडून तो भलतेच काम करीत आहे आणि या लोकांचा शोध लावणे हे नेटकेला दोन महीन्या पासून शक्य होऊन राहीले नाही. म्हणून आता या महीन्या पासून...

**सुरक्षा रक्षक, श्री. बाजीराव जाधव:—** सार्वजनिक बांधकाम विभागाला पण पत्र दिले आहे, पाणी पुरवठा विभागाला पण पत्र दिले आहे.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—** साहेब, नेटके आज स्थायी समितीच्या मिटींगला आले नाहीत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** नेटके आज डिझार्टमेंटच्या मिटींगसाठी गेले आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** नाही, नाही, आपल्याकडे त्यांची नावे असतील ना.

**सुरक्षा रक्षक, श्री. बाजीराव जाधव:—** होय सर आहेत ना.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मग आत ते कुठे काम करतात हे माहीत नाही?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** आस्थापना सामान्य प्रशासन विभागाकडे आहे, त्यामुळे सामान्य प्रशासन विभागाने त्यांची अपॉईटमेंट केली आहे, कोणाची अपॉईंटमेंट कुठे झालेली आहे...

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** भालेरावजी, आयुक्त साहेब स्वत: मान्य करीत आहेत.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** सामान्य प्रशासन विभागातून...

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** त्यांना पण माहीत नाही, डिपार्टमेंटला पण माहीती नाही.

**सदस्य, श्री. भारत रामचंदनी:—** परंतु पगार घेत आहेत, असे कसे चालेल?

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** म्हणून या महीन्या पासून सांगितले आहे की, जे लोक पॅरोलवर सुरक्षारक्षकाचे काम करीत आहेत, जे नेटकेच्या अंडर आहेत, तेवढयाच लोकांचा पगार होईल. बाकी लोकांचे पगार होणार नाहीत, त्यांनी यावे नेटकेना रिपोर्टींग करावे, कुठे काम करीत आहेत, ते सगळे सांगावे त्यांची डयुटी वैगेरे आपण नंतर स्ट्रीम लाईन करू. मग आपल्याला माणसे मिळतील, माणसे नाहीत, अशातला भाग नाही. मिस मॅनेजमेंट आहे. ते मी दोन महीन्या पासून हे सांगत आहे, हे कसे करायचे? काय करायचे?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** नाही, नाही, असे जर होत असेल, तर स्ट्रीकली सिक्युरीटी बोर्डाकडे तुम्ही हे करा.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** नाही, सिक्युरीटी बोर्डाकडाचे नाहीत, हे आपले लोक आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** हे आपलेच लोक आहेत,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** त्यांचे बरोबर असतील.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** इथे जे ९६ लोक आहेत, ते कोणी बदली करून पाणी पुरवठयामध्ये गेला आहे, तिथे कामावर नाहीत, परत त्यांची मागणी येईल की, अजून आम्हांला चार लोक दया, आपण बालकनजी बारीच्या

टाकीसाठी साहेबांना परत परत बोलत आहेत. साहेब बोलतात की आपण खर्च करू शकत नाही, बजेट नाही, हा प्रॉब्लेम आह, तो प्रॉब्लेम आहे आणि आता यांना ठेवत आहेत आणि त्यांना ४० टक्केच्यावर देत आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** पाणी पुरवठयाचे लोक भरपूर रिटायर झाले आहेत, जे आहेत, ते खुपच कमी असतील, त्यांची शोधशोध करायला लागेल,

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** इथे जे रेकॉर्डवर आहेत, त्यांना आपण सुरक्षारक्षक म्हणूनच घेऊ आणि माणसाने सुरक्षारक्षकाने वॉलमनचे काम करावे असे अपेक्षीत नाही, त्यांनी सुरक्षारक्षकाचेच काम करावे. वॉलमन दुसरे मागवू आपण.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** सिस्टम पण चुकीचे नको व्हायला ते पण बघा.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** नाही, तेच, तेच शेवटी आपण फायनल करू.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ठिक आहे, इतिवृत्ताची वाट न पहाता,पास...पास...

**महापालिका सचिव:—** पास...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** यामध्ये जे ४३ टक्के आपण प्लस करून देत आहेत, ते काय आहे साहेब, थोडे सांगणार का, गोषवारा बघा तुम्ही त्यामध्ये आहे. ४३ टक्के प्लस आहे आणि त्यांचे मंडळ आहे, मंडळाच्या नावावे आपण देत आहेत, तेच मी विचारत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** यामध्ये विशेष भत्ता, महागाई भत्ता सर्व मिळून आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** इथे दिड टक्केचा फरक आहे, सर्व मिळून ३ करोड झाले.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** दिड टक्के वाढवले होते, त्यांनी एकगाडी वाढवली.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** नाही नाही इथे वाढेलना आता

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** भरपूर जागेवर आता बील वाढेल, सर्वांमध्ये वाढेल.

**महापालिका सचिव:—** पास...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** पास. पास..इतिवृत्ताची वाट न पहाता पास...

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** हे तर चौधरी साहेबांनी पहीलेच बोलेले की, सर्वांमध्ये इतिवृत्ताची वाट न पहाता पास...

**महापालिका सचिव:—** सर्वांमध्ये नाही, फक्त याच्यामध्येच आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** इतिवुत्ताची कोण बोलत आहे यामध्ये?

**सदस्य, श्री. राजेद्र चौधरी:—** जो सिक्युरीटीवाला आहे, त्यामध्ये ना.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मी इतिवृत्त वाचेल तेव्हा बोलेल, इतिवृत्त तर वाचेल ना.

**सदस्य, श्री. राजेद्र चौधरी:—** तुम्ही नव्हते, पण आम्ही सर्व लोक तर इथे होतीच ना.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मी इतिवृत्त बघूनच बोलेल ना, तुम्ही काय बोलेल ते मी वाचेल ना, मी बाहेर गेलो होतो, जसा आहे, तसेच इतिवृत्त वाचून करू.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** म्हणजे तुम्हांला माहीत होते की, हा ठेकेदार कोण आहे?

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ४ :—** उल्हासनगर महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा मुबई यांचे द्वारा नियुक्त सुरक्षा रक्षकांना मुदतवाढ देणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

सुरक्षा विभागामार्फत सुरक्षा रक्षक मिळणे कामी विविध विभागाकडुन महापालिकेच्या मालमत्तेच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी सतत मागणी होत असते परंतु सुरक्षा विभागाकडे सुरक्षा रक्षक मागणीपेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक ८/१०/२०१३ ,२७/११/२०१४, १३/१०/२०१५, ०६/०९/२०१७, व २९/०९/२०१८ रोजीच्या मान्यतेने तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६३ दिनांक १७/१२/२०१३ ठराव क्रमांक ६६ दिनांक ३०/१२/२०१४ अन्वये ठराव क्रमांक ५७ दिनांक ०२/१२/२०१५ ठराव क्र. ७३ दिनांक २९/०९/२०१६ ठराव क्र. ४० दिनांक ०३/१०/२०१७ अन्वये. उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे रक्षण करणेसाठी मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्या करिता) यांचे कडील २१ सुरक्षा रक्षक घेण्यात आलेले असुन त्यांची ०१ वर्षाची मुदत दिनांक ३० सप्टेंबर २०१८ रोजी संपुष्टात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय व प्रभाग कार्यालये येथे संप, मार्चा, घेराव, धरणे, व आंदोलने या सारखे प्रकार मोठया प्रमाणावर होत असतात. करीता अधिकारी/पदाधिकारी यांना अंगरक्षक तसेच मालमत्तेच्या संरक्षणासाठी यापूढे सुरक्षा रक्षकाची आवशक्ता लक्षात घेता तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेमध्ये दिवसें दिवस विस्तार होत असल्याकारणाने सुरक्षिततेच्या दृष्टिकोणातुन महापालिका प्रशासकिय भवन, तसेच चार प्रभाग समित्या, इत्यादी ठिकाणी सुरक्षा रक्षकांची आवश्यक्ता आहे.

महापालिका सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडुन २१ सुरक्षा जवानांना ०१ वर्षाची मुदतवाढ देणे कामी प्रस्तावित आहे. प्रती सुरक्षा रक्षकास ०१ महिन्या करीता **२२,४९६.००/—** तर २१ सुरक्षा रक्षकांना ०१ महिन्यासाठी **४,७२,४१६.००/—** तर २१ सुरक्षा रक्षकांना ०१ वर्षाकरीता **५६,६८,९९२.००/—** येवढा खर्च अपेक्षीत आहे.

मा.सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडुन घेण्यात येणा—या सुरक्षा रक्षकांच्या पगारात दर दोन वर्षानी व इतर भत्यात दर सहा महिन्याने वाढ होत असते. त्याच प्रमाणे मुळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन, नोंदीत सुरक्षा जवानांचा किमान वेतनावर मुळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन मुख्य मालकाने ४६.७५ टक्के दराने लेव्ही देणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे घर भाडे भत्ता, प्रवास भत्ता व अतिकालीक भत्ता या वर ४.७५ टक्के दराने लेव्ही देणे मुख्य मालकाला बंधनकारक राहिल.

तसेच ज्या विभागामध्ये सुरक्षा रक्षकांना कामगार विमा योजना लागु नाही. अशा मुख्य मालकांनी ४३ टक्के लेव्ही किमान वेतनावर ( मुळ वेतन +विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन,) देणे बंधनकारक राहिल.

सबब. मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडील कार्यरत २१ सुरक्षा रक्षकांना एक वर्षा करीता मुदत वाढ देणे आवश्यक आहे. त्यावर येणारा खर्च महापालिका अंदाजपत्रकातील अ. १ (२४) आस्थापना रोजंदारी/मानधन इत्यादी या लेखाशिर्षकातील मंजुर तरतुदीतुन करणेसाठी मा. स्थायी समितीच्या प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३७ **दिनांक:— ५/१०/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा मुबई यांचे द्वारा नियुक्त २१ सुरक्षा रक्षकांना एक वर्षासाठी मुदतवाढ देणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिवः—** विषय क्रमांक ५ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.५ :—**मनपा शाळांतील विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संच पुरवठा करणेकामी सर्वात न्युनत्तम दराचे निविदाकार मे. अंकुर एंटरप्रायझेस, मे. ऑनेस्टी सायन्टीफिक व मानसी महिला औदयोगिक उत्पादक सहकारी संस्था (मर्या.) यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** काय विषय आहे? आणि काय काय दयायचे आहे?

**लेखापाल, शिक्षण मंडळ, श्रीमती निलिमा कदमः—** खरे तर शिक्षण मंडळ यामध्ये संपर्ण किट देते, त्यामध्ये स्कुल बॅग राहते, स्कुल बॅग मध्ये एक वॉटर बॅग असते, एक टीफिन असते, नोट बुक असतो, नोट बुकमध्ये ड्राव्हिंग त्याच्या नंतर रायटींगचे मटेरीयल असते, कंम्पास बॉक्स, पेन्सील, स्केल, खोड रबर या सर्व गोष्टी यामध्ये असतात.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. आयुक्त साहेब, सरकारतर्फे भरपूर वेळा हे सांगितले गेले आहे की, प्रत्येक विद्यार्थ्यांना हे सामान न देता, त्याच्या खात्यामध्ये हे पैसे टाकण्यात यावे. परंतु प्रत्येक वेळा विषय येतो आणि प्रत्येक वेळा बोलतात की, दुस—या वर्षा पासून त्यांचे पैसे त्यांच्या खात्यामध्ये टाकण्यात येतील, हा लाभ थेट देण्यात येईल. हे असे किती तरी वर्षा पासून चालत आले आहे. तर ही प्रथा कधी संपवण्यात येईल?

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** याच्या पहीले...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** याच्या पहील्यामध्ये पण आयुक्तांनी बोलेले होते, पुढच्या वर्षा पासून, पुढचे वर्षे शेवटी कधी येणार?

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—** या वर्षी गणवेशाचे जे पैसे होते, ते आम्ही थेट त्यांच्या खात्यामध्ये टाकण्यात आले, एस.एम.सी. च्या आणि एस.एम.सी.ला सांगण्यात आले की, तुम्ही खरेदी करा, डायरेक्ट गव्हर्नरमेंटला कनेक्ट आहे आणि आता या ज्या वस्तु आहेत, त्या वेगळया वस्तू आहेत त्या सरकारतर्फे नाहीत तर त्या आपण महापालिकेतर्फे देणार आहेत. याचे टेंडर पण पहीले निघाले होते, त्याचे पैसे थेट त्यांना देण्यासाठी हा टेंडर पहीले निघाला होता आणि हे अर्जेन्सी आहे, त्यामुळे मी डायरेक्ट मंजुरी देण्यात आली. तर तुम्ही बघा यामध्ये काय करायचे आहे ते?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** यामध्ये काय आहे? हे बघा....

**लेखापाल, शिक्षण मंडळ, श्रीमती निलिमा कदमः—** सर यामध्ये खरे तर असे आहे की, या विषयावर मागच्या वेळेस सेम गोष्टी म्हणून डिलीट झाला होता, मागच्या वेळेस अेसेच आपण डिबीटीमध्ये अडकलो होतो आणि उशिर झाला होता मुलांना देण्यासाठी आणि आता जस्ट आमच्या याच्यामध्ये इजीचे ऑडीट झाले, इजीच्या ऑडीटमध्ये सेम त्या लोकांनी विचारले फाईल्समध्ये की, तुम्ही उशिर का केला? त्यांना आम्ही सेम गोष्ट सांगितली की, शासनाचा असा

निर्णय होता की, डीबीटीनुसार मुलांच्या खात्यामध्ये पैसे टाकायचे आहे. त्यांनी मला त्यांची ओटींग दाखवली त्यांनी पुण्यामध्ये सुध्दा त्यांनी केलेली आहे. त्याच्यानुसार जर का तुमची महानगरपालिका हे सर्व साहित्य हे महानगरपालिकेच्या फंडातून देत असेल तुम्हांला शासन निर्णय फालो करण्याची आवश्यकता नाही. शासनाच्या फंडातून जर देत असाल तर तुम्हांला हा निर्णय लागू करणे आवश्यक आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** **श**ासनाचा निर्णय फालो करणे जरूरी नाही, परंतु जरूरी आहे असे काही बंधन नाही, की करू नका. आज आपण एका विद्यार्थ्यावर ५० हजाराच्या जास्त वर्षाचा खर्च करीत असतो. उल्हासनगर महानगरपालिका ५० हजाराच्या जास्त आपण खर्च करीत असतो, एका विद्यार्थ्यावर उल्हासनगरचा एक पण विद्यालय असा नाही, मोठमोठे विद्यालय उल्हासनगरचे, झुलेलाल स्कुल असेल, एन.सी.टी. स्कुल असेल किंवा कोणतेही इग्लिश मेडीयम त्यामध्ये शिकणा—या विद्यार्थ्यांना २० हजाराच्या जास्त खर्च येत नाही. आपण त्यांना चांगले शिक्षण पण देत नाही आणि आपण ५० हजाराच्या जास्त प्रत्येक वर्षी खर्च पण करीत असतो. सरकारचे अनुदान सोडून, पगार पण सोडून ५२०० विद्यार्थ्यांवर २५ करोड रूपये उल्हासनगर महानगरपालिका खर्च करते आणि आज आपण दोन दोन हजारचे साहित्या प्रत्येक विद्यार्थ्यांना देत आहेत आणि हे जे साहित्य आहे, ते किती विद्यार्थ्यांन मिळेल किंवा मिळणार नाही, किती विद्यार्थ्यांना पोहचेल, किती गैर हजर आहेत? आणि किती हजर आहेत? ते पण नुकसान होईल. जर आपण ५२०० विद्यार्थ्यांचे जर खाते उघडलेले असेल आणि त्यांच्या खात्यामध्ये जर आपण दोन, दोन हजार रूपये टाकले, तर ते जास्त लाभदायक होइल. शासनाची गाईड लाईन असेल किंवा नाही. तर हे जे सामान आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** त्यांच्या खात्यामध्ये टाकायला पाहीजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** होय, त्यांच्या खात्यामध्ये जायला पाहीजे.

**लेखापाल, शिक्षण मंडळ, श्रीमती निलिमा कदम:—** खरे तर अकॉउंटचा विषय असा येतो की..........

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** पी.पी. म्हणजे काय?

**लेखापाल, शिक्षण मंडळ, श्रीमती निलिमा कदम:—** पी. प्रायमेरी, बालवाडी

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** बालवाडी आपल्याकडे नाही ना, त्यांच्याकडे असेल.

**लेखापाल, शिक्षण मंडळ, श्रीमती निलिमा कदम:—** नाही सर, अंगणवाडी त्यांच्याकडे असते, आपल्याकडे बालवाडी असते.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** सर्व शिक्षा अभियानचे विद्यार्थी इकडे आहेत,

**लेखापाल, शिक्षण मंडळ, श्रीमती निलिमा कदम:—** सर्वशिक्षा अभियानचे विद्यार्थी यामध्ये येत नाहीत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** त्यांचा संबंध येत नाही.

**आयुक्त, श्री. गणेश पाटील:—** सर्वशिक्षा अभियान जो आहे, ना ते सर्वांसाठी आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** बेसिकली शाळा महानगरपालिकेच्या आहेत. शासन निर्णय जरी असला आता लोकांचे अकॉउंटस नाहीत. झोपडपट्टीतील विद्यार्थी आहेत. प्रत्येकाचे अकॉउंटस नाहीत, मध्ये लोकमतमध्ये अर्टीकल आले होते आणि प्रत्यक्ष झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांना विचारले बोलणे सोपे असते.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** आपण करू.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** करणार कधी? तुम्ही फक्त उंच महालात राहणा—यांचे विचार करीत आहेत, झुलेलाल शाळेमध्ये काय आहे? साधूबेलामध्ये काय आहे? झोपडपट्टीमधल्या शाळेतील विद्यार्थ्यांचा विचार करणार की नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** हे बघा सर्वशिक्षा अभियानामध्ये २५ टक्के कंपलसरी आहे. मोठमोठया शाळांमध्ये मुलांना शिकवू शकतो. आपण विद्यार्थांना कमी पैशामध्ये चांगले शिक्षण देवू शकतो. सर्वांना आपण त्यांची फी भरून दुस—या विद्यालयामध्ये शिकवू शकतो. खर्च कमी येईल, जर ५२०० विद्यार्थ्यांना आपण

वेगवेगळया विद्यालयामध्ये टाकले आणि आपण त्यांची फी, महानगरपालिकेने पेड केली तर कमी खर्च येईल. ५२०० विद्यार्थांना जर आपण वेगवेगळया विद्यालयामध्ये टाकले आणि महानगरपालिकेने त्यांची फी पेड केली तरी आपल्याला खर्च कमी येईल. जर आपण ५० विद्यालयांमध्ये ५००० हजार विद्यार्थांना दुस–या शाळेमध्ये १००, १०० विद्यार्थ्यांना टाकले तर त्यांची फी महानगरपालिका भरेल आणि विद्यार्थी ए.सी. रूममध्ये बसून शिक्षण घेतील.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** सभागृह नेताजी जर महानगरपालिका एखादया प्राव्हेट कंपनीला चालवायला दिली तर तो अजूनखर्च कमी येईल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः–** येईलच.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** एवढा अस्थापनाचा खर्च पण येणार नाही, आणि आपल्याला बसण्याची गरज नाही. ज्या प्रकारे तुम्ही विचार करीत आहेत ना, जर महानगरपालिका रिलायन्स कंपनीला चालवायला दिली, तुम्ही कशा प्रकारे बोलत आहेत, काही पण बोलत आहेत. महापालिका एखादया प्राव्हेट कंपनीला चालवायला दिली तर अजून खर्च कमी येईल.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः–** सव्वा तीनशे करोड....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः–** यामध्ये जो सामान आहे...

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः–** तीनशे, सव्वा तीनशे कोटी वरून नऊशे कोटीवर जातो.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** तीनशे, साडेतीनशे कोटीवर खर्च चालला आहे आणि २५ लाख रूपये मुलांसाठी खर्च होत आहे, तर तुम्हांला हे होत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः–** कोणत्या आधारावर तुम्ही बोलले की, ५० हजार रूपये प्रत्येक मुलावर खर्च होत आहे,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः–** २५ करोड आपले खर्च होत आहे ना.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः–** आपण संपुर्ण बजेट खर्च करतो का?

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः–** एज्युकेशन बोर्ड...

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** त्यांना पगार किती आहे?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः–** मागच्या वर्षी ५२ आपला खर्च झाला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः–** या वर्षी एवढा खर्च होईल, असे मला वाटत नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः–** मागच्या वर्षी आपण ५२ करोड खर्च केला आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः–** मागच्या वर्षी केला पण आता होईल, असे मला वाटत नाही.

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः–** शाळेच्या बांधकामाचे....

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः–** विषय असा आहे साहेब, हे देणे....

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** दयायचे दया, नाही तर देवू नका?

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः–** साहेब, विषय असा आहे की, हे देणे गरजेचे आहे. सहा, सहा महीने उशिर लागला नाही पाहीजे. आमचा मुद्दा असा आहे की, सहा महीने आता गेले आता दिवाळीच्या सुट्टया लागतील आणि सहा सहा महीने उशिर का लागतो?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–** एक मिनीट त्यांना ठरवू दया, दयायचे की नाही. सत्ता पक्ष आहे. नाही दयायचे ते नका देवू.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** आमचे म्हणणे हे आहे की, परंतु देण्याची पध्दत पण ठिक असली पाहीजे. आम्हांला दयायचे आहे, या पेक्षा पण जास्त दिले पाहीजे. वितरण करण्याची पध्दत व्यवस्थित पध्दतीने झाली पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** जुन, जुलैमध्ये दयायला पाहीजे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** जुनमध्ये प्रस्ताव आणून त्याचे, आता काय काय सामान आहे? त्याची क्वालिटी काय आहे? कोणत्या कंपनीचे आहे. कोणते दयायचे आहे, सर्व आले पाहीजे ना. आता जे सामान देत आहेत, जो पण किट देणार आहेत या बॅगचे रेट कोण फिक्स करेल? आता जो टेंडर आला....

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** ई— टेंडरीग झाले आहे, हे पण ई—टेडरींग झाले आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मला पहीले बोलू दया, तुम्ही नंतर बोला,

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** याचे पण ई—टेंडरींग झाले आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** बरोबर आहे, काचेचा ग्लास १० रूपयेमध्ये पण मिळते, काचेचा ग्लास हजार रूपयेचा पण आहे. ही जी बॅग आहे ना, कोणती बॅग लिहीली आहे?

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:</u>** सरळ सांगा मुलांना विरोध आहे, देर आहे, दुरूस्त त्यांना नाही.

**<u>सदस्या, श्रीमती रेखा ठाकुर:—</u>** पहीलेच उशिर झाला आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** तुमचा म्हणण्याचा अर्थ असा आहे की, या बॉटलची कंपनी कोणती आहे?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मी देण्याच्या विरोधात नाही, मी आता पण विचारतो, सामान काय काय आहे?

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** बरोबर आहे, प्रोकलन ३४०० वाला पण मिळते, प्रोकलन २७०० ला पण मिळते.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मला प्रश्न विचारायचे आहे, जर तुम्हांला करायचा तर तुम्ही करा.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** ई—टेंडरींग आह, ते काय बोलणार, क्वालीटी देणारच.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** क्वालीटी आपण काय ठेवली होती, टेंडरच्या वेळी वस्तुचे वजन आणि त्याचे क्वालीटी आणि नोट बुक विषयी आपण काय काय लिहीले होते.

**<u>लेखापाल, शिक्षण मंडळ, श्रीमती निलिमा कदम:—</u>** सर ती पुर्ण फाईल मी तुम्हांला आणून दाखवते, प्रत्येक वस्तु आपण ज्या वेळेला खरेदी करीत असतो, त्या वेळेला आपण एक पेसीफिकेशन डिसाईड करतो, ते स्पेसीफिकेशन मा. आयुक्त साहेबांनी निर्देश दिले होते, त्यानुसार ऑडीट डिपार्टमेंटमधून तो टेंडर आपण पुर्णपणे वेरीफाय करून घेतो आणि पुन्हा अथेटेक केल्या नंतर पुन्हा आपण क्लोज करतो.सगळयांचेच पेसीफिकेशन आहेत आपल्याकडे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** हे सामान आणले आहे आपण ते सॅम्पल दाखवून टेंडर काढला आहे.

**<u>लेखापाल, शिक्षण मंडळ, श्रीमती निलिमा कदम:—</u>** होय,

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** कोण कोणत्या वस्तुचे सॅम्पलआहेत?

**<u>लेखापाल, शिक्षण मंडळ, श्रीमती निलिमा कदम:—</u>** सगळयांचे आहे, स्कुल बॅगच

े आहे, नोट बुक आहेत, रायटींग मटरेल फक्त एकच वस्तू असते, ते कंपनीला सांगावे लागते.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** कोणत्या मटेरियलची गरज पडली तर करू.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** परंतु प्रोकलन पण दाखवून टेंडर झाला होता का? प्रोकलनचा टेंडर दाखवून केला होता का?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** शाळेचा विषय आहे, त्यामध्ये तुम्ही असे करीत आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** प्रोकलनचा टेंडर दाखवून केला होता.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** १०० ग्लास आपण...

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** प्रोकलन चालू आहे की बंद आहे, ३४०० रूपयाचे ते चालू आहे की, बंद आहे, ते दाखवून केले होते का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** अधिकारी लिहीतील की प्रोकलन किती तास चालले आहे,

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** अधिकारी काय लिहीणार?

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** जो विषय चाललेला आहे, त्या विषयावरच बोला.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** तोच चाललेला आहे ना.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** तो विषय संपला आहे, तर त्या विषयावर बोलणे काहीच अर्थ नाही. आता याच विषयावर बोलावे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** हा पण ई—टेंडरींग झाला आहे, तुमचा पण ई—टेंडरीग आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** सॅम्पल दाखवायला पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** सॅम्पल मागवा, आम्ही लोक सॅम्पल बघू नंतर पास करू.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** स्कुलचा आहे, पास करायचे आहे की नाही करायचे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** मतदान करा, मतदान.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** हे जे मटेरीयल तुम्ही मागवला आहे, जो रेट आहे, ७०० रूपये...

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** शाळेसाठी आपले प्रशासन काय करते, करायचे आहे की नाही करायचे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** माझी तुम्हांला विनंती आहे की, हा मुलांचा मुद्दा आहे, पहीलेच उशिर झाला आहे,

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** हे बघा, आम्ही हे म्हणत नाही की, देवू नका परंतु तुम्ही जी बॅग लिहीली आहे, ती बॅग आहे का? बॅग बघितली आहे का? इथे लिहीले फक्त बॅग परंतु ती बॅग कुठे आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** तुमची सत्ता आहे, खाऊन पिऊन मजा करा, सत्तेवर कारवाई करा. ई—टेंडरींगमध्ये काय करणार, ई— टेंडरींगमध्ये जे दिले आहे, तेच देणार ना.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** पहीले आपण चिक्की देत होतो, पहीले आपण सॅम्पलबघत होतो, त्यां नंतर चिक्की देत होतो, आता हा जो अॅटम देणार आहेत, तो आम्हांला पहीले दाखवा. आम्हांला बघायचे आहे.

**लेखापाल, शिक्षण मंडळ, श्रीमती निलिमा कदमः—** एस सर जरूर.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** तुम्हांला दाखवायला काही प्रॉब्लेम आहे का?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** पास करायचा असेल तर पास करा.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** पहीले पास करा, सॅम्पलनंतर दाखवू.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** तुम्ही सॅम्पलघेऊन या आम्ही बघू नंतर पास करू.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—**अजून दोन चार महीने जातील त्यामध्ये

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** तुम्ही उद्या दाखवू शकतात.

**लेखापाल, शिक्षण मंडळ, श्रीमती निलिमा कदम:—** उद्याच दाखवेन.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** नाही, नाही, आता उशिर करायचा नाही. नाही तर रिजेक्ट करायचा तर रिजेक्ट करा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ई—टेंडरींगचा रिजेक्ट करायचा तर रिजेक्ट करा.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**मतदान करा. तुम्हांला पास करायचा नाही तर नका करू. नाही दयायचे तर देवू नका.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** आम्ही देण्याच्या बाजूनेच आहेत....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** पर्सनली यांच्याकडे एक एक सॅम्पलपाठवून दया.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** कोणाचे काहीच नाही, स्थायी समितीचे सर्व सदस्य, सॅम्पलबघतील, त्याच्या नंतर आपला निर्णय देवू.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** काहीच गरज नाही, ई—टेंडरींग झाले आहे, झोपडपट्टीतील लोकांना नाही दयायचे तर तसे बोला.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** मुलांना दयायला उशिर झाला नाही पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** उशिर झाला आहे, पहीलेच दयायला पाहीजे होते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** हा प्रस्ताव मे महीन्यामध्ये यायला पाहीजे, तसे की, जुनमध्ये स्कुल चालू असते,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सत्ता तुमची आहे, तुम्ही आणायला पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** सत्तेमुळे काहीच होत नाही, प्रशासनाकडून काम चालते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सत्ता तर तुम्हीच चालवत आहेत ना.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** सत्ता तर तुमची पण होती, तेव्हा पण असेच होत होते, प्रशासनाला हवे तर काहीच होत नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** आता फुल तुमचीच सत्ता आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. आयुक्तांनी दिनांक २१/८/२०१८ दिले आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** तुमची पण फुल सत्ता होती, तेव्हा पण असेच होते, प्रशासनाला पाहीजे होत होते आणि नाही पाहीजे तर होत नव्हते.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** आयुक्त साहेबांनी निविदा करण्यासाठी मंजुरी दिनांक २१/८/२०१८ ला दिली आहे. त्याच्या नंरच येणार ना, दिनांक २२/८/ला आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. आयुक्तांकडेच होते, आमाच्याकडून उशिर झाला नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:— वो**टींग घ्या, मॅडम वोटींग घ्या.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** पहीली गोष्ट म्हणजे आपण कोणताही निर्णय...

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** दयायचे की नाही दयायचे ते सांगा.

**सभापती, श्रीम. जया माखिजा:—** वरिष्ठ बसले आहेत ना.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** वरिष्ठ कशाला, कोणी वरिष्ठ नाही, इथे सर्व सदस्य आहेत.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** इथे सदस्य, डिमांड करीत आहेत, मतदान करा.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** उद्या आपण बाहेर जावून बोलायचे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** आम्ही देण्याच्या बाजूने आहेत, विरोधामध्ये नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** जे.सी.पी., प्रोकलनची क्वालीटी दाखवली नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** जे.सी.पी. प्रोकलन तासावर चालते, क्वालीटी काय बघायची. आम्ही आज पण होण्याच्या बाजूने आहेत, कदम मॅडमला माहीती आहे, जेव्हा विषय येतो तेव्हा सॅम्पल घेऊन येतात की नाही येत, सांगा तुम्ही.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** चिक्कीचा सॅम्पल आम्हांला दाखवला होता.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** एकाला एक निर्णय, दुस—याला दुसरा निर्णय हे कसे होऊ शकते? निर्णय एकच चालेल ना, ई—टेंडरींग आहे ना. मग ई—टेडरींगच्या हिशोबाने चालेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** परंतु विषय वेगळे आहेत ना, टेंडरींगसाठी सर्वांना दाखवायला लागते.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** कुठे लिहीले आहे?.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** विचारा ना त्यांना.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** गोषवा—यामध्ये कुठे लिहीले आहे?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** सॅम्पलमागवले आहेत ना, दाखवा, एक बॅग देणार तर बॅगेमध्ये किती क्वालीटी आहे, १०० रूपयाची पण बॅग आहे, ५०० रूपयाची पण आहे. सॅम्पलमागवले असेल की अशी बॅग पाहीजे, तीचे वजन निश्चित केले असेल. जेव्हा माल येईल तेव्हा सॅम्पलबघू.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** तुम्हांला काय वाटले हे मला माहीती आहे, त्यासाठी बोलण्याची गरज नाही. पहील्या प्रस्तावा बरोबरा रिलेटेड आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** हा बरोबर आहे, ई— टेंडरींग.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** एक कच—याचा विषय ती वेगळी गोष्ट आहे, मुलांसाठी शाळेचा प्रस्ताव एवढा लेट झाला की, तुम्ही प्रशासनाला विचारायला पाहीजे की एवढा लेट का आला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** पाहीजे तर मिटींगला १०, १५ मिनीटे स्थगीत करा, तुम्ही सॅम्पल मागवून दाखवा. आम्ही सॅम्पलबघू त्याच्या नंतर निर्णय घेऊ.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आम्हांला पण प्रोकलेन कोणत्या कंपनीचा चालणार आहे, तो पण दाखवायला पाहीजे. ते पण दाखवा, इथे आतमध्ये घेऊन या. मतदान घ्या, चला मॅडम,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मतदान कशासाठी घेणार आम्ही देण्याच्या विरोधात नाहीत तर मतदान आम्ही कसे घेणार?

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** नाही मॅडम तुम्ही जमनुजीचे ऐकुन पटकन आदेश दिले तसे आमचे पण ऐका मतदानाचे आदेश दया.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आता तुम्ही कसा आदेश दिला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** आमचे असे आहे की, मुलांना या वस्तू वेळेवर मिळाल्या पाहीजेत. हे लेट झाले आहे. जूनमध्ये हा टेंडर झाला पाहीजे आणि जुलैमध्ये साहीत्य मिळायला पाहीजे, त्यासाठी मे महीन्यामध्ये टेंडर झाला पाहीजे. जुनमध्ये शाळा उघडतील आणि मिळायला पाहीजे. आम्ही त्याच्या विरोधात नाही. गरीब मुलांना या पेक्षा पण जास्त वस्तु दयायच्या असतील तर त्या पण दया. परंतु योग्य वस्तू बघून, क्वालीटी मेंटेन करून टेंडर काढून त्यांना दिली पाहीजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** परंतु ई— टेंडरींग झाले आहे ना.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** ई— टेंडरींग झाले आहे, त्यासाठी कोणती क्वालीटी ठेवली आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** ई—टेंडरींगवाला क्वालीटी बघेल ना, नाही तर त्याचा टेंडर रद्द करा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** आयुक्त साहेबांची जबाबदारी क्वालीटी चांगली असली पाहीजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आयुक्तांना प्राधिकृत करा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** जर क्वालीटी चांगली राहणार नाही, तर ठेकेदारावर कारवाई करायला पाहीजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आपण आयुक्तांना प्राधिकृत करू, ठिक आहे,चला पास...

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** तरी सुध्दा क्वालीटी बघायला पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** आम्हांला नाही बघायची, प्रशासनाने बघायचे.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** ऐकूण घ्या, तुम्हांला बघायचे नाही तर नका बघू, तुम्ही सोमवारी सॅम्पल आणा, सोमवारी आपण सभेमध्ये पास करू.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** याच्या पहीले किती वेळा तुम्ही सॅम्पल बघितले होते, कधी बघितले होते?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** या टेंडरचे सॅम्पल मागवून...

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** मॅडम आमची मागणी आहे की, तुम्ही मतदान घ्या.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** पहील्या विषयामध्ये कसे मतदानाची मागणी केली, तुमचा इंटरेस्ट होता तर त्वरीत मतदानाची मागणी करतात. डंपिंग ग्राउंडचा विषय होतो, तेव्हा तुम्ही त्वरीत मतदान करण्याची मागणी केली. आम्ही एवढे बोलत आहेत की, एक करोड रूपये जात आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** त्यांचे काम आहे, मतदान घेणे, समजत नाही तुम्ही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** ठिक आहे, घ्याना मतदान, आम्ही कुठे मतदानाला घाबरत आहेत. आम्ही डिफर करण्याच्या बाजूने नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** आपण मिटींग स्थगीत करू, सोमवारी

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः— वो**टींग घ्या ना.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** पास करायचा का नाही करायचा

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** सोमवारी सॅम्पल येईल, त्या नंतर सॅम्पल बघून आपण पास करू.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मिटींग सोमवारी ४.०० वाजे पर्यंत स्थगीत करण्यात येत आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** नाही, नाही, तुम्ही कोण आहेत, मिटींग स्थगीत करणारे? कशासाठी मिटींग स्थगीत करायची?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** सोमवारी ४.०० वाजे पर्यंत मिटींग स्थगीत करू.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** सभागृह नेत्यानी सांगितले आहे मिटींग स्थगीत करा.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** सभागृह नेता, इथे सभागृह नेता नाहीत, ते हाऊसचे सभागृह नेता आहे, इथे सदस्य आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** पहीलेच उशिर झाला आहे, आम्हांला पास करायचे आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** आम्ही ही मिटींग स्थगीत करण्यासाठी मागणी करीत आहेत, त्यासाठी वोटींग करा, पहीले आमचे मतदान घ्या.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** विषय चालू आहे, आता.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** असे कसे, सॅम्पल बघून वोटींग कारण सांगा.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** या विषयाचे काय करायचे आहे, त्याच्या नंतर ...

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** स्थगन प्रस्ताव नंतर टाका.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** या विषयाचे काय?

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** पाहीजे तर मतदान करा, पहीले हा विषय क्लीयर करा, नंतर...

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः— श**ाळेला डेव्हलेप करायचे आहे की नाही, मुलांना दयायचे नाही का? तर बोला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** सॅम्पल न बघता,

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** या विषयावर पहीले मतदान घ्या, त्याच्या नंतर तुम्ही ठरवा.

**सदस्या, श्रीम. रेखा ठाकुरः—** आता सॅम्पल उपलब्ध नाही का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** डिपार्टमेंटनेच सॅम्पल आणायला पाहीजे ना.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** एक मिनीट याच्या पहीले झाडू मागवले, ३२, त्यांचे सॅम्पलपाहीजे, त्यांचे सॅम्पलकधी बघितले. पहीले तुम्ही आरोप केले की, ही मिळत नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** गव्हर्नमेंटच्या कंपनीकडून हे सगळे येते.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** आयुक्त साहेब, इथून पुढे प्रत्येक गोष्टीचे सॅम्पल दाखवले पाहीजे, मी परत रिवाईज करतो, ३२ च्या ३२ सर्व झाडूचे सॅम्पल इथे पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** मिटींग स्थगीत करू.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** फिनॅल मटेरीयल येईल ते पण आपल्याला पिऊन बघायचे आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** पहीले या विषयाचे काय करायचे ते सांगा? नियम काय आहे, या विषया बाबत.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** एक मिनीट मला एक गोष्ट सांगायचे आहे आयुक्त साहेब, मला टेंडर संदर्भात एक सांगायचे आहे,आपण हा टेंडर ई—टेंडरींग आहे, ५ (२) (२) मध्ये नाही. सॅम्पल बघायला.

**सदस्या, श्रीमती रेखा ठाकुरः— श**ाळेतील मुलांना हे साहीत्य मिळायला पाहीजे, पहीलेच खुप उशिर झाला आहे आणि चांगली क्वालीटी मिळायला पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** बेस्ट क्वालीटी मिळायला पाहीजे, आमचे पण तेच म्हणणे आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** आम्हांला पण वाटते की, बेस्ट क्वालीटी मिळाली पाहीजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आयुक्त साहेब, बसले आहेत, आयुक्त साहेबांवर विश्वास नाही का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** आमचा विश्वास आहे, मी कधी बोललो की, माझा विश्वास नाही. आताच तुम्ही बोलेल की, डांबराचे साहेबांनी दिले, त्यावेळी तुमचा विश्वास नव्हते का? आम्ही आयुक्तांना प्राधिकृत केले.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** मी प्रोसिजर विचारली.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** त्यांनी प्रोसिजर विचारली.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** मी डांबरला विरोध केला नाही, प्रोसिजर विचारली.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** त्यांनी काय विचारनले, ऐकुन घ्या, की ५ (२) (२) मध्ये दिल्या नंतर परत इथे आणायला पाहीजे, तर आयुक्त साहेबांनी क्लीयर केले.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** या मध्ये असे करा, यामध्ये जसे श्री. भगवान भालेरावजी यांनी सांगितले की, आयुक्तांना प्राधिकृत करू.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आम्ही पण तयार आहेत, आयुक्त साहेब, विषय असा आहे की, ई— टेंडरींग केल्या नंतर....

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** सचिवांना आदेश दया की, यांना लिगल पोझिशन सांगा, सदस्यांनी मागणी केली आहे की, लिगल पोझिशन काय आहे, लिगल पोझिशन सांगा.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** माझे म्हणणे असे आहे की, ई—टेंडरींग झाल्या नंतर आपण ई— टेंडरींगला त्याची क्वालीटी चेक केली का? पहीला लिफाफा उघडतो, त्यावेळेस क्वालीटी चेक करतो का? त्यांची क्वालीटी हे मागवा, ते मागवा, आपण ती कंपनी चांगली असेल, त्याची छानणी करूनच त्यांना टेंडर देतो. त्याचा लिफाफा उघडतो, दुसरा लिफाफा उघडतो, मग ती कंपीनी जर ती चुकीची असेल तर करतो का? आणि कोण हे सगळे बघून घेतो. आपण सॅम्पल कधी बघितले आहेत का? पहीला लिफाफा उघडला असेल तेव्हा बघितला असेल ना.

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—** आपण टेस्टींग करून घेतो.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मी आपले सदस्य, श्री. चौधरी यांना सांगतो की, हे काम जेव्हा आपण कचरा कुंडी १० लिटरची देत होतो, १० लिटरच्या कुंडया जेव्हा दिड लाखांच्या कुंडयाचा प्रस्ताव आला होता, त्या वेळी सॅम्पलमागवला होता की नाही, सॅम्पल ठेवला होता ना आपण.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** सॅम्पल मी आणून दिला होता, या दराने ही कुंडी मिळते. मी

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** तेव्हा आयुक्तांनी सॅम्पल इथे ठेवला होता. आयुक्तांनी त्याचे वजन...

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** आता प्रोकेलनचे सॅम्पल मागवून वजन दाखवा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** सॅम्पल मागवला नव्हता, मी आणून दाखवला होता.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** एवढेच बघायचे आहे, २५ लाखाचे ॲटम यामध्ये काय असेल?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** बोडारे साहेब, आम्ही आता पण देण्याच्या बाजूने आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** साडे तीन करोड, एका झटक्यात देण्यात आले...........

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** आयुक्तांना प्राधिकृत करू.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** मी तेच बोलत आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मी पण तेच सांगत आहे, हे बघा, माझे ऐकुन घ्या, मा. आयुक्तांना प्राधिकृत करण्यासाठी आम्ही सर्व तयार आहेत. मॅडमने सॅम्पल ठेवला आहे, तो आयुक्तांच्या ताब्यात दया. आम्ही याला मान्यता देत आहेत, आम्ही विरोधात नाही. परंतु ती क्वालीटी त्या सॅप्पलच्या हिशोबाने माल यायला पाहीजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** ठिक आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मी तेच सांगत आहे की, प्रत्येक वस्तुची जबाबदारी मा. आयुक्तांची आहे. तशीच वस्तु आली पाहीजे आणि लोकांना वाटली गेली पाहीजे. आयुक्तांवर देवू मी नाही बोलत नाही. माझा विषय समजला नाही, मी नाहीच्या पक्षाच्या बाजूने कधी नाही. परंतु जी वस्तु आहे, क्वालीटी वारीस ती व्यवस्थितरित्या आयुक्तांच्या ताब्यामध्ये असली पाहीजे. दुसरी मिटींग जेव्हा होईल, तेव्हा आम्हांला दाखवा की, हा सॅम्पलआहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** पास करू.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** पास करू आणि तीच वस्तु आली पाहीजे आणि आयुक्त साहेब चेक करतील

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** ठिक आहे, आयुक्तांना प्राधिकृत करू.

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—** पुढच्या मिटींगमध्ये तुम्ही सॅम्पलघेऊन या.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** क्वालीटीवर आहे ना.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** हेच पहीले बोलले असते तर, पहीले सुरूवात काय केली?

**सदस्या, श्रीम. रेखा ठाकूरः—** हे आता देतच आहेत तर दिवाळी भेट म्हणून त्वरीत देण्यात यावे, पहीलेच खुप उशिर झाला आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** लवकर दयायला पाहीजे, मीमा. आयुक्तांना सांगतो की, असे विषय त्याच बरोबर पॉईंट पण टाका, इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास... हा खुप महत्वाचा विषय आहे, मुलांना लवकर मिळायला पाहीजे. यामध्ये लिही ना, अशा विषयामध्ये आपण लिहा, कोण नाही बोलतात तुम्हांला लिहीण्यासाठी हे बघा बोडारे साहेब, मला बोलण्याची संधीच दिली नाही. क्वालीटी बरोबर येत आहे, क्वालीटी बरोबर आली पाहीजे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** तुमची भावना आहे की, क्वालीटी बरोबर आली पाहीजे.....

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** मॅडम पुढच्या सभेमध्ये आयुक्त साहेबां बरोबर आम्हांला प्रत्येकाला सॅम्पलदाखवा, संपला विषय.

**महापालिका सचिवः—** ठरावामध्ये लिहीत की, सॅम्पल बघून देण्यात योवे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** यासाठी आमचा विरोध नाही दुस—यामध्ये पण आयुक्तांना प्राधिकृत करू. जसे सॅम्पलअसेल तसाचा माल मागवला पाहीजे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** जमनुजी जबाबदारी कोणाची आहे, आयुक्त साहेबाची काही पण अर्थ काढतात कुठे पण प्राधिकृत करतात. जिथे गरज आहे तिथे नाही आयुक्तांची जबाबदारी आहे, प्रशासनाची जबाबदारी आहे,जर चुकीचा आला तर रद्द करायला पाहीजे ही त्यांची जबाबदारी आहे. प्रशासनाने गुणवत्ता तपासावी.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** हे बघा बोडारे साहेब, छोटीशी गोष्ट आहे, मा. आयुक्तांनी आता पर्यंत सॅम्पलबघितला आहे का? नाही बघितला ना तर बघायला पाहीजे, आता हा विषय निघाला, उद्या सॅम्पलबघू.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** शिक्षण मंडळाच्या उप आयुक्तांनी बघितला असेल, उप आयुक्तांना दाखवला असेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** उप आयुक्तांना दाखवला असेल, पण आयुक्तांनी पण बघितले तर बरोबर आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** डांबर पण इथे आला पाहीजे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** डांबर पण इथे आणला पाहीजे, दाखवण्यासाठी रोडवर किती दिवस टीकेल हे पण बघायला पाहीजे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** डांबर बरोबर आहे की नाही हे पण चेक केले पाहीजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** हे बघा, क्वालीटीचे कॉम्प्रोमाईज कुठे पण रूलिंग, विरोधी पक्ष करणार नाही. विषय संपला. माझ्या हिशोबाने हे पहीलेच उशिर झाला आहे, तुमची सहमती नसेल तर नका टाकू

**आयुक्त, श्री. गणेश पाटीलः—**प्रशासनाची जबाबदारी लिहू.

**महापालिका सचिव:—** यामध्ये आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. यामध्ये गुणवत्ता तपासनेची जबाबदारी प्रशासनाची राहिल असे ठरावात टाकते.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५ :—** मनपा शाळांतील विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संच पुरवठा करणेकामी सर्वात न्युनत्तम दराचे निविदाकार मे. अंकुर एंटरप्रायझेस, मे. ऑनेस्टी सायन्टीफिक व मानसी महिला औदयोगिक उत्पादक सहकारी संस्था (मर्या.) यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

मागिल वर्षाप्रमाणे यावर्षी देखिल २०१८—१९ मध्ये म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संच पुरवठा करणे नियोजित आहे. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि.१७/०३/२०१८ रोजीच्या मान्यतेने सदर शैक्षणिक साहित्य संच खरेदीची निविदा ई—टेंडरींगव्दारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना वर्तमानपत्रांत प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करून ई—टेंडरिंग पध्दतीने इंटरनेट व्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

तद्नंतर दि. २१/०८/२०१८ रोजीच्या मा. आयुक्त सो. उल्हासनगर महानगरपालिका यांचे मंजूरीने सदरच्या ई—निविदांचा तांत्रिक लखोटा निविदा समितीसमोर उघडण्यात आला. त्यानुसार Check list तयार करण्यात आलेली असून सदर Check list सोबत जोडत आहे. यामध्ये वर उल्लेखलेले तिनही पुरवठादार पात्र असल्याने तसेच सन २०१८—१९ या शै. वर्षासाठी शाळा चालू होवून ३ महिने झालेले असून म.न.पा. शाळांमधील विदयार्थ्यांना दरवर्षी मिळणारे मोफत शैक्षणिक साहित्य अदयापपर्यंत मिळालेले नसल्याने निविदा समितीच्या मान्यतेने उपरोक्त सर्व पात्र निविदाधारकांचे व्यापारी लखोटे देखिल उघडण्यात आले. सदर व्यापारी लखोटयांमध्ये नमूद केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पूरवठादारनिहाय खालीलप्रमाणे तयार करण्यात आला आहे.

| Sr. No | STD | Details | Honesty Scientific Company | Mansi Mahila Sanstha | Ankur Enterprise |
|---|---|---|---|---|---|
| 1 | PP | School Bag Kit | 778.80 | 809.48 | 855.50 |
| 2 | 1st | | 1038.40 | 1054.92 | 1121.00 |
| 3 | 2nd | | 1038.40 | 1054.92 | 1121.00 |
| 4 | 3rd | | 1038.40 | 1054.92 | 1121.00 |
| 5 | 4th | | 1038.40 | 1054.92 | 1121.00 |
| 6 | 5th | | 1156.40 | 1239.00 | 1359.36 |
| 7 | 6th | | 1156.40 | 1239.00 | 1359.36 |
| 8 | 7th | | 1156.40 | 1239.00 | 1359.36 |
| 9 | 1st | Note book Kit | 271.04 | 250.88 | 268.58 |
| 10 | 2nd | | 441.28 | 358.40 | 404.32 |
| 11 | 3rd | | 441.28 | 378.56 | 417.31 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 12 | 4th | | 510.72 | 409.92 | 447.10 |
| 13 | 5th | | 630.56 | 508.48 | 564.48 |
| 14 | 6th | | 630.56 | 508.48 | 564.48 |
| 15 | 7th | | 630.56 | 508.48 | 564.48 |
| 16 | Geometry Compass Box | Writing Material | 95.20 | 80.08 | 79.52 |
| 17 | Plastic Scale 30 cms | | 12.26 | 12.32 | 11.87 |
| 18 | Oil Pastels | | 38.08 | 39.20 | 34.72 |
| 19 | Tempra Colour Box - 15 ML | | 259.60 | 236.00 | 231.28 |
| 20 | Fine Hair Brush Size 2 | | 23.60 | 20.06 | 19.47 |
| 21 | Fine Hair Brush Size 4 | | 29.50 | 25.96 | 24.78 |
| 22 | Plastic Painting Tray | | 21.24 | 17.70 | 12.98 |
| 23 | Writing Pencils HB -10 pcs.box with 1sharpner & 1 Eraser | | 56.00 | 49.84 | 49.28 |
| 24 | Slate | | 60.00 | 60.00 | 56.00 |
| 25 | Slate Pencil | | 19.00 | 22.00 | 18.00 |
| 26 | Ball Pen Packet shall consist of 5 Nos of Ball Pen. | | 42.56 | 40.32 | 35.84 |
| 27 | Refill Packet shall consist of 10 Nos of Refill | | 32.48 | 33.60 | 31.36 |
| 28 | Eraser Packet of 2 nos. | | 1.58 | 1.58 | 1.47 |
| 29 | Sharpener Packet of 2 nos. | | 3.36 | 3.36 | 3.14 |

उपरोक्त सर्व निविदाधारकांनी सादर केलेल्या दरांच्या तुलनात्मक तत्क्यानुसार लेखन साहित्य संच पूरवठा करणेसाठी मेसर्स अंकूर एंटरप्रायझेस तसेच मानसी महिला औदयोगिक उत्पादक सहकारी संस्था (मर्या), दप्तर संच पूरवठा करणेसाठी मेसर्स ऑनेस्टी सायन्टीफिक कंपनी तसेच वहया संच पूरवठा करणेसाठी मानसी महिला औदयोगिक उत्पादक सहकारी संस्था (मर्या) यांनी सादर केलेले दर हे सर्वात न्युनतम आहेत.

उपरोक्त प्रमाणे सदर शैक्षणिक संच ५२४४ विद्यार्थ्यांसाठी खरेदी करणेसाठी एकूण खर्च रू. ८८५७९६६/— अपेक्षित आहे. मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या आर्थिक अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार सदर खर्च 'विद्यार्थ्यांना मोफत वहया वाटपावरील खर्च' या लेखाशिर्षकाअंतर्गत रू.३५लक्ष, 'विद्यार्थ्यांना लेखन साहित्य पूरविणे' या लेखाशिर्षकाअंतर्गत रू.३०लक्ष, 'विद्यार्थ्यांना मोफत दप्तर, जेवनाचा डब्बा, पिण्याची पाण्याची बाटली वाटपावरील खर्च' या लेखाशिर्षकाअंतर्गत असलेल्या रू.५७लक्ष असे एकूण १.२२कोटी या निधीतून भागविता येवू शकतो.

तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर लेखन साहित्य संच खरेदी करणेसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मेसर्स अंकूर एंटरप्रायझेस व मानसी महिला औदयोगिक उत्पादक सहकारी संस्था (मर्या), दप्तर संच खरेदी करणेकरीता मेसर्स ऑनेस्टी सायन्टीफिक कंपनी तसेच वहया संच खरेदी करणेकरीता मानसी महिला औदयोगिक उत्पादक सहकारी संस्था (मर्या) यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३८ **दिनांकः—** ५/१०/२०१८

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

हीं स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा शाळांतील विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्य संच पुरवठा करणेकामी सर्वात न्युनत्तम दराचे निविदाकार मे. अंकुर एंटरप्रायझेस, मे. ऑनेस्टी सायन्टीफिक व मानसी महिला औदयोगिक उत्पादक सहकारी संस्था (मर्या.) यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

सदर साहित्याची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी प्रशासनाची राहिल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव:—** विषय क्रमांक. ६ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.६ :—** मनपा शाळांतील विदयार्थ्यांना बुट मोजे पुरवठा करणेकामी सर्वात न्युनत्तम दराचे निविदाकार मे. अंकुर एन्टरप्राईजस यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** याच्यामध्ये मुलांना देण्यासाठी सामान काय काय आहे मॅडम? ते कोणत्या कंपनीचे आहे.

**लेखापाल,शिक्षण मंडल, श्रीम. निलिमा कदम:—** यामध्ये बुट आणि मौजे आहेत.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** ते कोणत्या कंपनीचे आहेत?

**लेखापाल,शिक्षण मंडल, श्रीम. निलिमा कदम:—** कंपनी वैगेरे असे कोणतीच नाही,

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** यामध्ये शुज आहेत ना, यामध्ये जो सरकारच्या अशा कंपन्या आहेत की, यांच्याकडूनच वस्तू खरेदी करायला पाहीजे अशी कोणतीही गाईड लाईन नाही का? जे आपल्या खुप वेळा येते की, स्वच्छतेच झाडू वैगेरे यांच्याकडूनच खरेदी करा अशी गाईडलाईन आहे का शाळेसाठी घेण्यासाठी जसे मध्ये आले होते की, एल.डी. बल्ब वैगरे त्याच कंपनीकडूनच घ्यायचे आहेत.

**लेखापाल,शिक्षण मंडल, श्रीम. निलिमा कदम:—** अशा गाईड लाईन कुठेच नाहीत.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** त्यांचा मुद्दा बरोबर आहे, ठिक आहे याच्या पुढे मॅडम लक्षात ठेवा, ब्रॅन्डेड कंपनी असेल ना, आता आपण सेक्रेट स्कुल आहेत, ते ब्रॅन्डेड कंपनीचेच शुज वापरतात. तसेच आपण एखादया कंपनीला दर वर्षी त्या कंपनीला सांगितले आपण करून घेतले तर साहेब, हे बरे होईल, क्वालीटी पण आपल्याला चांगली मिळेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. आयुक्तजी, सरकारकडून एक गाईन लाईन घ्या तुम्ही की, संपुर्ण महाराष्ट्रामध्ये सरकारी शाळा आहेत, तर अशी एखादी गाईड लाईन्स आहे का? ही कंपनी शुज बनवते आणि ती कंपनी सरकारशी संबंधित आहे.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** सरकार गाईड लाईन देत नाही त्याचे कारण असे आहे की, सरकारकडून फक्त ड्रेस मिळतात जर सरकार गाईड लाईन देईल तर बाकीच्या ज्या शाळा आहेत, ते म्हणतील आम्हांला ही फीज दया. गाईड लाईन तयार करणे...

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** ब्रॅन्डेड जर आपण मागवले तर त्याचे कॉस्ट

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** ब्रॅन्डेड कंपनीशी वाटाघाटी करायला पाहीजेत.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** आता ठरावामध्ये नाही तर याला इतिवृत्तात टाका, आता आम्ही जे दिले आहे, ते देत आहेत या पुढे...

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** मुरबाडला शुजच्या मोठमोठया कंपन्या आहेत, तिकडून मागवा. एक दम ब्रॅन्डेड बाहेरच्या देशामध्ये जातात.

**<u>आयुक्त, श्री. गणेश पाटील:—</u>** ब्रॅन्डेड मटेरीयल वापरणार का?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** बाटा कंपनीचे ...

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** ठिक आहे, झाले का?

**<u>महापालिका सचिव:—</u>** जसा होता तसाच. मागील विषयाप्रमाणे ठराव करायचा ना.

**<u>काही सदस्य :—</u>**हो, पास—पास......

**<u>सभापती, जया प्रकाश माखिजा:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६ :—** मनपा शाळांतील विदयार्थ्यांना बुट मोजे पुरवठा करणेकामी सर्वात न्युनत्तम दराचे निविदाकार मे. अंकुर एन्टरप्राईजस यांच्याशी संविदेस मान्यता देणे.

**<u>प्रस्तावना</u>**

मागिल वर्षाप्रमाणे यावर्षीदेखिल २०१८—१९ मध्ये म.न.पा. शाळांतील विद्यार्थ्यांना बूट मोजे पुरवठा करणे नियोजित आहे. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि.१७/०३/२०१८ रोजीच्या मान्यतेने सदर बूट मोजे खरेदीची निविदा ई—टेंडरींगव्दारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना वर्तमानपत्रांत प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करून ई—टेंडरिंग पध्दतीने इंटरनेट व्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

तद्नंतर दि. २१/०८/२०१८ रोजीच्या मा. आयुक्त सो. उल्हासनगर महानगरपालिका यांचे मंजूरीने सदरच्या ई—निविदांचा तांत्रिक लखोटा निविदा समितीसमोर उघडण्यात आला. त्यानुसार Check list तयार करण्यात आलेली असून सदर Check list सोबत जोडत आहे. यामध्ये वर उल्लेखलेले तिनही पुरवठादार पात्र असल्याने तसेच सन २०१८—१९ या शै. वर्षासाठी शाळा चालू होवून ३ महिने झालेले असून म.न.पा. शाळांमधील विदयार्थ्यांना दरवर्षी मिळणारे मोफत बूट मोजे अदयापपर्यंत मिळालेले नसल्याने निविदा समितीच्या मान्यतेने उपरोक्त सर्व पात्र निविदाधारकांचे व्यापारी लखोटे देखिल उघडण्यात आले. सदर व्यापारी लखोटयांमध्ये नमूद केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पूरवठादारनिहाय खालीलप्रमाणे तयार करण्यात आला आहे.

| Sr.No | Type | STD | Ankur Enterprise | Honesty Scientific Company | GSN Associates |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Boys | PP | 451.50 | 496.65 | 488.25 |
| 2 | Boys | 1st | 462.00 | 496.65 | 498.75 |
| 3 | Boys | 2nd | 462.00 | 496.65 | 509.25 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | Boys | 3rd | 472.50 | 496.65 | 519.75 |
| 5 | Boys | 4th | 472.50 | 496.65 | 530.25 |
| 6 | Boys | 5th | 483.00 | 496.65 | 540.75 |
| 7 | Boys | 6th | 483.00 | 496.65 | 551.25 |
| 8 | Boys | 7th | 493.50 | 496.65 | 561.75 |
| 9 | Girls | PP | 451.50 | 496.65 | 488.25 |
| 10 | Girls | 1st | 462.00 | 496.65 | 498.75 |
| 11 | Girls | 2nd | 462.00 | 496.65 | 509.25 |
| 12 | Girls | 3rd | 472.50 | 496.65 | 519.75 |
| 13 | Girls | 4th | 472.50 | 496.65 | 530.25 |
| 14 | Girls | 5th | 483.00 | 496.65 | 540.75 |
| 15 | Girls | 6th | 483.00 | 496.65 | 551.25 |
| 16 | Girls | 7th | 493.50 | 496.65 | 561.75 |

उपरोक्त सर्व निविदाधारकांनी सादर केलेल्या दरांच्या तुलनात्मक तत्क्यानुसार मेसर्स अंकूर एंटरप्रायझेस यांनी सादर केलेले दर हे सर्वात न्युनतम आहेत. उपरोक्तप्रमाणे सदर बूट मोजे ५२४४ विद्यार्थ्यांसाठी खरेदी करणेसाठी एकूण खर्च रू.२४७३१४२/— अपेक्षित आहे. मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या आर्थिक अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार सदर खर्च मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पादत्राणे पुरविणे' या लेखाशिर्षकाअंतर्गत असलेल्या रू.३०लक्ष या निधीतून भागविता येवू शकतो.

तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर बूट मोजे खरेदी करणेसाठी न्यूनतम दर सादर करणाऱ्या निविदाकार मेसर्स अंकूर एंटरप्रायझेस यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ३९ **दिनांकः—** ५/१०/२०१८

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार मनपा शाळांतील विदयार्थ्यांना बुट मोजे पुरवठा करणेकामी सर्वात न्युनत्तम दराचे निविदाकार मे. अंकुर एन्टरप्राईजस यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

सदर बुट मोजेची गुणवत्ता तपासण्याची जबाबदारी प्रशासनाची राहिल.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सायंकाळी ५.५० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२/११/२०१८

**दि. २/११/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

८

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ०२/११/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ५ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ६ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| ७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ९ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| १० | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| ११ | श्री. भगवान भालेराव | सदस्य |
| १२ | श्रीमती मिनाकौर लबाना | सदस्या |
| १३ | श्रीमती रेखा ठाकुर | सदस्या |
| १४ | श्रीमती दिप्ती दुधानी | सदस्या |
| १५ | श्रीमती ज्योती बठिजा | सदस्या |

तर,

१. श्रीमती अंजना म्हस्के हया सदस्या अनुपस्थित होत्या.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१५०. श्री. अच्युत हांगे, आयुक्त
१५१. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१५२. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी
१५३. श्री. एस. के. सेलवन कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१५४. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
१५५. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
१५६. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
१५७. श्री. दगडू वानखेडे, लेखा परिक्षक
१५८. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१०. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त, मालमत्ता
११. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१२. श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
१३. श्री. अश्विनी अहुजा, प्र. उप अभियंता

१४. श्री. संदिप जाधव, प्र. उप अभियंता
१५. श्री. तरूण सेवकांनी, प्र. उप अभियंता
१६. श्री. जितू चौईथानी, प्र. उप अभियंता
१७. श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता
१८. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता
१९. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
२०. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२१. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२२. श्रीम. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२३. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
२४. श्री. दत्तात्रय जाधव, अधिक्षक
२५. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२६. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
२७. श्रीम. अलका पवार, अधिक्षक
२८. श्रीम. निलिमा कदम, लेखापाल

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. बाळु भांगरे
४. श्री. संतोष कोठरे

दुपारी १२.५० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**<u>महापालिका सचिव:</u>**— मा. सभापती मॅडम आयुक्तांचे स्वागत करतील आणि मा. सभापती मॅडम श्री. जमनादास पुरस्वानी यांचे स्वागत करतील.

यावेळी पुष्पगुच्छ देवुन मा. आयुक्त यांनी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांचा सत्कार केला.

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—**मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ५/१०/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १ :—** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ५/१०/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री.जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेंद्र चौधरी

**स्थायी समिती ठराव क्र. :—३९ अ** **दिनांक : ०२/११/२०१८**

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले मागील स्थायी समिती सभेचे दिनांक ५/१०/२०१८ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४१ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र..२ :—** दि. १ एप्रिल,२०१६ ते डिसेंबर,२०१७ पर्यंतची बिल देयक रु. २२११३/— निर्लेखीत करणे.

---

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** ठिक आहे, पास..पास...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** हा जो पाण्याचे बिल निर्लेखीत करण्यासाठी विषय आला आहे, यामध्ये भरपुर असे बिल सोसायटीसाठी जात आहेत. बिल्डींगसाठी ज्यांचा पार्किंगचे बिल जाते, जो पॅसेजचा बिल, त्यामध्ये पाण्याचे बिल लिहून पाठवले जाते. तर पहीले पण भरपूर वेळा बोलेले आहे की, आपण रेसिडेंन्सीसाठी टॅक्स बिलाबरोबर पाण्याचे बिल लावत असतो आणि जो सोसायटीच्या नावाने वेगळे बिल जाते, सेक्रेटरीच्या नावाने जे बिल जाते, पार्किगचा, पॅसेजचा त्यामध्ये पाण्याचे बिल जायला नाही पाहीजे. तर भरपुर लोकांनी ॲपलीकेशन केले आहे. तर हा विषय आपण पास करू, दुस—या वेळा जर असे विषय आले तर आपल्याला वाटते की, जर निर्लेखीत करायचे असतील तर ते विषय लवकरात लवकर घेऊन या.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र..२ :—** दि. १ एप्रिल,२०१६ ते डिसेंबर,२०१७ पर्यंतची बिल देयक रु. २२११३/— निर्लेखीत करणे.

**प्रस्तावना**

वरील विषयान्वये सादर करण्यात येते की, श्री. तेजंग राम पतिदार, यांचा नळ ग्राहक क्र.यु. /१/९४४८ डब्ल्यु १००००२१४ यांनी दि.३/१/२०१५ व १/६/२०१६ रोजी कायम स्वरुपी पाणी पुरवठा खंडित करणेबाबत पाणी पुरवठा देयक विभागात अर्ज सादर केला होता. त्यानुसार पाणी पुरवठा देयक विभागामार्फत श्री. तेजंग राम पतिदार यांना दि. २/१/२०१६ व २५/७/२०१६ रोजी कळविण्यात आले होते की, आपले पाणी देयकाचे थकीत रक्कम भरुन दोन महिन्याचे आगाऊ (Advanc Payment) रक्कमेचा भरणा करण्यात आल्यानंतरच पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल असे कळविण्यात आले होते.

श्री. तेजंग राम पतिदार यांनी थकीत रक्कम रु.४४,०००/— दि.१४/६/२०१६ रोजी भरले आहेत. परंतु सदर अर्जदाराने दोन महिन्याचे आगाऊ रक्कम भरण्याची पुर्तता त्यावेळी केली नसल्यामुळे त्यांचे कायम स्वरुपी पाणी पुरवठा खंडित झाले नाही. व त्यांचे पाणी पुरवठा ग्राहक क्र. यु./१/९४४८ डब्ल्यु १००००२१४ देयक नियमित प्रमाणे त्यांनी जारी करण्यात आले आहे. सदर ग्राहकाने रु.२०१६/— इतकी आगाऊ रक्कम भरणेबाबत सहमती दर्शविली आहे. तरी उप विभागीय अभियंता देयक विभाग यांच्या कार्यालयातील जा.क्र.उमपा/पापुदेवि/७२२/१८ दि.१५/०१/२०१८ अन्वये त्यांनी दि. १ एप्रिल,२०१६ ते डिसेंबर,२०१७ पर्यंतची बिल देयक रु.२२११३/— माफ करणेस विनंती केलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार दि. १ एप्रिल,२०१६ ते डिसेंबर,२०१७ पर्यंतची बिल देयक रु.२२११३/— माफ करणेचा अधिकार मा.स्थायी समितीस असल्याने, स्थायी समितीसमोर निर्णयास्तव सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ४०** **दिनांकः— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार दि. १ एप्रिल,२०१६ ते डिसेंबर,२०१७ पर्यंतची बिल देयक रु.२२११३/— निर्लेखीत करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३ :—** पॅनल क्र. १० मधील विठ्ठलवाडी पश्चिम आहुजा मार्केट, शंकर स्टोअर्सच्या बाजुला उल्हासनगर —३ येथे महापालिकेची परवानगी न घेता बांधण्यात आलेल्या शौचालय ‘‘पैसे द्या व वापरा’’ अंतर्गत मान्यता देण्याबाबत निर्णय घेणे.

---

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** ब—याच वेळा आयुक्तांना सांगून, संबंधित अधिका—यांना सांगून एक एक आयुक्तांचे नविन नविन निर्णय असल्यामुळे ते राहून गेले होते आणि आता ते आणलेले आहे आणि आता ते आणतांना प्रशासनाने फक्त १० वर्षासाठी आणलेले आहे. शासनाचा जी.आर. असा आहे की, कमीत कमी ३० वर्षासाठी दिले पाहीजे. आपण मला वाटते की, भिवंडी महानगरपालिकेत आयुक्त असतांना स्वत: अशा ऑर्डर दिलेल्या आहेत. त्या कंपनीला १० वर्षासाठी, ३० वर्षासाठी. तर ३० वर्षासाठी दयावे. जेनेकरून अशा कंपन्या, सामाजिक संस्था जर पुढे आल्या. सद्या शहरामध्ये शौचालयाची स्थिती फार खराब आहे. जर अशा संस्थांना आपण प्राधान्य दिले, तर आपल्याला जे शौचालय बनवायला लागतात ते बनवायला लागणार नाही. बी. ओ.टी. तत्वावर दिल्या नंतर ते स्वच्छ आणि लोकांना चांगली सेवा देवू शकतील. म्हणून याला ३० वषासाठी करावे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** कोणाकडून प्रस्ताव आला आहे, हा? जरा खुलासा करा. प्रस्ताव काय आहे, ते वाचून दाखवा?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** मा. सभापती महोदया, विठ्ठलवाडी पश्चिम आहुजा मार्केट, शंकर स्टोर्सच्या बाजूला एक सन २०१६ ला प्रस्ताव होता. प्रस्ताव एकता सामाजीक प्रतिष्ठा यांच्याकडून पे ॲन्ड युज, पैसे दया आणि वापरा, या तत्वावर शौचालय बांधण्यासाठी परवानगी मागितली होती. सदरचा प्रस्ताव सन २०१६ त्यांनी सादर केल्या नंतर, मालमत्ता विभागाकडून तो प्रस्ताव स्थायी समिती पुढे प्रस्तावीत होता. तथापी सन २०१७ ला सार्वजनिक निवडणूका लागल्या. त्या नंतर तो प्रस्ताव तसाच प्रलंबित होता. या दरम्यांच्या कालावधीत एकता सामाजीक संस्था यांनी परवानगी न घेता त्यांनी तिथे ते शौचालय बांधून घेतले आणि सद्या स्थितीत ते शौचालय पे ॲन्ड युज अनाधिकृतपणे चालू आहे. मा. आयुक्त यांच्याशी चर्चा केल्या नंतर शहरात शौचालयाची परिस्थिती पाहता, सर्वच शौचालय ना दुरूस्त अथवा तिथे पाण्याची, स्वच्छतेची कमतरता असल्यामुळे ते शौचालय आपल्याला पे ॲन्ड युजवर देता येतील. जर सामजिक संस्था पुढे येत असतील तर त्यांना देण्यास हरकत नाही. सदरचा जो शौचालय बांधलेला आहे, तो अनाधिकृतपणे बांधण्यात असल्यामुळे निर्णयास्तव ठेवावा अशा सुचना होत्या. त्यामुळे मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव ठेवलेला आहे. यासाठी सन २००४—२००५ मध्ये जे ॲग्रीमेंट झालेले आहेत, यात टोटल ४२ संस्था आहेत, पे ॲन्ड युजच्या आहेत. त्यांच्याशी २० वर्षासाठी करार, काहीशी २५ वर्षासाठी करार केलेले आहेत. तथापी हा दोन वर्षापासून बांधून झालेला आहे आणि अनाधिकृत आहे. तर तत्कालीन आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार १० वर्षासाठी प्रस्तावीत करावे. तसेच यामध्ये जे ॲग्रीमेंट करण्यात येईल, जर मा. स्थायी समितीने आदेश दिले तर जे ॲग्रीमेंट करण्यात येईल, त्याच्यात सुध्दा जे चार्जेस आहेत, त्यामध्ये काही बदल सुचवले आहेत. त्यानुसार मा. स्थायी समिती समोर निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** प्रशासनाला याच्यामध्ये काय अभिप्रत आहे, केणेजी तुम्हांला काय म्हणायचे आहे? याच्यात स्पष्ट बोधच होत नाही.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** सर याच्यामध्ये असे आहे की, जे एकता सामाजीक संस्थेन बांधलेले आहे ते अनाधिकृत आहे, कोणतीही परवानगी न घेता, स्थायी समितीची त्यांनी बांधकाम सुरू केले आणि ते बांधलेले आहे आणि ते युजमध्ये आहे, वापरात आहे. अशा प्रकारचे ते अनाधिकृतपणे असल्यामुळे ते स्थायी समितीपुढे ठेवलेला आहे की, काय करायचे?

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** जागा कोणाची आहे?

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** महापालिकेची आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** जागा महापालिकेचीच आहे, शौचालय जुने होते, ते तोडून त्या जागेवर नविन बांधले आहे. असे त्यांनी केले आहे. १० वर्षासाठी केले आहे. पण ३० वर्षासाठी सरकारचा जी.आर. आहे.

**प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. विनोद केणेः—** रेग्युलायजेशन आपण जर कमर्शिअल असेल....

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** त्यांना १०, २०, २५ हजार रूपये दंड ठोका ना.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** साहेब, असे आहे की, तिथे लोकांची परिस्थिती खराब असल्यामुळे आम्ही पुढाकार घेऊन तिथे बांधण्याचा प्रयत्न केला, बाजारपेठ आहे, विठ्ठलवाडीला, स्टेशनच्या जवळ आणि त्यावेळेला मंजूरी दयायचे सोडून काही ना काही आक्षेप काढत गेले, त्याच वेळेला त्याला मंजूरी दयायला पाहीजे होती. नंतर निवडणूकीची अचारसंहीता लागली. त्यावेळेला कुठलेही प्राव्हेट शौचालय नसल्यामुळे लोकांची गैरसाय झाली. ते आपण बांधलेले आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** लोकांची सोय झाली, चांगली गोष्ट आहे, परंतु अनाधिकृत बांधल्यामुळे त्यांनी त्याची पेनाल्टी भरली पाहीजे.

या वेळी सदस्या, श्रीमती ज्योती बठिजा यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** मा. आयुक्त साहेब, मा. सभापती महोदया, हा जो विषय आला आहे, सार्वजनिक शौचालय संपुर्ण उल्हासनगरमधल्या मला बोलायचे आहे. जो आपण पहीले असे शौचालय महानगरपालिकेने ४० ते ४५ शौचालय दिले आहेत, त्यामध्ये खुप कंडीशन आहेत. साफसफाई करायची आहे, लाईटची व्यवस्था त्यांना करायची आहे, पैसे घेत आहेत, ते ठिक आहे आणि आपण पाण्याच्या व्यवस्थे बरोबर काही ५ ते १० महानगरपालिकेचे जे शौचालय आहेत, त्यांची पण देखभाल करण्यासाठी आपण त्यांना जबाबदारी दिली होती. परंतु हे शौचालय अनाधिकृत बनले, कसे बनले? आणि शौचालयाची स्थिती खुप दयनीय आहे. शौचालयाच्या दुरूस्तीसाठी आणि तिथे साफसफाई करणे आणि मेन्टेनेस ठेवण्यासाठी प्रस्ताव आणला होता. परतु आज पण अपुर्ण राहीला आहे. शौचालयाची अवस्था खुपच दैनिय आहे. माझ्या माहीती प्रमाणे त्यांना दयायला पाहीजे आणि त्यांना त्याच पध्दतीने अन्य संस्थांना शौचालयाची जवळ पासच्या काही शौचालयांची स्वच्छता, साफसफाई त्यांची देखरेख करण्यासाठी त्यांच्यावर जबाबदारी टाकली पाहीजे. त्याच बरोबर ज्या ४० ते ४५ संस्थांना काम दिले आहे. मला वाटत नाही की, त्यांना देण्यात आलेल्या शौचालयापैकी महानगरपालिकेच्या अन्य शौचालयावर लक्ष देतात किंवा कोणतेही काम, देखरेख करतात, एक पण देखरेख करीत नाहीत आणि खास करून आपण त्यांना जे सार्वजनिक शौचालय त्यांना देत आहेत, संस्थांना त्यामध्ये जो युरीनलचा पोर्शन असतो, मा. आयुक्तांना निवेदन करतो की, ते जर एक वेळा बघून आले तर त्यांना पैसे मिळतात. इथे युरीनलचा पोर्शन असते, त्यांची साफसफाई पण व्यवस्थतीत करीत नाहीत. आपले जे स्वच्छता निरीक्षक आहेत, स्वच्छता अधिकारी आहेत ते जर त्यांना जाऊन बोलतील की,एक एक महीन्यामध्ये अशा ठिकाणी जाऊन युरीनलचा पोर्शन साफसफाई केली तर खुप चांगले होईल आणि त्याच बरोबर मा. आयुक्ताजी मी पहीले तुम्हांला एक विषय सांगितला होता, तो शहराचा अत्यंत गंभीर विषय आहे. कमीत कमी १५० शौचालय असे आहेत की, ते पुर्णपणे आठ, दहा वर्षापासून बंद आहेत, जे दयनीय स्थितीमध्ये आहेत, ज्यांचे कोणी पण ८ ते १० वर्षापासून कोणीच वापर करीत नाही. त्यांना आपण तोडून, मलबा, दुर्गंधी हटवून तिथे आपल्याला समाज मंदिर, सी.सी. पॅसेज, किंवा सुका कचरा, ओला कचरा संपवण्यासाठी तिथे काही व्यवस्था, पार्किंगची व्यवस्था केली तर खुप चांगले होईल. तो विषय पण पेडींग आहे, सर मी खुप पत्र पण दिले आहेत. प्रत्येक वार्डमध्ये, जिथे झोपडपट्टी आहे, तिथे १० वर्षा पासून शौचालय बंद आहेत. तर आपल्या स्वच्छता निरीक्षकांनी जे रिपोर्ट दिले आहेत, त्या सर्व शौचालय बरोबर घेण्यात यावेत. मी आज आपले केणेजी आहेत, त्यांनी तीन वेळा रिपोर्ट पाठवले आहेत. किती तरी महीन्यापासून रिपोर्ट दिले आहेत की, हे शौचालय ८ ते १० वर्षा पासून बंद पडले आहेत. तिथे मलबा, दुर्गंधी लोक काय करतात की, तुटलेल्या शौचालयावर कचरा टाकून जातात. जर ते काढून टाकले तर आपले अर्धे काम, जो आपण स्वच्छता मिशन अभियान घेतला आहे, त्यामुळे दुर्गंधी दुर होईल. जर १५० शौचालय तिथून काढून टाकले तर तिथे सी.सी. पॅसेज, पार्किंग, समाज मंदिर आणि ओला कचरा संपवण्यासाठी पिठ हे जर बनले तर हा त्रास आपला दुर होईल. हा विषय अन्य संस्थांवर कंडीशन टाकून त्यांच्यावर जबाबदारी टाकून केले तर ठिक राहील.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u>** मुळातच आपण मान्य केले की, हे शौचालय बेकायदेशिर आहे, परंतु लोकांना आवश्यक होते. जर शौचालय नसते तर लोकांना ओडीयन होता काम नये, जर हे नसते तर ओडीयन, म्हणजे आवश्यकता पण होती. संस्थने केले बेकायदेशिर पण हेतु त्याच्या मागचा जर चांगला असेल लोकांच्या उपयोगाचे आहे ते आणि बेकायदेशिर आपण वापरत आहेत. आपण अनाधिकृत बांधकामे अधिकृत केलेली आहेत. शासनाने पण मान्य दिलेली आहे की, अनाधिकृत कंन्सस्ट्रक्शन रेग्युलाजेशन करा ते आपल्या महानगरपालिकेच्या प्रशासनाकडून आता पर्यंत ते झालेले नाही किंवा ॲथॉरिटी कोण होते, ठाणे पण आता ते पण बदलून घ्यावी. कारण प्रत्येक आयुक्तांना सांगितले आहे की, बदलून घेऊ आयुक्तच डेझिगनेटेड ॲथोरिटी असली पाहीजेत. पण तो आपला प्रस्ताव चालूच आहे, ते आणायचे आहे. लोकांना फायदेशिर आहे, लोकांना उपयोगी आहे आणि जे बेकायदेशिरपणे चालले होते, ते बांधा व वापराच होते. आता त्याच्यामध्ये आपण काही कंडीशन टाकू कारण आवश्यकता आहे. माझ्या वार्डमध्ये श्रीराम, पेट्रल पंपाजवळ पण अशीच अवस्था आहे. बांधा वापरा व हस्तांतरीत करा. हस्तारीत काही झाले नाही, त्यासाठी आपण परवानगी देत नाही, म्हणून तिथली अवस्था बिकट झालेली आहे. श्रीराम पेट्रोल पंपाच्या बाजुला त्याला परवानगी आहे,

परवानगी घेतलेली परंतु ती परवानगी संपलेली आहे. ते नुतनीकरण केले पाहीजे आणि अशा प्रकारेचे जर असेल तर मला वाटते की, लोकांना आवश्यक असलेला हा प्रस्ताव आहे, फक्त टर्म कंडीशन व्यवस्थित टाकल्या पाहीजेत. कारण त्याचा गैर फायदा कोणी घेणार नाही आणि इथून पुढे महानगरपालिकेच्या शौचालयांची अवस्था बिकट आहे. साफसफाई होत नाही, दुरूस्ती होत नाही. मागच्या वर्षी पाच दरवाजे बसवले होते, मला वाटते की, वार्ड ऑफिर गणेश शिंपीला मी परवाच सांगितलेले आहे. लेडीज शौचालयाचे पाच दरवाजे नाहीत. शिंपी साहेब तुम्ही बघून आलेत ना, म्हणजे महादेवनगरमध्ये, शिवनगरमध्ये माझ्या वार्डमध्ये एकदम खरोखर तुम्हांला सांगतो, इथे शहरामध्ये तशीच अवस्था असणार आहे. मग सार्वजनिक शौचालयाची देखभाल दुरूस्ती लगेच झाली पाहीजे ती होत नाही. एम.एम.आर.डी.ए. चे शौचालय.....

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** बोडारे साहेब, एक मिनीट सर जे प्लास्टीकेचे दरवाजे लावत आहेत, ते टिकत नाहीत, एक वर्षात निघून जातात. एक वर्षात पण नाही, कोणी दारूडे वैगेरे येतात,ते तोडून घेऊन जातात.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** मागच्या वर्षीचे रिपेअर केले आहेत, ते परत तसेच झाले आहेत, ते आपण मेन्टेन करीत असतो, मग हा प्रस्ताव जो आहे, या वार्डमध्ये सुध्दा त्यांनी मान्य केले आहे, कारण कायदेशिर कशी बसावाल? कारण तुमचे म्हणणे तेच आहे की, बेकायदेशिर आहे, त्याला आपण कायदेशिर मान्यता कशी दयायची? कारण आपल्याकडे प्रस्ताव आहे. ८५५ इमारतीमध्ये इमारती होत्या, हे शौचालय लोकांसाठी उपयोगी आहे. सार्वजनिक हितासाठी एक चांगली प्रथा चालु आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**हे चांगले आहे पब्लीकसाठी केले आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यामध्ये एक विषय आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**शौचालय देखभालीचे कोण पाहते. साफसफाईच्याबाबतीत सन्माननिय सदस्यांनी सांगितले त्यांचे काय म्हणणे आहे त्याबाबत तुम्ही सांगा.

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**त्यांचा जो इश्यु आहे, ब—याचशा शौचालयास सेप्टीक टॅक नाही त्यामुळे मैला तसाच राहतो, सिव्हरेज लाईन नाही. कुठल्याही शौचालयास पाण्याचे कनेक्शन ८० टक्के नाही आहेत. असतील तर त्यास पाणी नाही.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**मग सफाई कशी होते.

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**साहेब, आम्ही तेथे ड्रम ठेवुन पाणी भरुन ते करुन घेतो.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**ड्रमने कसे पाणी येणार, कोठुन येणार?

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**साहेब, आम्ही केले आहे व ते तात्पुरते केले आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**माझ्या पॅनल क्र. १० मध्ये शौचालयांना दरवाजे सुध्दा नाहीत.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**संबंधीत विभागाकडुन तक्रार आली आहे. ३६ शौचालयांना दरवाजे नाहीत तर त्याची दुरुस्ती करण्यात यावी तर त्याचे आमच्याकडे प्राकलन तयार आहे.

**सदस्या श्रीमती पंचम कालानी :—**हे फक्त पॅनल नं. १० चीच बाब नाही तर प्रत्येक पॅनलमध्ये तीच बाब आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—**साहेब, माझ्या प्रभागात बोरींग नाही मी त्यासाठी मागणी केली आहे. एमएमआरडीएचे शौचालय आहे, दिड वर्षापासुन मला दोन बोरिंग मिळत नाही. कोणी सहया करत नाही सर्व ओके झाल्यानंतर सुध्दा काम करत नाही.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>**सार्वजनिक शौचालय व पब्लीक शौचालयांची संख्या किती आहे. एमएमआरडीए आणि महापालिकेचे मिळुन संख्या किती आहे. नंबर ऑफ शिट्स नाही तर नंबर ऑफ शौचालय किती आहेत.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—</u>**२५ शौचालय आहेत.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—</u>**साहेब, एमएमआरडीएचे १८२ आहेत आणि पे ॲण्ड पार्कचे ४२ आहेत आणि बाकी सर्व सार्वजनिक आहेत.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>**यामध्ये किती याची बेकार स्थिती आहे.

**<u>श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—</u>**साहेब,एकुण ५२५ आहेत व एकुण शिट्स ५००० आहेत आणि मागे आपण सर्व्हे केला तर त्या सर्व्हे मध्ये पाच वर्षापासुन जे शौचालय बंद आहेत, त्यांची दुरुस्ती करायची आहे तर अशा ९९ शौचालयांची दुरुस्ती आपण काढली आणि ती यादी आपण पब्लीश ही केली की आम्ही हे हे शौचालय तोडणार आहेत आणि तोडुन आम्ही गोडाउन बनविणार किंवा हजेरी शेड बनविणार किंवा तेथे कंपोस्टींग फीड बनविणार असे प्रस्ताव आम्ही मा. स्थायी समिती समोर ठेवणार आहोत.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**९९ ला आपण रिसर्व्हे केले तर दिडशे होणार.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे</u>**:—एक मिनिट सर्वांमध्ये महत्वाचा मुद्दा असा आहे की आता जे श्री. जमनु भाईनी सांगितले की आपणाकडे दिडशे शौचालय आहेत त्याची बेकार अवस्था आहे ते तोडण्यामागे दुमत नाही, महासभेची मान्यतेने ते शौचालय तोडावे लागेल, हा धोरणात्मक निर्णय आहे. यामध्ये निर्णय दयावा की हे दिडशे शौचालय तोडण्यास आम्ही परवानगी देत आहोत. पण तेथे काय बनविणार, समजा सन्माननिय सदस्य श्री. भगवान भालेराव यांच्या प्रभागाचे असेल किंवा श्री. चौधरी साहेबांच्या प्रभागातील असेल तर तुम्ही त्याठिकाणी काय बनविणार आहात ते जोडुन पाहिजे आम्हांला. दिडशे शौचालय उदया जेसीबीने तोडुन टाकणार आणि लोक जागा हडप करुन टाकणार, आम्ही काही राखत बसणार नाही त्यास. उदया ही बाटली तोडुन टाकायची आहे तर येथे काय करायचे तर ती यादी मला १५० ची बनवुन पाहिजे आणि तेथे काय करायचे आहे तेथे समाजमंदिर पाहिजे, की शौचालय बांधुन पाहिजे की आणखी दुसरे काही पाहिजे.  जर आपण एकाच वेळी तोडुन बसणार तर जागा सांभाळण्यासाठी आमच्याकडे लोक नाहीत, तर आपण जे टप्याटप्याने करणार. कोणाच्या प्रभागात काय करायचे आहे तर ते सोबत देवुन टाका ना.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**शौचालय तोडायचे आहे जेथे बॅरेकची जागा आहे तेथे मिलिटरी टाईपचे शौचालय होते, ते बरेच तोडले आहेत तर काही ठिकाणी जागा हडप झाल्या, काही ठिकाणी...

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>**मी तेच म्हणत आहे की दिडशे जर एकदम तोडले तर जागा हडप होण्याची शक्यता आहे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**१०० टक्के तसे होवु शकते.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>**११० टक्के होवू शकते. जे काही बनवायचे तर शौचालय तोडुन लगेच बनवा. आणि दुसरे काही तोडायचे तर जे बनवायचे ते आपण तेथे बनवु अशा पध्दतीने आपण जावु. किंवा १०—१० ची यादी करा आणि तसे करत जा. तुम्ही आज आपल्या तिजोरीकडे सुध्दा पहा ना.  आज आम्ही १५ दिवसामध्ये ३५ लाख रुपये प्रत्येक दिवशी वसुल केल्यामुळे पगार देवु शकतो आणि सानुग्रह अनुदान देवु शकतो, ही आपल्या महापालिकेची परिस्थिती आहे.  आर्थिक परिस्थिती पाहुन विचार केला पाहिजे. आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करत असतांना आपल्याला ५० हजार रुपये लागत असतील तर आपण त्याप्रमाणे विचार करतो की या महिन्यात आपणास ५० हजार रुपये खर्च करायचा आहे.  हे फक्त आयुक्तांनीच पाहायचे आणि पदाधिकारी यांनी फक्त ठराव देत राहायचे, काम करत राहायचे.  आर्थिक परिस्थितीकडे सुध्दा लक्ष देणे गरजेचे आहे. आपणाकडे काय आहे हे पाहुन तुक्ही निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे. म्हणजे मला

म्हणायचे आहे करुन नका असे नाही तर टप्याटप्याने तुम्ही करा. १० करायचे आणि नंतर पून्हा १० करायचे व नंतर तिस—यांदा पुन्हा १० करायचे. पण एकदाच दिडशे करा, एकदाच आदेश दया असे होणार नाही. प्रायोरीटी डिसाईड करणारे आपणच आहात. तेथे तोडल्यावर काय बनवायचे आहे. शौचालय तोडुन समाजमंदिर बनवायचे आहे की शौचालय तोडुन शौचालय बनवायचे आहे की शौचालय तोडुन गार्डन बनवायचे आहे, शौचालय तोडुन तेथे सफाई कामगारांचे कार्यालय बनवायचे आहे, हे आपण ठरवायचे. आमची प्रयोरिटी काय आहे. कोणत्या एरियामध्ये काय आहे ते आम्ही नाही पाहणार. आणि स्वच्छतेचा जो विषय आहे तर ते सांगा कोणाकडुन संचिका आली आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—** तयार आहेत संचिका.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** तयार ब—याच संचिका आहेत मी गठ्ठा बांधुन सर्व बाजुला ठेवुन दिल्या आहेत.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—**३६ शौचालय आहेत.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** मी आता आपणांस आदेश देत आहे की आपणाकडील एखादा जबाबदार अभियंता व सॅनिटरीचा एखादा जबाबदार स्वच्छता निरिक्षक यांनी प्रत्येक सन्माननिय नगरसेवकांच्या प्रभागात जावुन त्यांना सांगावे की आम्ही शौचालयाची पाहणी करण्यास आलो आहोत ते पाहुन त्याची काय परिस्थिती आहे, काय करायचे आहे, दरवाजे लावायचे आहे, कोठे त्याची आवश्यकता नसेल तर काही ठिकाणी कलर करायचे आहे, तर काही ठिकाणी नळ लावायचे आहेत, तर त्या प्रायोरिटीने तुम्ही यादी बनवा व पहिल्या टप्प्यात आपण जेथे जास्त बेकार परिस्थिती आहे तेथे असे अॅसेंडींग, डिसेंडिंग ऑर्डर आपण पाहिले पाहिजे, आता दिडशे शौचालय तर आपण एका दिवसात नाही करु शकत. पुर्ण करणार परंतु १०—१० चा ग्रुप बनवा, काहीतरी असे करा पॉलिसी डिसाईड करा. तसे करणे आवश्यक आहे. तसेच एका गार्डनचा प्रस्ताव माझ्याकडे आला आहे तो प्रस्ताव असा आहे की तेथे सुरक्षा रक्षक ठेवायचे आहे, त्या गार्डनची देखभाल करण्यासाठी लेबर लावायचे आहेत, ते लेबर किती आले व किती गेले हे पाहण्यासाठी माझ्याकडे माणसे नाहीत, तर आपण बाकीच्या महापालिकेत कसे चालत आहे, पिंपरी चिंचवड येथे कसे आहे ते पहा. नवि मुंबई येथे गार्डनसाठी निविदा काढली जाते. तर निविदा काढा, स्केअर फुट एरिया काढा व तेथे पाहा एका महिन्यात जावुन पहा की आपला नगरसेवक सुध्दा बोलणार की तेथिल उदयान एकदम ओके आहे. त्यांचे सुध्दा कन्सेस घ्या, त्यांनी म्हटले पाहिजे की आपले उदयान ओके आहे, त्यांनी काय करायचे आहे की पाणी दयायचे आहे, झाडे लावायचे आहे व महिन्या, दोन महिन्यामध्ये जे काही कटिंग झाले आहे ना, तर ते करुन १२ तासासाठी एक सेक्युरीटी ठेवायचा आहे, दुपारी दोन वाजेपर्यंत व सायंकाळी ८ वाजेपर्यंत असे १२ तासाची डयुटी आपण कॅलक्युलेट करा की किती खर्च येणार, आपले जितके उदयान जे बनविणे चालु आहे, समजा खराब झाले तर तेथे सेक्युरीटी लावायची नाही. सोळा उदयान बनत आहेत तर त्यांची सिक्युरीटी १६ राहील, १६ ची वेगळी निविदा काढा, त्या हिशोबाने नाहीतर या निविदेची रेट जर फायनल होणार तर त्याच दराने आपण पुढील कार्यवाही करु. आता आपणाकडे ६४ की ६२ उदयाने आहेत, त्या गार्डनची सिक्युरीटी याच हिशोबाने करणार, हे कोण काउंट करणार की डयुटीवर आला आहे की नाही, काम केले आहे की नाही, काय करत आहे काय नाही आपणांस काही घेणे देणे नाही. आपण महिन्यातुन एकदा जावुन पहावे की गार्डन नीट आहे स्वच्छ आहे, आपण ते पहा व सन्माननिय नगरसेवकाच्या कोणाच्या प्रभागाचे आहे तर त्यांची स्वाक्षरी घ्या, मुद्दा संपला.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—** ठिक आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—** शौचालयांच्या बाबतीत सर्व्हे झाला आहे, स्वच्छता निरिक्षकांनी अहवाल सुध्दा दिला आहे. काय परिस्थती आहे काय नाही.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** ज्या शौचालयांची बेकार परिस्थिती आहे, ते काम युध्द पातळीवर करणार.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारियाः—</u>** साहेब, यामध्ये एक इश्यु आहे की जसे शौचालय सार्वजनिक बांधकाम विभाग बनवितो, तर ते मालमत्तेस हॅण्डओव्हर होवुन जाते, परंतु मालमत्ता विभागात तशी यंत्रणा नाही की त्याकडे लक्ष देईल. तर हे पब्लीक हेल्थ विभागास काम दिले पाहिजे, त्यांच्याकडे १६ एसआय आहेत व ७८ मुकादम आहेत. प्रत्येक मुकादम आपापल्या प्रभागात फिरत असतो परंतु जेव्हा आम्ही त्यास तक्रार करतो की शौचालय आहे तेथे सफाई नाही, त्यामध्ये अशी अशी अडचण आहे, तर ते ऐकुन घेत नाहीत. ते म्हणतात की आमच्यावर मालमत्ता विभाग आहे आम्ही त्यांचे ऐकुन घेणार नाही. माझ्या प्रभागात सुंदर अपार्टमेंट येथे एक शौचालय आहे ते पे ॲण्ड युजचे आहे. तर तेथे सेप्टींक टॅक लिकेज आहे तर त्याचे पाणी आजुबाजुला जी घरे आहेत तेथे वाहत राहते. कित्येक वेळा बोलल्यानंतर सुध्दा काही होत नाही ती सेप्टींक टॅक ओव्हर फ्लो होवुन जाते. तर हे जर मालमत्ता विभागास सांगितले तर त्यांचा माणुस तेथे जाणार, पाहणार, मग सांगणार. तर मुकादम प्रत्येक प्रभागात असतो ७.०० ते ३.०० वाजेपर्यंत तर मग हे काम पब्लीक हेल्थ विभागास सोपविले पाहिजे. त्याचबरोबर त्यांच्याबरोबर जे ॲग्रीमेंट झालेले आहे, जसे आता श्री. जमनादास यांनी सांगितले की बाजुला जे शौचालय आहे, महानगपालिकेचे किंवा जी मुतारी आहे ती दिवसातुन दोन वेळा माणुस पाठवुन साफ केली पाहिजे. एकतर ते मुतारी साफ करत नाहीत व आजुबाजुला प्रत्येकास तीन तीन देण्यात आले आहे तर मग तीन त्यास एक्स्ट्रा दिलेले आहे ते देत नाहीत. त्याचा टार्गेट असा असतो की मी पे ॲण्ड युजमध्ये जास्त पैसे कमवु. खर्च करण्याचा त्याचे मन राहत नाही, सफाई करण्याचे, सेफ्टीक टॅक ओव्हर फ्लो झाले तर त्यास खाली करण्याचे. आता एक शौचालय आहे ते पाच सहा वर्षापासुन बंद आहे. संपुर्ण बाजारपेठ आहे. सिरु चौकापासुन पुढे जे मंदिर आहे बेफिक्री चौक तेथे बाजारात शौचालय आहे. ते बंद पडले आहे. त्यास चालु करण्यास सांगितले तर दोन दिवस चालु राहते परत तो पळुन जातो व म्हणतो माझ्याकडे दुसरे काम आहे ते पाहायचे आहे.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—</u>** हे प्रभाग अधिका—यांना दयावे. कारण प्रभाग अधिकारी त्या प्रभागाचा मिनी कमिशनर आहे. त्यामुळे आपण प्रत्येक ठिकाणी पाहण्यापेक्षा आपण प्रभाग अधिका—यांना हा अधिकार देवुन टाकु.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारियाः—</u>** माझा सल्ला आहे, हे पब्लीक हेल्थला दया, त्यांच्याकडे यंत्रणा आहे. आता जसे प्रभाग अधिकारी आहे त्यांच्याकडे मुकादम किती आहेत तर ४, कधी पाच कधी २ तर एसआयकडे त्यांना राहु दया.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>** श्री. राजु भाऊ जेव्हापासुन प्रभाग समिती बनल्या आहेत तेव्हापासुन सर्व जबाबदारी प्रभाग अधिका—यांची आहे. भलेही आपण सॅनीटेशन विभागास देणार पण त्यांच्यावर प्रभाग अधिकारी आहे ना.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेरावः—</u>** साहेब, विषय असा आहे शौचालयाच्या संदर्भात जी शौचालय तुम्ही संस्थेला दिली आहेत. त्यांच्या रेटमध्ये तफावत आहेत. काही ठिकाणी १० रुपये घेतले जातात, काही ठिकाणी ३ रुपये घेतले जातात. काय आहे आपला नियम काहीतरी लावायला पाहिजे महापालिकेकडुन.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>** फलक लावले पाहिजे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>** होय, काही ठिकाणी नैसर्गीक क्रियेसाठी समजु शकतो. पण नाही त्या गोष्टीसाठी सुध्दा पैसे घेतले जातात.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>** त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेरावः—</u>** होय. आता गजानन मार्केटचा विषय आहे तेथे साधा माणुस आला तरी १० रुपये घेतले जातात. नैसर्गीक क्रियेसाठी आपण समजु शकतो १० रुपये घेतले तर. अशा प्रकार असतो. तेथे १० रुपये असतील तर आमच्या स्लम एरियामध्ये ३ रुपये असेल, ५ रुपये असेल. कुठलाही एक दर महानगरपालिकेने त्या संस्थेला सांगितला पाहिजे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>** त्यांच्या ॲग्रीमेंटमध्ये २ रुपये लिहिले आहे. परंतु बाजार आहे तेथे बरेच लोक बाहेरुन येतात तर १० रुपये घेतले जातात.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>** म्हणजे त्यावर काही अंकुश नाही. अंकुश ठेवणे गरजेचे आहे.

**<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—</u>** साहेब, आम्ही काही प्लेट्स लावलेल्या आहेत व तेथे दर दिलेले आहे.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>** तेथे प्रवेश केल्याबरोबर दिसले पाहिजे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>** प्रभाग त्यांचाच आहे आपणापेक्षा त्यांना जास्त माहित आहे. आपण बीपीएमसी ॲक्टनुसार ३० वर्षापेक्षा जास्त असु शकत नाही. इतर ठिकाणी परिस्थिती वेगळी असु शकते, उल्हासनगरची परिस्थिती वेगळी असु शकते.

**<u>महापालिका सचिव :—</u>** ठिक आहे, ३० वर्षाकरीता मान्यता टाकते.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>** होय. इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>काही सदस्य :—</u>** पास, पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३ :—** पॅनल क्र. १० मधील विठ्ठलवाडी पश्चिम आहुजा मार्केट, शंकर स्टोअर्सच्या बाजुला उल्हासनगर —३ येथे महापालिकेची परवानगी न घेता बांधण्यात आलेल्या शौचालय ''पैसे द्या व वापरा'' अंतर्गत मान्यता देण्याबाबत निर्णय घेणे.

**<u>प्रस्तावना</u>**

सौ. राजश्री राजेंद्र चौधरी, नगरसेविका यांनीदिनांक १५/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये विठ्ठलवाडी पश्चिम अहुजा मार्केट, शंकर स्टोअर्सच्या बाजुला उल्हासनगर — ३ येथील मोडळकीस आलेले सार्वजनिक शौचालय देखभाल, दुरुस्ती करुन ''पैसे दया व वापरा'' या तत्वावर मे. एकता सामाजिक प्रतिष्ठाण यांना देणेकरिता शिफारस केलेली आहे.

तसेच दिनांक २६/०४/२०१८ रोजी मा. उप—आयुक्त यांचे दालनात सदर संचिकेवर मा. उप—आयुक्त साहेब, मा. सहा. आयुक्त (मालमत्ता), मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री.राजेंद्र चौधरी, मा. महापालिका सदस्य व एकता सामाजिक संस्थेतर्फे त्यांचे सदस्यांसोबत बैठक केली होती. सदर बैठकीस झालेल्या चर्चेनुसार सद्यस्थितीत असलेली वस्तूनिष्ठ अहवाल तयार करुन प्रस्ताव सादर करणेबाबत मा. उप—आयुक्त (आरोग्य/मालमत्ता) यांनी आरोग्य विभागास सूचना दिल्या होत्या.

त्यांनतर स्वच्छता निरीक्षक यांचे अभिप्राय नुसार सदर शौचालयची वस्तुनिष्ठ अहवाल नुसार पॅनल क्र. १० अ मध्ये आहुजा मार्केट विठ्ठलवाडी स्टेशन जवळ, उल्हासनगर— ३ येथे असलेल्या पैसे दया वापरा शौचालयाची पहाणी मुकादम सह प्रत्यक्ष पहाणी केली असता पहाणी अती आढळून आले की सदर शौचालयात एकुण सिट स्त्री —२ पु.:६ मुतारी ०५ आहे सदर संस्था एकता सामाजिक प्रतिष्ठाण यांना नोटीस देवून आवश्यक कागदपत्रे व दस्ताऐवज सादर करण्यासाठी कळविण्यात आलेले आहेत. सदर संस्था कडून फक्त मालमत्ता विभाग यांना (बी.ओ.टी.) पैसे दया व वापरा या तत्वावर चालविण्या करीता अर्ज केले आहेत. सदर अर्ज सोबत जोडून सादर करण्यात येत आहे. सदर संस्थाने महानगरपालिकेद्वारे कुठल्याही प्रकाराचे करारनामा न केलयाबाबत निर्देशनास येत आहेत. तसेच एकता सामाजिक प्रतिष्ठान संस्था द्वारे सदर शौचालय पैसे दया व वापरा तत्वावर महापालिकेचा विनापरवानगी चालवत आहेत. (शौचालयाचे छायाचित्र सोबत जोडण्यात आलेले आहेत.

सबब उक्त माहितीनुसार असे निर्देशनास येत आहे की, सदरचे शौचालय एकता सामाजिक संस्थेने महापालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता अनधिकृतपणे शौचालयाचे बांधकाम करुन त्याचा वापर नागरीकांना पैसे दया व वापरा या तत्वावर करीत आहे.

महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. मुंसाशी—१०००/स.क्र. २४१/प्र.क्र.१३/पा.पु.२१, दिनांक ३०/०८/२००१ अन्वये सुलभ व तत्सम सेवाभावी संस्थंतर्फे ''पैसे द्या व वापरा'' या तत्वावर शौचालय बांधकामाचा कार्यक्रम हाती घ्यावा, यासाठी सेवाभावी संस्थांची निवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती/सर्वसाधारण सभा ठरवतील त्या निकष, अटी व शर्तीप्रमाणे करावी असे निर्देश आहेत. अशाप्रकारे शौचालय बांधल्यास महापालिकेचर आर्थिक बोजा पडणार नाही व संस्थेमार्फत

परस्पर संबंधित शौचालयांची देखभाल व दुरुस्ती होणार असल्याने नागरिकांना चांगल्या प्रतीची सेवा उपलब्ध होऊ शकेल.

उल्हासनगर महानगरपालिकेने यापूर्वी शहरात विविध ठिकाणी ''बांधा'' वापरा व हस्तांतरीत करा'' या तत्वावर शौचालय बांधलेले असुन सद्यस्थितीत ''पैसे दया व वापरा'' या पध्दतीने सदरहु शौचालय विविध संस्थामार्फत चालविण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महानगरपालिकेचया मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

उक्त बाबी विचारात घेता विठ्ठलवाडी पश्चिम अहुजा मार्केट, शंकर स्टोअर्सच्या बाजुला उल्हासनगर — ३ येथील महापालिकेचे सार्वजनिक शौचालय सौ. राजश्री राजेंद्र चौधरी, नगरसेविका, यांनी विनंती केल्यानुसार व तेथील नागरिंकाच्या सुविधेसाठी सदर ठिकाणी एकुण २ स्त्री ०६ पुरुष व ५ मुतारी सीटचे सार्वजनिक शौचालय एकता समाजिक संस्था यांना पुढील १० वर्षा करीता पैसे द्या व वापरा तत्वावर चालविणेसाठी देणेबाबत मा. स्थायी समिती समोर निर्णयास्तव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४१ **दिनांक:— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री.जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार पॅनल क्र. १० मधील विठ्ठलवाडी पश्चिम आहुजा मार्केट, शंकर स्टोअर्सच्या बाजुला उल्हासनगर —३ येथे एकुण २ स्त्री ०६ पुरुष व ५ मुतारी सीटचे सार्वजनिक शौचालय एकता समाजिक संस्था यांना पुढील ३० वर्षा करीता पैसे द्या व वापरा तत्वावर चालविणेसाठी देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :—** उल्हासनगर शहरातील कॅम्प १,२,३ मधील भागात अस्तित्वातील विधंन विहीरी वरील हातपंप /जेटपंपाची दैनदिन देखभाल व दुरूस्ती करणे .

---

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**सर्व ठिकाणी पाणी टंचाई आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**४, ५ चे काय.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**यामध्ये असे आहे साहेब आता नविन बोरवेल आता आपणाकडे ५ लावले जात आहे. काम चालु आहे.

**महापालिका सचिव :—**हा प्रस्ताव माहितीसाठी आहे. काम सुध्दा झाले आहे असे प्रस्तावात लिहिले आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**माहितीसाठी लिहिले आहे ना.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**हे पहा मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे असे लिहिले आहे.

**महापालिका सचिव :—**माहितीसाठी त्यांनी दिले आहे.

**<u>सदस्य श्री. धनपंजय बोडारे :—</u>**माहितीसाठी आहे का?

**<u>श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता , पाणी पुरवठा :—</u>**होय, माहितीसाठी दिले आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>**साहेब, यामध्ये असे आहे की ज्या विंधन विहिरी आहेत त्यांना रिपेअर करण्याची निविदा आपण काढली आहे. सध्यास्थितीत आपणाकडे जे काही ४ वर्षापुर्वी निविदा काढली होती, नविन बोअरवेलसाठी, त्यानंतर नविन बोअरवेल मारण्याचे एकही निविदा निघाली नाही. एकही बोअरवेल महापालिकेच्या माध्यमातुन मारली गेली नाही. पण पाणी टंचाई मुळे येणारा काळ गंभीर असणार आहे. त्यामुळे आपणांस या इंधन विहिरी नविन कोठे मारायच्या असतील तर अशा निविदा काढुन इंधन विहिरी मारल्या पाहिजे. श्री. सेलवन साहेब, बरोबर आहे की नाही.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**यामध्ये दुसरा विषय असा आहे, त्यावेळी ज्या बोरवेल मारल्या बोअरवेल मारल्यानंतर कनेक्शन दिले, कनेक्शनच झाले नाही तर त्यावेळी सर्व कनेक्शन काढुन गेले एमएसईबीने. आपण बिले भरले नाही, मी यांना वारंवार सांगितले की ती बिले भरा कनेक्शन चालु राहु दया. काही या कारणास्तव बंद आहेत.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**आपण काही नविन मारायच्या असतील तर आम्ही तसे प्रपोजल दिले आहे. श्री. सेलवन साहेब, आम्ही नविन बोरवेल मारण्यासाठी तुम्हांला पत्र दिलेले आहे, तर आमच्याकडे तुम्ही सर्व्हे करा की खरच पाणी टंचाई आहे तसा बोरवेल करण्यासाठी प्रस्ताव आण.

**<u>श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता , पाणी पुरवठा :—</u>**शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी जे सध्या असलेले बोअरवेल आहेत, ज्या ज्या ठिकाणी बंद आहे ते प्रत्येक ठिकाणचे घेतले आहे साहेब. नविन बोअरवेलची सुध्दा मागणी जनरल निधी मधुन आहे. तो सुध्दा प्रस्ताव मी बनविला आहे. तो सुध्दा मंजुर करुन घेता येईल, आता येणा—या काळामध्ये पाणी कपात असल्याने बोअरवेलद्वारे लोकांना दयावे लागणार.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>**गर्व्हमेंटच्या मालकीची आतापर्यंत शहरात किती बोअरवेल आहेत.

**<u>श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता , पाणी पुरवठा :—</u>**कॅम्प नं. १,२,३ मध्ये आतापर्यंत ४८ बोअर आहेत.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**आता चालु किती आहेत.

**<u>श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता , पाणी पुरवठा :—</u>**चालु त्यामध्ये १८७ आहेत.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**ज्या बंद आहेत त्या कशामुळे बंद आहेत. कारण तर सांगा.

**<u>श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता , पाणी पुरवठा :—</u>**साहेब, त्यामध्ये कधी कधी मोटरबंद होवुन जाते.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**लाईट कनेक्शनचा प्रॉब्लेम आहे का.

**<u>श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता , पाणी पुरवठा :—</u>**नाही. लाईट कनेक्शन सर्वांना आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**काय आहे साहेब, कित्येक जागेत यांनी बिल भरलेले नाही. आता जे कनेक्शन त्यांनी घेतले आहे ते लोकल ॲड्रेसवर घेतले आहे. एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर वॉटर सप्लाय बॅरेक नं. ५२८ च्या बाजुला बोअरवेल आहे. तर बिल तेथेच येते. तर काय झाले पाहिजे बोअरवेलचे जेवढी बिले आहेत, एसीपी यांना पत्र देवुन आपण आमच्या येथे उल्हासनगर महानगरपालिकेस पत्र देवुन पाठवा, तर होते काय की ती लोक बिले फेकुन जातात, चार महिने बिल नाही भरले तर ती लोक मिटर काढुन निघुन जातात.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**प्रायव्हेट संस्थेला दिले आहे म्हणुन अडचण होत आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**ती लोक काय करतात आम्ही तेथे गेलो तेथे मिटर लावले व बिल देवुन टाकले.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>** मी तुम्हांला काय विचारले आहे, तुम्ही येथे दोन तीन असे वाचुन नका, प्रत्येकजण आपापल्या प्रभागातील सांगतात. श्री. बोडारे साहेब म्हणतात माझ्या प्रभागात असेल तर श्री. चौधरी साहेब म्हणतात माझ्या प्रभागात असेल. का की उल्हासनगर शहर हा एकच प्रभाग आहे. बरोबर, म्हणुन मी तुम्हांला विचारले की उल्हासनगरमध्ये बोअरवेलची संख्या किती आहे. ४५० आहे तर मग त्यामध्ये चालु किती आहे आजच्या तारखेला.

**<u>श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता , पाणी पुरवठा :—</u>**३५० चालु आहे साहेब.

**<u>आयुक्त श्री. अच्युत हांगे:—</u>**आणि बंद बाकीच्या कारणामुळे जे काही बंद झाले तर ते लवकरात लवकर चालु करा. आणि आवश्यकतेनुसार तुम्हांला भविष्यामध्ये जर गरज असेल, प्रपोजल तयार करा जेथे बोअर मारण्याची आवश्यकता आहे. श्री. चौधरी साहेबांनी जसे सांगितले की दुष्काळग्रस्त परिस्थिती झाली तर तेथे तहान लागल्यानंतर तेथे जमिन उखाडायची नाही. तुमची प्लॅनिंग असली पाहिजे आतापासुनच. ठिक आहे. आणि जेवढे चालु आहेत त्याबद्दल खात्री करा जरा. श्री. बोडारे साहेब म्हणतात तसे त्यांच्या प्रभागात लाईट नसल्यामुळे ८ कनेक्शन काढले आहेत, कोणाचे बंद असेल, कोणाचा दांडा तुटला असेल, कोणाचा पाईपच सटकलेला असेल. ते सर्व बघुन घ्या.

**<u>श्री. एस.के. सेलवन, कार्यकारी अभियंता , पाणी पुरवठा :—</u>**ते आपण ५(२)(२) मध्ये दिलेले आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**या विषयावर मी बोलु इच्छितो आपण मला एक गोष्ट सांगावी. आपण ५(२)(२) मध्ये ८ लाख ६० हजारचे जे दिले आहे तर हे बोअरवेल दुरुस्ती करण्याची पध्दत काय आहे. आम्ही जेव्हा तक्रार करतो, लिखीत देतो किंवा फोन करतो विभागामध्ये, आमच्या येथे बोरवेल विभाग आहे तर मग ते डायरेक्ट कॉन्ट्रक्टरचा नंबर देतात की आपण त्यांना शोधायचे. मी स्वत: एक बोअरवेल दुरुस्त केले. २०० रुपये उघडायचे व अडीच हजाराचे सामान. येथे सर्व सदस्य बोलणार, एकही सदस्य असे सांगणार नाही की त्यांनी स्वत: केले नसेल. आपणांस विनंती करतो की आपण एक रजिस्टर मेंटेन करा, नगरसेवकांचे पत्र आले, संस्थेचे पत्र आले, सदस्यांचे पत्र आले, बोअरवेल दुरुस्तीसाठी आले आहे तर आपल्या विभागाकडुन तो ठेकेदार गेला पाहिजे. महासभेचे जे सदस्य आहेत त्यांना पत्र गेले पाहिजे. आजपर्यंत ना मला पत्र आले आहे ना कोणी ठेकेदार पाठविला आहे. एकही सदस्य म्हणणार नाही की त्यांच्या पत्राने एक सुध्दा ठेकेदार आला असेल तर ही पध्दत बंद करा, नगरसेवकांचे जे पत्र जातात त्याचे रजिस्टर मेंटेन झाले पाहिजे. सर्व एकत्र तर होणार नाही की पाच बोअरवेल तीन बोअरवेल रिपेअर करायचे आहे तर त्याचे पत्र पाठवा की आपले बोअरवेल दुरुस्त झाले आहे. ही एक पध्दत आहे काम करण्याची तर.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**चांगले काम करण्याची पध्दत फक्त विदयुत विभागामध्ये आहे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी:—</u>**होय त्यांची सर्व्हिस चांगली आहे.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** हा विषय फक्त माहितीसाठी आहे. चला पास करा.

**<u>महापालिका सचिव :—</u>**पास?

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४ :—** उल्हासनगर शहरातील कॅम्प १,२,३ मधील भागात अस्तित्वातील विंधन विहीरी वरील हातपंप /जेटपंपाची दैनदिन देखभाल व दुरूस्ती करणे .

**<u>प्रस्तावना</u>**

उपरोक्त विषयाकीत प्रकरणी अहवाल सादर करण्यात येतो की उल्हासनगर शहरातील कॅम्प १,२,३ मधील भागात साप्ताहीक पाणी कपातीचे काळात व टंचाई काळात पाणी पुरवठयाची पर्यायी व्यवस्था होणेसाठी तसेच टोकाचे भागात दाट लोकवस्तीचे भागात ज्या ठिकाणी दैनदिन पाणी पुरवठा हा अपूरा होत असतो अशा भागासाठी तातडीची पाणी पुरवठा व्यवस्था म्हणून ठिकठिकाणी विधंन विहीरी घेण्यात आल्या असून पाण्याच्या उपबब्धते नुसार त्यावर हात पंप व विदयुत पाणबुडे पंप बसविण्यात आले आहेत. विधंन विहिरीचे पाण्याचा वापर परिसरातील नागरिक करित असल्याने पाणी टंचाईची तिव्रता कमी होत असते त्यामुळे प्रशासनाकडे मोर्चे सुध्दा येत नाही.

सदर विधंन विहीरीवरील हात पंप, विदयुत पंप स्थानिक नागरिक चालु बंद करीत असल्याामुळे दैनदिन वापरामुळे नादुरूस्त होत असतात. त्यामुळे नादुरूस्त पंप तातडीने दुरूस्त करणे गरजेचे असते.नादुरूस्त पंप दुरूस्त करणेसाठी महापालिकेकडे तांत्रिक कर्मचारी नसल्याने तसेच सदर पंप दुरूस्तीसाठी लागणारी सामुग्री भांडराव्दारे खरेदी होत नसल्याने ठेकेदार मार्फत पंप दुरूस्तीचे कामे करून घेण्यात येतात. याकरीता पंप दुरूस्तीचा रू. ८,५९,९७९/– किमतीचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

विधंन विहीरीवरील हात पंप व पाणबुडेपंप दुरूस्त करण्याचे वार्षिक प्रस्ताव तयार करण्यात आले असून मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे. परंतु सदर दोनही प्रस्ताव सपूर्ण १२ माहिण्यासाठी असल्याने ई– निविदा मागवून त्यानुसार मंजुरीची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. परंतु या करीता ३ महिण्याचा कालावधी लागणार असल्याने परंतु तो पर्यत सदया वापरात असलेले हात पंप /विदयुत पंप नादुरूस्त झाल्यानंतर वेळीच दुरूस्त करून घेणे गरजेचे आहे. सदया ५०टक्के पंप दुरूस्ती अभावी बंद असल्याने त्यावरील स्थानिक लोकप्रतिनिधी निगमीतपणे दुरूस्तीची मागणी करित आहेत परिसरात निर्माण होणारी पाणी टंचाई तातडीने दुर करणेसाठी विधंन विहीरीव्दारे पाणी पुरवठा हा एकच पर्याय आहे.

करीता सन २०१८ वर्षात या कालावधीत उल्हासनगर शहरातील कॅम्प १,२,३ मधील भागात अस्तित्वातील विधंन विहीरी वरील हातपंप / जेटपंपाची दैनदिन देखभाल व दुरूस्ती करण्याचे काम महापालिकेकडून ठेकेदाराची नेमणूक ५(२) (२) अंतर्गत में. शितल बोअरवेल उल्हासनगर या संस्थेकडून तातडीची बाब म्हणून काम करून घेण्यात येत आहे. तरी सदर बाब मा.स्थायी समितीपुढे माहितीसाठी सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४२ **दिनांकः– ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील कॅम्प १,२,३ मधील भागात अस्तित्वातील विधंन विहीरी वरील हातपंप /जेटपंपाची दैनदिन देखभाल व दुरूस्ती में. शितल बोअरवेल उल्हासनगर या संस्थेकडून तातडीची बाब म्हणून काम करून घेण्यात येत असल्याबाबत कामाची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :—** उल्हासनगर महानगरपालिकेतील विद्युत अभियांत्रिकी विभागामार्फत शहरातील दिवाबत्तीची निगा व दुरुस्ती करणेकामी खरेदी केलेल्या विद्युत साहित्याची माहिती स्थायी समितीस देणे.

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**हे फक्त माहितीसाठी आहे काय?

**श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता:—**होय माहितीसाठी आहे. हा विषय दुरुस्ती करण्यासाठीचा आहे. विभागामार्फत आपण निगा व दुरुस्ती करतो. त्यासाठी हे विदयुत साहित्य घेतले, त्यामध्ये टायमर बसविले आहे, ते ॲटोमॅटिक चालु बंद होतात त्यासाठी हे खरेदी केलेले आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**साहेब, आता आपण जे नविन रस्ते डेव्हलप केले आहे त्यामध्ये डिवायडर टाकले आहे तर तेथे विदयुतची व्यवस्था कसे करणार.

**श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता:—**साहेब, एमएमआरडीएने करणार आहे, त्यामध्ये दिवाबत्ती बसविण्याचा प्रस्ताव आपण एमएमआरडीएला पाठविलेला आहे आणि मुलभुत सुविधा अंतर्गत रस्ता बनणार आहे. त्यासंदर्भात १० टक्के मुलभुत सुविधा ठेवणार आहे. त्यासाठी मी एक प्रस्ताव बनविलेला आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**कुठल्या कुठल्या रस्त्याचे बनविणार जरा सांगावे.

**श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता:—** पीडब्ल्युडी मार्फत जे १८ रस्ते आहेत, मुलभुत सुविधाचा जो ३०० काटीचा रस्ता आहे ना.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**होय.

**श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता:—**काजोल पेट्रोल पंप आहे त्यानंतर नागकन्या, माणेरा गाव आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—** साहेब, यामध्ये आपण निविदा मागविली की काय हे जरा आम्हांस सांगावे.

**श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता:—**साहेब, त्यामध्ये जे आपण दिवाबत्तीसाठी साहित्य वापरतो त्यामध्ये इलेक्ट्रीक आयटम असतात. इलेक्ट्रीक आयटम मध्ये बल्ब चोक वगैरे असतात आणि बल्ब जे असतात ते आपण फिलीप्स कंपनीचे वापरतो. आणि दुसरा आयटम त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स भाग आहे. इलेक्ट्रॉनिक्स पार्टमध्ये टायमर ठेकेदार देतात आणि थर्ड पार्ट फॅब्रिकेशन आहे. फॅब्रिकेशनमध्ये स्वीच ए भाग वगैरे, टायमर्स वगेरे आहेत, त्याचा पार्टस् वगैरे आहे त्यामुळे ते आपल्याला वेगळे करावे लागले आहे. त्यामुळे ते तीन निविदा मागविले आहेत, कारण इलेक्ट्रॉनिक्सवाला जे ठेकेदार व टायमर्स वगैरे आहेत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यामध्ये साहेब, कोठेच लिहिले नाही की यांनी निविदा मागविली आहे. त्यांचे म्हणणे आहे की ७३ ड, तर ७३ ड असे म्हणतो की स्थायी समिती आयुक्तांना प्राधिकृत करणार ॲग्रीमेंट करण्यासाठी आणि हे एकुण काम आहे ८९,३६,२००/—रुपये .

**श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता:—**साहेब ४ निविदा आहेत. निविदा वेगवेगळया आहेत त्यामध्ये एक नंबरचे जे आहे ते ७ लाख ९३ हजार, जे दोन नंबरचे आहे ते ९ लाख ३० हजारचे आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**मा. सभापती महोदय, २५ लक्ष रुपयाचे एक कोणतेही काम करण्याचा अधिकार आयुक्तांना कायदयाप्रमाणे आहे आणि ३ लक्ष पर्यत जे आहे त्याचे आपण मॅन्युअल टेंडरींग म्हणजे ७ दिवसाची नोटिस काढतो आणि मी आल्यापासुन पाठीमागे काय झाले त्याची मला काही देणे घेणे नाही परंतु मी आल्यानंतर सर्व हेड ऑफ विभागाची जबाबदारी काय आह? याबाबत मी स्पष्ट निर्देश दिले आहेत आणि २५ लक्ष रुपयाचे पर्यंत जे काही आपण टेंडर काढतो. तर ती

ईटेंडरींगनेच काढतो म्हणजे ३ लक्षच्या आतले आपण मॅन्युअल टेंडरींग काढतो ७ दिवसाची नोटिस काढुन २५ लक्ष ९४ हजार म्हणजे जी रक्कम असेल एखादया निविदेची ती आपण ईटेंडरींगने काढतो. ई—टेंडरींग झाल्यानंतर ते ओपन करण्यासाठी एक समिती आहे, समितीसमोर निविदा ओपन केली जाते. माझी परवानगी घेतात व ती घेतल्यानंतर निविदा ओपन केली जाते जर टॅक्नीकली फिजीबल असेल, तर त्यामध्ये २ निविदा असतात, एक टेक्नीकल निविदा असते व त्यामध्ये त्यांनी ऑफर केलेली निविदा असते. आर्थिक व फायनान्शीअल बीड तर ती ओपन केली जाते. मग ती ओपन करुन आमच्या स्तरावर २५ लक्ष अधिकार असल्यामुळे खर्च करण्यासाठी माझ्या स्तरावर त्यास मान्यता देवुन आपण त्यांना वर्कऑर्डर देतो ॲग्रीमेंट करतो आणि हे केलेले काम कायदया प्रमाणेच स्थायी समितीकडे प्रत्येक हेड ऑफ द विभागाने स्थायी समितीसमोर पंधरा दिवसात कळविले पाहिजे अशी कायदयात तरतुद आहे, त्यामुळे आम्ही हे स्थायी समितीला माहितीसाठी कळविले आहे. अगोदरचे नवव्या महिन्याचे काम आहेत वेगवेगळे आणि काही काम माझ्या कालावधीत मी आल्यानंतर मंजुर झालेले आहे. तर अशी प्रथा आहे.

**सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी:—**साहेब, हे ८९ लाखाचे आहे आता श्री. राजेशजी यांनी टोटल करुन सांगितले आहे. आणि ३४—३४ लाख व ३५—३५ लाख दोन संस्थेचे आहे. सिमरन इलेक्ट्रानिक्स ३५ लाखाचे आहे. टिंकल टॅक्नो त्याचे सुध्दा ३५ लाख आहेत.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दया तुम्ही मध्ये बोलु नका काही. तुम्ही हे जे काम आहे त्याचे तुकडे केलेले नाही ना.

**श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता:—**साहेब, तुकडे नाहीत हे....

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**बस पुढचे काही बोलायचे नाही मी जेवढे विचारले तेवढेच सांगा. तुकडे केलेले नाहीत ना.

**श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता:—** नाही.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**बाब अशी आहे की एका कामाचे दोन तुकडे नाही करु शकत. आणि मी तुकडे करायचे नाही असा सुध्दा आदेश काढलेला आहे. समजा हा टेबल बनवायचा आहे त्याची किंमत ५० लाख रुपये आहे. आणि माझ्याकडे येणार आणि मी २४ लाख ९९ हजार असे दोन तुकडे करु शकत नाही. या कामाची स्थायी समितीनेच मान्यता दिली पाहिजे व तीनेच मंजुरी दिली पाहिजे. दोन तुकडे करता येणार नाही. एखादा पाईप लाईन टाकायचे तुमच्या प्रभागाचे एक कोटीचे काम आहे. काही कामे अर्जंट असतात, माझ्याकडे आले व मी सांगतो एस्टीमेट करुन टाका आणि त्यावेळी त्या कामाचे एस्टीमेट आले तर ते माझ्या अधिकार कक्षेत येते. निविदा काढल्यानंतर प्रोसीजर फालोप केले की नाही ते पहा मग आपण स्थायी समितीस माहितीस्तव कळवितो. आणि ते वेगवेगळया ठिकाणचे कामे आहेत, बरोबर आहे. आणि ती गोळा बेरीज झाल्यानंतर १०० टक्के...

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**एक मिनिट, यामध्ये ३ नंबर वाचा महानगरपालिका क्षेत्रात उभारलेल्या दिवाबत्ती दुरुस्ती व साहित्य खरेदी करणे व नंतर ४ नंबर वाचा महानगरपालिका क्षेत्रात उभारलेल्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती साहित्य खरेदी करणे यामध्ये २ विभाग नाही केला तर मग एकच आहे का?

**श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता:—** नाही, एकच आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रानिक आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**अर्थ सांगा जरा.

**श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता:—**साहेब इलेक्ट्रानिक वेगळे आहे व इलेक्ट्रीकल वेगळे आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**ठिक आहे, विदयुत विभागाच्या कामास काही हरकत नाही आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**विदयुत विभागाचे काम आहे ते चांगले काम करतात चला ठिक आहे पास करु या.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**विदयुत विभागाचे अभिनंदन करतो. स्थायी समितीच्या सर्व सदस्यांची भावना लक्षात घेता बाकीच्या विभागातील लोकांना त्यांच्या विभागाचे अनुकरण करण्यासाठी बंधनकारक केले जाईल. अणि त्यांच्या प्रमाणे आपण सर्व प्रथा पाळण्याचा प्रयत्न आपण करु. सन्माननिय नगरसेवक व पदाधिकारी यांच्याकडुन पत्र प्राप्त झाले की ती दखल घेतली जाईल. आणि पत्र दिलेम जाईल की आमच्याकडे पत्र आल्यानंतर संबंधीत प्रभाग अधिका—याकडे पाठविले आहे ती कार्यवाही झाली की तुम्हांला पत्र दिले जाईल. त्यामध्ये पाठपुरावा तुमच्या पी.ए.ला कोणाला करायला लावा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र. ५ :—** उल्हासनगर महानगरपालिकेतील विद्युत अभियांत्रिकी विभागामार्फत शहरातील दिवाबत्तीची निगा व दुरुस्ती करणेकामी खरेदी केलेल्या विद्युत साहित्याची माहिति स्थायी समितीस देणे.

**प्रस्तावना**

सार्वजनिक सुरक्षितेच्या दृष्टीने दिवाबत्ती उभारणी हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ६३ (७) व प्रकरण ४ वर्ग २ (क) नुसार अनिवार्य कर्तव्य आहे. रस्त्यांवर दिवाबत्ती करणे व त्यांची निगा, दुरुस्ती चोख ठेवणे हे महापालिकेचे एक बंधनकारक कार्य आहे. सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने हे कार्य कुठल्याही परिस्थितीमध्ये बंद ठेवता येत नाही.

उल्हासनगर महानगरपालिका विद्युत अभियांत्रिकी विभागमार्फत विद्युत साहित्य खरेदी करण्यासाठी देण्यात आलेल्या मंजुरीची माहीती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ ( ड ) नुसार पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विषय | मंजुर निवीदा रक्कम | कराराचा दिनांक | मक्तेदार/पुरवठादार |
|---|---|---|---|---|
| १ | महानगरपालिका क्षेत्रात उभारलेल्या दिवाबत्तीचे विद्युतीकरण करणेकामी वायर्स/केबल्सची खरेदी करणेबाबत. | ७३,६०० | २७/९/२०१८ | मे. सिमरन इलेक्ट्रोमॅकॅनिक, उल्हासनगर—२ |
| | | ६,९७,२०० | २५/९/२०१८ | मे. ट्विंकल टेक्नोक्राफ्ट, उल्हासनगर — १ |
| २ | महानगरपालिका क्षेत्रात उभारलेल्या दिवाबत्तीचे टायमर बॉक्स व स्ट्रीट लाईट बॉक्स बदलणेकामी फेब्रिकेशन साहित्य खरेदी करणेबाबत. | ९,०४,००० | २८/९/२०१८ | मे. साईदिप एन्टरप्रायजेस, उल्हासनगर — २ |
| ३ | महानगरपालिका क्षेत्रात उभारलेल्या दिवाबत्तीच्या “वार्षिक देखभाल व दुरुस्तीसाठी इलेक्ट्रिकल साहित्य खरेदी करणेबाबत. | ४,५२,००० | २७/९/२०१८ | मे. सिमरन इलेक्ट्रोमॅकॅनिक, उल्हासनगर—२ |
| | | १८,३५,००० | २५/९/२०१८ | मे. ट्विंकल टेक्नोक्राफ्ट, उल्हासनगर — १ |
| ४ | महानगरपालिका क्षेत्रात उभारलेल्या दिवाबत्तीच्या “वार्षिक देखभाल व | ४,४३,८८० | २६/९/२०१८ | मे. एशिअन कंट्रोल्स इक्युपमेंट, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | दुरुस्तीसाठी इलेक्ट्रॉनिक साहित्य खरेदी करणेबाबत. | | | मुंबई –४०००१२ |
| | | १५,६४,००० | २७/९/२०१८ | मे. सिमरन इलेक्ट्रोमॅकॅनिक, उल्हासनगर–२ |
| ५ | महानगरपालिका क्षेत्रातील ७० वॅट दिवाबत्तीची निगा व दुरुस्तीकरिता फिक्चर्स व अेक्सेसेरिज खरेदी करणेबाबत. | ८,१७,६०० | २७/९/२०१८ | मे. सिमरन इलेक्ट्रोमॅकॅनिक, उल्हासनगर–२ |
| | | ६,३१,००० | २५/९/२०१८ | मे. ट्विंकल टेक्नोक्राफ्ट, उल्हासनगर – १ |
| ६ | महानगरपालिकेच्या अखत्यारितीत असलेल्या सर्व कार्यालयातील विद्युत व्यवस्थेची निगा व दुरुस्तीकरिता विद्युत साहित्य खरेदी करणेबाबत. | २,५३,६०० | २७/९/२०१८ | मे. सिमरन इलेक्ट्रोमॅकॅनिक, उल्हासनगर–२ |
| | | १२,६४,३२० | १६/१०/२०१८ | मे. एम.पी.एन्टरप्रायजेस, उल्हासनगर – ३ |

तरी सदरची माहीती स्थायी समिती अवलोकनार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४३ **दिनांकः– : ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेतील विद्युत अभियांत्रिकी विभागामार्फत शहरातील दिवाबत्तीची निगा व दुरुस्ती करणेकामी खरेदी केलेल्या विद्युत साहित्याची माहिति नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :–** मा.सचिव,सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा नवी मुंबई. यांचे द्वारा पुरवठा करण्यात आलेल्या कार्यरत १० सुरक्षा जवानांनसाठी १ वर्ष मुदत वाढ करणे करिता मान्यता मिळणे.

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**प्रत्येकवेळी मुदतवाढचेच का येते. एकतर आपण निविदा काढा किंवा काय पध्दत आहे ती सांगावी. २०१७ पासुन प्रत्येकवेळी मुदतवाढ होत राहते.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**कोणाचा विषय आहे, बोला.

**श्री. बाळु नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी :—** गेल्या २०१६ पासुन आपण १० जवान घेतले होते, जशी गरज आहे तसे आपण घेतले आहे. आपण निवडणूकीच्या काळात घेतले होते. त्या अनुषंगाने प्रत्येक वेळेस मुदतवाढीचा विषय येतो. आपणाकडे ९६ पदे मंजुर असल्याने आपणाकडे तसा शासनाचा निर्णय आहे. सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत वगैरे यांना ज्या ज्या वेळी सुरक्षा रक्षक, अधिकारी आवश्यक असेल त्या त्या वेळी त्यांनी शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडुनच सुरक्षा रक्षक घेण्यात यावे. खाजगी संस्थेकडुन घेण्यात येवु नये अशी त्यांची अट असल्याने आपणांस त्यांच्याकडुन घेणे बंधनकारक आहे आणि सन्मानिय नगरसेवकांची जी मागणी असते ती पुर्ण करण्यासाठी सुरक्षा रक्षक सलग करणे अगदी गरजेचे आहे साहेब. म्हणुन मुदतवाढ घेणे आवश्यक आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आता आपणाकडे जी मंजुर पदे आहेत आणि आपण आता आपली भरती केली नाही त्यामुळे सुरक्षा रक्षक म्हणजे आता वदारियांचा जो प्रश्न की वारंवार मुदतवाढ आपण दयायची, पगार तेवढाच दयायचा आणि काम कमी. हे जे बाहेरून आलेले असतात, परंतु आपले हक्काचे कर्मचारी काम करतात, त्यांच्याकडून काम करून घेऊ शकतो, कधीही बोलवू शकतो, तसे सुरक्षा मंडळाचे नाही. त्यामुळे आता मुदतवाढ घेऊन आपली भरती कशी करता येईल? सुरक्षा रक्षकांची, आडचण काय? त्याबाबतीत काय आडचण आहे?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** यामध्ये दोन गोष्टी आहेत, बोडारे साहेब, दोन गोष्टी आहेत, यांचे रेट आहे, २२,४९६/—, २४,१३१ याच्या कमी दरामध्ये आपल्याला बाहेरून मिळतील ना.

**श्री. बाळु नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी :—** साहेब, गव्हर्नमेंटचा तसा जी. आर. आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** साहेब, जी.आर. काय आहे? सांगितले का आज पर्यत? हे प्रत्येक येतो, एक पेज.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** हा विषय आल्या नंतर परत परत चर्चा होते.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** नाही, नाही, या विषया बरोबर आम्हांला जी.आर. ची प्रत पण दया.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— जी.आर.ची प्रत दया ना काय आहे ते?

**श्री. बाळु नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी :—** सर जी.आर. ची प्रत सोबत जोडलेली आहे, माझ्याकडे जी. आर.ची प्रत आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** २२ हजार प्लस लेव्ही आहे त्याच्यावर ना त्याच्यावर ४३ टक्के लेव्ही.

**श्री. बाळु नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी:—** सर खरे म्हणजे वदारिया साहेब आणि बोडारे साहेब यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो खरोखरच वाखाखण्याजोगा आहे. जसे की, आपल्याकडे ९६ पदे आहेत, तर आपल्याकडे फक्त ६० पदे भरलेली आहेत. ३६ कर्मचा—यांची पद रिक्त आहेत. तर आपण त्या पैकी ३१ कर्मचारी सुरक्षारक्षक मंडळाकडून घेतो, त्यासाठी आपल्याला प्रत्येक कर्मचा—यासाठी एका महीन्याला २२,४९६/— रूपये एका कर्मचा—यासाठी दयावे लागतात आणि तोच कर्मचारी जर परमनंट केला किंवा शासनाच्या निर्णयानुसार परमनंट केला तर आपल्याला जास्तीत जास्त १५ हजार, १६ हजार, १४ हजार आपल्या आस्थापना सुचीनुसार कमी खर्चात ते आपले होऊ शकते ही वस्तुस्थिती आहे. या शासन निर्णयामध्ये तसे नमुद केलेले आहे. आपण दुसरीकडून घेऊ शकत नाही. पण महापालिकेने जर जाहीरात काढली आणि त्यातून आपण भरती केली तर आपल्याला मिळू शकते. दुसरी गोष्ट म्हणजे अशी आहे की, शासनाने जर आपल्याकडे कर्मचारी पाठवलेले आहेत, तर त्यांच्या मधूनच भरती करून घेणे, त्यांच्यामधूनच परमनंट यावेत असे आदेश/निर्देश दिलेले आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** तर शहरातील नागरीकांना काम मिळू शकते.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** महापालिकेच्या आस्थापनावरती सुरक्षारक्षकांची पदे मंजुर आहेत का?

**श्री. बाळु नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी :—** ९६ पदे आहेत, बाकीचे भरलेले आहेत.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** आस्थापनाचे कोण आहेत?

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** ६० भरले आहेत.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** ६० भरले आहेत, बाकीचे बाकी आहेत. एकुण मुंजुर पदे किती आहेत सगळे? वर्ग—१, वर्ग—२, वर्ग—३, वर्ग—४.

**प्र. सहाय्यक आयुक्त, श्री. मनिष हिवरेः—** यादी आणून दाखवावी लागेल सर.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** संपुर्ण तोंडी पाठ पाहीजे, यादी आणतो आणि मला दाखवतो. किती वर्षापासून काम करतात, १,२, ३, ४ चे पाठ पाहीजे. ते बघितल्या नंतर कोणी पण सांगेल मला अंदाजपंचे सांगा, मला आकडा पाहीजे. ४ हजार पदे आहे, दोन हजार पदे आहेत, ३ हजार पदे आहेत, असे काल जसे सांगितले सफाई कामगारां बददल माझ्या संगणकामध्ये फिट झाले. तुमची १५५० सफाई कामगारांची पद आहेत, ९० भरले आहेत आणि शिल्लक पद ६० आहेत. दर वर्षी ३०५ चा जो घोळ चालला आहे, काल कोर्टामध्ये मी ॲफीडेव्हीट केले आहे, ३०५ चा जो घोळ चालला आहे, दर वर्षी काही कर्मचा—यांना मुकादमाचे प्रमोशन दिले, त्याचे पद रिक्त झाले अशी पदे रिक्त झालेली आहेत आणि ३५ टक्के आपल्या माहीतीस्तव तर सगळयांना वाटते की, पद भरली पाहीजेत. महानगरपालिकेचा आस्थापनावर होणारा खर्च ३५ टक्के आहे, ३५ टक्याची अट आहे, आपण आजच्या घडीला ४० टक्केच्या पुढे गेलेलो आहे. परफेक्ट आकडा मला माहीत नाही, पण माझ्या माहीती प्रमाणे ४० टक्केच्या पुढे. अशा स्थितीमध्ये तुम्ही जर पद भरणार तर त्या कर्मचा—यांना पुढच्या महीन्यापासून पगारच मिळणार नाही. म्हणजे त्यांचे विहीत वेळेत पगार होणार नाही, उत्पन्नाचे साधन काय वाढले आहे? उत्पन्न जेवढे आहे,तेवढेच आहे. मग आपण आता सर्व्हेचे टेंडर काढलेला आहे. म्हणजे आपल्या शहराचा सर्व्हे करायचा ज्या ठिकाणी रेसिडेनशिअल प्रॉपर्टी आहेत तिथे कमर्शिअल प्रॉपर्टी आहेत तिथे ी रेसिडेनशिअल प्रॉपर्टी टॅक्स ब—याच ठिकाणी काही ठिकाणी टॅक्सच लागलेला नाही. अशा प्रॉपर्टीचा शोध घेऊन दिवाळी झाल्या नंतर आमचे काम तर चालूच राहील. परंतु टेंडर जो काढलेला आहे, या टेंडरमध्ये आपण सगळे आणलेले आहे आणि स्थायी समितीने मान्यता दिली होती मला वाटते काही राजेशभाई ड्रोनवर करावे म्हणून मला वाटते आर.डी.एक्स कंपनी इथे असल्यामुळे ड्रोनची परवानगी इथे भेटत नाही. आपण गुगलवरती सर्व्हे करण्यासाठी केलेला आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** आम्ही ठराव पास केला आहे, परंतु तुम्ही जसे सांगत आहेत की, ड्रोनची परवानगी नाही, परंतु आम्ही टेंडर काढलेला आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** ड्रोनची परवानगी मिळत नाही म्हणून आपण दुसरीकडे जसे गुगलवर सर्वे करतात तसे करायचे टेंडर काढले आहे. मला वाटते पहीले दोनच कॉल आले, म्हणून आपण परत रिकॉल दिलेला आहे, मला वाटते काल, परवाच्या दिवशीच झालेले आहे, सात दिवसाची आपण मुदतवाढ दिलेली आहे. मग ते झाले तर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल तुम्ही ५० काय १०० कर्मचारी भरा. आम्हांला घरून पैसे दयायचे आहेत का? तुमचेच पैसे आहेत, तुमच्याच सेवेसाठी वापरायचे आहेत. पण आज अशी परिस्थिती आहे की, आपण एक दम बॉडरी लाईनवर आहेत. म्हणजे स्थायी समिती ही आर्थिक नियोजन करणारी कमिटी आहे, म्हणून मी आपल्याला सांगत आहे की, आपल्याकडे १६ कोटी तिजोरीत जमा आहेत. १७ कोटी खर्च आहे, १ कोटीचे सोंग कुठून करणार आहेत? सगळया गोष्टीचे सोंग करायचे पैशाचे नाही करता येणार. १ कोटीचा फरक कुठून भरून काढणार? आयुक्त आणणार कुठून? दर महीन्याला १ कोटी आणायचे कुठून? म्हणजे १२ कोटींचा फरक आहे, म्हणजे समजा मला माझे घर, एक कुटूंब म्हणून चालवायचे आहे, तर मला महीन्याला १७ कोटी रूपये लागतात, तर माझ्याकडे १६ कोटीच रूपये आहेत, आम्ही आता हातपाय हलवले तर ५०, ३५ लाखाचे एवरेज आहे १५ दिवसामध्ये वसुलीचे कधी, ५० लाख आले, कधी ५५ लाख आल, कधी ३५ लाख आले, कधी २५ लाख रूपये आले मी सांगितले किती अवरेज आले सांग मला, कधी ३५ लाख रूपये अवरेजे आले असे म्हणतात. त्यामुळे आपण कर्मचा—यांना सानुग्रह अनुदान देवू शकलो, पगार देवू शकलो. अशीच जर

आपल्याला वसुली जर कंटीन्युव चालू राहीली तर सगळे ऑफिसच उतरावे लागेल तरच आमचे वसुलीचे टार्गेट पुर्ण होईल. त्याला अभिप्रेत आहे, त्या पध्दतीने काम होईल. आम्ही नुसते ऑर्डर देत राहायचे आणि ठेकेदाराने आमच्या दारात उभे राहायचे तुमच्या वार्डातले काम करायचे, सर्व व्यवस्थित करायचे आणि भिक मागायला माझ्या दारामध्ये उभे राहायचे ते म्हणतील ऑर्डर कशाला दिली? जर तुमच्याकडे पैसे नव्हते तर, आमच्याकडे काय उत्तर आहे? त्याच्यामुळे मला काय तुम्ही म्हणतात जेवढया पध्दतीने पळा त्याच्या पेक्षा मी दहा पट्टीने पळणारा माणूस आहे. पण तिजोरीतच पैसे नाहीत, मला दोन्हीचे तारतंम्य तर बघावे लागेल ना. जमनुभाई बोलतात की, हा ठराव केला आहे, तो ठराव केला आहे, हे केले आहे आणि स्थायी समितीचे सभापतीचे मिस्टर नेहमी बोलत असतात की, आम्ही सर्व ठराव पास केले आहेत. परंतु मला समजते की, सर्व ठराव पास केले आहेत, पण मी तुमच्या पहीले टेंडर काढण्यासाठी बसलो आहे. परंतु तिजोरीमध्ये काय आहे? हे पण बघा. आपण खिशात काय आहे? हे बघूनच आपण बाजार करणार ना. उल्हासनगरचा बाजार तर खुप मोठा आहे.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—** यामध्ये आपण माझ्या हिशोबाने तीन महीन्याची मुदत वाढ दया आणि तीन महीन्याच्या आत आपण एक आढावा लिहा तुमच्याकडे सुरक्षा रक्षकांचे किती गरज आहे. किती लोक आपले सुरक्षारक्षक आहेत आणि अजून किती पाहीजेत? परत परत वाढ देणे तर काहीच होणार नाही. तर असेच लोक वाढत जातील.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** साहेब, एक विषय असा आहे की, मागचे आयुक्त होते, श्री. गणेश पाटील त्यांनी सांगितले होते की, ६० कर्मचारी आणि ३१ म्हणजे ९१, ९१ कर्मचारी अस्तित्वात आहेत ते विचारा. कुठल्याच म्हणजे ठरावीक ठिकाणी आपल्या वार्ड ऑफिसरकडे, महानगरपालिकेमध्ये कुठेच नोकरीला नसतात? म्हणजेच सुरक्षारक्षक गायब असतात कोणालाच माहीती नाही? हे आयुक्तांचे म्हणणे आहे इतिवृत्तामध्ये आणि त्यांना पण माहीती नाही.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** इतिवृत्तामध्ये आहे ना, त्यांनी सांगितले आहे की, मला माहीतीच नाही कोण कुठे काम करीत आहे?

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** उद्या सकाळीच ९६ माणसे कुठे आहेत, त्यांची ठिक १०.०० वाजता परेड ठेवायची, उद्या सकाळी आता नाही, उद्या सकाळी ९६ माणसे लाईनने उभी करायची उद्या त्यांचा मी आढावा घेतो ना. उद्या सकाळी त्यांची परेड घ्यायची कोण कुठे काम करतो, किती वाजता त्यांची डयुटी आहे? त्याचा आढावा घेऊन मला त्याचा चार्ट देवून टाका.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** सुरक्षारक्षक कुठे गायब असतात कोणालाच माहीत नाही

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** तीन महीने केले आहे ना.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** तीन महीन्यासाठी पास केले आहे.

**महापालिका सचिव:—** तीन महीन्यासाठी पास.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—** माझे ऐकुन घ्या, तीन महीन्यासाठी मुदतवाढ देवू यामध्ये आयुक्तांना प्राधिकृत करू की, त्यांनी आढावा घेण्यात यावा. नंतर काय करायचे आहे? हे तुम्ही आम्हांला सांगा.

**महापालिका सचिव:—** यामध्ये लिहायचे आहे ना, आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—** नाही ठराव असा असेल, तीन महीन्यासाठी मुदतवाढ, आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे, तीन महीन्याच्या आत आढावा घ्या आणि पुढे काय करायचे हे आम्हांला सांगा? हे पब्लिकचे काम नाही, ज्याचा अचासंहितेवर परिणाम होईल.

**महापालिका सचिव:—** यात तीन महीन्यासाठी मुदतवाढ टाकते. बाकी इतिवृत्तात येईल.

**काही सदस्य :—**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजाः—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**☑विषय क्र. ६ :—** मा. सचिव,सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा नवी मुंबई. यांचे द्वारा पुरवठा करण्यात आलेल्या कार्यरत १० सुरक्षा जवानांनसाठी १ वर्ष मुदत वाढ करणे करिता मान्यता मिळणे.

**<u>प्रस्तावना</u>**

सुरक्षा विभागामार्फत सुरक्षा रक्षक मिळणे कामी विविध विभागाकडुन महापालिकेच्या मालमत्तेच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी सतत मागणी होत असते परंतु सुरक्षा विभागाकडे सुरक्षा रक्षक मागणीपेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो.यांच्या दिनांक ०४/०४/२०१६ रोजीच्या मान्यतेने तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रमांक २१ दिनांक १३/०६/२०१६ व मा. आयुक्त सो. यांच्या दिनांक २०/०३/२०१७ रोजीच्या मान्यतेने तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रमांक १२७ दिनांक २९/०३/२०१७ ठराव क्रमांक १२९ दिनांक ३१/०३/२०१८ अन्वये. उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेचे रक्षण करणेसाठी मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्या करिता) यांचे कडील ०९ **“सुरक्षा रक्षक”** व ०१ **“सुरक्षा सुपरवायझर”** कार्यारत असुन त्यांची ०६ महिन्याची मुदत दिनांक १२ ऑक्टोबंर २०१८ रोजी संपुष्टात येत आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागाच्या अस्थापनेमधिल कर्मच्या—यांची कमी लक्षात घेता प्रसंगानुसार शहराच्या विविध समस्या घेऊन नागरिक संप, मोर्चा, घेराव, धरणे, व आंदोलने या सारखे प्रकार मोठया प्रमाणावर होत असतात. करीता अधिका—यांना अंगरक्षक तसेच मालमत्तेच्या संरक्षणासाठी यापूढे सुरक्षा रक्षकाची आवशकता लक्षात घेता तसेच उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्तेमध्ये दिवसेंदिवस विस्तार होत असल्याकारणाने सुरक्षिततेच्या दृष्टिकोणातुन महापालिका प्रशासकिय भवन, तसेच चार प्रभाग समित्या, इत्यादी ठिकाणी सुरक्षा रक्षकांची आवश्यकता आहे.

महापालिका सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडुन १० सुरक्षा जवानांना ०१ वर्षाची मुदत वाढ देणे प्रस्तावित आहे. मा. सचिव, सुरक्षा रक्षक मंडळ मुबंई यांचे दिनांक १३/०८/२०१८ रोजीच्या आदेशानुसार प्रती सुरक्षा रक्षकास एक महिन्या करीता २२,४९६/– तर ९ सुरक्षा रक्षकांना एक महिन्या करिता २,०२,४६४/– तर ९ सुरक्षा रक्षकांना एका वर्षाकरीता २४,२९,५६८/– तसेच एका सुरक्षा सुपरवायझर करीता एका महिन्याला २४,१३१/– तर एक वर्षा करीता २,८९,५७२/– एकुण १० सुरक्षा जवानांना एक वर्षा करीता २७,१९,१४०/– येवढा खर्च अपेक्षीत आहे.

मा.सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडुन घेण्यात येणा—या सुरक्षा रक्षकांच्या पगारात दर दोन वर्षानी व इतर भत्यात दर सहा महिन्याने वाढ होत असते. त्याच प्रमाणे मुळ वेतन +विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन, नोंदीत सुरक्षा जवानांचा किमान वेतनावर मुळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन मुख्य मालकाने ४६.७५ टक्के दराने लेव्ही देणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे घर भाडे भत्ता, प्रवास भत्ता व अतिकालीन भत्ता यावर ४.७५ टक्के दराने लेव्ही देणे मुख्य मालकाला बंधनकारक राहिल. तसेच ज्या विभागामध्ये सुरक्षा रक्षकांना कामगार विमा योजना लागु नाही. अशा मुख्य मालकांनी ४३ टक्के लेव्ही किमान वेतनावर ( मुळ वेतन +विशेष भत्ता/महागाई भत्ता = किमान वेतन,) देणे बंधनकारक राहिल.

सबब. मा. सचिव सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा (मुंबई ठाणे जिल्ह्याकरिता) यांचे कडुन घेण्यात आलेल्या १० सुरक्षा जवानांना १२/१०/२०१८ पासुन एक वर्षा करीता मुदत वाढ देणे आवश्यक आहे. त्यावर येणारा खर्च महापालिका अंदाजपत्रकातील अ. १(२४)

आस्थापना खर्च रोजंदारी/मानधन इत्यादी या लेखाशिर्षकातील मंजुर तरतुदीतुन खर्च करणेसाठी मा. स्थायी समिती यांचे प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४४ **दिनांकः— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सचिव,सुरक्षा रक्षक मंडळ सानपाडा नवी मुंबई. यांचे द्वारा पुरवठा करण्यात आलेल्या कार्यरत १० सुरक्षा जवानांनसाठी १२/१०/२०१८ पासुन ३ महिन्याची मुदत वाढ देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :—** उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीद्वारे पाच दिवसांचा आयोजित ''उल्हास फेस्टीवल'' कार्यक्रमाकरीता साहित्य पुरवठा करणेकरीता न्युनत्तम निविदाकार मे. अमरज्योती एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांचे न्युन्नतम खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणे.

---

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** कोण सांगणार आहे?

**अधिक्षक, श्रीमती. अलका पवारः—** महीला व बालकल्याण समितीद्वारे पाच दिवसांचा ''उल्हास फेस्टीवल'' आयोजित केला आहे. याच्यामध्ये शहरातील उत्कृष्ट काम करणारे शहरातील महीला बचत गट, उद्योग महीला, उत्सुक महीला यांना स्टॉल लावण्यासाठी आयोजन केलेले आहे आणि त्यासाठी ई—टेंडरींगद्वारे ई निविदा मागविण्यात आलेली होती. निविदा मांगवल्या नंतर न्युनतम दर मे.अमरज्योत एंटरप्राईजेस यांचे होते. त्यामुळे त्यांच्या खर्चास वित्तीय व आर्थिक मान्यता देण्यासाठी स्थायी समितीपुढे गोषवारा सादर केलेला आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** साहेब, याच्यामध्ये विषय असा आहे, महीला बालकल्याण विभागाकडून विषय आला आहे, त्याच्यामध्ये सगळे स्टॉल वैगेरे असतील, डिजे, साऊंड सिस्टीम, आम्हीमागच्या वर्षामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती असेल आम्हांला अशा ठिकाणी पैसे खर्च करायला लावले आणि नंतर ते पैसे दिले नाही आणि हा त्या संदर्भातला फक्त महीला व बालकल्याणकडून आलेला विषय आहे. त्याला पण मान्यता दयावी. कारण की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती असेल, शिव जयंती असेल यांच्या जयंतीसाठी आपण जो खर्च करतो, त्या खर्चाला मागच्यावेळेस मान्यता दिली नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** स्थायी समितीमध्ये हा मुद्दा आला नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** स्थायी समितीमध्ये आला नाही, आयुक्तांकडे अजून पर्यंत पेडींगच आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** डॉ. बाबासाहेबांची जयंती ही शासकीय जयंती आहे, त्याच्यामुळे महानगरपालिका साजरी करते.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** करते म्हणजे जो खर्च दिला आहे, तो खर्च संबंधित एजेन्सीला करायला लावला त्या वेळेस त्या वेळेस आयुक्त बोडके साहेब होते आणि त्यांनी सांगितले की खर्च करा पण नंतर खर्च दिलाच नाही._ठेकेदार खर्च करून बसला ना.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** कोणाकडे ते डिपार्टमेंट होते, भांडार विभागाकडे? भांडार विभागाचे कोण आहेत? काय आहे हे?

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आयुक्तांकडे उद्या फाईल पाठवून दया.

**आयुक्त, श्री. भगवान भालेराव:—** भालेराव साहेब, म्हणतात तो विषय काय होता? सुप्रीम कोर्टाची ऑर्डर आहे, ते मला सगळे माहीत आहे, पण विषय काय होता? तो मला सांगा, मग मी बोलतो.

**मुख्य लेखाधिकारी, श्री. विकास चव्हाण:—** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे काही तरी ८ लाखाचे बिल होते,

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** बरे ८ लाख बिल होते, तो खर्च कोणी केला होता?

**मुख्य लेखाधिकारी, श्री. विकास चव्हाण:—** एका संस्थेने खर्च केला होता साहेब,

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**महापालिकेने केले होते का?

**मुख्य लेखाधिकारी, श्री. विकास चव्हाण:—** नाही, नाही, महापालिकेने नाही.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** शासकीय जयंती ८ लाख का? महापालिकेने जयंती......

**मुख्य लेखाधिकारी, श्री. विकास चव्हाण:—** चहाची व्यवस्था, नास्त्याची व्यवस्था दरवर्षी महापालिकेने केली आहे

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** या वर्षी १२ लाखाचा निधी या वर्षी तो ८ लाखावर करायला लावला. उलट ४ लाख त्याच्यातले आम्ही वाचवले आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** जयंती आपण कोणत्या कोणत्या महापुरूषांची करतो, शासनाच्या नियमा प्रमाणे?

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** शासनाची यादीच आहे ती, त्याच्या व्यतिरिक्त आपण करीतच नाही.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मागच्या वर्षी, त्याच्या मागच्या वर्षी १२ लाख रूपये खर्च झाले परंतु यावर्षी ८ लाखात खर्च करायला लावला नियोजन केले पाटील साहेब लेखाधिकारी यांच्या सोबत बसुन आम्ही ते केले, देहरकर साहेब होते आठ लाख रूपयापर्यंत आणले आणि ते थांबवले

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** ठिक आहे, एक काम करू एक महीन्याच्या आत यांचे एक्झामिन करून स्थायी समितीपुढे सादर करा. एक महीन्याच्या आत. तुम्ही बघा आपआपसात काय इश्यु आहे तो करून एक महीन्याच्या आत स्थायी समितीमध्ये घेऊन या.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** शिवजयंती शासकीय जयंती म्हणून साजरी करायची पण आम्ही आज पर्यंत केली नाही. पुढच्या वेळेपासुन शिव जयंती देखील शासकीय जयंती म्हणुन साजरी करण्यात यावी. आजपर्यंत शिव जयंती ही शासकीय जयंती म्हणुन साजरी करण्यात आलेली नाही. आम्ही आमच्या रितीने शिव जयंती साजरी करतो.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:— मागच्या वेळेस तीन लाख पच्याहत्तर हजार वाटाघाटी अंती चार लाख चौदा हजार

**<u>अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार</u>** :— चार लाख चौदा हजार नाही सर, चौतीस लाख नव्वद हजार तीनशे तेहतीस आहे.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>**:— आयटम बघा ना तुम्ही तीन पंच्याहत्तरचे चार चौदा नव्वद हजाराचे दीड लाख दोन लाख चाळीस हजारचे दोन पंच्याऐंशी.

**<u>अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार</u>** :— सर सुरूवातीला जे आले होते ते छत्तीस लाख बाव्वन्न हजार सातशे होते त्यानंतर ते वाटाघाटी करून ते कमी केले.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>** वाटाघाटी अंती ते कमी झाले पाहिजे.

**<u>अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार</u>** :— काही काही आयटेमस मध्ये कमी केले सर्वामध्ये नाही.

**<u>सदस्य, श्री, राजेंद्र चौधरी :—</u>** मॅडम, याच्यामध्ये ना....

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** तीन पंच्याहत्तरचे चार चौदा नव्वद हजाराचे दीड लाख दोन लाख चाळीस हजारचे दोन पंच्याऐंशी साठ हजाराचे पंचवीस हजार..

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u>** :— पंचवीस हजारचे सदोतीस हजार

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे</u>** :— वाटाघाटी मध्ये कमी झाले पाहिजे ना?

**<u>अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार</u>** :— किती नंबरला होते? टोटल मधुन कमी करून छत्तीस लाख पंच्याहत्तर हजार...

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u>** :— याचात तर वाढलेले आहते ना.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी</u>** :— डीजे, साउंडला किती दाखवले आहेत?

**<u>अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार</u>** :— आलेल्या टोटल रक्कम मधून वाटाघाटी करण्यात आलेली आहे. प्रत्येक साहीत्याला वाटाघाटी केलेली नाही. एका लमसम रक्कम मधुन आलेली रक्कम छत्तीस लाख त्याच्यामध्ये वाटाघाटी केलेली आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी</u>** :— आपण आता एक विषय घेऊ या डीजे, साउंड चार दिवसा करीता आहे का?

**<u>अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार</u>** :— पाच दिवसाकरीता.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी</u>** :— चार साऊंड आहेत, इथेपण सत्तर हजाराचे नव्वद हजार केलेले आहे.

**<u>अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार</u>** :— सर, ते बरोबर आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** हा असे बोला ना, हा.. हा कॉलम इकडे पाहिजे होता

**अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार :—** हा... हा.. कॉलम वेगळे वेगळे झाले. नाही नाही सर त्याच्यामध्ये कॉलम....

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** वाटाघाटी झालेल्या आहेत.

**सदस्य, भगवान भालेराव :—** फासे साहेब....

**अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार :—** सर हा मधला कॉलम जो आहे ना, तो योग्य आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** चुक दुरूस्त करून आणा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** दुसरे त्याच्यामध्ये हा तर विषय झालाच दुसरा विषय डीजे, सांऊड जो आहे त्यावर बंदी आहे. जर त्याला लावला तर तुमच्यावर गुन्हे दाखल होतील. रस्त्याचे रामचंदानी हे घेऊन फिरते....

**अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार :—** सर मी जुलैमध्ये आलेली आहे, त्यामुळे मला फेरफार करायला लागेल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** साऊंड सिस्टीम कमी ठेवायची आहे, रस्त्यावर असेल किंवा मंडपामध्ये असेल

**अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार :—** सर हा प्रस्ताव मी येण्याच्या अगोदर झालेला आहे. मी जुलै मध्ये आलेली आहे. त्यामुळे मला फैसला करावा लागेल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** डिसीबल सर्वांना सांउड सिस्टर कमी ठेवायचा आहे तो रस्त्यावर असेल या मंडपात असेल.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे :—** राजेशजी रिंकु माहराज गोलमैदानमध्ये हे फिरवत होते.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** नाही तर काय आहे? सरिता खामचंदानी महापालिकेवर केस करतील.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे :—** नाही, नाही प्रभाग अधिकारी.....

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—:—** आपण साऊंड वाजवा साउंड वाजविण्याकरीता मनाई नाही आहे फक्त त्याचा आवाज हा नियमानुसार डेसीमलमध्ये मर्यादित नियंत्रीत करायचा आहे. आपण लोक माईकवर बोलत आहोत हा जो आवाज आहे तो डेसीबलच्या आत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** ऐका..ऐका....

**सदस्य, श्री. भगवान भालेराव :—** २० नगचे ७२ हजार रूपये....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—** पूर्णपणे हे चुकीचे आहे.

**अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार :—** सर, सर हि टायपिंग मिस्टिेक झालेली आहे. त्याच्यामध्ये...

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव :—</u>** हे रद्द करा दुरूस्त करून आणा चला.

**<u>आयुक्त, श्री. अच्यु हांगेः—</u>** मॅडम बोला....

**<u>अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार</u>** :— टायपिंग मिस्टेक झालेली आहे हा कॉलम येथे असायला पाहिजे होता.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे</u>**:— एक मिनीट सुचना अशी आहे की....

**<u>अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार</u>** :— सर हा विषय असा आहे की....

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे</u>**:— तिकडे उभे रहा. चला तिकडे उभे रहा. तर सुचना अशी आहे की, हेड ऑफ डिपार्टमेंटनी सिरियसली घ्या सगळयांना मी एक आदेश काढलेला आहे की, ज्यांना प्रस्तावना स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभेपुढे पाठवायाचा आहे त्यांनी प्रस्तावनाची मुळे प्रत माझ्याकडुन मंजुर करून घ्यावयाची आहे आणि त्याच्या नंतर दुस—या कॉपीवर मुळ प्रतीवर आयुक्तांची सही असेल. बाजूला लिहून ती प्रस्तावना स्थायी समितीकडे किंवा सर्वसाधारण सभे कडे पाठवयाची आहे. अशी ब्रेडेर चुक मी पुढच्या वेळेला मान्य करणार नाही. तुमचा कोण कारकुन आहे जर त्यानी इकडचा कॉलम तिकडे झाला आहे. आणि तिकडचा कॉलम इकडे झाला आहे हे तुम्ही स्थायी समितीपुढे मांडत आहेत, तर त्याला निलंबीत करून टाकतो आज कोणी टाईप केले आहे हे.

**<u>अधिक्षक, (म.बा.वि.), श्रीमती अलका पवार</u>** :— सर, भारती अंगाळे यांनी.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे</u>**:— त्यांना घरी पाठवुन देतो आज.

**<u>सदस्य, जमनादास पुरस्वानी</u>** :— सर, हे सर्व चुकीचे आहे.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे</u>**:— हि जबाबदारी हेड ऑफ द डिपार्टमेंटने बारकाईने बघण्याची जबाबदारी आहे, याचा अर्थ तुम्ही बारकाईने बघितले नाही. कारकुनाने टाईप केले, तुम्ही सही केली दिले पाठवून, हा असा प्रकार आहे. जो बेजबाबदार वागण्याची पध्दत आहे. याच्यानंतर सर्व हेड ऑफ द डिपार्टमेंट यांना आदेश दिलेला आहे. माझ्याकडुन प्रत मंजुर घेतल्याशिवाय बाहेर पत्रच पडणार नाही.

**<u>सदस्य, जमनादास पुरस्वानी</u>**:— सर, मी एक बोलु इच्छितो की, आपल्या उप—आयुक्त साहेबांनी सही केलेली आहे. हे एवढे चुकीचे आहे की, ते म्हणतात हे इकडुन तिकडे झालेले आहे. हे असे झालेले नाही आहे. ऐका ऐका १० नंबर कॉलम बघा मुव्हीचा लिहिलेले ७५ हजार वाटाघाटी मध्ये झाले २४ हजार म्हणजे २०० टक्के कमी अशी वाटाघाटी असे केले आहे. आणि कॉलम नंबर ७ बघा ९० हजार वरून त्याला सरळसरळ वाटाघाटी करून १ लाख ५० हजार म्हणजे ६० हजार रूपये वाढ केलेली आहे. सर हे सर्व पूर्णपणे चुकीचे आहे.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी</u>**:— सर पहिला आईटम आहे ३ लाख ७५ हजार त्याला चार लाख चौदा हजार करण्यात आले आहे.

**<u>सदस्य, जमनादास पुरस्वानी</u>**:— चार लाख चौदा हजार आहेत कुठे? उलट सुलट लिहीले आहे.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u>** चव्हाण साहेबांची सही आहे.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी</u>**:— सर वाटाघाटी आहे ना, वाटाघाटी आहे, सर, दुसरे कॅमेरा लावण्याकरीता सी.सी. टि.व्हि. कॅमेरा...

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे**:— एक मिनीट मी तुम्हाला सुचना करू इच्छितो की, स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभे पूर्वी हेड ऑफ डिपार्टमेंटची किंवा अजेंडा निधण्यापूर्वी असा प्रकार व्हायला नको
**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** याच्यापुढे असा प्रकार होणार नाही याची मी दक्षता घेईन.

**महापालिका सचिव:—** मग हा विषय डिफर, डिफर नाही प्रशासनास फेर सादर करण्यास निर्देश देत आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** फेर सादर करण्यास.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ७ :—** उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीद्वारे पाच दिवसांचा आयोजित ‘‘उल्हास फेस्टीवल’’ कार्यक्रमाकरीता साहित्य पुरवठा करणेकरीता न्युनत्तम निविदाकार मे. अमरज्योती एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांचे न्युन्नतम खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती व्दारे चार दिवसांचा आयोजित “उल्हासफेस्टीवल” कार्यक्रमा करिता साहित्य पुरवठा करणेकरीता “ई टेंडर प्रक्रीयेव्दारे” दोन लिफाफा पध्दतीने जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या.नियमानुसार खालील तीन निविदाकारांनी वेबसाईटवरुन निविदा submit केल्या आहेत.
१. में अमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर
२. मेंमोहित एंटरप्राईजेस, उल्हासनगर
३. में जे. ई. एंटरप्राईजेस, उल्हासनगर

दिनांक ०९/०३/२०१८ रोजी प्राप्त झालेल्या निविदा गुरूवार दिनांक २२/०३/२०१८ रोजी दुपारी ठिक ०३:३० वाजता निविदा कक्षामध्ये निविदा समिती समक्ष उघडण्यात आल्या आहेत.
लिफाफा क्र १ च्या अहवालानुसार तीनही निविदाकार पात्र ठरल्याने लिफाफा क्रं २ वरिल सर्व उपस्थितांच्या समक्ष उघडण्यात आला.प्राप्त तिन निविदाकारांच्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे. (लिफाफा क्रं. १ चा अहवाल सोबत सादर).

(लिफाफा क्रं. २ चा तुलनात्मक तक्ता).

| अ क्रं | तपशिल | आवश्यक परिणाम | पुरवठादाराचे नांव व त्यांनी सादर केलेले प्रति दर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | में जे. ई एंटरप्राईजेस , उल्हासनगर | मेंअमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर | में मोहित एंटरप्राईजेस, उल्हासनगर |
| १ | Stall 10x10 (for rental ) (4 days) | ११० | ३८९००० | **३७५०००** | ३८५००० |
| २ | Table 3 inch stall (for rental) (4 days) | ११० | १५८००० | **१५००००** | १६१००० |
| ३ | Chairs 5 inch stall (for rental) (4 days) | ११० | २७५०० | **२५०००** | २३००० |
| ४ | Visitor chairs (for rental) (4 days) | २०० | ८००० | **७५००** | ७३०० |
| ५ | VIP chairs for stage (for rental) (4 days) | २० | १३००० | **१२५००** | १२८०० |
| ६ | CFL light 2 inch sgtall (for | ११० | ८२५०० | **८००००** | ८०००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | rental) (5 days) | | | | |
| ७ | Focus 100w (5 days) | १५० Nos | ९१००० | ९०००० | ८८००० |
| ८ | Carpet (for rental) (4 days) | 27500 Sqft | २४२५०० | २४०००० | २४१००० |
| ९ | Stage 30x20 (4 days) | १ | ६३००० | ६०००० | ६१५०० |
| १० | Advertising Movie 2 Nos. | ५ | ७९००० | ७५००० | ७०००० |
| ११ | Photo (10x6) | १००० | ४९००० | ४५००० | ४७००० |
| १२ | Small Trophi (with UMC city Logo) | ५० | ४१००० | ३७५०० | ४०००० |
| १३ | Big Trophi (with UMC city Logo) | २५० | १२८००० | १२०००० | १२४००० |
| १४ | Flower Books | २० | १०००० | ८००० | ११००० |
| १५ | Volentry (4 days) 20 each day | २० Nos | १२०००० | १२०००० | ११५००० |
| १६ | Generator (for rent6al) (5 days) | २ Nos | १९०००० | १७५००० | १९६००० |
| १७ | Gift (Juice set) | १५० | १४८७५० | १४०००० | १४०००० |
| १८ | Shawl and Coconut | ५०० | १४४००० | १४०००० | १४६००० |
| १९ | Nasta Pack (Sandwich, Gulabjam, Biscut) | २००० | १९०००० | १८०००० | १८०००० |
| २० | Fountain big size (For rental) (4 days) | १ | ५०००० | ५०००० | ५२५०० |
| २१ | Banner for city Add/Welcome Gate/Stall (4 days) | 7500 Sqft | ३२०००० | ३००००० | ३००००० |
| २२ | Advertisement Moving Vehicle (For Rental) | ४ | १६०००० | १५०००० | १६०००० |
| २३ | Cable Advertisement | 1 week | ८०००० | ७५००० | ७५००० |
| २४ | 20 ltr Water jar for Stalls | 300 | ४०००० | ३९२०० | ३९२०० |
| २५ | 1 ltr Bisleri Bottle for Officers and VIPs | 100 box | २०००० | १८००० | २१००० |
| २६ | Cable Live Program | ४ | ६६००० | ६०००० | ६२५०० |
| २७ | CC Camera (with Tv and Back up) (For rental) | ४ | २४०००० | २२५००० | २३०००० |
| २८ | D.J. sound system (For rental) | ४ | ७२००० | ७०००० | ७५००० |
| २९ | Cloth Bag with Printing | ५०० | ६०००० | ५०००० | ५५००० |
| ३० | Invitation cards | ५०० | २२००० | २०००० | २०००० |
| ३१ | colour Certificate | ५०० | ४४००० | ४०००० | ४०००० |
| ३२ | Welcome gate (For rental) | २ | ३०००० | २५००० | २७५०० |
| ३३ | Maharastrain Traditional Dances and singings (with famousAdvertise for 2 Hrs daily) | ४ days | १७५००० | १५०००० | १४०००० |
| ३४ | Sindhi Sanskrit Darshan | १ days | ८०००० | ७५००० | ७२५०० |
| ३५ | Panjabi Loknrutya | १ days | ८०००० | ७५००० | ७२५०० |
| ३६ | Gujrati Sanskrit Program | १ days | ८०००० | ७५००० | ७२५०० |
| ३७ | Other Cultural Sanskrit Program | १ days | ८०००० | ७५००० | ७२५०० |
| | | | ३८,७३,२५० | **३६,५२,७००** | ३७१६३०० |

तीनही निविदाकारांचा (लिफाफा क्रं. २ चा तुलनात्मक तक्ता)

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | अंदाजित किंमत | एकूण प्राप्त दर (रू) |
|---|---|---|---|
| १ | में. में अमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर | रू. **३४,९०,३३०/—** | **३६,५२,७००** |
| २ | में. मोहित एंटरप्राईजेस, उल्हासनगर | | **३७,१६,३००** |
| ३ | में. जे. ई. एंटरप्राईजेस, उल्हासनगर | | **३८,७३,२५०** |

उक्त तुलनात्मक तक्त्यानुसार निविदेमध्ये प्राप्तमें अमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांनी सादर केलेले न्युन्नतम दर रू. **३६,५२,७००/—**हेअंदाजित दरा पेक्षा ४: ने जास्त आहेत.यास्तव उप आयुक्त (मबाकस)यांना पत्र क्र उमपा/मबाकस/०९/दिनांक २१/४/२०१८ अन्वये दिनांक

२३/०४/२०१८रोजी दुपारी ०३:०० वाजता उप आयुक्त (मबाकस)यांचे दालनात बोलविण्यात आले व त्यानुसार संबधित निविदाकाराने दिनांक २६/४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर साहित्य निविदेतील प्राप्त पुरवठा करणेस तयारी दर्शविली आहे.वाटाघाटीच्या तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ क्रं | तपशिल | आवश्यक परिणाम | प्राप्त न्युनत्तम दररू (मेंअमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर) | वाटाघाटी अंती प्राप्त दर रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | Stall 10x10 (for rental ) (4 days) | 110 | ३७५००० | ४,१४,००० |
| 2 | Table 3 inch stall (for rental) (4 days) | 110 | १५०००० | १३१८०० |
| 3 | Chairs 5 inch stall (for rental) (4 days) | 110 | २५००० | ३७७०० |
| 4 | Visitor chairs (for rental) (4 days) | 200 | ७५०० | १०३५० |
| 5 | VIP chairs for stage (for rental) (4 days) | 20 | १२५०० | १२४२० |
| 6 | CFL light 2 inch sgtall (for rental) (5 days) | 110 | ८०००० | ६०३०० |
| 7 | Focus 100w (5 days) | 150 Nos | ९०००० | १५०००० |
| 8 | Carpet (for rental) (4 days) | 27500 Sqft | २४०००० | २८५००० |
| 9 | Stage 30x20 (4 days) | 1 | ६०००० | ९०००० |
| 10 | Advertising Movie 2 Nos. | 5 | ७५००० | २४८४० |
| 11 | Photo (10x6) | 1000 | ४५००० | ४५७५० |
| 12 | Small Trophi (with UMC city Logo) | 50 | ३७५०० | ४८३०० |
| 13 | Big Trophi (with UMC city Logo) | 250 | १२०००० | ७५९०० |
| 14 | Flower Books | 20 | ८००० | ७२००० |
| 15 | Volentry (4 days) 20 each day | 20 Nos | १२०००० | ३१०००० |
| 16 | Generator (for rent6al) (5 days) | 2 Nos | १७५००० | १२५००० |
| 17 | Gift (Juice set) | 150 | १४०००० | ५७७५० |
| 18 | Shawl and Coconut | 500 | १४०००० | ७५२५० |
| 19 | Nasta Pack (Sandwich, Gulabjam, Biscut) | 2000 | १८०००० | १९४००० |
| 20 | Fountain big size (For rental) (4 days) | 1 | ५०००० | ३५००० |
| 21 | Banner for city Add/Welcome Gate/Stall (4 days) | 7500 Sqft | ३००००० | १८०००० |
| 22 | Advertisement Moving Vehicle (For Rental) | 4 | १५०००० | ५८६५० |
| 23 | Cable Advertisement | 1 week | ७५००० | २१००० |
| 24 | 20 ltr Water jar for Stalls | 300 | ३९२०० | ५०४०० |
| 25 | 1 ltr Bisleri Bottle for Officers and VIPs | 100 box | १८००० | १९९२० |
| 26 | Cable Live Program | 4 | ६०००० | ८०००० |
| 27 | CC Camera (with Tv and Back up) (For rental) | 4 | २२५००० | १७८००० |
| 28 | D.J. sound system (For rental) | 4 | ७०००० | ९०००० |
| 29 | Cloth Bag with Printing | 500 | ५०००० | ६७००० |
| 30 | Invitation cards | 500 | २०००० | १०००० |
| 31 | colour Certificate | 500 | ४०००० | ३०००० |
| 32 | Welcome gate (For rental) | 2 | २५००० | २५००० |
| 33 | Maharastrain Traditional Dances and singings (with famousAdvertise for 2 Hrs daily) | 4 days | १५०००० | ८०००० |
| 34 | Sindhi Sanskrit Darshan | 1 days | ७५००० | ८०००० |
| 35 | Panjabi Loknrutya | 1 days | ७५००० | ८०००० |
| 36 | Gujrati Sanskrit Program | 1 days | ७५००० | ८०००० |
| 37 | Other Cultural Sanskrit Program | 1 days | ७५००० | ८०००० |
| | | | ३६,५२,७०० | ३४,९०,३३० |

या अनुषंगाने निविदाकार मे. अमरज्योत एंटरप्राईजेस, उल्हासनगर यांना पाच दिवसांचा आयोजित ''उल्हास फेस्टीलवल'' कार्यक्रमाकरीता साहित्य पुरवठा करणे पोटी रु. ३४,९०,३३०/– एवढी रक्कम अदा करावी लागेल. तसेच निविदेमध्ये प्राप्त न्युनत्तम निविदाकार मे. अमरज्योत एंटरप्राईजस, उल्हासनगर यांचे न्युनत्तम दर रु. ३४,९०,३३०/– एवढा खर्चास व त्यांना पुढील आदेश करण्यासाठी सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या प्रशासकिय व वित्तिय मंजुरीस्तव सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.४५** **दिनांकः– ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीद्वारे पाच दिवसांचा आयोजित ''उल्हास फेस्टीवल'' कार्यक्रमाकरीता साहित्य पुरवठा करणेचा प्रस्ताव प्रशासनास फेरसादर करण्यास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :– उल्हासनगर-५ येथील स्मशानभुमी विकसित करणेचे कामाची ई निविदा मागविणेस मान्यता मिळणे.**

---

**सदस्य, श्री. भारत राजवानी :–** याचात कोण खुलासा करणार की यात काय बनवायचे आहे?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:–** सार्वजनिक बांधकामाचा हा विषय आहे, सर हे स्मशान भुमी विकसीत करण्याकरीता तिथे जॉगींग ट्रॅक आहे.

**मा. आयुक्त, श्री. अच्युत हांगे:–** शहर अभियंता यांचाकडुन हा प्रस्ताव मी मान्य केला आहे. हया पत्रात ड्राफटींग यापूर्वी करून घेतले पाहिजे होते. याच्यात चुकीचे पाठवत आहे किंवा बरोबर पाठवत आहात. यात हे ओव्हर शो झाले आहे. असे झाले नाही पाहिजे याकरीता बरोबर आहे ते माझ्याकडुन मंजूर करून घ्या आणि याच्या बाजुला लिहा की आयुक्तांची मुळ पत्रावर म्हणजे ओ.सी. वर सही असेल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :–** काय बोलायचे आहे ते बोला?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:–** सर, याला विकसीत करायचे असुन त्यामध्ये जॉगिंग ट्रॅक बनविण्याचे आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी :–** एक मिनिट आता तेथे जो जॉगिंग ट्रॅक बनविण्यात आले आहे तर त्यात दुसरा कसे बनवणार?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** सर, एक मिनिट त्यात पेव्हर ब्लॉक...

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी :—** १० हजारच्या वर लोक त्या स्मशान भुमीत येतात.

**सदस्य, श्री. भारत राजवानी :—** नाही, नाही ठिक आहे, आपण सुशोभिकरण करा हि चांगली गोष्ट आहे. परंतू तेथे आता जे बनविण्यात आले आहे या व्यतिरिक्त आणखी काय बनविणार आहे आपण?

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** आता जर प्रेवेश केला तर तो डाव्या बाजूला बनवला आहे, महापपालिकेने बनवला नाही. आता उजव्या बाजुला बनविणार आहेत.

**सदस्य, श्री. भारत राजवानी :—** मला एक पहीले सांगा, तो चांगल्या प्रकारे युज होत आहे का? जर आपण खर्च करणार आहेत आणि आम्हांला इथे गार्डननसाठी फंड मिळत नाही, गार्डन एक दम भंगार परिस्थितीमध्ये आहे. जिथे पब्लिक राहत आहे, त्यांच्यासाठी गार्डन तर.. ..

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** सर गाडर्नच्या टेंडरचे काम चालू आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी :——** ठिक आहे, टेंडरचे काम सुरू आहेत पण सांगा कुठले कुठले उदयान माझ्या प्रभागातील आहेत, पॅनलमधले आहेत?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :— नाही, नाही** स्मशानभुमीच्या आतील भागा संदर्भात बोलत आहात ना तुम्ही

**सदस्य, श्री. राजेश वदारिया :—** याचा अर्थ काय आहे? की माझ्या प्रभागात काम नाही झाले तर कोणाच्याही प्रभागात काम नही झाले पाहिजे का? हे सार्वजनिक काम आहे. हे उल्हासनगर ५ येथील आहे. सर माझ्या प्रभागात उदयान जर नाही बनविण्यात आले तर कोणत्याही प्रभागात उदयान बनविणार नाही का?

**सदस्य, भगवान भालेराव:—** आयुक्त साहेब,....

**सदस्य, श्री. राजेश वदारिया :—** आत बाहेर, उजवा, डावा सर्व त्यांना नियंत्रित करू दया, सर, यांनी काय सांगितले.

**सदस्य, श्री. भारत राजवानी :—** साहेब, तिथे बनवलेला आहे, राजेश भाई तेथे बनविण्यात आलेले आहे. नाही नाही बनविण्यात आलेले साहेब

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** माझ्या वार्डमध्ये बनवलेला नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया :—** आम्ही वारंवार बोलुन बोलुन थकलो आहे, गार्डन आयुक्तांनी मंजूर केले नाही. ते गोष्ट वेगळी आहे. परंतु हे...

**सदस्य, श्री. भारत राजवानी :—** नाही नाही, तेथे बनविण्यात आलेले आहे, आता बनविण्यात आलेले आहे.
एक वर्षापूर्वी बनविण्यात आलेले आहे. त्याठिकाणी एक पण व्यक्ती वाक करण्यासाठी जात नाही स्मशानभुमी मध्ये, एक मिनिट मला बोलू दया ना आठवडयात एक किंवा दोन वेळा तर आम्ही जात असतो मयत करीता.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया :—** आपण लोक महीन्यामध्ये एक वेळा जात असेल.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी :—</u>** तिथे लोक वॉक करण्यासाठी जात नाहीत, जिथे लोक वापर करीतात तिथे महापालिकेने खर्च करायला पाहीजे. तिथे त्याचा उपयोग पण झाला पाहीजे. लोक पण खुश होतील की, काही तरी काम होत आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** महापालिकेच्या तिजोरीत पैसे नाहीत. प्रभागातील शौचालयाची परिस्थिती अत्यंत खराब आहे, बिकट आहे, हवे असेल तर तुम्ही भेट दया आम्ही तुम्हाला दाखवतो.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव :—</u>** साहेब, विषय असा आहे की, स्मशानभुमी मुळात चार ते पाच आपल्या ज्या स्मशानभुमी आहेत, त्या महानगरपालिका चालवत नाही. त्या संस्था चालवतात. त्याचे जे पैसे असतील महानगरपालिका लाकडाचे पैसे देते, स्मशानभुमीमध्ये प्रत्येक दिवस एका माणसाला जाळण्यासाठी १४०० ते १५०० रूपये घेतले जातात.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>** सर. मला विश्वास आहे उल्हासनगर ४ व ५ ही महानगरपालिका चालवत नाही. त्या संस्था चालवतात. त्याचे जे पैसे असतील ते महानगरपालिका लाकडाचे पैसे देते. एका माणसाला जाळण्याकरीता दर दिवसाला १४०० ते १५०० रूपये घेतले जातात. संस्था चालवते, त्या संस्थेसाठी आपण किती खर्च करायचे? याची पण काही तरी मर्यादा आहे ना. ही संस्था चालवते, जमीनी संस्थेच्या ताब्यात आहे.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** मा. आयुक्तजी, मी एक मिनीट बोलतो, मग तुम्ही जो निर्णय करायचा तो करा.यापूर्वीच्या महासभेत आमचे आदरणाीय सदस्य श्री. सुनिल सुर्वे साहेब याचा विषय होता की, स्मशान भुमीची परिस्थिती ही अत्यंत वाईट आहे. ऐका ना, ऐका संस्था चालवणारे लाखो रूपये घेतात का? फक्त दोनशे ते तीनशे रूपये घेतात, लाकड व इतर साहित्य धरून

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>** चार नंबरमध्ये ब—याच लोकांची तक्रार आलेली आहेत की, विचारूच नका एकुण १४०० ते १५०० रूपये घेतात.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** ऐकुन घ्या, तुम्हाला करायचा आहे किंवा नाही परंतु मला बोलु दया, २०० ते ३०० रूपये एका मयतचे घेतात आणि लाकडे वैगेरे सर्व पकडून १४०० आणि जी लावारीस प्रेत असते त्याचे आम्ही १२०० ते १३०० रूपये देतात तर त्यांचे तर २०० ते ३०० रूपयेच झाले ना. एका स्मशान भुमीत एक किंवा दोन, मयत जास्तीत जास्त आठ मयताची नोंद आह आपल्या उल्हासनगरची, जिथे चार ते पाच स्मशान भुमी आहे त्यांना मयताचे रोज ४०० ते ५०० रूपये स्मशान भुमीला डेली मिळतात आणि स्मशान भुमीत काम करणारे दोन ते तीन कर्मचारी कार्यरत आहेत. पण उल्हासनगर ५ येथील स्मशान भुमी आहे त्यात आता येणा—या कार्तिक एकादशी जी गुरूनानक जयंतीच्या चार दिवस पूर्वी त्या दिवसात कमीत कमी एक लाखापेक्षा जास्त लोक तेथे जातात. इथे बसलेले सर्व लोक जे तिथे त्या दिवशी येत नाही असे कोणीही नसेल तसेच तेथे स्वामी शांती प्रकाश महाराज यांचे स्वत: लाखो रूपये खर्च करतात संस्थेला कोणत्याही प्रकारचे दान किंवा निधी येत नाही. स्वामी वसंत शहा दरबार जो उल्हासनगर ५ येथे आहे हा दरबार फार मोठा असुन तेथील प्रवेशद्वाराचे काम हे माझ्या उप—महापौर निधीतून करण्यात येते असुन त्यावर माझे नाव आहे. डाव्या बाजुला २० ते ३० हजार फुट जागा असुन जेथे स्मशान भुमी असुन त्याठिकाणी अत्यसंस्कार होतात ते अतिशय आतील बाजुस आहे. तर लोक तेथे बसणे, उठणे, उदयान आणि ब—याच संताची अशी मागणी आहे की करा किंवा नका करू परंतु संत महात्म्याची भुमी असल्यामुळे त्याठिकाणी उदयान बनविले पाहिजे. संताची भुमी आहे ती. तेथे नाव कसे देणार ते तर संताची मागणी आहे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>** संताची भुमी आहे तर तिथे नाव लिहीले गेले पाहीजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मी आयुक्त यांना देखील निवदेन करतो की, आपण देखील एकादशीच्या दिवशी तुम्ही या, सकाळी ४ वाजे पासून ते १०. ०० वाजे पर्यंत ५ हजार लोक आणि १ लाख लोक राहतात. म्हणून हे देणे खुप गरजेचे आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** हे आपण करू....

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मला हे सांगणे खुप गरजेचे आहे की, उल्हासनगर—१ , उल्हासनगर—४ मध्ये ज्या स्मशानभुमी आहेत, बाकीच्या तीन स्मशानभुमीचा पण प्रस्ताव लवकरात लवकर आणण्यात यावा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** जर मागणी असेल तर.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** परंतु प्रस्ताव आणतांना अटी, शर्ती न होता, सदर जॉगींग ट्रॅक. ...

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** जर तुमची संमती असेल तर मी तर बोलतो की, ५ (२) (२) मध्येच दयायला पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** असा विषय लोक वाचतील ना, बाहेर लोक ब्लॅक मॅलर...

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** सर फक्त जॉगींग ट्रॅकच नाही, तर तिथे बॅचेस आहेत, सुंदर बगीचा आहे, एफ.आर.पण आहे

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** एक मिनीट जमनुजी हे ५ (२) (२) मध्येच करा.

**प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** येण्या, जाण्याचा रस्ता.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** मा. सभापती महोदया, महाराष्ट्र राज्यामध्ये ब—या महानगरपालिका, नगरपालिका याच्यामध्ये सगळयात जास्त महत्व कुठे दिले जाते? स्मशानभुमी कारण जर गावातील स्मशानभूमीच खराब असेलत महापालिकेच्या आयुक्तांना, महापालिकेच्या नगरसेवकांना, पदाधिका—यांना, महापालिकेच्या महापौरांना, उप महापौरांना सगळे लोक शिव्या घाततात. त्यांचे काहीच लक्ष नाही, पाणी नाही, लाईट नाही हे नाही, ते नाही. त्याच्यामुळे आपले आद्य कर्तव्य आहे की, आधी सगळयात चांगली आणि वाईट जी चर्चा होते, ती तिथेच होते. जर समजा तुम्ही सुंदर स्मशानभुमी केली. तुमचे नाव महाराष्ट्रातल्या कान्याकोप—यात जाऊ शकते. याचे एक उदाहरण सांगतो की, धुळे जिल्हामध्ये शहादा, जळगांव जिल्हामध्ये, जळगांवची स्मशानभुमी मी २५ वर्षापूर्वीच ही स्मशानभुमी कशी असावी किंवा कशी करावी त्यासाठी तिथे बघायला गेलो. जो पर्यंत शेड पर्यंत गेला नाही, तो पर्यंत ही स्मशानभुमी आहे, असे वाटलेच नाही. ही म्हणजे वृंदावनच्या गार्डनमध्ये फिरायला आलो आहे, असे वाटले. तो सगळा परिसर बघितल्या नंतर असे वाटले की लवकर मरायला पाहीजे. म्हणजे सगळे जी फिलींग झाली तसे म्हणून....

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** जसे लोक काशीला मरण्यासाठी जातात.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** नाही, नाही सांगण्याची आवश्यकता अशी आहे की, एक मिनीट आपल्या गांवाची स्मशानभुमी आहे, ती सुंदर झाली पाहीजे आणि त्यासाठी महापौर मॅडमनी जो निर्देश दिला आहे या वार्डचा प्रस्ताव आला आहे, तर बाकीच्या वार्डचे पण पाहणी करून जो पण नविन प्रस्ताव करायचा असेल तो आपण करू दुसरे रोडची कामे कमी करू, पण स्मशानभुमीचे चांगले काम युध्द पातळीवर करू. जो चांगला ठेकेदार आह, चांगला डिझायनर आहे, त्यांच्याकडून रिव्हाईज प्रोजेक्ट बनवून आपल्याकडे चांगले काम करणारे दोन

तीन ठेकेदार आहेत, त्यांचे काम बघून त्यांना काम देवू. जळगावच्या स्मशानभुमीचे काम त्यांना बोलावून दाखवू आणि काय करायचे आहे, ते करू आणि चांगली स्मशानभुमी करू.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** मा. आयुक्तांना खुप, खुप धन्यवाद.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** आयुक्त साहेब, दोन वर्षापुवी....

**महापालिका सचिवः—** पास...

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** इतिवृत्ताची वाट न पहाता पास..पास...

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** आयुक्त साहेब, दोन वर्षापुवी कॅम्प नंबर ३स्मशानभुमीमध्ये आम्ही स्वामी साई बलाराम यांच्या आठवणीसाठी एक मोठा हॉल पास केला होता. दोन वर्षे झालीत तो पुर्ण झाला नाही. प्रत्येक महीन्याला व्हॉटस ॲपवर फोटो टाकत असतो, परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोणीच तिथे येऊन चेक करीत नाही. मागच्या महीन्यामध्ये मी स्वतःचे पैसे काढून ग्रीलचे काम चालू केले, नंतर ठेकेदाराने आपले ग्रील लावले. शटर लावले नाही, स्टाईल लावलेली नाही. दोन वर्षे झाली आहेत, त्याच्या दोन भिंती पडल्या आहेत.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** आता स्मशानभुमीचा विषय संपला आहे, मी सांगितले की, मी स्वतः जाऊन बघणार आहे.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** तुम्ही स्वतः येऊन तिथे भेट दया.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजाः—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**☑विषय क्र. ८ :—** उल्हासनगर-५ येथील स्मशानभुमी विकसित करणेचे कामाची ई निविदा **मागविणेस मान्यता मिळणे.**

**प्रस्तावना**

मा.स्थायी समिती सभापती श्रीम.कंचन अमर लुंड यांनी त्यांचे पत्रानुसार उल्हासनगर-५ कैलाश कॉलनी येथील स्मशानभुमीची अवस्था खराब झाली असल्याने सदर स्मशानभुमीचे नुतनीकरण करणेबाबत कळविले आहे.

सदर स्मशानभुमीचा वापर परिसरातील नागरीक उद्यान म्हणून देखील करतात. सदर स्मशानभुमीच्या मोकळया जागेत योगाचे वर्ग घेतले जातात. परिसरातील नागरीक जॉगींग करण्याकरीता येत असतात. त्यामुळे सदर स्मशानभुमीचे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर कामाचे रु.५६,००,०००/- एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले. सदर कामास प्रशासकीय मान्यता मिळून कामाची ई निविदा प्रक्रिया करणेस मा. स्थायी समितीच्या मंजूरीकरीता गोषवारा सादर करण्यात आला. परंतू सार्वजनिक बांधकाम विभागातील काही तांत्रिक / प्रशासकीय कारणांमुळे सदर विषय विषयसुचीवरुन मागे घेण्यात आला.

वास्तविक पाहता सदर स्मशानभुमीची अवस्था खराब झाली आहे. नागरीकांना विविध सोयी सुविधा मिळण्याच्या दृष्टीने स्मशानभुमीचे सौंदर्यीकरण करणे महत्वाचे आहे. तथापी, काम हाती घेण्यापूर्वी महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर काम हाती घेणे / कामाची निविदा प्रक्रिया करणेकरीता लेखा विभागाचे अभिप्राय घेणे करीता प्रस्तावित केले. मा.मुख्य लेखा अधिकारी यांनी सदर काम आवश्यक असल्याने हाती घेण्याकरीता मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.४६** **दिनांकः— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—५ येथिल स्मशानभुमी विकसित करणेचे कामाची ई निविदा मागविणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :— उल्हासनगर-३ येथील ओ.टी. सेक्शन ते रामायण नगर पर्यंतच्या रस्त्याची साईड पट्टी व नालीचे काम पूर्ण करणेच्या कामाची ई निविदा प्रक्रिया करणे.**

---

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** साहेब, मी ब—याच वर्षा पासून, मागच्या वर्षी पण सांगितले होते, सार्वजनिक बांधकाम विभागाला वाकुरेडीओ ते व्हि.टी.सी. हा पण मुख्य रस्ता आहे, तिथे जवळपास दिड फुटाचा खड्डा पडला असेल मधला लेयर दोन्ही बाजुला, त्या नंतर आपल्या लोकांनी झाडे लावायची म्हणून बरोबर फुटपाथ पासून ५ फुट पर्यंत रस्त्यामध्ये खड्डे केलेले आहेत. त्यामुळे रस्ता एकच पण मधला पट्टा हा २५ फुटाचा जवळपास दोन्ही बाजुच्या साईडला दिड फुटाचा खड्डा पडलेला आहे. ती पट्टी का घेत नाही तुम्ही, तो रस्तता का घेत नाही.

**प्र, शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** नाही, नाही सर हा जो प्रस्ताव आहे, आता त्याचे सिमेंट ब्लॉकचे झालेले आहे. तुम्ही जो सांगत आहेत, तो ८० फुटाचा रोड आहे, मध्येभागी ३० फुटाचाच फक्त बनलेला आहे, बाकी १५ फुटाचा साईड पट्टीचे काम करायचे आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** मागच्या वर्षी पण तुमच्या रॅकमध्ये आणला होता का? साहेबांनी आता सांगितले की, प्रत्येक नगरसेवककाला आपला वार्ड बघायचा आहे, तुम्हांला तर पुर्ण शहर बघायचे आहे. एकच प्रस्ताव का येत असतो.

**प्र, शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** रिसरफेसिंगमध्ये घेतला आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** फक्त एक प्रस्ताव, एखादया नगरसेवकांचे घेतात.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** रिसरफेसिंगमध्ये घेतला आहे म्हणतात. घेतला आहे, सर.

**प्र, शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** घेतला आहे, सर.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** कधी चालू करणार आहेत?

**प्र, शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** सर फक्त टेंडर पास करायचे बाकी आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** मी तर इथे बसलो आहे ना.

**प्र, शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** प्रस्ताव बनवायचे काम चालू आहे, सर.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** ठिक आहे, लवकर करा इतिवृत्ताची वाट न पहाता. रिसरफेसिंगसाठी लवकर घेऊन या.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** नेताजी पासून अंबरनाथ पर्यंत मेन रोड आहे, ८० फुटाचा रोड आहे. त्या रोडसाठी मागच्या वेळेस शिंदे साहेबांनी पण, त्यावेळस श्री. गणेश शिंपी वार्ड ऑफिसर होते. त्यांना सांगितले होते की ही ड्रेनेज नाली बनवून घ्या, तुटला आहे, आता त्यांनी जेसीबीच्या साहय्याने नाली क्लअर केली आहे. मेन रोडची अशी परिस्थिती आहे, यांनी असे प्रस्ताव आणले नाहीत. तुम्ही त्यांना सांगा की, हा पण एक प्रस्ताव आणा, ते पण काम होऊन जाईल.

**प्र, शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** होय, सर तो प्रस्ताव पण आणला जाईल आणि एम.एम.आर.डी.ए. ला पण तो प्रस्ताव पाठवला आहे आणि इथे पण आणला जाईल.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** आता मी दिवाळी नंतर तुमच्या बरोबर संपुर्ण एक नंबर, दोन नंबर, तीन नंबर गल्ली गल्ली फिरेल आणि .....

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** कॅम्प नंबर ४ व पाचचा पण.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** आणि आता जे नगरसेवक प्रस्ताव देतील, पण मी उल्हासनगरचा प्रस्ताव देईल त्या हिशोबाने काम करायचे.

**प्र, शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—** होय सर.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** चुकीने ६४ चा ७५ नगरसेवक निधीमध्ये लिहीण्याची चुक केली आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—**इतिवृत्ताची वाट न पहाता पास..पास...

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ९ :—** उल्हासनगर-३ येथील ओ.टी. सेक्शन ते रामायण नगर पर्यंतच्या रस्त्याची साईड पट्टी व **नालीचे काम पूर्ण करणेच्या कामाची ई निविदा प्रक्रिया करणे.**

**प्रस्तावना**

मा.महासभा ठराव क्र.२३ दिनांक ०४/०७/२०१४ अन्वये राधास्वामी सत्संग ते ओ.टी.चौक पर्यंत सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेच्या कामाकरीता अतिरिक्त रु.२.०० कोटी खर्चासह एकूण ३.२५ कोटी खर्चासाठी तसेच उल्हासनगर-३ ओ.टी. सेक्शन ते रामायण नगर पर्यंतच्या रस्त्यासाठी रुपये २.१५ कोटी खर्चासाठी लेखाशिर्षाअंतर्गत तरतूदीचे समायोजनासह प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाली होती. त्यानुसार उल्हासनगर-३ ओ.टी. सेक्शन ते रामायण नगर पर्यंतच्या रस्त्यांचे काम विहित खर्चाचे मर्यादेत पूर्ण करण्यात आले आहे. वास्तवित सदर नाली मोठी असून दुतर्फा एकूण १२०० मीटर लांबीची नाली, फुटपाथ व साईडपट्टीचे काम करणे बाकी आहे. ओ.टी. सेक्शन ते रामायण नगर येथील रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. तथापी रस्त्याची दुतर्फा असलेली नाली खराब स्थितीत असल्याने सदर नालीचे बांधकाम प्रलंबित राहिल्यास पावसाळयात नालीतील पाणी रस्त्यावर साचून रस्ता पुन्हा खराब होऊ नये याकरीता नाली व साईडपट्टीचे बांधकाम करणे आवश्यक होते. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सदर नालीच्या बांधकामाचे रुपये १,५३,५७,६७६/- एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले. सदर खर्च महापालिकेच्या वर्ष २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील नवीन सिमेंट रस्ते बनविणे या लेखाशिर्षातून हाती घेणे होते.

सदर प्रस्तावास तत्कालीन आयुक्त सो. यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया करण्यात येणार आहे. तथापी, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब असल्याने सदर काम प्रलंबित राहीले.

वास्तविक पाहता ओ.टी. सेक्शन ते रामायण नगर येथील रस्त्याचे काम नव्यानेच पूर्ण झाले आहे. सदर रस्त्याचे काही ठिकाणी नाली खराब असल्याने व काही ठिकाणी नाली अस्तित्वात नसल्याने पाण्याचा निचरा होत नसल्याने पाणी रस्त्यावर साचते. त्यामुळे मच्छरांचा प्रादुर्भाव वाढून परिसरात रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच नव्यानेच बांधलेला रस्ता खराब होत आहे. पाण्याचा निचरा सुरळीत होणेकरीता रस्त्याच्या दुतर्फा नाली व साईडपट्टीचे काम करणे अत्यंत आवश्यक आहे. यासंदर्भात स्थानिक नगरसेवक व परिसरातील रहिवासी यांचा सदर कामाकरीता वारंवार पाठपुरावा सुरु आहे.

महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीमुळे उक्त काम प्रलंबित आहे. परंतू याबाबत स्थानिक नगरसेवक व नागरीकांचा वारंवार होणारा पाठपुरावा लक्षात घेता सदर काम हाती घेणे / कामाची निविदा प्रक्रिया करणेकरीता लेखा विभागाचे अभिप्राय घेणे करीता प्रस्तावित केले. मा.मुख्य लेखा अधिकारी यांनी सदर काम आवश्यक असल्याने हाती घेण्याकरीता मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ४७ **दिनांकः— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री.जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर —५ येथिल ओ.टी. सेक्शन ते रामायण नगर पर्यंतच्या रस्त्याची साईड पट्टी व नालीचे काम पूर्ण करणेच्या कामाची ई निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १० :— स्थायी समिती ठराव क्र.११३ दिनांक २८/०२/२०१८ मध्ये अंशतः बदल करणे.**

---

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास...

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १० :— स्थायी समिती ठराव क्र.११३ दिनांक २८/०२/२०१८ मध्ये अंशतः बदल करणे.**

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वये प्रभाग क्र.१८ मधील नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी या लेखाशिर्षाअंतर्गत करावयाच्या रुपये ६४,००,०००/- एवढ्या रक्कमेच्या कामाकरीता मा.स्थायी समिती ठराव क्र. ११३ दिनांक २८/०२/२०१८ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

वास्तविक पाहता प्रभाग क्र.१८ मध्ये रुपये ७४,००,०००/- एवढ्या रक्कमेची कामे प्रस्तावित होती. त्यामुळे निविदा प्रक्रिया करताना रुपये ७४,००,०००/- एवढया रक्कमेची करण्यात आली. परंतू सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे गोषवारा तयार करताना नजर चुकीने रुपये ६४,००,०००/- असे टाईप झाले. त्यामुळे तेवढ्याच रक्कमेचा ठराव पारित करण्यात आला.

तरी स्थायी समिती ठराव क्र.११३ दिनांक २८/०२/२०१८ मध्ये अंशत: बदल करुन रु.७४,००,०००/- एवढ्या रक्कमेस मान्यता घेणेकरीता सदर प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवणेस मान्यतेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ४८** **दिनांकः— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री.जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार स्थायी समिती ठराव क्र. ११३, दिनांक २८/२/२०१८ मध्ये अंशतः बदल करुन रु. ७४,००,०००/— एवढया रक्कमेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ११ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीक सुविधा केंद्रावर लागणारे मनुष्यबळ व तदअनुषंगिक बाबी खाजगी तत्वावर उपलब्ध होणे

---

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** या बाबतीत कोण सांगेल?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** यामध्ये माझे निवेदन आहे की, मा. आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती महोदया, हे जे नागरीक सुविधा केंद्राचे काम आहे, यामध्ये १ करोड, १५ लाख, ९८ लाख ८४२ चा आला आहे. याच्या पहीले आपण नागरीक सुविधा केंद्राला बी.ओ.टी. वर १० वर्षासाठी दिले होते. हा मुद्दा ३० नोव्हेंबरला संपत आहे, पहीले बी.ओ.टी. वर १० वर्षासाठी टेंडर होते. आता आला आहे, एक वर्षासाठी हा नागरीक सुविधा केंद्राचा विषय आहे, यामध्ये आपल्याला काम करणे अतिआवश्यक आहे व या विषयाचे जे आकडे आले आहेत, तर मी निवेदन करतो की, याला एक दोन महीन्याची मुदतवाढ करून तीन किंवा चार वर्ष जो आपला कालावधी आहे. त्यामध्ये चार वर्ष काढला तर खुप चांगले होईल. एक वर्षासाठी परत टेंडर काढा, टेंडर उघडा त्यामुळे एक वर्ष लवकरच संपून जाते. तर दोन महीन्यासाठी मुदतवाढ देवून आणि दोन महीने संपुर्ण अभ्यास करून चार वर्षासाठी देण्यात यावा. आपला जो कालावधी सन २०२२ पर्यंत. एक वर्ष झाला आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** साहेब, पाच वर्षासाठी काढायला पाहीजे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** पाच वर्ष म्हणजे पिरीयड वाढू पण शकतो.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** ठिक आहे, पाच वर्षासाठी

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** जमनुजी ज्या दिवसापासून नगरसेवक बनले ते आच पर्यंत नगरसेवक राहीले आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** जो दोन महीन्याचा पिरीयड आपण वाढवून दिला आहे, त्यामध्ये टेंडर प्रोसेस पुर्ण झाले पाहीजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—** झाले पाहीजे आणि १ जानेवारीच्या पहीले यायला पाहीजे. नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये दोन महीन्यामध्ये झाले पाहीजे आणि स्थायी समितीनमध्ये आणून मंजूर करून घेतले पाहीजे, पाच वर्षासाठी टेंडर केले पाहीजे.

**महापालिका सचिवः—** यामध्ये काय टाकायचे आहे?

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** मॅडम ऐकले का दोन महीन्यासाठी मुदतवाढ आहे, तेवढयाच पिरीयडमध्ये पुढचे टेंडर प्रोसेस करायचे आहे, तुम्हांला.

**प्रोग्रॅमर, श्रीमती श्रध्दा सपकाळेः—** सर आता सध्या हे टेंडर प्रोसेससाठी आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** मुदत कधी संपते?

**प्रोग्रामर, श्रीमती श्रध्दा सपकाळेः—** मुदत सर या महीन्याच्या शेवटी संपेल.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** मग ठिक आहे, लगेच प्रोसेस करून टाका.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास...

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** दोन महीने पुढील टेंडर प्रक्रिया पुर्ण होई पर्यंत कमीत कमी एक महीन्यात टेंडर, लवकर करून टाका.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजाः—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ११ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीक सुविधा केंद्रावर लागणारे मनुष्यबळ व तदअनुषंगिक बाबी खाजगी तत्वावर उपलब्ध होणे

## प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र हे १३ चौ. कि.मी. मध्ये विभागलेले असुन नागरी स्थानिक स्वराज्य स्वस्थेचे प्रशासन गतिमान व लोकाभिमुख होण्याच्या दृष्टिने व प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टिने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन सामान्य नागरिकांना विहित मुदतीत सेवा उपलब्ध करुन देणेकामी महापालिका क्षेत्रामध्ये पब्लिक प्रायव्हेट पार्टन्रशिप माध्यमातुन १० वर्षाकरीता एकुण ४ प्रभाग कार्यालये व नागरिकांची जास्तीत जास्त वर्दळ असलेल्या अशा एकुण २४ ठिकाणी CFC व KIOSK सेटर्स बी.ओ.टि तत्वावर प्रस्थापित केलेले आहेत. याव्दारे नागरिकांना मालमत्ता कर वसुली, जन्म—मुत्यु दाखले, अत्यंविधी, विविध परवाने, ना हरकत दाखले, नाव बदल, मालमत्ता हस्तांतरण, कर देयक, पाणी देयक, इत्यादी अनेक विविध सुविधा पुरविण्यात येत आहेत. सदर सुविधांचा अनेक प्रकारे नागरिकांनी लाभ घेउन महापालिकेला उत्तमरित्या आर्थिक उत्पन्न प्राप्त झालेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Collection Centers | 2008-09 | 2009-10 | 2010-11 | 2011-12 | 2012-13 | 2013-14 | 2014-15 | 2015-16 | 2016-17 | 2017-18 | 01-04-18 TO 25-10-18 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| CFC@HQ | | 462218 | 40 | | 52819 | 141254 | 15117015 | | | 199289 | |
| KIOSK@HQ2 | | 15592090 | 1320918 | | | 4000 | 7413439 | 2774332 | 4892235 | 2029532 | 137187 |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| CFC@VTC | 149533 | 6168856 | 14886121 | 11023789 | 13846984 | 88811754 | 128885897 | 61791387 | 65987789 | 79614226 | 76782 |
| CFC@GOLMAIDAN | | 5769737 | 13777966 | 14487979 | 11950043 | 93637183 | 203119198 | 144966339.5 | 134850439 | 118461166 | 37539091 |
| CFC@YATRI | | 3184296 | 12411258 | 11740271 | 15282383 | 20129553 | 34327287 | 15787053 | 23202805 | 25191447 | 33780639 |
| CFC@NETAJI | | 10113303 | 27786899 | 25241550 | 37209930 | 41623755 | 77013827 | 39711445 | 44586658 | 43658636 | 10423064 |
| KIOSK@HQ | | 63297901 | 133842294 | 160349842 | 138958099 | 65726218 | 22528434 | 12472624 | 16270648 | 20031812 | 23146877 |
| KIOSK@SHOBRAJ | | 630700 | 13355130 | 15076663 | 17027265 | 23506402 | 36608748 | 20167810 | 27130806 | 30985346 | 6854331 |
| KIOSK@VENUS | | 4768472 | 15973491 | 16096071 | 22827917 | 36676890 | 47196144 | 35095895 | 36446951 | 39920532 | 8259542 |
| KIOSK@UNRSTN(W) | 10420637 | 6358022 | 3120367 | 4237029 | 8700048 | 11700777 | 9964725 | 5701431 | 3183532 | 5145678 | 16130105 |
| KIOSK@SAPNA | | 2747137 | 11775568 | 11795724 | 14151679 | 17216888 | 23452750 | 13325011 | 17961345 | 12844563 | 2061662 |
| KIOSK@GURUNANAK | | | 4994388 | 6300341 | 9923200 | 16829336 | 28430890 | 15401286 | 21913889 | 25720082 | 4295573 |
| KIOSK@SADHUBELA | | | | 6865767 | 7218604 | 9469910 | 17109473 | 8815263 | 12778375 | 15539460 | 6758726 |
| KIOSK@PAWAI | | | | 76232 | 21127619 | 32412989 | 35291587 | 21253208 | 30943019 | 26856978 | 5896675 |
| KIOSK@AAKASHUNR-5 | | | | | | 476610 | 1643390 | 187356 | 3913877 | 2922164 | 12183860 |
| KIOSK@MARATHA | | | | | | 3582731 | 10271017 | 5936645 | 7060409 | 9592665 | 973586 |
| KIOSK@RadhaSwami | | | | | | | 7781257 | 3862193 | 9805104 | 6996910 | 3483587 |
| KIOSK@ShantiNagar | | | | | | | 2576797 | 2012428 | 892823 | 3387275 | 1373765 |
| KIOSK@Busstop(UNR5) | | | | | | | 8217829 | 3355894 | 12236423 | 8635438 | 541989 |
| KIOSK@IndiraGandhi | | | | | | | 4543793 | 4197894 | 7424441 | 5821687 | 2130466 |
| KIOSK@BirlaMandir | | | | | | | 6333453 | 3090032 | 6006585 | 6895252 | 2907751 |
| KIOSK@NehruChowk | | | | | | | 6944565 | 5625342 | 10971776 | 9605360 | 1795014 |
| KIOSK@SubbashTekadi | | | | | | | 6924875 | 4745496 | 8168894 | 12704392 | 1481961 |
| KIOSK@oxypark | | | | | | | | | 6439238 | 4046720 | 3921132 |
| KIOSK@C-Block | | | | | | | | | 3319000 | 3778140 | 731435 |
| KIOSK@OTUNR2 | | | | | | | | | 2837011 | 5922521 | 939548 |
| CFC@HQ1 | | | | | | | | | 5074178 | 135739 | 2647274 |
| CFC@HQ2 | | | | | | | | | 2605878 | | |
| CFC@HQ3 | | | | | | | | | 10018893 | | |
| CFC@HQ4 | | | | | | | | | 2046492 | | |
| **Total =** | **10570170** | **119092732** | **253244440** | **283291258** | **318276590** | **461946250** | **741669466.5** | **430276363.5** | **538969512** | **526643009.5** | **190471623** |

वरीलप्रमाणे महापालिकेला प्राप्त झालेली आर्थिक वसुली उल्लेखनिय असुन महापालिकेच्या महसुली उत्पन्नात नक्कीच वाढ झालेली दिसुन येत आहे. शिवाय सदरचा प्रकल्प हा अतिशय महत्वाकांक्षी असुन नागरीकांना आपले जवळच्या प्रभाग क्षेत्रात सुविधा उपलब्ध झाल्याने लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांकडुन देखिल समाधान व्यक्त होत आहे.

तथापि, बी.ओ.टि तत्वावर सुरु असलेला सदरचा प्रकल्प दि. ३०/११/२०१८ रोजी निविदा कालावधीनुसार संपुष्टात येणार असुन सबंधित सेंटर्स हे पुन्हा महापालिकेकडे हस्तांतर करुन घेण्यात येतील. यामध्ये एकुण ३९ संगणक प्रस्थापित असुन त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. | Name of Place | No. of Desktop PC available at Centers |
|---|---|---|
| 1 | UMC (HQ) | 12 Nos. |
| 2 | Ward Office No. 1(Goal Maidan) | 02Nos. |
| 3 | Ward Office No. 2(Yatri Niwas) | 02Nos. |
| 4 | Ward Office No. 3(VTC Ground) | 02Nos. |
| 5 | Ward Office No. 4(Netaji Chowk) | 02Nos. |
| 6 | KIOSK Centers(19 Cabins) | 19Nos. |
| | **Total Desktop PC =** | **39Nos.** |

तथापि, सदरचा प्रकल्प हा व्यापक स्वरुपाचा असल्याने शहरातील जनतेला सेवा देणेसाठीचे व सध्या महापालिकेत कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने निविदा कालावधी संपल्यानतंर सर्व सुविधा केंद्र चालविण्यासाठी मनुष्यबळ व इतर लेखन सामुग्री, तांत्रिक देखभाल दुरुस्तीची आवश्यकता भासणार

असल्याने त्याबाबतची नव्याने वार्षिक निविदा मागविणेसाठी सादर केलेले आहे. यामध्ये प्रति संगणकासोबत आवश्यक लागणारे मनुष्यबळ, संगणकाची व संगणकीय साहित्याची देखभाल दुरुस्ती, टोनर्स, पेपर्स, स्टेशनरी, प्रतिदिन जमा होणा—या रकमेचा भरणा करणे व त्याची विमा व सुरक्षा, इत्यादींसह सर्व जबाबदारी निविदाधारकाची ठरविण्यात येणार आहे. त्याचा सविस्तर खर्च हा खालीलप्रमाणे असेल.

**खुल्या बाजारातुन निविदा मागविल्यास प्रकल्पासाठी येणारा मासिक व वार्षिक खर्च अंदाजे खालीलप्रमाणे असेल.**

**Annexure 1 - Estimated Cost (Excl. taxes)**

| Sr. | Per Computer Expenditure including all accessories | Qty | Per Month Per Computer Rate (Outside Kiosk 27 Computer) (Excl. tax) | Per Month Per Computer Rate in (UMC Head Office 12 Computer) (Excl. tax) |
|---|---|---|---|---|
| 1 | **Skilled Manpower –** **(As per Min. Wages Act dated 24 Feb 2015)** | 01 | | |
| | Basic | 14000 | 18664/- | 18664/- |
| | Spl. allowance | 2200 | | |
| | **Total =** | **16200** | | |
| | Employer EPF 13.36% | 2164 | | |
| | ESTs | 300 | | |
| | **Total =** | **18664** | | |
| 2 | **Comphrensive Maintenance of Desktop PC** Set including UPS & LaserJet Printer. | 01 | 400/- | 400/- |
| 3 | **Toner (Recycle)** (Rs.750/- Per Toner) | 04 | 3000/- | 3000/- |
| 4 | **Paper RIM (A4 Size)** (Rs.250/- Per RIM) | 03 | 750/- | 750/- |
| 5 | **Insurance & security** of Cabin, AC, Computer, Employee & transit of cash insurance.(**Rs. 400/Month** | Lumsum | 400/- | 400/- |
| 6 | **Stationary** items (e.g. stapler, pins, rubber, etc.) **(Rs. 100/Month)** | Lumsum | 100/- | 100/- |
| 7 | Transfer of daily cash from respective Center to UMC Head Quarter. (travelling Expense Rs. 50/- per day) **Rs.50 X 25days = 1250/-** | Lumsum | 1250/- | -- |
| | **Total =** | | = 24564/- | = 23314/- |
| | Administrative Charges 2.5% | | 614/- | 583/- |
| | **Total =** (Excl. taxes) | | **= 25178/-** | **= 23897/-** |
| **A** | **Total 27Nos. Outside Kiosk Computer X Rs. 25178/-** (Charges including all 1 to 7 points) = | | **= 6,79,808/-** | **--** |
| **B** | **Total 12Nos. UMC Head Office Computer X Rs. 23897/-** (Charges except point No. 7) = | | | **= 286762/-** |
| **C** | **Total Per Month Expenditure( A + B)** Excl. taxes = | | | **966570/-** |
| | **Total Per Year Expenditure( C X 12 Month)** Excl. taxes = | | | **1,15,98,842/-** |

वरील तक्त्यानुसार सदर प्रकल्पासाठी एकुण अंदाजित वार्षिक खर्च रु. १,१५,९८८४२/— इतका अपेक्षित असुन सदरचा खर्च हा अंदाजपत्रकिय लेखाशिर्ष Part 1-A3(XI) यामध्ये पुरेशी तरतुद असल्याकारणाने भागविता येईल. सदर नमुद दर हे कर वगळता आहेत. वेळोवेळी करामध्ये बदल होत असल्याने निविदाधारकाकडुन प्रतिसंगणकाकरीता प्रतिमहिन्यासाठीचे कर वगळता दर मागविण्यात येतील. यामध्ये भविष्यात शासनाकडुन वेळोवेळी अदयावत होत असलेल्या कराचा समावेश करुन निविदाधारकाचे देयक अदा करण्यात येईल.

सबब, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामधील बी.ओ.टि तत्वावर सुरु असलेले ब्थ्ब्क्ष्ज्ञप्कैज्ञ ब्मदजमते चा निविदा कालावधी दि.३०/११/२०१८ रोजी संपुष्ठात येत असल्याने उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे याकामी येणारा रु. १,१५,९८८४२/— इतका अदांजित खर्च लक्षात घेता पुढिल १ वर्षाकरीता खुल्या बाजारातुन नव्याने ई—निविदा मागविणेसाठी मा. स्थायी समिती पटलावर सविनय सादर करण्यात येत आहे

**स्थायी समिती ठराव क्र.४८** **दिनांकः— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीक सुविधा केंद्रावर लागणारे मनुष्यबळ व तदअनुषंगिक बाबी खाजगी तत्वावर उपलब्ध होणेस २ महिन्याची मुदतवाढ देवुन पुढील ५ वर्षाकरीता खुल्या बाजारातून ई निविदा मागविणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १२ :—** डेंगू व मलेरीया आदी रोगांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी आवश्यक अळीनाशके/डासनाशके खरेदीसाठी न्युनतम दर सादर करणारे मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, कल्याण व मे. बायोटेक इंटरनॅशनल लि., दिल्ली यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

---

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** मान्यता आहे, चला पुढे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** नाही, नाही, सॅप्पल आणला आहे का?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** इतिवृत्ताची वाट न पहाता, चला पास...पास...

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १२ :—** डेंगू व मलेरीया आदी रोगांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी आवश्यक अळीनाशके/डासनाशके खरेदीसाठी न्युनतम दर सादर करणारे मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, कल्याण व मे. बायोटेक इंटरनॅशनल लि., दिल्ली यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावना**

मा. आयुक्त सो. यांनी दिनांक २६/०९/२०१८ रोजी अन्वये मलेरिया व डेंग्यू नियंत्रणासाठी अळीनाशके/डासनाशके/किटकनाशके खरेदीच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महापालिका वेबसाईटवर व दैनिक वृत्तपत्रात ई—निवदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्याअनुषंगाने ३ निविदाकारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त निविदेचा पहिला लिफाफा तांत्रिक बाब दि. १६/१०/२०१८ रोजी दुपारी १२:०० वाजता ई—निविदा कक्षात निविदा समिती सदस्य व निविदाकारांच्या उपस्थितीत संगणकाच्या माध्यमाने उघडण्यात आल्या. निविदा समितीने सर्व कागदपत्रांची पहाणी केली. प्राप्त तीन ही निविदाकार यांनी अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केल्याने पात्र ठरले. निविदाकार मे. रमेश अॅग्रो—केम कॉपोरेशन, भिवंडी, मे. बायोटेक इंटरनॅशनल लि., व मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, कल्याण यांनी अटी व शर्तीनुसार पुर्तता केली असल्याने निविदा समितीने वित्तीय लिफाफा उघडण्याबाबत सुचना केल्या त्यानुसार दिनांक १७/१०/२०१८ रोजी दुपारी ०३.३० वाजता निविदा समितीच्या मान्यतेन वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र ३ निविदाकारांनी सादर केलेल दर खालीलप्रमाणे आहेत.

**तुलनात्मक तक्ता**

| अ. क्र. | सफाई साहित्याचे नांव व त्यांचा तपशिल | आवश्यक मालाचा (परिमाण) | मागील वर्षाचे मंजुर दर रू. (२०१७—१८) | मे. बायोटेक इंटरनॅश्नल लि., | मे. रमेश ॲग्रो—केम कॉपोरेशन, | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पेरेशन | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मलेरिया लार्व्हीसाईड, ऑईल आय.एस.क्र.५८८/१९७८ | ५००० लिटर | २२४ | .. | २८७ | <u>**२७५**</u> | १३७५०००६. |
| २ | पायरेथ्रम, ०.५: मॅलेथिऑन १: | २०० लिटर | २७५० | .. | ३३५० | <u>**३१४९**</u> | ६२९८००६. |
| ३ | टेमेफॉस, ५०: इ.सी. आय.एस.क्र.८४९८/१९७२ ब्ठप् त्मह्पेजमतए ॅभ्ठ व्चिचतवअमक | ३०० लिटर | २५०० | .. | ३१८९ | <u>**३१००**</u> | ९३००००६. |
| ४ | डेल्टामेथ्रीन, १.२५:यु.एल.व्ही. आय.एस.क्र.१५२२७/२००२ ब्ठप् त्मह्पेजमतए ॅभ्ठ व्चिचतवअमक | ४०० लिटर | २६११ | .. | ३२४९ | <u>**३२००**</u> | १२८०००००६. |
| ५ | लॅबडा सायहैलोथ्रीन, १०: डब्ल्यु. पी., आय.एस.क्र.१४५१०/१९९७ ब्ठप् त्मह्पेजमतए ॅभ्ठ व्चिचतवअमक | १०० थ्कलो | ४१०० | .. | ४८८० | <u>**४६९०**</u> | ४६९०००६. |
| ६ | बी. टी. आय., ५:ॅच | ६०० लिटर | १२८० | <u>**१२३४**</u> | २३०० | २१६० | ७४०४००६. |
| ७ | करनिम, म्ब | २०० लिटर | १७२५ | .. | २०२२ | <u>**१९८९**</u> | ३९७८००६. |
| **एकुण** | | | | | | | **५८२२०००६.** |

उपरोक्त तुनात्मक तक्त्यानुसार अ. क्र. १,२,३,४,५ व ७ साठी मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पेरेशन, कल्याण व अ.क्र. ६ साठी मे. बायोटेक इंटरनॅश्नल लि., दिल्ली यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत. उक्त एकुण अ. क्र. १,२,३,४,५,६, व ७ वरील नमुद केलेली सदरची जंतूनाशक/अळीनाशके/डासनाशके/किटकनाशके औषधे खरेदी करण्यासाठी अंदाजीत खर्च रूपये ५८,२२,०००/— खर्च अपेक्षित आहे. निविदा समितीने दिलेल्या निर्देशानुसार सर्वात कमी दर सादर केलेले निविदाकार मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पेरेशन, कल्याण यांना वाटाघाटी करिता दिनांक १९/१०/२०१८ रोजी बोलविण्यात आले होते. त्यानुसार मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पेरेशन, कल्याण यांनी वाटाघाटीसाठी उपस्थित राहुन वाटाघाटीअंती आपले दर सादर केले आहे.

वाटाघाटीअंती दराचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | सफाई साहित्याचे नांव व त्यांचा तपशिल | आवश्यक मालाचा (परिमाण) | मागील वर्षाचे मंजुर दर रू. (२०१७—१८) | मे. बायोटेक इंटरनॅश्नल लि., | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पेरेशन | वाटाघाटीअंती सादर केलेले दर रूपये | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मलेरिया लार्व्हीसाईड, ऑईल आय.एस.क्र.५८८/१९७८ | ५००० लिटर | २२४ | .. | <u>**२७५**</u> | २३२६. | ११६०००००६. |
| २ | पायरेथ्रम, ०.५: मॅलेथिऑन १: | २०० लिटर | २७५० | .. | <u>**३१४९**</u> | २८३३६. | ५६६६००६. |
| ३ | टेमेफॉस, ५०: इ.सी. आय.एस.क्र.८४९८/१९७२ | ३०० लिटर | २५०० | .. | <u>**३१००**</u> | २५७५६. | ७७२५००६. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ब्ठप् त्मह्पेजमतए ॅभ्ठ ।चचतवअमक | | | | | | |
| ४ | डेल्टामेथ्रीन, १.२५:यु.एल.व्ही. आय.एस.क्र.१५२२७/२००२<br>ब्ठप् त्मह्पेजमतए ॅभ्ठ ।चचतवअमक | ४०० लिटर | २६११ | .. | <u>**३२००**</u> | २७०५६. | १०८२०००६. |
| ५ | लॅबडा सायहैलोथ्रीन, १०: डब्ल्यु. पी., आय.एस.क्र.१४५१०/१९९७<br>ब्ठप् त्मह्पेजमतए ॅभ्ठ ।चचतवअमक | १०० किलो | ४१०० | .. | <u>**४६९०**</u> | ४२२०६. | ४२२०००६. |
| ६ | बी. टी. आय., ५:ॅच | ६०० लिटर | १२८० | <u>**१२३४**</u> | २१६० | .. | ७४०४००६. |
| ७ | करनिम, म्ब | २०० लिटर | १७२५ | .. | <u>**१९८९**</u> | १८५०६. | ३७००००६. |
| **एकुण** | | | | | | | **५१ए१३ए५००६.** |

वाटाघाटी अंती प्राप्त दरानुसार उक्त नमुद केलेली अळीनाशक/डासनाशके त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा नुसार खरेदीकरीता रू ५१,१३,५००/— खर्च अपेक्षित आहे. परंतु सदरचा खर्च हा सन २०१८—१९ च्या अर्थिक अंदाजपत्रकामध्ये दिलेल्या रुपये ५०,०००,००/— तरतूद पेक्षा जास्त असल्याने मागवण्यात येणाऱ्या औषधांचे परिमाण कमी करण्याचे प्रस्तावित करण्यात येते. तरी मागणी करण्यात येणाऱ्या औषधांचे परिमाण व त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत.

| **अ. क्र.** | **सफाई साहित्याचे नांव व त्यांचा तपशिल** | **आवश्यक मालाचा (परिमाण)** | **मागील वर्षाचे मंजुर दर रू. (२०१७—१८)** | **मे. बायोटेक इंटरनॅश्नल लि.,** | **मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन** | **वाटाघाटीअंती सादर केलेले दर रूपये** | **अपेक्षित खर्च** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मलेरिया लार्व्हीसाईड, ऑईल आय.एस.क्र.५८८/१९७८ | ५००० लिटर | २२४ | .. | <u>**२७५**</u> | २३२६. | ११६००००६. |
| २ | पायरेथ्रम, ०.५: मॅलेथिऑन १: | २०० लिटर | २७५० | .. | <u>**३१४९**</u> | २८३३६. | ५६६६००६. |
| ३ | टेमेफॉस, ५०: इ.सी. आय.एस.क्र.८४९८/१९७२<br>ब्ठप् त्मह्पेजमतए ॅभ्ठ ।चचतवअमक | ३०० लिटर | २५०० | .. | <u>**३१००**</u> | २५७५६. | ७७२५००६. |
| ४ | डेल्टामेथ्रीन, १.२५:यु.एल.व्ही. आय.एस.क्र.१५२२७/२००२<br>ब्ठप् त्मह्पेजमतए ॅभ्ठ ।चचतवअमक | ४०० लिटर | २६११ | .. | <u>**३२००**</u> | २७०५६. | १०८२०००६. |
| ५ | लॅबडा सायहैलोथ्रीन, १०: डब्ल्यु. पी., आय.एस.क्र.१४५१०/१९९७<br>ब्ठप् त्मह्पेजमतए ॅभ्ठ ।चचतवअमक | १०० किलो | ४१०० | .. | <u>**४६९०**</u> | ४२२०६. | ४२२०००६. |
| ६ | बी. टी. आय., ५:ॅच | ३०० लिटर | १२८० | <u>**१२३४**</u> | २१६० | .. | ३७०२००६. |
| ७ | करनिम, म्ब | २०० लिटर | १७२५ | .. | <u>**१९८९**</u> | १८५०६. | ३७००००६. |
| **एकुण** | | | | | | | **४७ए४३ए३००६.** |

वाटाघाटी अंती प्राप्त दरानुसार उक्त नमुद केलेली अळीनाशक/डासनाशके त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा नुसार खरेदीकरीता रू. ४७,४३,३००/— (रूपये सत्तेचाळीस लाख त्रेचाळीस हजार तीनशे मात्र) खर्च अपेक्षित आहे. प्राप्त दर वाजवी आहेत. सदरचा खर्च सन २०१८—१९ च्या आर्थिक अंदाजपत्रकामध्ये हिवताप व डेंग्यु प्रतिबंधक खर्च यात रुपये ५००००००/— तरतूद करण्यात आली आहे.

पैकी पुर्ण तरतूद शिल्लक आहे त्यातून करण्यात येत आहे. तरी सदरच्या खर्चास व तसेच उक्त औषधांसाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणा—या निविदाकार मे. बायोटेक इंटरनॅश्नल लि. दिल्ली व मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मान्यतेसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ५०** **दिनांकः—०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार डेंगू व मलेरीया आदी रोगांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी आवश्यक अळीनाशके/डासनाशके खरेदीसाठी न्युनतम दर सादर करणारे मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, कल्याण व मे. बायोटेक इंटरनॅश्नल लि., दिल्ली यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १३ :—**शहर वाहतुक उपशाखा, उल्हासनगर व विठ्ठलवाडी हद्दीत वाहतुक नियमनासाठी नियुक्त असलेले ट्राफिक वार्डन यांचे मानधन वाढीस मंजुरी मिळण्याबाबत.

---

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** कोणाचा प्रस्ताव आहे? सांगा पटकन.

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळेः—** सर पहीले ४ हजार रूपये होते, आता ६ हजार रूपये वाढवायचे आहेत.

**सदस्य, श्री. भगवान भालेरावः—** दोन हजार रूपये वाढवायचे आहेत.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** साहेब, दुसरे असे की, यांना आपण जे वार्डन देत आहेत, ज्यासाठी हे लोक घेत आहेत, ते काम शहरामध्ये होत नाही.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** आपण पोलिस विभागाला माणसे देतो, त्यांच्याकडून काय कामे करून घ्यायची ती त्यांची जबाबदारी आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** शहरामध्ये यांनी काय दिले आहे, ट्रॅफिक होत आहे, ट्रॅफिकला....

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** सुपरवायझिंग ते करतील आपण फक्त त्यांना माणसे सहाय्यक म्हणून देतो.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** साहेब, मिसयुज पण होत आहे ना.

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळेः—** साहेब, त्यांचे पत्र दिले आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** माणसांचा योग्य वापर होत नाही, असे स्थायी समितीमध्ये चर्चा झाली आहे, नाराजी व्यक्त केलेली आहे. तरी आम्ही ज्या कामासाठी लोक दिलेली आहेत, त्याच कामासाठी त्यांचा वापर व्हावा.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** दोन्ही ट्राफिक ऑफिसला चार नंबरचे आणि एक नंबरचे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** दोन्ही ट्रॅफिक ऑफिसामध्ये.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास...

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑**विषय क्र. १३ :—** शहर वाहतुक उपशाखा, उल्हासनगर व विठ्ठलवाडी हद्दीत वाहतुक नियमनासाठी नियुक्त असलेले ट्राफिक वार्डन यांचे मानधन वाढीस मंजुरी मिळण्याबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये उल्हासनगर शहरातील वाहतुक समस्यांचे निवारणकरणेसाठी शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व विठ्ठलवाडी येथे असलेले पोलीस अंमलदार हे अपुरे पडत असल्यामुळे त्यांचे मदतीकरीता एकुण ४५ ट्राफिक वार्डन नियुक्त करण्यात आलेले आहेत. सदर वार्डन यांना महापालिकेमार्फत त्यांच्या उदारनिर्वाहसाठी प्रति वार्डन रू. ४,०००/— एवढे मानधन देण्यात येते. सदर मानधन हे अंत्यत अल्प असल्यामुळे वार्डन त्यांच्या कामात अनियमितता दिसुन येत आहे. तरी त्यांना वाहतुक नियमनाचे काम करण्यास प्रोत्साहन मिळून त्यांनी नियमीतपणे काम करावे म्हणुन त्यांचे मानधनात वाढ करून रू. ६०००/— एवढे मानधन देण्यात यावे अशी विनंती दिनांक ०४/०९/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या बैठकीत करण्यात आली होती. तसेच वाहतुक विभागास पुरविण्यात आलेल्या वार्डन हे उल्हासनगर शहरातील वाहतुक कोंडीची समस्या दुर करणेसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. या व्यतीरिक्त त्यांना कोणतेही काम देऊ नये याची जबाबदारी पोलिस वाहतुक विभागाची राहील. मा. स्थायी समितीतील मा.पदाधिकारी यांनी सदरवेळी तोंडी प्रस्ताव मंजुर केलेला आहे. तरी दिनांक ०४/०९/२०१८ रोजीच्या बैठकीच्या प्रस्तावा प्रमाणे ट्राफिक वार्डन यांना मासिक रू. ६०००/— एवढे मानधन देण्यात यावे असे संदर्भय पत्रान्वये विनंती केलेली आहे.

सदर बाबत सादर करण्यात येते की, उल्हास्गनर शहरातील वाहतुक समस्यांचे निवारण करणेसाठी ट्राफिक वार्डन यांना वाहतुक नियमनाचे काम करण्यास प्रोस्ताहीत करणे अंत्यत गरजेचे आहे. सदर ट्राफिक वार्डन यांना मा. स्थायी समिती ठराव क्र. ३२, दिनांक ०४/०९/२०१८ नुसार रू. ६०००/— एवढे मानधन मंजुर केल्यास रू. ६,००० (मासिक मानधन) × ४५ (वार्डन) × १२ (महिने) = रू.३२,४०,०००/— एवढा वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

तरी मा. स्थायी समिती दिनांक ०४/०९/२०१८ च्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार प्रति ट्राफिक वार्डन यांना रू. ६,०००/— एवढे मानधन करण्यास मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी पटलावर सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ५१** **दिनांक:— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार शहर वाहतुक उपशाखा, उल्हासनगर व विठ्ठलवाडी हद्दीत वाहतुक नियमनासाठी नियुक्त असलेले प्रति ट्राफिक वार्डन यांना रू. ६,०००/— एवढे मानधन वाढीस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १४ :—** शहर वाहतुक उपशाखा, उल्हासनगर अंतर्गत १५ ट्रफिक वार्डन उपलब्ध होणे.

---

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** यामध्ये इश्यु काय आहे? जसे की, नेहरू चौक ते गोलमैदान पर्यंत डिवायडर लागले आहेत, त्यामध्ये नाना नानी गार्डनपासून जो रस्ता येत आहे. तो मार्केट एरियाच्या आतमधून रस्ता येतो. तिथे सर्व लोक रॉग साईडने गोल मैदानाकडे जात आहेत, काही वेळा अपघात झाले आहेत. जो आपण वार्डन देत आहेत, तर महानगरपालिकेकडून आपण जो १५ वाढवून देत आहेत, तिथे एक आणि एक देवी भवानी मंदिर येथे वार्डन उभे राहायला पाहीजे तिथून पण लोक नेहरू चौककडे रॉग साईडने जातात. त्यामुळे किती तरी वेळा अपघात झाले आहेत?

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :—** एक हिराघाट आणि एक पवई चौक इथे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** याच्यामध्ये चौधरी साहेबांचे पण ॲड करा.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** आणि मला काय सांगायचे सगळे तुम्हांला याच्यामध्ये खेमानीच्या चौकामध्ये तिथे अत्यंत ट्राफिक असते, तिथे पण दया.

**प्र. वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे:—** होय सर.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** भालेराव बोलतात ते बरोबर आहे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** खेमानी चौकात गरज आहे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** पोलिस डिपार्टमेंटचे आले आहेत, बोलावा त्यांना, त्यांच्याशी पहीले बोलू.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** दोन मिनीट मी या विषयावर बोलायचे आहे, पहीले महानगरपालिकेने ट्रॅफिक विभागाला २५ वार्डन दिले होते, २५ वार्डनमध्ये संपुर्ण उल्हासनगरचे काम चालत होते आणि बरोबर काम चालत होते. त्याच्या नंतर २० वार्डनचा प्रस्ताव आला, फक्त एक वर्षासाठी त्यांनी २० वार्डनची मागणी केली. तर आम्ही त्यांना २० वार्डन वाढवून दिले. २० वार्डनला एक वर्ष पण पुर्ण झाले नाही, ४५ वार्डन आम्ही त्यांना देत आहेत. ४५ वार्डनच्या नंतरही परत आता ३० वार्डनचा १५ एका जागेवर, १५ दुस—या जागेवर आपला महानगरपालिकेचा जो खर्च वाढत आहे, तिप्पटीने वाढत आहे, पहीले ४५ साठी चार हजार देत होतो, नंतर ४५ चे आम्ही ६ हजार केले तर दिड पट झाले. आता ३० वार्डन अजून वाढवणार ६ हजारा पासून आपला जो खर्च होइल, तो तिप्पट होणार आहे. जर हिशोब केला तर. आपल्या महापौरांचे निवेदन आहे की, खुप आवश्यक आहे, मी पण सांगतो की, दयायला पाहीजे. परंतु त्यांचा योग्य उपयोग होत नाही. आज ट्रॅफिक डिपार्टमेंटचे लोक इथे बसलेले आहेत, जेव्हा पहील्या वेळेस तुम्ही २५ वार्डनची मागणी केली होती, तेव्हा याच स्थायी समितीचा सदस्य होतो, आम्ही २५ वार्डन दिले.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** आता एकुण किती आहेत?

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** आता ७५ आहेत.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>** ट्रॅफिकचे इन्सपेक्टर आपले नाव काय?

**<u>पोलिस अधिकारी, श्री.नितीन शिंदे:—</u>** मी इन्सपेक्टर शिंदे विठ्ठलवाडी वाहतुक विभाग, नितीन शिंदे उल्हासनगर वाहतुक विभाग.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>** दोन्ही शिंदे, या बैठकीमध्ये मा. सभपती मॅडमच्या वतीने स्वागत करतो, सन्माननिय सदस्यांची या ठिकाणी चर्चा झालेली आहे. आपण जे वार्डन मागवून घेता आणि त्यांचा मानधनाचा प्रस्ताव आमच्याकडे होता. आता आम्ही आपल्याला जे काही सहाय्यक दिलेले आहेत, ज्या कामासाठी आम्ही दिलेले आहेत, त्याच्यासाठी वापर होत नाही. असे यांचे म्हणणे आहे आणि आता परत १५ आणि ३० माणसे वाढवून मागितलेली आहेत, ती पण माणसे आम्ही तुम्हांला देत आहे. पण असे निदेशनास आले की, आम्ही तुम्हांला जी माणसे  ज्या कामासाठी देत आहे, त्या कामाला त्यांचा वापर होत नाही. आम्ही कोणत्याही क्षणी ती माणसे बंद करून टाकू लक्षात आले का? आम्ही जी माणसे देतो, ती माणसे तुम्ही कुठे लावतात? दररोज तुमची डयुटी लागते की कोणत्या बक्कलचा माणूस कोणत्या नाक्यावर लावलेला आहे? कोणत्या बक्कल नंबरचा माणूस कुठे लागला आहे. तसेच आम्ही दिलेले सहाय्यक कुठे लावलेले आहेत? ही माहीती आम्हांला दररोज ई—मेलवरती चार्ट बनवून दिली पाहीजे. म्हणजे आम्हांला कोणाची तक्रार असेल तर चेक करता येतील, खरोखर जागेवर आहेत का चेक करता येतील? नुसतेच ते दुसरीकडे भांडे घासत फिरत असतील तर तुम्हांला देवून उपयोग काय? आणि एवढी माणसे ७५ माणसे आम्ही तुम्हांला देत आहोत, तरी एवढी बेकार हालत आहे, उल्हासनगरमध्ये एखादया मार्केटमध्ये गेलो तर आपल्याला या शहरातला अधिकारी आहे असे म्हणायला आम्हांला लाज वाटते. लक्षात आले का? आता तुमच्या सोबत आम्ही व्यापारी असोएशियन लोकांच्या, बैठक आम्ही दिवाळी नंतर अरेंज करीत आहे. तर त्याच्यामध्ये तुमच्या काय अडचणी आहेत, ते तुम्ही सांगितल्या पाहीजेत. व्यापा—याकडून जो पर्यत सहकार्य मिळणार नाही, तो पर्यंत आपण जसे पाहीजे, तसे सुरळीत ट्राफिक करू शकणार नाहीत. कारण रस्त्यावरच गाडया लागतात, रस्त्यावरतीच मोटारसायकल लागतात, दोन्ही साईडने गाडया लागतात, एवढी बेकार परिस्थिती आहे. परवा मी शिक्षण मंडळामध्ये व्हिजीट केली, मला लाज वाटली की, दुकानदार माझ्याकडे बघतात, त्यांचे सर्व सामान रस्त्यावर ठेवतात. कोणाला शिकलेली लोक आहेत, त्यांना पण एवढे कळत नाही की, आपण रस्त्यावर सामान ठेवून आडथळा निर्माण करीत आहे. आपल्या पासून दुस—याला त्रास होईल असे वर्तन करायला नाही पाहीजे. दुकानदार एवढे पैसे कमवतात, तुम्ही १ कोटी काय ५० कोटी कमवा त्याच्या बददल काहीही म्हणणे नाही, परंतु आम्ही नागरीकांसाठी जो रस्ता उपलब्ध केला आहे, त्या रस्त्यावर तुम्ही सामान ठेवणार, त्या सामानाच्या पलिकडे इकडून एक गाडी लागणार. समोरचा दुकानदार तिकडून सामान ठेवणार. त्याच्यापुढे गाडी लावणार आमची गाडी जायला रस्ता पण नाही. म्हणजे एवढी बेकार परिस्थिती आहे, मग ट्राफिकवाल्या माणसांना आम्ही तुम्हांला ७५ लोक दिले आहेत, तुम्हांला आम्ही गाडया ओढण्यासाठी गाडी पण देतो, तरी पण तुमची ही जर परिस्थिती असेल, ट्रॅफिक नियंत्रित करण्याची जबाबदारी तुमची आहे. आम्ही कधीही अर्ध्यारात्री पण सहकार्य करायला तयार आहेत. पण एवढी बेकार टॉफिकची समस्या मी महाराष्ट्रामध्ये कुठेच बघितलेली नाही. त्याच्यामुळे दिवाळीच्या नंतर तुम्ही प्लॅन करा, मी स्वतः तुमच्या सोबत उभे राहायला तयार आहे आणि आपण चांगल्या पध्दतीने ट्रॅफिक व्यवस्था करू, जी जागा आहे, तिथेच पट्टा मारून देईल, तिथे तुम्ही कॅपॅसिटी लिहा. जिथे १० च गाडया उभ्या राहू शकतील, इथे ५ च गाडया उभ्या राहू शकतील, इथे २५ च गाडया उभ्या राहू शकतील, तुम्ही तशी कॅपॅसिटी देवून करा, मी त्याप्रमाणे तुम्हांला मार्किंग देतो. परंतु सामान्य माणसाला, कोणी कुठेही गाडी लावते, डिसीप्लेन नावाची गोष्टच नाही आणि तुमच्या विभागाकडून शिस्त लावणे हे अभिप्रेत आहे. आमचे काम नाही, आपण वर्दीमधले माणसे आहात तुम्ही ते काम लावले पाहीजे. आम्ही तुम्हांला काय सहकार्य लागेल ते देतो, सन्माननिय नगरसेवकांचे म्हणणे आहे की, आपण एवढे पैसे खर्च करतो, एवढे पैसे देतो पण

रिझल्ट आम्हांला मिळत नाही. मग रिझल्ट मिळत नसेल तर ही माणसे तुम्हांला कशाला पाहीजेत?

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** आयुक्त साहेब, ४ नंबर......
**पोलिस अधिकारी, श्री. शिंदे:—** आताचे जे वार्डन आहेत, ते उल्हासनगरचे नाहीत.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—** स्टेशनच्या इथे ऐकले आहे का? स्टेशन जवळ कोणी पण ट्रॅफिक हवलदार राहत नाही आणि उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे ४५ दया नाहीतर, ७५ दया किंवा ४५० दया, उल्हासनगर स्टेशन पुर्व, पश्चिम दोन्ही बाजूला जो पर्यंत आम्ही फोन करीत नाही, तो पर्यंत कोणीच येत नाही. सकाळी ११.०० वाजता येतील सायंकाळी ६.०० वाजता निघून जातील. सकाळी ७.०० वाजल्या पासून रात्री ९.०० वाजे पर्यंत दिपक म्हणून कॉन्स्टेबल आहे, गेटे म्हणून साहेब आहेत...

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** नाही, नाही, सगळयात महत्वाचा मुद्दा १३ किलो चौ.मि. आमचा एरिया आहे, ७५ माणसे आम्ही तुम्हांला देतो, खरे म्हणजे टार्गेट ज्या एरियामध्ये टॅफिक ख—या अर्थाने होते किंवा जिथे किती वाजता कुठे जास्त ब्लॉक होतो? त्या ठिकाणी संख्या जास्त वाढवली पाहीजे. ज्या ठिकाणी कमी आहे, त्या ठिकाणी कमी केली पाहीजे. हे नियोजन करण्याचे काम तुमचे आहे. तुम्ही आम्हांला नियोजन करून आम्हांला एक चार्ट दया, काही अडचण असेल तर आम्हांला सांगा. पण रिझल्ट मिळाला नाही तर मी माणसे कधी पण काढून घेईल. सगळयांच्या समोर सांगत आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** आता विठ्ठलवाडी इथे ट्रॅफिक झाली, जे ऑफिस आहे, त्याचा एरिया किती आहे? कैलास कॉलनी पर्यंत. हे आपले जे वार्डन आहेत, ते खोणी गांवापर्यंत युज होतात. उल्हासनगरच्या बाहेर आणि उल्हासनगरमध्ये विठ्ठलवाडी येथे मुश्किलने तीन ते चार वार्डन बघयला मिळत नाही. तर मी स्वतः पत्र दिले आहे की, नेताजी चौकामध्ये सायंकाळी एवढी परिस्थिती खराब होते. बाईकच्या तीन लाईन लागतात, आपल्याला चालण्यासाठी त्रास होतो, नेताजी चौक उल्हासनगरमध्ये सगळयात मोठा चौक आहे. सायंकाळच्या वेळी बघाल तर ६० ते ७० फुटा पर्यंत टॅफिक दिसेल, गाडया उभ्या असतात, फक्त १० फुट.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** हे जे बोलत आहेत, ते खुप आवश्यक आहे आणि बरोबर आहे. यामध्ये आपण एक अट टाकू की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये या वार्डनचा उपयोग झाला पाहीजे, त्यांनी बाहेर जायला नाही पाहीजे. नाही तर ते म्हारळगांव इथे गेले, टीटवाळा गेले, तिकडे गेले.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** साहेब हाजी मलंग चौकामध्ये, खोणी गांवामध्ये माझे येणे जाणे असते, तिथे मला ते वार्डन बघायला मिळतात. तो एरिया पण त्यांच्या हातामध्ये आहे आणि आपण वार्डन उल्हासनगरसाठी देत आहेत?

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** कंडीशन टाकले आहे ना.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** महापालिकेच्या हद्दीमध्येच वापर करायला पाहीजे, इतरत्र नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** जसे की, मी दोन ठिकाणे सांगितली आहेत, टोनी यांनी उल्हास स्टेशन पुर्व, पश्चिम दोन्ही सांगितले आहेत,

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** नेताजी चौकामध्ये एक वार्डन तर असायलाच पाहीजे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** शिंदे साहेब, तुम्ही जरा खुलासा करा, हद्दीच्या बाहेर वापरणे अलाऊड नाही, दोघांपैकी कोणी तरी एक जण खुलासा करा.

**पोलिस अधिकारी, श्री. शिंदे:—** आता जे खोणी येथे वार्डन आहेत, ते आपले नाहीत, उल्हासनगरचे नाहीत.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** साहेब, उल्हासनगरचेच असतात, त्यांना ब्लु पॅन्ट ऐवजी खाकी पॅन्ट घालून उभे करतात, फोटो काढून आणून त्यांना दाखवेल.

या वेळी सदस्य, श्री. भगवान भालेराव हे सभागृहाच्या बाहेर गेले.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** ठिक आहे, आपण चेक करू.
**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** साहेब, एक मिनीट त्यासाठी पर्याय आहे...
**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** नेवाळी नाका....

**पोलिस अधिकारी, श्री. शिंदे:—** नेवाळी नाक्याला आपले नाहीत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** नेवाळी नाक्याला कल्याणचे आहेत.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** नेटके तुम्ही एक काम करा, ७५ लोकांचे फोटो स्कॅनिंग करा, ओळखपत्र एक आपल्याकडे ठेवा, एक त्यांना देवून टाका आणि साहेब, इकडे बघा, सन्माननिय महोदय, आपल्याला शंका असेल तर फोटो वेरीफाय करा, त्याच वेळेला कॅन्सल करून टाकू, ठिक आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** नेहरू चौक ते गोल मैदान पर्यंत, पहीले देवी भवानी येथे, दुसरा गोलमैदान पासून ४४४ पासून बाहेर जो रोड येतो, सती भवन तिथे पण वार्डन पाहीजे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** १७ सेक्शन.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** १७ सेक्शन येथे तर असतातच.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** नाही, नाही, नो एन्ट्री जिकडे होते, तिकडे केवळ लोकांना पकडण्यासाठी उभे असतात, लोकांनी जावू नये असे नाही.

या वेळी सदस्य, श्री. भगवान भालेराव यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** इतिवृत्ताची वाट न पहाता,पास... आहे, पण कंडीशन आहेत.
**महापालिका सचिव:—** ठिक आहे, पास
**काही सदस्य :—**पास—पास......
**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १४ :—** शहर वाहतुक उपशाखा, उल्हासनगर अंतर्गत १५ ट्रफिक वार्डन उपलब्ध होणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरातील वाहतुक कोंडीच्या समस्यांचे निवारणकरणेसाठी शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व विठठलवाडी यांना मनुष्यबळ अपुरे पडत असल्यामुळे त्याना त्यांचे मदतीकरीता एकुण ४५ ट्राफिक वार्डन नियुक्त करण्यात आलेले आहेत. सदर वार्डन यांना त्यांच्या उदारनिर्वाहासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेयने रू ४०००/—एवढे मानधन देण्यात येते. सदर ट्राफिक वार्डन शहराच्या वाढत्या लोकसंख्येबरोबर तसेच वाढत्या लोकसंख्येबरोबर तसेच वाढत्या वाहनांमुळे होणाऱ्या वाहतुक समस्यांवर नियंत्रण ठेवण्यास अपुरे पडत असल्यामुळे त्यांनी खालील नमुद चौकात नमुद संख्येत वार्डन नेमण्याची आवश्यकता असल्याबाबत कळविले आहे.

| अ. क्र. | पॉईट चे नाव | अ.क्र | पॉईट चे नाव |
|---|---|---|---|
| १ | बिर्ला गेट | ९ | खेमानी चौक |
| २ | शिरू चौक | १० | म्हारळ चौक |
| ३ | उल्हासनगर रेल्वे स्टेशन | ११ | रिलासन्स मॉल |
| ४ | विठ्ठलवाडी रेल्वे स्टेशन | १२ | गुरूद्वारा चौक |
| ५ | शहाड रेल्वे स्टेशन | १३ | मध्यवर्ती रूग्णालय |
| ६ | मधुबन चौक | १४ | टर्निग पॉईन |
| ७ | डर्बी चौक | १५ | सागर वाईन्स |
| ८ | स्मशान भुमी | | |
| | | एकुण | १५ वार्डन |

या अनुषंगाने वरील प्रमाणे ट्राफिक वार्डन नियुक्त करणेबाबत मा. स्थायी समितीने मंजुरी दिल्यास

दि.०४/९/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार प्रति वार्डन रू. ६०००/— एवढे मानधन दयावे लागणार आहे. तसेच वाहतुक विभागास पुरविण्यात आलेल्या वार्डन हे उल्हासनगर शहरातील वाहतुक सुरळीत करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. या व्यतीरिक्त त्यांना कोणतेही काम देऊ नये याची जबाबदारी पोलिस वाहतुक विभागाची राहील.

सदर वार्डन यांना रू ६,००० (मासिक मानधन) × १५ (वार्डन) × १२ (महिने) = १०,८०,०००/— एवढा वार्षिक खर्चाचा बोझा महापालिकेस सोसावा लागणार आहे. यास्तव ट्राफिक वार्डन यांची नियुक्ती करण्याची जबाबदारी शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर यांची राहील.

वाहतुक शाखेस उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे १५ ट्रॉफिक वॉर्डन यांना खालील अटी व शर्तीच्या आधारे देय मानधनावरील खर्च अर्थसहाय्य स्वरुपात देणेस मान्यता दिलेली होती.

१) संबंधित १५ ट्रॅफिक वॉर्डन नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहील.

२) संबंधित १५ ट्रॅफिक वॉर्डन यांना प्रतिमहा रु.६०००/— मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, कल्याण विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.

३) १५ ट्रॅफिक वॉर्डन यांचे मानधनापोटी वार्षिक रक्कम रु.१०,८०,०००/— खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च वर्ष २०१८—१९ चे अंदाजपत्रकात सी ५ (६) वाहतूक नियंत्रण या लेखाशिर्षात करण्यात येईल.

४) ट्रॅफिक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.

५) ट्रॅफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

६) याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

तरी वरील तक्त्यानुसार शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर यांना १५ ट्राफिक वार्डन नियुक्त करण्यास मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी पटलावर सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.५२** **दिनांकः— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री.जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेतील अटी व शर्तीनुसार शहर वाहतुक उपशाखा, उल्हासनगर अंतर्गत १५ ट्रफिक वार्डन उपलब्ध करुन देणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

खालील नमुद रस्त्यांवर ट्रफिक वार्डन असणे आवश्यक असेल.

१. त्यांचा उपयोग हद्दीबाहेर न होता उल्हासनगर हद्दीतच झाला पाहिजे हे पाहण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.
२. उल्हास स्टेशनचा पुर्व व पश्चिम भाग
३. नेताजी चौक, कैलास कॉलनी चौक
४. १ नंबर बसस्टॉप
५. नेहरु चौक, देवीभवानी मंदिर ते गोलमैदान
६. १७ सेक्शन नो एन्ट्री जेथे नाही तेथे
७. गोल मैदान पासुन ४४४ रस्ता, सतीभवन
८. खेमाणी

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १५ :—** विठ्ठलवाडी शहर वाहतुक उपशाखा, उल्हासनगर अंतर्गत १५ ट्रॅफीक वार्डन उपलब्ध होणे.

———————————————————————————————————————

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** खेमानी चौकात पण एक दयायला पाहीजे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** होय, खेमानीला दिला, सेम कंडीशन पास.. पास...
**काही सदस्य :—**पास—पास......
**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १५ :—** विठ्ठलवाडी शहर वाहतुक उपशाखा, उल्हासनगर अंतर्गत १५ ट्रॅफीक वार्डन उपलब्ध होणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरातील वाहतुक कोंडीच्या समस्यांचे निवारणकरणेसाठी शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व विठ्ठलवाडी यांना मनुष्यबळ अपुरे पडत असल्यामुळे त्याना त्यांचे मदतीकरीता एकुण ४५ ट्राफिक वार्डन नियुक्त करण्यात आलेले आहेत. सदर वार्डन यांना त्यांच्या उदारनिर्वाहासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेयने रू ४०००/—एवढे मानधन देण्यात येते. सदर ट्राफिक वार्डन शहराच्या वाढत्या लोकसंख्येबरोबर तसेच वाढत्या लोकसंख्येबरोबर तसेच वाढत्या वाहनांमुळे होणाऱ्या वाहतुक समस्यांवर नियंत्रण ठेवण्यास अपुरे पडत असल्यामुळे, त्यांनी श्रीराम चौक, जंगल हॉटेल, दुधनाका, भाजीमार्केट, नेताजी चौक, कैलाश कॉलनी, भाटीया चौक, तहसिल कार्यालय चौकात नमुद संख्येत वार्डन नेमण्याची आवश्यकता असल्याबाबत कळविले आहे.

या अनुषंगाने वरील प्रमाणे ट्राफिक वार्डन नियुक्त करणेबाबत मा. स्थायी समितीने मंजुरी दिल्यास दि. ०४/९/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार प्रति वार्डन रू. ६०००/— एवढे मानधन दयावे लागणार आहे. तसेच वाहतुक विभागास पुरविण्यात आलेल्या वार्डन हे उल्हासनगर शहरातील वाहतुक सुरळीत करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. या व्यतीरिक्त त्यांना कोणतेही काम देऊ नये याची जबाबदारी पोलिस वाहतुक विभागाची राहील.

सदर वार्डन यांना रू <u>६,००० (मासिक मानधन) × १५ (वार्डन) × १२ (महिने) त्र १०,८०,०००/—</u> एवढा वार्षिक खर्चाचा बोझा महापालिकेस सोसावा लागणार आहे. यास्तव ट्राफिक वार्डन यांची नियुक्ती करण्याची जबाबदारी शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर यांची राहील.

विठ्ठलवाडी वाहतुक शाखेस उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे १५ ट्रॉफिक वॉर्डन यांना खालील अटी व शर्तीच्या आधारे देय मानधनावरील खर्च अर्थसहाय्य स्वरुपात देणेस मान्यता दिलेली होती.

१) संबंधित १५ ट्रॅफिक वॉर्डन नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहील.
२) संबंधित १५ ट्रॅफिक वॉर्डन यांना प्रतिमहा रु.६०००/— मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक शाखा, कल्याण विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.
३) १५ ट्रॅफिक वॉर्डन यांचे मानधनापोटी वार्षिक रक्कम रु.१०,८०,०००/— खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च वर्ष २०१८—१९ चे अंदाजपत्रकात सी ५ (६) वाहतूक नियंत्रण या लेखाशिर्षात करण्यात येईल.
४) ट्रॅफिक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.
५) ट्रॅफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.
६) याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्भवल्यास त्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.

तरी वरील तक्त्यानुसार विठ्ठलवाडी शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर यांना १५ ट्राफिक वार्डन नियुक्त करण्यास मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी पटलावर सादर करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ५३** **दिनांक:— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेतील अटी व शर्तीनुसार विठ्ठलवाडी शहर वाहतुक उपशाखा, उल्हासनगर अंतर्गत १५ ट्रॅफीक वार्डन उपलब्ध करुन देणेस मान्यता देत आहे.

**तसेच**

खालील नमुद रस्त्यांवर ट्रफिक वार्डन असणे आवश्यक असेल.

१. त्यांचा उपयोग हद्दीबाहेर न होता उल्हासनगर हद्दीतच झाला पाहिजे हे पाहण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहिल.
२. शांतीनगर चौक,
३. श्रीराम चौक,
४. जंगल हॉटेल,
५. दुधनाका,
६. भाजीमार्केट,
७. नेताजी चौक,
८. कैलाश कॉलनी,
९. भाटीया चौक,
१०. तहसिल कार्यालय चौक

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १६ वाचुन दाखवितात.

————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १६ :—**माहे एप्रिल २०१७ पासून मार्च २०१८ अखेर पर्यंतची जमा खर्चाचा एकत्रित महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

————————————————————————————————————————————

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** साहेब, आपण हा विषय पास करू, पण यामध्ये इश्यु काय आहे? संपुर्ण वर्ष सन २०१७ एप्रिल पासून मार्च २०१८ चा जो ऑडीट रिपोर्ट आहे, तो याच बरोबर आला आहे. यामध्ये तुम्ही नोट केले आहे, गंभीर बाब आहे. कलेक्शन कमी आहे, हाच आपल्याला एक महीन्याचा रिपोर्ट येत होता. तर आपण त्याच्यावर काही पाऊल उचलत होतो, आयुक्त साहेब पाऊल उचलत होते, प्रशासन पाऊल उचलत होते, सभापती पाऊल उचलत होते. अहवाल प्रत्येक आठवडयाला यायला पाहीजे, प्रत्येक महीन्याला यायला पाहीजे. स्थायी समितीपुढे प्रत्येक आठवडयाला येत होता.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये काय आहे?

**प्र. मख्य लेखापरिक्षक, श्री. विनायक फासे:—** या पुर्वी आपल्या समोर माहीती ही वार्षीक ठेवलेली आहे. उद्देश असा आहे की, जरी आपण क्वार्टर क्वार्टरला आपल्याकडे आलो, त्या नंतर समग्र वर्षाचा आर्थिक स्थितीचा गोषवारा समोर आणला गेला पाहीजे. हा याच्या मागचा उद्देश आहे. पैकी ऑक्टोंबर पर्यंत या स्थायी समितीच्या...

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** त्यांचे म्हणणे आहे की, ॲक्टमध्ये काय तरतुद आहे, स्थायी समिती समोर किती दिवसात यायला पाहीजे?

**प्र. मख्य लेखापरिक्षक, श्री. विनायक फासे:—** साप्ताहीक येणे अपेक्षित आहे.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** पर विक.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** पर विक, ज्या ज्या वेळेला स्थायी समितीची मिटींग असेल त्या त्या वेळेला तुम्ही दिला पाहीजे.

**प्र. मख्य लेखापरिक्षक, श्री. विनायक फासे:—** या पुर्वी जी स्थायी समितीची मिटींग झाली होती, याच्यामध्ये आम्हांला निर्देश देण्यात आले होते की, तिमाही आमच्याकडे अहवाल दया.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** तिमाही जो, हे बघा ॲक्टवर स्थायी समितीचे इन्सट्रक्शन नाहीत. तुम्ही एक एक वर्षाच देत आहेत, म्हणून आम्ही सांगितले की, कमीत कमी तीन महीन्याचा तरी घेऊन या.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** हा अहवाल प्रत्येक महीन्याचा यायला पाहीजे, तीन तीन महीन्याचा नाही.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** नाही, नाही, कायदयानुसार करा.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** प्रत्येक आठवडयाचा अहवाला यायला पाहीजे आणि मुंबई महानगरपालिकेमध्ये बघा, तिथे प्रत्येक आठवडयाला मिटींग होते. प्रत्येक आठवडयाचा अहवालावर तिथे चर्चा होते.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** सन १९९७ मध्ये या सभागृहामध्ये मला वाटते की, माझ्या बरोबर बोडारे साहेब होते, त्या वेळी आम्ही ९१ मिटींग घेतल्या होत्या, बोडारे सोहेब होते, इथे बसलेले काही सदस्य पण असतील, चौधरी साहेब होते, प्रत्येक आठवडयाला बुधवारी मिटींग घेत होतो. प्रतिभा पण होत्या, तरी सुध्दा आम्ही निवेदन करतो सभापती महोदयांना की, प्रत्येक आठवडयाला मिटींग ठेवण्यात यावी.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १६ :—** माहे एप्रिल २०१७ पासून मार्च २०१८ अखेर पर्यंतची जमा खर्चाचा एकत्रित महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल विचारात घेणे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ नुसार माहे एप्रिल २०१७ पासून मार्च २०१८ अखेर पर्यंतची जमा खर्चाचा एकत्रित अहवाल खालील प्रमाणे सादर करित आहे. कृपया सदरचा अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. ही विनंती

वित्तीय वर्ष २०१७—२०१८ च्या “अ” “ब” व “क” अर्थसंकल्पात अंदाजे अपेक्षित केलेले उत्पन्न खालीलप्रमाणे आहे.

| अर्थसंकल्प | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|
| १ | **२** |
| मागील शिल्लक | ३८४७५००० |
| “अ” | ५८५२४५०००० |
| “ब” | १६०००००० |
| “क” | १५७२१०३००० |
| **एकूण** | ७४७९०२८००० |

सदर अपेक्षित जमेमध्ये कर्ज वगळता खालील बाबी अंर्तभूत आहेत.

| अ.क्र. | बाब | अंदाजपत्रकानुसार जमा रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| २ | महसूल जमा | ४१०६६७५००० |
| ३ | शासकीय अनुदान | २२९०२५०००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्वे इ. | ३३४१२५००० |
| ५ | एकुण | ६७३१०५०००० |
| ६ | प्रारंभिक शिल्लक | ३८४७५००० |
| ७ | एकुण :— | ६७६९५२५००० |

वित्तीय वर्ष २०१७—२०१८ च्या मुळ अर्थसंकल्पात एकुण जमा रक्कम रुपये **७४७९०२८०००**/— अपेक्षित धरलेली आहे. त्यामुळे माहे मार्च २०१८ अखेर समप्रमाणात रुपये **६५७८४२९५००**/— एकुण उत्पन्न जमा होणे अपेक्षित होते. परंतू प्रत्यक्षात रुपये **४०५८४६६०२४**/— (एकूण अपेक्षित जमेच्या ५४.२६ टक्के) एकुण उत्पन्न प्राप्त झाले आहे.

माहे , मार्च २०१८ अखेर मूळ अंदाजानुसार व सुधारित अंदाजपत्रकानुसार अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा महसूल लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| ESTIMATES FOR THE YEAR | REVISED ESTIMATES FOR THE YEAR 2017/18 | Expected Revenue income Up To MARCH 2018 |
|---|---|---|
| 38475000 | 778051000 | 778051000 |
| **A - BUDGET** | | |
| **REVENUE INCOME** | | |
| 485800000 | 120000000 | 120000000 |
| 1564500000 | 771500000 | 771500000 |
| 901500000 | 40600000 | 40600000 |
| 10000000 | 0 | 0 |
| 10000000 | 0 | 0 |
| 600000 | 600000 | 600000 |
| 69200000 | 9600000 | 9600000 |
| 1631500000 | 1648700000 | 1648700000 |
| 28675000 | 16600000 | 16600000 |
| **CAPITAL RECEIPTS (LOANS)** | | |
| 159600000 | 7500000 | 7500000 |
| 658750000 | 488209000 | 488209000 |
| 0 | 0 | 0 |
| 332325000 | 146900000 | 146900000 |
| **5852450000** | **3250209000** | 3250209000 |
| **B - BUDGET** | | |
| 1000000 | 0 | 0.00 |

| | | |
|---|---|---|
| **15000000** | **0** | 0.00 |

**C - BUDGET**

**REVENUE INCOME**

| | | |
|---|---|---|
| 500000000 | 350000000 | 350000000 |
| 60000000 | 20000000 | 20000000 |
| 475000000 | 211000000 | 211000000 |
| 11100000 | 7627000 | 7627000 |
| 300000 | 100000 | 100000 |
| 215000000 | 0 | 0 |
| 308903000 | 28130000 | 28130000 |
| 1800000 | 400000 | 400000 |
| **1572103000** | **617257000** | 617257000 |
| **7440553000** | **3867466000** | 3867466000 |
| **7479028000** | **4645517000** | 4645517000 |

सन २०१७—१८ च्या 'अ''ब'व'क' मूळ अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. ७४७९०२८०००/— (प्रारंभिक शिल्लकेसह) अपेक्षित धरलेले होते . परंतू सन २०१७—१८ चे सुधारित अंदाजपत्रकात अपेक्षित जमा रक्कम रू. ४६४५५१७०००/— इतकी ग्राहृय धरली आहे. मात्र प्रत्यक्षात माहे , एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ अखेरपर्यंत मुळ अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने रू. ४०५८४६६०२४/— (प्रारंभिक शिल्लकेसह) उत्पन्न प्राप्त झाले आहे. सदर उत्पन्न हे सुधारित अंदाजपत्रकाच्या **८७.३६** टक्के इतके आहे. मुळ अंदाजपत्रकाप्रमाणे अपेक्षित असलेले उत्पन्न सुरवातीच्या आठ महिन्यात विभागाकडून जमा करता न आल्याने मुळ अंदाजपत्रकापेक्षा रू. २८३३५११०००/— ने कमी करून सुधारित अंदाजपत्रक हे मुळ अंदाजपत्रकाच्या ३७.८९ टक्के कमी तयार करणे भाग पडले आहे.

**अर्थसंकल्पात नमूद केलेल्या बाबी मध्ये खालील विभागांनी उत्पन्न वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.**

१) मालमत्ता कर विभाग:— सुधारीत अर्थसंकल्पात मालमत्ता कर विभागाकडून सन २०१७—१८ मध्ये एकूण रक्कम रू १४७९४०००००/—एवढी कर स्वरूपात जमा होणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात रक्कम रू. ९२६०३५२४८/— एवढी जमा झाली आहे. ती वरील अर्थसंकल्पिय तरतूदीच्या ६२ टक्के एवढी प्रमाणात जमा झाली आहे. त्यामुळे मालमत्ता कर विभागाने प्रलंबीत मालमत्ता कर वसुली बाबत ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच ज्या इमारतींची कर निर्धारणा (Assessment ) केल्या नाहीत त्या त्वरीत कर निर्धारणा करून कर लावल्यास महापालिकेस उत्पन्न प्राप्त होईल.

**२)** <u>मालमत्ता विभाग :— </u>१) मालमत्ता विभागाकडून शहरातील पार्किंग स्थळाचे सर्वेक्षण करून पार्किंग स्थळे निर्माण करावी, ज्यामुळे महापालिकेस उत्पन्न प्राप्त होईल.

२) रिकाम्या मालमत्ता भाडे तत्वावर वापरात आणून उत्पन्न वाढविणे.

३) व्यवसाय परवाना धोरण अवलंबून उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे.

४) फेरिवाला धोरण लवकरात लवकर निश्चित करून उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे.

५) महापालिकेच्या मालमत्तेचे सुधारित दर निश्चित करून उत्पन्न वाढविण्या साठी उपाययोजना करणे .

**३)** <u>पाणी पुरवठा विभागः—</u> १) सुधारीत अर्थसंकल्पात पाणी पट्टीसाठी सन २०१७—१८ मध्ये एकुण रूक्कम रू. २००००००००/—एवढी पाणी पट्टी जमा होणे आवश्यक होते. मात्र प्रत्यक्षात रू. १००८७७३६/— एवढी रक्कम पाणी पट्टी जमा झाली आहे. ती सुधारीत अर्थसंकल्पाच्या ५०.४४ टक्के एवढीच अल्प प्रमाणात जमा झाली आहे. त्यामुळे प्रलंबीत पाणी पट्टी वसुलीबाबत ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. अनधिकृत नळ जोडणी नियमाप्रमाणे दंड आकारून नियमित करून नळ कनेक्शनला मिटर लावून पाणी चोरीला आळा घालणे आवश्यक वाटते.

लेखा परिक्षण विभागास पुरेसा कर्मचारीवृंद नसल्याने उत्पन्नाचे लेखा परिक्षण अद्यावत ठेवणे शक्य होत नाही. तथापी आर्थिक वर्ष संपताच मागील जमेचे लेखा परिक्षण करण्यात येत असून. अनियमितता आढळल्यास सदर बाब संबंधित विभागाच्या निदर्शनास आणून देवून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात येतात.

**खर्च—**

माहे , मार्च २०१८ अखेर मूळ अंदाजानुसार व सुधारित अंदाजपत्रकानुसार अपेक्षित असलेले खर्च व प्रत्यक्ष खर्च लेखा शिर्षनिहाय खालीलप्रमाणे आहे.

| ESTIMATES 2017/18 | REVISED ESTIMATES 2017-18 | Expected Revenue Expenditure Up To MARCH 2018 |
|---|---|---|
| | | |
| 891944000 | 954638000 | 954638000 |
| 57700000 | 49800000 | 49800000 |
| 133300000 | 133500000 | 133500000 |
| 98800000 | 86100000 | 86100000 |
| 5100000 | 5100000 | 5100000 |
| 374650000 | 383050000 | 383050000 |
| 43100000 | 29800000 | 29800000 |

| | | |
|---|---|---|
| 72000000 | 46700000 | 46700000 |
| 622623000 | 561000000 | 561000000 |
| 207600000 | 168700000 | 168700000 |
| 156000000 | 130000000 | 130000000 |
| 76701000 | 96185000 | 96185000 |
| 2739518000 | 2644573000 | 2644573000 |
| **CAPITAL EXPENDITURE** | | |
| 42200000 | 7500000 | 7500000 |
| 32000000 | 20500000 | 20500000 |
| 27000000 | 4000000 | 4000000 |
| 37500000 | 7500000 | 7500000 |
| 6000000 | 0 | 0 |
| 38000000 | 18000000 | 18000000 |
| 1863906000 | 874300000 | 874300000 |
| 5000000 | 500000 | 500000 |
| 0 | 0 | 0 |
| 22870000 | 22870000 | 22870000 |
| 500000 | 200000 | 200000 |
| 332325000 | 150100000 | 150100000 |
| 2407301000 | 1105470000 | 1105470000 |
| **5146819000** | **3750043000** | **3750043000** |
| | | |
| **1500000** | **1000000** | **1000000** |
| **20000000** | **0** | **0** |
| **C BUDGET -Revenue** | | |
| 61139000 | 65698000 | 65698000 |
| 2550000 | 1950000 | 1950000 |
| 2300000 | 2100000 | 2100000 |
| 300000000 | 250000000 | 250000000 |

| | | |
|---|---|---|
| 5000000 | 19845000 | 19845000 |
| 150500000 | 127200000 | 127200000 |
| 25700000 | 19200000 | 19200000 |
| 102500000 | 78000000 | 78000000 |
| 15600000 | 7800000 | 7800000 |
| 4000000 | 2800000 | 2800000 |
| 669289000 | 574593000 | 574593000 |
| **CAPITAL EXPENDITURE** | | |
| 1000000 | 0 | 0 |
| 229500000 | 68800000 | 68800000 |
| 726000000 | 38500000 | 38500000 |
| 296500000 | 100500000 | 100500000 |
| 385642000 | 84216000 | 84216000 |
| 50000 | 0 | 0 |
| 1800000 | 650000 | 650000 |
| 1640492000 | 292666000 | 292666000 |
| **2309781000** | **867259000** | **867259000** |
| **7478100000** | **4618302000** | **4618302000** |
| 60412456 | 532115000 | 532115000 |

माहे मार्च २०१८ अखेर पर्यंत सुधारीत अंदाज पत्रकाच्या अनुषंगाने ३३५०६९६४९९/— खर्च लेखांकित झालेला आहे. तो एकूण प्रत्यक्ष जमा महसूलाच्या ८२.५६ टक्के झाल्याचे दिसून येत आहे. खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते व लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान करण्यात येत आहे. झालेला खर्च हा सक्षम प्राधिका—याच्या पूर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पीय तरतूदीच्या अधिन आहे.

माहे मार्च २०१८ पर्यंतची जमा व खर्चाची पत्रके सोबत जोडली आहेत.

निवृत्ती वेतन प्रकरणे—माहे मार्च २०१८, अखेर महानगरपालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या / निधन पावलेल्या कर्मचा—यांची ६२ निवृत्ती वेतन प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ कलम ०६ (१) अ च्या तरतुदीप्रमाणे):— अर्थसंकल्पिय अंदाजाप्रमाणे महानगरपालिकेस फारच कमी उत्पन्न मिळाले आहे. त्यामुळे १) स्थानिक संस्था कर २) मालमत्ता कर ३) महानगरपालिका मालमत्ता उत्पन्न ४)पाणी बिल वसूली (कर) ५) पाणी बिल वसुली(पाणीपट्टी) या महसूली उत्पन्नात वाढ होणेच्या दृष्टीने विभागांनी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ५४** **दिनांकः— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार माहे एप्रिल २०१७ पासून मार्च २०१८ अखेर पर्यंतची जमा खर्चाचा एकत्रित महानगरपालिका लेख्यांच्या छाननीचा मुख्य लेखा परिक्षकांचा अहवालाची नोंद घेत आहे व उत्पन्न वाढविण्या प्रयोजनार्थ प्रशासनास योग्य उपाययोजना करण्यास व कठोर पावले उचलण्यास निर्देशित करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** सभापती महोदया, शिक्षण विभागाकडून शिक्षण विभागाकडून मला तीन गोष्टींचा खुलासा पाहीजे. नंबर एक जे सॅम्पल आणलेले आहेत, ते सन्माननिय समितीच्या समोर ठेवावे. नंबर दोन मला वाटते शासनाचा जी.आर. सन २०१६ मध्ये निघाला होता, त्याच्यामध्ये विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये पैसे टाकणे बंधनकारक होते. असे असतांना देखील आपल्याकडे टेंडर कॉल का केले? असे मला विचाले असता, तुम्ही मला जो जी. आर. दाखवला तो कधीचा जी. आर. आहे?

**लेखापाल, श्रीम. निलिमा कदमः—** ४ जुलै, २००० चा आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** ४ जुलै, २०००, तो कोणाचा जी.आर. आहे? कोणत्या विभागाचा आहे?

**लेखापाल, श्रीम. निलिमा कदमः—** नियोजन विभागाचा आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** नियोजन विभागाचा आणि अगोदरचा जो सन २०१६, चा तो कोणाचा होता. त्याच्यामध्ये काय म्हणटले आहे? ते वाचून दाखवा. तक्रार आली आहे, माझ्याकडे आपले सन्माननिय नगरसेवक कोण आहेत? मला नाव माहीत नाही.

**सदस्य, श्री. राजेश वदारियाः—** जग्यासी, सभापती आहेत, रवि जग्यासी.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** त्यांची माझ्याकडे तक्रार अशी आली आहे की, आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या जी आहे, ती अगोदरच्या बैठकीमध्ये एवढी दाखवली आणि

आता एवढी दाखवली. त्याचा एक खुलासा आपल्याला समितीच्या समोर करायचा आहे आणि आता जो जी.आर. तुमच्या हातामध्ये आहे, तर त्याच्यामध्ये शेवटच्या पॅराग्राफमध्ये काय लिहीले की, विद्यार्थाच्या खात्यामध्ये पैसे टाकायला आपल्याला मुभा दिली आहे, नाही किंवा टेंडर काढण्यासाठी मुभा दिली आहे का? ते एक मला खुलासा करा आणि विद्यर्थ्याची सख्या का घटली, का वाढली? तो एक खुलासा करायचा आहे.

**लेखापाल, श्रीम. निलिमा कदमः—** आधीच्या शासन निर्णयामध्ये सांगितलेले आहे की, डी.बी. टी. नुसारच आपल्याला सगळयांच्या खात्यामध्ये पैसे वर्ग करायचे आहेत, खरेदी करायची नाही आणि ४ जुलै, २०१८ ला जो शासन निर्णय आला त्याच्यामध्ये असे सांगितले होते की, शालेय शिक्षण विभागाची, शालेय गणवेश योजना ही लाख हस्तांतर प्रक्रियेतून वगळण्या बाबत प्रस्तावाच संदर्भ क्र. २ येथे छाणनी समितीने दिलेल्या अभिप्रायनुसार नियोजन विभाग शासन निर्णय क्र. डी.सी.टी. २०००/३१६/प्र.क्र.१३३/का. १४१७/ दिनांक ५ डिसेंबर, २०१६ परिशिष्ट अ मधील अनुक्रमांक ८ येथे दर्शविण्या आलेल्या गणवेश ही वस्तू फक्त चालू शैक्षणिक वर्षा करीता सन २०१८—१९ करीता वगळण्यात येत आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** याच्यामध्ये काय झाले? अगोदरचा एक शासन जी.आर. निघाला होता, मी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अतिरिक्त आयुक्त असतांना शिक्षण विभाग माझ्याकडेच होते, ३०० शाळा माझ्याकडे होत्या. तर त्या ठिकाणी ड्रेस घेतले तेव्हा असेच प्रकरण झाले होते, तिथे ऑलरेडी टेंडर प्रसिध्द झालेले होते. त्याच्या नंतर जी.आर. आला त्यामुळे ते अगोदर प्रोसेस झाल्यामुळे ते काढून टाकले. पण इथे माझी सही होऊन गेल्यावर मी त्यांना फोन करून विचारले की, माझी सही झाली. परंतु शासनाचे असे निर्देश आहेत की, विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा झाले पाहीजेत. तुम्ही कसे काय टेंडर मागवले? तर मग ते म्हणाले नाही सर नंतर आपल्याकडे एक जी.आर. आला आहे, त्यात विभागाचा त्याच्यातून आपल्याला सन २०१८—१९ साठी वगळण्यात आलेला आहे. मग मला तो जी.आर. दाखवा त्यांनी मला तो दाखवला, तुम्ही मला जाताना जी.आर.ची एक प्रत देवून जा, त्यांनी तक्रार केली आहे, त्यांना पाठवून देतो.

**लेखापाल, श्रीम. निलिमा कदमः—** होय सर.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** तर मला वाटते पुढच्या वर्षी होईल किवा नाही, ते आपल्याला माहीत नाही, या वर्षीचा टेंडर जी.आर. प्रामाणे स्थायी समिती जो निर्णय घेईल पुढच्या वर्षी विद्यर्थ्यांच्या खात्यामध्ये पैसे आपल्याला ओपन करणे बंधनकारक आहे असे धरून विद्यार्थ्यांचे खाते उघडा आणि सगळया शिक्षकांना जबाबदारी दया, जेवढे आपल्याकडे १२५ किंवा १२७ शिक्षक आहेत, त्यांना डिव्हाईट दि नंबर ऑफ स्टूडंट ४०, २० त्यांची जबाबदारी आहे. शिक्षकांनी काम नाही केले तर त्यांचा पगार थांबवून टाकायचा म्हणजे ते लगेच झटपट करून टाकणार. त्यांना सांगायचे की, पुढच्या महीन्यात तुला पगार मिळणार नाही ४० विद्यार्थ्यांचे खाते उघडण्याची जबाबदारी तुमची. ते पध्दतीने करा तुम्ही, पुढे बोला.

**लेखापाल, श्रीम. निलिमा कदमः—** सर दुसरा एक खुलासा असा होता की, पहील्या ज्या प्रस्तावामध्ये ५२४४ तेव्हा जेव्हा टेंडरींग केले होते, ३० सप्टेंबर २०१७ ची ती पट संख्या आहे आणि आता आपली प्रवेश प्रक्रिया झाल्या नंतर प्रवेश वाढले आहेत त्याच्यामुळे आताच्या मागणी नंतर आताची टेंडरींग तसे केले.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** त्यांच्या तक्रारीमध्ये असे म्हणणे होते की, ५२४४ तुमचे विद्यार्थी होते, अगोदरचे कमी होते आणि नंतर जास्त कसे काय झाले? मग ते मला संभ्रम झाला. मी त्यांना अर्जेंट बोलावून घेतले मला अशी तक्रार आली आणि स्थायी समितीची पहीलीच बैठक आहे, साहेब, ज्या वेळेला टेंडर कॉल केला, त्या वेळेला तेवढी संख्या आपल्याकडे होती, त्याच्या नंतर ॲडमिशन झाले, आता जी संख्या दिली आहे, ती बरोबर आहे. बरोबर ना.

**लेखापाल, श्रीम. निलिमा कदमः—** होय सर.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** सॅप्पल आपल्या शाळेचा ड्रेस कसा आहे?

**लेखापाल, श्रीम. निलिमा कदम:—** हे कापड आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** सगळयांना दाखवा, क्वालिटी, आहे किंवा नाही सॅम्पल कट करून आम्ही आमच्या फाईलला लावू, उद्या कोणी आरोप केले तर स्थायी समितीने जो सॅप्पल मंजूर केला आहे, तोच घेतला.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** जमनुजी एक कॅडबरी चॉकलेट मागवायला पाहीजे, चिक्की मागवत आहेत. तो पण सॅम्पलवाला.

**महापालिका सचिव:—** पास?

**काही सदस्य :—**पास—पास...... इतिवृत्ताची वाट न पाहता.

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १७ :—** सन २०१८—१९ मध्ये मनपा शाळांतील विदयार्थ्यांना गणवेश पुरवठा करणे.

**प्रस्तावना**

मागिल वर्षाप्रमाणे यावर्षीदेखिल २०१८—१९ मध्ये म.न.पा. शाळांतील विदयार्थ्यांना गणवेश पूरवठा करणे नियोजित आहे. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि.१७/०३/२०१८ रोजीच्या मान्यतेने सदर गणवेश खरेदीची निविदा ई—टेंडरींगव्दारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करून ई—टेंडरींग पध्दतीने इंटरनेटव्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

तद्नंतर दि. २५/१०/२०१८ रोजीच्या मा. आयुक्त सो. उल्हासनगर महानगरपालिका यांचे मंजूरीने सदरच्या ई—निविदांचा तांत्रिक लखोटा दि.२६/१०/२०१८ रोजी निविदा समितीसमोर उघडण्यात आला. त्यानुसार Check list तयार करण्यात आलेली असून यामध्ये वर उल्लेखलेले तिनही पुरवठादार पात्र असल्याने उपरोक्त सर्व पात्र निविदाधारकांचे व्यापारी लखोटे दि.३०/१०/२०१८ उघडण्यात आले. सदर व्यापारी लखोटयांमध्ये नमूद केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पूरवठादारनिहाय खालीलप्रमाणे तयार करण्यात आला आहे.

| अ. क्र. | तपशिल | इयत्ता | नग | मेसर्स जी.एस्.एन्. असोसिएटस | | मेसर्स ऑनेस्टी सायन्टीफिक कंपनी | | मेसर्स अंकूर एंटरप्रायझेस | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दर | एकूण | दर | एकूण | दर | एकूण |
| 1 | Boys | PP | 575 | 536.00 | 308200.00 | 588.00 | 335160.00 | 577.50 | 329175.00 |
| 2 | Boys | 1st | 689 | 552.25 | 380500.25 | 603.75 | 414172.50 | 577.50 | 396165.00 |
| 3 | Boys | 2nd | 720 | 578.50 | 416520.00 | 619.50 | 431172.00 | 640.50 | 445788.00 |
| 4 | Boys | 3rd | 732 | 610.00 | 446520.00 | 635.25 | 457180.00 | 640.50 | 461160.00 |
| 5 | Boys | 4th | 762 | 856.75 | 652843.50 | 918.75 | 690900.00 | 924.00 | 694848.00 |
| 6 | Boys | 5th | 852 | 893.00 | 760836.00 | 934.50 | 775635.00 | 924.00 | 766920.00 |
| 7 | Boys | 6th | 826 | 909.25 | 751040.50 | 950.25 | 784906.50 | 976.50 | 806589.00 |
| 8 | Boys | 7th | 772 | 905.50 | 699046.00 | 966.00 | 743820.00 | 976.50 | 751905.00 |
| 9 | Girls | PP | 575 | 542.25 | 311793.75 | 614.25 | 380835.00 | 624.75 | 387345.00 |
| 10 | Girls | 1st | 689 | 569.55 | 392419.95 | 630.00 | 464940.00 | 624.75 | 461065.50 |
| 11 | Girls | 2nd | 720 | 600.00 | 432000.00 | 645.75 | 485604.00 | 677.25 | 509292.00 |
| 12 | Girls | 3rd | 732 | 616.25 | 451095.00 | 661.50 | 549045.00 | 677.25 | 562117.50 |
| 13 | Girls | 4th | 762 | 895.00 | 681990.00 | 966.00 | 741888.00 | 997.50 | 766080.00 |
| 14 | Girls | 5th | 852 | 921.25 | 784905.00 | 981.75 | 742203.00 | 997.50 | 754110.00 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 15 | Girls | 6th | 826 | 927.00 | 765702.00 | 997.50 | 913710.00 | 1050.00 | 961800.00 |
| 16 | Girls | 7th | 772 | 957.50 | 739190.00 | 1013.25 | 847077.00 | 1050.00 | 877800.00 |
| Grand Total | | | | | 8974602.00 | | 9758448.00 | | 9932160.00 |

उपरोक्त सर्व निविदाधारकांनी सादर केलेल्या दरांच्या तुलनात्मक तत्क्यानुसार मेसर्स जी.एस्.एन्. यांनी सादर केलेले दर हे सर्वात न्युनतम आहेत. परंतू तरीही सदर निविदाधारकाने सादर केलेले दर जास्त वाटत असल्याने सदर निविदाधारकास वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले होते. सदर वाटाघाटीअंती निविदाधारकाने खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| अ. क्र. | तपशिल | इयत्ता | नग | मेसर्स जी.एस्.एन्. असोसिएटस | | वाटाघाटीअंतीचे दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दर | एकूण | दर | एकूण |
| 1 | Boys | PP | 575 | 536.00 | 308200.00 | 526.00 | 302450.00 |
| 2 | Boys | 1st | 689 | 552.25 | 380500.25 | 532.25 | 366720.25 |
| 3 | Boys | 2nd | 720 | 578.50 | 416520.00 | 558.50 | 402120.00 |
| 4 | Boys | 3rd | 732 | 610.00 | 446520.00 | 590.00 | 431880.00 |
| 5 | Boys | 4th | 762 | 856.75 | 652843.50 | 836.75 | 637603.50 |
| 6 | Boys | 5th | 852 | 893.00 | 760836.00 | 873.00 | 743796.00 |
| 7 | Boys | 6th | 826 | 909.25 | 751040.50 | 889.25 | 734520.50 |
| 8 | Boys | 7th | 772 | 905.50 | 699046.00 | 885.50 | 683606.00 |
| 9 | Girls | PP | 575 | 542.25 | 311793.75 | 522.25 | 300293.25 |
| 10 | Girls | 1st | 689 | 569.55 | 392419.95 | 549.55 | 378639.95 |
| 11 | Girls | 2nd | 720 | 600.00 | 432000.00 | 580.00 | 417600.00 |
| 12 | Girls | 3rd | 732 | 616.25 | 451095.00 | 596.25 | 436455.00 |
| 13 | Girls | 4th | 762 | 895.00 | 681990.00 | 875.00 | 666750.00 |
| 14 | Girls | 5th | 852 | 921.25 | 784905.00 | 901.25 | 767865.00 |
| 15 | Girls | 6th | 826 | 927.00 | 765702.00 | 907.00 | 749182.00 |
| 16 | Girls | 7th | 772 | 957.50 | 739190.00 | 937.50 | 723750.00 |
| Grand Total | | | | | 8974602.00 | | 8743232.00 |

उपरोक्त दरानुसार प्रति विदयार्थी ०२ गणवेश ५९२८ विद्यार्थ्यांसाठी खरेदी करणेसाठी एकूण खर्च रू.८७४३२३२/— अपेक्षित आहे. मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या आर्थिक अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार सदर खर्च 'मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश पुरविणे' या लेखाशिर्षकाअंतर्गत असलेल्या रू.१कोटी या निधीतून भागविता येवू शकतो.

तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर सन २०१८—१९ मध्ये म.न.पा. शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदी करणेसाठी मेसर्स जी.एस.एन. असोसिएटस् यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.५५** **दिनांकः— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २०१८—१९ मध्ये मनपा शाळांतील विदयार्थ्यांना गणवेश पुरवठा करणेकामी मेसर्स जी.एस.एन. असोसिएटस् यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १८ :—** सन २०१८—१९ मध्ये मनपा शाळांतील विदयार्थ्यांना चिक्की पुरवठा करणे.

---

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** ही काय चिक्की आहे?

**लेखापाल, श्रीम. निलिमा कदम:—** होय सर.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** स्कुल बोर्डाचे सॅप्पल मागवतात, बाकीचे सॅम्पल मागवत नाहीत.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** आता आपल्याकडे ही प्लास्टीकची थैली आली आहे, प्लास्टीक बंद आहे, त्याच्या नंतर सुध्दा पिशवी आली आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** चिक्की किती मागवतो? कसे देतात?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** इतिवृत्ताची वाट न पहाता दोन्ही पास...पास...

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** क्वाटींटी किती?

**लेखापाल, श्रीम. निलिमा कदम:—** क्वांटीटी जेवढी, खरे तर कसे असते सर विद्यार्थी संख्या जेवढी असते, तेवढी येते आणि त्याच्या नंतर उपस्थितीनुसार वाटप केले जाते, दुस—या दिवशी उरलेले ती चिक्की ठेकेदार परत घेऊन जातो.

**सदस्य, श्री. राजेश वदारिया:—** मॅडम हे प्लॅस्टीक युज व्हायला नाही पाहीजे, त्याची खात्री घ्या.

**लेखापाल, श्रीम. निलिमा कदम:—** होय, होय.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** एका विद्यार्थ्याला किती देतात?

**लेखापाल, श्रीम. निलिमा कदम:—** एक चिक्की.

**महापालिका सचिव:—** मिटींगचे विषय संपले आहेत.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १८ :—** सन २०१८—१९ मध्ये मनपा शाळांतील विदयार्थ्यांना चिक्की पुरवठा करणे.

**प्रस्तावना**

मागिल वर्षाप्रमाणे यावर्षीदेखिल २०१८—१९ मध्ये म.न.पा. शाळांतील विदयार्थ्यांना चिक्की पूरवठा करणे नियोजित आहे. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांच्या दि.१७/०३/२०१८ रोजीच्या मान्यतेने सदर

चिक्की खरेदीची निविदा ई—टेंडरींगव्दारे प्रसिध्द करून जाहीर निविदा सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालिकेच्या वेब साइटवर ई—निविदा सुचना प्रसिध्द करून ई—टेंडरींग पध्दतीने इंटरनेटव्दारे निविदा मागविण्यात आल्या होत्या.

तद्नंतर दि. २५/१०/२०१८ रोजीच्या मा. आयुक्त सो. उल्हासनगर महानगरपालिका यांचे मंजूरीने सदरच्या ई—निविदांचा तांत्रिक लखोटा दि.२६/१०/२०१८ रोजी निविदा समितीसमोर उघडण्यात आला. त्यानुसार Check list तयार करण्यात आलेली असून यामध्ये वर उल्लेखलेले तिनही पुरवठादार पात्र असल्याने उपरोक्त सर्व पात्र निविदाधारकांचे व्यापारी लखोटे दि.३०/१०/२०१८ उघडण्यात आले. सदर व्यापारी लखोटयांमध्ये नमूद केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पूरवठादारनिहाय खालीलप्रमाणे तयार करण्यात आला आहे.

| अ. क्र. | तपशिल | नग | मेसर्स जी.एस्.एन्. असोसिएटस | | मेसर्स मानसी महिला संस्था | | मेसर्स अंकूर एंटरप्रायझेस | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दर | एकूण | दर | एकूण | दर | एकूण |
| 1 | Peanut Chikki | 93860 | 15.60 | 1464216.00 | 16.25 | 1525225.00 | 16.99 | 1594681.40 |
| 2 | Crushed Peanut Chikki | 93860 | 15.60 | 1464216.00 | 16.25 | 1525225.00 | 16.99 | 1594681.40 |
| 3 | Coconut Peanut Chikki | 93860 | 15.60 | 1464216.00 | 16.25 | 1525225.00 | 16.99 | 1594681.40 |
| 4 | Til Chikki | 93860 | 15.60 | 1464216.00 | 16.25 | 1525225.00 | 16.99 | 1594681.40 |
| 5 | 3 in 1 Chikki | 93860 | 15.60 | 1464216.00 | 16.25 | 1525225.00 | 16.99 | 1594681.40 |
| 6 | Til Peanut Chikki | 93860 | 15.60 | 1464216.00 | 16.25 | 1525225.00 | 16.99 | 1594681.40 |
| Grand Total | | | | 8785296.00 | | 9151350.00 | | 9568088.40 |

उपरोक्त सर्व निविदाधारकांनी सादर केलेल्या दरांच्या तुलनात्मक तत्क्यानुसार मेसर्स जी.एस्.एन्. यांनी सादर केलेले दर हे सर्वात न्युनतम आहेत. परंतू तरी सदरचे दर जास्त वाटत असल्याने सदर निविदाधारकास वाटाघाटीसाठी बोलविण्यात आल्यानंतर निविदाकाराने वाटाघाटीअंती सादर केलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | तपशिल | नग | मेसर्स जी.एस्.एन्. असोसिएटस | | वाटाघाटीअंतीचे दर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | दर | एकूण | दर | एकूण |
| 1 | Peanut Chikki | 93860 | 15.60 | 1464216.00 | 15.00 | 1407900.00 |
| 2 | Crushed Peanut Chikki | 93860 | 15.60 | 1464216.00 | 15.00 | 1407900.00 |
| 3 | Coconut Peanut Chikki | 93860 | 15.60 | 1464216.00 | 15.00 | 1407900.00 |
| 4 | Til Chikki | 93860 | 15.60 | 1464216.00 | 15.00 | 1407900.00 |
| 5 | 3 in 1 Chikki | 93860 | 15.60 | 1464216.00 | 15.00 | 1407900.00 |
| 6 | Til Peanut Chikki | 93860 | 15.60 | 1464216.00 | 15.00 | 1407900.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Grand Total | | 8785296.00 | | 8447400.00 |

(कृ.मा.प)

उपरोक्तप्रमाणे सदर वाटाघाटीअंती सदर निविदाधारकाने सादर केलेल्या दरानुसार चिक्की ५९२८ विद्यार्थ्यांसाठी खरेदी करणेसाठी एकूण खर्च रू.८४४७४००/— अपेक्षित आहे. मा. स्थायी समितीने मंजूर केलेल्या आर्थिक अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार सदर खर्च 'मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना पूरक पोषण आहार (चिक्की) पुरविणे' या लेखाशिर्षकाअंतर्गत असलेल्या रू.४कोटी या निधीतून भागविता येवू शकतो.

तरी सदरच्या खर्चास व तसेच सदर सन २०१८—१९ मध्ये म.न.पा. शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी चिक्की खरेदी करणेसाठी मेसर्स जी.एस.एन. असोसिएटस् यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) अन्वये मा. स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.५६** **दिनांकः— ०२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार सन २०१८—१९ मध्ये मनपा शाळांतील विदयार्थ्यांना चिक्की पुरवठा करणेकामी मेसर्स जी.एस.एन. असोसिएटस यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी २.४५ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

.

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २२/१२/२०१८

**दि.२२/१२/२०१८ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती**

**सभेचे इतिवृत्त.**

९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक २२/११/२०१८ रोजी १२.३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ५ | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| ६ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ७ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |
| ९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १० | श्री. भगवान भालेराव | सदस्य |
| ११ | श्रीमती मिनाकौर लबाना | सदस्या |
| १२ | श्रीमती रेखा ठाकुर | सदस्या |
| १३ | श्रीमती दिप्ती दुधानी | सदस्या |
| १४ | श्रीमती ज्योती बठिजा | सदस्या |
| १५ | श्रीमती अंजना म्हस्के | सदस्या |

तर,
श्री. राजेंद्र शांतराम चौधरी हे सदस्य अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१५९. श्री. अच्युत हांगे, आयुक्त
१६०. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१६१. श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय
१६२. श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
१६३. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
१६४. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
१६५. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता, साबांवि
१६६. श्री. हनुमंत खरात, प्र. कार्यकारी अभियंता, विद्युत
१६७. श्री. सोनवणे, उप अभियंता, पाणी पुरवठा
१६८. श्री. अश्वीनी अहुजा, उप अभियंता, साबांवि
१६९. श्री. संदिप जाधव, क. अभियंता, साबांवि
१७०. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१७१. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१७२. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१७३. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त?
१७४. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी

१७५. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१७६. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख
१७७. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१७८. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
१७९. श्री. केशव हंबीर, लिपिक, भांडार विभाग
१८०. श्री. मनोज भोईर, लिपिक, नासुके

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्री. बाळु भांगरे
३. श्री. संतोष कोठरे

दुपारी १२.४५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. १ :—** प्रभाग क्र. १६ उल्हासनगर-५ येथील न्यु इंग्लिश स्कुल ते निजधाम आश्रम पर्यंत एम ३५० ने सिमेंट रस्ता व नाली बनविणेचे कामाची ई निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणे.

---

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** विषय सुरू करण्यापूर्वी आयुक्त, श्री. अच्युत हांगे साहेब एक गोष्ट निदर्शनास आणू इच्छितो, दोन दिवसापूर्वी काहीतरी आपल्या प्रभाग अधिका—याच्या संदर्भात एक अनधिकृत बांधकाम संदर्भात काहीतरी दाखल झाले शिवीगाळी झाली का मारामारी त्याच्यासंदर्भात काही गुन्हा दाखल झाला तो विषय एक वेगळा आहे. पण जे कर्मचारी महानगरपालिकेच्या आणि आपल्या अधिपत्याखाली काम करतात, त्यांना भाषा सुधारण्याची जरा आवश्यकता आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** सभापती महोदय, सभेत आलेल्या विषयावरती चर्चा व्हावी आणि भालेराव साहेब म्हणतात तो विषय आपण शेवटी घेऊ. आपल्या विषयावर चर्चा होवू दया ना. तुमचा विषय घ्या, पण माझी विनंती आपल्याला की विषय असा

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** साहेब मी विषय अशासाठी घेत होतो.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** नाही, घ्या ना पण आगोदर अजेंडातले विषय होवू दया. नंतर तुमचा विषय घ्या अशी माझी विनंती आहे.

**महापालिका सचिव :—** विषय वाचलेला आहे.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** हया विषयाचा खुलासा कोण देणार.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** शितलानी खुलासा दया.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—** हे आपल्या बजेट कन्ट्रोल मध्ये चालीया साहेब मंदीरासाठी रू. १० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. जसे की हा रस्ता चालीया साहेब मंदीराकडे जात आहेत.त्या फंडातून आम्ही हा प्रस्ताव केलेला आहे. आणि हा रस्ता १२० फुट पर्यंत केलेला आहे. न्यु इग्लिीश स्कुल पासून ते निजधाम आश्रम पर्यंत.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** कशामधून घेतला आहे?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता**:— जनरल बॉडी मध्ये चालीए साहेब साठी रू.१० कोटीची तरतूद केलेली आहे. चालीया साहेब मंदीरासाठी.

**सदस्य श्री.दिपक सिरवानी :—** आमचे सिंधी समाजाचे इन्स्टिटयुट आहे. यामध्ये सर्व समाजाचे लोक येत असतात.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—** यामध्ये डेव्हलपमेंट ऑफ चालीया साहेब मंदीर फंडामध्ये रू.१० कोटी आहेत तर हा रस्ता तिकडेच जात असल्यामुळे पहिले जे आयुक्त, श्री.

अच्युत हांगे साहेब होते त्यांना व्यक्तीगत आम्ही भेटी दिलेल्या असून साहेबांनी सांगितले होते की या फंडातून हा रस्ता बनविण्याचा प्रस्ताव आणा.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानीः—** हा जो विषय आहे, आपल्याला धन्यवाद दयायला पाहिजे आणि मा. आयुक्त, श्री. अच्युत हांगे साहेब आणि सर्वांना, हे झुलेलाल मंदीर जे आहे, जेव्हा भारताचे विभाजन झाले आणि सिंध प्रातातील लोक इकडे येवून वस्ती झाली हे एक फार मोठे तिर्थस्थळ जे उल्हासनगर मध्ये पूर्ण भारतातील लोकं या तिर्थस्थळावर येत असतात. आणि महाराष्ट्र शासनाने सुध्दा याला तिर्थस्थळ म्हणून घोषीत केलेले आहे. तर हा रोड काही दिवसापासून काही ना काहीतरी कारणासाठी राहून जात होता परंतु मी मा. आयुक्त, श्री. अच्युत हांगे जी यांना पहिले हया रोड कडे लक्ष केंद्रीत करून आमचे शहर अभियंता यांना आणि सर्व सा.बा.विभागाचे जे इंजिनिअर आहेत ज्यांनी या रोडचे एस्टीमेंट बनविले त्याना धन्यवाद देत आहे.आणि याचे लवकरात लवकर टेंडर काढण्यात यावे आणि हे काम जेवढया लवकर सुरू करण्यात यावे आणि नविन वर्षात हे झुलेलाल पर्व हे तिर्थस्थळ आहे जे आपण साजरा करतो, तोपर्यत हा रोड तयार करण्यात यावा आणि चालीया मेळा जो लागेल ज्याठिकाणी लाखो भविक येत असतात, तर ६ ते७ महिन्याच्या आत हा रोड बनविला गेला पाहिजे.

**सदस्य,श्री.भगवान भालेरावः—** सन्मानीय सभापती महोदय आणि आयुक्त, श्री. अच्युत हांगे साहेब, शहर अभियंता आपण मला सांगा की हा जो रस्ता आपण घेतला आहे, हा आपल्या नविन डीपी मध्ये रिंग रोड आहे का?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता**:— नविन डीपी नुसार १२० फुट आहे परंतु आपले जुने आयुक्त, श्री. अच्युत हांगे साहेब साइट विजीट साठी आले होते तेव्हा सांगितले की सद्यस्थितीत हा १०० फुटांचा रस्ता आहे तर लोकांना त्रास होवू नये म्हणून आणि आपला फंड सुध्दा रू. १० कोटीआहे त्याला १२० कोटी केले तर फंड त्याला जास्त लागेल. म्हणून सद्यस्थितीत त्याला सिमेंटचा रस्ता त्यामध्ये लाईटची तरतूद, ड्रेनेजची तरतूद करून बनविण्यात यावा.

**सदस्य,श्री.भगवान भालेरावः— वि**षेश तिकडे रिगरोडची संकल्पना आम्ही महानगरपालिकेमध्ये रदद् केलेली आहे. रिंगरोड घ्यायचेच नाही.आणि इकडे रिगंरोडच्या नावाखाली १२० फुटावरून १०० फुटावर आणायचे....

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—** नाही रिंगरोडचे कुठे उल्लेख आहे इकडे.

**सदस्य,श्री.भगवान भालेरावः—** मी बोलतो, मला बोलू दया नंतर आपण सांगा ना. ही सभा आपण बोलाल तोपर्यत चालेल. आपण मला एक सांगा हा जो रस्ता आहे, चालीया मंदीर पासून हे जे आश्रम आहे आणि आपण हा जो रस्ता सांगितला न्यु इंग्लिश स्कुल, याचे अंतर किती आहे. आपण सांगा.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—** ज्या ठिकाणी रस्ता संपतो...

**सदस्य,श्री.भगवान भालेरावः—** त्यापासून अंतर किती?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—** अंतर ३०० ते ३५० मीटर आहे.

**सदस्य,श्री.भगवान भालेरावः—** त्या मधल्या रस्त्याचे काय?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—** साहेब, मधल्या रस्त्याचे साहेबांनी सांगितल्यानुसार प्रोव्हीजन करून परंतु आपल्याकडे तरतूद ही १० कोटीची आहे. त्याप्रमाणे आम्ही घेतले आहे.

**सदस्य,श्री.धनंजय बोडारेः—** एक मिनेट, बजेट काय आहे? चालीया साहेब तिर्थस्थळ विकसित करणे, तो चालीया साहेब तिर्थस्थळ मध्ये रोड येत आहे. त्या रोडची व्याख्या कोणती आहे. नेताजी पासून का नाही घेण्यात आला. चालीया साहेब मंदीराकडे जाणारा एकच रस्ता नाही आहे.

**सदस्य,श्री.भारत राजवानीः—** शहराची सुरूवात होत आहे वेलकम टू उल्हासनगर.

**सदस्य,श्री.धनंजय बोडारेः—** ५ नंबरचा रस्ता अंबरनाथ वरून येत आहे, इकडे कुर्ला कॅम्प वरून येत आहे. हा रोड का घेतला? तिर्थस्थळ नावाने जर फंड आहे, त्याच्यात फंडाचे रिअॅप्रोप्रीएशन केले पाहिजे. कारण फंड आहे तिर्थस्थळ विकसित करणे , आपण वापरतो रोडसाठी, तर हा बनाव आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** त्याच्यामधून पण रोड रस्ते नाल्या हे सगळे येईल.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव**:— ३००मीटरच्या लांब तिर्थस्थळ आहे. साहेब आमचे म्हणणे एकच आहे, महानगरपालिका इथे आहेआणि आपण १७ सेक्शनमध्ये महानगरपालिका बोलून राहाल का? इथच यावे लागेल ना.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** मी विचारत आहे. ३०० मीटर आपण सोडलेले आहे ते तर अगोदरच सिमेंट ब्लाकचे विकसित आहे. आणि शासनाकडून आपलयाला २५ करोड फंड येणार आहे.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—**हे पण विकसित आहे. रोडवरती एक खडडा नाही आहे, दुसरा चालीया.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** आताही तुम्ही तपासणी करू शकता आणि हा रस्ता जो घेतला आहे त्याला खडड् असले, उल्हासनगर शहराच्या हिशोबाने याला जर खडडे असतील तर रस्ता घ्या. नसतील खडडे तर रस्ता रद्द करा. चालीया साहेब ज्याच वार्ड आहे, चालीया साहेब मंदीर हे १७ नंबर प्रभाग आणि १९ नंबर प्रभागाच्या बाजूला येते.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** नाही पूर्ण १७ प्रभागामध्ये येते. बाजूला आहे.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** तर तो वार्ड १६ नंबर प्रभाग हा चालीया मंदीरापासून त्या ३०० ते ४०० मीटरपासून लांब आहे. तिथून रस्ता आवश्यक आहे. मग १६ नंबर प्रभागाची लोक जातात तिथे नाही.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** प्रभाग १६ मध्ये नाही आहे.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** कोणाचा आहे १६ आहे पूर्ण

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** याचा तुकडा प्रभाग १७ मध्ये सुध्दा येत आहे.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** काहीच`येत नाही का?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—** वार्ड नं. १६ मध्ये येत आहे.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** पूर्ण

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—** निजधाम आश्रम पर्यंत आहे

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** वार्ड नंबर १७ मध्ये सुध्दा संपतो.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—** साहेब मी आयुक्त, श्री. अच्युत हांगे साहेबाची पर्सनली विजीट.....

**सदस्य,श्री.भगवान भालेराव**:— साहेब एक मिनीट

**सदस्या श्रीमती रेखा ठाकुर:—** सर याविषयावरती मी बोलू इच्छिते की न्यु इग्लिंश आणि नेताजी स्कुल जसे आमचे नगरसेवक बोलत आहेत की त्याठिकाणी खडडे नाही आहेत पण मी रोज नेताजी शाळेत बसत असते. तर भरपूर प्रमाणात खेडडे आणि ड्रेनेजचा अडचणी आहेत.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—** मॅडम एक मिनीट, साहेब मला आता या महानगरपालिकेत आयुक्त पदाचा कार्यभार घेवून दोन महिने पण पूर्ण झालेले नाहीत, आता दहा तारखेला दोन महिने पूर्ण होतील. हे मला वाटत, मला वाटत यापूर्वीचे आयुक्त, श्री. गणेश पाटील होते त्यांनी विजीट केलेली आहे आणि ही फाईल त्यांनी मंजूर केलेली होती. मंजूर केल्यामंळे मी ती प्रस्तावना आपल्या स्थायी समितीकडे पाठवली आहे. जर आपल्याला काय याच्यामध्ये काही संभ्रम वाटत असेल तर आपण स्थायी समिती सभापती,सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते, मा. महापौर यांच्या दालनामध्ये बसून आपण ठरवावे कोणते रोड घ्यायचये आहेत. त्यासाठी भांडण करायची काय गरज आहे. तूम्हाला जे घ्यायचे आहेत ते म्हणजे मी...महापौराकडे बसा, सगळे चर्चा करा आणि निर्णय आम्हाला सांगा. हे हे घ्यायचे आहेत संपला विषय.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** एकच रस्ता घेण्यापेक्षा सगळया रस्त्याबाबत चर्चा होवू दया, तो पर्यंत हा रस्ता पेडींग राहू दया.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—** अत्यावश्यक आहेत ते घ्या ना.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** दुसरी गोष्ट अशी आहे की हा निधी चालीया मंदीराचा.चालीया मंदीराच्या बाजूला जे करायचे असेल ते आजूबाजूचे रस्ते असतील त्यात हे काम करून टाका.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—** हा विषय, दोन चार रस्ते आहेत ते पेडींग ठेवून पुढच्या स्थायी समिती सभेत घेवू. आपण मा. महापौर

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** आयुक्त साहेब, एक मिनीट.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** हे विषय मा. आयुक्त, हा विषय सभागृहाचा विषय आहे. सभागृह निर्णय घेणार. हा विषय करणे अतिआवश्यक आहे. मी हया गोष्टीचा विरोध करत आहे.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** जमनुजी, आपण विरोध करा आम्ही ही विरोध करणार आहेत. आयुक्त साहेब, चालीया मंदीर चे सभोवतालचे रस्ते बोटलनेक चे रस्ते जे अतिआवश्यकता आहे ते रोड डीपी च्या हिशेबाने बनवावे. त्याचा प्रस्ताव मी जून मध्ये दिलेला आहे. तो अजून घेतलेला नाही आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—** माझे हेच म्हणणे आहे.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** आपण बघून घ्यावे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** एक मिनीट चालीया साहेब मंदीर आम्हाला विकसित करायचे नाही असे बोला.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** आपण सांगा नाही.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**आपल्याला चालीया साहेब मंदीराचे कामच कराचे नाही आहे. पूर्ण निधी आपल्याला रोडच्या कामासाठी खर्च करायचा आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** माझी सभागृहाला विनंती आहे सभापती महोदय, की वाद इथे घलण्यापेक्षा की बघा आठ दिवस उशीराच होईल ना याच्यापेक्षा अजून काय होईल. नाही करा जास्त उशीर नाही होणार. माझे म्हणणे आहे वादग्रस्त विषयाचे महापौरांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेवून तूम्ही ठरवना.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** हे वादग्रस्त नाही आहे.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—या**मध्ये प्रस्तावात काय दिले आहे की स्थानिक नगरसेवक.स्थानिक नगरसेवकांची सिमा ३५० मीटर लांब आहे.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** त्याचे तिथेच दुरूस्ती करणार.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** दुरूस्ती करणार म्हणजेच आपण मनमानी करणार.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** जमनुजी एक गोष्ट आहे, साहेब तुम्ही आता एक गोष्ट सांगा आपण जो बजेट केला आहे. तो ॲक्चूअल बजेट तुमचा नंतर स्थायी समितीचा आणि नंतर महासभेचा तुमच्या ॲक्चूअल बजेट हा विषय आहे का त्याच्यात हे त्यांनी सांगावे.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** हे असे होत नाही.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** त्याच्यामध्ये किती रक्कमेची तरतूद आहे.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** मा. आयुक्त, जेव्हा आपण बजेट बनवतो स्थायी समिती मान्यतेनंतर तिथे आपला बजेट संपून जातो. अंतिम बजेट महासभेचा असतो तर आम्ही पुन्हा पुन्हा बोलणार का? परत नगरसेवक निधी मा. आयुक्त यांनी रू.२ लाख दिला होता, स्थायी समितीने रू. १२ते १५ लाख केले महासभेने रू.२५ लाख केले तर कोणाला मान्य करणार दोन लाखाला मागणार का २५ लाख मागणार. तसे तर नगरसेवक निधी किंवा प्रभाग समिती निधी कोणीही मागू नका. आयुक्त यांनी बजेट दिला होता त्यामध्ये नगरसेवक निधी आणि स्थायी समिती निधी यामध्ये सर्व निधी शुन्य होता.

**सदस्य श्री.धनंजय बोडारे:—** जमनुजी, एक मिनीट बजेट कशासाठी, चालीया साहेब विकसीत करण्यासाठी याच्यापूढे स्थायी समिती ठरवेल की चालीया साहेब वरती एक रूपया सुध्दा खर्च नाही आहे.

**सदस्य श्री दिपक सिरवानी:—या**नंतर नविन बजेटमध्ये सुध्दा येईल ना. आता जो विषय आला तो आपण केला पाहिजे. ३५० मीटरचा जो विषय आहे तो पूढच्या बजेटमध्ये ठेवून त्यावर चर्चा करू.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** चालीया साहेब चे आजूबाजूचा भाग आहे त्याच्यावर खर्च करा. पहिले सभोवतालचा परीसर तर चांगल्या प्रकारे बनवा.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—**मा. आयुक्त, श्री. अच्युत हांगे जी जेव्हा चालीयाची जत्रा भरते तेव्हा त्या जत्रेत लाखोंच्या संख्येत लोकं उभी राहतात, त्याठिकाणी आम्ही पार्कींग लावतो वाहने उभी राहतात त्यानंतर लोक तिथून पायी जात असतात हा तो पूर्ण रोड आहे याच रोडवरती शिवसेना मार्फत बसेस उभ्या राहतात, लोकाना घरोघरी पोहचविण्यात येते, आणि हे सर्व हयाच ठिकाणी केले जाते. याच रोडवरून लोक जात येत असतात. माझी आपणास विनंती आहे की मंजूर करण्यात यावा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** जमनुजी आशेळे गावापासून

**सदस्य,श्रीभगवान भालेराव:—** मंदीर ३५० मीटर लांब आहे.

**सदस्यश्री दिपक सिरवानी:—** भालेरावजी पुढच्या बजेट मध्ये येईल ना.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** नाही, नाही, चालीया साहेब मंदीर चे सभेवतालचे जे रस्ते आहेत ते एक पण रस्ता डीपी नुसार घेण्यात आलेला नाही. एक गाडी, कार गेली तरी समस्या होते.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—** महापौर मॅडमच्या दालनात बसून चर्चा करून नंतर ठरवा काय करायचे ते. माझी अशी सूचना आहे मी हया ठरावाला मंजूरी देत आहे.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** ठिक आहे, मान्यता देत आहे.

**सदस्यश्री दिपक सिरवानी:—** मतदान घ्या.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—**बोडरे साहेब, आपण विरोधी पक्ष नेता आहेत आपण फार वर्षापासून उल्हासनगर४ व ५ चे प्रतिनिधीत्व करत आहात, हा विषय फार काही नाही आहे. हे सर्व रोड बनले पाहिजे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे**:— याच्या आगोदर देखील जे पण आयुक्त होते ,महापौर होते, जर शहरातील मोठ मोठे रस्ते घ्यावयाचे होते तर सगळयाना विश्वासात घेणे गरजेचे होते. आपण आपल्यापध्दतीने घेत आहेत, आपल्याला शहराचे कामे करून चालावायचे आहे. विरोधी पक्ष नेता, गटनेता सगळयांना बोलावून सभा घेवून सर्वांना आत्मविश्वासात घेतले असते.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** जमनुजी, चालीया साहेब विकासाठी जर सिरीअस असते तर पहिली तिथली परिस्थिती समजून घ्यायला पाहिजे. या ठिकाणचे आम्ही स्थानिक आहेत.

**सदस्य,श्री.राजेश वदारिया:—** आम्ही सुध्दा बोडारे साहेबांच्या म्हणण्याशी सहमत आहे. की जे मोठे निर्णय घ्यावयाचे असतात तर ते सर्वांना एक्त्र घेवून करावे. की कसे आपण एकत्र राहून जसे की हा रोड असेल किंवा सोबत दोन रोड असतील तर काही अडचण होणार नाही. अजून चार रोड असले पाहिजेत. हा रोड होवून अजून चार रोड झाले पाहिजेत.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** दोन दिवसानंतर ठेवा.

**सदस्य,श्री.राजेश वदारिया:—** महापौरांकडे उदयाच मीटींग ठेवा. नाही तर आज ठेवा , सध्याकाळी ४.०० वाजता ठेवा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** यामध्ये सर्वांना एकत्र घ्यायचे आहे किंवा नाही. शहर विकास करायचा आहे की व्यक्तीगत.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** हा विषय जो आज आलेला आहे आपण जसे बोलता ना हा विषय वाचल्यानंतर मला माहिती झाली आहे. आपण सांगत असाल की कोणाकोणाला घेतले आहे. उपमहापौरजी यांनी पत्र दिलेले आहे आणि मा. महापौरजी यांनी दिलेले आहे. दुसरे कोणी नगरसेवक किंवा वार्डचे नाही आहे.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** चालीया साहेब साठी जर आपण सिरीयस असाल तर आपण स्वत: सुध्दा फिरलेले आहेत की सभोवतालचे परीसरातील किती रस्ते आहेत. कोणते रस्तें खराब आहेत, दहा फुटाचे रस्ते आहेत तिथे आपण विचार करीत नाही.

**सदस्यश्री दिपक सिरवानी:—** ते पण घेणार.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** वधारीया साहेबांनी सांगितले तसे करा. याबरोबर अजून काही रोड आणणार. माणेरे वाला रोड आहे उल्हासनगर १,२,३,४ ला जाण्यासाठी तिथूनच जावे लागते.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** आम्ही पत्र दिलेले आहे त्याचे अजून काहीच झाले नाही.

**सदस्यश्री दिपक सिरवानी:—** शहर विकासासाठी आपण आणि आम्ही कटीबध्द आहेत.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** मध्येच सोडून दयायचे आणि त्याच्यापूढे सुरूवात करायची.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** नाही नाही आज चालीया साहेब या ठिकाणी दहा फुटाचे खडडे आहेत.

**सदस्य,श्री.राजेश वदारिया**:— डीपी आणि नॉन डीपी हे वेगवेगळे अहेत. कुठुन घ्यायचे आणि कुठपर्यंत ही एक वेगळी गोष्ट आहे. परंतु बोडारे साहेब जे बोलले सर्वाचे सहमतानी एक ठिकाणी बसून महापौर, आयुक्त, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता स्थायी समिती सभापती यांनी सर्वानी चर्चा करून निर्णय घ्यावे. कोणता रोड घ्यायचा काय आणि किती घ्यायचे आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** असे जर केले तर चर्चाच होणार नाही. एकाच्या बदल्यात पाच रस्ते होतील, झाला तर शहराचाच विकास होईल ना. आणि दुसरी गोष्ट बजेट एक आणि बघा तुम्ही टेक्नीकली असे पण आहे.रोड त्या इथपर्यंत जातच नाही. निजधाम आश्रम अलिकडे आहे ना. तो सुध्दा

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** ३०० मीटरपेक्षा लांब आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** तो सुध्दा एक टॅक्नीकल प्रॉब्लेम होवू शकतो.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** आणि हे स्थानिक सुध्दा नाही आहे. ज्या ठिकाणचे आम्ही स्थनिक आहोत आम्ही मागणी केली आहे ते वेगळे ठेवण्यात आहे.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** बोडारेजी हे जे आम्ही बोलत आहेत ना, चालीया मंदीर पासून ३०० मीटर दूर आहे किवा २०० मी. दूर आहे. असे होत नाही जेव्हा एक रस्ता मोठा १०० फटांचा रस्ता आपण निर्माण करत आहोत, तर चालीया मंदीर पर्यंतच जणार आहे. त्यानंतर गल्लीमध्ये जाणार.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** जमनुजी हा रोड पण आम्ही एमएमआरडीअे मध्ये दिलेला आहे. आता आवश्यकता कोणती आहे. उल्हासनगर १,२,३ मधील लोक चालीया जातात ते माणेरे रोडवरून जात असतात. पूर्ण ट्रफीक तिथून जात असते.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** हा रोड टाकलेला आहे का?

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** हा रोड टाकलेला आहे तो कधी येणार. मी बोलतो आपल्याला. नेताजी पासून गांधी रोड निजधाम आश्रमव्हाया अंबरनाथ झाला आहे की नाही.जर आपल्याला चालीया कडे जाण्यासाठी लोकांची फिकीर राहीली असती तर हा रोड का नाही घेतला?त्यापेक्षा खराब आहे किती खराब आहे. हा रोड ५० टक्के खराब आहे.

**सदस्य श्री.दिपक सिरवानी:—** हे रोडचे काम चालू होईल.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** टोनीजी, आम्ही कशाामध्ये जास्त इंट्रेस्ट घेतो, शहरासाठी देतो का व्यक्तीगत देतो.

**सदस्य श्री.दिपक सिरवानी:—** एक मिनीट माझे प्रभागातील

**सदस्य श्री. धनंजय बोडारे**:— जर शहरासाठी असेल तर पहिले ते झाले पाहीजे.

**सदस्य श्री.दिपक सिरवानी:—** आपले म्हणणे बरोबर आहे. चालू इथून करा किंवा तिथून करा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** त्यासाठी जर पहिलेच चर्चा महापौर कडे किंवा आयुक्त साहेबांकडे झाली असती किंवा सभागृह नेता यांच्याकडे सगळयांनी मिळून चर्चा केली असती, आणि सर्वाना विश्वासात घेतले असते. तर त्याच्यात चर्चा झाली असती.

**सदस्य श्री.दिपक सिरवानी**:— हा विषय आता आला आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** विषय काय असाच नाही आला.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—** विषय चूकीचा आला याचा अर्थ मंजूर दयायची का? हा विषय चूकीचा आहे.

**सदस्य श्री.दिपक सिरवानी:—** काहीच नाही आहे पीडब्ल्युडी मार्फत आपल्याला गोषवारा आलेला आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी**:—ऐका आपण चालीया साहेब येथे जातात कि नाही,

**सदस्य श्री.दिपक सिरवानी:—** बजेट तेवढाच असेल.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—** टोनीजी मला फक्त ऐवढेच सांगा.

**सदस्य श्री.दिपक सिरवानी:—** मी जातो.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—**त्या ठिकाणचे आपण रस्ते बघितले आहेत का?

**सदस्य श्री.दिपक सिरवानी:—** नगरसेकाने पेपर मध्ये एक जाहीरात दिली होती काय लिहिले होते त्याच्यात, न्यु इग्लिीश स्कुल ते चालीया मंदीर पर्यंत लिहिले होते परंतु बजेटचे जे त्यांनी मार्किंग केले होते, आपला बजेट काढले, तर हे निजधाम चौकापर्यंत येत आहे तर त्याच्यात कोणी नगरसेवकाचे ...नाही आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—**पहिले चालीयापासून सुरूवात करा ना.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** बजेट चालीया मंदीरारचे आहे.

**सदस्य श्री.दिपक सिरवानी:—**माझी खात्री आहे आपण सहकार्य कराल.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** चालीया मंदीरापासून सुरू करा ना.

**सदस्य श्री.दिपक सिरवानी:—**आपल्याला, विरोध कोणत्या गोष्टीचा आहे.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** चालीया मंदीरापासून सुरू झाला पाहिजे. रस्ता बनवू नये असा विरोध नाही.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** ठिक आहेना.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** चालीया मंदीरापासून सुरू करा.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** ते आम्ही दुरूस्ती करून घेतो.चालीया मंदीरापासून सुरू करून जेवढा होईल तेवढा होईल.

**सदस्य श्री.दिपक सिरवानी:—** ठिक आहे.

**सदस्य,श्री.राजेश वदारिया:—** बघा आमचे म्हणणे काय आहे की हापण रस्ता झाला पाहिजे याबरोबर दुसरे सुध्दा रोड झाले पाहिजे. जे दुस—यांचे सुध्दा विचार सुझाव आहेत, बोडारे साहेबांखे काही विचार असतील काही माझे विचार असतील, काही जमनादासजीचे असतील काही भालेराव यांचे असतील, काही टोनीजी चे विचार असतील काही भारतगंगोत्रीजीचे विचार असतील काही रेखा ठाकूर यांचे सुझाव असतील तर सर्वाचे सुझाव विचारात घेतले पाहिजेत. याप्रमाणे सर्वानी मिळून एक कन्सेसन्स तयार करून निर्णय घेतला पाहिजे. आपल्याला कन्सेसन्स घेवून निर्णय घ्यायला पाहिजेत, आणि रोड बनतील ते शहरासाठी असतील. आपण कल्याण अंबरनाथला जावून काम करणारे नाही आहेत. माझा विचार आहे आपण ४.०० वाजता महापौर यांच्याकडे सर्व लोकांनी मिळून बैठक घेवून त्या ठिकाणी चर्चा करावी.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** मिटींग एडजॉन करत आहेत...

**सदस्य,श्री.राजेश वदारिया:—** एडजॉन करा साहेब बरोबर आहे ना. ५.०० वाजेपर्यंत एडजॉन करा ना. ५.०० वाजेपर्यंत मिटींग तहकूब करा. काही अडचण नाही आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** चालेल ना. ५ वाजेपर्यंत एडजॉन करून नविन रोड थेडे येणार आहेत.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** मी बोडारे जी, एक विषय एडजॉन नाही करता येणार पूर्ण मिटींग एडजॉन करावी लागेल किवा एक विषय रद्द होईल.

**सदस्य,श्री.राजेश वदारिया:—**बघा, भरपूर आयडीया असतात याला डिफर करू शकता. ठिक आहे.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** रदद् केले तर नविन सभा घ्यावी.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** नाही , एका विषयाला डिफर करू शकता ना.

**सदस्य,श्री.राजेश वदारिया:—** हया विषयाला डिफर कस्न तीन दिवसानंतर परत घेवू शकता.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी**:— हा विषय जर रदद केला तर हा विषय दहा दिवस तापर्यंत येणार नाही.

**सदस्य,श्री.राजेश वदारिया**:— तीन दिवस लागतील.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** कसे तीन दिवस तर महापालिका बंद आहे. सोमवारी काढले तर आठ दिवसानंतर येणार.

**सदस्य,श्री.राजेश वदारिया:—** सोमवारी काढून बुधवारी सभा ठेवा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** याच्या बरोबर दुसरेही विषय येतील.

**सदस्य,श्री.राजेश वदारिया:—** ऐजेंडा आजच काढा ना.

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** एजेंडा आजच काढा महापौरांना मिळून.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** आम्ही सभपती महोदया यांच्याकडे सोपवत आहे त्यानी आदेश करावे.

**सदस्य श्री.दिपक सिरवानी:—** जमनादासजी मी आपल्या मताशी सहमत आहे की चालीया साहेब पासून सुरू करून जी त्यांनी लांबी घेतलेली असेल तिथपर्यंत घेवून बाकीचे नंतर निर्णय घ्यावा. बाकी हे एडजॉन करा किंवा काय माझा तर विचार नाही.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** मा. आयुक्त साहेब, आमचे सभागृहातील सदस्य भगवान भालेराव यांनी सांगितले की चालीया मंदीराचे आहे तर चालीया मंदीरापासून सूरू झाले पाहीजे, आणि शेवट त्या ठिकाणी झाला पाहीजे त्या साठी आम्ही...

**सदस्य,श्री.भगवान भालेराव:—** ऐस्टीमेट मध्ये बदल होईल ना.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** काही नाही माप तेवढेच आहे ना ऐस्टीमेट मध्ये मापामध्ये बदल होत नाही. इथून सुरू करा किंवा तिथून सुरू करा.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—** पूर्ण बदल होईल.

**सदस्य,श्री. दिपक सिरवानी:—** कसे चेंज होईल.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—**चालीया साहेब च्या काही ठिकाणी ४० फुटाचा रोड आहे.

**सदस्य,श्री.राजेश वदारिया:—** एक मिनीट भरतभई, रोडची लेंथ किती आहे.

**अधिकारी श्री. महेश शितलानी:—** ९०० मीटर आहे.

**सदस्य,श्री.राजेश वदारिया**:— ९०० मीटर आहे.

अधिकारी श्री. महेश शितलानी:— काय होईल सर, आपली लांबी आणि रूंदी वैगेरे बदल होणार नाही. लोकेंशन मध्ये बदल होईल.

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—ए**क मिनीट अतिक्रमण सुध्दा आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** लोकेशन निजधाम आश्रम पासून कैलास कॉलनी पर्यंत असे करू शकता का?

**सदस्य,श्री.भारत राजवानी:—**इन्क्रोचमेंवर पण याच्यामध्ये आहे ना साहेब,

**सदस्यश्री धनंजय बोडारेः—** चालेल ना मग चालीया साहेब पासून केलास कॉलनी पर्यंत असे ही लोकेशन करू शकता.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानीः—** आता पहिली गोष्ट तर मी हे सांगत आहे की हे मान्यतेसाठी आले आहे अजूनपर्यंत टेंडर काढलेला नाही. याचे टेंडर काढायचे आहे. आम्ही जे ठरावामध्ये टाकणार जे हे रोड जमनु पुरस्वनीपासून भगवान भालेराव पर्यंत बनवायचा आहे. तर भगवान भालेराव पासून सुरू करा किवा इथून सुरू करा.

**सदस्य,श्री.भगवान भालेरावः—** असे जर झाले तर आमच्या खेमाणी पासूनचा रस्ता बजरंग आइस फॅक्टरी चा यामध्ये टाका.

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानीः—**असे कसे होणार?

**सदस्य, श्री.भगवान भालेरावः—** याच्यात टाकू शकता तर त्यामध्ये का नाही टाकू शकत.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानीः—**त्याची लेंथ कमी कराना.

**सदस्य, श्री.भगवान भालेरावः—** आपण सांगता हा रस्ता टाका तर हा सुध्दा रस्ता चालेल ना.

**सदस्य श्री धनंजय बोडारेः—**हे बघा जमनुजी चालीया साहेब या ठिकाणी आहे.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी**ः— मा. सभापती महोदया,मी सर्व सदस्याच्या गोष्टीला सहतीने मी सहमत करून जसे की ते बोलत आहेत की चालीया मंदीर नाही आहे. तर आम्ही शहर अभियंता यांना सुध्दा माहिती आहे की हा रोड ३०० मीटर जर कमी आहे. तर ३०० मीटर त्या ठिकाणा पासून सुरू करत आहेत. त्याचे अजून टेडर निघालेले नाही टेंडर निघाल्यानंतरच आम्ही लोकेशन वैगरे बदल करू शकत नाही. टेंडर झाल्यानंतर केले तर टेंडरच बदली होणार. आता तर मान्यता देत आहेत, आपण या रोड ला मान्यता देण्यासाठी....

**सदस्य श्री राजेश वदारिया**ः— आपण एक काम करा मी सांगतो, ३०० मीटर लेंथ वाढवा. हया बजेट मध्ये १० करोड घ्या ३ करोड दुस—या बजेट मध्ये घ्या.

**सदस्य श्री भारत राजवानीः—** राजेश जी हे त्यांचे अेप्रोक्झीमेटली ३००आहे. प्रॉपर ३०० मी. नाही आहे. सीटी इंजिनिअर प्रोपर आहे का?

**सदस्य श्री.भगवान भालेरावः—** प्रॉपर आहे का?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—** काय सर,

**सदस्य श्री.भगवान भालेरावः—** प्रॉपर आहे का? ३०० मीटरच आहे का जास्त आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—** हे तेवढच आहे ना.

**सदस्य श्री. भगवान भालेरावः—** माहिती आहे का.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—** हो माहिती आहे

**सदस्य श्री. भगवान भालेरावः—** चालीया मंदीरपासून जिथे रस्ता संपतो ते अंतर किती आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—**सर एका ना, हे प्रपोजल होते न्यु इग्लिंश पासून ते चालीया साहेब पर्यंत होते. हे एकूण अंतर होते ९००मीटर. आपल्याकडे जे बजेट होते त्याच्या हिशोबाने त्यामध्ये लाईट आणि ड्रेनेजचा खर्च कट करून तेवढी लेंथ आम्ही घेतलेली आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेरावः—** आता आपली किती लेंथ आहे.

**सदस्य श्री भारत राजवानीः—** हे आपले जिथे जूनी लाईट ऑफीस होते.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—** ६०० मीटर.

**सदस्य श्री. भगवान भालेरावः—** अजून ३०० मीटर वाढेल.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—** इथून ३०० मीटर सोडलेले आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेरावः—** अजून ३०० मीटर कमी होईल. तेच पोल येतील का हे असे आपल्याला वाटते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** एक मिनीट भगवानजी, मी आपल्याला एक प्रश्न विचारत आहे, ६०० मीटर साठी आपल्याला रू.१० करोडचा फंड पाहिजे काय आपले एस्टीमेट प्रॉपर आहे?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—** हा प्रॉपर आहे. ६०० मीटर साठी

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** आम्हाला हया गोष्टीवरती शंका येत आहे. की मी तर इंजिनिअर नाही आहे तसेच मी टेक्नीकल सुध्दा नाही आहे.परतु ६०० मीटर रोड साठी आपल्याला रू.१० करोडचा निधी पाहिजे मला येथे शंका निर्माण होत आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**नाही, सर मी आपल्या सांगतो

**सदस्य,श्री.जमनादास पुरस्वानी:—** त्या नंतर लाईटचे काम पूर्ण रोडचे टाकलले आहे.पोल एलइडी चे ४७ लाख टाकलेले आहेत. जलवाहिनीचे रू.२४ लाख लावलेले आहेत.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—** हेच तर आम्ही सांगत आहेत, जर आपण चालीया मंदीरापर्यंत धेतले तर जलवाहिनी जास्त असू शकते कमी पण असू शकते. पोल पण जास्ती कमी होवू शकतात. त्यामुळे हे प्रोपर होवू शकते का

**सदस्य श्री भारत राजवानी:—** चालीया कुठून आणि कोणत्या रोपासून मेजरमेंट घेतलेली आहे. हे जरा सांगा याचा खुलासा करा

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—** न्यु इग्लिश स्कुल पासूनकृ

**सदस्य श्री भारत राजवानी:—** नाही नाही, चालीया पासून विचारतो आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—** साहेब चालीयापासून घेतलेले नाही, न्यु इग्लिश पासून लाल चक्की चौक रोडपर्यंत घेतलेले आहे. लाल चक्की रोड जो येतो मेन रोड

**सदस्य श्री भारत राजवानी:—** म्हणजे चालीया पासून सरू होत नाही.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—** त्या ठिकाणी सर्व सीसी रोड बनलेले आहे

**सदस्यश्री भारत राजवानी:—** डीपी रोड मध्ये इन्क्रोचमेंट आहे.

**सदस्यश्री धनंजय बोडारे:—** हा जो चौक आहे जो तहसीदार ऑफीस कडून जातो.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—** आंबेडकर चौक आहे तिथपर्यंत.

**सदस्य श्री धनंजय बोडारे:—** आम्ही बजेट मध्ये काय दिलेले आहे

**सदस्य श्री दिपक सिरवानी**.:— आपण हया राबाजूच्या रोडवरून जाणर का त्या बाजूच्या रोडवरून जाणार.

**सदस्य श्री भारत राजवानी:—** मंदीर मध्येच आहे, जेवढे त्यांचे सभोवतालचे रोड येत आहेत हे सर्व बोटल नेक आहे. एकपण रोड डीपी नुसार बनलेला आहे. यामुळे तिथला जो इन्क्रोचमेंट आहे. हे पण काढायला पाहिजे. तर त्यानुसार एस्टीमेट वैगेरे परत बनविण्यात यावे. कोणताही रस्ता डायरेक्ट जात आहे. कुठे कुठे ते दहा दहा फुटाचे रस्ते आहेत. डीपी मध्ये ४० फुटआहेत इथे ६० फुट आहेत.

**सदस्य श्री धनंजय बोडारे:—** आयुक्त साहेब, हा चालीया तिर्थस्थळ विकसित करण्यासाठी निधी आहे. चालीया साहब तिर्थस्थळ विकसित करणे. नेताजी चौकापासून इथपर्यंत यांच्या म्हणण्यानुसार १००० मीटरचे अंतर येते. आणि त्यांनी रोड घेतला तो नेताजी चौक ते निजधाम आश्रम म्हणजे ६०० मीटरचा म्हणजे जवळपास ५०टक्के पुढचा रस्ता ३०० मीटर किंवा ३५० मीटर होवू शकते. हा चालीया मंदीपासूनचा रोड आहे. तो घेतलेला नाही. बजेट कुठले हा विकसित करणे आणि विकसित करतो कुठे इकडे, हे बरोबर आहे का?

**सदस्य श्री भारत राजवानी**:— दुसरे साहेब नेताजी चौकापासून

**सदस्य श्री धनंजय बोडारे**:— टॅक्नीकली फार चूकीचे होते. मीस युज ऑफ फंड, चालीया मंदीर विकसीत करणे आणि रोड विकसित करणे तो ही तिकडचा.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—** मा. सभापती महोदय, बघा तुम्ही अगोदरच्या आयुक्तांनी मान्यता दिली होती.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—** होय,

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—** तुम्ही साईडवर जावून वेरीफिकेशन केले.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—** होय, सर,

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—** आणि ती प्रस्तावना दयायची समजा माझेकडून फक्त प्रस्तावना आलेली आहे. मी कोणत्याही साईडवर गेलो नाही वैगेरे,

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**बरोबर, सर.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—** पण आता जे बोडारे साहेबांनी सागितले की या ठिकाणी चालीया मंदीर आहे. त्या मंदीराच्या परिसराचा आणि मंदीराच्या विकासासाठी निधी आलेला असेल तर तो परीसर सोडून तुम्ही हया पासून इथून इथ पर्यंत विकसीत करत असाल तर हे चूकीचे आहे. तुम्ही इथपासून सुरूवात करून तिथपर्यंत या तिकडे जाणारा रस्ता विकसीत करत असाल तर आमचे काही म्हणणे नाही.पण हे पॅच तुम्हाला सोडता येणार नाही. सगळयात महत्वाचा मुददा असा आहे, की ज्या वेळेला म्हणजे बजेट मंजूर होतो. तर त्या वेळेला तुम्ही हा आता विषय आलेला आहे तर तो विषय तुमच्या बजेट मध्ये लिहिलेला असतो का? बजेट मंजूर होताना येथील न्यु इग्लिश स्कुल ते आश्रम पर्यत सिमेंट रोड तयार करणे. हा विषय लिहिलेला असतो का?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**नाही,

**मा.आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—** नाही, बरोबर. आता तुम्ही नविन पध्दत म्हणजे पुढच्या वर्षात काय रोड घ्यायचे आहेत त्याचे पुढे नाव घ्यायचे. लक्षात आले. हा वादच निर्माण होत नाही. आणि यांच्याकडे स्थायी समिती ही आर्थिक कमीटी आहे. प्रशासकीय मान्यता जनरल बोर्डाने सगळया बजेटला दिलेली आहे. बजेट ला दिली म्हणजे प्रशासकीय मान्यता दिली आणि रोडचे नावे जर ठरले, आता फक्त इथे ठरायला यायचे होते. की नाव ठरले नाही म्हणून की हया रस्त्याचे काम आम्हाला करायचे आहे प्रशासकीय आणि आर्थिक मान्यता दया म्हणून. बरोबर पण प्रशासकीय आर्थिक मान्यता स्थायी समितीने आगोदरच दिलेली आहे. त्याच्या नंतर जनरल बोर्डाने दिलेली आहे. जनरल बोर्डाने दिल्यानंतर तुम्हाला फक्त या रस्त्याचे नाव याचे डायरेक्ट टेंडर आपण काढायला पाहिजे. स्थायी समिती कडे यायला पाहिजे. तुम्ही नाव न दिल्यामुळे हा वाद निर्माण झाला. रस्ता कुठून कुठपर्यंत घ्यायचा. ही जर पहिल्यांदाच बजेटच्या वेळेस चर्चा झाली असती, हा वाद तेव्हाच संपला असता. नविन बजेटमध्ये आता तुम्हाला कोणते रस्ते घ्यायचे ते नाव लिहीणे आणि त्याच्या पुढे रक्कम लिहीणे.

**सदस्य श्री भारत राजवानी:—** कसे आहे, न्यु इग्लिंश स्कुल पर्यंत दाखविलेला अर्ध रस्ता...

**मा.आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—** नाही नाही, असे करता येणार नाही.

**सदस्य श्री भारत राजवानी:—** देना बॅक वाला रस्ता दाखविलेलाच नाही आहे तो पण तिकडेच जात आहे ना.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—** तुम्ही मंदीराचा अप्रोच घेवून इथून अलिकडचा घेता हे चूकीचे आहे. श्री. शितलानी मी तुम्हांला बोलत आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—** जिथे आपण सीसी रस्ता सोडलेला आहे ना तो नेताजी स्कुल पासुन खाली जात आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—**सुरुवात मंदिरापासुन करावी.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**सर्व रिवाईज्ड होणार.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**सर्व रिवाईज्ड होणार.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**तेथे इन्क्रोचमेंट आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**त्याची चिंता करु नका इन्क्रोचमेंट काढुनच रस्ता करणार.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**वांरवार खर्च होणार नाही एकाच वेळी खर्च करायचा आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**ठराव करतांना चालिया मंदिरपासुन जिथपर्यंत जाईल १० कोटीमध्ये तिथपर्यंत करा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**चालिया मंदीर म्हणा, कारण लालचक्कीपर्यंत सिमेंट कॉंक्रिट रस्ता आहे. तर सिमेंट कॉंक्रीट रस्ता बनला पाहिजे, लालचक्की पासुन निजधाम आश्रमापासुन जेथुन ६०० मिटर मार्किंग येते. जयबाबाधाम टाका, नेताजी स्कुल टाका.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**साहेब, चालिया साहेब मंदिरपासुन रस्ता सुरु होतो तेथे नाला नाही.

**सदस्य श्री. भगवान भालेराव:—**चालिया मंदिर येथे ड्रेनेज नाही.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**दोन्ही जागी ड्रेनेज टाका. लालचक्कीपासुन नको मंदिरचा जो परिसर आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**आपण जे सांगत आहे ते रिवाईज्ड होईल मी स्वत: व्हिजीट करेन.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**आयुक्त साहेबांनी व्हिजीट करावी.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**चालिया मंदिर येथिल जो रस्ता येतो तेथिल इन्क्रोचमेंट हटले पाहिजे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**मला फक्त एवढे दया की कोठुन कोठपर्यंत याची आपण आज यास मंजुरी दया.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**एक मिनिट, ऐकुन घ्या, आपण ठरावात असे टाकु या १० कोटीचा रस्ता बनला पाहिजे, चालिया मंदिर ते लालचक्की, जे ड्रेनेज नाही ते आणि लालचक्की ते निजधाम आश्रम येथुन न्यु इंग्लीश पर्यंत जेथे १० कोटीचा रस्ता पुर्ण होतो. आयुक्तांना प्राधिकृत करु या, त्यांनी व्हिजीट करावी.

**आयुक्त श्री. अच्युत हांगे:—**१० कोटी असे म्हणु नका. १० कोटीपर्यंत म्हणा. आमचे प्राकलन ९ कोटी ४ लाख सुध्दा होवु शकते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**होय.

**आयुक्त श्री. अच्युत हांगे:—**आपण म्हणत आहात की १० कोटीचा बनला पाहिजे, मग नंतर म्हणणार हे कमी का केले.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**एज पर डीपी, चालिया मंदिर येथे डीपीच्या हिशोबाने इन्क्रोचमेंट सुध्दा गेले पाहिजे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपण यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे की त्यांनी जे प्राकलन बनविले आहे ते बरोबर आहे, नाही आहे.

**आयुक्त श्री. अच्युत हांगे:—**आपण मला फक्त हा निर्णय घेवुन दया की कोठुन कोठपर्यंत. तर मग आम्ही जावुन त्याची मोजमापणी करुन घेतो. रिवाईज्ड इस्टीमेट बनवुन तात्काळ करु.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी** चालिया मंदिर ते लालचक्की, जे ड्रेनेज नाही ते आणि लालचक्की ते निजधाम आश्रम येथुन न्यु इंग्लीश पर्यंत जी अर्थसंकल्पात तरतुद आहे.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे मी ठराव वाचते. ही स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेअंती प्रभाग क्र. १६ उल्हासनगर—५ येथिल चालीया साहेब मंदिर ते लालचक्की, लालचक्की ते निजधाम आश्रम आणि निजधाम आश्रम ते न्यु इंग्लिश स्कुलपर्यंत रस्ता बनविणेस मान्यता देणे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**निविदा प्रक्रिया करणेस मान्यता टाका.

**महापालिका सचिव :—**हो टाकते.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**दुसरे म्हणजे जे इन्क्रोचमेंट असेल ते निघणार.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**महोदया, यामध्ये असे येईल की जे काही इफेक्टेड असणार त्यांना पर्यायी जागा दयावी.

**महापालिका सचिव :—**हे ठरावात नाही येणार.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**परंतु जमनुजी मी एका गोष्टीवर आक्षेप घेतो रस्ते घेतांना आपण सर्वांना विश्वासात घेतले पाहिजे. हा आपला मुद्दा आहे.

**<u>सदस्य श्रीमती दिप्ती दुधानी :—</u>**आयुक्त साहेब, तेथे जे देना बॅक व न्यु इंग्लिश स्कुल आहे व दुसरा वर आहे.

**<u>सदस्या श्रीमती रेखा ठाकुर :—</u>**साहेब, तो सेम रस्ता आहे. दोन्ही बाजुंनी रस्ता आहे, एका बाजुने खुपच वर आहे व एका बाजुने खुप उंच आहे. तर तो रस्ता बनला पाहिजे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**तो यामध्ये येणार नाही, माझ्यामते निजधाम ते जयबाबा धामपर्यंत ३०० मिटर रस्ता आहे. तो रस्ता डाउन आहे व येथे आपला आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**मी सांगतो जो रस्ता शाळेजवळ आहे तो नार्मली आधीपासुनच तसा आहे, नॅचरल आहे. आपण नॅचरल विरुध्द जावु शकत नाहीत. नाहीतर आपली शाळा जमिनीच्या खाली होईल. तर जे नॅचरल आहे ते इंजिनिअर बरोबर करतील.

**<u>महापालिका सचिव :—</u>**पास?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**होय.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**होय चालिया मंदिरपासुन सुरु करुन जेथे होतो तेथपर्यंत. आणि इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**मला चांगले आठवत आहे की मागील सभेत श्री. जमनादास यांनी म्हटले होते की, यानंतर आपण इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता बोलणार नाही.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**ते मागील वेळेस काय म्हणाले ते विसरले.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>**महोदया, जरा ठराव वाचुन दाखवा.

**<u>महापालिका सचिव:—</u>** मी ठराव वाचुन दाखविते. ही स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेअंती प्रभाग क्र. १६ उल्हासनगर—५ येथिल चालीया साहेब मंदिर ते लालचक्की, लालचक्की ते निजधाम आश्रम आणि निजधाम आश्रम ते न्यु इंग्लिश स्कुलपर्यंत रस्ता व नाली बनविणेकामी १० कोटीपर्यंतच्या मर्यादेपर्यत खर्चास मान्यता देउन निविदा प्रक्रिया करणेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>**काय करायचे आहे डांबरीकरण की काय, त्याच्यामध्ये लाईट आणि साईड ड्रेन आहेत काय?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**साहेब, जेथे नाली कामात येणार नाही तेथे ती नाली कामात घेतली पाहिजे ना.

**<u>महापालिका सचिव :—</u>**हो ते टाकते विदयुतवाहिन्या व पाणीपुरवठा वाहिन्या ठरावात टाकते.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**अंडरग्राउंड ड्रेनेजची प्रोव्हिजन घेतली नाही.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>**ते वेगळे आहे ना.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**यामध्ये पालेवरुन येणा—या लाईनी जड आहेत, त्या हिशोबाने करा.

**<u>महापालिका सचिव :—</u>**पास?

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑**विषय क्र. १ :— प्रभाग क्र. १६ उल्हासनगर-५ येथील न्यु इंग्लिश स्कुल ते निजधाम आश्रम पर्यंत एम ३५० ने सिमेंट** रस्ता व नाली बनविणेचे कामाची ई निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणे.

**प्रस्तावना**

वर्ष २०१८-१९ च्या महापालिका अर्थसंकल्पात उल्हासनगर-५ येथील चालीया साहेब तिर्थस्थळ विकसित करणे या लेखाशिर्षात रुपये १०.०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार मा.उप महापौर व स्थानिक नगरसेवक यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये प्रभाग क्र.१६ उल्हासनगर-५ येथील न्यु इंग्लिश स्कुल ते निजधाम आश्रम पर्यंत एम ३५० ने सिमेंट रस्ता व नाली बनविणेकरीता कळविले आहे.

सदर रस्ता हा चालीया साहेब मंदीराकडे जाणारा मुख्य रस्ता आहे. उल्हासनगर-५ येथे प्राचीन शिवमंदीर आहे. दरवर्षी महाशिवरात्रीच्या दिवशी याठिकाणी लाखो संख्येने भाविक दर्शनाला येत असतात. तसेच उल्हासनगर शहरातून अंबरनाथकडे जाणारा हा एकमेव मार्ग आहे. या परिसरात सिंधी बांधवांचे चालीया साहेब मंदीर हे मोठे तिर्थक्षेत्र मानले जाते. पर्यटन स्थळांचा विकास या योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समितीने २७ "क" वर्ग मध्ये चालीया मंदीर पर्यटन स्थळ म्हणून घोषित केले आहे. हि उल्हासनगर शहरासाठी गौरवपूर्वक बाब आहे. चालीया महोत्सव दरवर्षी ४० दिवस चालतो. या काळात लाखो भाविक देशोदेशातून मोठया संख्येने येतात. तसेच प्रत्येक महिन्यात चाँदचे दिवशीही याठिकाणी यात्रा भरते. त्यामुळे कैलाश कॉलनी चौकातून मोठया प्रमाणात वर्दळ सुरु असते.

सदर कामाचे प्राकलन करणेस मा.आयुक्त यांचे मान्यतेकरीता सादर केले असता मा.आयुक्तांनी दिनांक १०/०८/२०१८ रोजी मान्यता दिली आहे. तथापी तत्पुर्वी पाणीपुरवठा विभाग, विद्युत विभाग व बांधकाम विभाग यांची एक समिती तयार करुन समन्वयाने सदर रस्त्याअंतर्गत विद्युत वाहिन्या व पाणी पुरवठा विभागाच्या जलवाहिन्यांची कामे असल्यास त्यांनीही प्राकलने तयार करणेच्या सुचना दिल्या आहेत.

त्याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे पाणी पुरवठा विभाग व विद्युत विभागास सदर रस्त्यांअंतर्गत त्यांच्या विभागाची कामे असल्यास तात्काळ अंदाजपत्रकासह सादर करण्यास पत्र देण्यात आले. त्यानुसार त्यांनी अंदाजपत्रक सादर केले आहे.

प्रभाग क्र.१६ मधील उल्हासनगर-५ येथील न्यु इंग्लिश स्कुल ते निजधाम आश्रम या रस्त्याचा विकास करणेकरीता खालीलप्रमाणे प्राकलने तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | कामाचे स्वरुप | प्राकलनिय खर्च |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम विभाग | रस्त्याचे स्थापत्य स्वरुपाचे काम | ०९,०८,३१,०६९/- |
| २ | विद्युत विभाग | आधुनिक पध्दतीचे पोल व एल.ई.डी. दिवाबत्ती बसविणे. | ४७,४०,०००/- |
| ३ | पाणी पुरवठा विभाग | रस्त्याअंतर्गत असलेल्या जलवाहिन्या स्थलांतरीत करणे | २४,२८,२०२/- |
| | | **एकूण** | **०९,७९,९९,२७१/-** |

वरील खर्च वर्ष २०१८-१९ च्या महापालिका अर्थसंकल्पात उल्हासनगर-५ येथील चालीया साहेब तिर्थस्थळ विकसित करणे या लेखाशिर्षात रुपये १०.०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. तरी सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ५७ **दिनांक:— २२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चेअंती उल्हासनगर–५ येथिल चालीया साहेब मंदिर ते न्यु इंग्लिश स्कुलपर्यंत एम ३५० ने सिमेंट रस्ता व नाली बनविणे आणि रस्ता अंतर्गत विदयुतवाहिन्या व पाणी पुरवठयाच्या जलवाहिन्या कामासाठी १० कोटीपर्यंतच्या मर्यादेपर्यत खर्चास मान्यता देउन निविदा प्रक्रिया करणेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :– उल्हासनगर–४ येथिल ६० फुट रुंद वीर सावरकर चौक ते जिजामाता उदयानापर्यंत मागे उल्हास स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे कामास मान्यता देणे.**

---

**महापालिका सचिव :–**यामध्ये ४० फुट लिहिले आहे. व विषयात ६० फुट लिहिले आहे. आताच काय ते करेक्शन करुन घ्या.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:–**डीपीच्या हिशोबाने तो ६० फुट रस्ता आहे. जिजामाता गार्डन पासुन ते विर सावरकर चौक.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**उल्हासस्टेशनपर्यंत लिहिले आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:–**तो ४० फुट आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:–**आपण करेक्शन करा की कोठुन कोठपर्यंत ४० व ६० आहे ते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**आपण आधी सांगा की हा रस्ता आधीच मुलभुत सुविधामध्ये झालेला आहे बरोबर?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:–**काम चालु झालेले नाही. हा नविन डीपीनुसार आहे. जिजामाता गार्डन पासुन ते विर सावरकर चौक, उल्हास स्टेशन हा ६० फुटचा आहे. परंतु महासभेत मा. आयुक्तांच्या उपस्थितीत या संदर्भात चर्चा झाली व जागेची परिस्थिती पाहता हा रस्ता ४० फुट करायचे ठरविले. तर ४० फुटाच्या हिशोबाने त्यामध्ये सेविंग होत होती. सेविंग झाल्यानंतर तेथे गेल्यावर तेथिल जे प्रतिनिधी आहेत त्यांनी म्हटले की तेथे लाईटचे काम करायचे आहे. विदयुत विभागाकडुन त्याचे प्राकलन मागविण्यात आले. २ कोटी १९ लाखाचे प्राकलन आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**लाईटचे काम आहे तर लाईटच्या निधीतुन आणा ना. यामधुन कसे होणार.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**साहेब, त्यांना बोलु तर दया.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:–**जिजामाता गार्डन पासुन जंगम हॉटेलपर्यंतचा भाग सुध्दा त्यात समाविष्ट करण्यात आला. त्यामुळे त्यास नविन बनविले.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**मा. आयुक्त महोदय मी आपणांस एक गोष्ट सांगु इच्छितो की ५ कोटीचे प्राकलन बनविले ६० फुट रस्त्यासाठी. व ६० फुटचा रस्ता झाला ४० फुट तर मग प्राकलन कमी होईल की वाढणार. यांनी आता काय म्हटले यांचे रेकॉर्डींग सुध्दा आहे. ६० चे ४० वर कमी झाले. तर इस्टीमेट ५ कोटीवरुन कमी झाले पाहिजे, ठिक आहे आम्ही तर करायला तयार आहोत. नंतर म्हणतात की विदयुतचे २ कोटीचे काम वाढणार.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**प्राकलन झाले जिजामाता उदयानापासुन ते विर सावरकरपर्यंत ६० फुटचा कारण पहिल्या डीपीमध्ये तो ६० फुट होता. परंतु नविन डीपी आल्यानंतर जिजामाता उदयान ते क्वांईटी पुतळयापर्यंत ४० फुट करण्यात आला. तर मग ६० फुटाचा रस्ता तेवढाच आहे व पुढे तो ४० फुट आहे. तो ६०० मिटर होता आपल्या भाषेत तर मग तो ॲडीशनल यामध्ये घेतला, जिजामाता उदयानापासुन जंगम हॉटेलपर्यंत समजा तो ३०० मिटर झाले. ४० फुटाची रुंदी वाढविली. त्यासाठी जे सेविंग होते ते ४० टक्के असले पाहिजे होते त्याजागी २० टक्के राहिले. ॲडशनल त्यांनी त्यामध्ये २ कोटी १९ लाखाचे जे प्राकलन आहे त्यामध्ये ६० लाख सेव्हींग झाले आहे व बाकी दिड कोटी त्यांनी ॲडीशनल मागीतले.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**यामध्ये लाईटचे काम किती आहे.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—</u>**लाईटचे काम आपण करत नाही आहोत ते काम एमएसईबीवाले करणार.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**आपण तर म्हणालात की २ कोटी १९ लाख लाईटचे आहे.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—</u>**हो २ कोटी १९ लाख आहेत व ते डीपीनुसार ६० करायचे आहे.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—</u>**स्टेशनच्या जवळचा ४० फुटाचा ६० फुट करा बोलतात ती प्रस्तावना शासनाकडे ३७(१)च्या कार्यवाहीसाठी पाठविली आहे ना.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—</u>**हो पाठविली आहे. आतापर्यंत अप्रुव्हल आले नाही.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—</u>**दोन मिनीटे थोडे बोलतो २०१७ मध्ये जो डीपी मंजुर झाला, त्यामध्ये उल्हासनगर स्टेशनपासुन जिजामाता गार्डनपर्यंत हा पुर्ण रस्ता आहे. तर त्यामध्ये ४० फुट काही ठिकाणपर्यंत कोहिनुरपर्यंत आहे, आणि नंतर ६० फुटाचा आहे. दोन बाजु आहेत. आता यामध्ये कधी मार्किंग ६० फुटाचा पहिल्यांदा दिला नंतर आपला अशासकिय ठराव झाला. त्याप्रमाणे ४० ची मागणी झाली. श्री. सुर्वे साहेब माझ्याकडे आले होते ते म्हणाले करायचे असेल तर ६० फुट सर्वच करा. मी म्हटले तसे नाही आता लोकसंख्या वाढत आहे आणि आपण डीपीमध्ये रस्ता ६० फुटाचा असतांना तो ४० फुट करणे उचित नाही म्हणुन आपल्याला तो रस्ता ६० फुटाचाच करावा लागेल. राहिलेला जो ४० फुट आहे त्यासाठी महासभेचा ठराव झाला आहे की त्या ४० फुटात ६० फुट करावा. तर ते आम्ही शासनाकडे पाठविले मला वाटते परवाच आमचा शासनाकडे ३७ (१) चे प्रपोजल पाठविले आहे, मॉडिफिकेशनसाठी. आता आपल्याला ६० फुटच रस्ता करावा लागेल. आणि ६० मध्ये जिजामाता गार्डनपासुन ते जिथपर्यंत आहे तिथपर्यंत. राहिलेला आताच्या डेटला फक्त वाढवायचा नाही. आणि ३७ (१) चे मॉडिफिकेशन होवुन आल्यानंतर ते ६० फुट करावे लागणार आहे. म्हणजे एकुण रस्ता ६० फुटाचा होवुन जाईल. परंतु आपण मिडटाईममध्ये तो ठराव घेतला होता की तो रस्ता ४० फुट करा, डीपीमध्ये जर समजा एखादया रस्त्याची रुंदी ६० फुटाची असेल तर ती ५९ घेण्याचा कसलाही अधिकार नाही. किंवा ६० फुटाचा ६१ घेण्याचा अधिकार नाही, ६० फुटाला ६० फुट, ८० फुटाला ८० फुट, १०० फुटाला १०० फुट.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**एक मिनिट साहेब, मग पहिला जो प्रस्ताव आपण पाहिला तर त्यामध्ये आता मंजुरी दिली १०० फुटाची आणि डीपीमध्ये १२० फुट आहे.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—</u>**तो रस्ता सुध्दा १२० फुट होता. जो पहिला मुद्दा होता तो नविन डीपीनुसार १२० फुट आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**नविन डीपीप्रमाणे १२० फुटाचा रस्ता आहे. त्यास कमी घेताच येणार नाही. तुम्हांला १०० फुट करायचे असेल तर ३७ (१) चे मॉडिफिकेशन करुन आणा त्यानंतर निविदा काढा. श्री. शितलानी, मी सहा महिन्यानंतर पेन्शनवर जाणार तर हे चुकीचे काम करु नका. त्यांना समजावुन सांगा. कारण त्यांना माहित नाही ना मग समजावुन सांगा. समोरचा व्यक्ती बोलतो तर मध्ये बोलले नाही पाहिजे. पदाधिकारी जर बोलत असतील तर त्यांचे ऐकुन घेतले पाहिजे. डेव्हलोपमेंट प्लान मंजुर करत असतांना काय पध्दत आहे माहित आहे तुम्हांला? नगररचनाकार सर्व शहराचे डेव्हलोपमेंट प्लान बनवितात. आयुक्तांच्या सुपरविजन खाली बनवितो. ते बनविल्यानंतर महासभेपुढे आणतो त्यानंतर सूचना घेतल्या जातात, महासभेपुढे मंजुर झाल्यानंतर नगररचना विभागाकडे जातो, तेथुन मुंबईला जाते, नंतर येथे येतो आता ते कसे येते काय येते त्याबद्दल बाकी चर्चा करणे योग्य नाही. परंतु आल्यानंतर तुम्ही ते लक्ष दयायला पाहिजे ना की हे ६० फुटाचे करायचे आहे, हे ४० फुटाचे करायचे आहे. आजच्या तारखेला एकदा शिक्कामोर्तब झाल्यानंतर डीपीतील फुट कमी करण्याचा काही अधिकार नाही किंवा जास्त घेण्याचा अधिकार नाही. मी एक इंच जरी म्हटले जास्त घ्या तर घेणार नाही कमी घ्या म्हटले तरी घेणार नाही. बाकी लोक माझ्याकडे आले होते की ५ इंच कमी घ्या तर मी म्हटले घेणार नाही. नाहीतर बाकीचे लोक येतील आणि म्हणतील त्यांच्या दारात ५ फुट वाचविले व आमचेच का तोडले म्हणुन. तुम्ही केबल सर्व्हे करुन करायला पाहिजे होते ते केले नाही चुकीचे काम केले. जेव्हा डीपीची मार्किंग देतात तेव्हा तुम्ही सर्व्हे करायला पाहिजे होता. ज्यांनी दुकाने तोडले आहेत ते माझ्या दारात येवुन बसतील. म्हणजे असे चुकीचे काम करु नका. लाईटली घेवु नका. डेव्हलोपमेंट प्लानमध्ये रस्ते करतांना तुमच्याकडे यंत्रणा नसेल तर खाजगी घेवुन करा. चुकीचे करु नका. एखादा पॅच सुटता कामा नये. विकासासाठी पैसा आला आहे आणि तुम्ही ५०,१००,२०० फुट गॅप सोडुन अलीकडचा रस्ता करतात व पलिकडचा सोडुन देतात. मागील वेळेस तुम्ही तसे केले आहे व आता माझ्या लक्षात आले की तुम्ही कसे काम करत आहेत ते. त्यामुळे मी आता तुमचे प्रत्येक काम पाहिल्याशिवाय तुम्हांला परवानगी देणार नाही. आता जो ठराव झाला तो मला दाखवा. आपण उदया सकाळी पाहु या. सुट्टीच्या दिवशी करु आपण काम काय फरक पडतो. उदया अधिवेशन चालु आहे सर्व विभागप्रमुख मला येथे पाहिजे. उदया गुरुनानक जयंतीची सुट्टी आहे परंतु अधिवेशन चालु असल्यामुळे मला येथे दुपारपर्यंत सर्वांनी बसुन राहायचे आहे. आणि आपण उदया सकाळी १०.०० वाजता व्हिजीट करु. आज चर्चा झाली त्याची आपण उदया सकाळी व्हिजीट करु. तुम्ही सर्टीफाईड ऑथरीटी आहात उदया हे माझे प्राकलन चुकले हे मान्य नाही. तुम्ही तांत्रिक मान्यता शहर अभियंता बनुन देत आहात. शहर अभियंताचा शिक्का नाही. तांत्रिक पध्दतीने झाले पाहिजे ना. तुमचा तांत्रिक मान्यतेचा कुठलाही शिक्का मला दिसत नाही. तांत्रिक मान्यतेचा एक शिक्का असतो व एक गोल सिल असतो. तुम्ही तो तयार करुन घ्या सोमवारी शिक्का मला दिसला पाहिजे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**शहर अभियंताजी, आमचा म्हणण्याचा उद्देश काय की मा. आयुक्तांनी कसे म्हटले की एकदम परफेक्ट काम झाले पाहिजे. आम्ही करणार, नंतर लटकुन राहणार नंतर काम पडुन राहणार, आपण हा जो विषय आणला आहे दिड लाखाचा, मा. आयुक्तजी, खुप आवश्यक आहे, आम्हांला विरोध नाही कसाचा. गोषवाराच चुकीचा पाठवितात ना तर आम्ही विरोध करतो. गोषवारा वाचा, श्री. बोडारेजी, हे जिजामाता उदयान असे वास्तु आहे की उल्हासनगरचा व्यक्ती पाहु इच्छित असेल व तो पाहण्यास जाईल तर म्हणेल, तेथे नाली, रस्ते बनविणेस आमचा विरोध नाही, तर आमचा विरोध या गोष्टीकडे आहे आम्ही जो चुकीचा गोषवारा घेवुन येतात जी चुक करतात त्याची दुरुस्ती झाली पाहिजे. मी अजुन सांगतो आपणांस की किती मोठी चुक आहे. बघा काय चुक आहे ती आपण यामध्ये लिहिले आहे की उर्वरीत रु. ०१,५०,७९,४८३/- एवढा खर्च महापालिका अर्थसंकल्पातील रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षातून करणेस व कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित. यामध्ये कोणता अर्थसंकल्प आहे, त्यात किती शिल्लक आहे असे लिहिले नाही. श्री. बोडारेजी, जिजामाता उदयान असे गार्डन आहे की प्रत्येक व्यक्तीस वाटेल की मी पाहु. आमचा उद्देश फक्त असा असणार की सत्तेत असतांना रस्ते व नाली बनली पाहिजे, उल्हास स्टेशन आहे तेथे बनविले आहे, ठिक आहे आमचा विरोध नाही. विरोध याचाच आहे की आम्ही जे गोषवारे घेवुन येतो ते निट आणावे त्यात चुक होता कामा नये. त्याची दुरुस्ती झाली पाहिजे, मी सांगतो आता असे किती चुका आहेत. गोषवा—यात असे लिहिले आहे उर्वरीत रु. ०१,५०,७९,४८३/- एवढा खर्च महापालिका अर्थसंकल्पातील रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षातून करणेस व कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित. यामध्ये लेखाशिर्ष कोठे लिहिले आहे की किती बजेट आहे, किती तरतुद आहे, किती शिल्लक आहे, गोषवा—यात कोठेच याचा उल्लेख नाही. तर यामध्ये रस्त्यासाठी किती खर्च झाला आहे किती शिल्लक आहे. आता हे पहा विषय क्र. ३ मध्ये लिहिले आहे, लेखाशिर्ष किती व तरतुद किती, पण यामध्ये कोठे लिहिले आहे. तर यात पहा लेखाशिर्ष कट केला आहे यात कोठे आहे लेखाशिर्षाचा उल्लेख. कोठुन येणार दिड

कोटी, काम करणार तर येईल नाहीतर कोठुन येईल दिड कोटी. कोणत्या लेखाशिर्षातुन कापले आहे त्यामध्ये किती तरतुद होती आज किती शिल्लक आहे?

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—**एक मिनिट जरा ऐकुन घ्या, माझ्या सहीशिवाय त्यांच्याकडे प्रस्ताव पाठवु नये. तुम्हांला मी आदेश काढला तुम्हांला आदेश समजला नसेल तर समजुन घ्या. मी असा आदेश काढलेला आहे की तुम्ही स्थळप्रतीवर आधी माझी स्वाक्षरी घ्या. नंतर तुम्ही सहया १०० प्रतीवर करा, पण माझ्याकडुन एक प्रत मंजुर करुन घेतली पाहिजे. असा गलथान कारभार जर तुमचा असेल ना तर शेवटी माझ्या माथ्यावर फुटणार आहे. तुमच्या नाही फुटणार. आता तुम्ही येथे काय लिहिले आहे की मा. आयुक्तांच्या मान्यतेने बरोबर? मी प्रस्तावास तुमच्याकडुन जो प्रस्ताव आला त्यास मान्यता दिली. हे कधी लिहायला पाहिजे तुम्ही, माझ्याकडुन येथे सही झाल्यावर दुस—या कॉपीवर तुम्ही लिहायचे स्थळप्रतीवर मा. आयुक्तांची स्वाक्षरी असेल तेवढे लिहायचे आणि इकडे तुम्ही सही करायची. माझ्याकडुन सहीशिवाय एकसुध्दा प्रस्ताव पाठवायचा नाही. सर्व विभाग प्रमुख स्थायी समितीसमोर व महासभेसमोर प्रस्ताव पाठवायचा आहे ना मग ती प्रस्तावना माझ्याकडुन मंजुर करुन घ्यायची. एका प्रतीवर माझी सही झाल्यानंतर तुम्ही पाठवा नाहीतर माझ्या सहीने जावु दया. तुमची बाजुला सही करा मी सही करुन पाठवुन देईल, ठिक आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**परंतु गोषवा—यात लेखाशिर्ष लिहिले नाही.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**नीट पहा लिहिले आहे. रस्ते दुरूस्ती लेखाशिर्षातुन टाकले आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**होय पण किती तरतुद काय आहे ते लिहिले पाहिजे ना. निविदेच्या आधी दुरुरूती करा ना, दुरुस्तीबरोबर लिहा ना.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—**श्री. शितलानीजी, आतापर्यंत तुम्ही अर्थसंकल्पात १२ कोटीची तरतुद केली आहे, आतापर्यंत २ कोटी खर्च झाला, १० कोटी शिल्लक आहे, तर मग आता ९ कोटी मागत आहेत, असे तुम्ही प्रस्तावामध्ये लिहा. यामध्ये लिहिले आहे आणि या विषयात लिहिलेले नाही. साहेब, ते २ नंबर डिसाईड करायला लागेल.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे ::—**कोणता?

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—**६० फुट अणि ४० फुट. ४०—४० नाही, ६०—४०. उदया कोणी कोटेशन जाहिर केले तर स्थायी समितीपुढे जाईल.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—**१२० फुट सांगितला ना साहेब.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**साहेब, मी एक गोष्ट आपणाकडुन समजुन घेवु इच्छितो. एक ६० फुटावरुन ४० फुट झाला आपली प्राकलनावर सही झाली. परंतु साहेबांनी आता सांगितले की ३७ (१) मध्ये आपण प्रस्ताव पाठविला आहे की हा रस्ता आम्हांस ६० फुट करुन दया. समजा एक महिना, ४ महिन्यात तो रस्ता ६० फुटाचा होवुन येणार, आपण नाली, गटार बनविले ४० फुटाच्या हिशोबाने, एमएसईबीची लाईन काढुन ४० फुटावर ठेवले. मग आपण परत काढणार व दुसरी नाली परत बनविणार? दुसरे फुटपाथ बनविणार, कसे करणार? याबाबत जरा मला सांगावे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—**मी सांगतो आपल्या मुलभुत सुविधेतुन जे प्राकलन आपण पाठविले होते ते ६० फुटाचेच होते, जुन्या डीपीच्या हिशोबाने.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**जे डीपीमध्ये होते ते कधी पास केले? वर्क ऑर्डर कधी दिले?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंताः—**२०१७ मध्ये.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**तारीख सांगा. शासन निर्णय १६ चे आहे वर्कऑर्डर १७ चे आहे असे यांचे म्हणणे आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**१३/६/२०१७ लिहिले आहे ना.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**काम का सुरु झाले नाही.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**डीपी मंजुर झाल्यानंतर झाले, तो एप्रिलमध्ये मंजुर झाला आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**डीपी १७ मध्ये मंजुर झाला आहे. १३/६/१७ मध्ये त्यांनी वर्कऑर्डर दिले. जो भाग ६० फुट आहे, डीपी जुना व नविनमध्ये सुध्दा तर तेवढे काम तर कमीत कमी केले पाहिजे. ते काम नाही का सुरु केले आपण? मी आपणांस उदाहरण देतो, आताच आयुक्त महोदयांनी आपणांस सांगितले की पदाधिकारी बोलत असतांना मध्येच बोलु नका. आपण सिरीयल नं. १ मध्ये नेहरु चौक ते फॉलोवर लाईन चौक असे लिहिले आहे. तो बनुन पुर्ण झाला? विठ्ठलवाडी स्मशानभुमीपर्यंतचा रस्ता, काजोल पेट्रोल पंप डांबरीकरणाचे हे काम सुध्दा पुर्ण झाले. आपले दोन काम १०० टक्के पुर्ण व्हायचे आहे. दुसरे व्हिटीसी ग्रांउंड क्रिडा संकुल ते आशेळा गाव ते सुध्दा आपले काम पुर्ण झाले. एक काम आपण का थांबविले आहे. त्याचे एक्सलेशनचे जबाबदार कोण असणार.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**मी बोलु साहेब, प्रथम तर एक्सलेशन कॉस्ट आहेच नाही. डीपीनुसार ६० फुट आहे. परंतु महासभेत ठराव पास केला त्या हिशोबाने आम्ही ४० फुटाचे करायचे का नाही, काम त्या हिशोबानेच बंद होते. ४० फुटाच्या हिशोबाने आपण बनविलाच नाही. न्यू डीपी नुसार केले तर ६० फुटाच्या हिशोबाने मार्किंग दया. पुर्ण प्रस्ताव बदल होईल. ६० फुटाच्या हिशोबानेच आपणांस करावा लागेल.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**काय होते अधिकारी लोकांचे यात संभ्रम होते. आज मी एक पत्र दिले आहे, सचिव महोदया, जो अशासकिय ठराव आहे त्यावर एक शिक्का मारा ना. जो शासकिय ठराव आहे त्यावर शासकिय शिक्का मारा. आयुक्तांकडुन जो प्रस्ताव गेला त्यास शासकिय ठराव म्हणायचे. त्यावर निर्णय काहीही झाला तरी म्हणजे आमच्या कर्मचा—यास कळेल की शासकिय ठराव आहे त्यास १०० टक्के करणे भाग आहे. हा अशासकिय ठराव करायचा की नाही करायचा यामध्ये काय संभ्रम आहे, असे गुंतागुंतीचे विषय तयार होतात. असे होते की डीपी मोठा की ठराव मोठा. कारण की ठराव तर तुम्ही लोकांनीच तेथे पास केला आहे. डीपीला सोडुन अशाासकिय ठराव घेवुन नाही करता येणार. ते तुम्हांला माहित आहे, सर्वांनाच माहित आहे. कधीकधी पदाधिका—यांना जनतेच्या समाधानासाठी सुध्दा असे ठराव घ्यावे लागतात. त्यामुळे आपल्याला एज डिपी.....

**सदस्य श्री. राजेश वदारिया:—**एज पर डीपी बनवा ना त्यात काही अडचण नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**थोडे समजत नाही, जसे आता पाच कोटी आधीच पडला आहे, आता दिड कोटी वाढवत आहोत. जर आम्ही आता आपणांस हे करुन देणार तर काम सुरु होणार काय.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**साहेब, आपण काहीच करणार नाही, डीपी नुसार सुरु करु. सेविंग काहीच होणार नाही, विदयुतचा प्रस्ताव काहीच होणार नाही, तो ८० फुट आणला होता आम्ही त्यास ६० फुट, ४० फुट केला होता.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**यामध्ये माझी अशी सूचना आहे की, ६० फुटापर्यंत डीपी रस्ता जो आहे, डीपीप्रमाणे प्रस्ताव करावा. मधल्यावेळेत महासभेत जो ठराव झाला आहे तो ४० फुटाचा रस्ता ६० फुट करण्यासाठी पाठविला. त्याचा थोडा पाठपुरावा करुन, प्रशासकिय पातळीवर नाही, राजकीय पातळीवर करुन तुम्ही ते मंजुर करुन आणले तर पण पहिला टप्पा तिथपर्यंत ६० फुटाचा राहिल. ६० फुटाचा टप्पा प्रथम करणार. आणि नंतर बाकी उरलेला ६० फुट. डीपीत जेवढे आहे तेवढेच करणार, जर शासनाने मंजुर केले इनटाईममध्ये ६० फुटाचा ४० फुट केला मी दुस—या टप्यात त्यास सुध्दा करु शकतो ना.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**वीर सावरकर चौक ते जिजामाता उदयान ६० फुट आहे तर तेवढा ६० फुट तर आधी बनवा.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**साहेब, तेच तर मी सांगत आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**जो रस्ता डीपीमध्ये आला आहे, ६० फुटाचा आहे तर तो तेवढा तर अंमलात आणा.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—</u>**साहेब, मी काय सांगत आहे आपण महासभेत ठराव पास केला आहे ना.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>**अशासकिय प्रस्ताव होता. एक्झीसस्टीग ४० फुट नव्हता.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—</u>**एक्झीसस्टींग ४० फुट नाही, ३२—४० फुटचा रस्ता आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**३२ फुट आहे.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—</u>**आपणच ठराव पारीत केला आहे. २८ फुटाची कटींग जाणार.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**अर्धे ३०—३२ फुट आहे.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—</u>**१४—१४ फुट जाईल.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>**श्री. शिंपी, तुम्ही तेथे मार्किंग दिलेले आहे ना. ६० फुटावर किती मार्किंग करतात.

**<u>श्री. गणेश शिंपी, प्र.सहा. आयुक्त:—</u>**साहेब, त्या रस्त्याला ४० फुटाची मार्किंग दिलेली आहे. आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन आम्हांस जी यादी मिळाली आहे ती सुध्दा ४० फुटाची आहे. त्याप्रमाणे आम्ही सर्वांना नोटिसा बजावलेल्या आहेत. आणि डीमॉलीशनची कारवाई सुध्दा सुरु केली आहे त्या रस्त्यावर ४० फुटाप्रमाणे. आम्हांला सार्वजनिक बांधकाम विभागाने जी यादी दिली आहे आयुक्तांच्या स्वाक्षरीने ती ४० फुटाची आहे.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>**हो, यादी तुम्हांला स्वाक्षरीने दिलेली आहे पण तुम्ही ६० फुट असतांना कसे करणार ४० फुटाचे.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—</u>**साहेब, आम्ही ६० फुटाच्या हिशोबानेच म्हटले होते परंतु महासभाने त्याचा ठराव केला आहे.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**साहेब, आम्ही या ठरावास मान्यता देतो, जो तुमचा प्रस्ताव आला आहे त्यास. तुम्ही आणला आहे प्रशासनाने.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>**काय प्रस्ताव आहे तुमचा?

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—</u>**नविन डिपीनुसार करणार ना आपण.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**ठिक आहे साहेब, नविन डीपीनुसार देणार असाल तर कल्याण—मुरबाड रस्ता सुध्दा नविन डिपीनुसार दया.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**श्री. भालेरावजी, जो विषय चालु आहे त्यावरच बोला ना.

**<u>सदस्य श्री.भगवान भालेराव :—</u>**तुम्ही आता जो प्रस्ताव आणला तो नविन डीपीनुसार आणला आहे ना.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>**तो एमएमआरडीएचा प्रस्ताव आहे ना. तो आमचा विषयच नाही.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**आपल्या मताशी आम्ही सहमत आहोत. हा विषय जो आहे त्यास आम्ही मंजुरी देतो.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**प्रस्तावाला मान्यता देत आहोत.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>**श्री. शितलानीजी तुम्ही बोलले पाहिजे ना. ४० फुटाच्या कामाचे प्राकलन निश्चित झाले आहे. पण मी अगोदर खुलासा केलेला आहे की अशासकिय ठराव आहे तो. डीपीमध्ये तुम्हांला मॉडिफिकेशन करायचे असेल तर ३७ (१) ची कार्यवाही पुर्ण झाल्याशिवाय हा रस्ता करता येणार नाही.

**<u>श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—</u>**करता येणार नाही.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>**तोपर्यंत स्टॉप होईल ते.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**स्टॉप होईल तर दुसरे परत जाईल निधी.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>**६० फुटाचा रस्ता करु शकतो.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**१० कोटीचे तसेच होणार.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**त्यास तर परत बनवायचे आहेच ना.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**आमचे म्हणणे आहे १२० च्या हिशोबाने करा व पैसे तेथे फिरवा.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**होणार नाही, होणार नाही. साहेब, एक ऐकुन घ्या की जेव्हा आपण डीपी मंजुर केला होता. आपला सुध्दा विरोध आहे १२० फुट रिंगरोडवर, आम्ही म्हटले होते की ८० फुट किंवा १०० फुटाचा रस्ता बनविणार. जेव्हा तेथे इमारती बनतील व ते प्लान पास करतील तर आपोआप २० फुट जागा मिळणार. कमीत कमी वायंडिंग १२० करु शकत नाहीत. १२० वायंडिंगबाबत सर्व सदस्यांचा विरोध होता.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>**हे पहा, आता जर १२० चे आपणांस १०० फुट वाढवायचे आहे तर आपण असे पकडणार की तेथे आपणाकडे पैसे नाहीत म्हणुन १०० फुट करु, परंतु मी मार्किंग १२० फुटाची देणार. आणि साईड ड्रेन बनविणार नाही फक्त रस्ता बनेल. भविष्यात अन्य कोणी आयुक्त येईल तो आणखीन रस्ता चौडा करणार व डीपीपच्या हिशोबाने १२० फुटात करेल व नाली बनवेल. आजच्या तारखेस १०० बनवायचे असेल तर साईड ड्रेन बनणार नाही. साईड ड्रेननुसार बनवायचे आहे तर डीपीनुसारच बनणार.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**त्यासाठी दोघांमध्ये आम्ही आयुक्तांना प्राधिकृत करीत आहोत.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**आता २ कोटी १९ लाख एमएसईबीचे लाईन टाकायला सांगितले आहे यामध्ये. मग ते सुध्दा बंद करावे लागेल, ते देण्याची गरज नाही.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>**हा नव्याने प्रस्ताव करुन आणा व ठराव करुन घ्या विषय संपला. परंतु आयुक्तांनी अशी नोंद केली की डीपीप्रमाणेच रस्ता करावा लागेल हे लिहा ठरावात.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**ते इतिवृत्तात येईल ना साहेब.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>**होय.

**<u>महापालिका सचिव :—</u>**मी ठराव वाचते एकदा.

हो स्थायी समिती उल्हासनगर–४ वीर सावरकर चौक ते जिजामाता उदयानापर्यंत मागे उल्हास स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे कामी ...............

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**६० फुट टाका.

**<u>महापालिका सचिव :—</u>**विषयच तो आहे ना ६० फुट रुंद.

**<u>सदस्या श्रीमती रेखा ठाकुर :—</u>**साहेब, ड्रेन बनने आवश्यक आहे कारण तेथे ड्रेनेजचा फार मोठा इश्यु आहे.
**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—</u>**प्रशासनाचा विषय ६० फुटाचा आहे परंतु तुमचे प्राकलन तयार झाल्यामुळे ४० फुटाचे करण्यात आले. आमचा प्रस्ताव ६० फुटाचाच आहे. चला पुढचा विषय घ्या.

**<u>महापालिका सचिव :—</u>**ठराव ऐकुन घ्या.
ही स्थायी समिती उल्हासनगर—४ वीर सावरकर चौक ते जिजामाता उदयानापर्यंत मागे उल्हास स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे कामी येणारा खर्च १,५०,७९,४८३/— यास मान्यता देउन आयुक्तांना निविदा प्रक्रिया करणेस प्राधिकृत करीत आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**यामध्ये असे येणार अर्थसंकल्पात लेखाशिर्षाची तरतुद व निविदा प्रक्रिया हे सर्व येणार ना. त्यांनी सबमिशन केले आहे. एवढा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्पात तरतुदीनुसार कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा. स्थायी समिती आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे. दिड कोटीचे प्रशासकिय व वित्तीय मान्यता देवुन त्यास आयुक्तांना प्राधिकृत करीत आहोत.

**<u>महापालिका सचिव :—</u>**पास?

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**इतिवृत्ताची वाट न पाहता कोण बोलणार?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**श्री. भगवान भालेराव म्हणणार.

**<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>**ठिक आहे, इतिवृत्ताची वाट न पाहता.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. २ :— उल्हासनगर—४ येथिल ६० फुट रुंद वीर सावरकर चौक ते जिजामाता उदयानापर्यंत मागे उल्हास स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे कामास मान्यता देणे.**

**<u>प्रस्तावना</u>**

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२७५/नवि-१६ दिनांक १५ नोव्हेंबर,२०१६ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजनेअंतर्गत हाती घ्यावयाच्या खालील ४ रस्त्यांच्या प्राकलनिय खर्च रुपये २०,००,००,०००/- एवढया खर्चाच्या रस्त्यांच्या कामांना मान्यता प्राप्त झाली होती. सदर कामांची निविदा प्रक्रिया करुन निम्न दराचे मे.जय हिंद — जय भारत — झा पी ॲण्ड कंपनी यांचे नावे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहे. सदर कामांचा सद्यस्थिती अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत | कार्यारंभ आदेश क्रमांक व दिनांक | कामाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-३ येथील ६० फुट रुंद नेहरु चौक ते फॉलवर लाईन पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे काम करणे. | रु.५,५०,००,०००/- | कार्यारंभ आदेश क्र.०१ दिनांक १३/०६/२०१७. | काम पूर्ण |
| २ | उल्हासनगर-३ येथील ६० फुट रुंद विठ्ठलवाडी स्मशानभुमी पर्यंतचा रस्ता मार्गे काजल पेट्रोलपंप पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली / फुटपाथ व दुभाजकाचे काम करणे. | रु.५,५०,००,०००/- | | ९० टक्के काम पूर्ण |
| ३ | उल्हासनगर-४ येथील ६० फुट रुंद व्हि.टी.सी.क्रिडा संकुल ते आशेळे गांव पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे काम करणे. | रु.४,००,००,०००/- | | ८० टक्के काम पूर्ण |
| ४ | उल्हासनगर-४ येथील ६० फुट रुंद वीर सावरकर चौक ते जिजामाता उद्यानापर्यंत मार्गे उल्हास स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली / फुटपाथ व दुभाजकाचे काम करणे. | रु.५,००,००,०००/- | | अद्याप काम सुरु झाले नाही. |

वरील तक्त्यातील अनु.क्र.४ चे काम उल्हासनगर-४ येथील ६० फुट रुंद वीर सावरकर चौक ते जिजामाता उद्यानापर्यंत मार्गे उल्हास स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली / फुटपाथ व दुभाजकाचे काम मंजूर आहे. परंतू दिनांक ०५/०३/२०१८ रोजीच्या महासभेत मा.आयुक्त सो. यांचे उपस्थितीत सदर रस्त्याचे कामासंदर्भात चर्चा झाली असता कामाचे जागेवरील स्थिती पाहता ४० फुट रस्त्याचे कामाचे प्राकलन तयार करणेचे निश्चित झाले. त्यानुसार सदर रस्त्याचे पुनश्च ४० फुट प्रमाणे प्राकलन तयार करण्यात असून प्राकलनिय किंमत रु.**४३१७५०१०**/- एवढी होत आहे. तसेच विद्युत विभाग यांचेशी समन्वय साधुन सदर रस्त्यावरील विद्युत वाहिन्या भुमिगत करण्याच्या कामाचे प्राकलने तयार करणेत आले आहेत.

| **अ.क्र.** | **विभागाचे नाव** | **कामाचे स्वरुप** | **प्राकलनिय खर्च** |
|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक बांधकाम विभाग | रस्त्याचे स्थापत्य स्वरुपाचे काम | ४,३१,७५,०१०/- |
| २ | विद्युत विभाग | विद्युत वाहिन्या भुमिगत करणे. | २,१९,०४,४७३/- |
| | | **एकूण** | **०६,५०,७९,४८३/-** |

वास्तविक पाहता, मुलभूत सोई सुविधांचा विकास योजनेअंतर्गत सदर रस्त्याचे कामाकरीता ५,००,००,०००/- एवढा निधी मंजूर आहे. तथापी सध्या तयार करण्यात आलेल्या प्राकलनानुसार रस्त्याचे बांधकाम करणेस रु. **०४,५०,७९,४८३**/- एवढा खर्च होत आहे. (०६,**५०**,७९,४८३/- - ५,००,००,००० = ०१,**५०**,७९,४८३/-) शासनाचा मंजूर निधी रु.५,००,००,०००/- वजा जाता उर्वरीत रु. ०१,५०,७९,४८३/- एवढा खर्च महापालिका अर्थसंकल्पातील रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षातून करणेस व कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ५८ **दिनांकः— २२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती उल्हासनगर—४ वीर सावरकर चौक ते जिजामाता उदयानापर्यंत मागे उल्हास स्टेशन पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण, दुतर्फा नाली/फुटपाथ व दुभाजकाचे कामी येणारा खर्च १,५०,७९,४८३/— यास मान्यता देउन आयुक्तांना निविदा प्रक्रिया करणेस प्राधिकृत करीत आहे. श

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

**विषय क्र. ३ :— उल्हासनगर-३ येथील वर्षा हॉटेल ते एम.एस.ई.बी.कार्यालय येथील रस्त्याचे सिमेंट दुतर्फा नाली / फुटपाथ बनविणेच्या कामाची ई निविदा प्रक्रिया करणेस स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत...**

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**श्री. शितलानीजी, यामध्ये लेखाशिर्षात तरतुद लिहिली आहे २३ कोटी ९३ लाख.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—**नाही साहेब, ही चुकीची आहे, ही पहिलेची तरतुद आहे, आता नविन तरतुद आहे ३८ कोटी ५२ लाख. २३ कोटी आधीची होती आता नविन अर्थसंकल्प पारीत केला आहे आता ती ३८ कोटी ५२ लाख आहे. बीसीआर स्लीप लागली आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**कोठे आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**श्री. बोडारे साहेब, यात सर्व लिहिले आहे आपण लक्ष देवुन वाचा, २३ कोटी ९६ लाख ६ हजार रुपये लेखाशिर्ष उपलब्ध एकुण तरतुद यामध्ये नविन रस्ते सिमेंट कॉक्रिट करणे सी—४, सदर कामाची लखाशिर्षात तरतुद ती १३ कोटी ८८ लाख २३३, प्रस्तावित कामाचा खर्च ५९११७१०, प्रस्तावित कामानंतर उक्त लेखाशिर्षात १२८९७६५२३.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**बजेचा काही अर्थच नाही ना. हे काय लिहिले आहे, या वर्षाची तरतुद किती आहे?

**सदस्य श्री. संदिप जाधव, क. अभियंता:—**साहेब, सांगतो तुम्हांला हा जो प्रस्ताव आम्ही बनविला होता, मार्च २०१८ पुर्वी बनविलेला प्रस्ताव आहे. त्यानंतर करंट बीसीआर टाकण्यासाठी आम्हांस सांगितले. करंट बीसीआर आम्ही लावले परंतु येथे जे आहे ना, आधी अकांउट विभागाचे श्री. पाटील साहेब होते ना त्यांची सही झाली होती.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मागचा एक प्रस्ताव होता त्यामध्ये चुक काढली होती, तो महिला बालकल्याणचा होता. आताही तसेच आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**काय आहे ते स्पष्ट करा ना. मला सुध्दा कळले नाही.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—**साहेब, हा प्रस्ताव आधीचा होता त्यावेळी आमची तरतुद २३ कोटी ९६ लाख होती. त्यावेळी आयुक्तांच्या आदेशान्वये आम्ही त्यावेळी काम थांबविले होते. त्यावेळी लेखा अधिकारी श्री. पाटील साहेबांची सही होती. साहेबांच्या आदेशान्वये या वर्षात आम्ही अर्थसंकल्पात तरतुद केली आहे. गोषवा—यात आले नाही परंतु बीसी सीट मध्ये लागले आहे साहेब.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आपल्या मनानुसार मंजुरी देतात की पेपरवर काय आहे त्यास मंजुरी देतात.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—**साहेब, पेपरनुसार.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मग काय आहे यामध्ये?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—**साहेब, थोडा बदल करावा लागणार.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**कधी?

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपण फेरबदल करुन घेवुन यावे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. आयुक्त महोदय, मोठया खेदाने म्हणावे लागते आमच्याकडे जे गोषवारे येतात त्यामध्ये किती चुका, किती दुरुस्त्या असतात स्थायी समिती काय करणार?

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**यापुढे असे होणार नाही, ते माझ्या सहीनेच येणार.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**धन्यवाद, चांगले बनवुन परत आणा.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**नाही चांगले बनवुन नाही, अहो शितलानी, काय म्हणतात तुम्ही की आम्ही यावर्षीच्या बजेटमध्ये ठेवले आहे, २३ लाख......

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**ते मागच्या वर्षीच्या अर्थसंकल्पात होते.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**हो असु दया पण यावर्षी काय ते मला नाही कळले.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**श्री. शितलानीजी, हे पहा यामध्ये दिड कोटी सुध्दा कापले नव्हते आम्ही म्हटले चला करायचे आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—ना**ही, विषय फक्त असा आहे की बजेटमध्ये तरतुद आहे ना.

**श्री. महेश शितलानी, प्र.शहर अभियंता:—**हो आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**मग तेच विचारत आहोत ना चार वेळा. बजेटमध्ये तरतुद किती आहे आणि तुम्ही किती प्रस्तावित केले आहे.  आधी किती आणि आता किती.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**एक मिनिट, येथे किती दिले आहे २३ कोटी ९६ लाख रुपये दिले आहे. आणि पुढच्या त्याच हेडमध्ये किती दिले आहे ३८ कोटी ५२ लाख.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**हा २०१७—१८ चा अर्थसंकल्प आहे ना.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**ठिक आहे ना मग असे २—४ प्रस्ताव आणतो मागील वेळचे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आमचे येत नाही फक्त आपलेच येते.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आमचे येत नाही ना फक्त उप—महापौराचे आले आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**या वर्षात तरतुद किती आहे तीच येणार. मागची तरतुद येणार नाही.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**याचबरोबर आम्ही असे म्हणणार की महापौरांबरोबर सभा ठेवा सर्वांना बोलवा कोणाचा रस्ता घ्यायचा आहे, नाही घ्यायचा.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**आमचा सुध्दा घ्या.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**सर्वांचे रस्ते झाले पाहिजे.

**महापालिका सचिव :—**हे इतिवृत्तातच येईल.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**होय.

**महापालिका सचिव :—**ठरावात असे येईल गोषवारा फेरसादर करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**☑विषय क्र. ३ :— उल्हासनगर-३ येथील वर्षा हॉटेल ते एम.एस.ई.बी.कार्यालय येथील रस्त्याचे सिमेंट दुतर्फा नाली / फुटपाथ बनविणेच्या कामाची ई निविदा प्रक्रिया करणेस स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत…**

**प्रस्तावना**

मा.उप-महापौर यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये उल्हासनगर-३ येथील वर्षा हॉटेल ते एम.एस.ई.बी. कार्यालय येथील रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण व दुतर्फा नाली / फुटपाथ बनविणेस विनंती केली आहे.

सदर रस्ताची अवस्था अत्यंत बिकट आहे. सदर रस्ता उल्हासनगर शहरास अन्य शहरांशी जोडणारा मुख्य रस्ता आहे. रहदारीचे व वाहतुकीचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. सदर रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतूक सुरु असते. या परिसरात अनेक छोटया-मोठया उद्योगांचे कारखाने, लोकवस्ती वसलेली आहे. सदर रस्ता खराब असल्याने नागरीकांना अडचण निर्माण होते. दरवर्षी पावसाळयापूर्वी सदर रस्त्यावरील खड्डे महापालिकेमार्फत भरले जातात. त्यामुळे वेळेचा व निधीचा अपव्यय होत आहे. सदर रस्ता सिमेंट काँक्रीट केल्यास दरवर्षी महापालिकेस डांबरीकरणाचा करावा लागणारा खर्च वाचेल.

सदर रस्त्याचे कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे रु. ५९,११,७१०/- एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर खर्च महापालिकेच्या वर्ष २०१८-१९ च्या अर्थसंकल्पातील नवीन सिमेंट रस्ते बनविणे या लेखाशिर्षातून हाती घ्यावयाचे आहे. सदर लेखाशिर्षातील उपलब्ध तरतूदीची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) लेखाशिर्षाचे नाव | :- | नविन रस्ते सिमेंट काँक्रीट करणे (C 4) |
| २) लेखाशिर्षामध्ये उपलब्ध एकंदर तरतूद | :- | रु. २३,९६,०६,०००/- |
| ३) सदर कामापूर्वी लेखाशिर्षातील शिल्लक तरतूद | :- | रु. १३४८८८२३३/- |
| ४) प्रस्तावित कामावरील खर्च | :- | रु. ५९११७१०/- |
| ५) प्रस्तावित कामानंतर उक्त लेखाशिर्षात | :- | रु. १२८९७६५२३ |

तरी सदर कामास प्रशासकीय मान्यता मिळून कामाची ई निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ५९** **दिनांक:— २२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—३ येथिल वर्षा हॉटेल ते एम.एस.ई.बी. कार्यालय येथिल रस्त्याचे सिमेंट दुतर्फा नाली/फुटपाथ बनविणेच्या कामाची ई निविदा प्रक्रिया करणेचा गोषवारा दुरुस्ती करुन फेरसादर करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :— उल्हासनगर-३ येथील रोटरी उद्यान ते शिल्पा अपार्टमेट (बॅ.नं. ८४१) गुरुद्वारा येथील परिसरात सिमेंट काँक्रीटीचे रस्ता बनविणेच्या कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत...**

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**हा बरोबर बनविला आहे. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यामध्ये आपण लिहिले आहे डीपीमध्ये ४० फुट रस्ता लिहिले आहे व रस्ता २० फुट आहे. तर आपण किती फुट रस्ता बनविणार आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**४० फुट बनविणार आणि १०० टक्के डीपीनुसार बनविणार.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**यामध्ये प्रस्तावित कामामध्ये उक्त लेखाशिर्षात ३२,०२,६१,०११,००/— असे लिहिले आहे. म्हणजे अकराशे झाले.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**नाही साहेब, ते ०११ आहेत. बाजुला पॉईट ०० दिले आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**पण तो कॉमा दिसत आहे पॉईट नाही. कॉमा आणि पॉईटमध्ये फरक आहे ना.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**म्हणजे काय होईल ३२० कोटी २६ लाख १० हजार ११०० होईल.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**नाही साहेब, अकराशे नाही ०११ येथे पॉईट आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**ठिक आहे पास, इतिवृत्ताची वाट न पाहता.

**महापालिका सचिव :—**पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ४ :— उल्हासनगर-३ येथील रोटरी उद्यान ते शिल्पा अपार्टमेट (बॅ.नं. ८४१) गुरुद्वारा येथील परिसरात सिमेंट काँक्रीटीचे रस्ता बनविणेच्या कामाची निविदा प्रक्रिया करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेबाबत...**

**प्रस्तावना**

उपरोक्त संदर्भियविषयानुसार उल्हासनगर-३ येथील रोटरी उद्यान ते शिल्पा अपार्टमेट (बॅ.नं. ८४१) गुरुद्वारा येथील रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीचे रस्ता बनविणे संदर्भात मा.उप-महापौर, मा. सभागृह नेता यांनी विनंती केली आहे.

उक्त रस्ता या अंदाजे २५ ते ३० वर्ष जुने असुन रस्त्यावर पाणी पुरवठा विभागाने जल वाहिन्या टाकल्याने रस्ता नादुरुस्त स्थितीत झाले आहे. रस्त्याच्या कडेला दोन गुरुद्वारा असुन भाविकाचे प्रचंड प्रमाणात गर्दी असते. सध्यास्थिती रस्त्याचे रुंदी २० फुट आहे. दोन्ही बाजुला अनधिकृत बांधकामे आहे, विद्युत विभागाचे लाईट पोल ट्रांस्फोमर रस्त्याच्या रुंदी मध्ये येत असल्याने भाविकाना प्रचंड प्रमाणात वहिवाटा करिता व वाहतुकी करीता त्रास सोसावे लागतो. मंजुर नवीन आडाखडाप्रमाणे सदर रस्त्याची रुंदी ४० फुट आहे. सदर अरुंद रस्ता मंजुर आराखडाप्रमाणे बनविल्यास वरील नमुद केलेले अडचणी अपुष्टात येईल. त्यामुळे लोकप्रतिनिधी , गुरुद्वाराचे संस्थापक व तेथील रहिवासी यांचे सदर नादुरुस्त व अरुंद रस्ता हे मंजुर आराखडाप्रमाणे नव्याने बांधण्याचे मागणी करीत आहे.

सदर रस्त्याचे काम हे नवीन रस्ते ( सिमेंट कॉक्रीट) या लेखाशिर्षातुन कराव्याचे आहे व त्याची आकडेवारी खालील प्रमाणे आहे:-

| | |
|---|---|
| १) लेखाशिर्षाचे नाव | - नवीन रस्ते ( सिमेंट कॉक्रीट) |
| २) लेखाशिर्षामध्ये उपलब्ध एकंदर तरतुद | - ३८५,२२७,०००/- |
| ३) सदर कामापूर्वी लेखाशिर्षातील शिल्लक तरतुद | - ३६९,८६९,३२१/- |
| ४) प्रस्तावित कामावरील खर्च | - १९६,०८,३१०/- |
| ५) प्रस्तावित कामानंतर उक्त लेखाशिर्षा | - ३५,०२,६१,०११,००/- |

तरी सदर कामास प्रशासकीय मान्यता मिळून कामाची ई-निविदा प्रक्रिया करणेस मा. स्थायी समितीच्या मंजूरीस्तव प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ६०** **दिनांक:— २२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—३ येथिल रोटरी उदयान ते शिल्पा अपार्टमेंट (बॅ.नं. ८४१) गुरुद्वारा येथिल परिसरात सिमेंट कॉक्रिटीचे रस्ता बनविण्याच्या कामास प्रशासकिय मान्यता देवुन कामाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————

⇨ **<u>विषय क्र. ५</u> :—कचरा निर्मितीच्या ठिकाणीच कचरा विलगीकरण व सुका कचऱ्यावर (प्लास्टिक) प्रक्रीया करणेच्या कामास मे. द आर्ट ऑफ लिवींग श्री श्री. रूरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट, बेंगलुर यांची १ वर्षासाठी अभिकर्ता म्हणुन नेमणुकी करणेस मान्यता देणे**

————————————————————————————————————

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**पास करा.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>**इतिवृत्ताची वाट न पाहता कोण बोलणार.

**<u>महापालिका सचिव :—</u>**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता लिहायचे काय?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**होय.

**<u>काही सदस्य :—</u>**पास—पास......

**<u>सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ५ :— कचरा निर्मितीच्या ठिकाणीच कचरा विलगीकरण व सुका कचऱ्यावर (प्लास्टिक) प्रक्रीया करणेच्या कामास मे. द आर्ट ऑफ लिवींग श्री श्री. रूरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट, बेंगलुर यांची १ वर्षासाठी अभिकर्ता म्हणुन नेमणुकी करणेस मान्यता देणे**

**<u>प्रस्तावना</u>**

स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत व घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार घनकचरा विलगीकण करणे बंधनकारक आहे. याबाबत वारंवार जनजागृती करून कार्यशाळा घेण्यात आलेल्या आहेत. तथापी नागरीकांचा सहभाग व सहकार्य मिळत नसल्याने उद्दिष्ट पूर्ण करण्यास महापालिकेला यश मिळालेले नाही. त्यामुळे घरोघरी ओला व सुका कचरा या प्रकारे वर्गीकृत करून संकलन करणेकामी कचरा निर्मितीच्या ठिकाणीच कचरा विलगीकरण व ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेबाबत महानगरपालिकेस सर्वतोपरी सहाय्य विना मोबदला पुरविणेचे कामाचे श्री. श्री. रूरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट, आर्ट ऑफ लिवींग इंटरनॅशनल सेंट, बेंगलुर, यांच्याशी सामंजस्य करारनामा कराराचे दिनांका पासून १ वर्षे पर्यंत करण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

कचरा निर्मितीच्या ठिकाणीच कचरा विलगीकरण व सुका कचऱ्यावर (प्लास्टिक) प्रक्रीया करणेबाबत. मे. श्री श्री. रूरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट, बेंगलुर यांच्याबरोबर करारा केल्याच्या दिनांका पासून १ वर्षे पर्यंत खालिल अटी व शर्तीस अधिन राहुन करण्यास बंधनकारक करण्यात येईल.

उल्हासनगर महानगरपालिका तर्फे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन घनकचारा गोळा करून जुनी खडी मशिन, गायकवाड, उल्हासनगर — ५, येथे वाहनांद्वारे डम्पींग ग्राऊंड येथे संकलीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापी सदर प्रक्रिया मध्ये नागरीकांचा सहभाग (प्रत्यक्ष घराघरामध्ये निर्माण होणार कचरा घंटागाडी मध्ये टाकण्यापूर्वीच ओला व सुका असा विलगीकरण करुन देणे). वाढविणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने सदर संस्थे तर्फे शहरामधील सर्व शाळा, महाविद्यालये, शैक्षणीक संस्थ, धार्मीक संघटना, सामाजिक संस्था, व्यापारी संघटना, अशासकीय संस्था, बचट गट इत्यादी सहभाग घेवून या बाबींचे महत्व पटवून देण्यासाठी महानगरपालिका पदाधिकारी, नगरसेवक तसेच अधिकाऱ्यासह बैठकांचे आयोजन करुन ओला व सुका कचरा विलगीकरणासाठी त्यांचे संस्थेच्या स्वयंसेवकामार्फत स्वच्छ भारत मिशनचे धर्तीवर चळवळ उभी करण्याचा प्रस्ताव संस्थेने दिला आहे. तसेच अशा प्रकारे चळवळीच्या माध्यमावून जमा होणाऱ्या सुक्या कचऱ्यातील प्लास्टीक कचरा संस्थेमार्फत पुढील शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी संस्था घेवून जाईल. या कार्यवाहीसाठी माहनगरपालिकेने जुनि खडी मशिन, गायकवाड पाडा, उल्हासनगर— ५, येथे जागा उपलब्ध करुन दयावयाची आहे. पाणी व वीज जोडणी उपलब्ध करुन दयावयाची आहे. तसेच वरील चळवळी मार्फत जमा होणाऱ्या सुका प्लास्टीक कचऱ्यावर संस्थेने विकसीत केलेले जगपवनी हे द्रव्य वापरुन शास्त्रोक्त पध्दतीने खत तयार करुन परस्पर विल्हेवाट लावेल. विकसीत

केलेले जगपवनी या जैविक द्रव्याचा वापर खत निर्मितीसाठी करण्यात येईल या साठी कोणताही खर्च उल्हासनगर महानगरपालिकेला दयावा लागणार नाही तो संस्थेमार्फत करण्यात येईल.

या कामासाठी वरील प्रमाणे उभारण्यात येणाऱ्या लोकचळवळीसाठी झेंडे, प्रसिध्दी फलक, हस्तपत्रीका, हॉर्डिंग इत्यादी जनजागृती करण्यासाठीचा साहित्याचा खर्च महानगरपालिकेने करावयाचा आहे. तसेच सदर साहित्यावर उल्हासनगर महानगरपालिका व संस्था या दोघांची बोधचिन्ह लावणे, प्रसिध्द करणे आवश्यक राहील.

१. करारनाम्याचा कालावधी सामजस्य कराराचे दिनांकापासून १ वर्षे पर्यंत राहील. तथापी कामाची प्रगती पाहून पुढे मुदत वाढ देणेबाबत निर्णय घेण्यात येईल.
२. संस्था सोबत करण्यात येणाऱ्या सामंजस्य कराराच्या बाबतीत त्यांनी अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.
३. संस्था सोबत करण्यात येणाऱ्या सामंजस्य कराराच्या बाबतीत प्रत्यक्ष स्थळावर होणाऱ्या प्रत्येक बाबीसाठी संस्था जबाबदार राहील.
४. संस्था सोबत करण्यात येणाऱ्या सामंजस्य कराराच्या बाबतीत घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे कायदयाचे, न्यायालयीन ओदशाचे काटेकोरपणे पालन करणे बंधन कारक राहील.
५. संस्था सोबत करण्यात येणाऱ्या समजस्य कराराच्या बाबतीत कोणताही वाद निर्माण झालयास सक्षम प्राधिकाऱ्या कडून देण्यात येणाऱ्या आदेशाची तत्काळ अंमलबजावणी संस्थेला करावी लागेल.
६. संस्था व उल्हासनगर महानगरपालिका यांना या सामजस्य करारनाम्याच्या अंमलबाजणीसाठी स्वतंत्र रीत्या समन्वये अधिकारी नियुक्त करावा लागेल.
७. या करारनाम्या अंतर्गत दयावयाची नोटीस, मागणीपत्र इत्यादी शासन निर्णयानुसार मराठी भाषेतुनच करण्यात येईल. तसेच तो उभय पक्षाचे अंतिम ज्ञात पतत्यावर ई—मेलवर किंवा फॅक्सवर करण्यात येईल. तसेच कोणताही नोटीस उभय पक्षाला ज्या तारखेला पोहोचेल अश्या तारखेपासून प्रत्यक्ष अंमलात येईल.
८. सदर करारनाम्याचे अनुषंगाने उपस्थित होणारा वाद/विवाद याबाबत आयुक्त सो., यांच्या निर्णय अंतिम राहिल.
९. उभय पक्षाचे नांव व बोधचिन्ह हे प्रस्तावित कामाचे (प्रचारात्मक साहीत्य किंवा माहिती मध्ये) उपयोगात आणण्यात यावे.
१०. डंम्पींग ग्राऊंड येथे जागा कराराचे कालावधी पूरती उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच विद्युत पूरवठा व पाणी पूरवण्याची जोडणी महानगरपालिके तर्फे उपलब्ध करुन देण्यात येईल. विज वापराचा खर्च संस्थेला करावा लागेल.
११. सुक्या कचऱ्यामधील प्लास्टीक कचरा हा शास्त्रोक्त पध्दतीने (महाराष्ट्र प्रदुषण नियत्रण मंडळा कडील विशिष्ट सुचनासह घनकचरा व्यवस्थान नियम २०१६ आणी प्लास्टीक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ तसेच या विषयी शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या या अनुषंगीक निर्देशानुसार) संस्थेने विल्हेवाटी लावयाची असून या व्यतिरिक्त सुका कचऱ्यामध्ये असणाऱ्या इतर घटकाचाही या पध्दतीने विल्हेवाट लावण्याची जबाबदारी संस्थेची राहील.
१२. नागरीकांमध्ये ओला/सुका कचरा विलगीरणासाठी जागृती वाढविण्यासाठी सर्व प्रकारची मदत व्हावी. शाळा, महाविद्यालयाना स्वच्छतेचे संदेश प्रसारीत करणे, व्यापारी दुकानदाराबरोबर बैठकांचे आयोजन करणे, व्यापारी संघटनासह बैठक घेणे, धार्मिक आणि सामुदायीक प्रमुखासोबत बैठका घेणे, सर्व महानगरपालिका कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे यासाठी संस्था त्यांचे सर्व कार्यकर्त्यासह (एकूण १५ ते २० स्वयंसेवक) सदैव कार्यरत राहील. स्वच्छतेचा संदेश प्रसारीत करण्यासाठीची बिले व नागरीकामध्ये जागृती आणण्यासाठीचा खर्च महानगरपालिके तर्फे करण्यात येईल.
१३. दैनंदिन केलेल्या कामाचा लेखी अहवाल संबंधीत संस्थेस महापालिका नियुक्त अधिकाऱ्यास देणे बंधनकारक राहील.
१४. संस्थे तर्फे पूरविण्यात येणाऱ्या सेवेसाठी सुक्या कचऱ्या मधुन विलगीकरण करण्यात ओल्या प्लास्टीक कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे, सुक्या कचऱ्यामधील उर्वरित कचऱ्याचीही शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे इत्यादी) कोणताही खर्च महानगरपालिकेकडून संस्थेला देण्यात येणार नाही. सुक्या कचऱ्यातील प्लास्टीक कचऱ्यावर प्रक्रीया करण्यासह त्यासाठी येणारा अंनुषगीक सर्व खर्च संस्थेला करावा लागेल. तसेच प्लास्टीक व्यतिरिक्त इतर सुक्या कचऱ्याच्या शास्त्रोक्त विल्हेवाटीसाठी येणारा सर्व खर्च संस्थेला करावा लागेल. यासाठी उल्हासनगर महानगरपालिका कोणताही आर्थिक व इतर मदत करण्यात येणार नाही.
१५. संपूर्ण कामकाजामधे समाविष्ट कामगार यांना व डम्पींग ग्राऊंड सभोवती जाणाऱ्या येणाऱ्या सर्वसामान्य नागरीक यांना अपाय, धोका, अपघात, जिवित हानी इत्यादी होणार नाही याची दक्षता संस्थेमार्फत घेण्यात येईल. कामाचे ठिकाणी कोणत्याही प्रकारची वित्तीय, जिवीत अथवा मालमत्तेची हानी झाल्यास याची भरपाई करुन देण्याची थेट व संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.
१६. संस्थेद्वारा कामाकरीता नेमलेल्या कचरा वेचकांसह नियुक्त कर्मचारी इतयादी हे संस्थेच्या अखत्यारित काम करित असल्याने (Minimum wages Act) अल्पत्म मजूरी कायद्याचे व कामगार काद्यायाचे पालन करण्याची जबाबदारी संस्थेची राहील. डम्पींग ग्राऊंडवर संस्थे मार्फत करण्यात येणाऱ्या सर्व कामकाजासाठी आवश्यक कर्मचारी वर्गासह लागणारी सर्व यंत्रणा संस्थेला उभी करावी लागतील व त्यासाठीचा संपूर्ण खर्च (वेतन, इंधन, देखभाल, दुरूस्ती इत्यादी) संस्थेला करावा लागेल.
१७. कामाचे ठिकाणी कचऱ्यावर प्रक्रीया करताना निर्माण होणाऱ्या धुळीपासून परिसरात प्रदुषण होणार नाही या करिता आवश्यक ती उपाययोजना संस्था करेल तसेच काम करतांना महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या संदर्भातील सर्व मानकांचे काटेकोरपणे पालन संस्थेमार्फत करण्यात येईल.

१८.उल्हासनगर महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने अथवा लोकहिताचे दृष्टीने सामजस्य करारा मधील शर्ती व अटीमधे फेरबदल करणे नव्याने शर्ती अटी घालणे इत्यादी अधिकार आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांचे राहतील.
१९.काम सुरु असलेल्या कालावधीत महानगरपालिकेला कचऱ्या संबंधी अन्य कोणताही प्रकल्प/कारखाना प्रक्रीया राबविण्यासाठी पूर्णत: मुभा असेल.
२०.अविघटणशिल कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहील अविघटनशिल कचरा वेगळा करण्याची जबाबदारी संस्थेची राहील.
२१.सदर कामाबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांचा निर्णय अंतिम राहील व तो उभय पक्षांना मान्य राहील.

सदर संस्थेस नियुक्ती केल्यास शहरातील नागरिकांमध्ये विनामूल्य जनजागृती करणे शक्य होणार आहे. तसेच डंपिंग ग्राऊंड वरील संपुर्ण प्लास्टिकचे विलगीकण केल्यास डंपिंगची कचरा सामावून घेण्याची क्षमता वाढेल व तेथे आग लागल्यास धूराचे प्रमाण व आगीचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे. तरी मे. द आर्ट ऑफ लिवींग, श्री श्री. रूरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट, बेंगलुर यांची १ वर्षासाठी अभिकर्ता म्हणुन नेमणुक करण्यासाठी मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. स्थायी समिती समोर सविनय सादर.

**स्थायी समिती ठराव क्र. ६१** **दिनांक:— २२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत वरील नमुद अटी व शर्तीवर कचरा निर्मितीच्या ठिकाणीच कचरा विलगीकरण व सुका कचऱ्यावर (प्लास्टिक) प्रक्रीया करणेच्या कामास मे. द आर्ट ऑफ लिवींग श्री श्री. रूरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट, बेंगलुर यांची १ वर्षासाठी अभिकर्ता म्हणुन नेमणुक करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** उल्हासनगर—५ येथिल राजीव गांधी गार्डन, लालसाई बिल्डींग, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत—नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प (स्थापत्य स्वरुपाच्या कामाची प्राकलन) या कामाकरीता मे. साई कंन्स्ट्रक्शन यांची निम्न दराची निविदा मान्य करणेस व त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**किती कोटीचे काम आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**३३ लाखाचे काम आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**काय करणार आहात ते तर सांगा.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**डीपीआर मधला भाग आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**तो डीपीआर मधला भाग आहे ते माहित आहे. पण याबाबत सभागृहाला माहिती दया ना.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**साहेब, राजीव गांधीगार्डन येथे स्थापत्य स्वरुपाची काम करायचे आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**श्री. केणी गार्डनमध्ये हौद बांधायचे आहे काय?

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**हौद नाही साहेब, डीसेंट्रललाईज प्रस्ताव आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**यामध्ये काय काय करणार आहात.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**एकाच जागेवर करायचे आहे, लाललोई उदयानात.

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**मा. सभापती महोदया, डीपीआर अंतर्गत जो ३२ कोटीचा निधी शासनाकडुन आपणांस आलेला आहे. त्याअंतर्गत काही ठराविक ठिकाणी डिसेंट्रललाईज करायचे आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**शासनाकडुन ३२ कोटीचा निधी आलेला आहे असा लोकांमध्ये गैरसमज बसेल. ३२ कोटीचा निधी मंजुर झालेला आहे. आणि त्यामध्ये ९ कोटी आलेत फक्त. एवढे सांगा.

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**होय साहेब.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**त्यात काय काय करायचे आहे.

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**वाहन खरेदीसाठी आणि घनकचरा व्यवस्थापनासाठी त्यामध्ये ट्रांन्सर्पोटेशनसाठी, वाहने खरेदी करण्यासाठी आहे, त्यानंतर मशिनरी खरेदी करायची आहे. बायोमायनिंग करायचे आहे. डीसेंट्रललाईज काही युनिट शेड उभारायचे आहेत या सर्व गोष्टी आहेत. यामध्ये साहेब, जागा नसल्याने आपण काही डीसेंट्रलाईज जागा पाहिल्या होत्या. ३ डिसेंट्रलाईज जागा आपण फायनल केलेल्या आहेत, ३ जागेवर आपण निविदा काढली होती, त्यापैकी एक निविदा ही लालसाई बिल्डींग जवळचे राजीव गांधी गार्डन येथे साईट आहे. तर तेथे आपण शेड उभारणार आहोत आणि तेथे विंडो प्लॅटफॉर्म पध्दतीने येणारा कचरा तेथे सेग्रीगेट करणार आहोत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया**:—यामध्ये आपण एक प्लॅटफॉर्मची निविदा का काढली आहे. माझ्या हिशोबाने ३ प्लॅटफॉर्म असले पाहिजे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता:—**एक ३३ लाखाच्या खाली आहे व एक ३३ लाखाच्या वर आहे. एक मंजुरीसाठी पाठविले आहे. बाकी दोन कामे २५ लाखापेक्षा कमी आहे ती आपल्या माहितीसाठी पुढील सभेत पाठविले जाईल.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**शहरातील जो कचरा आहे आपल्या चारही प्रभागातील त्यासाठी कोणत सेंट्रल म्हणतात त्यास, डिसेंट्रलाईज पावर किंवा डिसेंट्रलाईज कवर वेगवेगळया ठिकाणी त्यास एक शब्द आहे.

**श्री. विनोद केणी,प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—**साहेब, विंडो प्लॅटफार्म, कलेक्शन सेंट्रल.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**होय कलेक्शन सेंट्रल. कचरा त्या त्या एरियातुन येवुन आपण ज्या जागा निश्चित केल्या तेथे आपण बांधतो तेथे कचरा येईल व त्याचे विलीगीकरण होईल. सुका कचरा व ओला कचरा वेगळा होईल व तेथुन जाईल. त्यासाठीच डीपीआर मधील आयटम आहे. सध्या आपण तेवढेच करु शकतो. म्हणुन तो आयटम त्यांनी घेतला आहे व त्याची निविदा काढली आहे. आपणांस मोठी मशिनरी कच—यासाठी लावायची आहे. परंतु

आपल्या मालकीची जमिनच नाही. आता कसे पाठपुरावा करायचा मी पत्र लिहिले आहे त्यांना. श्री. राजेशजी आपण गीरणी आमदारासोबत गेला होतात काय झाले ते सांगा. ३२ कोटीचा प्रस्ताव मंजुर झाला आणि ९ कोटी आलेत आणि पुढच्या डिसेंबरला १४ कोटी आपणांस भेटतील. त्यातील २४ कोटीतील १२ कोटी या खर्चामध्ये वर्ग होतील. एकुण माझ्याकडे २१.५० कोटी असणार आहे पण मला काम करायला काय आहे फक्त हे तीन सेंटर १४ कोटी भेटतील वित्त आयोगात त्यातील १२ कोटी हे तीन सेंटर ५० आणि ३३, ५ आणि ३ लाख रुपयाचे काम करु शकतो सध्या. त्यामुळे गंभीर घेतले पाहिजे, आपल्या डीपीमध्ये आपण कच—याचे प्रोसेसिंग प्लानसाठी किंवा डंम्पीगसाठी जागा दिली नाही, आता जी शासनाची जागा आहे, गायकवाड पाडयाच्या बाजुला जेथे आपण सध्या मटेरियल टाकतो. तर त्याठिकाणी २० हेक्टर जागा आहे. २० ते ३१ हेक्टर जागा आहे. तर कशासाठी राखीव आहे.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—**पब्लीक आणि युटीलिटीज.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**पब्लीक आणि युटिलिटीजसाठी आपण जागा ठेवली आहे. परंतु तेथे आपणांस अर्धी जरी जागा मिळाली तरी आपला प्लांट व्यवस्थीत होवु शकतो. त्यापासुन खतनिर्मिती झाली तरी लोकांना त्यापासुन काही त्रासही होणार नाही. पैसे आपणाकडे तयार आहेत परंतु जागा तयार नसल्यामुळे मी काहीच करु शकत नाही. सभा संपल्यावर मी महोदयांना जावुन भेटणार आहे की अशी परिस्थिती आहे तर काय करायचे. आणि दुसरे काल एक कॉन्फरन्स होती मुंबईला त्यामध्ये कल्याण डोंबिवली महानगरपालिका, आपली महापालिका आणि त्यानंतर कुळगाव बदलापुर, अंबरनाथ, वसई विरार, मिराभाईंदर, आपल्या महापालिकेसाठी नेदरलॅण्डची कंपनी आहे, या सर्वांचे मिळुन कच—याचे प्रोसेसिंग उभारायचे, अंबरनाथ येथे उभारायचे असे काहीतरी चालले आहे. ते जर झाले शासनाकडुन तर आपणांस जागेची गरज लागणार नाही. परंतु ते लवकर होणे गरजेचे आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**हा विषय पास करा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ६ :— उल्हासनगर—५ येथिल राजीव गांधी गार्डन, लालसाई बिल्डींग, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत—नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प (स्थापत्य स्वरुपाच्या कामाची प्राकलन) या कामाकरीता मे. साई कंन्स्ट्रक्शन यांची निन्म दराची निविदा मान्य करणेस व त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देणे.**

**प्रस्तावना**

उल्हासनगर-५, येथील, राजीव गांधी गार्डन, लालसाई बिल्डिंग स्वच्छ भारत अभियान अंतर्गत— नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प (स्थापत्य स्वरुपाच्या कामाची प्राकलन) या कामाचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार नियमाप्रमाणे सदर कामाची निविदा प्रक्रिया करण्यात आली. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्राकलनीय खर्च | रु. ३३,३५,९१० /- |
| २. | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दिनांक १४/०९/२०१८ |
| ३. | निविदा विक्री कालावधी | दिनांक १४/०९/२०१८ ते २८/०९/२०१८ |
| ४. | भरलेल्या निविदा सादर केल्याचा अंतिम दिनांक | दिनांक ३/१०/२०१८ |
| अ) | प्रथम मुदतवाढ | |

| | | |
|---|---|---|
| ब) | द्वितीय मुदतवाढ | |
| क) | तृतीय मुदतवाढ | |
| ५. | तांत्रिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १६/१०/२०१८ |
| ६. | आर्थिक भाग उघडल्याचा दिनांक | दिनांक १६/१०/२०१८ |
| ७. | विक्री केलेल्या निविदांची संख्या | ०५ |
| ८. | प्राप्त झालेल्या निविदांची संख्या | ०३ |

दिनांक १४/०९/२०१८ उल्हासनगर-५, येथील, राजीव गांधी गार्डन, लालसाई बिल्डिंग स्वच्छ भारत अभियान अंतर्गत– नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प (स्थापत्य स्वरुपाच्या कामाची प्राकलन) करणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ०३ निविदांचा तांत्रिक भाग उघडण्यात आला. त्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

**तांत्रिक भाग (Technical Bid)**

| अ. क्र. | निविदाकाराच्या निविदेमधील बाबी | **मे. साई कन्स्ट्र.** | **मे.मॉ.भवानी कन्स्ट्र.** | **मे. श्री. गणेश ॲण्ड कंपनी** |
|---|---|---|---|---|
| १. | निविदा प्रपत्रकाच्या खरेदीची रक्कम भरलेली आहे का ? | होय | होय | होय |
| २. | इसारा रक्कम भरलेली आहे का? | होय | होय | होय |
| ३. | अद्यावत आयकर रिटर्न भरल्याची पावती | होय | होय | होय |
| ४. | कामाचा अनुभव | होय | होय | होय |
| ५. | पॅन कार्डाची प्रत | होय | होय | होय |

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार १) मे. साई कन्स्ट्र. २) मे.मॉ.भवानी कन्स्ट्र. ३) मे. श्री.गणेश ॲण्ड कंपनी हे तीनही निविदाकार पात्र ठरत असल्याने त्यांचे निविदेचा आर्थिक भाग (Financial Bid) उघडण्यात आला. त्याची माहिती खालीलप्रमाणे.

| **अ.क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **दिलेले दर (टक्के प्रमाणे)** |
|---|---|---|
| १ | मे. साई कन्स्ट्र. | दिलेले दर १०.०४९१९ % टक्के कमी |
| ३. | मे.मॉ.भवानी कन्स्ट्र. | दिलेले दर ३.१ % टक्के जास्त |
| ४. | मे. श्री.गणेश ॲण्ड कंपनी | दिलेले दर ०.१० % टक्के कमी |

उक्त तक्त्यात नमुद केलेल्या माहितीनुसार उल्हासनगर-५, येथील, राजीव गांधी गार्डन, लालसाई बिल्डिंग स्वच्छ भारत अभियान अंतर्गत– नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प (स्थापत्य स्वरुपाच्या कामाची प्राकलन) या कामाकरीता मे. साई कन्स्ट्र. यांनी १०.०४९१९ % टक्के कमी दर असुन तसेच मे. साई कन्स्ट्र. यांनी परफॉर्मस सेक्युरीटी बैक ऑफ बडौदा डी.डी. क्रमांक ६३०१३७ रक्कम ३५,०००/- रुपये, अन्वये भरणा केले आहे.

तरी मे. साई कन्स्ट्र यांची निम्न दराची निविदा मान्य करण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम **१९४९** चे कलम **७३** (ड) अंतर्गत मा.आयुक्त यांचे स्तरावर मे. साई कन्स्ट्र. यांचेशी संविदा करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस सविनय सादर .

**स्थायी समिती ठराव क्र. ६२** **दिनांकः– २२/११/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर–५ येथिल राजीव गांधी गार्डन, लालसाई बिल्डींग, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत–नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प (स्थापत्य स्वरुपाच्या कामाची प्राकलन) या कामाकरीता मे. साई कंन्स्ट्रक्शन यांची निम्न दराची निविदा मान्य करणेस व त्यांच्याशी संविदा करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ७ :–** उल्हासनगर–१ येथिल ८० फुट रुंद बसस्टॅंडच्या बाजूचा परिसर, आशा कोल्ड्रींक्स ते पोलिस रस्त्याचे डांबरीकरण/मजबुतीकरण करणे ऐवजी बसस्टॉप, उल्हासनगर–१ येथिल यादव टायर शॉप ते शिवसेना शाखा पर्यंत सी.सी. एम–३५० रस्ता व नाला बनविणे.

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:–**आमचे रस्ते घ्या.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**हे बसस्टॉपसाठी ७५ लाखाचे होते मुलभुत सुविधा यामधुन घेतले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:–** तेथे सुध्दा चालले असते.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**हे युएस डॉलरमध्ये आले आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**हे काय आहे मी ७५ लाख रुपये महापालिकेचे वाचवत आहे. तेथे आधीच बनले आहे त्यासाठी मी त्याचे लोकेशन बदल केले.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:–**आयुक्त महोदय, आमचे सुध्दा पत्र आहे. पुढील वेळेस आमचे सुध्दा रस्ते घ्या.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :–**आपण हे पास करु या. महापौरांकडे निर्णय घेवु या की कोणता रस्ता घ्यायचा वगैरे. आता हा रस्ता घ्या. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:–**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ७ :– उल्हासनगर–१ येथिल ८० फुट रुंद बसस्टॅंडच्या बाजूचा परिसर, आशा कोल्ड्रींक्स ते पोलिस रस्त्याचे डांबरीकरण/मजबुतीकरण करणे ऐवजी बसस्टॉप, उल्हासनगर–१ येथिल यादव टायर शॉप ते शिवसेना शाखा पर्यंत**

**सी.सी. एम—३५० रस्ता व नाला बनविणे.**

**प्रस्तावना**

शासन निर्णय क्र. आईएन-२०१५/प्रक्र८२/नवि १६, दि.०८ मार्च, २०१६ अन्वये राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत यांना रस्ता अनुदान योजनेअंतर्गत विविध विकास कामांकरीता “अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर” सर्वसाधारण रस्ता अनुदानाअंतर्गत रु. ७५.०० लक्ष व “विशेष रस्ता अनुदान” अंतर्गत रु.३००,००,०००/- असे एकुण रु.३,७५,००,०००/- एवढी रक्कम मंजूरी करीता प्रस्तावित करण्यात करण्यात आली होती. त्यापैकी “ड” वर्ग महानगरपालिके अंतर्गत रु.३,००,००,०००/- रक्कमेच्या कामांना मंजुरी देण्यात आली होती.

त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील खालील कामांना मा.स्थायी समिती ठराव क्र. १२६ दिनांक २९/०३/२०१७ अन्वये मंजूरी घेण्यात आली तसेच जिल्हास्तरिय समितीच्या दि.०२/०९/२०१७ रोजीच्या बैठकीत प्रशासकिय मान्यता प्राप्त झालेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत | कामाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-३ प्रबुध्द नगर येथील ४०फूट रुंद प्लायवूड फॅक्टरी ते गॅस गोडावून पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु.७५,००,०००/- | काम पूर्ण |
| २ | उल्हासनगर-१ ८० फूट रुंद बसस्टँडच्या बाजूचा परिसर, आशा कोल्ड्रिंक्स ते पोलिस चौकी रस्त्याचे डांबरीकरण/मजबुतीकरण | रु.७५,००,०००/- | काम अद्याप सुरु नाही |
| ३ | उल्हासनगर-५ येथील ८० फूट रुंद कैलास कॉलनी चौक येथील रस्त्याचे डांबरीकरण/मजबुतीकरण | रु.१,५०,००,०००/- | काम प्रगतीपथावर आहे. |
| ४ | उल्हासनगर-४ येथील ८० फूट रुंद श्रीराम चौक येथील स्वर्गीय आनंद दिघे प्रवेशद्वारा जवळील रस्त्याचे डांबरीकरण/मजबुतीकरण | रु.७५,००,०००/- | काम पूर्ण |

वरील नमुद तक्त्यामधील अनु.क्र.२ बाबत असे सादर करण्यात येते की, उल्हासनगर-१ येथील बसस्टँडच्या बाजूचा परिसर, आशा कोल्ड्रिंक्स ते पोलिस चौकी (८० फूट रुंद) रस्त्याचे महापालिकेतर्फे खड्डे भरुन पुनर्पृष्ठांकन करण्यात आले आहे. सदर सस्ता जवळपास ७०% सुस्थितीत आहे. त्यामुळे सदर रस्त्याचे कामाऐवजी बस स्टॉप, उल्हासनगर १ येथील यादव टायर शॉप ते शिवसेना शाखा पर्यंत सी.सी.एम.-३५० रस्ता व नाला बनविणे (प्राकलनिय किंमत ७५,००,०००/- हे काम स्थानिक नगरसेवक श्री.जमनु पुरस्वानी, सभागृह नेता यांनी दि.०४/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्तावित केले आहे.

उल्हासनगर महापालिकेतर्फे कामांच्या तक्त्यामधील अनु.क्र. २ चे कामाकरीता कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि, स्थानिक नगरसेवक यांनी वरील परिच्छेदात नमुद केलेल्या विनंती नुसार कामात बदल करणेस व तसे मा. विभागीय आयुक्त (नगरपरिषद प्रशासन), कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना कळविणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ६२ **दिनांकः—२२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—१ येथिल ८० फुट रुंद बसस्टॅडच्या बाजूचा परिसर, आशा कोल्ड्रींक्स ते पोलिस रस्त्याचे डांबरीकरण/मजबुतीकरण करणे ऐवजी बसस्टॅाप, उल्हासनगर—१ येथिल यादव टायर शॉप ते शिवसेना शाखा पर्यंत सी.सी. एम—३५० रस्ता व नाला बनविणेस मान्यता देवुन मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना कळविण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर शहरात ५ वर्षा पेक्षा जास्त वापरात नसलेली व शौचालय निष्कासीत करणे

---

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**साहेब, विषय यामध्ये असा आहे की अनेक शौचालय अजुनही आहेत. जसे तुम्ही महासभेत सांगितले की, शौचालयाची जागा तुटल्यानंतर त्याठिकाणी समाजमंदिर किंवा शौचालय किंवा व्यायामशााळा असतील अन्य काही असेल असे तुम्ही नमुद करा. मला वाटते ब—याच लोकांचा त्यामध्ये विषय आहे. आणि माझे जे प्रभाग ७ मध्ये शौचालय दिले आहे महिलांसाठी तर आधीच तेथे महिलांसाठी शौचालय आहे तर तेच खराब आहे तर मला वाटते तर तेथे जो निधी मंजुर झाला आहे. तो निधी मला वाटते येथे दया तेथे मला समाजमंदिर वगैरे बांधता येईल. शौचालय न बांधता तेथे समाजमंदिर बांधावे कारण तेथे वडारी समाज मोठया प्रमाणात राहतात, वडारी समाजाला तेथे जागा नाही. तर ते शौचालय तेथे बंद करावे आधीच एक शौचालय त्यास लागुनच आहे. आणि फक्त १० लाखाचा निधी त्या शौचालयावर खर्च केला आणि सुस्थितीत केले तर मला वाटते जागा राहिल. आणि तेथे चांगले समाजमंदिर आपणांस बांधता येईल.

**महापालिका सचिव :—**हे इतिवृत्तात येईल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**श्री. केणीजी....

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**आमचे एक सुध्दा आले नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**दया ना मग.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**दिले आहे परंतु अधिकारी आणत नाहीत काय करणार आम्ही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**श्री. केणीजी, स्वच्छता निरिक्षकांकडुन मी याचा अहवाल सुध्दा काढला, शिवसेना शाखेकडे जे शौचालय आहे ते, आणि बॅरेक नं. १८१ हे सर्व टाका ना आताच्या आता समावेश करा.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**१७१९ चे दिले आहे. ते यामध्ये आले नाही.

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**हे प्रस्ताव आम्ही १५/२/२०१८ मध्ये यादी काढली होती त्याआधारावर आहे त्यानंतर जे काही प्रस्ताव आले ते प्रोसेसमध्ये आहेत.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**त्यानंतर किती पत्र आहेत.

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**माझ्या विभागात आहे ते सर्व प्रोसेसमध्ये आहे. येईल ते.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौर महोदयांचे सुध्दा टाकले नाही.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**माझे तेच म्हणणे आहे. आता ज्यांचे राहिले आहेत ना त्यांना एक—दोन दिवसाची मुदत देवुन यादीत समाविष्ट करुन त्यास मान्यता देण्यास हरकत नाही.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**मान्यता यामध्ये करुन घ्यावी ना. यामध्ये समाविष्ट करा.

**श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक:—**मा. सभापती महोदया, प्रशासनाकडुन ९९ शौचालयांचा प्रस्ताव आलेला आहे. प्रत्येक जागेवर काय करायचे त्याचा शेरामध्ये उल्लेख केलेला आहे. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी :—**श्री. केणीजी, आमचे तर तीन वर्षापासुन आहे आमच्याकडे भेट नाही दिली.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**आता तीन दिवस सुट्टी आहे तर २६ तारखेला दया ज्याचे प्रस्ताव येतील त्यास मान्यता करुन ते करुन घ्या. २६ तारखेपर्यंत येतील का प्रस्ताव. जेथे गरज आहे आणि अत्यावश्यक आहे त्यास तुम्ही प्राधान्य दया.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**कोणताही नगरसेवक निधी आहे तो टाकला आहे, मान्यता असेल परंतु तेथे निष्कासित झाल्यानंतरच त्याचे काम करावे.

**सदस्य श्री. भारत राजवानी:—**एक आणखीन प्रस्ताव प्रलंबित आहे, आमचे दिले आहे परंतु ते आले नाहीत.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**साहेब, मी तुम्हांला एक सांगतो, आयसीबीएस विभाग आपल्या महापालिकेच्यामागे आहे, त्यांना २१ अंगणवाडया बांधायच्या होत्या. त्यास महापालिकेने जागाच दिली नाही त्यामुळे त्यांचा निधी उरत गेला. त्यांच्याशी तुम्ही जर सानिध्य साधले, त्यांना जी समाजमंदिर आहेत त्यात ते आपली अंगणवाडी चालवितात जर त्यांना ती जागा दिली तर त्यांचा निधी आपणांस मिळु शकतो. आपण जर त्यास संपर्क केला व त्यांना बोलावुन घेतले तर ५० अंगणवाडयांचा आपणांस निधी मिळु शकतो. मला वाटते तो केंद्राचा निधी असतो, तर ते चांगल्यापध्दतीने होवू शकते व आपला आर्थिक बोझा कमी होवु शकतो. मागे आपण जागा न दिल्यामुळे २१ अंगणवाडया रद्द झाल्या. शौचालय निष्कासित झाल्यावर जर समाजमंदिर बनविले असेल तर त्या जागा त्यांना आपण देवु शकतो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**ठिक आहे, सर्वांनी नावे देवुन टाका व त्याजागी काय बनवायचे आहे ते सुध्दा दया. व पुढील सभेत मंजुर करुन घ्या.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**जे काही आहे ते मंजुर करा आणि पुढील वेळेस यास मान्यता देवु.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**पुढील वेळेस घ्या.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**ठिक आहे, पुढील वेळेस प्रस्ताव आणा.

**महापालिका सचिव :—**ज्यांना प्रस्ताव दयायचे आहे त्यांनी ते दयावे. श्री. बोडारे साहेबांनी माझ्याकडे दिले आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**जे जे सदस्य आपली यादी देत आहेत ना तर ती समाविष्ट करुन घ्यावी.

**महापालिका सचिव :—**फक्त स्थायी समितीचे सदस्य घ्यायचे की अन्य सदस्य सुध्दा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**फक्त स्थायी समिती सदस्यांचेच प्रस्ताव घ्यायचे आहे.

**महापालिका सचिव :—**पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर शहरात ५ वर्षा पेक्षा जास्त वापरात नसलेली व शौचालय निष्कासीत करणे

**प्रस्तावना**

दिनांक १५/०१/२०१८ रोजी मा. आयुक्त सों. यांनी विभाग प्रमुखांच्या बैठकीत दिलेल्या सुचनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व स्वच्छता निरीक्षक यांना वरील संदर्भिय पत्रानुसार उल्हासनगर शहरात वापरात नसलेली व सदर शौचालय निष्कासीत करणे आवश्यक असतील असे शौचालय व ५ वर्षा पेक्षा जास्त कालावधीपासून वापरात नाहीत किंवा नादुरुस्त आहेत व सदर शौचालय निष्कासीत केल्यानंतर तेथील नागरीकांना पर्यायी शौचालयाची सुविधा उपलब्ध असेल त्याचा परिणाम उघडयावर शौचालयास होणार नाही तसेच प्रस्तावित केलेले शौचालयाच्या जागी शौचालयाची ठिकाणी समाज मंदिर, हजेरी शेड, गोडाऊन, कंपोस्टि पिट किंवा इतर याचा स्पष्ट उल्लेख शेरा मध्ये करुन अहवाल मागविण्यात आलेला होता. त्यानंतर एकुण १०१ असे शहरात ५ वर्षापेक्षा जास्त वापरात नसलेली शौचालय आढळुन आहे. त्यानां पुढील कार्यवाहीसाठी मा. आयुक्त सो. यांचे समोर अभिप्रायसाठी सादर करण्यात आलेल्या होता तरी मा. आयुक्त सो. यांना दिनांक १५/०२/२०१८ रोजीच्या आदेशान्वये सर्व शौचालयांबाबत संबंधीत पॅनल मधील नगरसेवक व कोणते ५ नागरीकांच्या नावे व स्वाक्षरीसह प्रस्ताव मागवून त्यावर पेपरमध्ये जाहिरात देऊ आक्षेप /हरकती मागवून त्यांनतर निर्णयासाठी सादर करणेबाबत कळविले होते.

दिनांक ०७/०३/२०१८ रोजी मा. आयुक्त सों. यांचे आदेशानुसार सर्व स्वच्छता निरीक्षकाकडून दिनांक ३१/०३/२०१८ रोजी पर्यंत यादीत नमुद केलेल्या सर्व शौचालयाबाबत पॅनल मधील नगरसेवक व कोणते ५ नागरीकांच्या अभिप्राय प्राप्त करणे बाबत पत्र देण्यात आला होता. सदर पत्रानुसार १०१ शौचालया मधून २ शौचालय नव्याने बांधण्यात आलेल्या आहे असे स्वच्छता निरीक्षक यांचेद्वारे कळविण्यात आले आहे. तरी १०१ पैकी ९९ शौचायालांवर कार्यवाही करणेसाठी स्वच्छता निरीक्षककाकाडून प्राप्त झालेल्या अभिप्राय स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी करणेबाबत कळविण्यात आलेला होता.

दिनांक १३/०४/२०१८ रोजी स्थानिक हिन्दी व मराठी वृत्तमानपत्रात शौचालय संबंधीत नागरीकांना कुठल्याही प्रकारच्या आक्षेप असल्यास तर दिनांक २५/४/२०१८ रोजी पर्यत आरोग्य विभागास सादर करावा अशी माहिती प्रसिध्दी करण्यात आलेली होती. तथापी कोणत्याही हरकती व सूचना प्राप्त झालेली नाहीत तरी तुटलेले व नादुरुस्त वापरात नसलेलया शौचालयांची यादी खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रभाग क्रमांक | शौचालय क्र. | शौचालयाच्या पत्ता | एकुण सिट्सची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १अ | M.W.C. No 1/1 | साईसंस्था बचत गट संस्था शहाड गांवठाण उल्हासनगर— १ | ११ | समाज मंदिर बांधणे |
| २ | १अ | M.W.C. No 1/2 | साई श्रध्दा बचत गट संस्था, शहाड गांवझाण उल्हासनगर— १ | ८ | दुरुस्ती करुण पुन्हा सुरु करणे |
| ३ | १ब | | शिवाजी बाल उद्यान जवळ, धोबीघाट उल्हासनगर— १ | १० | समाज मंदिर बांधणे/खत प्रकल्प बनविणे |
| ४ | २ब | U.W.C.No 1/16 | बॅरेक नं. ६३,६४ कपाट कारखाना समोर, उल्हासनगर— १ | ६ | महापालिकेच्या गोडाऊन बनविणे |
| ५ | २अ | | बॅ नं. ४०४ टिळकनगर, उल्हासनगर— १ | ४ | हजेरी शेड तयार करणे |
| ६ | २ब | U.W.C. No 1/14 | बॅरेक नं २६८ साई दृष्टी अर्पा उल्हासनगर— १ | ६ | महापालिकेच्या गोडाऊन बनविणे |
| ७ | २ड | U.W.C. No 1/33 | बॅ नं. १०४, विठ्ठल अर्पा. जवळ, उल्हासनगर— १ | ४ | महापालिकेच्या गोडाऊन बनविणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | २क | | नारायण मंदिराच्या बाजुला जुने मंदिर लाकु महाराज ट्रॅन्सफामर बाजुला उल्हासनगर— १ | १२ | हजेरी शेड तयार करणे/खत प्रकल्प बनविणे |
| ९ | ३ब | M.W.C.No1/21 | भिमनगर, उल्हासनगर— १ | १२ | दुरुस्ती करुण पुन्हा सुरु करणे |
| १० | ३ब | U.M.C.No 1/47 | सहयाद्री कॉलनी उल्हासनगर— १ | १० | समाज मंदिर बांधणे |
| ११ | ३क | U.M.C.No 1/51 | बॅरेंक नं. ३९० जवळ, त्रिलोक अर्पा उल्हासनगर— १ | १० | हजेरी शेड/गोडाऊन बनविणे |
| १२ | ३क | U.M.C.No 1/53 | स्वामी विवेकानंदपाठी मागे उल्हासनगर— १ | ३ | वाचनालय तयार करणे/खत प्रकल्प बनविणे |
| १३ | ३क | | माऊंटन मेरी, बॅरेक नं. ४०५ जवळ, उल्हासनगर— १ | १० | ४ सीटचे शौचालय/समाज मंदिर तयार करणे |
| १४ | ३क | | बॅरेक नं. ३९९ जवळ, उल्हासनगर — १ | ८ | वाचनालय तयार करणे |
| १५ | ३क | | बॅरेक नं. ३९९ जवळ, उल्हासनगर — १ | १० | वाचनालय तयार करणे |
| १६ | ३क | | बॅरेक नं. ३७,३८ जेवानी हाऊस समोर, उल्हासनगर— १ | ६ | कंपोस्टिंग पिट बनविणे |
| १७ | ४क | | ब्रम्हणपाडा विठ्ठलमंदिर जव, एम.एम.आर.डी.ऐ. शौचालय मागे | १० | हजेरीशेड बांधणे |
| १८ | ५ क | | सत्यम पॅलेस च्या पाठी मागे उल्हासनगर— २ | ६ | कंपोस्टिंग पिट तयार करणे |
| १९ | ५ड | | बॅरेक नं. ७७३,७७४ रु नं. ४ च्या समोर, चोपडा कोर्ट मागे उल्हासनगर— ३ | २ | नविन शौचालय बनविणे |
| २० | ६ब | U.W.C. No 2/2 | बॅरेक नं. ३३७ सोनार गल्ली जगदीश मंदिर समोर, उल्हासनगर— २ | १० | हजेरी शेड बांधणे/खत प्रकल्प बनविणे |
| २१ | ६ब | U.W.C. No 2/3 | बॅरेक नं.३५६ सोनार गल्ली उल्हासनगर— २ | ३ | २ सीट चे शौचालय व १ मुत्री तयार करणे |
| २२ | ६ब | U.W.C. No 2/4 | बॅ रेक नं ३४९ सोनार गल्ली उल्हासनगर— २ | ३ | नविन शौचालय बांधणे |
| २३ | ६ब | U.W.C. No 2/5 | बॅरेक नं. ३५१ सोनार गल्ली उल्हासनगर— २ | ४ | महापालिकेच्या गोडाऊन बनविणे |
| २४ | ६ब | U.W.C. No 2/9 | बॅरेक नं. ३१४ प्रकाश माखीजा ऑफीस बाजूला उल्हासनगर— २ | ४ | नविन शौचालय बांधणे |
| २५ | ६ड | U.W.C. No 2/12 | बॅरेक नं. २९२ अण्णाभाऊसाठे चौक समोर खेमाणी उल्हासनगर— २ | ३ | मुत्री बनविणे/नविन शौचालय बनविणे |
| २६ | ६ड | U.W.C. No 2/13 | बॅरंक नं. ६२६ शिवमंदिर समोर खेमाणी उल्हासनगर— २ | २ | मुत्री बनविणे |
| २७ | ६ड | U.W.C. No 2/16 | बॅरेक नं. ६२६ दुनीचंद कालानी बंगलो समोर खेमाणी | १० | शोचालय दुरुस्ती करणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | उल्हासनगर— २ | | |
| २८ | ६ड | U.W.C. No 2/17 | झुलेलाल कॉलनी बॅरेक नं. ५७८ ओ.टी. सेक्शन उल्हासनगर— २ | ६ | शोचालय दुरुस्ती करणे |
| २९ | ७क | | वडार कॉलनी प्रेमलात यांच्या घरा मागे | १० | महिला करीता नविन शौचालय बनविणे |
| ३० | ७क | | बुध्द नगर, ब्रिजेश श्रीवास्तव यांच्याघरा मागे उल्हासनगर— २ | ६ | समाज मंदिर बांधणे |
| ३१ | ८अ | M.W.C. no 2/17 | एम.एम.आर.डी.ए. शौचालय बाजुला संतोषी माता मंदिर जवळ, गणेश कॉलनी सुभाष नगर, उल्हासनगर— ३ | १२ | हजेरी शेड तयार करणे |
| ३२ | ८ब | | बॅरेक क्र.११४७, प्रेम अहुजा दुधवाला मागे, तुलशी ट्रेडींग जवळ, उल्हासनगर— ३ | १२ | हजेरीशेड बांधणे |
| ३३ | ८ब | | बॅरेक नं. ७०५ समोर सेंट्रल पोलिस स्टेशन रोड, उल्हासनगर— ३ | ४ | नागरी सुविधा केंद्र कॅबिन बनविणे |
| ३४ | ८ब | | रेमि आपर्टमेंट मागे, पप्पु गार्डन परिसर उल्हासनगर— ३ | ३ | महापालिकेच्या गोडाऊन बनविणे |
| ३५ | ८ब | U.W.C.No 2/50 | एमएमआरडीए शौचालय बाजूला गौतम बुध्द नगर, उल्हासनगर— ३ | ५ | हजेरी शेड बांधणे |
| ३६ | ८ब | U.W.C.No 2/49 | नंदलाल किराणा स्टोर बाजूला, गौतम बुध्द नगर, उल्हासनगर— २ | २ | कंपोस्टिंग पिट तयार करणे |
| ३७ | ९क | | सुभाष नगर पंजाबी कॉलनी गुप्ता हाऊस समोर उल्हासनगर— ३ | १० | कंपोस्टिंग पिट तयार करणे |
| ३८ | १०क | | भाऊजी नगर, एम.एम.आर.डी. शौचालय च्या बाजूला उल्हासनगर— ३ | ६ | हजेरी शेड बांधणे |
| ३९ | १०ड | U.M.C.No.2/95 | बॅ नं. ११७६ जवळ, पवई चौक उल्हासनगर— ३ | १० | हजेरी शेड / स्टोर रुम बांधणे |
| ४० | १०ड | U.W.C. No 2/91 | बॅ नं.११५४ध्५५ जवळ, लाईन्सव क्लस मागिल धोबीघाटा पाडा | २ | हजेरी शेड / स्टोर रुम बांधणे/खत प्रकल्प बनविणे |
| ४१ | ११ब | U.W.C. No 3/11 | बॅरें न. १०३९ ते १०४० सेक्शन उल्हासनगर— ३ | १२ | महापालिकेच्या गोडाऊन बनविणे |
| ४२ | ११क | U.W.C. No 3/17 | बॅ नं. ८९६ नारायणदास हॉस्पीटल | ६ | महापालिकेच्या गोडाऊन बनविणे |
| ४३ | ११क | U.W.C.No 3/16 | बॅ नं. ९०१ समोर, | १० | महापालिकेच्या गोडाऊन बनविणे |
| ४४ | ११क | U.W.C.No 3/14 | बॅ नं. ९५७/ २२ सेक्शन | ६ | शौचालय बनविणे |
| ४५ | ११ड | | बॅ. नं. ९८५ जवळ न्यु पोस्ट ऑफीस मागे उल्हासनगर— ३ | १० | हजेरी शेड बांधणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४६ | ११अ | | सिन्धवाडी १७ सेक्शन ब्रेक नं. ८१४ | ३ | नविन शौचालय बनविणेबाबत कळविले आहेत्र |
| ४७ | ११अ | | बॅ नं. ८३९ गीता भवन हॉटेल के पिछे | २ | महापालिकेच्या गोडाऊन बनविणे |
| ४८ | ११अ | U.W.C. No 3/8 | बॅ नं. ८८७ जुना पोस्ट १९ सेकशन | १० | हजेरी शेड बांधणे |
| ४९ | ११अ | U.W.C. No 3/9 | बॅरेक नं. ८६२ दुर्गा नगर झोपडपट्टी | ४ | नविन शौचालय बनविणे |
| ५० | ११अ | | शिवालय केपास | ६ | हजेरी शेड बांधणे |
| ५१ | ११अ | U.W.C. No 3/12 | बॅ नं. ८७७ समाज हॉल के पिछे १९ सेक्शन | १० | महापालिकेच्या गोडाऊन बनविणे |
| ५२ | १२अ | | बॅरेक नं. ११०२ प्रति अपार्टमेंटच्या मागे उल्हासनगर–३ | ६ | महापालिकेच्या गोडाऊन बनविणे |
| ५३ | १२ब | U.WC. No 3/34 | बॅ नं. १०६५/१ च्या बाजुला ओ.टी. उल्हासनगर– ३ | ३ | साहित्य ठेवण्यासाठी गोडाऊन बनविणे |
| ५४ | १२ड | | रेणुका सोसायटी गल्ली नं. १ ओ.टी. सेक्शन उल्हासनगर– ३ | १० | आरोग्य केंद्र व हजेरी शेड तयार करणे |
| ५५ | १४अ | U.W.C. No 3/54 | शिव शक्ती कॉलनी | १० | समाज मंदिर/व्यायामशाळा बांधणे |
| ५६ | १४अ | | अशोक सोसायटी जवळ, | १० | आंगणवाडी साठी |
| ५७ | १४अ | | शिवम बार मागे | २ | ०२ सीटचे मुतारी आवश्यक |
| ५८ | १४अ | | बॅरेक नं. १३०१ च्या मागे | ५ | गार्डन बनविणेबाबत |
| ५९ | १४अ | U.W.C. No 3/52 | बॅरेक नं. १२९० | ३ | समाज मंदिर बांधणे/खत प्रकल्प बनविणे |
| ६० | १४अ | U.W.C. No 3/49 | बॅरेक नं. १३०१ | १० | समाज मंदिर बांधणे |
| ६१ | १४ब | U.W.C. No 3/56 | बॅ नं.१३८१ मोरया अर्पा च्या समोर, | ४ | समाज मंदिर बांधणे |
| ६२ | १४ब | U.W.C. No 3/57 | बॅ नं. १४१६ बाजुला उँ शिवधाम अर्पा च्या समोर, | ४ | समाज मंदिर बांधणे/खत प्रकल्प बनविणे |
| ६३ | १४क | | बॅ नं. १३५८ सुरेश सावंत यांच्याधरी जवळ, | ६ | नविन शौचालय तयार करणे |
| ६४ | १४ड | U.W.C. No 3/79 | शिवाजी मैदान पुरुष शौचालय | ४ | हजेरी शेड/समाज मंदिर बांधणे |
| ६५ | १४ड | U.W.C. No 3/81 | बॅ नं. १४१८ शौचालय | ३ | समाज मंदिर बांधणे |
| ६६ | १५अ | U.W.C. No | लक्ष्मी निवास बिल्डींग जवळ, | ४ | आरोग्य विभागाचे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | 3/86 | हींगो राणी वकील यांच्या घराजवळ ओ.टी. उल्हासनगर– ४ | | गोडाऊन बनविणे |
| ६७ | १५ब | U.W.C. No 3/89 | बॅ नं. १४८५ बलराम यांचे घराजवळ, गुजारती पाडयाजवळ, उल्हासनगर– ४ | ८ | |
| ६८ | १६अ | U.W.C. No 3/102 | बॅ नं.१६८२ समोर कॅनारा बॅकेच्या मागे | ६ | समाज हॉल तयार करणे/खत प्रकल्प बनविणे |
| ६९ | १७ | U.W.C. No 4/09 | बॅरेक नं १७२० जवळ, तहसिलदार ऑफीस जवळ, उल्हासनगर– ५ | ४ | हजेरी शेड बांधणे |
| ७० | १७ | U.W.C. No 4/10 | बॅ नं. ४०४ शासत्री हॉल बाजु मे उनगर – ५ | ३ | हजेरी शेड बांधणे |
| ७१ | १८ | U.W.C. No 4/26 | बॅ नं. ७१ जुली यांच्या घराच्या मागे उल्हासनगर– ५ | ३ | महापालिकेच्या गोडाऊन बनविणे |
| ७२ | १८ | U.W.C. No 4/25 | बॅ नं. ७१ रुम नं.४२६ सुरजीत कौर यांच्या घरा समोर, | ३ | आरोग्य विभागाचे गोडाऊन |
| ७३ | १८ | U.W.C. No 4/24 | बू नं. सी.६५ रु नं. ३८७ खत्री यांच्या घरासमोर, उल्हासनगर– ५ | ३ | आरोग्य विभागाचे गोडाऊन |
| ७४ | १८ | U.W.C. No 4/23 | बॅ नं. बी.७० झुझारराव यांच्या घरा समोर, उल्हासनगर– ५ | ३ | आरोग्य विभागाचे गोडाऊन |
| ७५ | १८ | U.W.C. No 4/22 | बू नं. ८० लक्ष्मण परमार यांच्या घरासमोर, उल्हासनगर– ५ | ३ | वाचनालय तयार करणे |
| ७६ | १८ | U.W.C. No 4/18 | बॅ नं. ७७ रुम नं. ४५९ मोहिते यांच्या घरासमोर कुल ि कॅम्प नं. ५ | ३ | हजेरी शेड बांधणे |
| ७७ | १८ | | बॅ नं. ६९ रुम ११ व १२ उल्हासनगर– ५ | ३ | वाचनालय तयार करणे |
| ७८ | १९अ | U.M.C.No 4/44 | लेखराज बर्नलवाला, बॅरेक नं. १८९३ उल्हासनगर – ५ | १४ | कंपोस्टिंग पिट तयार करणे |
| ७९ | १९अ | U.M.C.No 4/43 | बॅरेक नं. १८६१ जवळ, उल्हासनगर– ५ | ४ | आरोग्य विभागाचे गोडाऊन |
| ८० | १९अ | | गणेश नगर एम.एम.आर.डी. शौचालय मागे उल्हासनगर– ५ | १० | कंपोस्टिंग पिट तयार करणे |
| ८१ | १९अ | | बॅरेक नं. १८७७ रुम नं. १० च्या बाजुला, उल्हासनर– ५ | २ | समाज मंदिर बांधणे |
| ८२ | १९ब | U.M.C. no 4/45 | बॅरॅक नं. १८९९ च्या बाजुला उल्हासनगर– ५ | ४ | समाज मंदिर बांधणे |
| ८३ | १९ब | | बॅरॅक नं. १८९९ च्या बाजुला उल्हासनगर– ५ | २ | समाज मंदिर बांधणे |
| ८४ | १९ब | | बॅरेक नं. १९०३ च्या बाजुला उल्हासनगर– ५ | ६ | हजेरी शेड बांधणे |
| ८५ | १९ब | | बॅरेक नं. १९०३ च्या बाजुला | १४ | हजेरी शेड बांधणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | उल्हासनगर— ५ | | |
| ८६ | १९ब | | बॅरेक नं. १९२५ जवळ, उल्हासनगर— ५ | २ | समाज मंदिर बांधणे/खत प्रकल्प बनविणे |
| ८७ | १९ब | U.M.C.No 4/42 | साई नाथ कॉलनी बॅ नं. १८९२ जवळ, उल्हासनगर— ५ | १० | नविन शौचालय बनविणेबाबत कळविले आहे. |
| ८८ | १९क | U.M.C.No 4/39 | बॅरेक नं. १९५२ नेहरु गार्डन मागे, उल्हासनगर— ५ | १० | हजेरी शेड / स्टोर रुम |
| ८९ | १९क | U.M.C.No 4/38 | बॅरेक नं. १९३६ झुलेला टॉवर मागे उल्हासनगर— ५ | २४ | गार्डन बनविणेबाबत/नविन शौचालय बनविणे |
| ९० | १९क | U.M.C.No 4/37 | कैलाश कॉलनी उल्हासनगर— ५ | ६ | गोडाऊन |
| ९१ | १९क | | बॅरेक नं. १९५२ जवळ, ऑन प्लॉट उल्हासनगर— ५ | ४ | नविन शौचालय बनविणेबाबत कळविले आहे./खत प्रकल्प बनविणे |
| ९२ | १९क | | नेहरुनगर, नाल्या जवळ, उल्हासनगर— ५ | १० | समाज मंदिर |
| ९३ | १९क | | नेहरुनगर, माता मंदिर, उल्हासनगर— ५ | ४ | नविन शौचालय बनविणे |
| ९४ | १९ड | U.M.C.No 4/40 | बॅरेक नं. १९८४ जुना बस स्टॉप शाखेच्या मागे उल्हासनगर— ५ | ४ | नविन शौचालय बनविणे |
| ९५ | १९ड | | ब्रेक नं. २०४४ जवळ, से. ३६ उलहासनगर— ५ | १० | समोज मंदिर/खत प्रकल्प बनविणे |
| ९६ | २०ब | | कलर कंपनी मागे खदान जवळ, उल्हासनगर— ५ | ४ | नविन शौचालय बनविणे |
| ९७ | २०ब | | बॅरेक नं. २०८५ श्री. भजनलाल यांच्या घरा शेजारी, उल्हासनगर | ६ | आरोग्य विभागाचे गोडाऊन |
| ९८ | २०ब | | बॅरेक नं. २०७७,२०७६ श्री. सेरासिंग यांच्या घराजवळ, | ४ | कंपोस्टिंग पिट तयार करणे |
| ९९ | २०ब | | बॅरेक नं. २०८६ श्री. खन्ना पत्राका यांच्या शेजारी | ५ | शोचालय दुरुस्ती करणे |

तसेच दिनांक २५/०४/२०१८ रोजीपर्यंत कुठल्याही प्रकारच्या आक्षेप न आल्याने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये महानगरपालिकेचया मालमत्तेचा अन्य प्रकारे विनियोग करावयाचा झाल्यास मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

उक्त बाबी विचारात घेता उल्हासनगर शहरात एकुण ९९ नादुरुस्त शौचालयावर सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे कार्यवाहीस मंजुरी मिळण्यासाठी मा. स्थायी समिती पटलावर प्रस्ताव प्रस्तावित करणेत येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र.** ६४ **दिनांक:— २२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेत जोडलेल्या यादीनुसार उल्हासनगर शहरात ५ वर्षा पेक्षा जास्त वापरात नसलेली ९९ व सदस्यांनी सुचवलेले खालील प्रमाणे इतर शौचालयांचा समावेश करून निष्कासित करणेस मान्यता देत आहे.

• बॅ. नं. १४६४, ३० सेक्शन, उल्हासनगर–४ येथील शौचालय निष्कासित करुन ––– समाज मंदिर बांधणे.

• बॅ.नं. १४८५, १५०७ समोर महावीर अपार्टमेंट, स्टोर जवळ शौचालय निष्कासित करणे –

• बॅ.नं. १४५६ चे बाजूला स्त्री आणि पुरुष शौचालय निष्कासित करणे –

• गणेश नगर येथिल जोशी यांचे घराच्या बाजुला, पॅनल क्र. ५ असलेले शौचालय निष्कासित करुन ––– समाज मंदिर बनविणे

• पॅनल क्र. १७ मधील वाल्मीकी मंदिर, फालोअर लाईन, उल्हासनगर–५ च्या मागील बाजूस असलेले सार्वजनिक शौचालय निष्कासित करणे ––– मोफत अभ्यासिका केंद्र बनविणे

• पॅनल क्र. १७ मधील, त्रिमुर्ती परिसरातील बॅ.नं. १७१९ येथे असलेले सार्वजनिक शौचालय निष्कासित करुन ––– त्या ठिकाणी समाजमंदिर बनविणे.

• पॅनल क्र. १७ मधील, त्रिमुर्ती परिसरातील ब्लॉक नं. बी/४०, रुम नं. २३५ च्या मागील बाजूस असलेले शौचालय निष्कासित करुन ––– त्याठिकाणी सार्वजनिक वाचनालयाची निर्मिती करणे

• बॅरेक नं. १८१, राम काकारानी यांच्या घरासमोर शौचालय निष्कासित करुन ––– रोड बनविणे

• शिवसेना शाखा, बॅरेक नं. ११० चे पाईप लाईन १० सिट + ४ सिट + ६ सिट शौचालय निष्कासित करणे ––– ६ सिटचे नवीन शौचालय व समाज मंदिर बांधणे.

• बॅरेक नं. ११९ येथिल शौचालय निष्कासित करुन ––– समाज मंदिर बांधणे

• बॅरेक नं. १५० येथिल शौचालय निष्कासित करुन ––– नविन शौचालय बांधणे

• बॅरेक नं. १२२ येथिल शौचालय निष्कासित करुन ––– समाजमंदिर बांधणे

• के.के. धर्मानी येथिल शौचालय निष्कासित करुन ––– समाजमंदिर बांधणे

• बॅरेक नं. १०६५ समोर प्रेम सागर सोसायटी, ओ.टी. सेक्शन व बॅरेक नं. ११०१च्या पाठीमागे नवजीवन बॅक, ओ.टी. सेक्शन, उल्हासनगर–३ येथिल शौचालय निष्कासित करणे –

• गणेश कॉलनी उल्हासनगर–५ येथिल शौचालय निष्कासित करुन ––– नविन शौचालय बनविणे.

• रमाबाई आंबेडकर नगर येथिल एमएमआरडीएचे पुरुष व स्त्री शौचालय ––– दुरुस्ती करणे.

• महात्मा गांधी नगर, शारदा विदयामंदिराच्या पाठीमागील ६ सिट्चे शौचालय निष्कसित करुन – ६ सिट नविन शौचालय बांधणे.

• रमाबाई आंबेडकर नगर, शरद सोनवणे यांच्या घरासमोरील ६ सिट्चे शौचालय निष्कासित करुन – ६ सिट नविन शौचालय बांधणे.

• बॅरेक नं.३३७, सोनार गल्ली, जगदिश मंदिर समोर, उल्हासनगर–२ शौचालय निष्कसित करुन ––– खत प्रकल्प बनवणे/ लेडीज ओपन जिम/ नविन शौचालय बनवणे/ हजेरी शेड व गाडाऊन बनवणे.

• बॅरेक नं. ३५६ सोनार गल्ली, उल्हासनगर–२ शौचालय निष्कसित करुन – दुचाकी वाहन पार्किंग करीता सी.सी. बनवणे.

• बॅरेक नं.३४९ सोनार गल्ली, उल्हासनगर–२ शौचालय निष्कसित करुन – दोन सिटर शौचालय व मुतारी बनवणे.

• बॅरेक नं. ३५१ सोनार गल्ली, उल्हासनगर–२ शौचालय निष्कसित करुन – दुचाकी वाहन पार्किंगसाठी सी.सी. बनवणे.

• बॅरेक नं. ३१४, प्रकाय माखिजा ऑफिसच्या बाजुला, उल्हासनगर–२ शौचालय निष्कसित करुन – दुचाकी वाहन पार्किंगसाठी सी.सी. बनवणे.

• बॅरेक २९२, अण्णाभाऊ साठे चौक, खेमानी उल्हासनगर–२ शौचालय निष्कसित करुन – दुचाकी वाहन पार्किंगकरीता सी.सी. बनवणे.

• बॅरेक नं. ६२६, शिवमंदिर समोर, खेमानी उल्हासनगर–२ शौचालय निष्कसित करुन – दुचाकी वाहन पार्किंग करीता सी. सी. बनवणे.

• बॅरेक नं. ६२६, दुनीचंद कालानी बंगल्या समोर, खेमानी उल्हासनगर—२ शौचालय निष्कसित करुन— दुचाकी वाहन करीता सी.सी. बनवणे.

• झुलेलाल कॉलनी , बॅरेक नं. ५७८ ओ.टी. सेक्शन, उल्हासनगर—२ शौचालय निष्कसित करुन — दुचाकी वाहन करीता सी.सी. बनविणे.

• बॅरेक नं. ब, ४० रूम नं.२३५, च्या मागे, प्रकाश चक्की जवळ उल्हासनगर—५ शौचालय निष्कसित करणे —

• बॅरेक नं. १७१९ वाल्मिकी मंदिराच्या मागे शौचालय निष्कसित करणे —

• पॅनल नं. ७ क वडार कॉलनी प्रेमलात यांच्या घरामागे असलेले महिला शौचालय रद्द करुन त्याच्या बाजुला लागत शौचालय त्याठिकाणी १० लाख निधी दुरुस्तीच्या कामासाठी वर्ग करुन त्या जागेवर समाजमंदिर बांधणे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीद्वारे चार दिवसांचा आयोजित ''उल्हास फेस्टीवल'' कार्यक्रमाकरीता साहित्य पुरवठा करणेकरीता न्युनत्तम निविदाकार मे. अमरज्योत इंटरप्रायझेस, उल्हासनगर यांचे न्युनत्तम खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देणे.

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**कोणत्या निधितुन करायचे आहे.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**महिला व बालकल्याण समितीमधुन घ्यायचे आहे वर लिहिले आहे.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—**कोणता निधी आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**पेज २ वर लिहिले आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**कोणत्या लेखाशिर्षात आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**महिला व बालकल्याण समिती. आधी आपणाकडे आला होता हा प्रस्ताव आम्ही म्हटले गोषवा—यात बदल करुन आणावा.

**श्री. दत्तात्रय जाधव, प्र. भांडार विभाग प्रमुख:—**मला १९ तारखेला चार्ज दिला आहे. त्या आधी हे बनविले आहे. महोदया रजेवर आहेत म्हणुन मी येथे आलो आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—** इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ९ :—** उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीद्वारे चार दिवसांचा आयोजित ''उल्हास फेस्टीवल'' कार्यक्रमाकरीता साहित्य पुरवठा करणेकरीता न्युनत्तम निविदाकार मे. अमरज्योत इंटरप्रायझेस, उल्हासनगर यांचे न्युनत्तम खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती व्दारे चार दिवसांचा आयोजित ''उल्हास फेस्टीवल" कार्यक्रमा करिता साहित्य पुरवठा करणेकरीता ''ई टेंडर प्रक्रियेव्दारे" दोन लिफाफा पध्दतीने जाहिर निविदा मागविण्यात आल्या होत्या. नियमानुसार खालील तीन निविदाकारांनी वेबसाईट वरुन निविदा submit केल्या आहेत.

१) मे. अमरज्योत एंटरप्रायजेस, उल्हासनगर
२) मे. मोहित एंटरप्रायजेस, उल्हासनगर
३) मे. जे. ई. एंटरप्रायजेस, उल्हासनगर

दिनांक ०९/०३/२०१८ रोजी प्राप्त झालेल्या निविदा गुरुवार दिनांक २२/०३/२०१८ रोजी दुपारी ठिक ०३.०० वाजता निविदा कक्षामध्ये निविदा समिती समक्ष उघडण्यात आल्या आहेत.

लिफाफा क्र. १ च्या अहवालानुसार तीनही निविदाकार पात्र ठरल्याने लिफाफा क्र. २ वरिल सर्व उपस्थितांच्या समक्ष उघडण्यात आला. प्राप्त तीन निविदाकारांच्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे. (लिफाफा क्र. १चा अहवाल सोबत सादर)

(लिफाफा क्र. २ चा तुलनात्मक तक्ता)

| अ.क्र | तपशिल | आवश्यक परिणाम | पुरवठादाराचे नांव व त्यांनी सादर केलेले प्रति दर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मे. जे. ई. एंटरप्रायजेस, उल्हासनगर | मे. अमरज्योत एंटरप्रायजेस, उल्हासनगर | मे. मोहित एंटरप्रायजेस, उल्हासनगर |
| 1 | Stall 10x10 (for rental) (4 days) | 110 | ३८९००० | ३७५००० | ३८५००० |
| 2 | Table 3 inch stall (for rental) (4 days) | 110 | १५८००० | १५०००० | १६१००० |
| 3 | Chairs 5 inch stall (for rental) (4 days) | 110 | २७५०० | २५००० | २३००० |
| 4 | Visitors chairs (for rental) (4 days) | 200 | ८००० | ७५०० | ७३०० |
| 5 | Vip chairs for stage (for rental) (4 days) | 20 | १३००० | १२५०० | १२८०० |
| 6 | Cfl light 2 inch stall (for rental) (4 days) | 110 | ८२५०० | ८०००० | ८०००० |
| 7 | Focus 100w (5 days) | 150 Nos | ९१००० | ९०००० | ८८००० |
| 8 | Carpet (for rental) (4 days) | 27500 sqft | २४२५०० | २४०००० | २४१००० |
| 9 | Stage 30x20 (4 days) | 1 | ६३००० | ६०००० | ६१५०० |
| 10 | Advertising movie 2 nos | 5 | ७९००० | ७५००० | ७०००० |
| 11 | Photo (10x6) | 1000 | ४९००० | ४५००० | ४७००० |
| 12 | Small trophie (with umc city logo) | 50 | ४१००० | ३७५०० | ४०००० |
| 13 | Big trophie (with umc city logo) | 250 | १२८००० | १२०००० | १२४००० |
| 14 | Flower books | 20 | १०००० | ८००० | ११००० |
| 15 | Volentry (4 days) 20 each day | 20 nos | १२०००० | १२०००० | ११५००० |
| 16 | Generator (for rental) (5 days) | 2 nos | १९०००० | १७५००० | १९६००० |
| 17 | Gift (juice set) | 150 | १४८७५० | १४०००० | १४०००० |
| 18 | Shawl and coconut | 500 | १४४००० | १४०००० | १४६००० |
| 19 | Nasta pack (sandwich, gulabjam, biscuit) | 2000 | १९०००० | १८०००० | १८०००० |
| 20 | Fountain big size (for rental) (4 days) | 1 | ५०००० | ५०००० | ५२५०० |
| 21 | Banner for city add/welcome gate/stall (4 days) | 7500 Sqft | ३२०००० | ३००००० | ३००००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 22 | Advertisement moving vehicle (for rental) (4 days) | 4 | १६०००० | १५०००० | १६०००० |
| 23 | Cable advertisement | 1 week | ८०००० | ७५००० | ७५००० |
| 24 | 20 ltr water jar for stalls | 300 | ४०००० | ३९२०० | ३९२०० |
| 25 | 1 ltr bisleri bottle for officers and vips | 100 box | २०००० | १८००० | २१००० |
| 26 | Cable live program | 4 | ६६००० | ६०००० | ६२५०० |
| 27 | Cc camera (with tv and back up ) for rental | 4 | २४०००० | २२५००० | २३०००० |
| 28 | d.j. sound system (for rental) | 4 | ७२००० | ७०००० | ७५००० |
| 29 | Cloth bag with printing | 500 | ६०००० | ५०००० | ५५००० |
| 30 | Invition cards | 500 | २२००० | २०००० | २०००० |
| 31 | Colour certificate | 500 | ४४००० | ४०००० | ४०००० |
| 32 | Welcome gate (for rental) | 2 | ३०००० | २५००० | २७५०० |
| 34 | Maharastian traditional dances and singing (with famous advertise for 2 hrs daily) | 4 days | १७५००० | १५०००० | १४०००० |
| 35 | Sindhi Sanskrit darshan | 1 days | ८०००० | ७५००० | ७२५०० |
| 36 | Punjabi loknrutya | 1 days | ८०००० | ७५००० | ७२५०० |
| 37 | Gujrati Sanskrit program | 1 days | ८०००० | ७५००० | ७२५०० |
| 38 | Other cultural Sanskrit program | 1 days | ८०००० | ७५००० | ७२५०० |
| | | | ३८,७३,२५० | ३६,५२,७०० | ३७,१६,३०० |

तीनही निविदाकारांचा (लिफाफा क्र. २ चा तुलनात्मक तक्ता)

| अ.क्र | निविदाकारांचे नाव | एकूण प्राप्त दर (रु) |
|---|---|---|
| १ | मे. अमरज्योत एंटरप्रायजेस, उल्हासनगर | ३६,५२,७०० |
| २ | मे. मोहित एंटरप्रायजेस, उल्हासनगर | ३७,१६,३०० |
| ३ | मे. जे. ई. एंटरप्रायजेस, उल्हासनगर | ३८,७३,२५० |

उक्त तुलनात्मक तक्त्यानुसार निविदेमध्ये प्राप्त मे. अमरज्योत एंटरप्रायजेस, उल्हासनगर यांनी सादर केलेले न्युन्नतम दर रु. ३६,५२,७००/— हे अंदाजित दरापेक्षा ४: जास्त आहेत. यास्तव उप आयुक्त (मबाकस) यांनी आदेशित केल्यानुसार सदर निविदेतील दराच्या वाटाघाटीसाठी मे. अमरज्योत एंटरप्रायजेस, उल्हासनगर यांना पत्र क्र. उमपा/मबाकस/०९/, दिनांक २१/०४/२०१८ अन्वये दिनांक २३/०४/२०१८ रोजी दुपारी ०३.०० वाजता उप आयुक्त (मबाकस) यांचे दालनात बोलविण्यात आले व त्यानुसार संबंधित निविदाकारांने दिनांक २६/०४/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर साहित्य निविदेतील प्राप्त दर रु. ३६,५२,७००/— वरुन रु. ३४,९०,३००/— एवढया दरानुसार सदर कार्यक्रमाकरीता साहित्य पुरवठा करणेस तयारी दर्शवली होती.

त्याअनुषंगाने महिला व बाल विकास कल्याण समितीने न्युन्नतम दराच्या रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळण्याकरीता प्रस्ताव मा. स्थायी समितीस दि. २४/१०/२०१८ रोजीच्या गोषवारान्वये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास दिनांक ०२/११/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या बैठकित चर्चेवेळी प्रस्तावातील प्राप्त न्युन्नतम दरे व वाटाघाटी अंती निश्चित केलेली दरे यामध्ये तफावती आढळल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र. ४५, दिनांक ०२/११/२०१८ नुसार सदरचा प्रस्ताव दुरुस्त करुन फेरसादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्यामुळे संबंधिताना कारणे दाखवा नोटीस बजावून चूकीबाबत विचारणा केली असता सदर चूक ही टंकलेखन करतावेळी झाल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे सदर निविदेतील प्राप्त दर व वाटाघाटी अंती निश्चित झालेला दर यांची सुधारणा करुन तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | आवश्यक | प्राप्त न्यनत्तम दर रु. मे. अमरज्योत इंटरप्रायजेस, उल्हासनगर | वाटाघाटी अंती प्राप्त दर रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | Stall 10x10 (for rental) (4 days) | 110 | 375000 | 365000 |
| 2 | Table 3 inch stall (for rental) (4 days) | 110 | 150000 | 148000 |
| 3 | Chairs 5 inch stall (for rental) (4 days) | 110 | 25000 | 24000 |
| 4 | Visitors chairs (for rental) (4 days) | 200 | 7500 | 7200 |
| 5 | Vip chairs for stage (for rental) (4 days) | 20 | 12500 | 12250 |
| 6 | Cfl light 2 inch stall (for rental) (4 days) | 110 | 80000 | 79000 |
| 7 | Focus 100w (5 days) | 150 Nos | 90000 | 85000 |
| 8 | Carpet (for rental) (4 days) | 27500 sqft | 240000 | 235000 |
| 9 | Stage 30x20 (4 days) | 1 | 60000 | 59000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10 | Advertising movie 2 nos | 5 | 75000 | 69500 |
| 11 | Photo (10x6) | 1000 | 45000 | 44000 |
| 12 | Small trophie (with umc city logo) | 50 | 37500 | 37000 |
| 13 | Big trophie (with umc city logo) | 250 | 120000 | 118000 |
| 14 | Flower books | 20 | 8000 | 7800 |
| 15 | Volentry (4 days) 20 each day | 20 | 120000 | 114500 |
| 16 | Generator (for rental) (5 days) | 2 nos | 175000 | 174000 |
| 17 | Gift (juice set) | 150 | 140000 | 139500 |
| 18 | Shawl and coconut | 500 | 140000 | 138000 |
| 19 | Nasta pack (sandwich, gulabjam, biscuit) | 2000 | 180000 | 175000 |
| 20 | Fountain big size (for rental) (4 days) | 1 | 50000 | 49000 |
| 21 | Banner for city add/welcome gate/stall (4 days) | 7500 Sqft | 300000 | 285000 |
| 22 | Advertisement moving vehicle (for rental) (4 days) | 4 | 150000 | 124250 |
| 23 | Cable advertisement | 1 week | 75000 | 72500 |
| 24 | 20 ltr water jar for stalls | 300 | 39200 | 37830 |
| 25 | 1 ltr bisleri bottle for officers and vips | 100 box | 18000 | 17500 |
| 26 | Cable live program | 4 | 60000 | 59000 |
| 27 | Cc camera (with tv and back up ) for rental | 4 | 225000 | 200000 |
| 28 | sound system (for rental) | 4 | 70000 | 68000 |
| 29 | Cloth bag with printing | 500 | 50000 | 48000 |
| 30 | Invition cards | 500 | 20000 | 19500 |
| 31 | Colour certificate | 500 | 40000 | 35000 |
| 32 | Welcome gate (for rental) | 2 | 25000 | 24000 |
| 34 | Maharastiantraditional dances and singir (with famous advertise for 2 hrs daily) | 4 days | 150000 | 139000 |
| 35 | Sindhi Sanskrit darshan | 1 days | 75000 | 70000 |
| 36 | Punjabi loknrutya | 1 days | 75000 | 70000 |
| 37 | Gujrati Sanskrit program | 1 days | 75000 | 70000 |
| 38 | Other cultural Sanskrit program | 1 days | 75000 | 70000 |
| | | | 3652700 | 3490330 |

या अनुषंगाने निविदाकार मे. अमरज्योत इंटरप्रायजेस, उल्हासनगर यांना चार दिवसांचा आयोजित ‘‘उल्हास फेस्टीवल” कार्यक्रमा करिता साहित्य पुरवठा करणे पोटी रु. ३४,९०,३००/— एवढी रक्कम अदा करावी लागेल. तसेच निविदेमध्ये प्राप्त न्यन्नतम निविदाकार मे. अमरज्योत इंटरप्रायजेस, उल्हासनगर यांचे न्युन्नतम दर रु. ३४,९०,३००/— एवढा खर्चास व त्यांना पुढील आदेश करण्यासाठी सदर प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या प्रशासकिय व वित्तीय मंजूरीस्तव सविनय सादर

**स्थायी समिती ठराव क्र.** ६५ **दिनांकः— २२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीद्वारे चार दिवसांचा आयोजित ‘‘उल्हास फेस्टीवल’’ कार्यक्रमाकरीता साहित्य पुरवठा करणेकरीता न्युनत्तम निविदाकार मे. अमरज्योत इंटरप्रायझेस, उल्हासनगर यांचे न्युनत्तम दर रु. ३४,९०,३००/—एवढा खर्चास व त्यांना पुढील आदेश करण्यासाठी प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :—** श्रीमती प्रियंका राजाने आन कंस्ट्रक्शन सर्विस यांची स्थापत्य अभियंता /सल्लागार म्हणुन महापालिका पॅनलवर नेमणूक करणे.

---

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**याची फी कशी असणार? कारण आता एकच स्ट्रक्चरल इंजिनिअर असतो त्याच्या मनात जे येईल ती तो घेतो. कमीत कमी काय आहे जास्तीत जास्त काय आहे हे तर आपण ठरविले पाहिजे. स्केअर मीटर, स्केअर फीट असो एवढे एवढे घेणार असे पाहिजे ना.

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—**साहेब, हे ऑन कंस्ट्रक्शन आहे, यास आपणांस सर्टीफिकेट दयायचे आहे. त्यांना पॅनलवर घ्यायचे आहे, त्या आपल्या महापालिकेचे काम नाही करणार. स्ट्रक्चर ऑडिट करण्यासाठी घ्यायचे आहे. ते बिल्डींग प्लान अप्रुव्ह नाही करणार तर स्ट्रक्चरल ऑडिट करणार.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**त्या एकच होत्या काय?

**श्री. महेश शितलानी, प्र. शहर अभियंता :—**फक्त त्यांचेच प्राप्त झाले आहे. आमच्या सार्वजनिक विभागात एकच आले आहे.

**श्री. संदिप जाधव, कनिष्ट अभियंता:—**नगररचना विभागात सुध्दा फारवर्ड केले होते.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे :—**जाहिरात वगैरे देवुन मागवा ना. प्रत्येक प्रभाग समितीमध्ये मागवा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**नाखवा म्हणुन आहे त्याने कोणताही अहवाल पाठविला नाही आपली मनमानी चालु आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**नाखवाचे काय झालेले आहे त्यांना काम दिले की ती इमारत बरोबर आणि त्यांना काम नाही दिले तर मग ती डेंजरस बिल्डींग आहे ती पाडावी लागेल. त्यांचे दोन ठिकाणचे मला अनुभव आले आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**ठिक आहे यास मान्यता देतो, बाकी आपण मागवा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजा:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १० :—** श्रीमती प्रियंका राजाने आन कंस्ट्रक्शन सर्विस यांची स्थापत्य अभियंता /सल्लागार म्हणुन महापालिका पॅनलवर नेमणूक करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर शहरातील सर्वेक्षणात आढळून येणा-या धोकादायक व अतिधोकादायक इमारतींबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून इमारतींमधील रहिवाशांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ व २६५ अंतर्गत नोटीस बजावण्यात येते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६५ व त्यात दिनांक १४/०१/२००९ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ०६ अन्वये अंतर्भुत करण्यात आलेल्या कलम २६५ (अ) अन्वये उल्हासनगर शहरातील अशा प्रकारच्या जुन्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन या इमारती सुस्थितीत आहेत अथवा धोकादायक आहेत, याबाबतचा अहवाल सादर करण्यासाठी वेळोवेळी वर्तमानपत्रात सुचनापत्र प्रकाशित केले जाते. मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २६५ मधील २६५ अ समाविष्ट करणेस शासनाने १४ जानेवारी २००९ रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्राप्रमाणे ३० वर्ष जुन्या इमारती रहिवास योग्य असल्याचा दाखला महानगरपालिकेस सादर करण्याची कार्यवाही खाजगी इमारत धारक करीत नसल्याने महानगरपालिकेने ०७ स्ट्रक्चरल अभियंतांचे पॅनल निर्माण केले आहे. त्यांचेकडून इमारत तपासून घेणेसाठी प्रभाग क्षेत्र अधिकारी स्तरावर नोटीस बजावून, वृत्तपत्र इत्यादींमध्ये जाहिर सुचना प्रसिध्द केली जाते. नोटीस बजावल्यानंतरही इमारती खाली न केल्यास सदर इमारतींचा विद्युत व पाणीपुरवठा खंडीत करण्यात येतो.

दिनांक ०६/०७/२०१८ ते साधारणत: २०/७/२०१८ या दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली. या सातत्याने पडणाऱ्या पावसामुळे दिनांक ९/७/२०१८ रोजी उल्हासनगर-१ येथील शांतीपॅलेस या इमारतीचा स्लॅब कोसळला व दिनांक १५/७/२०१८ रोजी उल्हासनगर-५ येथील मुरलीवाला या इमारतीचा स्लॅब कोसळून एका महिलेचा दुर्देवी मृत्यु झाला व काहीजण जखमी झाले होते. त्यामुळे शहरातील सर्व इमारतींना मान्यताप्राप्त स्ट्रक्चरल इंजिनियर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट एका महिन्याचे आत करुन घेणे व तसे स्थैर्यता प्रमाणपत्र (Stability Certificate) या कार्यालयास सादर करणेबाबत नोटीस बजावण्यात आल्या.

शहरातील धोकादायक व अतिधोकादायक इमारतींबाबत वारंवार विधानसभेतही प्रश्न उपस्थित होतात. महापालिकेच्या पॅनलवर सध्या ०७ बांधकाम स्थापत्य सल्लागार आहेत. त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आला आहे. शहरातील इमारतींच्या सुरक्षिततेकरीता व कामाचा वाढता बोजा व गांभिर्य लक्षात घेता उल्हासनगर शहरातील इमारतींची तांत्रिक गुणवत्ता तपासणीकरीता सक्षम बांधकाम स्थापत्य सल्लागार कार्यरत असणे आवश्यक आहे.

श्रीम.प्रियंका राजाने, आन कंन्स्ट्रक्शन सर्वीस यांनी या कार्यालयात अर्ज केला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी त्यांचे शैक्षणिक, अनुभव इत्यादी कागदपत्र सादर केले आहेत. सध्या त्या कल्याण – डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट ची कामे सुरु आहेत. याबाबत श्रीम.प्रियंका राजाने, आन कंन्स्ट्रक्शन यांचेशी प्रत्यक्षात सविस्तरही चर्चा करण्यात आली आहे. त्यांचे कामातील अनुभव पाहता त्यांचेकडून इमारतींच्या पाया, जोत्यापासून शेवटच्या मजल्याच्या छप्परापर्यंत संपूर्ण इमारतीच्या सर्व बीम, कॉलम, भिंती, स्लॅब इत्यादी घटकांची सखोल पाहणी तसेच आवश्यक त्या चाचण्या जसे की, रिबाउंड हॅमर टेस्ट, अल्ट्रा सोनिक पल्स व्हेलॉसिटी, कार्बोनेशन टेस्ट, हाफ सेल पोटेंशियल टेस्ट, कोअर टेस्ट इत्यादी चाचण्या करुन घेण्यात येणार आहेत.

तरी शहरातील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेकरीता श्रीम.प्रियंका राजाने, आन कंन्स्ट्रक्शन सर्वीस यांची महापालिकेच्या पॅनलवर स्थापत्य अभियंता (Structural Engineer) म्हणून नेमणूक करणेस मा.स्थायी समितीची मान्यता मिळणेस प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र. ६६** **दिनांकः–२२/११/२०१८**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. भगवान भालेराव

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेकरीता श्रीमती प्रियंका राजाने आन कंस्ट्रक्शन सर्विस यांची स्थापत्य अभियंता /सल्लागार म्हणुन महापालिका पॅनलवर नेमणूक करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११ :—** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंती निमित्त येणाऱ्या अनुयायांसाठी पाणी, चहा, बिस्कीटस् पुरवठा केलेल्या कामाची माहीती देणे.

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारेः—**माहितीसाठी आहे काय, पास करा.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—**यामध्ये काय झाले आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त काही ७ लाख ५० हजार खर्च करण्यात आला होता, मला वाटते त्यावेळेस आपले बोडके साहेब आहे त्यांच्याकडे चार्ज होता. पण श्री. भालेराव साहेबांनी सांगितले की तुम्ही करुन टाका. त्यावेळी स्वाक्षरी झाली नाही परंतु ते आमच्या अधिकारात होते. आपणाकडे येण्याचे कारण एकच आहे की त्यास मंजुरी नसल्यामुळे आर्थिक समिती आपण आहात, तसे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राष्ट्रीय जयंती आहे. त्यांचा खर्च कसा केला काय केले हे पाहण्यापेक्षा स्थायी समिती आर्थिक समिती असल्यामुळे त्यांच्या निदर्शनास आणुन देत आहोत, म्हणुन हा प्रस्ताव तुमच्याकडे पाठविला.

**सदस्य श्री. भारत राजवानी :—**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती जया प्रकाश माखिजाः—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ११ :—** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंती निमित्त येणाऱ्या अनुयायांसाठी पाणी, चहा, बिस्कीटस् पुरवठा केलेल्या कामाची माहीती देणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका तर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंती निमित्त येणाऱ्या अनुयायांसाठी पाणी, चहा, बिस्कीटस्ची व्यवस्था दिनांक १३/०४/२०१८ च्या रात्री ते १४/०४/२०१८ या कालावधीत (२ दिवस) महापालिका मुख्यालय व शहरातील दर्शनिय ठिकाणी वरील साहीत्याची व्यवस्था करण्यात आली होती. सदरचे कार्य १४/४/२०१८ रोजी पूर्ण झालेले आहे. सदर प्रस्तावास अतिरीक्त आयुक्त यांनी दिनांक १८/७/१८ रोजी मान्यता दिलेली आहे. परंतू तत्कालीन आयुक्त यांची मान्यता झालेली नसल्या कारणामुळे सदर कार्यक्रमासाठी झालेल्या खर्चाचे अदायगी अदयाप पर्यंत करण्यात आलेले नाही. त्यामुळे झालेल्या खर्चाच्या संचिका अदयाप पर्यंत भांडार विभागात प्रलंबित होत्या.

| अ.क्र | कामाचे नाव | मंजूर रक्कम | एजंन्सीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंती निमित्त येणाऱ्या अनुयायांसाठी पाणी, चहा, बिस्कीटस् व्यवस्था करणेबाबत. (चहा,बिस्कीटस्, पाणी, फोटो, व्हिडीओ शुटींग, बॅनर्स, महापालिका गेट डेकोरशन, महापालिका मुख्यालयाला लाईटींग,मंडप) | ७,६०,८०० | मे. साईबाबा एंटरप्रायझेस उल्हासनगर—३ |

उपरोक्त बाबत झालेल्या खर्चाची अदायगी करणेबाबत निर्णयार्थ प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर.

**स्थायी समिती ठराव क्र.** ६७ **दिनांकः—२२/११/२०१८**

सुचकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंती निमित्त येणाऱ्या अनुयायांसाठी पाणी, चहा, बिस्कीटस् पुरवठा केलेल्या कामाची माहीती नोंद करीत आहे.

तसेच याबाबत झालेल्या खर्चाची अदायगी करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

दुपारी २.३० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती जया प्रकाश माखिजा यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका